# धुळे महानगरपालिका,धुळे

## नगरसचिव कार्यालय

## स्थायी समिती सभा क्रमांक २ चे इतिवृत्त

---

**धुळे मनपा भारतरत्न अटलबिहारी वाजपेयी सभागृह**
**मंगळवार दिनांक २३/०२/२०२१**
**वेळ दुपारी ४-०० वाजता.**

धुळे महानगरपालिका स्थायी समितीची आज मंगळवार दिनांक २३/०२/२०२१ रोजी दुपारी ४-०० वाजता **मा.श्री संजय सुधाकर जाधव, सभापती,** स्थायी समिती, मनपा, धुळे यांच्या अध्यक्षतेखाली **धुळे मनपा भारतरत्न अटलबिहारी वाजपेयी सभागृह** भरली. स्थाक्षरी बुकावर सही करुन खालील सन्मा.सदस्य सभागृहात हजर होते.

| अ.क्रं. | सदस्यांचे नांव | हुद्दा |
|---|---|---|
| १ | श्री. जाधव संजय सुधाकर | सभापती |
| २ | श्री. बैसाणे सुनिल तुळशिराम | सदस्य |
| ३ | श्रीमती पाटील मंगला सुरेश | सदस्या |
| ४ | श्री. देवरे कमलेश नारायण | सदस्य |
| ५ | श्रीमती पठाण हिना अस्लम | सदस्या |
| ६ | श्री. नवले शितल मोहन | सदस्य |
| ७ | श्री. बोरसे नागसेन दामोदर | सदस्य |
| ८ | श्रीमती कुलेवार किरण राकेश | सदस्या |
| ९ | श्रीमती. वराडे वैशाली भिकन | सदस्या |
| १० | श्री. जाधव बन्सीलाल माणिक | सदस्य |
| ११ | श्रीमती चौधरी मंगला अर्जुन | सदस्या |
| १२ | श्री. पटेल अमीन अब्दुल करीम | सदस्य |

उपस्थित अधिकारी गण

| अ.क्र. | अधिकाऱ्यांचे नाव | हुद्दा |
|---|---|---|
| १ | श्री. अजिज शेख | आयुक्त |
| २ | श्रीमती शिल्पा नाईक | उपायुक्त |
| ३ | श्रीमती पल्लवी शिरसाठ | सहा. आयुक्त |
| ४ | श्री मनोज अरविंद वाघ | प्र.नगरसचिव |
| ५ | श्री. दिनकर जाधव | मुख्य लेखाधिकारी |
| ६ | श्री. पी.डी. चव्हाण | प्र . अभियंता |
| ७ | डॉ. श्री महेश मोरे | आरोग्याधिकारी |

| | | |
|---|---|---|
| ८ | श्री. चंद्रकांत जाधव | सहा.आरोग्याधिकारी |
| ९ | श्री. प्रकाश सोनवणे | ओव्हरसिअर नगररचना विभाग |
| १० | श्री. एन.पी. सोनार | इस्टेट मॅनेजर |
| ११ | श्री. रमजान अन्सारी | प्र. कार्यालय अधिक्षक |
| १२ | श्री.बी.एस. सोनवणे | प्र. परवाना अधिक्षक |
| १३ | श्री. बी.एस. रनाळकर | सहा.कर मूल्य निधारण अधिकारी |
| १४ | श्री. एन.के. बागुल | विद्युत अभियंता |
| १५ | श्री. सी.एम. उगले | ओव्हरसिअर पा.पु. विभाग |
| १६ | श्री.राजेश गायकवाड | लेखापाल मनपा शिक्षण मंडळ |
| १७ | श्री.राजू माईनकर | भांडारपाल |
| १८ | श्री. हेमत पावटे | ओव्हरसिअर बांधकाम विभाग |
| १९ | श्री. सी.सी. बागुल | ओव्हरसिअर पा.पु. विभाग |
| २० | श्री. किशोर सुडके | बाजार विभाग |
| २१ | श्री. प्रसाद जाधव | अति. विभाग |
| २२ | श्री. संक्राम आत्या राऊत | वाहन विभाग |

म. नगरसचिव — स्थायी समिती सभापती पदी श्री. संजय सुधाकर जाधव यांची निवड झाल्याबद्दल तसेच स्थायी समिती सदस्य पदी ज्या सदस्यांची निवड झाली त्याबद्दल प्रशासनाच्या वतीने त्यांचे स्वागत करतो.अधिनियमातील तरतुदीनुसार सभापती निवडी नंतरची पहिला सभा आयुक्तांनी बोलाविणेची तरतूद आहे. त्यानुसार आजची पहिली सभा बोलाविण्यांत आली आहे.

मा. सभापती — सन्मा.सदस्य मा.आयुक्त सो. सर्व अधिकारी कर्मचारी व पत्रकार, छायाचित्रकर बांधव यांचे मी स्थायी समितीच्या बैठकीत स्वागत करतो.सभेचा कोरम पुर्ण झाला असुन नगरसचिव यांनी सभेचे कामकाज सुरु करावे.

म. नगरसचिव — वंदे् मातरम् या राष्ट्रवंदनेसाठी सर्वांनी उभे रहावे.

प्रशासनाच्या वतीने मा.आयुक्त साहेब यांनी नुतन सभापती श्री. संजय सुधाकर जाधव यांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत केले.

तसेच धुळे महानगरपालिकच्या उपायुक्त पदी श्रीमती शिल्पा नाईक हया दि. ८ फेब्रुवारी २०२१ रोजी रुजू झालेल्या आहेत. त्यांचे मा. सभापती यांनी पुष्पगुच्छ देऊन स्वागत केले. तसेच सभागृहासमोर त्यांनी त्यांचा परिचय करुन दिला.

विषय क्रमांक :- ०२ — स्थायी समितीच्या साप्ताहिक सभेचा वार व वेळ निश्चित करणे.

म. नगरसचिव — नगरसचिव यांनी विषयांचे वाचन केले.

म. शितल नवले — आज स्थायी समितीच्या साप्ताहिक सभेचा वार व वेळ निश्चित करणेची पहिली सभा आहे. मी आयुक्त सो. यांना विनंती करेल की त्यांनी स्थायी समितीच्या जास्तीत जास्त बैठकांना स्वत:उपस्थित रहावे. शहराच्या विकासाचे महत्वाचे प्रश्न या स्थायी समितीमार्फत सोडविले

जातात. त्यामुळे त्याबाबत तात्काळ निर्णय होणे गरजेचे आहे. त्यामुळे आयुक्तांची उपस्थिती स्थायी समितीच्या बैठकांना गरजेची आहे. त्यासाठी आयुक्तांच्या सोयीने बैठकीचा वार व वेळ ठरविल्यास सोयीचे होईल. तसेच एम.जी.पी. मार्फत अक्कलपाडा ते हनुमान टेकडी जलशुध्दीकरण केद्रापर्यंत पाईप लाईन टाकण्यांचे काम सुरु आहे.परंतु अद्याप पावेतो जॅक्वेलच्या कामाबाबत निर्णय झालेला नाही. त्यामुळे सदर निर्णय लवकरात लवकर घेतला गेला पाहिजे.

म. सुनिल बैसाणे — नुतन सभापती श्री. संजय भाऊ जाधव यांना येणा-या काळात निश्चित जुने अनुभव कामास येतील कारण त्यांनी स्थायी समितीचे सभापती पद भूषविलेले आह. त्यांची दुस-या इनिंगला कार्याचा अनुभव उपयोगी पडणार आहे. स्थायी समितीच्या माध्यमातून व तिच्या सहमतीने कार्यकुशलपणे काम करु या. मा. आयुक्त सो. हे मागील काळात जास्तीत जास्त बैठकांना उपस्थित होते. अनेक धोरणात्मक निर्णय मागील काळात आनलाईन मिटींगच्या माध्यमातून सभागृहात उपस्थित राहिले. मागील वेळी सभेचा वार गुरुवार व सभेची वेळ सकाळी 11-00 वाजेची ठेवण्यांत आली होती. प्रशासनाच्या दृष्टीकोनातून गुरुवार हा योग्य वार आहे.व सभेची वेंळ देखील 11-00 वाजेची ठेवण्यांत यावी. तसेच नुतन सभापती यांना त्यांच्या पुढील वाटचालीस शुभेच्छा देतो व येणा-या काळात अतिशय चांगल्या प्रकारे व पारदर्शक निर्णय स्थायी समितीच्या माध्यमातून घेतले जावे अशी अपेक्षा व्यक्त करतो.

म. अमीन पटेल — स्थायी समितीचा वार व वेळ निश्चित करण्यासाठी सभा बोलविली आहे. ते ठरविण्यांत यावे परंतु जेष्ठ नगरसेवकाची पाण्याच्या मुद्दा उपस्थित केला आहे. उन्हाळा सुरु होत आहे. त्यादृष्टीने पाण्याचे व्यवस्थित नियोजन झाले पाहिजे. जेष्ठ सदस्यांनी सभेचा वार गुरुवार व वेळ सकाळी 11-00 वाजेची सुचविलेली आहे हे योग्य आहे.

म. कमलेश देवरे — सर्व प्रथम नुतन सभापती श्री. संजय भाऊ जाधव यांचे राष्ट्रवादी कॉग्रेस पक्षाच्या वतीने अभिनंदन करतो. मागील सभापती महोदयांनी देवपूर भागातील भूमिगत गटार योजनेच्या कामांच्या संदर्भात येणा-या अडचणीसाठी सभागृहात विषय मांडल्यानंतर आम्हाला साथ दिली. सदर विषय लवकरात लवकर मार्गी लावण्यांत यावा ही आपणास विनंती आहे.

म. आयुक्त — आदरणीय सभापती सर्व सन्मा. सदस्य नवनियुक्त सदस्य तसेच नुतन सभापती महोदयांना शुभेच्छा देतो. पहिली बैठक आहे. या बैठकीत साप्ताहिक सभेचा वार व वेळ निश्चित करावा लागतो. तो आज आपणास ठरवावयाचा आहे. ठरविलेल्या दिवशी काही कारणामुळे सभा झाली नाही तर अन्य इतर वेळी देखील सभा भरविण्यांत येऊ शकतात. कोणत्याही दिवशी सभा असली तरी प्रशासनास अडचण नाही. प्रशासन संपूर्ण सहकार्य करण्यासाठी तयार आहे. आपल्या सुचनेनुसार स्थायी समितीच्या बैठकांना वेळेच्या उपलब्धतेनुसार निश्चितच उपस्थित राहण्याचा प्रयत्न असेल व शहराच्या महत्वपूर्ण विषयावर निश्चितच उपस्थित राहणार आहे. काही अपरिहार्य कारणास्तव किंवा अन्य महत्वाच्या बैठकांमुळे काही वेळेला बैठकीला उपस्थित राहता येवू शकत नाही. परंतु जास्तीत जास्त बैठकीना उपस्थित राहीन. आपण या ठिकाणी अक्कलपाडा पाणीपुरवठयाच्या कामाबाबत प्रश्न उपस्थित केला आहे. याबाबत माझे देखील प्रशासनाच्या वतीने प्रयत्न सुरु आहे. सदर आठवडयाला संबंधित अधिका-यांसमवेत बैठका घेण्यांत येत असून प्राधान्याने जॅक्वेलच्या कामाबाबत चर्चा झालेली आह. पुढील बैठकीत सभापती महोदय व आपणही उपस्थित राहिल्यास आपण त्या प्रमाणे आवश्यक ते नियोजन करु व लवकरच काम मार्गी लावू.

म. शितल नवले — मी याबाबत सूचीत करु इच्छितो की,भातसा गंगापूर डॅम इत्यादी ठिकाणी काम केलेले सेवानिवृत्त अभियंता यांच्याशी माझा संपर्क झालेला आहे. आपण जॅकवेलच्या कामाबाबत त्यांचे मार्गदर्शन घेवू शकतो व आहे त्या परिस्थितीत काम चालू करु शकतो.

म. सभापती — सर्व सन्मा.सदस्यांनी केलेल्या सुचनेचे मी स्वागत करतो.स्थायी समिती ही शहराच्या विकासाच्या दृष्टीने निर्णय घेणारी महत्वाची समिती आहे. मी आयुक्त साहेबांना विनंती करेन की त्यांनी स्थायी समितीच्या बैठकांना वेळ दयावा. जेणे करुन महत्वाचे निर्णय घेणे सोयीचे होणार आहे. सर्व सन्मा. सदस्यांच्या सहमतीने स्थायी समितीच्या साप्ताहिक सभेचा वार गुरुवार निश्तचत करण्यांत येत असून सभेची वेळ सकाळी ११-०० वाजेची निश्चित करण्यांत येत आहे.तसेच अन्य दिवशीही आवश्यकतेनुसार व तांतडीच्या प्रसंगी स्थायी समिती सभापती यांच्याआदेशाने बैठक आयोजन करण्यांस मान्यता देण्यांत येत आहे.

**धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर ०१ दिनांक २३/०२/२०२१**

कार्यालयीन अहवालानुसार धुळे महानगरपालिकेच्या स्थायी समिती सभापती पदाची निवडणूक दिनांक १८/०२/२०२१ रोजी होऊन स्थायी समिती सभापती पदी श्री. संजय सुधाकर जाधव हे निवडून आलेले आहेत.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम प्रकरण २ महानगरपालिका स्थायी समिती परिवहन समिती इत्यादीचे कामकाज यामध्ये खालील प्रमाणे तरतूद आहे.

**स्थायी समितीचे कामकाज**

३) स्थायी समितीच्या कामकाजाचे नियमन करण्यासंबंधी तरतुदी—

अ) स्थायी समितीची सभा आठवड्यातून एकदा आणि आवश्यक वाटेल अशा अन्य वेळी भरवण्यांत आली पाहिजे.

ब) प्रत्येक स्थायी समितीची पहिला सभा आयुक्त ठरवील अशा दिवशी व वेळी भरवण्यात आली पाहिजे. आणि जर ती त्या दिवशी भरवण्यात आली नाही तर ती आयुक्त ठरवील अशा नंतरच्या एखादया दिवशी भरवण्यात आली पाहिजे. आणि स्थायी समितीची त्यानंतरची प्रत्येक सभा उक्त समिती वेळोवेळी ठरवील अशा दिवशी अशा वेळी भरवण्यात आली पाहिजे.अशी तरतूद आहे.

सर्व उपस्थित सन्मा.सदस्यांच्या सहमतीने स्थायी समितीच्या साप्ताहिक सभेचा वार गुरुवार ठेवण्यांस व सभेची वेळ सकाळी ११-०० वाजेची ठेवण्यांस मान्यता देण्यांत येत आहे. तसेच अन्य दिवशीही आवश्यकतेनुसार व तांतडीच्या प्रसंगी स्थायी समिती सभापती यांच्याआदेशाने बैठक आयोजन करण्यांस मान्यता देण्यांत येत आहे.

**सर्वानुमते मंजुर,**

**सही/-x x x**

**सभापती,**

**स्थायी समिती,**

**धुळे महानगरपालिका,धुळे**

# धुळे महानगरपालिका,धुळे

## नगरसचिव कार्यालय

## स्थायी समिती सभा क्रमांक ३ चे इतिवृत्त

---

**धुळे मनपा भारतरत्न अटलबिहारी वाजपेयी सभागृह**
**गुरुवार दिनांक २५/०२/२०२१**
**वेळ सकाळी ११-०० वाजता.**

धुळे महानगरपालिका स्थायी समितीची आज गुरुवार दिनांक २५/०२/२०२१ रोजी सकाळी ११-०० वाजता **धुळे मनपा भारतरत्न अटलबिहारी वाजपेयी सभागृह आयोजित करण्यांत आली.** सदर सभेस स्वाक्षरी बुकावर सही करुन खालील सन्मा.सदस्य सभागृहात हजर होते.

| अ.क्रं. | सदस्यांचे नांव | हुद्दा |
|---|---|---|
| १ | श्री. बैसाणे सुनिल तुळशिराम | सदस्य |
| २ | सौ. माळी भारती अशोक | सदस्या |
| ३ | सौ. बोरसे पुष्पा प्रकाश | सदस्या |
| ४ | श्री. मासुळे अमोल पावबा | सदस्य |
| ५ | श्री. देवरे कमलेश नारायण | सदस्य |
| ६ | श्रीमती पठाण हिना अस्लम | सदस्या |
| ७ | श्री. सईद बेग आशम बेग | सदस्य |
| ८ | श्री. नवले शितल मोहन | सदस्य |
| ९ | श्री. बोरसे नागसेन दामोदर | सदस्य |
| १० | श्री. जाधव बन्सीलाल माणिक | सदस्य |
| ११ | श्रीमती चौधरी मंगला अर्जुन | सदस्या |
| १२ | श्री. पटेल अमीन अब्दुल करीम | सदस्य |

उपस्थित अधिकारी गण

| अ.क्रं. | अधिकाऱ्यांचे नाव | हुद्दा |
|---|---|---|
| १ | श्री. अजिज शेख | आयुक्त |
| २ | श्री. गणेश गिरी | अति.आयुक्त |
| ३ | श्रीमती शिल्पा नाईक | उपायुक्त (१) |
| ४ | श्री. शांताराम गोसावी | उपायुक्त |
| ५ | श्रीमती पल्लवी शिरसाठ | सहा. आयुक्त तथा मुख्य लेखा परीक्षक |
| ६ | श्री. विनायक कोते | सहा. आयुक्त |
| ७ | श्री. महेंद्र परदेशी | नगररचनाकार |
| ८ | श्री मनोज अरविंद वाघ | प्र.नगरसचिव |
| ९ | श्री. दिनकर जाधव | मुख्य लेखाधिकारी |
| १० | श्री. पी.डी. चव्हाण | प्र.अभियंता |

| | | |
|---|---|---|
| ११ | डॉ. श्री महेश मोरे | आरोग्याधिकारी |
| १२ | श्री. चंद्रकांत जाधव | सहा.आरोग्याधिकारी |
| १३ | श्री. लक्ष्मण पाटील | सहा.आरोग्याधिकारी |
| १४ | श्री. पी.डी. नाईक | लेखापाल |
| १५ | श्री. एन.पी. सोनार | इस्टेट मॅनेजर |
| १६ | श्री. रमजान अन्सारी | प्र. कार्यालय अधिक्षक |
| १७ | श्री.बी.एस. सोनवणे | प्र. परवाना अधिक्षक |
| १८ | श्री. बी.एस. रनाळकर | सहा.कर मूल्य निधारण अधिकारी |
| १९ | श्री. गितेश सोनार | विद्युत विभाग |
| २० | श्री. सी.एम. उगले | ओव्हरसिअर पा.पु. विभाग |
| २१ | श्री. महेंद्र सोनवणे | प्रशासन अधिकारी मनपा शिक्षण मंडळ |
| २२ | श्री.राजू माईनकर | भांडारपाल |
| २३ | श्री. हेमत पावटे | ओव्हरसिअर बांधकाम विभाग |
| २४ | श्री. सी.सी. बागुल | ओव्हरसिअर पा.पु. विभाग |
| २५ | श्री. किशोर सुडके | बाजार विभाग |
| २६ | श्री. प्रसाद जाधव | अति. विभाग |
| २७ | श्री. सुक्राम आत्या राऊत | वाहन विभाग |

म. नगरसचिव — आजच्या बैठकीस विद्यमान सभापती श्री.संजय सुधाकर जाधव हे प्रकृती आवस्थामुळे बैठकीस अनुपस्थित आहेत.याबाबत त्यांनी रजेचा अर्ज सादर केलेला आहे. विद्यमान सभापतीच्या अनुपस्थितीमुळे त्यांच्या जागी उपस्थित सदस्यांमधून एका सदस्यांची हंगामी सभापती म्हणून नियुक्ती करता येईल यासाठी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम प्रकरण 2 नियम 3 ई नुसारउपस्थित सदस्यांमार्फत आजच्या बैठकीसाठी सभापती म्हणून निवड करण्यांत यावी.

म. नगरसचिव — वरील विषयान्वये आज रोजीच्या स्थायी समितीच्या सभेस मा.विद्यमान सभापती हे अनुपस्थित असल्याने महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम प्रकरण 2 नियम 3 ई नुसार आजच्या स्थायी समिती बैठकीच्या सभापती पदी श्री. सुनिल तुळशिराम बैसाणे यांची नियुक्ती करण्यांत यावी असे पत्र श्री.बन्सीलाल जाधव,श्री.शितलकुमार नवले,श्री.अमोल मासुळे,सौ. भारतीताई माळी, श्री.कमलेश देवरे,श्री.अमीन पटेल,श्री.नागसेन बोरसे यांनी सादर केलेले आहे. त्यानुसार आजच्या बैठकीचे कामकाज करण्यासाठी श्री सुनिल बैसाणे यांनी सभापती पदी विराजमान व्हावे.

म. सभापती — सर्वांनी माझ्यावर विश्वास ठेवून आजच्या बैठकीसाठी सभापती म्हणून माझी निवड केली याबद्दल मी प्रथमत:सर्वाचे आभार व्यक्त करतो.सभेचे कामकाज चालविणेसाठी आवश्यक तो कोरम पूर्ण झालेला असल्याने नगरसचिव यांनी सभेच्या कामकाजास सुरुवात करावी.

म. नगरसचिव — वंदे् मातरम् या राष्ट्रवंदनेसाठी सर्वांनी उभे रहावे.\

**सन्मा. सदस्यांकडून आलेले रजेचे अर्ज**

सन्मा.सदस्या सौ.किरण राकेश कुलेवार व सौ.वैशाली भिकन वराडे यांनी आजच्या सभेस अर्जात नमूद केलेल्या कारणामुळे उपस्थित राहू शकत नसल्याने रजा मंजूर करणेबाबत विनंती केली आहे.

म. सभापती सन्मा.सदस्यांच्या आलेल्या विनंती अर्जावरुन रजा मंजूर करण्यांत येत आहे.

**धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर ०२ दिनाक २५/०२/२०२१**

सन्मा.सदस्या सौ. किरण राकेश कुलेवार व सौ.वैशाली भिकन वराडे यांनी आजच्या सभेस अर्जात नमूद केलेल्या कारणामुळे उपस्थित राहू शकत नसल्याने रजा मंजूर करणेबाबत विनंती केली आहे.

सन्मा.सदस्यांच्या आलेल्या विनंती अर्जावरुन आजच्या सभेस रजा मंजूर करण्यांत येत आहे.

**सर्वानुमते मंजुर,**
**सही/- x x x**
**सभापती,**
**स्थायी समिती,**
**धुळे महानगरपालिका,धुळे**

विषय क्रमांक:-३ मा.आयुक्त सो. धुळे महानगरपालिका धुळे यांच्या पत्रानुसार सन २०२०-२१ चे सुधारीत व सन २०२१-२२ चे मुळ अंदाजपत्रक सादर करणे.

म. नगरसचिव नगरसचिव यांनी विषयांचे वाचन केले.

म. नगरसचिव आज सन २०२०-२१ चे सुधारीत व सन २०२१-२२ चे मुळ अंदाजपत्रक मे. स्थायी समिती सभेसमोर सादर होणार आहे.मी मा. आयुक्त महोदयांना विनंती करेन त्यांनी अंदाजपत्रक प्रशासनामार्फत मा.सभापती यांच्याकडेस सादर करावे. तसेच या अंदाजपत्रकाच्या प्रती सन्मा. उपस्थित सदस्यांना वितरीत करण्यांत याव्यात.

म. नगरसचिव अंदाजपत्रकाच्या प्रती प्रशासनामार्फत स्थायी समिती समोर देण्यांत आलेल्या आहेत. या बाबत मी मा. आयुक्त महोदयांना विनंती करेन की, अंदाजपत्रकाचे सादरीकरण व विवेचन सभागृहासमोर सादर करावे.

म. आयुक्त महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम १०३ व १०४ नुसार सन २०२०-२१ चे सुधारित व कलम ९५ नुसार सन २०२१-२२ चे मूळ अंदाजपत्रक आज मी स्थायी समितीसमोर सादर करत आहे.

महानगरपालिकेच्या निर्मिती नंतरही महापालिकेच्या कारभारात अनेक स्थित्यतंरे होत गेलेली आहेत. १९८६ साली नगरपालिकेची हद्दवाढ झाली व तद्नंतर जानेवारी २०१८ मध्ये महानगरपालिकेची हद्द वाढ झालेली असुन एकुण क्षेत्र १०१.०८ चौ.कि.मी. असुन लोकसंख्या ४.४६,०९४ इतकी आहे. धुळे शहरासाठी नियोजनबध्द व विकासात्मक कामे करण्यावर सद्यस्थितीत भर दिला जाता आहे. यात यापुर्वी अनेक समस्या होत्याच परंतु तरीही यातुन मार्गक्रमण करुन वाटचाल करण्याचा प्रयत्न राहिलेला आहे.

स्थानिक स्वराज्य संस्थेमध्ये कार्यरत कार्यकारी अधिका-यांनी प्रशासकीय शिस्त, पारदर्शकता आणि व्यापक जनहित विचारात घेऊन काम करणे आवश्यक आहे त्यादृष्टीने महानगरपालिकेची वाटचाल सुरु आहे. स्थानिक स्वराज्य संस्था या लोकशाहीच्या पाठशाळा असुन या ठिकाणी समतोल न्याय व जनसामान्यांचे समाधान केंद्रस्थानी ठेवुन व्यापक जनहितासाठी काम करत राहणे हे आद्यकर्तव्य ठरते.जनता व लोकप्रतिनिधी यांच्यात सुसंवाद निर्माण झाल्यास विकासात्मक कामांना निश्चित पणे गती मिळते. याच भुमिकेतुन शहराच्या सर्वांगीण विकासासाठी विविध विकास कामे व उपक्रमांना केलेली सुरुवात आशादायी ठरत आहे.

शहर स्वच्छतेबाबत धुळे महानगरपालिकेने देश पातळीवर आपले स्थान कायम ठेवले आहे. स्वच्छ सर्वेक्षण २०२१ च्या अनुषंगानेही महानगरपालिकेने कंबर कसले असुन ओला व सुका कचरा वर्गीकरण, नविन अद्यायावत शौचालयांची निर्मिती, कचऱ्यावर पुर्नप्रक्रिया, घनकचरा संकलन व वाहतुक यासाठी विशेष लक्ष देण्यात येत असुन धुळे महानगरपालिकेला सर्वोत्तम मानांकन मिळण्यासाठी नागरिक, प्रशासन, पदाधिकारी नगरसेवक बंधु-भगिनी व प्रसार माध्यमे यांच्या माध्यमातुन स्वच्छता ही चळवळ व्हावी व नागरिकांचीही मानसिकता तयार व्हावी यासाठी सर्व स्तरातुन महानगरपालिका प्रयत्नशिल आहे. आज धुळे महानगरपालिकेस थ्री स्टार मानांकन प्राप्त झाले असून **प्रतिष्ठेचे अवार्ड सुध्दा मनपास प्राप्त झाले आहे.**

आपण कोरोना सारख्या आपत्तीत सर्वांच्या सहकार्याने शहरास सुस्थितीत ठेवण्याचा प्रयत्न केला व त्यात आपणास यश ही प्राप्त झाले. दुर्दवाने शहरातील ब-याच व्यक्तींचे दुर्दवी निधनसुध्दा झाले.परंतू या आपत्तीच्या परिस्थितीत शहराच्या एकूणच अर्थव्यवस्थेवर झालेल्या परिणामाची झळ धुळे महानगरपालिकेसही सोसावी लागलेली आहे. तरीही या परिस्थितीतून मार्गक्रमण करण्याचा आपला प्रयत्न राहिलेला आहे. या आपत्तीच्या काळात धुळे महानगरपालिकेमार्फत झालेले कार्य शहरवासियांसाठी निश्चितच महत्वपुर्ण व सकारात्मक ठरलेले आहे.

सर्व सामान्य व अल्प उत्पन्न गटातील नागरिकांना घरकुलांची सोय उपलब्ध व्हावी यासाठी पंतप्रधान आवास योजनेचे कामही गतीने सुरु केलेले आहे. तसेच रमाई आवास योजना,शासकिय व खाजगी जमिनीवरील असणारे अतिक्रमीत घरांबाबत शासन निर्णयानुसार **पटटे वाटप** करावयाची कार्यवाही **गतीने चालू आहे.**महिला सक्षमी करणासाठी स्वयंरोजगार निर्माण करण्यासाठी बचत गटांच्या माध्यमातुन प्रभावी प्रयत्न सुरु आहेत. महिला बालकल्याण **समिती , दिव्यांग , दुर्बल घटक यांचेसाठी** राखीव निधी **ठेवून** विविध प्रकारे नियोजन **व अंमलबजावणी सुरू आहे.**

विकास हा केंद्र स्थानी ठेवुन महानगरपलिकेचे कार्य सुरु असल्याने तक्रारदार व तक्रारींचे प्रमाणही कमी झाल्याचे दिसुन येत आहे. नियोजनात्मक प्रशासन व्यवस्था निर्माण करण्याचा प्रयत्न झाल्यामुळेच नागरिकांमध्ये विश्वासाहर्ता निर्माण होऊन मालमत्ता कराचा भरणा ही मोठ्या प्रमाणात वाढलेला आहे.

वर्षानुवर्ष थकीत असलेली प्रलंबित देयके व वित्तीय नियोजन सावरुन महानगरपालिकेला प्रगतीपथावर नेण्याचा मनस्वी प्रयत्न करण्यात येत आहे. शहराच्या एकुणच अर्थव्यवस्थेमुळे महानगरपालिके**च्या** उत्पन्नवाढीवर मर्यादा पडतात त्याचाच परिणाम म्हणुन शहराच्या खर्चासाठी निधी उपलब्ध नसतो. त्यामुळे शासनांच्या योजनांचा पुरेपुर लाभ घेवुन जास्तीत जास्त नागरीसुविधा पुरविण्याचा महानगरपालिकेचा प्रयत्न राहीलेला आहे. नगरसेवक व पदाधिकारी यांच्या सहकार्यामुळे नियोजनबध्द विकास कामे मार्गी लागत आहेत. महानगरपालिकेतील वरिष्ठ पातळीवर पदे रिक्त असुन अत्यल्प तांत्रिक कर्मचारी वर्ग मंजुर पदापैकी केवळ ५०% भरलेली पदे व आर्थिक स्थिती या सर्वबाबींवर मात करुन स्वच्छ भारत अभियान, स्वच्छ सर्वेक्षण २०१९-२० यांमधील मानांकन, शहर हगणदारी मुक्त करण्यासाठी ठेवलेले सातत्य, राष्ट्रीय क्षयरोग नियंत्रण उपक्रमात मिळालेला प्रथम क्रमांक, **बांधकाम परवानगीमध्ये ड वर्ग महानगरपालिकांमध्ये धुळे मनपास अव्वल स्थान,** मालमत्ता कराच्या वसुलीसाठी होणारे यशस्वी प्रयत्न, मनपा निधी व शासन निधी या मधुन होणारी शहरातील सर्वांगीण विकासकामे याबाबत धुळे महानगरपालिका आश्वासक भुमिका नोंदवित आहे.

महानगरपालिका कामकाजात भविष्यात अश्या प्रकारे नियोजनबध्द विकासासाठी पदाधिकारी व अधिकारी कर्मचारी यांची पारदर्शक व कार्यक्षम व्यवस्था निर्माण करुन सामान्य धुळेकर नागरिकांच्या अपेक्षापुर्तीसाठी आपण सारे सज्ज होवु या.

सन २०२०-२१चे सुधारीत अंदापत्रक व सन २०२१-२२ चे मूळ अंदाजपत्रक सादर करतांना समाजातील व तळागाळातील सर्व घटकांचा विचार करून सर्वसमावेशक अंदाजपत्रक तयार करण्याचा प्रयत्न केला आहे.जमा व खर्चाचा अंदाज प्रथम स्थायी समितीसमोर व स्थायी समितीमार्फत नंतर महापालिका सभेसमोर सादर करून मंजूर केला जातो. अर्थसंकल्पीय अंदाज हा वस्तुनिष्ठ असावा व त्यानुसार शाश्वत विकास साधला जावा याचा प्रामाणिक प्रयत्न केलेला आहे.

## अर्थसंकल्पातील महत्वपुर्ण योजना

### १) डेडरगाव तलाव परिसर सौदर्यीकरण करणे:-

डेडरगाव तलाव धुळे शहरापासून सुमारे १२ कि.मी. अंतरावर असून सदर तलाव हा महानगरपालिकेच्या मालकीचा आहे. सदर तलावाच्या खालील बाजूस ११ एकर जागा मनपा मालकीची असून त्यामध्ये पर्यटन स्थळ विकास या प्रयोजनासाठी नियोजीत आहे.त्यामध्ये लहान मुलांची खेळणी,हॉटेल, बगिचा तसेच बोटींग यासारख्या बाबींसाठी पुढील आर्थिक वर्षामध्ये रूपये २५ लक्षची तरतूद केलेली आहे.

### २) अभ्यासिका उभारणे :-

धुळे शहराच्या विस्तार खूप वेगाने होत आहे.मनपा क्षेत्रात स्पर्धा परिक्षेची तयारी करणा-यांची संख्या वाढली आहे.विद्यार्थ्यांचा बौध्दीक विकास करण्यासाठी अभ्यासिका व वाचनालय यांचे खूप मोठे महत्व आहे.शासकीय ,निमशासकीय नोकरी मिळविण्यासाठी व बेरोजगारी कमी होवून एक आदर्श जीवन जगण्यासाठी स्पर्धा परिक्षा द्यावी लागते. मूळात सध्याचे युग हे स्पर्धेचे असल्यामुळे बौध्दिक पातळी वाढविण्यासाठी अभ्यासिका एक महत्वाचे साधन आहे.

शासनातर्फे मोठया प्रमाणात संघलोक सेवा आयोग, महाराष्ट्र लोकसेवा आयोग , कर्मचारी चयन आयोग, आयबीपीएस,रेल्वेभरती,पोलीस भरती,तलाठी भरती , ग्रामसेवक यासारख्या अनेक स्पर्धा परीक्षा घेण्यात येत असतात. त्यामुळे या परीक्षा देवून नोकरी मिळविण्यासाठी विद्यार्थ्यांना अभ्यासाची आवश्यकता असते.आजच्या युवक वर्गाला नोकरी मिळवून भवितव्य घडविण्यात अडचणींना सामोरे जावू लागू नये तसेच नविन अभ्यासक पिढी तयार होणेसाठी धुळे महानगरपालिकेने सन २०२१-२२ या वर्षात रूपये २५ लक्षची तरतूद अभ्यासिका व वाचनालय करीता केली असून बहुसंख्य विद्यार्थी अभ्यास करू शकतील अशी समृध्द अभ्यासिका निर्माण केली जाणार आहे. तसेच सदर विद्यार्थ्यांना लागणारे साधन सामुग्री (पुस्तके) ही या योजनेतून पुरवली जाणार आहे.

अभ्यास करण्यासाठी शांतता तसेच अभ्यासाच्या वातावरणाची आवश्यकता असते सेल्फ स्टडी साठी वातावरण निर्माण करणा-या या अभ्यासिकेमध्ये विद्यार्थ्यांवर वॉच ठेवण्यासाठी सीसीटीव्ही कॅमेरे व हजेरीसाठी बायोमॅट्रीकचा वापर देखील करण्यात येणार आहे.प्रत्येक विद्यार्थ्यांचे ओळखपत्र तयार करून त्या ओळखपत्रावरून विद्यार्थ्यांची नोंद ठेवण्यात येणार आहे.

### ३) शहरी उपजिविका केंद्र (CLC) :-

धुळे शहरात दिनदयाळ अंत्योदय योजना - राष्ट्रीय नागरी उपजिविका अभियान, धुळे महानगरपालिकेमार्फत शहर उपजिविका केंद्र (City Livelihood Center) पुढील आर्थिक वर्षात कार्यान्वित होणार आहे. त्यासाठीचा प्रस्ताव नगपरिषद प्रशासन संचालनालय कार्यालय, मुंबई यांचेकडे मंजूरीसाठी पाठविण्यात आला आहे. या शहर उपजिविका केंद्र(City Livelihood Center) साठी पुढील आर्थिक वर्षात धुळे महानगरपालिका अंदाजपत्रकात रूपये १० लक्ष मात्रची तरतूद करण्यात आली आहे. शहर उपजिविका केंद्र धुळे महानगरपालिकेचा स्त्युत्य उपक्रम असून त्यामार्फत शहरातील नागरीकांना स्वस्त दरात चांगल्या प्रतीच्या सेवा प्राप्त होतील तसेच सुरू झाल्यानंतर सेवा व विक्री देणा-या व्यक्तींची नोंदणी केली जाणार व त्यांची कामाची गुणवत्ता तपासून त्यानंतरच त्यांची नोंदणी केली जाणार आहे त्यामार्फत शहरातील नागरीकांना सर्व सेवा जसे फिटर , इलेक्ट्रीशियन , नळकाम , गवंडी , शिलाई कामगार व इतर सर्व सेवा कमी वेळेत दर्जेदार सेवा उपलब्ध होणार आहे. तसेच धुळे शहरासाठी सर्व सेवा देणा-या बेरोजगारांना काम मिळणार आहे.

४) **पार्किंग व्यवस्था** :-.

धुळे शहरात वाहतुकीची वर्दळ वाढलेली आहे. त्यामुळे धुळे शहरात वाहतूक व्यवस्थेची कोंडी होत असल्याने वाहतूक व्यवस्था सुरळीत करण्याकरीता धुळे पेठ ग नं १ ते ७ मध्ये पार्किग सुविधेसाठी सम आणि विषम तारखांना वाहने उभी करण्यासाठी तसेच चुकीच्या ठिकाणी वाहने उभी केल्यास टोईंग वाहनाच्या माध्यमातून पोलीस प्रशासनाच्या सहाय्याने वाहनांची जप्ती तसेच दंड आकारणी या स्वरूपाची कामे करण्यासाठी पुढील आर्थिक वर्षात प्रस्तावित आहे त्यासाठी मनपा अंदाजपत्रकात रूपये १० लक्ष तरतूद केलेली आहे.

५) **अक्कलपाडा योजना अनुषांगिक कामे** :-

धुळे शहरातील हद्दवाढ अंतर्गत ११ गावांचा विचार करून सन २०५०-५१ या वर्षापर्यंत वाढणा-या लोकसंख्येचा विचार करून नागरीकांना प्रतिदिन प्रतिव्यक्ती १३५ लिटर पाणी आवश्यक आहे. त्याचे पुर्ततेसाठी अक्कलपाडा पाणीपुरवठा योजना ही धुळे महानगरपालिकेसाठी जिवनदायी ठरणार आहे. सदर योजनेच्या पुर्णत्वास गेल्यानंतर पुढील ३० वर्षापर्यंत नागरीकांना पिण्याच्या पाण्याचा प्रश्न भेडसावणार नाही. सदरहू योजना सद्यस्थितीत ५२% पुर्ण झाली असून जून २०२१ पावेतो सदर योजना पुर्ण होवू शकेल. सदर योजनेचा मनपा हिस्सा या वर्षामध्ये १९.२३ कोटी प्रदान केले असून उर्वरीत मनपा हिस्सा रक्कम रूपये २३.०५ कोटी हो १५ वा वित्त आयोग व मनपा निधी यातून देणे प्रस्तावित आहे. तसेच सदर योजना पुर्णत्वास आल्यानंतर पाणीपुरवठा सुरळीत करणेसाठी मुख्य जलवाहिनीची जोडणी करणे , व्हॉल बसविणे , झोनिंग करणे इ महत्वपुर्ण कामांसाठी रूपये २५ लक्षची तरतूद पुढील आर्थिक वर्षासाठी अंदाजपत्रकात केलेली आहे.

६) **परिवहन सेवा** :-

धुळे शहराचा एकूण विस्तार सद्यस्थितीत १०१.०८ चौ. कि.मी. आहे. नागरीकांना मुख्य बसस्थानक , देवपूर बसस्थानक , औद्योगिक वसाहत, बाजार , भाजीपालामार्केट ,शासकीय कार्यालय ,कॉटन मार्केट येथे जाण्यासाठी खाजगी वाहनांचा वापर करावा लागतो. सदरबाब ही खर्चीक असून त्यावर उपाययोजना म्हणून

महानगरपालिकेच्या नियंत्रणाखाली परिवहन सेवा सुरू करणे हे पुढील आर्थिक वर्षात नियोजीत आहे. सदर सेवेचा उपयोग मनपा हद्द तसेच साक्री , मालेगाव , शिरपूर ,दोंडाईचा इत्यादी नेहमी संपर्कातील शहरांसोबतही या योजनेअंतर्गत परिवहन सेवा पुरविणेत येणार आहे. सदर योजनेसाठी पुढील आर्थिक वर्षात रूपये ५० लक्षची तरतूद केलेली आहे.

**७) ट्रान्सपोर्ट /इंडस्ट्रीयल हब** :-

धुळे शहरातून ३ राष्ट्रीय महामार्ग १) मुंबई आग्रा २) नागपूर सुरत ३) धुळे सोलापूर महामार्ग जात आहेत. तसेच इतर राज्यमार्ग सुध्दा जात असल्याने शहरात प्रवासी व माल वाहतूक असे सुमारे २०००० वाहने २४ तासात शहरातून जात असतात. त्यामुळे शहरात ट्रान्सपोर्ट व गॅरेज व्यवसाय मोठया स्वरूपाचा आहे.

सदर वाहनांसाठी व नागरीकांच्या सुविधांसाठी मनपा मालकीच्या जागेवर ट्रान्सपोर्ट हब उभारल्यास नागरीकांना सुविधा तसेच मनपास मोठया स्वरूपात उत्पन्न मिळू शकते. सदर ट्रान्सपोर्ट हब मध्ये सर्व प्रकारच्या माल वाहतूक , प्रवासी वाहतूक , वाहनांचे टू- व्हीलर , थ्री व्हीलर , फोर व्हीलर व मोठया मालवाहतूक गाडयांचे शोरूम , सर्व्हिस सेंटर , बॉडी बिल्डींग तसेच गॅरेज यांची उभारणी , जागेस कुंपन भिंत त्या ठिकाणी येणा-या गाडयांसाठी पार्किंग व्यवस्था, नागरीकांसाठी दवाखाने , बँकिंग सुविधा , इंटरनेट सुविधा , अंतर्गत रस्ते अशा अनुषांगिक सुविधा उपलब्ध करून दिल्यास दरवर्षी कोटयावधी रूपयांची उलाढाल होवून शहर आर्थिक दृष्टया सक्षम होईल , नागरीकांचे रहाणीमान उंचावेल यासाठी प्रकल्प राबविणे नियोजीत आहे. यासाठी पुढील वर्षामध्ये रूपये ५० लक्षची तरतूद करणेत आलेली आहे.

८) **मनपा जागा विकसीत करणे (शॉपिंग सेंटर)** :-

धुळे मनपा अंतर्गत मनपाच्या मालकीच्या जागेवर व्यापारी संकुल बांधणेचे प्रस्तावित आहे. त्यामध्ये नागरीकांना मोठया प्रमाणावर व्यवसाय / व्यापारासाठी दुकानगाळे उपलब्ध करून देण्यात येणार आहेत त्यासाठी पुढील वर्षातील अंदाजपत्रकात रूपये ५० लक्षची तरतूद करणेत आलेली आहे.

९) **शहरातील ओपनस्पेस विकसीत करणे** :-

शहरातील ओपनस्पेस वर होणारे अतिक्रमण टाळण्यासाठी सदरहू योजना पुढील आर्थिक वर्षात राबविण्यात येणार आहे. त्यासाठी पुढील आर्थिक वर्षामध्ये रूपये ५० लक्षची तरतूद केलेली आहे. सदर योजनेअंतर्गत ओपनस्पेसला कम्पौंड , मुलांसाठी खेळणी व बसण्याची व्यवस्था करण्याचे नियोजीत आहे

**१०) राखीव निधी (आर्थिक व दुर्बल घटक) :-**

नगरविकास विभागाकडील दि. २६/२/२००१ च्या परिपत्रकानुसार मागासवर्गीय आर्थिक दुर्बल घटकांना त्यांचा सामाजिक स्तर उंचावणे करीता व शासन निर्णायतील कल्याणकारी योजना राबविण्याकरीता सन २०२०-२१ च्या सुधारीत अंदाजपत्रकात रूपये २३३.२४ लक्ष व पुढील वर्षाच्या मुळ अंदाजपत्रकात रूपये ६१.३२ लक्ष मात्रची तरतूद केलेली आहे त्यामुळे आर्थिक दुर्बल घटकातील नागरीकांना समाजाच्या मुख्य प्रवाहात आणण्यास मदत होणार आहे.

**११) महिला व बाल विकास ५% -**

महिला व बालकल्याण साठी सुधारीत अंदाजपत्रकामध्ये २३३.२४ लक्ष व पुढील वर्षासाठी ६१.३२ लक्ष ची तरतूद केलेली आहे. सदर तरतूदीमधून दिव्यांग गार्डन , महिलांसाठी विश्रामगृह ,महिलांसाठी सार्व. शौचालये , सॅनिटरी नॅपकिन वेडींग मशिन व डिस्पोजल युनिट , कायदेविषयक शिबीर , आंगणवाडी केंद्रातील मुलांना खेळणी , महिला बचत गटामार्फत मनपा आवारात कॅंटींग , जागतिक महिला दिनानिमित्त कार्यक्रम , महिलांसाठी व्यावसायिक प्रशिक्षण तसेच आरोग्य तपासणी यासारख्या योजना राबविण्यात येणार आहेत.

**१२) दिव्यांगांसाठी ५% राखीव :-**

दिव्यांग कल्याणासाठी सुधारीत अंदाजपत्रकामध्ये २३३.२४ लक्ष व पुढील वर्षासाठी ६१.३२ लक्षची तरतूद केलेली आहे.सद्यस्थितीत महानगरपालिकेअंतर्गत १८८८ दिव्यांगांची नोंदणी केलेली आहे. त्यापैकी १८०० दिव्यांगांना रूपये ४००० प्रमाणे सानुग्रह अनुदान वितरीत केलेले आहे. तसेच उर्वरीत ८८ लाभार्थ्यांना मार्च अखेरपर्यंत लाभ देणे नियोजीत आहे. तसेच दिव्यांग बंधू / भगिनींकरीता बगिचासुध्दा पुर्ण करण्याचा मानस आहे. सदर योजनेअंतर्गत दिव्यांग विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती ,खेळात प्राविण्य असणा-या दिव्यांग विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती , त्यांच्या उदरनिर्वाह ,व्यवसाय , साहित्य खरेदीसाठी अर्थसहाय्य , लग्नासाठी जिवनावश्यक वस्तू खरेदीसाठी अर्थसहाय्य , MSCIT, TALLY यासारख्या प्रशिक्षणासाठी प्रतिपुर्ती अशा इत्यादी योजना सदर निधीतून राबविणे नियोजीत आहे.

१३) **मनपा शाळांमसाठी विविध उपक्रम** :-

मनपा मालकीच्या २० शाळा सद्यस्थितीत सुरू आहेत. त्यामध्ये सुमारे २३७४ विद्यार्थी शिक्षण घेत आहेत.शिक्षणाचे सार्वत्रिकरणाच्या उद्दिष्टापोटी बहुतेक योजना शासन स्तरावरून राबविण्यात येत आहेत.परंतू मुलींना स्वसंरक्षणाचे धडे तसेच मुलांमध्ये स्पर्धापरीक्षेची आवड व त्यांच्या बुध्दीला चालना देणारी फाउंडेशन कोर्सेस अद्यापपर्यंत शासन स्तरावरून राबविली जात नाही. त्यासाठी महानगरपालिका अंतर्गत मुलींना कराटे व सर्व मुलांसाठी फाऊंडेशन कोर्स राबविण्याचे पुढील वर्षात नियोजीत आहे.त्यासाठी रूपये २५ लक्षची पुढील वर्षात तरतूद केलेली आहे.

**१४) नविन मिळकतींचा सर्व्हे करणे:-**

सन २०२०-२१ या वर्षात मालमत्ता कराकरीता मिळकतीचा सर्व्हे करणेचे काम प्रगतीपथावर आहे. त्यामध्ये चटई क्षेत्र उल्लंघन, अधिकृत/अनधिकृत बांधकामे विचारात घेवून कर आकारणी, भाडेकरी वापर, कर आकारणी नसलेल्या मिळकती व नळजोडणी संख्या,सोलर वॉटर हिटर वापर, विहिर/कूप नलिका इ.बाबींचा प्रामुख्याने सदर सर्व्हेक्षणात समावेश असून उक्त सर्व्हेक्षण जी.आय.एस. मॅपींग पध्दतीने करणे सुरू आहे. प्रत्येक मालमत्ता जी.आय.एस नकाशात लिंक करणेत येत असून सदर सर्व्हेक्षणाचे संपूर्ण कामकाज हे संगणकीय प्रणाली व्दारे करणे सूरू आहे. सदर योजनेतून पुढील आर्थिक वर्षापासून उत्पन्नाच्या साधनात मोठया प्रमाणामध्ये वाढ होणार आहे. सदर योजनेसाठी पुढील वर्षामध्ये २ कोटी रूपयांची तरतूद करण्यात आलेली आहे.

**१५) वेतन / वेतन आयोग फरक :-**

मनपा कर्मचा-यांना व निवृत्तीवेतनधारकांना माहे जानेवारी २०२१ पासून ७ वा वेतन आयोग लागू केला असून त्यापोटी लागणा-या खर्चाची तरतूद सदर अंदापत्रकात केलेली आहे. तसेच फरकाच्या रकमा पुढील आर्थिक वर्षात देण्याचे नियोजीत आहे.

**१६) विकास कामांचे प्रलंबित देयके :-**

धुळे म.न.पात यापूर्वी मनपा निधीतून विविध विकास कामे करणेत आलेली आहे.परंतु निधी अभावी मोठया प्रमाणात देयके प्रलंबित होती.त्यासाठी सुधारीत अंदाजपत्रकामध्ये १८ कोटी रूपयांची तरतूद केलेली आहे. तसेच सन २०२०-२१ च्या सुधारीत अंदाजपत्रकामध्ये विकास कामांसाठी १५ कोटी मात्रची तरतूद केलेली आहे. नगरसेवकांसाठी स्वनिधी पोटी १६ कोटी रूपये सुधारीत अंदाजपत्रकामध्ये तरतूद केलेली आहे.

**१७) ई-गर्व्हनन्स:-**

याअंतर्गत नागरीकाना सर्व नागरी सुविधा संगणकीय करण्याच्या माध्यमातून अचूक व विहित काळात मिळवून देण्यासाठी मनपाने निर्णय घेतलेला आहे. उदा. जन्म मत्युचे दाखले, व्यवसायाचे परवाने, घनकचरा व्यवस्थापन सुविधा, ऑनलाईन मालमत्ता कर भरणे, विवाह नोंदणी दाखले, भाडे तत्वावरील मनपाच्या सर्व मालमत्ता,Auto D.C.R,ई-टेंडर, एस.एम.एस लघुसंदेश, इ.प्रकल्प सुरु करणेत आलेले असून सदर प्रकल्पांची प्रभावी व अत्याधुनिक पध्दतीनुसार संगणकीय प्रणालीची अंमलबजावणी करणेत येईल. यासाठी अर्थसंकल्पात रक्कम रुपये १.०० कोटी तरतूद करणेत आलेली आहे.

**१८) वृक्षनिधी :-**

वृक्ष प्राधिकरण समितीने केलेल्या नियोजनासाठी या वर्षाच्या सुधारीत अंदापत्रकात रूपये ३७ लक्ष व पुढील वर्षासाठी रूपये १ कोटीची तरतूद केलेली आहे.

१९) **एकात्मिक डास निर्मुलन अंमलबजावणी :-**

डेंगू व मलेरिया या रोगांच्या समूळ उच्चाटनासाठी पुढील वर्षामध्ये रूपये ४ कोटीची तरतूद केलेली आहे.सन २०१८-१९ मध्ये डेंगूचे ४७६ तर मलेरियाचे ११६ संशयित रूग्ण आढळून आले होते.तसेच २०१९-२० मध्ये डेंगूचे ५७२ तर मलेरियाचे १८१ संशयित रूग्ण आढळून आले होते.याबाबीचा विचार करता सदर योजना पुढील वर्षामध्ये कार्यान्वित करण्याचे नियोजीत आहे. त्यामध्ये घरोघरी जावून कंटेनर सर्व्हेक्षण , ॲबेटींग ,फवारणी , धुरळणी,नागरीकांचे प्रशिक्षण व प्रबोधने इत्यादी कामे पुर्ण करून घेणेत येणार आहेत.

**२०) एल.ई.डी. बसविणे** :-

धुळे मनपा क्षेत्रात हद्दवाढ क्षेत्रासह सुपर्णत: LED पथदिवे बसविणेचे कामाचे कार्यादेश झाले आहेत. सपुर्ण LED पथदिवे बसविणे पृथ्थकरणानंतर वीज बिल खर्चात कपात होवून सुमारे ४०% बचत होणार आहे. त्यानुसार सुमारे ४ कोटी रूपयांची प्रतिवर्ष बचत होणार आहे. तसेच संबंधित यंत्रणेस ५ वर्षासाठी देखभाल दुरूस्ती करणे गरजेचे राहणार आहे.सदर योजनेसाठी पुढील वर्षामध्ये रूपये १० कोटीची तरतूद केलेली आहे.

एकंदरीत सर्वच घटकांना समोर ठेवून अंदाजपत्रकामध्ये न्याय देण्याचा प्रयत्न केलेला आहे.

सन २०२०-२१ चे सुधारीत अंदाजपत्रक रुपये ६२१५२.६३ लक्ष व सन २०२१-२२ चे मूळ अंदाजपत्रक रूपये ६२२६६.७९ लक्ष मात्रचे सादर करण्यात येत आहे.

धुळे महानगरपालिकेच्या कार्यप्रणालीत मा पालकमंत्री श्री अब्दुल सत्तार अब्दुल नबी, मा.खासदार श्री सुभाषजी भामरे, मा.आमदार श्री फारूख शाह ,मा. आ. श्री कुणाल पाटील,मा.आ.अमरिषभाई पटेल,भाजप महानगर अध्यक्ष श्री अनुपजी अग्रवाल, विविध पक्षांचे प्रतिनिधी, जिल्हाप्रशासन,पोलीस प्रशासन इतर सर्व शासकीय विभागाचे बहुमोल सहकार्य लाभत आहे.ही सर्व कामे मार्गी लावतांना मा. महापौर श्री चंद्रकांत सोनार , उपमहापौर मा. सौ कल्याणीताई अंपळकर , सभापती स्थायी समिती श्री संजय जाधव, सभागृह नेते श्री कांतीलाल दाळवाले,विरोधी पक्षनेते श्री साबीर शेख,महिला बालकल्याण समिती सभापती मा. सौ वंदना थोरात , विविध पक्षांचे गटनेते , सर्व सन्मा सदस्य त्याचबरोबर शहरातील सर्व सामाजिक व सांस्कृतिक संस्था, जेष्ठ नागरीक , शहरातील मान्यवर व सर्व प्रसार माध्यमे व नागरीक यांचे सहकार्य व योगदान अतिशय महत्वपुर्ण ठरतआहे.महानगरपालिका कामकाजात भविष्यात अशा प्रकारे नियोजनबध्द विकासासाठी पदाधिकारी व अधिकारी कर्मचारी यांची पारदर्शक व कार्यक्षम व्यवस्था निर्माण करून सामान्य धुळेकर नागरिकांच्या अपेक्षापुर्तीसाठी आपण सारे सज्ज होऊया.

सदर अर्थसंकल्प तयार करतांना सन्मा.पदाधिकारी, सर्व सदस्य, अति. आयुक्त , उपायुक्त, मुख्य- लेखाधिकारी , मुख्यलेखापरीक्षक , लेखापाल तसेच पत्रकार बांधव व नागरीक यांनी वेळोवेळी सूचना केल्या या सर्वांचा मी आभारी आहे.

**कभी ना कहो की दिन अपने खराब है समझ लो की काँटो से घिर गए गुलाब हैं. रखो हौंसला वो मंजर भी आयेगा... प्यासे के पास चलकर समंदर भी आयेगा... थक कर ना बैठो ऐ मंजिल के मुसाफिर...मंजिल भी मिलेगी और जीने का मजा भी आयेगा**

**धन्यवाद...**

म. नागसेन बोरसे — प्रशासनामार्फत अंदाजपत्रक आज सादर झालेले आहे.तथापि याबाबत अभ्यास करुन निर्णय घेणे आवश्यक आहे.यासाठी वेळ मिळावा म्हणून आजची बैठक तहकूब करुन पुढे घेण्यांत यावी ही विनंती.

म. सभापती — प्रशासनामार्फत अत्यंत संतुलित व शहराला विकासाकडे नेणारा अर्थसंकल्प सादर झालेला आहे. याबद्दल मी प्रथम प्रशासनाचे अभिनंदन करतो. सदर अर्थसंकल्पातील बाबीबाबत अभ्यास करुन त्यात अधिक सुधारणा व नागरीकांच्या हिताच्या व शहराच्या विकासाच्या योजना व संकल्पना करणे गरजेचे आहे. यासाठी चर्चा व विचार विनिमय करणेसाठी आजची सभा तहकूब करण्यांत येत आहे.

मला आज सभापती पदाची पुनश्च संधी देऊन आपण दाखविलेला विश्वास व सहकार्याबद्दल मन:पूर्वक आभार.

**सही/- x x x**
**सभापती,**
**स्थायी समिती,**
**धुळे महानगरपालिका,धुळे**

**धुळे मनपा भारतरत्न अटलबिहारी वाजपेयी सभागृह**
**शुक्रवार दिनांक २६/०३/२०२१**
**वेळ सकाळी ११-०० वाजता**

धुळे महानगरपालिका स्थायी समितीची सभा क्रं.३ अर्थसंकल्पीय तहकूब विशेष सभा आज शुक्रवार दिनांक २६/०३/२०२१ रोजी सकाळी ११-०० वाजता मा. श्री. संजय सुधाकर जाधव, सभापती, स्थायी समिती, मनपा, धुळे यांच्या अध्यक्षतेखाली **धुळे मनपा भारतरत्न अटलबिहारी वाजपेयी सभागृह** भरली.स्वाक्षरी बुकावर सही करुन खालील सन्मा.सदस्य सभागृहात हजर होते.

| अ.क्रं. | सदस्यांचे नांव | हुद्दा |
|---|---|---|
| १ | श्री. जाधव संजय सुधाकर | सभापती |
| २ | श्री. बैसाणे सुनिल तुळशिराम | सदस्य |
| ३ | श्रीमती माळी भारती अशोक | सदस्या |
| ४ | श्रीमती पाटील मंगला सुरेश | सदस्या |
| ५ | श्रीमती बोरसे पुष्पा प्रकाश | सदस्या |
| ६ | श्री. मासुळे अमोल पावबा | सदस्य |
| ७ | श्रीमती पठाण हिना अस्लम | सदस्या |
| ८ | श्री. नवले शितल मोहन | सदस्य |
| ९ | श्री. बोरसे नागसेन दामोदर | सदस्य |
| १० | श्रीमती कुलेवार किरण राकेश | सदस्या |
| ११ | श्री. जाधव बन्सीलाल माणिक | सदस्य |
| १२ | श्री. पटेल अमीन अब्दुल करीम | सदस्य |

उपस्थित अधिकारी गण

| अ.क्र. | अधिकाऱ्यांचे नाव | हुद्दा |
|---|---|---|
| १ | श्री. अजीज शेख | आयुक्त |
| २ | श्रीमती शिल्पा नाईक | उपायुक्त |
| ३ | श्री. तुषार नेरकर | सहा. आयुक्त |
| ४ | श्री. विनायक कोते | सहा. आयुक्त |

| | | |
|---|---|---|
| ५ | श्री. महेंद्र परदेशी | नगररचनाकार |
| ६ | श्री मनोज अरविंद वाघ | प्र.नगरसचिव |
| ७ | श्री. के.एन. शिंदे | अभियंता |
| ८ | श्री. लक्ष्मण पाटील | सहा.आरोग्याधिकारी |
| ९ | श्री. पी.डी नाईक | लेखापाल |
| १० | श्री. रमजान अन्सारी | कार्यालयीन अधिक्षक |
| ११ | श्री.आर.बी.. सोनवणे | प्र. परवाना अधिक्षक |
| १२ | श्री. बी.एस. रनाळकर | प्र. सहा.कर मूल्य निधारण अधिकारी |
| १३ | श्री. एन.के. बागुल | विद्युत अभियंता |
| १४ | श्री. राजू माईनकर | भांडारपाल |
| १५ | श्री. अक्षय चौधरी | लिपीक मनपा शि.मं. |
| १६ | श्री. किशोर सुडके | बाजार विभाग |
| १७ | श्री. प्रसाद जाधव | अति. विभाग |
| १८ | श्री. सुक्राम आत्या राऊत | वाहन विभाग लिपीक |

म. सभापती — सर्व सन्मा. सदस्य,आयुक्त सो.अधिकारी गण, पत्रकार छायाचित्रकार बांधव यांचे स्वागत करतो.नगरसचिव यांनी सभेचे कामकाजा सुरुवात करावी.

म. नगरसचिव — वंदे् मातरम् या राष्ट्रवंदनेसाठी सर्वांनी उभे रहावे.

म. नगरसचिव — आज आपली ही अंदाजपत्रकाची दिनांक 25/2/2021 रोजीची तहकूब सभा आहे. मा. आयुक्त महोदयांनी प्रशासनामार्फत सन 2021-22 चा अर्थपंकल्प सादर केला होता. त्या संदर्भात विवेचन त्यांनी केले होते व त्यानंतर आपण ती सभा तहकूब केली होती. ती तहकूब आज रोजी आयोजित केलेली आहे. सभेच्या कामकाजाला सुरुवात करतो आहे.

विषय क्रमांक:-३ — मा.आयुक्त सो. धुळे महानगरपालिका धुळे यांच्या पत्रानुसार सन २०२०-२१ चे सुधारीत व सन २०२१-२२ चे मुळ अंदाजपत्रक सादर करणे.

म.शितल नवले — सभापती महोदय, माझे असे म्हणणे आहे की,आज आपण जी सभा सन 2021-22च्या अर्थसंकल्पासाठी बोलाविली आहे तीच बेकायदेशीर आहे. त्यांचे कारण असे की, आपण सन 2020- 21 चा अर्थसंकल्प मंजूर केलेला होता. तो मंजूर केल्यानंतर तो महासभेसमोर अवलोकनार्थ आलेला नाही. आपण आम्ही सन 2020- 21 मध्ये ज्या काही तरतुदी सुचविलेल्या होत्या त्या महापौरांनी ठरावात का घेतल्या नाही. त्यांचे उत्तर आम्हाला महापौरांकडून पाहिजे आहे माझे असे म्हणणे आहे.कारण ज्या गोष्टी नगरसेवकांनी महासभेत मांडल्या आहेत त्या ठरावात का आल्या नाही हे विचारण्याचा अधिकार नगरसेवकांना आहे. कारण ज्या गोष्टी सदस्यांनी सूचविलेल्या होत्या यांचे उत्तर सभापती महोदय आपण देऊ शकणार नाही त्यांचे उत्तर महापौर सो. देऊ शकतील. मागच्या दोन वर्षापासूनचे महासभांचे एकही इतिवृत्त सभागृह समोर अवलोकनार्थ सादर झालेले नाही. माझे तर स्पष्ट असा आरोप आहे की हे महापौर आमचे आहे की नाही. कारण महापौर झाल्यांचे इतिवृत्त देखील आमच्या समोर सादर झालेले नाही. म्हणून आजची सभा तहकूब करण्यांत यावी. मागचे दोन अर्थसंकल्प झाले ते सभागृहासमोर अवलोकनार्थ प्रथम सादर करण्यांत यावे.आजची ही स्थायी समितीची सभा तहकूब करा वाटले तर मी व माझ्यासोबत

जे 5-6 स्थायी समितीचे सदस्य आहोत तसे पत्र देतो अगोदर महासभा होवू दयावी. महासभेत आमच्या प्रश्नांची उत्तरे घेवू द्या. कारण असे झाले आहे की काही ठरावीक प्रभाग म्हणजे धुळे शहर असे झालेले आहे. आम्ही आमच्या भागातील कामे सुचविले ते महासभेत का घेतले नाही. तुम्हाला जसे पटेल तसे ठराव महासभेत घ्यावयाचे का? माझे म्हणणे चूकीचे असेल तर तुम्ही मला सांगा. देवपूर भागात, मुस्लीम भागात तसेच आमच्या भागात काय परिस्थिती आहे.आम्ही महासभेत सूचविलेली कामे महासभेत का घेतली नाही. दोन वर्षाचे अर्थसंकल्प दोन वर्षाचे प्रोसीडींग महासभेत अवलोकनार्थ का सादर झाले नाही. 17 वर्ष झाले मी नगरसचिवांना पाहतो आहे. असे गेल्या 15 वर्षात कधी झाले की, 2-3 सभांचे प्रोसीडींग सभागृहासमोर आलेले नाही. नगरसचिव महोदय असे कधी झाले आहे की 2 वर्षाचे प्रोसीडींग सभागृहासमोर सादर झालेले नाही यांचे उत्तर नगरसचिव यांचे कडुन अपेक्षित आहे.आणि नगरसेवकांचा अधिकार नाही का, मागच्या सभांचे प्रोसीडींग मागण्याचा. जर तुमच्या कडून प्रोसीडींग लिहण्यांचे होत नसेल तर पुढच्या महासभा घेवू नका. आधी प्रोसीडींग सादर करा नंतर महासभा घ्या. आजची सभा तहकूब झाली पाहिजे अन्यथा मी येथे उपोषणाला बसेल. आपण यांचे उत्तर दयावयास उत्तरदायी नाही परंतु जे उत्तरदायी असे त्यासाठी अगोदर महासभा घेण्यांत यावी.

म. नागसेन बोरसे

सभापती महोदय, आताच शितल भाऊनी मुद्दा उपस्थित केला की मागील सभेचा ठराव अवलोकनार्थ आला पाहिजे होता. तो आलेला नाही याचा अर्थ यांत काही गोलमाल आहे असा होतो. मी बजेटची महासभा झाल्याबरोबर 10 व्या दिवशी पत्र दिले होते की, मला महासभेची रेकॉर्डींग व सभेचा ठराव पाहिजे आहे. परंतु अडीच महिन्यामध्ये मला ना ठराव भेटला ना रेकॉर्डींग मिळाले. हे बजेट एक नंबरचे फेक बजेट होते. आणि मी त्यावेळेसही बोललो होतो हे फेक बजेट आहे.मी आरोप केले होते 56 कोटीचे दायित्व 3 महिन्यांत स्विकारा. मी लेखा विभागाच्या अधिका-यांशी बोललो त्यांनी 30 लाखाचे बेकायदेशीर बिल दिल्यानंतर त्यांना भेटावयास गेलो की तुम्ही बेकायदेशीर बिल दिलेले आहे. तर सव्वा महिना रजा टाकून निघून गेले. त्यानंतर पुन्हा एक कोटीचे बिल काढले ज्या अर्थसंकल्पामध्ये ज्यांची तरतुद नाही ते देऊन टाकले पुन्हा त्यांना विचारले तर पुन्हा रजा टाकून निघून गेले.त्यांची चौकशी झाली पाहिजे. अर्थसंकल्पाला जबाबदार अधिकारी पाहिजे नाईकांना या अर्थसंकल्पात किती माहिती आहे. आम्ही प्रश्न विचार ते वेगळे उत्तर देतील या ठिकाणी जबाबदार अधिकारी पाहिज तरच चर्चा होईल. अन्यथा चर्चा होणार नाही मी या बजेटची कॉपी मागितली होती. मला एक पत्र आले आहे दि. 22/1/2021 प्रभारी लेखापाल नाईक साहेबांनी दिलेले आहे. दि. 21/1/2021 रोजी पर्यत महासभेचा ठराव त्यांना प्राप्त झालेला नव्हता याचा अर्थ तुम्ही सुधारीत बजेट करु शकत नाही दि. 21/1/2021 रोजी जर तुम्ही डिसेंबरचे आकडेवारी घेवून बजेट सादर केला आहे. महासभेचा बजेट झाला नाही तर महासभेची आकडेवारी आली कशी हा फेक बजेट आहे. सक्षम अधिकारी असल्याशिवाय हा बजेट मंजूर करु नये व ही सभा तहकूब करावी महापौरांनी 44कोटीचे वाढीव म्हणून तरतूद सुचविल्या आहेत ज्या वेळेस अर्थसंकल्पामध्ये स्थायी समितीने 14 कोटीचे वाढीव सुचना दिलेल्या होत्या त्या तुम्ही कमी केल्या व त्यांनी 44 कोटी टाकले तुमच्याकडे उत्पन्नाची बाजू होती तर ते 12 कोटीचे कामे रद्द का करण्यांत आले जर उत्पन्नाची बाजू नव्हती तर तुम्ही 44 कोटी कोठुन पाठविले त्याचाही विचार झाला पाहिजे. सन 2020-21 या आर्थिक वर्षात ठरविण्यात आलेली तरतूद प्राथमिक स्वरुपाची असून संबंधित विभागाने 2021अखेर प्रत्यक्ष होणा-या रकमेचा होता जर तुम्ही 2020 डिसेंबर पर्यत बजेटच सादर

केला नाही तर सुधारीत बजेट कसा काय येवू शकतो सर्व सदस्यांनी केलेल्या सुचना व उत्पन्न वाढीचे स्त्रोत घेवून व प्रशासनाचे सुचविलेल्या अंदाजपत्रकात वाढ व घट करण्यांत आलेली आहे. सन 20-21च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मान्यता देण्यांत येत आहे. यांचा अर्थ असा होतो डिसेंबर पर्यत बजेटच झाला नाही तर मान्यता कोणत्या आधारावर देता आहे. आणि उत्पन्नावाढीबाबतचे स्त्रोत व प्रत्यक्ष उत्पन्न याचा आढावा घेऊन प्राथमिक वसुलीबाबत उचित कार्यवाही करावी याचा अर्थ असा आहे की त्यांनी प्रशासनावर ढकलून दिलेले आहे. मी ज्या वेळेस 56 कोटीचे दायित्व मागितले त्या वेळेसच हा गोलमाल झाला मागील वर्षा 56 कोटी व या वर्षाचे मे उत्पन्न वाढेल कुठे आठ महिन्यांमध्ये किती उत्पन्न झाले यांचीही माहिती द्यावी त्यानंतर डिसेंबर ते आतापर्यत किती उत्पन्न झाले त्याची माहिती दयावी त्यानंतर विकास शुल्क हा काही गव्हेमेंटचा फंड नाही हा प्रशासनाचा भाग आहे उत्पन्नांचा मालमत्ता घरभाडे दुकान भाडे यांच्या उत्पन्नातून त्यांची गणना केली जाते विकास शुल्काच्या नावावर 20 कोटी रुपयांचे कामे मंजूर झाली आहे याला आमचा विरोध नाही कामे घ्या पण उत्पन्नाची बाजूही बघा. हे 20 कोटी आणि पहिलेचे 56 कोटी असे एकुण 76 कोटी दायित्व आहे. आपल्याला एवढे उत्पन्न अपेक्षित आहे का? आपल्याला वसुली करातून 22 ते 23 कोटी प्राप्त होतात. आणि एलबीटीचे उत्पन्नातून पगार व विद्युत बिल यांचा खर्च होतो. त्यामुळे आपल्याकडे निधी उपलब्ध राहतो का? हा तो अर्थसंकल्प आहे तो तुटीचा आहे का शिल्लकी आहे हे प्रथम सांगावे.

म.सुनिल बैसाणे — प्रशासनाने स्थायी समिती पुढे अंदाजपत्रक सादर केलेले आहे. याठिकाणी शितलभाऊ नवले यांनी जो मुद्दा उपस्थित केला त्याच मुद्दयावर मी दोन पत्र दिलेले आहे. महासभेचे इतिवृत्त अंदाज वाचायला मिळालेले नाही. आपण इतिवृत्ताला मंजूरी न देता बजेट सादर करतो. इतिवृत्त सादर होणे आवश्यक आहे. प्रशासनाने जो बजेट सादर केलेला आहे त्यात अत्यंत धुळफेक करणारी आकडेवारी आहे. आम्हाला जनतेने विकासाच्या कामासाठी निवडून दिलेले आहे त्यांचे हित पाहणे आमचे कर्तव्य आहे. या अर्थसंकल्पात 19-20 ची प्रलंबीत देयके 8 कोटी व सन 2020-21 ची विकास कामे 15 कोटी , स्पील ओव्हर 10 कोटी अशा एकुण 33 कोटीच्या तरतुदी सादर केलेल्या आहेत. ज्यांनी आज अर्थसंकल्प सादर केला ते आज सभागृहात नाहीत. त्यामुळे आमच्या प्रश्नाची समाधानकारक उत्तरे मिळतील याची खात्री नाही. स्थायी समितीला यांत नवीन तरतूद सुचावावयाच्या आहे.परंतु त्याबाबत संबंधित अधिकारी मुख्य लेखाधिकारी उपस्थित नसेल तर याबाबत निर्णय काय घ्यावयाचा त्यामुळे ही सभा तहकूब करावी.

म. शितल नवले — मी मागच्या सभेप्रसंगी बोललो होतो. प्रशासनावर विश्वास ठेवून आम्ही बजेटला मंजुरी देत आहोत.परंतु आमच्या विश्वासाला तडा गेलेला आहे. जर आपण महासभेच्या केलेल्या तरतुदी पहाल त्या आम्ही सुचलेल्या नाही मी महासभेत फायर फायटरच्या विषयी सांगितले होते त्या विषयी तरतूद नाही. सदर तरतुदी कोणी सुचविल्या . प्रशासनाने किंवा महापौरांनी या तरतूदी सुचविल्या असतील तर आम्ही कोणाला विचारावे मागच्या अर्थसंकल्पाचे अवलोकन झालेले नाही सन 2019- 20 ला अनेक तरतुदी होत्या. त्या तरतुदीची काय अंमलबजावणी झाली कोणती कामे पूर्ण झाली. मागील आयुक्तांनी आम्हाला स्वप्न दाखविले होते. त्याही तरतुदी पूर्ण झाल्या नाही. आता वेळ न घालवता महासभा लावा. मी सही करण्यांस तयार आहे. अल्पसंख्याक भागात व आमच्या मिल परिसरात वीस रुपयांचे काम मिळत नाही.जर महासभेत महापौरांनी तरतुदी सुचविल्या तर महापौरांच्या मताने मंजूर

| | |
|---|---|
| | असे टाकावे.आपण सर्वानुमते मंजुर असे टाकतात. हे चुकीचे आहे.आपण ठरावाची अंमलबजावणी करण्याकडे दुर्लक्ष करतात. |
| म. नगरसचिव | आजतागायत झालेल्या महासभांचे कोणतेही ठराव नगरसचिव विभागाकडेस प्रलंबीत नाही. संबंधित ठराव विभागाकडे अंमलबजावणीसाठी सादर करण्यांत आलेले आहे तथापि फक्त शासन निधी व विकास कामांचे प्रस्ताव प्रलंबीत असल्याने इतिवृत्त देण्यांत अडचणी आलेल्या आहेत. |
| म. शितल नवले | आपण स्थायी समितीचे इतिवृत्त वेळोवेळी दिलेले आहे. मग महासभेच्या इतिवृत्तांना विलंब का? आपल्याला ज्या गोष्टीची गरज नाही त्यांच्या तरतुदी केलेल्या आहेत. आपण पंचतारांकित तरतुदी केलेल्या आहेत. पण प्रत्यक्षांत मुलभूत प्रश्नाकडे दुर्लक्ष केलेले आहे.शहरात 10ते12दिवस पाणी येत नाही त्याबाबत काय ठोस तरतुद केली. पाणीपुरवठयाच्या प्रश्नासाठी तज्ञ संस्था नियुक्ती बाबत प्रस्ताव होता.त्यांचीही तरतुद नाही. 2020-21 च्या अर्थसंकल्पात विकास कामासाठी 15 कोटीची तरतुद केली आहे आपण 15 कोटीची कामे कोणत्या भागात टाकणार आहांत. |
| म.सुनिल बैसाणे | आयुक्त सो. आपण बैठकीला उपस्थित राहणे आवश्यक आहे. जर आपण उपस्थित राहणार नसाल तर मी सभात्याग करीत आहे. |
| म. आयुक्त | आज या ठिकाणी बजेटची महत्वपूर्ण सभा आहे. प्रशासनाने स्थायी समितीपुढे बजेट सादर केल्यानंतर त्यावर आपण चर्चा करतो. माहिती घेतो आणि त्यानुसार ही बैठक आयोजित केलेली आहे. याठिकाणी लेखाधिकारी यांच्या मार्फत बजेट सादर झालेला आहे परंतु ते आजारी असल्याने बैठकीस उपस्थित नाही. जर कोणी रजेवर असेल त्यामुळे संस्थेचे कामकाज थांबू शकत नाही लेखाधिकारी यांचा कार्यभार श्री. नाईक यांच्याकडे दिलेला आहे. आपण याठिकाणी बरेच चांगले मुद्दे उपस्थित केले. इतर सदस्यही आपले मत मांडणार आहे. या बैठकीत चांगले कामे व्हावीत काही चांगल्या उपाय योजना सुचवाव्यात हे अपेक्षित आहे. माझी कोरोना बाबत जिल्हाधिकारी कार्यालय येथे मा. मुख्यमंत्री महोदयांची व्ही.सी. असल्याने मला आता त्याठिकाणी जाणे गरजेचे होते. परंतु बजेटची मिटींग असल्याने मी याठिकाणी थोडा वेळ उपस्थिती दिलेली आहे. याठिकाणी सर्व विभागाचे अधिकारी तसेच उपायुक्त उपस्थित आहेत आपण चर्चा करावी व चांगले मुद्दे या बैठकीत समोर यावेत. त्यामुळे ही बैठक सुरु ठेवावी सभा तहकूब करणे याबाबत आपण सर्वानी फेर विचार करावा. |
| म. शितल नवले | आम्ही समजू शकतो. जर दोन दोन अर्थसंकल्पांचे अवलोकन होत नसेल तर हे चूकीचे आहे. |
| म. आयुक्त | मी आपल्याशी सहमत आहे.नगरसचिव विभागाकडून आपणास इतिवृत्त पुढील महासभेत दिले जाईलच मागील वर्षी माजी सभापती सुनिल बैसाणे यांनीही चांगला अर्थसंकल्प सादर केलेला होता. त्याच प्रमाणे आपण ही बैठक पुढे सुरु ठेवावी. |
| म. सुनिल बैसाणे | प्रशासनाने ज्या ज्या प्रसंगी चांगले काम केलेले आहेत्यांचे आम्ही कौतुकच केलेले आहे. जर कोणावर अन्याय झाला तर त्याच्या पाठीशी आम्ही उभे राहिलेलो आहे. परंतु आज बजेट सादर होत असतांना जर प्रशासनाचा प्रमुख अधिकारी उपस्थित नसेल तर बैठकीला महत्व नाही. |
| म. शितल नवले | आयुक्त सो. आपण रोज बैठका घेवून चर्चा करु शकतो हा अर्थसंकल्प वर्षभरासाठी आहे. |
| म. आयुक्त | मी जिल्हाधिकारी कार्यालयातील बैठक संपल्यावरती पुनश्च या बैठकीला हजर होईल आपणही बैठक सुरु ठेवावी. चर्चा करावी काही महत्वाचे विषय असतील तर मी आल्यावर |

परत बोलू. आपल्याला विचार विनिमय करुनच एक चांगला बजेट सादर करावयाचा आहे. त्यामुळे सदर बैठक तहकूब करु नये.

म. शितल नवले — 2- 2 वर्ष जर इतिवृत्तांचे वाचन होत नसेल तर काय अर्थ आहे त्याचा मी निषेध करतो. जो पर्यत इतिवृत्त महासभेपर्यत येत नाही तो पर्यत स्थायी समितीच्या बैठका घेण्यांत येऊ नये. नाही तर मी सभागृहात येणार नाही.

म. सभापती — मा.आयुक्त सो.यांना महत्वाच्या मिटींगसाठी जिल्हाधिकारी कार्यालय येथे जावयाचे असल्याने सदर सभा तहकूब करण्यांत येत आहे. सदर सभा आज दुपारी 4-00 वाजतां पुनश्च या सभागृहात घेण्यांत येईल.

**सही/- x x x**
**सभापती,**
**स्थायी समिती ,**
**धुळे महानगरपालिका,धुळे**

**धुळे मनपा भारतरत्न अटलबिहारी वाजपेयी सभागृह**
**शुक्रवार दिनांक २६/०३/२०२१**
**वेळ- दुपारी ४-०० वाजता**

धुळे महानगरपालिका स्थायी समितीची सभा क्रं.३ अर्थसंकल्पीय तहकूब विशेष सभा आज शुक्रवार दिनांक २६/०३/२०२१ रोजी सकाळी ११-०० वाजता भरली. सदस्यांनी केलेल्या विस्तृतचर्चअंती सदर सभा पुन्हा तहकूब करुन दुपारी ४-०० वाजता मा. श्री. संजय सुधाकर जाधव, सभापती, स्थायी समिती, मनपा, धुळे यांच्या अध्यक्षतेखाली **धुळे मनपा भारतरत्न अटलबिहारी वाजपेयी सभागृह** भरली.स्वाक्षरी बुकावर सही करुन खालील सन्मा.सदस्य सभागृहात हजर होते.

| अ.क्रं. | सदस्यांचे नांव | हुद्दा |
|---|---|---|
| १ | श्री. जाधव संजय सुधाकर | सभापती |
| २ | श्रीमती माळी भारती अशोक | सदस्या |
| ३ | श्रीमती बोरसे पुष्पा प्रकाश | सदस्या |
| ४ | श्रीमती पठाण हिना अस्लम | सदस्या |
| ५ | श्री. सईद बेग हाशम बेग | सदसय |
| ६ | श्री. बोरसे नागसेन दामोदर | सदस्य |
| ७ | श्री. जाधव बन्सीलाल माणिक | सदस्य |
| ८ | श्री. पटेल अमीन अब्दुल करीम | सदस्य |

उपस्थित अधिकारी गण

| अ.क्र. | अधिकाऱ्यांचे नाव | हुद्दा |
|---|---|---|
| १ | श्रीमती शिल्पा नाईक | उपायुक्त |
| २ | श्री. विनायक कोते | सहा. आयुक्त |
| ३ | श्री मनोज अरविंद वाघ | प्र.नगरसचिव |

| | | |
|---|---|---|
| ४ | श्री. के.एन. शिंदे | अभियंता |
| ५ | श्री. लक्ष्मण पाटील | सहा.आरोग्याधिकारी |
| ६ | श्री. पी.डी नाईक | लेखापाल |
| ७ | श्री. रमजान अन्सारी | कार्यालयीन अधिक्षक |
| ८ | श्री. एन.के. बागुल | विद्युत अभियंता |
| ९ | श्री. सी.सी. बागुल | ओव्हरसिअर पाणीपुरवठा |
| १० | श्री. हेमंत पावटे | ओव्हरसिअर बांधकाम |
| ११ | श्री. सी.एम. उगले | ओव्हरसिअर पाणीपुरवठा |
| १२ | श्री. पी.डी. चव्हाण | ओव्हरसिअर बांधकाम |
| १३ | श्री. प्रसाद जाधव | अति. विभाग |
| १४ | श्री. सुक्राम आत्या राऊत | वाहन विभाग लिपीक |

म. सभापती — सर्व सन्मा. सदस्य, उपायुक्त सो. अधिकारी गण, पत्रकार छायाचित्रकार बांधव यांचे स्वागत करतो.नगरसचिव यांनी सभेचे कामकाजा सुरुवात करावी.

म. नगरसचिव — वंदे् मातरम् या राष्ट्रवंदनेसाठी सर्वांनी उभे रहावे.

म. नगरसचिव — सन्मा. सदस्यांच्या सुचनेनुसार व सभापती महोदयांच्या आदेशानुसार ती सभा दुपारी 4-00 वाजता बोलविण्यांत आलेली होती. याठिकाणी एक सुचना देऊ इच्छितो मा. आयुक्त महोदय मा. मुख्यमंत्री महोदयांच्या व्ही.सी.साठी गेलेले होते. ती व्ही.सी. आता पुन्हा 2- 45 वाजतां जिल्हाधिकारी कार्यालय येथे सुरु आहे. आजच्या बैठकीसाठी अजूनही आयुक्त महोदय उपस्थित राहू शकणार नाही असा संदेश याठिकाणी प्रापत झालेला आहे. उपायुक्त शिल्पा नाईक मॅडम याठिकाणी उपस्थित आहे.याबाबत आपण पुढील चर्चेला सुरुवात करु.

म. नागसेन बोरसे — सभापती महोदय सकाळची सभा तहकूब करुन दुपारी 4-00 वाजतां ठेवण्यांत आलेली आहे. आयुक्त सो. उपस्थित नसल्याने आपण कोणताही निर्णय घेऊ शकत नसल्याने तहकूब केली होती. माझी आपणाला पुन्हा विनंती आहे आयुक्त सो. ज्यावेळी उपलब्ध होतील त्यावेळी सभा घेण्यांत यावी. आताचा सभा तहकूब करण्यांत यावी ही विनंती.

म.अमीन पटेल — ही अर्थसंकल्पीय सभा आहे. सदस्यांचे म्हणणे आहे की आयुक्त सो. सभेस उपस्थित राहिले पाहिजे. सभा तहकूब केली पाहिजे. माझे म्हणणे असे आहे की सभा सुरु केली पाहिजे चर्चा केली पाहिजे् कारण ही महत्वाची सभा आहे. बाकीचे सदस्य म्हणत असतील की सभा तहकूब झाली पाहिजे हे त्याचे मत आहे.परंतु आज शहरातील परिस्थिती पाहता त्यावर अर्थसंकल्प सादर केला आहे त्यामध्ये काय काय घेतले पाहिजे नागरीकांना कोणत्या सुविधांची गरज आहे. पाण्याची गटारीची , लाईटाची यासाठी लवकरात बजेट मंजूर झाले पाहिजे.

म.भारती माळी — आमचे नागसेन भाऊ यांनी सांगितले की बजेट हे अंत्यत महत्वाचे आहे. आणि बजेटच्या सभेला आयुक्त सो. असणे अत्यंत गरजे आहे. सदस्यांचे महत्वाचे विषय असले तर त्यांचे उत्तर आयुक्त सो. देऊ शकतात म्हणून ही सभा तहकूब करण्यांत यावी.

म. सभापती — सर्व सन्मा. सदसयांना खास करुन अमीन भैय्या यांना सांगू इच्छितो की, बजेट महत्वाचा आहे. बजेट आपण तयार करत नाही बजेट प्रशासनाने तयार केलेला असतो. आणि बजेट मध्ये त्रुटी राहू नये किंवा चूकीचे निर्णय घेतले जावू नये त्यासाठी आपल्याला आयुक्त सो.यांची उपस्थिती आवश्यक आहे.याठिकाणी सभागृहात हजर असलेले सर्व पत्रकार बांधवाना विनंती आहे. सकाळी जो प्रकार झाला तो केवळ आयुक्त सो. हजर नसल्याने सभा घेवू नये असे मत होते त्यामध्ये बराचसा गदारोळ झाला कदाचित काही वृत्तपत्रामध्ये काही चूकीच्या बातम्या आल्या

आहे की भाज प पक्षात फूट वगैरे परंतु तसा काहीही प्रकार नसून सकाळी जे काही वाद असतील किंवा काही मागणी असेल ती केवळ अर्थसंकल्प कशा पध्दतीने मांडला जावा म्हणून होती. कृपया आपण याची दखल घ्यावी.आज याठिकाणी स्थायीची अर्थसंकल्पीय सभा तहकूब करण्यांत येत आहे. आणि आयुक्त सो. यांची वेळ घेवून योग्य वेळ व तारीख कळविण्यांत येईल आजची सभा संपली.

**सही/- x x x**
**सभापती,**
**स्थायी समिती ,**
**धुळे महानगरपालिका,धुळे**

**धुळे मनपा भारतरत्न अटलबिहारी वाजपेयी सभागृह**
**मंगळवार दिनांक ०४/०५/२०२१**
**वेळ सकाळी ११-०० वाजता**

धुळे महानगरपालिका स्थायी समितीची सभा क्रं.३ अर्थसंकल्पीय दिनांक २६/३/२०२१ रोजीची तहकूब विशेष सभा आज मंगळवार दिनांक ०४/०५/२०२१ रोजी सकाळी ११-०० वाजता मा. श्री. संजय सुधाकर जाधव, सभापती, स्थायी समिती, मनपा, धुळे यांच्या अध्यक्षतेखाली **धुळे मनपा भारतरत्न अटलबिहारी वाजपेयी सभागृह** भरली.स्वाक्षरी बुकावर सही करुन खालील सन्मा.सदस्य सभागृहात हजर होते.

| अ.क्रं. | सदस्यांचे नांव | हुद्दा |
|---|---|---|
| १ | श्री. जाधव संजय सुधाकर | सभापती |
| २ | श्री. बैसाणे सुनिल तुळशिराम | सदस्य |
| ३ | श्रीमती माळी भारती अशोक | सदस्या |
| ४ | श्रीमती पाटील मंगला सुरेश | सदस्या |
| ५ | श्रीमती बोरसे पुष्पा प्रकाश | सदस्या |
| ६ | श्री. मासुळे अमोल पावबा | सदस्य |
| ७ | श्री. देवरे कमलेश नारायण | सदस्य |
| ८ | श्रीमती पठाण हिना अस्लम | सदस्या |
| ९ | श्री. सईद बेग हाशम बेग | सदस्य |
| १० | श्री. नवले शितल मोहन | सदस्य |
| ११ | श्री. बोरसे नागसेन दामोदर | सदस्य |
| १२ | श्रीमती कुलेवार किरण राकेश | सदस्या |

| | | |
|---|---|---|
| १३ | श्री. जाधव बन्सीलाल माणिक | सदस्य |
| १४ | श्रीमती चौधरी मंगला अर्जुन | सदस्या |
| १५ | श्री. पटेल अमीन अब्दुल करीम | सदस्य |

उपस्थित अधिकारी गण

| अ.क्र. | अधिकाऱ्यांचे नाव | हुद्दा |
|---|---|---|
| १ | श्री. अजीज शेख | आयुक्त |
| २ | श्रीमती शिल्पा नाईक | उपायुक्त |
| ३ | श्री. शांताराम गोसावी | उपायुक्त |
| ४ | श्रीमती पल्लवी शिरसाठ | सहा. आयुक्त |
| ५ | श्री. तुषार नेरकर | सहा. आयुक्त |
| ६ | श्री. विनायक कोते | सहा. आयुक्त |
| ७ | श्री. महेंद्र परदेशी | नगररचनाकार |
| ८ | श्री मनोज अरविंद वाघ | प्र.नगरसचिव |
| ९ | श्री. के.एन. शिंदे | अभियंता |
| १० | डॉ. महेश मोरे | आरोग्याधिकारी |
| ११ | श्री. चंद्रकांत जाधव | सहा.आरोग्याधिकारी |
| १२ | श्री. पी.डी नाईक | लेखापाल |
| १३ | श्री. रमजान अन्सारी | कार्यालयीन अधिक्षक |
| १४ | श्री.आर.बी. सोनवणे | प्र. परवाना अधिक्षक |
| १५ | श्री. बी.एस. रनाळकर | प्र. सहा.कर मूल्य निधारण अधिकारी |
| १६ | श्री. एन.के. बागुल | विद्युत अभियंता |
| १७ | श्री. सी.सी. बागुल | ओव्हरसिअर पाणीपुरवठा |
| १८ | श्री. रा.र. गायकवाड | मनपा शि.मं. |
| १९ | श्री. किशोर सुडके | बाजार विभाग |
| २० | श्री. प्रदीप चव्हाण | ओव्हरसिअर बांधकाम |
| २१ | श्री. अनिल वळवी | वाहन विभाग लिपीक |
| २२ | श्रीमती कल्पना जाधव | अभिलेखापाल |
| २३ | श्री.मधुकर निकुंभे | वृक्ष समिती लिपीक |

म. सभापती — आजच्या अर्थसंकल्पीय बैठकीस उपस्थित आयुक्त सो.सर्व सन्मा. सदस्य / सदस्या अधिकारी गण, पत्रकार छायाचित्रकार बांधव यांचे स्वागत करतो. नगरसचिव यांनी सभेचे कामकाजा सुरुवात करावी.

म. नगरसचिव — वंद् मातरम् या राष्ट्रवंदनेसाठी सर्वांनी उभे रहावे.

विषय क्रमांक:-३ — मा.आयुक्त सो. धुळे महानगरपालिका धुळे यांच्या पत्रानुसार सन २०२०-२१ चे सुधारीत व सन २०२१-२२ चे मुळ अंदाजपत्रक सादर करणे.

म. नगरसचिव — धुळे महानगरपालिकेचे सन 2021-22 चे अंदाजपत्रकीय तहकूब सभा आज रोजी आयोजित करण्यांत आलेली आहे.या अंदाजपत्रकाबाबत सन्मा.सभापती यांनी प्रथम:आपले मनगोत या ठिकाणी व्यक्त करावे.

म. सभापती — धुळे महानगरपालिकेचे सन 2021- 22 ची अंदाजपत्रकीय सभा आपण दि.26/3/2021 रोजी आयोजित केली होती. कोरोनाच्या आपत्तीमुळे काही कारणास्तव मा. आयुक्त उपस्थित

नसल्याने आपण सभा तहकूब केली होती. सदर तहकूब सभा आज रोजी आयोजित केलेली आहे. शहर विकासाच्या दृष्टीने अंदाजपत्रकीय सभेला महत्व आहे. प्रशासनाने आपल्याकडे अंदाजपत्रक सादर केले आहे. सर्व सन्मा. सदस्यांना विनंती की, आपण याबाबत आपले मत नोंदवावे व शहर विकासाच्या दृष्टीने चांगल्या सूचना व मार्गदर्शन याठिकाणी अपेक्षित आहे. आपण शहरासाठी विचार विनिमय करुन एक चांगले अंदाजपत्रक सादर करु शकतो. माझ्याकडे काही सन्मा. सदस्यांनी विकास कामांबाबत प्रस्ताव सादर केलेले आहे. त्यानुसार उत्पन्नाचा आढावा घेवून व प्रशासनाशी चर्चा करुन आपण याबाबत सकारात्मक निर्णय घेणार आहोत.आपण चर्चेला सुरुवात करावी व शहर विकासाच्या दृष्टीने आपले मत नोंदवावे.

म. सुनिल बैसाणे — आपली 25/2/2021 रोजी अंदाजपत्रकीय बैठक होती. त्यात प्रशासनाने सन 2021- 22 चे अंदाजपत्रक सादर केले आहे. त्यानंतर आपण ती सभा तहकूब केली. त्यानंतर कोरोनाच्या कार्यकाळामुळे बैठक पुनश्च तहकूब करण्यांत आली होती. आज जे अंदाजपत्रक सादर झालेले आहे. व ज्यांनी हे अंदाजपत्रक सादर केले आहे. ते मुख्य लेखाधिकारी जाधव साहेब आज गैरहजर आहे. ते दिर्घकालीन मुदतीसाठी गैरहजर आहे. ते गैरहजर का आहे याची माहिती सभागृहास मिळणे आवश्यक आहे.

म. लेखापाल — श्री. जाधव साहेब हे वैद्यकीय कारणास्तव गैरहजर आहे. त्यांनी या संदर्भात रजेचा अर्ज सादर केलेला आहे.

म. सुनिल बैसाणे — सदर अधिकारी गेल्या दोन महिन्यांपासून कार्यालयीन कामासाठी उपलब्ध नाही. ते कोणत्या कारणास्तव गैरहजर आहे असा कोणता आजार त्यांना झालेला आहे. मी स्वत: व मनपातील अनेक अधिकारी कोरोना संसर्गातून बाहेर येवून कामावर रुजू झालेले आहे. परंतु श्री. जाधव हे सातत्याने अशा प्रकारे गैरहजर रहात असतील तर या अंदाजपत्रकाबाबत काही शंका किंवा त्रुटी असल्यास याबाबत विचारणा कोणाकडे करावयाची. हे संपूर्ण अंदाजपत्रक श्री. जाधव यांनी केलेले आहे शहराच्या विकासासाठी व उत्पन्नाच्या वाढीसाठी चर्चा करुन आपण त्यास मंजुरी देतो परंतु अशा प्रसंगी अशा जबाबदार अधिका-यांनी गैरहजर राहाणे ही बाब उचित नाही.

ज्यावेळेस आपल्याकडे अंदाजपत्रक सादर केले त्यावेळेस वृक्ष समितीचे अंदाजपत्रक देण्यांत आले नव्हते. जर आपली बैठक तहकूब झाली नसती तर आपण अंदाजपत्रक मंजूर केले असते व वृक्ष समितीचे अंदाजपत्रक त्यावेळेस सादर नसल्याने त्यास मंजुरी मिळाली नसती प्रशासनाने मुळ अंदाजपत्रक स्थायी समिती समोर सादर करतांना वृक्ष समितीचे अंदाजपत्रक सादर करणे आवश्यक होते.

म.सभापती — आपल्याकडे जरी वृक्ष समितीचे अंदाजपत्रक सादर झाले नसते तरी सदर अंदाजपत्रक महासभेसमोर सादर करण्यांत येणार होते.

म.सुनिल बैसाणे — सन 2020-21 च्या अंदाजपत्रकात 25 कोटीचे कामे सुचविण्यांत आले होते. 18 कोटीच्या कामावर खर्च झाल्याचे दाखविण्यांत आले. सन 2019 – 20 व 2020 – 21 मध्ये 13 कोटीचा जो तुटीचा तपशील आहे तो प्रशासनाने कशा मध्ये समाविष्ट केलेला आहे. ती तुट कशी भरुन काढणार आहोत. मागील स्थायी समिती सभापती असतांना 16 कोटीच्या कामांना प्री बजेटच्या नावाखाली प्रशासनाकडून मंजूरी घेण्यांत आली. स्थायी समितीची कोणतीही मंजुरी त्यावेळेस घेण्यांत आलेली नव्हती. त्यानंतर महासभा झाली महासभेत सुध्दा 16 कोटीच्या कामांना मंजुरी दिली गेली नव्हती. त्यावेळेस आम्ही प्रशासनाकडे सातत्याने पाठपुरावा केला. त्यावेळेस प्रशासनाच्या वतीने लेखी उत्तर मिळाले होते की, बजेटला अद्याप

मंजुरी मिळालेली नाही. ही वस्तुस्थिती असतांना कामांच्या आवश्यकतेप्रमाणे प्रशासनाने मान्यता घेतली असेल किंवा कोरोनाच्या कार्यकाळात अशा प्रकारचे तांतडीचे निर्णय झाले असतील त्यास आमची हरकत नाही. परंतु ज्या कामांची आवश्यकता नाही अशी अनेक कामे त्याठिकाणी घेतली गेली आहे आणि स्थायी समितीची किंवा महासभेची मंजुरी नसतांना 4 कोटीची बिले कोणत्या नियमाने अदा केली गेली याची चौकशी होणे आवश्यक आहे.

शहराच्या पिण्याच्या पाण्यासाठी बजेट मध्ये तरतूद नाही. नगरसेवकांना छोटया छोटया कामाच्या तरतुदीसाठी फिरावे लागते. पिण्याच्या पाण्याच्या नियोजनासाठी 5 कोटी रुपयांची तरतूद केली पाहिजे. परंतु यासाठी कामाच्या खर्चावर नियंत्रण व दर्जा तसेच धोरण ठरविले पाहिजे. छोटया व अत्यावश्यक पिण्याच्या पाण्याच्या कामासाठी प्राधान्य दिले पाहिजे. धुळे मनपा हद्दीत अनेक बेकायदेशीर मोबाईल टॉवर आहेत. त्याव्दारे मोठया प्रमाणावर उत्पन्नाच्या स्तोत्रात वाढ होवू शकते. जे टॉवर अनधिकृत असतील त्यावर दंडात्मक कार्यवाही करुन ते कायदेशीर करावे. त्यातून उत्पन्नात वाढ होवू शकेल. आपल्या शहरात अनेक मनपा मालकीचे शॉपींग कॉम्प्लेस आहेत त्यात अनेक गाळे हस्तांतरण झालेले आहे. सद्या शासनामार्फत दर व शुल्क ठरविण्यासाठी त्रिसदस्यीय समिती करण्यांत आलेली आहे.

सन 2020- 21 च्या अंदाजपत्रकात प्रशासनाने मागील उत्पन्नाच्या बाजूचा विचार न करता सभागृहात बजेट सादर केलेले आहे. हद्दवाढ गावातील भांडवली खर्च प्रशासनाने 150 कोटी दाखलेला आहे. तो कुठल्या कामासाठी दाखविलेला आहे. त्यात कोणती कामे करणार आहोत याचा तपशील नाही. आजच्या बैठकीत लेखाधिकारी यांची उपस्थिती आवश्यक होती. परंतु ते आज नाहीत अशा परिस्थितीत निर्णय कसा घेणार .

मनपाच्या हितासाठी प्रशासन आणि लोकप्रतिनिधी यांचे समन्वय असणे गरजेचे आहे.ही मनपाची दोन चाके आहेत केवळ प्रशासनास दोष देवून चालणार नाही परंतु प्रशासनाने सर्वांना सामावून घेतले पाहीजे.

तीन लाखांच्या आतील पाण्या संदर्भाच्या अत्यावश्यक कामांना मंजुरी दिली पाहिजे या ठिकाणी अनेक मोबाईल टावर धारकांनी मोबाईल कायदेशीर होण्यासाठी दावा दाखल केलेला आहे त्यातून आपल्याला उत्पन्न मिळू शकते.

या अंतिम बजेट मध्ये बॅलन्स शीट दिले गेले नाही हा दर वर्षाचा प्रश्न आहे यासाठी व्दि नोंद पद्धतीचा वापर करणे यापूर्वी आदेशित केले होते यासाठी आपण पंधरा दिवसांची मुदत दिली होती परंतु ती मुदत कमी असल्याने मी एक महिन्याची मुदत द्यावी अशी मागणी केली होती परंतु त्यावर अद्याप कार्यवाही झालेली नाही आपल्या मालमत्तांचे मूल्यांकन होऊन मनपाची स्थावर मालमत्ता निश्चित होणार आहे तीन लाखांच्या आतील अत्यावश्यक कामे आपण करतो परंतु त्याचे रेकॉर्ड ठेवले जात नाही आतापर्यंत किती खर्च झाला याची नोंद नाही मी या ठिकाणी सांगेन प्रि बजेटच्या बिलाबाबत व कामांबाबत शहानिशा करूनच मान्यता द्यावी.

शहर विकासाच्या दृष्टिकोनातून धुळे मनपा च्या जागा आहेत त्याचे मूल्यांकन झालेले नाही मनपाच्या स्थावर मालमत्तेचा त्यामुळे अंदाज येत नाही मी प्रशासनाला विनंती आहे मालमत्तेचे मूल्यांकन केल्यास एखादा चांगला प्रकल्प त्या माध्यमातून मनपाला राबवता येईल त्यावर आपल्याला शासनामार्फत कर्ज उपलब्ध होऊ शकेल आपण स्वयंपूर्ण होण्यासाठी त्या दृष्टीने निश्चित मदत होणार आहे व त्यामुळे मनपा सक्षम होणार आहे आज आपल्या मनपा हद्दीत ११ गावांचा समावेश झालेला आहे त्यामधील असलेल्या जागांचे कोणतेही रेकॉर्ड मनपाकडे प्राप्त नाही सदर रेकॉर्ड स्थानिक कार्यालयात जमा आहेत सदर रेकॉर्ड आपण

तातडीने मनपाच्या ताब्यात घ्यावे व प्रॉपर्टीचे मूल्यांकन करावे सन्माननीय सभापती महोदय आपण या ठिकाणी अनुभवी आहात यात कुठल्याही नगरसेवकांवर अन्याय होणार नाही व नागरिकांनाही मूलभूत सेवा-सविधा पासून नागरीक वंचित राहणार नाही याची अंदाजपत्रकाच्या माध्यमातून काळजी घ्यावी व मनपाचे नाव उज्ज्वल करावे आपण सर्वांनी एकत्र येऊन काम करावे प्रशासनाने बजेट सादर केलेला आहे त्याची समीक्षा करून त्याला मान्यता द्यावी आम्ही प्रशासन सोबत आहोत धन्यवाद.

म. नागसेन बोरसे — मागचा बजेट ज्यावेळेस सादर झाला. त्यात अनेक त्रुटया होत्या. महापौरांच्या मार्फत बजेट मध्ये अनेक उत्पन्नाचे स्त्रोत सुचविण्यांत आले होते. परंतु माझ्या माहितीप्रमाणे त्यातुन एक कोटी रुपयांचे उत्पन्न सुध्दा मनपाला मिळाले नाही. त्यावेळेस 35 ते 40 कोटीचे उत्पन्न सुचविले आणि त्याच आधारावर खर्च दर्शविला होता. त्याचा ताळमेळ कुठेच बसत नाही. जर आपण हिशोब लावला तर 70 ते 75 कोटीची तुट या बजेटमध्ये दिसत आहे. त्याप्रमाणे उत्पन्न नाही. ज्या वेळेस 3 महिन्यांचे सुधारीत बजेट सादर झाले त्यावेळेस देखील मी हा मुद्दा उपस्थित केला होता. या 3 महिन्यांच्या सुधारीत बजेट मध्ये एकदम 30 ते 40 कोटीच्या तरतुदी करणे चूकीचे आहे. त्याकाळात जास्तीत जास्त 9 कोटी उत्पन्न आले असेल. आपण त्यावेळेस स्पील ओव्हरमध्ये 1 कोटी तरतूद दर्शविली होती. आणि त्याच काळामध्ये आपण 13 कोटीच्या वर्कऑर्डर दिल्या होत्या. कार्यादेश दिल्यानंतर ती कामे स्पील ओव्हरमध्ये येणे अपेक्षित होते. त्यानंतर 6 कोटीचे स्पील ओव्हरची कामे लेखाधिकारी जाधव सो. यांनी सूचविली. प्री बजेट बाबतही काही तक्रारी झाल्या. यात सन 2020- 21 ची विकास कामे या हेडखाली 15 कोटीची तरतुद करुन घेतली. माझी प्रशासनाला विनंती आहे. प्री बजेट च्या कामाची यादी व तरतूद रजिस्टर आपल्याकडे उपलब्ध आहे त्या चे सभागृहात वाचन करावे.

म.शितल नवले — मला सांगावेसे वाटते मागच्या महासभेचे इतिवृत्त वाचले जात नाही आम्ही ज्या बाबी सुचविल्या होत्या त्या या बजेटमध्ये विस्तृत करण्यात आलेल्या नाहीत माझे सहकारी बंटीभाऊ व आम्ही महापौराचे अभिनंदन केले आमच्या मिल परिसरातील ५० ते ६० हजार लोकवस्तीसाठी चितोड रोडला अमरधाम आहे.त्यासाठी तरतूद करणेबाबत प्रस्ताव मांडला होता. आणि ती तरतूद शुन्य करून टाकली हा काय प्रकार आहे आयुक्त सो.यांनी प्रॅक्टीकल बजेट मांडला होता प्रशासनातर्फ उत्पन्न खर्च दोन्ही बाजूचा विचार करण्यात येतो मग बजेट मांडण्यात येते आयुक्त सो यांनी बजेटमध्ये बीओटी साठी सर्वात जास्त उत्पन्नाचा साईटमध्ये दिले आहे. आपल्यापैकी कोणीहि काहि सांगितले नाही तरतूद वाढवा म्हणून आपल्या महासभने २७ कोटी वाढवून टाकले त्यामध्ये कायदयात अशी तरतूद आहे जर चुकीचे आकडे मांडून महासभेत वाढीव बजेट करत असाल तर आपले पद पण रद्द करण्याचे अधिकार शासनाला आहे जर एखादयाने हुशार वकील ठेवला तर आपण सर्व घरी जाऊ माझे असे म्हणणे आहे पाहिले महासभा होऊ द्या व त्यानंतर पुढच्या बजेट घ्या मला एक कळत नाही पहिला अधिकार असतो स्थायीचा बजेट मंजूरीच्या ज्या तुम्ही तरतूद सुचविल्या त्या कमी करण्याचा अधिकार महासभेला असतो का मागच्या सभापतीने १४ कोटीच्या तरतूदी सुचविल्या होत्या त्या १२ कोटी कट करून २ कोटी करून ठेवल्या माझ्या सदस्यांना असा प्रश्न पडतो की जर तरतूदी सुचविल्या त्या मान्य होतील का मागाचे इतिवृत्त अजून मिळाले नाही माझी हिच मागणी आहे की, आजची सभा तहकूब करा मी माझा विरोधच नोंदवत आहे ठराव मंजूर करण्याची घाई करू नका आम्हाला आमची उत्तरे घेऊ द्या अभिनंदन स्विकरातात आणि आमची तरतूद कॅन्सल करून टाकतात २/२ हजार लोकसंख्येचे गाव त्या गावाला स्मशानभुमीसाठी ७५ लाख मंजूर करतात वेळेवर महासभा घ्यायची नाही. वेळेवर ठराव

वाचायला द्यायाचे नाही म्हणजे हे आम्हाला कळूच दयायचे नाही काय गोलमाल चालूआहे मी अस होऊ देणार नाही सभापती महोदय मागच्या बऱ्याच्या गोष्टी आहेत ज्या गरज नसतांना तरतूद वाढविण्यात आल्या आहेत. आज खरा प्रश्न पाणीपुरवठा व आरोग्याचा आहे आपण कोणतेही अन्य रस्ते गटारी सुशोभिकरणाचे काम घेऊ नका परंतु पाण्याच्या प्रश्नाला प्राधान्य द्या आपण शहरातील पाणीपुरवठा सुरळीत करण्यासाठी वॉटर कन्सल्टंट नियुक्ती केलेली आहे. त्यांना व त्यांच्या मार्गदर्शनुसार इतर पाणीपुरवठ्याच्या सुधारणांसाठी या वर्षी किमान दहा कोटी रुपये तरतूद करावी आपण बजेटमध्ये अंतर्भूत करा आपण काही बाबी कमी केले आहेत जसे आता आपण मलेरियाचे फवारणीचे टेंडर काढलेले आहे त्यात आपल्याला १५ व्या वित्त आयोगातून काही रसायने खरेदी करता येईल बीओटीचे प्रकल्प बांधकाम विभागाकडे तयार आहेत गुजराती शाळा येथे बीओटीवर प्रकल्प तयार करावयाचा आहे त्यातून आपल्याला कमीत कमी २० ते २२ कोटी उत्पन्न मिळू शकते ज्याप्रमाणे गरुड कॉम्प्लेक्स व देवपूर स्टेडियम येथे जिल्हाधिकारी कार्यालयामार्फत तयार करून ते तातडीने वितरित करण्यात आली त्या प्रमाणे आपल्याला तातडीने गुजराती शाळेच्या ठिकाणी बुकिंग मिळू शकते आज कलेक्टर ऑफिसला त्या गाळयांच्या माध्यमातून चांगल्या प्रकारची उत्पन्न मिळत आहे मी ढोबळमानाने इथे काही गोष्टी मांडलेले आहेत याठिकाणी नागसेन भाऊ बोलले की तीन महिन्यात असताना आपण बजेटला मंजुरी दिलीमहिन्यात उत्पन्नाचे स्तोत्र आपण टाकले परंतु तेवढे उत्पन्न आपल्याला मिळू शकते का हा सुद्धा प्रश्न होता म्हणून वस्तुनिष्ठ असेल ते मांडा दरवर्षी आपण फुगीर बजेट तयार करतो पण प्रत्यक्षात तीस तीस ते पस्तीस टक्के उत्पन्न आपल्याला मिळत नाही फक्त विशेष निधी व शासन निधीच्या कामांचे पैसे खर्च होतात आणि अठरा कोटीचा स्पील ओव्हर माझ्या मते खूप मोठा आहे आपण यापूर्वी मागे बिल काढण्यासाठी रजिस्टर तयार केले होते परंतु ते आता गहाळ झाल्याचे समजते ते जर शोधले तर आपल्याला वस्तूनिष्ठा आकडे मिळू शकतात माझ्या हिशोबाने आजच्या तारखे मध्ये नगरसेवक निधी सोडला तर सत्तर ते ऐंशी टक्के दायित्व आपल्यावर येते आपल्याला विभागीय आयुक्तांकडे कडून जुन्या बिलांच्या संदर्भात नोटिसा बजावण्यात आलेले आहेत त्याबाबतही कार्यवाही करणे गरजेचे आहे बजेट मध्ये नवीन कामे समाविष्ट करण्यापूर्वी मागील देयके आहेत त्याबाबत निर्णय घेणे अपेक्षित आहे आपण विभागीय आयुक्तांच्या आदेशाची पायमल्ली करतो आहोत याबाबत सुनील भाऊंनी विषय मांडला मोबाईल टॉवरच्या संदर्भात मोबाईल टॉवरला आपण परवानगी देतो एका टॉवर वरती सर्व कंपन्यांचे नेटवर्क असतात ते फक्त पैसे एका टॉवरचे जमा करतात परंतु ते तेथून चार ते पाच कंपन्यांची सेवा देतात आपण त्याबाबत चौकशी करून व तपासणी करून त्यांच्यावर कारवाई करावी आज सुरत येथे ९० % टॉवर मनपाच्या मालकीचे आहेत सर्व सुसज्य अशी मनपा आहे ते छोटे छोटे नगरपरिषदेने अल्प व्याज दराने कर्ज देतात. आपण सुरत गोवा अशा महानगरपालिकेचा अभ्यास करायाला पाहिजे. या बजेटमध्ये प्रमुख्याने आरोग्य व पाणी पुरवठा या दोनच गोष्टीवर भर दिला गेला पाहिजे. मी माझ्या जन्मापासून पाणी पुरवठयाची समस्या बघत आलेलो आहे. धुळेकर नागरीक फार संयमी आहेत आपण पाणी पुरवठयावर लक्ष घालणे आवश्यक आहे. आपण मागील वेळेस आयुर्वेदिक हॉस्पिटलसाठी ३० लक्ष तरतूद केलेली होती परंतू त्यांचावर कार्यवाही झालेली नाही. कमीम कमी ज्या महत्वाच्या तरतूदी केलेल्या आहेत. त्याची अमलबजावणी करण्याची जबाबदारी आपल्या समक्ष अधिकाऱ्यावर टाकावी व प्रकल्प मार्गी कसे लागतील यांचा विचार करावा. आपल्याकडे आयुर्वेदिक डॉक्टर आहेत सदर दवाखान्याचे काम झाले असते. तर आपल्याला सदर दवाखाना कोविड सेंटर म्हणून सुध्दा

उपयोगात आलेला असता. मागील वेळेस आम्ही काही तरतूदी सुचविल्या होतात परंतू त्या घेण्यात आलेला नाहीत. आमच्या चितोड रोड अमरधामसाठी मी मागणी केलेली होती त्याठिकाणी एक एक ओटा ८ लाख रूपयात करण्यात आला जर तरतूद जास्त झाली असती तर अत्यंविधी जमीनीवर करण्याची वेळ आली नसती. मला महापौरांना प्रश्न विचाराचा आहे की, आम्ही तुमचे अभिनंदन केले तुम्ही चितोड रोड अमरधाम साठी ८६ लाख तरतूद केली आहे म्हणून आम्ही तुमचे अभिनंदन केले परंतू आपण बजेटमध्ये शून्य तरतूद केली हे योग्य नाही. स्व:ता सभापती व ५ ते ६ नगरसेवक त्या परिसरात राहतात ६० ते ७० हजार लोकसंख्याचा भाग आहे. त्याचा विचार होणे गरजेचे होते.

म.अमोल मासुळे

सन २०२१ २२ या आर्थिक वर्षाचा अर्थसंकल्प प्रशासनाने मंजुरीसाठी स्थायी समितीसमोर सादर केलेला आहे परंतु भविष्यात सदर अंदाजपत्रकातील तरतुदींबाबत लेखा आक्षेप आल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी मनपा प्रशासनाची राहील विशेषता याबाबत इतिवृत्तात नोंद घेण्यात यावी सभापती महोदय या ठिकाणी अनेक सन्माननीय सदस्यांनी बजेटवर त्यांची योग्य असे मत मांडले आहे या ठिकाणी उत्पन्न वाढीसाठी धुळे शहरात अनेक बीओटी प्रकल्प आहेत त्यांचा गांभीर्याने विचार केला तर मनपाचे आर्थिक उत्पन्न वाढू शकणार आहे याठिकाणी बीओटी तत्त्वावर मनपाने चार ते पाच जागा विकसित करण्यासाठी हाती घेतलेले आहेत मागील वर्षी सभापती सुनील भाऊ बैसाणे असताना याबाबत आर्किटेक व एजन्सी देखील नेमण्यात आलेली होती जे बीओटी तत्त्वावर प्रोजेक्ट हाती घेतलेले आहेत त्याबाबत लवकर अंमलबजावणी झाल्यास मनपाच्या उत्पन्नात निश्चित वाढ होणार आहे या ठिकाणी अनधिकृत टॉवरच्या दंड वसुली बाबत मुद्दा घेण्यात आलेला आहे परंतु त्यावर ठोस कार्यवाही होताना दिसत नाही अधिकाऱ्यांकडून देखील योग्य उत्तर मिळत नाही आपण किती टावर ला आजपर्यंत मंजुरी दिलेली आहेत त्याला किती वर्षाची परवानगी देण्यात आलेली आहे त्यांची मुदत संपून देखील मनपाचे अधिकारी त्यावर कारवाई करत नाही हा देखील मनपाच्या उत्पन्नाचा प्रमुख स्तोत्र आहेत व खूप मोठा विषय आहेत जे अवैध टॉवर कनेक्शन घेतात त्यांच्यावर पाच ते दहा पट दंड आकारणी करता येईल व त्यामुळेदेखील उत्पन्नात मोठ्या प्रमाणावर वाढ होणार आहे तसेच अवधान शिवारात मनपा मालकीचे ट्रक टर्मिनल उभारलेले आहे आपण तेथे लाखो रुपयांची गुंतवणूक केलेली आहे त्यावर योग्य ती बैठक घेऊन नियोजन केले तर त्यापासून आपल्याला उत्पन्न मिळू शकते दुसरा विषय की आपण बाजार फी संदर्भात आवश्यक ती प्रक्रिया व मान्यता दिलेली आहे याबाबत मागील मिटिंग मध्ये प्रश्न उपस्थित केला होता परंतु त्याबाबतही अद्याप ठोस निर्णय झालेला नाही त्यातूनही आपल्याला रोज ३० ते ३५ हजार रुपये उत्पन्न मिळू शकते व वर्षाकाठी लाख रुपये उत्पन्न मिळणार आहे याबाबत मी मागे बैठकीत ट्रॅव्हल्स संदर्भात त्यांच्यावर कर आकारणी करण्याचा विषय मीटिंगमध्ये मांडलेला होता आपल्या धुळे शहरात दर दिवसाला १५० ते २०० गाड्या येत जात असतात ते आपल्या महानगरपालिकेचे रस्ते व इतर गोष्टींचा वापर करतात तसेच ग्राहकांकडून त्यांच्या मनमानी प्रमाणे दर आकारणी करतात आपल्या शहरात ते थांबतात व आपल्या यंत्रणेवर त्याचा अतिरिक्त ताण पडतो म्हणून त्यांच्यावर रक्कम ठरवून आकारणी करण्यात आकारणी केल्यास त्यातून आपल्याला ३० ते ३५ हजार रुपये उत्पन्न मिळेल वर्षाकाठी ७० ते ८० लाख रुपये उत्पन्न मिळणार आहे दुसरा विषय जीपीएस प्रणाली शहरांमध्ये आपण मालमत्तेच्या सर्वेक्षणासाठी लागू केलेली आहे त्यातूनही आपल्याला मोठ्या प्रमाणात उत्पन्न मिळू शकते त्याचे काम लवकरात लवकर मार्गी लावण्यात यावे

अमीन पटेल

आज सन २०२१- २२ चा अंदाज पत्रक आपल्याकडे सादर झालेले आहे सर्वप्रथम शहरात पाणी प्रश्न महत्त्वाचा आहे पाणी प्रश्नामुळे अनेक नागरिकांना अडचणी निर्माण होतात आपल्याकडे आठ महिने पाणी बरोबर येते व नंतर चार महिने पाणी मिळत नाही आज सभापती महोदय आनंदाची गोष्ट आहे आपण पदभार घेतल्यानंतर पाणीपुरवठ्याच्या विषयावर दोन वेळा मीटिंग घेतली आज पाणीपुरवठा मध्ये ६० ते ७० टक्के सुधारणा झालेली आहे परंतु अजूनही आवश्यक ती सुधारणा करणे आज शहरात अनेक ठिकाणी लिकेंजेस आहेत तसेच अनेक ठिकाणी व्हॉल आहेत ते गटारी च्या बाजूला आहे जर व्हॉल लिकेंज असेल तर गटारीचे पाणी व्हॉलमध्ये जाऊन नागरिकांना दूषित पाणीपुरवठा होतो व जे काही व्हॉल नादुरुस्त आहेत ते देखील बदलणे गरजेचे आहे यासाठी आवश्यक ती तरतूद या अंदाजपत्रकात करायला हवी आज आपण पाणी सोडले तर शेवटच्या भागाला पाणी येत नाही पाणी सोडण्यासाठी माझ्या भागात साडेचार लाख रुपयांची एस्टिमेट तयार झालेले आहे परंतु तेथील पाईपलाईन जोडली गेली तर त्या ठिकाणी शेवटच्या भागाला चांगल्या प्रकारे पाणी मिळू शकते परंतु गोष्टींसाठी बजेट मध्ये आवश्यक ती तरतूद करणे गरजेचे आहे तसेच जलकुंभ व्हॉलमन व नगरसेवक मनमानी करून पाणी सोडतात त्यासाठी मी यापूर्वी बैठकीत सांगितले होते प्रत्येक जलकुंभावर सीसीटीव्ही कॅमेरे बसविणे गरजेचे आहे त्यासाठी देखील तरतूद करावी आज धुळे शहराचा जो फिल्टर प्लांट आहे तो प्रभावीपणे काम करत नाही फिल्टर प्लांटमुळे आपल्याला अनेक प्रकारच्या समस्या येतात पाणी व्यवस्थित फिल्टर न झाल्याने दूषित पाणीपुरवठा होतो आज शहरात अनेक नागरिक किडनी स्टोन व दूषित पाण्याचे शिकार झालेले आहेत त्यामुळे नवीन फिल्टर प्लांट आवश्यक त्या ठिकाणी बसवणे गरजेचे आहे त्यासाठी सुद्धा या अंदाजपत्रकात तरतूद करणे अपेक्षित आहे. आज आमच्या स्लम भागात गटारीचा मोठा प्रश्न आहे अनेक जण डायरीमुळे मृत्युमुखी पडत आहेत त्या ठिकाणी भूमिगत गटार तयार करून मेंन गटारीला जोडली गेली पाहिजे १४ वित्त आयोगातून सदर काम केले तर मनपाच्या निधीची आवश्यकता नाही आमच्या आजाद नगर भागात जे सार्वजनिक शौचालय आहे त्याठिकाणी पाईपलाईन नाही त्यामुळे नागरिकांच्या आरोग्याला धोका होत आहे जर आपण त्या ठिकाणी व्यवस्थित गटारी व सांडपाण्याची व्यवस्था केली तर अनेक नागरिकांना फायदा होईल दुसरी गोष्ट अल्पसंख्यांक निधीसाठी अंदाजपत्रक फक्त २० लाख रुपये तरतूद आहे आम्ही अल्पसंख्यांक भागात एकूण १७ नगर सेवक आहोत विकासाचा मोठ्याप्रमाणावर अनुशेष याठिकाणी प्रलंबित आहे एक रस्ता सुद्धा २० लाखात तयार होत नाही त्यासाठी भरीव अशी तरतूद या अंदाजपत्रकात करावी अशी मी विनंती करतो. या ठिकाणी अनेक शाळा आहेत त्यांची परिस्थिती अत्यंत वाईट झालेली आहे काही ठिकाणी पिण्याच्या पाण्याची व्यवस्था नाही शौचालय नाही यामुळे मनपा शाळा दुरुस्ती व नूतनीकरणासाठी तरतूद करणे आवश्यक आहे यापूर्वी आपण संदीप महाले सभापती असताना मनपाच्या इंग्रजी माध्यमांच्या शाळा सुरू केल्या होत्या त्या अतिशय चांगल्या प्रमाणात सुरू होत्या त्या ठिकाणी अनेक गरीब विद्यार्थी शिक्षण घेत होते तेथील शाळापूर्ववत सुरू करून तेथील शिक्षकांना मानधन व इतर सुविधा दिल्या गेल्या पाहिजेत त्यासाठी अंदाजपत्रकात तरतूद करावी तसेच शहराच्या अन्य भागातील ज्या वसाहती आहे त्या ठिकाणी मोठ्या प्रमाणावर रस्ते गटारीचा समस्या आहे त्या ठिकाणी अनेक नागरिक मोठ्या प्रमाणावर वास्तव्य करतात त्या भागातही आवश्यक त्या मूलभूत सेवासुविधा च्या कामासाठी तरतूद करावी आपण या ठिकाणी मी जे प्रश्न मांडले आहे त्यात निश्चित लक्ष देऊन कारवाई करु.

म. सुनिल बैसाणे
सभापती महोदय, याठिकाणी अमीन पटेल यांनी जी खंत व्यक्त केली ती अत्यंत खरी आहे. परंतु धुळे मनपा मध्ये किवा महाराष्ट्राच्या अनेक मनपा असतील त्यामध्ये दलित वस्ती सुधार योजनेअंतर्गत अनेक दलित प्रभागामध्ये दलित भागासाठी विकास निधी उपलब्ध असतो. त्याच पध्दतीने अल्पसंख्याक माझ्या माहितीनुसार धुळे मनपा मध्ये 14 ते 15 नगरसेवक आहेत. 15 नगरसेवक अल्पसंख्याक असतांना त्यांना अल्पसंख्यांक निधी 20 लाख देऊ करत आहे. ही अत्यंत खेदजनक बाब आहे. आणि धुळे मनपाच्या इतिहासामध्ये अल्पसंख्याक आमदार याठिकाणी निवडून आलेला आहे. जे अल्पसंख्याक सन्मा. सदस्य निवडून आलेले आहे त्यांना विनंती करतो की, त्यांच्या माध्यमातून देखील निधी उपलब्ध करुन घ्यावी.धुळे मनपाच्या अंदाजपत्रकात त्यांना कमीत कमी 1 ते दीड कोटी रुपयांची अल्पसंख्याक निधी म्हणून तरतूद करावी.आणि अल्पसंख्याक समाजामध्ये ज्या येणा-या जाती जमाती आहे त्यांच्या वस्ती मध्ये काम केले पाहिजे. जैन, खिश्चन हे देखील अल्पसंख्याक समाजात गणले जातात. त्यांच्या ही कॉलन्या असतील त्या भागात कामे झाली पाहिजे. येणा-या काळात ती तरतूद करणार ही अपेक्षा व्यक्त करतो.

म. नागसेन बोरसे
सभापती महोदय, सुनिल भाऊ यांनी व अमीन भाऊ यांनी जो विषय याठिकाणी उपस्थित केला आहे. आपण त्या भागात फिरतो. त्या भागातील नागरीकांना सुखसुविधा दिल्या गेल्या पाहिजे. गटारी साफ होत नाही जागेवर झाडू मारले जात नाही अतिशय घाण परिस्थिती सदर भागात आहे. आपल्याला विनंती करतो की, सन्मा. सदस्यांनी 1 कोटीची मागणी केली आहे ज्या पध्दतीने आपण महासभेमध्ये ग्रामीण भागासाठी 3 कोटी रुपयांची पाईप लाईनची तरतूद केली आहे तशी 3 कोटी रुपयांची तरतुद अल्पसंख्याक विशेष बाब म्हणून केली तर आमच्या कोणत्याही नगरसेवकांची त्यास हरकत राहणार नाही. माझी विनंती आहे अल्पसंख्याक वस्ती सुधारण्यासाठी 2.5 ते 3 कोटी रुपयांची तरतुद अंदाजपत्रकात करण्यांत यावी. जेणे करुन त्यांच्या एक एक नगरसेवकांच्या हिश्यास किती येणार हे सांगावयाचे काम नाही. तरी 3 कोटी रुपयांची तरतूद अल्पसंख्याक विशेष बाब म्हणून करावी. कारण या मनपात भारतीय जनता पार्टीची सत्ता आहेआणि भाजपा पक्ष सर्वांना विकास सोबत घेऊन चालणारा पक्ष आहे असा वेगळा संदेश जनतेमध्ये गेला पाहिजे.या मुळे इतर मनपामध्ये देखील तरी तरतूद केली जाईल.दलित वस्ती मध्ये ज्या पध्दतीने विकास होतो त्याच पध्दतीने अल्पसंख्याक प्रभागामध्ये विकास होईल. स्लम भागात जास्त घाण दुर्गंधी आजारपण या गोष्टींचा त्यांना त्रास होतो. तरी अल्पसंख्याक वस्ती सुधारण्यासाठी 3 कोटीची तरतूद अंदाजपत्रकात करावी.

म. शितल नवले
आपल्या शहरात अशा काही शाळा आहेत त्याठिकाणी आधुनिक व नुतनीकरण करणे आवश्यक आहे. आपण या आधी आमच्या प्रभागात शाळा नं. 28 येथे एका समता शैक्षणिक संस्थेला मनपा शाळा चालविण्यासाठी दिलेली आहे. आज ती शाळा चांगल्या प्रकारे सुरु आहे. त्याच प्रमाणे आपली शाळा क्रं. 29 येथे मोठी शाळा आहे. तेथे यापूर्वी केंद्रीय विद्यालय होते.ती जागा अल्पसंख्याक वस्ती लगत आहे व जवळपास अल्पउत्पन्न गटातील नागरीकांची वस्ती आहे. सदर शाळा जर एखादया संस्थेला लिजवर दिल्यास शाळा विकसीत होवून शाळेची गुणवत्ता देखील वाढणार आहे. व त्यात आपण संस्थेशी करार करुन आपले काही विद्यार्थी यांना तेथे प्रवेश देऊ शकतो. त्यामुळे तेथे विद्यार्थी चांगल्या प्रकारे तयार होवू शकतात. अशा प्रमाणे विचार होणेही गरजेचे आहे. तसेच अल्पसंख्याक भागातील विकास कामांसाठी रस्ता अनुदानाचे मिळणारे 75लाख रुपये देण्यांस हरकत नाही.

म. भारतीताई माळी
माझा प्रभाग क्रं. 2 हा शहरापासून 5 किलोमिटर अंतरावर आहे. तेथे खूप मोठया प्रमाणावर कॉलनी परिसर आहे. माझ्या भागातही विकासाचा अनुषेश मोठा परिसर असल्यामुळे मोठया

प्रमाणावर प्रलंबीत आहे. माझ्या भागात सर्व नागरीक अत्यंत प्रामाणिकपणे प्रॉपटी टॅक्स नियमित भरतात. 5 ते 7 कोटी रुपयांची वसुली माझ्या प्रभागातून मिळते. माझ्या प्रभागातून ज्या प्रमाणे घरपट्टी टॅक्स वसुल केला जातो त्याप्रमाणात विकास कामे होणे गरजेचे आहे.जर ती विकास कामे झाली तर माझ्याही प्रभागातील नागरीकांचा उत्साह वाढून जास्तीत जास्त कर वसूल होवू शकेल.. शहरात फक्त् काही भागातच विकास झाला आहे. माझ्या प्रभागातील घरपट्टी टॅक्सचा भरणा प्रभागातील विकास कामांसाठी देण्यांत यावा.

म.सभापती — आपण व्दिनोद लेखा पद्धतीचे काम सुरू केलेले आहे परंतु जोपर्यंत मूल्यांकन होत नाही तोपर्यंत ते काम होणार नाही याबाबत समक्ष आयुक्त साहेबांशी चर्चा करणार आहे. सर्व सन्माननीय सदस्यांनी मोलाचा सूचना केलेल्या आहेत शहर विकासाच्या दृष्टीने आपण ज्या सूचना केल्या त्याबाबत आयुक्त महोदयांना विनंती करेन की आपण या सूचना याबाबत विवेचन मार्गदर्शन करावे.

म. आयुक्त — आपण अतिशय चांगल्या सूचना मांडलेले आहेत काही कारणामुळे मागची बैठक आपण तर खूप केलेली होती अंदाजपत्रक सादर करणे ही कायदेशीर तरतूद आहे आपण आगामी वर्षात शहराला काय देणार आहोत त्याप्रमाणे नियोजन अंदाजपत्रकात असते आणि त्या दृष्टीने त्याची प्रक्रिया सुरुवात केलेली आहे आपण आज दुसरा टप्पा पूर्ण करीत आहोत अतिशय चांगल्या सूचना आपण सादर केलेले आहेत त्यानुसार चर्चा झालेली आहे बहुतेक सदस्यांनी उत्पन्न वाढीच्या सूचना केल्या आहेत त्या अतिशय योग्य आहेत विकास कामांसाठी उत्पन्नाचा विचार होणे गरजेचे आहेत बी.ओ.टी.प्रकल्पांचा विषय या ठिकाणी मांडण्यात आला असे प्रकल्प शहरात होणे आवश्यक आहे त्यासाठी आम्ही निश्चित कार्यरत आहोत त्याची कार्यवाही आम्ही गतीने सुरु केलेली आहे. माजी सभापती सुनिल बैसाणे यांच्या काळात आपण चांगले बजेट देण्याचा प्रयत्न केला परंतु वर्षभर कोरोनाच्या या परिस्थितीमुळे अंमलबजावणी शक्य झाली नाही ही वस्तुस्थिती आहे आजही कोरोनाचा काळ आहे पण आज आपण स्थिर झालेलो आहोत मागील वर्षी फक्त कोरोनावर लक्ष केंद्रीत करणे गरजेचे होते परंतु आता इतर बाबींकडे लक्ष देणे गरजेचे राहणार आहे व त्याप्रमाणे आपण कार्यवाही सुरू केलेली आहे बी.ओ.टी. प्रकल्पांबाबत गंभीरपणे आपण प्रक्रिया राबवित आहोत लवकरच त्याची पूर्तता करण्यासाठी प्रयत्नशील आहोत त्याची सर्व माहिती आपणास आम्ही देऊ आपण या ठिकाणी श्री जाधव यांच्या गैरहजेरी बाबत मुद्दा उपस्थित केलेला होता आपल्याकडे यापूर्वी असलेले लेखाधिकारी भामरे यांची बदली झाल्यानंतर ते पद काही महिने रिक्त होते आपण भरपूर शासनाकडे पदे भरण्यासाठी प्रयत्न केले त्यानंतर आपल्याकडे पाठपुरावा केल्यानंतर श्री जाधव अधिकारी रुजू झालेत आपल्याकडे लेखापरीक्षकांची पण सुद्धा रिक्त आहे मध्यंतरात श्री जाधव साहेब रजेवर गेले त्यांनी वैद्यकीय रजेचा अर्ज दिला त्यानंतर आम्ही त्यांना प्रशासनामार्फत नोटीस दिली त्याला त्यांनी उत्तर दिले आहे त्यांच्या कौटुंबिक समस्यांमुळे मी त्यांना याबाबत फोर्स करू शकलो नाही ही संस्था चालविणे गरजेचे आहे श्री प्रदीप नाईक यांनी त्या ठिकाणी काम केलेले आहे आपल्याकडे अधिकारी व कर्मचार्‍यांची कमतरता आहे संस्थेचे काम सुरू राहावे म्हणून त्यांना पदभार दिलेला आहे ही वस्तुस्थिती आहे बजेट बाबत काही कायदेशीर तरतूदी आहेत.

आपण वृक्ष समितीच्या बजेट बाबत मुद्दा उपस्थित केलेला होता ज्यावेळेस स्थायी समितीचे अंदाजपत्रक सादर केले त्यावेळेस वृक्ष समितीचेही बजेट सादर आपण करीत असतो परंतु वृक्ष समितीची बैठक होण्यास विलंब झाला आपली पद्धत अशी आहे प्रशासनाने बजेट सादर केल्यानंतर आपण त्याठिकाणी लगेच चर्चा करत नाही सदर सभा तहकूब करून पुढील

सभेत सन्माननीय सदस्य त्याचा अभ्यास करतात व त्यानंतर आपण तर खूप सभेचे आयोजन करतो त्या अनुषंगाने त्या कालावधीत वृक्ष समितीचे अंदाजपत्रक मंजूर करून स्थायी समितीपुढे सादर केलेले आहे यापुढे स्थायी समितीपुढे बजेट सादर करतानाच वृक्ष समितीचे बजेट सादर होईल याची दक्षता घेऊ या ठिकाणी अनधिकृत टॉवर बाबत मुद्दा उपस्थित झालेला आहे मोबाईल टावर चा सर्वे केलेला आहे त्यांना सर्वांना नोटिसा देखील पाठवलेले आहेत त्यातील काही लोकांना आपण परवानगी दिली आहे व त्यांच्याकडे काही त्रुटी आहेत त्यांना त्या कळविण्यात आलेल्या आहेत मोबाईल टावर कडून आपल्याला उत्पन्न मिळाले पाहिजे हे महत्त्वाचे आहे मोबाईल टावर ही शहराची सुद्धा गरज आहे परंतु त्यातून मनपाचे उत्पन्न पाहणे हे सुद्धा गरजेचे आहे व त्या दृष्टीने आपला प्रयत्न व कार्यवाही सुरू आहे मोबाईल टावर बाबत आपण या वर्षीसुद्धा कारवाई करणार आहोत शितल भाऊंनी या ठिकाणी मुद्दा उपस्थित केला एका टॉवरवरून वेगवेगळ्या कंपन्या सेवा देतात याबाबत मला कायदेशीर व तांत्रिक बाबी तपासून घ्याव्या लागतील आपल्या नियमाप्रमाणे एखाद्या स्ट्रक्चर वर आपण प्रॉपर्टी टॅक्स घेतो त्याचप्रमाणे मोबाईल टॉवरच्या स्ट्रक्चर वर आकारणी करावी लागते त्यामध्ये अनेक कंपन्या सेवा देत असतील तर या कायदेशीर बाबी तपासून काढाव्या लागतील आपल्याला चुकीच्या पद्धतीने वसुली करता येणार नाही.

धुळे मनपा मालकीच्या व्यापारी संकुलातील गाळयांच्या संदर्भात मुद्दा उपस्थित केला आपले बरेच गाळे हस्तांतरण झालेले आहे त्यासाठी आपण का अधिकाऱ्याची नियुक्ती केलेली आहे त्याबाबत श्री.सुडके हे काम पाहत आहेत त्यांनी याबाबत सर्व माहिती जमा केलेली आहे यामध्ये शासनामार्फत असलेल्या त्रिसदस्यीय समितीची बैठक झालेली नाही यासंदर्भात आपण जिल्हाधिकारी यांना पत्र दिले आहे व बैठक लवकर लावण्याचा प्रयत्न आहे आपण वेदर यापूर्वी हस्तांतरणासाठी जे दर ठरविले होते ते अवाजवी असल्याचे गाळे धारकांनी तक्रार केली होती ती वस्तूता रास्त आहे आपण दर आकारणी नव्याने करण्याबाबत प्रयत्न करणार आहोत जेणेकरून समन्वयाने मनपाच्या उत्पन्नात वाढ होईल.

म.शितल नवले — आता जी नवीन नियमावली आलेली आहे त्यात हस्तांतरणाचा कायदा आलेला आहे जर आपण त्या कायद्याप्रमाणे तपासून अंमलबजावणी केली तर आपण आपल्या उत्पन्नात वाढ होईल याबाबत प्रशासनाने तपासणी करून घ्यावी.

म.नागसेन बोरसे — मी जो मुद्दा उपस्थित केलेला आहे कि चार महिन्यात किती उत्पन्न आले व आपल्याला एकूण दायित्व किती आहे याचा खुलासा झाला पाहिजे.

म.आयुक्त — काही मुद्द्यांबाबत मी अधिकाऱ्यांकडून माहिती घेणार आहे सभागृहाला पूर्णपणे माहिती मिळेल तीन लाखापर्यंत च्या कामांची नोंद ठेवणे बाबत कार्यवाही करण्यात आलेली आहे.

म.अभियंता — तीन लाखांच्या आतील कामांची माहिती दर आठवड्यापुरवठ्याच्या व्यतिरिक्त इतर जी कामे आहेत ती टेंडर काढूनच करावी अशी मी सभागृहाला विनंती करेल.

म.अमोल मासुंळे — अतिशय अभिनंदनीय निर्णय आहे.

म.आयुक्त — आपल्याला ज्या काही सुधारणा करायचे आहेत त्याला आमचा व पदाधिकारी व समितीचा पूर्णपणे पाठिंबा आहे आपण त्याची अंमलबजावणी सुरू करा यामध्ये चर्चेत व्दि नोंद पद्धतीचा मुद्दा उपस्थित झालेला होता आपण त्या कामाला सुरुवात केलेली होती परंतु सध्या ते काम मंदावले होते त्या कामाला आपण लवकरच गती देऊन आपले उत्पन्न वाढवून आपण स्वयंपूर्ण होण्यासाठी निश्चित आपण प्रयत्न करणार आहोत उत्पन्न खर्चाबाबत लेखापाल प्रदीप नाईक यांनी माहिती द्यावी.

| | |
|---|---|
| म.लेखापाल | महासभेने बीओटी तत्तवावर उत्पन्न सुचविलेले होते त्यानुसार आपल्या उत्पन्न प्राप्त झालेले नाही. यामध्ये २७ कोटी २५ लाख उत्पन्नबाबत तरतूद केलेली होती. |
| म.आयुक्त | आपल्याला बीओटी तत्त्वावर काही प्रोजेक्ट करायचे होते परंतु आपले सर्व प्रोजेक्ट कोरोनाच्या मधील कार्यक्रमामुळे थांबलेले होते आपली त्यावर कार्यवाही सुरू आहे आपण ते पूर्णपणे बंद केलेले नाहीत ते प्रकल्प आपल्याला घ्यायचे होते या वर्षी आपण बी.ओ.टी. चे चार ते पाच प्रकल्प सुरु केलेले आहे व ते अंतिम टप्प्यापर्यंत आलेले आहे अभियंता यांनी त्याची माहिती द्यावी. |
| म.अभियंता | आपण या आधी पाच कंदील मार्केटचा प्रकल्पासाठी कार्यादेश दिलेला आहे परंतु तो प्रस्ताव थांबलेला आहे सर्वे नंबर १५३ ची निविदा केलेली आहे देवपूर भागातील दोन शॉपिंगची निविदाही तयार आहे या सर्व प्रकल्पांच्या मान्यतेचा प्रस्ताव येत्या महिन्याभरात स्थायी समितीपुढे सादर होणार आहे. |
| म.शितल नवले | पाच कंदील च्या निविदेमध्ये मनपाला फार मोठा तोटा आहे ती निविदा रद्द केली पाहिजे आपण गल्ली नंबर ६ व शिवाजी पुतळा येथील शॉपिंग सेंटरच्या कामात फसलेलो आहोत आज करोडोची जागा कवडीमोल भावाने दिलेले आहे अतिशय चुकीच्या पद्धतीने निविदा झालेली आहे. आपण एकदा यामध्ये पुन्हा क्रॉस चेक करावे आपण पुन्हा एकदा चांगल्या पद्धतीने निविदा करा आपल्याला त्यात शंभर पटीने उत्पन्न मिळणार आहे आपण प्रीमियम यापूर्वी मागवलेला आहे प्रीमियम कसा अडजेस्ट होतो ते आपल्या सर्वांना माहीत आहे मनपाचे नुकसान होईल असे करू नये ही निविदा रद्द करणेच मनपाचे हिताचे आहे |
| म.आयुक्त | आपला मुद्दा मला देखील तत्वतः मान्य आहे २०१५ मध्ये दर निविदा निघालेली होती आज सहा वर्षे झालेले आहेत सहा वर्षात त्यामध्ये कोणतीही प्रगती झालेली नाही ते कोर्टात देखील केले आहेत व आपल्या कडून नुकसान भरपाई मागितलेली आहे आपण त्याबाबत त्यांना पत्र दिले आहे मी या प्रक्रियेचा अभ्यास करतो आपण यात निश्चितपणे मनपाच्या हिताचाच निर्णय घेऊ. |
| म.अभियंता | गुजराथी शाळेचा प्रस्ताव देखील स्थायी समितीपुढे सादर करीत आहोत. |
| म.आयुक्त | आपण बी.ओ.टी.च्या प्रस्तावाबाबत अतिशय संवदेनशीलआहोत. आपण त्यावर गतीने कार्यवाही करू. |
| म.शितल नवले | गुजराती शाळेचा प्रस्ताव सर्व तयार आहे आपल्याला त्या ठिकाणी एकूण ६० हजार स्क्वेअर फूट बिल्टअप एरिया मिळत आहे आज त्या भागातील दर सात हजार ते आठ हजार स्क्वेअर फूट प्रमाणे आहेत यातून आपल्याला ४२ कोटी रुपये मिळू शकतात यात आपल्याला दुकानांसह त्यामध्ये मुख्य सभागृह तयार करून मिळणार आहे मुंबई-पुण्यासारख्या अद्ययावत सभागृह प्रमाणे ते सभागृह असेल यात आपण संबंधितांचे प्रेझेंटेशन करुन आपण त्या प्रमाणे टेंडर प्रसिध्द करा.यातून २० ते २५ कोटी रुपये उत्पन्न मिळू शकते ते आजच बजेट मध्ये ऍड करू शकतो. |
| म.नागसेन बोरसे | आपण सन २०२० २१ च्या बजेटमध्ये ज्या उत्पन्नाच्या तरतुदी सुचविल्या होत्या तेवढे उत्पन्न आपल्याला मिळालेले नाही याचा अर्थ २१ २२ च्या बजेटमध्ये दायित्व किती आहे हे मला पण सांगावे आपल्याला देणे किती आहे याचा खुलासा करावा उत्पन्न व दायित्व किती आहे हे समजल्यावरच आम्हाला अन्य विकास कामे या बजेटमध्ये सुचवता येतील. |
| म.आयुक्त | श्री प्रदीप नाईक यांनी माहिती सादर करावी आपण मालमत्ता कराबाबत एजन्सी नियुक्त केले आहे त्यांनी देखील गतीने कामास सुरुवात केलेली आहे साधारणता डिसेंबर जानेवारी पर्यंत काही असेसमेंट होऊन उत्पन्नात काही प्रमाणात भर होणार आहे एजन्सी चांगले काम करीत |

आहे आपल्याकडे पूर्वीच्या असेसमेंट मध्ये अनेक तुमच्या होत्या त्या एजन्सीच्या माध्यमातून आपण दुरुस्त करत आहोत संपूर्ण असेसमेंट नंतर आपल्या उत्पन्नात भरीव वाढ होणार आहे यात सुमारे दुपटीने वाढ होऊ शकते या कामाला आपण गती देत आहोत या ठिकाणी आरोग्य व पाणीपुरवठा यासाठी स्वतंत्र तरतूद करण्याबाबत मागणी आलेली आहे प्रशासनाने आपल्याकडे अंदाजपत्रक सादर केले आहेत त्यानुसार स्थायी समितीने सर्वानुमते योग्य तो निर्णय घेऊन तरतुदी कराव्यात.

या ठिकाणी माननीय विभागीय आयुक्त साहेब यांच्या कडील नोटिशीचा उल्लेख झाला परंतु माझ्या निदर्शनास अद्याप तशी नोटीस आलेली नाही परंतु मी जेव्हा पदभार घेतला त्या वेळेस मागील बिलाबाबत माझ्याकडे ठेकेदारांची सातत्याने मागणी होती मी त्याबाबत आढावा घेतला त्याप्रमाणे आपण लगेच आढावा घेतला त्या प्रमाणे ताळमेळ घेवून आपण वेबसाईटवर नोटीस बोर्डावर जुन्या बिलांची यादी व रक्कम प्रसिद्ध केल्या त्यावर आपण सूचना व हरकती मागवण्यात आल्या त्यानंतर आम्ही ते देणे कमीत कमी करत आलेलो आहोत आपण ते दायित्व कमी केले आहे ते पूर्णपणे संपलेले नाही आता साधारण चार ते पाच कोटी रुपयापर्यंत जुने दायित्व असेल.

आयुर्वेद दवाखान्यासाठी ३० लाखांची तरतूद केली होती याबाबत आपल्या खासदार महोदय यांनी देखील या कामी सहकार्य करण्याचे आश्वासन दिले होते केंद्र शासनाच्या आयुष योजनेअंतर्गत या ठिकाणी नवीन आयुर्वेदिक दवाखाना उभारण्यासाठी खासदार महोदय यांचे प्रयत्न होते परंतु त्यासाठी स्वतंत्र नवीन जागा देणे बबाबत सुचविण्यात आलेले आहे त्यानुसार आपण प्रयत्न करीत आहोत यामध्ये शासनाचे देखील अनुदान आपल्याला उपलब्ध होणार आहे.

म.शितल नवले — आपण जे यावर तयार करतो त्यामध्ये काही अमेनिटी स्पेस असतील तर ती आपण अधिगृहीत करून त्या ठिकाणी आयुर्वेदिक दवाखाना करावा त्याप्रमाणे मोठे लेआऊट तपासून जागा उपलब्ध करावी असे माझे मत आहे.

म.आयुक्त — सुदैवाने आपल्या मनपाच्या स्वतःच्या जागा फार आहेत आपल्याकडे ते मोठे स्तोत्र आहेत त्या ठिकाणी आपण स्वतंत्र जागा शोधून त्या ठिकाणी आयुर्वेदिक दवाखान्यासाठी निश्चित प्रयत्न करू.

याठिकाणी ट्रक टर्मिनस असा मुद्दा मांडलेला आहे आपली ती फार मोठी जागा आहे साधारण सहा एकर ची जागा आहे ती हायवेलगत ची मोक्याची जागा आहे आपण त्यासाठी ट्रान्सपोर्ट हबचा प्रस्ताव तयार केला आणि तो पालकमंत्र्यांकडे सादर केला तो प्रकल्प साधारणता १२० कोटी रुपयांचा सादर केलेला होता परंतु या कोरोनाच्या काळात इतके मोठे अनुदान उपलब्ध होण्याबाबत साशंकता आहे तरीसुद्धा आपल्याला सदर प्रकल्प बीओटीवर देता येईल किंवा कसे याबाबत अभ्यास करून निर्णय घेण्यात येणार आहे. याबाबत विभागने आढवा घ्यावा व ती जागा चांगल्याप्रकारे विकसित झाल्यास आपल्याला भरीव उत्पन्न मिळेल.

बाजार फी च्या बाबतीत आपण यापूर्वी तीन ते चार वेळा टेंडर काढले परंतु आपल्याकडे त्याला प्रतिसाद मिळालेला नाही आता आपण ओपन लिलाव करणे बाबत निर्णय घेतलेला आहे व त्याप्रमाणे निविदा प्रसिद्ध केली आहे यापूर्वी ठरवण्यात आलेली अपसेट प्राईस जास्त स्वरूपाची होती पण आता आपण स्थायी समितीमध्ये निर्णय घेऊन एक रिझनेबल ऑफर्स प्राइस ठरवलेली आहेत येत्या २० तारखेला त्याचा लिलाव आहे यामध्ये आपल्याला निश्चित उत्पन्न वाढणार आहे.

ट्रॅव्हल्स वर कर आकारणीबाबत मुद्दा आलेला होता त्याची कायदेशीर बाजू तपासून घ्यावी लागेल शेवटी गाडी मालक ती रक्कम प्रवाशांकडून वसूल करेल आपण कायदेशीर बाबी तपासून त्यानुसार निर्णय घेऊ जी एस आय प्रणालीद्वारे मुद्दा उपस्थित केला होता त्याबाबत मी यापूर्वी सांगितले आहे तसेच या ठिकाणी जलकुंभ आवर सीसी टीव्ही कॅमेरे बसवणे बाबत मुद्दा उपस्थित झालेला आहे अतिशय चांगला मुद्दा आहे कारण जलकुंभांची सुरक्षितता देखील महत्त्वाची आहे आपण यासाठी तरतूद करावी अशी मी सभापतीना विनंती करतो अल्पसंख्यांक भागात तरतूद वाढवणे बाबत सूचना होती या वर्षामध्ये बरीच कामे घेण्याचा प्रयत्न आपण केलेला आहे माझे निरीक्षण आहे त्याप्रमाणे मी सांगू इच्छितो आपण कामे केलेली आहेत पण ते चुकीच्या पद्धतीने घेतलेल्या आहेत रस्ता तयार करण्याआधी त्या ठिकाणी गटार होणे आवश्यक आहे कारण त्याशिवाय तो रस्ता टिकू शकत नाही वर्षभरात असते खराब होतात मी यासाठी विभागाला सूचना दिलेल्या आहेत शहराच्या कोणत्याही भागात रस्त्याच्या काम आधी गटारीचे काम घेण्यात यावे पाटील आणि गटारीचे किंवा नाल्याचे स्लोप सुद्धा करून घेणे गरजेचे आहे संबंधित ओव्हरसियरांने या गोष्टी तपासून घेणे गरजेचे आहे अशा सूचना दिलेल्या आहेत गटारी व नाल्याचे काम करूनच रस्त्याचे काम हाती घेण्यात यावे.

मनपा शाळेच्या संदर्भात काही मुद्दे उपस्थित झाले आहेत आपण यासाठी काही तरतूद केलेली आहे आपण एक सूचना केली की आपल्या ज्या काही शाळा आहे त्या खाजगी संस्था यांना दिल्यास शाळेच्या गुणवत्तेत सुद्धा सुधारणा होईल तसे काही प्रस्ताव माझ्याकडे आलेले आहेत ते मी आपल्याकडे सादर करीत इंग्रजी माध्यमांच्या शाळांचे बाबतीत मुद्दा उपस्थित झाला होता महासभेचा ठराव झालेला आहे सदर ठरावाचा गोषवारा व कायदेशीर बाजू आम्ही तपासून घेत आहोत त्यानुसार त्या शिक्षकांनाही मानधन देणे व शाळा सुरू करण्याबाबत आपण प्रयत्नशील राहणार आहोत.

नागसेन भाऊनी अल्पसंख्यांक निधी तीन कोटी रूपये तरतूद करणेबाबत मुद्दा सांगितलेला आहे यावर स्थायी समिती निर्णय घेईल सन्माननीय सदस्य सौ.भारतीताई माळी यांनी घरपट्टी वसुलीबाबत मुद्दा उपस्थित केला आपल्याकडील नागरिक व्यवस्थित घरपट्टी भरतात परंतु आपण एखाद्या भागातील घरपट्टीचा टॅक्स त्या भागासाठी व त्या कामांसाठी वाटपाबाबत वापरण्याबाबत असा काही निर्णय घेऊ शकत नाही हद्दवाढीचा गावांसाठी आपण एक ते दोन वर्षासाठी हा प्रयोग केला पण तो सुद्धा कायमस्वरूपी निर्णय नाही कारण तेथे विकास कामांचा मोठ्या प्रमाणावर अनुशेष होता म्हणून तो आपण निर्णय त्यावेळेस घेतला परंतु इतर प्रभागांमध्ये आपल्याला हा निर्णय घेता येणार नाही आपल्या भागांमध्ये जे महत्त्वाचे काम आहेत ते आपण निश्चितपणे घेऊ व त्याप्रमाणे कामांना मान्यता देखील दिले आहे अजूनहीकाही कामे आपण घेऊ शकतो.

मी आपल्या सर्व मुद्दयांबाबत सविस्तर माहिती देण्याचा प्रयत्न केलेला आहे श्री नाईक यांनी दायित्व बाबत माहिती द्यावी.

म.प्रदिप नाईक — महासभेने मंजुरी दिलेल्या अंदाजपत्रकात स्पील ओव्हर 18 कोटी, सन 2020- 21 ची विकास कामे 15 कोटी, व नगरसेवक निधी 16 कोटी असे एकुण 49 कोटी व इतर अनुषंगिक कामे धरुन 67.07 कोटी तरतुदी दिलेल्या आहेत. त्यापैकी साधारणत: अंदाजे 15-16 कोटीची देयके आहेत. महसुली उत्पन्न 130 कोटी असून त्यांत जी.एस.टी. अनुदान 100 कोटी आहे.

म.नागसेन बोरसे — ती महसुली बाजू सोडून द्या तो सर्व खर्च लाईट बिल व आस्थापनावर खर्च होतो तो या धरू नका आपल्याला टॅक्स मधून किती उत्पन्न येते याचा हिशोब द्या .

म.प्रदिप नाईक ३० ते ३२ कोटी रूपये येतात.

म.नागसेन बोरसे मग बजेट करतांना उत्पन्नाचे स्त्रोत कोणते वापराचे आपण यापुर्वी मालमत्ता करातून ७० ते ७५ कोटी रू.उत्पन्न सुचविलेले आहे. म्हणजे ७० ते ७५ कोटी रू.दायित्व आपल्यावर आहे.

म.आयुक्त आपले यापुर्वी चे प्रलंबित देयके होते त्यामुळे आपल्यावर दायित्व तयार झालेले होते. ते ४ ते ५ कोटीचे आहे. आपण जे दायित्व सांगत आहात. त्यात काही कामांचे कार्यादेश दिलेली आहे. काहि कामे सुरू आहेत अशी एकूण रू.१५ कोटी आहे.

म.नागसेन बोरसे आपण आजवर आम्ही ज्या तरतूदी सुचविल्या तर ते पुन्हा दायित्व तयार होणार आहेत. आप्ल्याला तेवढे उत्पन्न अपेक्षित आहे का.

म.आयुक्त आपला मुद्दा पुर्णपणे मान्य आहे परंतू ७५ कोटीचे दायित्व नाही. यात बरीच कामे प्रगतीपथावर आहे. काही चालू आहेत.

म.नागसेन बोरसे याचा अर्थ आपल्याला ती देयके द्यावी लागणार आहेत ती साधारणता ५० कोटीची असतील. आता स्थायी समितीच्या व इतर महासभेच्या तरतूदी सुचविल्या जातील त्या ५० कोटीच्या असतील. ऐवढे १०० कोटीचे उत्पन्न आपल्याला अपेक्षित आहे का.

म.सुनिल बैसाणे यासाठी प्रमुख लेखाधिकारी असणे आवशयक होते.

म.नागसेन बोरसे आपण कामाच्या सोईसाठी कर्मचाऱ्यांना प्रभारी पदे नियुक्त करतात. त्यांनी कामात चुका किंवा गैर व्यवहार केल्यास त्यांची जबाबदारी पर्यायाने प्रमुख अधिकाऱ्यांवर येते.

म.आयुक्त आपल्याकडे सद्यास्थितीत लेखापरिक्षक पद रिक्त आहे. तसेच मुख्य लेखाधिकारी हि रजेवर आहेत. त्यामुळे कामात गैरसोई होवू नये म्हणून असे प्रकाराचे निर्णय घ्यावा लागतो. आपल्याकडे दोन्ही वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या बदल्या झालेल्या आहेत मी याबाबत वारंवार शासनाकडे पत्रव्यवहार केलेलेआहे.श्री.दिपकांत वाघ यांनाही अर्ध वेळ धुळे महानगरपालिकेत बोलविण्यासाठी प्रयत्न सुरू आहेत. आपल्याला हि संस्था सुरू ठेवायची आहे. त्यासाठी कामाच्या सोईसाठी प्रभारी कामाकाज चालवावे लागते.

म.नागसेन बोरसे सन २०२०-२१ च्या अंदाजपत्रकात विकास कामांबाबत तरतूद केलेली आहे. ते विकास कामे कोणती त्याची माहिती द्यावी.

म.प्रदिप नाईक याबाबत बांधकाम विभागाने त्या कामांची यादी प्रमाणित करून दिलेली आहे. ती यादी सादर करण्यात येत आहे.

म.नागसेन बोरसे सदर यादी श्री.शिंदे अभियंता यांनी प्रमाणित केलेले आहे त्या यादीतील दोन कामाचे बिल दिड ते २ वर्षापुर्वी निघालेले आहे. आपण सन २०२०-२१ चा बजेट मंजूर केला त्याअधिच सदर कामांचे बिल अदा झालेले होते.माझ्याकडे लेखी पूरावा आहे.ज्यांची तरतूद रजिस्टरला नोंद नाही तरी अशी बिल कशी अदा होतात. मग आपण तरतूद कशी काय केली. महासभेचा ठराव नसतांना तरतूद रजिस्टरला तरतूद कशी काय करण्यात आली व देयके अदा कशी करण्यात आली.

म.अभियंता सदर कामे नगरोत्थान योजनेतून प्रस्तावित केलेली होती. सदरचे काम अल्पसंख्याक भागातील होतील. याबाबत प्रकरण तपासून खुलासा करता येईल.

म.नागसेन बोरसे आपल्याकडे बजेटमध्ये तरतूद करण्यास पूष्काळ वेळ होता. परंतू तरतूद का केली नाही.

म.अभियंता या सर्व प्रकरणांना स्थायी समितीने मान्यता दिलेली आहे.

म.आयुक्त यात कोणताही बेकायदेशीर काम झालेले नाही.

म.नागसेन बोरसे यामध्ये मी आपणास पूर्वी सांगितलेले होते प्री बजेट अंतर्गत जी कमी झालेले आहेत ती बेकायदेशीर आहेत यामध्ये यापूर्वी मुख्य लेखा परीक्षक यांनी आक्षेप नोंदवले होते जोपर्यंत

कामांसाठी तरतुद होत नाही तोपर्यंत कार्यवाही करू नये परंतु कामांचे टेंडर निघाले कार्यादेश झाला काम झाले देयके अदा केले मग लेखापरीक्षक यांचे अभिप्राय ला काहीच अर्थ नाही का.

म.आयुक्त — याबाबत मी संपूर्ण माहिती घेतो जर त्याबाबत बेकायदेशीर बाबी झाल्या असतील तर त्याबाबत चौकशी करण्यात येईल व त्यानंतर आपल्याला निर्णय घेणे सोपे जाईल.

म.नागसेन बोरसे — अशी भरपूर प्रकरणे आहेत त्या कामांची तरतूद रजिस्टरला नोंद नाही व अशी बिले निघून गेलेली आहेत. ३, ३ लाखांच्या आतील कामांसाठी ही तरतूद रजिष्टर नोंद झाले पाहिजे जेणेकरून बजेटमध्ये काम करताना सोपे होईल सदरची कामे आपली दिशाभूल करुन करण्यात आलेली आहे याबाबत आपण स्वत: चौकशी करावी

म.आयुक्त — याबाबत प्रथम दर्शनी बेकायदेशीर बाब झालेली आहे असे वाटत नाही आपण दैनंदिन काम करताना आवश्यक ती दक्षता घेत आहोत याबाबत कार्यवाही करताना काही अनियमितता झाली असेल तर आपल्याला त्यात सुधारणा करता येईल. आपण सर्व बाबींची चौकशी करून यावर निश्चित निर्णय घेऊ.

म. नागसेन बोरसे — आम्हाला आमच्या प्रभागातील काही तरतुदी करावयाचे आहे आपल्यावर ५५ ते ७० कोटी चे दायित्व आहे तर आम्ही तरतूदी काय सुचवायचे याठिकाणी अल्पसंख्यांक भागांमध्ये तीन कोटी तरतूद करण्याबाबत मुद्दा आलेला आहे आपण त्यासाठी निश्चितच करावे अल्पसंख्यांक भागात आरोग्याचे मोठ्याप्रमाणात प्रश्न आहे मी माझ्या भागात काही विकास कामे सुचवले आहे त्याच्या तरतुदी करण्यात याव्यात.

म.सभापती — सर्व सन्माननीय सदस्यांनी या अंदाजपत्रक बाबत मत मांडले आहे वास्तविक या अंदाजपत्रकात नगरसेवक निधीसाठी तरतूद केली नाही धुळे शहरातील नागरिक प्रामाणिकपणे कर भरत असतात आणि त्या कराच्या माध्यमातून त्यांच्या भागात मूलभूत सेवा सुविधा देणे हे महानगरपालिकेचे कर्तव्य आहे त्यामुळे या नागरिकांच्या मूलभूत सेवासुविधा न च्या कामांसाठी नगरसेवक निधी म्हणून प्रत्येकी वीस लक्ष रुपयांची तरतूद या अंदाजपत्रकात सुचवण्यात येत आहे तसेच शहराला नियमित व योग्य दाबाने पाणीपुरवठा करण्यासाठी आपण पहिल्यापासून प्रयत्नशील आहोत यासाठी आपण मागील सभेत पाणीपुरवठा योजनेच्या कामांसाठी कन्सल्टंट नेमणे बाबतही प्रस्ताव घेतलेला होता त्या अनुषंगाने त्यांच्या सांगण्यानुसार काही कामे करणे अत्यावश्यक आहे यासाठी या अंदाजपत्रकात तरतूद करण्यात येत आहे. याठिकाणी अल्पसंख्यांक निधीच्या बाबतीत मुद्दा उपस्थित झाला अल्पसंख्यांक भागात विकासाचा अनुशेष मोठ्याप्रमाणावर प्रलंबित आहे यासाठी या अंदाजपत्रकात तरतूद प्रस्तावित करण्यात येत आहे या ठिकाणी ब-याच नगरसेवकांनी प्रभागातील विकास कामांची यादी आमच्याकडे सादर केलेली आहे त्यामुळे मी या अंदाजपत्रकातील उत्पन्नाचा आढावा घेऊन व प्रशासनाशी चर्चा करून जास्तीत जास्त विकास कामे देण्याचा व त्यासाठी तरतूद करण्याचा या अंदाजपत्रकात निश्चितपणे प्रयत्न करणार आहोत आपण ज्या पद्धतीने पाणीपुरवठ्यासाठी विशेष सभा घेतली त्यासाठी या अंदाजपत्रकातील उत्पन्न वाढीच्या बाबी आपण प्रस्तावित केले आहे त्याचा आढावा घेण्यासाठी आपण स्वतंत्र बैठक आयोजित करू यामध्ये मोबाईल टावर, दंडात्मक कार्यवाही, मनपा गाळे हस्तांतरण, मनपा जागांचे मूल्यांकन ट्रक टर्मिनस,बीओटी वरील प्रस्ताव या सर्व उत्पन्नाच्या बाबींचा आपण आढावा घेणार आहोत या ठिकाणी सर्व सन्माननीय सदस्यांच्या सहमतीने सन २०२१-२२चा अंदाज पत्रक मान्यतेसाठी महासभेकडे पाठवण्यास शिफारस करण्यात येत आहे.तसेच महिला बालकल्याण निधी, मागासवर्गीय आर्थिक दुर्बल घटक व अपंग कल्याण राखीव निधी यापोटी होणारी अनुषंगिक वाढ करण्यास मान्यता देणेत येत आहे.

सदर अंदाजपत्रकात नव्याने हद्दवाढ झालेल्या गावासाठी रस्ते गटारी, देवपूर व्यतिरिक्त १४ प्रभागासाठी रस्ते व गटारी, तसेच देवपूर भागातील मलनिस्सारण योजनेमुळे खराब झालेले रसते व गटारी नुतनीकरण करणे यासाठी विशेष तरतूद करण्यांत येत आहे. सदर लेखाशिर्षात प्रशासनाने अत्यावश्यक स्वरुपाचीच कामे प्रसतावित करावीत. विभागाने सदर लेखाशिर्षातील कामांना तरतूद लावण्यापूर्वी सदर कामाचे प्रस्ताव प्रथमत: स्थायी समितीपुढे अवलोकनार्थ सादर करावेत.

**धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर ४५ दिनांक ०४/०५/२०२१**

धुळे महानगरपालिका प्रशासनाने स्थायी समितीस रु.६२२ कोटी ६६ लक्ष कोटीचा अर्थसंकल्प सादर केला होता, त्यात स्थायी समितीने उत्पन्नात रु.११७ कोटी ९६ लक्ष व अल्पसंख्याक निधी शासन अनुदान ८० लक्ष वाढ सुचविले आहे व रु.१११ कोटी ४७ लक्षच्या तरतुदी सुचविल्या आहेत.

यानुसार उत्पन्न व खर्चाचा ताळमेळ घेवून मे. स्थायी समिती मार्फत खालील प्रमाणे तरतुदी तथा उत्पन्नाच्या बाबी प्रस्तावित करण्यांत येत आहे.

| अ.क्र. | लेखाशिर्षक | प्रशासनाने केलेल्या तरतूदी | मे.स्थायी समितीने सुचविलेल्या शिफारशी | वाढ | घट |
|---|---|---|---|---|---|
| | **जमा बाजू** | | | | |
| १ | स्थानिक संस्था कर | ३०.०० | १५००.०० | १४७०.०० | ०.०० |
| २ | नविन मालमत्ता कर आकारण व हद्दवाढ गाव नवीन कर | ०.०० | ५०००.०० | ५०००.०० | ०.०० |
| ३ | GST अनुदान | १०७२८.०० | ११५४४.०० | ८१६.०० | ०.०० |
| ४ | दुकान भाडे (IDSMT) | ४०.०० | ५०.०० | १०.०० | ०.०० |
| ५ | शॉपिंग सेंटर विकसित करणे | २००.०० | ५००.०० | ३००.०० | ०.०० |
| ६ | स.नं. 73 शॉपींग सेंटर करणे | २००.०० | ४००.०० | २००.०० | ०.०० |
| ७ | मनपा जागा विकसीत करणे | १०००.०० | ३०००.०० | २०००.०० | ०.०० |
| ८ | कराराने जुन्या दिलेल्या जागा पासून दंड व भाडे वसुली ( मुदत संपलेल्या) | ०.०० | २०००.०० | २०००.०० | ०.०० |

| अ.क्र. | लेखाशिर्षक | मे.आयुक्त सो यांनी केलेल्या तरतूदी | मे. स्थायी समितीने सुचविलेल्या शिफारशी | वाढ | घट |
|---|---|---|---|---|---|
| | **खर्च बाजू** | | | | |
| १ | नगरसेवक निधी प्रत्येकी २० लाख | ०.०० | १५४०.०० | १५४०.०० | ०.०० |
| २ | विभागाने सादर केलेल्या ABC नुसार स्पील ओव्हर | ५०.०० | ६०२२.०० | ५९७२.०० | ०.०० |
| ३ | रस्ता दुरुस्ती | २५.०० | १००.०० | ७५.०० | ०.०० |
| ४ | गटार दुरुस्ती | २०.०० | ५०.०० | ३०.०० | ०.०० |
| ५ | पाईप लाईन दुरुस्ती | १०.०० | २५.०० | १५.०० | ०.०० |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ६ | दवाखाने दुरुस्ती व नुतनीकरण | २०.०० | ७५.०० | ५५.०० | ०.०० |
| ७ | शहरातील ओपनस्पेस विकसीत करणे | ५०.०० | २५.०० | ०.०० | २५.०० |
| ८ | परिवहन सेवा | ५०.०० | २५.०० | ०.०० | २५.०० |
| ९ | नव्याने हद्दवाढ झालेल्या गावासाठी रस्ते गटारी व अनुषंगिक कामे | ०.०० | २५०.०० | २५०.०० | ०.०० |
| १० | देवपूर व्यतिरिक्त १४ प्रभागासाठी रस्ते व गटारी | ०.०० | ७००.०० | ७००.०० | ०.०० |
| ११ | विकास निधी शुल्क अंतर्गत 100 फूटी रस्ता ते चितोड नाक्यापावेतो डिव्हाईडर सह रस्ता डांबरीकरण करणे | ०.०० | ३५५.०० | ३५५.०० | ०.०० |
| १२ | मालमत्तांचे मुल्यांकन (GIS) | २००.०० | ७००.०० | ५००.०० | ०.०० |
| १३ | PMCनियुक्ती | २५.०० | १००.०० | ७५.०० | ०.०० |
| १४ | देवपूर भागातील मलनिस्सारण योजनेमुळे खराब झालेले रसते व गटारी नुतनीकरण करणे | ०.०० | १५००.०० | १५००.०० | ०.०० |
| १५ | अल्पसंख्याक निधी | २०.०० | १००.०० | ८०.०० | ०.०० |

सर्व सन्मा. सदस्यांनी केलेल्या सुचना लक्षांत घेवून तसेच उत्पन्न व खर्चाचा ताळमेळ करुन सन २०२०- २०२१ चे सुधारीत व सन २०२१-२२ चे अंदाजपत्रक योग्य त्या फेरबदलासह अंतिम करुन मे. महासभेपुढे सादर करण्यांस मान्यता देण्यांत येत आहे. तसेच सन २०२१-२२ चे वृक्ष प्राधिकरण समिती अंदाजपत्रक महासभेपुढे सादर करण्यांस मान्यता देण्यांत येत आहे.

**सर्वानुमते मंजुर,**
**सही/- x x x**
**सभापती,**
**स्थायी समिती,**
**धुळे महानगरपालिका,धुळे**

# धुळे महानगरपालिका,धुळे

## नगरसचिव कार्यालय

### स्थायी समिती सभा क्रमांक ४ चे इतिवृत्त

---

**धुळे मनपा भारतरत्न अटलबिहारी वाजपेयी सभागृह**
**गुरुवार दिनांक १८/०३/२०२१**
**वेळ :- सकाळी ११-०० वाजता.**

धुळे महानगरपालिका स्थायी समितीची साप्ताहिक सभा आज गुरुवार दिनांक १८/०३/२०२१ रोजी सकाळी ११-०० वाजता **मा.श्री संजय सुधाकर जाधव, सभापती,** स्थायी समिती, मनपा, धुळे यांच्या अध्यक्षतेखाली **धुळे मनपा भारतरत्न अटलबिहारी वाजपेयी सभागृह** भरली. स्थाक्षरी बुकावर सही करुन खालील सन्मा.सदस्य सभागृहात हजर होते.

| अ.क्रं. | सदस्यांचे नांव | हुद्दा |
|---|---|---|
| १ | श्री. जाधव संजय सुधाकर | सभापती |
| २ | श्री. बैसाणे सुनिल तुळशिराम | सदस्य |
| ३ | श्रीमती माळी भारती अशोक | सदस्या |
| ४ | श्रीमती पाटील मंगला सुरेश | सदस्या |
| ५ | श्रीमती बोरसे पुष्पा प्रकाश | सदस्या |
| ६ | श्री. मासुळे अमोल पावबा | सदस्य |
| ७ | श्री. देवरे कमलेश नारायण | सदस्य |
| ८ | श्रीमती पठाण हिना अस्लम | सदस्या |
| ९ | श्री. सईद बेग हाशम बेग | सदस्य |
| १० | श्री. नवले शितल मोहन | सदस्य |
| ११ | श्री. बोरसे नागसेन दामोदर | सदस्य |
| १२ | श्रीमती कुलेवार किरण राकेश | सदस्या |
| १३ | श्रीमती. वराडे वैशाली भिकन | सदस्या |
| १४ | श्री. जाधव बन्सीलाल माणिक | सदस्य |
| १५ | श्री. पटेल अमीन अब्दुल करीम | सदस्य |

उपस्थित अधिकारी गण

| अ.क्र. | अधिकाऱ्यांचे नाव | हुद्दा |
|---|---|---|
| १ | श्री. अजिज शेख | आयुक्त |
| २ | श्रीमती शिल्पा नाईक | उपायुक्त |
| ३ | श्री. शांताराम गोसावी | उपायुक्त |
| ४ | श्री. महेंद्र परदेशी | नगररचनाकार |
| ५ | श्री. मनोज अरविंद वाघ | प्र.नगरसचिव |
| ६ | श्री. के.एन. शिंदे | अभियंता |
| ७ | डॉ. श्री महेश मोरे | आरोग्याधिकारी |

| | | |
|---|---|---|
| ८ | श्री. चंद्रकांत जाधव | सहा.आरोग्याधिकारी |
| ९ | श्री. लक्ष्मण पाटील | सहा.आरोग्याधिकारी |
| १० | श्री. पी.डी नाईक | लेखापाल |
| ११ | श्री. रमजान अन्सारी | प्र. कार्यालय अधिक्षक |
| १२ | श्री.आर.बी.. सोनवणे | प्र. परवाना अधिक्षक |
| १३ | श्री. बी.एस. रनाळकर | प्र. सहा.कर मुल्य निधारण अधिकारी |
| १४ | श्री. एन.के. बागल | विद्युत अभियंता |
| १५ | श्री. पी.डी. चव्हाण | ओव्हरसिअर बांधकाम |
| १६ | श्री. हेमंत पावटे | ओव्हरसिअर बांधकाम विभाग |
| १७ | श्री.राजेश गायकवाड | लेखापाल मनपा शिक्षण मंडळ |
| १८ | श्री.राजू माईनकर | भांडारपाल |
| १९ | श्री. किशोर सुडके | बाजार विभाग |
| २० | श्री. प्रसाद जाधव | अति. विभाग |
| २१ | श्री. अनिल वळवी | वाहन विभाग लिपीक |

म.सभापती सर्व उपस्थित सन्मा. सदस्य आयुक्त सो. अधिकारी वर्ग छायाचित्रकार बांधव सभेचे कामकाज चालविणेसाठी आवश्यक तो कोरम पूर्ण झाल्याने नगरसचिव यांनी सभेचे कामकाज सुरुवात करावी.

म. नगरसचिव वंदे मातरम् या राष्ट्रवंदनेसाठी सर्वांनी उभे रहावे.

विषय क्रमांक:- ४ मागील स्थायी समिती सभांचे इतिवृत्त वाचून कायम करणे. ( दि. १/२/२०२१ , २३/२/२०२१)

म.नगरसचिव नगरसचिव यांनी विषयांचे वाचन केले.

म.अमोल मासुळे इतिवृत्त कायम करण्यांत यावे.

म. सभापती सर्व सन्मा.सदस्यांच्या सहमतीने मागील स्थायी समिती सभांचे इतिवृत्त क्रमश: वाचून कायम करण्यांत येत आहे.

**धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर ०३ दिनांक १८/०३/२०२१**

मागील स्थायी समिती सभा दिनांक १/२/२०२१ च्या सभेतील स्थायी समिती ठराव नंबर १४५ ते १५२ तसेच सभेत सन्मा.सदस्यांनी उपस्थित केली चर्चा व त्या मा.सभापती यांनी दिलेले निर्णय क्रमश: वाचून कायम करण्यांत येत आहे.

तसेच दिनांक २३/२/२०२१ रोजीच्या सभेतील स्थायी समिती ठराव नंबर १ क्रमश : वाचून कायम करण्यांत येत आहे. सही/-x x x

**सभापती,**
**स्थायी समिती,**
**धुळे महानगरपालिका,धुळे**

विषय क्रमांक:- ५ मा.आयुक्त सो. यांना असलेल्या अधिकारानुसार रु.५ लाख ते २५ लाखापर्यत मंजुरी दिलेल्या कार्यादेश (बांधकाम विभागाकडील) कामांची यादी अवलोकनार्थ सादर.
( दि.१५/१/२०२१ ते २३/२/२०२१) अखेर

म.नगरसचिव नगरसचिव यांनी विषयांचे वाचन केले.

म. नागसेन बोरसे विषय मंजूर करण्यांत यावा

म.कमलेश देवरे विषय मंजूर करण्यांत यावा.

म.सभापती मा. आयुक्त सो.यांना असलेल्या अधिकारानुसार रु. ५ लाख ते २५ लाखापर्यत मंजुरी दिलेल्या बांधकाम विभागाकडील कार्यादेशाची वाचून माहिती देण्यांत आली.

**धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर ०४ दिनांक १८/०३/२०२१**

धुळे महानगरपालिका बांधकाम विभागाकडून होत असलेल्या विकास कामासाठी दि. १५/१/२०२१ ते २३/०२/२०२१ अखेर विकास कामांची निर्गमित केलेल्या कार्यादेशाची यादी

सोबत जोडली आहे.कृपया उक्त यादी अवलोकनासाठी मे.स्थायी समिती पुढे सादर झालेली आहे.

**धुळे महानगरपालिका धुळे**
**(बांधकाम विभाग)**

**दिनांक :- दि.१५/०१/२०२१ ते दि.२३/०२/२०२१ अखेर निर्गमित केलेल्या विकास कामांच्या कार्यादेशची यादी**

| अ.क्र | कार्यादेश क्रमांक | दिनांक | कामाचे नाव | रक्कम | निधी |
|---|---|---|---|---|---|
| १ | ३०३ | २१/०१/२०२१ | प्र.क्र.७ मध्ये कुमार नगर येथे बाबू आसीजा ते मनोहर मिल्क पावेतो रस्ता कॉंक्रीट करणे. | १९,९२,२७५/- | मनपा निधी अंतर्गत (आर्थिक दुर्बल घटक) |
| २ | ३०४ | २१/०१/२०२१ | प्र.क्र.७ मध्ये दिलीप बुडानी यांचे घरापासुन ते हरेश सिंग तनवाणी यांच्या घरापर्यंत रस्ता कॉंक्रीट करणे. | १९,९६,६१०/- | मनपा निधी अंतर्गत |
| ३ | ३०७ | ०९/०२/२०२१ | प्र.क्र.५ तुळशीराम नगर देवपूर येथे सभा मंडप बांधकाम (पत्र्याचे) करणे. | ७,००,०००/- | म.खासदार स्थानिक वि. कार्यक्रम निधी अंतर्गत |
| ४ | ३०८ | ०९/०२/२०२१ | भोला बाजार भागात चौक डांबरीकरण करण्या बाबत. | ९,३७,२४४/- | मनपा निधी अंतर्गत (रस्ता दुरुस्ती) |
| ५ | ३०९ | १२/०२/२०२१ | प्र.क्र.१७ सेवादास नगर भागात सेवादास मंदिर ते भट्टू कदम ते नाल्यापासुन ते चौधरी घरापावेतो रस्ता डांबरीकरण करणे. | ९,९८,७८९/- | म.आमदार स्थानिक वि. कार्यक्रम निधी अंतर्गत |
| ६ | ३१२ | १२/०२/२०२१ | किसान विद्या प्रसारक समाज संस्थाश्री शिवाजी मराठा बोर्डिंग देवपूर धुळे येथे संरक्षण भिंत बांधणे. | ९,९९,५९७/- | म.खासदार स्थानिक वि. कार्यक्रम निधी अंतर्गत |

उक्त यादीचे वाचन करुन सभागृहास माहिती देण्यांत आली. सही/-x x x

**सभापती,**
**स्थायी समिती,**
**धुळे महानगरपालिका,धुळे**

विषय क्रमांक:- ६ — धुळे महानगरपालिका बाजार विभागाने मनपा मालकीचे दुकाने, ओटे, गाळे, जागा यांना महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम अनुसुची ड प्रकरण ८ नियम ५१ अन्वये नियम ४१ अन्वये शास्ती फी माफी मा.आयुक्त सो. यांच्या आदेशानुसार जाहीर करण्यांत आलेली आहे. सदर बाब माहितीस्तव मे. स्थायी समिती समोर सादर.

म.नगरसचिव — नगरसचिव यांनी विषयांचे वाचन केले. व सदर विषय स्थायी समिती पुढे माहितीस्तव आलेला आहे.

म. शितल नवले — ज्या प्रकारे कर्मशियल गाळे धारकांना शास्ती माफी जाहीर केली आहे. त्याप्रमाणे निवासी नागरीकांना देखील शास्ती माफी जाहीर करावी. मार्च एन्डला अजून मनपाचे उत्पन्न वाढेल.

म. नागसेन बोरसे — मागे मी शास्ती माफी बाबत पत्र दिलेले आहे.

मा. आयुक्त — मा. सभापती महोदय, हा जो विषय या ठिकाणी आणलेला आहे. जे महानगरपालिकेचे गाळे आहेत त्यांचे भाडे व प्रॉपटी टॅक्स थकलेला आहे. त्यातील काही लोकांनी पैसे भरलेले आहे. काही लोकांनी पैसे भरलेले नाही. त्यादृष्टीने आपण वसुलीची कार्यवाही सुरु केलेली आहे. काही गाळे धारकाकडे शास्ती बराच प्रमाणात थकलेली होती. सदर गाळे धारकांचे अनेक वर्षापासून बरचसे वाद विवाद सुरु आहे आणि आता मार्च महिना संपत आलेला आहे. सदर गाळे धारकांनी आपल्याकडेस निवेदन देऊन विनंती केलेली होती. त्यात त्यांचा मुद्दा होता की भाडे आकारणी जास्त केलेली आहे. या संदर्भात तो विषय आपल्या कडे स्वतंत्र आणणार आहोत.आज फक्त त्यांना शास्ती माफी देणे गरजेचे होते.आपली वसुली देखील ब-याच प्रमाणात थकीत आहे. त्यामुळे आपण वसुलीची कार्यवाही सुरु केलेली आहे. शितल भाऊ आपण निवासी मालमत्ता धारकांना शास्ती माफी देण्यांची सुचना केलेली आहे. आपण यापूर्वी

वेळोवेळी शास्ती माफी योजना जाहीर केलेली होती. त्यांचा अनेक नागरीकांनी लाभही घेतलेला आहे.आताच आपण निवासी मालमत्ता धारकांसाठी 15 दिवस 100 टक्के शास्ती दिलेली होती. आपण आजच्या बैठकीत शास्ती माफी योजना लागू करण्याबाबत मागणी केलेली आहे. परंतु या संदर्भात मी आमच्या अधिका-यासमवेत विचार विनिमय करतो. व त्यानंतर आवश्यकते प्रमाणे निर्णय घेतला जाईल.

म. नागसेन बोरसे — शास्ती माफी बाबत मी 10 दिवसापूर्वी पत्र दिलेले आहे. सद्यस्थितीत कोरोनाचा काळ आहे संपूर्ण शहराची आर्थिक स्थिती हालाखीची झालेली आहे. आपण महानगरपालिकेमार्फत जप्तीची कार्यवाही सुरु केलेली आहे. आपण या शहराचे पालक आहोत. शास्ती माफी बाबत आयुक्तांना अधिकार आहेत. आपण यापूर्वी ज्या वेळी शास्ती माफी दिली त्यावेळे नागरीकांची आर्थिक स्थिती नव्हती. त्यामुळे आपण आता आपल्या स्तरावरुन शास्तीची माफीची अभय योजना जाहीर करावी. सद्यस्थितीत विज मंडळाने पठाणी वसुली सुरु केलेली आहे. त्यामुळे नागरीकांना आर्थिक मार पडत आहे. नागरीकांच्या हितासाठी शास्ती माफीची योजना जाहीर करणेबाबत विनंती करण्यांत येत आहे.

म. सुनिल बैसाणे — मी सभापती असतांना शहरातील गाळे धारकांना केलेल्या अवाजवी भाडे व थकीत दुकान भाडयाबाबत प्रश्न माझ्याकडे आलेला होता. त्यानुसार मी आयुक्तांना त्याबाबत पत्रव्यवहार केलेला आहे. त्या पत्रानुसार आज आयुक्तांमार्फत सदरचा प्रस्ताव गाळे धारकांना शास्ती माफीचा प्रस्ताव आज स्थायी समिती समोर सादर झालेला आहे. त्याबद्दल मी प्रशासनाचे आभार व्यक्त करतो. आपण धुळे महानगरपालिकेमार्फत थकबाकीदार मालमत्ता धारकांवर जप्तीची मोहीम सुरु केलेली आहे. मनपाचे उत्पन्न वाढले पाहिजे हे जरी खरे असले तरी नागरीकांच्या आर्थिक स्थितीचा विचार होणे गरजेचे आहे. कोरोना आपत्तीमुळे संपूर्ण देशाची अर्थव्यवस्था अत्यंत बिकट झालेली आहे. त्यामुळे नागरीकांना दिलासा देण्यासाठी शास्ती माफीची योजना राबविणे गरजेचे आहे.

म. कमलेश देवरे — गाळे धारकांसाठी शास्ती माफीचा विषय आलेला आहे. त्याबद्दल मी प्रशासनाचे आभार व्यक्त करतो.त्याप्रमाणेच घरगुती निवासी मालमत्ता धारकांनाही शास्ती माफी योजना लागू करावी त्याच बरोबर मार्च एन्डींग असल्यामुळे कर भरणा-या नागरीकांची मोठी गर्दी जुन्या मनपा आवारात होते. त्याठिकाणी नागरीकांच्या सोयीसाठी मंडप, बैठक व्यवस्था, पिण्याच्या पाण्याची व्यवस्था तसेच सद्यस्थिती कोरोना संसर्गाचा काळ असल्याने सॅनिट्रायझेशन या व्यवस्था करणे गरजेचे आहे. त्याबाबतही प्रशासनाने कार्यवाही करावी. तसेच कर भरण्यासाठी आवश्यक तो कर्मचारी व स्टॉल व काऊटरची संख्या वाढविण्यांत यावी.

म. भारतीताई माळी — सदर प्रस्ताव अतिशय योग्य आहे. त्याच बरोबर रहिवासी मालमत्ता धारकांनाही शास्ती माफी दयावी कोरोना आपत्तीच्या काळात नागरीकांची स्थिती गंभीर झालेली आहे. मनपाची आर्थिक स्थिती सुधारली पाहिजे पण त्याच बरोबर नागरीकांची मानसिकता देखील पाहणे गरजेचे आहे. शहरातील नागरीक आपल्याच कुटुंबातील सदस्य आहेत.आमच्या भागातही नगांवबारी, कदमबांडे नगर, भिलाटी या भागात अल्पउत्पन्न गटातील नागरीकांची वस्ती आहे.तशीच शहराच्या संपूर्ण भागात आहे. शास्ती माफीमुळे त्यांना दिलासा मिळणार आहे तरी शास्ती माफी योजना जाहीर करावी ही विनंती..

म. सभापती — गाळेधारकांसाठी शास्ती माफीचा प्रस्ताव अवलोकनार्थ सादर झालेला आहे. तथापि आजच्या बैठकीत सन्मा. सदस्यांनी केलेल्या सुचना व एकुणच शहराची आर्थिक स्थिती लक्षांत घेता रहिवासी मालमत्ता धारकांसाठी शास्ती माफी योजना लागू करणे गरजेचे आहे. त्यामुळे प्रशासनाने याबाबत दखल घेवून शहरातील नागरीकांसाठी शास्ती माफी योजना तांतडीने लागू

करणेबाबत कार्यवाही करावी सदरची बाब मा.आयुक्तांच्या अधिकार कक्षेतील असून त्याप्रमाणे आयुक्तांनी याबाबत सकारात्मक निर्णय घ्यावा.

तसेच शहरातील मनपा मालकीचे असणारे व्यापारी संकुल, गाळयांची संख्या,मुळ मालक, तेथीलसद्यस्थितील भोगवटाधारक आकारण्यांत येणारे भाडे मालमत्ता कर, याबाबतची सविस्तर माहिती पुढील बैठकीत बाजार विभागामार्फत सादर करावी.

**धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर ०५ दिनांक १८/०३/२०२१**

धुळे महानगरपालिका बाजार विभागाने मनपा मालकीचे दुकाने, ओटे, गाळे, जागा यांना महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील अनुसुची ड प्रकरण ८ मधील नियम ४१ मध्ये विहित कालावधी मध्ये न भरलेल्या रकमेवर २ % प्रमाणे शास्ती आकारण्याची तरतुद आहे त्याप्रमाणे शास्ती आकारलेली आहे.

अनुसुची ड प्रकरण ८ नियम ५१ अन्वये नियम ४१ अन्वये शास्ती फी माफी किंवा वसुलीचा खर्च म. आयुक्त सो. आपल्या स्वेच्छा निर्णयानुसार माफ करू शकतात अशी तरतुद आहे.

कोरोना प्रादुर्भावामुळे वित्तीय बाबींवर व उद्योगधंद्यावर मोठ्या प्रमाणात विपरित परिणाम झालेला आहे ही वस्तुस्थिती आहे त्यामुळे सदर व्यापा-यांकडुन शास्ती माफी मिळणे करिता निवेदने, अर्ज, प्रत्यक्ष भेट घेऊन पाठपुरावा व विनंती करण्यांत येत आहे. उपरोक्त रास्त मागणीचा विचार करता शास्ती माफ करण्याची परिस्थिती उद्भवलेली आहे, याकरीता शास्ती माफ करण्यांत येत आहे. (दि. ०८-०३-२०२१ ते ३१-०३-२०२१ पावेतो) सदर शास्ती माफीचा लाभ केवळ त्या भोगवटादारांना देण्यांत येत आहे जे थकबाकीसह चालु वर्षाची पुर्ण रक्कम जमा करतील.

सदर शास्ती माफी योजना विषय मे. स्थायी समितीस अवगत करण्यांत आलेला आहे.

तसेच आजच्या बैठकीत सन्मा. सदस्यांनी केलेल्या सुचना व एकुणच शहराची आर्थिक स्थिती लक्षांत घेता रहिवासी मालमत्ता धारकांसाठी शास्ती माफी योजना लागू करणे गरजेचे आहे. त्यामुळे प्रशासनाने याबाबत दखल घेवून शहरातील नागरीकांसाठी शास्ती माफी योजना तांतडीने लागू करणेबाबत कार्यवाही करावी सदरची बाब मा.आयुक्तांच्या अधिकार कक्षेतील असून त्याप्रमाणे आयुक्तांनी याबाबत सकारात्मक निर्णय घ्यावा.

तसेच शहरातील मनपा मालकीचे असणारे व्यापारी संकुल, गाळयांची संख्या,मुळ मालक, तेथील सद्यस्थितील भोगवटाधारक आकारण्यांत येणारे भाडे मालमत्ता कर, याबाबतची सविस्तर माहिती पुढील बैठकीत बाजार विभागामार्फत सादर करावी.

**सर्वानुमते मंजूर,**
**सही/-x x x**
**सभापती,**
**स्थायी समिती,**
**धुळे महानगरपालिका,धुळे**

विषय क्रमांक :- ७ धुळे मनपाच्या विविध जलशुध्दीकरण केंद्रासाठी सन २०२०-२१ यावर्षा करीता जलशुद्दीकरण केंद्रावर क्लोरिन टर्नर गॅसचा ३०० नगाचा पुरवठा करणेंसाठी निविदा दर मागविण्यांत आलेत, निगोसिएशन अंती आलेल्या दरास मान्यता देणेबाबत आलेल्या कार्यालयीन अहवालावर विचार करणे.

म.नगरसचिव नगरसचिव यांनी विषयांचे वाचन केले.

म. अमोल मासुळे जलशुध्दीकरण केंद्रासाठी क्लोरीन गॅसचा पुरवठा करणेसाठी प्रस्ताव सादर झाला आहे. या प्रस्तावासोबत सादर झालेल्या टिपणीत 3 वेळा निविदा प्रक्रिया पार पाडण्यांत आल्याचे नमूद आहे.पहिली निविदा दि. 3/6/2020 रोजी, दुसरी निविदा 20/7/2020 रोजी व तिसरी निविदा 25/9/2020 रोजी काढण्यांत आलेली आहे.या कालावधीत क्लोरीन गॅसचा साठा आपल्याकडे होता का? व आपण साठा किती प्रमाणात करु शकतो. सद्या किती साठा शिल्लक आहे.

म. शितल नवले 3/6/2020 रोजी निविदा प्रक्रिया होते. हा मार्च महिना आहे आपण सुमारे 9 महिन्यांपासून टेंडर प्रक्रिया राबवित आहोत. आपल्याकडे निविदा प्रक्रियेबाबतची कार्यवाही अत्यंत किचकट स्वरुपाची आहे. आपल्याकडेस निविदा प्रक्रियेसाठी केवळ एक कर्मचारी सागर जकातदार आहे. त्यांच्याकडे भरपूर प्रमाणात कामाचा व्याप आहे. त्यांच्याकडेस अतिरिक्त कर्मचारी देणे आवश्यक आहे. वेळच्या वेळी टेंडर उघडले जात नाही पक्रियेला वेळ लागतो. आज 2020-21 आला तरी आपली खरेदी होत नाही. ही आपली दप्तर दिरंगाई आहे. अशी दिरंगाई होणार नाही याची काळजी घ्यावी व दिरंगाई करणा-यावर कडक कार्यवाही करावी.

म. अमीन पटेल मा. आयुक्त सो. ८दिवसअगोदर तापी पाणीपुरवठा केद्र येथून सोडण्यांत आलेले पाणी अत्यंत खराब होते. नागरीकांनी आम्हाला बोलावून ते पाणी पाजले. सदर पाण्याला कुत्रा मेल्याचा वास येत होता. आपलया कडेस क्लोरीन गॅस आहे. ब्लिचींग पावडर, तुरटी आहे. असे असून खराब पाणी कसे आले.तेथील कर्मचा-यांनी बिगर फिल्टर केलेले पाणी सोडल्याचे समजते. हा अत्यंत गंभीर प्रकार आहे. सदर भागातील नागरीकांना संडास सुरु झाल्या. तेथील नागरीकांना डायरियाची लागण झाली आहे.आपल्याकडेस सर्व प्रकारचे रसायने उपलब्ध असतांना अशा प्रकारे बिगर फिल्टर केलेले पाणी कोणी सोडले त्यांचेवर योग्य ती कार्यवाही झाली पाहिजे. नागरीकांच्या जिवनाशी अशा प्रकारे खेळण्यांचा अधिकार नाही.

म. नागसेन बोरसे आपण क्लोरीन गॅसचा उपयोग कोण कोणत्या ठिकाणी करतो. हा डोस कधी आणि कसा दिला पाहिजे. यासाठी आपल्याकडेस आवश्यक तो तांत्रिक कर्मचारी वर्ग आहे का? डेडरगांव जलशुध्दीकरण केंद्र येथे तशी व्यवस्था नाही.आपल्याकडे तांत्रिक कर्मचारी किती आहे त्यांची माहिती द्यावी.

म. सुनिल बैसाणे हा विषय नागरीकांच्या आरोग्यासाठी फार महत्वाचा आहे.आपण यासाठी 3 वेळा निविदा केल्या आहे. या टिपणी पूर्वी दाखल झालेल्या निविदा मध्ये कोण निविदा धारक आहे त्यांचे नांव नमूद नाही.आपल्याला वर्षभरासाठी किती क्लोरीन गॅस टनर लागतात.याठिकाणी 14200 हा दर आलेला आहे.आपल्याकडे किती साठा शिल्लक आहे.जर आपल्याकडे यापूर्वी क्लोरीन गॅस टनर संपले असेल आणि आपण त्याशिवाय पाणीपुरवठा केला असेल तर त्यास जबाबदार कोण ? या प्रस्तावात 14200 दर निविदा दर आलेला आहे.माझ्या माहिती प्रमाणे बाजारात 12000 ते13000 हजार या दरात क्लोरीन गॅस टनरउपलब्ध होऊ शकतो. प्रशासनाने बाजार भावाची माहिती घेतली का? आपल्या वर्षाला किती गॅस टनर लागतात. टिपणी सादर करतांना सविस्तर टिपणी देणे आवश्यक आहे. याबाबत बाजार भावाची माहिती घेवून दरात निगोसिएशन करुन पुनश्च ठेकेदाराशी वाटाघाटी कराव्यात व आमचे समाधान होत नाही तो पर्यत विषय तहकूब ठेवावा.

म.सभापती आपण जो पाणीपुरवठयाबाबत विषय मांडलेला आहे. त्याबाबत मी 10 महिन्यापूर्वी एक तक्रार दाखल केलेली होती. आपल्या प्रत्येक घरापर्यंत शुध्द पाणी येते का? असा प्रश्न मी केला होता. डेडरगांव तलावावर क्लोरीन गॅसचा वापर होत नाही तसेच निविदा प्रक्रिया गतीने राबविण्यांत येत नाही याबाबत कैलास शिंदे यांनी खुलासा करावा.

| | |
|---|---|
| म. अभियंता | मी आताच तापी योजनेवरील केमिस्टशी चर्चा केली. त्याठिकाणी सदया 6 क्लोरीन गॅस टनर शिल्लक आहे. ते महिना भरासाठी पुरेशे आहेत. यामध्ये शितल भाऊ यांनी प्रश्न उपस्थित केला होता. आपल्याला निविदा पक्रियेत खूप वेळ लागतो त्यावर मी सभागृहाला विनंती करेल की, सर्व निविदा प्रक्रियेसाठी 3 अधिका-यांनी समिती नेमावी त्यामध्ये संबंधित विभागाचे खाते प्रमुख लेखा विभागाचा अधिकारी, व प्रशासकीय दर्जातील अधिकारी या 3 अधिका-यांमार्फत निविदा उघडणे, तांत्रिक बाबी तपासणे, व अन्य प्रक्रियेतील कामे एकाच वेळी पूर्ण करता येतील व निविदा प्रक्रियेतील लागणारा कालावधी आपल्याल कमी करता येईल. |
| म. शितल नवले | आपण जी पध्दत सांगत आहात ती पध्दत चूकीची आहे. ज्यावेळेला निविदेचे तांत्रिक बीड उघडण्यांत येईल त्याच वेळी सर्व संबंधितांनी एकत्र बसून स्क्रीनवर आवश्यकती कागदपत्रे व तांत्रिक बाबी त्याच ठिकाणी आवश्यक त्या फॉमेटमध्ये तपासणी करुन सहया करणे आवश्यक आहे.करोडो रुपयांचे टेंडर पी. डब्ल्यू डी किंवा जलसिंचन विभागात 5 लोक एका ठिकाणी बसून एका दिवसात निविदा ओपन करतात. आपण त्याप्रमाणे निर्णय घ्यावा यासाठी आठवडयातील एक दिवस ठरविण्यांत यावा. एकाच ठिकाणी असल्यामुळे एकाच वेळेला तपासणी होवून सहया होऊ शकतात.व त्यामुळे निविदा प्रकियेचा लागणारा कालावधी कमी होईल आपण हे चांगले काम चालू करा.याचा आपल्याला पुढील 25 वर्ष फायदा होणार आहे. |
| म. अभियंता | संबंधित विभागाकडे निविदा पक्रियेसाठी स्वतंत्र शाखा असते. व त्यांना त्याप्रमाणे अधिकार दिलेले आहे. आपल्याकडेस अशा प्रकारची कार्यवाही केल्यास दिरंगाई होणार नाही. सन्मा. सदस्य श्री अमीन भैय्या यांनी सांगितले की पाणी खराब आलेले होते. मी त्या काळात रजेवर होतो. मी त्यांची चौकशी करुन खात्री करतो व या प्रकरणी जो दोषी असेल त्यांच्यावर कार्यवाही करण्यांत येईल. तसेच डेडरगांव तलाव येथे क्लोरीन डोस देण्यांची व्यवस्था पूर्वी होती परंतु सदया त्याठिकाणी तशी व्यवस्था नाही त्याठिकाणी पूवी क्लोरीन टनर लिक झाल्याने गावातील लोकांचे व शेतक-यांचे मोठया प्रमाणावर नुकसान झालेले होते. आपण त्याठिकाणी क्लोरीन गॅस टनर ऐवजी ब्लिचींग पावडरचा वापर करीत आहोत. नवीन क्लोरीन टनर बसविण्यांची कार्यालयीन प्रक्रिया प्रस्तावित केलेली आहे. आपल्याकडील तांत्रिक कर्मचारी सेवानिवृत्त झालेले आहे जे कर्मचारी सदयस्थितीत आहेत ते प्रशिक्षीत नाहीत आपल्याकडे तांत्रिक कर्मचारी वर्ग अत्यंत कमी प्रमाणात आहे. तांत्रिक कर्मचारी उपलब्ध करुन देणेबाबत आस्थापना विभागाकडेस मागणी केलेली आहे. सद्यस्थितीत आपल्याकडे 6 क्लोरीन गॅस टनरचा साठा शिल्लक आहे. या निविदेत जो दर आलेला आहे तो बाजार भावाप्रमाणे वाजवी आहे. याबाबत निर्णय घेण्यांचे अधिकार सभागृहाचे आहे. काही समस्या राहिल्या असतील तर पुढील बैठकीत त्याबाबत पूर्ण माहिती सभागृहास देण्यांत येईल. |
| म.अमोल मासुळे | शिंदे साहेबांनी सांगितले की 6 क्लोरीन टनर शिल्लक आह. ते असून 2 महिना भर जाणार आहे. जर 6 टनर आपल्याला दोन महिने जाणार असतील तर वर्षभरात 36 लागतीलमग 300 नग खरेदी करतो आहे जर ते 7/ 8 वर्षात जाईल का याबाबत 3/6/2020 ला निविदा प्रक्रिया केली आहे. |
| म. सभापती | कैलास शिंदे मागच्या वर्षी किती वापरले गेले या बाबत माहिती द्यावी. |
| म. अभियंता | आपल्याला पाण्यातील टर्बीडीटी प्रमाणे क्लोरीन गॅसचा वापर करावा लागतो. त्यानुसार क्लोरीन गॅस प्रत्येक जलशुध्दीकरण केंद्रावर वापरावे लागतात. मी याबाबत संपूर्ण माहिती घेवून सभागृहासमोर सादर करेल. |
| म.आयुक्त सो. | या ठिकाणी बऱ्याच सदस्यांनी मुद्दे उपस्थित केलेले आहे. शितलभाऊनी संगणक लिपिका संदर्भात मुद्दा उपस्थित केलेला आहे. त्याठिकाणी सागर जकातदार एकटा कर्मचारी होता. मी |

स्वत: त्यांच्या ऑफिसला जावून पाहणी केलेली आहे. त्याठिकाणी कर्मचारीची कमतरता होती. त्याठिकाणी अतिरिक्त कर्मचारी देण्यात आलेले आहेत. त्यांना ट्रेनिंग देण्याची गरज आहे. मी त्यांना त्या पध्दतीने सुचना दिलेल्या आहेत व अन्य कोणत्याही सुविधा लागत असेल तर त्यांना देण्यात येणार आहे.

म.शितलभाऊ नवले मी यामध्ये सुधारणा करण्यासाठी सांगतो आहे. आपल्याकडे टेकनिक्ल बिड उघडतांना सर्व कागदपत्राच्या प्रिंट काढण्यात येतात. अशी पध्दत नाही. एका प्रोजक्टरवर सर्व कागदपत्रे दिसतिल अशी व्यवस्था केली पाहीजे. तेथे सर्व स्टॉप बसवून तपासणी करून तेथेच स्वाक्षरी केली पाहिजे. आपण एकीकडे पेपरलेस कार्यप्रणालीकडे येत असतांना पुन्शच: कागदाचा अतिरिक्त वापर करतो हि पध्दत बदलली पाहिजे.

म.आयुक्त याबाबत अति.आयुक्त व तांत्रिक अधिकारी यांची नियुक्ती करता येवू शकेल. आपल्याकडे निविदांची संख्याही मोठया प्रमाणात आहे. आपण याबाबत निश्चित सुधारणा करू. श्री.अमीनभाई यांच्या तक्रारी नुसार त्याबाबत चौकशीकरून संबंधितांवर कार्यवाही केली जाईल. श्री.नागसेनभाऊ बोरसे यांनी उपस्थिती केलेल्या मुद्याबाबत माहिती संबंधित विभागाने तातडीने द्यावी या निविदा प्रक्रियेत आलेल्या दराबाबत मी स्वत: निगोशिऐशन केलेले आहे. मी याबाबत खात्रीने सांगू शकतो की, सदर दर वाजवी आहेत व इतर कोणत्याही मनपापेक्षा व बाजार भावापेक्षा कमी आहेत. त्यास सभागृहाने मान्यता द्यावी.

म.सभापती सर्व सन्मा.सदस्यांच्या सहमतीने तसेच मा.आयुक्त यांच्या अभिप्रायानुसार व कार्यालयीन अहवालास अधिन राहून वाटाघाटी अंती आलेल्या दरांना मान्यता देण्यात येत आहे.

**धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर ०६ दिनांक १८/०३/२०२१**

धुळे मनपाअंतर्गत पाणीपुरवठा योजना वरील जलशुद्धीकरण केंद्रावर क्लोरिन टर्नर गॅसचा 300 नगाचा पुरवठा करणे करिता ई- निविदा क्र.18DMCD583485 (1) अन्वये दि.03/06/2020 रोजी निविदा प्रसिद्ध करण्यात आलेली होती परंतु त्यांत एकच निविदा धारकाने भाग घेतलेला होता. परंतु ई- निविदा प्रक्रियांच्या निविदे प्रमाणे पहिल्या निविदेत कमीत कमी 3 तीन निविदा धारकांनी भाग घेणे बंधनकारकआहे. त्यामुळे सदरची निविदा रद्द करण्यात येवून पुन्हा फेर निविदा काढणेस मा.अति.आयुक्त सो. यांनी दि.20/07/2020 रोजी मंजुरी दिली.

त्यानुसार पुन्हा ई-निविदा क्र. 46- DMCD 603662 (1) अन्वये निविदा प्रसिद्ध करण्यात येवून दि. 26/08/2020 रोजी निविदा उघण्यात आली त्यानुसार त्यात एकच निविधा धारकाने सहभाग नोंदविलेला होतो परंतु शासकीय नियमाप्रमाणे दुसरी फेर निविद न कमीत कमी दोन निविदा आवश्यक असल्याने सदरची निविदा रद्द करून पुन्हा फेर निविदा काढणेस मा. आयुक्तसो. यांनी दि. 25/09/2020 रोजी मंजुरी दिलेली आहे.

त्यानुसार उक्त क्लोरिन टर्नर गॅस पुरवठा करणे करिता तिसरी फेर निविदा क्र.73 DMCD618350 (1) अन्वये प्रसिद्ध करण्यात आलेली होती त्यामध्ये दोन निविदा धारकांनी सहभा गनोंदविलेला आहेत.

त्यात 1) मे. तिरुपती केमीकल्स, पिंपरी जळगांव 2) महालक्ष्मी ट्रेडींग कंपनी जळगांव यांनी सहभाग घेतलेला होता त्यां Comercial bed व्यापारी बीड उघडण्यात येवून त्यांत सर्वात कमी दर हा मे. तिरुपती केमिकल्स यांचा रु.14,567/- प्रति नग क्लोनि टर्नर गॅस असे आलेले होते त्यानुसार त्या दरांना मंजुरी करिता मे. स्थायी समिती कडे पाठविणे करीता मंजुरीसाठी मा.आयुक्त सो. यांच्याकडे पाठविले असता मा. आयुक्तसो. यांनीदि. 27/01/2021 रोजी सदरच्या दराबाबत वाटाघाटी करण्याचे आदेशीत केले त्यानुसार मे.

तिरुपती केमिकल्स पिंपरी जळगांव यांना धुळे मनपा जा.क्र./ पापुवि/728 दि.25/01/2021 अन्वये पत्र देवून दराचे वाटाघाटीसाठी बोलविण्यात आले होते. त्यानुसार दि. 27/01/2021 रोजी दुपारी 12:30 वा. मा. आयुक्त सो. यांच्या दालणात दराबाबत वाटाघाटी होवून मे. तिरुपती केमिकल्स पिंपरी जळगांव यांनी त्यांचे दर रु.14,567/- प्रति नग ऐवजी रु.367 ने कमी करुन रु.14,200/- प्रति नगाने क्लोरीन टर्नरचा पुरवठा करण्यास तयारअसल्याचे पत्र दि.27/01/2021 रोजी दिले आहे.

तरी रु.14,200/- प्रति नगाने क्लोरीन गॅस टर्नर खरेदी करणेचे दर मान्यतेसाठी प्रस्ताव मे स्थायी समितीपुढे सादर झालेला आहे.

या प्रस्तावासंदर्भात सर्व सन्मा.सदस्यांनी केलेली चर्चा व कार्यालयीन अहवाल, तसेच मा. आयुक्त यांनी दराबाबत दिलेले अभिप्राय विचारात घेता मे. तिरुपती केमीकल्स,पिंपरी जळगांव यांचे निगोसिएशन अंती प्रती नग रु. 14200/- मात्र या दरास कार्यालयीन अहवालास अधिन राहून महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम 73 अन्वये मान्यता देण्यांत येत आहे. सदर प्रस्ताव व कार्यवाहीबाबत लेखा आक्षेप निर्माण होणार नाही याची दक्षता घ्यावी. याबाबतची जबाबदारी संबंधित विभागानची राहील. **सर्वानुमते मंजुर,**

सही/-x x x

**सभापती,**

**स्थायी समिती,**

**धुळे महानगरपालिका,धुळे**

विषय क्रमांक:- ८ — मनपा निधी (विकास शुल्क निधी) अंतर्गत प्र.क्र. १९ मध्ये रहेबर बाग सर्व्हे नं.४३६ येथे ओपन स्पेसला संरक्षण भिंत बांधणेच्या कामाचे निविदा दर मागविण्यांत आलेत, त्याबाबत आलेल्या कार्यालयीन अहवालावर विचार करणे.

म.नगरसचिव — नगरसचिव यांनी विषयांचे वाचन केले.

म. सुनिल बैसाणे — सदरचा प्रसताव माझ्या कार्यकाळात प्रशासकीय मान्यतेसाठी आलेला होता. आपण तेंथील जागा भूसंपादन करुन २.५० कोटी रुपये भरुन ताब्यात घेतलेली आहे. त्या जागेवर काही भूमाफीया अतिक्रमण करुन जागेचा कब्जा घेण्याच्या प्रयत्नांत होते सदरची बाब आपल्या सन्मा. सदस्या हिनाताई पठाण यांनी प्रशासनाच्या निदर्शनास आणून दिली. त्यानुसार त्या जागेवर विकास शुल्क निधी अंतर्गत संरक्षण भिंत बांधणेचा प्रस्ताव मान्य करण्यांत आला. सदरचा प्रसताव अतिशय योग्य आहे. त्यास मान्यता देण्यांत यावी. तथापि मला या संदर्भात माहिती हवी आहे आपण विकास शुल्क निधीतून कोणती कामे करु शकतो याबाबत शासनाचे निर्णय किंवा दिशा निर्देश आहेत का? याबाबत माहिती मिळावी.

म. नगररचनाकार — महाराष्ट्र प्रादेशिक नगररचना अधिनियम १९६६ कलम १२४ ड नुसार विकास शुल्क निधी अंतर्गत करावयाच्या कामाबाबत नमूद आहे. यांत भूसंपादन करणे,भूसंपादीत जागा विकसीत करणे, तसेच विकास योजना आराखडयातील रस्ते, गटारी व अन्य नागरी सुविधा विकसित करणे अशा बाबी नमूद आहे.

म. सभापती — डी.पी. रोड अंतर्गत कोणती कामे करण्यांत येतात.

म.सुनिल बैसाणे — भुसंपादनाच्या किती जागा प्रस्ताव प्रलंबीत आहे.आणि किती जागाचा मोबदला द्यावयाचा आहे. माझ्या माहितीप्रमाणे विकास निधीतून मनपा मार्फत विकास कामाचे टेंडर निघाले आहे. सदरची जागा आहे तिथे आपण वॉल कपौंड करत आहे. सदरची जागा भूमाफीयाच्या घशात जाणार होती आपला विकास शुल्काचा पैसा योग्य ठिकाणी खर्च होत आहे मला एक सांगा आपल्याकडे विकास शुल्क किती शिल्लक आहे.

| | |
|---|---|
| म.नगररचनाकार | विकास शुल्काचा जो क्लार्क भरणा करत होता त्या कर्मचा-यांची बदली झाली आहे. मी कालच कर्मचा-यांची मिटींग घेवून शनिवार रविवार विकास शुल्काचा भरणा आता पर्यतचा पूर्ण करुन पुढील स्थायी समितीच्या मिटींग मध्ये सादर करेल. |
| म. सुनिल बैसाणे | जर विकास शुल्क ५ कोटी शिल्लक आहे. टेंडर प्रक्रिया १७- १८ कोटीचे आहे. हे काम आहे देयक अदा करतांना कुठल्या फंडातून देणार आहात यांची माहिती दयावी. |
| म.शितल नवले | विकास शुल्क वाढला पाहिजे. या मताशी सर्व सहमत आहोत आपले जे ११ हद्दवाढ गावे आहेत तिथे अजून पण युनिफाईड लागू केला नाही. आपल्याला असलेल्या अधिकारानुसार तिथे लागू करुन मनपाचे उत्पन्न वाढविता येईल. |
| म. नगररचनारकार | धुळे मनपाच्या जुन्या हद्दीप्रमाणे वाढीव हद्दीत देखील युनिफाईड डी.सी.आर. च्या अनुषंगाने विकसन परवानगी बाबत कार्यवाही करता येवू शकते. तसेच याप्रमाणे सॉप्-टवेअर मध्ये बदल करण्यांत येत असून त्याप्रमाणे कार्यवाही करण्यांत येत आहे. |
| म. आयुक्त | बैसाणे सो.जो मुद्दा उपस्थित केला आहे. त्याबाबत विकास शुल्क कशा पध्दतीने वापरता येईल याबाबत शासनाचे नियम आहे. विकास आराखडयातील विकसनासाठी आपण निधी वापरु शकतो.आपण मागितलेली सर्व आकडेवारी आपल्याला उपलब्ध करुन दिली जाईल.आज जो प्रस्ताव सादर झालेला आहे.त्याच्या कामासाठी तरतूद आहे.इतर कामाबाबत देखील माहिती सादर करण्यांत येईल. |
| म. सुनिल बैसाणे | जर विकास शुल्कात ५ कोटी शिल्लक आहे व आपण सुमारे ७- ८ कोटीच्या निविदा केलेल्या आहे सदर कामाचे पैसे ठेकेदाराला कशा पध्दतीने देणार. |
| म. आयुक्त | आपला मुद्दा बरोबर आहे.आपल्याकडे जो निधी उपलब्ध आहे त्यातून आपल्याला कामे करावयाची आहे याबाबत शिल्लक निधी संदर्भात आपणास माहिती उपलब्ध करुन देण्यांत येईल. |
| म. सभापती | सर्व सन्मा. सदस्यांनी दिलेल्या सहमतीनुसार व कार्यालयीन अहवालास अधिन राहून सदर प्रस्तावास मान्यता देण्यांत येत आहे. |

**धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर ०७ दिनांक १८/०३/२०२१**

मनपा निधी (विकास शुल्क निधी) अंतर्गत प्र.क्र.१९ मध्ये रहेबर बाग सर्व्हे नं.४३६ येथे ओपनस्पेसला संरक्षण भिंत बांधणे. कामाबाबत स्थायी समिती ठराव नं.९९ दि. १०/१२/२०२० मा.आयुक्त सो. धुळे यांचे टिपणी मंजुरीने दि.०९/०१/२०२१ अन्वये उक्त कामाबाबत रक्कम रु.३१,०७,१५१/- मात्र खर्चाचा आर्थिक व प्रशासकीय मंजुरी देणेत आली आहे. उक्त कामाबाबत शहर अभियंता मनपा धुळे यांचे पत्र क्र.८४० दि.१७/१२/२०२० अन्वये रक्कम रु. ३१,०७,१५१/- मात्र खर्चास तांत्रिक मंजुरी मिळालेली आहे.

उक्त बाबत धुळे महानगरपालिका जा.क्र./बां.वि./१२९/२० दि.२३/१२/२०२० अन्वये दि.२३/१२/२०२० रोजीचे देशदूत/राजरंग या वृत्तपत्रात जाहीर निविदा प्रसिद्ध करणेत येऊन दि.१५/०१/२०२१ रोजी निविदा दर मागविण्यात आले आहेत. पात्र कंत्राटदार यांनी निविदेबाबत ऑनलाईन पद्धतीने बयाणा रक्कम भरून निविदा दर सादर केलेले आहेत.

| अ.क्र. | कंत्राटदार किंवा ठेकेदाराचे नाव | दिलेले निविदा दर | शेरा |
|---|---|---|---|
| १ | मे.अक्षय धनराज आखिजा | अंदाजपत्रकीय दराने | |
| २ | मे.अे.के.सैफी | शे.१% जास्तीने | |
| ३ | मे.सुकन्या सुरेश चौधरी | शे.२% जास्तीने | |
| ४ | मे.सुयोग भानुदास बोरसे | **शे.-२% कमीने** | **सर्वात कमी दर** |

वरील प्रमाणे निविदेत भाग घेतलेले ठेकेदार पात्र असून **मे.सुयोग भानुदास बोरसे** यांचे दर शे.-२% कमी आहे व त्यांनी नियमा प्रमाणे ऑनलाईन बयाणा रक्कम भरलेली आहे. सबब कंत्राटदार **मे.सुयोग भानुदास बोरसे** यांची शे.-२ % कमी दराने आलेले निविदा दर मे.स्थायी समिती पुढे मंजुरीस्तव सादर झालेला आहे.

सर्व सन्मा.सदस्यांनी दिलेल्या सहमतीनुसार व कार्यालयीन अहवालास अधिन राहून याकामी मे. सुयोग भानुदास बोरसे यांचे अंदाजपत्रकीय दरापेक्षा शे. -२% कमीने आलेल्या निविदा दरास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ७३ नुसार मान्यता देण्यांत येत आहे. सदर प्रस्ताव व कार्यवाहीबाबत लेखा आक्षेप निर्माण होणार नाही याची दक्षता घ्यावी. याबाबतची जबाबदारी संबंधित विभागानची राहील.

तसेच शिल्लक विकास शुल्क, सद्यस्थितीत त्याअंतर्गत घेतलेली कामे याबाबतचा तपशील पुढील स्थायी समिती समोर सादर करणेबाबत कार्यवाही करावी.

**सर्वानुमते मंजुर,**
सही/-x x x
**सभापती,**
**स्थायी समिती,**
**धुळे महानगरपालिका,धुळे**

विषय क्रमांकः- ९ धुळे मनपा हद्दीत सहाय्यक अनुदान अंतर्गत प्र.क्र. ०७ मधील मोहन मेडिकल ते मुस्लीम कब्रस्थान पर्यंत रस्ता डांबरीकरण करणे कामाबाबत निविदा दर मागविण्यांत आलेत, त्याबाबत आलेल्या कार्यालयीन अहवालावर विचार करणे.

म.नगरसचिव नगरसचिव यांनी विषयांचे वाचन केले.
म. सुनिल बैसाणे विषय मंजूर करण्यांत यावा.
म.अमोल मासुळे विषय मंजूर करण्यांत यावा.
म. सभापती सर्व सन्मा. सदस्यांच्या सहमतीने व कार्यालयीन अहवालास अधिन राहून प्रस्तावास मान्यता देण्यांत येत आहे.

**धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर ०८ दिनांक १८/०३/२०२१**

धुळे मनपा हद्दीत सहाय्यक अनुदान अंतर्गत प्र.क्र. ०७ मधील मोहन मेडिकल ते मुस्लीम कब्रस्थान पर्यंत रस्ता डांबरीकरण करणे कामाबाबत धुळे मनपा स्थायी समिती ठराव क्र. १२० दि. २२/१२/२०२० मा. आयुक्त सो., धुळे मनपा यांनी टिपणी मंजुरीने दि.२३/१२/२०२० अन्वये उक्त कामाच्या खर्चास रु.५५,३३,८०८/- मात्र रक्कमेस आर्थिक व प्रशासकीय मंजुरी देणेत आली आहे.

उक्त बाबत शहर अभियंता मनपा,धुळे यांचे पत्र क्र. ९५२दिनांक ११/०१/२०२१ अन्वये रक्कम रु.५५,१३,३५२/- मात्र खर्चास तांत्रिक मंजुरी मिळालेली आहे.

उक्त कामाबाबत धुळे महानगरपालिका जा.क्र./बां.बि./१४६ अन्वये दि. २१/०१/२०२१रोजीचा दै.देशदूत या अंकात प्रसिद्ध केली असता मुदतीत दि. ०८/०२/२०२१ अखेर खालील प्रमाणे निविदा धारकांचे निविदा दर आलेले आहे.

| अ.क्र. | कंत्राटदारा/ठेकेदराचे नाव | दिलेले निविदा दर | शेरा |
|---|---|---|---|
| १ | श्री.आशिष एम. पटवारी | शे २.००% जास्तीने | |
| २ | श्री.स्वामी समर्थ कन्सट्रक्शन | शे ३.००% जास्तीने | |
| **३** | **मे. हिंद कन्सट्रक्शन** | **अंदाजपत्रकीय दराने** | **सर्वात कमी दर** |

यावाबत सर्वात कमी निविदा दर असलेले निविदा धारक मे. हिंद कन्स्ट्रक्शन यांच्याशी दरासंदर्भात वाटाघाटी केल्या असता त्यांनी १% कमी दराने काम करण्यास संमती दर्शविली असून त्यानुसार याकामी सर्वात कमी दर मे. हिंद कन्स्ट्रक्शन यांचे आलेले **अंदाजपत्रकीय दरापेक्षा शे.१ % कमीने दरास** मान्यतेसाठी स्थायी समिती समोर सादर झालेला आहे.

**सर्व सन्मा. सदस्यांच्या सहमतीने व कार्यालयीन अहवालास अधिन राहून सदर कामी** मे. हिंद कन्स्ट्रक्शन यांच्याशी झालेल्या निगोसिएशन अंती त्यांनी १% कमी दराने काम करण्यास संमती दर्शविलीने त्यांचे शेकडा १% कमीचे असलेल्या दरांस **महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ७३ नुसार** मान्यता देण्यांत येत आहे. सदर प्रस्ताव व कार्यवाहीबाबत लेखा आक्षेप निर्माण होणार नाही याची दक्षता घ्यावी. याबाबतची जबाबदारी संबंधित विभागानची राहील.

**सर्वानुमते मंजुर,**

सही/-x x x

**सभापती,**

**स्थायी समिती,**

**धुळे महानगरपालिका,धुळे**

विषय क्रमांक:- १० धुळे मनपा हद्दीत सहाय्यक अनुदान अंतर्गत कब्रस्थान ते बहावलपुरी भवन पर्यंत रस्ता डांबरीकरण करणे कामाबाबत निविदा दर मागविण्यांत आलेत, त्याबाबत आलेल्या कार्यालयीन अहवालावर विचार करणे.

म.नगरसचिव नगरसचिव यांनी विषयांचे वाचन केले.

म. सुनिल बैसाणे विषय मंजूर करण्यांत यावा.

म.कमलेश देवरे विषय मंजूर करण्यांत यावा.

म. शितल नवले विषय मंजूर करण्यांत यावा.

म. सभापती सर्व सन्मा.सदस्यांच्या सहमतीने व कार्यालयीन अहवालास अधिन राहून प्रस्तावास मान्यता देण्यांत येत आहे.

**धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर ०९ दिनांक १८/०३/२०२१**

धुळे मनपा हद्दीत सहाय्यक अनुदान अंतर्गत कब्रस्थान ते बहावलपुरी भवन पर्यंत रस्ता डांबरीकरण करणे कामाबाबत धुळे मनपा स्थायी समिती ठराव क्र. ११९ दि. २२/१२/२०२० मा.आयुक्त सो., धुळे मनपा यांनी टिपणी मंजुरीने दि.०५/११/२०२० अन्वये उक्त कामाच्या खर्चास रु.४६,६८,३३३/- मात्र रक्कमेस आर्थिक व प्रशासकीय मंजुरी देणेत आली आहे.

उक्त बाबत शहर अभियंता मनपा , धुळे यांचे पत्र क्र. ९५१ दिनांक ११/०१/२०२१ अन्वये रक्कम रु.४६,६८,३३३/- मात्र खर्चास तांत्रिक मंजुरी मिळालेली आहे.

उक्त कामाबाबत धुळे महानगरपालिका जा.क्र./वां.वि./१४६अन्वये दि. २१/०१/२०२१ रोजीचा दै. देशदूत या अंकात प्रसिद्ध केली असता मुदतीत दि.०८/०२/२०२१ अखेर खालील प्रमाणे निविदा धारकांचे निविदा दर आलेले आहे.

| अ.क्र. | कंत्राटदारा/ठेकेदराचे नाव | दिलेले निविदा दर | शेरा |
|---|---|---|---|
| १ | श्री.आशिष एम. पटवारी | शे २.००% जास्तीने | |
| २ | श्री.स्वामी समर्थ कन्सट्रक्शन | शे ३.००% जास्तीने | |
| **३** | **मे. हिंद कन्सट्रक्शन** | **अंदाजपत्रकीय दराने** | **सर्वात कमी दर** |

याबावत सर्वात कमी निविदा दर असलेले निविदाधारक मे. हिंद कन्स्ट्रक्शन यांच्याशी दरासंदर्भात वाटाघाटी केल्या असता त्यांनी १% कमी दराने काम करण्यास संमती दर्शविली असून त्यानुसार याकामी सर्वात कमी दर मे. हिंद कन्स्ट्रक्शन यांचे आलेले **अंदाजपत्रकीय दरापेक्षा शे.१ %कमीने दरास** मे.स्थायी समितीपुढे मान्यतेस्तव सादर झालेला आहे.

**सर्व सन्मा. सदस्यांच्या सहमतीने व कार्यालयीन अहवालास अधिन राहून सदर कामी** मे. हिंद कन्स्ट्रक्शन यांच्याशी झालेल्या निगोसिएशन अंती त्यांनी १% कमी दराने काम करण्यास संमती दर्शविलीने त्यांचे शेकडा १% कमीचे आलेल्या दरांस **महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ७३ नुसार** मान्यता देण्यांत येत आहे. सदर प्रस्ताव व कार्यवाहीबाबत लेखा आक्षेप निर्माण होणार नाही याची दक्षता घ्यावी. याबाबतची जबाबदारी संबंधित विभागानची राहील.

**सर्वानुमते मंजुर,**

सही/-x x x

**सभापती,**

**स्थायी समिती,**

**धुळे महानगरपालिका,धुळे**

विषय क्रमांक:- ११ — धुळे मनपा हद्दीत मुलभूत सोई सुविधांचा विकास योजने अंतर्गत राज्य मार्ग क्र. ६ ते हरणमाळ रस्त्याची दुरुस्ती करणेच्या कामाचे निविदा दर मागविण्यांत आलेत, त्याबाबत आलेल्या कार्यालयीन अहवालावर विचार करणे.

म.नगरसचिव — नगरसचिव यांनी विषयांचे वाचन केले.

म. शितल नवले — यापूर्वी विषय झाल्याप्रमाणे सदरचा रस्ताही मागच्या पावसाळयात वाहून गेला होता. त्यांची निविदा प्रक्रिया आज होते आहे. अशा प्रकारे कार्यालयीन प्रकियेस विलंब लागतो. याबाबत प्रशासनाने गांभिर्याने दखल घ्यावी.

म. कमलेश देवरे — विषय मंजूर करण्यांत यावा.

म. सभापती — सर्व सन्मा.सदस्यांच्या सहमतीने व कार्यालयीन अहवालास अधिन राहून सदर प्रस्तावास मान्यता देण्यांत येत आहे.

**धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर १० दिनांक १८/०३/२०२१**

धुळे मनपा हद्दीत मुलभूत सोई सुविधांचा विकास योजने अंतर्गत राज्य मार्ग क्र.६ ते हरणमाळ रस्त्याची दुरुस्ती करणे कामाबाबत शासन निर्णय क्र. मनपा २०२०/ प्र.क्र. ७३ (७५) नवि- १६ दि. १३/०१/२०२१ अन्वये उक्त कामाबाबत रक्कम रु.३८,७२,८३०/- मात्र खर्चास आर्थिक व प्रशासकीय मंजुरी देणेत आली आहे.

उक्त बाबत शहर अभियंता मनपा , धुळे यांचे पत्र क्र. ६४९ दिनांक २८/०७/२०२० अन्वये रक्कम रु.३८,७२,८३०/- मात्र खर्चास तांत्रिक मंजुरी मिळालेली आहे.

उक्त कामाबाबत धुळे महानगरपालिका जा.क्र./पा.पु.वि./ ६५६ दि. १४/०१/२०२१ अन्वये दि.१५/०१/२०२१ रोजीचा दै.वार्ता/ नवभारत या अंकात प्रसिद्ध केली असता मुदतीत दि.०५/०२/२०२१ अखेर खालील प्रमाणे निविदा धारकांचे निविदा दर आलेले आहे.

| अ.क्र. | कंत्राटदारा/ठेकेदाराचे नाव | दिलेले निविदा दर | शेरा |
|---|---|---|---|
| १ | मे.अ.के.सैफी | शे १.००% जास्तीने | |
| २ | सुकन्या सुरेश चौधरी | शे २.००% जास्तीने | |
| **३** | **ओम शिव कन्सट्रक्शन** | **शे ११.०७०% कमीने** | **सर्वात कमी दर** |
| ४ | प्रियंका मंजूरसह सोसा., मर्या | अंदाजपत्रकीय दराने | |

वरील प्रमाणे प्राप्त दरास सर्वात कमी दर **मे.ओम शिव कन्सट्रक्शन, धुळे** यांचे **शे ११.०७० % कमीने** सर्वात कमी असून त्यांनी नियमाप्रमाणे रोखीने बयाना रक्कम भरलेली आहे. सदर कामासाठी नियमानुसार १०% चा वरBELOW काम असल्यास आवश्यक डी.डी. रु.८०१६७/- मात्र ठेकेदाराने भरलेली आहे. तरी सदर दरास मे.स्थायी समितीची आवश्यकता असल्याने सदर दरास मंजुरीसाठी मे.स्थायी समिती पुढे मंजुरीस्तव सादर झालेला आहे.

उक्त कार्यालयीन अहवाल व सर्व सन्मा. सदस्यांच्या सहमतीनुसार याकामी मे.ओम शिव कन्सट्रक्शन, धुळे यांचे शे ११.०७०% कमीने आलेल्या दरांस कार्यालयीन अहवालास अधिन राहून महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ७३ नुसार मान्यता देण्यांत येत आहे. सदर प्रस्ताव व कार्यवाहीबाबत लेखा आक्षेप निर्माण होणार नाही याची दक्षता घ्यावी. याबाबतची जबाबदारी संबंधित विभागाची राहील.

**सर्वानुमते मंजुर,**

सही/-x x x

**सभापती,**

**स्थायी समिती,**

**धुळे महानगरपालिका,धुळे**

# धुळे महानगरपालिका,धुळे
## नगरसचिव कार्यालय
## स्थायी समिती सभा क्रमांक ५ चे इतिवृत्त

---

**धुळे मनपा भारतरत्न अटलबिहारी वाजपेयी सभागृह**
**गुरुवार दिनांक २५/०३/२०२१**
**वेळ :- सकाळी ११-०० वाजता.**

धुळे महानगरपालिका स्थायी समितीची साप्ताहिक सभा आज गुरुवार दिनांक २५/०३/२०२१ रोजी सकाळी ११-०० वाजता **मा.श्री संजय सुधाकर जाधव, सभापती,** स्थायी समिती, मनपा, धुळे यांच्या अध्यक्षतेखाली **धुळे मनपा भारतरत्न अटलबिहारी वाजपेयी सभागृह** भरली. स्वाक्षरी बुकावर सही करुन खालील सन्मा.सदस्य सभागृहात हजर होते.

| अ.क्रं. | सदस्यांचे नांव | हुद्दा |
|---|---|---|
| १ | श्री. जाधव संजय सुधाकर | सभापती |
| २ | श्री. बैसाणे सुनिल तुळशिराम | सदस्य |
| ३ | श्रीमती माळी भारती अशोक | सदस्या |
| ४ | श्रीमती पाटील मंगला सुरेश | सदस्या |
| ५ | श्रीमती बोरसे पुष्पा प्रकाश | सदस्या |
| ६ | श्री. मासुळे अमोल पावबा | सदस्य |
| ७ | श्री. देवरे कमलेश नारायण | सदस्य |
| ८ | श्रीमती पठाण हिना अस्लम | सदस्या |
| ९ | श्री. सईद बेग हाशम बेग | सदस्य |
| १० | श्री. नवले शितल मोहन | सदस्य |
| ११ | श्री. बोरसे नागसेन दामोदर | सदस्य |
| १२ | श्रीमती कुलेवार किरण राकेश | सदस्या |
| १३ | श्रीमती. वराडे वैशाली भिकन | सदस्या |
| १४ | श्री. जाधव बन्सीलाल माणिक | सदस्य |
| १५ | श्रीमती चौधरी मंगला अर्जुन | सदस्या |
| १६ | श्री. पटेल अमीन अब्दुल करीम | सदस्य |

उपस्थित अधिकारी गण

| अ.क्र. | अधिकाऱ्यांचे नाव | हुद्दा |
|---|---|---|
| १ | श्री. गणेश गिरी | अति. आयुक्त |
| २ | श्रीमती शिल्पा नाईक | उपायुक्त |
| ३ | श्री. शांताराम गोसावी | उपायुक्त |
| ४ | श्री. तुषार नेरकर | सहा. आयुक्त |
| ५ | श्री. विनायक कोते | सहा. आयुक्त |

| | | |
|---|---|---|
| ६ | श्री. महेंद्र परदेशी | नगररचनाकार |
| ७ | श्री मनोज अरविंद वाघ | प्र.नगरसचिव |
| ८ | श्री. के.एन. शिंदे | अभियंता |
| ९ | डॉ. श्री महेश मोरे | आरोग्याधिकारी |
| १० | श्री. चंद्रकांत जाधव | सहा. आरोग्याधिकारी |
| ११ | श्री. लक्ष्मण पाटील | सहा. आरोग्याधिकारी |
| १२ | श्री. पी.डी. नाईक | लेखापाल |
| १३ | श्री.आर.बी.. सोनवणे | प्र. परवाना अधिक्षक |
| १४ | श्री. बी.एस. रनाळकर | प्र. सहा.कर मुल्य निधारण अधिकारी |
| १५ | श्री. एन.के. बागल | विद्युत अभियंता |
| १६ | श्री. पी.डी. चव्हाण | ओव्हरसिअर बांधकाम |
| १७ | श्री. सी.सी. बागल | पा. पु. ओव्हरसिअर |
| १८ | श्री. हेमंत पावटे | ओव्हरसिअर बांधकाम विभाग |
| १९ | श्री.एस.एन. देसले | लिपीक मनपा शिक्षण मंडळ |
| २० | श्रीमती कल्पना जाधव | अभिलेखापाल |
| २१ | श्री. किशोर सुडके | बाजार विभाग |
| २२ | श्री. प्रसाद जाधव | अति. विभाग |
| २३ | श्री. सुक्राम आत्या राऊत | वाहन विभाग लिपीक |

म.सभापती सर्व उपस्थित सन्मा. सदस्य आयुक्त सो.अधिकारी वर्ग छायाचित्रकार बांधव सभेचे कामकाज चालविणेसाठी आवश्यक तो कोरम पूर्ण झाल्याने नगरसचिव यांनी सभेचे कामकाज सुरुवात करावी.

म. नगरसचिव वंदे् मातरम् या राष्ट्रवंदनेसाठी सर्वांनी उभे रहावे.

विषय क्रमांक :-१२ मागील स्थायी समिती सभेचे इतिवृत्त वाचून कायम करणे.(१८/३/२०२१)

म. नगरसचिव नगरसचिव यांनी विषयांचे वाचन केले.

म. अमोल मासुळे इतिवृत्त कायम करण्यांत यावे.

म. सभापती सर्व सन्मा.सदस्यांच्या सहमतीने मागील स्थायी समिती सभेचे इतिवृत्त क्रमश:वाचून कायम करण्यांत येत आहे.

**धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर ११ दिनांक २५/३/२०२१**

मागील स्थायी समिती सभा दिनांक १८/३/२०२१ रोजीच्या सभेतील स्थायी ३ ते १० अखेर क्रमश: वाचून कायम करण्यांत येत आहे.

सही/-x x x

**सभापती,**
**स्थायी समिती,**
**धुळे महानगरपालिका,धुळे**

विषय क्रमांक:-१३ धुळे मनपा मार्फत नव्याने खरेदी करण्यांत आलेल्या फिरते शौचालयासाठी दर तथा अनामत शुल्क ठरविणेबाबत आलेल्या कार्यालयीन अहवालावर विचार करणे.

म. नगरसचिव नगरसचिव यांनी विषयांचे व कार्यालयीन टिपणीचे वाचन केले.

म. शितल नवले विषय मंजूर करण्यांत यावा.

म. नागसेन बोरसे विषय मंजूर करण्यांत यावा.

म. सभापती सर्व सन्मा.सदस्यांच्या सहमतीने व कार्यालयीन अहवालानुसार सदर प्रसतावास मान्यता देण्यांत येत आहे.

**धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर १२ दिनांक २५/३/२०२१**

धुळे मनपा मालकीचे फिरते शौचालय यापुर्वी अस्तित्वात होते.परंतु सदर फिरते शौचालय बऱ्याच प्रमाणात जुने असल्याने ते सन २०१३ साली स्क्रॅप करुन बंद करण्यात आले होते. सदर कालावधीनंतर मनपा मालकीचे फिरते शौचालय उपलब्ध नसल्याने शहरातील

नागरीकांचे सामुहिक कार्यक्रम, सभा, धार्मीक सम्मेलन, सामुदायीक विवाह इ. करीता मनपाकडे फिरते शौचालयाची मागणी होत असते.मागणी विचारात घेऊन मनपा मार्फत नविन १० सिटचे फिरते शौचालय खरेदी करण्यात आले असुन ते सदर कार्यक्रमाकरीता सुरु करणे आवश्यक आहे.

यापुर्वी मनपा मार्फत असलेले जुने फिरते शौचालयाचे खालील प्रमाणे दर ठरविण्यात आले होते.

| तपशिल | रक्कम |
|---|---|
| एका दिवसाचे भाडे | रु.७००/- |
| अनामत रक्कम (तुट फुट नुकसान भरपाईपोटी) | रु.२०००/- |

सद्यस्थितीत खरेदी करण्यात आलेले नविन फिरते शौचालय उक्त कार्यक्रम करतेवेळी नागरीकांच्या मागणी नुसार मनपा मार्फत फि आकारणी करुन सुरु करणे आवश्यक आहे. त्याकामी शिरपुर वरवाडे नगरपरिषदकडे भ्रमणध्वनीवर विचारणा केली असता त्यांच्याकडे खालील प्रमाणे दर आकारणी करण्यात येत आहे.

| तपशिल | रक्कम |
|---|---|
| एका दिवसाचे भाडे | रु.१०००/- |
| अनामत रक्कम (तुट फुट नुकसान भरपाईपोटी) | रु.५०००/- |

सदर दरानुसार मनपाचे नविन फिरते शौचालय उपलब्ध करुन दिल्यास वेळोवेळी केलेल्या मागणी नुसार मनपा मार्फत उक्त सेवा देणे सोयीचे होवुन मनपाच्या उत्पन्नात भर पडणार आहे. नागरीकांनी केलेल्या मागणीनुसार व आजुबाजुच्या हद्दीबाहेरील कार्यक्रमाकरीता केलेल्या मागणीनुसार व बाजार भाव व इंधनाचा खर्च पाहता उक्त दराप्रमाणे फिरते शौचालय उपलब्ध करुन देणे योग्य होईल. तसेच हद्दी बाहेरील कार्यक्रमा करीता ने आण चा खर्च संबंधीतांवर टाकुन सदर दरास मे.स्थायी समितीची मान्यता घेणे आवश्यक आहे. त्याअनुषंगाने सदरचा अहवाल मे. स्थायी समितीपुढे मंजुरीस्तव सादर झाला आहे.

सर्व सन्मा.सदस्यांच्या सहमतीने व कार्यालयीन अहवालास अधिन राहून फिरते शौचालयांचे एका दिवसाचे भाडे रु.१०००/- मात्र व अनामत रक्कम रु.५०००/- मात्र शुल्क निश्चित करण्यांस मान्यता देण्यांत येत आहे. तसेच हद्दी बाहेरील कार्यक्रमा करीता ने आण चा खर्च संबंधीतांकडून वसुल करण्यांस मान्यता देण्यांत येत आहे. **सर्वानुमते मंजुर,**

सही/-x x x

**सभापती,**
**स्थायी समिती,**
**धुळे महानगरपालिका,धुळे**

विषय क्रमांक:-१४ मे.आर.जगताप ॲण्ड असोसिएट कन्सल्टं ॲण्ड इंजिनीयरींग सर्व्हिसेस, नागपुर यांचेकडून घनकचरा संकलन व वाहतूक करण्याकामी प्रारुप निविदा व मुल्यमापन अहवाल तयार करण्यांत आलेला असून त्यासाठी झालेला खर्च रु.५,९३,०००/- मात्रला कार्योत्तर मंजुरी देणेबाबत आलेल्या कार्यालयीन अहवालावर विचार करणे.

म. नगरसचिव नगरसचिव यांनी विषयांचे वाचन केले.

म.शितल नवले सदर प्रस्तावाच्या निविदा झालेल्या आहेत.मागील निविदा प्रक्रियेत ज्या त्रुटी होत्या त्या जर सभेपुढे सादर झाल्या असत्या तर आपल्याला इतका त्रास झाला नसता. आपण फक्त निविदा करण्यासाठी इतका खर्च करतो आहे तर प्रस्ताव मंजुरीपूर्वी स्थायी समिती समोर ठेवणे आवश्यक होते. आपल्या मागील निविदा प्रकियेतील चुकांमुळे आपण कोर्टात जरी गेलो तरी

आपण केस हारणार आहोत.मागील निविदा प्रक्रियेत अनेक गोष्टी नमूद होत्या परंतु त्यात कोणतीही ठोस कार्यवाही झालेली नाही.आपण जे काही निविदेसंदर्भात अटी शर्ती व निकष ठरविलेले आहे.ते या सभागृहाला कळणे आवश्यक आहे.सदरचे काम नागपूर येथील तज्ञ संस्थेने केले आहे.मी अनेकदा नागपूर येथे गेलेलो आहे. ते चांगले असेलच परंतु त्या कामाचा तपशील सभागृहाला कळणे आवश्यक आहे.

म. सभापती — सदर घनकचरा वाहतूक व संकलनाचा निविदा दर मंजुरीचा विषय माझ्याकडे मागील आठवडयास आला होता.आपण जे मुद्दे उपस्थित केले त्याच मुद्दयांच्या आधारावर प्रशासनाला पत्र दिलेले आहे.जो पर्यत याबाबतची संपूर्ण माहिती व तपशील सभागृहाला मिळत नाही. तोपावेतो सदर प्रस्ताव सभेपुढे सादर करु नये असे कळविलेले आहे. मागील निविदा प्रक्रियेतील त्रुटीमुळे नगरसेवक व नागरीकांना अनेक प्रकारचा त्रास सहन करावा लागला होता.या निविदा प्रक्रियेत असणा-या अटी शर्ती ठेकेदाराची कामाची कार्यपध्दती याबाबत सर्वकक्ष माहिती होणे गरजेचे आहे. व शहराच्या दृष्टीकोनातून त्यात आपण आवश्यक त्या सुधारणा करु शकतो.

म. नगरसचिव — सदर प्रस्ताव हा घनकचरा वाहतूक व संकलनाचा नसून सदर निविदा प्रक्रिया व त्याबाबतचा मूल्यमापन अहवाल तज्ञ संस्थेकडून तयार करुन घेण्यांत आलेला आहे व त्याकामाबाबत संबंधित संस्थेला देण्यांत येणारा खर्च मान्यतेसाठी प्रस्ताव सादर करण्यांत आलेला आहे.

म.शितल नवले — आम्ही ते म्हणत आहोत फक्त त्यांच्या काय अटी शर्ती आहेत या सभागृहाला कळू दया त्यांचे पेमेंट काढून टाकले आहे.

म. सुनिल बैसाणे — घनकचरा बाबत मागे अनेक वाद झाले. अनेक तक्रारी होत्या शितलभाऊनी जे मुद्दे नमूद केले ते अत्यंत योग्य पध्दतीने नमूद केले आहे कारण स्थायी समिती समोर दर मंजुरीला येत असतांना जो कोणी ठेकेदार असेल त्याचा डेमो प्रत्याक्षिक जसे महासभेपुढे होते ते स्थायी समिती समोर झाले पाहिजे मी सभापती असतांना पत्र दिले होते.महापौर व सभापती यांच्या समोर प्रेझेन्टेशन झाले पाहिजे ते झाल्यानंतर आपण त्यांना मानांकन देऊ. याबाबतचे दोन पत् मी आयुक्त सो. यांना दिलेले आहेजर चूकीची निविदा पक्रिया करुन विशिष्ट निविदाधारकाला लाभ होणेसाठी किंवा त्याला निविदा प्राप्त होण्यासाठी प्रयत्न केला तर मी उच्च न्यायालयात जाईल असे पत्र दिलेले आहे आणि त्या पत्राची दखल त्यांनी घेतली किंवा नाही हे मला माहित नाही परंतु चूकीच्या निविदा प्रक्रियेमुळे नागरीकांची गैरसोय होणार नाही हे पाहणे गरजेचे आहे.व या गोष्टी लोकप्रतिनिधी म्हणून आम्हाला करावयाच्या आहे. याठिकाणी प्रथम सदर निविदा प्रक्रियेचा विस्तृत तपशील स्थायी समिती समोर सादर करणे आवश्यक आहे. सदर ठेकेदाराला कामाचा अनुभव लक्षांत घेवून टप्याटप्प्याने मुदतवाढ देणे गरजेचे आहे. 7 वर्षाकरिता निविदा देणे हे शासन निर्णयानुसार चूकीचे आहे. यापूर्वी नियुक्त ठेकेदार सुध्दा न्यायालयांत जाण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे सदर पुढील निविदा प्रक्रिया तयार करतांना संपूर्ण तपशील निविदेच्या अटी शर्ती स्थायी समिती समोर येणे आवश्यक आहे. जेणे करुन भविष्यात आपल्याला आर्थिक अडचणी निर्माण होणार नाही व चूकीची निविदा प्रक्रिया होणार नाही यासाठी सभापती महोदयांनी गांभिर्याने विचार करावा.

म. शितल नवले — सभापती महोदय, घनकचरा संकलन व वाहतूक याबाबत नियुक्त करावयाच्या निविदा प्रक्रियेत ज्या काही अटी शर्ती आहेत व ज्या पध्दतीने संबंधित ठेकेदार काम करणार आहे. त्या सर्व बाबी सभागृहासमोर येणे आवश्यक आहे. सर्व गोष्टी पारदर्शी पणाने झाल्यास आपल्याला पुढे अडचण येणार नाही.

म. नगरसचिव — या संदर्भात घनकचरा संकलन व वाहतूक बाबत निविदा दर मान्यतेचा प्रस्ताव नगरसचिव कार्यालयाकडेस स्थायी समितीच्या मान्यतेसाठी सादर झालेला होता. त्यावेळसच सभापती महोदयांनी आरोग्य विभाग व मा.आयुक्त सो. यांना पत्र सादर केलेले आहे. आपण जे मुद्दे याठिकाणी उपस्थित केलेले आहेत त्या सर्व बाबी पत्रात नमूद करुन त्याबाबतचे प्रात्यक्षिक व विस्तृत माहिती तथा अहवाल विषय घेण्यापूर्वी स्थायी समिती समोर सादर करणेबाबत कळविण्यांत आलेले आहे.

म. उपायुक्त — सन्मा. सदस्यांनी जे काही मुद्दे उपस्थित केले आहे ते सभागृहाला दिशा देणारे आहे. सन 2012 पासून घनकचरा संकलनाचे काम आरोग्य विभागामार्फत समाधानकारक होत नसल्याचे दिसून येत आहे. काम करतांना आपणास अनेक अडचणी आलेल्या आहेत. याबाबत सभागृहास विस्तृत माहिती देण्यांत येईल.

म. सभापती — सर्व सन्मा.सदस्यांनी केलेल्या चर्चेनुसार व उपस्थित केलेल्या मुदयासंदर्भात विस्तृत माहिती सदस्यांना पुढील बैठकीत देण्यांत यावी.तो पावेतो सदर प्रस्ताव तहकूब ठेवण्यांस मान्यता देण्यांत येत आहे.

**धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर १३ दिनांक २५/३/२०२१**

मे.आर.जगताप ॲण्ड असोसिएट कन्सल्टं ॲण्ड इंजिनीयरींग सर्व्हिसेस,नागपुर यांचेकडून घनकचरा संकलन व वाहतूक करण्याकामी प्रारुप निविदा व मुल्यमापन अहवाल तयार करण्यांत आलेला असून त्यासाठी झालेला खर्च रु.५,९३,०००/- मात्रला कार्योत्तर मंजुरी देणेबाबत आलेल्या कार्यालयीन अहवाल मान्यतेसाठी सभागृहासमोर ठेवण्यांत आला असता सर्व सन्मा.सदस्यांनी केलेल्या चर्चेनुसार व उपस्थित केलेल्या मुदयासंदर्भात विस्तृत माहिती सदस्यांना पुढील बैठकीत देण्यांत यावी.तो पावेतो सदर प्रस्ताव तहकूब ठेवण्यांस मान्यता देण्यांत येत आहे. **सर्वानुमते मंजुर,**

सही/-x x x

**सभापती,**
**स्थायी समिती,**
**धुळे महानगरपालिका,धुळे**

विषय क्रमांक:- १५ — MSW नियम 2016 च्या प्रभावी अंमलबजावणीसाठी नियुक्त तांत्रिक सल्लागार अखिल भारतीय स्थानिक स्वराज्य संस्था नवी दिल्ली यांना मुदतवाढ देणेबाबत आलेल्या कार्यालयीन अहवालावर विचार करणे.

म. नगरसचिव — नगरसचिव यांनी विषयांचे वाचन केले..

म. सुनिल बैसाणे — सभापती महोदय, विषय क्रं. 15 हा जो विषय आलेला आहे प्रशासनाच्या वतीने आम्हाला खुलासा करावा की, या संस्थेलाच मुदतवाढ देण्या मागचे कारण काय आहे. या संस्थेला मुदतवाढ देऊन काय साध्य करणार आहे.

म. शितल नवले — सन्मा. सभापती महोदय, धुळे शहर हगणदारी मुक्त आहे असे म्हणायला हरकत नाही. ठिक आहे आपण चांगले काम करत आहांत परंतु ग्राऊंड लेव्हल कडे पहा.सचिव सो. आपण महासभेमध्ये विषय मंजूर केला आहे. शौचालय दुरुस्तीबाबतचा सदर ठराव द्या जेणे करुन तांतडीने कार्यवाही करता येईल.

म. नगरसचिव — माझ्याकडे कुठलाही ठराव पेन्डींग नाही सर्व ठराव कार्यवाहीसाठी संबंधित विभागाकडे सादर करण्यांत आलेले आहे.

म. सुनिल बैसाणे — धुळे मनपा मालकीचे अनेक व्यापारी संकुल आहे आणि त्या व्यापारी संकुलामध्ये लेनीन चौकातआण्णाभाऊ साठे संकुल आहे. त्या ठिकाणी असलेल्या शौचालयांची परिस्थिती आपण जर पाहिली तर दोन मिनिटे तेथे माणूस उभा राहू शकत नाही.

म. सभापती — त्या शॉपींग कॉम्प्लेक्स मध्ये काही भाडेकरी टाकण्यांत आले होते आणि खाजगी व्यक्ती त्याच्यातून भाडे कमावत होते मागच्या आठवडयाला नाईक मॅडम आणि सुडके यांना सांगितले त्यांनी त्या ठिकाणी जाऊन खाली केले राहिला शौचालयाचा विषय त्या ठिकाणी वॉचमन ठेवून व्यवस्था करता येईल.

म. सुनिल बैसाणे — लेनीन चौक शॉपींग कॉम्प्लेक्स मध्ये अशी परिस्थिती आहे अशा परिस्थितीत त्या संस्थेला 2,50,0000/-रु.महिना देणार आहे. आम्हाला कोणती संस्था आहे त्यांचे कोणते कर्मचारी उपलब्ध आहे काय काय काम करता यांची माहिती दया.

मसहा.आरोग्याधिकारी — ऑल इंडिया इन्टीटयुट ऑफ लोकल सेल्प गर्व्हमेंट,नवी दिल्ली ही संस्था आहे मागच्या वर्षापासून काम करत आहे.2016 च्या शासन निर्णयानुसार काम करणे गरजेचे आहे. आरोग्य विभागामध्ये कुठलाही टेक्नीकल स्टॉफ उपलब्ध नाही. त्यामुळे मागच्या वर्षी या संस्थेला नियुक्त केले होते. स्वच्छ सर्व्हेक्षण 2020 मध्ये आपण त्यांच्याकडून पोर्टलवर जी माहिती लोड करावी लागते आपल्याकडे टेक्नीकल कर्मचारी नसल्याने ही संस्था नेमली होती. त्या अनुषंगाने 2021 मध्ये चांगल्या पध्दतीने काम केल्याने आपल्याला थ्री स्टार रॅन्क म्हणून मांनाकन मिळाला व धुळे मनपाला चांगला दर्जा मिळाला शासनाच्या पोर्टलवर विविध माहिती भरणे आवश्यक असते रोजच्या दैनंदिन पत्रव्यवहार करणे हे काम आपण या संस्थेकडून करुन फायदेशीर ठरणार आहे त्यामुळे हा विषय स्थायी समितीपुढे ठेवला आहे. पोर्टलवर 47 संस्था आहेत त्यात ही ऑल इंडिया इन्टीटयुट ऑफ लोकल सेल्प गर्व्हमेंट,नवी दिल्ली ही संस्था आहे. म्हणून त्यांना काम देण्यांत आले आहे शासन सल्लागार नियुक्त करणेसाठी शासन निर्णय 2017 चे पत्र आहे.

म. शितल नवले — सेट्रल गव्हमेंट काही संस्था त्यांच्यासाठी आपण काही निविदा मागविली होती का डायरेक्ट नियुक्ती केली आहे मागच्या वेळेस अशा किती संस्था आहे त्यांना आपण काम देऊ शकतो.

म. उपायुक्त — सन्मा. सदस्यांनी उपस्थित केलेल्या मुद्दयांच्या संदर्भात मा. सभापती यांच्या वतीने मी खुलासा करतो जवळपास 36- 37 संस्था हया नोंदणीकृत पोर्टलवर आहेत. ऑल इंडिया लोकल सेल्फ ही अर्बन डिपार्टमेंट संस्था आहे आम्ही सर्वांनी याच संस्थेत ट्रेनींग झेतले आहे. त्यांच जे सॉलीड बेस आहे आणि ते चांगले काम करते आणि आपल्याकडे आरोग्य अधिकारी पद रिक्त आहे आपण जर नाशिक मनपात गेलो तर हे कार्य स्वच्छ भारत मिशन असेल सफाईअभियान यांनी एक्सपर्ट नेमलेले आहेत ते साधारणत: मनपाचे अधिकारी आहेत आपल्याकडे खूप कमी प्रमाणात आहे माझ्यामते ते चार्जस देखील नाममात्र आहे

म. अति. आयुक्त — ही प्रॉपरली संस्था नाही ही एनजीओ आहे आणि सेल्फ इंडियाच्या ग्रॅन्डवर चालती हि संस्था म्हणजे वैयक्तीक मालक नाही त्यांच्यावर गर्व्हमेंटमध्ये बरेच बंधने आहेत ही एक नामाकिंत संस्था आहे हिला गर्व्हमेंट कडून ग्रॅन्ट मिळते हे लोक आहेत हे एक्फर्ट आहेत. ते चांगल्या पध्दतीने काम करतात जे डाक्युमेन्टेशन आपल्याकडून होत नाही म्हणून यांच्याकडून ते काम करुन घेतले जाते. ते चांगल्या पध्दतीने काम करतात जे डाक्युमेन्टेशन आपल्याकडून होत नाही म्हणून हयांना दिले आपल्या काही चूका झालेल्या असतील तर ते लोक सांगतात

म. सभापती — सर्व सन्मा. सदस्यांच्या सहमतीने व कार्यालयीन अहवालास अधिन राहून सदर विषय मंजूर करण्यांत येत आहे.

**धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर १४ दिनांक २५/३/२०२१**

अखिल भारतीय स्थानीक स्वराज्य संस्था यांना खालील कामांसाठी तांत्रीक सल्लागार म्हणुन मंजुर दर मासिक रु.२,५०,०००/- प्रमाणे उक्त संदर्भिय कार्यादेशान्वये माहे जुन-२०२० ते जानेवारी-२०२१ या कालावाधीकरीता खालील कामे करण्याकामी तांत्रीक सल्लागार म्हणुन नेमण्यात आले आहे.

१) स्वच्छ भारत अभियान अंतर्गत स्वच्छ सर्व्हेक्षण (ODF++,GFC, Water+) स्पर्धासाठी लागणारे कागदपत्र तयार करणे व शासनाच्या पोर्टलवर विहित पध्दतीने माहिती भरणे
२) राष्ट्रीय हरीत लवाद कायद्याअंतर्गत व प्रदुषण मंडळ यांच्या नियमानुसार घनकचरा व्यवस्थापन नियम २०१६ च्या अनुषंगाने शासनाच्या पोर्टलवर योग्य ती माहिती भरणे
३) कचरा विलगीकरण, होम कंपोस्टींग, MRF याबाबत योग्य त्या मार्गदर्शन व कृती आराखडा तयार करणे
४) सिंगल युज प्लास्टीक बंदी बाबत जनजागृती व कृती आराखडा तयार करणे व मार्गदर्शन करणे
५) स्वच्छ भारत अभियान अंतर्गत C&D, Biomining व बायोगॅस प्रकल्प या बाबत योग्य ते मार्गदर्शन करणे

तरी सदर कालावधीत अखिल भारतीय स्थानीक स्वराज्य संस्थमार्फत उक्त काम करुन घेण्यात आले असुन त्याचा फायदा मनपास खालील प्रमाणे झालेला आहे.

६) Scotch Award For Eliminating Manual Scavanging and Introducing Machine to manhole consept
७) हगणदारी मुक्त शहर ++ दर्जा प्राप्त झाला (ODF++) आहे.
८) कचरा मुक्त शहर मानांकन करीता वेळोवेळी शासनाने मागणी केलेल्या अभिलेखेंची पुर्तता करणे व दिलेल्या निर्देशांची अंमलबजावणी करुन कामे करणे
९) माझी वसुंधरा अभियान अंतर्गत विविध कामे करण्यात येत आहे तसेच आढावा घेऊन त्यांंची पुर्तता करण्यात येत आहे
१०) प्रसार माध्यमांवर (Social Media) धुळे महानगरपालिकेच्या कामांचा प्रसार व जनजागृती करणे
११) स्वच्छ सर्व्हेक्षण २०२१ (पहिला व दुसरा टप्पा) अंतर्गत वेळोवेळी शासनाने मागणी केलेल्या अभिलेखेंची पुर्तता करणे व दिलेल्या निर्देशांची अंमलबजावणी करुन कामे करणे
१२) NGT (राष्ट्रीय हरीत लवाद) द्वारे आलेल्या माहिंतींची पुर्तता करणे
१३) MPCB (महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ) संबंधीत कामे करणे
१४) सफाई मित्र सुरक्षा चॅलेंज अंतर्गत शासनाकडुन वेळोवेळी प्राप्त झालेल्या निर्देशांची अंमलबजावणी करण्यात आली आहे व अनुषंगीक कामे करण्यात येत आहे

होणाऱ्या कामाबाबत व होणाऱ्या खर्चाबाबत मे. स्थायी समितीपुढे अहवाल सादर करण्यात आला असता मे.स्थायी समिती ठराव क्र.७१ दि.२४/९/२०२०अन्वये सदर प्रस्तावाचे अवलोकन करण्यात आले आहे.

त्यानुसार सद्यस्थितीत स्वच्छ सर्व्हेक्षण-२०२१ सुरु असुन राज्य शासनामार्फत माझी वसुंधरा अभियान राबविण्यात येत आहे.यावर धुळे मनपा मार्फत प्रभावीपणे अंमलबजावणी करुन धुळे मनपाचे मानांकन मिळविणे आवश्यक आहे. त्याकरीता खालील प्रमाणे सदर संस्थेकडुन माहे फेब्रुवारी-२०२१ ते सप्टेंबर-२०२१ पर्यंत कामे करुन घेणे आवश्य आहे. स्वच्छ

भारत अभियान अंतर्गत स्वच्छ सर्व्हेक्षण-२०२१,कचरा मुक्त शहर मानांकन ३ / ५ स्टार करीता अभिलेखे तयार करणे व शासनाच्या संकेस्थळावर माहिती भरणे व प्रसिध्द करणे.

१) शासनामार्फत प्राप्त होणाऱ्या निर्देशानुसार धुळे मनपाचे कर्मचारी यांना स्वच्छ सर्व्हेक्षण-२०२१ व माझी वसुंधरा अभियान अंतर्गत करावयाच्या कार्यवाही बाबत कर्मचारींना प्रशिक्षण देणे, त्याचे अभिलेखे तयार करणे व त्यांच्याकडुन कामे करवुन घेणे

२) मनपाचे मैला व्यवस्थापन करीता कृती आराखडा तयार करणे. As per CPEHO Norms to prepare schedule dsluding plant and FSSM Action plan अनुषंगीक कामे करणे

३) राष्ट्रीय हरीत लवाद कायद्या अंतर्गत NGT-६०६ व इतर घनकचरा अनुषंगीक कायद्यांचे अनुषंगाने शासनास वेळोवेळी माहिती देणे व त्याची कार्यवाही होत असल्याचा अहवाल शासनास सादर करणे.

४) महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळाचे व  घनकचरा अनुषंगीक कायद्यांचे अनुषंगाने शासनास वेळोवेळी माहिती देणे व त्याची कार्यवाही होत असल्याचा अहवाल शासनास सादर करणे.

५) सिंगल युज प्लास्टीक बंदी बाबत कृती आराखडा तयार करणे व त्याची प्रत्यक्षात अंमलजावणी होत आहे किंवा नाही याबाबत शासनास माहिती सादर करणे.

६) सफाई मित्र सुरक्षा चॅलेज बाबत प्रभावी अंमलबजावणी करुन शासनास होत असलेल्या कार्यवाहीची माहिती सादर करणे.

अखिल भारतीय स्थानीक स्वराज्य संस्था यांच्या उक्त संदर्भिय पत्रानुसार फेब्रुवारी-२०२१ सप्टेंबर - २०२१ या कालावधीत उक्त कामे करणार असल्याबाबत विनंती केली आहे.

त्यानुसार सदरचे कामे करुन घेणे धुळे मनपास करुन घेणे आवश्यक असल्याने अखिल भारतीय स्थानीक स्वराज्य संस्था यांच्याकडुन उक्त कामे करुन घेतल्यास मंजुर दर  प्रती महिना रु.२,५०,०००/- नुसार एकुण २०,००,०००/- खर्च येणार आहे. यापुर्वी जुन-२०२० ते जानेवारी-२०२१ चा खर्च हा १४ वा वित्त आयोगातुन भागविण्यात आला असुन पुढे येणारा खर्च रु.२०,००,०००/- खर्च १४ वा वित्त आयोगातुन करण्यास मान्यतेस्तव अखिल भारतीय स्थानीक स्वराज्य संस्था यांना कार्यादेश देण्यास अहवाल ठेवण्यात आल असता त्यावर मा. आयुक्त सो.ा. यांनी मा.लेखपाल यांचा अहवाल मागविणे बाबत कळविले होते.

लेखा विभागाचे अभिप्रायानुसार उक्त काम करणेकामी रु.२०,००,०००/- मात्र रु.२५,००,०००/- मात्र पेक्षा अधिकचा खर्च होणार असल्याने सदरचा विषय पुढील मान्यतेसाठी स्थायी समितीकडे पाठविणे उचित होईल असे मत आहे. सदर अहवाल मे. स्थायी समितीपुढे निर्णयार्थ सादर झालेला आहे.

उक्त कार्यालयीन अहवाल व सन्मा. सदस्यांनी केलेल्या चर्चेनुसार अखिल भारतीय स्थानिक स्वराज्य संस्था, नवी दिल्ली यांना माहे फेब्रुवारी-२०२१ सप्टेंबर - २०२१ या कालावधी मुदतवाढ देण्यांस व संभाव्य खर्चास  कार्यालयीन अहवालास अधिन राहून मान्यता देण्यांत येत आहे. याबाबत सदर प्रस्ताव व कार्यवाहीबाबत लेखा आक्षेप निर्माण होणार नाही याची दक्षता घ्यावी. याबाबतची जबाबदारी संबंधित विभागाची राहील. **सर्वानुमते मंजुर,**

सही/-x x x

**सभापती,**
**स्थायी समिती,**
**धुळे महानगरपालिका,धुळे**

| | |
|---|---|
| विषय क्रमांक:- १६ | विकास शुल्क निधी अंतर्गत 100 फूटी रस्ता ते अरिहंत भुवन नाल्यापावेतो गटार बांधणेकामी अंदाजित खर्च रु.34,64,111/-मात्रला प्रशासकीय मान्यता देणेबाबत आलेल्या कार्यालयीन अहवालावर विचार करणे. |
| म. नगरसचिव | नगरसचिव यांनी विषयांचे वाचन केले. |
| म.सुनील बैसाणे | मागील स्थायी समितीच्या सभेत विकास शुल्काबाबत खुलासा सादर करणार होतेतरी त्याचा खुलासा सादर करावा त्यांनी काय अहवाल उपस्थित केला आहे. |
| म.नगररचनाकार | विभागाकडे असलेल्या माहितीनुसार दिनांक२७ फेब्रुवारी पावेतो विकास शुल्काचा ऑफलाइन भरणार3,07,00797/-असून ऑनलाइन भरणा2,48,21,321असा एकूण5,61,47,118 विकास शुल्काचा भरणा आहे आणि सामान्य भरणा ऑफलाइन 32,08,914 ऑनलाइन भरणा38,77,815असा एकूण70,87,764 मात्र आहे असा एकूण भरणा 6,32,35,883 फेब्रुवारी अखेर पर्यंतचा आहे |
| म.सुनील बैसाणे | याबाबत लेखापाल श्री नाईक यांनी खुलासा करावा परदेशी सो. सगितलेली माहिती बरोबर आहे का आपण या ठिकाणी निविदा प्रक्रिया केलेली आहे ती बरोबर आहे का? |
| म. लेखापाल | आजच्या स्थितीत 3 कोटी डिपॉझीट असून आपल्याकडे 3,07,22,724 भरणा कॅश बुकला दिसत आहे. |
| म.सुनील बैसाणे | शिंदे साहेब आपल्या विभागामार्फत विकास शुल्क अंतर्गत निविदा प्रक्रिया प्रकाशित झालेले आहेत आपल्याकडे सात कोटी मात्र विकास शुल्काचा भरणा झालेला आहे व त्या अंतर्गत १७ कोटी च्या निविदा प्रक्रिया झालेले आहेत तसेच संगणक लिपिक सागर जकातदार यांच्याकडे ही काही निविदा प्रक्रिया प्रलंबित आहेत जर सात कोटी शिल्लक आहे तर आपण १७ ते १८ कोटी चे देयकांची दायित्व शिकणार आहोत का दायित्व स्वीकारत असताना त्यांना देयके देणे बंधनकारक आहे ते देखी कोणत्या निधीतून व कशा प्रकारे दिले जाणार याची माहिती मिळावी. |
| म.अभियंता | आपण सद्यस्थितीत सात कामांची निविदा विकास शुल्क अंतर्गत काढलेली आहे त्याची किंमत रु.5,20,80,121/- इतकी आहे आपण मागच्या वेळेस जो मुद्दा उपस्थित केलेला होता व या निविदा झालेले आहेत त्याची माहिती नगर सचिव व सभापती महोदयाकडे दिलेली आहे त्यानुसार प्रक्रिया झालेली आहे व विकास शुल्काबाबत माहिती लेखा विभागाकडे उपलब्ध आहे आपण जमा होणाऱ्या विकास शुल्कातून टप्प्याटप्प्याने निविदा प्रक्रिया करणार आहोत. |
| म.सुनील बैसाणे | आपल्या निदर्शनास आणून देऊ इच्छितो की विकास शुल्क अंतर्गत आजही श्री सागर जकातदार यांच्याकडे निविदा प्रक्रिया प्रलंबित आहेत माझा विकास शुल्कातील होणाऱ्या विविध विकास कामांना विरोध नाही माझे म्हणणे आहे की आपल्याकडे जर सहा ते सात कोटी शिल्लक असताना आपण सतरा ते अठरा कोटींच्या निविदा प्रक्रिया का करतात मागे प्री बजेटच्या नावाने आपण सोळा कोटींचे निविदा प्रक्रिया केली या अगोदर एखाद्या कामासाठी तरतूद नसल्यावर आपण तरतूद नाही असा अभिप्राय लेखा विभागामार्फत देण्यात येतो व छोट्या छोट्या कामांनाही ब्रेक लागतो प्रशासकीय मंजुरी देताना आयुक्तांची मान्यता देताना जबाबदारी आहे या ठिकाणी खेदाने नमूद करावे लागते की विशिष्ट ठेकेदारांची बिले व कामांना मान्यता दिली जाते आपण या ठिकाणी विकास शुल्क अंतर्गत मान्यता देताना या गोष्टी तपासणे गरजेचे आहे. |
| म.सभापती | विकास शुल्कातील कामा संदर्भात माझे यापूर्वी आयुक्त साहेब यांच्याशी बोलणे झाले होते ज्याप्रमाणे आपल्याकडे विकास शुल्कातून निधी उपलब्ध होईल त्याप्रमाणे निविदा प्रक्रिया प्रसिद्ध केली जातील व तशाच पद्धतीने सदर प्रक्रिया राबवली जाईल आपण याबाबतीत लक्ष |

देणार आहोत. सदर प्रस्तावास सर्व सन्मा.सदस्यांच्या सहमतीने प्रशासकीय व आर्थिक मान्यता देण्यांत येत आहे.

**धुळे मनपा स्थायी समिती ठराव नं.१५दिनांक २५/३/२०२१**

विकास शुल्क निधी अंतर्गत100 फुटी रस्ता ते अरिहंत भुवन नाल्यापावेतो गटार करणे बाबत सन्मा. सदस्या.मदिना समशेर पिंजारी,पठाण हिना अस्लम,सदस्य मोमीन आसिफ इस्माईल यांनी मागणी केल्यानुसार उक्त कामाचा प्रस्ताव तयार करण्यात आला असून सदर कामास शासकीय दरसूची सन 2020-21नुसार अंदाजित रक्कम रु.34,64,111/-मात्र खर्च अपेक्षित आहे.100 फुटी रस्ता ते अरिहंत भुवन पर्यंतचा रस्ता धुळे शहर मंजूर विकास योजना आराखड्यानुसार अस्तित्वातील रस्ता दर्शविला असल्याने सदरचे काम विकास शुल्क निधी अंतर्गत करता येईल असे मा.नगररचनाकार यांनी अभिप्राय दिले आहे. उक्त प्रस्तावास प्रशासकीय मान्यता मिळणेसाठी मे.स्थायी समितीची मंजुरी घेणे आवश्यक आहे.त्यानुसार सदरचा प्रस्ताव प्रशासकीय मान्यता करिता मे.स्थायी समिती पुढे सादर झालेला आहे.

उक्त कार्यालयीन प्रस्ताव व सन्मा. सदस्यांनी केलेल्या चर्चेनुसार विकास शुल्क निधी अंतर्गत100 फुटी रस्ता ते अरिहंत भुवन नाल्यापावेतो गटार करणे कामी अंदाजित खर्च रु. 34,64,111/- मात्रला आर्थिक व प्रशासकीय मान्यता देण्यांत येत आहे. प्रशासनाने उपलब्ध होणा-या विकास शुल्कातंर्गत सदर कामी पुढील कार्यालयीन प्रक्रिया तांतडीने करावी.

**सर्वानुमते मंजुर,**

सही/-x x x

**सभापती,**

**स्थायी समिती,**

**धुळे महानगरपालिका,धुळे**

विषय क्रमांक:- १७ सन 2021-22 च्या विकास शुल्क निधी अंतर्गत धुळे शहर मनपा हद्दीत 100 फूटी रस्ता वैभवनगर ते चितोड नाका पावेतो रस्ता डांबरीकरण,रस्ता दुभाजक इत्यादी कामे करण्यासाठी अंदाजीत खर्च रु. 3,54,99,730/- मात्रला प्रशासकीय मान्यता देणेबाबत आलेल्या कार्यालयीन अहवालावर विचार करणे.

म. नगरसचिव नगरसचिव यांनी विषयांचे वाचन केले.

म.सभापती सर्व सन्मा.सदस्यांच्या सहमतीने व कार्यालयीन अहवालास अधिन राहून प्रशासकीय मान्यता देण्यांत येत आहे.

**धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर १६ दिनांक२५/३/२०२१**

सन्मा.नगरसेवक श्री.संजय सुधाकर जाधव, धुळे मनपा यांनी धुळे शहर हद्दीमध्ये 100 फुटी रस्ता वैभव नगर ते चितोड नाका विकास शुल्क अंतर्गत करण्याबाबत सुचविले आहे. त्याप्रमाणे धुळे मनपा नगररचना विभागामार्फत जमा होणाऱ्या विकास शुल्क रक्कमेतून सदरचे काम हे मंजूर शहर विकास योजने अंतर्गत डी.पी. रस्ता दर्शविलेला आहे.

सदरचा रस्ता हा शहरातील जमनागिरी रोड ते चितोड नाका पावेतो जोडण्यात येवू शकतो त्यामुळे शहरातील वाहतुकीचा प्रश्न सुटू शकेल तसेच इंधनाची देखील बचत सुद्धा होवू शकेल.

तरी सदर कामाची समक्ष पहाणी केली असता रस्ता डांबरीकरण, डीवायडर ई. कामे करण्यासाठी रु.3,54,99,730/- मात्रचा खर्च विकास शुल्क खात्या अंतर्गत पुढील जमा होणाऱ्या निधीतून सन 2021-22 या आर्थिक वर्षात अपेक्षित उत्पन्नातून करणेत येईल.

सर्व सन्मा.सदस्यांच्या सहमतीने व कार्यालयीन अहवालास अधिन राहून सदर कामाचे एस्टीमेट रु.3,54,99,730/- मात्र खर्चास आर्थिक व प्रशासकीय मान्यता देण्यांत येत आहे. सन 2021-22 याआर्थिक वर्षात जमा होणा-या विकास शुल्कातून सदर काम प्राधान्याने घेण्याबाबत कार्यवाही करावी व त्यानुसार आवश्यकतो निधी सदर कामासाठी वर्ग करण्यांत यावा.

**सर्वानुमते मंजुर,**

सही/-x x x

**सभापती,**

**स्थायी समिती,**

**धुळे महानगरपालिका,धुळे**

विषय क्रमांक:- १८ — धुळे मनपा मालकीचे गांडूळ खत प्रकल्प येथे साचलेला कचरा उचलून कंपोस्ट डेपो येथे वाहतूक करुन उंच धिग लावणेबाबत निविदा दर मागविण्यांत आलेले असून त्याबाबत वाटाघाटी अंती आलेल्या दरांस व खर्चास मान्यता देणेबाबत आलेल्या कार्यालयीन अहवालावर विचार करणे.

म. नगरसचिव — नगरसचिव यांनी विषयांचे वाचन केले.

म.श्री सुनील बैसाणे — या प्रकल्पावर मी सभापती पदाच्या तारखेची स्वतः भेट देऊन पाहणी केलेली आहे त्या ठिकाणी अनेक दिवसांपासून साचलेला कचरा तो मोठ्या प्रमाणात होता त्या कचऱ्याचे ढिगारे प्रचंड प्रमाणात होते त्यानुसार सदर निविदा प्रसिद्ध करण्यात आलेली होती या ठिकाणी आपण सदर कचऱ्याचे ढीग हटवण्यासाठी ३५ लाख रुपये ठोक रक्कम निश्चित केलेले आहे याबाबत मला अधिकाऱ्यांकडून खुलासा अपेक्षित आहे.

म.सहा.आरोग्याधिकारी — सर्वे नंबर ३०७ येथे गांडूळ खत प्रकल्प आहे त्या ठिकाणी बऱ्याच दिवसांपासून कचरा असलेला होता त्या ठिकाणी आपल्याला प्रोसेसिंग प्लांट उभा करायचा आहे त्या साठी टेंडर प्रोसेस करणे गरजेचे होते प्रोसेसिंग प्लांट बाबत शासनाकडून वारंवार विचारणा होत होती प्रोसेसिंग प्लांट अपूर्ण अवस्थेत असल्यामुळे मी निविदा प्रक्रिया बाबत बांधकाम विभागाची संपर्क साधलेला होता व त्या बाबतचे अंदाजपत्रक कशाप्रकारे तयार करता येईल याबाबत संबंधित ओव्हरसिअर यांच्याकडे संपर्क केला असता त्यांनी याबाबत कचऱ्याचे कोणत्याही प्रकारचे मूल्यमापन करता येणार नाही असे सांगितले आपण याबाबत ठोक रकमेवर कचरा उचलण्या संदर्भात दर मागवले होते यामध्ये ७५ लाख रुपये दर प्राप्त झाले होते परंतु हा दर जास्त वाटत असल्याने कचऱ्याचे प्रमाण पाहता आयुक्त साहेब यांच्याकडे याबाबत निगोसिएशन साठी बोलविण्यात आले होते सदर प्रस्ताव स्थायी समितीसमोर पाठवताना अभियंता यांचे अभिप्राय घेण्यात आलेले आहेत त्या ठिकाणी ड्रोन कॅमेरा ने चित्रीकरण केले व त्या अनुषंगाने वाटाघाटी अंती दर निश्चित करण्यात आले व ३५ लाख ठोक रक्कम निश्चित करण्यात आलेली आहे व हा प्रस्ताव स्थायी समितीसमोर ठेवण्यात आलेला आहे.

म.शितल नवले — याबाबत प्रशासनाचे अभिनंदन केले पाहिजे आपल्याला या कामात साधारणत:५०% डिस्काउंट मिळालेला आहे परंतु आपल्याला सदर कचऱ्याच्या ढीगाचे योग्य पद्धतीने व तांत्रिक पद्धतीने मोजमाप करता आले असते.जगात कोणतीही अशी गोष्ट नाही की ज्याचे अंतर किंवा मोजमाप घेतले जाऊ शकत नाही या ठिकाणी आपण अभ्यासपूर्वक प्रस्ताव सादर करावा.

म. सभापती — सर्व सन्मा. सदस्यांनी केलेल्या सुचना व कार्यालयीन अहवालास अधिन राहून प्रस्तावास मान्यता देण्यांत येत आहे.

**धुळे मनपा स्थायी समिती ठराव नं. १७ दिनांक २५/३/२०२१**

धुळे महानगरपालिका मालकीचे सि.स.नं.२०७ गांडुळखत प्रकल्प येथे जुने विंड्रोपॅडवर साचलेला कचरा आहे त्या परिस्थितीत उचलुन सि.स.नं.६१/६२ कंपोस्ट डेपो येथे वाहतुक करुन ऊंच ढिग लावणे बाबत ठोक रक्कमेवर ई-निविदा प्रसिध्द करण्यात आली होती.

त्यानुसार सर्वात कमी दर L-१श्री.आशिष एम.पटवारी यांचे ठोक रक्कमेचे रु.७५,००,०००/- प्राप्त झाले होते. तरी सदरचे दर हे जादाचे असल्याने त्यांना मा.आयुक्त सो. यांच्या दालनात दिनांक १५/३/२०२१ रोजी सकाळी ११.०० वा. दराबाबत समक्ष वाटाघाटी बोलविण्यास संदर्भ क्र.२ चे पत्र देण्यात आले होते.

तरी दिनांक १५/३/२०२१रोजीमा.आयुक्त सो. यांच्या दालनात निविदाधारक श्री.आशिष एम.पटवारी हे वाटाघाटीसाठी उपस्थित राहिले असता त्यांनी सदर कामाच्या दराबाबत वाटाघाटी अंती रु.३५,००,०००/- ठोक रक्कमेवर सर्व करां सहीत काम करण्यास संमती दर्शवीली आहे. त्यानुसार त्यांनी सदर दराने काम करणे बाबत उक्त संदर्भिय क्र.३ नुसार लेखी पत्र सादर केले आहे.

त्याअनुषंगाने सदर दरा बाबत बांधकाम विभागाकडुन तपासणी करुन अहवाल मागविण्यात आला असता मा.अभियंता सो. यांनी टिपणी क्र.११ मध्ये सदर कचऱ्याचे मोजमाप करुन एकुण अंदाजीत किंमत रु.३९,८१,५४५/- खर्च असुन १२% जी.एस.टी खर्च रु.४,७७,७८५/- असे धरुन एकुण रु.४४,३९,३३०/- मात्र अंदाजीत खर्च दिला आहे.

तरी उक्त अंदाजीत खर्चापेक्षा श्री.आशिष पटवारी यांनी वाटाघाटी अंती सादर केलेले रु.३५,००,०००/- ठोक रक्कमेवर सर्व करां सहीत सादर केलेले दर कमीने आहे.

श्री.आशिष पटवारी यांनी उक्त कामाकरीता रु.३५,००,०००/- ठोक रक्कमेवर सर्व करांसहीत सादर केलेले दर मंजुरीसाठी मे.स्थायी समितीपुढे सादर झालेला आहे.

सर्व सन्मा. सदस्यांनी केलेल्या सुचना व कार्यालयीन अहवालास अधिन राहून उक्त कामी वाटाघाटी अंती श्री. आशिष पटवारी यांच्या सर्व करासहीत रु. 35,00,000/- मात्र निश्चित झालेल्या दरांना महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम 73 नुसार मान्यता देण्यांत येत आहे.सदर प्रस्ताव व कार्यवाहीबाबत लेखा आक्षेप निर्माण होणार नाही याची दक्षता घ्यावी. याबाबतची जबाबदारी संबंधित विभागाची राहील. **सर्वानुमते मंजुर,**

सही/-x x x

**सभापती,**

**स्थायी समिती,**

**धुळे महानगरपालिका,धुळे**

विषय क्रमांक:- १९ — बांधकाम/पाणी पुरवठा विभागातील मानधन तत्वावरील कनिष्ठ अभियंता या संवर्गातील कर्मचा-यांना मुदतवाढ देणेबाबत आलेल्या कार्यालयीन अहवालावर विचार करणे.

म. नगरसचिव — नगरसचिव यांनी विषयांचे वाचन केले.

म.शितल नवले- — सभापती महोदय हा विषय मंजूर करावा आजचे कनिष्ठ अभियंता धुळे महानगरपालिकेत कार्यरत आहेत ते सर्व प्रशिक्षित झालेले आहेत आज त्यांच्यावर संपूर्ण विभागाचा कार्यभार सुरू आहे त्यांचे काम अतिशय योग्य प्रकारे सुरू आहे त्यामुळे त्यांना मुदतवाढ देणे गरजेचे आहे.या ठिकाणी रोजंदारी कर्मचाऱ्यांच्या दराबाबत एक प्रस्ताव प्रलंबित आहे सदर

प्रस्तावाबाबत ही तातडीने कार्यवाही करणे गरजेचे आहे आपण त्यांचा हा प्रस्ताव स्थायी समितीसमोर घेणे बाबत कार्यवाही करणे अपेक्षित आहे.या ठिकाणी अडीच महिने मुदतवाढ नमूद केलेले आहे परंतु त्यांच्या कामाचे स्वरूप लक्षात घेता त्यांना सहा महिने तरी मुदतवाढ द्यावी.

**म.अमीन पटेल** सदर नियुक्त मानधनावरील कनिष्ठ अभियंता हे मनपाचे हात आहेत त्यांना आजतागायत सहा महिन्यांनी मुदतवाढ दिलेली आहे परंतु त्यांचे एकंदरीत काम व सेवा लक्षात घेता त्यांना अकरा महिन्यांची मुदतवाढ देता आली तर फार योग्य राहील. तसेच त्यांना कायमस्वरूपी नियुक्ती देण्याबाबत शासन स्तरावर पाठपुरावा करावा अशी मी विनंती करतो.

**म.सुनिल बैसाणे** आयुक्त महोदयांनी अडीच महिने मुदतवाढ देणे बाबत अभिप्राय दिलेले आहेत. या ठिकाणी नमूद करावेसे वाटते की सर्वच मानधनावर चे कर्मचारी अतिशय प्रामाणिकपणे याठिकाणी आपली सेवा देत आहेत सुमारे पाच ते सात वर्षापासून हे कर्मचारी काम करीत आहेत. महानगरपालिकेत तांत्रिक अधिकारी व कर्मचाऱ्यांची कमतरता आहे. महानगरपालिकेतील कर्मचाऱ्यांची कमतरता विचारात घेऊन आपण येणाऱ्या काळामध्ये आपल्याला ज्या अडचणी येणार आहेत किंवा नियुक्ती देतांना कायदयानुसार नियुक्ती देणे आवश्यक आहे. त्यातून आपल्याला कर्मचाऱ्यांची नियुक्ती करावयाची असेल तर कशा पद्धतीने करता येईल याबाबत काही उपाययोजना आपल्याकडे आहेत का याचा सर्वंकष विचार करावा व सदर कर्मचाऱ्यांना आवश्यकतेनुसार मुदतवाढ देणे योग्य राहील.

**म. नागसेन बोरसे** माननीय सभापती महोदय आपल्याला वेळोवेळी कायद्याची भीती दाखवली जाते आपल्याला स्थायी समितीला अधिकार आहेत. अडीच महिन्याच्या आत आपले आउटसोर्सिंग चे काम पूर्ण होणार नाही आउटसोर्सिंग मार्फत कर्मचारी भरणे असा आयुक्तांच्या विकार आहेत या मानधनावरील अभियंत्यांना सहा महिने मुदतवाढ देण्यास आमची कोणती हरकत नाही आपण त्यांच्याकडून आज काम करून घेत आहोत. व ते योग्य प्रकारे काम करीत आहेत. सहा महिन्याची मुदतवाढ देण्यास काही हरकत नाही आपण हा विषय मंजूर करावा.

**म. उपायुक्त** आपल्या महानगरपालिकेत अभियंत्यांची २३ पदे मंजूर आहेत परंतु सध्या तीन पदे भरलेली आहेत व दिसत आहेत २० पदे रिक्त आहेत तसेच विद्युत अभियंत्यांची चार पदे मंजूर आहेत एक पद भरले आहे.म्हणून आपल्याला मानधनावर आज स्थापत्य अभियंता आणि दोन इलेक्ट्रिक अभियंता लागणार आहे सदर विषय बऱ्याच वर्षापासून सुरू आहे वेळोवेळी यांना यापूर्वी मुदतवाढ देण्यात आलेले आहेत परंतु जर पद रिक्त असल्याने ते पद भरण्यासाठी एक तर सेवा प्रवेश नियमावली नुसार सदर पद भरणे गरजेचे आहे किंवा आउटसोर्सिंग द्वारे सदर पदे भरणे गरजेचे आहे त्यामुळे अनेकदा अनफेअर लेंबर प्रॅक्टिस मुळे न्यायालयीन प्रकरणे निर्माण होतात आयुक्त साहेब त्यांनी त्यांच्या अभिप्रायात बाहय यंत्रणेद्वारे भरती करण्याची तात्विक मान्यता दिलेली आहे व आमच्या स्तरावर तसा प्रस्ताव तयार करण्यात येत आहे आम्ही कामगार कार्यालयाकडून स्किल लेबर व अनस्किल लेबर यांचे दर मागून घेत आहोत आणि त्यानंतर पुढची प्रक्रिया होणार आहे दुसरा एक मुद्दा आपण उपस्थित केला होता की मुदतवाढ अकरा महिन्यांचे द्यावी त्यामध्ये आपण एन.यु.एल.एम.च्या कर्मचा-याना नगरपालिका संचालनालयाच्या आदेशाने अकरा महिन्यांची मुदतवाढ दिली जाते त्या व्यतिरिक्त अकरा महिन्यांची मुदतवाढ दिलेली नाही.

**म. शितल नवले-** आपल्या म्हणण्याप्रमाणे आज ते २३ पदे आपल्याकडे मंजूर आहेत व त्या पैकी १९ पदे स्थापत्य अभियंता म्हणून रिक्त दिसत आहेत माझे म्हणणे असे आहे की शहराचा विस्तार व गरज लक्षात घेता सर्व पदे भरून घ्या आपल्याला पाणीपुरवठ्याच्या अनेक अडचणी येतात. व

कामातही अनेक समस्या निर्माण होत आहेत नवीन प्रक्रिया केली व नवीन नियुक्ती केली तर नवीन कर्मचाऱ्यांना शहरातले हॉल देखील सापडणार नाहीत त्यामुळे आजी अभियंता काम करीत आहेत ते रात्री अकरा अकरा वाजेपर्यंत काम करतात. आज २००००रुपये महिना पगारावर कोणीही काम करत नाही परंतु आज हे अभियंता आपल्याकडे काम करीत आहेत त्यांना जर अकरा महिने मुदतवाढ देता येत असेल तर ती जरूर द्यावी.

म.नागसेन बोरसे आपण मुदतवाढ देताना पाच दिवसाची सेवा खंडित करतो म्हणजे आपण त्यांची सेवा खंडीत करतो त्यामुळे नियमाप्रमाणे ते न्यायालयात जाऊ शकत नाही आणि आपण आणि अनफेअर लेबर प्रॅक्टिसची काळजी करू नये आपण यापूर्वी जाहिरात देऊन अर्ज देखील मागवले होते त्याची छाननी बाकी आहे त्यांना आपण त्यामध्ये प्राधान्यक्रमाने मुलाखत घेऊन नियुक्ती देऊ शकतो त्यामुळे सद्यस्थितीत सहा महिने मुदतवाढ देण्यास हरकत नाही तरी हा विषय मंजूर करावा.

म. सभापती सर्व सन्मा. सदस्यांच्या सुचना लक्षांत घेवून व कामाची निकड लक्षांत घेता सदर कर्मचा-यांना 6 महिने मुदतवाढ देण्यांत येत आहे.इतर प्रक्रिया प्रशासनाने पूर्ण करावी.

**धुळे मनपा स्थायी समिती ठराव नं. १८ दिनांक २५/३/२०२१**

बांधकाम / पाणीपुरवठा विभागातील मानधन तत्वारील खालील कर्मचारी यांना मे. स्थायी समिती ठराव क्र. ७७ दि. २९/०८/२०१९ अन्वये तसेच जा क्र /धुमपा/आस्था २८५९ दि १८/०९/२०२० नुसार ०६ महिने कालावधी करीता क. अभियंता या पदवार एकत्रित मानधन रुपये २०,०००/- मात्र ने नियुक्ती देण्यात आली होती. सदर नियुक्तीची मुदत दि ०९/०३/२०२१ रोजी संपलेली आहे.

| अ क्र | कर्मचा-याचे नाव | पदाचे नाव | नेमणुक दिलेल्या विभागाचे नांव |
|---|---|---|---|
| १ | पाटील वर्षा गंगाधर | कनिष्ठ अभियंता | बांधकाम / पाणीपुरवठा विभाग |
| २ | कु.चंदाबी शेख जाफर शेख | कनिष्ठ अभियंता | बांधकाम / पाणीपुरवठा विभाग |
| ३ | शिंदे प्रणव किशोर | कनिष्ठ अभियंता | बांधकाम / पाणीपुरवठा विभाग |
| ४ | मयुर राजेंद्र निकम | कनिष्ठ अभियंता | बांधकाम / पाणीपुरवठा विभाग |
| ५ | टकले निखील अशोक | कनिष्ठ अभियंता | बांधकाम / पाणीपुरवठा विभाग |
| ६ | भुषण मनोज ढवळे | कनिष्ठ अभियंता | बांधकाम / पाणीपुरवठा विभाग |
| ७ | मोहनिष दिलीप पाटील | कनिष्ठ अभियंता | बांधकाम / पाणीपुरवठा विभाग |
| ८ | स्वप्नील सुनिल थोरात | कनिष्ठ अभियंता | बांधकाम / पाणीपुरवठा विभाग |
| ९ | पाटील अक्षय राजेंद्र | कनिष्ठ अभियंता | बांधकाम / पाणीपुरवठा विभाग |
| १० | ठाकरे पराग प्रदिप | कनिष्ठ अभियंता | विद्युत विभाग |
| ११ | गितेश दिलीप सोनार | कनिष्ठ अभियंता | विद्युत विभाग |

म.अभियंता यांचे अहवालात सदरचे मानधन तत्वावरील सिव्हील अभियंता हे बांधकाम विभाग, पाणी पुरवठा विभाग, नगररचना विभाग व विद्युत विभाग इत्यादी विभागात कार्यरत असून सदर क.अभियंता यांच्या कडून स्वच्छ भारत अभियानां अतर्गत वैयक्तिक शौचालयाचे, स्वच्छ सर्वेक्षण २०२० सिटीझन फिडबॅक, सार्व. शौचालयाचे दुरूस्तीचे काम तसेच शासकीय योजना अंतर्गत होणाऱ्या तसेच मनपा निधी अंतर्गत होणाऱ्या कामांचे अंदाजपत्रक तयार करणे,साईट सुरपव्हिजन करणे, पाणीपुरवठा वितरण व्यवस्था सांभाळणे, अतिक्रमणाची पाहणी करणे व अतिक्रमण निष्कासित करत असतांना प्रत्यक्ष जागेवर थांबणे

व विद्युत विभागात अंदाजपत्रक तयार करणे अशी महत्वाची कामे या कर्मचाऱ्याकडून करण्यात येत असलेबाबत नमुद केले आहे.

तरी वरील कर्मचारी हे मानधन तत्वावरील कनिष्ठ अभियंता संवर्गातील असल्याने त्यांना नवीन मानधनावरील क.अभियंता यांची भरती प्रक्रिया पूर्ण होईपावेतो नियुक्तीचा कालावधी संपुष्टात आल्याच्या दिनांकापासून ०५ दिवसाचा सेवा खंड करुन रु.२०,०००/- मात्र एकत्रित मानधनावर ०६ महिने कालावधीकरीता फेर नियुक्ती देणेबाबत मे. स्थायी समिती पुढे ठेवणेस मा. आयुक्त सो यांचेकडेस प्रस्ताव सादर केला असता, यावर मा.आयुक्त सो.यांनी याबाबत अडीच महिने कालावधीसाठी मुदतवाढ देणेबाबत शिफारस केली असून सदर मुदतीत बाहय यंत्रणेमार्फत अभियंता / इतर कर्मचारी घेणेबाबत कार्यवाही करणेबाबत आदेशित केलेले आहे. त्यानुसार सदर प्रस्ताव मे. स्थायी समितीपुढे सादर झाला आहे.

सर्व सन्मा. सदस्यांच्या सुचना लक्षांत घेवून व कामाची निकड लक्षांत घेता सदर कर्मचा-यांना 6 महिने मुदतवाढ देण्यांत येत आहे.इतर प्रक्रिया प्रशासनाने पूर्ण करावी. याबाबत सदर प्रस्ताव व कार्यवाहीबाबत लेखा आक्षेप निर्माण होणार नाही याची दक्षता घ्यावी. याबाबतची जबाबदारी संबंधित विभागाची राहील. **सर्वानुमते मंजुर,**

सही/-x x x

**सभापती,**
**स्थायी समिती,**
**धुळे महानगरपालिका,धुळे**

# धुळे महानगरपालिका,धुळे

## नगरसचिव कार्यालय

## स्थायी समिती सभा क्रमांक ६ चे इतिवृत्त

---

**धुळे मनपा भारतरत्न अटलबिहारी वाजपेयी सभागृह**
**गुरुवार दिनांक ०१/०४/२०२१**
**वेळ :- सकाळी ११-०० वाजता.**

धुळे महानगरपालिका स्थायी समितीची साप्ताहिक सभा आज गुरुवार दिनांक ०१/०४/२०२१ रोजी सकाळी११-०० वाजता **मा.श्री संजय सुधाकर जाधव, सभापती,** स्थायी समिती, मनपा, धुळे यांच्या अध्यक्षतेखाली **धुळे मनपा भारतरत्न अटलबिहारी वाजपेयी सभागृह** भरली. स्वाक्षरी बुकावर सही करुन खालील सन्मा.सदस्य सभागृहात हजर होते.

| अ.क्रं. | सदस्यांचे नांव | हुद्दा |
|---|---|---|
| १ | श्री. जाधव संजय सुधाकर | सभापती |
| २ | श्री. वैसाणे सुनिल तुळशिराम | सदस्य |
| ३ | श्रीमती माळी भारती अशोक | सदस्या |
| ४ | श्रीमती पाटील मंगला सुरेश | सदस्या |
| ५ | श्री. मासुळे अमोल पावबा | सदस्य |
| ६ | श्री. देवरे कमलेश नारायण | सदस्य |
| ७ | श्रीमती पठाण हिना अस्लम | सदस्या |
| ८ | श्री. नवले शितल मोहन | सदस्य |
| ९ | श्री. बोरसे नागसेन दामोदर | सदस्य |
| १० | श्रीमती कुलेवार किरण राकेश | सदस्या |
| ११ | श्रीमती. वराडे वैशाली भिकन | सदस्या |
| १२ | श्री. जाधव बन्सीलाल माणिक | सदस्य |
| १३ | श्रीमती चौधरी मंगला अर्जुन | सदस्या |
| १४ | श्री. पटेल अमीन अब्दुल करीम | सदस्य |

उपस्थित अधिकारी गण

| अ.क्र. | अधिकाऱ्यांचे नाव | हुद्दा |
|---|---|---|
| १ | श्रीमती शिल्पा नाईक | उपायुक्त |
| २ | श्री. शांताराम गोसावी | उपायुक्त |
| ३ | श्री. तुषार नेरकर | सहा. आयुक्त |
| ४ | श्री. विनायक कोते | सहा. आयुक्त |
| ५ | श्री. महेंद्र परदेशी | नगररचनाकार |
| ६ | श्री मनोज अरविंद वाघ | प्र.नगरसचिव |
| ७ | श्री. के.एन. शिंदे | अभियंता |
| ८ | डॉ. श्री महेश मोरे | आरोग्याधिकारी |
| ९ | श्री. चंद्रकांत जाधव | सहा.आरोग्याधिकारी |

| | | |
|---|---|---|
| १० | श्री. लक्ष्मण पाटील | सहा.आरोग्याधिकारी |
| ११ | श्री. पी.डी नाईक | लेखापाल |
| १२ | श्री.आर.बी.. सोनवणे | प्र. परवाना अधिक्षक |
| १३ | श्री. बी.एस. रनाळकर | प्र. सहा.कर मूल्य निधारण अधिकारी |
| १४ | श्री. एन.के. बागुल | विद्युत अभियंता |
| १५ | श्री. पी.डी. चव्हाण | ओव्हरसिअर बांधकाम |
| १६ | श्री. सी.सी. बागुल | पा. पु. ओव्हरसिअर |
| १७ | श्री. हेमत पावटे | ओव्हरसिअर बांधकाम विभाग |
| १८ | श्री.एस.एन. देसले | लिपीक मनपा शिक्षण मंडळ |
| १९ | श्रीमती कल्पना जाधव | अभिलेखापाल |
| २० | श्री. किशोर सुडके | बाजार विभाग |
| २१ | श्री. प्रसाद जाधव | अति. विभाग |
| २२ | श्री. सुक्राम आत्या राऊत | वाहन विभाग लिपीक |

म.सभापती सर्व उपस्थित सन्मा.सदस्य उपायुक्त सो. अधिकारी वर्ग छायाचित्रकार बांधव सभेचे कामकाज चालविणेसाठी आवश्यक तो कोरम पूर्ण झाल्याने नगरसचिव यांनी सभेचे कामकाज सुरुवात करावी.

म. नगरसचिव वंदे् मातरम् या राष्ट्रवंदनेसाठी सर्वांनी उभे रहावे.

सभेच्या सुरुवातीस सन्मा. सदस्यांकडून आलेले रजेचा अर्ज.

सन्मा. सदस्य श्री.सईद बेग हाशम बेग यांनी आजच्या सभेस अर्जात नमूद केलेल्या कारणामुळे उपस्थित राहू शकत नसल्याने रजा मंजूर करणेबाबत विनंती अर्ज सादर केलेला आहे.

म. सभापती सन्मा. सदस्यांच्या विनंती अर्जानुसार आजच्या सभेस रजा मंजूर करण्यांत येत आहे.

**धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर १९ दिनांक१/४/२०२१**

सन्मा. सदस्य श्री.सईद बेग हाशम बेग यांनी आजच्या सभेस अर्जात नमूद केलेल्या कारणामुळे उपस्थित राहू शकत नसल्याने रजा मंजूर करणेबाबत विनंती अर्ज सादर केलेला आहे.

सन्मा.सदस्यांच्या विनंती अर्जानुसार आजच्या सभेस रजा मंजूर करण्यांत येत आहे.

**सर्वानुमते मंजुर,**
**सही/-x x x**
**सभापती,**
**स्थायी समिती,**
**धुळे महानगरपालिका,धुळे**

विषय क्रमांक:- २० प्रभाग क्रं. 10 वरखेडी रोड येथे माऊलीनगर मध्ये पाणीपुरवठयाची पाईप लाईन टाकण्यांचे काम तांतडीने करुन घेण्यांत आलेत,त्यासाठी झालेला खर्च रु.3,47,590/- मात्रला कार्योत्तर मान्यता देणेबाबत आलेल्या कार्यालयीन अहवालावर विचार करणे.

म.नगरसचिव नगरसचिव यांनी विषयांचे वाचन केले.

म.शितल नवले विषय मंजूर करण्यांत यावा.

म.नागसेन बोरसे विषय मंजूर करण्यांत यावा.

म.सभापती सर्व सन्मा. सदस्यांच्या सहमतीने व कार्यालयीन अहवालास अधिन राहून सदर प्रस्तावास कार्योत्तर मान्यता देण्यांत येत आहे.

**धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर २० दिनांक १/४/२०२१**

प्रभाग क्र.10वरखेडीरोड येथे माऊली नगरमध्येआपल्याकडील आदेशा नुसार रस्त्याचे काम सुरु करण्यात आलेले असुन सदर ठिकाणी काहि भागात पाणीपुरवठा करणारी पाईपलाईनच नसल्याने नविन करण्यात येतअसलेला रस्ता नळ कनेक्शन घेण्यासाठी परत रस्त्याचे खोदकाम होऊ शकते

त्यामुळे मनपाचे नुकसान होण्याची शक्यता नाकारता येत नाही त्याकरीता सदर भागामध्ये तातडीने पाण्याची पाईपलाईन टाकणे अत्यंत गरजेचे असल्याने सदर भागात समक्ष पाहणी करून अंदाजपत्रक तयार केलेअसता उक्त कामी अंदाजपत्रकीय खर्च रु. 3,47,590/- मात्र येणार आहे.

तरी उक्त काम हे नागरिकांचा पिण्याचा पाणीचा प्रश्नाशी निगडीत असल्याने सदरचे काम विनानिविदा श्री. संजय दगडु गायकवाड, ठेकेदार, धुळे यांचेकडुन करून घेण्यात आलेले असून सदरचे काम मुंबई प्रांतिक अधिनियमनियम 5(2) (2) अन्वये विनानिविदा कार्योत्तर मंजुरीसाठी व अंदाजपत्रकीय खर्च रु.3,47,590/ मात्र खर्चास जा.क्र. 482 दि.26/03/2021 अन्वये मा. आयुक्त सो. यांनी प्रशासकिय मान्यता दिलेली आहे. तसेच उक्त बाबत कार्योत्तर मंजुरीसाठी मे. स्थायी समितीपुढे मंजुरीसाठी सादर झालेला आहे.

सर्व सन्मा. सदस्यांच्या सहमतीने व कार्यालयीन अहवालास अधिन राहून सदर कामी झालेला खर्चास कार्योत्तर मान्यता देण्यांत येत आहे. सदर प्रस्ताव व कार्यवाहीबाबत लेखा आक्षेप निर्माण होणार नाही याची दक्षता घ्यावी. याबाबतची जबाबदारी संबंधित विभागाची राहील.

**सर्वानुमते मंजुर,**
**सही/-x x x**
**सभापती,**
**स्थायी समिती,**
**धुळे महानगरपालिका,धुळे**

विषय क्रमांक:- २१ — प्रगभाग क्रं.15 येथे पिण्याच्या पाण्याची आवश्यकता असल्याने पाईप लाईप टाकण्यांचे काम तांतडीने करण्यांत आले असून त्यासाठी झालेला खर्च रु.17,38,803/- मात्रला कार्योत्तर मान्यता देणेबाबत आलेल्या कार्यालयीन अहवालावर विचार करणे.

म.नगरसचिव — नगरसचिव यांनी विषयांचे वाचन केले.

म.शितल नवले — विषय मंजूर करण्यांत यावा.

म.अमोल मासुळे — विषय मंजूर करण्यांत यावा.

म.सभापती — सर्व सन्मा.सदस्यांच्या सहमतीने व कार्यालयीन अहवालास अधिन राहून सदर प्रस्तावास कार्योत्तर मान्यता देण्यांत येत आहे.

**धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर २१ दिनांक १/४/२०२१**

धुळे मनपा हद्दीतील प्रभाग क्र. 15 मधील देसले ते गोळीबार टेकडी पुलापावेतो व MSEB पतपेढी ते हेरंभ अपार्टमेंट पावेतो भागात राहत असलेल्या नागरिकांना पिण्याचे पाणीसाठी पाईप लाईनची सोय नसल्याने सदरचा भागात पाईप लाईन टाकणे आवश्यक आहे असे संदर्भीय पत्रान्वये कळविले आहे.तरी सदरचा भागात समक्ष पहाणी करून 4" व 6"पाईप लाईन टाकणे कामी अंदाजपत्रक तयार केले असता उक्त कामी अंदाजपत्रकीय खर्च रु.17,38,803/-मात्र येणार आहे.

उक्त काम हे नागरिकांचा पिण्याचा पाणीचा प्रश्नाशी निगडीत असल्याने सदरचे काम विना निविदा श्री.नागसेन लेबर मजूर सोस.. ठेकेदार, धुळे यांचे कडून करून घेण्यात आलेले असून सदरचे काम मुंबई प्रांतिक अधिनियम नियम 5(2) (2) अन्वये विना निविदा करण्यास मंजुरीसाठी व अंदाजपत्रकीय खर्च रु.17,38,803/-मात्र खर्चास कार्योत्तर मंजुरीस्तव मे. स्थायी समितीपुढे मंजुरीस्तव सादर झालेला आहे. सर्व सन्मा.सदस्यांच्या सहमतीने व कार्यालयीन अहवालास अधिन राहून सदर कामी झालेला खर्चास कार्योत्तर मान्यता देण्यांत येत आहे. सदर प्रस्ताव व कार्यवाहीबाबत लेखा आक्षेप निर्माण होणार नाही याची दक्षता घ्यावी. याबाबतची जबाबदारी संबंधित विभागाची राहील.

**सर्वानुमते मंजुर,**
**सही/-x x x**
**सभापती,**
**स्थायी समिती,**
**धुळे महानगरपालिका,धुळे**

विषय क्रमांक:- २२ — प्रभाग क्र.१७ मधील सुलभ शौचालय साफसफाई व देखभाल दुरुस्तीचे बिल अदा करणे बाबत आलेल्या कार्यालयीन अहवालावर विचार करणे.

म.नगरसचिव — नगरसचिव यांनी विषयांचे वाचन केले.

म.शितल नवले — विषय मंजूर करण्यांत यावा.

म.अमोल मासुळे — विषय मंजूर करण्यांत यावा.

म.सभापती — सर्व सन्मा. सदस्यांच्या सहमतीने व कार्यालयीन अहवालास अधिन राहून सदर प्रस्तावास मान्यता देण्यांत येत आहे.

**धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर २२ दिनांक १/४/२०२१**

संदर्भिय क्र.१ ठरावान्वये व २ च्या कार्यादेशानुसार प्रभाग क्र.१७मधील रंगारी चाळ येथील १० सिट सुलभ शौचालय साफसफाई देखभालदुरुस्तीसाठी दि.१/२/२०२१ पासुन श्रमीक स्वयंरोजगार सेवा सह.संस्था यांना देण्यात आले आहे.

सदरचे शौचालय हे माहे ऑगस्ट-२०१९ पासुन त्या भागातील सन्मा. नगरसेवक यांच्या सुचनेनुसार व स्वच्छ सर्व्हेक्षण-२०१९ अंतर्गत सुरु करणे आवश्यक असल्याने सदरचे शौचालय विना मोबदला काम केल्याने माहे ऑगस्ट-२०१९ ते जानेवारी-२०२१ असे एकुण १८ महिन्याचे बिलाची मागणी उक्त संस्थेने केली आहे.

उक्त संदर्भिय क्र.१ ठरावानुसार सदर संस्थेने मागील कालावधीत शौचालय देखभाल दुरुसतीचे काम योग्य प्रकारे केले असेल तर त्यांच्या नियमाप्रमाणे मोबदला देण्यासाठी आवश्यक ती पुर्तता व कार्यालयीन कार्यवाही करण्यात यावी व त्याप्रमाणे कार्योत्तर मान्यतेसाठी मे.स्थायी समितीपुढे प्रस्ताव सादर करणे बाबत निर्देश दिले आहे.

तरी सदरच्या ठरावानुसार संबंधीत स्वच्छता निरीक्षक यांनी दिलेल्या अहवालानुसार सदर शौचालय हे माहे ऑगस्ट-२०१९ मध्ये त्या भागातील सन्मा.नगरसेवक यांच्या मागणी नुसार व स्वच्छ सर्व्हेक्षण-२०१९ अंतर्गत कार्यवाही करणे गरजेचे असल्याने सदरचे शौचालय श्रमीक स्वयंरोजगार सेवा सह.संस्था यांना तोंडी आदेशानुसार साफसफाई देखभाल दुरुसतीचे काम चांगल्या प्रकारे केले असुन त्यानुसार सदर संस्थेचे माहे माहे ऑगस्ट-२०१९ ते जानेवारी-२०२१ पावेतो खालील प्रमाणे बिल होत आहे.

| अ.क्र. | माहे | मासिक रक्कम |
|---|---|---|
| १. | ऑगस्ट-२०१९ | १०४५० |
| २. | सप्टेंबर-२०१९ | १०४५० |
| ३. | ऑक्टोबर-२०१९ | १०४५० |
| ४. | नोव्हेंबर-२०१९ | १०४५० |
| ५. | डिसेंबर-२०१९ | १०४५० |
| ६. | जानेवारी-२०२० | १०४५० |
| ७. | फेब्रुवारी-२०२० | १०४५० |
| ८. | मार्च-२०२० | १०४५० |
| ९. | एप्रिल-२०२० | १०९२२ |
| १०. | मे-२०२० | १०९२२ |
| ११. | जुन-२०२० | १०९२२ |
| १२. | जुलै-२०२० | १०९२२ |
| १३. | ऑगस्ट-२०२० | १०९२२ |
| १४. | सप्टेंबर-२०२० | १०९२२ |
| १५. | ऑक्टोबर-२०२० | १०९२२ |
| १६. | नोव्हेंबर-२०२० | १०९२२ |
| १७. | डिसेंबर-२०२० | १०९२२ |
| १८. | जानेवारी-२०२१ | १०९२२ |

| | |
|---|---|
| **एकुण** | **१९२८२०** |

सदरचे दर हे ऑगस्ट-२०१९ ते मार्च-२०२० पर्यंत जा.क्र./धुमपा/आरोग्य/८० दि.९/५/२०१९ नुसार १० सिट करीता प्रती माह रु.१०,४५०/-व तसेच माहे एप्रिल-२०२० ते जानेवारी-२०२१ पर्यंत जा.क्र./ धुमपा/आरोग्य/ ५८ दि.४/६/२०२० नुसार १० सिट करीता प्रती माह रु.१०,९२२/- लागु करण्यात आले आहे.

तरी श्रमीक स्वयंरोजगार सेवा संस्था यांनी माहे ऑगस्ट-२०१९ ते जानेवारी-२०२१ विना मोबदला काम केल्याने उक्त स्थायी समिती ठरावानुसार एकुण बिल रु.१,९२,२८०/- बिल अदा करण्यास मे. स्थायी समितीपुढे मान्यतेसाठी सादर करण्यास मा.आयुक्त सो.यांनी मान्यता दिली आहे त्यानुसार सदरचा विषय मे.स्थायी समितीपुढे मान्यतेस्तव सादर झालेला आहे.

सर्व सन्मा. सदस्यांच्या सहमतीने व कार्यालयीन अहवालास अधिन राहून श्रमीक स्वयंरोजगार सेवा संस्था यांनी माहे ऑगस्ट-२०१९ ते जानेवारी-२०२१ विना मोबदला काम केल्याने एकुण बिल रु.१,९२,२८०/- बिल अदा करण्यास मान्यता देण्यांत येत आहे. सदर प्रस्ताव व कार्यवाहीबाबत लेखा आक्षेप निर्माण होणार नाही याची दक्षता घ्यावी. याबाबतची जबाबदारी संबंधित विभागाची राहील.

**सर्वानुमते मंजुर.**
**सही/-x x x**
**सभापती,**
**स्थायी समिती,**
**धुळे महानगरपालिका,धुळे**

विषय क्रमांक:-२३ — मे.आर.जगताप ॲण्ड असोसिएट कन्सल्टं ॲण्ड इंजिनीयरींग सर्व्हिसेस,नागपुर यांचेकडून घनकचरा संकलन व वाहतूक करण्याकामी प्रारुप निविदा व मुल्यमापन अहवाल तयार करण्यांत आलेला असून त्यासाठी झालेला खर्च रु.5,93,000/- मात्रला कार्योत्तर मंजुरी देणेबाबत आलेल्या कार्यालयीन अहवालावर फेर विचार करणे.

म. नगरसचिव — नगरसचिव यांनी विषयांचे वाचन केले.

म. शितल नवले — मी यापूर्वी देखील सांगितले होते की त्यांचे बिल देण्यांत यावे. याबाबत विभागाने संक्षिप्त अहवाल सादर केलेला आहे.

म. सुनिल बैसाणे — निविदेतील अटी शर्ती तपासणे आवश्यक आहे. पुनश्च आपणाला मागील प्रमाणे त्रास व अडचण होणार नाही यांची दक्षता घेणेत यावी. व त्याबाबत विभागाने नवीन निविदा अटी शर्ती बाबत माहिती द्यावी.

म. शितल नवले — याठिकाणी आधीच विभागाने माहिती सादर केलेली आहे व ती आपणास वितरीत करण्यांत आली आहे.त्यामुळे नवीन निविदा धारकाच्या दर मंजुरीच्या आधी आपण या सर्व बाबी तपासणार आहोत. त्यामुळे आता वेळ घालविणे योग्य नाही. संबंधित संस्थेने चांगले काम केलेले आहे प्रस्ताव मान्य करणेस हरकत नाही.

म.सभापती — सर्व सन्मा. सदस्यांच्या सहमतीने व कार्यालयीन अहवालास अधिन राहून सदर प्रस्तावास कार्योत्तर मान्यता देण्यांत येत आहे.

**धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर २३ दिनांक १/४/२०२१**

घनकचरा संकलन व वाहतुक करण्याकामी निविदा तयार करण्यासाठी सादर केलेल्या प्रस्तावानुसार संदर्भ क्र.२ अन्वये धुळे महानगरपालिकेच्या निविदा तयार करण्याकामी प्रस्तावास मंजुरी देण्यात आली आहे.ज्यामध्ये Door to Door Collection Transportation of segregated solid waste Construciton & Demolition Waste and Silt From Drain and Nalla Cleaning of Dhule City upto processing Site Directly of through Collectionn Point (या कामाचे निविदा मसुदा तयार करणे,अटी शर्ती,अंतीम निविदा कागदपत्रे जमा करणे,पुर्व निविदा मिटींग सभा इ. करीता ) खालील काम करणेकामी आर.जगताप ॲण्ड असोसिएट कन्सल्टं ॲण्ड इंजिनीयरींग सर्व्हिसेस,नागपुर यांनी दर सादर केले असता वाटाघाटीअंती खालील कामारीता दर सादर करुन कार्यादेश देण्यात आला आहे.

| अ.क्र. | तपशिल | रक्कम |
|---|---|---|
| १ | प्रारुप निविदा तयार करणे | २९५००० |
| २ | मुल्यमापन अहवाल तयार करणे | २९८००० |
| एकुण :- | | **५९३०००** |

त्यानुसार आर. जगताप ॲण्ड असोसिएट कन्सल्टं ॲण्ड इंजिनीयरींग सर्व्हिसेस, नागपुर यांनी धुळे मनपाला उक्त कामाची प्रारुप निविदा तयार करुन देण्यात आली असुन ई-निविदा प्रसिध्द करण्यात आली आहे.

संबंधीत संस्थेने सादर केलेले दर विचारात घेता वाटाघाटीअंती दर अंतीम करण्यात आले असुन विना निविदा कार्यारंभ आदेश देण्यात आला आहे. तरी त्यामुळे सदर खर्चास कलम ७३ अन्वये मे.स्थायी समितीची मान्यता घेणे आवश्यक असल्याने सदरचा अहवाल मे.स्थायी समितीपुढे कार्योत्तर मान्यतेसाठी फेर सादर झालेला आहे.

सर्व सन्मा. सदस्यांच्या सहमतीने व कार्यालयीन अहवालास अधिन राहून मे.आर. जगताप ॲण्ड असोसिएट कन्सल्टं ॲण्ड इंजिनीयरींग सर्व्हिसेस,नागपुर यांच्या वाटाघाटी अंती आलेल्या दरास व खर्चास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम 5 (2)(2) अन्वये कार्योत्तर मान्यता देण्यांत येत आहे. सदर प्रस्ताव व कार्यवाहीबाबत लेखा आक्षेप निर्माण होणार नाही याची दक्षता घ्यावी. याबाबतची जबाबदारी संबंधित विभागाची राहील.

**सर्वानुमते मंजुर,**
**सही/-x x x**
**सभापती,**
**स्थायी समिती,**
**धुळे महानगरपालिका,धुळे**

विषय क्रमांक:- २४ — धुळे मनपातील विविध विभागात मानधनावरील कार्यरत संगणक लिपीक यांना मुदतवाढ देणेबाबत आलेल्या कार्यालयीन अहवालावर विचार करणे.

म. नगरसचिव — नगरसचिव यांनी विषयांचे वाचन केले.

म. शितल नवले — सदर कार्यालयीन टिपणीत नमूद केले आहे की,अंतिम मुदतवाढ देण्यांत यावी. माझे असे म्हणणे आहे हे सर्व कर्मचारी विविध विभागात चांगल्या प्रकारे प्रशिक्षित झालेले आहे.अजून नवीन कर्मचारी नेमल्यास त्यांना प्रशासनाला अजून ट्रेन करावे लागेल तरी टिपणीतील अंतिम मुदत हा शब्द वगळून सदर कर्मचा-यांना 6 महिन्यासाठी पुनश्च मुदतवाढ देण्यांत यावी. हा विषय मंजूर करण्यांत यावा.

म.नागसेन बोरसे — विषय मंजूर करण्यांत यावा.

म. सभापती — सन्मा.सदस्यांनी केलेली चर्चा व कार्यालयीन अहवालास अधिन राहून उक्त 1 ते 16 मानधनावरील लिपिक / टंकलेखक (संगणक ऑपरेटर) यांना पुढील 6 महिन्यांसाठी पुनश्च मुदतवाढ देण्यांस मान्यता देण्यांत येत आहे.

**धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर २४ दिनांक १/४/२०२१**

खालील अ.क्र. १ ते १६ यांची नियुक्ती मे. स्थायी समिती ठराव क्र. ७० दि. २४/०९/२०२० अन्वये जा.क्र./ धुमपा/आस्था/२९१९ दि. ६/१०/२०२० अन्वये दि. १/१०/२०२० पासुन ६ महिने कालावधीकरीता करण्यात आलेली होती.

सदर संगणक ऑपरेटर यांची नियुक्ती दि. ३१/०३/२०२१ रोजी संपुष्टात येत आहे.

| अ.क्र. | संगणक ऑपरेटरचे नाव | विभाग |
|---|---|---|
| १. | नितीन ज्ञानेश्वर महाले | महापौर कार्या. |
| २. | लतेश सुरेश चौधरी | कंपोस्ट डेपो |
| ३. | राहुल सुभाष भावसार | कोरोना कक्ष |
| ४. | शोऐबरजा आदिल शेख | आरोग्य |
| ५. | कुणाल संजय दरगुडे | उपायुक्त कार्यालय |
| ६. | पुजा विठ्ठलसंग परदेशी | उपमहापौर कार्या. |

| | | |
|---|---|---|
| ७. | अंजना प्रल्हाद गायकवाड | बांधकाम |
| ८. | पल्लवी जयराम सावरकर | लाईट विभाग |
| ९. | सचिन विनायक शिंदे | कंपोस्ट डेपो |
| १०. | निखिल रविंद्र देशमुख | मालमत्ता कर |
| ११. | सरिता गंभिरराव चव्हाण | मालमत्ता कर |
| १२. | सुनिता दत्तात्रय आव्हाड | मालमत्ता कर |
| १३. | शरद दामु मोहिते | मालमत्ता कर |
| १४. | योगिता रमेश चौधरी | सहा.आयुक्त कार्या. |
| १५. | जितेंद्र सुभाष शिंदे. | बाजार विभाग |
| १६. | दिलीप खुशाल शिवदे | विरोधी पक्ष नेता कार्या. |

संदर्भिय क्र. २ अन्वये कामाची आवश्यकता असल्याने अ.क्र. १ ते १६ संगणक ऑपरेटर यांना पुनश्च ६ महिनेकरीता नियुक्ती देणेबाबत विभागप्रमुख यांनी अहवाल सादर केलेला आहे. तसेच संदर्भिय क्र. १ अन्वये लिपिक / टंकलेखक (संगणक ऑपरेटर) यांनी विनंती अर्ज देवून पुनश्च नियुक्ती मिळणे बाबत मागणी केलेली आहे.

उक्त अ.क्र. १ ते १६ यांना पुनश्च ६ महिने करीता १०,०००/- मात्र एकत्रित मानधनावर पुनश्च:फेर नियुक्ती देणेबाबत कार्यालयीन टिपणी सादर केली असता याबाबत मा.उपायुक्त सो. यांनी वारंवार मुदतवाढ दिल्याने बाह्य यंत्रणेव्दारे मनुष्यबळ उपलब्ध होणेस विलंब होत आहे. तरी सदरची मुदतवाढ ही अंतीम मुदतवाढ असावी या अटीवर प्रस्ताव मान्यतेस्तव सादर असा अभिप्राय नोंदविलेला आहे.यावर मा.आयुक्त सो. यांनी सहमती दर्शविली आहे. सदर प्रस्ताव मे.स्थायी समितीपुढे मान्यतेस्तव सादर झालेला आहे.

सन्मा.सदस्यांनी केलेली चर्चा व कार्यालयीन अहवालास अधिन राहून उक्त 1 ते 16 मानधनावरील लिपिक / टंकलेखक (संगणक ऑपरेटर) यांना पुढील 6 महिन्यांसाठी अंतिम मुदतवाढ देण्यांस मान्यता देण्यांत येत आहे. तसेच त्या कालावधीत बाहय यंत्रणेव्दारे भरती प्रक्रिया करणेबाबत प्रशासनाने कार्यवाही करावी. सदर प्रस्ताव व कार्यवाहीबाबत लेखा आक्षेप निर्माण होणार नाही याची दक्षता घ्यावी.याबाबतची जबाबदारी संबंधित विभागाची राहील.

**सर्वानुमते मंजुर,**
**सही/-x x x**
**सभापती,**
**स्थायी समिती,**
**धुळे महानगरपालिका,धुळे**

विषय क्रमांक:- २५ — कोविड-19 कोरोना वायरस प्रतिबंधात्मक उपाययोजना साठी महानगरपालिका क्षेत्रात कंटेंमेंट झोन करिता व कोविड सेंटर मध्ये विविध व्यवस्था करणेकामी धनलक्ष्मी मंडप व डेकोरेटर्स यांचे वाटाघाटी अंती निश्चित केलेल्या दरांना व शासन निधीअंतर्गत सदर खर्चास मान्यता देणेबाबत आलेल्या कार्यालयीन अहवालावर विचार करणे.

म. नगरसचिव — नगरसचिव यांनी विषयांचे वाचन केले.

म. शितल नवले — सन्मा. सभापती महोदय अतिशय महत्त्वाचा विषय याठिकाणी आलेला आहे आपल्या शहराला एक कोटीचा रोजगार आपल्या महानगरपालिकेच्या माध्यमातून आपण उपलब्ध करून दिलेला आहे यामध्ये जी कार्यालयीन टिपणी सादर झालेली आहे या टिपणीत आपल्याला चाळीस फूट बॅरेकेटींग साठी ९५ लाख रुपये भाडे आपण देत आहोत असे नमूद आहे यामध्ये ५०% डिस्काउंट दिला असल्याचेही नमूद आहे डिस्काउंटची चांगली सिस्टीम महानगरपालिके मार्फत सुरू झालेली आहे मी या ठिकाणी चाळीस फूट केलेले बॅरेकेटींगचे फोटो आणलेले आहे या ठिकाणी फोटोमध्ये नमूद केलेल्या रस्त्याची रुंदी किती असावी मला अभियंत्यांनी उत्तर द्यावे.

म. अभियंता — साधारणत: दहा मीटर असावी.

म.शितल नवले दहा मीटर म्हणजे साधारणत: ३० फूट होते म्हणजे आपल्याकडे चाळीस फुटी बॅरेकेटींगला साधारणत: अकरा बांबू लागतात त्याची किंमत मी आता बाजारातून खरेदी केलेली आहे त्याची किंमत सातशे वीस रुपये आहे आणि नारळ दोरी शंभर रुपये असे आठसे वीस रुपये लागले यात दहा हजार रुपये मानधनावर लेबर कॉन्ट्रॅक्ट म्हणजे लेबर साठी दोनशे वीस रुपये भरून हजार रुपये किंमत जर एका ठिकाणी हजार रुपये किंमत एका साईडला दुसऱ्या साईडला हजार रुपये असे एकूण २००० रुपये सरासरी निश्चित होतात. जी वस्तू किंवा ज्याची आपल्याला दोन हजार रुपये देणे आवश्यक आहे तेथे आपण २८ हजार रुपये निश्चित केलेले आहे ही टिपणी कोणत्या विभागामार्फत सादर झालेली आहे.

म.नगरसचिव:- सदरची टिपणी विद्युत विभाग व बांधकाम विभागामार्फत सादर झालेले आहे नगरसचिव विभागाकडे विषय सादर होताना आपण सक्षम अधिकाऱ्यांच्या स्वाक्षऱ्या असल्याशिवाय प्रस्ताव विषय पत्रिकेवर घेत नाही.

म.शितल नवले जी वस्तू आपल्याला दोन हजार रुपयाला मिळते त्याचे भाडे आपण २८ हजार रुपये म्हणजे शंभर टक्के जास्तीने टेंडर देत आहोत आणि त्यावर तो ५०% लेस करतो आहे तरी तो प्रॉफिट मध्ये आहे जर समजा चारशे कंटेनमेंट झोन आहे गुणिले दोन हजार आपण २०० जरी विकत घेतले असते तरी चार लाखात काम झाले असते जर आपण ४७० कंटेनमेंट झोनचे मटेरियल एकदम घेऊन टाकले असते तर त्याची किंमत सहा लाख रुपये सरासरी आली असती आणि कोव्हिड संपला असता तर एखाद्या गरीब ठेकेदाराला आपण तीन ते पाच लाख रुपयात विकू शकत होतो आज आपण पाच लाखाचे ९५ लाख रुपये भाडे देत आहोत आपल्या मिल परिसरात तसेच मुस्लिम भागात एवढेच काय तर महापौरांच्या वॉर्डात देखील १२ मीटरचे रस्ते नाहीत आणि टिपणीमध्ये कंटेनमेंट साठी रुपये २८ ६८७ भाडे नमूद आहे यापेक्षा दुसरी गोष्ट अशी की ग.नं. ४ च्या मागील बोळ सुमारे दोन ते तीन फुटाची असेल त्या ठिकाणी बारा मीटर बॅरेकेटींग नमूद केलेले आहे यामध्ये संगनमताने भ्रष्टाचार झाल्याचे प्रथमदर्शनी दिसून येत आहे. कोरोना काळात आमचे जिल्हाध्यक्ष अनुपभाऊ अग्रवाल, खासदार बाबासाहेब भामरे, महापौर चंद्रकांत सोनार, सभापती आणि आम्ही स्वत: संपुर्ण नागरिकांना जेवण व इत्यादी व्यवस्था पुरवण्यासाठी सहकार्य केले. आज हा जनतेचा पैसा आहे हजार रुपये चे मटेरियल आणि त्याचे ९५ लाख रुपये इतक्या निर्लज्जपणे आपल्यासमोर मंजुरी समोर हा विषय सादर केलेला आहे मी याबाबतीत ठामपणे सांगतो की मी या संदर्भात न्यायालयात जाणार आहे यामध्ये मोठ्या प्रमाणावर भ्रष्टाचार झालेला असून जर आपण प्रस्ताव मंजूर केला तर आपल्याला कार्यवाहीला देखील सामोरे जावे लागेल अजूनही मागील काही केसेस मध्ये नगरसेवक अधिकारी तसेच त्यांचे नातेवाईक कोर्टात फिरत आहेत चारशे कंटेनमेंट झोनसाठी बारा मीटर चे रस्ते शहरात चाळीस देखील नाहीत शहरात अग्रवाल नगर देवपूर भाग व इतर काही ठिकाणी बघता कुठे हि बारा मीटरचे रस्ते नाहीत आणि आपण चक्क कार्यालयीन टिप्पणी बारा मीटरचे रुंदीचे कंटेनमेंट निश्चित करून ४५ लाख रुपये भाडे निश्चित केलेले आहे. आणि आपण व्हाल दुरूस्तीसाठी १७ हजार रुपये देऊ शकत नाही घंटागाड्या दुरुस्त करायला पैसे नाही केमिकल घ्यायला पैसे नाहीत दूषित पाणी शहरात येत आहे त्यासाठी कार्यवाही करण्यासाठी पैसे नाहीत दोन वर्ष झाले मी पाणीपुरवठा यंत्रणेसाठी कन्सलन्टं नेमा म्हणून प्रयत्न करीत आहे त्यासाठी सुद्धा बजेट मध्ये तरतूद नाही आणि आपण ९५ लाख रुपये देण्याचा प्रस्ताव सादर केलेला आहे सभापती महोदय हा विषय रद्द करा. मी यासाठी उपोषणाला बसणार आहे या प्रस्तावात ज्यांनी ज्यांनी टिपण्या ठेवलेलया आहेत त्यांच्यावर ती कार्यवाही करणे आवश्यक आहे मी यासाठी न्यायालयात जायला देखील तयार आहे मी न्यायालयाला विनंती करून समिती स्थापन करायला लावेल आणि त्या समितीला प्रत्येक कंटेनमेंट झोनमध्ये घेऊन जाईल आणि मोजमाप करून दाखवेल आमचा बीजेपी पक्ष कोरोना काळात रस्त्यावर जाऊन काम करणारा पक्ष आहे. हे आम्ही कदापि सहन करणार नाही मी राज्याचे विरोधी पक्षनेते देवेंद्र फडवणीस यांना देखील या प्रश्नाबाबत कळवलेले आहे. मी माझ्या पक्षाची बदनामी होऊ देणार नाही. मी भाजपाचा एक नगरसेवक म्हणून विनंती करतो की हा विषय रद्द करावा आपण या ठिकाणी तात्काळ कार्यवाहीचे आदेश द्यावेत अन्यथा मी उपोषणाला बसेल.

म.सभापती — आपण सर्वच नगरसेवक याठिकाणी जबाबदार आहोत आपण कोणताही प्रस्ताव प्रशासनाचा खुलासा घेतल्याशिवाय मंजूर करत नाही त्यामुळे आपण याठिकाणी प्रशासनाचा खुलासा घेणेही आवश्यक आहे आपण कोणत्या विषयाला एकतर्फी मंजुरी देत नाही.

म. सुनील बैसाणे — शितलभाऊ नवले यांनी या ठिकाणी सविस्तर मुद्दा उपस्थित केलेला आहे व शहरांच्या रस्त्याबाबत मांडणी केलेली आहे सभापती महोदय कोरोनाचा कार्यकाळ होता कंटेनमेंट झोन चा विषय अत्यंत त्यावेळेस आवश्यक होता याबाबत त्यावेळेस तातडीने कार्यवाही करणे आवश्यक होते ते काम जरी त्यावेळेस घाईगर्दीत झाले असले तरी त्याचे लाखो रुपयांचे बिल आज या ठिकाणी मान्यतेसाठी सादर झालेले आहे प्रशासनाने केलेल्या कार्यवाहीला आमचा विरोध नाही आमचा विरोध या ठिकाणी एकच आहे कोरोनाच्या नावावर झोळी भरण्याचे काम जर मनपात होत असेल त्याला आमचा विरोध आहे. कोरूना चा प्रसार जास्त झाल्याने ही अत्यंत अत्यावश्यक अशा होती त्याबद्दल आमचे दुमत नाही याबाबतीत तीन निविदा आल्या धन लक्ष्मी मंडप राजू मंडप विनोद मंडप यांच्या निविदा आल्या होत्या त्यांचे दर सूची आलेली होती आपण याचा उल्लेख केलेला आहे माझा एक प्रश्न आहे ही जरी अत्यावश्यक सेवा होती तरी आपण स्थानिक पेपरात देवून दर मागविणे आवश्यक होते. आपण सांगता आपण पोर्टलवर जाहिरात दिलेली होती. यामध्ये आपण जर स्थानिक वर्तमान पत्रात जाहिरात दिली असती तर धुळे शहरात अनेक मंडपवाले आहे त्याचे दर आलेले असते व यामध्ये ५०% पेक्षा जास्त डिस्कांउट मिळाला असता. आपण वर्तमानपत्रात छोटीशी का होईना जाहिरात देणे आवश्यक होते कोरोना काळामध्ये जे जे प्रशासकीय निर्णय घेण्यात आलेत त्यामध्ये जिल्हाधिकारी, आयुक्त साहेब, पोलीस प्रशासनाचे प्रमुख म्हणून डी. एस. पी.साहेब या समितीचे प्रमुख असतात लोकप्रतिनिधी म्हणून महापौर असतील सभापती असतील या समितीमध्ये निर्णय घेण्यासाठी उपस्थित होते या कंटेनमेंट झोनच्या नावाखाली आपण एक कोटी रुपये देत आहोत या वर्षी देखील अशी परिस्थिती निर्माण झाली आहे जर आता कंटेनमेंट झोन करायची वेळ आली तर आपण अशाच पद्धतीने कार्यवाही करणार आहोत का याचाही विचार करणे अत्यंत आवश्यक आहे त्यावेळी निविदा समिती नव्हती कुणाच्या अधिकाराखाली हे काम देण्यात आले निविदा कार्यादेश देण्यात आले होते. मी आज कार्यालयीन टिपणीचे अवलोकन केले. यात मंडप निविदेसाठी आपण तीन मंडप धारकांना बोलविलेले होते यामध्ये आपण विद्युत फोक्स बसविण्याचे काम नमूद केलेले आहे. मंडप धारकांना विद्युत फोकस बसविण्याचा व त्यांचे दर देण्याचा अधिकार आहे का याठिकाणी आपण जनरेटरचे बिल देत आहोत जर जनरेटर विकत घेतले ते २ ते ३ लाखात मिळेल आणि आपण ६ लाख रूपये भाडे देत आहोत. यामध्ये धनलक्ष्मी मंडप डेकोरेटर्स यांनी जे बिल सादर केलेले आहे. त्या बिलावर तारीख नाही. इॅलेक्ट्रीक साहित्य पुरविण्याचा मंडप डेकोरेटर्स यांना अधिकार नाही. आपण एक अभ्यासू सभापती म्हणून नियुक्त झाल्याने मला त्यांचा आनंदा होता. सदस्यांवर कोणत्याही आक्षेप किंवा अडचणी येणार नाही म्हणून आम्ही निरधास्त होतो. त्यामुळे आपण ही असे प्रस्ताव मंजूर करतांना काळजीपुर्वक सर्व बाबींचा विचार करूनच असे प्रस्ताव स्थायी समितीसमोर घेण्यात यावे. आमचा याप्रस्तावास विरोध आहे.आमच्यावर या प्रस्तावाच्या मान्यतेवर काही अडचण येणार नाही याची दक्षता घेवून आमचा विरोध नोंदवावा व हा विषय नामंजूर करावा.

म.सभापती — या प्रस्तावाबाबत संबंधित अधिकारी यांनी खुलासा करावा.

म.विद्युत अभियंता — मागील मार्चमध्ये कोरोनाची सुरुवात मुस्लिम भागात झालेली होती मा. जिल्हाधिकारी यांच्या आदेशाप्रमाणे महापौर साहेब आयुक्त साहेब यांची मिटिंग झाली आणि याबाबत आम्हाला अतिरिक्त आयुक्त यांनी आदेश करून अभियंता यांच्या नियंत्रणात काम करण्यासाठी आदेश दिले होते सुरुवातीला आपण बॅरेकेटींग तयार केले होते त्यासाठी धुळे महानगरपालिकेची सार्वत्रिक निवडणुकीच्या वेळेस जे दर निश्चित केले होते त्या दराने आपण तातडीने ते काम धनलक्ष्मी मंडप डेकोरेटर्स यांना करायला सांगितले त्यावेळेस देखील धुळे शहरात असणारे मंडप डेकोरेटर्स यांना आपण बोलावले होते एकविरा मंडप डेकोरेटर्स यांच्याकडे मटेरियल भरपूर आहेत त्यांना देखील आपण बोलले होते परंतु त्यावेळी कोणीही काम करण्यास तयार नव्हते त्यामुळे धनलक्ष्मी मंडपाला हे

काम आपण सांगितले होते त्यानंतर मा. लेखापरीक्षक यांनी यामध्ये आक्षेप नोंदवला होता बाजारभावाप्रमाणे दर मागणे गरजेचे होते त्यावेळेस वर्तमानपत्र बंद होते त्यामुळे जाहिरात देऊन दरपत्रक मागवली व त्याप्रमाणे आपण काम केले. आता त्याच्यामध्ये २८ हजार रूपये रेट दिलेला आहे आधी आपल्याकडे जे रेट होते अतिरिक्त आयुक्त आणि लेखापरीक्षक यांच्याकडे मिटिंग झाली त्याप्रमाणे रेट आपण निगोसिएट केले त्याप्रमाणे जो रस्ता १२ मीटरचा आपण पूर्णपणे बंद केला होता तिरंगा चौकापासून ते ८० फुटी रोड पर्यंत संपूर्ण रस्ता आपण कंटेनमेंट झोन केला होता जुने धुळे परिसर संपूर्ण बंद केले होते गांधी पुतळा ते नगर पट्टी जुन्या धुळे असे मोठे मोठे कंटेनमेंट झोन आपण त्यावेळेस केले होते कंटेनमेंट निश्चितीचा निर्णय मा.आयुक्त यांच्या आदेशाने नगररचनाकार यांच्यामार्फत व त्यांचे कर्मचारी श्री बहाळकर यांच्यामार्फत क्षेत्र निश्चित करण्यात येत होते ते क्षेत्र संपूर्ण बंदिस्त करायचे त्या ठिकाणी केलेल्या मार्किंग प्रमाणे तो ठेकेदार पूर्ण कंटेनमेंट झोन घेऊन तयार करायचा अशा प्रकारे कंटेनमेंट झोन तयार केलेले आहे त्याचा पुरावा देखील आपल्याकडे आहे पुरावा म्हणून प्रत्येक कंटेनमेंट झोनचे व तेथील बॅरेकेटींगचे फोटो आपण काढलेले आहेत तसेच पॉलिटेक्निक कॉलेज, सिव्हिल हॉस्पिटल अजमेरा कॉलेज येथे जनरेटर लावण्यात आलेले होते त्या ठिकाणी जनरेटर ऑपरेटरही सोबत होता तसेच ८० केजी चे जनरेटर आपण पॉलीटेक्निक मध्ये लावले होते आणि ते जनरेटर २४ तास चालू ठेवणे आवश्यक होते यामध्ये जनरेटर रेट देखील दिलेले आहेत.

**म.सुनिल बैसाणे** मंडपवाल्याला ईलेक्टीक साहित्य व सुविधा पुरविण्याचे प्रमाणपत्र आहे का ? आपण सांगता वर्तमान पत्र बंद होते.मी त्यावेळेच व त्या तारखेचे वर्तमान पत्र आणून दाखवितो आपण चांगले अधिकारी आहात चूकीचा विषयाला पाठीशी घालण्याचा प्रर्यत्न करू नका.

**म.शितल नवले** कैलास नगर, रासकर नगर येथे आमचे पत्रकार बांधव राहतात ते किती मध्ये आहेत त्यामध्ये तीन मीटरचे सुध्दा गल्लया नाहीत माझ्या प्रभागात कंटेनमेंट झोन कसे झालेले होते याबाबत मला चांगले माहिती आहे. दोन गल्लया मध्ये कॉलनी संपते चुकीचे उत्तरे देवू नका.

**म.विद्युत अभियंता** मे,जून मध्ये जे कंटेनमेंट झोन तयार करण्यात आलले होते ते दोन ते तीन कि. मी. क्षेत्राचे होते याठिकाणी यादीमध्ये फक्त ठिकाणाचे नाव नमूद आहे .

**म.शितल नवले** याठिकाणी आपण उज्जवल ऑटोमोबाईलचे नाव नमूद केलेले आहे.ती कंपनी किती मोठी आहे. एक गेट बंद केले तर सर्व कंपनी बंद होते.

**म.सभापती** प्रशासनामार्फत लेखापरिक्षण पदाचा पदभार उपायुक्त श्री. गोसावी यांच्याकडेस आहे. आपण याठिकाणी यासंदर्भात खुलासा करावा .

**म.उपायुक्त** आपण याठिकाणी जे काही मुद्दे मांडलेले आहेत ते योग्य आहेत आपल्या सर्वांना माहिती असेल यामध्ये मार्च महिन्यात सदर प्रक्रिया सुरू झाली. आपण यामध्ये निविदा प्रक्रिया गरजेचे होते पण तशी परिस्थिती त्यावेळेस नव्हती यामध्ये जिल्हा प्रशासनाकडुन अचानक निर्णय प्राप्त झाले याबाबत संबंधित विभागचे पत्र आपल्याकडे उपलब्ध आहेत. त्यामध्ये तातडीने युध्द पातळीवर कंटेनमेंट झोन करणे गरजेचे होते. विभागाने सदरचा पत्र व्यवहार सभागृह समोर सादर करणे आवश्यक होते. निविदा प्रक्रिया करण्यासाठी वेळ नव्हती.त्यामुळे आपल्याकडे जे काही निविदेचे दर यापुर्वी निवडणूक प्रक्रियांच्या प्रसंगी निश्चित केलेले होते त्यानुसार आपण एजन्सीला काम दिले. परिस्थिती गंभीर असल्याने इतर कोणीही काम करण्यास तयार नव्हते. सुरूवातीच्या काळात केंद्राच्या निर्देशाप्रमाणे तीन ते चार कि.मी.कंटेनमेंट झोन करावे लागत होते. त्यानंतर गाईडलाईनमध्ये सुधारणा होत गेल्या. ग्रामिण भागात ही दोन ते तीन कि.मी. कंटेनमेंट झोन करणेबाबत निर्देश होते. ज्यावेळेस ऑडिटर म्हणून प्रस्ताव आला व त्यामध्ये जे दर होते त्यानुसार अत्यावश्याक बाब म्हणून व परिस्थितीचे गांभीर्य लक्षात घेवून काम झालेले आहे. आम्ही सदरचा प्रस्ताव स्थायी समितीसमोर मान्यतेसाठी सादर केलेले आहे. त्याचे बिल अदा केलेले नाही. आपण या दरामध्ये आजही निगोसिएशन करू शकतात. जनरेटर बाबत मी स्वत: सांगू इच्छितो की, मी स्वत:कोविड सेंटरला होतो तिथे ५ मिनिटे जरी लाईट गेली तर काय भयानक परिस्थिती होते हे मी स्वत: अनुभवलेले आहे. आणि त्या परिस्थितीत प्रशासनाने काही निर्णय घेतलेले आहे. सदरचा दर रास्त असल्याने मान्यतेसाठी सादर केलेला आहे. आपण यात निगोसिएशन

करू शकतात. यामध्ये इतर साहित्य साधनसामुग्री संबंधित मंडप धारकांमार्फत पुरविण्यात आलेली आहे.

म.शितल नवले — कंटेनमेंट झोन करण्यासाठी शासनाने जे निर्णय घेतलेले आहे. त्याला आमचा आक्षेप नाही. परंतू २००० ची वस्तू २८,०००/- घेण्याचे अधिकार कोणी दिले. हे काम जास्तीत जास्त ८,००,०००/- वर नाही यासाठी १०,००,०००/- पर्यंत बिल देण्यात यावे.

म.सभापती — याबाबत अभियंता श्री.कैलास शिंदे यांनी खुलासा करावा.

म.अभियंता — त्यावेळेस जी प्राप्त परिस्थिती होती त्यानुसार प्रशासनाने निर्णय घेतलेला आहे. आपल्याकडेस त्यावेळेस साधन सामुग्री उपलब्ध नव्हती. आपल्याला त्यावेळेस सदर झोन दोन दिवसासाठी करावायाचे आहे किंवा ४ दिवसासाठी करावायाचे आहे हे ही माहिती नव्हाते. त्यामुळे प्रशासनाच्या वतीने जिल्हा प्रशासनाच्या आदेशाने आपण प्राप्त परिस्थितीत कार्यवाही केलेली आहे. आपण संबंधित ठेकेदाराचे देयके अदा केलेली नाहीत. आपण संपुर्ण गोष्टी रेकॉर्डवर घेवून काम केलेले आहे. सर्व सन्मा.सदस्यांच्या भावना लक्षात घेवून याबाबत त्रयस्थ यंत्रणा म्हणून सार्वजनिक बांधकाम विभाग यांच्याकडून दर व प्रस्तावातील नमूद बाबीबाबत तपासणी करून सदर प्रस्ताव पुनश्च: सादर करू यामध्ये जर चुकीचे असेल तर आपल्याला दुरूस्त करून घेता येईल.

म.सभापती:- — सर्व सदस्यांच्या भावना लक्षात घेवून नमूद करतो की, यासाठी कोणी एक जबाबदार नाही. शासनाच्या आदेशाप्रमाणे प्रशासानाने कार्यवाही केलेली आहे आणि मी आहे तो पर्यंत कोणत्याही विषयात सदस्यावर अडचण येणार नाही असे मी ठाम पणे नमूद करतो. सदर प्रस्ताव त्रयस्थ यंत्रणेकडे दर व नमूद बाबीबाबत तपासणीसाठी सादर करावा व त्यानंतर सदर प्रस्ताव आवश्यक त्या दुरूस्ती सह सभागृहसमोर सादर करावा तो पावेतो सदर प्रस्ताव तहकुब ठेवण्यास मान्यता देण्यात येत आहे.

**धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर २५ दिनांक १/४/२०२१**

कोविड-१९ कोरोना वायरस प्रतिबंधात्मक उपाययोजना साठी महानगरपालिका क्षेत्रात कंटेंमेंट झोन करिता व कोविड सेंटर मध्ये विविध व्यवस्था करणेकामी धनलक्ष्मी मंडप व डेकोरेटर्स यांचे वाटाघाटी अंती निश्चित केलेल्या दरांना व शासन निधीअंतर्गत सदर खर्चास मान्यता देणेबाबत मे.स्थायी समिती समोर सादर झाला असता उपस्थित सदस्यांनी केलेली चर्चा लक्षांत घेवून सदर प्रस्ताव त्रयस्थ यंत्रणेकडे दर व नमूद बाबीबाबत तपासणीसाठी सादर करावा व त्यानंतर सदर प्रस्ताव आवश्यक त्या दुरूस्तीसह सभागृहासमोर सादर करावा तो पावेतो सदर प्रस्ताव तहकुब ठेवण्यास मान्यता देण्यात येत आहे.

**सर्वानुमते मंजुर,**
**सही/-x x x**
**सभापती,**
**स्थायी समिती,**
**धुळे महानगरपालिका,धुळे**

विषय क्रमांक:- २६ — जुने जिल्हा रुग्णालय व शासकीय तंत्रनिकेतन (कोविड केअर सेंटर) येथे CCTV कॅमेरे लावणेकामी मे. रुबी फोटो स्टुडिओ यांच्या दरास व शासन निधीअंतर्गत सदर खर्चास मान्यता देणेबाबत आलेल्या कार्यालयीन अहवालावर विचार करणे.

म. नगरसचिव — नगरसचिव यांनी विषयांचे वाचन केले.

म. कमलेश देवरे — विषय मंजूर करण्यांत यावा.

म. शितल नवले — सभापती महोदय, येथे बरोबर रेट मिळाला आहे. विषय मंजूर करण्यांत यावा.

म. सभापती — सर्व सन्मा. सदस्यांच्या सहमतीने कार्यालयीन अहवालास अधिन राहून सदर प्रस्तावास कार्योत्तर मान्यता देण्यांत येत आहे.

**धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर २६ दिनांक १/४/२०२१**

आपत्ती व्यवस्थापन कायदा 2005 तसेच साथ रोग प्रतिबंधात्मक कायदा 1897 अन्वये धुळे महानगरपालिका क्षेत्रात कोरोना विषाणूचा प्रादुर्भाव रोखणेसाठी प्रतिबंधात्मक उपाययोजना दि.22-3-2020 पासून करणेत येत होते.त्यानुसार शहरातील कोविड केअर सेंटर जुने जिल्हा रुग्णालय व शासकीय तंत्रनिकेतन येथे CCTV कॅमेरे बसविणे बाबत म. अति. आयुक्त. म. उपयुक्त सो मनपा धुळे यांनी सूचना केल्या प्रमाणे सदर ठिकाणी कामाचे गांभीर्य व वेळ लक्षात घेता विना निविदा काम करून

घेण्यात आले. त्यानुसार जुने जिल्हा रुग्णालय येथे दि.15-8-2020 ते दि.28-10-2020 व शासकीय तंत्रनिकेतन येथे दि.1-7-2020 ते दि. 28-10-2020पावतो या कालावधी करिता लावून घेण्यात आले होते.उक्त काम शीघ्र गतीने करायचे असल्याने मे.रुबी फोटो स्टुडीओ,धुळे यांचेकडून सदर काम तात्काळ करून घेण्यात आले.उक्त कामी मक्तेदाराने covid 19 मध्ये मनपास आवश्यक व गरजेप्रमाणे तत्पर सेवा दिली.

करिता उक्त कामासाठी वरील शासन दरसूची / सा.बा./ विद्युत / 2018-19 नुसार व शासनाच्या पोर्टलवरील दरांनुसार अंदाजपत्रकीय खर्च रक्कम रु.3,00,827/- मात्र अपेक्षित आहे.उक्त खर्च हा विद्युत विभागाकडील दिवे साहित्य खरेदी नुसार अर्थसंकल्प तरतूद 2020-21मध्ये करणेत आलेल्या मनपा निधीतून प्रस्तावित असून, सदर तरतुद मध्ये वरील विषयात अनुसरून खर्च रु.3,00,827/-मात्र अपेक्षित आहे.

सदर प्रकरणी म.आयुक्त सो यांचे दालनात दि.२५/०१/२०२१ रोजी चर्चा झाली. कोविड-१९ कोरोना व्हायरस प्रतिबंधत्मक उपाययोजना करणे कामी करण्यात आलेल्या विविध व्यवस्था कामापैकी शहरातील शासकिय तंत्रनिकतन संस्थेला जुने जिल्हा रूग्णालय या कोविड केअर सेंटर येथे सी.सी.टी.व्ही कॅमेरे बसविणे या करीता खर्च रक्कम रू. ३००८२७/- मंजुरीस सादर करणेत आले आहे. सदर देयकांबाबत म.आयुक्त सो., यांचे दालनात, म.आयुक्त सो, म. अति.आयुक्त सो, म.उपायुक्त तथा उपमुख्यलेखा परिक्षक सो, व म. अभियंता यांची चर्चा झाली असता सदरचे देयक खालील प्रमाणे अनुदानातुन देय होण्यास शिफारस करणे बाबत निर्देशीत व म.आयुक्त सो यांनी खालील प्रमाणे शिफारस व मान्यता दिलेली आहे.

| | | | |
|---|---|---|---|
| १. | शहरातील शासकिय तंत्रनिकतन संस्थेला जुने जिल्हा रूग्णालय या कोविड केअर सेंटर येथे सी.सी.टी.व्ही कॅमेरे बसविणे | ३००८२७/- | शासन अनुदान — कोविड -१९ व्यवस्थापन कामे |
| | | ३००८२७/- | |

वरील प्रमाणे मक्तेदार मे.रूबी फोटो स्टुडीओ यांचे देयक उक्त प्रमाणे उपलब्ध निधी / तरतुद मधुन खर्च करण्यास मान्यतेस शिफारस असुन मंजुरीस्तव मा.स्थायी समिती सादर झालेला आहे.

सर्व सन्मा. सदस्यांच्या सहमतीने व कार्यालयीन अहवालास अधिन राहून सदर कामी मे. रुबी फोटो स्टुडिओ यांचे आलेल्या दरास व झालेल्या खर्चास कार्योत्तर मान्यता देण्यांत येत आहे. सदर प्रस्ताव व कार्यवाहीबाबत लेखा आक्षेप निर्माण होणार नाही याची दक्षता घ्यावी. याबाबतची जबाबदारी संबंधित विभागाची राहील.

**सर्वानुमते मंजुर,**

**सही/-x x x**

**सभापती,**

**स्थायी समिती,**

**धुळे महानगरपालिका,धुळे**

# धुळे महानगरपालिका,धुळे

## नगरसचिव कार्यालय

## स्थायी समिती सभा क्रमांक ७ चे इतिवृत्त

---

**धुळे मनपा भारतरत्न अटलबिहारी वाजपेयी सभागृह**
**मंगळवार दिनांक ०६/०४/२०२१**
**वेळ :- सकाळी ११-०० वाजता.**

धुळे महानगरपालिका स्थायी समितीची विशेष सभा आज मंगळवार दिनांक ०६/०४/२०२१ रोजी सकाळी ११-०० वाजता मा. श्री संजय सुधाकर जाधव, सभापती, स्थायी समिती, मनपा, धुळे यांच्या अध्यक्षतेखाली **धुळे मनपा भारतरत्न अटलबिहारी वाजपेयी सभागृह** भरली. स्वाक्षरी बुकावर सही करुन खालील सन्मा.सदस्य सभागृहात हजर होते.

| अ.क्रं. | सदस्यांचे नांव | हुद्दा |
|---|---|---|
| १ | श्री. जाधव संजय सुधाकर | सभापती |
| २ | श्रीमती माळी भारती अशोक | सदस्या |
| ३ | श्रीमती पाटील मंगला सुरेश | सदस्या |
| ४ | श्रीमती बोरसे पुष्पा प्रकाश | सदस्या |
| ५ | श्री. मासुळे अमोल पावबा | सदस्य |
| ६ | श्री. देवरे कमलेश नारायण | सदस्य |
| ७ | श्रीमती पठाण हिना अस्लम | सदस्या |
| ८ | श्री. सईद बेग हाशम बेग | सदस्य |
| ९ | श्री. नवले शितल मोहन | सदस्य |
| १० | श्री. बोरसे नागसेन दामोदर | सदस्य |
| ११ | श्रीमती कुलेवार किरण राकेश | सदस्या |
| १२ | श्रीमती. बराडे वैशाली भिकन | सदस्या |
| १३ | श्री. जाधव बन्सीलाल माणिक | सदस्य |
| १४ | श्री. पटेल अमीन अब्दुल करीम | सदस्य |

उपस्थित अधिकारी गण

| अ.क्र. | अधिकाऱ्यांचे नाव | हुद्दा |
|---|---|---|
| १ | श्री. शांताराम गोसावी | उपायुक्त |
| २ | श्री. तुषार नेरकर | सहा. आयुक्त |
| ३ | श्री. विनायक कोते | सहा. आयुक्त |
| ४ | श्री मनोज अरविंद वाघ | प्र.नगरसचिव |
| ५ | श्री. के.एन. शिंदे | अभियंता |
| ६ | श्री. चंद्रकांत जाधव | सहा.आरोग्याधिकारी |
| ७ | श्री. पी.डी नाईक | लेखापाल |
| ८ | श्री. रजमान अन्सारी | कार्यालय अधिक्षक |

| | | |
|---|---|---|
| ९ | श्री. एन.के. बागल | विद्युत अभियंता |
| १० | श्री. पी.डी. चव्हाण | ओव्हरसिअर बांधकाम |
| ११ | श्री. सी.सी. बागुल | पा. पु. ओव्हरसिअर |
| १२ | श्री. हेमत पावटे | ओव्हरसिअर बांधकाम विभाग |
| १३ | श्री. प्रसाद जाधव | अति. विभाग |
| १४ | श्री. सुक्राम आत्या राऊत | वाहन विभाग लिपीक |

म.सभापती — सर्व उपस्थित सन्मा.सदस्य उपायुक्त सो.अधिकारी वर्ग छायाचित्रकार बांधव सभेचे कामकाज चालविणेसाठी आवश्यक तो कोरम पूर्ण झाल्याने नगरसचिव यांनी सभेचे कामकाज सुरुवात करावी.

म. नगरसचिव — वंदे् मातरम् या राष्ट्रवंदनेसाठी सर्वांनी उभे रहावे.

**विषय क्रमांक:- २७** — मा.सभापती सो.स्थायी समिती,मनपा,धुळे यांच्या पत्रानुसार धुळे शहरातील सद्यस्थितीतील पिण्याच्या पाण्याची स्थिती, वितरण व्यवस्था या संदर्भात होत असलेली उपाय योजना व कार्यवाही व तसेच वितरण व्यवस्था नियोजनासंदर्भात विचार विनिमय करणे.

म. नगरसचिव — नगरसचिव यांनी विषयांचे वाचन केले.

म.सभापती — आज स्थायी समितीची विशेष सभा भरविण्याचे प्रयोजन असे की, मी ज्यावेळेस सभापती पदाचा चार्ज घेतला त्यावेळेपासून धुळे शहरातील बहूतेक नगरसेवकांची व नागरीकांची विस्कळीत पाणी पुरवठाबाबत तक्रार होती. मी स्वत:नगरसेवक असतांनाही मला ही त्या गोष्टीचा अनेकदा त्रास झालेला होता. शहरात काही भागात ३ ते ४ दिवसात तर काही भागात ७ ते ८ दिवसात पाणी पुरवठा होतो.मागील सभेत सदस्यांनी याबाबत विशेष सभा बोलविण्याची मागणी केली. त्यानुसार मी तातडीने त्याच दिवशी आपल्या अधिकाऱ्या समवेत सुकवद व बांभळे येथील जलशुध्दीकरण केंद्राची पाहणी केली. तसेच याबाबत संबंधित अधिकारी यांनी तातडीने शहरातील सर्व व्हॉलमन व ऑपरेटर यांची बैठक घेवून नियोजन केलेले आहे.माझी सर्व सन्मा.सदस्यांना विनंती असेल की, आपण मागील अडचणी बाबत चर्चा करण्यापेक्षा आता उन्हाळा असल्याने पुढील नियोजनाबाबत चर्चा करावी जेणे करून आपल्याला हया अडचणी सोडविता येतील व धुळे शहरातील नागरीकांना वेळेवर पाणी पुरवठा होणेबाबत नियोजन करता येईल.

म.नागसेन बोरसे — सर्वात प्रथम आपण तातडीने पाणी पुरवठयाबाबत बैठक बोलविली त्याबद्यल मी आपले अभिनंदन करतो यामध्ये काही समस्या हया जाणून बूजून निर्माण केल्या जातात असा आमचा आरोप आहे. याठिकाणी कर्मचारी कमी आहेत. काही जुने जाणकार कर्मचारी रिटायर्ड झालेले आहे. हे देखील खरे आहे. रिटायर्ड झालेल्या कर्मचाऱ्यांना पाणी पुरवठाबाबत माहिती होती. त्यामुळे त्यावेळेस व्यत्यय येत नव्हता. आपण अशा कर्मचाऱ्यांना मानधनावर घेतल्यास यामध्ये अडचणी दुर होवू शकतात. मागे आपण सुकवद बांभळे येथे पाहणी केली होती. त्यावेळेस पंपीग स्टेशनचे ६ पंपा पैकी ३ पंप बंद होते. आपले फक्त् ३ पंप चालू राहतात. सुरळीत पाणी पुरवठयासाठी ६ पंप सुरू असणे आवश्यक आहे. अशा अनेक समस्या आहेत. १३६ कोटी योजनेचे कामकाज पुर्णत्वास आलेले आहे. यामध्ये जलकुभांचे काम देखील पुर्ण झालेले आहे. सदर जलकुंभ पुर्ण क्षमतेने सुरू करणे आवश्यक आहे. आपण अक्कलपाडा योजनेवर अंवलबून बसलेलो आहोत. प्रथम आहे त्या परिस्थितीत नियोजन करणे गरजेचे आहे. काही ठिकाणी क्रॉस कनेक्शन, व्हॉल टाकणे, पाईपलाईन जोडणे अशा स्वरूपाची कामे आहेत ते आपण करू शकत नाही. जुने रिटायर्ड माहितगार कर्मचारी मानधनावर घेता येईल का याचा देखील विचार करावा व त्याप्रमाणे नियोजन करावे.

म.अमोल मासुळे:- संपुर्ण धुळेकराचा पाणी पुरवठा हा जिव्हाळाचा प्रश्न आहे.मी 8 ते 10 वर्षापासून महानगरपालिकेत नगरसेवक म्हणून कार्यरत आहे. मी प्रत्येक बैठकीत पाणी पुरवठयाबाबत समस्या मांडलेले आहे. प्रथमत: या शहरात बऱ्याच मोठया प्रमाणावर लिकेंजेसची समस्या आहे. आपण लिकेंजसाठी लाखो रूपायाची टेंडर काढतो. त्यात काय काम चालते हे कळणे गरजेचे आहे. आज धुळे शहरातील जलकुंभ भरण्याच्या मेनलाईनवर अनेक अवैध कनेक्शन देण्यात आलेले आहे. हे कोणाच्या आदेशाने व आशिर्वादाने दिलेले आहे. तक्रारी केल्यानंतर ही सदर कनेक्शन आजपावेतो बंद करण्यात आलेले नाही. आमच्या मिल परिसरात अनेक ठिकाणी मेनलाईनवर कनेक्शन दिलेले आहे. मिल परिसराला चक्करबर्डी टाकी वरून पाणी पुरवठा होत असतो. त्यावर ही अनेक कनेक्शन आहेत.सभेमध्ये अनेक प्रश्न उपस्थित केलेले असतांना देखील यावर कार्यवाही झालेली नाही. आपण आज पर्यंत किती अवैध कनेक्शन धारकांवर कार्यवाही केली यांची माहिती मिळावी. या कनेक्शनमूळे शेवटच्या भागात राहणाऱ्या नागरीकांना वेळेवर पाणी मिळत नाही. नागरीक पाण्याचा अपव्यय करतात हे कोणाच्या आशिर्वादाने सुरू आहे. तसेच अनेक भागात व विशेषत: स्लम भागात नळांना तोटया नसल्याने आपण कोटयावधी रूपये खर्च करून फिल्टर केलेले पाणी वाया जाते आहे. नागरीक निष्काळजीपणा करतात त्यामुळे आपल्याला भुर्दंड सोसावा लागतो. धुळे शहरात अनेक मोठे हॉस्पीटल असून तेथे ही कोरोना काळात मोठया प्रमाणावर लूट सूरू आहे. या हॉस्पिटलने मेन लाईन वरून अनेक ठिकाणी कनेक्शन घेतलेले आहे. त्यांना आपल्या मनपाच्या अधिका-यांची साथ आहे असा माझा आरोप आहे. सामान्य नागरीक दरवर्षी नियमाप्रमाणे पाणी पट्टी भरतात त्यांना कमी दाबाने पाणी द्यायाचे आणि अशा अवैध नळ कनेक्शन धारकांना फुकट पाणी दयावयाचे हि महानगरपालिकेची फसवणूक आहे.याबाबत मला संबंधित अधिकाराकडून खुलासा आवश्यक आहे.

म.अमिन पटेल:- सद्यास्थितीत उन्हाळयाचे दिवस आहेत पाण्याची मोठी समस्या आहे.व हि समस्या दुर करण्यासाठी नियोजन करणे गरजेचे आहे. आज आपण पाणी पुरवठाबाबत बैठक आयोजित केली त्याबद्दल मी आपले अभिनंदन करतो. आपण तापी योजनेवरून पाणी पुरवठा करतो, परंतू जलकुंभ भरल्यानंतर काही भागात नगरसेवक त्यांच्या पध्दतीने बळाचा वापर करून पाणी सोडतात.त्यामुळे अनेक भागात पाण्याच्या अडचणी निर्माण होतात. यासाठी प्रत्येक जलकुंभावर सी.सी.टी.व्ही. कॅमेरे बसविले गेले पाहिजे. यामध्ये नगरसेवक व नागरीक हस्तक्षेप करणार नाही. याबाबत काळजी घेतली पाहीजे व ज्या भागात पाण्याचे नियोजन असेल त्याच भागात पाणी सोडले पाहिजे. सद्या सर्व वर्तमान पत्रात लिकेंजचे मोठया प्रमाणावर छायांचित्र प्रसिध्दीस येतात याबाबत व्हॉलमनने पाणी सोडल्यानंतर प्रभागात फिरून लिकेंजेची पाहणी करून तात्काळ लिकेंज काढणेबाबत प्रशासनाने कार्यवाही करणे गरजेचे आहे. त्यामुळे लाखो लिटर वाया जाणारे पाणी हे वाचू शकेल. शहरात जे जलकुंभ आहेत त्यावर पंपींग स्टेशन बसविणे गरजेचे आहे. यासाठी एकदाच खर्च होणार आहे. परंतू कायमची अडचण दूर होणार आहे. यासाठी आवश्यकता असल्यास बजेटमध्ये तरतूद करण्यात यावी. धुळेकर जनतेला पाणी कसे मिळेल याचे नियोजन करणे गरजेचे आहे. ज्या नळांना तोटया नाही त्यांना ५०० दंड करावा त्यामुळे पाणी वाया जाणार नाही. माझ्या भागात १ कि.मी. पाईपलाईन आहे. परंतू शेवटयाच्या भागात पाणी मिळत नाही. त्याठिकाणी दोन भाग करून व्हॉल बसवून नियोजन केले तर संपुर्ण भागात उच्च दाबाने पाणी मिळू शकेल.

म.शितलभाऊ नवले:- आजच्या बैठकीतआपण फक्त नियोजनाबाबत चर्चा करणार आहोत. परंतू प्रशासनाने त्यानुसार कार्यवाही करावयाची आहे.नंतर १५दिवसानंतर आपण पुश्नच:नियोजनाबाबत काय कार्यवाही

झाली. याचा आढावा घेणार आहोत. धुळे शहरातील पाणी पुरवठयाचा प्रश्न अनेक वर्षापासून आहे.यासाठी आपण तज्ञ संस्था कन्सल्टंट नियुक्त करणेबाबत कार्यवाही करत आहोत. त्याच्या मार्गदर्शनानुसार आपल्याला शहरात विविध बद्दल व त्याप्रमाणे कार्यवाही करावी लागेल. यासाठी या वर्षाच्या अंदाजपत्रकात १५ कोटीची तरतूद करण्यात यावी कारण जर आपण वेळेवर संबंधितांना पैसे दिले तर आपले काम वेळेत पुर्ण होईल आपण पाणी पुरवठयाला प्रथम प्राधान्य दिले पाहिजे. इतर रस्ते गटारी ही कामे नाही झाली तरी चालेले परंतू शहरातील पाणी पुरवठासाठी खर्च करणे गरजेचे आहे. आपण यापुर्वी १३६ कोटीची पाणी पुरवठा योजना केली. त्यामध्ये अनेक जलकुंभ उभारले सदर जलकुंभ कशा पध्दतीने भरवायाचे याबाबत प्रशासनाचे काय नियोजन होते. याचा ही अभ्यास होणे गरजेचे आहे. लिकेंजच्या कामाबाबत सुसूत्रता येणे गरजेचे आहे. आपण कन्सल्टंट नेमत आहोत. त्याच्याकडून याबाबत आवश्यक ते मार्गदर्शन घेवून या वर्ष भरात आपल्याला कोणते कामे प्राधान्याने करणे गरजेचे आहे.याचे प्रथम नियोजन करूनच काम करावे. मी महासभेत यापुर्वी बोललो होतो. आपल्याकडे नविन पंपासाठी ३ ते ४ कोटी मंजूर झालेले आहेत. त्याकामाचे फक्त तांत्रिक मान्यता प्रलंबित आहे.आपण संबंधित विभागाकडून मुंबईला जावून ते काम प्राधान्याने केल्यास हा प्रश्न कायमचा निकाली लागणार आहे.बंटीभाऊ मासुळे यांनी मेनलाईन वरून दिलेल्या अवैध नळ कनेक्शनबाबत मुद्द उपस्थितीत केलेला आहे. यासाठी हि कठोर कार्यवाही करणे गरजेचे आहे.अक्कलपाडा योजनेबाबत मी अनेकदा पोटतीडकीने हा प्रश्न उपस्थिती केलेला आहे. जॅक्वेलचे काम आज आहे त्या परिस्थितीत पाण्यात करता येवू शकते. परंतू याबाबत कोणीही लक्ष देत नाही.आपण आज ही प्लॅन्ट पुर्ण केला. तरी जॅक्वेल झाले नाही तर पाणी उचलता येणार नाही.आपण एकदा एम.जी.पी.चे अभियंता आपले अभियंता यांच्याशी चर्चा करून त्यांचे म्हणे समजून घेवू जेणे करून आपल्याला काम लगेच सूरू करता येईल व पाणी पुरवठा सुरळीत होवू शकेल.आपण रोजचे ५ लाख लिटर पाणी फिल्टर करतो साधारणत: १२ ते १३ पाण्याचे जलकुंभ आहेत आणि एकूण २० जलकुंभ आहेत. आपण तातडीने कन्सल्टंट नेमून त्याचे मार्गदर्शनाने काम केल्यास यामध्ये निश्चितपणे पाण्याच्या वेळा कमी होण्यास मदत होणार आहे. मागे विलास भाऊ होते. त्यावेळेस याच पध्दतीने पाणी मिळत होते. त्यावेळेस इंजिनिअर पण हेच होते व कर्मचारी सुध्दा हेच होते. फक्त वरिल अधिकारी बदलले याठिकाणी आपला विद्युत विभाग कमी पडतो आहे.

म. किरण कुलेवार — आपण आज पाणी पुरवठयाबाबत विशेष सभा घेतली त्याबद्दल आपले आभार. महानगरपालिकेत राष्ट्रवादी पक्षाची सत्ता असतांना 4-5 दिवसात पाणी यत होते.आता 8-9 दिवसांत पाणी येते याचे कारण काय? कर्मचा-यांवर अधिका-यांचे नियंत्रण नाही.

म. सभापती — आपण यासाठीच आज मिटींग घेतली आहे.आपण संबंधिताकडून कसे काम करुन घ्यावयाचेहा आपला अधिकार आहे.

म.किरण कुलेवार — माझ्या भागात दुषित पाणीपुरवठा होत होता. मी चंद्रकांत उगले यांना फोन केला तर त्यांनी सांगितले की पाणी उकळून प्या.ही अतिशय बेजबाबदारपणाची बाब आहे. माझ्या भागात अनेक मुस्लीम बांधव राहतात. आता त्यांचा रमजान महिना सुरु होत आहे. त्यांना सकाळी नियमित पणे पाणी मिळेल याबाबत कार्यवाही करावी. पाण्याच्या वेळा अनिश्चित आहे रात्री अपरात्री पाणी सोडले जाते. यावर विचार करावा.

म. भारतीताई माळी — माझ्या प्रभागातील पाण्याच्या प्रश्नासंदर्भात मी आपणास पत्र दिले होते. आपण याबाबत दखल घेवून विशेष सभा बोलविले त्याबद्दल आपले आभार व्यक्त करते.माझ्या भागात अनेक पत्रकार बांधव राहातात. त्यांनाही पाण्याचा त्रास आहे. आपण नागरीकांना 8 दिवसांत म्हणजे

वर्षातून 45 दिवस पाणी पुरवठा करतो. आणि संपूर्ण वर्षाची पाणीपट्टी आकारणी करतो.आपण फक्त 45 दिवसांची पाणी पट्टी घ्यावी असे माझे मत आहे. माझ्या भागात अनेक अल्पउत्प गटातील नागरीक डी.सी कॉलेज रोड नगांव बारी, इत्यादी भागात राहतात त्यांनाही पाण्याचा खूप मोठया प्रमाणावर त्रास आहे. त्यांना 169 0 पाणीपट्टी परवडत नाही. माझ्या प्रभागातील देंदेकॉलनी, श्रीराम कॉलनी, भगवती नगर, ड्रायव्हर्शन रस्ता या भागातील नागरीकांना पाणी पोहचत नाही आज आमच्याकडे पाण्याचा दिवस होता परंतु पाणी आलेले नाही. ज्या वेळेस माझ्याभागात पाणी येईल त्यावेळेस तुम्ही स्वत:माझ्या प्रभागात या म्हणजे आपणास नागरीकांच्या त्रासाबद्दल जाणीव होईल.भागात अनेक ज्येष्ठ नागरीक राहतात त्यांनाही पाणी पुरवठयाचा त्रास आहे.आज मनपात आपल्या भाजपाची सत्ता आहे. आपण नियमित पाणीपुरवठा करण्याबाबत वचननाम्यात जाहीर केले होते. पण ते आपण करु शकत नाही. आपल्या पक्षाला बदनाम करण्यांचे कारस्थान सुरु आहे. आपली प्रतिमा लोकांनामध्ये खराब करण्यांचे काम जे कोणी अधिकारी करत असतील त्यांना जाब विचारणे गरजेचे आहे. इतर मुलभूत सुविधांच्या आधी पाणीपुरवठा व्यवस्थित करणे गरजेचे आहे. माझ्या प्रभागात 136 कोटीचे काम अपूर्ण अवस्थेत आहे.

म.सभापती — आपण पुढच्या बैठकीला एम.जी.पी.च्या अधिका-यांनाही बोलावू जेणे करुन आपल्या प्रश्नाबाबत मार्ग काढता येईल.

म.पुष्पाताई बोरसे — आज जी बैठक बोलविली त्याबद्दल मी आपली आभारी आहे. प्रभागात 8 दिवसांनी पाणी येते परंतु पाणी सोडण्याची वेळ निश्चित नाही. रात्री अपरात्री कधीही पाणी सोडले जाते. आपण पाण्याची वेळ निश्चित करावी. जेणे करुन नागरीक घरी थांबून पाणी घेवू शकतील याबाबत आपण नियोजन करावे.

म. सईद बेग — माझा प्रभाग हा एक घनदाट वस्तीचा प्रभाग आहे. आज पाणी सोडण्याचा 5 वा दिवस आहे. आमच्या प्रभागातील नागरीक 5-6 दिवस पाणी पुरेल इतका साठा करुन ठेवू शकत नाही. अतिक्रमण वस्ती असल्याने रस्त्याच्या कडेला ड्रम वगैरे ठेवून 2-3 दिवस पुरेल इतका साठा होतो. 5 दिवशी पाणी आले तर नागरीकांना मोठया प्रमाणावर अडचणी निर्माण होतात. पाणी प्रश्नावर यापूर्वी आंदोलन देखील केले होते. मला नाईजास्तव पाण्याच्या टाकीवर चढावे लागले होते.परंतु त्याचा काही उपयोग झाला नाही मला फक्त आश्वासन मिळाले. माझ्या प्रभागात 4 ठिकाणी दुषित पाणी येते. तक्रार देवून देखील त्यावर कार्यवाही झालेली नाही. लिकेजेस बाबत तीच ओरड आहे. माझ्या भागात पाण्याची पाईप लाईन टाकणे गरजेचे आहे परंतु त्यासाठी वांरवार एम.जी.पी. महानगरपालिका अशा चकरा माराव्या लागतात. परंतु काम होत नाही.

म.कमलेश देवरे — आपण पाणीपुरवठया प्रश्नावर तात्काळ बैठक लावली त्याबद्दल मी आपले अभिनंदन करतो. सदस्यांचे म्हणणे ऐकून घेतल्यावर त्यावर कार्यवाही व उपाय योजना झाल्या तर फार चांगले होईल. राष्ट्रवादीच्या काळात 4-5 दिवसाआड पाणी यावयाचे त्यावेळचे महापौर श्री. मोहनभाऊ नवले, सभापती श्री. विलासभाऊ खोपडे यांनी त्यांचे नियोजन केले होते. प्रशासनाच्या माध्यमातून अधिका-यांच्या बैठका घेवून व्यवस्थित नियोजन केल्यामुळे 3-4 दिवसाआड पाणीपुरवठा झाला होता. आपणही अशा पध्दतीने नियोजन केल्यास 100 टक्के मार्ग निघू शकतो. माझ्या संपूर्ण प्रभागात 40 ते45 हजार लोकवस्ती आहे आणि एकच रामनगरचा जलकुंभ आहे. त्याला हनुमान टेकडीवरुन पाणीपुरवठा होतो. टाकी जोडण्याच्या मेनलाईनवर अनेक अवैध् नळ कनेक्शन आहे. त्यामुळे टाकी भरण्यास 12 ते 14 तास कालावधी लागतो. जर अवैध नळ कनेक्शन काढले तर 8- 10 तासांत जलकुंभ भरु शकेल.

आपण पुढच्या बैठकीला एम.जी.पीच्या अधिका-यांना बोलावणार आहांत. त्या वेळेस मी प्रश्न मांडेलच . माझ्या प्रभागात एम.जी.पी. चे ठेकेदार अर्ध्यवट काम सोडून निघून गेलेले आहे. रस्ते खोदून ठेवले आहे. आपण अधिका-यासमवेत संबंधित ठेकेदारालाही बोलवावे.

म. हिना पठाण — आपण पाणीपुरवठयाबद्दल बैठक घेतली त्याबद्दल आपले आभार. आपण 8 दिवसाआड पाणी देतो पण वेळेचे नियोजन नाही.कधी पण पाणी देण्यांत येते. आता रमजान महिना येत आहे. मुस्लीम बांधवांचे उपवास असतात. त्यामुळे पाण्याची वेळ निश्चित करावी. काही भागात 12-12 दिवस पाणी येत नाही. त्यांचेंही नियोजन करावे.

म. अमीन पटेल — माझ्या भागात गजानन कॉलनी ते अरिहंत भुवन पावेतो पाईप लाईन टाकली गेलेली आहे. त्यांचे काम पूर्ण झालेले आहे.परंतु प्रभाग क्रं.20 चे नगरसेवक त्या लाईन वरुन पाणी सुरु करु देत नाही. त्यासाठी 450000 एस्टीमेट केलेले आहे.परंतु त्यासाठी तरतूद नाही असे सांगितले जाते. आता उन्हाळयांचे दिवस आहे.भागात पाणी मिळत नाही. त्यासाठी डबल व्हॉल सुरु करुन पाणी दयावे लागते. तरी सदरचे काम तांतडीनें मंजूर करुन कार्यवाही करावी.

म.शितल नवले — आता 2 महिन्यांत पावसाळा सुरु होईल्. देवपूर भागात ड्रेनेजचे काम करणारा ठेकेदार यालाही बैठकीला बोलाविले पाहिजे.नाही तर देवपूर भागातील परिस्थिती अत्यंत वाईट होणार आहे. पावसाळयापूर्वी रस्ते दुरुस्त करुन घेणे आवश्यक आहे. आज जशी ही बैठक लावली तशी ती पण बैठकलावावी जेणे करुन काम वेळेत पूर्ण होईल्.

म.सभापती — सन्मा. सदस्यांनी याठिकाणी अत्यंत महत्वाचा सुचना मांडल्या आहेत. लिकेजेच्या अनेक तक्रारी आहेत. आपण लिकेजचा ठेका दिलेला आहे. परंतु माझ्या असे लक्षात आले की, तो ठेकेदार काम करीत नाही. आणि त्यांचे बील आपण अदा करतो. आपण त्या ठेकेदाराचे काम बंद करावे. अन्य नवीन चांगला ठेकेदार नेमावा.अथवा मनपाच्या इंजिनिअर मार्फत काम करुन घ्यावे.लाखो लिटर पाणी वाजा जात आहे.मेन लाईन वरील बेकायदेशीर कनेक्शन सुध्दा आपल्याला बंद करावे लागतील. मुस्लीम बांधवांचा रमजान महिना सुरु होत आहे. त्यामुळे पाणी सोडण्यांच्या वेळा निश्चित करावयात. याबाबत संबंधित सदस्यांशी चर्चा करुन वेळा निश्चित करावयात.सद्यस्थितीत उन्हाळयांचे दिवस आहे आपण तांतडीने पाणी पुरवठयाच्या तक्रारीसाठी तक्रार कक्ष निर्माण करा. त्याठिकाणी सक्षम अधिका-यांची नियुक्ती करा तसेच ज्या तक्रारी प्राप्त होतील त्या तक्रारीचे निवारर्ण दुस-या दिवशी करण्याबाबत नियोजन करावे. सुक्ष्म नियोजन केल्याशिवाय पाणी प्रश्न सुटणार नाही. सन्मा. सदस्यांनी केलेल्या सुचनाची नोंद घ्यावी व त्याबाबत तांतडीने कार्यवाही करावी.

म.शितल नवले — आपल्या महानगरपालिकेत एकच शहर अभियंता आहे. त्यांच्याकडेस बांधकाम, पाणीपुरवठा विद्युत अशी अनेक कामे आहेत. आपण अजून एखादा शहर अभियंता वाढवू शकतो का याबाबत विचार करावा. एका माणसावर जास्त कामाचा भार असल्याने काम व्यवस्थित होऊ शकत नाही.

म.सभापती — सदरची बाब प्रशासनाशी संबंधित आहे.आपण त्याबाबत प्रशासनाकडे मागणी करु. पाणी प्रश्नाबाबत केलेली कार्यवाही व सदस्यांच्या सुचनाबाबत अभियंता श्री. कैलास शिंदे यांनी खुलासा करावा.

म. अभियंता — मागील स्थायी समिती सभेत सन्मा. सदस्या हिनाताई पठाण यांच्या भागातील क्रास कनेक्शन व व्हॉल बसविणेसाठी श्री.पावटे यांना आदेश केला होता. ते काम पूर्ण झालेले आहे. धुळे शहरातील पाणीपुरवठयाबाबत मा. सभापती साहेबांनी समक्ष तात्काळ पहाणी केली. आम्ही याबाबत आवश्वासन दिलेले आहे.पुढील 4 महिने उन्हाळयांचे आहे व ते पाणीपुरवठयासाठी महत्वांचे राहणार आहेत. धुळे शहराला कशा प्रकारे पाणीपुरवठा करता येईल याबाबत आम्ही

नुकतीच सर्व व्हॉलमन,फिटर,ओव्हरसिअर यांची एकत्रित बैठक घेवून नियोजन केलेले आहे.व सुचना दिलेल्या आहे आम्ही नियमित पाणी पुरवठयासाठी कटीबध्द आहोत.कर्मचा-या कडून निष्काळजीपणा केल्यास आम्ही त्यांच्यावर कार्यवाहीचा अहवाल सभागृहापुढे व वरिष्ठाकडेस सादर करु. बैठकीत सर्वांनी नियमित पाणीपुरवठयाबाबत आश्वासन दिलेले आहे. यासाठी आपल्याला प्रथ्म एम.एस. ई.बी च्या अधिका-यासमवेत बैठक घ्यावी लागेल त्यांनी तर विद्युत पुरवठा सुरळीत ठेवला तर आपण नियमित पाणीपुरवठा करु शकू. सन्मा. सदस्य श्री. नागसेन बोरसे यांनी सेवानिवृत्त कर्मचारी यांना मानधनावर घेणेबाबत सांगितले आहे. याबाबत आस्थापना विभाग व प्रशासनाची चर्चा करुन निर्णय घेता येईल. याठिकाणी तापी योजनेवरील 6 पंप बाबत विचारणा झालेली होती. याबाबत आपल्याकडे एका कंपनीचा प्रस्ताव आलेला आहे.त्या कंपनीला महिन्याला 1 कोटी रुपये द्यावयाचे आहे. आपल्याकडे 5-6 वर्षाचे रेकॉर्ड आहे. त्यामध्ये किती युनिट वापरले गेले. पंपाचे डीस्चार्ज काय आहे याची नोंद आहे.सदर कंपनी स्वखर्चाने पंप बदलून देणार आहे. कॉम्प्युटराईज करुन देणार आहे. आपण कार्यालयांत बसून त्यावर नियंत्रण ठेवू शकतो.पंप किती दिवस चालला त्यांचा डिस्चार्ज किती याबाबत पहाणी करण्यांत आलेली आहे.सदर कंपनी स्वखर्चाने पंप बदलून देणेस तयार आहे. यांत जे विद्युत बील होईल त्यातून आपल्याला 10 वर्षात पैसे संबंधित कंपनीला अदा करावयाचे आहे. समजा पंप बसविल्यानंतर जे बील 1 करोड येत होते ते 60 लाख आले तर 40 लाख रुपये संबंधित कंपनीला दयावे लागतील. म्हणजे आपल्याला खर्च तेवढाच आहे.परंतु आज आपल्याला सर्व पंप बदलून मिळतील.त्यात संपूर्ण नविन टेक्नालॉजी असेल त्यांची देखभाल दुरुस्ती संपूर्ण कंपनी करणार आहे. हे सर्व आपण सभागृहासमोर आणणार आहोत. सभागृहाची संमती असेल तर आपणास पंप बदलून घेता येतील. तसा प्रस्ताव आम्ही स्थायी समिती समोर सादर करतो. आपल्याकडे जो पैसा आहे त्यांत बाहेरचे जे स्ट्रक्चर आहे, डी.पी.सबस्टेशन हे सर्व खराब झालेले आहे. आपला सप्लाय आज डायरेक्ट आहे सदर कामावर तो पैसा खर्च करता येईल. आपण क्लोरीन गॅस प्लॅनबाबत प्रश्न उपस्थित केला होता. त्यांची निविदा प्रसिध्द केलेली आहे.सन्मा. सदस्य यांनी अवैध नळ कनेक्शन बाबत तसेच हॉस्पीटल व अन्य ठिकाणी बेकायदेशीर नळ कनेक्शन असलेबाबत प्रश्न उपस्थित केला होता. मी याबाबत समक्ष चौकशी करुन कार्यवाही करेल. तसेच शाळा नं. 28 येथील पाण्याची टाकी सुरु करणेबाबत सांगितले आहे. शहरात 7 नवीन ठिकाणी जलकुंभ बांधण्यांत आलेले आहे. आम्ही सर्व जलकुंभ सुरु करण्याबाबत नियोजन करीत आहोत. एम.जी.पी.च्या अधिका-यासमवेत टेस्टींग करुन घेण्यांत येईल. व येत्या 2 महिन्यांत सदर काम पूर्ण करण्यांत येईल.

म. शितल नवले — तुम्ही आता जे प्रेझेनटेशन देणार आहेत त्याबाबत आपली काय कल्पना आहे. आपल्याला संपूर्ण शहराचे पंप बदलावयाचे आहे की पंपींग स्टेशन वरील पंप बदलावयाचे आहे. तेथील मिटर चालू आहे का?

म. अभियंता — पूर्ण धुळे शहरात जेवढे पंपींग स्टेशन आहे. त्या सर्व पंपींग स्टेशनचे मिटर सुरु आहे. त्याचा अॅव्हरेज काढावा लागेल. सदर कंपनीने भारतात 107 ठिकाणी अशी सिस्टीम बसविलेली आहे. आपल्याला योग्य वाटल्यास आपण त्याचा विचार करु.

म.शितल नवले — चांगली कल्पना आहे. आपण सदर कंपनीने केलेल्या कामाच्या ठिकाणी एकदा प्रत्यक्ष भेट देऊ आजच्या स्थितीत आपले पंप 50 टक्के देखील पाणी डिस्चार्ज करत नाही.

म. नागसेन बोरसे — आता अभियंता सो. यांनी पाण्याचे नियोजन सांगितले. त्यावरुन असे वाटते की येत्या 8- 15 दिवसांत पाणीपुरवठा सुरळीत होईल.2 वर्षापासून आपली भाजप ची सत्ता आहे.

याकालावधीतआपण नियोजन का केले नाही. किती वेळा नियोजन करण्यांचा प्रयत्न केला याची माहिती द्यावी.

म. अभियंता आम्ही पाणीपुरवठा सुरळीत करण्यासाठी निश्चित प्रयत्न करु. यात कोणतेही राजकारण नाही. मी सर्व कर्मचारी यांना सुचना केलेल्या आहेत.पाणीपुरवठा वितरणात जो कर्मचारी निष्काळजीपणा करेल त्याचा अहवाल स्थायी समितीपुढे ठेवण्यांत येईल. आपली स्थायी समितीची साप्ताहिक बैठक असते त्या बैठकीत बैठक संपल्यानंतर आपण पुनश्च याबाबत चर्चा करु शकतो. पाणी वितरणात ज्या ज्या अडचणी येतील त्या समन्वयाने सोडविण्याचा निश्चित प्रयत्न करु.

म. नागसेन बोरसे वेळोवेळी नगरसेवकानी बैठकांमध्ये सुचना केलेल्या आहेत. या2 वर्षात आपण त्या सुचनांबाबत काय कार्यवाही केली.

म. अमोल मासुळे सन्मा. सदस्यानी तक्रारी केल्या म्हणून आपण पाणीपुरवठयांची बैठक बोलाविली. पाणी पुरवठयाचे नियोजन करावयाची जबाबदारी प्रशासनाची नाही का? आता उन्हाळा सुरु झालेला आहे ही बैठक यापूर्वी घेणे आवश्यक होते. मागे हेच अधिकारी होते. परंतु आता नागरीकांना त्रास देण्यांचे कारण काय?

म. नागसेन बोरसे आपण सांगितले की, लिकेजेसची निविदा काढलेली आहे. माझ्या माहिती प्रमाणे सर्व ठेकेदारांची लिकेजेसची बिले निघतात. जर ठेकेदार नेमलेला आहे तर कार्यालयामार्फत् लिकेजेसची बिले येतात कशी काय? असे लिकेजेससाठी किती ठेकेदार नेमलेले आहेत.

म. अभियंता लिकेजेस बाबत नियोजन करीत आहोत. ज्या भागात पाणी सोडतात त्या भागात पाणी सोडल्यानंतर समक्ष फिरुन नळांना तोटया लावलेल्या आहेत किंवा नाही याची पहाणी करण्यांचे आदेश व्हॉलमन व फिटर यांना देण्यांत आलेले आहे.

म. अमीन पटेल पाण्याचे नियोजन योग्य झाले पाहिजे. आपण अन्य ठिकाणी लाखो रुपये खर्च करतो. जलकुंभ येथे पंपींग स्टेशन झाल्यास लाखो लिटर पाणी बचत होईल.

म. अभियंता पूर्ण धुळे शहराची पाणी वितरण योजना झाली त्यावेळेस 1- 2 ठिकाणीच पंपींग स्टेशन होते. आपल्याकडे फक्त बडगुजर जलकुंभ येथेच पंपींग स्टेशन होते. जो जलकुंभ पांझरा वॉटर वरुन भरण्यांत येत होता.मायक्रो टॉवर जामचा मळा येथे देखील पंपींग स्टेशन करण्यांची आवश्यकता नाही. एम.बी.आर. जलकुंभावरुन ग्रायव्हीटीव्दारे जलकुंभ भरतील अशी व्यवस्था आहे व त्याप्रमाणे रचना असते. प्रत्येक ठिकाणी पंपींग स्टेशन झाल्यास मेन्टेनन्स व लाईट बीलांत वाढ होते. त्यामुळे योजना तयार करतांनाच आपण त्याचा विचार करतो. आता आपण जो कन्सल्टटं नेमणार आहोत. त्यांच्याकडून अभिप्राय व मार्गदर्शन घेवून त्याप्रमाणे कार्यवाही केली जाईल.

म. शितल नवले आपण यापूर्वी 136 कोटीची योजना तयार केली होती. त्यात पाण्याचे जलकुंभ भरण्याबाबत काही नियोजन नव्हते का? सदर नियोजन आपल्या रेकॉर्डवर आहे का?

म. अभियंता त्यासाठी आपण एम.जी.पी.चे अधिकारी ठेकेदार व आपले अधिकारी यांची एकत्रित बैठक घेवून याबाबत कार्यवाही करता येईल. जे जलकुंभ पूर्ण झालेले आहेत त्यांची टेस्टींग करुन ताब्यात देणे हे ठेकेदाराचे काम आहे. आपण त्यांना याबाबत वेळोवेळी पत्र दिलेले आहे. एकत्रित बैठकीत आपण त्यांना याबाबत आदेशित करु शकतो. कन्सटंट नेमणेबाबत निविदा काढलेली असून त्यांचा प्रस्ताव आम्ही स्थायी समिती समोर लवकरच ठेवणार आहोत. व त्यासाठी येणा-या खर्चाची अंदाजपत्रकात तरतूद करणेबाबतअहवाल स्थायी समितीपुढे सादर करण्यांत येईल.जॅकवेलचे काम चालू करण्याबाबत स्वतंत्र 3- 4 वेळा बैठका घेतल्या तेथे सद्या

अडीच ते तीन मिटर पाणी आहे. तेथे आपण जॅक्वेलचे काम सुरु करु शकतो.आयुक्त सो. व आम्ही स्वत: तेथे पाहणी केलेली आहे. व काम सुरु करण्याबाबत ठेकेदाराला पत्र व नोटीस देण्यांत आलेली आहे.

म.शितल नवलें — त्यांना पाण्यात जॅक्वेल बांधावयाचे नसेल तर बांधू नका त्याच्यासाठी पर्याय आहेत. त्याप्रमाणे जॅक्वेल बांधता येते अशी पध्दत नाशिक येथील गंगापूर डॅमवर झालेली आहे. आपण समक्ष पहाणी करावी. कारणे दाखवून वेळ वाया घालवू नये काम तांतडीने सुरु करावे.

म. अभियंता — विद्युत पुरवठयाबाबत एम.एस.ई.बी.च्या अधिका-यासमवेतही बैठक होणे आवश्यक आहे. देवपूर भागात ड्रेनेज सिस्टीम मुळे पावसाळयापूर्वी रस्ते दुरुस्ती करणेसाठी आपण एम.जी.पी. व ठेकेदारांची तांतडीची बैठक सभापती महोदयांकडे बोलावू. सन्मा. सदस्य श्री. सईद बेग यांच्या भागात नवीन पाईप लाईन टाकावयाची आहे. त्याबाबतच्या खर्चाचा प्रस्ताव आम्ही स्थायी समितीपुढे सादर करु. तसेच दुषित पाण्याबाबत येत्या 8 दिवसांत निश्चित कार्यवाही करु. सन्मा. सदस्य श्री. कमलेश देवरे यांनी सांगितले की त्यांच्या भागात एका जलकुंभावरुन पाणीपुरवठा होतो. आता त्या भागात तुळशीरामनगर व क्षिरे कॉलनी येथे 2 जलकुंभ झालेले आहेत. क्षिरे कॉलनीचा जो परिसर आहे. त्यांना पाणी मिळत नाही त्या टाकीची टेस्टींग झालेली असून त्यांचे वितरण बाकी आहे. नवीन 7 जलकुंभ झालेले आहे. त्यात कनेक्शन जोडणे व अन्य कामे बाकी आहेत. याबाबत एम.जी.पी.च्या अधिका-यांची बैठक घेवून 2 महिन्यांत कार्यवाही केली जाईल. सन्मा. सदस्या हिनाताई पठाण यांनी रमजान महिन्यांत नियमित पाणी देणेबाबत सूचित केले आहे दरवर्षी प्रमाणे याबाबत नियोजन करण्यांत येईल. सन्मा. सदस्या भारतीताई माळी यांनी आपण 8 दिवसाआड पाणी देतो म्हणून पाणीपट्टी कमी करण्याबाबत सूचित केले आहे.सदरचा निर्णय हा प्रशासनाचा आहे.काही भागात पाईप लाईपजोडावयाच्या आहेत एम.जी.पी. मनपा मार्फत बैठक घेवून तांतडीने सदरचे काम करण्यांत येईल.तसेच देवपूर भागातील काही कॉलन्यामध्ये पाईप लाईन टाकल्या गेलेल्या आहेत त्या जोडण्यासाठी साधारणत:1 महिना लागेल. इतर क्रास कनेक्शन जोडले तर भागात पाणी सुरळीत होईल. सन्मा. सन्मा.सदस्या पुष्पाताई बोरसे यांनी पाण्याची वेळ निश्चित नसल्याबाबत तक्रार केलेली आहे.परंतु विद्युत पुरवठा खंडीत झाल्याने पाणी वेळेवर देण्यास अडचणी निर्माण होतात.त्याबाबत आपण वेळ ठरवून घेवू.

म. भारतीताई माळी — दोंदे कॉलनी भागात पाणी आल्यावर मी आपल्यला फोन करेन तेथे काही निवडक भागातच पाणी मिळते. इतर ठिकाणी पाणी मिळत नाही याचे कारण काय?

म.अभियंता — मी तेथे समक्ष येवून पहाणी करेन. पाणीपुरवठयाबाबत आम्ही सर्व गोष्टी करत आहोत. परंतु काही गोष्टींची आम्हाला मर्यादा आहे. आपल्याकडे मानधनावरील व्हॉलमन व अभियंता आहेत. त्यांचा ठराव झालेला आहे परंतु अद्याप पावेतो आदेश प्राप्त झालेला नाही. त्याबाबत कार्यवाही करावी.हनुमान टेकडी व मालेगांवरोड पंपींग स्टेशन येथे पाणी वितरणात अडचणी येतात त्याठिकाणी आम्ही स्वतंत्र अभियंता नेमतो आहोत. पाणी सोडण्यांच्या वेळा किती वेळ पाणी सोडले यांचे स्वतंत्र नोंदवही ठेवण्यांत येत आहे. व त्यावर नागरीकांच्या स्वाक्ष-या घेण्यांत येतील. पाईप लाईन लिकेजे किंवा विद्युत पुरवठा खंडीत झाला तरच पाणी वितरणात अडचणी येतात आम्ही प्रामाणिकपणे नियोजन करुन व्यवस्था करीत आहोत. तसेच तापी योजनेवर सुलवाडे बॅरेज आहे तेथे 27 गेट आहे. सदर गेट एकाच वेळी उघडल्यास आपल्याला पाणी मिळत नाही याबाबत संबंधित विभागाला आताच पत्रव्यवहार करुन याबाबत नियोजन करावे लागेल. तसेच दरवर्षी या दिवसात शहरास पिवळसर पाणीपुरवठा होतो यासाठी तेथील

| | |
|---|---|
| | फिल्टरेशन प्लॅंट येथील गाळ काढणे व स्वच्छता करणे हे काम करावे लागणार आहे.त्यासाठी येत्या शनिवार व रविवारी हे काम होईल. त्यासाठी पाणीपुरवठा बंद करावा लागेल . |
| म.सभापती | पाणी पुरवठयाचा प्रश्न गंभीर आहे.उन्हाळयांचे दिवस आहे नागरीकांना अडचणी निर्माण होतात यासाठी स्वतंत्र तक्रार निवारण कक्ष स्थापन करावा तेथे 24 तास तक्रारी घेण्यासाठी कर्मचारी नियुक्त करावा वआलेल्या तक्रारीचे तांतडीने निराकरण करण्यांची कार्यवाही करावी. तसेच याबाबत व्यापक स्वरुपात प्रसिध्दी द्यावी. |
| म. अमोल मासुळे | मी माझा प्रश्न पुन्हा मांडतो आहे. मिल परिसरात व मेनलाईनवर हजारो अवैध नळ कनेक्शन आहेत. आता पर्यंत किती नळ कनेक्शन शोधले किती जणावर कार्यवाही केली. आम्ही प्रश्न उपस्थित करुनही जर कार्यवाही होत नसेल तर ही दुदैवी बाब आहे. धुळेकर नागरीकांना 4 दिवसात पाणी मिळाले नाही आणि उपाय योजना झाल्या नाहीत तर नागरीकांच्या रोषास आम्हाला सामोरे जावे लागेल.याबाबत उपाय योजना व कार्यवाही सक्षमपणे होणे गरजेचे आहे. |
| म. सभापती | आताच प्रशासनाच्या वतीने नियोजनाबाबत आश्वासित केलेले आहे. आपण पुनश्च याबाबत बैठका घेवून केलेल्या कार्यवाहीचा आढावा घेणार आहोत. प्रशासनाने याबाबत गंभीरतेने पुढील काळात कार्यवाही करावी व त्याबाबतचा अहवाल स्थायी समितीपुढे सादर करावा. |
| म. शितल नवले | सभापती सो.आपण प्रशासनाच्या ही अडचणी समजावून घेतल्या पाहिजे श्री. शिंदे सो.वारंवार सांगत आहेत त्यांच्या कडील कर्मचारी इंजिनिअर व्हॉलमन, 4चतुर्थश्रेणी कर्मचारी तुम्ही आस्थापना विभागाकडे लक्ष् घतले पाहिजे.मी नाईक मॅडमाशी बोललो हा तुमच्या लेव्हलचा प्रश्न आहे.त्यांना ऑर्डर दिल्या पाहिजे नवीन आकृतीबंध मध्ये 24 इंजिनिअर घेण्यांची प्रोवहीजन आहे. 24 इंजिनिअर आजच्या आज लावू शकत नाही. त्यामुळे यांना ऑर्डर देऊन यांच्याकडून काम करुन घेवू शकतो. श्री. शिंदे साहेबांवर संपूर्ण शहराची जबाबदारीआहे. |
| म. सभापती | श्री.शितलभाऊ आस्थापनावर आजपर्यंत जास्तीचा खर्च आहे. जो पर्यत आस्थापना खर्च खाली येत नाही. तो पर्यत नव्याने भरती करता येणार नाही असे शासनाने आपल्याला लेखी दिलेले आहे. आऊट सोर्सींगव्दारे इंजिनिअर वाढविले तर ते आपल्याला प्राप्त होतील तर ते आपल्याला कामात येवू शकतात आणि आस्थापना विभागाने 24 इंजिनिअर बाबत काय कार्यवाही केली त्याबाबत माहिती सांगावी |
| म. कार्यालय अधिक्षक | आपल्या आकृती बंधानुसार सिव्हील इंजिनिअर 24 पदे भरु शकतो. त्यांचे अर्ज आपण मागविले आहे त्यांची छाननी करुन मानधन तत्वावर भरु कार्यरत इंजिनिअर आहेत त्यांचा अहवाल प्राप्त झालेला आहे त्यावर कार्यवाही सुरु आहे त्यांना 5 दिवसाचा खंड देवून आदेश लवकर देण्यांत येईल. |
| म. शितल नवले | मला एक सांगा याची इन्टर व्हयु कधी घेतली होती किती महिने झाले. |
| म. कार्यालय अधिक्षक | त्यांचे अर्ज मागविले होते बांधकाम विभागाला यादी देऊन यांची मुलाखत घेवून अर्जाची छाननी करुन अहवाल सादर करा. |
| म. अभियंता | आस्थापना विभागामार्फत वर्तमान पत्रात जाहिरात दिली होती. आस्थापना विभागाने आमच्या विभागाला अर्ज जमा करण्यासाठी व छाननी करण्यासाठी कळविले होते. परंतु सदरचे काम आमच्याकडे अतिरिक्त कर्मचारी नसल्याने आमच्या विभागात होऊ शकत नाही व विभागात मानधनावरील अभियंते आहे त्यांचेच अर्ज त्याच्यात असल्याने छाननी योग्य प्रकारे होणार नाही. आस्थापनाने छाननी करुन व यादी प्रसिध्द करुन मुलाखती घेणे उचित राहील. |
| म. शितल नवले | ही कार्यवाही 7—8 महिन्यांपासून सुरु आहे लवकरात लवकर मुलाखती घेवून इंजिनिअर भरती करा. |
| म. सभापती | श्री. गोसावी सो.आपण प्रशासनाच्या वतीने पाणीपुरवठा विषयाबाबत खुलासा सादर करावा. |

| | |
|---|---|
| म. उपायुक्त | या बैठकीत सदस्यांनी चांगल्या सुचना मांडलेल्या आहेत याबाबत अभियंता यांनी यातील काही बाबी बाबत स्पष्टीकरण सादर केले आहे. सन्मा. सदस्य श्री. नागसेन बोरसे यांनी चांगला मुद्दा मांडलेला आहे.आपल्याकडील अनुभवी कर्मचारी कमी झाल्याने यंत्रणेवर ताण आलेला आहे. आपल्याला सेवानिवृत्त कर्मचारी सरळ घेता येणार नाही परंतु यासाठी कमीशन बेसेसवर एजन्सी मार्फत असे कर्मचारी घेणेबाबत कार्यवाही करता येवू शकेल. आपण याबाबत इतर महानगरपालिकेची माहिती घेवू.त्याप्रमाणे आस्थापना विभागाने प्रस्ताव तयार करावा. लिकेज बाबत आपण एजन्सी नियुक्त केलेली आहे. मी माझ्या अधिकारात याबाबत तपासणी करुन घेतो. श्री. अमोल मासुळे यांनी अवैध नळ कनेक्शनबाबत मुद्दा उपस्थित केला आहे. जो नागरीक नियमित पाणीपट्टी भरतो त्याला पाणी मिळत नाही आणि अवैध कनेक्शन धारकांना पाणी सुरु असते. यामध्ये लक्ष घालावे लागेलआपल्याकडे कर्मचा-यांवर मर्यादा आहे. यासाठी ऑऊट सोर्सींग व्दारे अवैध नळ कनेक्शन शोधणे, नियमित करणे, यासाठी अभियंता यांनी प्रस्ताव सादर करावा. सन्मा.सदस्य अमीन पटेल यांनी जलकुंभावर सी.सी.टी.व्ही कॅमेरे लावणेबाबत मुद्दा उपस्थित केला आहे ते फार गरजेचे आहे त्याव्दारे नागरीक व कर्मचा-यावर देखील नियंत्रण ठेवता येईल.सन्मा. सदस्य श्री. शितलभाऊ यांनी वॉटर कन्सटंट नेमणेबाबत सूचित केले आहे. याबाबत प्रेझेंटेशन झालेले आहे. ते खूप चांगल्या प्रकारे होते आता नवीन कार्यपध्दती व प्रणाली विकसीत झालेली आहे पूर्वी पेक्षा आता टेक्नॉलाजीचा वापर केल्याने मनुष्यबळ कमी प्रमाणात लागते. तसेच नवीन अपडेट राहता येते. सदर प्रस्ताव लवकर सादर करण्यांत येईल. आपणी तापी योजनेचा पांढरा हत्ती पोसत आहोत वांरवार पाईप लाईन लिकेज होणे या सारख्या बाबीमुळे अडचणी निर्माण होतात. यासाठी अर्थसंकल्पात आवश्यक ती तरतूद करण्यांचा मुद्दा अतिशय योग्य आहे. त्याप्रमाणे कार्यवाही करण्यांत येईल. आपले कर्मचारी तांत्रिकदृष्टया अपडेट नाहीत त्यामुळे त्यांना प्रशिक्षण देणे देखील आवश्यक आहे. आता रजमान महिना सुरु होत आहे. आपण मागील वर्षी चांगल्या प्रकारे नियोजन करुन पाणी वितरण केले होते. आता देखील आपल्या सर्वाच्या मदतीने पाणी वितरणाचे नियोजन करण्यांत येईल. पाणीपुरवठया विषयी जी विशेष बैठक घेतली त्याबद्दल मी सभापती महोदयांचे अभिनंदन करतो. कारण प्रशासनाच्या काही चुका व त्रुटी असतील आपल्या सुचना नुसार त्या दूर करता येतील.आपण जो तक्रार निवारण कक्षाचा मुद्दा उपस्थित केला आहे तो अतिशय चांगला आहे. त्यामुळे नगरसेवक व नागरीकांच्या तक्रारीचे तांतडीने निराकरण करणे शक्य होणार आहे. आपण या ठिकाणी जे मुद्दे उपस्थित केले त्यावर प्रशासनाच्या वतीने निश्चित कार्यवाही करु.अभियंता यांच्यावर कामाचा फार मोठा भार आहे. शासनाकडून प्रतिनियुक्तीवर अभियंता घेण्यांची तरतूद आहे. आपल्याकडे सरळ सेवेने भरण्यासाठी आस्थापना खर्चाची अट निर्माण होते. याबाबत शासनाकडून पाठपुरावा करावा व प्रतिनियुक्तीवर पदे भरण्यासाठी प्रयत्न करावे अशी मी विनंती करतो. आपण पुन्हा मिटींग घेवून आढावा घेणार आहोत. आजच्या चर्चेत जे जे विषय आले त्याचा अजेंडा बनवा. आराखडा तयार करा व कामाचे नियोजन करा. मागील त्रुटी दूर करण्यासाठी कार्यवाही करावी आपल्याला पुढील चार महिन्यांत नियमित पाणीपुरवठा करावयाचा आहे त्यासाठी आपण ज्या सुचना दयाल त्यांचे प्रशासनाच्या वतीने निश्चित पालन केले जाईल. |
| म. अमिन पटेल | अक्कलपाडा योजनेत पाईप लाईनला कलरींगचे काम घेतलेले होते. त्यांचे काय झाले. |
| म. शितल नवले | सदर कंपनीचे नांव काय. |
| म. अभियंता | मी आपल्या याबाबत पूर्ण माहिती देतो. श्री.एन.के.बागुल यांनी सदर काम पाहिलेले आहे ते यासंदर्भात अधिक माहिती देतील. |

म.एन.के. बागुल — सद्या हनुमान टेकडी , मालेगांव टाकी व इतर ठिकाणी आपले 7 पंपींग स्टेशन आहेत त्या सर्व ठिकाणी कंपनीने व्हिजीट केलेली आहे. त्यांचे एनर्जी सेव्हींगचे जे टारगेट आहे त्यात आपले जे पंप आहे. त्यांची कार्यक्षमता कमी झालेली आहे. एनर्जी कन्झमशन जास्त आहे. त्यामुळे मोटार बदलणे, पंप बदलणे हे त्यांचे टारगेट आहे. त्यांचा सर्व कॅपीटल खर्च कंपनी करणार आहे. त्या ठिकाणचा स्टॉप पंप आपरेटर, इलेक्ट्रीशियन हे त्यांचे असणार आहे. आपण त्यांना विद्युत बिलाच्या बचतीतून 10 वर्षात पैसे दयावयाचे आहे. तो पर्यत सदर कंपनी पूर्ण ऑपरेटर करेल आणि दर तासाची रिडींग , दर तासाचे प-लोमिटर हे सुध्दा आपल्याला अपडेट मिळेल अशा प्रकारे हा प्रोजेक्ट आहे. सद्यस्थितीत जोतपूरला त्यांचे काम सुरु आहे. त्यांनी त्यांच्या प्रोजेक्टची व्हिजीट करण्याबाबत कळविलेले आहे. मध्यप्रदेश सरकारने सदर कंपनीला तेथील सर्व नगरपरिषदांची ऑर्डर दिलेली आहे.

आपण शुक्रवारी रात्री बांभळे जलशुध्दीकरण केंद्रावरील क्लोरीफ्लॅक्युलेटरची स्वच्छता करणार आहोत. त्या दिवशी आपण रात्री पासून पाणीपुरवठा बंद ठेवणार आहोत. त्याच बरोबर तापी योजनेचे लिकेजेस व शहरातील जलकुंभाची साफसफाई आपण करणार आहोत. रविवारी रात्रीपासून पाणी सुरु करण्यांत येईल कृपया याची नोंद घ्यावी ही विनंती.

म. सभापती — सन्मा. सदस्यांनी अतिशय महत्वाच्या सुचना मांडलेल्या आहेत प्रशासनाने आपल्याला पूर्णपणे सहकार्य करण्यांचे मान्य केलेले आहे. सर्व सन्मा.सदस्यांनी देखील प्रशासनाशी समन्वय ठेवून अडचणी समजावून घेवून त्यावर आपल्याला मात करावयाची आहे. आपण पुन्हा 15 ते 20 दिवसांत केलेल्या कार्यवाहीचा आढावा घेवू.

**धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर २७ दिनांक ६/४/२०२१**

आज झालेल्या पाणीपुरवठा वितरणासंदर्भातील आयोजित विशेष स्थायी समितीच्या बेठकीत सन्मा. सदस्यांनी केलेल्या सुचनानुसार खालील प्रमाणे निर्णय घेण्यांत येत आहे.

१) जुन्या अनुभवी सेवा निवृत्त तांत्रिक कर्मचा-यांना नियुक्त करणेबाबत नियम तपासून कार्यवाही करावी.

२) शहरातील मुख्य वितरण वाहिनीवरील अवैध नळ कनेक्शन बंद करणेबाबत कार्यवाही करावी. तसेच शहरातील मोठे हॉस्पिटलस येथेही अवैध नळ कनेक्शन शोधून बंद करण्यात यावे.

३) शहरातील जलकुंभावर सी.सी.टी.व्ही कॅमेरे बसविण्यात यावे.

४) शहरात ज्या नळाना तोटया नाहीत त्या नळ धारकांनावर दंडात्मक कार्यवाही करावी व तोटया बसविण्यात यावे.

५) पाणी पुरवठयासाठी वॉटर कॅन्सलटंन्ट नियुक्तीबाबत तातडीने कार्यवाही करावी.

६) पाणी पुरवठाच्या कामांसाठी व तज्ञ मार्गदर्शकाच्या अभिप्रायानुसार आवश्यक ते बदल व दुरूस्ती करण्यासाठी अंदाजपत्रकात १५ कोटी मात्र तरतूद करण्यात यावी.

७) तापी योजना व पंपीग स्टेशनवरील पंप बदलणे व अद्ययावत करणे यासाठी संबंधित कंपनीकडे तातडीने पाठपुरावा करून कामास गती द्यावी याबाबत युध्दपातळीवर कार्यवाही करावी.

८) शहरात यु.डी.आय.एस.एस.एम.टी.योजनेअंतर्गत नवीन जलकुंभ उभारणी झालेली असून सदर जलकुंभ तातडीने कार्यान्वित करणेबाबत कार्यवाही करावी.

९) पाणी वितरणाबाबत महाराष्ट्र जिवन प्राधिकरण मंडळाचे अधिकारी व मनपा अधिकारी यांची संयुक्त बैठक घेण्यात यावी.

१०) पाणी वितरण व्यवस्थेमधील वारंवार खंडीत होणार विद्युत पुरवठा यासाठी संबंधित अधिकारीची बैठक आयोजित करण्याची कार्यवाही करावी.

११) शहरातील लिकेंजेस बाबत तात्काळ प्रभावी व गतीमान कार्यवाही करावी.

१२) पाणी पुरवठाच्या तक्रारी निवारण करण्यासाठी धुळे महानगरपालिकेमार्फत तात्काळ २४ तास तक्रार निवारण कक्ष सुरू करण्यात यावा.तसेच येणाऱ्या तक्रारीचे तात्काळ निराकरण करावे व याबाबत सन्मा.सदस्यांना अवगत करावे व माहितीसाठी व्यापक प्रसिध्दी द्यावी.

१३) पाणी पुरवठाचा प्रश्न लक्षात घेता मानधनावर नविन अभियंता नियुक्तीसाठी आस्थापना विभागामार्फत तात्काळ कार्यालयीन प्रक्रिया करून कार्यवाही करावी.

१४) सन्मा.सदस्यांनी बैठकीत उपस्थितीत केलेल्या मुद्दे व तक्रारीची नोंद घेवून सदर तक्रारी तात्काळ निराकरण करावेत.

१५) शहरातील पाणी वितरणाचे सुक्ष्म नियोजन करून प्रत्येक जलकुंभासाठी स्वतंत्र अभियंताची नियुक्ती करावी. तसेच वितरणाबाबत नियोजन करून आराखडा तयार करावा व याबाबत सर्व सन्मा.सदस्यांना अवगत करावे व त्यास व्यापक प्रसिध्दी द्यावी.

उक्त बाबत संबंधित विभागाने कार्यवाही करावी व त्याबाबत आराखडा तयार करुन नियोजन करावे.तसेच केलेल्या कार्यवाहीचा अहवाल पुढील होणा-या आढावा बैठकीत सादर करावा.

**सर्वानुमते मंजुर,**
**सही/-x x x**
**सभापती,**
**स्थायी समिती,**

**धुळे महानगरपालिका, धुळे**

# धुळे महानगरपालिका,धुळे

## नगरसचिव कार्यालय

## स्थायी समिती सभा क्रमांक ८ चे इतिवृत्त

---

**धुळे मनपा भारतरत्न अटलबिहारी वाजपेयी सभागृह**
**गुरुवार दिनांक १५/०४/२०२१**
**वेळ :- सकाळी ११-०० वाजता.**

धुळे महानगरपालिका स्थायी समितीची साप्ताहिक सभा आज गुरुवार दिनांक १५/०४/२०२१ रोजी सकाळी ११-०० वाजता **मा.श्री संजय सुधाकर जाधव, सभापती,** स्थायी समिती, मनपा, धुळे यांच्या अध्यक्षतेखाली **धुळे मनपा भारतरत्न अटलबिहारी वाजपेयी सभागृह** भरली.स्वाक्षरी बुकावर सही करुन खालील सन्मा.सदस्य सभागृहात हजर होते.

| अ.क्रं. | सदस्यांचे नांव | हुद्दा |
|---|---|---|
| १ | श्री. जाधव संजय सुधाकर | सभापती |
| २ | श्रीमती माळी भारती अशोक | सदस्या |
| ३ | श्रीमती पाटील मंगला सुरेश | सदस्या |
| ४ | श्रीमतजी बोरसे पुष्पा प्रकाश | सदस्या |
| ५ | श्री. मासुळे अमोल पावबा | सदस्य |
| ६ | श्री. देवरे कमलेश नारायण | सदस्य |
| ७ | श्रीमती पठाण हिना अस्लम | सदस्या |
| ८ | श्री. सईद बेग हाशम बेग | सदस्य |
| ९ | श्री. नवले शितल मोहन | सदस्य |
| १० | श्री. बोरसे नागसेन दामोदर | सदस्य |
| ११ | श्रीमती कुलेवार किरण राकेश | सदस्या |
| १२ | श्रीमती चौधरी मंगला अर्जुन | सदस्या |
| १३ | श्री. पटेल अमीन अब्दुल करीम | सदस्य |

उपस्थित अधिकारी गण

| अ.क्र. | अधिकाऱ्यांचे नाव | हुद्दा |
|---|---|---|
| १ | श्री. गणेश गिरी | अति. आयुक्त |
| २ | श्रीमती शिल्पा नाईक | उपायुक्त |
| ३ | श्री. तुषार नेरकर | सहा. आयुक्त |
| ४ | श्री. विनायक कोते | सहा. आयुक्त |
| ५ | श्री मनोज अरविंद वाघ | प्र.नगरसचिव |
| ६ | श्री. के.एन. शिंदे | अभियंता |
| ७ | श्री. चंद्रकांत जाधव | सहा.आरोग्याधिकारी |
| ८ | श्री. पी.डी नाईक | लेखापाल |

| | | |
|---|---|---|
| ९ | श्री. एन.पी. सोनार | इस्टेट मॅनेजर |
| १० | श्री. प्रकाश सोनवणे | ओव्हरसिअर नगररचना विभाग |
| ११ | श्री.आर.बी. सोनवणे | प्र.परवाना अधिक्षक |
| १२ | श्री. रजमान अन्सारी | प्र. कार्यालय अधिक्षक |
| १३ | श्री. बी. एस. रनाळकर | प्र.सहा.कर मूल्य निधारण अधिकारी |
| १४ | श्री. एन.के. बागुल | विद्युत अभियंता |
| १५ | श्री. पी.डी. चव्हाण | ओव्हरसिअर बांधकाम |
| १६ | श्री. सी.सी. बागुल | पा. पु. ओव्हरसिअर |
| १७ | श्री. हेमत पावटे | ओव्हरसिअर बांधकाम विभाग |
| १८ | श्री.एस.एन. देसले | लिपीक मनपा शिक्षण मंडळ |
| १९ | श्री. राजू माईनकर | भांडारपाल |
| २० | श्री. किशोर सुडके | बाजार विभाग |
| २१ | श्री. प्रसाद जाधव | अति. विभाग |
| २२ | श्री. सुक्राम आत्या राऊत | वाहन विभाग लिपीक |

म.सभापती सर्व उपस्थित सन्मा.सदस्य अति.आयुक्त सो. अधिकारी वर्ग छायाचित्रकार बांधव सभेचे कामकाज चालविणेसाठी आवश्यक तो कोरम पूर्ण झाल्याने नगरसचिव यांनी सभेचे कामकाज सुरुवात करावी.

म. नगरसचिव वंदे् मातरम् या राष्ट्रवंदनेसाठी सर्वांनी उभे रहावे.

**सन्मा. सदस्यांकडून आलेली श्रध्दांजलीची यादी**

धुळे महानगरपालिकेचे विद्यमान नगरसेवक श्री. बन्सीलाल जाधव यांच्या मातोश्री तसेच धुळे महानगरपालिकेच्या माजी नगसेविका चंद्रकला माणिकराव जाधव यांचे दि. 11/4/2021 रोजी दु:खद निधन झाले. त्यांना आज रोजीच्या स्थायी समिती सभेत श्रध्दांजली वाहून तसा ठराव पारीत करण्यांत यावा.

सुचक :- श्री. अमोल पावबा मासुळे

म. सभापती सनमा. सदस्यांच्या यादीनुसार श्रध्दांजली अर्पण करणेसाठी दोन मिनिटे मौन उभे रहावे.

**धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर २८ दिनांक १५/०४/२०२१**

धुळे महानगरपालिकेचे विद्यमान नगरसेवक श्री. बन्सीलाल जाधव यांच्या मातोश्री तसेच धुळे महानगरपालिकेच्या माजी नगसेविका चंद्रकला माणिकराव जाधव यांचे दि. ११/४/२०२१ रोजी दु:खद निधन झाले.

मान्यवरांचे दु:खद निधनामुळे या सभेस आतीव दु:ख होत आहे ही सभा त्यांचे कुटुंबियांच्या दु:खात सहभागी असून मृत आत्म्यास चिरशांती प्रदानार्थ दोन मिनिटे मौन राहून भावपूर्ण श्रध्दांजली समर्पित करण्यांत येत आहे.

**सर्वानुमते मंजुर,**

सही/-X X X

**सभापती,**

**स्थायी समिती,**

**धुळे महानगरपालिका,धुळे**

**सभेच्या सुरुवातीस सन्मा. सदस्यांकडून आलेले रजेचा अर्ज.**

सन्मा. सदस्य श्री. सुनिल तुळशीराम बैसाणे, व श्री. बन्सीलाल माणिक जाधव यांनी आजच्या सभेस अर्जात नमूद केलेल्या कारणामुळे उपस्थित राहू शकत नसल्याने रजा मंजूर करणेबाबत विनंती अर्ज सादर केलेला आहे.

म. सभापती सन्मा. सदस्यांच्या विनंती अर्जानुसार आजच्या सभेस रजा मंजूर करण्यांत येत आहे.

**धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर २९ दिनांक १५/४/२०२१**

सन्मा. सदस्य श्री. सुनिल तुळशीराम बैसाणे, व श्री. बन्सीलाल माणिक जाधव यांनी आजच्या सभेस अर्जात नमूद केलेल्या कारणामुळे उपस्थित राहू शकत नसल्याने रजा मंजूर करणेबाबत विनंती अर्ज सादर केलेला आहे. सन्मा.सदस्यांच्या विनंती अर्जानुसार आजच्या सभेस रजा मंजूर करण्यांत येत आहे.

**सर्वानुमते मंजुर,**

सही/-X X X

**सभापती,**
**स्थायी समिती,**
**धुळे महानगरपालिका,धुळे**

विषय क्रमांक :- २८ मागील स्थायी समिती सभेचे इतिवृत्त वाचून कायम करणे.( दि.25/3/2021)

म.नगरसचिव नगरसचिव यांनी विषयांचे वाचन केले.

म.अमोल मासुळे इतिवृत्त वाचून कायम करण्यांत यावे.

म. सभापती सर्व सन्मा. सदस्यांच्या सहमतीने मागील स्थायी समिती सभेचे इतिवृत्त क्रमश: वाचून कायम करण्यांत येत आहे.

**धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर ३० दिनांक १५/४/२०२१**

मागील स्थायी समिती दिनांक २५/३/२०२१ रोजीच्या सभेतील धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर 11 ते 18 अखेर तसेच सभेत उपस्थित झालेली चर्चा व त्यावरील निर्णय क्रमश :वाचून कायम करण्यांत येत आहे.

सही/-X X X

**सभापती,**
**स्थायी समिती,**
**धुळे महानगरपालिका,धुळे**

विषय क्रमांक:- २९ मा. आयुक्त सो. यांना असलेल्या अधिकारानुसार रु. 5 लाख ते 25 लाखापर्यंत कार्यादेश दिलेले कार्यादेश (बांधकाम विभागाकडील) कामांची यादी अवलोकनार्थ सादर (दि. 24/2/21 ते 31/3/21)

म.नगरसचिव नगरसचिव यांनी विषयांचे वाचन केले.

म. नागसेन बोरसे या यादीतील अनुकंमांक 343 वर प्री बजेटचे काम आलेले आहे. आपण ते मंजूर करणार आहोत का?

म. नगरसचिव सदर अवलोकनार्थ सादर झालेली कामे मा. आयुक्तांनी त्यांच्या अधिकारात मान्यता दिलेली आहे. व सदर बाब फक्त अवलोकनार्थ स्थायी समितीपुढे सादर झालेली आहे.

म. नागसेन बोरसे तर आपण मंजूर शब्द याठिकाणी वापरु नये.

म.सभापती मा. आयुक्त सो.यांना असलेल्या अधिकारानुसार रु. ५ लाख ते २५ लाखापर्यंत मंजुरी दिलेल्या बांधकाम विभागाकडील कार्यादेशाची वाचून माहिती देण्यांत आली.

**धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर ३१ दिनांक १५/४/२०२१**

मा.आयुक्त सो.यांना असलेल्या अधिकारानुसार रु.5 लाख ते 25 लाखापर्यंत कार्यादेश दिलेले कार्यादेश(बांधकाम विभागाकडील)कामांची यादी अवलोकनार्थ सादर (दि.24/2/21 ते 31/3/21) धुळे महानगरपालिका धुळे (बांधकाम विभाग)

दिनांक :- दि.24/02/2021 ते दि.31/03/2021 अखेर निर्गमित केलेल्या विकास कामांच्या कार्यादेशची यादी

| अ. क्र. | कार्यादेश क्रमांक | दिनांक | कामाचे नाव | रक्कम | निधी |
|---|---|---|---|---|---|
| 1 | 318 | 24/02/2021 | प्र.क्र.13 मध्ये रहमानिया मस्जिद ते युनुस शेठ घरापर्यंत रस्ता कॉंक्रीट करणे बाबत. | 8,70,466/- | मनपा निधी अंतर्गत |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| 2 | 324 | 26/02/2021 | प्र.क्र.14 पत्रकार कॉलनी भागात श्री.रविंद्र यांच्या घरापासून ते श्री.भालेराव यांच्या घरापर्यंत कॉक्रीट रस्ता करणे. | 8,00,212/- | मनपा निधी अंतर्गत |
| 3 | 325 | 26/02/2021 | श्री.फारुख शाह अन्वर शाह आमदार धुळे शहर यांचे निधीतून प्र.क्र.18 मध्ये सतीश लोखंडे यांचे घर ते प्रियामीस ते संतोष अग्रवाल यांच्याघरापावेतो बंदिस्त गटार करणे. | 9,99,796/- | आमदार निधी अंतर्गत |
| 4 | 328 | 08/03/2021 | धुळे मनपा हद्दीतील प्र.क्र.5 मधील नकाणे रोड वरील गवळी समाज स्मशान भूमी येथे पेव्हिंग ब्लॉक बसविणे. | 6,27,536/- | मनपा निधी अंतर्गत (अमरधाम दफनभूमी दुरुस्ती) |
| 5 | 330 | 10/03/2021 | प्र.क्र.18 मोहाडी भागात गावडे वस्ती मध्ये रस्ता कॉक्रीट करणे. | 5,28,350/- | मनपा निधी अंतर्गत |
| 6 | 331 | 10/03/2021 | डेडरगाव जलशुद्धीकरण केंद्रावर नविन क्लोरीन गॅसचे क्लोरीनेटर बसविणे. | 5,59,213/- | मनपा निधी अंतर्गत (पंपिंग स्टेशन दुरुस्ती अंतर्गत ) |
| 7 | 343 | 12/03/2021 | देवपूर भागातील प्र.क्र.2 मधील विद्या नगर भागातील 1)प्लॉट नं.1 ते प्लॉट नं.31 पावेतो 2)प्लॉट नं.112 ते प्लॉट नं.159 पावेतो 3) प्लॉट नं.125 ते प्लॉट नं.141 पावेतो 4) प्लॉट नं.188 ते प्लॉट नं.192 पावेतो गटार करणे. | 24,98,427/- | मनपा निधी अंतर्गत (प्री बजेट) |
| 8 | 364 | 25/03/2021 | प्र.क्र.19 अंबिका नगर येथे मस्जिद मिसबाह पासून ते इब्राहीम मस्जिद ते जुना वडजाई रोड पावेतो कॉक्रीट रोड करणे. | 12,96,469/- | आमदार स्थानिक विकास कार्यक्रम अंतर्गत |
| 9 | 365 | 25/03/2021 | प्र.क्र.11 मध्ये बोरसे कॉलनी येथे वडजाई रोड ते जुनेश शहा यांचे घरापर्यंत रस्ता कॉक्रीटीकरण करणे. | 19,96,887/- | आमदार स्थानिक विकास कार्यक्रम अंतर्गत |
| 10 | 366 | 25/03/2021 | प्र.क्र.19 अंबिका नगर येथे मोहम्मद युनुस मोहम्मद अयुब यांच्या घरापासून ते एस. के. गनी यांच्या घरापर्यंत व नूर किराणा यांच्या घरापासून ते जुना वडजाई रोड पावेतो कॉक्रीट गटार तयार करणे. | 11,99,232/- | आमदार स्थानिक विकास कार्यक्रम अंतर्गत |
| 11 | 367 | 26/03/2021 | प्र.क्र.19 मध्ये अंबिका नगर येथे तौकीर अहमद यांच्या घरापासून ते हादी मेडिकल पावेतो कॉक्रीट गटार करणे. | 14,99,497/- | आमदार स्थानिक विकास कार्यक्रम अंतर्गत |
| 12 | 368 | 26/03/2021 | प्र.क्र.19 मध्ये हाफिज सिद्दिक नगर येथे दस्तगीर शेख यांच्या घरापासुन ते युसुफ चाचा यांच्या घरापावेतो व अख्तर हाजी यांच्या घरापासून ते मुन्ना शेठ यांच्या कारखान्यापर्यंत आणि दुल्हन मंडप ते इबने मसूद मदरसा पर्यंत कॉक्रीट गटार करणे. | 14,96,272/- | आमदार स्थानिक विकास कार्यक्रम अंतर्गत |
| 13 | 369 | 26/03/2021 | प्र.क्र.19 मध्ये अंबिका नगर येथे अन्नू मार्बल यांचे दुकानापासून ते कलीम भाई यांचे घरापावेतो कॉक्रीट गटार करणे. | 14,96,347/- | आमदार स्थानिक विकास कार्यक्रम अंतर्गत |
| 14 | 375 | 26/03/2021 | प्र.क्र.6 मध्ये महिंदळे येथे इच्छापूर्ती कॉलनी,अनिरुद्ध नगर भागात बंदिस्त गटार करणे. | 20,01,236/- | मनपा निधी अंतर्गत (हद्दवाढ निधी अंतर्गत ) |

उक्त यादीचे वाचन करुन सभागृहास माहिती देण्यांत आली.

सही/-X X X

**सभापती,**

**स्थायी समिती,**

**धुळे महानगरपालिका,धुळे**

विषय क्रमांक :- ३० धुळे मनपा हद्दीतील मायक्रो जलकुंभ येथील 450 मी.मी व्यासाचा मुख्य व्हॉल नवीन बसविणेचे काम तांतडीने करण्यांत आले त्यासाठी झालेला खर्च रु. 2,95,308/- मात्रला कार्योत्तर मंजुरी देणेबाबत आलेल्या कार्यालयीन अहवालावर विचार करणे.

म.नगरसचिव नगरसचिव यांनी विषयांचे वाचन केले.

म.कमलेश देवरे विषय मंजूर करण्यांत यावा.

म.सभापती सर्व सन्मा. सदस्यांच्या सहमतीने व कार्यालयीन अहवालास अधिन राहून सदर प्रस्तावास कार्योत्तर मान्यता देण्यांत येत आहे.

**धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर ३२ दिनांक १५/४/२०२१**

धुळे मनपा हद्दीतील वडजाईरोड भागात तापी पाणीपुरवठा योजना अंतर्गत मायक्रो जलकुंभ असुन सदर जलकुंभावरून वडजाईरोड, हजार खोली,कबीर गंज,छोटा मिल्लत नगर , १०० फुटी रोड , व इतर भागातील पाणी वितरण होत असते तरी सदर जलकुंभावरील ४५० मी. मी. व्यासाचा मुख्य व्हाल हा खराब झाल्याने वरील संपूर्ण भागातील पाणी पुरवठा बंद झाला होता तरी सदरचे काम तातडीने करणे गरजेचे असल्याने सदर भागातील सन्माननीय सदस्य श्री अमिन पटेल,श्री मुख्तार मन्सुरी व अन्सारी फातमाबी नुरुल अमीन यांनी तातडीने व्हाल दुरुस्ती किंवा नवीन व्हाल बसविणे बाबत मागणी केली.त्यानुसार दि.२६/१०/२०२० रोजी मुख्य व्हाल जवळच ४५० मी.मी व्यासाचा व्हाल नविन बसविण्यात आला.सदर काम हे श्री गौरव विजय बुरकुले यांच्या कडुन करून घेण्यात आलेले असुन सदर कामास २,९५,३०८/- रु. खर्च झालेला आहे सदरचा खर्च हा हद्दवाढ गावात पाणीपुरवठा करणे तरतुद अंतर्गत करण्यात येणार असल्याने सदर खर्चास मनपा अधिनियम १९४९ चे कलम ५(२) (२) नुसार मे.स्थायी समितीची मान्यतेस्तव सादर झाला आहे.

सर्व सन्मा. सदस्यांच्या सहमतीने व कार्यालयीन अहवालास अधिन राहून सदर कामी झालेला खर्च रुपये २,९५,३०८/- मात्रला कार्योत्तर मान्यता देण्यांत येत आहे. सदर प्रस्ताव व कार्यवाहीबाबत लेखा आक्षेप निर्माण होणार नाही याची दक्षता घ्यावी. याबाबतची जबाबदारी संबंधित विभागाची राहील.

**सर्वानुमते मंजुर,**

सही/-X X X

**सभापती,**
**स्थायी समिती,**
**धुळे महानगरपालिका,धुळे**

विषय क्रमांक:-३१ — धुळे शहरातील तापी पाणीपुरवठा योजने 1500 m m, 900m m व 300m m पाईप लाईनची विविध ठिकाणी दुरुस्ती करणेचे काम तांतडीने करुन घेण्यांत आलेत, त्यासाठी झालेला खर्च रु.3,70,285/-मात्रला कार्योत्तर मंजुरी देणेबाबत आलेल्या कार्यालयीन अहवालावर विचार करणे.

म. नगरसचिव — नगरसचिव यांनी विषयांचे वाचन केले.

म.शितल नवले — सदर प्रस्तावात अति तांतडीने काम असल्याचे नमूद केले आहे. यात तापी पाईप लाईन वरील काम केल्याचे नमूद आहे. तेथे काम सुरु आहे. नेमके काय काम होत आहे हेही तपासणे गरजेचे आहे. आपण क्रास चेकींग करणे आवश्यक आहे. काम करा पण एकदाच्या गळत्या बंद करा.

म.अमोल मासुळे — या पध्दतीने अनेक विषय कार्योत्तर मान्यतेसाठी येत असतात.12 तारखेला सकाळी वृत्तपत्रात बातमी आली होती तापी योजनेच्या गळत्यांना रबर पट्टी लावून काम करण्यांत येत आहे. रबर पट्टी व कापडी पिशव्या लावून लिकेज काढण्यांत येत आहे. आपण 3 –4 लाख रुपयांच्या कामांना मंजुरी देतो.ते काम खरेच चांगल्या पध्दतीने झाले आहे का नाही हे तपासणे गरजेचे आहे. ज्या ठिकाणी गळती लागते त्याठिकाणी रबर पट्टी लावतात.मागील दोन महिन्यांत किती ठिकाणी व्हॉल रिपेअर व लिकेजेसचे काम केले याची पहाणी केली तर 100 टक्के या पध्दतीने काम केल्यांचे लक्षांत येईल.यावर नियंत्रण व क्रास चेकींग करणे आवश्यक आहे. तसेच पाईप लाईन रिपेअरींग व व्हॉल रिपेअरींगचे कामात जे काही मटेरियल निघते ते कुठे जाते त्यांची काही नोंद आहे का त्यांची स्वतंत्र रजिस्टर ला नोंद घेतली जाते का ते कोणाकडे आहे. पाणी पुरवठयाच्या किती भंगाराची विक्री झालेली आहे कधी झाली त्यांची माहिती द्यावी

| | |
|---|---|
| म. शितल नवले | या टिपणीत 1500 एम.एम 900 एम.एम. 300 एम.एम. पाईप लाईनचे लिकेज काढल्याचा उल्लेख आहे आपण किती ठिकाणी दुरुस्ती केली किती लांबीची केली त्याला एवढा खर्च लागणार होता का? मोघम मंजुरी देणे योग्य नाही. |
| म. भारती ताई माळी | वांरवार स्थायी समितीत कार्योत्तर मान्यतेचे विषय येतात. पण हे काम आपण चांगल्या पध्दतीचे करतो आहोत का? व झालेला खर्च योग्य आहे का? हा नागरीकांचा महत्वाचा प्रश्न आहे. पाणी वेळेवर देणे आपली जबाबदारी आहे. काम चांगल्या पध्दतीने करणे गरजेचे आहे. माझ्या प्रभागात डॉक्टर सचिन ढोले यांनी त्यांच्या घराजवळील लिकेजबाबत तक्रार केली होती. तेथे 10 वेळा लिकेंज काढले गेलेले आहे. अद्याप गळती सुरु आहे. आणि जबाबदार व्यक्ती जेव्हा तक्रार करते ही गंभीर बाब आहे. |
| म. सभापती | लिकेजेचे जे विषय येतील त्यावेळी आपण सदस्यांसमवेत पहाणी करु. आणि कामात जर गैरप्रकार आढला तर आयुक्तांकडे तक्रार करु. हे सर्व प्रस्ताव आयुक्तांमार्फत कार्योत्तर मान्यतेसाठी येतात. |
| म. शितल नवले | आयुक्तांच्या सहीने प्रस्ताव आलेला आहे. सदर टिपणीत सविस्तर माहिती व तपशील नमूद करणे आवश्यक आहे. संपूर्ण तापी योजनेच्या पाईप लाईनचा डायमिटर एकच वाटतो. मग 1500 एम.एम. 900 एम.एम. डायमिटरचे पाईप कुठे आहे याबाबत शंका आहे याचा खुलासा करावा. |
| म.ओव्हरसिअर पा.पु. | देवपूर ड्रायव्हर्शन नगांव बारी ते पारोळारोड चौफुली पावेतो 1500 एम.एम. ची जलवाहिनी आहे. तेथे 2 ठिकाणचे लिकेजेस व एअरव्हॉलचे काम करण्यांत आले. वरखेडीरोड येथे 300 एम.एम.ची पाईप लाईन आहे. तेंथे लिकेंजेस काढण्यांत आलेले आहे. तसेच 80 फूटी रोड डॉ. भामरे सा ो. यांच्या घरासमोर व पारोळारोड येथे लिकेजेस काढलेले आहे. काम पूर्ण झालेले असून मोजमाप करुनच बिल अदा केले जाईल. काम तांतडीचे असल्याने काम पूर्ण करण्यांत आलेले आहे. |
| म. शितल नवले | रिकन्सलेशन ऑफ मटेरियल यांचे काय करणार? जुन्या व्हॉल बाबत काय करतात? जुने मटेरियल व भंगार कुठे गेले त्याचा हिशेब लागणे आवश्यक आहे. यांत फार मोठा गैरव्यवहार दिसून येत आहे. |
| म. अमोल मासुळे | गेल्या 5 ते 7 वर्षात केलेल्या कामातील मटेरियल कुठे गेले यांची सविस्तर माहिती द्यावी. |
| म. नागसेन बोरसे | मी पूर्वी स्थायी समिती सदस्य असतांना व्हॉल दुरुस्तीच्या कामाबाबत आक्षेप घेतला होता. या 7 ते 8 वर्षात जेवढे व्हॉल बदलले त्यांचे बिले काढा. बदलले जुने व्हॉल कुठे आहे याची माहिती घ्यावी.व्हॉल बदलण्यांचे फक्त नांव केले जाते. फक्त कलरींग व दुरुस्ती करुन तसेच सापसफाई व पॉलिस करुन जुना व्हॉल लावण्यांत येतो व नव्याचे बील काढण्यांत येते. मी याबाबत माहिती घेतली आहे. एक व्हॉल वर्षानुवर्षे चालू शकतो फक्त मधील पार्ट बदलण्यांची ग्रज असते. बदललेल्या व्हॉलची नोंद आहे का? त्याचा लिलाव झालेला आहे का? याची माहिती मिळावी. |
| म. सभापती | श्री. माईनकर याबाबत तुमच्याकडे काही नोंद आहे का? भांडार विभागात अनेक जुने सामान येत असतात. त्यांची विल्हेवाट कशा पध्दतीने लावतात. त्यांचे रजिष्टर आहे का? व त्यांचा लिलाव केलेला आहे का? |
| म. शितल नवले | यापूर्वी 30 नंबरचा विषय मंजूर केला. त्यामध्ये नवीन व्हॉल बसविला का व्हॉल दुरुस्त केला.आणि जर तो बदलला असेल तर भांडार विभागात जमा झाला का? संबंधितांनी याची माहिती द्यावी. |

| | |
|---|---|
| म. श्री पावटे | जो जुना व्हॉल होता तो जागेवरच आहे. आपण त्या पाईपवर दुस-या ठिकाणी नवीन व्हॉल बसविला त्याठिकाणी काम करतांना संबंधित विभागातील नगरसेवक उपस्थित होते. |
| म. शितल नवले | व्हॉल खराब होण्यांचे मुख्य कारण म्हणजे व्हॉलची जीभ पडून जाते जुन्या व्हॉलमध्ये जी क्लॅप आहे ती जर अडून राहिली तर त्यांचा पॅच काढायला पाहिजे. आपण काम करतो पण ते काम एकदाच व्यवस्थित करा. आपण इंजिनिअर आहात आपल्याला या सर्व गोष्टी समजल्या पाहिजे. तुम्ही इंजिनिअर सारखे काम करा. सुपरवायझर सारखे नाही. तो व्हॉल काढून का लावला नाही. |
| म.श्री. पावटे | त्या जागेवर दोन तीन व्हॉल आहे. 2- 3 दिवस पाणी बंद होते ठेकेदाराने त्या व्हॉलचे वेल्डींग केले व दुस-या दिवशी औरंगाबाद येथून तांतडीने नवीन व्हॉल मागविले.जुने व्हॉल अजूनही जागेवर आहे. |
| म. राजू माईनकर | सन 2019-20 या आर्थिक वर्षात पाणीपुरवठा विभाग , लाईट विभाग, तसेच इतर विविध विभागामार्फत जुने साहित्य विक्री करण्याकरिता यादी प्रापत करुन घेण्यांत आली होती. त्यानुसारसदर साहित्य विक्री करण्याकरिता साहित्याची किंमत निश्चित करण्यासाठी शासकीय व्हॅल्यूव्हर ए.व्ही. शेवडे यांचे मार्फत सदर साहित्याची तपासणी करुन त्यांची विक्रीची किंमत रुपये 24 लाख मात्र निश्चित करण्यांत आली होती. सदर साहित्य विक्री करता ई निविदा प्रसिध्द करण्यांत आली होती. त्यानुसार निविदे मध्ये 5 लिलाव धारक यांनी भाग घेतलेला असून त्यामध्ये जास्तीचे दर रक्कम रुपये 28 लाख मे. संगम स्टील वर्क्स यांना सदरचे साहित्य देण्यांत आलेले होते. |
| म.नागसेन बोरसे | जनरेटर कुठल्या ठिकाणी ठेवलेले आहे. |
| म.राजू माईनकर | एक जनरेटर जुन्या मनपात व दुसरा पांझरा वॉटर वर्क्स येथे आहे. |
| म. नागसेन बोरसे | ते जनरेटर कधी विकत घेतले व त्याचा वापर किती वेळेस झाला. |
| म. एन.के. बागुल | मनपातील जनरेटर हे हनुमान टेकडी येथील आहे. ते मनपात शिप्-ट केले आहे. त्याठिकाणी 250 के.जी. व्हॅटची गरज नव्हती सन 2005 मध्ये विकत घेतण्यांत आलेले आहे. जून्या मनपात त्याचा एकदाही उपयोग झालेला नाही. |
| म. सभापती | हा फार गंभीर विषय आहे. पुढच्या मिटींग पर्यत आपण आपल्याकडे असलेल्या स्टॉकची नोंद घ्या व सदर रजिस्टर स्थायी समिती पुढे सादर करा. भांडार विभागाकडे कोणते साहित्य व भंगार उपलब्ध आहे याची माहिती द्या. तसेच यापूर्वी लिलावांत किती रक्कम प्राप्त झाली याचा तपशील सादर करा. |

सर्व सन्मा.सदस्यांच्या सहमतीने व कार्यालयीन अहवालास अधिन राहून सदर प्रस्तावास कार्योत्तर मान्यता देण्यांत येत आहे.

**धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर ३३ दिनांक १५/४/२०२१**

धुळे शहरातील तापी पाणी पुरवठा योजने 1500mm, 900mm व 300mm पाईप लाईनची गळती नटराज टॉकीज जवळ, खासदार मा. सुभाष भामरे यांचे घराजवळ, वरखेडी भागात तापी लाईनीचा एअर व्हॉल, बडगुजर प्लॉट व D.D.R.C.हॉटेल जवळ अशा विविध ठिकाणी तापीचा मुख्य जलवाहिनीला गळती लागलेली आहे त्याकरीता सदर पाईपलाईनीचे काम तातडीने करणे अत्यंत गरजेचे असल्याने सदर भागात समक्ष पाहणी करून अंदाजपत्रक तयार केले असता उक्त कामी अंदाजपत्रकीय खर्च रु.3,70,285/- मात्र येणार असून सदर कामासाठी सन2020-21च्या अर्थसंकल्पात मे.महासभेचे ठराव नुसार रु.15 कोटीची तरतुद केलेली असून सदरचे काम हे यादीतील क्र.60 वर नोंद घेण्यात आलेली आहे.

तरी उक्त काम हे नागरिकांचा पिण्याचा पाणीचा प्रश्नाशी निगडीत असल्याने सदरचे काम विना निविदा श्री.संजय दगडु गायकवाड,ठेकेदार,धुळे यांचे कडुन करून घेण्यात आलेले असून सदरचे काम मुंबई प्रांतिक अधिनियम 5(2) (2) अन्वये विना निविदा कार्योत्तर मंजुरीसाठी व अंदाजपत्रकीय खर्च रु.3,70,285/- मात्र खर्चास मा.आयुक्त सो.यांनी दि. 12/03/2021अन्वये खर्चास मान्यता दिलेली आहे. तसेच उक्त बाबत कार्योत्तर मंजुरीसाठी मे. स्थायी समिती पुढे मंजुरीसाठी सादर झालेला आहे.

सर्व सन्मा.सदस्यांच्या सहमतीने व सदर कामी झालेला खर्च रुपये रु.3,70,285/- मात्रला कार्योत्तर मान्यता देण्यांत येत आहे. सदर प्रस्ताव व कार्यवाहीबाबत लेखा आक्षेप निर्माण होणार नाही याची दक्षता घ्यावी. याबाबतची जबाबदारी संबंधित विभागाची राहील.

तसेच भांडार विभागाने पुढच्या मिटींग पर्यंत आपल्या विभागाकडे असलेल्या स्टॉकची नोंद घ्या व सदर रजिस्टर स्थायी समिती पुढे सादर करा. भांडार विभागाकडे कोणते साहित्य व भंगार उपलब्ध आहे याची माहिती द्या. तसेच यापूर्वी लिलावांत किती रक्कम प्राप्त झाली याचा तपशील सादर करा.

**सर्वानुमते मंजुर,**

सही/-X X X

**सभापती,**

**स्थायी समिती,**

**धुळे महानगरपालिका,धुळे**

विषय क्रमांक:- ३२ मनपा निधी अंतर्गत प्र.क्र.14 मध्ये विशाल नगर भागात रस्ता डांबरीकरण करणे निविदा दर मागविण्यांत आलेत, त्याबाबत आलेल्या कार्यालयीन अहवालावर विचार करणे.

म. नगरसचिव नगरसचिव यांनी विषयांचे वाचन केले.

म. सभापती सर्व सन्मा. सदस्यांच्या सहमतीने व कार्यालयीन अहवालास अधिन राहून सदर प्रस्तावास मान्यता देण्यांत येत आहे.

**धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर ३४ दिनांक १५/४/२०२१**

मनपा निधी अंतर्गत प्र.क्र.१४ मध्ये विशाल नगर भागात रस्ता डांबरीकरण करणे कामाबाबत धुळे मनपा ठराव नं.८५ दि.२९/१०/२०२० मा. आयुक्त सो. धुळे यांचे टिपणी मंजुरीने दि. १४/०६/२०२० अन्वये उक्त कामाबाबत रक्कम रु.२९,९६,०९४/- मात्र खर्चाचा आर्थिक व प्रशासकीय मंजुरी देणेत आली आहे.

उक्त कामाबाबत शहर अभियंता मनपा धुळे यांचे पत्र क्र./६४७ दि.१५/०७/२०२० अन्वये रक्कम रु. २९,९६,०९४/- मात्र खर्चास तांत्रिक मंजुरी मिळालेली आहे.

उक्त कामाबाबत धुळे महानगरपालिका जा.क्र. / धुमपा/ बा.वि./ १११ दि. अन्वये दि. ०८/१२/२०२० रोजीचे दैनिक दिव्य मराठी / श्रमराज्य या वृत्तपत्रात जाहीर निविदा प्रसिद्ध करणेत येऊन दि.२८/१२/२०२० रोजी निविदा दर मागविण्यात आले आहेत. पात्र कंत्राटदार यांनी निविदेबाबत ऑनलाईन पद्धतीने बयाणा रक्कम भरून निविदा दर सादर केलेले आहेत.

| अ.क्र. | कंत्राटदार किंवा ठेकेदाराचे नाव | दिलेले निविदा दर | शेरा |
|---|---|---|---|
| १ | मे.वृषभ सतिष खिवसरा | शे.१% जास्तीने | |
| २ | मे.एकविरा कन्सट्रक्शन | **अंदाजपत्रकीय दराने** | **सर्वात कमी दर** |
| ३ | मे.गौरवसिंग आर.कौर | शे.२% जास्तीने | |

वरील प्रमाणे निविदेत भाग घेतलेले ठेकेदार पात्र असून श्री/ **मे.एकविरा कन्सट्रक्शन** यांनी दिलेले दर अंदाजपत्रकीय दर असून त्यांनी नियमा प्रमाणे ऑनलाईन बयाणा रक्कम

भरलेली आहे. सबब कंत्राटदार **मे.एकविरा कन्सट्रक्शन** यांची अंदाजपत्रकीय दराने आलेले असल्याने सदर दर मंजुरीस्तव मे. स्थायी समिती समोर सादर झाला आहे.

सर्व सन्मा.सदस्यांच्या सहमतीने व कार्यालयीन अहवालास अधिन राहून सदर कामी मे. एकविरा कन्स्ट्रक्शन यांचे आलेले अंदाजपत्रकीय दरांस महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ७३ अन्वये मान्यता देण्यांत येत आहे. सदर प्रस्ताव व कार्यवाहीबाबत लेखा आक्षेप निर्माण होणार नाही याची दक्षता घ्यावी.याबाबतची जबाबदारी संबंधित विभागाची राहील.

**सर्वानुमते मंजुर,**

सही/-X X X

**सभापती,**

**स्थायी समिती,**

**धुळे महानगरपालिका,धुळे**

# धुळे महानगरपालिका,धुळे

## नगरसचिव कार्यालय

## स्थायी समिती सभा क्रमांक ९ चे इतिवृत्त

---

**धुळे मनपा भारतरत्न अटलबिहारी वाजपेयी सभागृह**
**गुरुवार दिनांक २२/०४/२०२१**
**वेळ :- सकाळी ११-०० वाजता.**

धुळे महानगरपालिका स्थायी समितीची साप्ताहिक सभा आज गुरुवार दिनांक २२/०४/२०२१ रोजी सकाळी ११-००वाजता **मा.श्री संजय सुधाकर जाधव,सभापती**,स्थायी समिती, मनपा,धुळे यांच्या अध्यक्षतेखाली **धुळे मनपा भारतरत्न अटलबिहारी वाजपेयी सभागृह** भरली. स्वाक्षरी बुकावर सही करुन खालील सन्मा.सदस्य सभागृहात हजर होते.

| अ.क्रं. | सदस्यांचे नांव | हुद्दा |
|---|---|---|
| १ | श्री. जाधव संजय सुधाकर | सभापती |
| २ | श्री. बैसाणे सुनिल तुळशिराम | सदस्य |
| ३ | श्रीमती माळी भारती अशोक | सदस्या |
| ४ | श्रीमती पाटील मंगला सुरेश | सदस्या |
| ५ | श्रीमती बोरसे पुष्पा प्रकाश | सदस्या |
| ६ | श्री. मासुळे अमोल पावबा | सदस्य |
| ७ | श्री. देवरे कमलेश नारायण | सदस्य |
| ८ | श्रीमती पठाण हिना अस्लम | सदस्या |
| ९ | श्री. सईद बेग हाशम बेग | सदस्य |
| १० | श्री. नवले शितल मोहन | सदस्य |
| ११ | श्री. बोरसे नागसेन दामोदर | सदस्य |
| १२ | श्रीमती कुलेवार किरण राकेश | सदस्या |
| १३ | श्री. जाधव बन्सीलाल माणिक | सदस्य |
| १४ | श्रीमती चौधरी मंगला अर्जुन | सदस्या |
| १५ | श्री. पटेल अमीन अब्दुल करीम | सदस्य |

### उपस्थित अधिकारी गण

| अ.क्र. | अधिकाऱ्यांचे नाव | हुद्दा |
|---|---|---|
| १ | श्री. गणेश गिरी | अति. आयुक्त |
| २ | श्रीमती शिल्पा नाईक | उपायुक्त |
| ३ | श्री. तुषार नेरकर | सहा. आयुक्त |
| ४ | श्री. विनायक कोते | सहा. आयुक्त |
| ५ | श्री. महेंद्र परदेशी | नगररचनाकार |
| ६ | श्री मनोज अरविंद वाघ | प्र.नगरसचिव |

| | | |
|---|---|---|
| ७ | श्री. के.एन. शिंदे | अभियंता |
| ८ | डॉ. महेश मोरे | आरोग्याधिकारी |
| ९ | श्री. लक्ष्मण पाटील | सहा.आरोग्याधिकारी |
| १० | श्री. चंद्रकांत जाधव | सहा.आरोग्याधिकारी |
| ११ | श्री. पी.डी नाईक | लेखापाल |
| १२ | श्री. रजमान अन्सारी | प्र. कार्यालय अधिक्षक |
| १३ | श्री.आर.वी. सोनवणे | प्र.परवाना अधिक्षक |
| १४ | श्री. एन.के. बागुल | विद्युत अभियंता |
| १५ | श्री. पी.डी. चव्हाण | ओव्हरसिअर बांधकाम |
| १६ | श्री. सी.सी. बागुल | पा. पु. ओव्हरसिअर |
| १७ | श्री. हेमत पावटे | ओव्हरसिअर बांधकाम विभाग |
| १८ | श्री.एस.एन. देसले | लिपीक मनपा शिक्षण मंडळ |
| १९ | श्री. किशोर सुडके | बाजार विभाग |
| २० | श्री. सुक्राम आत्या राऊत | वाहन विभाग लिपीक |

म.सभापती सर्व उपस्थित सन्मा.सदस्य अति.आयुक्त सो.अधिकारी वर्ग छायाचित्रकार बांधव सभेचे कामकाज चालविणेसाठी आवश्यक तो कोरम पूर्ण झाल्याने नगरसचिव यांनी सभेचे कामकाज सुरुवात करावी.

म. नगरसचिव वंदे् मातरम् या राष्ट्रवंदनेसाठी सर्वांनी उभे रहावे.

**सन्मा. सदस्यांकडून आलेली श्रध्दांजलीची यादी**

काल नाशिक शहरात ऑक्सीजन गळतीमुळे दुदैवी घटना घडली असून शासनाच्या निष्काळजीपणापमुळे 24 रुग्ण बंधू भगिंनी मृत पावले आहेत. यात पूर्णत: प्रशासनाच्या निष्काळजीपणा दिसून येतो. त्यामुळे मी शासानाचा निषेध व्यक्त करते व मृत झालेल्या बंधु आणि भगिंनींना भावपूर्ण श्रध्दांजली वाहण्याचा ठराव आज रोजीच्या बैठकीत ठराव पारीत करण्यांत यावा.

सुचक :- सौ. किरण राकेश कुलेवार, नगरसेविका, मनपा धुळे

म. सभापती सनमा. सदस्यांच्या यादीनुसार श्रध्दांजली अर्पण करणेसाठी दोन मिनिटे मौन उभे रहावे.

**धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर ३५ दिनांक २२/०४/२०२१**

सन्मा.सदस्यांच्या यादीनुसार काल नाशिक शहरात ऑक्सीजन गळतीमुळे दुदैवी घटना घडली असून शासनाच्या निष्काळजीपणापमुळे२४ रुग्ण बंधू भगिंनी मृत पावले आहेत.यात पूर्णत: प्रशासनाच्या निष्काळजीपणा दिसून येतो. त्यामुळे मी शासानाचा निषेध व्यक्त करते व मृत झालेल्या बंधु आणि भगिंनींना भावपूर्ण श्रध्दांजली वाहण्यांत यावी.

मान्यवरांचे दु:खद निधनामुळे या सभेस आतीव दु:ख होत आहे ही सभा त्यांचे कुटुंबियांच्या दु:खात सहभागी असून मृत आत्म्यास चिरशांती प्रदानार्थ दोन मिनिटे मौन राहून भावपूर्ण श्रध्दांजली समर्पित करण्यांत येत आहे.तसेच प्रशासनाच्या निष्काळजीपणाचा निषेध करीत आहे.

**सर्वानुमते मंजुर**

सही/-X X X

**सभापती,**

**स्थायी समिती,**

**धुळे महानगरपालिका,धुळे**

**सन्मा. सभापती महोदयाकडून आलेली अभिनंदनाची यादी**

धुळे जिल्हयांत रेमडेसिवीर इंजेक्शन कमतरतेमुळे इतिशय बिकट परिस्थिती झालेली असतांना भाजपा नेतेमा.गिरीषभाऊ महाजन,मा.खासदार सुभाषबाबा भामरे,जिल्हा महानगराध्यक्ष मा. अनुपभैय्या अग्रवाल, महापौर चंद्रकांत बापू सोनार यांच्या प्रयत्नातून कालच 400 रेमडेसिवीर इंजेक्शन प्राप्त झाली असून अजून बाकी इंजेक्शन्स टप्याटप्याने येणार आहेत. त्यांच्या या बहुमोल कार्याबद्दल भाजपा नेते मा.गिरीषभाऊ महाजन,मा.खासदार सुभाषबाबा भामरे,जिल्हा महानगरध्यक्ष मा.अनुपभैय्या अग्रवाल, महापौर चंद्रकांत बापू सोनार यांच्या अभिनंदनाचा ठराव आजच्या स्थायी समिती सभेमध्ये करण्यांत यावा ही विनंती.

**म. नागसेन बोरसे अभिनंदनाचा ठराव मंजूर करण्यांत यावा.**

**धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर ३६ दिनांक २२/४/२०२१**

मा. सभापती महोदय यांच्या कडून आलेल्या यादीनुसार धुळे जिल्हयांत रेमडेसिवीर इंजेक्शन कमतरतेमुळे इतिशय बिकट परिस्थिती झालेली असतांना भाजपा नेते मा. गिरीषभाऊ महाजन,मा. खासदार सुभाषबाबा भामरे, जिल्हा महानगराध्यक्ष मा.अनुपभैय्या अग्रवाल, महापौर चंद्रकांत बापू सोनार यांच्या प्रयत्नातून कालच 400 रेमडेसिवीर इंजेक्शन प्राप्त झाली असून अजून बाकी इंजेक्शन्स टप्याटप्याने येणार आहेत.त्यांच्या या बहुमोल कार्याबद्दल भाजपा नेते मा.गिरीषभाऊ महाजन, मा. खासदार सुभाषबाबा भामरे,जिल्हा महानगरध्यक्ष मा.अनुपभैय्या अग्रवाल, महापौर चंद्रकांत बापू सोनार यांच्या अभिनंदनाचा ठराव सर्वानुमते मंजुर करण्यांत येत आहे.

**सर्वानुमते मंजुर.**
सही/-X X X
**सभापती, स्थायी समिती,**
**धुळे महानगरपालिका,धुळे**

**सन्मा.सदस्यांकडून आलेला निषेधाचा ठराव पारीत करणेबाबत**

संपूर्ण जगभर गेल्या दिडवर्षापासून धुळे जिल्हयात देखील कोरोना या आजाराने थैमान मांडलेले आहे. या मध्ये या शहरातील प्रत्येक नागरीकाने आपले नातेवाईक किंवा मित्र परिवारातील कोणाला तरी या आजाराने बाधीत तरी होतांना पाहिले आहे. किंवा मृत्यूमुखी पडतांना पाहिले आहे. या दिड वर्षात भारतीय जनता पार्टीचे गिरीषभाऊ महाजन, धुळे लोकसभा खासदार मा. सुभाष बाबा भामरे,आमदार जयकुमारभाऊ रावल,जिल्हा महानगराध्यक्ष मा.अनुपभैय्या अग्रवाल, महापौर चंद्रकांत बापू सोनार यांचेसह भारतीय जनता पार्टीचे शहरात निवडुन आलेल्या सर्वच नगरसेवकांनी लॉक डाऊनच्या अतिशय सुरुवातीच्या काळात ज्यावेळी शहरातील गोरगरीब वर्ग कामावर जाऊ शकत नव्हता व आपल्या कुटुंबाला दोन घास भरवता येणार नाही या वेदनेने तळमळत होता त्या वेळेस याच नेत्यांनी आपल्या नगरसेवकांना सोबत घेवून शहरातील केवळ मोजमजुरी करणाराच नव्हे तर गरजु असलेल्या मध्यमवर्गीयांपर्यंत सुध्दा अतिशय चांगल्या दर्जाचे जेवणाचे पार्सल घरापर्यंत काही महिने पोहोचवले.आणि तेव्हापासून ते आजपर्यंत जिल्हयातील कोरोनाग्रस्तांसाठी सर्व भाजपाची सर्व नेतेमंडळीच चांगले काम करीत असल्याने धुळे शहरातील काही पत्रकबाज छपरी पुढाऱ्यांना आज केवळ पत्रके काढून भाजपा नेत्यांना व नगरसेवकांना बदनाम करण्यासाठी केवळ पत्रकांचा आश्रय घ्यावा लागत आहे. कारण हे सर्व सुरुवातीपासून नागरीकांप्रती कोणतेही कार्य करु न शकल्याने अर्थातच त्यांची ती कुवतच नसल्याने हे केवळ पत्रकबाजी करुन भाजपा नेते व नगरसेवकांवर खोटे आरोप करुन यांच्या निष्क्रियते वरुन लोकांचे लक्ष् वळविण्याचा प्रयत्न करत आहेत. वास्तविक पाहता राज्यात सत्ता यांची आहे तरी यांना जिल्हयासाठी साधारणत:1 विद्युत शववाहिनी मंजूर करुन घेता आली नाही. कोरोनाग्रस्तांना मदत होईल अशी दुसरीही कोणती मदत यांना करता आालेली नाही त्यामुळे यांची अवस्था खिसीयानी बिल्ली खंबा नोचे अशी झाली आहे. एकीकडे लोक मरत असतांना व राज्यात सत्ता असुनही काहीच न करता सतत कार्यरत असणा-या भाजपा नेते व नगरसेवकांची

बदनामी करणा-या या नीच छपरी प्रवृत्तीला आम्ही उत्तर देणार नाहीत.नागरीकांचा जीव जास्त महत्वाचा आहे.आणि आमचा वेळ त्यासाठी आहे. नागरीकांप्रती समाजकारणासाठी पुढे न येता केवळ पत्रकाबाजीवर पोट भरणा-या अशा या नीच प्रवृत्तीच्या निषेधाचा ठराव आजच्या स्थायी समिती सभेत पारीत करण्यांत यावा ही विनंती.

सूचक:- अमोल पावबा मासुळे, नगरसेवक मनपा धुळे

अनुमोदक:-श्री.सूनिल तुळशीराम बैसाणे, श्री. नागसेन दामोदर बोरसे,सौ. भारती अशोक माळी, सौ. मंगला सुरेश पाटील, श्री.बन्सीलाल माणिक जाधव, श्री. शितल मोहन नवले, सौ. किरण राकेश कुलेवार, सौ. पुष्पा प्रकाश बोरसे

म.नागसेन बोरसे मागील लॉक डाऊनच्या काळात भाजपाचे सर्व पदाधिकारी सर्व नगरसेवक तसेच आमचे नेते गिरीषभाऊ महाजन, खासदार सुभाषबाबा भामरे,भाजपा जिल्हाध्यक्ष अनुपभैय्या अग्रवाल, महापौर श्री. चंद्रकांत बापू सोनार आम्ही सर्व प्रत्यक्ष फीडवर काम करीत होतो व वर्षभरापासून काम करीत आहोत. पण शहरात काही फोटो छाप नेते कोणतेही काम न करता पेपरबाजी करीत आहेत. शहरात ऑक्सीजन, लसीकरण, इंजेक्शन यासाठी नागरीक वनवन फिरत आहेत.आम्ही सर्वांनी प्रत्यक्ष फीडवर काम केलेले आहे.गौरगरीब नागरीकांना जेवण पुरविलेले आहे.खोटे पत्रके काढून आमच्या पक्षाला बदनाम करावयाचे हा धंदा फोटो छाप नेत्यांनी सुरु केलेला आहे. हिमंत असेल तर त्यांनी त्यांचे कार्य दाखवावे. उगाच आमच्या नेत्यांना बदनाम करु नये.मागील वेळेस पालक मंत्री दौ-यावर आले ते 11 वाजेची मिटींग असून 3 वाजेपर्यंत आले नाही. काही महाभाग् याठिकाणी सत्ता असते त्या पक्षात प्रवेश करण्याचा त्यांचा एकमेव कार्यक्रम आहे. शहरात त्यांचे कोणतेही योगदान नाही. आणि भाजपाला बदनाम करण्यांचे कारस्थान करीत आहे.आम्ही पालकमंत्रयांचा जाहीर निषेध या ठिकाणी करीत आहोत.

म.शितल नवले मागील वर्षी मार्च ते ऑगस्ट महिन्यांत कडक लॉकडाऊन होते त्या काळातभाजपाच्या नगरसेवकांनी स्वत:चे मानधन देऊन स्थलातरीत नागरीकांसाठी भोजन, पाणी व अन्य व्यवस्था केली त्या काळात गौरगरीबांना दोन्ही वेळेस मोफत भोजन भाजपा तर्फे पुरविण्यांत आले त्यावेळेस 20 टक्के राजकारण आणि 80 टक्के समाज कारण अशी घोषणा देणारे कुठे लपून बसले होते. शासनाने दिलेले शिवभोजन थाळी वाटप करुन पेपरमध्ये स्वत:चे फोटो छापून घेतले. शिवभोजन थाळीचा पैसा हा शासनाचा म्हणजे जनतेच्या करातून आलेला पैसा आहे.त्यांचे श्रेय घेण्यांचे कारण नाही. आपल्या महानगरपालिकेला 15 कोटी नगरोत्थान मधून व दीड कोटी अग्नीशमन व्यवस्थेचे अनुदान प्राप्त होणार होते. परंतु हे 16- 17 कोटी त्यांनी परस्पर दुसरीकडे वर्ग केले. येथे भाजपाची सत्ता असल्याने आपले काही चालणार नाही म्हणून अशा प्रकारे राजकारण केले जात आहे.आमचे जिल्हाध्यक्ष अनुपभाऊ अग्रवाल डॉ. माधुरी बाफना यांनी अत्यंत कमी दरात रेमिडीसेव्हर वाटप केले. त्यावेळेस आपल्याकडे या इंजेक्शनचा काळा बाजार होत होता.अशी सर्व परिस्थिती असतांना कोणता आढावा घेतला. कोणती मदत धुळे शहराला केली.या कोरोना काळात जनतेपर्यंत खरी मदत भाजपाने पोहोचविलेली आहे. आणि ते फक्त फोटो आणि पत्रकबाजीत गुंतलेले आहे.फक्तआयुक्त जिल्हाधिकारी यांना पत्र देऊन पत्रक बाजी शिवाय शुन्य काम केलेले आहे. महानगरपालिकेत सर्वच वाईट आहे असे नाही. कोरोना काळात महानगरपालिकेने अतिशय चांगले काम केलेले आहे. कोवीड स्मशान भूमीत दिवसरात्र प्रेतांवर अंत्य संस्कार करण्यांचे काम धुळे महानगरपालिकेचे कर्मचारी करीत आहे. पाणीपुरवठयांतही आता 25 टक्के सुधारणा झाली आहे. पूर्वी 10- 12 दिवसाआड पाणी मिळायचे आता ते 4 थ्या दिवसावर आलेले आहे. पूढील कार्यकाळात यामध्ये सुधारणा होईल असा विश्वास आहे. फूटकची पेपरबाजी करण्यापेक्षा प्रत्यक्ष फील्डवर काम करा. आपले काम दाखवा. मी आमचा जाहीर निषेध नोंदवत आहे.

म.नागसेन बोरसे 22 मार्चलानागरी दलित वस्तीच्या कामांचा प्रस्ताव डी.पी.डी.सीच्या मिटींग मध्ये मंजूर झाला पण फक्त प्रोसीडींग वर सही करावयाची होती पण 22 मार्च पासून ते आता पर्यत प्रोसीडींगवर सही झाली नाही.तो निधी परत गेला. एका बाजूला सांगायचे की,जनतेसाठी काम करणारे सरकार आहे व एका बाजूला अशा प्रकाररे विकास कामाची अडवणूक करावयाची नागरीकांना मुलभूत सेवा सुविधापासून वंचित ठेवावयाचे याचा आम्ही सर्व नगरसेवक जाहीर निषेध करतो. आज कोरोना काळात आमचे बी.जी.पी. चे कार्यकर्ते सचिनभाऊ शेवतकर, विजय पवार हे वैद्यकीय महाविद्यालयात निस्वार्थपणे सेवा करीत आहेत. बी.जी.पी सेलचे डॉक्टर काम करीत आहे त्यांचे मी अभिनंदन करतो.आणि दलित वस्तीचा निधी जो आज परत गेलेला आहे त्याबद्दल सर्व दलित वस्तीतील नागरीकांच्या वतीने जाहीर निषेध याठिकाणी व्यक्त करतो.

म.अमोलमासुळे आजच्या परिस्थितीत विरोध त्यांचाअपमान होईल अशा पध्दतीने काम करतांना दिसत आहे. याठिकाणी आमचे स्थायी चे सदस्य श्री.अमीन पटेल हे आमचे राजकीय विरोध आहे पण त्यांचे कोरोना काळातील कार्य सर्वांनच माहित आहे. या काळात त्यांनी अतिशय निस्वार्थी पणाने व तत्परतेने काम केलेले आहे. सध्याकोरोनाने थैमान घातलेले आहे. या परिस्थितीत विरोध विसरुन कुठल्या पध्दतीने चांगल्या प्रकारे सेवा देता येईल् याचा जर विचार केला तर निश्चित चांगले कार्यहोईल्. परंतु या ठिकाणी विरोधक पत्रकबाजी करुन भाजपा पक्षाला आमच्या नेत्यांना तसेच नगरसेवक व कार्यकर्त्यांना बदनाम करण्यांचे षडयंत्र करीत आहेत.आज शहरात रेडीमेसेव्हर इंजेक्शनसाठी नागरीक अक्षरश: भटकंती करीत आहेत. अत्यंत दीनवाणीपणा आणि आश्रूपूर्ण नयनानी मदतीची याचना करीत आहेत. ऑक्सीजन साठा मिळत नाही. पहिल्या लॉटमध्ये 20- 30 सिलेंडर लागत होते आता 70 – 80 सिलेंडर लागत आहेत. प्लाझमा सेंटर साठी कोणताही प्रयत्न केला नाही आज त्यांचे सरकार आहे शासनामार्फत्कोणतीही भरीव मदत या लॉकडाऊन काळात सामान्य कुटुंबातील नागरीकांना व हातावर पोट भरणा-या मजूरांना केली यांचाही खुलासा करावा. जे विरोधक पत्रकबाजी करुन आम्हाला बदनाम करीत आहेत त्यांनी या कोरोनाच्या कठीण काळात राजकारण बाजूला ठेवून जनतेसाठी काम करण्यांची गरज आहे. व त्यासाठी प्रयत्न करा असे मी सांगू इच्छितो.

म. अमीन पटेल पूर्ण देशात कोरोनाचा आहाकार आहे. पण माझ्या प्रभागात डायरियाचे प्रमाण फार मोठया प्रमाणात वाढलेले आहे. मोरे साहेबांनी वैद्यकीय पथक पाठवून सर्व्हे केला ओगले साहेबांनी पाण्याचे सॅम्पल घेतले परंतु हा डायरियाचा प्रभाव संपूर्ण शहरात पसरत आहे. यांत लहान मुलांना मोठया प्रमाणावर लागण होत आहे. हा पहिल्यापेक्षा घातक डायरिया आहे. त्यामुळे चिंता करण्यांची वेळ आलेली आहे. आपण कोरोना काळात महानगरपालिकेमार्फत अतिशय चांगल्या प्रकारे सेवा देत आहोत. नागरीकांना रेमिडीसेव्हर इंजेक्शन मिळणे गरजेचे आहे.आज इंलेक्शनचा काळा बाजार सुरु झालेला आहे. मी यासाठी स्वत:आरोग्य मंत्रयांनी भेट घेतली.त्यांच्या स्वीय सहायकाने अन्न औषध विभागाच्या प्रमुखांशी संपर्क केला परंतु संपर्क झाला नाही. या इंजेक्शनसाठी आपल्या स्तरावरुन प्रयत्न होणे गरजेचे आहे. त्यामुळे कोरोना व डायरिया या दोन्ही प्रश्नावर तांतडीने व गांभिर्याने कार्य करावे. सध्या रमजान महिना सुरु आहे. आमच्या भागात संधयाकाळच्या वेळेस जास्त कचरा निघतो सदरचा कचरा रात्री उचलण्याबाबत कार्यवाही करावी.आपण चांगले काम करीत आहोत. पण कार्यवाही अधिक प्रभावीपणे झाली पाहिजे.मला डायरिया बाबत काय उपाय योजना करता येतील याची माहिती द्यावी.

म. सुनिल बैसाणे सभा सुरु झाल्यापासून आपण सत्ताधारी व विरोधक अशी चर्चा करीत आहोत. परंतु या कोरोनाच्या काळात एकमेकांची उणे दुणे न काढता राजकारण बाजूला ठेवूनचांगल्या कामाच्या सुचना करा. विधायक कामासाठी सर्वांनी पुढे येणे गरजेचे आहे.जे कोणी या कोरोनाच्या संसर्गाने बाधीत झालेले होते. त्यांना या परिस्थितीची पूर्ण जाणीव झालेली आहे. माझ्या परिवारातील 8-10 सदस्य कोरोना बाधीत होते त्यामुळे त्यांच्या व्यथा व वेदना मला चांगल्या प्रकारे ज्ञात आहे. असा काळ असतांना

एकमेकांच्या चूका काढून त्यांचे प्रदशरन करणे हे योग्य नाही.राजकारण करण्यासाठी आपल्याला भरपूर मोकळे मैदान व वेळ आह.परंतु ती वेळ आता नाही.महानगरपालिकेमार्फत कोरोनाच्या कार्यकाळात चांगले काम झालेले आहे. जिल्हा प्रशासन चांगले काम करीत आहे परंतु या सर्व यंत्रणेला आपली साथ असणे महत्वाचे आहे.लोकसेवक म्हणून आपली बांधिलकी असली पाहिजे. केवळ विरोध म्हणून लोकांपुढे विचार मांडू नका.याठिकाणी अनुपजी अग्रवाल,डॉ. सुभाषबाबा भामरे, गिरीषभाऊ महाजन,आमदार जयकुमार भाऊ रावल महापौ चंद्कांत सोनार यांचे मी अभिनंदन करेन की त्यांनी आज अल्पदरामध्ये रेमीडीसेव्हर इंजेक्शन उपलब्ध करुन दिलेले आहे. सिटीस्कॅनचे बाहेर 3500 ते 4000 रु. घेतात परंतु डॉक्टर विपुल बाफना व डॉ. माधुरी बाफना यांनी हे काम 1500 रुपयांत करुन दिले. ही खरी सामाजिक बाधीलकी आहे बीजीपीने कधीच कोणाला विरोध केला नाही. आमचे नेते देवेंद्र फडवणीस किंवा महाराष्ट्राचे अनेक नेते असतील ते आज नागरीकांना मदत करीत आहेत. कोरोना पासून कशा प्रकारे रिलीफ देता येईल त्यासाठी प्रयत्न करीत आहेत. आज आपल्या शिरपूर तालुक्यात अमरीशभाई पटेल व त्यांच्या परिवाराने 40 लाख रुपये निधी गोळा करुन ऑक्सीजन प्लॅन्ट उभा केला आहे.त्याप्रमाणे आपण धुळे शहरात करु शकतो का याचा विचार झाला पाहिजे.अशा पध्दतीने ऑक्सीजन प्लॅन्ट सुरु केला तर मी माझ्या नगरसेवक निधीतील शिल्लक निधी रु. 5 लाख देण्यास तयार आहे. या कार्यकाळात अशा चांगल्या पध्दतीच्या उपाय योजना करण्यासाठी सर्वांनी प्रयत्न करणे गरजेचे आहे केवळ विरोधाला विरोध करुन चालणार नाही. आपल्यातील बहुतेक जण कोरोनाच्या संसर्गातून निघालो आहोत आपण जर कोणाला मदत करु शकत नसलो तर किमान आपुलकीने फोन करा. त्यांची भिती दुर करा. आज पत्रकार बांधवही जिव धोक्यात घालून काम करीत आहे.त्यांना देखील मदत करणे गरजेचे आहे. महानगरपालिकेमार्फत उपलब्ध बेड व इतर सुविधेबाबत नागरीकांना माहिती होणेसाठी दोन वेळात माहिती प्रसिध्द करावी. जेणे करुन नागरीकांना त्याचा उपयोग होवू शकेल.प्रशासन चांगले काम करीत आहे.ऑक्सीजन प्लॅन्टबाबत जी सुचना केली त्याबाबत विचार करावा.

म. कमलेश देवरे या कोरोना काळात सर्वच पक्षांनी चांगले काम केलेले आहे. याबाबत मी सर्वांना शुभेच्छा देतो. माझा विषय वेगळा आहे.मागील दीडदोन वर्षापासून भूमिगत गटारीचे काम सुरु आहे.त्या भूमिगत गटारीचा ठेकेदार व त्यांचे कर्मचारी 1 ते दीड महिन्यापासून गायब आहेत. त्यांचा कोणाचाही तसेच एमजीपीच्या अधिका-यांचा संपर्क होत नाही. प्रभागातील परिस्थिती अत्यंत वाईट आहे. त्यांनी जी कामे केली त्याठिकाणी आता लिकेजेस वाढलेले आहेत. त्यांनी अनेक ठिकाणी खड्डे व अर्धवट पाईप लाईन टाकून ते निघून गेलेले आहेत. लोकांना पायी चालणे व गाडी लावणे देखील मुष्कील झाले आहे.

म. सभापती या विषयावर आपण लवकरच बैठक घेणार आहोत. व त्या बैठकाला आपण संबंधित ठेकेदार व एम.जी.पी.च्या अधिका-यांना सुध्दा बोलावू.आपण एक ते दीड वर्षापासून या विषयाचा पाठपुरावा करीत आहोत आपण यावर निश्चित सकारात्मक कार्यवाही करु.

म.कमलेश देवरे मी याबद्दल आपले अभिनंदन करतो. आयुक्तांकडे या योजनेच्या कामांबाबत संबंधित अधिकारी व ठेकेदार यांच्या बैठका होतात परंतु बैठकीत चूकीची माहिती व प्रात्यक्षीक दिले जाते. परंतु प्रभागात तशी परिस्थिती नाही. यासाठी देवपूरातील सर्व नगरसेवकांना बैठकीला बोलाविण्यांत यावे. आता 1 ते दीड महिन्यांत पावसाळा सुरु होणार आहे. मागील पावसाळयात देखील नागरीकांनी मोठया प्रमाणावर त्रास सहन केला. पुढच्या बैठकील सर्वांना बोलवा.

म.सभापती त्यांना मिटींगला बोलावयाचे आहे जर बैठक झाल्यानंतर प्रश्न मिटला नाही तर आपण निश्चित कार्यवाही करु.आपण जर त्यांची देयकेआपल्या मार्फत निघत असेल तर त्यांची निश्चित चौकशी करु.

म.अमोल मासुळे याठिकाणी सन्मा.सदस्य श्री. सुनिलभाऊ बैसाणे यांनी ऑक्सीजन प्लॅन्टबाबत अतिशय चांगली सुचना केलेली आहे.व त्या विषयासंदर्भातील पत्र आपल्याकडे सादर केलेले आहे. मी या विषयावर

मा.आयुक्त साहेबांशी चर्चा केलेली आहे. शिरपूर सारख्या 1 ते दीड लाख लोकेच्या गावात सुसज्ज 100 बेडचे हॉस्पीटल व हवेतून ऑक्सीजन निर्मितीचा प्रकल्प झालेला आहे. नंदुरबारला आहे परंतु आपल्या धुळे शहरात याबाबत कार्यवाही झालेली नाही. यासंदर्भात आयुक्तांशी चर्चा केली असता आपले स्वत:चे हॉस्पीटल नसल्याने तो प्रकल्प कुठे उभारावा या विषयी साशंका आहे आपल्या मनपा मालकीच्या खूप जागा आहेत.त्या जागेवर जर हा प्रकल्प उभा केला तर हा प्रकल्प 30 ते 40 लाख रुपयांत होवू शकतो एका दिवसाला30 ते 40 सिलेंडर आपण तयार करु शकतो. शहरात ऑक्सीजनची मोठया प्रमाणात कमतरता आहे मा. जिल्हाधिकारी महोदयांनी आताच तिसरी लाट येण्याची शक्यता वर्तविली आहे. त्यासाठी आपण सावध होणे गरजेचे आहे. यासाठी आपण मनपाची सक्षम ताकद उभारली पाहिजे.आपण यासाठी एक तांतडीची बैठक बोलावून हा प्रकल्प मार्गी लावल्यास एक निश्चित चांगले काम होवू शकते. मनपाचे दवाखाने आहे त्यांना आपण ऑक्सीजन पुरवठा करु शकतो. मनपास कायम स्वरुपी उत्पन्नाचे स्त्रोत निर्माण होईल. तरी याबाबत तांतडीने कार्यवाही करावी

म.सभापती सर्वसन्मा.सदस्यांनी याठिकाणी आपल्या भावना व्यक्त केल्या.धुळे शहरात कोरोना पसरलेला असतांना केवळ बी.जी.पी.च्या नगरसेवकांना बदनाम करण्यासाठी पत्रक काढावयाचे सोशल मिडीयावर चूकीचे मेसेंज पाठवावयाचे अशी निषेधजनक कामे विरोधकामार्फत सुरु आहे संपूर्ण धुळे शहर याला साक्षआहे. मागील मार्च महिन्याच्या काळात बी.जी.पी. मार्फत संपूर्ण धुळे शहरात दिवसाला हजारो फूड पॅकेट तयार करुन ते नागरीकांपर्यत पोहचविले. बी.जी.पी. चे सर्व नगरसेवक कार्यकर्ते यासाठी शहरात फिरत होते. आम्हाला राजकारण करावयाचे नाही. व करणार नाही परंतु त्या काळात हे पत्रकबाज कुठे लपलेले होते.आज अशी परिस्थिती आहे रेमेडीसेव्हर इंजेक्शनसाठी दिवसातून २० ते २५फोन येतात. व कळकळीने विनंती करतात ही दुदैवाची बाब आहे. विद्युत शवदाहिनीची गरज असतांना आज पर्यत त्यावर कार्यवाही झालेली नाही हि शरमेची बाब आहे. फक्त बी.जी.पी.च्या नगरसेवकांना बदनाम करुन हे संधी साधू पुढारी नागरीकांची दिशाभूल करीत आहे. या सर्वाचा सर्वानुमते निषेधाचा ठराव पारीत करण्यांत येत आहे.

**धुळे मनपा स्थायी स्थायी समिती ठराव नंबर ३७ दिनांक २२/४/२०२१**

सन्मा.सदस्यांकडून सादर झालेल्या यादीनुसार संपूर्ण जगभर गेल्या दिडवर्षापासून धुळे जिल्हयात देखील कोरोना या आजाराने थैमान मांडलेले आहे. या मध्ये या शहरातील प्रत्येक नागरीकाने आपले नातेवाईक किंवा मित्र परिवारातील कोणाला तरी या आजाराने बाधीत तरी होतांना पाहिले आहे. किंवा मृत्यूमुखी पडतांना पाहिले आहे. या दिड वर्षात भारतीय जनता पार्टीचे गिरीषभाऊ महाजन, धुळे लोकसभा खासदार मा.सुभाष बाबा भामरे,आमदार जयकुमारभाऊ रावल, ,जिल्हा महानगराध्यक्ष मा. अनुपभैय्या अग्रवाल,महापौर चंद्रकांत बापू सोनार यांचेसह भारतीय जनता पार्टीचे शहरात निवडुन आलेल्या सर्वच नगरसेवकांनी लॉकडाऊनच्या अतिशय सुरुवातीच्या काळात ज्यावेळी शहरातील गोरगरीब वर्ग कामावर जाऊ शकत नव्हता व आपल्या कुटुंबाला दोन घास भरवता येणार नाही या वेदनेने तळमळत होता त्या वेळेस याच नेत्यांनी आपल्या नगरसेवकांना सोबत घेवून शहरातील केवळ मोजमजुरी करणाराच नव्हे तर गरजु असलेल्या मध्यमवर्गीयांपर्यत सुध्दा अतिशय चांगल्या दर्जाचे जेवणाचे पार्सल घरापर्यत काही महिने पोहोचवले.आणि तेव्हापासून ते आजपर्यत जिल्हयातील कोरोनाग्रस्तांसाठी सर्व भाजपाची सर्व नेतेमंडळीच चांगले काम करीत असल्याने धुळे शहरातील काही पत्रकबाज पुढाऱ्यांना आज केवळ पत्रके काढून भाजपा नेत्यांना व नगरसेवकांना बदनाम करण्यासाठी केवळ पत्रकांचा आश्रय घ्यावा लागत आहे. कारण हे सर्व सुरुवातीपासून नागरीकांप्रती कोणतेही कार्य करु न शकल्याने अर्थातच त्यांची ती कुवतच नसल्याने हे केवळ पत्रकबाजी करुन भाजपा नेते व नगरसेवकांवर खोटे आरोप करुन यांच्या निष्क्रियते वरुन लोकांचे लक्ष वळविण्याचा प्रयत्न करत आहेत.वास्तविक पाहता राज्यात सत्ता यांची तरी यांना जिल्हयासाठी साधारणत: एक विद्युत शववाहिनी

मंजूर करुन घेता आली नाही. कोरोनाग्रस्तांना मदत होईल अशी दुसरीही कोणती मदत यांना करता आलेली नाही त्यामुळे यांची अवस्था खिसीयानी बिल्ली खंबा नोचे अशी झाली आहे. एकीकडे लोक मरत असतांना व राज्यात सत्ता असुनही काहीच न करता सतत कार्यरत असणा-या भाजपा नेते व नगरसेवकांची बदनामी करणा-या या प्रवृत्तीला आम्ही उत्तर देणार नाहीत.नागरीकांचा जीव जास्त महत्वाचा आहे.आणि आमचा वेळ त्यासाठी आहे. नागरीकां प्रती समाजकारणासाठी पुढे न येता केवळ पत्रकबाजीवर पोट भरणा-या अशा या प्रवृत्तीच्या निषेधाचा ठराव सर्वानुमते पारीत करण्यांत येत आहे.

**सर्वानुमते मंजुर,**

**सही- x x x**

**सभापती,**

**स्थायी समिती,**

**धुळे महानगरपालिका,धुळे**

**सन्मा.सदस्य श्री.शितल मोहन नवले यांनी बैठकीच्या प्रारंभी सादर केलेल्या लक्षवेधीपत्राबाबत चर्चा व निर्णय**

म. नगरसचिव याठिकाणी सन्मा.सदस्य श्री. शितलकुमार नवले यांनी लक्षवेधी सादर केलेली असून त्यांचे वाचन करण्यांत येत आहे.

दिनांक २२/४/२०२१ रोजी होणा-या स्थायी समितीच्या बैठकीत आस्था स्वयंरोजगार सेवा सह. संस्थाकडून होणा-या गैर व्यवहारवर चर्चा करणे बाबत.

सदर संस्थेचे कर्मचारी यांनी हिरे मेडिकल जवळील स्मशानभूमी मध्ये अंत्यविधीसाठी मृत व्यक्तींच्या नातेवाईकांकडून अंतयविधीसाठी अवाजवी पैसे घेतले सदर संस्थेचा कालावधी संपलेला असून देखील ती संस्था कार्यरत आहे.सातत्याने प्रत्येक सदस्य या संस्थेबाबत तक्रार करीत असतात. परंतु प्रशासनातर्फे कुठलीही कार्यवाही होत नाही. सदर संस्थेचा ठेका आजच रद्द करुन त्या संस्थेला काळया यादीत टाकण्यांत यावे व लवकरात लवकर नवीन निविदा काढून दुस-या कुठल्याही चांगल्या संस्थेला काम देण्यांत यावे ही विनंती.

म. सभापती या विषया संदर्भात शितलभाऊ नवले यांनी आपले मत मांडावे.

म. शितल नवले आपली दोन वर्षापासून मनपावर सत्ता आहे. या काळात आस्था स्वयंरोजगार संस्थेच्या रोज तक्रारी प्राप्त होतात. यात मागे आस्था संस्थेच्या कर्मचा-यांनी कोविड अमरधाम येथे मनपा कर्मचा-यांचा काही संबंध नसताना तेथील मृत व्यक्तीच्या नातेवाईकांकडून पैसे घेतले. आणि पत्रकबाज्यानी कोणतीही शहानिशा न करता प्रसिध्दीसाठी फोटो छाप कार्यक्रम केला. या आस्थाच्या कर्मचा-यांनी सभापती साहेबाच्या वार्डातील नागरीकांकडून पैसे घेतले. आज त्याठिकाणी आपले महानगरपालिकेचे कर्मचारी अतिशय चांगले काम करीत आहे. आपल्या कर्मचा-यांची अजिबात चूक नव्हती. आपण मागच्या वेळेस आस्था संस्थेच्या कामाबाबत मुंबई मंत्रालयापर्यंत तक्रार दाखल केली होती. त्यावर काही कार्यवाही झालेली नाही. त्यावर कार्यवाही करण्यांत यावी. आपण नवीन टेंडर काढण्यासाठी का टाळाटाळ करीत आहोत.४० गांवरोड कनोसा कॉन्हेटजवळ नेहमी गटारीचा प्रश्न निर्माण होतो त्याठिकाणी आस्था चे कर्मचारी काम करीत होते. त्या ठिकाणी मनपाचा सुपरवायझर होता. मी आपल्या अधिका-यांकडे तपास केला असता ५ कर्मचारी कामासाठी पाठविल्याचे सांगितले पण प्रत्यक्षांत दोन कर्मचारी तेथे काम करीत होते.अशा प्रकारचे काम या आस्था संस्थेचे सुरु आहे. यावर कार्यवाही झालीच पाहिजे.

म.सभापती या पत्रकबाज मंडळींनी तक्रारीत मनपाचे कर्मचारी असल्याचे नमूद केले होते. पण प्रत्यक्षांत ते आस्था संस्थेचे कर्मचारी होते. या संदर्भात श्री. लक्ष्मण पाटील यांना तांतडीने संर्पक केला व त्यांना याबाबत वर्तमान पत्रात खुलासा देणेबाबत सांगितले. ही फार गंभीर बाब आहे.

म. शितल नवले मनपा कर्मचा-यांनी चूक केली तर ती आपली जबाबदारी होती. कोविड स्मशान भूमी येथे अत्यंत विदारक परिस्थिती आहे.सातत्याने त्याठिकाणी अंत्यसंस्कार सुरु आहे.आपले महानगरपालिकेचे कर्मचारी उपस्थित असतात मी स्वत: प्रत्यक्ष पाहिलेले आहे. ते चांगले काम करीत आहेत. पण आपण या ठेकेदारामुळे बदनाम होत आहोत. नवीन टेंडर लवकरात लवकर काढा.व या ठेकेदाराला काळया यादीत टाकण्यांचा ठराव पारीत करा.

म. सभापती नवीन संस्था नेमण्याबाबत प्रस्ताव तयार केलेला आहे. व मी यासाठी दोन वर्षापासून सातत्याने तक्रारी व पाठपुरावा करीत आहे. तो प्रस्ताव आयुक्तांच्या सहीसाठी प्रलंबीत आहे.

म. शितल नवले मला वाटते आपण स्वत:आयुक्तांकडे जावून याबाबत स्वाक्षरी घ्यावी व या ठेकेदाराचा बंदोबस्त करावा.

म.सभापती सदर संस्थेने सुरुवातीपासूनच नियमांचा भंग केलेला असून कामगार पुरविण्यांचे कोणतेच पुरावे आता पर्यंत बिलासोबत सादर केलेले नाहीत.जेवढया कामगारांचे बिल काढले जाते त्या तुलनेत खूप कमी कामगारांचे ईपीएफ कपातीचे चलन बिला सोबत जोडलेले असतात.नियमानुसार कामगारांचा शासकीय विमा कपात करणे आवश्यक असतांना शासकीय विमा कपात न करता मनपामार्फत १ टक्के कपात दाखविली जाते ही बाब बेकायदेशीर आहे तसेच शासकीय विमा व पूर्ण कामगारांचे ईपीएफ कपात झालेली नाही प्रत्यक्ष कामगारच नसल्याने या रकमा कपात झालेल्या नाहीत अशा अनेक त्रुटया आस्था स्वयंरोजगार संस्थेमार्फत झालेल्या आहेत.तसेच निविदा अटी शर्तीमध्ये कामगारांचे वेतन ठेकेदाराने बॅकेतून अदा करणे बंधनकारक असतांना कामगारांचे वेतन सदर संस्थेने बॅकेतून अदा कधीच केले नाही. कारण प्रत्यक्षात कामगार कामावर नाहीत. आस्था स्वयंरोजगार या संस्थेने या व धुळे महानगरपालिकेत अनेक प्रकारचे ठेके मिळविलेले असून सर्व ठिकाणी त्यांच्या भ्रष्टाचाराचे उघड पुरावे असल्याने सर्वानुमते या संस्थेस काळया यादीत टाकण्याबाबत प्रशासनाने तांतडीने उचित कायदेशीर प्रक्रिया करावी व त्याबाबतचा अहवाल मे.स्थायी समितीपुढे सादर करावा. तसेच सदर संस्थेस धुळे महानगरपालिकेतील कोणत्याही निविदा प्रक्रियेत भाग घेऊ देऊ नये व तांतडीने सदर संस्थेचे काम थांबविण्यांत यावे.

सही/-X X X
**सभापती,**
**स्थायी समिती,**
**धुळे महानगरपालिका,धुळे**

विषय क्रमांक:- ३३ मागील स्थायी समिती सभेचे इतिवृत्त वाचून कायम करणे. (१/४/२०२१)

म. नगरसचिव नगरसचिव यांनी विषयांचे वाचन केले.

म.नागसेन बोरसे इतिवृत्त कायम करण्यांत यावे.

म. सभापती सर्व सन्मा.सदस्यांच्या सहमतीने मागील स्थायी समित दि. 1/4/2021 रोजीचे इतिवृत्त क्रमश: वाचून कायम करण्यांत येत आहे.

**धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर ३८ दिनांक २२/४/२०२१**

मागील स्थायी समिती सभा दिनांक १/४/२०२१ रोजीच्या सभेतील स्थायी समिती ठराव नंबर १९ ते २६ अखेर तसेच सभेत उपस्थित झालेली चर्चा व त्यावरील निर्णय क्रमश : वाचून कायम करण्यांत येत आहे.

सही/-X X X
**सभापती, स्थायी समिती,**
**धुळे महानगरपालिका,धुळे**

विषय क्रमांक:- ३४ अर्बन मलेरीया स्किम अंतर्गत डास नियंत्रण व डास निर्मुलन करणे कामी निविदा दर मागविण्यांत आलेत, त्याबाबत आलेल्या कार्यालयीन अहवालावर विचार करणे.

म. नगारसचिव नगरसचिव यांनी विषयांचे वाचन केले.

म. सभापती — सदर प्रस्तावा संदर्भात मला स्थायी समितीचे अनेक सदस्यांनी सदर विषयांची सखोल माहिती व प्रात्यक्षित सदस्यांना दिलेली नाही असे सूचित करुन सदस्यांना त्यांची माहिती व प्रात्यक्षित दाखविल्या शिवाय विषय मंजूर करु नये असे सूचित केले आहे. सदस्यांना याची सखोल माहिती होणे आवश्यक असल्याने सद्यस्थितीत सदर विषय तहकूब ठेवण्यांत येत आहे.

**धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर ३९ दिनांक २२/४/२०२१**

अर्बन मलेरीया स्किम अंतर्गत डास नियंत्रण व डास निर्मुलन करणे कामी निविदा दर मागविण्यांत आलेत, त्याबाबत आलेल्या कार्यालयीन अहवालावर विचार करणेबाबतचा प्रस्ताव सभागृहासमोर मंजुरीसाठी सादर झाला असता सदस्यांच्या मागणीनुसार सदर विषयाची संपूर्ण माहिती सभेपूर्वी सदस्यांना होणे आवश्यक आहे.म्हणून सदर प्रस्तावाची संपूर्ण माहिती सदस्यांना देई पावेतो सदर प्रस्ताव तहकूब ठेवण्यांत येत आहे. **सर्वानुमते मंजुर,**

सही/-X X X
**सभापती,**
**स्थायी समिती,**
**धुळे महानगरपालिका,धुळे**

विषय क्रमांक:- ३५ — धुळे मनपा हद्दीत जिल्हा वार्षिक योजने अंतर्गत सर्वे नं. ५२४-१/२/३ येथील सार्व. जमिनीवर संरक्षण भिंत बांधणेचे निविदा दर मागविण्यांत आलेत, त्याबाबत आलेल्या कार्यालयीन अहवालावर विचार करणे.

म. नगरसचिव — नगरसचिव यांनी विषयांचे वाचन केले.

म.अमोल मासुळे — विषय मंजूर करण्यांत यावा.

म. शितल नवले — विषय मंजूर करण्यांत यावा.

म.सभापती — सर्व सन्मा. सदस्यांच्या सहमतीने व कार्यालयीन अहवालास अधिन राहून सदर प्रस्तावास मान्यता देण्यांत येत आहे.

**धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर ४० दिनांक २२/४/२०२१**

धुळे मनपा हद्दीत जिल्हा वार्षिक योजने अंतर्गत सर्वे नं. ५२४-१/२/३ येथील सार्व. जमिनीवर संरक्षण भिंत बांधणे कामाबाबत मा. जिल्हाधिकारी सो., धुळे मनपा यांनी दि.०३ /०३ /२०२१ अन्वये उक्त कामाच्या खर्चास रु. ३६,४५,०००/- मात्र रक्कमेस आर्थिक व प्रशासकीय मंजुरी देणेत आली आहे.

उक्त बाबत शहर अभियंता मनपा,धुळे यांचे पत्र क्र.९८२दिनांक १५/०१/२०२१ अन्वये रक्कम रु.४२,३३,४५७/- मात्र खर्चास तांत्रिक मंजुरी मिळालेली आहे.

उक्त कामाबाबत धुळे महानगरपालिका जा.क्र./पा.पु.वि./ ८९० अन्वये दि ०८/०३/२०२१ अन्वये दि.०९/०३/२०२१ रोजीचा दै.देशदूत / राजरंग टाईम्स या अंकात प्रसिद्ध केली असता मुदतीत दि.३१/०३/२०२१ अखेर खालील प्रमाणे निविदा धारकांचे निविदा दर आलेले आहे.

| अ.क्र. | कंत्राटदारा/ठेकेदराचे नाव | दिलेले निविदा दर | शेरा |
|---|---|---|---|
| १ | श्री.स्वामी समर्थ कन्स्ट्रक्शन | अंदाजपत्रकीय दराने | |
| २ | श्री.रोहित दिलीप अग्रवाल | शे ०.५० % कमीने | |
| **३** | **श्री.आशिष एम. पटवारी** | **शे.०.९९% कमीने** | **सर्वात कमी दर** |

वरील प्रमाणे प्राप्त दरास सर्वात कमी दर **श्री.आशिष एम. पटवारी, धुळे** यांचे **शे.०.९९%कमी दराने** सर्वात कमी असून त्यांनी नियमाप्रमाणे रोखीने बयाना रक्कम भरलेली आहे.सबब कंत्राटदार **श्री.आशिष एम. पटवारी, धुळे** यांचे **शे.०.९९% कमी दराने**

आलेले निविदा दर मंजुरीसाठी मे.स्थायी समितीची आवश्यकता असल्याने सदर दरास मंजुरीसाठी मे.स्थायी समिती पुढे सादर झालेला आहे. सर्व सन्मा. सदस्यांच्या सहमतीने व कार्यालयीन अहवालास अधिन राहून सदर कामी **श्री.आशिष एम. पटवारी, धुळे** यांचे **शे.०.९९% कमी दराने** आलेल्या निविदा दरास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ७३ नुसार मान्यता देण्यांत येत आहे. सदर प्रस्ताव व कार्यवाहीबाबत लेखा आक्षेप निर्माण होणार नाही याची दक्षता घ्यावी. याबाबतची जबाबदारी संबंधित विभागाची राहील.

**सर्वानुमते मंजुर,**
सही/-X X X
**सभापती,**
**स्थायी समिती,**
**धुळे महानगरपालिका,धुळे**

विषय क्रमांकः- 36 — धुळे मनपा हद्दीत जिल्हा वार्षिक योजनेअंतर्गत सर्वे नं.561/2 येथील सार्व. जमिनीवर संरक्षण भिंत बांधणे कामाचे निविदा दर मागविण्यांत आलेत,त्याबाबत आलेल्या कार्यालयीन अहवालावर विचार करणे.

म. नगरसचिव — नगरसचिव यांनी विषयांचे वाचन केले.

म. नागसेन बोरसे — विषय मंजूर करण्यांत यावा.

म. शितल नवले — विषय मंजूर करण्यांत यावा.

म.सभापती — सर्व सन्मा. सदस्यांच्या सहमतीने व कार्यालयीन अहवालास अधिन राहून सदर प्रस्तावास मान्यता देण्यांत येत आहे.

**धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर ४१ दिनांक २२/४/२०२१**

धुळे मनपा हद्दीत जिल्हा वार्षिक योजने अंतर्गत सर्वे नं. 561/2 येथील सार्व. जमिनीवर संरक्षण भिंत बांधणे कामाबाबत मा. जिल्हाधिकारी सो., धुळे मनपा यांनी दि.03/03/2021 अन्वये उक्त कामाच्या खर्चास रु.37,00,000/- मात्र रक्कमेस आर्थिक व प्रशासकीय मंजुरी देणेत आली आहे.

उक्त बाबत शहर अभियंता मनपा,धुळे यांचे पत्र क्र.981 दिनांक 15/01/2021 अन्वये रक्कम रु.39,94,541/- मात्र खर्चास तांत्रिक मंजुरी मिळालेली आहे.

उक्त कामाबाबत धुळे महानगरपालिका जा.क्र./ पा.पु.वि./ 890 अन्वये दि. 08/03/2021अन्वये दि. 09/03/2021 रोजीचा दै.देशदूत / राजरंग टाईम्स या अंकात प्रसिद्ध केली असता मुदतीत दि.31/03/2021 अखेर खालील प्रमाणे निविदा धारकांचे निविदा दर आलेले आहे.

| **अ.क्र.** | **कंत्राटदारा/ठेकेदराचे नाव** | **दिलेले निविदा दर** | **शेरा** |
|---|---|---|---|
| 1 | श्री.स्वामी समर्थ कन्सट्रक्शन | अंदाजपत्रकीय दराने | |
| 2 | श्री.रोहित दिलीप अग्रवाल | शे 0.50 % कमीने | |
| 3 | **श्री.आशिष एम. पटवारी** | **शे.0.99% कमीने** | **सर्वात कमी दर** |

वरील प्रमाणे प्राप्त दरास सर्वात कमी दर **श्री. आशिष एम. पटवारी, धुळे** यांचे **शे.0.99%कमी दराने** सर्वात कमी असून त्यांनी नियमाप्रमाणे रोखीने बयाना रक्कम भरलेली आहे. सबब कंत्राटदार **श्री.आशिष एम.पटवारी, धुळे** यांचे **शे.0.99% कमी दराने** आलेले निविदा दर मंजुरीसाठी मे. स्थायी समितीची आवश्यकता असल्याने सदर दरास मंजुरीसाठी मे. स्थायी समिती पुढे सादर झालेला आहे. सर्व सन्मा. सदस्यांच्या सहमतीने व कार्यालयीन अहवालास अधिन राहून सदर कामी **श्री.आशिष एम. पटवारी, धुळे** यांचे **शे.0.99% कमी दराने** आलेल्या निविदा दरास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम 73 नुसार

मान्यता देण्यांत येत आहे. सदर प्रस्ताव व कार्यवाहीबाबत लेखा आक्षेप निर्माण होणार नाही याची दक्षता घ्यावी. याबाबतची जबाबदारी संबंधित विभागाची राहील. **सर्वानुमते मंजुर,**

सही/-X X X
**सभापती,**
**स्थायी समिती,**
**धुळे महानगरपालिका,धुळे**

| | |
|---|---|
| विषय क्रमांक:- ३७ | महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान योजनेअंतर्गत महाराणा प्रताप चौक येथे उद्यान विकसीत करणेकामी झालेल्या बदलानुसार सुधारीत अंदाजपत्रकास मान्यता देणेबाबत आलेल्या कार्यालयीन अहवालावर विचार करणे. |
| म. नगरसचिव | नगरसचिव यांनी विषयांचे वाचन केले. |
| म. नागसेन बोरसे | विषय मंजूर करण्यांत यावा. |
| म. शितल नवले | विषय मंजूर करण्यांत यावा. |
| म.सभापती | सर्व सन्मा.सदस्यांच्या सहमतीने व कार्यालयीन अहवालास अधिन राहून सदर प्रस्तावास मान्यता देण्यांत येत आहे. |

**धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर ४२ दिनांक २२/४/२०२१**

महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान योजनेअंतर्गत महाराणा प्रताप चौक येथे उद्यान विकसीत करणेकामीउक्त बाबत सदर कामाचेअंदाजपत्रक रक्कम रु.70,00,124/-मात्रस म. जिल्हाधिकारी, धुळे मनपा यांनी जा.क्र./क/कक्ष-5/नपाप्र /कावी/836 दि.03/09/2019 रोजी प्रशासकीय मंजुरी दिलेली आहे. सदर खर्चास मे.स्थायी समिती ठराव क्र. 106 दि. 20/09/2019अन्वये मान्यता मिळालेली आहे. सदर कामास सर्वात कमी दराची निविदा श्री. स्वामी समर्थ कन्सट्रक्शन,धुळे ठेकेदार यांची मंजूर झाली असून यांना कार्यादेश देण्यात आला आहे.

सदर कामाचे मूळ अंदाजपत्रक वास्तू विशारद श्री.दिपेश खिलोसिया यांनी सादर केलेली असून रक्कम रु.70,00,124/- मात्रस दि. 05/08/2019 रोजी तांत्रिक मान्यता प्रदान केले आहे. सदरचे काम शासनाचा जिल्हा नगरोत्थान योजना सन 2019-20 मध्ये प्रस्तावित असून सदर कामास जिल्हाधिकारी सो., धुळे यांनी आर्थिक व प्रशासकीय मान्यता दिलेले आहे. सदरचे काम बी-1 निविदा पद्धतीने सर्व प्रशासकीय बाबीचे पूर्तता करून मे. स्थायी समिती ठराव नं. 107 दि.20/09/2019 अन्वये मंजुरी दिले वरून सदरचे काम अंदाजपत्रकीय दराने मे.स्वामी समर्थ कन्सट्रक्शन यांना कार्यादेश देण्यात आलेला आहे. सदर कामाचा कार्यादेश दि.22/11/2019रोजी देण्यात आले नुसार ठेकेदारणे मनपा व वास्तू विशारद श्री.खिलोसिया यांचा मार्गदर्शनानुसार प्रत्यक्ष काम करणेत येत आहे. सदर काम करते वेळी कामाचा बाबीमध्ये काही बदल करणे बाबत म.महापौर सो., यांनी दि. 15/02/2021 रोजी पत्र दिले असून त्यानुसार वास्तू विशारद श्री.खिलोसिया आर्कीटेक्ट यांनी दि. 19/02/2021 रोजी सुधारित अंदाजपत्रक देवून सादर केलेले आहे. सदर अंदाजपत्रकात खालील प्रमाणे अंदाजपत्रकातील बाबीत बदल होणार आहे.

1) पुतळ्याच्या मागील भिंतीवर थ्रीडी पेंटिंग एवजी थ्रीडी WPC वॉल क्लाडिंग घेतले आहे.
2) पुतळ्याच्या मागील भिंतीवर थ्रीडी राजवाडा टाईप मेहरण खिडक्या घेतल्या आहे.
3) कंपाउंड वॉल मध्ये ग्रील बसविणे
4) वॉटर फाउंटन नवीन घेतले आहे.
5) इलेट्रिकवर्क अंदाजपत्रकातील कमी होणार आहे.टेक्चर प्लास्टरिंग गेट कमान अंदाज पत्रकातून कमी होणार आहे.

सदर अंदाजपत्रकात होणारे खर्चास कुठलीही वाढ प्रस्तावित करणेत आलेली नाही. सदर कामाची दर मंजुरी मे. स्थायी समिती पुढे मंजुरी दिलेली असल्याने सदर सुधारित अंदाजपत्रकास मे.स्थायी समितीपुढे मंजुरी आवश्यक आहे. सदरचे काम हे शहरातील मुख्य बाजार पेठेतील व बगीचा सुशोभीकरणाचे असल्याने त्या कामासाठीच्या सुधारित अंदाजपत्रकास मंजुरीसाठी मे.स्थायी समितीपुढे सादर झालेला आहे.

सन्मा. सदस्यांच्या सहमतीने व कार्यालयीन अहवालास अधिन राहून सदर अंदाज पत्रकातील झालेल्या बदलास मान्यता देण्यांत येत असून अंदाजपत्रकात कोणतीही वाढ होणार नाही याबाबत विभागाने दक्षता घ्यावी तसेच सदर प्रस्ताव व कार्यवाहीबाबत लेखा आक्षेप निर्माण होणार नाही याची दक्षता घ्यावी.याबाबतची जबाबदारी संबंधित विभागाची राहील.

**सर्वानुमते मंजुर,**

सही/-X X X

**सभापती,**

**स्थायी समिती,**

**धुळे महानगरपालिका,धुळे**

# धुळे महानगरपालिका,धुळे

## नगरसचिव कार्यालय

## स्थायी समिती सभा क्रमांक १० चे इतिवृत्त

---

**धुळे मनपा भारतरत्न अटलबिहारी वाजपेयी सभागृह**
**गुरुवार दिनांक २९/०४/२०२१**
**वेळ :- सकाळी ११-०० वाजता.**

धुळे महानगरपालिका स्थायी समितीची साप्ताहिक सभा आज गुरुवार दिनांक २९/०४/२०२१ रोजी सकाळी ११-०० वाजता मा. श्री संजय सुधाकर जाधव, सभापती, स्थायी समिती, मनपा, धुळे यांच्या अध्यक्षतेखाली **धुळे मनपा भारतरत्न अटलबिहारी वाजपेयी सभागृह** भरली. स्वाक्षरी बुकावर सही करुन खालील सन्मा.सदस्य सभागृहात हजर होते.

| अ.क्रं. | सदस्यांचे नांव | हुद्दा |
|---|---|---|
| १ | श्री. जाधव संजय सुधाकर | सभापती |
| २ | श्री. बैसाणे सुनिल तुळशिराम | सदस्य |
| ३ | श्रीमती माळी भारती अशोक | सदस्या |
| ४ | श्रीमती पाटील मंगला सुरेश | सदस्या |
| ५ | श्रीमती बोरसे पुष्पा प्रकाश | सदस्या |
| ६ | श्री. मासुळे अमोल पावबा | सदस्य |
| ७ | श्री. देवरे कमलेश नारायण | सदस्य |
| ८ | श्रीमती पठाण हिना अस्लम | सदस्या |
| ९ | श्री. सईद बेग हाशम बेग | सदस्य |
| १० | श्री. नवले शितल मोहन | सदस्य |
| ११ | श्री. बोरसे नागसेन दामोदर | सदस्य |
| १२ | श्रीमती कुलेवार किरण राकेश | सदस्या |
| १३ | श्रीमती वराडे वैशाली भिकन | सदस्या |
| १४ | श्री. जाधव बन्सीलाल माणिक | सदस्य |
| १५ | श्रीमती चौधरी मंगला अर्जुन | सदस्या |
| १६ | श्री. पटेल अमीन अब्दुल करीम | सदस्य |

**उपस्थित अधिकारी गण**

| अ.क्र. | अधिकाऱ्यांचे नाव | हुद्दा |
|---|---|---|
| १ | श्रीमती शिल्पा नाईक | उपायुक्त |
| २ | श्री. तुषार नेरकर | सहा. आयुक्त |
| ३ | श्री. विनायक कोते | सहा. आयुक्त |
| ४ | श्रीमती पल्लवी शिरसाठ | सहा. आयुक्त |
| ५ | श्री. महेंद्र परदेशी | नगररचनाकार |

| | | |
|---|---|---|
| ६ | श्री मनोज अरविंद वाघ | प्र.नगरसचिव |
| ७ | श्री. के.एन. शिंदे | अभियंता |
| ८ | डॉ. महेश मोरे | आरोग्याधिकारी |
| ९ | श्री. लक्ष्मण पाटील | सहा.आरोग्याधिकारी |
| १० | श्री. चंद्रकांत जाधव | सहा.आरोग्याधिकारी |
| ११ | श्री. पी.डी नाईक | लेखापाल |
| १२ | श्री. रजमान अन्सारी | प्र. कार्यालय अधिक्षक |
| १३ | श्री.आर.बी. सोनवणे | प्र.परवाना अधिक्षक |
| १४ | श्री. एन.के. बागुल | विद्युत अभियंता |
| १५ | श्री. पी.डी. चव्हाण | ओव्हरसिअर बांधकाम |
| १६ | श्री. सी.सी. बागुल | पा. पु. ओव्हरसिअर |
| १७ | श्री. हेमत पावटे | ओव्हरसिअर बांधकाम विभाग |
| १८ | श्री.एस.एन. देसले | लिपीक मनपा शिक्षण मंडळ |
| १९ | श्री. किशोर सुडके | बाजार विभाग |
| २० | श्री. सुक्राम आत्या राऊत | वाहन विभाग लिपीक |

म.सभापती सर्व उपस्थित सन्मा.सदस्य अति.आयुक्त सो.अधिकारी वर्ग छायाचित्रकार बांधव सभेचे कामकाज चालविणेसाठी आवश्यक तो कोरम पूर्ण झाल्याने नगरसचिव यांनी सभेचे कामकाज सुरुवात करावी.

म. नगरसचिव वंदे् मातरम् या राष्ट्रवंदनेसाठी सर्वांनी उभे रहावे.

विषय क्रमांक:- ३८ मागील स्थायी समिती सभेचे इतिवृत्त वाचून कायम करणे. ( ६/४/२०२१,१५/४/२०२१)

म. नगरसचिव नगरसचिव यांनी विषयांचे वाचन केले.

म.नागसेन बोरसे इतिवृत्त कायम करण्यांत यावे.

म. सभापती सर्व सन्मा.सदस्यांच्या सहमतीने मागील स्थायी समिती सभा दि. ६/४/२०२१, १५/४/२०२१ या सभांचे इतिवृत्त क्रमशः:वाचून कायम करण्यांत येत आहे.

**धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर ४३ दिनांक २९/४/२०२१**

मागील स्थायी समिती सभा दिनांक दि. ६/४/२०२१ रोजीच्या सभेतील स्थायी समिती ठराव नंबर २७ अखेर क्रमशः वाचून कायम करण्यांत येत आहे.

तसेच मागील स्थायी समिती सभा दिनांक १५/४/२०२१ रोजीच्या सभेतील स्थायी समिती ठराव नंबर २८ ते ३४ तसेच सभेत उपस्थित झालेली चर्चा व त्यावरील निर्णय क्रमश : वाचून कायम करण्यांत येत आहे.

सही/-x x x

**सभापती,**
**स्थायी समिती,**
**धुळे महानगरपालिका,धुळे**

विषय क्रमांक:- ३९ अर्बन मलेरीया स्किम अंतर्गत डास नियंत्रण व डास निर्मुलन करणे कामी निविदा दर मागविण्यांत आलेत, त्याबाबत आलेल्या कार्यालयीन अहवालावर फेर विचार करणे.

म.नगरसचिव नगरसचिव यांनी विषयांचे वाचन केले.

म.नागसेन बोरसे — आज पुन्हा विषयपत्रिकेवर सादर झालेला आहे याबाबत सन्माननीय सदस्यांना आवश्यक ती माहिती देण्यात आलेली आहे सदर एजन्सीला हा ठेका देताना ज्या काही अटी-शर्ती आपण नमूद केलेले आहेत त्याचे पूर्णपणे पालन झाले पाहिजे आपण एजन्सीला १५% प्रोफित देत आहोत वेतन पद्धती व दंडात्मक कार्यवाही नियमानुसार वेळच्या वेळी करणे गरजेचे आहे आपण ज्या वेळेस करारनामा करू त्या वेळेस त्या पद्धतीने काटेकोर पालन प्रशासनामार्फत व्हावे ही अपेक्षा आहे.

म.सभापती — आपण स्थायीच्या माध्यमातून कार्यादेश देताना करारनामा पुन्हा एकदा तपासून घेऊ.

म.सुनिल बैसाणे — मी या विषयासंदर्भात १५ २ २०१९ रोजी काही सूचना आयुक्त साहेब यांना केलेल्या होत्या त्याबाबत कार्यवाही झाले आहे किंवा नाही मला माहित नाही परंतु या एजन्सीच्या दरासंदर्भात वाटाघाटी करण्यात आल्याचे नमूद आहे यात वाटाघाटी अंती काय दर आले याबाबत उल्लेख नाही याबाबत टिपणी मध्ये खुलासा करावा.

म.शितल नवले — सदरचा विषय शहराच्या सार्वजनिक आरोग्याशी निगडित आहे विषय खूप चांगला आहे या एजन्सीमार्फत एकूण ९७ कर्मचारी नियुक्त करावयाचे आहेत त्याप्रमाणे प्रत्येक प्रभागाला तीन ते चार माणसे आपल्याला फोगिंग व इतर कामासाठी नियुक्त होणार आहे माझी आरोग्य अधिकाऱ्यांना एक विनंती असेल या ठिकाणी जो सक्षम अधिकारी असेल त्या अधिकाऱ्यांनी त्या प्रमाणे एक ग्रुप तयार करावा व कर्मचारी व तेथील नगरसेवक यांचा समन्वय असावा आपल्याकडे काही प्रभाग कार्यालय आहेत शाळा नंबर २८ अशोक नगर अशा जागा आहेत ही यंत्रणा संपूर्ण मनपा स्तरावर न ठेवता प्रभागनिहाय विभागणी केली तर कामाच्या दर्जात चांगल्याप्रकारे सुधारणा होईल व ग्रुप तयार झाल्यानंतर स्वच्छता व फवारणी बाबत रोज अपडेट याच्यावर टाकले गेल्याने एक नगरसेवक व कर्मचाऱ्यांमध्ये समन्वय निर्माण होईल आता पावसाळा सुरू होणार आहे मलेरिया डेंग्यू या गोष्टीसुद्धा वाढणार आहेत दुसरी गोष्ट आपण आज देवपुर चा भाग ड्रेनेज लाईन जोडतो आहोत सर्व गटारी ओपन आहेत आणि त्यामुळे डासांचा प्रादुर्भाव वाढला आहे या कारवाईमुळे डासांचा प्रादुर्भाव निश्चित प्रमाणात कमी होईल आपल्या कचऱ्याच्या ठेक्यात आपल्याला जे काही अडचण निर्माण झाल्यास व पश्चाताप करण्याची वेळ आली परंतु त्या याठिकाणी निर्माण व्हायला नको मी याबाबतच्या एजन्सीच्या नियम व अटी वाचलेल्या आहेत त्यांचे सॉफ्टवेअर आहेत ॲप्स आहेत आपण ते नियमित व चांगल्या पद्धतीने कसे चालू करू शकतो हे या कडे लक्ष दिले पाहिजे या निविदेमध्ये ज्या अटी शर्ती आहेत सॉफ्टवेअर आहेत. यात ज्या काही अटी शर्ती व सुविधा ठेकेदाराने सांगितलेले आहे तो दिले आहेत त्याप्रमाणे प्रशासनाने सुद्धा त्याप्रमाणे कार्यवाही होते किंवा नाही हे तपासणे गरजेचे आहे व त्यानुसार अंमलबजावणी करावी जेणेकरून शहराला एक चांगल्या प्रकारे आपण सेवा देऊ शकू. आस्था संस्थेबाबत हि अद्याप पर्यंत काही कारवाई झालेली नाही आपण फक्त बैठकीत विषय करतो परंतु त्याची अंमलबजावणी होत नाही यापुढे असे होता कामा नये.

म.सभापती — याबाबत मी स्वतः आयुक्त साहेबांशी संपर्क केलेला आहे व निविदा काढण्याबाबत फाइल अंतिम स्वाक्षरीसाठी आयुक्त महोदयांकडे आहे लवकरच आपण याबाबत नवीन निविदा काढून आपल्या म्हणण्याप्रमाणे सर्व काम पारदर्शक प्रमाणे पद्धतीने करण्याबाबत आपला आपला कटाक्ष राहणार आहे.

म.शितल नवले — या ठेक्यात यात मी पहिल्यांदा पाहत आहे की ठेकेदाराने १५% प्रोफीट ठेवलेला आहे काही हरकत नाही आपण त्याला पैसे देत आहोत परंतु त्याच्याकडून त्याप्रमाणे योग्य पद्धतीने काम करून घ्यावे हीच विनंती.

म.किरण कुलेवार आपण जे टेंडर सादर केले आहे ते शहराच्या लोकसंख्येनुसार सादर केलेले आहे चांगली गोष्ट आहे आणि त्याचा शहरासाठी नक्कीच उपयोग व्हायला पाहिजे मला प्रशासनाला प्रश्न विचारायचा आहे महानगरपालिका असताना किती कर्मचारी कार्यरत होते आणि सद्यस्थितीत किती कर्मचारी आहेत ही जी पदे आहेत शासनाची असल्याकारणाने ती रिक्त पदे आहेत त्यांचा पाठपुरावा आपण शासनाकडे केलेला आहे का शासनामार्फत ज्या औषधी आपल्याला प्राप्त होणार आहेत त्याची रक्कम ठेकेदाराच्या बिलातून आपण कमी करणार आहोत का याचा खुलासा करावा.

म.उपायुक्त आपला आकृतीबंध २०१५ ला मंजूर झालेला होता त्याप्रमाणे मध्ये मंजूर पदे १४२४ आहेत त्यानंतर आपल्याला ८५० पदे मंजूर होऊन आली आता आकृतिबंध यामध्ये २२७४ पदांना मान्यता देण्यात आलेली आहे आपल्याकडे बरीच पदे रिक्त आहेत काही पदे ही सरळसेवेने भरायचे आहेत व काही पदे पदोन्नतीने भरायचे आहेत पदे भरण्यास मान्यता मिळणे बाबत आपण शासनाकडे विनंती केलेली आहेत.

म.किरण कुलेवार या टेंडर मध्ये आपण २० कर्मचारी महानगरपालिकेचे देणार आहोत त्याचं नियोजन कसे काय करणार आहेत.

म.नगरसचिव सदर कर्मचारी ठेकेदाराकडे वर्ग होतील व त्यांचा पगार ठेकेदारामार्फत करण्यात येईल व त्याप्रमाणे प्रशासनामार्फत नियोजन केलेले आहे.

म.अमोल मासुंळे हा प्रस्ताव धुळेकर नागरिकांच्या आरोग्याच्या दृष्टिकोनातून अतिशय महत्त्वाचा आहे याठिकाणी सदस्यांनी देखील चांगले मत व्यक्त केलेले आहे आपण ज्या ठेकेदाराला काम देणार आहोत त्याच्या वाटाघाटी कशा पद्धतीने झालेल्या चार ते पाच मुद्दे आहेत मनपाच्या हिताच्या दृष्टीने वाटाघाटी झालेले आहेत ठेकेदाराने कर्मचारी नियोजन यंत्रसामुग्री वगैरे मुद्दे दिले आहेत परंतु ते मुद्दे फक्त कागदावरच नको आपण त्यांना जवळपास चौदा कोटी रुपये देणार आहोत त्या ठिकाणी मध्ये पैसे कसे देणार आहोत १४ व्या वित्त आयोगातून की महानगरपालिकेच्या फंडातून याचा उल्लेख नाही १४ कोटी खूप मोठी रक्कम आहे परंतु धुळेकर नागरिकांच्या दृष्टिकोनातून चांगली गोष्ट आहे सद्यस्थितीत कोरोनाने थैमान घातले आहे पावसात देखील डेंग्यू मलेरियाने धुळेकर नागरिकांना फार त्रास होतो धुळे शहरातील सेफ्टी टँकला जाळी बसवण्याच्यासाठी रुपये ३ लाख ७५ हजार आहे त्याचा सर्व्हे कसा करणार आहे आणि त्यांनी काय नियोजन दिले आहेत याची माहिती दिली तर बर होईल त्यांनी कागदावर चांगल्या प्रकारे मांडलेले आहे. आपण त्यांच्याकडून काम करून घेतले पाहिजे ागील कचऱ्याच्या प्रकरणात ज्या चुका झाल्या त्या यांमध्ये होणे अपेक्षित नाही त्यामुळे आपण या प्रस्तावाबाबत गंभीरपणे व प्रभावीपणे कारवाई करावी.

म.सभापती संबंधित संस्थेला कार्यदेश दिल्यानंतरही आपण स्थायी समितीमध्ये याबाबत वारंवार आढावा घेत राहणार आहोत.

म.शितल नवले सदर संस्थेने आपल्याला मोबाईल ॲप वैगरे दिलेले आहे.

म.आरोग्याधिकरी हो त्यांचे सद्य नाशिक महानगरपालिकेत काम सुरू आहे.त्यांची प्रत्येक कर्मचाऱ्याकडे ट्रॅकिंग व जिओ टॅग वर आपण त्याला मॅनिटर करू शकतो. ऑनलाईन पध्दतीने त्याचे ट्रॅकेर्करस आहेत.

म.शितल नवले असे असेल तर फार चांगली गोष्ट आहे. त्यांची अंमलबजावणी चांगली करा.

म. सभापती या विषयावर सर्व सन्मा. सदस्यांनी चांगल्या सुचना केलेल्या आहेत. या प्रस्तावाबाबत प्रशासनाने सदोष पध्दतीने करारनाम्यातील अटी शर्तीनुसार ठेकेदाराकडून काम करुन घ्यावे. याबाबत त्यांना कोणतीही सुट देण्यांत येवू नये.

एकात्मिक डांस निर्मुलनसाठी मेसर्स व्दिग्विजय एंटरप्राईजेस यांचे वाटाघाटी अंती ३ वर्षासाठी प्राप्त झालेल्या निविदा दरांना व संभाव्य खर्चास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ७३ नुसार मान्यता देण्यांत येत आहे. तसेच याबाबत करारनाम्यांतील अटी शर्तीनुसार संबंधित संस्थेंकडून योग्यप्रकारे काम करुन घेण्याबाबत प्रशासनाने दक्षता घ्यावी तसेच संस्थेच्या कामाचा आढावा घेवून त्याबाबत अहवाल मे. स्थायी सामिती समोर वेळोवेळी सादर करावा. सदर प्रस्ताव व कार्यवाहीबाबत लेखा आक्षेप निर्माण होणार नाही याची दक्षता घ्यावी. याबाबतची जबाबदारी संबंधित विभागाची राहील.

**धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर ४४ दिनांक २९/४/२०२१**

धुळे महानगरपालिके मार्फत नोंदणीकृत एकात्मीक डास नियंत्रण बाबत सेवा देणाऱ्या संस्था नेमणे कामी Expression of Interest (EOI) दिनांक ३०/९/२०२० रोजी प्रसिध्द करण्यात आली होती.

सदर कामाकरीता एकुण खालील ३ संस्थांनी सिलबंद पाकीटात प्रस्ताव सादर केला होता.

1.मे.एस. आर. पेस्ट कंट्रोल सर्व्हिसेस,नाशिक

2.2दिग्विजय एंटरप्राईजेस नाशिक

3.किरण कॉर्पोरेशन, मुंबई

सदर तीनही संस्थेंचा तांत्रीक लिफाफा उघडण्यात आला असता किरण कॉर्पोरेशन यांच्या ३ वर्षाचा अनुभव पुरेसा नसल्याने सदर संस्थेला बाद करुन खालील २ संस्थांचे दिनांक ११/२/२०२१रोजी वेळ दु.४.०० वा.मा.आयुक्त सो. यांच्या दालनात सादरीकरण ठेवण्यात आले होते.

१. मे.एस. आर. पेस्ट कंट्रोल सर्व्हिसेस,नाशिक

२. दिग्विजय एंटरप्राईजेस नाशिक

सदर सादरीकरणा वेळी Proposal of Mosquito Control in DMC Area नुसार नेमण्यात आलेल्या समितीने दिग्विजय एंटरप्राईजेस यांना १३९ गुणांकन व एस.आर.पेस्ट कंट्रोल यांना ६४ ½ गुण प्राप्त झाले होते.

तरी एस.आर.पेस्ट कंट्रोल यांना कमी गुणांकन प्राप्त झाल्याने सदर संस्थेचे दरपत्रक न उघडता सर्वाधीक गुणांकन प्राप्त झालेली संस्था दिग्विजय एंटरप्राईजेस यांचे दरपत्रक उघडणे बाबत मा.आयुक्त सो. यांनी दिनांक १८/३/२०२१ रोजी मान्यता दिली होती.

त्यानुसार दिनांक २५/३/२०२१ रोजी दु.२.३०वा.मा.आयुक्त सो.यांच्या दालनात मा. उपायुक्त सो.,मा.सहा.आयुक्त सो.,मा.लेखाधिकारी सो., मा.आरोग्याधिकारी, मा. जिवशास्त्रज्ञ सो.व मलेरीया पर्यवेक्षक यांच्या उपस्थितीत दिग्विजय एंटरप्राईजेस यांचे सिलबंद पकीटात सादर केलेले दरपत्रक उघडण्यात आले असता त्यांचे खालील प्रमाणे दर प्राप्त झाले होते.

| Sr.No. | Description | Monthy Cost |
|---|---|---|
| A | Manpower | १८१५९७५ |
| B | Personal Protective equipment | १६९४२७ |
| C | Equipments | ७३५०० |
| D | Insecticide | ३७५००० |
| E | Monitoring tool | १११००० |
| F | Miscellaneous | ४६१००६ |

| | | |
|---|---|---|
| G | Fuel cost | ५३७९९२ |
| Total | | ३५४३९०० |
| **H** | **Profit@ १५% of G** | **५३१५८५** |
| स | **Grand Total** | **४०७५४८५** |
| | **Monthly Cost in Rs.** | **४०७५४८५** |

सदरचे दर जादाचे वाटत असल्याने दिग्विजय एंटरप्राईजेस यांना दिनांक ३०/३/२०२१ रोजी मा.आयुक्त सो. यांच्या दालनात निगोसीएशन (वाटाघाटी) उपस्थित राहणे बाबत उक्त संदर्भ क्र.२ अन्वये पत्र देण्यात आले होते.

दिनांक३०/३/२०२१ रोजी दु.१२.०० वा.मा. आयुक्त सो.यांच्या दालनात संस्थेचे प्रतिनिधीसोबत सदर दराबाबत वाटाघाटी साठी बैठक घेण्यात आली असता सदर संस्थेला फेर तपासुन दर सादर करणे बाबत कळविले होते.

त्यानुसार सदर संस्थेने संदर्भ क्र.३ अन्वये दिनांक ६/४/२०२१च्या पत्रानुसार खालील प्रमाणे वाटाघाटी अंती दर सादर केलेले आहे.

| Sr.No. | Description | Monthy Cost |
|---|---|---|
| A | Manpower | १८३५९४० |
| B | Personal Protective equipment for workers | ४५७५२ |
| C | Equipments & Maintanance | ७४६२४ |
| D | Larvacides and Adulticides & Toilet Vent Pipe Mesh (jail) | ३७५००० |
| E | Monitoring tool & Maintanance | १११००० |
| F | Miscellaneous | ३४४७२१ |
| G | Diesel / Petrol Fuel cost for fogging | ५५६८४४ |
| **Total** | | **३३४३८७९** |
| H | **Profit@ १५% of G** | **५०१५८५** |
| री | **Grand Total** | **३८४५४६१** |
| | **TDS @२% of J** | **७६९०९** |
| | **Insurance @१% of J** | **३८४५५** |
| | **Monthly Cost in Rs.** | **३९६०८२५** |

उक्त दरानुसार वार्षिक ४,७५,२९,९००/- व ३ वर्षाकरीता १४,२५,८९,७००/- खर्चअपेक्षीत आहे. त्यानुसार उपमुलेप यांनी विभागाने व लेखा विभागाने दिलेल्या अभिप्रायास अधीन राहुन विभागाने प्रस्तावीत केलेल्या कामाचे वाटाघाटी अंती आलेले दर मे.स्थायी समिती पुढे मान्यतेस सादर करणे बाबत शिफारस केली आहे.त्यानुसार सदर प्रस्ताव फेर निर्णयार्थ मे. स्थायी समिती समोर सादर झालेला आहे.

उक्त कार्यालयीन अहवाल व सन्मा. सदस्यांनी केलेल्या चर्चेनुसार एकात्मिक डांस निर्मुलनसाठी मेसर्स दिग्विजय एंटरप्राईजेस यांचे वाटाघाटी अंती ३ वर्षासाठी प्राप्त झालेल्या निविदा दरांना व संभाव्य खर्चास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ७३ नुसार मान्यता देण्यांत येत आहे. तसेच याबाबत करारनाम्यांतील अटी शर्तीनुसार संबंधित

संस्थेंकडून योग्यप्रकारे काम करुन घेण्याबाबत प्रशासनाने दक्षता घ्यावी तसेच संस्थेच्या कामाचा आढावा घेवून त्याबाबत अहवाल मे.स्थायी सामिती समोर वेळोवेळी सादर करावा. सदर प्रस्ताव व कार्यवाहीबाबत लेखा आक्षेप निर्माण होणार नाही याची दक्षता घ्यावी. याबाबतची जबाबदारी संबंधित विभागाची राहील.

**सर्वानुमते मंजुर,**

सही/-x x x

**सभापती,**

**स्थायी समिती,**

**धुळे महानगरपालिका,धुळे**

# धुळे महानगरपालिका,धुळे

## नगरसचिव कार्यालय

## स्थायी समिती सभा क्रमांक ११ चे इतिवृत्त

---

**धुळे मनपा भारतरत्न अटलबिहारी वाजपेयी सभागृह**
**गुरुवार दिनांक ०६/०५/२०२१**
**वेळ :- सकाळी ११-०० वाजता.**

धुळे महानगरपालिका स्थायी समितीची साप्ताहिक सभा आज गुरुवार दिनांक ०६/०५/२०२१ रोजी सकाळी ११-००वाजता **मा.श्री संजय सुधाकर जाधव,सभापती**,स्थायी समिती, मनपा,धुळे यांच्या अध्यक्षतेखाली **धुळे मनपा भारतरत्न अटलबिहारी वाजपेयी सभागृह** भरली. स्वाक्षरी बुकावर सही करुन खालील सन्मा.सदस्य सभागृहात हजर होते.

| अ.क्रं. | सदस्यांचे नांव | हुद्दा |
|---|---|---|
| १ | श्री. जाधव संजय सुधाकर | सभापती |
| २ | श्री. बैसाणे सुनिल तुळशिराम | सदस्य |
| ३ | श्रीमती माळी भारती अशोक | सदस्या |
| ४ | श्रीमती बोरसे पुष्पा प्रकाश | सदस्या |
| ५ | श्री. मासुळे अमोल पावबा | सदस्य |
| ६ | श्री. देवरे कमलेश नारायण | सदस्य |
| ७ | श्रीमती पठाण हिना अस्लम | सदस्या |
| ८ | श्री. सईद बेग हाशम बेग | सदस्य |
| ९ | श्री. नवले शितल मोहन | सदस्य |
| १० | श्रीमती कुलेवार किरण राकेश | सदस्या |
| ११ | श्रीमती वराडे वैशाली भिकन | सदस्या |
| १२ | श्री. जाधव बन्सीलाल माणिक | सदस्य |
| १३ | श्रीमती चौधरी मंगला अर्जुन | सदस्या |
| १४ | श्री. पटेल अमीन अब्दुल करीम | सदस्य |

**उपस्थित अधिकारी गण**

| अ.क्र. | अधिकाऱ्यांचे नाव | हुद्दा |
|---|---|---|
| १ | श्री. गणेश गिरी | अति. आयुक्त |
| २ | श्रीमती शिल्पा नाईक | उपायुक्त |
| ३ | श्री. शांताराम गोसावी | उपायुक्त |
| ४ | श्री. तुषार नेरकर | सहा. आयुक्त |

| | | |
|---|---|---|
| ५ | श्री. विनायक कोते | सहा. आयुक्त |
| ६ | श्रीमती पल्लवी शिरसाठ | सहा. आयुक्त |
| ७ | श्री. महेंद्र परदेशी | नगररचनाकार |
| ८ | श्री मनोज अरविंद वाघ | प्र.नगरसचिव |
| ९ | श्री. के.एन. शिंदे | अभियंता |
| १० | डॉ. महेश मोरे | आरोग्याधिकारी |
| ११ | श्री. लक्ष्मण पाटील | सहा.आरोग्याधिकारी |
| १२ | श्री. चंद्रकांत जाधव | सहा.आरोग्याधिकारी |
| १३ | श्री. पी.डी नाईक | लेखापाल |
| १४ | श्री. रजमान अन्सारी | प्र. कार्यालय अधिक्षक |
| १५ | श्री.आर.बी. सोनवणे | प्र.परवाना अधिक्षक |
| १६ | श्री. एन.के. बागुल | विद्युत अभियंता |
| १७ | श्री. सी.सी. बागुल | पा. पु. ओव्हरसिअर |
| १८ | श्री. पी.डी. चव्हाण | ओव्हरसिअर बांधकाम |
| १९ | श्री. हेमंत पावटे | ओव्हरसिअर बांधकाम |
| २० | श्री.आर. आर. गायकवाड | लिपीक मनपा शिक्षण मंडळ |
| २१ | श्री. राजू माईनकर | भांडारपाल |
| २२ | श्री. किशोर सुडके | बाजार विभाग |
| २३ | श्री. सुक्राम आत्या राऊत | वाहन विभाग लिपीक |
| २४ | श्री. प्रसाद जाधव | अति. विभाग प्रमुख |

म.सभापती सर्व उपस्थित सन्मा.सदस्य अति.आयुक्त सो.अधिकारी वर्ग छायाचित्रकार बांधव सभेचे कामकाज चालविणेसाठी आवश्यक तो कोरम पूर्ण झाल्याने नगरसचिव यांनी सभेचे कामकाज सुरुवात करावी.

म. नगरसचिव वंदे् मातरम् या राष्ट्रवंदनेसाठी सर्वांनी उभे रहावे.

**सभेच्या सुरुवाती सन्मा. सदस्यांकडून आलेले रजेचे अर्ज**

सन्मा. सदस्य श्री. नागसेन दामोदर बोरसे यांनी त्यांची तब्येत बरी नसल्याने आजच्या सभेस रजा मंजूर करणेबाबत विनंती अर्ज सादर केलेला आहे.

म. सभापती सन्मा. सदस्यांच्या विनंती अर्जानुसार आजच्या सभेस त्यांची रजा मंजूर करण्यांत येत आहे.

सन्मा. सदस्य श्री. नागसेन दामोदर बोरसे यांनी त्यांची तब्येत बरी नसल्याने आजच्या सभेस रजा मंजूर करणेबाबत विनंती अर्ज सादर केलेला आहे.

सन्मा. सदस्यांच्या विनंती अर्जानुसार आजच्या सभेस त्यांची रजा मंजूर करण्यांत येत आहे.

**सर्वानुमते मंजूर,**
**सही/- x x x**
**सभापती,**
**स्थायी समिती,**
**धुळे महानगरपालिका,धुळे**

**सभेच्या सुरुवाती सन्मा.सभापती सो. यांचेकडून आलेली श्रध्दांजलीची यादी**

धुळे नगरपालिकेचे माजी उपनगराध्यक्ष दिलीप उमराव जगताप यांचे नुकतेच निधन झाले आहे.अत्यंत मनमिळावू स्वभावाचे दिलीप मामा जगताप यांनी मनपा शिक्षण मंडळाचे सभापती पद देखील भूषविले होते.त्यांचे दु:खद निधनानिमित्त आजच्या स्थायी समिती सभेत त्यांना श्रध्दांजली सर्मपित करुन तसा ठराव पारीत करण्यांत यावा.

धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर ४६ अ दिनांक ०६/०५/२०२१

तत्कालीन धुळे नगरपालिकेचे माजी नगराध्यक्ष दिलीप उमराव जगताप यांचेनुकतेच हदयविकाराच्या झटक्याने निधन झाले आहे. अत्यंत मनमिळावू स्वभावाचे दिलीप मामा जगताप यांनी मना शिक्षण मंडळाचे सभापती पद देखील भूषविले होते. त्यांचे दु:खद निधनामुळे या सभेस आतिव दु:ख होत आहे. ही सभा त्यांचे कुटुंबियांचे दु:खद सहभागी असून त्यांचे आत्मास चिरशांती प्रदानार्थ दोन मिनिटे मौन उभे राहून त्यांना भावपूर्ण श्रध्दांजली सर्मपित करण्यांत येत आहे.

**सर्वानुमते मंजूर,**
**सही/- x x x**
**सभापती,**
**स्थायी समिती,**
**धुळे महानगरपालिका,धुळे**

| | |
|---|---|
| विषय क्रमांक:- ४० | म.महापौर सो यांचे सेवेतील टाटा सफारी क्र.एम.एच.१८ बी.आर.०१९ वाहनांची दुरूस्ती खर्च ₹.१,०६२९७/- मात्रच्या खर्चास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम प्रकरण सात ७३ (क) अन्वये मंजुरी देणेबाबत आलेल्या कार्यालयीन अहवालावर विचार करणे. |
| म. नगरसचिव | नगरसचिव यांनी विषयांचे वाचन केले. |
| म. शितल नवले | यात विषयांची सविस्तर जर टिपणी वाचली तर यामध्ये असे नमूद आहे की अपघात झाल्याने दुरुस्ती खर्च करण्यात आलेला आहे माझ्या माहिती प्रमाणे सदर वाहन दीड ते दोन वर्षांपूर्वी घेतलेले आहे त्याचा इन्शुरन्स नव्हता का आपण सदरचे काम इन्शुरन्स कंपनीकडून का केले नाही याबाबत खुलासा होणे आवश्यक आहे आपण संबंधित कंपनीला पैसे अदा करीत आहोत. |
| म.सभापती | त्यामध्ये कंपनीत नमूद केलेले आहे अपघाताची नोंद पोलिस दप्तरी झाली असल्या बाबत नमूद आहे यासाठी आपण विमा कंपनीकडे क्लेम करणार आहोत |

| | |
|---|---|
| श्री राऊत | आपण कंपनीला बिल अदा करतो व कामाची गरज असल्याने काम करून घेतो त्यानंतर आपण क्लेम करतो विमा कंपनी आपल्या अकाउंटला पैसे जमा करते. |
| म.शितल नवले | आपले स्वत:चे वाहन राहिले असते तर आपण आधी पैसे भरले असते का आपल्याला दोन वेळा पैसे भरावे लागल्याने आपले व्याज पण जाते आपण जर विमा कंपनी बाबत चौकशी केली अनेक कंपन्या आज या ठिकाणी आहेत नेटवर अनेक कंपन्यांची माहिती येत असते आपण त्यात रेटिंग पाहून संबंधित विमा कंपनीशी संपर्क केला तर चांगल्या प्रकारे आपल्याला आर्थिक फायदा होऊ शकतो आपण यापुढे विमा करताना कॅशलेस करा यामध्ये महानगरपालिकेचे कोणतेही वाहन खराब झाले तर ते तातडीने कमीत कमी रक्कमेत दुरुस्त होऊ शकेल यामध्ये अजून एक गोष्ट नमूद करावीशी वाटते आपण पदाधिकारी किंवा अधिकाऱ्यांच्या गाड्या लगेच दुरुस्त करून घेतो परंतु झुला गाडी तीन तीन आठवडे झाले बंद आहे आज माझ्या प्रभागात कचरा ओसंडून वाहत आहेत मला याबाबत व्हाट्सअप वर नागरिकांनी मेसेज टाकलेले आहेत आपण अशा गाड्यांचे काम महिने महिने करू शकत नाही याबाबत खुलासा व्हावा. |
| म.अमिन पटेल | झुला गाडी दुरुस्त होत नाही तोपर्यंत घंटागाडी ने कचरा उचलण्यात यावा आपण गाडीसाठी एक ते दीड लाख खर्च करू शकत नाही ही दुर्दैवाची बाब आहे आणि घंटागाडी बऱ्याच ठिकाणी जाऊ शकत नाही त्यामुळे झुला गाडी हि लवकर दुरुस्त करावी. |
| म.सभापती | सदर प्रस्ताव कशामुळे थांबलेल आहे गाडी का दुरूस्त होत नाही. गाडी दुरूस्त होण्यासाठी किती दिवस लागतात. |
| श्री.राऊत | सदर प्रस्ताव माझ्याकडे २७ तारखेला आलेला आहे. सदर गाडी हि ठेकेदाराकडे आहे. त्यामुळे प्रथम मंजूरी घेण्यास कालावधी लागला.दुरूस्तीबाबत कार्यादेश कंपनीला दिलेला आहे. परंतू लॉकडाऊनमूळे गाडीचे काम प्रलंबिल आहे. |
| म.अमिन पटेल | आपण ठेकेदारला लाखो रूपये बिल अदा करीत आहोत. मग झुलागाडी तो रिपेंअर का करीत नाही. |
| श्री.राऊत | चार दिवसात झुलागाडी दुरूस्त करण्यात येईल. |
| म.शितल नवले | जो पर्यंत झुलागाडी दुरूस्त होत नाही तो पर्यंत टॅक्टरने तरी कचरा उचलणेबाबत कार्यवाही करावी. |
| म.सभापती | श्री.जाधव आपण याबाबत तातडीने कार्यवाही करा.तसेच श्री.गोसावी साहेब यांनी झुलागाडी तातडीने सूरू करणेबाबत लक्ष दयावे. |

सर्व सन्मा.सदस्यांच्या सहमतीने व कार्यालयीन अहवालास अधिन राहून सदर प्रसतावास कार्योत्तर मान्यता देण्यांत येत आहे.

**धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर ४७ दिनांक ०६/०५/२०२१**

धुळे महानगरपालिका सामान्य प्रशासन विभागाकडील म.महापौर सो यांच्या सेवेतील वाहन क्र एम.एच.१८ बी.आर.००१९ हे मनपा टाटा सफारी वाहन चालक श्री. राजेश चित्ते यांच्या लेखी अहवालानुसार म.महापौर सो यांच्या सेवेतील वाहन क्र एम.एच.१८ बी. आर. ००१९ दि.१४/०२/२०२१ रोजी घेऊन गेले असता वाहन परत येत असतांना वाहनांचा पडघा येथे अपघात झाल्यामुळे वाहनांचे ब-याच मोठया प्रमाणत नुकसान झाले असल्याचे दिसुन आले आहे सदर वाहन हे मा.महापौर यांचे सेवेतील असल्यामुळे वाहन कार्यरत करणे आवश्यक आहे असा अहवाल व इस्टिमेट वाहन चालक व मेकॅनिक यांनी वाहन विभागाकडेस सादर केला त्यांचे अहवालानुसार वाहन अपघाता बाबत माहिती घेतली असता वाहनावर मनपाचा वाहन चालक न जाता खाजगी वाहन चालक श्री. देविदास छगन बाबर

नामक वाहन चालवित असल्याचे कळले व वाहनास वरील प्रमाणे दिनांकास अपघात होऊन अपघाताची नोंद पोलीस दप्तरी झाले असल्याचे कळले. त्यानुसार विमा कंपनी दि न्यु इंडिया एन्शोरन्स कं. कडेस क्लेम करणेत आला आहे. वाहन म.महापौर सो यांचे सेवेतील असल्याने व दुसरे वाहन उपलब्ध नसल्याने वाहन दुरूस्ती करणे आवश्यक आहे.

| | |
|---|---|
| **रिमुव्हिंग & रिफिटींग चार्ज** | ₹.7800.00/- |
| **कटींग, वेल्डींग,डेन्टींग चार्ज-** | ₹.2000.00/- |
| **पेंटींग चार्ज** | ₹.24500.00/- |
| **सीजीएसटी-९%** | ₹.3087.00/- |
| **एसजीएसटी-९%** | ₹.3087.00/- |
| **एकुण मजुरी सर्व करासहित** | ₹.40,474.00/- |

| | |
|---|---|
| **एकुण स्पेअर पार्ट सर्व करासहित रक्कम** | ₹.65823/- |
| **एकुण मजुरी रक्कम सर्व करासहित** | ₹.40,474/- |
| **एकुण स्पेअर पार्ट मजुरी रक्कम सर्व करासहित** | 1,06,297/- |

तरी वाहनास करण्यात येणारी दुरूस्ती मजुरीसह मे.उज्वल ॲटोमोटिव्ह प्रा.लि. धुळे टाटा मोटर्स अधिकृत वितरक यांचे कडुन करुन घेणे आवश्यक आहे.

**सन २०२०-२१ या चालु आर्थीक वर्षात या बिजकातील खर्चासहित** ₹.४५,४९७/- + ₹.१,०६,२९७/- = ₹.१,५१,७९४/- **मात्र होत आहे**.

सामान्य प्रशासन विभाग(वेतनेत्तर खर्च) वाहन दुरूस्ती १)₹.१०,०००००/- २)पुर्वीचा खर्च ₹.३,१०,४९१/- ३) या बिलातील खर्च ₹.१,०६,२९७/- आहे . आजपावेतो खर्च २ व ३ ची बेरीज ₹.४,१६,७८८/- या बिलातील वाहन दुरूस्ती खर्च वजा जाता आजपावेतो उपलब्ध शिल्लक ₹.५,८३,२१२/- मात्र आहे. त्यानुसार अंदाजपत्रकीय तरतुद मधुन करता येईल.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम तरतुद नुसार सदर खर्च ₹.१,०६,२९७/- मात्रला मा.आयुक्त सो. यांना मंजुरीचे अधिकार आहेत त्यानुसार म.आयुक्त सो. यांनी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ६९ व ८४ नुसार रुपये ₹.५०००००/-(पाच लक्ष) पर्यंत खर्चाचे अधिकार जा.क्र./धुमपा/आस्था/७२४ दि.२०/९/२०१९ अन्वये म.उपायुक्त सो यांना परावर्तीत केलेले आहे. तरी सदर खर्च ₹.१,०६,२९७/- मात्रच्या खर्चास, प्रशासकीय व आर्थिक मंजुरी मिळणे व सदर खर्च आर्थिक मर्यादेपेक्षा जास्त असल्याने व टाटा अधिकृत वितरक यांचे कडुन विना दरपत्रक दुरूस्ती करावयाची असल्याने मे.स्थायी समितीकडेस मान्यता मिळणेसाठी सादर झालेला आहे.

सर्व सन्मा.सदस्यांच्या सहमतीने व कार्यालयीन अहवालास अधिन राहून सदर कामी झालेला खर्च रु.१,०६,२९७/-मात्रला कार्योत्तर मान्यता देण्यांत येत आहे. सदर प्रस्ताव व कार्यवाहीबाबत लेखा आक्षेप निर्माण होणार नाही याची दक्षता घ्यावी.याबाबतची जबाबदारी संबंधित विभागाची राहील.

**सर्वानुमते मंजूर,**
**सही/- x x x**
**सभापती,**
**स्थायी समिती,**
**धुळे महानगरपालिका,धुळे**

विषय क्रमांक:- ४१ मनपा कार्यालयीन कामासाठी म.सहा. आयुक्त -श्री.तुषार नेरकर (परिविक्षाधिन) यांना स्वत:चे

खाजगी वाहन वापरणेस व त्यापोटी खाजगी वाहन प्रतिपुर्ती भत्ता/भाडे **₹.१३८७५/-** मासिक भाडे लागु करणेबाबत आलेल्या कार्यालयीन अहवालावर विचार करणे.

म. नगरसचिव नगरसचिव यांनी विषयांचे वाचन केले.

म.शितल नवले:- सभापती महोदय हा विषय मंजूरीला काही हरकत नाही परंतू माझ्या कडे काही सुचना आहेत यामध्ये आपल्या महानगरपालिकेत अनेक जण वरिष्ठ अधिकारी पदाचे काम करीत आहेत सलग सात ते आठ वर्षापासून ते त्या पदावर काम करीत आहेत त्यांची पदे सुद्धा क्लासवन class-२दर्जाची आहेत त्यांनाही या प्रमाणे वाहन भत्ता मिळाला पाहिजे असे माझे मत आहे आपले प्रभारी नगरसचिव मनोज वाघे सुद्धा सात ते आठ वर्षापासून नगर सचिव पदावर कार्यरत आहेत त्यांचे काम देखील आतापर्यंत उत्तम झालेले आहे त्यांना आपण शासनाच्या निकषाप्रमाणे व कायद्याच्या बाबतीत तपासून त्यांना सुद्धा वाहन भत्ता देणेबाबत कार्यवाही करू शकतो आपण त्यांना हक्काने काम सांगतो तर त्यांना आवश्यक ते भत्ते देणे हे आपले हे दायित्व आहे मला मी विनंती करतो की या पुढच्या बैठकीत याबाबत कायदेशीर बाबी तपासून त्याप्रमाणे प्रस्ताव स्थायी समितीपुढे सादर करावा.

म.सुनिल बैसाणे:- शितल भाऊ नवले यांनी अतिशय चांगला मुद्दा उपस्थित केलेले आहेत श्री मनोज वाघे सुद्धा आठ वर्षापासून तर प्रभारी नगर सचिवपदाचा कार्यभार सांभाळत आहेत त्यांना कुठलाही अतिरिक्त भत्ता मनपा मार्फत देण्यात येत नाही त्याचप्रमाणे मनपा मध्ये अनेक अधिकारी देखील काम करतात आपले सहा.आयुक्त श्री.विनायक कोते होते हे देखील त्या पद्धतीने काम करीत आहेत त्यांनाही वाहन भत्ता मिळाला पाहिजे याबाबत शासनाचे निकष व कायदेशीर बाबी तपासून आपण कायद्याच्या चौकटीच्या बाहेर न जाता या अधिकाऱ्यांना वाहन भत्ता लागू करण्याबाबतचा प्रस्ताव स्थायी समितीच्या बैठकीत घ्यावा म्हणजे आपल्याला संबंधित अधिकाऱ्यांना न्याय देता येईल.

म.सभापती:- आपण याबाबत नक्कीच निर्णय घेऊ मी प्रशासनाला आदेशित करतो की याबाबत स्वतंत्र प्रस्ताव योग्य त्या कायदेशीर तरतुदी स्थायी समितीपुढे सादर करावा.

सर्व सन्मा. सदस्यांच्या सहमतीने व कार्यालयीन अहवालास अधिन राहून सदर प्रस्तावास मान्यता देण्यांत येत आहे.

**धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर ४८ दिनांक ०६/०५/२०२१**

धुळे म.न.पा. सहा. आयुक्त श्री.तुषार नेरकर(परिवीक्षाधिन) यांनी त्याचे स्वत:चे वाहन क्र. एम.एच.४१ ए झेड ९७३७ हे धुळे मनपा कार्यालयीन कामकाजासाठी दि.०१/०१/२०२१ पासुन वाहन वापरणेस व वाहन वापरणे बाबत वाहन प्रतिपुर्ती भत्ता मिळणेस सहा.आयुक्त श्री.तुषार नेरकर यांनी पत्र सादर केलेले आहे.

मे.स्थायी समिती ठराव नं ८९ दि.१०/०८/२०१२ अन्वये वाहन भत्ता बंद करुन भाडे तत्वावर वाहन लावणे बाबत निर्णय होऊन दि. ०९/०१/२०१३ रोजी वाहन भाडे तत्वावर पुरविणे बाबत फेर निविदा (टेंडर) नोटीस प्रसिध्द करणेत आली होती. निविदेत प्राप्त दर जास्त असल्याने व शासन निर्णयात मासिक नमुद दर कमी आहेत. त्या दरातच वाहन प्रतिपुर्ती भत्ता देणेबाबत मा. आयुक्त सो. यांनी पदधिकारी/अधिकारी दि.२८/०१/२०१३ ने मंजुरी दिलेली आहे.

तरी प्राप्त निविदा दर मधील दरा नुसार ₹.२९०००/- मात्र प्रति माहे भाडे येणार असुन शासन निर्णय नुसार दर रक्कम ₹. १३८७५/- मात्र आहे. तरी यामध्ये धुळे महानगरपालिकेचा रक्कम ₹. १५१२५/- मात्रचा हिताचे असुन खालील प्रमाणे मासिक भाडे देय राहिल.

**मासिक वाहन प्रतिपुर्ती भत्ता**

**दि. ०१/०१/२०२१ पासुन प्रत्येकी एक (१) महिना ₹. १३८७५/-**

सहा. आयुक्त-श्री.तुषार नेरकर (परिविक्षाधिन) सो. यांना एक (१) महिन्याच्या वाहन प्रतिपुर्ती भत्ता रुपये १३,८७५/- मात्र लागु करता येईल व सदर खर्च वाहन भाडे बजेट तरतुद रक्कम ₹. ४०,०००००/- मात्र मधुन करता येईल.

शासन निर्णय क्रमाकं —वाहन १०.०५/प्र.क्र.१३/२००५/विनियम मंत्रालय मुंबई दि.२५ मे २००५ नुसार स्थायी समिती ठरांव क्र.१० दि.२१/१२/२००६ चे नुसार पदाधिकारी व आयुक्त व त्या पेक्षा उच्च दर्जा वरील उपायुक्त व इतर प्रति नियुक्तीने वर्ग १ व वर्ग २ च्या अधिका-याना वाहन वापराच्या दर महा खर्चाची प्रतिपुर्ती डिझेल वाहनासाठी १४८७५/- मधुन रु.१०००/- वजावट करुन १३८७५/- मात्र मंजुरी देण्यात आली आहे.

शासन निर्णय क्र.वाहन -१००७/प्र.क्र४८/२००७/विनिमय मंत्रालय मुंबई दि.३१ डिसेंबर २००७ अन्वये शासनाने खाजगी वाहन शासकीय कामाकाजासाठी वापरणेसाठीची योजनेस मिळालेला अल्प प्रतिसाद पाहुन योजना बंद करणेचा निण्रय घेण्यात आला. सदरील शासन निर्णया अन्वये जे अधिकारी सदर शासन निर्णय निर्गमित होण्याच्या दिनकांस या योजने नुसार स्वत:चे खाजगी वाहन शासकीय कामाकाजासाठी वापरत आहेत त्याच्या करिता सदर योजनेचा लाभ ते त्या पदावर कार्यरत असे पर्यंत कायम ठेवण्यात येत आहे. त्यानुसार मनपातील अधिकारी पदधिकारी यांना धुळे महानगरपालिका ठरांव क्र.२०१ दि.१३/०१/२०१६ अन्वये कार्यालयीन अहवालास अधिन राहुन मान्यता देण्यात आली आहे व या संदर्भात शासनाकडील आदेश तपासुन त्यानुसार उचित निर्णय प्रशासनाने घ्यावा असे नमुद आहे. तात्कालीन म.आयुक्त सो यांनी मनपातील पदाधिकारी/ अधिकारी यांना वाहन प्रतिपुर्ती भत्ता अदा करणेचा निर्णय मनपाचा आर्थिक हिताचे असल्याने मनपातील पदाधिकारी/ अधिकारी यांना वाहन प्रतिपुर्ती भत्ता अदा करणेस मंजुरी दिली आहे.

तरी सहा.आयुक्त-श्री.तुषार नेरकर (परिविक्षाधिन) यांना प्रत्येकी ०१ महिन्याचा मासिक वाहन प्रतिपुर्ती भत्ता रक्कम **₹.१३८७५/-(तेरा हजार आठशे पंच्याहत्तर** ) मात्र लागु करणेस सदर प्रस्ताव मंजुरीसाठी मे.स्थायी समितीपुढे सादर झालेला आहे.

सर्व सन्मा.सदस्यांच्या सहमतीने व कार्यालयीन अहवालास अधिन राहून सहा. आयुक्त-श्री.तुषार नेरकर (परिविक्षाधिन) यांना प्रत्येकी ०१ महिन्याचा मासिक वाहन प्रतिपुर्ती भत्ता रक्कम **₹.१३८७५/-(तेरा हजार आठशे पंच्याहत्तर**) मात्र लागु करणेस मान्यता देण्यांत येत आहे.

तसेच धुळे महानगरपालिकेचे सहा.आयुक्त श्री. विनायक कोते सहा.आयुक्त पदावर कार्यरत आहेत.तसेच श्री. मनोज अरविंद वाघ हे प्रभारी नगरसचिव पदावर गेल्या ७- ८ वर्षापासून उत्तम प्रकारे काम संभाळत आहेत.त्यांना देखील मासिक वाहन प्रतिपूर्ती भत्ता देणेबाबत प्रशासनाने नियमानुसार कार्यालयीन प्रस्ताव स्थायी समिती पुढे सादर करावे.

**सर्वानुमते मंजूर,**
**सही/- x x x**
**सभापती,**
**स्थायी समिती,**
**धुळे महानगरपालिका,धुळे**

विषय क्रमांक:- ४२ धुळे शहरात पंतप्रधान मा.श्री.नरेंद्रजी मोदी सो. यांच्या शुभहस्ते अक्कलपाडा पाणी पुरवठा योजना व भुमिगत गटारीचा शुभारंभ प्रसंगाचे छायचित्र धुळे मनपा सभागृहात लावणेकामी

झालेला खर्च रु.९०००/- मात्रला कार्योत्तर मंजुरी देणेबाबत आलेल्या कार्यालयीन अहवालावर विचार करणे.

म. नगरसचिव — नगरसचिव यांनी विषयांचे वाचन केले.

म.कमलेश देवरे — ज्या कामांचे उद्‌घाटन देशाचे पंतप्रधान करतात त्या कामांची आजची परिस्थिती काय त्या कामांवर आजपर्यंत अधिकाऱ्यांनी पाहणी केली आहे का वारंवार तक्रारी करून देखील कोणताही बदल व कार्यवाही त्यामुळे ठेकेदाराकडून होत नाही मी एक ते दीड वर्षापासून या कामाचा पाठपुरावा करीत आहे भूमिगत गटारीची  अत्यंत वाईट अवस्था आहेत जे चेंबर बनवले आहेत ते वाहने गेल्यानंतर तुटून गेलेले आहेत तसेच जे काळे पाईप टाकलेले आहे ते निघून गेलेले आहेत अशी परिस्थिती आज योजनेची आहे यासंदर्भात तातडीने कार्यवाही होण्यासाठी संबंधित अधिकाऱ्यांना बैठकीत बोलावण्यात यावे.

म.सभापती — आपण याबाबत सातत्याने विषय मांडत आहात माझे याबाबत आपले अभियंता श्री कैलाश शिंदे यांच्याशी बोलणे झाले आहे आपण या विषयावर संबंधित अधिकाऱ्यांची स्वतंत्र बैठक लावणार आहोत आपण निश्चित यावर कार्यवाही करून त्यात आपण सर्वांना बोलवू श्री शिंदे यांनी बैठकीचे नियोजन करावे त्यांच्याकडून जर काही निष्पन्न होत नसेल तर आपण यावर विशेष सभा घेऊन त्यांच्यावर ब्लॅकलिस्टची कारवाई करू.

म.कमलेश देवरे — जर या कामात सुधारणा झाली आणि ठेकेदाराने जर काम चांगले काम केले व नागरिकांचे समाधान झाले तर हा जो छायाचित्र लावण्याचा खर्च आहे तो मी वैयक्तिक करेल मी माझ्या मानधनातून हा खर्च करेल.

म.अमोल मासुंळे — मागील पुर्ण वर्ष कमलेश भाऊनी सातत्याने भुमिगत गटारीचा प्रश्न उपस्थितीत केलेला आहे. याठिकाणी सर्व नगरसेवकांना बैठकीला बोलवावे. तो ठेकेदार कोणलाही जुमानत नाही  त्याला ब्लॉकलिस्टला टाका.

म.अमिन पटेल — एम.जी.पी.ने  याअगोदर १३६ कोटीच्या पाईपलाईनचे काम केलेले आहे ते का संपूर्ण काम अत्यंत निकृष्ट दर्जाचे झालेले आहे आता काम सुरू आहे कामात कोणती सुधारणार नाही १३६ कोटी चे काम होते कोणते एस्टिमेट प्रमाणे झालेले नाही भूमिगत गटार योजनेच्या कामासाठी कालावधी किती आहेत त्या कालावधीत काम झाले पाहिजे.एम.जी.पी.चे एक अधिकारी स्थायी समितीच्या बैठकीत व्हायला पाहिजे त्यांना जनतेचे प्रश्न करतील वारंवार ही चर्चा होते परंतु कारवाई होत नाही अक्कलपाडा चे काम शहरासाठी महत्त्वपूर्ण आहे तेही काम मुदतीत व गुणवत्तापूर्ण झाले पाहिजे आमचे अधिकारी कामासाठी सक्षम आहेत परंतु एमजीपीने तीन्ही योजनेचे काम अत्यंत निकृष्ट दर्जाचे केलेले आहे.

म.शितल नवले — आपण जेवढ्या एजन्सी होत्या एमजीपी, पीडब्ल्यूडी व महापालिकी आपण यापूर्वी संयुक्त बैठक घेतलेली होती त्या बैठकीत सर्व नियोजन झालेले होते परंतु आजपर्यंत जे नियोजन झाले त्याप्रमाणे कोणतेही काम झालेले नाही संबंधित ठेकेदाराला ब्लॅकलिस्ट करा पण त्याला एक प्रोसेस आहे त्याने काम केले नाही आपण जे खड्डे भरतो त्यातून पाणी झिरपते परत खड्डे पडतात वाडीभोकर रोड चे काम सुरू आहे सद्यस्थितीत महाविद्यालये बंद आहेत नाहीतर रोज अपघात झाले असते इतकी वाईट परिस्थिती त्या ठिकाणी आहे चेंबरच्या कामामुळे वाहने निघू शकत नाही तर त्याचे कडून खड्डे भरण्याचे काम व्यवस्थित होत नसेल तर त्याचे वेगळे एस्टिमेट करा व त्यांचेकडून दंडात्मक कारवाई करून मनपाकडून ते काम करून घेऊ अशी कारवाई आपल्याला करता येते आपण त्या ठेकेदाराला नोटीस देत चला त्या आधारे आपण त्याला ब्लॅक लिस्ट ची कारवाई करू शकतो.एम.जी.पी.लाही नोटीस द्या हे आपल्याला पुढे उपयोगी पडेल कामाची प्रगती काय आहे याबाबत अहवाल द्या एचटी.पी. प्लांटला मी भेट दिली परंतु ते

काम पूर्णपणे बंद आहे एच.टी.पी. बांधून सक्षमपणे कार्यान्वित होणे गरजेचे आहे ही सोपी गोष्ट नाही त्यासाठी गुणवत्ता पूर्ण काम होणे गरजेचे आहे त्यांचे चिफ इंजिनिअर यांना सुद्धा बैठकीला बोलवा ते सुद्धा एकदाच पाहणीसाठी आले होते संपूर्ण त्यांचा स्टाफ मिटींगला बोलवा महिनाभरात पावसाळा हे पावसात खराब होणार आहे.

म.सुनिल बैसाणे — या दोन्ही योजना आमच्या नेत्यांनी या शहराच्या विकासासाठी आणलेले आहेत यात आमच्या भाजप नेत्यांचे फार मोठे योगदान आहे खासदार आदरणीय डॉ.सुभाषजी भामरे महानगराध्यक्ष श्री अनुप अग्रवाल, माजी मंत्री जयकुमार रावल, आमदार श्री गिरीश भाऊ महाजन यांच्या प्रयत्नाने ही महत्वकांक्षी योजना धुळे शहराला मिळालेली आहे परंतु आज भाजपाला बदनाम करण्यासाठी हेतुपुरस्पर कामाकडे दुर्लक्ष होत आहे. अधिकारी कानाडोळा करीत आहेत. नगरसेवकांना बदनाम करण्याचे काम सुरू आहे. अक्कलपाडा योजनेचे कामही गतीने सुरू नाही त्यांना देयके अदा केली जातात जर काम गुणवत्तापूर्वक केले नाही तर त्यांना पाठीशी घालण्याचे कारण काय तर एमजीपी कडे ही योजना दिली गेली आहे तेच चुकीचे आहे मी सभापती असताना या कामाची पाहणी केली आहे तेथील ठेकेदार अत्यंत मुजोरपणा वर्तन करीत होता याबाबत मी तिचे अधिकाऱ्यांकडे ही तक्रार केली आपण त्यांना वारंवार नोटिसा दिलेले आहेत व प्रायोगिक तत्त्वावर मनपा मार्फत आम्ही ते काम करतो याबाबत देखील त्यांना कळवले आहे जर केंद्राची योजना व्यवस्थित रित्या पूर्णपणे झाली नाही तर येणाऱ्या काळात पुढील अनुदान आपल्याला उपलब्ध होणार नाही त्याला त्याचा नफा मिळालेला आहे त्यामुळे तो स्वत: कार्यवाही ची वाट पाहत आहे याबाबतही लक्ष दिले पाहिजे ही भूमिगत गटार योजना नसून योजना आहे यात फरक आहे या दोन्ही योजनेचे लेखापरीक्षण झाले पाहिजे आता पर्यंत दिलेले धनादेश झालेले काम याची सर्व तपासणी झाली पाहिजे.

म.सभापती — सदरचे काम लॉकडाऊनमध्ये सुरू आहे किंवा कसे याबाबत माहिती दयावी.

म.अभियंता — शासनाच्या आदेशाने ज्या योजना सुरू आहेत त्यांचे काम करतात येतात. या संदर्भात आयुक्त साहेबांनी देखील आदेशित केलेले आहे. त्यांना आवश्यक तो मजुर वर्ग आणण्यासाठी लेखी परवानगी दिलेली आहे.

म.सुनिल बैसाणे — संबंधित ठेकेदार धुळयातील एका ठेकेदारला खड्डे बुजविण्याचे काम दिलेले आहे. या योजनेमध्ये लक्ष देणे गरजेचे आहे. या कामात सुधारणा झाली नाही. तर आम्ही लोकप्रतिनिधी म्हणून आम्ही स्वत: ठेकेदारावर गुन्हा दाखल करू.

म. सभापती — सर्व सन्मा. सदस्यांच्या सहमतीने व कार्यालयीन अहवालास अधिन राहून सदर प्रस्तावास कार्योत्तर मान्यता देण्यांत येत आहे.

**धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर ४९ दिनांक ०६/०५/२०२१**

धुळे महानगरपालिकेचे अक्कलपाडा पाणी पुरवठा योजना व भुमिगत गटारीचा शुभारंभ पंतप्रधान मा.श्री.नरेंद्रजी मोदी सो. यांच्या शुभहस्ते झाले होते या ऐतिहासिक प्रसंगाचे छायचित्र धुळे मनपा सभागृहात लावणेसाठी मा.महापौर यांनी ठराव क्र.१२८ दि.३०/१२/२०२० रोजीच्या ठरावान्वये मान्यता देण्यात आली आहे. सदर फोटो सभागृहात लावणेस म.महापौर सो यांना भांडार विभाग कडेस लेखी पत्र सादर केलेले आहे. सदर फोटो करीता बाजार दराची तपासणी करणेत आली असता **ज्योती फोटज,धुळे** यांचे कडुन खरेदी करून घेऊन म.स्थायी समिती पुढे कार्योत्तर मंजुरी घेऊन बिल अदा करणेत येईल या चर्चे अंती काम करून घेण्यात आले आहे.

तरी सदरचे खालील प्रमाणे काम करून घेण्यात आलेले असुन त्यांचे कडील बिला प्रमाणे खालील प्रमाणे खर्च दर्शविलेला आहे.

| अ.क्र | साहित्य तपशिल | नग | प्रति नग रुपये | जोती फोटोज,धुळे | एकुण खर्च रुपये |
|---|---|---|---|---|---|
| १ | Photo Frame ७×३ | १ नग | ९,०००/- | ९,०००/- | ९,०००/- |
| | | | | **एकुण खर्च सर्व करासोबत सादर केले** | **९,०००/-** |

तरी वरील प्रमाणे काम करून घेण्यात आलेनुसार एकुण खर्च रू**९,०००/-** मात्र करणेत आलेला आहे. तरी सदरचे बिल अदा करणेस महानगरपालिका अधिनियम ५(२) २ अंतर्गत झालेल्या कामास कार्योत्तर मंजुरीसाठी मे स्थायी समिती पुढे सादर झालेला आहे.

सन्मा. सदस्यांच्या सहमतीने व कार्यालयीन अहवालास अधिन राहून सदर कामी झालेला खर्च रु. ९०००/-मात्रला महानगरपालिका अधिनियम ५(२) २ अन्वये कार्योत्तर मान्यता देण्यांत येत आहे.

**सर्वानुमते मंजूर,**

**सही/- x x x**

**सभापती,**

**स्थायी समिती,**

**धुळे महानगरपालिका,धुळे**

विषय क्रमांक:- ४३ धुळे मनपा मार्फत मा.राज्यपाल, महाराष्ट्र राज्य यांचे हस्ते कोरोना योध्दा सत्कार कार्यक्रम प्रसंगी भांडार विभागामार्फत करण्यांत आलेला खर्च रुपये १,६३,११८/-मात्रला कार्योत्तर मंजुरी देणेबाबत आलेल्या कार्यालयीन अहवालावर विचार करणे.

म. नगरसचिव नगरसचिव यांनी विषयांचे वाचन केले.

म.शितल नवले विषय मंजूर करण्यांत यावा.

म. कमलेश देवरे विषय मंजूर करण्यांत यावा.

म.सभापती सर्व सन्मा.सदस्यांच्या सहमतीने व कार्यालयीन अहवालास अधिन राहून सदर प्रस्तावास कार्योत्तर मान्यता देण्यांत येत आहे.

**धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर ५० दिनांक ०६/०५/२०२१**

धुळे महानगरपालिका दि.४ फेब्रुवारी या दिवशी कोरोना योध्दाचा सत्कार कार्यक्रमाचे आयोजन करण्यांत आलेले आहे. याच उपक्रमाच्या अनुषंगाने दि.४ फेब्रुवारी २०२१ रोजी सायं १२:०० वाजता धुळे महानगरपालिका धुळे येथे कोरोना योध्दा सत्काराचा कार्यक्रम घेण्यात आलेला आहे.

तरी सदरचे नियोजन करणे करीता विभाग प्रमुख यांनी लेखी मागणी पत्र म.उपायुक्त सो यांचे मान्यतेने भांडार विभाग कडेस मागणी पत्र सादर केलेले आहे.

सदरचे नियोजन संदर्भात म.उपायुक्त सो यांचे सुचने नुसार तातडीचे असल्याने त्वरीत साहित्य उपलब्ध् करून दयावे लागणार असुन सदर साहित्य स्थानिक पुरवठाधारक यांचे कडुन घेऊन म.स्थायी समिती पुढे कार्योत्तर मंजुरी घेऊन बिल अदा करणेत येईल या चर्चे अंती काम करून घेण्यात आले आहे.

तरी सदरचे साहित्य खालील प्रमाणे घेण्यात आलेले असुन त्यांचे कडील बिला प्रमाणे त्यांनी खर्च दर्शविलेला आहे.

| अ.क्र | साहित्य तपशिल | नग | प्रति नग रुपये | गंगाधर बाळाशेठ नाशिककर, धुळे, | एकुण खर्च रुपये |
|---|---|---|---|---|---|
| १ | मुर्ती | ०१ | ३८,८३५/- | ३८,८३५/- | ३८,८३५/- |
| | | | | **एकुण खर्च** | **३८,८३५/-** |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | | | **GST ३%** | **१,१६६/-** |
| | | | | **एकुण खर्च सर्व करासोबत सादर केले** | **४०,००१/-** |
| **अ.क्र** | **साहित्य तपशिल** | **नग** | **प्रति नग रुपये** | **रेमंन्ड शॉप, धुळे,** | **एकुण खर्च रुपये** |
| ३ | शाल | ०१ | २,६७८/- | २,६७८/- | २,६७८/- |
| | | | | **एकुण खर्च** | **२,६७८/-** |
| | | | | **GST 12%** | **३२१/-** |
| | | | | **एकुण खर्च सर्व करासोबत सादर केले** | **२,९९९/-** |
| **अ.क्र** | **साहित्य तपशिल** | **नग** | **प्रति नग रुपये** | **भावना वस्त्र भांडार, धुळे** | **एकुण खर्च रुपये** |
| ०१ | नॅपकीन बिग साईज | १२ | ३५०/- | ३५०/- | ४,२००/- |
| ०२ | शॉल | ०५ | ३५०/- | ३५०/- | १,७५०/- |
| ०३ | शॉल | ०५ | २५०/- | २५०/- | १,२५०/- |
| ०४ | नॅपकीन लहान साईज | १२ | ११०/- | ११०/- | १,३२०/- |
| | | | | **एकुण खर्च रुपये** | **८,५२०/-** |
| | | | | **GST 5%** | **४२६/-** |
| | | | | **एकुण खर्च सर्व करासोबत सादर केले** | **८,९४६/-** |
| **अ.क्र** | **साहित्य तपशिल** | **नग** | **प्रति नग रुपये** | **कार्तीक इन्टरप्राझेस, धुळे** | **एकुण खर्च रुपये** |
| १ | बॅनर(राज्यपाल) १५×३० | १ | ७,६५०/- | ७,६५०/- | ७,६५०/- |
| २ | ट्रॉफी (जम्बो साईज) | ३८ | १,१८०/- | १,१८०/- | ४४,८४०/- |
| ३ | सर्टफिकीट | ४५ | ३५/- | ३५/- | १,५७५/- |
| | | | | **एकुण खर्च** | **५४,०६५/-** |
| | | | | **GST 18%** | **९,७३२/-** |
| | | | | **एकुण खर्च सर्व करासोबत सादर केले** | **६३,७९७/-** |
| **अ.क्र** | **साहित्य तपशिल** | **नग** | **प्रति नग रुपये** | **अलका प्रिन्टर्स, धुळे** | **एकुण खर्च रुपये** |
| १ | राज्यपाल कार्यक्रम बॅनर्स ८×१२ | २० | ६.७८/- | ६.७८/- | १३,०१८/- |
| | | | | **एकुण खर्च** | **१३,०१८/-** |
| | | | | **GST १२%** | **१,५६२/-** |

| | | | | | एकुण खर्च सर्व करासोबत सादर केले | १४,५८०/- |
|---|---|---|---|---|---|
| अ.क्र | साहित्य तपशिल | नग | प्रति नग रुपये | श्री डिजिटल प्रिंटर्स, धुळे | एकुण खर्च रुपये |
| १ | राज्यपाल कार्यक्रम बॅनर्स ८×१२ (बांधणी खर्च) | २० | २०,१६०/- | २०,१६० | २०,१६०/- |
| | | | | एकुण खर्च रुपये | २०,१६०/- |
| अ.क्र | साहित्य तपशिल | नग | प्रति नग रुपये | व्यकटेश इन्टरप्राझेस, धुळे, | एकुण खर्च रुपये |
| १ | किरकोळ साहित्य खर्च बिल नं.४६ | -- | -- | -- | १२,६३५/- |

तरी वरील प्रमाणे साहित्य खरेदी करण्यात आले असुन GST व इतर करासहित एकुण खर्च रू **१,६३,११८/-** मात्र करणेत आलेला त्यानुसार करणेत आलेला खर्च रू **१,६३,११८/-**मात्र अदा करणेस महानगरपालिका अधिनियम ५(२) २ अंतर्गत झालेल्या कामास कार्योत्तर मंजुरी देणेबाबत प्रस्ताव सादर झालेला आहे.

सर्व सन्मा.सदस्यांच्या सहमतीने व कार्यालयीन अहवालास अधिन राहून सदर कामी झालेला खर्च रुपये १,६३,११८/- मात्र खर्चास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम ५(२)(२) अन्वये कार्योत्तर मान्यता देण्यांत येत आहे. सदर प्रस्ताव व कार्यवाहीबाबत लेखा आक्षेप निर्माण होणार नाही याची दक्षता घ्यावी.याबाबतची जबाबदारी संबंधित विभागाची राहील.

**सर्वानुमते मंजूर,**
**सही/- x x x**
**सभापती,**
**स्थायी समिती,**
**धुळे महानगरपालिका,धुळे**

विषय क्रमांक:- ४४ — रस्ता अनुदान अंतर्गत प्र.क्र.१४ मध्ये पश्चिम हुडको भागात रस्ता कॉंक्रीट करणेचे निविदा दर मागविण्यांत आलेत, त्याबाबत आलेल्या कार्यालयीन अहवालावर विचार करणे.

म. नगरसचिव — नगरसचिव यांनी विषयांचे वाचन केले.

म.शितल नवले — विषय मंजूर करण्यांत यावा.

म.सुनिल बैसाणे — विषय मंजूर करण्यांत यावा.

म.सभापती — सर्व सन्मा.सदस्यांच्या सहमतीने व कार्यालयीन अहवालास अधिन राहून सदर प्रस्तावास मान्यता देण्यांत येत आहे.

**धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर ५१ दिनांक ०६/०५/२०२१**

रस्ता अनुदान अंतर्गत प्र.क्र.१४ मध्ये पश्चिम हुडको भागात रस्ता कॉंक्रीट करणे. कामाबाबत धुळे मनपा ठराव नं.१२५ दि.३१/१२/२०२० मा.आयुक्त सो. धुळे यांचे टिपणी मंजुरीने दि. / / अन्वये उक्त कामाबाबत रक्कम रु.४२,८६,९४९/- मात्र खर्चाचा आर्थिक व प्रशासकीय मंजुरी देणेत आली आहे.

उक्त कामाबाबत शहर अभियंता मनपा धुळे यांचे पत्र क्र.९३३ दि.०७/०१/२०२१ अन्वये रक्कम रु. ४२,८०,२२७/- मात्र खर्चास तांत्रिक मंजुरी मिळालेली आहे.

उक्तकामाबाबत धुळे महानगरपालिका जा.क्र./बा.वि./१५४दि.०१/०२/२०२१ अन्वये दि.०२/०२/२०२१ रोजीचे दै.पथदर्शी या वृत्तपत्रात जाहीर निविदा प्रसिद्ध करणेत येऊन

दि.२२/०२/२०२१ रोजी निविदा दर मागविण्यात आले आहेत.पात्र कंत्राटदार यांनी निविदेबाबत ऑनलाईन पद्धतीने बयाणा रक्कम भरून निविदा दर सादर केलेले आहेत.

| अ.क्र. | कंत्राटदार किंवा ठेकेदाराचे नाव | दिलेले निविदा दर | शेरा |
|---|---|---|---|
| १ | मे.ए.के.सैफी | शे.१% जास्तीने | |
| २ | सुकन्या सुरेश चौधरी | शे.२% जास्तीने | |
| ३ | गायत्री कन्सट्रक्शन | शे.०.००% (अंदाजपत्रक दर) | |
| ४ | सुर्यकांत दिपक महाले | शे.२.९९% (कमी) | **सर्वात कमी दर** |

वरील प्रमाणे निविदेत भाग घेतलेले ठेकेदार पात्र असून **सुर्यकांत दिपक महाले** यांनी दिलेले दर शे.२.९९% कमीने असून **सुर्यकांत दिपक महाले**यांनी नियमा नुसार अतिरिक्त सुरक्षा अनामत भरलेली आहे. तथा दि.१५/०४/२०२१ रोजी दिलेल्या पत्रानुसार सदर काम महागाईच्या दृष्टीने परवडत नसल्याने काम करण्यास सहमत नाही. L-२ गायत्री कन्सट्रक्शन यांना दि.१६/०४/२०२१ रोजी दर वाटाघाटी कामी बोलवले असता त्यांनी दि.१९/०४/२०२१ रोजी दिलेल्या पत्रात शे.३% कमी दराने काम करण्यास समर्थता दर्शविलेली आहे. त्याप्रमाणे त्यांनी ऑनलाईन बयाणा रक्कम भरलेली आहे. सबब कंत्राटदार L-२ गायत्री कन्सट्रक्शन यांचे शे.३% कमीचे दर आलेले असल्याने त्यांच्या दरास मंजुरीस्तव मे.स्थायी समिती पुढे सादर झालेला आहे.

सर्व सन्मा.सदस्यांच्या सहमतीने व कार्यालयीन अहवालास अधिन राहून सदर मे. गायत्री कंन्स्ट्रक्शन यांचे वाटाघाटी अंती आलेले शे.३% कमीचे दरास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ७३ नुसार मंजुरी देण्यांत येत आहे. सदर प्रस्ताव व कार्यवाहीबाबत लेखा आक्षेप निर्माण होणार नाही याची दक्षता घ्यावी.याबाबतची जबाबदारी संबंधित विभागाची राहील.

**सर्वानुमते मंजूर,**

**सही/- x x x**

**सभापती,**

**स्थायी समिती,**

**धुळे महानगरपालिका,धुळे**

विषय क्रमांकः- ४५ — मनपा विकास शुल्क अंतर्गत प्र.क्र.१४ मध्ये मालेगावरोड ते चाळीसगावरोड रस्ता डांबरीकरण करणेचे निविदा दर मागविण्यांत आलेत,त्याबाबत आलेल्या कार्यालयीन अहवालावर विचार करणे.

म. नगरसचिव — नगरसचिव यांनी विषयांचे वाचन केले.

म.शितल नवले — विषय मंजूर करण्यांत यावा.

म.सुनिल बैसाणे — विषय मंजूर करण्यांत यावा.

म.सभापती — सर्व सन्मा.सदस्यांच्या सहमतीने व कार्यालयीन अहवालास अधिन राहून सदर प्रस्तावास मान्यता देण्यांत येत आहे.

**धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर ५२ दिनांक ०६/०५/२०२१**

धुळे मनपा विकास शुल्क अंतर्गत प्र.क्र.१४ मध्ये मालेगाव रोड ते चाळीसगाव रोड रस्ता डांबरीकरण करणे. कामाबाबत धुळे मनपा ठराव नं.१२७ दि.३१/१२/२०२० मा.आयुक्त सो. धुळे यांचे टिपणी मंजुरीने दि. / / अन्वये उक्त कामाबाबत रक्कम रु.४२,८०,६३४/- मात्र खर्चाचा आर्थिक व प्रशासकीय मंजुरी देणेत आली आहे.

उक्त कामाबाबत शहर अभियंता मनपा धुळे यांचे पत्र क्र.९३४ दि.०७/०१/२०२१ अन्वये रक्कम रु. ४२,८०,६३४/- मात्र खर्चास तांत्रिक मंजुरी मिळालेली आहे.

उक्त कामाबाबत धुळे महानगरपालिका जा.क्र./बा.वि./१५४ दि.०१/०२/२०२१ अन्वये दि.०२/०२/२०२१ रोजीचे दै.पथदर्शी या वृत्तपत्रात जाहीर निविदा प्रसिद्ध करणेत येऊन दि.२२/०२/२०२१रोजी निविदा दर मागविण्यात आले आहेत. पात्र कंत्राटदार यांनी निविदेबाबत ऑनलाईन पद्धतीने बयाणा रक्कम भरून निविदा दर सादर केलेले आहेत.

| अ.क्र. | कंत्राटदार किंवा ठेकेदाराचे नाव | दिलेले निविदा दर | शेरा |
|---|---|---|---|
| १ | ए.के.सैफी | श.१% जास्तीने | |
| २ | सुकन्या सुरेश चौधरी | श.२% जास्तीने | |
| ३ | गायत्री कन्सट्रक्शन | श.०.००% (अंदाजपत्रक दर) | |
| ४ | सुर्यकांत दिपक महाले | श. २.९९% (कमी) | **सर्वात कमी दर** |

वरील प्रमाणे निविदेत भाग घेतलेले ठेकेदार पात्र असून **सुर्यकांत दिपक महाले** यांनी दिलेले दर श. २.९९% कमीने असून **सुर्यकांत दिपक महाले** यांनी नियमा नुसार अतिरिक्त सुरक्षा अनामत भरलेली आहे.तथा दि.१५/०४/२०२१ रोजी दिलेल्या पत्रानुसार सदर काम महागाईच्या दृष्टीने परवडत नसल्याने काम करण्यास सहमत नाही. L-२ गायत्री कन्सट्रक्शन यांना दि.१६/०४/२०२१ रोजी दर वाटाघाटी कामी बोलवले असता त्यांनी दि.१९/०४/२०२१ रोजी दिलेल्या पत्रात श.३% कमी दराने काम करण्यास समर्थता दर्शविलेली आहे. त्याप्रमाणे त्यांनी ऑनलाईन बयाणा रक्कम भरलेली आहे. सबब कंत्राटदार L-२ गायत्री कन्सट्रक्शन यांचे श.३% कमीचे दर आलेले असल्याने त्यांच्या दरास मंजुरीस्तव मे.स्थायी समिती पुढे सादर झालेले आहे.

सर्व सन्मा.सदस्यांच्या सहमतीने व कार्यालयीन अहवालास अधिन राहून सदर मे. गायत्री कंन्स्ट्रक्शन यांचे वाटाघाटी अंती आलेले श.३% कमीचे दरास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ७३ नुसार मंजुरी देण्यांत येत आहे. सदर प्रस्ताव व कार्यवाहीबाबत लेखा आक्षेप निर्माण होणार नाही याची दक्षता घ्यावी.याबाबतची जबाबदारी संबंधित विभागाची राहील.

**सर्वानुमते मंजूर,**

**सही/- x x x**

**सभापती,**

**स्थायी समिती,**

**धुळे महानगरपालिका,धुळे**

विषय क्रमांक :- ४६ धुळे महानगरपालिकेतील रोजंदारी कर्मचा-यांना दिनांक १/७/२०२० पासुन रोजंदारी दरवाढ लागू करण्यासंदर्भात आलेल्या कार्यालयीन अहवालावर विचार करणे.

म.सुनिल बैसाणे याबबाबत प्रशासनाने खुलासा करावा.

म.कार्यालयीन अधिक्षक धुळे मनपा सफाई कर्मचाऱ्यांना दिनांक १७ २०२० रोजी नवीन दर लागू करण्याबाबत सरकारी कामगार अधिकारी यांनी पत्र दिलेले आहे त्यानुसार हा विषय स्थायी समितीसमोर सादर करण्यात आलेला आहे एकूण कुशल कर्मचारी १० आहेत व ४९ अकुशल कर्मचारी यांचे मासिक खर्च ८४०८४/- इतके आहे आणि बदली कामगार १७६ आहे. त्यांना ऑऊट सोर्सिंगव्दारे काम देण्याचे प्रस्तावित आहे. आपण यापुर्वी त्यांना स्वच्छता निरिक्षक यांचा तोंडी आदेशाने कामावर पाठवत होतो.

म. बंटी मासुंळे सभापती महोदय हा विषय घेण्यात आला आहे या ठिकाणी रोजदारी वाढ करतो आहे जे बदली कामगार आहे त्यांची पण वाढ करतो आहे का.

म.सभापती बदली कामगारांचा विषय वेगळा ठेवला आहे त्यांना आऊट सोर्सिंगव्दारे काम करण्यात येईल.

म.अमोल मासुंळे यांच्या पहिले यांना वेतनवाढ दिलेली आहे का.

म.कार्यालयीन अधिक्षक त्यांना वेतनवाढ दिलेली आहे.

म.शितल नवले सभपती महोदय जो विषय आला आहे त्यांच्या अनुषंगाने दोन भाग आहेत एक आपल्याला लेबर कॉन्ट्रॅक्ट घ्यावयाचे आहे हा प्रस्ताव किमान वेतन कायदयाप्रमाणे दर देणयासाठी मान्यतेस्तव स्थायी समिती समोर सादर झालेला आहे. यापूर्वी देखील आपण कामगार कायदयाप्रमाणे वेतन देत होतो. तसे आपण लेबर कॉन्टक्टर कामगार घेत होतो. परंतु माझ्या माहितीप्रमाणे त्या ठेकेदाराने त्या लेबरच्या पी.एफमध्ये मोठया प्रमाणावर घोटाळा केला आहे आपल्याला माझ्यावतीने विनंती करतो आपण आपल्या स्तरावरती कामगार आयुक्त नाशिक आपल्याकडे मागील ५ वर्षांत किती लेबर लावले आहेत त्या ठेकेदाराने त्या लेबरांचे पी.एफ.चे पैसे भरले आहत का आता आपण आयुक्त आणि महापौर मार्फत लेबर कमीश्नरला पत्र पाठवा त्या नंतर आपण लेबर कमीश्नरकडे माहितीच्या अधिकारात जाऊ.

म. सभापती माझी या संदर्भातच तक्रार आहे. व याबाबत पाठपुरावा सुरु आहे. त्याने विमा देखील काढणे गरजेचे आहे. पण त्याने काढलेला नाही. माझी सुध्दा हीच तक्रार आहे.

म.शितल नवले माझ्याकडेही एक सूपरवायझर आहे मी त्यांचे पी एफचे रेकॉर्ड मागतो आहे कारण मला त्यांचे पी.एफचे पैसे भरायचे आहे. पण त्यात अनेक अडचणी येत आहेत. दुसरा विषय आपल्याकडे कायम रोजदारीचे कर्मचरी आहेत त्या पैकी काही जण रिटायमेन्टला आले आहे. त्यांचे क्लास फोरचे ऑर्डर उपायुक्त मॅडम यांचेकडे प्रलंबीत आहे. आपण त्यांची माहिती घ्यावी. दुसरा विषय मागे दिड महिन्यापुर्वी मी त्या २६ मुलांना व्हॉल ऑपरेटर यांची बदली बांधकाम विभागाकडे आहे त्या २६ व्हॉलमन कर्मचाऱ्यांना दीड महिन्याचे वेतन लवकर मिळावे व त्याबाबत स्थासी समितीसमोर विषय आणावा मॅडम आपल्या ग्रज्युट इंजिनिअर अपॉईट करायाचे आहेत त्यांचे कागदपत्रे पडताळणी करावयाचे आहे. प्रस्ताव तसाच प्रलंबित आहेत तो मार्गी लावा सध्या काय स्थीती आहे ते सांगा.

म.उपायुक्त आपण आता जे तीन मुद्दे उपस्थित केले त्यातील एक पाणी पुरवठयाच्या कर्मचाऱ्यांच्या बाबतीत पाणी पुरवठा विभागाकडून अहवाल प्राप्त झाल्यानंतर त्या दिड महिन्याच वेतन काढायाला काहीच अडचण येणार नाही दुसरा विषय जे नविन अर्ज आले आहेत त्यांची स्कुटीनी करायचा आहेत त्यांची छाननी झालेली आहे. राहिलेले अर्जाची छाननी बाकी आहे कोरोनाच्या पार्श्वभुमीवर त्यांना इंटरव्युसाठी पत्रही देयांचे ते देखील आम्ही करणार आहोत तीसरा विशय आहे वर्ग ३ च्या कर्मचाऱ्यांनी कर्मचाऱ्यांची नस्ती अद्याप माझ्याकडे नाही

म.शितल नवले मी माहिती घेऊन तुम्हाला कळवितो.

म.उपायुक्त यामध्ये विषय होता वर्ग ३ व ४ कर्मचाऱ्यांचा विभागाने सांगितले त्याप्रमाणे सहाय्यक कामगार कार्यालय यांच्याकडून आलेले दर आहेत त्या दरानुसार त्यांना वेतन अदा करणार आहोत या विषयात कॉन्ट्रक्टर कोणीही असल्यामुळे ई.पी.एफ.ते देखील भरले जातील ते रोजदारी कर्मचारी आहेत म्हणजे ते मनपाचेच कर्मचारी आहेत.

म.शितल नवले कायदा असा म्हणतो की, तुमच्याकडे २० लेबरच्या वरती कामगार आहे तर त्यांना ई.पी.एफ. कम्पलसरी आहे. जर २०च्या वरती कर्मचारी घेतले तर आपली लायबटी आली.

म.उपायुक्त रोजंदारी मानधन कर्मचारी यांचे ई.पी.एफ. आपण २०११ पासून भरत आहे.

म.आयु.आयुक्त जे मनपाचे रोजदारी व मानधन कर्मचारी आहेत त्यांचे आपण २०१० पासून ईपीएफ भरत आहे माझ्या माहिती प्रमाणे त्यांचे ई.पी.एफ. नंबर घेतले आहेत.

| | |
|---|---|
| म.उपायुक्त | जे कर्मचारी आरोग्य मार्फत तोंडी आदेशाने लावले जातात ती पध्दत बंद करावी व त्यांना आऊटसोर्सीगव्दारे ठेकेदाराकडून लावण्यात यावे. |
| म.सभापती | यामध्ये गिरी साहेबांनी प्रकाश टाकवा.आताचा विषय काय आहे या विषयात त्यांनी काय नमुद केले आहे. |
| म.शितल नवले | सभापती महोदय आपण जर नविन टेंडर करतो आहे आता कॉन्ट्रक्ट लेबरसाठी आस्थाचा या संस्थेचा विषय कुठुन आला. |
| म.अति.आयुक्त | सदर प्रस्ताव फक्त रोजंदारी दर वाढ बाबतचा आहे. बदली कामगारांना आपण आऊट सोससींगव्दारे नवीन संस्थेव्दारे काम देणार आहोत. |
| म.सभापती | आस्था संस्थाचा विषय वगळून आपण मंजूरी देऊ सदर संस्थेचा या विषयाशी काही संबंध नाही रोजदारी कर्मचाऱ्यांना यांना दि. १/७/२०२० पासून दरवाढ लागू करण्यांस कार्यालयीन अहवालास अधिन राहून मान्यता देण्यांत येत आहे. तसेच नवीन संस्था नियुक्त करुन त्यांच्या मार्फतच बाहय यंत्रणेव्दारे कामगार घेण्याबाबत कार्यवाही करावी. |

**धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर ५३ दिनांक ०६/०५/२०२१**

म. जिल्हाध्यक्ष कास्ट्राईब कर्मचारी महासंघ धुळे यांनी संदर्भीय क्रमांक १ अन्वये निवेदन सादर करून धुळे महानगरपालिकेतील रोजंदारी कर्मचा-यांना दिनांक १/७/२०२० पासुन महागाई भत्ता दर लागू करण्यासंदर्भात निवेदन दिलेले आहे.त्यानुसार संदर्भीय क्रमांक २अन्वये नविन दर म. सरकारी कामगार,अधिकारी धुळे यांच्याकडून मागविण्यात आलेले आहे.

त्यानुसार म. सरकारी कामगार अधिकारी, धुळे यांनी संदर्भीय क्रमांक ३ अन्वये किमान वेतन अधिनियम १९४८ अन्वये स्थानिक स्वराज्य संस्था या उदयोगातील किमान वेतनाचे दर खालील प्रमाणे सादर केलेले आहे. त्याअनुषंगाने कार्यवाही करणेबाबत नमूद केलेले आहे..

| अ.क्र. | वर्गवारी | परिमंडळ 1 | परिमंडळ 2 | परिमंडळ 3 | महागाई भत्ता दि 1/7/202 ते दि 31/12/2020 |
|---|---|---|---|---|---|
| 1 | कुशल | 14000 | 12000 | 11000 | 5495 |
| 2 | अर्धकुशल | 13000 | 11000 | 10000 | 5495 |
| 3 | अकुशल | 115000 | 10000 | 8500 | 5495 |

सदर पत्रामध्ये मुळवेतन + महागाई भत्ता एकुण वेतनाला २६ ने भागीतल्यावर एक दिवसाचा पगार मिळतो त्यानुसार खालील प्रमाणे एक दिवसाचे वेतन येते. तसेच महागाई भत्याचे दर (जानेवारी ते जून व जुलै ते डिसेंबर) हे दर सहा महिन्यानी बदल होत असतात. असे नमूद केलेले आहे.

धुळे महानगरपालिकेमध्ये रोजंदारी वर्ग के कर्मचारी (कुशल) / रोजंदारी वर्ग ४ कर्मचारी (अकुशल) / बदली सफाई कामगार यांना सद्यस्थितीत खालील प्रमाणे रोजंदारी दरानुसार वेतन अदा केले जाते.

१ कुशल प्रमाणे-- रुपये ७०१/- वरील प्रमाणे

२. अकुशल प्रमाणे रुपये ६०५/-

धुळे महानगरपालिकेमध्ये रोजंदारी कर्मचारी व आरोग्य विभागाकडील बदली सफाई कामगार यादीनुसार खालील प्रमाणे विभागात कार्यरत आहे. सोबत कर्मचाऱ्यांचे नाव, विभाग व पदनिहाय यादी सोबत सादर केलेली आहे.

| अ.क्र. | पदनाम | वर्ग | कर्मचारी संख्या |
|---|---|---|---|

| | | | |
|---|---|---|---|
| 1 | लिपीक, फिटर, वाहन चालक इ. | वर्ग 3 | 10 |
| 2 | बिगारी, मुकादम, शिपाई, सफाई कामगार, वाई इ. | वर्ग 4 | 55 |
| 3 | बदली सफाई कामगार | वर्ग 4 | 176 |
| | | एकुण | 241 |

सद्यस्थितीत रोजंदारी वर्ग ३ कर्मचारी यांना रोजंदारी दर कुशल वर्गवारी नुसार वेतन अदा केले जाते. तसेच रोजंदारी वर्ग ४ कर्मचारी यांना अकुशल दरानुसार वेतन अदा केले जाते.

त्या अनुषंगाने वरील तक्तात नमुद नुसार रोजंदारी वर्ग ३ कर्मचारी हे कुशल व वर्ग ४ कर्मचारी अर्धकुशल अकुशल वर्गवारी मध्ये येतात.

म.सरकारी कामगार अधिकारी यांच्या पत्रानुसार धुळे म.न.पा.कडील कुशल कर्मचारी / कर्मचारी यांना नविन रोजंदारी दर लागु केल्यास एक कर्मचाऱ्यांच्या वेतनात खालील प्रमाणे वाढ होणार आहे.

१.कुशल - रुपये ७५०/- नवीन रोजंदारी दर रुपये -७०१/- जुना रोजंदारी दर = रुपये ४९ एक दिवसाचे वेतनात वाढ

२. अकुशल रुपय ६५४/- नविन रोजंदारी दर रुपये -६०५/- जुना रोजंदारी दर = रुपये ४९ एक दिवसाचे वेतनात वाढ.

वरील प्रमाणे रोजंदारी दरवाढीबाबत खर्चाच्या तपशीलामध्ये सरासरी २६ दिवस गृहीत धरुन याषीक एकुण रुपये ३६,९९,६९६/- मात्र रुपये खर्चात वाढ होणार आहे.

तरी मनपाच्या अर्थिक परिस्थितीनुसार योग्य त्या आदेशार्थ सादर तसेच अहवालात नमुद नुसार सदरचा विषय स्थायी समितीपुढे ठेवण्याबाबत आदेशार्थ सादर असे नमुद केलेले आहे.

तसेच आरोग्य विभागाकडील अहवालानुसार महानगरपलिकेत एकुण १७६ बदली कर्मचारी हे कार्यरत आहेत. सदर बदली कामगारांना आरोग्य विभागतील स्वच्छता निरिक्षक यांच्या तोंडी आदेशाने काम देणेत येते तसेच सदर बदली कामगारांचे नियुक्ती बाबतचे कुठलेही अभिलेख कार्यालयात उपलब्ध नाहीत.

सदर बदली कामगारांना नियमीत काम देण्यात येत नाही ज्या वेळी कायम सफाई कामगार रजेवर गेल्यास त्यांच्या रजेच्या कालावधीत बदली कामगारांना बदलीचे काम देण्यात येते. सदरची बदली कामगार कायम पदावर नियुक्ती मिळण्यासाठी भविष्यात मे. न्यायालयात जाण्याची शक्यता नाकारता येत नाही.

त्यामुळे महानगरपालिकेतील एकुण १७६ बदली कामगार यांना आस्था सेवा भावि संस्था, धुळे यांच्यामार्फत काम देऊन सदर संस्थेमार्फतच वेतन अदा करण्याबाबत मा. आयुक्त सो यांनी निर्देश दिलेले आहेत.

तरी धुळे महानगरपालिकेतील रोजंदारी एकुण ६५ कर्मचारी यांना दरवाढ लागु करणेबाबतचा विषय व एकुण १७६ बदली कामगार यांना आस्था सेवा भावि संस्थेमार्फत काम देऊन त्यांचे वेतन सदर संस्थे मार्फत अदा करणे अहवाल सादर केलेला आहे. सदर अहवालावर मा उपायुक्त सो यांनी खालील प्रमाणे निर्देश दिलेले आहे .

धुळे महानगरपालिकेतील 65 रोजंदारी कर्मचारी यांना दरवाढ लागू करण्यास व बदली कामगारांना दरवाढ लागू करता येणार नाही व आस्था सेवा भावी संस्था मार्फत आवश्यक सफाई कामगारांनी मागणी करुन सफाई कामगार घेणे बाबतचा मा.उपायुक्त सो यांनी नमुद केलेले आहे तसेच रोजंदारी कर्मचा-यांना दरवाढ नियमाप्रमाणे लागु करावी

तसेच यापुढे रोजंदारीने / कंत्राटी पध्दतीने न घेता आऊट सोर्सींगद्वारे करावी.असे मा आयुक्त सो यांनी आदेशीत केलेले आहे .

उक्त कार्यालयीन अहवाल व सन्मा. सदस्यांनी केलेल्या चर्चेनुसार सद्यस्थितीतील ६५ कार्यरत रोजंदारी कर्मचा-यांना दि.१/७/२०२० पासून दरवाढ लागू करण्यांस कार्यालयीन अहवालास अधिन राहून मान्यता देण्यांत येत आहे.तसेच १७६ बदली कामगाराना सद्यस्थितीत कोणतीही दरवाढ लागू न करता आरोग्य विभागामार्फत आहे त्याच स्थितीत काम सुरु ठेवावे तसेच आस्था या संस्थेबाबत तक्रारी असल्याने त्यांच्याकडून कर्मचारी घेण्यांत येवू नये. बदली कामगारांच्या संदर्भात आरोग्य विभागाने नवीन संस्था / ठेकेदार एक महिन्याच्या आंत नियुक्त करुन त्यांच्या मार्फतच बाहय यंत्रणेव्दारे कामगार घेण्याबाबत कार्यवाही करावी. सदर प्रस्ताव व कार्यवाहीबाबत लेखा आक्षेप निर्माण होणार नाही याची दक्षता घ्यावी. याबाबतची जबाबदारी संबंधित विभागाची राहील.

**सर्वानुमते मंजूर,**

**सही/- x x x**

**सभापती,**

**स्थायी समिती,**

**धुळे महानगरपालिका,धुळे**

# धुळे महानगरपालिका,धुळे
## नगरसचिव कार्यालय
## स्थायी समिती सभा क्रमांक १२ चे इतिवृत्त

---

**धुळे मनपा भारतरत्न अटलबिहारी वाजपेयी सभागृह**
**शुक्रवार दिनांक २१/०५/२०२१**
**वेळ :-दुपारी ४-०० वाजता.**

धुळे महानगरपालिका स्थायी समितीचीऑन लाईन साप्ताहिक सभा आज शुक्रवार दिनांक २१/०५/२०२१ रोजी दुपारी ४-०० वाजता **मा.श्री संजय सुधाकर जाधव,सभापती,**स्थायी समिती, मनपा,धुळे यांच्या अध्यक्षतेखाली **धुळे मनपा भारतरत्न अटलबिहारी वाजपेयी सभागृह** भरली. ऑनलाईन सभेस खालील सन्मा.सदस्य सभागृहात हजर होते.

| अ.क्रं. | सदस्यांचे नांव | हुद्दा |
|---|---|---|
| १ | श्री. जाधव संजय सुधाकर | सभापती |
| २ | श्री. वैसाणे सुनिल तुळशिराम | सदस्य |
| ३ | श्रीमती माळी भारती अशोक | सदस्या |
| ४ | श्रीमती पाटील मंगला सुरेश | सदस्या |
| ५ | श्रीमती बोरसे पुष्पा प्रकाश | सदस्या |
| ६ | श्री. मासुळे अमोल पावबा | सदस्य |
| ७ | श्री. देवरे कमलेश नारायण | सदस्य |
| ८ | श्रीमती पठाण हिना अस्लम | सदस्या |
| ९ | श्री. सईद बेग हाशम बेग | सदस्य |
| १० | श्री. नवले शितल मोहन | सदस्य |
| ११ | श्री. बोरसे नागसेन दामोदर | सदस्य |
| १२ | श्रीमती कुलेवार किरण राकेश | सदस्या |
| १३ | श्रीमती वराडे वैशाली भिकन | सदस्या |
| १४ | श्री. जाधव बन्सीलाल माणिक | सदस्य |
| १५ | श्रीमती चौधरी मंगला अर्जुन | सदस्या |
| १६ | श्री. पटेल अमीन अब्दुल करीम | सदस्य |

**उपस्थित अधिकारी गण**

| अ.क्र. | अधिकाऱ्यांचे नाव | हुद्दा |
|---|---|---|
| १ | श्री. गणेश गिरी | अति. आयुक्त |
| २ | श्रीमती शिल्पा नाईक | उपायुक्त |
| ३ | श्री. शांताराम गोसावी | उपायुक्त |
| ४ | श्री. तुषार नेरकर | सहा. आयुक्त |
| ५ | श्री. विनायक कोते | सहा. आयुक्त |
| ६ | श्रीमती पल्लवी शिरसाठ | सहा. आयुक्त |
| ७ | श्री. महेंद्र परदेशी | नगररचनाकार |
| ८ | श्री मनोज अरविंद वाघ | प्र.नगरसचिव |
| ९ | श्री. के.एन. शिंदे | अभियंता |
| १० | डॉ. महेश मोरे | आरोग्याधिकारी |

| | | |
|---|---|---|
| ११ | श्री. चंद्रकांत जाधव | सहा.आरोग्याधिकारी |
| १२ | श्री. लक्ष्मण पाटील | सहा.आरोग्याधिकारी |
| १३ | श्री. पी.डी नाईक | लेखापाल |
| १४ | श्री.एन.पी. सोनार | ईस्टेट मॅनेजर |
| १५ | श्री.आर.बी. सोनवणे | प्र.परवाना अधिक्षक |
| १६ | श्री. एन.के. बागुल | विद्युत अभियंता |
| १७ | श्री. सी.सी. बागुल | पा. पु. ओव्हरसिअर |
| १८ | श्री. पी.डी. चव्हाण | ओव्हरसिअर बांधकाम |
| १९ | श्री. सी.एम. उगले | पा. पु. ओव्हरसिअर |
| २० | श्री. हेमंत पावटे | ओव्हरसिअर बांधकाम |
| २१ | श्री. राजु माईनकर | भांडारपाल |
| २२ | श्री. किशोर सुडके | बाजार विभाग |
| २३ | श्री. प्रसाद जाधव | अति. विभाग प्रमुख |
| २४ | श्री. राजेश गायकवाड | वरिष्ठ सहा. मनपा शि.मं. |
| २५ | श्री. सुक्राम आत्या राऊत | वाहन विभाग लिपीक |

म.सभापती सर्व उपस्थित सन्मा. सदस्य अति. आयुक्त सो. अधिकारी वर्ग छायाचित्रकार बांधव सभेचे कामकाज चालविणेसाठी आवश्यक तो कोरम पूर्ण झाल्याने नगरसचिव यांनी सभेचे कामकाज सुरुवात करावी.

म. नगरसचिव वंदे् मातरम् या राष्ट्रवंदनेसाठी सर्वांनी उभे रहावे.

विषय क्रमांक:- ४७ मागील स्थायी समिती सभांचे इतिवृत्त वाचून कायम करणे. (२२/४/२०२१, २९/४/२०२१)

म. नगरसचिव नगरसचिव यांनी विषयांचे वाचन केले.

म.अमोल मासुळे इतिवृत्त वाचून कायम करण्यांत यावे.

म. सभापती सर्व सन्मा.सदस्यांच्या सहमतीने मागील स्थायी समिती सभांचे इतिवृत्त क्रमश वाचून कायम करण्यांत येत आहे.

**धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर ५४ दिनांक २१/०५/२०२१**

मागील स्थायी समिती सभा दिनांक २२/४/२०२१ रोजीचे स्थायी समिती ठराव नंबर ३५ ते ४२ अखेर तसेच सन्मा. सदस्यांनी उपस्थित केलेली चर्चा व त्यावरील निर्णय क्रमश: वाचून कायम करण्यांत येत आहे.

तसेच स्थायी समिती सभा दिनांक २९/४/२०२१ रोजीचे स्थायी समिती ठराव ४३ ते ४४ अखेर तसेच सन्मा. सदस्यांनी उपस्थित केलेली चर्चा व त्यावरील निर्णय क्रमश: वाचून कायम करण्यांत येत आहे.

सही/-x x x

**सभापती,**
**स्थायी समिती,**
**धुळे महानगरपालिका,धुळे**

विषय क्रमांक:- ४८ मा. आयुक्त सो. यांना असलेल्या अधिकारानुसार रु. ५ लाख ते २५ लाखापर्यंत कार्यादेश दिलेले कार्यादेश (बांधकाम विभागाकडील) कामांची यादी अवलोकनार्थ सादर (दि.१/४/२०२१ ते ५/५/२०२१)

म. नगरसचिव नगरसचिव यांनी विषयांचे वाचन केले.

म. सभापती मा.आयुक्त सो. यांना असलेल्या अधिकारानुसार रु.५ लाख ते २५ लाखापर्यंत मंजुरी दिलेल्या बांधकाम विभागाकडील कार्यादेशाची वाचून माहिती देण्यांत आली.

**धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर ५५ दिनांक २१/०५/२०२१**

मा. आयुक्त सो.यांना असलेल्या अधिकारानुसार रु.५ लाख ते २५ लाखापर्यंत कार्यादेश दिलेले कार्यादेश (बांधकाम विभागाकडील) कामांची यादी अवलोकनार्थ सादर

**(बांधकाम विभाग)**

**दि.०१/०४/२०२१ ते दि.०५/०५/२०२१ अखेर निर्गमित केलेल्या विकास कामांच्या कार्यादेशची यादी**

| अ.क्र | कार्यादेश क्रं. | दिनांक | कामाचे नाव | रक्कम | निधी |
|---|---|---|---|---|---|
| १ | ०३ | ०५/०४/२०२१ | प्र.क्र.१९ मध्ये वडजाई रोड येथे हाजी कलीम चौक ते रघुनाथ चौधरी यांचे घरापर्यंत कॉंक्रीट गटार करणे. | १४,९६,६५१/- | आमदार स्थानिक विकास कार्यक्रम अंतर्गत |
| २ | ०४ | ०६/०४/२०२१ | धुळे येथील वलवाडी शिवारातील स.नं.७३-अ या जागेवर भाजी मंडई व व्यापारी संकुल विकसित करणे कामासाठी खाजगीकरणाच्या माध्यमातून (बी.ओ.टी./ बी.ओ.एल.टी.) तत्वावर विकसित करणे करीता वास्तू विशारद तज्ञ / प्रकल्प सल्लागार यांची नेमणूक करणे. | प्रकल्प किंमतीच्या/ अंदाजपत्रकीय रकमेच्या १.२५ % दराने | |
| ३ | ०५ | ०६/०४/२०२१ | १)देवपूर येथील सं.नं.२८/२(सि.स. नं.४७६०(अ) व ४७६०(ब) येथे खालील आरक्षणे विकसित करणे करीता वास्तू विशारद तज्ञ /प्रकल्प सल्लागार यांची नेमणूक करणे.<br>अ) आरक्षण क्र.४० म.आयुक्त सो. निवास स्थानसाठी राखीव (क्षेत्र ०.५१) येथे तारांगण (Plantorium) विकसित करणे.<br>ब) आरक्षण क्र.४१ मध्ये बगीचा विकसित करणे. (क्षेत्र ०.८२)<br>क) आरक्षण क्र.४२ मध्ये व्यापारी संकुल विकसित करणे. (क्षेत्र ०.२२)<br>ड) आरक्षण क्र.४३ म्यु.पर्पजसाठी राखीव येथे समाज भुवन बांधणे . (क्षेत्र ०.५३)<br>२) शाळा क्र.२ (सि.स.नं.११७९) सुभाष पुतळा,धुळे येथे व्यापारी संकुल विकसित करणे.<br>३) शाळा क्र.५ (सि.स.नं.२९९८) राजकमल टॉकीजवळ ,धुळे येथे व्यापारी संकुल विकसित करणे.<br>४) शाळा क्र.१७ (सि.स.नं.४४७३ व ४४७४) नेहरू चौक, देवपूर ,धुळे येथे व्यापारी संकुल विकसित करणे.<br>५) शाळा क्र.२८(सि.स.नं.३५०७) सं.नं.५६१/२१ अ चितोड रोड ,धुळे येथे व्यापारी संकुल विकसित करणे. | अंदाजपत्रकीय रकमेच्या १.२५ % दराने | |
| ४ | ०८ | ०९/०४/२०२१ | प्र.क्र.३ मधील जामा मस्जिद ते सईद भंगारवाले घरापावेतो कॉंक्रीट रस्ता करणे. | १५,०६,३२१/- | मनपा निधी अंतर्गत (नगरसेवक नधी) |
| ५ | ०९ | ०९/०४/२०२१ | प्र.क्र.३ मधील इस्लामपुरा भागातील मेहमूद हॉटेल ते लोंढी नाल्या पावेतो कॉंक्रीट रस्ता करणे. | ७,१४,२९९/- | मनपा निधी अंतर्गत (नगरसेवक नधी) |
| ६ | १० | ०९/०४/२०२१ | प्र.क्र.१० मध्ये आर.के.चौधरी हाउस भोईगल्लि जुने धुळे येथे महिलांसाठी १० शीट शौचालय बांधणे. | १६,११,६०१/- | महिला व बाल कल्याण समिती अंतर्गत |
| ७ | ११ | १६/०४/२०२१ | प्र.क्र.२ मध्ये गणपत आण्णा यांच्या घरापासून ते कुलकर्णी यांच्या घरापर्यंत रस्ता डांबरीकरण करणे. | १९,९१,५७१/- | मनपा निधी अंतर्गत (नगरसेवक नधी) |
| ८ | १२ | १६/०४/२०२१ | प्र.क्र.२ मध्ये दत्त कॉलनी भागात रस्ता डांबरीकरण करणे. | १९,९१,५७२- | मनपा निधी अंतर्गत (नगरसेवक नधी) |
| ९ | १७ | १९/०४/२०२१ | प्र.क्र.१३ मध्ये ८० फुटी रोड कॉर्नर येथे स्वागत कमान उभारणे. | ६,९७,९६१/- | मनपा निधी अंतर्गत (नगरसेवक नधी) |
| १० | १८ | २०/०४/२०२१ | धुळे मनपा हद्दीतील महात्मा गांधी चौकात प्रदर्शनीय राष्ट्रध्वज कामाचे सुशोभिकरण करणे. | २२,२२,४३८/- | मनपा निधी अंतर्गत (नगरसेवक नधी) |
| ११ | १९ | २०/०४/२०२१ | प्र.क्र.१९ मध्ये सुलतानिया मदरसा पासून ते बागे सुकुन हॉटेल पावेतो कॉंक्रीट रस्ता व गटार तयार करणे. | ९,९९,९१३/- | आमदार स्थानिक विकास कार्यक्रम अंतर्गत |
| १२ | २० | २०/०४/२०२१ | प्र.क्र.१३ मध्ये शिवाजी नगर नंदी रोड इसराईल शेठ यांच्या घराजवळील नाल्यावर पुलाचे बांधकाम करणे. | ९,९५,३३७/- | आमदार स्थानिक विकास कार्यक्रम अंतर्गत |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| १३ | २१ | २०/०४/२०२१ | प्र.क्र.१७ मध्ये स्वराज्य जिम ते बाळू आगलावे ते एफ.सी.आय.गोडावून कॉर्नर ते बडगुजर चौक कंपनी ते जयेश माळी घरापावेतो रस्ता डांबरीकरण करणे. | १९,९७,८७२/- | मनपा निधी अंतर्गत (नगरसेवक नधी) |
| १४ | २२ | २०/०४/२०२१ | प्र.क्र.१७ सीताराम माळी चाळ येथील ओपनस्पेसला वॉल कंपाऊंड करणे. | २०,०५,१४९/- | मनपा निधी अंतर्गत (नगरसेवक नधी) |
| १५ | २३ | २०/०४/२०२१ | प्र.क्र.१७ गौरी हौ.सोसा. कोतवाल नगर,सदिच्छा नगर येथे रस्ता डांबरीकरण करणे. | १९,९७,६४०/- | मनपा निधी अंतर्गत (नगरसेवक नधी) |
| १६ | २४ | २०/०४/२०२१ | प्र.क्र.१७ मध्ये श्री.संदीप दत्तात्रय महाले (स्वीकृत नगरसेवक) प्र.क्र.१७ आण्णासाहेब पाटील नगर भागात प्रमोद सोनावणे घर गांगुर्डे याचे घरापावेतो आर.सी.सी. पाईप ड्रेनेज लाईन टाकणे. | ६,९९,४५९/- | स्वीकृत नगरसेवक निधीतून |
| १७ | २५ | २०/०४/२०२१ | प्र.क्र.१७ चेवलेकर नगर येथे श्रीराम मंदिर ते दिनेश चव्हाण घर व साईदर्शन कॉलनी देवपूरकर घरापावेतो रस्ता डांबरीकरण करणे. | १९,९१,५६८/- | मनपा निधी अंतर्गत (नगरसेवक नधी) |
| १८ | २६ | २०/०४/२०२१ | सर्व्हे नं.५३६/१ येथील सार्वजनिक जमिनीवर संरक्षण भिंत बांधणे. | १९,६९,९३३/- | जिल्हा वार्षिक योजने अंतर्गत |
| १९ | २८ | २०/०४/२०२१ | धुळे मनपा हद्दीतील क्रांती ज्योती सावित्रीबाई फुले पुतळा सुशोभिकरण करणे. | ८,४४,६८३/- | महापुरुषांचे पुतळे सुशोभिकरण व दुरुस्ती करणे. |
| २० | ३९ | २२/०४/२०२१ | प्र.क्र.६ मध्ये मौजे नकाणे ता.जि.धुळे दलित वस्ती परिसरात डॉ.बाबासाहेब आंबेडकर पुतळ्याच्या परिसरात पेव्हिंग ब्लॉक बसविणे. | ९,९९,४९०/- | मा. खासदार स्थानिक संग विकास योजना सन २०१९-२० अंतर्गत |
| २१ | ४० | २३/०४/२०२१ | धुळे महानगरपालिका हद्दीतील पिंप्री गावात रस्ते कॉंक्रीट करणे. | ८,७९,८५१/- | १४ व्या वित्त आयोगा अंतर्गत |
| २२ | ४६ | २३/०४/२०२१ | प्र.क्र.१२ मध्ये मज्जू ड्रायव्हर यांच्या घरापासून ते अकबर गार्डन पर्यंत रस्ता कॉंक्रीट करणे. | ९,९८,७९७/- | मनपा निधी अंतर्गत (नगरसेवक निधी) |
| २३ | ५१ | २६/०४/२०२१ | प्र.क्र.१९ मध्ये आसिफ फौजी यांच्या घरापासुन ते अतिक सर यांच्या घरापावेतो रस्ता कॉंक्रीट करणे. | ९,९३,८१०/- | मनपा निधी अंतर्गत (नगरसेवक निधी) |
| २४ | ५४ | २९/०४/२०२१ | प्र.क्र.१९ मध्ये बागे सुकुन हॉटेल ते नूर बेग यांच्या घरापावेतो कॉंक्रीट रस्ता तयार करणे. | १९,९७,५३७/- | आमदार स्थानिक विकास कार्यक्रम अंतर्गत |
| २५ | ५६ | २९/०४/२०२१ | प्र.क्र.३ मध्ये नुरानी मस्जिद ते इमाम अहमद रजा चौक पावेतो रस्ता कॉंक्रीट करणे. | ९,९७,५५०/- | मनपा निधी अंतर्गत (नगरसेवक निधी) |
| २६ | ५८ | २९/०४/२०२१ | प्र.क्र.१९ मध्ये हुडको भागात कॉंक्रीट गटार करणे. | ९,७१,६९९/- | मनपा निधी अंतर्गत (नगरसेवक निधी) |
| २७ | ६४ | ०५/०५/२०२१ | प्र.क्र.१२ मध्ये नशनल स्कूल भागात सलीम भैय्या यांच्या घरापासून ते हाफिज भैय्या यांच्या घरापर्यंत कॉंक्रीट रस्ता करणे. | ६,९४,९३०/- | मनपा निधी (प्री बजेट अंतर्गत ) |
| २८ | ७२ | ०५/०५/२०२१ | बोरसे कॉलनी येथील अकील अन्सारी यांचे घरापासून ते मुजफ्फर भाई यांचे घरापावेतो गटार व रस्ता तयार करणे. | १९,९९,८३९/- | आमदार स्थानिक विकास कार्यक्रम सन २०२०-२१ अंतर्गत |
| २९ | ७३ | ०५/०५/२०२१ | प्र.क्र.१३ मध्ये शिवाजी नगर नंदी रोड भागात विविध ठिकाणी पेव्हिंग ब्लॉक बसविणे. | ९,७७,९२१/- | मनपा निधी अंतर्गत |

उक्त यादीचे वाचन करुन सभा गृहास माहिती देण्यांत आली. सही/-x x x

**सभापती,**
**स्थायी समिती,**
**धुळे महानगरपालिका,धुळे**

| | |
|---|---|
| विषय क्रमांक:- ४९ | धुळे महानगरपालिकेचे घनकचरा वाहतूक व संकलन करणे कामाचे निविदा दर मागविण्यांत आलेत, त्याबाबत आलेल्या कार्यालयीन अहवालावर विचार करणे. |
| म. नगरसचिव | नगरसचिव यांनी विषयांचे वाचन केले. |
| म.शितल नवले | मागच्या अडीच वर्षापासून सातत्याने या ठेकेदारांच्या तक्रारी येत होत्या त्यात प्रामुख्याने प्रशासनाची अडचण होत होती प्रशासनाने चुकीच्या पद्धतीने निविदा प्रक्रिया केली होती त्याचा सर्व दुष्परिणाम धुळे शहराला भोगावा लागलेला आहे मला याबाबत काही प्रश्न उपस्थित करावयाचे आहेत सर्वप्रथम मागच्या निविदा प्रक्रियेत व या निविदा प्रक्रियेत काय फरक आहे या फक्त एक नवीन बांधकाम मटेरियल असल्याबाबत प्रयोजन आहे दुसरी गोष्ट पहिली निविदा प्रक्रियेत १६८ टारगेट संबंधित ठेकेदाराला दिले होते कुठलेही अंदाजपत्रक तयार होताना १० टक्केपेक्षा कमी किंवा जास्त अंदाज धरला जातो पण दहा टक्केच्या वर जाऊ शकत शकत नाही असे शासनाचे आदेश आहेत जर ते जास्त जात असेल तर आपले एस्टिमेट चुकते आहे शासनाच्या निर्णयाप्रमाणे व शहराच्या लोकसंख्येप्रमाणे किती कचरा संकलन होणार आहे याचे काही गणित केले होते का पहिल्या निविदेत आपण ओला व सुका कचरा तसेच नाला व गटारीतील निघालेला असे एकत्र संकलित करीत होतो त्यावेळेस आपल्याकडे त्याप्रमाणे ठोस कॅल्क्युलेशन नाही त्यामुळे वर्गवारी केली होती का याचे उत्तर हवे आहे मला त्याचे उत्तर द्यावे मग मी नंतर प्रश्न विचारू शकेल कृपया माझ्या प्रश्नांची सर्व नोंद घ्यावी या ठिकणी नमूद आहे की ११५ ओला व सुका कचरा जमा होईल हा अंदाज प्रशासनाने दिलेला आहे बांधकाम मटेरियल एक टन गटारीचे भुगली ९२ टन असे वर्गीकरण केलेले आहे जर यात दहा टक्के गणित चुकले तर साधारणता १२७ टन होईल पण १३० तर यापुढे कचरा संकलन गेले तर त्याची जबाबदारी कोणाची असेल मागच्या टेंडर १६८ टनाचे दिले होते आज च्या तारखेत २२५ टन कचरा संकलन आहे जवळपास तीस टक्के जास्त कलेक्शन होत आहे तर त्यावेळेस एस्टीमेट चुकण्याचे कारण काय जर आता चुकले तर त्याची जबाबदारी कोणाची अंदाजपत्रका पेक्षा वाढीव खर्च होता कामा नये मागचे टेंडर आपण ९७० रुपये दिले होते व आताची टेंडर आपण १६२५ रुपयांनी देत आहोत इतकी ६० टक्के दरवाढ दोन वर्षात अपेक्षित होती का आणि कुठल्या निकषाने आपण ६० टक्के दरवाढ केली पाहिजे. बाजार भाव व मूल्यांकन याप्रमाणे दर वर्षी दहा टक्के वाढ गृहीत धरली तर २० ते ३० टक्के वाढ होईल त्यामुळे हे योग्य होणार नाही कायदेशीर बाब निर्माण झाली तर अडचण होईल पुन्हा एकदा या ठेकेदाराला आपण बोलवावे जर तो दर कमी करत असेल तर तशी प्रक्रिया राबवावी कारण शासनाचा नियम आहे जर कधी टेंडर कॉस्ट जास्त असेल व निविदा धारक कमी करत नसेल तर पहिल्या वेळेस ती निविदा मंजूर करू नये हे शासन परिपत्रक आहे दुसऱ्यांदा परत निविदा मागवावी जर पुन्हा:च रेट जास्त आले तर प्रशासनाने क्रॉस व्हेरिफाय करावी नंतर तिसऱ्या वेळेस निविदा मागवावी व त्याचा विचार करावा जर आपण ६० टक्के दर वाढवून देणार असाल तर ते योग्य होणार नाही व माझा याला विरोध आहे माझा विरोध नोंदविण्यात यावा हि विनंती. |
| म.अमिन पटेल | प्रथमता मी सर्वांना रमजान ईदच्या शुभेच्छा देतो रमजान ईदच्या काळात सर्व अधिकारी सभापती, महापौर, आयुक्त तसेच पाणीपुरवठा विभागाचे सर्व अधिकारी यांनी पाणीपुरवठा अल्पसंख्यांक भागात पाणी पुरवठा सुरळीत सुरू ठेवला त्याबद्दल मी त्यांचे प्रथम अभिनंदन करतो. या विषयात एकशे पंधरा टन सुका व ओला कचरा संकलन बाबत टिपणी नमूद आहे पण ११५ टन सुका कचरा घंटागाडीत बसू शकत नाही जेव्हाही टनावर ठेका दिला जातो त्यावेळेस ठेकेदार माती दगड भरून वजन करतात जेव्हापासून ठेका सुरू आहे तेव्हापासून कर्मचाऱ्यांवर दबाव टाकण्यात येतो गटारीचे व नालीचे गाळ उचलण्यात येत नाही यात आपल्याला सुरक्षितता काय राहील हे महत्त्वाचे आहे अल्पसंख्यांक भागात कचऱ्याची समस्या फार मोठी आहे मागील ठेकेदाराचा अनुभव वाईट आहे या वेळेस आपण प्रात्यक्षिक सादर केले असताना पाच वेळा घंटागाडी येईल असे सांगितले गेले परंतु एक दोन वेळेस जरी घंटागाडी आली तरी आपली कचऱ्याची समस्या मिटणार आहे या निविदेत नमूद आहेत ते चांगल्या प्रकारे व कार्यक्षमतेने झाले तर नागरिक व नगरसेवकांचे समाधान होईल ठेकेदार प्रथम ठेका घेतो व नंतर त्याच्या पद्धतीने काम करतो प्रथमच आपण सात वर्षाचा ठेका देत आहोत त्यामध्ये अटी व शर्ती नमूद |

कराव्यात जर त्याने चार महिने योग्य पद्धतीने काम केले तर त्याचा ठेका पुढे सुरू ठेवावा अन्यथा त्याचा ठेका रद्द करावा तर आपल्या शहरातील कचऱ्याची समस्या कायमस्वरूपी निकाली निघेल. जर संबंधित ठेकेदराने ४ महिने व्यवस्थित काम केले तरच त्यांचा ठेका पुढेही सुरू ठेवावा.ज्या ठिकाणी वजन करण्यात येते त्या ठिकाणी सीसीटीव्ही कॅमेरे लावावेत व ज्या ठिकाणी कचरा टाकण्यात येतो तेथे सीसीटीव्ही कॅमेरे लावावेत हा जनतेचा पैसा आहे त्याची योग्य विल्हेवाट लावली पाहिजे आज आमच्या आजादनगर भागात २५ ते ३५ टन कचरा निघेल चार महिन्यांची अट निविदेत टाकावी अन्यथा मी समाजवादी पार्टीतर्फे आंदोलन करेल.

म.सुनिल बैसाणे

धुळे शहरात पाणी प्रश्न सारखाच घनकचरा संकलनाचा महत्त्वाचा प्रश्न आहे याबाबत लोकप्रतिनिधी व नागरिक सातत्याने तक्रारी करतात गेल्या वर्षापासून घनकचरा संकलनाचे विषय आलेला आहे कचरा संकलन करण्यासाठी शासनाच्या वतीने दर निश्चित केले जातात अनेक मनपा महाराष्ट्रात आहेत त्याची अ,ब,क,ड वर्गवारी केली जाते त्यात आपली धुळे महानगरपालिका ड वर्गात येते आपण नागपूरचे जगताप कन्सल्टंट यांच्या माध्यमातून हा प्रस्ताव तयार केलेला आहे आज कोरोनाच्या कार्यकाळात ऑनलाइन सभा घेतलेली आहे परंतु मोबाईलच्या अडचणींमुळे आम्ही सभागृहात समक्ष उपस्थित आहोत हा महत्त्वाचा व जिव्हाळ्याचा प्रश्न आहे म्हणून प्रत्यक्ष हजेरी याठिकाणी लावलेली आहे वॉटर ग्रेसच्या भोंगळ कारभारामुळे नवीन निविदा प्रक्रिया करावी लागली त्यांना आपण तीन वर्षासाठी ठेका दिला होता सदरचा ठेकेदार काम करण्यास सक्षम नसल्याने व त्याला दर परवडत नसल्याने त्याने काम करण्यात बंद करण्याबाबत कळवले होते सातत्याने नागरिक लोकप्रतिनिधींच्या तक्रारीमुळे त्याला काळा यादीत टाकण्याबाबत नोटीस दिलेली होती आणि मी स्थायी समिती सभापती असताना आयुक्तांमार्फत संबंधित ठेकेदाराला काळया यादीत टाकणेबाबतचा प्रस्ताव सादर झालेला होता.सर्व सन्माननीय सदस्यांच्या सहमतीने हा अधिकार प्रशासन व आयुक्तांचा असल्याने सदर प्रस्ताव प्रशासनाकडे सादर केला जर त्या वेळेस स्थायीने निर्णय घेतला असता व ठेकेदार न्यायालयात गेला असता तर त्याची जबाबदारी स्थायी समितीवर निश्चित झाली असती त्यानंतर जोपर्यंत दुसरा ठेकेदार नियुक्त होत नाही तोपर्यंत वॉटरग्रेसला काही शर्ती व अटीवर काम देण्यात आले होते दुसरी निविदा प्रक्रिया साठी स्थायीने मंजुरी दिली व त्यानुसार हा प्रस्ताव चर्चेला आलेला आहे.

काही महाभाग आपल्या पक्ष्यांवर व नेत्यांवर आरोप करतात हे वॉटर ग्रेसच्या अपत्य कोणाचे आहे निविदा प्रक्रियेत कोणी सहभाग घ्यावा हे आमच्या हातात नाही पण निविदा प्रक्रिया व त्या पुढील कार्यवाही करण्याची जबाबदारी प्रशासनाची आहे व यात प्रशासन अपयशी झालेले आहे असा माझा आक्षेप आहे.आपल्याकडे सक्षम व तज्ञ यंत्रणा नसल्याने जगताप या कंनस्लटनला सहा लाख रुपये देऊन आपण निविदा तयार केली. वॉटर ग्रेसचा डीपीआर कोणाच्या माध्यमातून केला तो योग्य होता की अयोग्य होता मला माझ्या प्रश्नांची मुद्दयांची नोंद करून उत्तरे द्यावीत.घनकचरा संकलनाचे विषय ज्या ज्या वेळेस सत्ताधार्यां समोर आलेला आहे त्यात्या वेळेस सत्ताधाऱ्यांवर आरोप-प्रत्यारोप झाले आहेत त्याचे कारण ज्या वेळेस निविदा तयार केली जाते त्या वेळेस त्याकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष केले जाते आणि त्याचा फायदा घेऊन पैसे लाटण्याचे काम करतो आम्ही जागरूक होतो म्हणून वॉटर ग्रेसला काळया यादीत टाकण्यात यावे म्हणून प्रस्ताव सादर केला व त्याला हद्दपार केले. शहराच्या विकासासाठी आमचे नेते काम करतात महाराष्ट्रात कुठेही सात वर्षाची निविदा देण्यात आलेली नाही महा सभेचा कार्यकाळ पाच वर्षाचा असतो व स्थायी समितीचा कार्यकाळ एक वर्षाचा असतो जर आपल्याला शासनाने पाच वर्षाची कालमर्यादा दिलेली आहे तर आपण सात वर्षाची मंजुरी कोणत्या आधारावर द्यावयाची प्रशासनाची ही धूळफेक आहे कुठलीही निविदा व मंजुरी ही एका वर्षासाठी दिली जाते मागच्या वॉटर ग्रेसला तीन वर्षाची मान्यता दिली त्यावेळेस महासभेची मान्यता घेतली पाहिजे होती या सात वर्षाच्या प्रस्तावाला सुद्धा मे.महासभेची मंजुरी नाही ही बाब नमूद करावी. हा धोरणात्मक विषय आहे १५ व्या वित्त आयोगातून आपण निधी देणार आहोत यासाठी धोरणात्मक निर्णयाची जबाबदारी महासभेची असते टिपणी कुठेही महासभेची मान्यता दिसत नाही महासभेची मंजुरी न घेता हा प्रस्ताव सादर केला त्या अधिकाऱ्यांवर कारवाई झालीच पाहिजे आम्ही प्रशासनाच्या अहवालावर स्थायी

समितीत मंजुरी देत असतो परंतु हा धोरणात्मक आर्थिक विषय आहे त्यामुळे स्थायी समितीची ही मोठी जबाबदारी आहे यात जगताप नामक कन्सल्टंटने अमरावती व विदर्भातील डीपीआर तयार केलेला आहे. प्रस्ताव चांगला आहे परंतु ही जी स्वयंभू संस्था आहे त्यांचे कामही विदर्भ गडचिरोली येथे सुरू आहे संबंधित ठेकेदार याचा फायदा व्हावा या दृष्टीने सदर डीपीआर तयार झाला असावा अशी शंका आहे. निविदा प्रक्रिया तयार करण्याबाबत एक प्रशासकीय समिती गठीत केली होती आपण समितीने प्रस्ताव सादर करताना कोणत्या बाबी तपासल्या याबाबत समितीची बैठक झाली होती का त्या बैठकांची इतिवृत्त त्यातील मुद्दे चर्चा याबाबत माहिती मिळावी. संपूर्ण देशाचा, राज्याचा व मनपा चा कार्यभार भारतीय संविधानावर आधारित आहे महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम ७२अ.ब मध्ये नमूद आहे महासभेची मंजुरी नसताना स्थायी समितीसमोर विषय आला कसा १४ वा वित्त आयोग १५ वा वित्त आयोगाचा समाविष्ट झालेला आहे त्याचा स्पष्ट निर्देश आहेत स्वच्छ भारत योजनेअंतर्गत शासनाने अनुदान करून दिलेले आहे अनुदानाची अद्याप निश्चिती झालेली नाही याबाबत शासनाचे निर्देश आलेले नाहीत निश्चित किती स्वरूपाचे अनुदान मिळणार आहे याचा कोणताही उल्लेख नाही आपण महासभेची मंजुरी न घेता विषय आलेला आहे आपणास विनंती आहे या विषयाच्या मंजुरी बाबत स्थायी समिती निर्णय घेईल महासभेची धोरणात्मक मंजुरी का घेतली नाही आणि दर मंजुरीचा विषय कसा काय आला याची चौकशी व जबाबदारी निश्चित झाली पाहिजे हा शहराचा जिव्हाळ्याचा प्रश्न आहे सभागृहाचा कल पाहून व विचार विनिमय करून याबाबत निर्णय घ्यावा ही विनंती.

म.नागसेन बोरसे

हा जो विषय आलेला आहे याआधी सन्माननीय सदस्यांनी काही मुद्दे उपस्थित केलेले आहेत संबंधित संस्थेला सोळाशे रुपये प्रमाणे आपण काम देतो आहोत वॉटरग्रेसला आपण ९२५ रुपयाने काम दिले होते परंतु वॉटर ग्रेस कंपनीला ज्या वेळेस आपण काम दिले त्यावेळेस एका घंटागाडीत ओला व सुका कचरा गोळा केला जात होता त्या गाडीत जास्तीत जास्त दोनशे ते अडीचशे किलो कचरा संकलन होत होता याचा अर्थ त्या घंटा गाडीला चार ट्रीपा माराव्या लागत होत्या आणि त्या चार ट्रीपासाठी त्याला हजार ते बाराशे रुपये खर्च यायचा यात त्यांचा टॅक्सेस, लेबर खर्च, वाहन खर्च इत्यादी समाविष्ट होता त्यामुळे त्याला तो दर परवडत नव्हता मग तो एकाच वेळेसपाचशे किलो माल त्या गाडीत भरायचा त्यात भुगली दगड-माती भरत होता यात अनेक तक्रारी झाल्या जर एक एजन्सी चार ट्रीपा करेल त्याला हजार रुपयात परवडणार नाही त्यामुळे दर वाढवून दिले तरच प्रामाणिकपणे काम होईल त्यामुळे आलेले दर ते योग्य वाटतात एका टनाचे हजार किलो होतात त्यासाठी त्याला चार ट्रीपा माराव्या लागतील कोणत्याही तक्रारी विना जर काम करून घ्यायचे असेल तर आपल्याला दर त्याप्रमाणे द्यावेच लागतील.आज वॉटर ग्रेस कंपनीच्या ३० गाड्या टायर अभावी बंद आहेत आज जरी गाड्या बंद असल्या तरी तेवढ्याच माल कचरा डेपोवर कसा काय जातो आहे वॉटर ग्रेस कंपनीने किती टन दैनंदिन कचरा संकलन केलेले आहे याचा मला खुलासा करावा आपण दहा टक्के पेक्षा दर वाढून देऊ शकत नाही असा प्रश्न होता माझा प्रश्न असा आहे वॉटर ग्रेस किती टन कचरा गोळा करते याचा हिशोब लागला पाहिजे संबंधित कंपनीने कमी दराने निविदा दिली म्हणून आजची ही परिस्थिती आलेली आहे कारण एवढ्या कमी दरात कचरा संकलन शक्यच नाही वॉटर ग्रेसला आपण ब्लॉक लिस्ट करीत आहोत आपण मागे आस्था कंपनीला ठेका दिला तो एक वर्षाचा होता राष्ट्रवादी च्या काळात त्याला तीन वर्षे वाढवून दिली त्यात आस्था संस्थेलामागील सभापतीच्या काळात पुन्हा मुदतवाढ दिली. ते कोणत्या निकषाने दिली याचा खुलासा करावा. या संस्थेबाबत अनेक तक्रारीरी होत्या. त्या संस्थेलाच अशा प्रकारे मुदतवाढ देवू शकतो.तर ७ वर्षांचा ठेका नियमानुसार आहे किंवा नाही हे प्रथम सांगावे. कचरा संकलना बाबत प्रामणिकपणे काम करायाचे असेल तर सर्वांनी एकत्रितरित्य निर्णय घेतला पाहीजे. सदर ठेकेदार जेवढा कचरा संकलन करेल तेवढेच पैसे संबंधित ठेकेदाराला अदा करायाचे आहे. टिपणीत २०८ टन हा अंदाजित आंकडा आहे यात बदल होवू शकतो हा ठेका देतांना वजनमाप करण्याच्या ठिकाणी सी.सी.टी.व्ही.कॅमेरे बसविणे गरजेचे आहे. आपण सक्षम व प्रभावीपणे काम करण्यासाठी अटी व शर्ती नमुद करून निविदा दर मंजूर करावे.

म.शितल नवले — यामध्ये एक गोष्ट आहे देशाचा प्राईज इंडेक्स असतो त्यात ८ टक्केच्या वर दर वाढ नसावी असे नमुद आहे. जर प्राईज इंडेक्स ८ टक्के असेल तर सेव्हिंगचा रेट १ ते १.५ टक्का दर देता येतो या सभागृहात आपण २२ टक्के कमी देखील टेंडर मंजूर करतो आणि अंदाजपत्रक दराने देखील मंजूर करतो.आपण कोणत्याही ठेकेदार कोणते रेट भरावे हे सांगत नाही. आपण ठेकेदाराला चोऱ्या करायाला सांगत नाही.एक हि गाडीचे वजन मागच्या वेळेस ४०० किलोच्या खाली आलेले नाही. काही ठेकेदाराकडे सक्षम यंत्रणा व तशी परिस्थिती असेल त्याप्रमाणे तो रेट भरतो. प्राईज इंडेक्सनुसार १० ते २५ टक्के पर्यंत दरवाढ ठिक आहे. जर जास्त भाव आला व त्यांने जास्त माल गोळा केला तर काय करायाचे कोणत्याही अंदाजपत्रकात१० टक्केपेक्षा जास्त तफावत होता काम नये. पण मागच्या ठेकेच्या अनुभवा वरून ३० टक्के तफावत वजनात झालेली आहे.आपल्याकडे वजन करण्यासाठी साईड व हँगिंग कॅमेरे आवश्यक होते.आपला ओला व सुका कचरा एकाच ठिकाणी जातो. यावरती भविष्यात दोन भाग करावे ओला व सुका कचरा वेगळया ठिकाणी वर्गीकरण करावे.आपल्या कडे सक्षम यंत्रणा नाही त्यामुळे याबाबत आक्षेप येवू शकतात.

म.नागसेन बोरसे — आपणास १० टक्के पेक्षा जास्त दर देता येत नाही असे म्हणणे आहे. हे जे दर आलेले आहे ते सुधारित दर आहेत. प्रशासनाने यापुवीर् कोणते दर निश्चित केलेले होते.

म.शितल नवले — मागील दर ९१७ होते.

म.नागसेन बोरसे — दर वर्षी नैसर्गिक दरवाढ किती आहे. त्याप्रमाणे अंदाजित १२०० रूपये होतात पण आलेले दर सुधारित आहेत. आपण त्यावर आक्षेप घेवू शकत नाही.

म.सुनिल बैसाणे — मी याठिकाणी कोणाची बाजू घेण्यासाठी उभा नाही. या प्रस्तावाबाबत माझी नैतिक जबाबदारी आहे. हा प्रस्ताव मंजूर करा किंवा ना मंजूर करा संबंधित ठेकेदाराने दिलेल्या दराबाबत ही माझे काही म्हणणे नाही. आपण यापुर्वी वॉटरग्रेसच्या अकार्यक्षम कामामुळे त्यांना ब्लॉक लिस्ट करण्यासाठी या सभागृहात विषय आणला. आपण हा जो ७वर्षासाठी ठेका देतो आहोत. तो योग्य आहे किंवा अयोग्य आहे हे सभागृहाने ठरवाये आहे. आताच आस्था संस्थेच्या विषय निघालेला होता. सदरचा प्रस्ताव कोरोनाच्या कार्यकाळात प्रशासनाने आणलेला होता.सदर प्रस्ताव परिस्थितीनुसार प्रशासनाने सादर केला.मा. आयुक्त साहेबांनी सदर प्रस्ताव कोरोनाच्या कार्यकाळामुळे सादर केला व त्यांच्या विनंतीनुसार प्रस्तावास सभागृहाने मान्यता दिलेली होती. विषय मंजूरीचा अधिकारी सभागृहाला आहे. प्रशासनाने या प्रस्तावाबाबत मंजूरी घेतलेली नाही हि बाब निर्दशास आणून देणे ही माझी जबाबदारी व कर्तत्व आहे. याबाबत निर्णय सभागृहाने घ्यावयाचा आहे.

म.अमोल मासुळे — ज्याप्रमाणे मानवाला अन्न,वस्त्र,निवारा यांची गरज असते त्याचप्रमाणे नागरीकांना पाणी लाईट व सार्वजनिक स्वच्छता यांची हि त्याचप्रमाणे गरज असते. प्रत्येक घरात रोज कचरा निघत असतो. या प्रस्तावाबाबत अनेकांनी चांगले मुद्दे उपस्थिती केले. यामध्ये २००३ पासून मनपात अस्तित्वात आली. तेव्हापासून कचरा संकलनाचा ठेका देण्यात येत आहे. तो काय रेटने दिलेला होता. मागील काळात वॉटरग्रेस कंपनीला तीन वर्षासाठी ठेका दिलेला होता. आता आपण ७ वर्षासाठी ठेका देत आहोत. आपला कार्यकाळ ५ वर्षाचा असतो त्यामुळे ७ वर्ष ठेका देण्याचा निर्णयाबाबत विचार होणे गरजेचे आहे. आपल्या कचरा ठेकाचा मागील इतिहास बघता कोणत्याही ठेकेदारांने समाधानकारक काम केलेले नाही.त्यांने काम समाधानकारक केले नाही तर त्यास जबाबदार कोण? त्यामुळे या प्रस्तावाबाबत विचारपुर्वक निर्णय घेणे गरजेचेआहे.या प्रशासनाच्या प्रस्तावाबाबत काही कायदेशीर बाबी निर्माण झाल्या तर यास प्रशासनजबाबदार राहिल त्यामुळे प्रस्तावास मान्यता देतांना कायदेशीर बाबी तपासून प्रस्तवास मान्यता द्यावी हि विनंती.

म.चंद्रकांत जाधव — वॉटरग्रेसबाबत ज्या तक्रारी येत होत्या त्याअनुषंगाने स्थायी समितीने जे निर्देश दिलेले होते त्याप्रमाणे सदरचे काम ३१ डिसेंबरपर्यंत बंद करून नविन निविदा प्रक्रिया करावी असे आदेश दिलेले होते. मागली वर्षी घनकचरा संकलनाबाबत निविदा प्रक्रिया प्रसिध्द केलेली होती..त्यामध्ये मागच्या निविदया प्रक्रियेत घरस्थरावर घनकचरा संकलन करणेबाबत निविदा प्रक्रिया प्रसिध्द केलेली होती.त्यात फक्त घंटागाडीचे काम होते त्यात गटारीचे गाळ उचणेबाबत स्पष्टता नव्हती. त्यामध्ये आयुक्त सो निर्देश

देतील त्यापमाणे गटारीचा गाळ काढण्या संदर्भात संबंधित इन्सेप्क्टर सुचना करतील आणि तो गाळ त्या भागातला उचलायचा आहे.

| | |
|---|---|
| म.शितल नवले | याच्यात आयुक्त सो यांचा काहि संबंध नाही हे अटी शर्ती मध्येच म्हटले आहे. चुकीचे उत्तरे देवू नका |
| म.चंद्रकांत जाधव | हि जी निविदा प्रक्रिया राबविली आहे त्यात १६८ टन दाखविला होत आता २०८ टन कसा हा प्रश्न होता ज्या वेळेस ई निविदा प्रक्रिया राबवितांना शासनाने २०१७ साली धुळे शहराचा एक डी. पी. आर. बनविला होता.त्या डी.पी.आर.मध्ये असे नमुद होत की, प्रति माणसी ४०३ ग्रॅम कचरा उपलब्ध होतो असू नमुद होते. परंतू हा ठेका देणे अगोदर आपल्याकडे पुर्वी कुठलेही यंत्रणा नसल्याने १६८ टन कचरा हि अंदाजित बाब निश्चित केली होती. हया डी.पी.आर.मध्ये ४०३ ग्रॅमचा ॲव्हरेज धरला होता परंतू जे निर्देश आहेत त्या अनुषंगाने दर माणसी २.२५ ग्रॅम कचरा निर्माण होतो असे नमुद होते. त्यानुसार धुळे शहराच्या लोकसंख्याच्या हिशोबांने ११५ टन कचरा निर्माण होईल तसेच गटारीचा गाळ काढायचा आहे त्या संकलनानुसार सरासरी पकडली आहे. ती ९२ टन आहे त्यानुसार सद्याचे टेंडर केले आहे त्यांचे इस्टीमेंट चुकले आहे असे मला वाटत नाही. |
| म.शितल नवले | कॉन्ट्रक्ट अटीमध्ये स्पष्ट नमूद होते की, एस.आय.जिथे जिथे भूगल्या असतील ते सर्व उचलयाचे हे सर्व आपल्या कॉन्ट्रक्ट मध्ये होते.त्यांनी सांगितले की फक्त घंटागाडीसाठी होते. हि चुक आहे.दुसरे मला यांना प्रश्न विचारायाचा आहे की, धुळे शहराची लोकसंख्या किती धरली होती. |
| म.चंद्रकांत जाधव | लोकसंख्या ४,५८,२९४/- सन २०११ च्या जनगणनेनुसार धरण्यात आली होती. |
| म.शितल नवले | माझे हेच म्हणणे आहे जे ११५ टन आपण अंदाजित ठरलेले आहे त्यामध्ये १०%पेक्षा जास्ती वाढ झाली नाही पाहिजे. नाही तर काय होईल जो जास्तीचा रेट आहे त्याचे कलेक्शन जास्त होईल. त्यांन जे गटारीचे मायक्रोग्रॅम धरले आहे ते मागील निविदेत धरलेले नव्हते. मागील ठेकेदाराने ७९ घंटागाडी असतांना ३० ट्रक्टर ठेवले होते म्हणजे कामांच्या स्वरूपात काहीच बदल नाही. |
| म.चंद्रकांत जाधव | मागचा रेट ९१८/- टन प्रति टनानुसार देण्यात आलेला आहे. आता तो १६२५ रूपयांनी दिलेला आहे. त्यांचा जो फरक आहे घनकचरा संकलन नियम सन २०१६ च्या अनुषंगाने ज्या पध्दतीने आपल्याला कचरा संकलनाचे काम करायाचे आहे. हे जे टेंडर आपण दिलेले आहे ते टेंडर करतांना स्वतंत्र यंत्रणाचे डिझाईन करायला लावली आहे सर्व्हे तयार करायला सांगितला होता सर्व्हे करून त्यांचा रोडमॅप तयार करायाला लावलेला आहे. त्यांचा जो मायक्रा लेव्हल प्लॅन आहे तो प्लॅन एक महिन्याचा आत स्थायी समितीपुढे सादर करावयाचा आहे, यांची सर्व कॉस्ट आणि त्या ठेकेदाराना स्वत:चे वाहन लावायाचे आहे.स्वत:चे मालकीचे आर.टी.ओ. रजिस्टेशन असलेले वाहन असल्याशिवाय आपण त्याला परवानगी देणार नाही. यासाठी आपण त्याला तीन महिन्याचा कालावधी दिलेला आहे. |
| म.शितल नवले | मागच्या टेंडरमध्ये हिच अट होती. त्यांने मायक्रो प्लॅनिंग तयार करायाचे रोड मॅपिंग तयार करायाचे त्याने कक्ष उघडयाचा मी तेच सांगतो आहे,मागच्या व आताच्या निविदेमध्ये काहीच फरक नाही. पुर्ण भारतामध्ये निविदा प्रक्रिया तिच असते.तशाच अटी शर्ती असतात त्यात फक्म् किरकोळ बदल असतात राहिला प्रश्न त्यांना वाहन लावायाचे आहे. त्यामध्ये मागच्या निविदेमध्ये वाहने दिलेली होती. मागच्या टेंडरमध्ये या सर्व गोष्टी आहेत. |
| म.चंद्रकांत जाधव | जी वॉटरग्रेस कंपनी काम करीत होती त्यांचा घनकचरा संकलनाचा कोणताही अनुभव नसल्या कारणाने निविदा दर भरतांना कमी भरले म्हणून तफावत दिसत आहे. |
| म.शितल नवले | इस्टीमेट कॉस्ट १० % वर गेली तर त्यांची जबाबदारी कोणावर?हे इतिवृत्ता नमुद करा. |
| म.सहा.आयुक्त | शितलभाऊनी एक प्रश्न विचारला होता की, काय फरक आहे त्यामध्ये मागच्या वेळेस वॉटरग्रेसचा वाहतूकीचा मुद्दा होता घंटागाडी प्रभागात फिरून परत कचरा डेपोवर जाण्यासाठी वेळ लागायाचा. त्यामुळे घनकचरा संकलनासाठी वेळ लागत होता. या प्रक्रियेमध्ये प्रभागात घंटागाडी फिरणार आहे. त्यामुळे फेऱ्या वाढणार आहेत.त्या वाहतूकीसाठी ६ जागा आहेत. जो कचरा गोळा करणार आहे. त्यामध्ये हा खर्च समाविष्ट झालेला आहे. दुसरा मुद्दा आहे तो जनजागृतीचा आहे. ती जबाबदारी आपण ठेकेदाराकडे दिलेली आहे. प्रत्येक नागरीकापर्यंत जावून ओला व सुका व घातक कचरा वेगळा करणे यासाठी आपण आपल्या कर्मचारीमार्फत काम करीत होतो. तो आता करण्याची गरज नाही. ते |

याठिकाणी घेण्यात आलेले आहे.ओला व सुका कचरा वेगळे करण्याची जनजागृती त्या ठेकेदाराची आहे.तिसरा मुद्द धुळे शहरातून २०८ टन कचरा निर्माण होणार आहे त्यांचे इस्टिमेट आहे. व घर स्थारावरच कचराची विल्हेवाट लावणेबाबत ठेकेदारामार्फत काम करून घ्यावयाचे आहे. धुळे शहरातील कमीत कमी कचरा कसा निघेल व यामध्ये ओला व सुका कचरा वेगवेगळा करणे आवश्यक आहे. ठेकेदाराने होम कंपोस्टींग बाबत जनजागृती केली तर त्यासाठी ठेकेदाराला इनसेटीव्ह द्यावयाचे आहे त्यामध्ये त्यांने ३ ते ५ % कचरा कमी केला तर १० % आणि ५ ते ७ % केला तर २० % आणि ७ पेक्षा संकलन कमी केले तर त्याला ३० % इनसेटीव्ह देणार आहोत.

म.शितल नवले — इनसेटीव्ह च्या मुद्दयावर येतो जसा कचरा वाढला तर दुसऱ्या वर्षी त्यांला दंडही आहे. तीन ते पाच टक्केने वाढला तर दंडाची रक्कम कमी आहे व ठेकेदाराला इनसेटीव्ह जास्त आहे. पुर्वीच्या टेंडरला पण हीच अट होती ज्या वेळेस आपण एकत्रित मोठया प्रमाणावर वाहतूक करतो तर खर्च वाचतो. वाढत नाही याचे उत्तम उदा.कोरियर सर्व्हिसचे आहे त्यामुळे कॉस्ट कटींग होते. वाढत नाही.

म.विनायक कोते — शितलभाऊंनी मुद्दा उपस्थितीत केला की,कॉस्ट कटींग होते.हा त्यांचा मुद्दा बरोबर आहे. दोन्ही ठेकेदारामध्ये हा बेस धरतो आहे त्यामुळे वॉटरग्रेसला परवडत नव्हते.त्यामुळे त्याचा बेस धरू नये.

म.शितल नवले — माझे असे म्हणे आहे की,त्या ठेकेदाराला पुन्हा बोलवा पुन्हा निविदा प्रक्रिया करा.शासनाची नियमावली आहे.जर एखादे टेंडर जास्त जात असेल तर त्याला पहिल्या वेळेस रिकॉल करा. दुस:या वेळेही होत नसेल तर तिसऱ्या वेळेस प्रशासनाने त्याचावर काम करायाचे आहे. मी तुम्हाला वाटेल तर शासनाचा निर्णयाची प्रत देतो.

म.सुनिल बैसाणे — मी उपस्थितीत केलेल्या प्रश्नांची उत्तरे मिळाली नाही. मागे वॉटरग्रेसची निविदा प्रक्रिया करत असतांना निविदा काढतांना तुम्ही मे.महासभेची परवानगी घेतली होती का. किंवा नाही. आता ही निविदा प्रक्रिया करीत असतांना धोरणात्मक निर्णय असल्याकारणाने मे.महासभेची मजुंरी घेणे क्रमप्राप्त आहे किंवा नाही.

म.शांताराम गोसावी — शितलभाऊ, सुनिलभाऊ बैसाणे यांनी जे काही मुद्दे उपस्थितीत केलेले आहे. हा जो विषय आहे निविदा किती वर्षांची द्यावी.सभापती महोदय घनकचराच्या बाबतीत आपण १ वर्षांची निविदा देतो .त्यानंतर आपण त्याला मुदतवाढ देऊ शकता. आपण वॉटरग्रेस कंपनीला ३ वर्षांची निविदा दिलेली होती. नंतर आयुक्त सो.यांच्या दालनात आमची बैठक झाली. त्यामध्ये दिर्घ मुदतीची निविदा काढली. यात शासनाचे निर्देश आहेत कारण असे आहे की, त्या ठेकेदाराला गुतंवणूक करण्यासाठी वेळ लागतो त्यामुळे तो आपल्याला अद्यावत सेवा देऊ शकतो. त्यानंतर आम्ही असा विचार केला की, ७ वर्षांची निविदा काढायची झाली. तर आपल्याला निविदेचे जे प्रारूप आहे.तो कायदेच्या चौकटीत अडचणययाला नको म्हणून आम्ही आपल्या सर्वांच्या सहमतीने एक सल्लागार नेमला. त्या सल्लागाराने चांगल्या पध्दतीचा अभ्यास केला. संपुर्ण धुळे शहराचा अभ्यास केला. शहराच्या भौगोलिक स्थिती नुसार त्यानंतर एक प्रारूप निविदा तयार केली. त्यात आयुक्त सो.गणेश गिरी सो. आम्ही सर्वांनी सामुहिक चर्चा केली.त्याच्यावर आम्ही निर्णय घेतला ७ वर्षाचा जो काही निर्णय प्रशासानाने घेतला याबाबत जे जगताप सल्लागार आहेत ते खुप मोठे सल्लागार आहेत त्यांनी आम्हाला निविदा प्रारूप तयार करून दिला.सभापती महोदय आपल्या मार्गदर्शनाखाली ही सर्व प्रक्रिया पारदर्शक असावी म्हणून आपण प्रेझेन्टेशन पण ठेवले होते शितल भाऊचे प्रश्नाचे समाधानकारक उत्तर देण्याचा मी प्रयत्न केला.

म.शितल नवले — आमचे एकच म्हणे होते, शासनाचे जे गाईड लाईनस प्रदिर्घ काळासाठी होते तो कागद आहे का तुमच्याकडे कारण नाशिक महानगरपालिकेत देखील ७ वर्षांची निविदा नाही.

म.शांताराम गोसावी — ७ वर्षांची निविदा काढणे अपेक्षित होते. आणि त्यासाठी चार्ट तयार केला .त्यानंतर निविदा प्रसिध्दी केली. सुनिल भाऊंनी जो प्रश्न उपस्थितीत केला. तो वॉटरग्रेसच्या बाबतीत आम्ही प्रस्ताव केला होतो. सेक्शन ७२ अ,ब हा मुद्दा मे.महासभेत मनपा निधिसाठी लागू होतो. १४ व्या वित्त आयोगाचा विषय आहे.मनपाचा निधीचा विषय नसला तरी मे.महासभेला विश्वासात घ्या हा विषय मे.महासभेकडे पाठविला.मध्यंतरात कोविडचा काळ होता. वॉटग्रेसच्या कामाबाबत तक्रारी होत्या त्यामुळे आपण तांतडीने निर्णय घेतला.

म.शितल नवले — २००६ चा शासन निर्णय आहे तो मी वाचून दाखवितो. गुतवणूकदारास मागचा खर्च भरून काढता यावा म्हणून पुरेसा वेळ मिळावा यासाठी नागरी संस्थेचे वाहने पुरविणे असल्यास तीन वर्षाकरीता व एजन्सीचे वाहन असल्यास त्यांचा कालावधी ५ ते ७ वर्ष असावा सभापती महोदय ७९ घंटागाडया तर आपल्या आहे.झुलागाडी देखील तोच वापर करणार आहे.70 टक्के गाडया आपल्याच आहेत.माजी सभापतीचे जे म्हणणे आहे ते योग्य आहे.5 वर्षापेक्षा जास्त कालावधी नसावा.

म.शांताराम गोसावी — शितलभाऊंनी जो मुद्दा उपस्थितीत केला.त्याबाबत निवेदन करू इच्छितो आपण जे टेकनिकल कॉलीफिकेशन घेतलेले आहे ज्या ठेकेदाराला ज्याकाही गाडया लावायाचा आहेतत्याला नवीन गाडया घ्यावयाच्या आहे व त्याचे प्रपोजल आपल्याकडे द्यायाचे आहे.

म.सुनिल बैसाणे — माझा एकच साधा प्रश्न आहे.धोरणात्मक निर्णय घेण्याचा अधिकारी मे.स्थायी समितीचा आहे की मे. महासभेचा आहे? मे. महासभेची पुर्व मान्यता घेतली पाहिजे होती की नाही?मागे वॉटरग्रेसचा धोरणात्मक निर्णय असतांना मे.महासभेची मान्यता घेतली होती. तर यांच्यासाठी मान्यता का घेण्यात आली नाही. मान्यता न घेता मे.स्थायी समितीपुढे मान्यतेसाठी का ठेवला?

म.शांताराम गोसावी — सुनिल भाऊ आपण जो मुद्दा उपस्थितीत केला आहे, धोरणात्मक निर्णय म्हणजे काय? एखादे पॅलिसी मॅटर आहे. उदा.एखादया जागेचा कशा पध्दतीने विकास करावयाचा एखादे धोरण कसे ठरवावयाचे यासाठी पॉलिसी असते. हि एजन्सी आहे त्यानुसार आयुक्तांना अधिकार असतात. एका वर्षासाठी बजेटरी प्रोव्हिजन असते तर एका वर्षापेक्षा जास्त वित्तय वर्षासाठी खर्च करावयाचा असल्यास या सेक्शन नुसार मे.महासभेची मंजुरी घेणे आवश्यक आहे. पुढे बजेटमध्ये या तरतूद करण्यासाठी आर्थिक मंजुरी घेणे आवश्यक आहे.

म.नगरसचिव — हा मुद्दा चालू असतांना मी माझे अभिलेखे तपासले.वॉटरग्रेसची निविदा काढण्यापुर्वी धुळे महानगरपालिका ठराव नंबर १४६ दिनांक १९/१०/२०१८ अन्वये घनकचरा वाहतूक व संकलन करण्यासाठी निविदा प्रसिध्द करण्यासाठी मान्यता घेण्यात आलेली आहे. तीन वर्षांची मान्यता देण्यात आलेली आहे.घनकचराच आराखडा डिपी.आर.मंजुर केलेला आहे. घनकचरा वाहतूक व संकलनाला १४ व्या वित्त आयोगातून खर्च करण्यास मंजुरी देण्यात आलेली आहे. तसेच आता १५ वा वित्त आयोग चालू झालेला आहे.१५ व्या वित्त आयोगाच्या नुसार दिनांक २५/०५/२०२१ रोजी आपली मे. महासभा आहे त्यामध्ये विषय क्रमांक १४२ किंवा १४३ आहे. १५ व्या वित्त आयोगात कोणता खर्च करावा कामाच्या निश्चितीसाठी कामाच्या धोरणात्मक निर्णयासाठी विषय आलेला आहे.

म. सभापती — वॉटरग्रेसने काम बंद केले होते. त्यानुसार एक चांगला निर्णय आपल्याला घ्यावयाचा आहे. हा शहराचा महत्वाचा प्रश्न आहे.

म. सुनिल बैसाणे — गोसावी साहेब महाराष्ट्र शासन अधिनियम७२ अ, ब काय आहे ? उर्वरीत पैसा आपण कशातून देणार आहोत याचे दायीत्व कोणाचे? १५ व्या वित्त आयोगाचे निर्देश आहेत त्याचा निवियोग निश्चित आहे. जर स्थायी समिती व भाजपाला या विषयांत बदनाम केले तर त्यांची जबाबदारी अधिकाऱ्यांची असेल.

म.शितल नवले — आजून १५ व्या वित्त आयोगाचे निकष ठरवायाचे आहेत.१० लाखाच्या आत असलेलेआपले शहर आहे.खर्च कसा करायाचा ते ठरावायचे असून ध्येयधोरण ठरवायचे सन २०२०-२१ २०२५-२६ पर्यंत खर्च ठरविले नाही तर स्थायी समितीला अधिकार आहेत का ? उच्च सभागृहाला त्याची मान्यता दिली नाही तर हे खर्च करायाचे तर हे आपण कुठल्या अधिकारात टेंडर मंजुर करावायाचे याबाबत धोरणात्मक निणय झालेला नाही.ते आधी मंजूर होऊ द्या. तो पर्यंत हा विषय तहकुब ठेवावा अशी विनंती करतो.

म.अमिन पटेल — ७ वर्षाचा ठेका देत आहोत जर त्याने ४ महिने चांगले काम केले तर त्याला पुढील कालावधीचा ठेका देण्यात यावा ज्याठिकाणी कच-याचे वजन होत आहे.त्याठिकाणी सी. सी. टी. व्ही कॅमेरे बसविले पाहीजे.

म. सभापती — सर्व सदस्यांच्या भावना याठिकाणी समजले आहे.सर्व प्रथम प्रशासनाला मी सांगेल जेव्हापासून घनकचराचा ठेका देण्यात येत आहे. तेव्हापासून धुळेकरांचे व खास करून नगरसेवकांचे हात पोळलेले आहे.जो पर्यंत कचरा गोळा होत नाही.तो पर्यंत नगरसेवक हाच जबाबदार धरला जातो. सदर

निविदेमध्ये काही सुचना आहेत. त्यांची लक्षपुर्वक नोंद करावी. सदर कचरा संकलन व वाहतूक ठेका हा धुळे शहरासाठी अत्यंत महत्वपूर्ण आहे.सदर ठेकेदाराच्या प्रथम सहामाहीच्या कार्यपध्दतीचे व कामाचे मूल्यमापन करुन अटी शर्ती प्रमाणे समाधानकारक काम होते किंवा नाही याबाबत विभागाने खात्री तथा तपासणी करावी व त्याबाबत स्थायी समितीस अवगत करावे. माहिती दिल्यानंतर जर सदर ठेकेदाराने मागच्या ठेकेदारा सारख्याच काही चुका केल्या तर मे.स्थायी समितीला पुर्ननिर्णय घेण्यांचा अधिकार राहील.मागच्या ठेकेदाराला देखील आपण जी.पी.एस.ॲप देण्यासाठी कळविले होते परंतू कुठलेही जी.पी.एस.यंत्रणा संबंधित माहिती स्वच्छता निरिक्षक यांनी कोणत्याही नगरसेवका पर्यंत कळविले नाही. तर या ठिकाणी माझी एक सुचना राहिल हा ठेका देत असतांना जी.पी. एस. ॲपची अशी सुविधा उपलब्ध करायाची की,प्रभाग निहाय जे नागरीक आहेत त्यांना त्यांच्या प्रभागातील घंटागाडया त्या ॲपवर दिसल्या पाहिजे की आपली घंटागाडी कोणत्या भागात फिरत आहे नगरसेवकांनाच नाही तर नागरीका देखील ॲप उपलब्ध व्हावे यासाठी प्रत्येक प्रभागाचा वेगळा पासवड टाकावा अशी अट आपण सदर ठेकेदाराला दिलेली आहे.

सदरचा ठेका या ठिकाणी मंजुर करण्यात येत आहे परंतू जो करारनामा करणार आहे त्याची माहिती स्थायी समितीच्या निर्देशनास आणावी त्यानंतरच कार्यादेश संबंधित ठेकेदाराला द्यावा सदरचा विषय मंजुर करण्यात येत आहे.श्री. शितल नवले यांचा विरोध याठिकाणी नोंदविण्यात येत आहे.

**धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर ५६ दिनांक २१/५/२०२१**

धुळे महानगरपालिकेचे घनकचरा वाहतूक व संकलन करणे कामाची ई-निविदा प्रसिध्द करण्यात आली होती. त्यानुसार निविदा भरण्याची अंतीम मुदत दि.२२/१/२०२१ पर्यंत ठेवण्यात आली असता दिनांक २५/१/२०२१ रोजी निविदा उघडण्यात आली असता खालील संस्थांनी भाग घेवुन त्यांचे तांत्रिक लिफाफा उघडण्यात आले आहेत.

| अ.क्र. | निविदाधारकांचे नांव |
|---|---|
| १ | अमृत एंटरप्राईजेस ठाणे |
| २ | बी.व्ही.जी. इंडीया लि.पुणे |
| ३ | सेंटर फॉर डेव्हलपमेंट कम्युनिकेशन, जयपुर |
| ४ | स्टरलींग टेक्लनॉलॉजीस ॲण्ड सर्व्हिसेस, तिरुपती |
| ५ | स्वयंभु ट्रांसपोर्ट, पुणे |

त्यात सर्वात कमी दर स्वयंभु ट्रांसपोर्ट, पुणे यांचे खालील प्रमाणे प्राप्त झाले होते.

| निघणाऱ्या कचऱ्याचा प्रकार | एका दिवसाचा एकुण निघणारा अंदाजीत कचरा (मे.टन मध्ये) | दर |
|---|---|---|
| घंटागाडीद्वारे उचलण्यात येणाऱ्या ओला व सुका कचऱ्याचे दर | ११५ | १६५० |
| C&D (बांधकाम मटेरीयलचे दर) | १ | ५० |
| गटारीतील व रस्त्याचे गाळ भुगली व इतर कचरा | ९२ | २५० |
| एकुण :- | २०८ | १९५० |

सदर निविदा दि.२५/१/२०२१ रोजी उघडण्यात आली त्यात ४ निविदाधारक पात्र ठरले आहे सदर४ निविदाधारक पैकी स्वयंभु ट्रांसपोर्ट पुणे यांचे रु.१९५०/-मात्र चे दर कमी दिसुन येत आहे.

स्वयंभु ट्रांसपोर्ट, पुणे यांना इकडील कार्यालयात कामाच्या प्रस्तावीत कार्यपध्दती व दराच्या वाटाघाटीसाठी दि.१५/३/२०२१ रोजी उपस्थित राहणे बाबत पत्र देण्यात आले होते.

दिनांक १५/३/२०२१ रोजी मा. आयुक्त सो. यांच्या दालनात मा.आयुक्त, मा. अति. आयुक्त, मा.उपायुक्त,मा.सहा.आयुक्त,मा.आरोग्याधिकारी,मा.सहा.आरोग्याधिकारी उपस्थित राहुन स्वयंभु ट्रांसपोर्ट, पुणे यांचे कामाचे कार्यपध्दती समजुन घेण्यात आली असुन सादर केलेल्या दराबाबत घंटागाडीद्वारे उचलण्यात येणाऱ्या ओला व सुका कचऱ्याचे प्रती मे.टन रु.१६५०/- या दरास रु.२५/-

मात्र कमी करुन खालील दराने काम करण्यास तयार असल्याबाबत संमती देवुन ई-मेल द्वारे लेखी सादर केले आहे.

| निघणाऱ्या कचऱ्याचा प्रकार | एका दिवसाचा एकुण निघणारा अंदाजीत कचरा (मे.टन मध्ये) | दर |
|---|---|---|
| घंटागाडीद्वारे उचलण्यात येणाऱ्या ओला व सुका कचऱ्याचे दर | ११५ | १६२५ |
| C&D (बांधकाम मटेरीयलचे दर) | १ | ५० |
| गटारीतील व रस्त्याचे गाळ भुगली व इतर कचरा | ९२ | २५० |
| एकुण :- | २०८ | १९२५ |

सदर दरानुसार खालील प्रमाणे अंदाजीत खर्च अपेक्षीत आहे.

| निघणाऱ्या कचऱ्याचा प्रकार | एका दिवसाचा एकुण निघणारा अंदाजीत कचरा (मे.टन मध्ये) | दर | मासिक खर्च | वार्षिक खर्च | ७ वर्षाचा एकुण खर्च |
|---|---|---|---|---|---|
| घंटागाडीद्वारे उचलण्यात येणाऱ्या ओला व सुका कचऱ्याचे दर | ११५ | १६२५ | ५६०६२५० | ६७२७५००० | ४७०९२५००० |
| C&D (बांधकाम मटेरीयलचेदर) | १ | ५० | १५०० | १८००० | १२६००० |
| गटारीतील व रस्त्याचे गाळ भुगली व इतर कचरा | ९२ | २५० | ६९०००० | ८२८०००० | ५७९६०००० |
| एकुण :- | २०८ | १९२५ | ६२९७७५० | ७५५७३००० | ५२९०११००० |

दि.१५/३/२०२१ रोजी मा.आयुक्त सो. यांनी एल-१ मक्तेदार यांच्याशी वाटाघाटी करुन रु.१९२५/- मात्र मध्ये काम करण्यास तयार असल्याबाबत संमती दर्शवीली असुन त्याबाबतचे पत्र दि. १६/३/२०२१ रोजी दिले आहे.तसेच दर मंजुरीचे अधिकार मे.स्थायी समिती यांना आहेत.

तरी आरोग्य विभागाने सादर केलेल्या अभिप्रायानुसार व लेखा विभागाने नमुद केलेल्या अभिप्रायानुसार अ मध्ये नमुद नुसार स्वयंभु ट्रांसपोर्ट पुणे यांनी सादर केलेल्या दरास मा.स्थायी समितीकडे मान्यतेस्तव पाठविण्यास शिफारस केली असुन त्यास मा.आयुक्त सो. यानी मे.स्थायी समितीपुढे ठेवण्याची मान्यता दिली आहे.तरी सदरचा विषय मे.स्थायी समितीपुढे सादर झाला आहे.

सदर निविदा प्रक्रियेतील असणाऱ्या अटी शर्ती व ठेकेदाराच्या कार्यपध्दती महानगरपालिकेस उपलब्ध होणाऱ्या बाबी, वाहतुक यंत्रणा, मनपा मार्फत पुरविण्यात येणाऱ्या सुविधा या बाबतची सविस्तर माहिती तथा अहवाल स्थायी समितीच्या बैठकीपुर्वी सदस्यांना अवगत होणेकामी प्रस्तावा बाबतची संपुर्ण तपशिल तथा प्रात्यक्षीक सादर करणे बाबत कळविले होते.त्यानुसार दिनांक १५/४/२०२१ रोजी सदर कामाबाबतचा संपुर्ण तपशिल व प्रात्यक्षीक सादर करुन अवगत करण्यात आलेला आहे.

उक्त कार्यालयीन अहवाल व सन्मा. सदस्यांनी केलेल्या चर्चेनुसार धुळे महानगरपालिकेचे ७ वर्षासाठी घनकचरा वाहतूक व संकलन करणे कामी स्वयंभू ट्रान्स्पोर्ट पुणे यांनी वाटाघाटी अंती सादर केलेल्या निविदा दरास बहुमताने मान्यता देण्यांत येत आहे. याकामी सन्मा.सदस्य श्री.शितल मोहन नवले यांचा विरोध नोंदविण्यांत येत आहे.

सदर कचरा संकलन व वाहतूक ठेका हा धुळे शहरासाठी अत्यंत महत्वपूर्ण आहे. सदर ठेकेदाराच्या प्रथम सहामाहीच्या कार्यपध्दतीचे व कामाचे मूल्यमापन करुन अटी शर्ती प्रमाणे समाधानकारक काम होते किंवा नाही याबाबत विभागाने खात्री तथा तपासणी करावी व त्याबाबत स्थायी समितीस अवगत करावे. तसेच संबंधित ठेकेदाराला कार्यादेश देण्यापूर्वी अटी व शर्तीचा करारनामा अवलोकनार्थ सादर करावा. तसेच अटी व शर्ती नुसारच ठेकेदाराकडून काम करुन घेण्यांची

जबाबदारी विभागाची राहील.सदर प्रस्ताव व कार्यवाहीबाबत लेखा आक्षेप निर्माण होणार नाही याची दक्षता घ्यावी.याबाबतची जबाबदारी संबंधित विभागाची राहील. **बहुमताने मंजुर,**

**सही/-x x x**

**सभापती,**

**स्थायी समिती,**

**धुळे महानगरपालिका,धुळे**

विषय क्रमांक:- ५० प्रभाग क्रं.१५मधील नवीन बांधण्यांत आलेले सुलभ शौचालय साफसफाई व देखभाल दुरुस्तीसाठी देणे बाबत आलेल्या कार्यालयीन अहवालावर विचार करणे.

म. नगरसचिव नगरसचिव यांनी विषयांचे वाचन केले.

म.शितल नवले विषय मंजूर करण्यांत यावा.

म.सभापती सर्व सन्मा.सदस्यांच्या सहमतीने व कार्यालयीन अहवालास अधिन राहून सदर प्रस्तावास मान्यता देण्यांत येत आहे.

**धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर ५७ दिनांक २१/०५/२०२१**

प्रभाग क्र.१५ मध्ये धुळे महानगरपालिके मार्फत १) शाळा क्र.१४ जवळ १० सिट पुरुष व २) राजीव गांधी नगर १० सिट पुरुष चे नविन सुलभ शौचालय बांधण्यात आले आहे. तरी सदरचा भाग हा दाट वस्तीचा असल्याने नागरीकांसाठी शौचालय सुरु करणे गरजेचे आहे. उक्त शौचालय साफसफाई व देखभाल दुरुस्तीकरीता अल्पसंख्यांक मेहतर दुर्बल घटक स्वयं.सेवा सह.संस्था यांना देणे बाबत भागातील सन्मा.नगरसेवीका यांनी शिफारस केलेली आहे.

त्यानुसार सबंधीत स्व.निरीक्षक यांनी समक्ष् पाहणी करुन दिलेल्या अहवालानुसार प्रभाग क्र. १५ मध्ये १) शाळा क्र.१४ जवळ १० सिट पुरुष व २) राजीव गांधी नगर १० सिट पुरुषचे नविन सुलभ शौचालय बांधण्यात आले शौचालयाचे काम पुर्ण झाले असुन शौचालयात बोरींग, आऊटलेट, संपुर्ण नविन बांधकाम, नळ, लाईटची व्यवस्था करण्यात आलेली आहे. व सदरचे शौचालय नागरीकांसाठी खुले करण्यास हरकत नाही असा अहवाल सादर करण्यात आलेला आहे.

तरी भागातील सन्मा. नगरसेवीका यांच्या शिफारशीनुसार व संबंधीत स्वच्छता निरीक्षक यांनी दिलेल्या अहवालानुसार उक्त शौचालय साफसफाई देखभाल दुरुस्तीसाठी देणे बाबत मे.स्थायी समितीपुढे सादर करण्यास मा. आयुक्त सो. यांनी मान्यता दिली आहे त्यानुसार सदरचा विषय मे. स्थायी समितीपुढे मंजुरीसाठी सादर झालेला आहे.

सर्व सन्मा. सदस्यांच्या सहमतीने व कार्यालयीन अहवालास अधिन राहून सदर कामी अल्पसंख्यांक मेहतर दुर्बल घटक स्वयं. सेवा सह.संस्था यांना सदर शौचालय साफसफाई देखभाल दुरुस्तीसाठी देण्यांस मान्यता देण्यांत येत आहे.सदर प्रस्ताव व कार्यवाहीबाबत लेखा आक्षेप निर्माण होणार नाही याची दक्षता घ्यावी. याबाबतची जबाबदारी संबंधित विभागाची राहील.

**सर्वानुमते मंजुर,**

सही/-x x x

**सभापती,**

**स्थायी समिती,**

**धुळे महानगरपालिका,धुळे**

विषय क्रमांक:- ५१ धुळे महानगरपालिका साफसफाई (आरोग्य) विभागाकडील वाहन क्र. एम.एच.१८ जी.००७१ (झुलागाडी) मॉडेल LPT १६१३ वाहनांची दुरुस्ती ₹.१,५३,३७३/- मात्रच्या खर्चास प्रशासकीय व आर्थिक मंजुरी देणे तसेच सदर काम तांतडीचे असल्याने विना निविदा मे. उज्वल ॲटोमोटीव्ह प्रा. लि. टाटा अधिकृत वितरण यांचेकडून करुन घेणेबाबत आलेल्या कार्यालयीन अहवालावर विचार करणे.

म. नगरसचिव नगरसचिव यांनी विषयांचे वाचन केले.

म. अमीन पटेल विषय मंजुर करण्यांत यावा. सदरचे बील संबंधित कचरा ठेकेदार यांचे बिलातून कापून घेण्यांत यावे.

म.सभापती सर्व सन्मा. सदस्यांच्या सहमतीने व कार्यालयीन अहवालास अधिन राहून सदर प्रस्तावास कार्योत्तर मान्यता देण्यांत येत आहे.

**धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर ५८ दिनांक २१/०५/२०२१**

धुळे महागनगरपालिका साफसफाई (आरोग्य) विभागाकडील अत्यावश्यक सेवेतील वाहन क्र. एम.एच.१८ जी.००७१ हे वरील विषयानुसार कचरा संकलन कामी वॉटग्रेस प्रोडक्टस प्रा.लि. कन्नमवार ब्रिज जवळ, नाशिक या कंपनीस कचरा संकलन कामी दिनांक:०७/०३/२०१९ करारनामा आर्टिकल ३) ३.१ (९) मधील तरतुदी नुसार चारचाकी अॅटो टिप्पर (घंटागाडी) एकुण ७९ व टाटा ४०७ टेम्पो हायड्रोलिक जॅक एकुण-०९ वाहने व एलपीटी १६१३ झुलागाडी-०१ असे एकुण ८९ वाहने कचरा संकलन कामी देण्यात आले होते. अटी-शर्ती नुसार वाहनांची दुरूस्ती, मशिनचे साहित्य इ. सर्बधिताने करावयाचे आहे. परंतु मे.वॉटग्रेस प्रोडक्टस या कंपनीने ठेका चालविण्यास असमर्थ असलेबाबत पत्र दिलेले असल्यामुळे व म.आरोग्याधिकारी यांनी वाहनांची तपासणी करून वाहन दुरूस्ती बाबत इस्टिमेट इकडील कार्यालयास कळवावे असे कळविले होते.

तसेच जा.क्र./धुमपा/आरोग्य/१९/२१-२२ दिनांक:२३/४/२०२१ अन्वये वॉटरग्रेस प्राडक्टस, शाखा धुळे यांना मुख्य स्वच्छता निरीक्षक यांनी वेळोवेळी पत्रव्यवहार व तोंडी सुचना केलेली आहे. परंतु अद्यपपावेतो सदर झुलागाडी संस्थेने दुरूस्त केलेली नाही. तरी सद्यस्थितीत रमजान महिना सुरू असुन शहरत ठिकठिकाणी ठेवण्यात आलेल्या कचरा कुंडया उचलणे गरजेचे आहे. तरी सदर झुलागाडी मनपा मार्फत दुरूस्ती करण्यात देउन येणारा खर्च ₹.१,५३,३७३/- मात्र वॉटरग्रेस प्राडक्टस यांच्या मासिक बिलातुन कपात करण्यात येईल असे कळविले आहे.

तसेच जा.क्र./धुमपा/आरोग्य/२० /२१-२२ दिनांक:२३/४/२०२१ अन्वये मुख्य स्वच्छता निरीक्षक यांनी वाहन विभागाकडेस पत्र सादर करून वाहन क्र. एम.एच.१८ जी.००७१ झुलागाडीची दूरूस्ती त्वरीत आपल्या विभागामार्फत करण्यात यावी व खर्चाचा प्रस्ताव इकडील कार्यालयास सादर करावा असे कळविले आहे. त्यानसार टाटा अधिकृत वितरक यांचेडील उज्वल अॅटोमोटिव्ह प्रा.लि. धुळे इस्टिमेट येणेप्रमाणे

| | |
|---|---|
| **एकुण स्पेअर पार्ट रक्कम** | 123552 |
| **कर** | 29820.86 |
| **एकुण स्पेअर पार्ट व मजुरी करासहित रक्कम** | 153372.86 |
| **Adj.** | 0.14 |
| **एकुण स्पेअर पार्ट मजुरी व करासहित रक्क** | 153373 |

सन २०२१-२२ या चालु आर्थीक वर्षात खर्च निरक आहे व या बिजकातील खर्च ₹.१,५३,३७३/- असा एकुण चालु आर्थीक वर्षातील खर्च ₹.१,५३,३७३/- मात्र होत आहे.

त्याप्रमाणे वाहन (साफसफाई) आरोग्य सेवेसाठी कुंडी कचरा ऊचलणे अत्यावश्यक सेवेसाठी वापर होत असल्याने व मनपात पर्यायी व्यवस्था नसल्यामुळे दुरूस्ती कामे तातडीने करणे आवश्यक आहे. दुरूस्ती कामाचे दर बाजार भावाप्रमाणे योग्य आहेत असे मेकॅनिक यांनी तपासून सादर केले आहे. दुरूस्ती करण्यात येणारी संस्था ही जी.एस.टी.नोंदणीकृत आहे

आर्थीक वर्ष २०२०-२१ या वर्षात साफसफाई (आरोग्य) विभाग वाहन दुरूस्ती अंदाजपत्रकीय तरतुद येणेप्रमाणे १)₹.५०,०००००/-२) पुर्वीचा खर्च ₹.१,७३,६३८/-३) हया बिलातील खर्च-₹.१,५३,३७२/-४)२ व ३ ची बेरीज ₹.३,२७०१०/- उपलब्ध शिल्लक ₹.४६,७२,९९०/- येणे प्रमाणे आहे.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुद नुसार सदर खर्च रक्कम ₹.१,५३,३७२/- मात्रला मा.आयुक्त सो. यांना मंजुरीचे अधिकार आहेत. त्यानुसार म.आयुक्त सो.यांनी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम नुसार दुरूस्ती खर्च रक्कम ₹.१,५३,३७२/-मात्रस प्रशासकीय व आर्थिक तसेच प्रत्येक वाहनास आर्थिक वर्ष मर्यादा ओंलाडत असल्याने व विना निविदा मे. उज्वल अॅटोमोटिव्ह प्रा.लि.टाटा अधिकृत वितरक यांचेकडून तातडीने दूरूस्ती करावयाची असल्याने मे.स्थायी समिती कडेस मान्यतेसाठी ठेवणेस मंजुरी दिल्यानुसार मे.स्थायी समितीकडेस मंजुरीस्तव सादर झालेला आहे.

सर्वसन्मा.सदस्यांच्या सहमतीने व कार्यालयीन अहवालास अधिन राहून धुळे महानगरपालिका साफसफाई (आरोग्य) विभागाकडील वाहन क्र. एम.एच.१८जी.००७१ (झुलागाडी) मॉडेल LPT १६१३

वाहनांची दुरुस्ती ₹.१,५३,३७३/- मात्र खर्च व सदर काम तांतडीचे असल्याने विना निविदा मे. उज्वल ॲटोमोटीव्ह प्रा. लि. टाटा अधिकृत वितरण यांचेकडून करुन घेण्यांस कार्योत्तर मान्यता देण्यांत येत आहे. तसेच सदर चे दुरुस्तीचा खर्च संबंधित वॉटरग्रेस संस्थेकडून वसुल करण्यांत यावा.

**सर्वानुमते मंजुर,**
सही/-x x x
**सभापती,**
**स्थायी समिती,**
**धुळे महानगरपालिका,धुळे**

विषय क्रमांक:- ५२ — धुळे मनपाच्या नवीन प्रशासकीय इमारतीच्या बाजूला व्यापारी संकुल बांधणे कामाची निविदा व कार्यादेश रद्द करणेबाबत आलेल्या कार्यालयीन अहवालावर विचार करणे.

म. नगरसचिव — नगरसचिव यांनी विषयांचे वाचन केले.

म. शितल नवले — विषय मंजूर करण्यांत यावा.

म. सभापती — सर्व सन्मा.सदस्यांच्या सहमतीने व कार्यालयीन अहवालास अधिन राहून सदर प्रस्तावास मान्यता देण्यांत येत आहे.

**धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर ५९ दिनांक २१/०५/२०२१**

धुळे मनपा मार्फत नवीन प्रशासकीय इमारतीच्या बाजूस व्यापारी संकुल बांधणे कामास रु.२,८४,५०,४३४/- मात्रला मे. स्थायी समिती ठराव नं. १९ दि.२८/०२/२०१८ अन्वये मंजुरी दिलेली आहे. त्यानुसार सदर कामी ई- निविदा प्रसिध्दी करणेत आलेली होती.

ई- निविदा सर्वात कमी दराची आलेली निविदा दर धारक मे. वर्षा कन्सट्रक्शन कंपनी , धुळे यांना जा.क्र. / बां. वि. / ३४ दि. २८/०८/२०१९ अन्वये कार्यादेश देण्यात आलेले होते. सदर कामाची मुदत १२ महिने होती. तथापि सदरचे ठिकाणी मनपाची शाळा तसेच प्रथम मजल्यावर खाजगी संस्थेस दिलेली जागा रिक्त न झाल्यामुळे सदर कामाचा कार्यादेश देवून ६ महिन्याच्या वर कालावधी झाल्याने सदरची निविदा ठेकेदाराने दिलेल्या पत्रानुसार रद्द करणे बाबत कळविले आहे.

तरी सदरची निविदा मे.स्थायी समितीने मंजुरी दिलेली असल्याने ती रद्द करणेस व ठेकेदाराने भरलेली निविदा अनामत परत करणेस मे.स्थायी समितीपुढे मंजुरीस्तव सादर झालेला आहे.

सर्व सन्मा. सदस्यांच्या सहमतीने व कार्यालयीन अहवालास अधिन राहून सदरची ठिकाणी व्यापारी संकुल उभारणेसाठी काढण्यांत आलेली निविदा रद्द करण्यांस मान्यता देण्यांत येत असून ठेकेदाराने भरलेली निविदा अनामत रक्कम परत करण्यांत यावी. **सर्वानुमते मंजुर,**

सही/-x x x
**सभापती,**
**स्थायी समिती,**
**धुळे महानगरपालिका,धुळे**

विषय क्रमांक:- ५३ — धुळे मनपा कडील आरोग्य विभाग मार्फत राबविणेत येत असलेले विविध उपक्रमाकरिता करणेत आलेल्या खर्च रु.९२६२५/- मात्र कार्योत्तर मंजुरी देणेबाबत आलेल्या कार्यालयीन अहवालावर विचार करणे.

म. नगरसचिव — नगरसचिव यांनी विषयांचे वाचन केले.

म. अमोल मासुळे — विषय मंजूर करण्यांत यावा.

म. सभापती — सर्व सन्मा. सदस्यांच्या सहमतीने व कार्यालयीन अहवालास अधिन राहून सदर प्रस्तावास कार्योत्तर मान्यता देण्यांत येत आहे.

**धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर ६० दिनांक २१/०५/२०२१**

आरोग्य विभाग मार्फत शहरातील कोविड-19 या रुग्णाची तपासणी करणे करीता शहरातील मुख्य चौकामध्ये मंडप व्यवस्था करणे करीता आरोग्यधिकारी सो यांनी म. जिल्हा आधिकारी यांचे सुचने नुसार भांडार विभाग कडेस मागणी सादर केलेली होती. त्यानुसार काम हे तातडीचे असल्याने म.

उपायुक्त सो यांचे सुचने नुसार सदरचे काम श्री. स्वमी समर्थ डेकोरेटर्स ॲण्ड केटरर्स यांचेकडुन करुन घेण्यांत आलेले आहे. याकामी एकुण खर्च रुये ९२६२५/- मात्र सादर करण्यांत आलेला आहे.

सदरचे काम तातडीचे असल्याने **श्री.स्वामी समर्थ डेकोरेटर्स ॲण्ड केटर्स,धुळे** यांचे कडुन काम करून घेण्यात आले असुन कार्योत्तर मंजुरी करीता खर्च रुपये ९२,६२५/-मात्र कार्योत्तर मंजुरीस म.स्थायी समिती पुढे सादर करण्यास मा. आयुक्तांनी मंजुरी दिलेली आहे.

उक्त कार्यालयीन अहवाल व सन्मा.सदस्यांच्या सहमतीने सदर खर्च रु. ९२,६२५/- मात्रला कार्योत्तर मान्यता देण्यांत येत आहे. सदर प्रस्ताव व कार्यवाहीबाबत लेखा आक्षेप निर्माण होणार नाही याची दक्षता घ्यावी. याबाबतची जबाबदारी संबंधित विभागाची राहील. **सर्वानुमते मंजुर,**

सही/-x x x

**सभापती,**

**स्थायी समिती,**

**धुळे महानगरपालिका,धुळे**

विषय क्रमांक:- ५४ — धुळे मनपा अधिकारी व कर्मचारी यांना सफाई मित्र सुरक्षा चॅलेज अंतर्गत ट्रेनींग कार्यक्म राबविणे तसेच GPS सिस्टीम राबविणे करिता TV खरेदीस खर्च रु. १,४३,९४९/- मात्र कार्योत्तर मान्यता देणेबाबत आलेल्या कार्यालयीन अहवालावर विचार करणे.

म. नगरसचिव — नगरसचिव यांनी विषयांचे वाचन केले.

म. अमोल मासुळे — विषय मंजूर करण्यांत यावा.

म. सभापती — सर्व सन्मा. सदस्यांच्या सहमतीने व कार्यालयीन अहवालास अधिन राहून सदर प्रस्तावास कार्योत्तर मान्यता देण्यांत येत आहे.

**धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर ६१ दिनांक २१/०५/२०२१**

धुळे महानगरपालिका कडील अधिकारी व कर्मचारी यांना सफाई मित्र सुरक्षा चॅलेज अंतर्गत ट्रेनिंग कार्यक्रम राबविणे तसेच GPS सिस्टम राबविणे करीता TV खरेदी करुन मिळणेस म.सहा.आरोग्यअधिकारी सो याच्या मार्फत भांडार विभाग कडसे मागणी रिपोर्ट प्राप्त झालेला आहे. त्यानुसार म.आयुक्त सो यांचे सुचने नुसार सदर ट्रेनिंग हे स्वच्छ भारत अभियान अंतर्गत क्षमता बांधणी अन्वये सफाई मित्र ट्रेनिंग राबविणे तातडीचे असल्याने श्री. स्वमी समर्थ मंडप डेकोरेटर्स यांचेकडुन काम करुन घेण्यांत आलेले आहे. त्याचा एकुण खर्च रुपये १,०८,९५०/- सर्व करासहित सादर झालेला आहे. तसेच मे. बालाजी मोबाईस धुळे यांचेकडुन टी.व्ही. खरेदी करण्यांत आलेली असून त्याचा एकुण खर्च रु. ३४,९९९/- मात्र सर्व करासहित सादर झालेला आहे.

सदरचा खर्च स्वच्छ भारत अभियान अंतर्गत Capacity Building अंतर्गत खर्च करणेत येणार आहे सदरचे प्रकरणास म.आयुक्त सो यांनी झालेले खर्च रुपये १,४३,९४९/- मात्र कार्योत्तर मंजुरीस म.स्थायी समिती पुढे सादर करण्यास मंजुरी दिलेली आहे.

उक्त कार्यालयीन अहवालास अधिन राहून सर्व सन्मा. सदस्यांच्या सहमतीने याकामी झालेला एकुण खर्च रुपये १,४३,९४९/- मात्रला कार्योत्तर मान्यता देण्यांत येत आहे. सदर प्रस्ताव व कार्यवाहीबाबत लेखा आक्षेप निर्माण होणार नाही याची दक्षता घ्यावी. याबाबतची जबाबदारी संबंधित विभागाची राहील.

**सर्वानुमते मंजुर,**

सही/-x x x

**सभापती,**

**स्थायी समिती,**

**धुळे महानगरपालिका,धुळे**

| | |
|---|---|
| विषय क्रमांक:- ५५ | धुळे म.न.पा.मालकीचे डेडरगांव (तिखी) तलावातील मासेमारीचा मक्ता दि.१-६-२१ ते ३१-५-२०२६ या ५ वर्षाच्या कालावधी करिता देणे बाबत आलेल्या कार्यालयीन अहवालावर विचार करणे. |
| म. नगरसचिव | नगरसचिव यांनी विषयांचे वाचन केले. |
| म. शितल नवले | विषय मंजूर करण्यांत यावा. |
| म. सभापती | सर्व सन्मा. सदस्यांच्या सहमतीने व कार्यालयीन अहवालास अधिन राहून सदर प्रस्तावास मान्यता देण्यांत येत आहे. |

**धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर ६२ दिनांक २१/०५/२०२१**

धुळे मनपा मालकीच्या डेडरगांव (तिखी) तलावातील मासेमारीचा मक्ता दि.१ जुन २०१६ ते ३१ मे २०२१ या कालावधी करिता वार्षिक भाडे १,२८,०५०/- मात्रला दिलेला आहे त्याची मुदत दि.३१ मे २०२१ रोजी संपत आहे.

पुढील कालावधी दि.१-६-२१ ते ३१-५-२०२६ या कालावधी करीता (५वर्षासाठी) मागील किंमतीमध्ये नैसर्गिक १० % वाढ करून रू.१,४०,८५५/- मात्र येते अधिक १८%GST वेगळा असेल. सदर रक्कम ही शासनाने मत्स्य व्यवसायाकरिता जलाशय/तलाव ठेक्याने देणेकरीता सुधारित धोरणापेक्षा कमी नाही.

सदर निश्चित केलेली सरकारी रू. १,४०,८५५/- मात्र किंमतीत म.आयुक्त सो.यांनी मंजुरी दिलेली असुन त्यामध्ये दरवर्षी नैसर्गिक वाढ १०%प्रस्तावित असुन त्या रकमेवर (१८%GST वेगळा) या अटीवर सदरची सरकारी किंमत निश्चित होऊन जाहिर लिलाव काढणेस व अटी शर्ती नुसार योग्य त्या स्टॅम्प पेपरवर करारनामा करून घेणे तसेच १ वर्षाची रक्कम ॲडवान्स घेऊन पुढील ४वर्षाची बॅक ग्यारंटी घेण्यांत यावी या प्रस्तावास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७९ (ब) (क) नुसार मान्यता मिळणे कामी सदरचा निर्णय मे.स्थायीपुढे मान्यतेस्तव सादर झालेला आहे.

उक्त कार्यालयीन अहवालास अधिन राहून सन्मा.सदस्यांच्या सहमतीने दिनांक दि. १-६-२१ ते ३१-५-२०२६ या कालावधी करीता (५ वर्षासाठी) रू.१,४०,८५५/- मात्रला (18 % जी.एस.टी वेगळा)सरकारी किंमतीत मासेमारी मक्ता देण्यांस मान्यता देण्यांत येत आहे. तसेच कार्यालयीन अहवालानुसार आवश्यक व कायदेशीर पूर्तता प्रशासनाने करावी. **सर्वानुमते मंजुर,**

सही/-x x x
**सभापती,**
**स्थायी समिती,**
**धुळे महानगरपालिका,धुळे**

| | |
|---|---|
| विषय क्रमांक:- ५६ | छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंती निमित्ताने पुतळा परिसराचे सुशोभिकरण करण्यांत आलेले असून त्याकामी झालेला खर्च रु.३,२५,०००/- मात्रला कार्योत्तर मान्यता देणेबाबत आलेल्या कार्यालयीन अहवालावर विचार करणे. |
| म. नगरसचिव | नगरसचिव यांनी विषयांचे वाचन केले. |
| म. कमलेश देवरे | विषय मंजूर करण्यांत यावा. |
| म. सभापती | सर्व सन्मा.सदस्यांच्या सहमतीने व कार्यालयीन अहवालास अधिन राहून सदर प्रस्तावास कार्योत्तर मान्यता देण्यांत येत आहे. |

**धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर ६३ दिनांक २१/०५/२०२१**

धुळे मनपा हद्दीतील मिरच्या मारोती मराठा पंच मंडळ संचलित, सकल मराठा शिवजयंती उत्सव समितीतर्फे छत्रपती शिवाजी महाराज यांची जयंती सालाबादाप्रमाणे दि.१९/०२/२०२१ मोठ्या उत्साहात साजरी करण्यात येत असते. तसेच मिरवणुकीच्या प्रारंभ चाळीसगाव रोडवरील छत्रपती

शिवाजी महाराज यांच्या स्मारका पासून होणार आहे. त्यासाठी चाळीसगाव रोड परिसरातील छत्रपती शिवरायांच्या पुतळ्याचे व परिसराचे महापालिके तर्फे सुशोभिकरण करण्यात यावे असे संदर्भीय पत्रान्वये कळविले आहे. तरी छत्रपती शिवाजी महाराज जयंती निमित्त पुतळा व परिसर सुशोभित करणे आवश्यक असल्याने सदर भागात समक्ष पहाणी करून अंदाजपत्रक तयार केले असता उक्त कामी अंदाजपत्रकीय खर्च रु.३,२५,०००/- मात्र येणार आहे.

तरी उक्त काम हे विना निविदा मे. हिंद कन्सट्रक्शन, ठेकेदार, धुळे यांचे कडून करून घेण्यात आलेले असून सदरचे काम मुंबई प्रांतिक अधिनियम नियम ६७ (क) अन्वये विना निविदा करण्यास मंजुरीसाठी व अंदाजपत्रकीय खर्च रु.३,२५,०००/- मात्र खर्चास कार्योत्तर मंजुरीस्तव मे. स्थायी समितीपुढे ठेवणेस मंजुरीस्तव सादर झालेला आहे.

उक्त कार्यालयीन अहवालास अधिन राहून सर्व सन्मा. सदस्यांच्या सहमतीने याकामी झालेला खर्च रु. ३२५,०००/- मात्रला कार्योत्तर मान्यता देण्यांत येत आहे. सदर प्रस्ताव व कार्यवाहीबाबत लेखा आक्षेप निर्माण होणार नाही याची दक्षता घ्यावी. याबाबतची जबाबदारी संबंधित विभागाची राहील.

**सर्वानुमते मंजुर,**

सही/-x x x

**सभापती,**
**स्थायी समिती,**
**धुळे महानगरपालिका,धुळे**

# धुळे महानगरपालिका,धुळे

## नगरसचिव कार्यालय

## स्थायी समिती सभा क्रमांक १३ चे इतिवृत्त

---

**धुळे मनपा भारतरत्न अटलबिहारी वाजपेयी सभागृह**
**गुरुवार दिनांक १०/०६/२०२१**
**वेळ :- दुपारी ४-०० वाजता.**

धुळे महानगरपालिका स्थायी समितीचीऑन लाईन साप्ताहिक सभा आज गुरुवार दिनांक १०/०६/२०२१ रोजी दुपारी ४-०० वाजता **मा. श्री. संजय सुधाकर जाधव,सभापती,** स्थायी समिती, मनपा, धुळे यांच्या अध्यक्षतेखाली **धुळे मनपा भारतरत्न अटलबिहारी वाजपेयी सभागृह** भरली. ऑनलाईन सभेस खालील सन्मा.सदस्य सभागृहात हजर होते.

| अ.क्रं. | सदस्यांचे नांव | हुद्दा |
|---|---|---|
| १ | श्री. जाधव संजय सुधाकर | सभापती |
| २ | श्री. बैसाणे सुनिल तुळशिराम | सदस्य |
| ३ | श्रीमती माळी भारती अशोक | सदस्या |
| ४ | श्रीमती पाटील मंगला सुरेश | सदस्या |
| ५ | श्रीमती बोरसे पुष्पा प्रकाश | सदस्या |
| ६ | श्री. मासुळे अमोल पावबा | सदस्य |
| ७ | श्री. देवरे कमलेश नारायण | सदस्य |
| ८ | श्रीमती पठाण हिना अस्लम | सदस्या |
| ९ | श्री. नवले शितल मोहन | सदस्य |
| १० | श्री. बोरसे नागसेन दामोदर | सदस्य |
| ११ | श्रीमती कुलेवार किरण राकेश | सदस्या |
| १२ | श्रीमती बराडे वैशाली भिकन | सदस्या |
| १३ | श्री. जाधव बन्सीलाल माणिक | सदस्य |
| १४ | श्रीमती चौधरी मंगला अर्जुन | सदस्या |
| १५ | श्री. पटेल अमीन अब्दुल करीम | सदस्य |

### उपस्थित अधिकारी गण

| अ.क्र. | अधिकाऱ्यांचे नाव | हुद्दा |
|---|---|---|
| १ | श्रीमती शिल्पा नाईक | उपायुक्त |
| २ | श्री. शांताराम गोसावी | उपायुक्त |
| ३ | श्री. तुषार नेरकर | सहा. आयुक्त |
| ४ | श्री. विनायक कोते | सहा. आयुक्त |
| ५ | श्रीमती पल्लवी शिरसाठ | सहा. आयुक्त |
| ६ | श्री. दिनकर जाधव | मुख्य लेखाधिकारी |

| | | |
|---|---|---|
| ७ | श्री. महेंद्र परदेशी | नगररचनाकार |
| ८ | श्री मनोज अरविंद वाघ | प्र.नगरसचिव |
| ९ | डॉ. महेश मोरे | आरोग्याधिकारी |
| १० | श्री. चंद्रकांत जाधव | सहा.आरोग्याधिकारी |
| ११ | श्री. लक्ष्मण पाटील | सहा.आरोग्याधिकारी |
| १२ | श्री.एन.पी. सोनार | ईस्टेट मॅनेजर |
| १३ | श्री. रमजान अन्सारी | कार्यालय अधिक्षक |
| १४ | श्री.राजकुमार सुर्यवंशी | प्र.परवाना अधिक्षक |
| १५ | श्री. एन.के. बागुल | विद्युत अभियंता |
| १६ | श्री. सी.सी. बागुल | पा. पु. ओव्हरसिअर |
| १७ | श्री. सी.एम. उगले | पा. पु. ओव्हरसिअर |
| १८ | श्री. हेमंत पावटे | ओव्हरसिअर बांधकाम |
| १९ | श्री. राजू माईनकर | भांडारपाल |
| २० | श्री. किशोर सुडके | बाजार विभाग |
| २१ | श्री. प्रसाद जाधव | अति. विभाग प्रमुख |
| २२ | श्री. महेंद्र सोनवणे | प्रशासन अधिकारी मनपा शि.मं. |
| २३ | श्री. सुक्राम आत्या राऊत | वाहन विभाग लिपीक |
| २४ | श्री. प्रकाश सोनवणे | ओव्हरसिअर न.र. |
| २५ | श्री. कमलेश सोनवणे | ओव्हरसिअर न.र. |
| २६ | श्री.दिपक खोंडे | प्रकल्प विभाग |

म.सभापती सर्व उपस्थित सन्मा.सदस्य अति.आयुक्त सो.अधिकारी वर्ग छायाचित्रकार बांधव सभेचे कामकाज चालविणेसाठी आवश्यक तो कोरम पूर्ण झाल्याने नगरसचिव यांनी सभेचे कामकाज सुरुवात करावी.

म. नगरसचिव वंदे् मातरम् या राष्ट्रवंदनेसाठी सर्वांनी उभे रहावे.

**सभेच्या सुरुवाती सन्मा. सदस्यांकडून आलेले रजेचे अर्ज**

सन्मा. सदस्य श्री. सईद बेग हाशम बेग यांनी महत्वाचे काम असल्याने आजच्या सभेस उपस्थित राहून शकत नसल्याने रजा मंजूर करणे बाबत विनंती अर्ज सादर केलेला आहे.

म. सभापती सन्मा.सदस्यांच्या विनंती अर्जानुसार आजच्या सभेस त्यांची रजा मंजूर करण्यांत येत आहे.

**धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर ६४ दिनांक १०/०६/२०२१**

सन्मा. सदस्य सन्मा. सदस्य श्री. सईद बेग हाशम बेग यांनी महत्वाचे काम असल्याने आजच्या सभेस उपस्थित राहून शकत नसल्याने रजा मंजूर करणे बाबत विनंती अर्ज सादर केलेला आहे.

सन्मा. सदस्यांच्या विनंती अर्जानुसार आजच्या सभेस त्यांची रजा मंजूर करण्यांत येत आहे.

**सर्वानुमते मंजुर,**
**सही/-X X X**
**सभापती,**
**स्थायी समिती,**
**धुळे महानगरपालिका,धुळे**

विषय क्रमांक :- ५७ मागील स्थायी समिती सभांचे इतिवृत्त वाचून कायम करणे. (६/५/२०२१)

म. नगरसचिव नगरसचिव यांनी विषयांचे वाचन केले.

म.अमोल मासुळे इतिवृत्त वाचून कायम करण्यांत यावे.

म. सभापती सर्व सन्मा.सदस्यांच्या सहमतीने मागील स्थायी समिती सभेचे इतिवृत्त क्रमश वाचून कायम करण्यांत येत आहे.

**धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर ६५ दिनांक १०/०६/२०२१**

मागील स्थायी समिती सभा दिनांक ०६/०५/२०२१ ठराव नंबर ४५ ते ५३ अखेर तसेच सभा सन्मा. सदस्यांनी उपस्थित केले चर्चा व त्यावरील निर्णय क्रमश वाचून कायम करण्यांत येत आहे.

**सही/-X X X**
**सभापती,**
**स्थायी समिती,**
**धुळे महानगरपालिका,धुळे**

विषय क्रमांक:- ५८ — धुळे महानगरपालिकेच्या मानधनावरील वाहन चालकांना मुदतवाढ देणेबाबत आलेल्या कार्यालयीन अहवालावर विचार करणे.

म. नगरसचिव — नगरसचिव यांनी विषयांचे वाचन केले.

म.शितल नवले — विषय मंजूर करण्यांत यावा.

म. नागसेन बोरसे — विषय मंजूर करण्यांत यावा.

म. सभापती — सर्व सन्मा.सदस्यांच्या सहमतीने व कार्यालयीन अहवालास अधिन राहून सदर प्रस्तावास मान्यता देण्यांत येत आहे.

**धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर ६६ दिनांक १०/०६/२०२१**

धुळे महानगरपालिकेच्या मानधनावरील वाहन चालकांना मुदतवाढ देणेबाबत एकुण १५एकत्रित करार पध्दतीने मानधनावरील वाहन चालकांची नियुक्ती करण्यात आलेली होती सदर वाहन चालकांपैकी एक वाहन चालक हजर झालेला नसून एका वाहन चालकाने राजीनामा दिलेला असून राहिलेले खालील प्रमाणे १३ वाहन चालकांचे दि.१२/५/२०२१ रोजी मुदत संपत असल्याने त्यांनी मुदतवाढ बाबत अर्ज सादर केलेले आहेत

| अ क्र | कर्मचा-याचे नाव | पद | नियुक्ती आदेश क्रमांक व दिनांक |
|---|---|---|---|
| १ | प्रशांत नामदेव मुर्तडक | वाहन चालक | जा क्र /धुमपा/आस्था/ ३१०९ दि १२/११/२०२० |
| २ | प्रशांत राजेंद्र बाबर | वाहन चालक | |
| ३ | शाम भटू खंदरकर | वाहन चालक | |
| ४ | गोपाल सिताराम माळी | वाहन चालक | |
| ५ | सिध्दार्थ महेश राव खैरनार | वाहन चालक | |
| ६ | आबासाहेब रमेश नेरकर | वाहन चालक | |
| ७ | प्रदीप श्रीकिशन कांबळे | वाहन चालक | |
| ८ | निलेश रामभाऊ सोनवणे | वाहन चालक | जा क्र / धुमपा /आस्था/ ३०१४ दि २/११/२०२० |
| ९ | विजय दिलीप माळी | वाहन चालक | |
| १० | राहुल जिजाबराव पाटील | वाहन चालक | |
| ११ | विनोद प्रल्हाद पाटील | वाहन चालक | |
| १२ | चित्ते ईश्वर राजेश | वाहन चालक | |
| १३ | अविनाश दाजी कुवर | वाहन चालक | |

वाहन विभाग प्रमुख यांनी सादर केलेल्या अभिप्रायानुसार वाहन चालकांची आवश्यकता व निकड पाहता वरील प्रमाणे १ ते १३ वाहन चालकांना बाहय स्त्रोत प्रणालीने मनुष्यबळ मिळेपर्यंत मुदत संपल्याच्या दिनांकापासून ५ दिवसाचा खंड करुन एकत्रित करार पध्दतीने रुपये १२०००/-मात्र

मानधन प्रमाणे पुढील ६ महिनेकरीता मुदतवाढ देणेबाबत महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ५३(३) नुसार मे.स्थायी समितीच्या मंजुरी करीता प्रस्ताव सादर करणेस मान्यतेस्तव सादर केला आहे.

यावर म. सहा.आयुक्त यांनी बाहय यंत्रणेमार्फत भरती प्रक्रिया राबविणे कामी कालमर्यादा निश्चीत करणे आवश्यक आहे. त्यामुळे सदर भरती प्रक्रिया सुरळीत होईल. याबाबींचे अवलोकन होवून प्रस्तावित बाब उचित आदेशास्तव सविनय सादर असे अभिप्राय नोंदविले आहे.

यावर म.उपायुक्त यांनी अत्यावश्यक बाब असल्याने व बाह्य यंत्रणेद्वारे निविदा प्रक्रियेचे कामकाज सुरु असल्याने तुर्तास काही कालावधीसाठी मुदतवाढ देणेची शिफारस आहे.असे अभिप्राय नोंदविले आहे.तरी सदर प्रस्ताव मे.स्थायी समितीपुढे निर्णयास्तव सविनय सादर झाला आहे.

सर्व सन्मा.सदस्यांच्या सहमतीने व कार्यालयीन अहवालास अधिन राहून अ.नं.१ ते १३ वाहन चालकाना बाहय स्त्रोत प्रणालीने मनुष्यबळ मिळेपर्यंत संपल्याच्या दिनांकापासून ५ दिवसाचा खंड करुन एकत्रित करार पध्दतीने रुपये १२०००/-मात्र मानधन प्रमाणे पुढील ६ महिनेकरीता मुदतवाढ देणेस मान्यता देण्यांत येत आहे.सदर प्रस्ताव व कार्यवाहीबाबत लेखा आक्षेप निर्माण होणार नाही याची दक्षता घ्यावी.B याबाबतची जबाबदारी संबंधित विभागाची राहील.

**सर्वानुमते मंजुर,**
**सही/-X X X**
**सभापती,**
**स्थायी समिती,**
**धुळे महानगरपालिका,धुळे**

विषय क्रमांक:-५९ पाणीपुरवठा विभागाकडील मानधनावरील व्हॉलमन कर्मचा-यांना मुदतवाढ देणेबाबत आलेल्या कार्यालयीन अहवालावर विचार करणे.

म. नगरसचिव नगरसचिव यांनी विषयांचे वाचन केले.

म.अमोल मासुळे विषय मंजूर करण्यांत यावा.

म. कमलेश देवरे विषय मंजूर करण्यांत यावा.

म. सभापती सर्व सन्मा.सदस्यांच्या सहमतीने व कार्यालयीन अहवालास अधिन राहून सदर प्रस्तावास मान्यता देण्यांत येत आहे.

**धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर ६७ दिनांक १०/०६/२०२१**

पाणीपुरवठा विभागाकडील व्हॉलमन (मानधनावरील) कर्मचा-यांना मुदतवाढ देणबाबत पाणीपुरवठा विभागाकडून अहवाल प्राप्त झाला आहे. पाणीपुरवठा विभागाकडील खालील एकत्रित करार पध्दतीने व्हॉलमन (मानधनावरील) कर्मचा-यांची नियुक्ती करण्यात आली होती. सदर मानधनावरील कर्मचा-यांचे दि १४/६/२०२१ रोजी मुदत संपुष्ठात येत आहे .

| अ क्र | उमेदवाराचे नाव | अ क्र | उमेदवाराचे नाव |
|---|---|---|---|
| १ | दिपक छगन बागुल | ८ | गणेश शंकर बिरारी |
| २ | सैयद इमरान अली जाफर अली | ९ | किरण राजेंद्र फुलपगारे |
| ३ | तुषारगिरीश चौधरी | १० | योगेश भानुदास वाखारकर |
| ४ | शिंदे दिनेश रामसिंग | ११ | श्री ज्ञानेश्वर तुकाराम सैंदाणे |
| ५ | चंद्रकांत मोतीलाल फुलपगारे | १२ | प्रणय राजेंद्र लहामगे |
| ६ | हेमराज भाईदास कोळी | १३ | रणदिवे राहुल अरुणराव |
| ७ | श्री प्रमोद विठठल सोनवणे | | |

पाणीपुरवठा विभाग प्रमुख यांनी सादर केलेल्या अहवालानुसार उपरोक्त व्हॉलमन (मानधनावरील) यांची कामाची निकड पाहता बाह्य यंत्रणेमार्फत मनुष्यबळ उपलब्ध

होईपावेतो ५ दिवसाचा सेवा खंड करुन एकत्रित करार पध्दतीने रु. ८०००/- मात्र प्रमाणे पुढील ६ महिने कालावधीकरीता मुदतवाढ देणेबाबत मान्यता मिळणेसाठी प्रस्ताव मे. स्थायी समिती समोर सादर झाला आहे.

सर्व सन्मा.सदस्यांच्या सहमतीने व कार्यालयीन अहवालास अधिन राहून व्हॉलमन (मानधनावरील) यांची कामाची निकड पाहता बाह्य यंत्रणेमार्फत मनुष्यबळ उपलब्ध होई पावेतो ५ दिवसाचा सेवा खंड करुन एकत्रित करार पध्दतीने रु.८०००/- मात्र प्रमाणे पुढील ६ महिने कालावधीकरीता मुदतवाढ देणेस मान्यता देण्यात येत आहे. सदर प्रस्ताव व कार्यवाहीबाबत लेखा आक्षेप निर्माण होणार नाही याची दक्षता घ्यावी.याबाबतची जबाबदारी संबंधित विभागाची राहील.

**सर्वानुमते मंजुर,**
**सही/-X X X**
**सभापती,**
**स्थायी समिती,**
**धुळे महानगरपालिका,धुळे**

विषय क्रमांक:- ६० पाणीपुरवठा विभागाकडील मानधनावरील रसायन तज्ञ कर्मचा-यांना मुदतवाढ देणेबाबत आलेल्या कार्यालयीन अहवालावर विचार करणे.

म. नगरसचिव नगरसचिव यांनी विषयांचे वाचन केले.

म.सुनिल बैसाणे हा महत्वाचा विषय आहे. वलवाडी ग्रामपंचायत येथे रसायन तज्ञ म्हणून हर्षदा गवळे हे काम करीत आहे. त्यांना आस्था स्वयंरोजगार संस्थेमार्फत मानधन अदा केले जात होते. मागील वेळीस माझ्या सभापती पदाच्या कालावधीत श्रीमती गवळे यांना देखील मानधनावरील कर्मचारी म्हणून मुदतवाढ देणेबाबत आदेशित केलेले होते. श्रीमती गवळे हया शैक्षणिक पात्रतेनुसार या पदाला पात्र आहे.आता आपण आस्था संस्थेची निविदा रद्द करुन नवीन निविदा प्रक्रिया करीत आहोत. त्यामुळे त्यांना मानधनाबाबत अडचण निर्माण होणार आहे. त्यांची शैक्षणिक पात्रता असतांना सुध्दा त्यांच्यावर अन्याय होवू शकतो. तसेच त्यांच्या कामाची देखील त्याठिकाणी आवश्यकता आहे.आज संपूर्ण वलवाडी भागात सदर जलशुध्दीकरण केंद्रावरुन संपूर्ण भागाला पाणीपुरवठा केला जातो. श्रीमती गवळे यांना इतर केमिस्ट कर्मचा-यांना मुदतवाढ देतांना त्यांचा सुध्दा समावेश करुन मुदतवाढ देणेबाबत व मानधन देणेबाबत आदेशित केलेले असतांना देखील त्यांवर कार्यवाही झालेली नव्हती. त्यामुळे आता त्यांना या प्रस्तावात समाविष्ट करुन त्यांना देखील त्यांची शैक्षणिक पात्रता तपासून न्याय द्यावा.

म. उपायुक्त आपण उपस्थित केलेल्या मुद्दयांची चौकशी करुन त्यानुसार नियमानुसार योग्य तो निर्णय घेण्यांत येईल.

म. शितल नवले विषय मंजूर करण्यांत यावा.

म. सभापती सर्व सन्मा.सदस्यांच्या सहमतीने व कार्यालयीन अहवालास अधिन राहून सदर प्रस्तावास मान्यता देण्यांत येत आहे.

**धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर ६८ दिनांक १०/०६/२०२१**

पाणीपुरवठा विभागाकडील खालील एकत्रित करार पध्दतीने रसायन तज्ञ (मानधनावरील) कर्मचा-यांच्या नियुक्ती करण्यात आली होती. त्यांच्या कामाची मुदत दि. ६/६/२०२१ रोजी संपुष्ठात येत आहे.

| अ क्र | उमेदवाराचे नाव | पदाचे नाव |
|---|---|---|
| १ | श्री गोसावी विशाल अशोक | रसायन तज्ञ |
| २ | श्रध्दा मधुकर पाटील | रसायन तज्ञ |

पाणीपुरवठा विभाग प्रमुख यांनी सादर केलेल्या अहवालानुसार उपरोक्त रसायन तज्ञ (मानधनावरील) यांची कामाची निकड पाहता बाहय यंत्रणेमार्फत मनुष्यबळ उपलब्ध होईपावेतो ५ दिवसाचा सेवा खंड करुन एकत्रित करार पध्दतीने रु.२००००/- मात्र प्रमाणे पुढील ६ महिने कालावधीकरीता मुदतवाढ देणेबाबत महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ५३ (३) नुसार मान्यता मिळणेसाठी सदरचा विषय मे. स्थायी समिती पुढे ठेवणेस सविनय सादर झालेला आहे.

सर्व सन्मा.सदस्यांच्या सहमतीने व कार्यालयीन अहवालास अधिन राहून प्रस्तावात नमूद रसायन तज्ञ यांना बाहय यंत्रणेमार्फत मनुष्यबळ उपलब्ध होईपावेतो ५ दिवसाचा सेवा खंड करुन एकत्रित करार पध्दतीने रु. २००००/- मात्र प्रमाणे पुढील ६ महिने कालावधीकरीता मुदतवाढ देणेबाबत महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ५३ (३) नुसार मान्यता देण्यांत येत आहे. तसेच श्रीमती हर्षदा गवळे यांचे बाबत विभागाने स्वतंत्र प्रस्ताव तयार करुन उचित करावी.

**सर्वानुमते मंजुर,**

**सही/-X X X**

**सभापती,**

**स्थायी समिती,**

**धुळे महानगरपालिका,धुळे**

विषय क्रमांक:- ६१ — मानधन पदावरील व्हॉलमन,पंप ऑपरेटर,गाळणी निरीक्षक इत्यादी कर्मचा-यांची मुदत संपल्या नंतर त्यांनी त्या काळात केलेल्या कामाचे मानधन मिळणे बाबत आलेल्या कार्यालयीन अहवालावर विचार करणे.

म. नगरसचिव — नगरसचिव यांनी विषयांचे वाचन केले.

म. शितल नवले — सदर कर्मचा-यांनी मुदत संपल्यानंतर काम केलेले होते. सदर कर्मचा-यांचा उक्त कालावधीचा पगार मिळणे बाबत वारंवार मागणी करीत असून आस्थापना विभागाकडेस तसेच म. उपायुक्त मॅडम यांचेकडेस तसेच आमचेकडेस पाठपुरावा करीत होते. उपायुक्त मॅडम यांनी तांतडीने सदर प्रस्ताव विषय पटलावर मान्यतेसाठी सादर केल्याबद्दल मॅडम यांचे आभार व्यक्त करतो. सदर विषय मंजूर करण्यांत यावा.

म. नगरसचिव — शितल भाऊ आपण महासभेत मागणी केल्यानुसार रोजंदारी कर्मचारी यांना कायम सेवेत सामावून घेण्यांचा विषय मांडला होता सदर प्रस्तावाबाबत उपायुक्त मॅडम यांनी अनुकुलता दर्शवून रोजंदारी कर्मचारी यांना कायम सेवेत सामावून घेणेबाबत कार्यवाही केलेली आहे.

म.सभापती — सर्व सन्मा. सदस्यांच्या सहमतीने व कार्यालयीन अहवालास अधिन राहून प्रस्तावास मान्यता देण्यांत येत आहे.

**धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर ६९ दिनांक १०/०६/२०२१**

मानधन पदावरील व्हॉलमन, पंप ऑपरेटर, गाळणी निरीक्षक श्री. रमेश वेडू बोरसे व इतर कर्मचारी यांनी ६ महीन्याची मुदत संपल्यानंतर केलेल्या कामाचा पगार मिळणे बाबत नमुद करून त्यानुसार सदर कर्मचारी यांनी मुदत संपल्याच्या दिनांक पासून ५ दिवस खंड देऊन उर्वरित काम केल्याचा दिवसांचा पगार मिळण्या बाबत विनंती केली आहे.

कार्यालयीन अहवालानुसार जा.क्र धुमपा / आस्था / ५२ / दि- १९/४/२०२१ अन्वये अभियंता पाणी पुरवठा विभाग यांच्या कडुन मानधनावर विजतंत्री, पंप ऑपरेटर, गाळणी चालक, गाळणी निरीक्षक या कर्मचा-यांनी मुदत संपल्यानंतर दरम्यानच्या काळात कीती दिवस काम केले बाबत माहिती मागविण्यात आलेली होती.

त्यानुसार कनिष्ठ अभियंता यांनी जा.क्र धुमपा/पा पु/४/ दिनांक २६/४/२०२१ अन्वये सदर मानधनावरील सदर कर्मचारी यांनी दरम्यानच्या काळात केलेल्या कामाच्या बाबतीत खालील प्रमाणे अहवाल सादर केलेला आहे.

| अ.क्र. | कर्मचारी नाव | पद | मुदत संपण्याची दिनांक | नवीन आदेशाची दिनांक | दरम्यानच्या काळात कामकेल्याचे दिवस |
|---|---|---|---|---|---|
| १ | रोहित रंज मराठे | विजतंत्री | २८/११/२०२० | १४/१/२०२१ | ४६ |
| २ | पवार रमेश गुलाबराव | विजतंत्री | २८/११/२०२० | १४/१/२०२१ | ४६ |
| ३ | किशव मधुकर महाजन | विजतंत्री | २८/११/२०२० | १४/१/२०२१ | ४६ |
| ४ | विश्वजीत विजय गुर्जर | विजतंत्री | २८/११/२०२० | १४/१/२०२१ | ४६ |
| ५ | देवेंद्र नामदेव सोनवणे | विजतंत्री | १९/११/२०२० | १४/१/२०२१ | ५५ |
| ६ | रमेश भिकु पाटील | विजतंत्री | १९/११/२०२० | १४/१/२०२१ | ५५ |
| ७ | अक्षय राजेंद्र बराडे | विजतंत्री | १९/११/२०२० | १४/१/२०२१ | ५५ |
| ८ | चेतन भानुदास सुडके | पंप ऑपरेटर | १०/१२/२०२० | १४/१/२०२१ | ३४ |
| ९ | अंपळकर अमोल नरेंद्र | पंप ऑपरेटर | १०/१२/२०२० | १४/१/२०२१ | ३४ |
| १० | पोतदार अमित अनील | पंप ऑपरेटर | १०/१२/२०२० | १४/१/२०२१ | ३४ |
| ११ | योगेश साहेबराव देवरे | पंप ऑपरेटर | १०/१२/२०२० | १४/१/२०२१ | ३४ |
| १२ | दिपक वसंत माळी | पंप ऑपरेटर | १०/१२/२०२० | १४/१/२०२१ | ३४ |
| १३ | कल्पतरुन सदाशिव वाघ | पंप ऑपरेटर | १०/१२/२०२० | १४/१/२०२१ | ३४ |
| १४ | ईश्वर विठ्ठल बडगुजर | पंप ऑपरेटर | १०/१२/२०२० | १४/१/२०२१ | ३४ |
| १५ | राहुल नथ्थुसिंग जाधव | गाळणी निरिक्षक | १०/१२/२०२० | १४/१/२०२१ | ३४ |
| १६ | महाजन उमेश रविंद्र | गाळणी निरिक्षक | १०/१२/२०२० | १४/१/२०२१ | ३४ |
| १७ | निलेश पंढरीनाथ करनाळे | गाळणी निरिक्षक | १०/१२/२०२० | १४/१/२०२१ | ३४ |
| १८ | रमेश वेडु बोरसे | गाळणी निरिक्षक | १०/१२/२०२० | १४/१/२०२१ | ३४ |
| १९ | विनायक जगन साळुंखे | गाळणी निरिक्षक | १०/१२/२०२० | १४/१/२०२१ | ३४ |
| २० | राहुल अंबादास बडगुजर | गाळणी निरिक्षक | १०/१२/२०२० | १४/१/२०२१ | ३४ |
| २१ | किरण गोविंदा चव्हाण | गाळणी निरिक्षक | १०/१२/२०२० | १४/१/२०२१ | ३४ |
| २२ | अरुण राजाराम खैरनपार | गाळणी चालक | १०/१२/२०२० | १४/१/२०२१ | ३४ |
| २३ | पाटील अमोल मधुकर | गाळणी चालक | १०/१२/२०२० | १४/१/२०२१ | ३४ |
| २४ | गणेश दिगंबर शेलार | गाळणी चालक | १०/१२/२०२० | १४/१/२०२१ | ३४ |
| २५ | श्री खैरनार रुपेश महेंद्र | पंप ऑपरेटर | १०/१२/२०२० | १४/१/२०२१ | ३४ |

तरी मानधनावरील पंप ऑपरेटर, गाळणी चालक, गाळणी निरिक्षक, विजतंत्री कर्मचाऱ्यांनी मुदत संपल्यानंतर त्यांच्या नावा समोर नमुद दिवस दरम्यानच्या काळात काम केले आहे. तरी त्यांना त्यांच्या नावा समोर नमुद दिवसातुन ५ दिवसाचे खंड करून उर्वरित दिवसाचा पगार अदा करण्याबाबतचा विषय मे. स्थायी समितीपुढे सादर झालेला आहे.

उक्त कार्यालयीन अहवाल व सन्मा. सदस्यांच्या सहमतीने प्रस्ताव नमुद मानधनावरील कर्मचा-यांना त्यांच्या नावा समोर नमुद दिवसातुन ५ दिवसाचे खंड करून उर्वरित दिवसाचा पगार अदा करण्यास मान्यता देण्यांत येत आहे.सदर प्रस्ताव व कार्यवाहीबाबत लेखा आक्षेप निर्माण होणार नाही याची दक्षता घ्यावी. याबाबतची जबाबदारी संबंधित विभागाची राहील.

**सर्वानुमते मंजुर,**

**सही/-X X X**

**सभापती,**

**स्थायी समिती,**

**धुळे महानगरपालिका,धुळे**

विषय क्रमांक:- ६२ धुळे मनपा हद्दवाढ गावाच्या निधी अंतर्गत प्र.क्र.6 मध्ये मोराणे येथे काळम देव मंदिरा पासून ते आश्रम शाळेच्या गेट पर्यंत रस्ता डांबरीकरण करणेचे एस्टीमेट रुपये ३४,४९,०००/- मात्रला आर्थिक व प्रशासकीय मान्यता देणेबाबत विचार करणे.

म. नगरसचिव नगरसचिव यांनी विषयांचे वाचन केले.

म.अमोल मासुळे विषय मंजूर करण्यांत यावा.

म. कमलेश देवरे विषय मंजूर करण्यांत यावा.

म. सभापती सर्व सन्मा.सदस्यांच्या सहमतीने व कार्यालयीन अहवालास अधिन राहून सदर प्रस्तावास मान्यता देण्यांत येत आहे.

**धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर ७० दिनांक १०/०६/२०२१**

धुळे मनपा हद्दवाढ गावाच्या निधी अंतर्गत प्र.क्र.६ मध्ये मोराणे येथे काळम देव मंदिरा पासून ते आश्रमशाळेच्या गेट पर्यंत रस्ता डांबरीकरण करणे बाबतची मागणी सन्मा. सदस्य श्री. रावसाहेब नांद्रे यांनी हद्दवाढ महसूल निधीतून करण्याची मागणी केली होती.

त्यानुसार उक्त कामाचे अंदाजपत्रक तयार करण्यात येवून त्यास अंदाजित खर्च ३४,४९,०००/-मात्रच्या खर्चास जा.क्र/ धुमपा/ पा.पु.वि./२४ दि.१२/०५/२०२१ अन्वये प्रशासकीय मान्यता देण्यात आलेली आहे.

सर्व सन्मा. सदस्यांच्या सहमतीने व कार्यालयीन अहवालास अधिन राहून सदर कामी करण्यांत आलेले एस्टीमेट खर्च रुपये ३४,४९,०००/- मात्र आर्थिक व प्रशासकीय मान्यता देण्यांत येत आहे.

**सर्वानुमते मंजुर,**
**सही/-X X X**
**सभापती,**
**स्थायी समिती,**
**धुळे महानगरपालिका,धुळे**

विषय क्रमांक :- ६३ धुळे शहरातील कोविड 19 आजाराबाबत प्रतिबंधीत क्षेत्रात स्टीकर तयार करणेसाठी झालेला खर्च रु. २१२४०/- मात्र खर्चास कार्योत्तर मंजुरी देणबाबत विचार करणे.

म. नगरसचिव नगरसचिव यांनी विषयांचे वाचन केले.

म.शितल नवले विषय मंजूर करण्यांत यावा.

म. कमलेश देवरे विषय मंजूर करण्यांत यावा.

म. सभापती सर्व सन्मा.सदस्यांच्या सहमतीने व कार्यालयीन अहवालास अधिन राहून सदर प्रस्तावास कार्योत्तर मान्यता देण्यांत येत आहे.

**धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर ७१ दिनांक १०/०६/२०२१**

धुळे महानगरपालिका कोवीड-19 आजाराबाबत प्रतिबंधीत क्षेत्रातील स्टिकर बनविनेत आले होते. त्यानुसार नियोजन करणे करीता म.उपयुक्त सो यांनी भांडार विभागाकडेस कार्यवाही करावी अशी टिपणी सादर केलेली आहे.

| अ.क्र | साहित्य तपशिल | नग | प्रति नग रुपये | मार्केट मुव्हर्स,धुळे | एकुण खर्च रुपये |
|---|---|---|---|---|---|
| १ | स्टीकर (A4 साईज) | १५०० नग | १२/- | १८,०००/- | १८,०००/- |
| | | | | **GST 18%** | **३,२४०/-** |
| | | | | **एकुण खर्च सर्व करासोबत सादर केले** | **२१,२४०/-** |

त्यानुसार नियोजन करणेत येऊन सदरचा खर्च रू.**२१,२४०/-** मात्र मंजुरीकरीता प्रकरण सादर करणेत आले असता म.मु.ले.अ सो यांचे कडेस सादर केलेले असता काम तातडीचे असल्याने काम करून घेण्यास आले असुन कार्योत्तर मंजुरी करीता म.मु.ले.प यांचे मार्फत कार्योत्तर मंजुरी घेणेस उचीत होईल असे मत दर्शविलेले आहे

त्यानुसार सदरचे प्रकरण झालेला खर्च रू**२१,२४०/-** मात्र कार्येत्तर मंजुरीस मे.स्थायी समिती पुढे सादर झालेला आहे.

सर्व सन्मा.सदस्यांच्या सहमतीने व कार्यालयीन अहवाल अधिन राहून सदर कामी झालेला खर्च रुपये २१२४०/- मात्रला महाराष्ट्र महानगरपालिकाअधिनियमातील तरतूदीनुसार कार्योत्तर मान्यता देण्यांत येत आहे.सदर प्रस्ताव व कार्यवाहीबाबत लेखा आक्षेप निर्माण होणार नाही याची दक्षता घ्यावी.याबाबतची जबाबदारी संबंधित विभागाची राहील.

**सर्वानुमते मंजुर,**
**सही/-X X X**
**सभापती,**
**स्थायी समिती,**
**धुळे महानगरपालिका,धुळे**

| | |
|---|---|
| विषय क्रमांक:- ६४ | जामचा मळा जलकुंभ पाठी मागील भागात १२ " DI पाईप लाईन टाकणे, १०० फुटी रस्त्यावर ६" व्हॉल शिफ्ट करणे, आग्रा रोड येथे ६" व्हॉल टाकणे अविष्कार कॉलनी .हजार खोली भागात ४" पाईपलाईन टाकणे कामी झालेला खर्च रु..१,८४,१८६/- मात्रला कार्योत्तर मान्यता देणेबाबत आलेल्या कार्यालयीन अहवालावर विचार करणे. |
| म. नगरसचिव | नगरसचिव यांनी विषयांचे वाचन केले. |
| म.शितल नवले | विषय मंजूर करण्यांत यावा. |
| म. कमलेश देवरे | विषय मंजूर करण्यांत यावा. |
| म. सभापती | सर्व सन्मा.सदस्यांच्या सहमतीने व कार्यालयीन अहवालास अधिन राहून सदर प्रस्तावास कार्योत्तर मान्यता देण्यांत येत आहे. |

**धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर ७२ दिनांक १०/०६/२०२१**

धुळे शहरातील प्रभाग क्र.८,१२,१३,१९ च्या भागातील जामचा मळा जलकुंभ पाठीमागील भागात,१०० फुटी रस्त्यावर आग्रा रोड ,अविष्कार कॉलनी हजार खोली भागात लिकेजेस बाबत सन्मा. सदस्य यांनी तक्रार केली आहे. उक्त कामी मनपाचे ठेकेदार श्री.गौरव विजय बुरकुले यांना सदर काम तात्काळ करण्यास सांगितले.

सदर ठेकेदार यांना तोंडी सूचना दिल्यानुसार सदरची पाईपलाईन टाकण्यात आली असून उक्त कामाचे अंदाजपत्रकानुसार खर्च रु.१,८४,१८६/- मात्र इतका खर्च करण्यात आला असून सदर कामाचे देयक मिळणेबाबत संबधित ठेकेदार यांनी विनंती केली आहे.

तरी उक्त काम हे पाणीपुरवठा सुरळीत होणेकामी विना निविदा श्री.गौरव विजय बुरकुले ठेकेदार यांच्या कडून करून घेणेत आलेले असून सदरचा कामाचा खर्च हा मनपा अधिनियम १९४९ कलम ५(२)(२) नुसार विना निविदा करण्यास मंजुरीसाठी व खर्चास कार्योत्तर मान्यतेसाठी मे. स्थायी समिती पुढे सादर झालेला आहे.

सर्व सन्मा.सदस्यांच्या सहमतीने व कार्यालयीन अहवालास अधिन राहून सदर काम हे पाणीपुरवठा सुरळीत होणेकामी विना निविदा श्री.गौरव विजय बुरकुले ठेकेदार यांच्या कडून करून घेणेत आलेले असून सदरचा कामाचा झालेला खर्च रु.१,८४,१८६/- मात्रला हा मनपा अधिनियमातील कलम ५(२)(२) नुसार विना निविदा करण्यास व खर्चास कार्योत्तर मान्यता देण्यांत येत आहे. सदर प्रस्ताव व कार्यवाहीबाबत लेखा आक्षेप निर्माण होणार नाही याची दक्षता घ्यावी.याबाबतची जबाबदारी संबंधित विभागाची राहील.

**सर्वानुमते मंजुर,**
**सही/-X X X**

**सभापती,**
**स्थायी समिती,**
**धुळे महानगरपालिका,धुळे**

| | |
|---|---|
| विषय क्रमांक:- ६५ | स्थानिक विकास निधी मधून सन 2021-22 अंतर्गत धुळे शहराकरिता ऑक्सिजन जनरेशन प्लांट उभारणेकामी निविदा दर मागविण्यांत आलेत.त्याबाबत आलेल्या कार्यालयीन अहवालावर विचार करणे. |
| म.शितल नवले | सदरचा प्लॅन्ट हा नेमका कोणत्या ठिकाणी आपण बसविणार आहोत. |
| म.विद्युत अभियंता | हा प्लॅन्ट हा जुन्या सिव्हिल हॉस्पिटलमध्ये आता जिथे कोव्हीड सेंटर आहे त्यांच्या मागच्या बाजूला जो कॉक्रीट केलेला रस्ता आहे. त्यालगत सदरचा ऑक्सिजन प्लॅन्टची जागा पाहणी करून निश्चित करण्यात आलेली आहे. |
| म.शितल नवले | या अगोदर त्या ठिकाणी संजय सोया कंपनीमार्फत ऑक्सिजन प्लॅन्ट टाकण्यात येणार आहे. त्या प्लॅन्टंमार्फत ६० जम्बो सिलेंडर उपलब्ध होणार आहे. तसेच मोठया सिव्हिल हॉस्पिटल येथे यापुर्वीच एक ऑक्सिजन प्लॅन्टं निर्मिती करण्यात आलेली आहे. त्यामुळे आपण प्रस्तावित केलेल्या ठिकाणी प्लॅन्टंची खरोखर आवश्यकता आहे का? त्या ठिकाणी सद्यास्थितीत किती बेड आहेत. व त्या बेडसाठी नविन प्लॅन्टंची आवश्यकता आहे का ? या प्लॅन्टंची क्षमता किती आहे. |
| म.विद्युत अभियंता | १२० WCM एवढी क्षमता आहे. |
| म.शितल नवले | या ठिकाणी एकच टेंडर प्राप्त झालेले आहे. अद्याप तिसरी लाट आलेली नाही आपल्याला वेळ आहे. ८ दिवसाची मुदत टाकून नविन टेंडर काढण्यात यावे. |
| म.सभापती | सदर निविदा ही दुसऱ्यादा फेर निविदा मागविण्यात आलेली आहे. |
| म.शितल नवले | सदर ठिकाणी पायाभुत सुविधा तसेच आवश्यकता आहे किंवा नाही याची शहानिशा करून निर्णय घ्यावा कारण एवढा मोठा खर्च वाया जाणार नाही. याची काळजी घेणे आवश्यक आहे. |
| म.अमिन पटेल | एखादया व्यक्तीला कोरोना झाल्यास व त्याला ऑक्सिजनची गरजे पडल्यास एक दिवशाला १ जम्बो सिलेंडर लागते. व जर तो व्हेटीलेटरवर असला तर त्याला १५ ते २० जम्बो सिलेंडरची गरज पडते. सद्यास्थितीत जो प्लॅन्टं बसविणार आहे तेथे किती सिलेंडर भरले जातील. |
| म.आरोग्याधिकारी | आता तिथे ६० ऐवजी १२० जम्बो सिलेंडरची व्यवस्था होणार आहे. |
| म.अमिन पटेल | भविष्य काळात पेन्शंट वाढले तर सिलेंडरची गरज लागणार आहे. त्यामुळे सदर ठिकाणी प्लॅन्टंची आवश्यकता आहे. नागरीकांच्या आरोग्यासाठी सदर विषय मंजूर करावा. |
| म. सभापती | सर्व सन्मा.सदस्यांच्या सहमतीने व कार्यालयीन अहवालास अधिन राहून सदर प्रस्तावास मान्यता देण्यांत येत आहे. |

**धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर ७३ दिनांक १०/०६/२०२१**

धुळे शहराकरिता ऑक्सिजन जनरेशन प्लांट उभारणे.(मा.आ.श्री.शाह.फारूक अन्वर,धुळे शहर विधानसभा मतदार संघ यांचे आमदार स्थानिक विकास निधी अंतर्गत सन २०२१-२२ कामी अंदाजपत्रकीय खर्च रक्कम **रु.७९,८५,०००/-** मात्रला जिल्हा नियोजन समिती,जिल्हा जिल्हाधिकारी कार्यालय,धुळे यांच्या कडील जिनिस/O/२०२१/May/ AAO/ 00044 दि.१०/०५/२०२१ रोजी प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे.त्यानुसार मा. जिल्हाधिकारी धुळे यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हास्तरीय समितीची दि.०७/०५/२०२१ अन्वये रक्कम **रु.७९,८५,०००/-** मात्र खर्चास तांत्रिक मंजुरी मिळालेली आहे.त्यानुसार सदर कामी ई-निविदा कार्यवाही करण्यात आली असून, सदर निविदेत एकच निविदा प्राप्त झाली.

उक्त बाबत आपत्ती व्यवस्थापन कायदा २००५ मध्ये जिल्हास्तरावर निर्णय घेणे बाबतची तरतूद आहे.तथापि covid सारख्या संसर्गजन्य आजार व शहरातील आपत्कालीन परिस्थिती पाहता व सदरचे काम शहरातील नागरिकांच्या आरोग्याशी निगडीत असल्याने एकच निविदा (सेकंड call मध्ये) जरी प्राप्त असेन तरी आयुक्त म.न.पा धुळे हे समक्ष प्राधिकरण असून एक निविदा प्राप्त परिस्थितीत प्राप्त एक मक्तेदारांचे दर उघडण्यात आले असून, त्यात **मे. मावेन कॉर्पोरेशन,नाशिक** त्यांचे दर **अंदाजपत्रकाच्या ०.१ % ने कमी** असून सदर निविदेत L1 मक्तेदार **मे.मावेन कॉर्पोरेशन,नाशिक** हे आहेत.त्यानुसार सर्वात कमी दराची निविदा **मे.मावेन कॉर्पोरेशन,नाशिक** यांची म्हणजेच **अंदाजपत्रकाच्या ०.१ % ने कमी** दराला मंजुरी करिता मे.स्थायी समितीसमोर सादर झालेला आहे.

सर्व सन्मा. सदस्यांच्या सहमतीने व कार्यालयीन अहवालास अधिन राहून सदर सदर कामी मे.मावेन कॉर्पोरेशन,नाशिक यांचे आलेले अंदाजपत्रकीय दराच्या 0.1% कमीने या दरास मान्यता देण्यांत येत आहे. सदर प्रस्ताव व कार्यवाहीबाबत लेखा आक्षेप निर्माण होणार नाही याची दक्षता घ्यावी.याबाबतची जबाबदारी संबंधित विभागाची राहील.

**सर्वानुमते मंजुर,**
**सही/-X X X**
**सभापती,**
**स्थायी समिती,**
**धुळे महानगरपालिका,धुळे**

विषय क्रमांक:- ६६ — स्वच्छ भारत अभियानातंर्गत घनकचरा व्यवस्थापन प्रकल्पातील आवश्यक असलेली कामे करण्यासाठी ठेकेदारास मुदतवाढ देणेबाबत आलेल्या कार्यालयीन अहवालावर विचार करणे.

म. नगरसचिव — नगरसचिव यांनी विषयांचे वाचन केले.

म.शितल नवले — विषय मंजूर करण्यांत यावा.

म. कमलेश देवरे — विषय मंजूर करण्यांत यावा.

म. सभापती — सर्व सन्मा.सदस्यांच्या सहमतीने व कार्यालयीन अहवालास अधिन राहून सदर प्रस्तावास मान्यता देण्यांत येत आहे.

**धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर ७४ दिनांक १०/०६/२०२१**

स्वच्छ भारत अभियानाअंतर्गत घनकचरा व्यवस्थापन प्रकल्पातील आवश्यक असलेली कामे करण्यासाठी इकडील कार्यालयामार्फत कार्यादेश जाक्र/ धुमपा/ बांवि /२८२/ दि.०६/०३/२०१९ अन्वये श्री.मिलिंद मुडावदकर, धुळे यांना देण्यात आला होता. सदर कामाची मुदत ९ महिने देण्यात आली होती. त्यानुसार दि. ०५/१२/२०१९ रोजी सदरचे काम पूर्ण करणे आवश्यक होते.

परंतु सदरील ठिकाणी कामे करण्यासाठी जागा उपलब्ध नसल्याने उक्त कामे करण्यास अडचणी येत होत्या. तसेच कोविड-१९ या साथीचा रोग सुरु असल्याने लॉकडाऊनमुळे कामास उशीर झालेला आहे. तसेच ज्याठिकाणी शेड बांधकाम करावयाचे होते.त्याठिकाणी कचऱ्याचे ढिग होते.या संदर्भात इकडील कार्यालयामार्फत दि.१४/१०/२०१९ व दि.३०/०९/२०२० रोजी सहाय्यक आरोग्याधिकारी यांना पत्र देवून जागा मोकळी करणे बाबत विनंती करण्यात आली होती.तथापि जागा मोकळी झाली नसल्याने कामास विलंब झालेला आहे.त्यानुसार ठेकेदाराने दि.०१/०६/२०१९ व दि.०५/१०/२०२० नुसार पत्र देवून

एकतर्फी मुदतवाढ मिळणे बाबत विनंती केली होती. उक्त अंदाजपत्रकांत खालील प्रकारे कामकाजाचा समावेश आहे.सध्यस्थितीत खालीलप्रमाणे कामांची स्थिती आहे.

| अ.क्र. | प्रस्तावित काम | अंदाजपत्रकीय रक्कम | झालेले काम | शेरा |
|---|---|---|---|---|
| १) | Waste Receiving,Pre-sorting Area & Windrow Pad | ११९३८८८४.०० | काम बाकी | जागा उपलब्ध नाही. |
| २) | Leachate Holding Tank | २,५७,१४३.०० | काम बाकी | जागा उपलब्ध नाही. |
| ३) | Sheds For Compost Plant and Material Recovery Facilityएकूण ५ शेड (४२.०० x १०.००x ८.०० मी.उंची) | १,६८,२६,०८०.०० | काम बाकी | जागा उपलब्ध नाही. |
| ४) | Drainage Works | ३५,१२,०५२.०० | काम बाकी | जागा उपलब्ध नाही. |
| ५) | Office | ७,४४,६४३.०० | काम पूर्ण | |
| ६) | Toilet | २,२२,०००.०० | काम बाकी | जागा उपलब्ध नाही. |
| ७) | Weigh Bridge | ५,७१,८२५.०० | काम पूर्ण | |
| ८) | Rest Room | ७,४४,६४३.०० | ९० % काम पूर्ण | |

कामांपैकी अ क्र.५,७ व ८ चे कामांपैकी प्रथम धावते देयक रक्कम रु.२७,७१,४०३/-मात्र ठेकेदारास अदा करण्यात आले आहे.

तसेच अ क्र.१,२,३,४ व ६ चे काम करणे बाकी आहे.तथापि सदरचे काम ज्याठिकाणी करायचे आहे त्याठिकाणी कचऱ्याचे डम्पिंग ग्राउंड असल्याने काम करण्यास जागा मोकळीनाही.त्यामुळे सदरचे काम अद्यापपावेतो पूर्ण झालेले नाही.तरी त्वरित सदरची जागा मोकळी करून देणे बाबत संबधितांना आदेशित होणेस विनंती.तसेच श्री. मिलिंद मुडावदकर यांनी कामाचे लाईन आऊट दिल्यापासून पुढे २४ महिने मुदतवाढ मिळणे बाबत विनंती केली आहे.त्यानुसार सदर कामास एकतर्फी मुदतवाढ देणे बाबत मे.स्थायी समिती पुढे निर्णयार्थ सादर झालेला आहे.

उक्त कार्यालयीन अहवाल व सन्मा. सदस्यांच्या सहमतीने याकामी ठेकेदार श्री. मिलींद मुडावदकर यांना नियमाप्रमाणे व कार्यालयीन अहवालात नमूद केल्याप्रमाणे मुदतवाढ देण्यांस मान्यता देण्यांत येत आहे. सदर प्रस्ताव व कार्यवाहीबाबत लेखा आक्षेप निर्माण होणार नाही याची दक्षता घ्यावी.याबाबतची जबाबदारी संबंधित विभागाची राहील.

**सर्वानुमते मंजुर,**
**सही/-X X X**
**सभापती,**
**स्थायी समिती,**
**धुळे महानगरपालिका,धुळे**

विषय क्रमांक ६७ — धुळे मनपा १४ व्या वित्त आयोग योजनेअंतर्गत गोळीबार टेकडी ते जमनागिरी पावेतोच्या नाल्यास संरक्षण भिंत बांधणेकामी निविदा दर मागविण्यात आलेत त्याबाबत आलेल्या कार्यालयीन अहवालावर विचार करणे.

म. नगरसचिव — नगरसचिव यांनी विषयांचे वाचन केले.

म.अमोल मासुळे — विषय मंजूर करावा.

म. सभापती — सन्मा. सदस्यांच्या सहमतीने व कार्यालयीन अहवालास अधिन सदर प्रस्तावास मान्यता देण्यांत येत आहे.

**धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर ७५ दिनांक १०/०६/२०२१**

14 व्या वित्त आयोग अंतर्गत धुळे मनपा हद्दीत गोळीबार टेकडी ते जमनागिरी पावेतोचा नाल्यास संरक्षण भिंत बांधणे कामास धुळे महानगरपालिका स्थायी समिती ठराव नं. 139 दि. 30/12/2020 मा.आयुक्त , धुळे महानगरपालिका यांचे टिपणी मंजुरीने दिनांक 01/04/2021 अन्वये उक्त कामाबाबत रक्कम रु.1,33,41,217/- मात्र खर्चास आर्थिक व प्रशासकीय मंजुरी देणेत आली आहे.

उक्त बाबत सार्वजनिक बांधकाम विभाग , धुळे यांचे पत्र क्र. 1448 दिनांक 16/04/2021 अन्वये रक्कम रु.1,33,41,217/- मात्र खर्चास तांत्रिक मंजुरी मिळालेली आहे.

उक्त कामाबाबत धुळे महानगरपालिका जा.क्र./ पा.पु.वि./63 दि.26/04/2021 अन्वये दि. 28/04/2021 रोजीचा दै.देशदूत/ खान्देश मैदान या अंकात प्रसिद्ध केली असता मुदतीत दि.17/05/2021 अखेर खालील प्रमाणे निविदा धारकांचे निविदा दर आलेले आहे.

| अ.क्र. | कंत्राटदारा/ठेकेदराचे नाव | दिलेले निविदा दर | शेरा |
|---|---|---|---|
| 1 | अ.के.सैफी | **अंदाजपत्रकीय दराने** | **सर्वात कमी दर** |
| 2 | सुकन्या सुरेश चौधरी | शे.5.00% जास्तीने | |
| 3 | गायत्री कन्सट्रक्शन | शे.2.00% जास्तीने | |

वरील प्रमाणे प्राप्त दरास सर्वात कमी दर **श्री. अ.के.सैफी ,धुळे** यांचे अंदाजपत्रकीय दराने आलेले आहे. तरी उक्त **श्री. अ.के.सैफी ,धुळे** यांचे दर हे जास्तीचे आलेले असल्याने संबंधितांना इकडील जा.क्र./पा.पु.वि./171 दि.03/06/2021 अन्वये दरवाटाघाटीस बोलविले सदर ठेकेदार यांनी सदरचे काम अंदाजपत्रकीय दराने ऐवजी शे.1.00% कमीने करणेस तयारी दर्शविलेली आहे.

तरी दर वाटाघाटी अंती **श्री. अ.के.सैफी ,धुळे** यांनी दि.04/06/2021 रोजी दिलेले पत्रानुसार दर शे.1.00% कमीने करणेस संमती दर्शविलेली आहे. सबब सदर काम शे.1.00% कमी दराने आलेले असल्याने यांच्या दरास मंजुरीस्तव मे.स्थायी समिती पुढे ठेवणेस मंजुरीस्तव सादर झालेला आहे.

उक्त कार्यालयीन अहवाल व सन्मा.सदस्यांच्या सहमतीने या कामी बाटाघाटी अंती श्री.अ. के.सैफी धुळे यांचे आलेले शे. १ %कमीने आलेल्या दरांस मान्यता देण्यांत येत आहे. सदर प्रस्ताव व कार्यवाहीबाबत लेखा आक्षेप निर्माण होणार नाही याची दक्षता घ्यावी.याबाबतची जबाबदारी संबंधित विभागाची राहील.

**सर्वानुमते मंजुर,**
**सही/-X X X**
**सभापती,**
**स्थायी समिती,**
**धुळे महानगरपालिका,धुळे**

विषय क्रमांक ६८ — धुळे मनपा १४ व्या वित्त आयोग योजनेअंतर्गत साईदर्शन कॉलनी ते रासकर नगर ते सुदर्शन कॉलनी ते शेलार वाडीपावेतो नाल्यास संरक्षण भिंत बांधणेकामी निविदा दर मागविण्यात आलेत त्याबाबत आलेल्या कार्यालयीन अहवालावर विचार करणे.

म. नगरसचिव — नगरसचिव यांनी विषयांचे वाचन केले.

| | |
|---|---|
| म.शितल नवले | विषय मंजूर करावा. |
| म.अमोल मासुळे | विषय मंजूर करावा. |
| म. सभापती | सन्मा. सदस्यांच्या सहमतीने व कार्यालयीन अहवालास अधिन सदर प्रस्तावास मान्यता देण्यांत येत आहे. |

**धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर ७६ दिनांक १०/०६/२०२१**

१४ व्या वित्त आयोग अंतर्गत धुळे मनपा हद्दीत साईदर्शन कॉलनी ते रासकर नगर ते सुदर्शन कॉलनी ते शेलारवाडी पावेतो नाल्यास संरक्षण भिंत कामास धुळे महानगरपालिका स्थायी समिती ठराव नं. १३९ दि. ३०/१२/२०२० मा.आयुक्त , धुळे महानगरपालिका यांचे टिपणी मंजुरीने दिनांक ०१/०४/२०२१ अन्वये उक्त कामाबाबत रक्कम रु.१,५६,५४,४४५/- मात्र खर्चास आर्थिक व प्रशासकीय मंजुरी देणेत आली आहे.
उक्त बाबत सार्वजनिक बांधकाम विभाग,धुळे यांचे पत्र क्र.५५३ दिनांक १२/०२/२०२१ अन्वये रक्कम रु.१,५६,५४,४४५/- मात्र खर्चास तांत्रिक मंजुरी मिळालेली आहे.

उक्त कामाबाबत धुळे महानगरपालिका जा.क्र/पा.पु.वि./४३ दि.१६/०४/२०२१ अन्वये दि. १७/०४/२०२१ रोजीचा दै.पुण्य नगरी/ पोलीस शोध या अंकात प्रसिद्ध केली असता मुदतीत दि.१२/०५/२०२१ अखेर खालील प्रमाणे निविदा धारकांचे निविदा दर आलेले आहे.

| अ.क्र. | कंत्राटदारा/ठेकेदराचे नाव | दिलेले निविदा दर | शेरा |
|---|---|---|---|
| १ | अ.के.सैफी | अंदाजपत्रकीय दराने | |
| २ | सुकन्या सुरेश चौधरी | शे.२.००% जास्तीने | |
| ३ | **गायत्री कन्सट्रक्शन** | **शे.१.००% कमीने** | **सर्वात कमी दर** |

वरील प्रमाणे निविदेत भाग घेतलेले ठेकेदार पात्र असून **मे. गायत्री कन्सट्रक्शन, धुळे** यांचे दर शे.१.००% कमी आहे व त्यांनी नियमा प्रमाणे ऑनलाईन बयाणा रक्कम भरलेली आहे. सबब कंत्राटदार **मे. गायत्री कन्सट्रक्शन , धुळे** यांची शे.१.००% कमी दराने आलेले निविदा दर मंजुरीसाठी मे.स्थायी समितीची आवश्यकता असल्याने सदर दरास मंजुरीसाठी मे.स्थायी समिती पुढे ठेवणेस मंजुरीस्तव सादर झालेला आहे.

उक्त कार्यालयीन अहवाल व सन्मा.सदस्यांच्या सहमतीने या कामी वाटाघाटी अंती मे. गायत्री कन्सट्रक्शन ,धुळे यांचे आलेले शे. १ % कमीने आलेल्या दरांस मान्यता देण्यांत येत आहे.सदर प्रस्ताव व कार्यवाहीबाबत लेखा आक्षेप निर्माण होणार नाही याची दक्षता घ्यावी.याबाबतची जबाबदारी संबंधित विभागाची राहील.

**सर्वानुमते मंजुर,**
**सही/-X X X**
**सभापती,**
**स्थायी समिती,**
**धुळे महानगरपालिका,धुळे**

| | |
|---|---|
| विषय क्रमांक ६९ | धुळे मनपा १४ व्या वित्त आयोग योजनेअंतर्गत पारोळा रोड ताडीवाला नाला ते घडयाळवाला नाल्यापावेतोच्या संरक्षण भिंत बांधणेकामी निविदा दर मागविण्यात आलेत त्याबाबत आलेल्या कार्यालयीन अहवालावर विचार करणे. |
| म. नगरसचिव | नगरसचिव यांनी विषयांचे वाचन केले. |
| म.कमलेश देवरे | विषय मंजूर करावा. |
| म. मंगला चौधरी | विषय मंजूर करावा. |

म. सभापती — सन्मा.सदस्यांच्या सहमतीने व कार्यालयीन अहवालास अधिन सदर प्रस्तावास मान्यता देण्यांत येत आहे.

**धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर ७७ दिनांक १०/०६/२०२१**

१४ व्या वित्त आयोग अंतर्गत पारोळा रोड ताडीवाला नाला ते घड्याळ वाला नाला पावेतोचा नाल्यास संरक्षण भिंत बांधणे कामास धुळे महानगरपालिका स्थायी समिती ठराव नं. १३९ दि.३०/१२/२०२० मा.आयुक्त , धुळे महानगरपालिका यांचे टिपणी मंजुरीने दिनांक ०१/०४/२०२१अन्वये उक्त कामाबाबत रक्कम रु.९९,०२,२६१/- मात्र खर्चास आर्थिक व प्रशासकीय मंजुरी देणेत आली आहे.

उक्त बाबत शहर अभियंता , धुळे मनपा यांचे पत्र क्र. १०९६ दिनांक १८/०२/२०२१ अन्वये रक्कम रु.९९,०२,२६१/- मात्र खर्चास तांत्रिक मंजुरी मिळालेली आहे.उक्त कामाबाबत धुळे महानगरपालिका जा.क्र./ पा.पु.वि./ २७ दि.१२/०४/२०२१ अन्वये दि.१३/०४/२०२१ रोजीचा दै.देशदूत/ देशोन्नती या अंकात प्रसिद्ध केली असता मुदतीत दि.०५/०५/२०२१ अखेर खालील प्रमाणे निविदा धारकांचे निविदा दर आलेले आहे.

| अ.क्र. | कंत्राटदारा/ठेकेदराचे नाव | दिलेले निविदा दर | शेरा |
|---|---|---|---|
| १ | ऋषभ सतिष खिवसरा | शे.२.००% जास्तीने | |
| २ | एकविरा कन्सट्रक्शन | शे.३.००% जास्तीने | |
| ३ | **अंकित किशोर भंडारी** | **अंदाजपत्रकीय दराने** | **सर्वात कमी दर** |

वरील प्रमाणे प्राप्त दरास सर्वात कमी दर **श्री.अंकित किशोर भंडारी ,धुळे** यांचे अंदाजपत्रकीय दराने आलेले आहे. तरी उक्त **श्री.अंकित किशोर भंडारी ,धुळे** यांचे दर हे जास्तीचे आलेले असल्याने संबंधितांना इकडील जा.क्र./पा.पु.वि./ १६२ दि.०३/०६/२०२१ अन्वये दरवाटाघाटीस बोलविले सदर ठेकेदार यांनी सदरचे काम अंदाजपत्रकीय दराने ऐवजी शे.१.००% कमीने करणेस तयारी दर्शविलेली आहे

तरी दर वाटाघाटी अंती **श्री.अंकित किशोर भंडारी ,धुळे** यांनी दि.०४/०६/२०२१ रोजी दिलेले पत्रानुसार दर शे.१.००% कमीने करणेस संमती दर्शविलेली आहे. सबब सदर काम शे.१.००% कमी दराने आलेले असल्याने यांच्या दरास मंजुरीस्तव मे.स्थायी समिती पुढे ठेवणेस मंजुरीस्तव सादर झालेला आहे.

उक्त कार्यालयीन अहवाल व सन्मा.सदस्यांच्या सहमतीने या कामी वाटाघाटी अंती श्री.अंकित किशोर भंडारी, धुळे यांचे आलेले शे.१ % कमीने आलेल्या दरांस मान्यता देण्यांत येत आहे. सदर प्रस्ताव व कार्यवाहीबाबत लेखा आक्षेप निर्माण होणार नाही याची दक्षता घ्यावी. याबाबतची जबाबदारी संबंधित विभागाची राहील.

**सर्वानुमते मंजुर,**
**सही/-X X X**
**सभापती,**
**स्थायी समिती,**
**धुळे महानगरपालिका,धुळे**

विषय क्रमांक ७० — धुळे मनपा १४ व्या वित्त आयोग योजनेअंतर्गत वरखेडी कचरा डेपोला कुंपन भिंत बांधणेकामी निविदा दर मागविण्यात आलेत त्याबाबत आलेल्या कार्यालयीन अहवालावर विचार करणे.

म. नगरसचिव — नगरसचिव यांनी विषयांचे वाचन केले.

म.भारती माळी — विषय मंजूर करावा.

म. मंगला पाटील — विषय मंजूर करावा.

म. सभापती — सन्मा. सदस्यांच्या सहमतीने व कार्यालयीन अहवालास अधिन सदर प्रस्तावास मान्यता देण्यांत येत आहे.

**धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर ७८ दिनांक १०/०६/२०२१**

१४ व्या वित्त आयोग अंतर्गत वरखेडी कचरा डेपोला कुंपण भिंत बांधणे कामास धुळे महानगरपालिका स्थायी समिती ठराव नं. १३९ दि. ३०/१२/२०२० मा.आयुक्त , धुळे महानगरपालिका यांचे टिपणी मंजुरीने दिनांक ०१/०४/२०२१ अन्वये उक्त कामाबाबत रक्कम रु.१,४२,२१,५१७/- मात्र खर्चास आर्थिक व प्रशासकीय मंजुरी देणेत आली आहे.

उक्त बाबत सार्वजनिक बांधकाम विभाग,धुळे यांचे पत्र क्र. ६०३ दिनांक १७/०२/२०२१ अन्वये रक्कम रु.१,४२,२१,५१७/- मात्र खर्चास तांत्रिक मंजुरी मिळालेली आहे.

उक्त कामाबाबत धुळे महानगरपालिका जा.क्र./ पा.पु.वि./ ४३ दि.१६/०४/२०२१ अन्वये दि.१७/०४/२०२१ रोजीचा दै.पुण्य नगरी/ पोलीस शोध या अंकात प्रसिद्ध केली असता मुदतीत दि.१७/०५/२०२१ अखेर खालील प्रमाणे निविदा धारकांचे निविदा दर आलेले आहे.

| अ.क्र. | कंत्राटदारा/ठेकेदराचे नाव | दिलेले निविदा दर | शेरा |
|---|---|---|---|
| १ | **मे.अ.के. सैफी** | **अंदाजपत्रकीय दराने** | **सर्वात कमी दर** |
| २ | गायत्री कन्सट्रक्शन | शे १.००% जास्तीने | |
| ३ | सुकन्या सुरेश चौधरी | शे २.००% जास्तीने | |

वरील प्रमाणे प्राप्त दरास सर्वात कमी दर **मे.अ.के. सैफी ,** धुळे यांचे अंदाजपत्रकीय दराने आलेले आहे. तरी उक्त **मे.अ.के. सैफी , धुळे** यांचे दर हे जास्तीचे आलेले असल्याने संबंधितांना इकडील जा.क्र./पा.पु.वि./१६१ दि.०३/०६/२०२१ अन्वये दरबाटाघाटीस बोलविले सदर ठेकेदार यांनी सदरचे काम अंदाजपत्रकीय दराने ऐवजी शे.१.००% कमीने करणेस तयारी दर्शविलेली आहे.

तरी दर बाटाघाटी अंती **मे.अ.के.सैफी,** धुळे यांनी दि.०४/०६/२०२१ रोजी दिलेले पत्रानुसार दर शे.१.००% कमीने करणेस संमती दर्शविलेली आहे. सबब सदर काम शे.१.००% कमी दराने आलेले असल्याने यांच्या दरास मंजुरीस्तव मे.स्थायी समिती पुढे ठेवणेस मंजुरीस्तव सादर झालेला आहे.

**उक्त कार्यालयीन अहवाल व सन्मा.सदस्यांच्या सहमतीने या कामी बाटाघाटी अंती श्री. अ. के. सैफी धुळे यांचे आलेले शे. १ %कमीने आलेल्या दरांस मान्यता देण्यांत येत आहे.** सदर प्रस्ताव व कार्यवाहीबाबत लेखा आक्षेप निर्माण होणार नाही याची दक्षता घ्यावी.याबाबतची जबाबदारी संबंधित विभागाची राहील.

**सर्वानुमते मंजुर,**
**सही/-X X X**
**सभापती,**
**स्थायी समिती,**
**धुळे महानगरपालिका,धुळे**

विषय क्रमांक ७१ — धुळे मनपा १४ व्या वित्त आयोग योजनेअंतर्गत महिला सार्वजनिक शौचालय ते मौलवी गंज पावेतोच्या नाल्यास संरक्षण भिंत बांधणेकामी निविदा दर मागविण्यात आलेत त्याबाबत आलेल्या कार्यालयीन अहवालावर विचार करणे.

म. नगरसचिव — नगरसचिव यांनी विषयांचे वाचन केले.

म.अमीन पटेल — विषय मंजूर करावा.

म.हिना पठाण — विषय मंजूर करावा.

म. सभापती — सन्मा.सदस्यांच्या सहमतीने व कार्यालयीन अहवालास अधिन सदर प्रस्तावास मान्यता देण्यांत येत आहे.

**धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर ७९ दिनांक १०/०६/२०२१**

धुळे मनपा १४ व्या वित्त आयोग योजनेअंतर्गत महिला सार्वजनिक शौचालय ते मौलवी गंज पावेतोच्या नाल्यास संरक्षण भिंत बांधणेकामी निविदा दर मागविण्यात आलेत त्याबाबत आलेल्या कार्यालयीन अहवालावर विचार करणे.

१४ व्या वित्त आयोग अंतर्गत महिला सार्वजनिक सार्वजनिक शौचालय ते मौलवीगंज पावेतो नाल्यास संरक्षण भिंत बांधणे कामास धुळे महानगरपालिका स्थायी समिती ठराव नं. १३९ दि. ३०/१२/२०२० मा.आयुक्त , धुळे महानगरपालिका यांचे टिपणी मंजुरीने दिनांक ०१/०४/२०२१ अन्वये उक्त कामाबाबत रक्कम रु.३४,९९,२९९/- मात्र खर्चास आर्थिक व प्रशासकीय मंजुरी देणेत आली आहे.उक्त बाबत शहर अभियंता,मनपा धुळे यांचे पत्र क्र. १०९५ दिनांक ११/०२/२०२१अन्वये रक्कम रु.३४,९९,२९९/-मात्र खर्चास तांत्रिक मंजुरी मिळालेली आहे.

उक्त कामाबाबत धुळे महानगरपालिका जा.क्र./पा.पु.वि./ २७दि.१२/०४/२०२१अन्वये दि. १३/०४/२०२१ रोजीचा दै.देशदूत/ देशोन्नती या अंकात प्रसिद्ध केली असता मुदतीत दि.१७/०५/२०२१ अखेर खालील प्रमाणे निविदा धारकांचे निविदा दर आलेले आहे.

| अ.क्र. | कंत्राटदारा/ठेकेदराचे नाव | दिलेले निविदा दर | शेरा |
|---|---|---|---|
| १ | मे.अ.के. सैफी | शे १.००% जास्तीने | |
| २ | सुकन्या सुरेश चौधरी | शे २.००% जास्तीने | |
| ३ | **अक्षय धीरज माखीजा** | **अंदाजपत्रकीय दराने** | **सर्वात कमी दर** |

वरील प्रमाणे प्राप्त दरास सर्वात कमी दर **श्री.अक्षय धीरज माखीजा, धुळे** यांचे अंदाजपत्रकीय दराने आलेले आहे. तरी उक्त **श्री.अक्षय धीरज माखीजा, धुळे** यांचे दर हे जास्तीचे आलेले असल्याने संबंधितांना इकडील जा.क्र./पा.पु.वि./ १५९ दि. ०३/०६/२०२१ अन्वये दरवाटाघाटीस बोलविले सदर ठेकेदार यांनी सदरचे काम अंदाजपत्रकीय दराने ऐवजी शे.१.००% कमीने करणेस तयारी दर्शविलेली आहे.

तरी दर वाटाघाटी अंती **श्री.अक्षय धीरज माखीजा, धुळे** यांनी दि.०४/०६/२०२१ रोजी दिलेले पत्रानुसार दर शे.१.००% कमीने करणेस संमती दर्शविलेली आहे. सबब सदर काम शे.१.००% कमी दराने आलेले असल्याने यांच्या दरास मंजुरीस्तव मे.स्थायी समिती पुढे ठेवणेस मंजुरीस्तव सादर झालेला आहे.

उक्त कार्यालयीन अहवाल व सन्मा.सदस्यांच्या सहमतीने या कामी वाटाघाटी अंती श्री.अक्षय धीरज माखीजा, धुळे यांचे आलेले शे. १ %कमीने आलेल्या दरांस मान्यता देण्यांत येत आहे. सदर प्रस्ताव व कार्यवाहीबावत लेखा आक्षेप निर्माण होणार नाही याची दक्षता घ्यावी.याबाबतची जबाबदारी संबंधित विभागाची राहील.

**सर्वानुमते मंजुर,**
**सही/-X X X**
**सभापती,**
**स्थायी समिती,**
**धुळे महानगरपालिका,धुळे**

| | |
|---|---|
| विषय क्रमांक ७२ | धुळे मनपा १४ व्या वित्त आयोग योजनेअंतर्गत ओम क्रीटीकल ते कब्रस्थान पावेतोच्या नाल्यास संरक्षण भिंत बांधणेकामी निविदा दर मागविण्यात आलेत त्याबाबत आलेल्या कार्यालयीन अहवालावर विचार करणे. |
| म. नगरसचिव | नगरसचिव यांनी विषयांचे वाचन केले. |
| म. सुनिल बैसाणे | विषय मंजूर करावा. |
| म. सभापती | सन्मा.सदस्यांच्या सहमतीने व कार्यालयीन अहवालास अधिन सदर प्रस्तावास मान्यता देण्यांत येत आहे. |

**धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर ८० दिनांक १०/०६/२०२१**

१४ व्या वित्त आयोग अंतर्गत ओम क्रिटीकल ते कब्रस्थान पावेतो नाल्यास संरक्षण भिंत बांधणे कामास धुळे महानगरपालिका स्थायी समिती ठराव नं.१३९ दि.३०/१२/२०२० मा. आयुक्त, धुळे महानगरपालिकायांचे टिपणी मंजुरीने दिनांक ०१/०४/२०२१ अन्वये उक्त कामा बावत रक्कम रु.७२,९२,४००/- मात्र खर्चास आर्थिक व प्रशासकीय मंजुरी देणेत आली आहे.

उक्त बाबत सार्वजनिक बांधकामविभाग , धुळे यांचे पत्र क्र. ११०० दिनांक ११/०२/२०२१ अन्वये रक्कम रु.७२,९२,४००/- मात्र खर्चास तांत्रिक मंजुरी मिळालेली आहे.

उक्त कामाबाबत धुळे महानगरपालिका जा.क्र./ पा.पु.वि./ २७ दि. १२/०४/२०२१ अन्वये दि.१३/०४/२०२१रोजीचा दै.देशदूत/ देशोन्नती या अंकात प्रसिद्ध केली असता मुदतीत दि.०५/०५/२०२१ अखेर खालील प्रमाणे निविदा धारकांचे निविदा दर आलेले आहे.

| अ.क्र. | कंत्राटदारा/ठेकेदराचे नाव | दिलेले निविदा दर | शेरा |
|---|---|---|---|
| १ | ऋषभ सतिष खिवसरा | शे.२.००% जास्तीने | |
| २ | **एकविरा कन्स्ट्रकशन** | **अंदाजपत्रकीय दराने** | **सर्वात कमी दर** |
| ३ | अंकित किशोर भंडारी | शे.१.००% जास्तीने | |

वरील प्रमाणे प्राप्त दरास सर्वात कमी दर **मे.एकविरा कन्सट्रकश, धुळे** यांचे अंदाजपत्रकीय दराने आलेले आहे. तरी उक्त **मे.एकविरा कन्सट्रकश, धुळे** यांचे दर हे जास्तीचेआलेले असल्याने संबंधितांना इकडीलजा.क्र./पा.पु.वि./१७२दि. ०३/०६/२०२१ अन्वये दरवाटाघाटीस बोलविले सदर ठेकेदार यांनी सदरचे काम अंदाजपत्रकीय दराने ऐवजी शे.१.००% कमीने करणेस तयारी दर्शविलेली आहे.

तरी दर वाटाघाटी अंती **मे.एकविरा कन्सट्रकशन, धुळे** यांनी दि.०४/०६/२०२१ रोजी दिलेले पत्रानुसार दर शे.१.००% कमीने करणेस संमती दर्शविलेली आहे. सबब सदर काम शे.१.००% कमी दराने आलेले असल्याने यांच्या दरास मंजुरीस्तव मे.स्थायी समिती पुढे ठेवणेस मंजुरीस्तव सादर झालेला आहे.

उक्त कार्यालयीन अहवाल व सन्मा.सदस्यांच्या सहमतीने या कामी वाटाघाटी अंती मे. एकविरा कन्सट्रकशन, धुळे यांचे आलेले शे. १ % कमीने आलेल्या दरांस मान्यता देण्यांत येत आहे. सदर प्रस्ताव व कार्यवाहीबाबत लेखा आक्षेप निर्माण होणार नाही याची दक्षता घ्यावी. याबाबतची जबाबदारी संबंधित विभागाची राहील.

**सर्वानुमते मंजुर,**
**सही/-X X X**
**सभापती,**
**स्थायी समिती,**
**धुळे महानगरपालिका,धुळे**

विषय क्रमांक ७३ धुळे मनपा १४ व्या वित्त आयोग योजनेअंतर्गत साक्री रोड मोती नाला ते पांझरा नदी पावेतोच्या नाल्यास संरक्षण भिंत बांधणेकामी निविदा दर मागविण्यात आलेत त्याबाबत आलेल्या कार्यालयीन अहवालावर विचार करणे.

म. नगरसचिव नगरसचिव यांनी विषयांचे वाचन केले.

म. सुनिल बैसाणे विषय मंजूर करावा.

म. बन्सीलाल जाधव विषय मंजूर करावा.

म. सभापती सन्मा. सदस्यांच्या सहमतीने व कार्यालयीन अहवालास अधिन सदर प्रस्तावास मान्यता देण्यांत येत आहे.

**धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर ८१ दिनांक १०/०६/२०२१**

१४ व्या वित्त आयोग अंतर्गत साक्री रोड मोती नाला ते पांझरा नदी पावेतो नाल्यास संरक्षण भिंत बांधणे कामास धुळे महानगरपालिका स्थायी समिती ठराव नं. १३९ दि. ३०/१२/२०२० मा.आयुक्त, धुळे महानगरपालिका यांचे टिपणी मंजुरीने दिनांक ०१/०४/२०२१ अन्वये उक्त कामाबाबत रक्कम रु.९९,८०,१८५/- खर्चास आर्थिक व प्रशासकीय मंजुरी देणेत आली आहे.

उक्त बाबत शहर अभियंता, धुळे मनपा यांचे पत्र क्र. १०९४ दिनांक ११/०२/२०२१ अन्वये रक्कम रु.९९,८०,१८५/- मात्र खर्चास तांत्रिक मंजुरी मिळालेली आहे.

उक्त कामाबाबत धुळे महानगरपालिका जा.क्र./ पा.पु.वि./ २७ दि.१२/०४/२०२१ अन्वये दि.१३/०४/२०२१ रोजीचा दै.देशदूत/ देशोन्नती या अंकात प्रसिद्ध केली असता मुदतीत दि.०५/०५/२०२१ अखेर खालील प्रमाणे निविदा धारकांचे निविदा दर आलेले आहे.

| अ.क्र. | कंत्राटदारा/ठेकेदराचे नाव | दिलेले निविदा दर | शेरा |
|---|---|---|---|
| **१** | **स्मित कन्सट्रक्शन** | **शे.१४.००% कमीने** | **सर्वात कमी दर** |
| २ | जिग्नेश किशोर खैरनार | अंदाजपत्रकीय दराने | |
| ३ | अ.के.सैफी | शे.१.००% जास्तीने | |
| ४ | सुकन्या सुरेश चौधरी | शे.२.००% जास्तीने | |

वरील प्रमाणे निविदेत भाग घेतलेले ठेकेदार पात्र असून **मे. स्मित कन्सट्रक्शन, धुळे** यांचे दर शे.१४.००% कमी आहे व त्यांनी नियमा प्रमाणे ऑन लाईन बयाणा रक्कम भरलेली आहे. सबब कंत्राटदार **मे.स्मित कन्सट्रक्शन, धुळे** यांची शे.१४.००% कमी दराने आलेले निविदा दर मंजुरीसाठी मे.स्थायी समितीची आवश्यकता असल्याने सदर दरास मंजुरीसाठी मे.स्थायी समिती पुढे ठेवणेस मंजुरीस्तव सादर झालेला आहे.

उक्त कार्यालयीन अहवाल व सन्मा.सदस्यांच्या सहमतीने या कामी **मे. स्मित कन्सट्रक्शन, धुळे** यांची शे.१४.००% कमी दराने आलेल्या दरांस मान्यता देण्यांत येत आहे. सदर प्रस्ताव व कार्यवाहीबाबत लेखा आक्षेप निर्माण होणार नाही याची दक्षता घ्यावी. याबाबतची जबाबदारी संबंधित विभागाची राहील.

**सर्वानुमते मंजुर,**
**सही/-X X X**
**सभापती,**
**स्थायी समिती,**
**धुळे महानगरपालिका,धुळे**

| | |
|---|---|
| विषय क्रमांक ७४ | धुळे मनपा १४ व्या वित्त आयोग योजनेअंतर्गत हाग्रा नाला ते कचरा डेपो पावेतोच्या नाल्यास संरक्षण भिंत बांधणेकामी निविदा दर मागविण्यात आलेत त्याबाबत आलेल्या कार्यालयीन अहवालावर विचार करणे. |
| म. नगरसचिव | नगरसचिव यांनी विषयांचे वाचन केले. |
| म. नागसेन बोरसे | विषय मंजूर करावा. |
| म. शितल नवले | विषय मंजूर करावा. |
| म. सभापती | सन्मा.सदस्यांच्या सहमतीने व कार्यालयीन अहवालास अधिन सदर प्रस्तावास मान्यता देण्यांत येत आहे. |

**धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर ८२ दिनांक १०/०६/२०२१**

१४ व्या वित्त आयोग अंतर्गत हाग्रा नाला ते कचरा डेपो नाल्यास संरक्षण भिंत बांधणे कामास धुळे महानगरपालिका स्थायी समिती ठराव नं. १३९ दि. ३०/१२/२०२० मा.आयुक्त , धुळे महानगरपालिका यांचे टिपणी मंजुरीने दिनांक०१/०४/२०२१ अन्वये उक्त कामाबाबत रक्कम रु.२,७५,५४,५७०/- मात्र खर्चास आर्थिक व प्रशासकीय मंजुरी देणेत आली आहे.

उक्त बाबत सार्वजनिक बांधकाम विभाग , नाशिक यांचे पत्र क्र. १०४६ दिनांक १८/०२/२०२१ अन्वये रक्कम रु.२,७५,५४,५७०/-खर्चास तांत्रिक मंजुरी मिळालेली आहे.

उक्त कामाबाबत धुळे महानगरपालिका जा.क्र./पा.पु.वि./४३दि.१६/०४/२०२१ अन्वये दि.१७/०४/२०२१ रोजीचा दै.पुण्य नगरी/ पोलीस शोध या अंकात प्रसिद्ध केली असता मुदतीत दि.१७/०५/२०२१ अखेर खालील प्रमाणे निविदा धारकांचे निविदा दर आलेले आहे.

| अ.क्र. | कंत्राटदारा/ठेकेदराचे नाव | दिलेले निविदा दर | शेरा |
|---|---|---|---|
| **१** | **मे.स्मित कन्सट्रक्शन** | **शे.१६.००% कमीने** | **सर्वात कमी दर** |
| २ | श्री.आशिष एम. पटवारी | अंदाजपत्रकीय दराने | |
| ३ | श्री.रोहित दिलीप अग्रवाल | शे.५.००% जास्तीने | |
| ४ | श्रीस्वामी समर्थ कन्सट्रक्शन | शे.२.५०% जास्तीने | |

वरील प्रमाणे निविदेत भाग घेतलेले ठेकेदार पात्र असून **मे.स्मित कन्सट्रक्शन,धुळे**यांचे दर शे. १६.००% कमी आहे व त्यांनी नियमा प्रमाणे ऑनलाईन बयाणा रक्कम भरलेली आहे. सबब कंत्राटदार **मे.स्मित कन्सट्रक्शन, धुळे** यांची शे.१६.००% कमी आलेले निविदा दर मंजुरीसाठी मे.स्थायी समितीची आवश्यकता असल्याने सदर दरास मंजुरीसाठी मे.स्थायी समिती पुढे ठेवणेस मंजुरीस्तव सादर झालेला आहे.

उक्त कार्यालयीन अहवाल व सन्मा.सदस्यांच्या सहमतीने या कामी **मे. स्मित कन्सट्रक्शन, धुळे** यांची शे.१६.००% कमी दराने आलेल्या दरांस मान्यता देण्यांत येत आहे. सदर प्रस्ताव व कार्यवाहीबाबत लेखा आक्षेप निर्माण होणार नाही याची दक्षता घ्यावी. याबाबतची जबाबदारी संबंधित विभागाची राहील.

**सर्वानुमते मंजुर,**
**सही/-X X X**
**सभापती,**
**स्थायी समिती,**
**धुळे महानगरपालिका,धुळे**

| | |
|---|---|
| विषय क्रमांक ७५ | धुळे मनपा १४ व्या वित्त आयोग योजनेअंतर्गत वरखेडी रोड कचरा डेपो अंतर्गत रस्ते सिमेंट कॉक्रीट करणेकामी निविदा दर मागविण्यात आलेत त्याबाबत आलेल्या कार्यालयीन अहवालावर विचार करणे. |

म. नगरसचिव — नगरसचिव यांनी विषयांचे वाचन केले.

म. पुष्पा बोरसे — विषय मंजूर करावा.

म. भारती माळी — विषय मंजूर करावा.

म. सभापती — सन्मा. सदस्यांच्या सहमतीने व कार्यालयीन अहवालास अधिन सदर प्रस्तावास मान्यता देण्यांत येत आहे.

**धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर ८३ दिनांक १०/०६/२०२१**

१४ व्या वित्त आयोग अंतर्गत वरखेडी रोड कचरा डेपो अंतर्गत रस्ते सिमेंट कॉंक्रीट करणे कामास धुळे महानगरपालिका स्थायी समिती ठराव नं. १३९ दि. ३०/१२/२०२० मा.आयुक्त , धुळे महानगरपालिका यांचे टिपणी मंजुरीने दिनांक ०१/०४/२०२१ अन्वये उक्त कामाबाबत रक्कम रु.५९,९२,५६०/- मात्र खर्चास आर्थिक व प्रशासकीय मंजुरी देणेत आली आहे.

उक्त बाबत शहर अभियंता, धुळे मनपा यांचे पत्र क्र. १०९३ दिनांक ११/०२/२०२१ अन्वये रक्कम रु.५९,९२,५६०/- मात्र खर्चास तांत्रिक मंजुरी मिळालेली आहे.

उक्त कामाबाबत धुळे महानगरपालिका जा.क्र./ पा.पु.वि./ २७ दि. १२/०४/२०२१ अन्वये दि.१३/०४/२०२१रोजीचा दै.देशदूत/ देशोन्नती या अंकात प्रसिद्ध केली असता मुदतीत दि.०५/०५/२०२१ अखेर खालील प्रमाणे निविदा धारकांचे निविदा दर आलेले आहे.

| अ.क्र. | कंत्राटदारा/ठेकेदराचे नाव | दिलेले निविदा दर | शेरा |
|---|---|---|---|
| १ | अ.के.सैफी | शे.१.००% जास्तीने | |
| २ | सुकन्या सुरेश चौधरी | शे.२.००% जास्तीने | |
| ३ | **अक्षय धीरज माखीजा** | **अंदाजपत्रकीय दराने** | **सर्वात कमी दर** |

वरील प्रमाणे प्राप्त दरास सर्वात कमी दर **श्री.अक्षय धीरज माखीजा,धुळे** यांचे अंदाजपत्रकीय दराने आलेले आहे, तरी उक्त **श्री.अक्षय धीरज माखीजा,धुळे** यांचे दर हे जास्तीचे आलेले असल्याने संबंधितांना इकडील जा.क्र./पा.पु.वि./ १६० दि.०३/०६/२०२१ अन्वये दरवाटाघाटीस बोलविले सदर ठेकेदार यांनी सदरचे काम अंदाजपत्रकीय दराने ऐवजी शे.१.००% कमीने करणेस तयारी दर्शविलेली आहे.

तरी दर वाटाघाटी अंती **श्री.अक्षय धीरज माखीजा, धुळे** यांनी दि.०४/०६/२०२१ रोजी दिलेले पत्रानुसार दर शे.१.००% कमीने करणेस संमती दर्शविलेली आहे. सबब सदर काम शे.१.००% कमी दराने आलेले असल्याने यांच्या दरास मंजुरीस्तव मे.स्थायी समिती पुढे ठेवणेस मंजुरीस्तव सादर झालेला आहे.

उक्त कार्यालयीन अहवाल व सन्मा.सदस्यांच्या सहमतीने या कामी वाटाघाटी अंती श्री.अक्षय धीरज माखीजा,धुळे यांचे आलेले शे.१%कमीने आलेल्या दरांस मान्यता देण्यांत येत आहे.सदर प्रस्ताव व कार्यवाहीबाबत लेखा आक्षेप निर्माण होणार नाही याची दक्षता घ्यावी.याबाबतची जबाबदारी संबंधित विभागाची राहील.

**सर्वानुमते मंजुर,**
**सही/-X X X**
**सभापती,**
**स्थायी समिती,**
**धुळे महानगरपालिका,धुळे**

विषय क्रमांक ७६ — धुळे मनपा १४ व्या वित्त आयोग योजनेअंतर्गत हायवे पुलापासून ते गांडूळ खत प्रकल्पापावेतो रस्ता डांबरीकरण करणे व पोल बसविणेकामी निविदा दर मागविण्यात आलेत त्याबाबत आलेल्या कार्यालयीन अहवालावर विचार करणे.

म. नगरसचिव — नगरसचिव यांनी विषयांचे वाचन केले.

म.कमलेश देवरे — विषय मंजूर करावा.

म. मंगला चौधरी — विषय मंजूर करावा.

म. सभापती — सन्मा. सदस्यांच्या सहमतीने व कार्यालयीन अहवालास अधिन सदर प्रस्तावास मान्यता देण्यांत येत आहे.

**धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर ८४ दिनांक १०/०६/२०२१**

१४ व्या वित्त आयोग अंतर्गत हायवे पुलापासून ते ते गांडूळ खात प्रकल्प पावेतो रस्ता डांबरीकरण करणे व पोल बसविणे कामास धुळे महानगरपालिका स्थायी समिती ठराव नं. १३९ दि.३०/१२/२०२० मा.आयुक्त,धुळे महानगरपालिका यांचे टिपणी मंजुरीने दिनांक ०१/०४/२०२१ अन्वये उक्त कामाबाबत रक्कम रु.९८,९८,८८७/- मात्र खर्चास आर्थिक व प्रशासकीय मंजुरी देणेत आली आहे.

उक्त बाबत शहर अभियंता ,धुळे मनपा यांचे पत्र क्र. १११३ दिनांक २२/०२/२०२१ अन्वये रक्कम रु.९८,९८,८८७/- मात्र खर्चास तांत्रिक मंजुरी मिळालेली आहे.

उक्त कामाबाबत धुळे महानगरपालिका जा.क्र./ पा.पु.वि./ २७ दि.१२/०४/२०२१ अन्वये दि.१३/०४/२०२१रोजीचा दै.देशदूत/ देशोन्नती या अंकात प्रसिद्ध केली असता मुदतीत दि.०५/०५/२०२१ अखेर खालील प्रमाणे निविदा धारकांचे निविदा दर आलेले आहे.

| अ.क्र. | कंत्राटदारा/ठेकेदराचे नाव | दिलेले निविदा दर | शेरा |
|---|---|---|---|
| **१** | **स्मित कन्सट्रक्शन** | **शे.१४.००% कमीने** | **सर्वात कमी दर** |
| २ | ऋषभ सतीष खिवसरा | शे.२.००% जास्तीने | |
| ३ | एकविरा कन्सट्रकशन | शे.३.००% जास्तीने | |
| ४ | अंकित किशोर भंडारी | अंदाजपत्रकीय दराने | |

वरील प्रमाणे निविदेत भाग घेतलेले ठेकेदार पात्र असून **मे.स्मित कन्सट्रक्शन धुळे** यांचे दर शे.१४.००% कमी आहे व त्यांनी नियमा प्रमाणे ऑनलाईन बयाणा रक्कम भरलेली आहे. सबब कंत्राटदार **मे. स्मित कन्सट्रक्शन,धुळे** यांची शे.१४.००% कमी दराने आलेले निविदा दर मंजुरीसाठी मे.स्थायी समितीची आवश्यकता असल्याने सदर दरास मंजुरीसाठी मे.स्थायी समिती पुढे ठेवणेस मंजुरीस्तव सादर झालेला आहे.

उक्त कार्यालयीन अहवाल व सन्मा.सदस्यांच्या सहमतीने या कामी **मे.स्मित कन्सट्रक्शन, धुळे** यांची अंदाजपत्रकीय दरापेक्षा शे.१४.००% कमी दराने आलेल्या दरांस मान्यता देण्यांत येत आहे.सदर प्रस्ताव व कार्यवाहीबाबत लेखा आक्षेप निर्माण होणार नाही याची दक्षता घ्यावी, याबाबतची जबाबदारी संबंधित विभागाची राहील.

**सर्वानुमते मंजुर,**
**सही/-X X X**
**सभापती,**
**स्थायी समिती,**
**धुळे महानगरपालिका,धुळे**

# धुळे महानगरपालिका,धुळे

## नगरसचिव कार्यालय

## स्थायी समिती सभा क्रमांक १४ चे इतिवृत्त

---

**धुळे मनपा भारतरत्न अटलबिहारी वाजपेयी सभागृह**
**शुक्रवार दिनांक १८/०६/२०२१**
**वेळ :-सकाळी ११-०० वाजता.**

धुळे महानगरपालिका स्थायी समितीची ऑन लाईन साप्ताहिक सभा आज शुक्रवार दिनांक १८/०६/२०२१ रोजी सकाळी ११-०० वाजता **मा.श्री संजय सुधाकर जाधव,सभापती**,स्थायी समिती, मनपा,धुळे यांच्या अध्यक्षतेखाली **धुळे मनपा भारतरत्न अटलबिहारी वाजपेयी सभागृह** भरली.ऑनलाईन व ऑफ लाईन सभेस खालील सन्मा.सदस्य सभागृहात हजर होते.

| अ.क्रं. | सदस्यांचे नांव | हुद्दा |
|---|---|---|
| १ | श्री. जाधव संजय सुधाकर | सभापती |
| २ | श्री. बैसाणे सुनिल तुळशिराम | सदस्य |
| ३ | श्रीमती माळी भारती अशोक | सदस्या |
| ४ | श्रीमती पाटील मंगला सुरेश | सदस्या |
| ५ | श्रीमती बोरसे पुष्पा प्रकाश | सदस्या |
| ६ | श्री. मासुळे अमोल पावबा | सदस्य |
| ७ | श्री. देवरे कमलेश नारायण | सदस्य |
| ८ | श्रीमती पठाण हिना अस्लम | सदस्या |
| ९ | श्री. सईद बेग हाशम बेग | सदस्य |
| १० | श्री. नवले शितल मोहन | सदस्य |
| ११ | श्री. बोरसे नागसेन दामोदर | सदस्य |
| १२ | श्रीमती वराडे वैशाली भिकन | सदस्या |
| १३ | श्री. जाधव बन्सीलाल माणिक | सदस्य |
| १४ | श्रीमती चौधरी मंगला अर्जुन | सदस्या |
| १५ | श्री. पटेल अमीन अब्दुल करीम | सदस्य |

**उपस्थित अधिकारी गण**

| अ.क्र. | अधिकाऱ्यांचे नाव | हुद्दा |
|---|---|---|
| १ | श्री. गणेश गिरी | अति.आयुक्त |
| २ | श्रीमती शिल्पा नाईक | उपायुक्त |
| ३ | श्री. शांताराम गोसावी | उपायुक्त |
| ४ | श्री. तुषार नेरकर | सहा.आयुक्त |
| ५ | श्री. विनायक कोते | सहा.आयुक्त |
| ६ | श्रीमती पल्लवी शिरसाठ | सहा. आयुक्त |
| ७ | श्री. दिनकर जाधव | मुख्य लेखाधिकारी |
| ८ | श्री मनोज अरविंद वाघ | प्र.नगरसचिव |

| | | |
|---|---|---|
| ९ | डॉ. महेश मोरे | आरोग्याधिकारी |
| १० | श्री. चंद्रकांत जाधव | सहा.आरोग्याधिकारी |
| ११ | श्री. लक्ष्मण पाटील | सहा.आरोग्याधिकारी |
| १२ | श्री. पी.डी नाईक | लेखापाल |
| १३ | श्री.रमजान अन्सारी | कार्यालय अधिक्षक |
| १४ | श्री. पी.डी. चव्हाण | ओव्हरसिअर बांधकाम |
| १५ | श्री. सी.सी. बागुल | पा. पु. ओव्हरसिअर |
| १६ | श्री. सी.एम. उगले | पा. पु. ओव्हरसिअर |
| १७ | श्री. हेमंत पावटे | ओव्हरसिअर बांधकाम |
| १८ | श्री. कमलेश सोनवणे | ओव्हरसिअर न.र. |
| १९ | श्री. राजकुमार सुर्यवंशी | प्र.परवाना अधिक्षक |
| २० | श्री. गितेश सोनार | विद्युत विभाग |
| २१ | श्री. किशोर सुडके | बाजार विभाग |
| २२ | श्री. प्रसाद जाधव | अति. विभाग प्रमुख |
| २३ | श्री. राजेश गायकवाड | वरिष्ठ सहा. मनपा शि.मं. |
| २४ | श्री. दिपक खोडे | प्रकल्प विभाग |

म.सभापती सर्व उपस्थित सन्मा. सदस्य अति. आयुक्त सो. अधिकारी वर्ग छायाचित्रकार बांधव सभेचे कामकाज चालविणेसाठी आवश्यक तो कोरम पूर्ण झाल्याने नगरसचिव यांनी सभेचे कामकाज सुरुवात करावी.

म. नगरसचिव वंदे मातरम् या राष्ट्रवंदनेसाठी सर्वांनी उभे रहावे.

विषय क्रमांक:- ७७ धुळे म.न.पा.सन २०२१-२२साठी दैनंदिन बाजार फी वसुली करणेचा लिलाव ३ वार करण्यांत आलेला असून उक्त प्रस्ताव माहितीस्तव मे.स्थायी समितीपुढे माहितीस्तव सादर.

म.नगरसचिव नगरसचिव यांनी विषयांचे वाचन केले.

म. शितल नवले सदरचा प्रस्ताव माहितीसाठी सभागृहासमोर आला आहे.तथापि सदर काम हे २५ लाख रुपयांच्या वरील खर्चाचे काम आहे.या प्रस्तावाची दर मंजुरी स्थायी समितीपुढे येणे आवश्यक होते.

म. नगरसचिव कार्यालयीन टिपणी प्रमाणे याबाबत स्थायी समितीने यापूर्वी देकार रक्कम निश्चित केलेली होती. त्यानुसार लिलाव प्रक्रिया करण्यांत आली.

म. सुनिल बैसाणे दैनंदिन बाजार फी वसुलीची कार्यवाही अनेक दिवसांपासून प्रलंबीत होती. प्रशासनाच्या वतीने 42 ते 45 लाखाची देकार रक्कम यापूर्वी निश्चित केलेली होती. परंतु 3 वेळा निविदा काढूनही त्यास प्रतिसाद मिळालेला नव्हता.आपले जे कर्मचारी त्याठिकाणी कार्यरत होते त्यांचे मानधन तथा पगार देखील वसूल होत नव्हता. त्यामुळे स्थायी समिती मार्फत देकार रक्कम निश्चित करुन जाहिर लिलाव प्रक्रिया करण्यांचा निर्णय घेण्यांत आलेला होता.

म. शितल नवले याचा अर्थ आपण त्या रकमेला फक्त प्रशासकीय मान्यता दिलेली होती.

म. सुनिल बैसाणे आपण प्रथम कामाचा अंदाज घेवून त्याप्रमाणे अंदाजपत्रक तयार करतो . त्यानुसार आपण देकार रक्कम निश्चित केलेली होती. देकार रकमेपेक्षा जास्त रक्कम धुळे महानगरपालिकेस मिळालेली आहे.

म. शितल नवले माझा लिलाव देण्याला विरोध नाही परंतु सभागृहापुढे दर मंजुरीसाठी प्रस्ताव येणे आवश्यक होते. परंतु तसे न करता कार्यादेश देऊन विषय माहितीसाठी सादर केलेला आहे.

म. नगरसचिव यापूर्वी स्थायी समितीने देकार रक्कम निश्चित केलेली होती. त्यानुसार आपण जाहीर लिलाव प्रक्रिया केली.लिलावानंतर आलेल्या रकमेसाठी 3 वार करण्यांचे अधिकार मनपा ठराव क्रं.62 दिनांक 10/8/2004 अन्वये आयुक्तांना दिलेले आहे. त्यानुसार सदर दर तीनवार करुन कार्यादेश देण्यांत आल्याचे टिपणीत नमूद आहे.

म. सभापती म. उपायुक्त यांनी याबाबत माहिती द्यावी.

म. उपायुक्त दैनंदिन बाजार फी वसुली बाबत यापूर्वी देखील निविदा प्रक्रिया केलेली होती. परंतु त्यात प्रतिसाद मिळालेला नव्हता. त्यामुळे पुनश्च स्थायी समिती मार्फत देकार रक्कम निश्चित करुन जाहीर लिलाव प्रक्रिया करण्यांत आली. त्यामुळे त्या रकमेस स्थायी समितीने मान्यता दिलेली आहे.

म.शितल नवले — याठिकाणी मी फक्त कायदयाच्या दृष्टीने असणारी बाजू सादर केलेली आहे. ठराव व कायदा याबाबत तपासणी करुनच निर्णय घेतला पाहिजे.

म. सभापती — सदर प्रस्ताव सभागृहास माहितीस्तव अवगत करण्यांत आलेला आहे.

**धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर ८५ दिनांक १८/०६/२०२१**

धुळे महानगरपालिका बाजार विभाग दै. बाजार फी वसुली मक्ता सन २०२१-२२ या वर्षाकरिता संदर्भ क्र.१स्थायी समिती ठरावानुसार रू.२६,६४,६०७/- मात्र या निश्चित सरकारी अंक रकमेवर दि. २०-४-२०२१ रोजी अटी शर्तीसह जाहिर लिलाव ठेवण्यांत आला असता सदर लिलावामध्ये ४ बोली धारकांनी भाग घेतला त्यात जास्तीची बोली मार्केट मुव्हर्स, धुळे सरकारी किंमतीपेक्षा जास्त रू. २६,८०,०००/- आली.

लिलाव मंजुर करणेबाबत धुळे मनपा ठराव क्र. ६२ दि. ६-८-२००४ अन्वये म. आयुक्त सो. यांचेकडे लिलाव तीनवार करणेसाठी टिपणी सादर केली. म. आयुक्त सो. यांचे निर्देशानुसार दि. २७-५-२१ रोजी जास्तीचे बोली धारक श्री. राहुल याज्ञिक यांना निगोसिएशन साठी बोलविले असता त्यांनी रू. २०,०००/- मात्र वाढ करून एकुण २७,००,०००/- मात्र मध्ये मक्ता स्विकारला आहे (अधिक G.S.T. वेगळा) त्यास म. आयुक्त सो. यांनी मंजुरी दिलेली आहे त्यानुसार दि. ३१-५-२०२१ रोजी अनामत रू. ५,००,०००/- मात्र भरले आहे.

तरी उपरोक्त मागणी पत्राबाबत योग्य ते आदेशार्थ तसेच सदरचे मार्केट मुव्हर्स, धुळे यांना रू.२७लक्ष मध्ये जा.क्र./धुमपा/बाजार/३२/२१-२२/दि१०-६-२०२१ नुसार कार्यादश देण्यांत आलेला आहे.तरी सदरील विषय मे.स्थायी समिती पुढे माहितीस्तव सादर करण्यांत आलेला आहे.

सही/-x x x
**सभापती,**
**स्थायी समिती,**
**धुळे महानगरपालिका धुळे**

विषय क्रमांक:-७८ — प्रभाग क्र.१८मधील अ.नं.१ ते १८सुलभ शौचालय देखभाल दुरुस्तीसाठी राधेय सुशिक्षीत बेरोजगार व स्वयंरोजगार सेवा सह.संस्था मर्या.,धुळे या दुस-या संस्थेस देणेबाबत आलेल्या कार्यालयीन अहवालावर विचार करणे.

म.नगरसचिव — नगरसचिव यांनी विषयांचे वाचन केले. या संदर्भात आरोग्य विभागामार्फत काही कार्यवाही प्रस्तावित आहे. याची माहिती सहा. आरोग्याधिकारी यांनी सभागृहात द्यावी.

म. लक्ष्मण पाटील — धुळे शहरातील सर्व सार्वजनिक शौचालयांचे देखभाल दुरुस्तीसाठी आपण नव्याने ई टेंडर पक्रिया राबवित आहोत. त्यामध्ये सदर प्रस्तावित शौचालयांचाही समावेश आहे.

म. शितल नवले — आपली आता ई टेंडर प्रक्रिया सुरु आहे. मनपाची कार्यपध्दती सर्वांना माहित आहे. ई टेंडर प्रक्रिया होवून नव्याने कार्यादेश देणे या संपूर्ण प्रक्रियेत 2-3 महिन्यांचा कालावधी लागणार आहे.आपल्याकडे 4- 4 महिने प्रक्रिया होवून देखील कार्यवाही होत नाही.तो पर्यत आपण देखभाल दुरुस्तीचे काम थांबावयाचे का?

म.अमोल मासुळे — विषय मंजुर करण्यांत यावा.

म. सभापती — सद्यस्थितीत कार्यालयीन अहवालास अधिन राहून सदस्यांच्या सहमतीने प्रस्तावास मान्यता देण्यांत येत आहे.

**धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर ८६ दिनांक १८/०६/२०२१**

प्रभाग क्र.१८ मधील खालील सुलभ शौचालय मनपा मार्फत बांधण्यात आले असुन साफसफाई व देखभाल दुरुस्तीकरीता खालील संस्थांना देण्यात आले आहे.

| अ.क्र. | ठिकाण | पुरुष | स्त्री | साफसफाई करणारी संस्था |
|---|---|---|---|---|
| १ | भटाईमाता रिक्शा स्टॉप | १० | १० | |
| २ | समाधान नगर | ५ | ५ | |
| ३ | वर्षावाडी | ५ | ५ | |
| ४ | पिंपळादेवी नगर | १० | १० | |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ५ | शिवाजी व्या.शाळा | ० | १० | सेवा फाऊंडेशन, पुणे |
| ६ | राजवाडा जवळ | १० | १० | |
| ७ | रेल्वे स्टेशन मोहाडी | १० | १० | |
| ८ | बीएसएनएल ऑफीस | १० | १० | |
| ९ | वाल्मीकी आंबेडकरवसाहत | ५ | ५ | |
| १० | संजय भाऊ नगर | १० | १० | स्व.गोपालजी गोयर बेरोजगार संस्था |
| ११ | दंडेवाले बाबा नगर | १० | १० | अलपसख्यांक स्वयं.संस्था |

उक्त सर्व शौचालयांची साफसफाई व देखभाल दुरुस्ती व्यवस्थीत होत नसल्याने साफसफाई व देखभाल दुरुस्ती करणाऱ्या संस्थे विरुध्द कार्यवाही करणे बाबत भागातील सन्मा.नगरसेवक १) मा.श्री.दगडु भिमा बागुल २) मा.श्री.राजेश इश्वर पवार ३) मा.सौ.सुरेखा भागवत देवरे ४) मा.सौ.सारीका प्रविण अग्रवाल यांनी यापुर्वी पत्र सादर केले असता स्व.निरीक्षक यांनी पाहणी करुन दिलेल्या अहवालानुसार उक्त ३ संस्थंना कार्यालयामार्फत नोटीस देवुन ७ दिवसाच्या खुलासा मागविण्यात आला असता फक्त सेवा फाऊंडेशन यांनी मुदतीत खालील प्रमाणे खुलासा सादर केलेला आहे उर्वरीत दोन संस्थानी अद्याप खुलासा सादर केलेला नाही.

आमच्या संस्थेला प्रभाग क्र.१८मधील खालील सार्व.शौचालय साफसफाई व देखभाल दुरुस्तीसाठी देण्यात आले आहे.

| अ.क्र. | ठिकाण | पुरुष | स्त्री |
|---|---|---|---|
| १ | भटाईमाता रिक्शा स्टॉप | १० | १० |
| २ | समाधान नगर | ५ | ५ |
| ३ | वर्षावाडी | ५ | ५ |
| ४ | पिंपळादेवी नगर | १० | १० |
| ५ | शिवाजी व्यायाम शाळा | ० | १० |
| ६ | राजवाडा जवळ | १० | १० |
| ७ | रेल्वे स्टेशन मोहाडी | १० | १० |
| ८ | बीएसएनएल ऑफीस | १० | १० |
| ९ | वाल्मीकी आंबेडकर वसाहत | ५ | ५ |

तरी वरील शौचालयात व्यवस्थीतपणे साफसफाई होत नसल्याबाबत व मोठी दुरुस्तीच्या कामाबाबत भागातील सन्मा.नगरसेवक यांनी पत्र दिले असुन स्वच्छता निरीक्षक यांनी अहवाल दिला आहे.

उक्त संदर्भीय सन्मा.नगरसेवक यांच्या पत्रानुसार प्रभाग क्र.१८ मधील उक्त सर्व सुलभ शौचालय साफसफाईसाठी देण्यात आलेल्या उक्त संस्था काम व्यवस्थीत करीत नसल्याने सदर शौचालयाकडुन काम काढुन राधेय सुशिक्षीत बेरोजगार व स्वयंरोजगार सेवा सह.संस्था मर्या., धुळे या नोंदणीकृत संस्थेस मे.स्थायी समितीच्या मान्यतेने शौचालयाचे काम देणे बाबत शिफारस केले आहे.

राधेय सुशिक्षीत बेरोजगार व स्वयंरोजगार सेवा सह.संस्था मर्या.,धुळे यांनी नोंदणी प्रमाणपत्र जोडुन उक्त शौचालयांचे काम साफसफाई देखभाल दुरुस्तीसाठी मिळणे बाबत विनंती केली आहे.

त्यानुसार मे.स्थायी समिती ठराव क्र.९६ दि.२१/१२/२०१७ अन्वये मंजुर केलेल्या ठरावा नुसार व जा.क्र./ धुमपा / आरोग्य/ ५८ दि.४/६/२०२० अन्वये खालील दरानुसार मनपा मार्फत नियुक्त केलेल्या १० संस्थंना शहरातील १३९ युनिट सार्व.शौचालय साफसफाई व देखभाल दुरुस्तीसाठी देण्यात आलेले आहे.

| सिट संख्या | साफसफाई | लाईट बिल | दुरुस्ती | एकुण |
|---|---|---|---|---|
| १० | ७६०७ | २३१५ | १००० | १०९२२ |
| २० | ७७७२ | ४६३० | २००० | १४४०२ |
| ३० | १४९६५ | ६९४६ | २००० | २३९११ |

उक्त् संदर्भ क्र.२ चे सन्मा.नगरसेवक हे वेळोवेळी इकडील कार्यालयात भेटी देवुन संबंधीत कार्यरत संस्थेविरुध्द त्यांनी दिलेलया पत्रानुसार कार्यवाही करुन मे.स्थायी समितीच्या मान्यतेने राधेय सुशिक्षीत बेरोजगार व स्वयंरोजगार सेवा सह.संस्था मर्या., धुळे यांना देवुन उक्त शौचालय साफसफाई देखभालसाठी देणे बाबत वेळोवेळी मागणी करीत आहे. तसेच सदर संस्था हि नविन असुन यापुर्वी सदर संस्थेला मे. स्थायी समितीची मान्यता नाही.

सन्मा. नगरसेवक यांनी शिफारस केल्यानुसार उक्त शौचालय साफसफाईसाठी राधेय सुशिक्षीत बेरोजगार व स्वयंरोजगार सेवा सह.संस्था मर्या.,धुळे या संस्थेला देणे बाबत अहवाल ठेवण्यात आला असता त्यास मा.उपायुक्त सो.यांनी नविन निविदा प्रक्रिया विभागाने तातडीने करणे आवश्यक आहे.तोपर्यंत मे.स्थायी समितीच्या मान्यतेने विभागाने प्रस्तावीत केल्यानुसार मान्यता देण्यास हरकत नाही असे नमुद करुन मा.आयुक्त सो.यांनी नविन Panel निर्माण करण्याची प्रक्रिया अधिक गतिशिल करा तोपर्यंत अ प्रमाणे स्थायी समितीपुढे सादर झालेला आहे.

उक्त कार्यालयीनअहवाल व सन्मा.सदस्यांनी चर्चेत सुचित केल्यानुसार शौचालयांची नवीन निविदा प्रक्रिया पूर्ण होई पावेतो सन्मा.नगरसेवक यांनी शिफारस केल्यानुसार उक्त शौचालय साफसफाई व देखभाल दुरुस्तीसाठी राधेय सुशिक्षीत बेरोजगार व स्वयंरोजगार सेवा सह.संस्था मर्या.,धुळे या संस्थेला देणेस मान्यता देण्यांत येत आहे.सदर प्रस्ताव व कार्यवाहीबाबत लेखा आक्षेप निर्माण होणार नाही याची दक्षता घ्यावी. याबाबतची जबाबदारी संबंधित विभागाची राहील.

**सर्वानुमते मंजुर,**

सही/-x x x

**सभापती,**

**स्थायी समिती,**

**धुळे महानगरपालिका धुळे**

विषय क्रमांक:- ७९ प्रभाग क्रं. १८ मोहाडी भागात कॉंक्रीट गटार करण्यांचे काम तांतडीने विना निविदा श्री. गौरव विजय बुरकुले यांचेकडून करुन घेण्यांत आले, त्यासाठी झालेला खर्च रु.२,५२,५४२/- मात्रला कार्योत्तर मान्यता देणेबाबत आलेल्या कार्यालयीन अहवालावर विचार करणे.

म.नगरसचिव नगरसचिव यांनी विषयांचे वाचन केले.

म.शितल नवले विषय मंजुर करण्यांत यावा.

म. सभापती सर्व सन्मा. सदस्यांच्या सहमतीने व कार्यालयीन अहवालास अधिन राहून सदर प्रस्तावास कार्योत्तर मान्यता देण्यांत येत आहे.

**धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर ८७ दिनांक १८/०६/२०२१**

प्रभाग क्रं. 18 मधील मोहाडी भागात श्री. सातभाई यांच्या घराजवळ जुनी गटार तुटल्याने परिसरात घाण पाणी साचले होतजे तरी मा. महापौर सो. स्थायी समिती सभापती सो.,सन्मा.सदस्या सौ.सुरेखा भगवान देवरे व सन्मा.सदस्य श्री.नागसेन बोरसे यांच्या सुचनानुसार सदरचे काम तांतडीने काम करणे गरजेचे होते तसेच सदर कामास रु. 2,52,542/- मात्रचा खर्च झालेला असून सदरचे काम श्री. गौरव विजय बुरकुले यांच्याकडून सदर कामाचा खर्च मंजुरीकरिता महानगरपालिका अधिनियम 1949 कलम 5(2)(2) नुसार मे. स्थायी समितीपुढे मान्यतेस्तव सादर झाला आहे.

सर्व सन्मा. सदस्यांच्या सहमतीने व कार्यालयीन अहवालास अधिन राहून सदर कामी झालेला खर्च रु.2,52,542/-मात्रला महानगरपालिका अधिनियम 1949 कलम 5(2)(2) नुसार कार्योत्तर मान्यता देण्यांत येत आहे. सदर प्रस्ताव व कार्यवाहीबाबत लेखा आक्षेप निर्माण होणार नाही याची दक्षता घ्यावी. याबाबतची जबाबदारी संबंधित विभागाची राहील. **सर्वानुमते मंजुर,**

सही/-x x x

**सभापती,**

**स्थायी समिती,**

**धुळे महानगरपालिका धुळे**

विषय क्रमांक:- ८० प्र.क्र. १८ रायझिंग मेन पिराची टेकडी ते म्हाडा वस्ती पावेतो क्रॉस कनेक्शन करणेचे काम तांतडीने श्री. संजय दगडु गायकवाड यांचेकडून विना निविदा करुन घेण्यांत आले,त्यासाठी झालेला खर्च रुपय

३,७५,९१७/-मात्रला महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम नियम ६७(क) अन्वये कार्योत्तर मंजुरी देणेबाबत आलेल्या कार्यालयीन अहवालावर विचार करणे.

म.नगरसचिव — नगरसचिव यांनी विषयांचे वाचन केले.

म.अमोल मासुळे — विषय मंजुर करण्यांत यावा.

म. सभापती — सर्व सन्मा.सदस्यांच्या सहमतीने व कार्यालयीन अहवालास अधिन राहून सदर प्रस्तावास कार्योत्तर मान्यता देण्यांत येत आहे.

**धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर ८८ दिनांक १८/०६/२०२१**

धुळे मनपा हद्दीतील प्र.क्र. १८ येथे पाणीपुरवठा करणेस अडचण निर्माण झाल्याने सदरचा ठिकाणील रायझिंग मेन पिराची टेकडी ते म्हाडा वस्ती पावेतो पाईप लाईनला क्रॉस कनेक्शन केल्यास सदरील ठिकाणील पाणी प्रश्नाची अडचण दूर होणार असल्याने सदर ठिकाणी क्रॉस कनेक्शन करणे आवश्यक असल्याने सदर भागात समक्ष पहाणी करून अंदाजपत्रक तयार केले असता उक्त कामी अंदाजपत्रकीय खर्च रु.३,७५,९१७/-मात्र येणार आहे.

तरी उक्त काम हे नागरिकांचा पिण्याचा पाणीचा प्रश्नाशी निगडीत असल्याने सदरचे काम विना निविदा श्री.संजय दगडु गायकवाड, ठेकेदार, धुळे यांचे कडुन करून घेण्यात आलेले असून सदरचे काम मुंबई प्रांतिक अधिनियम नियम ६७ (क) अन्वये विना निविदा करण्यास मंजुरीसाठी व अंदाजपत्रकीय खर्च रु.३,७५,९१७/- मात्र खर्चास कार्योत्तर मंजुरीसाठी मे. स्थायी समितीपुढे ठेवणेस मंजुरीस्तव सादर झाला आहे. **सर्व सन्मा.सदस्यांच्या सहमतीने व कार्यालयीन अहवालास अधिन राहून सदर कामी झालेला खर्च रु.३,७५,९१७/- मात्रला महानगरपालिका अधिनियम अधिनियम नियम ६७(क) अन्वये कार्योत्तर मान्यता देण्यांत येत आहे.** सदर प्रस्ताव व कार्यवाहीबाबत लेखा आक्षेप निर्माण होणार नाही याची दक्षता घ्यावी.याबाबतची जबाबदारी संबंधित विभागाची राहील.

**सर्वानुमते मंजुर,**
सही/-x x x
**सभापती,**
**स्थायी समिती,**
**धुळे महानगरपालिका धुळे**

विषय क्रमांक:- ८९ — शाळा दुरुस्ती अंतर्गत प्र.क्र.१३ मध्ये शाळा क्र.२० परिसरात वॉल कंपाऊंड करणेचे निविदा दर मागविण्यांत आलेत, त्याबाबत आलेल्या कार्यालयीन अहवालावर विचार करणे.

म.नगरसचिव — नगरसचिव यांनी विषयांचे वाचन केले.

म. कमलेश देवरे — विषय मंजुर करण्यांत यावा.

म. अमीन पटेल — विषय मंजुर करण्यांत यावा.

म. सभापती — सर्व सन्मा.सदस्यांच्या सहमतीने व कार्यालयीन अहवालास अधिन राहून सदर प्रस्तावास मान्यता देण्यांत येत आहे.

**धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर ८९ दिनांक १८/०६/२०२१**

शाळा दुरुस्ती अंतर्गत प्र.क्र.१३ मध्ये शाळा क्र.२० परिसरात वॉल कंपाऊंड करणे कामाबाबत धुळे महानगरपालिका महासभा ठराव नं.११२ दि.१२/११/२०२० मा.आयुक्त सो. धुळे महानगरपालिका यांनी टिपणी मंजुरीने दि.०९/०३/२०२१ अन्वये उक्त कामाबाबत रक्कम रु.३८,०९,७६३/- मात्र खर्चाचा आर्थिक व प्रशासकीय मंजुरी देणेत आली आहे.

उक्त कामाबाबत शहर अभियंता मनपा धुळे यांचे पत्र क्र./१२७३/२०दि. १२/०३/२०२१ अन्वये रक्कम रु.३९,९८,१५७/- मात्र खर्चास तांत्रिक मंजुरी मिळालेली आहे.

उक्त कामाबाबत धुळे महानगरपालिका जा.क्र./बा.वि./२६९/२०२१ दि. ३१/०३/२०२१ अन्वये दि.०१/०४/२०२१ रोजीचे दै.नवभारत/वार्ता या वृत्तपत्रात जाहीर निविदा प्रसिद्ध करणेत येऊन दि.२२/०४/२०२१ रोजी निविदा दर मागविण्यात आले आहेत. पात्र कंत्राटदार यांनी निविदेबाबत ऑनलाईन पद्धतीने बयाणा रक्कम भरून निविदा दर सादर केलेले आहेत.

| अ.क्र. | कंत्राटदार किंवा ठेकेदाराचे नाव | दिलेले निविदा दर | शेरा |
|---|---|---|---|

| | | | |
|---|---|---|---|
| १ | श्री स्वामी समर्थ कन्स्ट्रक्शन | श.२% जास्तीने | |
| २ | मे.रामेश्वर ट्रेडर्स | **अंदाजपत्रक दर** | **सर्वात कमी दर** |
| ३ | आशिष एम.पटवारी | श.१% जास्तीने | |

वरील प्रमाणे निविदेत भाग घेतलेले ठेकेदार पात्र असून श्री/ **मे.रामेश्वर ट्रेडर्स** यांनी दिलेले दर अंदाजपत्रकीय दर असून त्यांनी नियमा प्रमाणे ऑनलाईन बयाणा रक्कम भरलेली आहे. **मे.रामेश्वर ट्रेडर्स** यांना मा.आयुक्त सो. यांचे आदेशानुसार **मे.रामेश्वर ट्रेडर्स** यांना दि.०२/०६/२०२१ रोजी दरवाटाघाटी करीता बोलावले असता त्यांनी दि.०४/०६/२०२१ रोजी दिलेल्या पत्रात श.१% कमी दराने काम करण्यास तयार असलेबाबत पत्र सादर केलेले आहे. त्यानुसार मा.आयुक्त सो. यांनी मान्यता दिलेली आहे. तरी **मे.रामेश्वर ट्रेडर्स** यांचे श.१%कमीचे दरास मे.स्थायी समिती पुढे ठेवणेस मंजुरीस्तव सादर झालेला आहे.

सर्व सन्मा.सदस्यांच्या सहमतीने व कार्यालयीन अहवालास अधिन राहून सदर कामी निगोसिएशन अंती **मे.रामेश्वर ट्रेडर्स** यानी दिलेल्या पत्रानुसार शेकडा १ % कमीचे आलेल्या दरांस मान्यता देण्यांत येत आहे. सदर प्रस्ताव व कार्यवाहीबाबत लेखा आक्षेप निर्माण होणार नाही याची दक्षता घ्यावी.याबाबतची जबाबदारी संबंधित विभागाची राहील.

**सर्वानुमते मंजुर,**
सही/-x x x
**सभापती,**
**स्थायी समिती,**
**धुळे महानगरपालिका धुळे**

विषय क्रमांक:- ८२ — नगररचना विभागाकडील विकास शुल्क अंतर्गत धुळे मनपा हद्दीतील देवपूर भागांतील जयहिंद सिनिअर कॉलेज ते जयहिंद स्विमिंग टँक पावेतो रस्ता डांबरीकरण करणेचे निविदा दर मागविण्यांत आलेत त्याबाबत आलेल्या आलेल्या कार्यालयीन अहवालावर विचार करणे.

म.नगरसचिव — नगरसचिव यांनी विषयांचे वाचन केले.

म. शितल नवले — सदर रस्ता हा अतिशय खराब अवस्थेत होता सदर रस्त्यांचे काम घेतल्याबद्दल मी प्रशासनाचे अभिनंदन करतो. परंतु सदर काम आपल्या भाजपाच्या कारकिर्दीत मंजूर झालेले आहे. सदर कामाची प्रक्रिया सुमारे 4 महिन्यांपासून सुरु आहे.परंतु कामाचे श्रेय घेण्याच्या नादात आमदरांनी कालच या रस्त्यांची पहाणी करुन दुरुस्तीचे आदेश देण्यांचा देखावा केला.हे अतिशय हास्यास्पद व निषेधजनक आहे. कामाचा कार्यादेश आपण देणार आहोत.यांची माहिती घेवून श्रेय लाटण्याच्या या कृत्याचा निषेध व्यक्त करतो. यांची इतिवृत्तांत नोंद करावी.

म. अमीन पटेल — विकास शुल्कांतर्गत माझ्या प्रभागातील नॅशनल हायस्कूल जवळील रस्त्यांचे कामही घेण्यांत यावे. सदर ठिकाणी शाळेचे विद्यार्थी वापर करतात.सदर रस्ता अत्यंत खराब झालेला आहे. आपण स्वत: पहाणी करावी व या निधी अंतर्गत रस्ता घेण्यांत यावा.

म. सभापती — निधी अंतर्गत असणारी कामे निश्चितीचा अधिकार महासभेचा व महापौरांचा आहे. आपण त्यांच्याकडे प्रस्ताव द्यावा.

सर्व सन्मा.सदस्यांच्या सहमतीने व कार्यालयीन अहवालास अधिन राहून सदर प्रस्तावास मान्यता देण्यांत येत आहे.

**धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर ९० दिनांक १८/०६/२०२१**

नगररचना विभागाकडील विकास शुल्क अंतर्गत धुळे मनपा हद्दीतील देवपूर भागांतील जयहिंद सिनिअर कॉलेज ते जयहिंद स्विमिंग टँक पावेतो रस्ता डांबरीकरण करणे रक्कम रु.84,48,033/- मात्र आदेशित करण्यात आले होते.त्यानुसार सदर कामास तांत्रिक मान्यता घेऊन उक्त कामाची ई-निविदा सूचना क्र.148 दि. 04/03/2021 नुसार दै. दिव्य मराठी/आपला महाराष्ट्र/मर्डर वृत्तपत्रात प्रसिद्ध करण्यात आली होती. त्यानुसार सदर कामाच्या निविदेत खालीलप्रमाणे निविदाधारकांनी भाग घेतला आहे.

| अ.क्र | निविदाधारकांचे नाव | दिलेले निविदा दर | शेरा |
|---|---|---|---|

| | | | |
|---|---|---|---|
| 1) | ऋषभ सतीश खिवसरा | शे.3 % जास्तीने | |
| 2) | मे.एकविरा कन्सट्रक्शन | अंदाजपत्रकीय दर | **सर्वात कमी दर** |
| 3) | भूषण लक्ष्मण चौधरी | शे.5 % जास्तीने | |

उक्त बाबत मे.एकविरा कन्सट्रक्शन यांचे दर सर्वात कमी (अंदाजपत्रकीय दर) असल्याने त्यांना दर वाटाघाटी करणे कामी बोलविण्यात आले होते.त्यानुसार मक्तेदार मे.एकविरा कन्सट्रक्शन यांनी सदर काम शे.1 % कमी दराने करणे बाबत पत्र दिले आहे.

त्यानुसार मक्तेदार मे. एकविरा कन्सट्रक्शन यांचे दर शे. 1 % कमीने असल्याने मे.एकविरा कन्सट्रक्शन यांना उक्त काम देणे बाबत मे. स्थायी समिती पुढे मंजुरीस्तव सादर झालेला आहे.

सर्व सन्मा. सदस्यांच्या सहमतीने व कार्यालयीन अहवालास अधिन राहून सदर कामी निगोसिएशन अंती मे. एकविरा कन्सट्रक्शन यानी दिलेल्या पत्रानुसार शेकडा 1 % कमीचे आलेल्या दरांस मान्यता देण्यांत येत आहे. सदर प्रस्ताव व कार्यवाहीबाबत लेखा आक्षेप निर्माण होणार नाही याची दक्षता घ्यावी.याबाबतची जबाबदारी संबंधित विभागाची राहील. **सर्वानुमते मंजुर,**

सही/-x x x
**सभापती,**
**स्थायी समिती,**
**धुळे महानगरपालिका धुळे**

विषय क्रमांक:- ८३ नगररचना विभागाकडील विकास शुल्कअंतर्गत धुळे मनपा हद्दीतील देवपूर भागांतील जयहिंद सिनिअर कॉलेज ते जयहिंद स्विमिंग टॅक पावेतो रस्त्याच्या दोन्ही बाजूस बंदिस्त गटार करणेचे निविदा दर मागविण्यांत आलेत त्याबाबत आलेल्या आलेल्या कार्यालयीन अहवालावर विचार करणे.

म.नगरसचिव नगरसचिव यांनी विषयांचे वाचन केले.

म. सुनिल बैसाणे विषय मंजूर करण्यांत यावा.

म. सभापती सर्व सन्मा.सदस्यांच्या सहमतीने व कार्यालयीन अहवालास अधिन राहून सदर प्रस्तावास मान्यता देण्यांत येत आहे.

**धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर ९१ दिनांक १८/०६/२०२१**

नगररचना विभागाकडील विकास शुल्क अंतर्गत धुळे मनपा हद्दीतील देवपूर भागांतील जयहिंद सिनिअर कॉलेज ते जयहिंद स्विमिंग टॅक पावेतो रस्त्याच्या दोन्ही बाजूस बंदिस्त गटार करणे.रक्कम रु.९६,९९,९००/- मात्र आदेशित करण्यात आले होते.त्यानुसार सदर कामास तांत्रिक मान्यता घेऊन उक्त कामाची ई-निविदा सूचना क्र.१४८ दि.०४/०३/२०२१ नुसार दै.दिव्य मराठी/आपला महाराष्ट्र/मर्डर वृत्तपत्रात प्रसिद्ध करण्यात आली होती.त्यानुसार सदर कामाच्या निविदेत खालीलप्रमाणे निविदाधारकांनी भाग घेतला आहे.

| अ.क्र | निविदाधारकांचे नाव | दिलेले निविदा दर | शेरा |
|---|---|---|---|
| १) | सुकन्या सुरेश चौधरी | शे.२ % जास्तीने | |
| २) | ऐ.के.सैफी | शे.१ % जास्तीने | |
| ३) | सचिन नानाभाऊ आखाडे | अंदाजपत्रकीय दर | **सर्वात कमी दर** |

उक्त बाबत मक्तेदार **सचिन नानाभाऊ आखाडे** यांचे दर सर्वात कमी (अंदाजपत्रकीय दर) असल्याने त्यांना दर वाटाघाटी करणे कामी बोलविण्यात आले होते.त्यानुसार मक्तेदार सचिन नानाभाऊ आखाडे यांनी सदर काम शे.१ % कमी दराने करणे बाबत पत्र दिले आहे.

त्यानुसार मक्तेदार सचिन नानाभाऊ आखाडे यांचे दर शे.१ % कमीने असल्याने मक्तेदार सचिन नानाभाऊ आखाडे यांना उक्त काम देणे बाबत मे.स्थायी समिती पुढे मंजुरीस्तव सादर झालेला आहे.

सर्व सन्मा. सदस्यांच्या सहमतीने व कार्यालयीन अहवालास अधिन राहून सदर कामी निगोसिएशन अंती सचिन नानाभाऊ आखाडे यानी दिलेल्या पत्रानुसार शेकडा १ % कमीचे आलेल्या

दरांस मान्यता देण्यांत येत आहे. सदर प्रस्ताव व कार्यवाहीबाबत लेखा आक्षेप निर्माण होणार नाही याची दक्षता घ्यावी.याबाबतची जबाबदारी संबंधित विभागाची राहील. **सर्वानुमते मंजुर,**

सही/-x x x
**सभापती,**
**स्थायी समिती,**
**धुळे महानगरपालिका धुळे**

विषय क्रमांक:- ८४ नगररचना विभागाकडील विकास शुल्क अंतर्गत धुळे मनपा हद्दीतील देवपूर भागांतील क्षिरे कॉलनी भागांत १) वाडीभोकर रोड ते ओझोन अॅक्वा पावेतो २) क्षिरे कॉलनी जलकुंभ ते पंचायत समितीच्या मागील बाजूपर्यंत ३) श्री.उपाध्ये ते श्री.बोरसे यांच्या घरापावेतो ४) श्री. जोशी ते नाल्यापावेतोचा रस्ता डांबरीकरण करणे व धुळे मनपा हद्दीतील देवपूर भागांतील क्षिरे कॉलनी भागांत वाडीभोकर रोड ते नाला पावेतो रस्त्याच्या दोन्ही बाजूस गटार करणेचे निविदा दर मागविण्यांत आलेत त्याबाबत आलेल्या आलेल्या कार्यालयीन अहवालावर विचार करणे.

म.नगरसचिव नगरसचिव यांनी विषयांचे वाचन केले.

म.कमलेश देवरे विषय मंजूर करण्यांत यावा.

म. सभापती सर्व सन्मा.सदस्यांच्या सहमतीने व कार्यालयीन अहवालास अधिन राहून सदर प्रस्तावास मान्यता देण्यांत येत आहे.

**धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर ९२ दिनांक १८/०६/२०२१**

नगररचना विभागाकडील विकास शुल्क अंतर्गत धुळे मनपा हद्दीतील देवपूर भागांतील क्षिरे कॉलनी भागांत १)वाडीभोकर रोड ते ओझोन अॅक्वा पावेतो २) क्षिरे कॉलनी जलकुंभ ते पंचायत समितीच्या मागील बाजूपर्यंत ३)श्री.उपाध्ये ते श्री.बोरसे यांच्या घरापावेतो ४)श्री.जोशी ते नाल्यापावेतोचा रस्ता डांबरीकरण करणेव धुळे मनपा हद्दीतील देवपूर भागांतील क्षिरे कॉलनी भागांत वाडीभोकर रोड ते नाला पावेतो रस्त्याच्या दोन्ही बाजूस गटार करणे रक्कम रु.६३,६८,४५२/-मात्र आदेशित करण्यात आले होते.त्यानुसार सदर कामास तांत्रिक मान्यता घेऊन उक्त कामाची ई-निविदा सूचना क्र.१४८ दि. ०४/०३/२०२१ नुसार दै.दिव्य मराठी/आपला महाराष्ट्र/मर्डर वृत्तपत्रात प्रसिद्ध करण्यात आली होती.त्यानुसार सदर कामाच्या निविदेत खालीलप्रमाणे निविदाधारकांनी भाग घेतला आहे.

| अ.क्र | निविदाधारकांचे नाव | दिलेले निविदा दर | शेरा |
|---|---|---|---|
| १) | अे.पी.तनेजा | शे.७ % जास्तीने | |
| २) | राधेय कन्सट्रक्शन | अंदाजपत्रकीय दर | **सर्वात कमी दर** |
| ३) | आशिष एम.पटवारी | शे.५ % जास्तीने | |

उक्त बाबत मक्तेदार राधेय कन्सट्रक्शन यांचे दर सर्वात कमी (अंदाजपत्रकीय दर)असल्याने त्यांना दर वाटाघाटी करणे कामी बोलविण्यात आले होते. त्यानुसार मक्तेदार राधेय कन्सट्रक्शन यांनी सदर काम शे.१% कमी दराने करणे बाबत पत्र दिले आहे.

त्यानुसार मक्तेदार राधेय कन्सट्रक्शन यांचे दर शे. १% कमीने असल्याने मक्तेदार **राधेय कन्सट्रक्शन** यांना उक्त काम देणे बाबत मे. स्थायी समितीपुढे मंजुरीस्तव सादर झालेला आहे.

सर्व सन्मा. सदस्यांच्या सहमतीने व कार्यालयीन अहवालास अधिन राहून सदर कामी निगोसिएशन अंती **राधेय कन्सट्रक्शन** यानी दिलेल्या पत्रानुसार शेकडा १ % कमीचे आलेल्या दरांस मान्यता देण्यांत येत आहे. सदर प्रस्ताव व कार्यवाहीबाबत लेखा आक्षेप निर्माण होणार नाही याची दक्षता घ्यावी.याबाबतची जबाबदारी संबंधित विभागाची राहील. **सर्वानुमते मंजुर,**

सही/-x x x
**सभापती,**
**स्थायी समिती,**
**धुळे महानगरपालिका धुळे**

विषय क्रमांक:- ८५ नगररचना विभागाकडील विकास शुल्क अंतर्गत धुळे मनपा हद्दीतील गायकवाड चौक ते वरखेडी रोड पुलापर्यंत सिमेंट कॉक्रीट रस्ता करणेचे निविदा दर मागविण्यांत आलेत त्याबाबत आलेल्या आलेल्या कार्यालयीन अहवालावर विचार करणे.

म.नगरसचिव नगरसचिव यांनी विषयांचे वाचन केले.

म.अमोल मासुळे विषय मंजूर करण्यांत यावा.

म. सभापती सर्व सन्मा.सदस्यांच्या सहमतीने व कार्यालयीन अहवालास अधिन राहून सदर प्रस्तावास मान्यता देण्यांत येत आहे.

**धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर ९३ दिनांक १८/०६/२०२१**

नगररचना विभागाकडील विकास शुल्क अंतर्गत धुळे मनपा हद्दीतील गायकवाड चौक ते वरखेडी रोड पुलापर्यंत सिमेंट कॉक्रीट रस्ता करणे रक्कम रु.९८,००,०००/- मात्र आदेशित करण्यात आले होते.त्यानुसार सदर कामास तांत्रिक मान्यता घेऊन उक्त कामाची ई-निविदा सूचना क्र.१४८ दि.०४/०३/२०२१ नुसार दै.दिव्य मराठी/आपला महाराष्ट्र /मर्डर वृत्तपत्रात प्रसिद्ध करण्यात आली होती.त्यानुसार सदर कामाच्या निविदेत खालीलप्रमाणे निविदाधारकांनी भाग घेतला आहे.

| अ.क्र | निविदाधारकांचे नाव | दिलेले निविदा दर | शेरा |
|---|---|---|---|
| १) | ऋषभ सतीश खिवसरा | शे.३ % जास्तीने | |
| २) | भूषण लक्ष्मण चौधरी | शे.२ % जास्तीने | |
| ३) | मे.एकविरा कन्सट्रक्शन | अंदाजपत्रकीय दर | **सर्वात कमी दर** |

उक्त बाबत मे.एकविरा कन्सट्रक्शन यांचे दर सर्वात कमी (अंदाजपत्रकीय दर) असल्याने त्यांना दर वाटाघाटी करणे कामी बोलविण्यात आले होते.त्यानुसार मक्तेदार मे.एकविरा कन्सट्रक्शन यांनी सदर काम शे.१ % कमी दराने करणे बाबत पत्र दिले आहे.

त्यानुसार मक्तेदार मे.एकविरा कन्सट्रक्शन यांचे दर शे.१ % कमीने असल्याने मे.एकविरा कन्सट्रक्शन यांना उक्त काम देणे बाबत मे.स्थायी समिती पुढे मंजुरीस्तव सादर झालेला आहे.

सर्व सन्मा. सदस्यांच्या सहमतीने व कार्यालयीन अहवालास अधिन राहून सदर कामी निगोसिएशन अंती मे.एकविरा कन्सट्रक्शन यानी दिलेल्या पत्रानुसार शेकडा १ % कमीचे आलेल्या दरांस मान्यता देण्यांत येत आहे. सदर प्रस्ताव व कार्यवाहीबाबत लेखा आक्षेप निर्माण होणार नाही याची दक्षता घ्यावी.याबाबतची जबाबदारी संबंधित विभागाची राहील. **सर्वानुमते मंजुर.**

सही/-x x x
**सभापती,**
**स्थायी समिती,**
**धुळे महानगरपालिका धुळे**

विषय क्रमांक:- ८६ नगररचना विभागाकडील विकास शुल्क अंतर्गत धुळे मनपा हद्दीतील गायकवाड चौक ते वरखेडी रोड पुलापर्यंत बंदिस्त गटार करणेचे निविदा दर मागविण्यांत आलेत त्याबाबत आलेल्या आलेल्या कार्यालयीन अहवालावर विचार करणे.

म.नगरसचिव नगरसचिव यांनी विषयांचे वाचन केले.

म.अमोल मासुळे विषय मंजूर करण्यांत यावा.

म. सभापती सर्व सन्मा.सदस्यांच्या सहमतीने व कार्यालयीन अहवालास अधिन राहून सदर प्रस्तावास मान्यता देण्यांत येत आहे.

**धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर ९४ दिनांक १८/०६/२०२१**

नगररचना विभागाकडील विकास शुल्क अंतर्गत धुळे मनपा हद्दीतील गायकवाड चौक ते वरखेडी रोड पुलापर्यंत बंदिस्त गटार करणे रक्कम रु.४९,६९,८८३/- मात्र आदेशित करण्यात आले होते.त्यानुसार सदर कामास तांत्रिक मान्यता घेऊन उक्त कामाची ई-निविदा सूचना क्र.१४८ दि.०४/०३/२०२१ नुसार दै.दिव्य मराठी/आपला महाराष्ट्र/मर्डर वृत्तपत्रात प्रसिद्ध करण्यात आली होती.त्यानुसार सदर कामाच्या निविदेत खालीलप्रमाणे निविदाधारकांनी भाग घेतला आहे.

| अ.क्र | निविदाधारकांचे नाव | दिलेले निविदा दर | शेरा |
|---|---|---|---|
| १) | ऋषभ सतीश खिवसरा | शे.२ % जास्तीने | |
| २) | भूषण लक्ष्मण चौधरी | शे.१ % जास्तीने | |
| ३) | मे.एकविरा कन्सट्रक्शन | अंदाजपत्रकीय दर | **सर्वात कमी दर** |

उक्त बाबत मे.एकविरा कन्सट्रक्शन यांचे दर सर्वात कमी(अंदाजपत्रकीय दर) असल्याने त्यांना दर वाटाघाटी करणे कामी बोलविण्यात आले होते. त्यानुसार मक्तेदार मे.एकविरा कन्सट्रक्शन यांनी सदर काम शे.१%कमी दराने करणे बाबत पत्र दिले आहे.

त्यानुसार मक्तेदार मे.एकविरा कन्सट्रक्शन यांचे दर शे.१ % कमीने असल्याने मे.एकविरा कन्सट्रक्शन यांना उक्त काम देणे बाबत मे.स्थायी समिती पुढे मंजुरीस्तव सादर झालेला आहे.

सर्व सन्मा.सदस्यांच्या सहमतीने व कार्यालयीन अहवालास अधिन राहून सदर कामी निगोसिएशन अंती मे.एकविरा कन्सट्रक्शन यानी दिलेल्या पत्रानुसार शेकडा १ % कमीचे आलेल्या दरांस मान्यता देण्यांत येत आहे.सदर प्रस्ताव व कार्यवाहीबाबत लेखा आक्षेप निर्माण होणार नाही याची दक्षता घ्यावी.याबाबतची जबाबदारी संबंधित विभागाची राहील. **सर्वानुमते मंजुर,**

सही/-x x x
**सभापती,**
**स्थायी समिती,**
**धुळे महानगरपालिका धुळे**

विषय क्रमांक:-८७ — हद्दवाढ निधीअंतर्गत प्रभाग क्रं.१० मध्ये वरखेडी येथे नवीन अमरधाम विकसित करुन सुशोभिकरण करणे कामाचे निविदा दर मागविण्यांत आलेत त्याबाबत आलेल्या आलेल्या कार्यालयीन अहवालावर विचार करणे.

म.नगरसचिव — नगरसचिव यांनी विषयांचे वाचन केले.

म.अमोल मासुळे — विषय मंजूर करण्यांत यावा.

म. सभापती — सर्व सन्मा.सदस्यांच्या सहमतीने व कार्यालयीन अहवालास अधिन राहून सदर प्रस्तावास मान्यता देण्यांत येत आहे.

**धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर ९५ दिनांक १८/०६/२०२१**

हददवाढ निधी अंतर्गत प्रभाग क्रमांक 10 वरखेडी येथे नविन अमरधाम विकसित करून सुशोभित करणे कामास धुळे महानगरपालिका स्थायी समिती ठराव नं. १५१ दि. ०१/०२२०२१ मा.आयुक्त , धुळे महानगरपालिका यांचे टिपणी मंजुरीने अन्वये उक्त कामा बाबत रक्कम रु.७८,२८,३७०/- मात्र खर्चास आर्थिक व प्रशासकीय मंजुरी देणेत आली आहे.

उक्त बाबत मा.अभियंता धुळे महानगरपालिका, धुळे यांचे पत्र क्र. ८७ दिनांक २१/०२/२०२१ अन्वये रक्कम रु. ७८,२८,३७०/- मात्र खर्चास तांत्रिक मंजुरी मिळालेली आहे.

उक्त कामाबाबत धुळे महानगरपालिका जा.क्र./ बा.वि./०१ दि. ०१/०४/२०२१ अन्वये दि.०१/०४/२०२१ रोजीचा दै.लोकमत / पथदर्शी या अंकात प्रसिद्ध केली असता मुदतीत दि.२२/०४/२०२१ अखेर खालील प्रमाणे निविदा धारकांचे निविदा दर आलेले आहे.

| अ.क्र. | कंत्राटदारा/ठेकेदराचे नाव | दिलेले निविदा दर | शेरा |
|---|---|---|---|
| १ | **मे.समर्थ कन्स्ट्रक्शन** | **शे.०.९९ % कमीने** | **सर्वात कमी दर** |
| २ | मे.हिंद कन्स्ट्रक्शन | शे.२ % जास्तीने | |
| ३ | मे.राधेय कन्स्ट्रक्शन | शे.१ % जास्तीने | |

वरील प्रमाणे प्राप्त दरास सर्वात कमी दरची निविदा **मे. समर्थ कन्स्ट्रक्शन,** धुळे यांची ०.९९% कमी आहे. त्यांनी नियमाप्रमाणे ऑनलाईन बयाणा रक्कम भरलेली आहे.

तरी सबब सदर काम शे.०.९९% कमी दराने आलेले असल्याने यांच्या दरास मंजुरीस्तव मे.स्थायी समिती पुढे मंजुरीस्तव सादर.

सर्व सन्मा.सदस्यांच्या सहमतीने व कार्यालयीन अहवालास अधिन राहून सदर कामी निगोसिएशन अंती **मे. समर्थ कन्स्ट्रक्शन,** यानी दिलेल्या पत्रानुसार शेकडा ०.९९ % कमीचे आलेल्या दरांस मान्यता देण्यांत येत आहे. सदर प्रस्ताव व कार्यवाहीबाबत लेखा आक्षेप निर्माण होणार नाही याची दक्षता घ्यावी.याबाबतची जबाबदारी संबंधित विभागाची राहील. **सर्वानुमते मंजुर,**

सही/-x x x
**सभापती,**
**स्थायी समिती,**
**धुळे महानगरपालिका धुळे**

# धुळे महानगरपालिका,धुळे
## नगरसचिव कार्यालय
### स्थायी समिती सभा क्रमांक १५ चे इतिवृत्त

---

**धुळे मनपा भारतरत्न अटलबिहारी वाजपेयी सभागृह**
**गुरुवार दिनांक ०८/०७/२०२१**
**वेळ :-सकाळी ११-०० वाजता.**

धुळे महानगरपालिका स्थायी समितीचीऑन लाईन साप्ताहिक सभा आज गुरुवार दिनांक ०८/०७/२०२१ रोजी सकाळी ११-०० वाजता **मा.श्री संजय सुधाकर जाधव,सभापती**,स्थायी समिती, मनपा,धुळे यांच्या अध्यक्षतेखाली **धुळे मनपा भारतरत्न अटलबिहारी वाजपेयी सभागृह** भरली. ऑनलाईन सभेस खालील सन्मा.सदस्य सभागृहात हजर होते.

| अ.क्रं. | सदस्यांचे नांव | हुद्दा |
|---|---|---|
| १ | श्री. जाधव संजय सुधाकर | सभापती |
| २ | श्री. बैसाणे सुनिल तुळशिराम | सदस्य |
| ३ | श्रीमती माळी भारती अशोक | सदस्या |
| ४ | श्रीमती पाटील मंगला सुरेश | सदस्या |
| ५ | श्रीमती बोरसे पुष्पा प्रकाश | सदस्या |
| ६ | श्री. मासुळे अमोल पावबा | सदस्य |
| ७ | श्री. देवरे कमलेश नारायण | सदस्य |
| ८ | श्रीमती पठाण हिना अस्लम | सदस्या |
| ९ | श्री. सईद बेग हाशम बेग | सदस्य |
| १० | श्री. नवले शितल मोहन | सदस्य |
| ११ | श्री. बोरसे नागसेन दामोदर | सदस्य |
| १२ | श्रीमती कुलेवार किरण राकेश | सदस्या |
| १३ | श्रीमती वराडे वैशाली भिकन | सदस्या |
| १४ | श्री. जाधव बन्सीलाल माणिक | सदस्य |
| १५ | श्रीमती चौधरी मंगला अर्जुन | सदस्या |
| १६ | श्री. पटेल अमीन अब्दुल करीम | सदस्य |

**उपस्थित अधिकारी गण**

| अ.क्र. | अधिकाऱ्यांचे नाव | हुद्दा |
|---|---|---|
| १ | श्री. नितीन कापडणीस | अति. आयुक्त |
| २ | श्रीमती शिल्पा नाईक | उपायुक्त |
| ३ | श्री. शांताराम गोसावी | उपायुक्त तथा प्र. नगरसचिव |
| ४ | श्री. तुषार नेरकर | सहा. आयुक्त |
| ५ | श्री. विनायक कोते | सहा. आयुक्त |

| | | |
|---|---|---|
| ६ | श्री. के.एन. शिंदे | अभियंता |
| ७ | डॉ. महेश मोरे | आरोग्याधिकारी |
| ८ | श्री. चंद्रकांत जाधव | सहा.आरोग्याधिकारी |
| ९ | श्री. लक्ष्मण पाटील | सहा.आरोग्याधिकारी |
| १० | श्री.बी.एस. रनाळकर | प्र. लेखाधिकारी |
| ११ | श्री.रमजानअन्सारी | कार्यालय अधिक्षक |
| १२ | श्री.एन.पी. सोनार | ईस्टेट मॅनेजर |
| १३ | श्री. एन.के. बागुल | विद्युत अभियंता |
| १४ | श्री. सी.सी. बागुल | पा. पु. ओव्हरसिअर |
| १५ | श्री. सी.एम. उगले | पा. पु. ओव्हरसिअर |
| १६ | श्री. हेमंत पावटे | ओव्हरसिअर बांधकाम |
| १७ | श्री. राजू माईनकर | भांडारपाल |
| १८ | श्री. किशोर सुडके | बाजार विभाग |
| १९ | श्री. प्रसाद जाधव | अति. विभाग प्रमुख |
| २० | श्री. महेंद्र सोनवणे | प्रशासन अधिकारी मनपा शि.मं. |
| २१ | श्री. सुक्राम आत्या राऊत | वाहन विभाग लिपीक |
| २२ | श्री. दिपक खोंडे | प्रकल्प विभाग |

म.सभापती सर्व उपस्थित सन्मा.सदस्य अति.आयुक्त सो.अधिकारी वर्ग छायाचित्रकार बांधव सभेचे कामकाज चालविणेसाठी आवश्यक तो कोरम पूर्ण झाल्याने नगरसचिव यांनी सभेचे कामकाज सुरुवात करावी.

म. नगरसचिव वंदे मातरम् या राष्ट्रवंदनेसाठी सर्वांनी उभे रहावे.

म. सभापती आजच्या आपल्याकडे अति. आयुक्त पदी श्री. नितीन कापडणीस सो. यांची नियुक्ती झालेली आहे. त्यांचे स्थायी समितीच्या वतीने बुके देवून स्वागत करण्यांत येत आहे.

तसेच स्थायी समिती सदस्य श्री. कमलेश भाऊ देवरे यांची विरोधी पक्षनेतेपदी नियुक्ती झाल्याने त्यांचे देखील बुके देऊन स्वागत करण्यांत येत आहे. तसेच स्थायी समिती सदस्या श्रीमती किरण राकेश कुलेवार यांचा आज वाढदिवस असल्याने स्थायी समितीच्या वतीने त्यांचे बुके देऊन अभिनंदन करण्यांत येत आहे.

**सन्मा. सदस्यांनी कडून आलेली श्रध्दांजलीची यादी**

चित्रपट सृष्टीचे महानायक ज्येष्ठ अभिनेते दिलीपकुमार यांचे खरे नांव मोहम्मद युसुफ खन जन्म 11 डिसेंरब 1922 पेशावर पाकिस्तान या ठिकाणी झाला काल दिनांक 7 जुलै 2021 रोजी त्यांचे मुंबई येथे उपचारा दरम्यान दु:खद निधन झाले. दिलीपकुमार सिने अभिनेते जरी असले परंतु ख-या अर्थाने राष्ट्रीय एकात्मतेचे काम करत होते. त्यांचे धुळे शहराशी जिव्हायाचे नाते झाले. त्यांनी 1981-82 मध्ये धुळे नगरपालिकेत व्याखानासाठी आले होते. त्यानंतर एका राजकीय पक्षाच्या प्रचार सभेला तसेच धुळे शहरातील नागरीकांना मार्गदर्शन केले. त्याचप्रमाणे शिरपूर येथील गोल्ड फॅक्टरीचा उद् दघाटन प्रसंगी देखील उपस्थिती होती. स्वर्गीय दिलीपकुमार यांच्या जुन्या आठवणी धुळे शहरासाठी अविस्मरणीय अशा न विसरण्यासारख्या आहेत. यावरुन त्यांचे धुळे शहरावर किती प्रेम होते ते दिसून येते मोहब्बत हमने माना जिंदगी बरबाद करदेती है. ये क्या कम है मर जाने के बाद दुनिया याद करते है. अशा महान कलाकारास धुळे शहराच्या वतीने महानगरपालिकेतील सर्व नगरसेवकांच्या वतीने दिलीपकुमार यांना आज रोजीच्या स्थायी समिती सभेमध्ये श्रध्दांजली वाहून तसा ठराव पारीत करण्यांत यावा ही विनंती.

**सुचक : - श्री. सुनिल तुळशीराम बैसाणे, मा. सभापती, स्थायी समिती मनपा धुळे**

म. सभापती सन्मा.सदस्यांच्या यादीनुसार स्व.दिलीपकुमार यांना भावपूर्ण श्रध्दांजली अर्पण करण्यासाठी दोन मिनिटे मौन उभे रहावे.

**धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर ९६ दिनांक०८/०७/२०२१**

सन्मा.सदस्यांच्या यादीनुसार चित्रपट सृष्टीचे महानायक ज्येष्ठ अभिनेते दिलीपकुमार यांचे खरे नांव मोहम्मद युसुफ खन जन्म ११ डिसेंबर१९२२ पेशावर पाकिस्तान या ठिकाणी झाला काल दिनांक ७जुलै २०२१ रोजी त्यांचे मुंबई येथे उपचारा दरम्यान दु:खद निधन झाले. दिलीपकुमार सिने अभिनेते जरी असले परंतु ख-या अर्थाने राष्ट्रीय एकात्मतेचे काम करत होते. त्यांचे धुळे शहराशी जिव्हायाचे नाते झाले.त्यांनी १९८१-८२ मध्ये धुळे नगरपालिकेत व्याखानासाठी आले होते. त्यानंतर एका राजकीय पक्षाच्या प्रचार सभेला तसेच धुळे शहरातील नागरीकांना मार्गदर्शन केले.त्याचप्रमाणे शिरपूर येथील गोल्ड फॅक्टरीचा उद्‌दघाटन प्रसंगी देखील उपस्थिती होती.स्वर्गीय दिलीपकुमार यांच्या जुन्या आठवणी धुळे शहरासाठी अविस्मरणीय अशा न विसरण्यासारख्या आहेत. यावरुन त्यांचे धुळे शहरावर किती प्रेम होते ते दिसून येते मोहब्बत हमने माना जिंदगी बरबाद कर देती है. ये क्या कम है मर जाने के बाद दुनिया याद करते है.

अशा या महान कलाकाराच्या दु:खद निधनामुळे या सभेस आतीव दु:ख होत आहे ही सभा त्यांचे कुटुंबियांचे दु:खात सहभागी असून मृतआत्म्यास चिरशांती प्रदानार्थ दोन मिनिटे मौन उभे राहून भावपूर्ण श्रध्दांजली समर्पित करण्यांत येत आहे. **सर्वानुमते मंजुर,**

सही/-x x x

**सभापती,**
**स्थायी समिती,**
**धुळे महानगरपालिका,धुळे**

| | |
|---|---|
| विषय क्रमांक :- ८८ | मागील स्थायी समिती सभांचे इतिवृत्त वाचून कायम करणे. (२१/०५/२०२१. १०/०६/२०२१) |
| म. नगरसचिव | नगरसचिव यांनी विषयांचे वाचन केले. |
| म. सुनिल बैसाणे | मा. सभापती महोदय मागील स्थायी समिती सभा दि. २१/५/२०२१ व १०/०६/२०२१ रोजीच्या सभेचे इतिवृत्त वाचून कायम करणे ठराव नं.४९ धुळे महानगरपालिकेचे घनकचरा वाहतुक व संकलन करणे या विषयाच्या वेळी मी आपणाकडेस जे लेखी पत्र दिले होते.आणि त्यांची इतिवृत्तात नोंद करणेबाबत सूचित केले होते.आपल्याला जे इतिवृत्त आलेले आहे. त्या सभेच्या मी जे पत्र दिलेले होते त्याचा इतिवृत्तात कुठेही उल्लेख झालेला नाही तरी तो उल्लेख त्यांच्यात करावा त्यानंतर इतिवृत्तास मंजुरी देण्यांत यावी. |
| म. सभापती | श्री.मनोज वाघ नगरसचिव आज रजेवर आहेत.तुमचे पत्र प्रशासनाच्या दप्तरी येवून गेले आहे. त्यांचेशी चर्चा करुन त्याप्रमाणे उचित कार्यवाही करण्यांत येईल. |
| म. सुनिल बैसाणे | माझी विनंती आहे. जशी महासभेमध्ये व्हिडिओ रेकॉर्डींग होते तशी रेकॉर्डींग स्थायी समितीची करण्यांत यावी कारण या ठिकाणी आपण अनेक धोरणात्मक विषयांना मंजुरी देत असतो अशी मी तुम्हाला सुचना वजा विनंती करतो |
| म. सभापती | मागील स्थायी समिती सभांचे इतिवृत्त योग्य ती नोंद करुन कायम करण्यांत येत आहे. |

**धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर ९७ दिनांक०८/०७/२०२१**

मागील स्थायी समिती सभा दिनांक २१/०५/२०२१ चे ठराव नंबर ५४ ते ६३ अखेर कंमशा वाचून कायम करण्यांत येत आहे. विषय क्रं.४९ चा ठराव नंबर ५५ मध्ये सन्मा. सदस्यांनी केलेल्या सुचनेनुसार नोंद घेण्यांत येत आहे.

तसेच मागील स्थायी समिती सभा दिनांक १०/०६/२०२१ च्या सभेतील ठराव नंबर ६४ ते ८४ अखेर तसेच सन्मा.सदस्यांनी उपस्थित केलेली चर्चा व त्यावरील निर्णय क्रमश: वाचून कायम करण्यांत येत आहे. सही/-x x x

**सभापती,**
**स्थायी समिती,**
**धुळे महानगरपालिका,धुळे**

| | |
|---|---|
| विषय क्रमांक :- ८९ | मा.आयुक्त सो. यांना असलेल्या अधिकारानुसार रु.५लाख ते २५ लाखापर्यंत कार्यादेश दिलेले कार्यादेश (बांधकाम विभागाकडील) कामांची यादी अवलोकनार्थ सादर (दि.०६/०५/२०२१ ते दि.२५/०६/२०२१) |
| म. नगरसचिव | नगरसचिव यांनी विषयांचे वाचन केले. |
| म. शितल नवले | सभापती महोदय दर वेळेस आप 25 लाखाच्या आतील कामाना इतिवृत्त मंजूर करतो. प्रामुख्याने यांच्यात दोन कामे झालेली आहेत. काम नं.163आणि 164 कन्सलन्टन नेमणे 15 वा वित्त आयोगातून असू शकतो. कन्टल्ससी नेमायाची असतील तर किमान एक समिती आपल्या बांधकामाची आहे. त्या समितीचा थोडा सल्ला घेतला तर त्यांच्यात प्रामुख्याने अजून काही चांगल करता येईल.8लाख रु.बांधकाम प्रकरण तांत्रिक सल्लागार नेमणे तर यांच्यामध्ये सल्लागार नेमण्यापेक्षा कंपनी कडून डॉयरेक्ट प्रपोजल मागवायचे ते 8 लाख सुध्दा खर्च करायची गरज नव्हती. समोरची कंपनी प्रकल्प उभा करुन ते उलट आपल्याला पैसे देतीलजे याच्यातून क्रश् केल्यानंतर मटेरियल निघत खडी निघते आपली जी खडी आहे त्या भावात विकली जाते. साधारणत:400 ते 500 रु.टन यामुळे आपल्या यंत्रनेचा खर्च कमी होईल आपल्याला दोन पैसे उत्पन्नाचे वाढतील.दुसरी गोष्ट म्हणजे बायोगॅस प्रकल्पाकरिता प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार नेमणे ज्या दिवसापासून ब्लॅक अॅण्ड व्हाईट TV आली त्या दिवसा पासून आपण बायोगॅस पहातो आहे बायोएनर्जीची बरेच प्रकल्प ब-याच मनपात चालू झालेले आहे. एक बायोगॅस प्रकल्पासंदर्भाची जी कंपनी आहे तिच्याशी माझे बोलणे झाले होते कारण मागच्या महिना भरात पूर्ण झाले होते त्याचे म्हणणे होते की मनपाने जागा उपलब्ध करुन द्यावी ते स्वत:50 कोटीचा बायोगॅस सीएनजीचा प्लॅन्ट लावण्यास आपल्याकडे तयार आहेत तर प्रारंपारीक गोष्टीकडे जाण्यापेक्षा जे मोदी साहेबाच स्वप्न आहे.15 व्या वित्त आयोगातून पैसे दिले आहे की एनर्जी प्लॅन्ट तयार करणे कृपया ज्यांना यांच्यातील काही माहिती आहे त्याचा सल्ला घ्यायचा मी वर्ष दिड वर्षापासून बांधकाम विभागाशी संबंधीत आहे शिंदे सो. कन्सल्टन् नेमणेबाबत लवकरात लवकर कार्यवाही करा. |
| म. अभियंता | श्री. शितल भाऊ नवले आपण जे मुद्दे उपस्थित केले पॅनलवर जे सल्लागार नेमले होते त्यांची एक समिती स्थापन करावी दुसरे बायोगॅसच्या प्रकल्पा बाबत विचार करावा या बाबत आपण सर्व मिळून चर्चा करुन काय त्रुटया आहेत ते पहा आणि 3 गोष्टी पाणीपुरचवठयांची त्यांनी ते काम पूर्ण केले आहे ती नस्ती अकौंट विभागाकडे आहे पुढच्या मिटींगला आपल्याकडे येईल. |
| म. शितल नवले | नाशिक मनपा आहे त्यांच्याकडे एक स्वतंत्र कक्ष आहे. लायनीग ऑफिसर त्यांच्याकडे फंड पडून आहेत. |
| म. सभापती | मा.आयुक्त सो. यांना असलेल्या अधिकारानुसार रु.५ लाख ते २५ लाखापर्यंत कार्यादेश दिलेले कार्यादेश (बांधकाम विभागाकडील) कामांची यादीचे अवलोकनार्थ करण्यांत आले. |

**धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर ९८ दिनांक०८/०७/२०२१**

मा.आयुक्त सो. यांना असलेल्या अधिकारानुसार रु.५ लाख ते २५ लाखापर्यंत कार्यादेश दिलेले कार्यादेश (बांधकाम विभागाकडील) कामांची यादी अवलोकनार्थ सादर

(दि.०६/०५/२०२१ ते दि.२५/०६/२०२१) (बांधकाम विभाग)

दिनांक 06/05/2021 ते दि.17/06/2021 अखेर निर्गमित केलेल्या विकास कामांच्या कार्यादेशची यादी

| अ.क्र. | कार्यादेश क्रं. | दिनांक | कामाचे नाव | रक्कम | निधी |
|---|---|---|---|---|---|
| 1 | 82 | 11/05/2021 | प्र.क्र.15 मध्ये वैभव नगर भागात श्री.व्ही.आर. राणा घर ते हेरब अपार्टमेंट व श्री.विसपुते घर ते नक्षत्र अपार्टमेंट व श्री.विसपुते घर ते स्वामी अपार्टमेंट पावेतो रस्ता डांबरीकरण करणे. | 19,99,266/- | मनपा निधी अंतर्गत (नगरसेवक निधी ) |
| 2 | 83 | 11/05/2021 | प्र.क्र.15 जवाहर नगर येथील मोकळ्या जागेस वॉल कंपाऊंड करणे. | 20,06,169/- | मनपा निधी अंतर्गत (नगरसेवक निधी ) |
| 3 | 96 | 12/05/2021 | श्री.फारुक अन्वर शहा ,आमदार धुळे शहर यांचे निधीतून प्र.क्र.18 मधील 100 फुटी रस्ता ते शासकीय दुध डेअरी पावेतो रस्ता डांबरीकरण करणे. | 17,96,800/- | आमदार स्थानिक क्षेत्र विकास कार्यक्रम अंतर्गत |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| 4 | 97 | 12/05/2021 | श्री.फारूक अन्वर शहा ,आमदार धुळे शहर यांचे निधीतून प्र.क्र.18 मधील 100 फुटी रस्ता ते शासकीय दुध डेअरी पावेतो दुभाजक टाकून पथदिवे बसविणे. | 14,99,182/- | आमदार स्थानिक क्षेत्र विकास कार्यक्रम अंतर्गत |
| 5 | 101 | 18/05/2021 | प्र.क्र.3 मध्ये लाला सरदार नगर भागात अब्दुल्लाह मिस्तरी यांच्या घरापासून ते सुशीनाल्या पावेतो ड्रेनेज लाईन करणे व ताहेर अंडेवाले यांच्या घरापासून ते सुशीनाल्या पावेतो कॉक्रीट गटार करणे. | 7,90,355/- | मनपा निधी अंतर्गत (नगरसेवक निधी ) |
| 6 | 107 | 20/05/2021 | प्र.क्र.18 मध्ये कोळवले नगर श्री.संजय खैरनार घर ते पटवारी घरापावेतो ड्रेनेज लाईन टाकणे. | 9,87,130/- | मनपा निधी अंतर्गत (नगरसेवक निधी ) |
| 7 | 108 | 20/05/2021 | प्र.क्र.18 मध्ये सहजीवन नगर श्री.भट्टू वाडीले घर ते जगन पेंटर घरापावेतो ड्रेनेज लाईन टाकणे. | 6,43,875/- | मनपा निधी अंतर्गत (नगरसेवक निधी ) |
| 8 | 111 | 24/05/2021 | प्र.क्र.15 मध्ये श्रीमती सुशिलाबाई ईशी नगरसेविका यांचे निधीतून भीमनगर मधील अंजना उंदा शिरसाठ नगर घरकुल येथे व्यायाम शाळाबांधणे. | 19,95,480/- | मनपा निधी अंतर्गत (नगरसेवक निधी ) |
| 9 | 121 | 27/05/2021 | प्र.क्र.2 मध्ये प्लॉट नं.58 ते श्री.ईश्वर सोनवणे यांच्या घरापर्यंत रस्ता डांबरीकरण करणे. | 9,97,866/- | मनपा निधी अंतर्गत (नगरसेवक निधी ) |
| 10 | 122 | 27/05/2021 | प्र.क्र.18 मध्ये भोले बाबा नगर येथे नागरिकांच्या सोईसाठी नविन 4" पाईपलाईन टाकणे. | 5,21,209/- | मनपा निधी अंतर्गत (नगरसेवक निधी ) |
| 11 | 123 | 01/06/2021 | श्री.फारूक अन्वर शाह,आमदार धुळे शहर यांचे स्थानिक विकास कार्यक्रम अंतर्गत भाईजीनगर श्री.मोहन अग्रवाल घर ते श्री.संजयअग्रवाल घर ते पसारी घर ते श्री.रोशन अग्रवाल घरापावेतो रस्ता कॉक्रीट करणे व गटार करणे. | 19,98,980/- | आमदार स्थानिक विकास कार्यक्रम अंतर्गत 2020-21 |
| 12 | 125 | 01/06/2021 | प्र.क्र.18 मध्ये सहजीवन नगर भागात भट्टू फरांदे घर ते डी.पी.रस्ता पावेतोचा रस्ता कॉक्रीट करणे. | 5,11,321/- | मनपा निधी अंतर्गत (नगरसेवक निधी) |
| 13 | 126 | 01/06/2021 | प्र.क्र.18 मध्ये हद्दवाढ अंतर्गत अवधान येथील विविध भागात एच.डी.पी.ई. पाईपलाईन टाकणे. | 20,75,598/- | मनपा निधी अंतर्गत (नगरसेवक निधी) |
| 14 | 128 | 01/06/2021 | प्र.क्र.18 मध्ये अवधान गावातील तलावाचा गाळ काढणे व खोलीकरण करणे. | 9,99,297/- | मनपा निधी अंतर्गत ( पंपिंग स्टेशन निगा व दुरुस्ती ) |
| 15 | 135 | 02/06/2021 | धुळे मनपा हद्दीतील वलवाडी येथील अमरधाम येथे सोई सुविधा करणे. | 9,99,592/- | आमदार स्थानिक विकास कार्यक्रम अंतर्गत 2020-21 |
| 16 | 141 | 07/06/2021 | प्र.क्र.2 मध्ये श्री.विलास पाटील यांच्या घरापासून ते श्री.गवळे रावसाहेब यांच्या घरापर्यंत रस्ता डांबरीकरण करणे. | 5,12,691/- | मनपा निधी अंतर्गत (नगरसेवक निधी) |
| 17 | 143 | 07/06/2021 | माझी वसुंधरा अभियाना अंतर्गत धुळे महानगरपालिका क्षेत्रात वृक्ष लागवड करणे. | 12,39,316/- | वृक्ष प्राधिकरण बियाणे व रोपे खरेदी व रोपवाटिका खर्च अंतर्गत |
| 18 | 144 | 07/06/2021 | प्र.क्र.12 मध्ये अस्लम अन्सारी यांच्या घरापासून ते मन्सुरी यांच्या घरापर्यंत तसेच मोह.अहमद फातमा पॅलेस जवळ रस्ता कॉक्रीटीकरण करणे. | 9,97,462/- | मनपा निधी अंतर्गत (नगरसेवक निधी ) |
| 19 | 150 | 07/06/2021 | प्र.क्र.8 मध्ये ग.नं.2 अकबर चौक ,अन्सारी किराणा पासून ते रियाज बागवान यांच्या घरापर्यंत बंदिस्त गटार करणे. | 18,10,513/- | मनपा निधी अंतर्गत (नगरसेवक निधी ) |
| 20 | 153 | 08/06/2021 | प्र.क्र.12 मध्ये आझादनगर भागात छोटी विहिर जवळ पठाण किरणापासून ते मदरसा पर्यंत रस्ता कॉक्रीट करणे. | 9,99,968/- | मनपा निधी अंतर्गत (नगरसेवक निधी) |
| 21 | 154 | 08/06/2021 | प्र.क्र.7 मध्ये श्री.जगदाळे यांचे घरापासून ते श्री.योगेश वाणी यांच्या घरापर्यंत रस्ता कॉक्रीट करणे. | 19,98,854/- | मनपा निधी अंतर्गत (नगरसेवक निधी) |
| 22 | 155 | 08/06/2021 | प्र.क्र.9 मध्ये ग.नं.7 मध्ये शाम गवळी ते श्री.विजय गद्रे यांच्या घरापर्यंत रस्ता कॉक्रीटीकरण करणे. | 5,87,300/- | मनपा निधी अंतर्गत (नगरसेवक निधी) |
| 23 | 156 | 08/06/2021 | प्र.क्र.7 मध्ये श्री.राहुल काळे ते श्री.मनोज मराठे यांच्या घरापावेतो रस्ता कॉक्रीट करणे. | 19,98,854/- | मनपा निधी अंतर्गत (नगरसेवक निधी) |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| 24 | 157 | 08/06/2021 | प्र.क्र.14 मध्ये चंपाबाग भागात हनुमान मंदिरापासून ते साक्री रोड पावेतो रस्ता काँक्रीटीकरण करणे. | 18,03,042/- | मनपा निधी अंतर्गत (नगरसेवक निधी) |
| 25 | 158 | 08/06/2021 | धुळे महानगरपालिका अंतर्गत दलित वस्तीतील विवेकानंद नगर प्लॉट नं.100 श्री.कुरील यांच्या घराच्या मागील बाजूस असलेल्या मोकळ्या जागेतील (ओपनस्पेस ) गोंदूर रोड देवपूर धुळे येथे पेव्हर ब्लॉक मिनी हायमास्ट व ब्लॉक बसविणे. | 9,99,784/- | मा.आमदार स्थानिक विकास कार्यक्रम निधी अंतर्गत |
| 26 | 162 | 16/06/2021 | प्र.क्र.19 मध्ये अजमेरा नगरपट्टी भागात बुशरा हॉटेल जवळील पुलापासून ते 100 फुटी रोड पावेतो काँक्रीट रस्ता करणे. | 9,99,207/- | मनपा निधी अंतर्गत (नगसेवक निधी ) |
| 27 | 163 | 17/06/2021 | बांधकाम व पाडकाम कचरा प्रकल्पा करीता तांत्रिक सल्लागार नेमणे बाबत. | 8,00,000/- | स्वच्छ महाराष्ट्र अभियान (नागरी) अंतर्गत बांधकाम व पाडकाम या प्रकल्पा करीता अनुदान |
| 28 | 164 | 17/06/2021 | बायोगॅस प्रकल्पाकरिता प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार नेमणे. | 24,00,000/- | स्वच्छ महाराष्ट्र अभियान (नागरी) अंतर्गत बांधकाम व पाडकाम या प्रकल्पा करीता अनुदान |
| 29 | 166 | 17/06/2021 | प्र.क्र.8 मध्ये मौलवीगंज भागात श्री. इक्बाल यांच्या घराजवळील नाल्यावर स्लॅब कल्व्हट करणे. | 19,98,576/- | मनपा निधी अंतर्गत (नगरसेवक निधी अंतर्गत ) |
| 30 | 167 | 17/06/2021 | प्र.क्र.10 मध्ये माधव कॉलनी भागात श्री.अनिल चौधरी ते श्री.शाह यांच्या घरापर्यंत सिमेंट काँक्रीट रस्ता करणे. | 6,85,029/- | मनपा निधी अंतर्गत (नगसेवक निधी ) |
| 31 | 168 | 17/06/2021 | प्र.क्र.10 मध्ये सतगुरु प्रेमानंद मंदिरा पासून ते श्री.वामन चौधरी यांच्या घरापर्यंत सिमेंट काँक्रीट रस्ता करणे. | 9,94,584/- | मनपा निधी अंतर्गत (नगसेवक निधी ) |
| 32 | 170 | 17/06/2021 | प्र.क्र.6 मध्ये मोराणे भगवान पवार ते नॅशनल हायवे पुलापर्यंत रस्ता काँक्रीटकरण करणे. | 15,29,188/- | मनपा निधी अंतर्गत (नगसेवक निधी ) |
| 33 | 171 | 17/06/2021 | प्र.क्र.10 मध्ये श्री.विनोद लालचंद यांचे घर ते ग्रामपंचायत कार्यालय वरखेडी पर्यंत रस्ता काँक्रीटीकरण करणे. | 19,12,990/- | मनपा निधी अंतर्गत (नगसेवक निधी ) |

दि.२२/०६/२०२१ ते २५/०६/२०२१ अखेर निर्गमित केलेल्या विकास कामांच्या कार्यादेशची यादी

| अ.क्र. | कार्यादेश क्रं. | दिनांक | कामाचे नाव | रक्कम | निधी |
|---|---|---|---|---|---|
| 1 | 179 | 22/06/2021 | प्र.क्र.2 मध्ये श्रीरंग कॉलनी भागात श्री. कांगणे यांच्या घरापासून ते श्री.चांदुरकर यांचे घरापर्यंत रस्ता काँक्रीट करणे. | 13,60,348/- | मनपा निधी अंतर्गत (नगरसेवक निधी ) |
| 2 | 183 | 22/06/2021 | प्र.क्र.4 मध्ये जयहिंद कॉलनी भागातील श्री. अजित मोरे यांच्या घरापासुन ते श्री.मनोज शिंदे यांचे घरापर्यंत रस्ता डांबरीकरण करणे. | 9,97,866/- | मनपा निधी अंतर्गत (नगरसेवक निधी ) |
| 3 | 184 | 22/06/2021 | प्र.क्र.4 मध्ये जयहिंद कॉलनी भागात सोना सुपर शॉप ते जयहिंद लेडीज हॉस्टेल पर्यंत रस्ता डांबरीकरण करणे. | 7,17,611/- | मनपा निधी अंतर्गत (नगरसेवक निधी ) |
| 4 | 185 | 22/06/2021 | प्र.क्र.4 मध्ये चंदन नगर भागात श्री.सुरेंद्र मोरे सर यांच्या घरापासून ते श्री.रवी दुसाने यांच्या घरापावेतो रस्ता काँक्रीट करणे. | 14,93,048/- | मनपा निधी अंतर्गत (नगरसेवक निधी ) |
| 5 | 186 | 22/06/2021 | प्र.क्र.4 मध्ये श्री.कमलाकर पाटील यांच्या घरापासून ते रावळे यांच्या घरापावेतो रस्ता काँक्रीट करणे. | 24,86,572/- | सन 2020-21 ची विकास कामे |
| 6 | 187 | 22/06/2021 | प्र.क्र.4 मध्ये श्री.संतोष संघवी यांच्या घरापासून ते श्री.बाळासाहेब भदाणे यांच्या घरापावेतो रस्ता काँक्रीट करणे. | 24,87,222/- | सन 2020-21 ची विकास कामे |
| 7 | 199 | 25/06/2021 | प्र.क्र.3 मध्ये आग्रा रोड श्री.फजलू रहेमान यांच्या घरापासून ते हाजी बदलू सरदार चौकापर्यंत व नवीन बांधण्यात आलेल्या सार्व. शौचालया समोर रस्ता काँक्रीट करणे. | 18,99,393/- | सन 2020-21 ची विकास कामे |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| 8 | 200 | 25/06/2021 | प्र.क्र.16 मध्ये जय मल्हार नगर श्री.रवी अहिरे घर ते श्री.योगेश वाघ घरापावेतो कॉंक्रीट गटार करणे. | 24,95,223/- | आर्थिक दुर्बल घटक अंतर्गत |
| 9 | 201 | 25/06/2021 | प्र.क्र.16 मधील जोरावर अली सोसा. मध्ये श्री.साळुंखे घर ते श्री.खैरनार घरापावेतो कॉंक्रीट गटार करणे. | 19,95,461/- | मनपा निधी अंतर्गत (नगरसेवक निधी ) |
| 10 | 202 | 25/06/2021 | प्र.क्र.16 मध्ये गवळीवाडा ते आदिवासी वस्ती पर्यंत नविन पाईपलाईन टाकणे. | 19,63,568/- | हद्दवाढ नवीन पाईपलाईन अंतर्गत |
| 11 | 203 | 25/06/2021 | प्र.क्र.15 मध्ये सौ.मंगला सुरेश पाटील नगरसेविका यांच्या निधीतून महात्माजी नगर व अरुणकुमार वैद्य नगर येथे ड्रेनेज लाईन टाकणे | 19,81,360/- | मनपा निधी अंतर्गत (नगरसेवक निधी ) |

उक्त यादीचे वाचन करुन सभागृहास माहिती देण्यांत आली.

सही/-x x x
सभापती,
स्थायी समिती,
धुळे महानगरपालिका,धुळे

विषय क्रमांक:-९० धुळे म.न.पा. मालकीचे डेडरगांव (तिखी) तलावातील मासेमारीचा जाहीर फेर लिलाव काढण्यांत आला होता. सदर कामी २२-६-२०२१ रोजी फेर लिलाव ठेवण्यांत आला होता. सदर लिलावात सर्वात जास्त बोली एकता मत्स्य व्यवसाय सहकारी संस्थेतर्फे रक्कम रू.१,५१,०००/- (अधिक G.S.T.वेगळा) मात्र आलेली आहे. सदर बाब मे.स्थायी समितीपुढे अवलोकनार्थ सादर.

म. नगरसचिव नगरसचिव यांनी विषयांचे वाचन केले.

म. सभापती स्थायी समिती समोर प्रस्तावाचे अवलोकन करण्यांत आले.

**धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर ९९ दिनांक०८/०७/२०२१**

धुळे म.न.पा. मालकीचे डेडरगांव (तिखी) तलावातील मासेमारीचा जाहिर लिलाव करणेकरीता मे. स्थायी समिती ठराव क्र. ६२ दि. २१-५-२०२१ अन्वये सरकारी किंमत रू. १,४०,८५५ प्रथम वर्षाकरिता व लिलावात असलेल्या रकमेत दरवर्षी १० % नैसर्गिक वाढ करणेस दि. १-६-२०२१ ते ३१-५-२०२६ या कालावधी करीता (५ वर्ष) मंजुरी दिलेली आहे.

दि. १५-६-२१ रोजी लिलाव ठेवण्यांत आला मात्र एकच बोलीधारक आल्याने दि. २२-६-२०२१ रोजी फेर लिलाव ठेवण्यांत आला त्यामध्ये ३ सदस्यांनी भाग घेतला व खालीलप्रमाणे बोली लावण्यांत आली.

१. एकता मत्स्य व्यवसाय सहकारी संस्थेतर्फे जास्तीची बोली रक्कम रू. १,५१,०००/-
२. काळभैरव आदिवासी मच्छीमार सहकारी संस्थेतर्फे रू. १,५०,०००/-
३. कालीका देवी मत्स्य व्यवसाय सहकारी संस्थेतर्फे रू.१,४८,०००/-

एकता मत्स्य व्यवसाय सहकारी संस्थेची सरकारी अंकापेक्षा जास्तीचे रक्कम रू. १,५१,०००/- (अधिक G.S.T.वेगळा) एवढ्या रकमेवर अंतीम बोली नोंदल्याने त्यांना उक्त मक्ता देणेबाबतचा विषय मे.स्थायी समिती पुढे अवलोकनार्थ ठेवणेसाठी म.आयुक्त सो. यांनी मंजुरी दिलेली आहे. सदरचा प्रस्तावाचे माहिती मे.स्थायी समिती वाचून अवलोकन करण्यांत आले. सही/-x x x

सभापती,
स्थायी समिती,
धुळे महानगरपालिका,धुळे

विषय क्रमांक:- ९१ डॉ.बाबासाहेब आंबेडकर जयंती निमित्त पुतळ्याचे रंगकाम व दुरुस्ती करणे तांतडीने करुन घेण्यांत आली.त्यासाठी झालेला खर्च रुपये रु.१,१७,५३४/- मात्र खर्चास कार्योत्तर मंजुरी देणेबाबत आलेल्या कार्यालयीन अहवालावर विचार करणे.

म. नगरसचिव नगरसचिव यांनी विषयांचे वाचन केले.

म. शितल नवले विषय मंजूर करण्यांत यावा.

म. सभापती — सर्व सन्मा. सदस्यांच्या सहमतीने व कार्यालयीन अहवालास अधिन राहून सदर प्रस्तावास कार्योत्तर मान्यता देण्यांत येत आहे.

**धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर १०० दिनांक०८/०७/२०२१**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती निमित्त मा. सभापती सो., व मा.अभियंता सो., यांच्या समवेत दि.०८/०४/२०२१ रोजी पुतळ्याची समक्ष पाहणी केली असता म.सभापती सो., यांनी दिलेल्या आदेशानुसार प्लॅटफॉर्म व जिना यांची दुरुस्ती करणे व स्टील रेलिंग व पुतळयाला पॉलिश करून रंगकाम करणे कामे डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती निमित्त करणे आवश्यक असल्याने सदर भागात समक्ष पहाणी करून अंदाजपत्रक तयार केले असता उक्त कामी अंदाजपत्रकीय खर्च रु.१,१७,५३४/- मात्र येणार आहे.

तरी सदरचे काम विना निविदा श्री.स्वामी समर्थ कन्सट्रक्शन,ठेकेदार,धुळे यांचे कडून करून घेण्यात आलेले असून सदरचे काम मुंबई प्रांतिक अधिनियम नियम ५(२) (२) अन्वये विना निविदा करण्यास मंजुरीसाठी व अंदाजपत्रकीय खर्च रु.१,१७,५३४/- मात्र खर्चास कार्योत्तर मंजुरीसाठी स्थायी समितीपुढे सादर झालेला आहे.

सर्व सन्मा. सदस्यांच्या सहमतीने व कार्यालयीन अहवालास अधिन राहून सदर प्रस्तावातील खर्च रु. १,१७,५३४/-मात्रला कार्योत्तर मान्यता देण्यांत येत आहे. सदर प्रस्ताव व कार्यवाहीबाबत लेखा आक्षेप निर्माण होणार नाही याची दक्षता घ्यावी. याबाबतची जबाबदारी संबंधित विभागाची राहील.

सर्वानुमते मंजुर,
सही/-x x x
सभापती,
स्थायी समिती,
धुळे महानगरपालिका,धुळे

विषय क्रमांक:-९२ — धुळे मनपा मालकीचे डेडरगांव जलशुध्दीकरण केंद्रावरील क्युरी फेक्युलेटर मध्ये गाळ सांचल्याने अशुध्द पाणीपुरवठा होत असल्याने सदर गाळ तांतडीने काढण्यांत आला. सदरचे काम विना निविदा करण्यांत आल्याने त्यासाठी झालेला खर्च रुपये १,०१,९६७/- मात्रला कार्योत्तर मंजुरी देणेबाबत आलेल्या कार्यालयीन अहवालावर विचार करणे.

म. नगरसचिव — नगरसचिव यांनी विषयांचे वाचन केले.

म.सुनिल बैसाणे — विषय मंजूर करण्यांत यावा.

म. सभापती — सर्व सन्मा.सदस्यांच्या सहमतीने व कार्यालयीन अहवालास अधिन राहून सदर प्रस्तावास कार्योत्तर मान्यता देण्यांत येत आहे.

**धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर १०१ दिनांक०८/०७/२०२१**

धुळे मनपा मालकीचे डेडरगाव जलशुध्दीकरण केंद्रावरील क्युरीफेक्युलेटर मध्ये गाळ काढणेचे काम त्वरीत व तातडीने विना निविदा करण्यात आलेले आहे.

कारण की सदरचे काम नागरिकांच्या पिण्याच्या पाण्याशी निगडीत होते व क्युरी फेक्युलेटर मध्ये गाळ झाल्याने अशुध्द पाणी पुरवठा होत असल्याने पत्र उपायुक्त मॅडम सो यांच्या आदेशान्वये सदरचे काम करण्यात आलेले आहे व त्यास **रु.**१,०१,९६७/- मात्र खर्च झालेला आहे.

तरी **रु.**१,०१,९६७/-मात्रच्या खर्चास व मनपा अधिनियम ५(२)(२) नुसार कार्योत्तर मंजुरीस्तव मे.स्थायी समितीपुढे सादर झालेला आहे.

सर्व सन्मा.सदस्यांच्या सहमतीने व कार्यालयीन अहवालास अधिन राहून सदर प्रस्तावातील खर्च रुपये १,०१,९६७/- मात्रला कार्योत्तर मान्यता देण्यांत येत आहे. सदर प्रस्ताव व कार्यवाहीबाबत लेखाआक्षेप निर्माण होणार नाही याची दक्षता घ्यावी. याबाबतची जबाबदारी संबंधित विभागाची राहील.

सर्वानुमते मंजुर,
सही/-x x x
सभापती,
स्थायी समिती,
धुळे महानगरपालिका,धुळे

| | |
|---|---|
| विषय क्रमांक:- ९३ | धुळे मनपा मालकीच्या मच्छीबाजार दवाखान्याचे नुतनीकरण करणेचे एस्टीमेट रु. २९,९९,७८६/- मात्र खर्चास प्रशासकीय मान्यता देणेबाबत विचार विनिमय करणे. |
| म. नगरसचिव | नगरसचिव यांनी विषयांचे वाचन केले. |
| म.सुनिल बैसाणे | विषय मंजूर करण्यांत यावा. |
| म. सभापती | सर्व सन्मा.सदस्यांच्या सहमतीने व कार्यालयीन अहवालास अधिन राहून सदर प्रस्तावास प्रशासकीय मान्यता देण्यांत येत आहे. |

**धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर १०२ दिनांक०८/०७/२०२१**

सन्मा.सदस्य श्री.अन्सारी अब्दुल लतीफ अब्दुल हमीद यांच्या मागणी पत्रानुसार धुळे मनपा मालकीच्या मच्छीबाजार दवाखान्याचे नुतनीकरण करणे संदर्भात पत्र दिले असून सदर ठिकाणी दवाखान्याचे मोठया प्रमाणावर दुरावस्ता झाली आहे. त्यामुळे रुग्णांची मोठया प्रमाणात गैरसोय होत असल्याने सदरचे काम करणे गरजेचे आहे.

त्यानुसार कामाचे अंदाजपत्रक तयार करण्यांत येवून त्यास रुपये २९,९९,७८६/- मात्र खर्च अपेक्षित असून सदर कामाचा खर्च हा सा.बां. यांच्या सन २०२०-२१ नुसार असून सदर खर्चाची नोंद तरतूद रजिस्टरला घेण्यांत आलेली असून तो खर्च योग्य व वाजवी आहे.

तरी सदरचा खर्च रुपये २९,९९,७८६/- मात्रला आर्थिक व प्रशासकीय मान्यता मिळणेस्तव मे. स्थायी समिती पुढे सादर झालेला आहे.

सर्व सन्मा.सदस्यांच्या सहमतीने व कार्यालयीन अहवालास अधिन राहून सदर प्रस्तावातील एस्टीमेट खर्च रु.२९,९९,७८६/- मात्रला प्रशासकीय मान्यता देण्यांत येत आहे.

सर्वानुमते मंजुर,
सही/-x x x
सभापती,
स्थायी समिती,
धुळे महानगरपालिका,धुळे

| | |
|---|---|
| विषय क्रमांक:- ९४ | प्रभाग क्र.६ व ७ मध्ये महानगरपालिका क्षेत्रात शासनाच्या अनुदानातून मुलभूत सोई सुविधांचा विकास अंतर्गत विविध भागात रस्ता कॉंक्रीटीकरण गटारीसह करणे तसेच अन्य ठिकाणी पाण्याची टाकी व हायमास्ट अनुषंगिक कामे करणेचे निविदा दर मागविण्यांत आलेत, त्याबाबत आलेल्या कार्यालयीन अहवालावर विचार करणे. |
| म. नगरसचिव | नगरसचिव यांनी विषयांचे वाचन केले. |
| म. शितल नवले | विषय मंजूर करण्यांत यावा. |
| म. सुनिल बैसाणे | विषय मंजूर करण्यांत यावा. |
| म. सभापती | सर्व सन्मा. सदस्यांच्या सहमतीने व कार्यालयीन अहवालास अधिन राहून सदर प्रस्तावास मान्यता देण्यांत येत आहे. |

**धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर १०३ दिनांक०८/०७/२०२१**

प्रभाग क्र. ६ व ७ मध्ये महानगरपालिका क्षेत्रात शासनाच्या अनुदानातून मुलभूत सोई सुविधांचा विकास अंतर्गत विविध भागात रस्ता कॉंक्रीटीकरण गटारीसह करणे तसेच अन्य ठिकाणी पाण्याची टाकी व हायमास्ट अनुषंगिक कामे करणे बाबतच्या कामास धुळे मा.जिल्हाधिकारी सो. यांचा दि.३०/०३/२०२१ रोजीचा प्रशासकीय मान्यता आदेश मा.आयुक्त सो. धुळे महानगरपालिका यांनी टिपणी मंजुरीने दि.०१/०२/२०२१ अन्वये उक्त कामाच्या खर्चास रक्कम रु.५,१९,९७,७६४/-मात्र रकमेस आर्थिक व प्रशासकीय मान्यता दिलेली आहे.

उक्त कामाबाबत शहर अभियंता मनपा धुळे यांचे पत्र क्र./१०२९/ २०२१ दि. ०२/०२/२०२१, पत्र क्र./१०१९ दि.२९/०१/२०२१,पत्र क्र./१०२०दि.२९/०१/२०२१, पत्र क्र./१०२१ दि.२९/०१/२०२१, पत्र क्र./१०२६ दि.२९/०१/२०२१, पत्र क्र./१०२२ दि.२९/०१/२०२१, पत्र क्र./१०२३ दि.२९/०१/२०२१ अन्वये रक्कम रु. ५,१९,९७,७६४/- मात्र खर्चास तांत्रिक मंजुरी मिळालेली आहे.

उक्त कामाबाबत या धुळेमहानगरपालिकाजा.क्र./धुमपा/बांवि/२३दि.२७/०४/२०२१ अन्वये दि.३०/०४/२०२१ रोजी दै.आ.महाराष्ट्र/आ.नवराज्य या वृत्तपत्रात जाहिर निविदा प्रसिद्ध करणेत येऊन दि.१९/०५/२०२१ पर्यंत निविदा दर मागविण्यात आले आहेत.पात्र कंत्राटदार यांनी निविदेबाबत ऑनलाईन पद्धतीने बयांना रक्कम भरून निविदा दर सादर केलेली आहेत.

| अ.क्र. | कंत्राटदारा/ठेकेदराचे नाव | दिलेले निविदा दर | शेरा |
|---|---|---|---|
| १ | मे.ऐ.बी.वाघ | **शे.७.५१% जास्तीने** | **सर्वात कमी दर** |
| २ | बी.आर.भदाणे | शे.१०% जास्तीने | |
| ३ | मे.एस.बी.देशमुख | शे.१५% जास्तीने | |

वरील प्रमाणे निविदेत भाग घेतलेले ठेकेदार पात्र असून श्री/**मे.ऐ.बी.वाघ** यांचे दर **शे.७.५१% जास्तीने** आहे व त्यांनी नियमा प्रमाणे ऑनलाईन बयाणा रक्कम भरलेली आहे.सबब कंत्राटदार श्री/**मे.ऐ.बी.वाघ यांची शे.७.५१% जास्त** दराने आलेले होते तथा L१ मे.ए.बी.वाघ यांना दि.०७/०६/२०२१ रोजी दर वाटाघाटीत दि. ०८/०६/२०२१ रोजी दिलेल्या पत्रात शे.२% जास्ती दराने काम करण्यास तयारी दर्शवलेली आहे.

उक्त फेर वाटाघाटीत दि.१७/०६/२०२१ मे.ए.बी.वाघ यांनी वाटाघाटी करून अंदाज पत्रकीय दराने पत्र दिले आहे. त्यानुसार मा.आयुक्त सो. यांनी मान्यता दिलेली आहे.तरी मे. ए.बी. वाघ यांचे अंदाजपत्रकीय दराने मे.स्थायी समिती पुढे ठेवणेस मंजुरीस्तव सादर झालेला आहे.

सर्व सन्मा. सदस्यांच्या सहमतीने व कार्यालयीन अहवालास अधिन राहून फेर वाटाघाटी अंती श्री. ए.बी. वाघ यांनी सदरचे काम अंदाजपत्रकीय दराने करणेबाबत पत्र सादर केल्याने त्यांचे आलेल्या अंदाजपत्रकीय दरास मान्यता देण्यांत येत आहे. सदर प्रस्ताव व कार्यवाहीबाबत लेखा आक्षेप निर्माण होणार नाही याची दक्षता घ्यावी. याबाबतची जबाबदारी संबंधित विभागाची राहील.

सर्वानुमते मंजुर,
सही/-x x x
सभापती,
स्थायी समिती,
धुळे महानगरपालिका,धुळे

विषय क्रमांक:- ९५ — धुळे मनपा पाणीपुरवठा विभागाकडील मानधनावरील पंप ऑपरेटर, विजतंत्री, गाळणी निरीक्षक, गाळणी चालक असे २५ कर्मचारी यांना ६ महिन्यांसाठी मुदतवाढ देणेबाबत आलेल्या कार्यालयीन अहवालावर विचार करणे.

म. नगरसचिव — नगरसचिव यांनी विषयांचे वाचन केले.
म. अमोल मासुळे — विषय मंजूर करण्यांत यावा.
म. नागसेन बोरसे — विषय मंजूर करण्यांत यावा.
म.कमलेश देवरे — विषय मंजूर करण्यांत यावा.
म. सभापती — सर्व सन्मा. सदस्यांच्या सहमतीने व कार्यालयीन अहवालास अधिन राहून सदर प्रस्तावास मान्यता देण्यांत येत आहे.

**धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर १०४ दिनांक०८/०७/२०२१**

धुळे मनपा जा क्र /धुमपा/आस्था/ ३५११ दि १४/१/२०२१ अन्वये अन्व्ये १ ते ८ कर्मचारी यांचे पंपऑपरेटर या पदावर ०६ महिने करीता मानधन तत्वावर मुदतवाढ देणेत आलेली होती.

तसेच जा क्र /धुमपा/आस्था/ ३५१५ दि १४/१/२०२१ अन्वये अन्वये १ ते ७ कर्मचारी यांना विजतंत्री या पदावर वरील प्रमाणे नेमणुक करणेत आलेली होती.

तसेच जा क्र /धुमपा/आस्था/ ३५१४ दि १४/१/२०२१ अन्वये १ ते ३ कर्मचारी यांना गाळणी निरीक्षक या नेमणुक करणेत आली होती.

तसेच जा क्र /धुमपा/आस्था/ ३५१२ दि १४/१/२०२१ अन्वये १ ते ७ कर्मचारी यांना गाळणी चालक या पदावर वरील प्रमाणे नेमणुक करणेत आलेली होती .

तसेच जा क्र /धुमपा/पा पु वि/ १८ दि १०/ ६/२०२१ अन्वये खालील प्रमाणे मानधन तत्वावरील कर्मचारी यांची कामाची मुदत दि १३/०७/२०२१ रोजी संपुष्ठात येत आहे.

| अ.क्र. | कर्मचाऱ्यांचे नांव | पद | आदेश | मुदत संपल्याची तारीख |
|---|---|---|---|---|
| १. | कल्पतरु स. वाघ | पंप ऑपरेटर | 3511-29/1/21-14/1/2021 | 13/7/2021 |
| २. | अमित अनिल पोतदार | पंप ऑपरेटर | 3511-29/1/21-14/1/2021 | 13/7/2021 |
| ३. | योगेश साहेबराव देवरे | पंप ऑपरेटर | 3511-29/1/21-14/1/2021 | 13/7/2021 |
| ४. | चेतन भानुदास सुडके | पंप ऑपरेटर | 3511-29/1/21-14/1/2021 | 13/7/2021 |
| ५. | दिपक वसंत माळी | पंप ऑपरेटर | 3511-29/1/21-14/1/2021 | 13/7/2021 |
| ६. | अमोल नरेंद्र अंपळकर | पंप ऑपरेटर | 3511-29/1/21-14/1/2021 | 13/7/2021 |
| ७. | इश्वर विठ्ठल बडगुजर | पंप ऑपरेटर | 3511-29/1/21-14/1/2021 | 13/7/2021 |
| ८. | रुपेश महेंद्र खैरनार | पंप ऑपरेटर | 3511-29/1/21-14/1/2021 | 13/7/2021 |
| ९. | रोहित रंजन मराठे | विजतंत्री | 3515-29/1/21-14/1/2021 | 13/7/2021 |
| १०. | पवार परेश गुलाबराव | विजतंत्री | 3515-29/1/21-14/1/2021 | 13/7/2021 |
| ११. | देवेंद्र नामदेव सोनवणे | विजतंत्री | 3515-29/1/21-14/1/2021 | 13/7/2021 |
| १२. | रमन भिकु पाटील | विजतंत्री | 3515-29/1/21-14/1/2021 | 13/7/2021 |
| १३. | केशव मधुकर महाजन | विजतंत्री | 3515-29/1/21-14/1/2021 | 13/7/2021 |
| १४. | विश्वजीत विजय गुर्जर | विजतंत्री | 3515-29/1/21-14/1/2021 | 13/7/2021 |
| १५. | वराडे अक्षय राजेंद्र | विजतंत्री | 3515-29/1/21-14/1/2021 | 13/7/2021 |
| १६. | अमोल मधुकर पाटील | गाळणी निरीक्षक | 3514-29/1/21-14/1/2021 | 13/7/2021 |
| १७. | गणेश दिगंबर शेलार | गाळणी निरीक्षक | 3514-29/1/21-14/1/2021 | 13/7/2021 |
| १८. | खैरनार अरुण राजाराम | गाळणी निरीक्षक | 3514-29/1/21-14/1/2021 | 13/7/2021 |
| १९. | रमेश वेडु बोरसे | गाळणी चालक | 3512-29/1/21-14/1/2021 | 13/7/2021 |
| २०. | साळुंखे विनायक जगन | गाळणी चालक | 3512-29/1/21-14/1/2021 | 13/7/2021 |
| २१. | बडगुजर राहुलअंबादास | गाळणी चालक | 3512-29/1/21-14/1/2021 | 13/7/2021 |
| २२. | महाजन उमेश रविंद्र | गाळणी चालक | 3512-29/1/21-14/1/2021 | 13/7/2021 |
| २३. | निलेश पंढरीनाथ करनाळे | गाळणी चालक | 3512-29/1/21-14/1/2021 | 13/7/2021 |
| २४. | किरण गोविंदा चव्हाण | गाळणी चालक | 3512-29/1/21-14/1/2021 | 13/7/2021 |
| २५. | राहुल नथ्थुसिंग जाधव | गाळणी चालक | 3512-29/1/21-14/1/2021 | 13/7/2021 |

पाणीपुरवठा विभागाकडील अहवालानुसार उक्त कर्मचारी यांच्या कामाची निकड पाहता व पाणीपुरवठा व्यवस्था सुरळीत ठेवणेकरीता वरील कर्मचा-यांना ०६ महिनेकरीता मुदतवाढ देणेबाबत पत्र सादर करण्यात आलेले आहे. तरी उक्त कर्मचा-यांना बाहय स्त्रोत प्रणालीने मनुष्यबळ मिळेपर्यंत मुदत संपल्याच्या दिनांकापासून ५दिवसाचा खंड करुन एकत्रित करार पध्दतीने मानधन रु ८०००/- मात्र नुसार पुढील ६ महिने करीता मुदतवाढ देणेबाबत महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ५३ (३) नुसार मान्यता मिळणेस्तव सविनय सादर केला असता मा.आयुक्त सो. यांनी आऊट स्टँडींगची प्रक्रिया Expedite करा, प्रस्तावीत केल्यानुसार मान्यतेस्तव सादर असे अभिप्राय नोंदविले आहे. उक्त नुसार सदर प्रस्ताव मे. स्थायी समितीपुढे निर्णयार्थ सादर झालेला आहे.

सर्व सन्मा.सदस्यांच्या सहमतीने व उक्त कार्यालयीन अहवालास अधिन राहून सदर पंप ऑपरेटर, विजतंत्री, गाळणी निरीक्षक, गाळणी चालक असे एकुण २५ कर्मचारी यांना ६ महिन्यांसाठी मुदतवाढ देण्यांस मान्यता देण्यांत येत आहे.सदर प्रस्ताव व कार्यवाहीबाबत लेखा आक्षेप निर्माण होणार नाही याची दक्षता घ्यावी. याबाबतची जबाबदारी संबंधित विभागाची राहील. **सर्वानुमते मंजुर.**

सही/-x x x
सभापती,
स्थायी समिती,
धुळे महानगरपालिका,धुळे

# धुळे महानगरपालिका,धुळे
## नगरसचिव कार्यालय
## स्थायी समिती सभा क्रमांक १६ चे इतिवृत्त

---

**धुळे मनपा भारतरत्न अटलबिहारी वाजपेयी सभागृह**
**गुरुवार दिनांक ०५/०८/२०२१**
**वेळ :-सकाळी ११-०० वाजता.**

धुळे महानगरपालिका स्थायी समितीची ऑन लाईन साप्ताहिक सभा आज गुरुवार दिनांक ०५/०८/२०२१ रोजी सकाळी ११-०० वाजता **मा.श्री संजय सुधाकर जाधव,सभापती**,स्थायी समिती, मनपा,धुळे यांच्या अध्यक्षतेखाली **धुळे मनपा भारतरत्न अटलबिहारी वाजपेयी सभागृह** भरली. ऑनलाईन सभेस खालील सन्मा.सदस्य सभागृहात हजर होते.

| अ.क्रं. | सदस्यांचे नांव | हुद्दा |
|---|---|---|
| १ | श्री. जाधव संजय सुधाकर | सभापती |
| २ | श्री. वैसाणे सुनिल तुळशिराम | सदस्य |
| ३ | श्रीमती माळी भारती अशोक | सदस्या |
| ४ | श्रीमती पाटील मंगला सुरेश | सदस्या |
| ५ | श्रीमती बोरसे पुष्पा प्रकाश | सदस्या |
| ६ | श्री. मासुळे अमोल पावबा | सदस्य |
| ७ | श्री. देवरे कमलेश नारायण | सदस्य |
| ८ | श्रीमती पठाण हिना अस्लम | सदस्या |
| ९ | श्री. सईद बेग हाशम बेग | सदस्य |
| १० | श्री. नवले शितल मोहन | सदस्य |
| ११ | श्री. बोरसे नागसेन दामोदर | सदस्य |
| १२ | श्रीमती कुलेवार किरण राकेश | सदस्या |
| १३ | श्रीमती वराडे वैशाली भिकन | सदस्या |
| १४ | श्री. जाधव बन्सीलाल माणिक | सदस्य |
| १५ | श्रीमती चौधरी मंगला अर्जुन | सदस्या |
| १६ | श्री. पटेल अमीन अब्दुल करीम | सदस्य |

**उपस्थित अधिकारी गण**

| अ.क्र. | अधिकाऱ्यांचे नाव | हुद्दा |
|---|---|---|
| १ | श्री. नितीन कापडणीस | अति. आयुक्त |
| २ | श्री. गणेश गिरी | उपायुक्त |
| ३ | श्रीमती शिल्पा नाईक | उपायुक्त |
| ४ | श्री. शांताराम गोसावी | सहा. आयुक्त |
| ५ | श्री. तुषार नेरकर | सहा. आयुक्त |
| ६ | श्री. विनायक कोते | सहा. आयुक्त |
| ७ | श्री. मनोज अरविंद वाघ | प्र. नगरसचिव |
| ८ | श्री. के.एन. शिंदे | अभियंता |
| ९ | डॉ. महेश मोरे | आरोग्याधिकारी |
| १० | श्री. चंद्रकांत जाधव | सहा.आरोग्याधिकारी |
| ११ | श्री. लक्ष्मण पाटील | सहा.आरोग्याधिकारी |

| | | |
|---|---|---|
| १२ | श्री.बी.एस. रनाळकर | प्र. लेखाधिकारी |
| १३ | श्री.रमजानअन्सारी | कार्यालय अधिक्षक |
| १४ | श्री.एन.पी. सोनार | ईस्टेट मॅनेजर |
| १५ | श्री. एन.के. बागुल | विद्युत अभियंता |
| १६ | श्री. सी.सी. बागुल | पा. पु. ओव्हरसिअर |
| १७ | श्री. सी.एम. उगले | पा. पु. ओव्हरसिअर |
| १८ | श्री. राजू माईनकर | भांडारपाल |
| १९ | श्री. किशोर सुडके | बाजार विभाग |
| २० | श्री. गजेश गायकवाड | लेखापाल, मनपा प्रि.मं. |
| २१ | श्री. सुक्राम आत्या राऊत | वाहन विभाग लिपीक |

म.सभापती — सर्व उपस्थित सन्मा. सदस्य अति. आयुक्त सो. अधिकारी वर्ग छायाचित्रकार बांधव सभेचे कामकाज चालविणेसाठी आवश्यक तो कोरम पूर्ण झाल्याने नगरसचिव यांनी सभेचे कामकाज सुरुवात करावी.

म. नगरसचिव — वंदे मातरम् या राष्ट्रवंदनेसाठी सर्वांनी उभे रहावे.

विषय क्रमांक :- ९६ — मागील स्थायी समिती सभेचे इतिवृत्त वाचून कायम करणे. (दि. १८/६/२०२१)

म. नगरसचिव — नगरसचिव यांनी विषयांचे वाचन केले.

म.सभापती — मागील स्थायी समिती सभेचे इतिवृत्त क्रमश:वाचून कायम करण्यांत येत आहे.

**धुळे मनपा स्थायी समिती ठराव १०५ दिनांक ०५/०८/२०२१**

मागील स्थायी समिती दिनांक १८/६/२०२१ च्या सभेतील ठराव नंबर ८५ ते ९५ अखेर क्रमश:वाचून कायम करण्यांत येत आहे.

सही/-X X X
**सभापती,**
**स्थायी समिती,**
**धुळे महानगरपालिका धुळे**

विषय क्रमांक:- ९७ — मा. सभापती सो. स्थायी समिती मनपा धुळे यांचे दिनांक ०२/०८/२०२१ च्या पत्रानुसार घनकचरा ठेकेदार मे. वॉटरग्रेस कंपनी यांच्या कामाबाबत विचार विनिमय करुन योग्य तो निर्णय घेणे.

म. नगरसचिव — नगरसचिव यांनी विषयांचे वाचन केले.

सभापती — मी मागच्या सभेत बोललो होतो वॉटरग्रेस बाबत विशेष सभा बोलवणार आहे आपण वॉटरग्रेस या संस्थेच्या कचरा संकलनाबाबत अनियमितते बाबत या ठिकाणी चर्चा करावी या विषयपत्रिकेवर हा विषय मी आवर्जून घेतला आहे प्रत्येक नगरसेवक नागरिकांच्या आरोपाला सामोरे जात आहे धुळे शहरात कचरा गाड्या फिरत नाहीत परंतु जीपीएस वरती त्यांच्या गाड्या फिरतांना दिसतात आता जीपीएस खरे की आपण खरे असा प्रश्न येतो आपण काम करून त्यांना 45 ते 50 लाख रुपये देत होतो गाड्या अजून कमी करून सुद्धा त्यांना 60 लाखांच्या पुढे बिल अदा केले जात आहे या ठिकाणी सर्व सन्माननीय सदस्यांनी मार्गदर्शन करावं आपण नवीन ठेकेदार नेमला आहे त्याच्यातही खूप मोठे राजकारण घडले आहे राजकारण असे घडले आहे की त्याला वर्क ऑर्डर देऊ नये जेणेकरून ठेकेदार काम करत राहावा आणि जी सन्माननीय सदस्यांची बॉडी आहे ती बदनाम होत राहावी यासाठी संपूर्ण यंत्रणा सज्ज झालेली आहे त्यासाठी वॉटरग्रेस बंद करण्याचा निर्णय घेणे आवश्यक आहे हे जे काही ट्रॅक्टर आहे गाड्या आहेत त्या आपल्याच मालकीची आहेत त्यांना आपण दुरुस्त करून मनुष्यबळ पुरवून केले तर कसे राहील मनपाला किती आर्थिक बोजा सोसावा लागेल कारण जोपर्यंत नवीन वर्क ऑर्डर देत नाही तोपर्यंत आपल्याला हा निर्णय घेणे अपेक्षित आहे याठिकाणी ज्यांना ज्यांना बोलण्याची इच्छा असेल त्यांनी मार्गदर्शन करावं.

म. कमलेश देवरे — मी तुमचे मनापासून स्वागत करतो जनतेच्या मनातील जो प्रश्न होता तो तुम्ही आज अजेंड्यावर आणला पण एक दु:खही वाटतं आपण प्रशासन हलगर्जी कुंभकर्ण झोपेत आहे पूर्ण धुळे शहरांमध्ये कचऱ्याचे ढीग लागले आहे घंटा गाड्यांचे नियोजन नाही कचरा उचलला जात नाही तरीपण मनपातील आरोग्य विभागातील अधिकाऱ्यांना वाटत नाही का एखाद्या दिवशी सकाळी उठून फेरफटका मारावा आणि धुळ्यातील शहरातील परिस्थिती काय आहे हे डोळ्यांनी पाहावी अधिकारी AC चा आस्वाद

घेतात पण एकही अधिकारी सकाळी उठून जात नाही का मागे पण सांगितले होते जोपर्यंत नवीन ठेकेदार येत नाही तोपर्यंत चार ते पाच महिने या ठेकेदाराकडून काम करून घ्यावे आता त्या गोष्टीला वर्ष झाले नवीन ठेकेदार नेमला आहे त्याला वर्क ऑर्डर देण्यासाठी हेतुपुरस्कर विलंब करायचा जुन्या ठेकेदाराकडून काम करून घेण्यास प्रशासनाला इंट्रेस्ट का माझा प्रश्न आहे नवीन ठेकेदार देण्यास विलंब होत आहे यामध्ये काही राजकारण आहे का राजकारण असेल तर ते पण प्रशासनाने व्यक्त करावं माझा स्पष्ट आरोप आहेत प्रशासनावर जुन्या ठेकेदाराकडून काम करून घ्यावे आणि आपले खिसे गरम करावं घंटागाडी घरापर्यंत येत नाही कचरा उचलला जात नाही आणि महिन्याला तेवढेच बिल निघत गौडबंगाल काय आहे याचं पण उत्तर प्रशासनाने द्यावं दुसरा मुद्दा जो नवीन ठेकेदार देत आहे त्याच्यामध्ये काही राजकारण किंवा टेक्निकल यायचं असेल किंवा प्रशासनाला काही अडचण असेल की शासन स्तरावर चौकशी चालू आहे त्यामुळे मी येऊ शकत नाही धुळे शहराच्या विकासासाठी आम्ही सदस्य याबाबत मुख्यमंत्र्यांची भेट घेऊन धुळे शहराचे कचरा समस्या ची अडचण सांगून त्यांच्याकडून मार्ग काढू शकतो.

म. अमोल मासुळे — गेल्या वर्षी माजी सभापती सुनील भाऊ बैसाणे असताना वॉटरग्रेस कचरा संकलनाचे काम पूर्ण धुळे शहरात सुरू होते त्यावेळी देखील वॉटरग्रेस चले जाव असा नारा दिला होता. नोव्हेंबर महिन्यात वॉटरग्रेस संस्थेवर सर्व सदस्य च्या संमतीने कार्यवाही करण्याबाबत ठराव करण्यात आला होता त्या गोष्टीला आठ ते नऊ महिने झाले याठिकाणी धुळे महानगरपालिकेचे विरोधी पक्ष नेते कमलेश भाऊ यांनी त्या व्यथा मांडल्या त्यांना माझं समर्थन आहे धुळे शहरात १९ प्रभागात प्रत्येक प्रभाग चार गाड्या असतील तर त्यातील एक किंवा दोन गाड्या बंद असतात आणि पंधरा-पंधरा दिवस गाड्या बंद ठेवतात आणि बिल संपूर्ण गाड्यांचे त्याठिकाणी निघतात मागील आठवड्यात बकरी ईद निमित्त धुळे शहरातील प्रभाग आहेत त्यांच्या प्रत्येक प्रभागातील एक एक दोन दोन गाड्या काढून त्या एक्स्ट्रा कामासाठी लावले त्यावेळी देखील पाच ते सहा दिवस नागरिकांना त्रास सहन करावा लागला प्रशासनाची जबाबदारी नव्हती का की बकरी ईद आहे आपल्याला त्या ठिकाणी वाहने पुरवायची आहेत पूर्वतयारी म्हणून प्रशासनाचे काम होतं या ठिकाणी पूर्वी ५० ते ५५ लाख रुपये बिल येत होतं तेच बिल आता ६० ७० लाखापर्यंत जात आहे याठिकाणी समस्या कमी न होता वाढलेले आहेत आपण या ठिकाणी विषय मांडला त्याबद्दल अभिनंदन माझी विनंती आहे या ठिकाणी योग्य निर्णय घेऊन त्या वाटत असला धुळे शहरातून हद्दपार करावे लागेल वॉटरग्रेस धुळेकर नागरिकांच्या आरोग्याशी खेळत आहे या ठिकाणी आपली भारतीय जनता पार्टीची सत्ता आहे तरी तो आपल्याला का जुमानत नाही याबाबत योग्य तो निर्णय घ्यावा धन्यवाद.

म.अमीन पटेल — सर्वप्रथम मी आपले धन्यवाद करतो कि कचऱ्याचा विषय अजेंड्यावर घेतला बद्दल धुळे शहरात कचरा समस्या बाबत गंभीर विषय बनला आहे धुळे शहरात सर्वात मोठा वॉर्ड माझा असून त्या ठिकाणी तीन दिवसांपासून घंटागाड्या येत नाही मी संबंधित अधिकाऱ्यांना विचारले गाड्या का आल्या नाहीत तर त्यांनी उत्तर दिले नाही धुळे शहरात कुठेही फिरा या ठिकाणी कचऱ्याचे ढीग पडलेले दिसतात जे महानगरपालिकेचे कर्मचारी आहेत त्यांना गटार काढण्यासाठी मेहनत करावी लागते शहरात कचरा उचलला जात नाही. एक महिन्यापासून गटार तुंबली आहेत त्यामुळे शहरात दूषित वातावरण होऊन रोगराई पसरत आहे डेंग्यू मलेरिया यासारखे आजार होत आहे माझ्या प्रभागात रोज 2 ते 2. 50 हजार लोक आजारी पडत आहे माझ्या प्रभागात पाण्याचा पण समस्या आहेत सहा ते सात दिवस पाणी येत नाही ठेकेदार आहे तो काम करीत नाही त्यांना पत्र सुद्धा दिले आहे मी काम नाही करणार नवीन ठेकेदाराने काम कशा पद्धतीने करणार याचा डेमो दाखविला होता पण त्याला अजून वर्क ऑर्डर दिली जात नाही त्याचे स्पष्टीकरण पाहिजे ही स्थानिक स्वराज्य संस्था आहे त्यांना महासभा स्थायिक निर्णय घेण्याचा अधिकार असतो धुळे शहरात कचऱ्याची समस्या सुटली नाही तरी मी आंदोलन करणार.

म. नागसेन बोरसे — हा विषय आपण आणला आहे धुळे शहराची समस्या फार आहे गंभीर दोन महिन्यापूर्वी एका दिला आहे त्याच्यात जे दर दिले आहे ते पूर्ण महाराष्ट्रात कमी आहेत मंत्रालयातील सचिवांनी सुद्धा सांगितले तुमचे

रेट कमी आहे तरी पण काही कारणास्तव फक्त वॉटरग्रेसचा फायदा झाला पाहिजे त्यांच्यासाठी हे चालू आहे काहींनी आमदारांना सांगून तक्रार केली आठ दिवसात त्याचा निकाल लागेल.

म. शितल नवले — माझ्याकडे दोन कागद आहे नाशिक मनपाची दर आकारणी व धुळे मनपाची दर आकारणी. माझ्या स्वतःचा ३०००स्क्वेअर फूट रेसिडेन्शिअल प्लॉट आहे. त्याला आकारणी झालेली नऊ हजार पाचशे रुपये नाशिकला आकारणी दुपटीने झाली सहा हजार दोनशे रुपये आपण डबल कर आकारणी करीत आहे माझे म्हणणे आहे. आपण ज्यावेळी दुपटीने कर आकारणी करतो. त्या सुखसोयी आपण देत नाही. ज्यावेळेस अडीच वर्षापूर्वी हा ठेका दिला गेला देशमुख साहेब यांनी कुठल्या आधारावर ८० गाड्या विकत घेतल्या म्हणजे आपले कुठे चुकले हा विचार करा अडीच वर्षापूर्वी आपण येण्याच्या आत त्यांची टेंडर प्रोसेस झालेली होती फक्त आपण आपल्या पहिल्या स्थायी समितीच्या सभेत मंजुरी दिली होती आणि आयुक्त साहेब तुम्हाला एक प्रश्न विचारावासा वाटतो तुम्ही टेंडर फ्रेश केले एखाद्या व्यक्तीने पहिल्या दोन महिने तीन महिने टेंडर कंडीशन प्रमाणे जर वागत नसेल तर टेंडर ॲक्शन झाली पाहिजे किंवा नाही त्याला फक्त पत्र दिले सॉफ्टवेअर जे दहा लाखाचे होते ते २५ लाखाचे कोटेशन तयार केले काटा बसवायला आपल्याला तेव्हा आठ महिने लागले. एका गाडीच्या काटयाचे पन्नास रुपये देत होतो. आपण ८० गाड्यांच्या किमान दोन फेऱ्या जर धरल्या तर तीनशे गाड्यांचे पन्नास रुपये प्रमाणे आपण पैसे देत होतो असे आपण आठ महिने भरले याला जबाबदार कोण ? प्रशासनाने तुम्ही टेंडर काढणार होते स्वतःचा काटा लावून देणार होते का लावला नाही टेंडर होण्याच्या आधी जो कक्ष स्थापनेसाठी कस्टमर केअर नंबर दिला होता त्यावर मी फोन केला तर तो कस्टमर नंबर कुठे असावा व तो म्हणजे शिर्डीला निघालो असे सांगितले त्याच्यावर कायदेशीर कारवाई करण्याची व्यवस्था काय आहे तर पत्रावर पत्र देणे तो आला अधिकाऱ्यांना भेटून सेटल झालं असायाचा अर्थ होतो आणि तीच वर्षापासून कार्यक्रम चालू आहे त्याला सव्वा दोन वर्ष बिल दिले गेले आहे मी टाटा मोटर्स ला गेलो होतो तर त्याठिकाणी महानगरपालिकेच्या सोळा ते सतरा गाड्या दिसल्या यांचे डिपॉझिट किती जमा आहे हे मला प्रशासनाने सांगावे आणि आज जर आपण त्या गाड्या मेंटेनेस करायला घेतल्या तर काय खर्च येऊ शकतो मागील वेळेस आपल्या कडे गाड्या नव्हत्या त्या वेळी बचत गटाकडून काम करून घेत होतो त्यावेळी ५० टक्केपेक्षा कमी खर्चात काम होते त्या बचत गटांना कामे द्या त्यांना गरज आहे कामाची छोट्या गाड्या का घेण्यात आल्या प्रमाणे अटी शर्तीनुसार अधिकाऱ्यांनी काम का करून घेतले नाही याला अधिकारी जबाबदार आहे त्यांच्यावर आतापर्यंत काय कारवाई झाली नाही सभापती महोदय पाच ते सात बचत गटांना हे काम करून स्वतः काम चालू करून घ्या.

म. पुष्पाताई बोरसे — सभापती महोदय माझा प्रभागात एक महिन्यापासून घंटागाडी येत नाही घराजवळ आला आहे त्या ठिकाणी सर्व लोक कचरा टाकत आहे उचलल्या ट्रॅक्टर पण येत नाही एक वर्षापूर्वी मी आणि प्रतिभाताई आम्ही साहेबांना पत्र दिले होते मिळणेबाबत तरी अजून सुद्धा या प्रश्नामुळे आज नागरिकांच्या जीवाशी खेळला जात आहे आमच्या वाडीभोकर रोड मंजूर झालेला आहे तो कुठून कुठपर्यंत तेवढे मला माहिती मिळावी.

म.नागसेन बोरसे — सभापती महोदय वलवाडी गावापासून तर एकविरा देवी मंदिर गेटपर्यंत मंजूर झालेला होता परंतु अडचण अशी आहे एकविरा देवी मंदिर गेट पासून ते उत्तर मुखी मारुती पर्यंत हे जे बांधकाम झाले आहे ते तीस तीस फूट रोड वाढणार आहे त्यामुळे प्रशासनाने असा निर्णय घेतला की उत्तर मुखी मारुती पासून तिकडेच करायचा लोक कोर्टात गेले असते त्यामुळे काम थांबले असते म्हणून आपण असे केले.

म. हिना पठाण — जिओ कंपनी वाल्यांना बाबत मागील सभेत सांगितले होते त्याचे स्पष्टीकरण झाले नाही.

म.भारती माळी — सर्वप्रथम संजूभाऊ तुमचे अभिनंदन करते कचऱ्याच्या विषय तुम्ही अजेंड्यावर घेतला मुळे शहरांमध्ये कचऱ्याच्या परिस्थिती इतकी बिकट झाली आहे धुळे महानगरपालिकेमध्ये भाजपाची एक हाती सत्ता आहे प्रशासनाच्या चुकीमुळे ही परिस्थिती निर्माण झालेली आहे याला सामान्य नागरिक त्रस्त झाले आहेत त्यांच्यासोबत जे सदस्य आहेत त्यांना प्रभागाचे कामे करण्यासाठी निवडून दिले आहेत या समस्येवर ठोस असा तोडगा काढावा अशी आशा आम्ही करू इच्छितो भाऊ माझ्या प्रभागामध्ये ज्या

गाड्या आहेत त्यामध्ये तीन गाड्या येतात गेल्या चार महिन्यापासून एक गाडी बंद आहे मी मागणी केली होती की माझ्या प्रभागात मोठा आहे. आणि जो कचऱ्याचा प्रश्न आहे तो तसाच आहे त्याच्यावर लवकरात लवकर निपटारा करावा.

म.अमोल मासुळे — प्रत्येक प्रभागात चार घंटागाडी आहेत त्यात काही बंद आहेत तर आतापर्यंत किती दंड दिला आहे मागील चार महिन्यात किती दंड दिला आहे.

म. शितल नवले — उत्तर देत असताना प्रतिप्रश्न करण्यासाठी मला परवानगी द्यावी.

म.चंद्रकांत जाधव — वॉटरग्रेस मार्फत सुरुवातीला चांगल्या पद्धतीने नियोजन केले होते त्या वेळेस पूर्ण नव्वद गाड्या सुरू होत्या त्यावेळी सहा ते सात महिने व्यवस्थित काम सुरू होते रूट मॅप तयार करण्यासाठी नाशिक करून त्यांचे लोक आले होते यावेळी घंटागाडी जात होते त्यावेळी एक दिवसाआड घंटागाडी जात होती असे माझे मत आहे परंतु नंतर मेंटेनन्स साठी गाड्या कमी कमी होत गेले.

म. शितल नवले — आपल्या टेंडर कंडिशन मध्ये असे म्हटले होते रोज गाडी यायला पाहिजे होती. तुम्ही म्हणता एक दिवस आड गाडी जात होती तर तुम्ही का कारवाई केली नाही.

म.चंद्रकांत जाधव — त्या गाड्यांचे मेंटेनेस खूप प्रमाणात होते त्यामुळे तक्रारी वाढत होत्या आणि आजही तीच परिस्थिती आहे त्याआधी अटी शर्तीनुसार दंडात्मक कार्यवाही केली आहे दहा लाख ३२ हजार ५८० रुपये दंड केला होता कचऱ्याबाबत २६ लाख ८१ हजार हजार असा एकूण ३७ लाख रुपये दंड केला आहे तसेच आपण मागच्या चार महिन्यापूर्वी वॉटरग्रेस कंपनीला नोटीस दिली घंटा गाड्या आहेत त्या रिपेयर कराव्यात.

म. सभापती — त्यांचे अवरेज काय आहे.

म.चंद्रकांत जाधव — त्यांचे पहिले पन्नास ते साठ लाख दिले जायचे आता चार महिन्यापासून ६० लाखाच्यावर दिले जात आहे.

म.शितल नवले — त्यावेळेस केलेले ठरावाप्रमाणे कार्यवाही व अंमलबजावणी करणे आवश्यक आहे. ठरावा व्यतिरिक्त काना मात्रा इकडे-तिकडे झाला नाही पाहिजे आपण एक रुपयाचे कामाचे एक रुपया दहा पैसे दिले आहे मी औरंगाबाद हायकोर्टात प्रशासन वरही केस टाकत आहे.

म. चंद्रकांत जाधव — कमलेश भाऊंनी मुद्दा उपस्थित केला होता त्या संदर्भात माहिती सांगतो मागील सभापती साहेब असताना एक ठराव केला होता नवीन निविदा प्रक्रिया सुरू केली होती जोपर्यंत पर्यायी व्यवस्था होत नाही तोपर्यंत वॉटरग्रेस काम करू सुरू राहावे जस-जसे काम कमी होत होते गाड्या खराब होत होत्या मनपाने स्वतः २२ गाड्या टाटा शोरूम मधून दुरुस्त करून घेतल्या त्याचे जे बिल होतं त्या ठेकेदाराच्या बिलातून कपात करण्यात आली आहे आता ज्या गाड्या दुरुस्त करायच्या होत्या त्या गाड्यांची टाटा शोरूम कडून मागविली आहे वाहन विभागाने त्या आता पुढच्या आठवड्यात पर्यंत येऊन जातील आपण वारंवार भेटी घेतल्या त्यांना वारंवार काम सुधारण्याबाबत नोटिसा दिल्या.

म. कमलेश देवरे — ज्या वेळी ९०गाड्या होत्या त्या वेळी किती पैसे द्यायचे त्याला.

म.चंद्रकांत जाधव — त्यावेळी पंचेचाळीस ते पन्नास लाख रुपये दरमहा देत होतो तीन महिन्यानंतर बिल वाढले त्यांचे.

म.कमलेश भाऊ देवरे — आता आपल्याकडे किती गाड्या सुरू आहे.

म.चंद्रकांत जाधव — आता आपल्याकडे ७० गाड्या सुरू आहे ज्या अठरा गाड्या शोरूम मध्ये आहे त्यापैकी दहा ते बारा गाड्या उपलब्ध करून दिले आहेत मागच्या दोन महिन्यापासून ६० लाख रुपये बिल देत आहोत.

म. शितल नवले — त्यांनी सांगितले सदोतीस लाख दंड वसूल केला परंतु माझ्या माहितीनुसार त्याला पहिला दहा लाख रुपये दंड केला होता त्याच्यातून पेमेंट परत करण्यात आली आहे त्यामुळे ती पण माहिती सांगा व आज त्याचे किती डिपॉझिट किती आहे व गाड्या दुरूस्तीसाठी किती खर्च लागणार आहे जर एखाद्या ठेकेदाराला आपण निलंबित करतो तर त्याच्यावर काय रिकव्हरी आहे हे माहिती काढून ठेवायला पाहिजे होती.

म.चंद्रकांत जाधव — आपण जवळपास ३५ लाखाची डिपॉझिट ठेकेदाराकडून केली आहे.

म. शितल नवले — माझ्या प्रश्नाचा उत्तर अधिकाऱ्यांकडून हवा आहे त्यांच्याकडून नाही.

म.सहा.आरोग्याधिकारी वाहन विभागामार्फत या गाड्यांचे इस्टिमेट मागविले आहे ती रक्कम आपण त्यांच्या देयकातून वजा करून घेणार आहोत.

म.सुनील बैसाणे सभापती महोदय आपण सभापती झाल्यापासून आपली कार्यपद्धती पाहता आपण धुळे शहरातील अत्यंत जिव्हाळ्याचे जे काही प्रश्न असतात त्यावर स्वतःहून प्रकाश टाकतात आणि आपल्या पत्र नुसारच हा विषय विषय पत्रिकेवर घेण्यात आला आणि या विषयावर सर्व सन्माननीय सदस्यांनी एकच एकच भावना आहे की धुळे शहरातील जो कचरा आहे त्याचं नीट संकलन झाले पाहिजे पुणे शहर रोगमुक्त कचरा मुक्त झाले पाहिजे ही सर्व सदस्यांची मागणी आहे सभापती महोदय मी या विषयावर चर्चा करू इच्छितो की मी ज्यावेळी स्थायी समितीचा सभापती झालो त्यावेळी कचर्या बाबतीत वारंवार तक्रारी झाल्या त्यावेळी वेळोवेळी अनेक बैठका घेऊन या कार्यपद्धती मध्ये सुधारणा झाली पाहिजे असा माणूस होता थोड्याफार सुधारणा करणे यामध्ये त्या वेळी मी यशस्वी झालो परंतु यावेळी सर्व सन्माननीय सदस्यांनी नारा दिला की वॉटरग्रेस चलेजाव त्या अनुषंगाने आम्ही त्यावेळी निर्णय घेतला निर्णय घेत असताना धुळेकरांची कचऱ्यापासून मुक्तता मिळाली पाहिजे. आमची मागणी होती. त्यानुसार नवीन निविदा तयार करण्यात आली त्यानुसार त्याच्या चांगल्या अटी शर्ती टाकून तिचं पालन करण्यात यावे अशा सूचना दिल्या होत्या सभापती महोदय त्यावेळी आम्ही ब्लॅक लिस्ट करण्याबाबतचा ठराव केला आणि त्यांना या आदेशाचे पालन करावे याबाबत माहिती दिली आयुक्त साहेबांनी पुन्हा वॉटरग्रेस ब्लॅकलिस्ट करण्याचा प्रस्ताव सादर केला त्यावेळी आम्ही सर्व सदस्यांनी आयुक्त आणि प्रशासनाला कळविले की हा प्रशासनाचा भाग आहेत प्रशासनाने त्याला ब्लॅक लिस्ट करावं किंवा काय करावं फक्त धुळेकर नागरिकांची कचरा मुक्ती कशी होईल त्या पद्धतीचे आम्ही त्या वेळेस केले त्याच्यात काही गोष्टी सन्माननीय सदस्यांच्या अंगाशी येणार होते वॉटरग्रेसला ब्लॅक लिस्ट का करावे याबाबत स्पष्ट अभिप्राय नव्हता त्यावेळी हा सर्व अधिकार आयुक्त सो यांना आहे त्याच्यावर यांनी निर्णय घ्यावा कारण अतिशय चुकीचे आपण प्रशासनाच्या माध्यमातून करतो त्यात आपल्याकडे मनुष्यबळही नाही नवीन निविदा निघेपर्यंत त्यांच्याकडूनच काम करून घ्यावे ते पत्र दिले आहे आम्ही दर भरलेले आहे त्याच्यात आम्हाला परवडत नाही सदर काम करण्यास आम्ही असमर्थ आहे जर ठेकेदाराने असमर्थता दाखवली तरी प्रशासनाची त्यांच्याकडून काम करून घेण्याचा अट्टाहास का दुसरी गोष्ट अशी आहे शासनाचा आदेश आहे त्यात जीआर मध्ये ज्या घनकचरा व्यवस्थापन समितीने त्याला निविदा दिल्यानंतर त्यांने अटी शर्तीमध्ये भंग केला असेल आणि वारंवार निवेदन धारकाच्या बाबतीमध्ये लोकप्रतिनिधी व जेष्ठ नागरिक यांच्या तक्रारी असतील आणि तक्रारी असल्या नंतर देखील त्याच्या जर धनादेश दिला जात असेल तर त्याबाबतची शिस्तभंगाची कार्यवाही प्रशासनावर करावी असे जीआर मध्ये नमूद आहे जर सदरची संस्था अटींचे पालन करत नाही म्हणून त्याला दंड करतो. ६७ लाख रुपये आपण दंडा करतो त्या यंत्रणेवर नियंत्रण ठेवण्यासाठी या प्रशासनाची जबाबदारी आहे प्रशासन लोकप्रतिनिधींच्या प्रश्नाकडे दुर्लक्ष करीत असेल आदेशाचा भंग होत असेल ज्या पद्धतीने वॉटरग्रेस जेवढा जबाबदार आहे त्याच्या शंभर पट प्रशासन जबाबदार आहेत प्रशासनाचे जे अधिकारी असतील त्यांच्या माध्यमातून हा सर्व व्यवहार होत असेल त्या सर्वांवर गुन्हे दाखल होण्यास शितल भाऊ जर कोर्टात जात असतील तर त्यांनी तो शासनाचा आदेश काढून बघावा त्यामध्ये स्पष्ट दिले आहे. की शिस्तभंगाची कार्यवाही करून त्यांना कारावासही होऊ शकतो १४ वा वित्त आयोग हा शासनाचा असलेल्या निधीवर अंकुश ठेवण्याचे काम प्रशासनाचे आहे. त्या आदेशाचा भंग झालेला आहे तक्रार दिल्यापासून सर्वांकडून रिक्वरी होऊ शकते हा इतका गंभीर विषय आहे काम करत असताना अनेक विषय असतात अनेक चुका होत असतात आम्ही मान्य करतो लोकप्रतिनिधी तुमच्याकडे तक्रार करून तुम्ही त्याकडे दुर्लक्ष करीत असाल तर तर आम्हाला पण नियम व कायद्यावर बोट ठेवता येते सभापती महोदय या ठिकाणी आम्ही पोटतिडकीने बोलतो त्या बोलण्याकडे जर प्रशासन दुर्लक्ष करीत असेल तर नाईलाज आहे न्यायालयाच्या कायद्याच्या बाबी तपासून बघितल्या पाहिजे कारण या ठिकाणी जे जे काही आर्थिक विषय येतात. लोकप्रतिनिधींनी घरचे काम न सांगता नागरिकांचे काम सांगत असतो आणि काही गोष्टी मध्ये आपण जबाबदार असू शकतो जे जे असतील

प्रश्न उपस्थित करणारे त्यांनी चांगल्या बाजू आपण तपासल्या गेल्या पाहिजे स्थायी समितीमध्ये आर्थिक विषय आले की त्याच्या मध्ये काहीतरी गोड बंगाल आहे आमची पद्धत काय आहे त्याच्यामध्ये सुधारणा झाली पाहिजे भाऊ आपल्याकडे लोणी खाण्याऱ्यांची नावे असेल तर शेयर करा सदस्यांना अधिकाऱ्यांना याच्यामध्ये एक वेगळा मेसेज जाईल असे पद्धतीचे काम कोणी करू नये प्रशासनाच्या पण काही गोष्ट आपण तपासले तर बरे होईल हा धुळे शहराच्या विकासासाठी चांगला विषय आहे अशा पद्धतीचा निर्णय घ्यावा.

म. शितल नवले — नाव घेतले नाही सदस्यांचे नावे घेतली नाही आता आमच्या आदरणीय सदस्यांनी उल्लेख केला की पत्र दिले की काम करण्यास असमर्थ आहे.

म.चंद्रकांत जाधव — सदर रेट मध्ये काम करणे परवडत नाही म्हणून त्याने सरेंडर केली आहे.

म.शितल नवले — मला माहिती आहे तीन वर्षासाठी काम करायचे आहे याला असेल ३१ लो मध्ये म्हणतात की त्याला परवडत नाही असे पत्र दिले असेल तर ही रक्कम रिकव्हरी करावी असे शासनाच्या नियमावलीत आहेत माझे म्हणणे आहे त्याच्या विरोधात कोर्टात जावे. जे जास्त दर द्यायचे असेल ते पण वसूल करा.

म.अमोल मासुळे — आपल्या किती गाड्या चालू आहेत.

म.सहा.आरोग्याधिकारी — ७० गाड्या चालू आहेत.

म.अमोल मासुळे — १२ ते १३ गाड्या एका महिन्यापासून उभे आहेत याला चार महिन्यापासून दंड किती दिला आहे.

म.अमीन पटेल — मी जो विषय मांडला त्याबाबत खुलासा करावा.

म.सहा.आरोग्याधिकारी — गाड्या भागात फिरत नाही ठेकेदार गाड्या उपलब्ध करून देत नाही गटारी साफ होत नाही तर स्वच्छता पसरते १२ ते १३ नंबर प्रभागातील यांची बदली झालेली आहेत्या भागात कामे झाली नाही मी मान्य करतो दुसरे असे की नवीन ठेकेदाराला वर्कऑर्डर का देण्यात आली नाही त्याबाबत तक्रार दाखल झाली आहे त्या अनुषंगाने प्रशासनामार्फत आपला पाठपुरावा सुरू आहे याबाबत आपण महाराष्ट्र शासनाला विनंती केली आहे आम्हाला कार्यादेश देण्यासाठी परवानगी मिळावी.

म.अमीन पटेल — जो नवीन ठेकेदार आहे त्याने जी कामाची पद्धत दाखविली ही चांगली असल्यामुळे त्याला आम्ही स्थायी समितीत मंजुरी दिली त्या नोंद केली गेली चार ते सहा महिने त्याने चांगले काम केले तर त्याला पुढील ठेका दिला जाईल ही स्थानिक स्वराज्य संस्था आहे तिथे अधिकार महापौर सभापती सो यांना हे कोणी नागरिक मंत्रालयात तक्रार करत आहे त्याला मला वर्क ऑर्डर द्यायची नाही तर शासनाचे चे पत्र आले आहे त्याला उत्तर दिले पाहिजे धुळे शहराची जनता आजाराने मरत आहे आणि मंत्र्यांच्या आदेश आहे त्या आदेशानुसार त्याचे वर्क ऑर्डर रोखून ठेवले आहे का मला पहिले याचे उत्तर द्या नियमाच्या विरोधात टेंडर आहे का?

म.सहा.आयुक्त — यापूर्वी माजी सभापती सुनील बैसाणे यांनी उपस्थित केलेला प्रश्न वॉटरग्रेस कंपनी आता याबाबत त्यांनी प्रशासनाला निर्देश दिले होते त्यानुसार प्रशासनाने तातडीने त्या विषयात तज्ज्ञ आहेत त्यांची नेमणूक करून त्यांनी ते प्रारूप केले त्याबाबत प्रसिद्धी केली त्यानुसार स्थायी समिती समोर दर मंजुरीसाठी आला आहे त्यात स्थायी समितीने त्यांचे दरही मंजूर केली आहे प्रशासनाला वर्कऑर्डर देण्यासाठी आम्ही तातडीने कार्यवाही करून त्याबाबत आयुक्तांकडे अहवाल सादर केला. तथापी नगर विकास विभागाकडून काही निर्देश प्राप्त झालेली आहे त्यामुळे वर्कऑर्डर देण्याची प्रक्रिया काही काळासाठी स्थगित करण्यात आली आहे यापूर्वी माननीय आयुक्त सो यांचे मा.उपमहापौर यांच्याकडे मीटिंगा झाले माननीय सभापती सो यांच्याकडे ही मिटिंग झाल्या.सभापती यांनी काही निर्देश दिले होते त्याचे गांभीर्य आम्ही आयुक्त साहेबांच्या लक्षात आणून दिले आहे आणि त्याबाबतचा पाठपुरावा वरती शासनस्तरावर चालू आहे आपल्या निविदेमध्ये कुठल्याही प्रकारची चूक नाही जे प्राप्त झालेले आहेत ते अत्यंत किफायतशीर आहे कमी आहे आणि नगरपालिकेच्या हिताचे आहे या संपूर्ण प्रकरणांमध्ये प्रशासनाकडून मात्र सुद्धा चूक झाली नाही याबाबतच्या वस्तुनिष्ठ अहवाल आम्ही शासनाला सुद्धा सादर केलेला आहे शासनाकडून याबाबत निर्णय घेणे अपेक्षित आहे.

म.अमीन पटेल — टेंडर व रेट बरोबर आहे ही स्थानिक स्वराज्य संस्था आहे येथे वर्क ऑर्डर देण्याचं काम आयुक्तांचे आहे ही मूलभूत सुविधा आहे त्याचे अधिकार आपल्याला आहे.

म. शितल नवले — आता पर्यंत आरोग्य अधिकारी उत्तर देत होते सर्वप्रथम चार्ज गोसावी साहेब यांच्याकडे होता त्यांच्या काळात त्यांनी काय काय कार्यवाही केली ठेकेदाराने अटी शर्तीचा भंग केला त्यांनी त्यांच्यावर कार्यवाही करायला पाहिजे होती. एक तरी पत्र दिले का प्रत्येक १२ तारखेला सह्या करतात.

म.अमोल मासुळे — मागील चार महिन्यात किती दंड वसूल केला.

म. सभापती — मी प्रशासनाला आदेश देतो की एका आठवड्याच्या आत म्हणजेच पुढील स्थायी समिती सभे पर्यंत संपूर्ण अहवाल तयार करावा हे जे २० ट्रॅक्टर चालू होते ते आठ दिवस चालू द्या परंतु आठ दिवसानंतर जर कार्यादेश मिळाला नाही तर हे ट्रॅक्टर आपल्याला बंद करावयाचे आहे प्रति ट्रॅक्टर किती खर्च येईल त्याच्यात ड्रायव्हर लेबर डिझेल खर्च धरून आणि भाडे यांचे २० ट्रॅक्टरचा अहवाल तयार करा ज्या घंटागाड्या आहेत आपल्या दुरुस्तीला पाठवले आहेत त्या दुरुस्त करुन त्यासाठी झालेला खर्च वॉटरग्रेस कंपनीच्या बिलातून वजा करा ते पैसे त्या घंटागाड्यावर लेबर मिळवून त्यासाठी किती खर्च येईल हा देखील परिपूर्ण अहवाल पुढच्या सभेपर्यंत द्यावा पुढच्या सभेत कुठलेही कारण सांगू नये.

म.अमीन पटेल — कोणाच्या तक्रारीमुळे वर्कऑर्डर देण्याची थांबले आहे.

म.सहा.आरोग्याधिकारी त्याबाबत माननीय आमदार सो यांनी नगरविकास विभागाकडे तक्रार दाखल केली त्या अनुषंगाने शासनाने आपल्याला विचारणा केली त्यानुसार आपण त्यांना सदर स्पष्टीकरण दिले आहे की त्यात निविदा प्रक्रिया कशी राबवली त्याचे दर कसे आहेत परत आपण २९ तारखेला शासनाला विनंती केली आम्हाला कार्यादेश देण्यासाठी मंजुरी द्या धुळे शहराचा कचऱ्याचा प्रश्न गंभीर आहे माननीय आमदार फारूक अन्वर यांनी तक्रार केली आहे.

म.अतिरिक्त आयुक्त — आमच्या वरती गव्हर्मेंट ऑफ महाराष्ट्रचा कंट्रोल आहे ही तक्रार महाराष्ट्र शासनाकडे गेली आहे.

म. सभापती — सदरचे काम आपल्या मनपा मार्फत करावयाचे निश्चित झाल्यास किती खर्च येईल याबाबत परिपूर्ण अहवाल पुढील सभेत सादर करावा.

**धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर १०६ दिनांक ०५/०८/२०२१**

मा.सभापती सो. स्थायी समिती मनपा धुळे यांचे दिनांक 2/08/2021 रोजीच्या पत्रानुसार धुळे शहरातील घनकचरा संकलनासाठी धुळे महानगरपालिकेने काही वर्षापूर्वी मे. वॉटरग्रेस कंपनी यांना ठेका दिलेला होता.परंतु सदर ठेकेदाराचे काम हे सुरुवाती पासूनच असमाधानकारक असून आता तर काम न करताच महिन्याला सुमारे 60 लाख रुपयांपेक्षा जास्तीचे बील सदर ठेकेदार लाटत असून सदरचे काम तात्काळ थांबवून मनपास्तरावर टक्‌रटकर व इतर यंत्रणा लावल्यास याचेपेक्षाही खूप कमी दरात व समाधानकारक काम होवू शकेल. त्याच बरोबर सदर कामाचा नवीन ठेकेदारास ठेका देणेबाबत स्थायी समितीने दर मंजुरी दिलेली असून त्यास कार्यादेश देईपर्यंत धुळे मनपा मार्फत कचरा संकलनाचे काम करणेबाबत निर्णय घेणेकामी प्रस्ताव सादर करण्यांत आलेला आहे.

सन्मा. सदस्यांनी केलेल्या चर्चेनुसार वॉटरग्रेस संस्थेच्या अकार्यक्षम कार्यप्रणालीमुळे शहरातील बिघडलेली सार्वजनिक स्वच्छतेची परिस्थिती लक्षांत घेता सदरचे काम नवीन संस्था निश्चित होई पावेतो मनपा मार्फत करण्यासाठी येणारा संभाव्य खर्च व मनुष्यबळाची स्थिती याबाबतचा परिपूर्ण अहवाल पुढील सभेत सादर करावा.

**सर्वानुमते मंजुर,**
सही/-X X X
**सभापती,**
**स्थायी समिती,**
**धुळे महानगरपालिका धुळे**

विषय क्रमांक :- ९८ — देवपूर भागांतील शाहूनगर येथे पाईपलाईन टाकणे तसेच वलवाडी भागांतीलईंदिरानगर भागांत क्रॉस कनेक्शन करणेचे काम तांतडीने करणे गरजेचे असल्याने सदरचे काम विना निविदा करुन घेण्यांत आले,त्यासाठी झालेला खर्च रु.२,९०,६६६/- मात्र खर्च आला असून सदरचे काम महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम ५ (२) (२) अन्वये कार्योत्तर मंजुरी देणेबाबत आलेल्या कार्यालयीन अहवालावर विचार करणे.

म. नगरसचिव नगरसचिव यांनी विषयांचे वाचन केले.

म.नागसेन बोरसे विषय मंजूर करण्यांत यावा.

म. सभापती सर्व सन्मा.सदस्यांच्या सहमतीने व कार्यालयीन अहवालास अधिन राहून सदर प्रस्तावास कार्योत्तर मान्यता देण्यांत येत आहे.

**धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर १०७ दिनांक ०५/०८/२०२१**

देवपूर भागांतील शाहू नगर येथे नागरिकांना अशुद्ध पाणीपुरवठा होत असल्याने त्या भागांतील नागरिकांनी दि.१८/०२/२०२१ रोजी मा.आयुक्त यांना समक्ष भेटून निवेदन दिले होते. तसेच वलवाडी भागांतील इंदिरा नगर परिसरात घाण पाणी येत असल्याने सदर ठिकाणी गोंदूर रोडवरील मुख्य पाईपलाईन वरून १५० एमएम पाईपलाईन क्रॉस कनेक्शन करणे बाबत सदर भागांतील कनिष्ठ अभियंता व व्हॉलमन यांनी रिपोर्ट दिला आहे. त्यामुळे उक्त काम हे तातडीने करणे गरजेचे असल्याने सदरचे काम विना निविदा श्री.संजय गायकवाड ठेकेदार यांच्या कडून करून घेण्यात आलेले असून त्यासाठी शासकीय दरसूची सन २०१९-२० नुसार रु.२,९०,६६६/- मात्र खर्च आला असून सदरचे काम मुंबई प्रांतिक अधिनियम ५ (२) (२) अन्वये विना निविदा कार्योत्तर मंजुरीसाठी व खर्चास मे. स्थायी समिती पुढे सादर झालेला आहे.

सर्व सन्मा. सदस्यांच्या सहमतीने व कार्यालयीन अहवालास अधिन राहून सदर कामी झालेला खर्च रु. २,९०,६६६/- मात्रला महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम प्रकरण ५ (२) (२) अन्वये कार्योत्तर मान्यता देण्यांत येत आहे. सदर प्रस्ताव व कार्यवाहीबाबत लेखा आक्षेप निर्माण होणार नाही याची दक्षता घ्यावी. याबाबतची जबाबदारी संबंधित विभागाची राहील.

**सर्वानुमते मंजुर,**
सही/-X X X
**सभापती,**
**स्थायी समिती,**
**धुळे महानगरपालिका धुळे**

विषय क्रमांक:- ९९ धुळे महानगरपालिका अग्निशामक विभागाकडील वाहन क्र.एम. एच. १८ जी. ०२५९ अत्यावश्यक सेवेतील अग्निशामक वाहन दुरूस्ती खर्च ₹. ३४,२०५/-मात्रच्या खर्चास प्रशासकीय,आर्थिक मंजुरी मिळणे व महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील अनुसूची "ड" प्रकरण ५ (२) (२) नुसार कार्योत्तर मान्यता देणेबाबत आलेल्या कार्यालयीन अहवालावर विचार करणे.

म. नगरसचिव नगरसचिव यांनी विषयांचे वाचन केले.

म.शितल नवले विषय मंजूर करण्यांत यावा.

म. सभापती सर्व सन्मा. सदस्यांच्या सहमतीने व कार्यालयीन अहवालास अधिन राहून सदर प्रस्तावास कार्योत्तर मान्यता देण्यांत येत आहे.

**धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर १०८दिनांक ०५/०८/२०२१**

धुळे म.न.पा अग्निशामक (सार्वजनिक सुरक्षितता) विभागाकडील अत्यावश्यक सेवेतील अग्निशामक वाहन एम.एच. १८ जी. ०२५९ वाहनाचे क्लच व्यवस्थितरित्या काम करीत नसल्याचे संदर्भीय अहवालानुसार वाहनांची अधिकृत वितरक यांना जा.क्र./धुमपा/ वावि /३२९ दि.१२/०३/२०२१ अन्वये पत्र देऊन त्यांचेअभियंता मार्फत वाहनांची तपासणी करून इस्टिमेट घेण्यात आले होते त्यातच प्रशासकीय व आर्थिक मंजुरी प्रक्रिया सुरू असताना नस्ती मंजुरीस उशीर होत असल्याने उन्हाळयाचे दिवस असल्याने वारंवार आगीच्या घटनामुळे व अग्निशामक विभाग सध्या तिनच वाहन कार्यरत असल्याने सहा.अग्निशामक अधिकारी यांनी वाहनांची दुरूस्ती टाटा अधिकृत वितरक उज्वल ॲटोमाबाईल प्रा.लि. यांच्याकडून तातडीने करून घेतली याकामी रु.३४२०५/- मात्र खर्चाचे काम करुन घेण्यांत आलेले आहे.

सन २०२०-२१ या चालु आर्थीक वर्षात खर्च ₹.४४३९/- मात्र आज पावेता खर्च झालेला आहे व या बिलातील खर्च ₹.३४,२०५/मात्र होत आहे. असे ₹.४४३९/- +₹.३४,२०५/-

=₹.३८,६४४/-मात्र चालु आर्थीक वर्षात खर्च होणार आहे. दुरूस्ती कामे जी.एस.टी. नोंदणीकृत संस्थेकडुनच करणेत आली आहेत. दुरूस्ती कामाचे दर बाजार भावाप्रमाणे योग्य आहेत.

अग्निशामक विभाग वाहन दुरूस्ती तरतुद१)₹.६०,०००००/-२) पुर्वीचा खर्च ₹.४,१६,६३६/-,३) या बिलातील खर्च ₹.३४,२०५/- आहे. आजपावेतो खर्च २ व ३ ची बेरीज ₹.४,५०,८४१/-या बिलातील वाहन दुरूस्ती खर्च वजा जाता आजपावेतो उपलब्ध शिल्लक ₹.५५,४९,१५९/- होत आहे अग्निशामक विभागाकडील वाहन क्र. एम.एच.१८ जी. ०२५९ अत्यावश्यक सेवेतील वाहन दुरूस्ती खर्च ₹.३४,२०५/- मात्रच्या खर्चास प्रशासकीय, आर्थिक मंजुरी मिळाल्यानुसार महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदीनुसार अनुसूची "ड" प्रकरण५(२)(२) नुसार मे.स्थायी समितीकडेस कार्योत्तर मंजुरीस्तव सादर झाला आहे.

सर्व सन्मा. सदस्यांच्या सहमतीने व कार्यालयीन अहवालास अधिन राहून सदर कामी वाहन दुरुस्तीसाठी झालेला खर्च रु.३४,२०५/- मात्रला महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम प्रकरण ५(२)(२)अन्वये कार्योत्तर मान्यता देण्यांत येत आहे.सदर प्रस्ताव व कार्यवाहीबाबत लेखा आक्षेप निर्माण होणार नाही याची दक्षताघ्यावी.याबाबतची जबाबदारी संबंधित विभागाची राहील.

**सर्वानुमते मंजुर,**
सही/-X X X
**सभापती,**
**स्थायी समिती,**
**धुळे महानगरपालिका धुळे**

| | |
|---|---|
| विषय क्रमांक:- १०० | प्रभाग क्र.17 मधील शेलारवाडी, सेवादास नगर येथील उच्च दाब वाहिनीचे धोकादायक पोल स्थलांतरीत करणे काम तांतडीने करुन घेण्यांत आलेत त्यासाठी झालेला खर्च रू. 1,40,064/- मात्रला महाराष्ट्र महानगरपालिक अधिनियमाचे कलम 5(2) (2) नुसार कार्योत्तर मंजुरी देणेबाबत आलेल्या कार्यालयीन अहवालावर विचार करणे. |
| म. नगरसचिव | नगरसचिव यांनी विषयांचे वाचन केले. |
| म.शितल नवले | विषय मंजूर करण्यांत यावा. |
| म. सभापती | सर्व सन्मा. सदस्यांच्या सहमतीने व कार्यालयीन अहवालास अधिन राहून सदर प्रस्तावास कार्योत्तर मान्यता देण्यांत येत आहे. |

**धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर १०९ दिनांक ०५/०८/२०२१**

प्रभाग क्र.१७ मध्ये शेलारवाडी,सेवादास नगर भागात नागरीकांच्या रहिवास घरांवरून महावितरण कंपनीची धोकादायक वीज वाहिनी आहे. याबाबत नागरींकानी श्री.शितलभाऊ नवले व सौ सुरेखाताई चंद्रकांत उगले यांचे कडे तक्रार केल्या नुसार सन्मा. नगरसेवकांनी सदरचे धोकादायक व अडथळयाचे पोल तात्काळ स्थलांतरीत करणे बाबत पत्र दिले आहे.

दि.१८/०६/२०२१ रोजीच्या स्थायी समिती बैठकीत उक्त् मुददयाबाबत श्री. शितल नवले यांनी विचारणा करून सदयास्थितीत पावसाळण्याचे दिवस असुन नागरिकांना या धोकादायक पोल मुळे धोका असुन जिवीत व वित्त हानी होण्याची शक्यता असल्याने सदरचे काम म.न.पा तातडीने करावे असे सुचित केले आहे. म.सभापती सो. स्थायी समिती यांनी सदर कामी तातडीने प्रस्ताव सादर करणे बाबत आदेश केले आहेत सदरील उच्चदाबवीज वाहिनी स्थलांतर करणे कामी महावितरण कडील दरसुची नुसार व अति.कार्यकारी अभियंता म.रा.वि.कं.यांचे अंदाजपत्रकीय बाबीनुसार रक्कम रू.१,४०,०६४/- मात्र आहे. म.स्थायी समिती सभापती सो., यांचे निर्देशानुसार सदर काम तातडीचे व गरजेचे असल्याने सदर काम मक्तेदार मे.पंडीत इलेक्ट्रीकल्स यांचे कडून अंदाजपत्रकीय दराने करवुन घेण्यात आले आहे. करीता उक्त प्रमाणे कामाकरीता व खर्च रू.१,४०,०६४/-करीता महाराष्ट्र महानगरपालिक अधिनियमाचे कलम ५(२)(२) नुसार कार्योत्तर मंजुरीस्तव सादर झाला आहे.

सर्व सन्मा.सदस्यांच्या सहमतीने व कार्यालयीन अहवालास अधिन राहून सदर कामी झालेला खर्च रु. १,४०,०६४/-मात्रला महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम प्रकरण ५ (२) (२) अन्वये

कार्योत्तर मान्यता देण्यांत येत आहे. सदर प्रस्ताव व कार्यवाहीबाबत लेखा आक्षेप निर्माण होणार नाही याची दक्षता घ्यावी.याबाबतची जबाबदारी संबंधित विभागाची राहील.

**सर्वानुमते मंजुर,**
सही/-X X X
**सभापती,**
**स्थायी समिती,**
**धुळे महानगरपालिका धुळे**

विषय क्रमांक:- १०१ — धुळे शहर पाणी पुरवठा योजनेचे नियोजन कामी प्रकल्प सल्लागार (PMC) नेमणे बाबतच्या कामाचे निविदा दर मागविण्यांत आलेत,त्याबाबत आलेल्या कार्यालयीन अहवालावर विचार करणे.

म. नगरसचिव — नगरसचिव यांनी विषयांचे वाचन केले.

म. शितल नवले — या विषयाबाबत शिंदे साहेब आणि मी दोन ते अडीच वर्षापासून काम करतो आहे आपण या कामाला मंजुरी देऊन टाका परंतु यासाठी अंदाजपत्रकात कमीत कमी या वर्षात दहा कोटीची तरतूद करत असाल तर त्यांना कार्यादेश द्या उद्या समजा संबंधित कन्सल्टंटने काम चालू केले आणि त्यांनी दुरुस्त्या सुचवल्या तर त्यासाठी निधीची आवश्यकता लागणार आहे त्यामुळे अंदाजपत्रकात यासाठी आवश्यक ती तरतूद करण्यात यावी आणि त्यानंतरच संबंधितांना वर्क ऑर्डर द्यावी.

म. सुनील बैसाणे — धुळे शहरातील पाण्याचा प्रश्न गंभीर आहे आपल्याकडे पाणी असताना आपण लोकांना पाणी देऊ शकत नाही अशी वस्तुस्थिती आहे परंतु त्यामागे अनेक कारणे आहेत आपल्या पाण्याच्या पाइपलाइन आहेत त्या फार जुन्या व जीर्ण झालेले आहेत या गोष्टी जरी खऱ्या असल्या तरी याठिकाणी पीएमसी नेमणे बाबत सादरीकरण केले होते परंतु ते सादरीकरण फक्त आयुक्त व संबंधित काही नगरसेवकांनी पाहिलेले आहे सदर एजन्सी नेमके काय काय करणार आहेत ते सभागृहातील सदस्यांना अवगत होणे क्रमप्राप्त आहे आपण या एजन्सीला काम देत आहोत परंतु आपण बजेटमध्ये त्या पद्धतीने तरतूद केलीच नाही आणि पाण्याचा विषय आहे म्हणून आपण या ठिकाणी मंजूर करून घेत आहोत मंजूर केल्यानंतर त्यांच्या सांगण्यावरून काम करणे गरजेचे आहे त्यानंतर त्या एजन्सीला काम केल्यानंतर पैसे देणे क्रमप्राप्त आहे जर आपल्याकडे ईलाज करत असताना औषधोपचार नसेल तर तो इलाज काही कामाचा नाही म्हणून बजेटमध्ये याविषयी तरतूद समाविष्ट करण्यात यावी बजेटमध्ये तरतूद नसताना असा विषय स्थायी समितीसमोर चर्चेत घेतला यामध्ये एवढा खर्च अपेक्षित आहे तर महापौर व आयुक्त यांना या विषयाबाबत अवगत करणे गरजेचे होते आपण या एजन्सीला साधारण एक कोटी देणार आहोत या ठिकाणी मला प्रशासनाच्या वतीने खुलासा करायचा आहे एजन्सी काय काय काम करणार आहेत एजन्सीने त्यांच्या अधिकारात कुठल्या कुठल्या मनपात काम केलेले आहे किंवा कसे केले आहे याबाबत सदस्यांना अवगत होणे गरजेचे आहे हा विषय धुळे शहराच्या हिताचा आहे तरी याबाबत प्रशासनाने खुलासा करावा.

म. अभियंता — आपण धुळे शहराला तीन ठिकाणाहून पाणीपुरवठा करतो तापी नदीवरून आपण ६० टक्के भागाला पाणीपुरवठा करतो तसेच नकाणे तलावातून ३० टक्के व १० टक्के याप्रमाणे आपण धुळे शहराला पाणी पुरवठा करतो आपली जी योजना होती ती १९६६ साली झाली होती त्यानंतर तापी योजना व जलशुद्धीकरण केंद्राचे काम १९८६ ला सुरू झाले १९९५ ला सदर योजना कार्यान्वित झाली आपल्याकडे ज्या पूर्वीच्या पाईपलाईन होत्या ज्या ठिकाणी पाण्याची टाकी असेल त्या 2.5किलोमीटर परिसरात आपण पाणीपुरवठा करत होतो पण आपल्याकडे धुळे शहरासह या वाढीव कॉलन्या झाल्या त्यामुळे यंत्रणेवर मोठ्या प्रमाणावर ताण पडत आहे बडगुजर जलकुंभ येथून आपण जास्तीत जास्त वाखारकर नगर पर्यंत पाणी देऊ शकत होतो मागणीनुसार आपण ते अभय कॉलेज पर्यंत नेले त्यामुळे त्या ठिकाणी पाणी नेण्यासाठी एक तासाचे नियोजन करावे लागते जे पाणी आपण दोन तासात देऊ शकतो त्यासाठी आपल्याला आठ तास पाणी द्यावे लागते जर याच्यामध्ये आपल्याला हायड्रोलिक मॉडेल तयार करावा लागेल आपली टाकी भरण्याची क्षमता आणि खाली होण्याची क्षमता तपासून त्याप्रमाणे पीएमसी कडून काम करून घ्यावयाचे आहे तापीची पाईप लाईन साधारणत: १९९०ला

झालेली आहे . डेडरगांवची पाईप लाईन आपण नवीन करतो आहोत त्यात दुरुस्ती लिकेजेस वगैरे या सर्व गोष्टी करून आपण तपासून घेणार आहोत पंपाची क्षमता कमी झालेली आहे आपल्या पूर्वीच्या पंपाची क्षमता होती एका तासाला ५ लाख लिटर होती त्यासाठी आता ची क्षमता काय आहे वॉटर मीटर कुठे कुठे बसवावे लागणार आहेत त्यासाठी आवश्यक काय काय दुरुस्त करावे लागणार आहेत यासाठी आपण पीएमसीची नेमणूक करणार आहोत.

म. सुनील बैसाणे — या एजन्सीच्या माध्यमातून आपला नेमका काय फायदा होणार आहे.

म. अभियंता — आपल्याकडे जे उपलब्ध कर्मचारी व अधिकारी आहेत त्यांच्याकडील कामाचा ताण व तांत्रिक क्षमता पाहता धुळे शहराचे हायड्रोलिक मॉडेल करून घेणे या सर्व सुधारणा करून जेणेकरून आपण धुळे शहराला रोज पाणीपुरवठा करू शकतो या कामी आपल्याकडे आवश्यक साधनसामुग्री मनुष्यबळ नाही त्यामुळे आपण पीएमसी ची नेमणूक करणे आवश्यक आहे शेवटी निर्णय सभेने घ्यावयाचा आहे आणि यासाठी आवश्यक खर्च आहे ज्या सुधारणा कराव्या लागतील त्याची सुद्धा बजेटमध्ये आपल्याला तरतूद करावी लागेल एका दिवसात काही सुधारणा होणार नाही ते संपूर्ण सर्वेक्षण करतील. त्यानंतर साधारण दोन वर्ष काम चालेल त्या कामाप्रमाणे आपल्याला पैसे लागतील व बजेटला यासाठी नियोजन करणे गरजेचे आह.

म. सुनील बैसाणे — टेक्निकल पर्सनल आपल्याला गाईडलाईन करणार आहेत या एजन्सीने कुठल्या मनपात काम केल्यानंतर पाण्याच्या बाबतीत सुसूत्रता आली त्याचा फायदा झाला याबाबत एजन्सीने आपल्याला काही माहिती दिली आहे का

म. अभियंता — याबाबत संबंधित जी संस्था आहे निविदेत भाग घेताना त्यांनी सादर केलेल्या कागदपत्रांवरून त्यांनी एमआयडीसी आणि इतर दोन ठिकाणी काम केल्याचे दिसून येते पण मनपाचे काम केले अजून दिसून येत नाही.

म. सुनील बैसाणे — एमआयडीसी हा मर्यादित असतो साधारणत पाच ते सात किलोमीटर चा भाग असतो हा आपल्या धुळे शहराचा पाण्याचा प्रश्न आहे त्यांना मंजुरी दिली पाहिजे या विषयात निर्णय घेऊन विचार करण्यापेक्षा विचार करून निर्णय घेतलेला कधीही चांगला राहील आपण निर्णय घेतो आणि त्यानंतर विचार करत बसतो हे असे माझे व्यक्तिगत मत आहे आपण निर्णय घेऊन विचारविनिमय करून त्यांच्या नंतर निर्णय घ्यावा शितल भाऊंनी टेक्निकल मुद्दा उपस्थित केलेला आहे.जर बजेटमध्ये तरतूद नाही मंजुरी कोणत्या आधारावर देत आहोत आपण त्याबाबत सविस्तर निर्णय घ्यावा.

म. नागसेन बोरसे — संबंधित एजन्सी ही पाणीपुरवठ्याचे नियोजन करण्यासाठी आलेली आहे या एजन्सीला दरमहा आठ लाख रुपये मानधन द्यावयाचे आहे माझ्या मते दोन कोटी रुपये २४ घेण्यासाठी लागणार आहेत आता अभियंता यांनी सांगितले एमआयडीसीला एजन्सीने काम केलेले आहे आपल्या धुळे शहरात एक लाख प्रॉपर्टी आहेत पाण्याच्या टाकी असतील एमआयडीसीमध्ये थोड्या प्रमाणात प्रॉपर्टी धारक असतात त्यामुळे त्यांना त्याप्रमाणे नियोजन करावे लागते पण ज्या वेळेस साधारणता एक लाख कापडचे नियोजन करण्यासाठी तेवढा मनुष्यबळ त्यांच्याजवळ आहे का तेवढे तांत्रिक मनुष्यबळ ते ठेवणार आहेत का? आपल्याकडे लिकेजेस नळांना तोटया नसणे पाईप लाईन फुटणे अशा अनेक समस्या आहेत. सदर एजन्सीने फक्त एमआयडीसी मध्ये काम केलेले आहे. त्यामुळे संबंधित एजन्सीची क्षमता तपासणे गरजेचे आहे.

म.सभापती — मे.पाचुरकर अॅन्ड असोसिएट्स यांचे दर रु.8,64,000/- प्रती महिना या दराप्रमाणे प्राथमिक स्तरावर।वर्षासाठी तांत्रिक सल्लागार(PMC)नियुक्त करण्यास कार्यालयीन अहवालास अधिन राहून महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ७३ अन्वये मान्यता देण्यांत येत आहे.१वर्षाच्या कालावधीत संबंधित संस्थेने केलेल्या कामाचे मुल्यमापन करुन पुनश्च स्थायी समिती पुढे मुल्यमापन प्रस्ताव सादर करावा व त्यानंतर कामाच्या आवश्यकतेनुसार पुढील मुदतवाढ देणेबाबत प्रशासनाने कार्यवाही करावी.तसेच सदर एजन्सी कडील तांत्रिक मनुष्यबळ व क्षमतेबाबत खात्री करुनच संबंधित एजन्सीला कार्यादेश देण्याबाबत कार्यवाही करावी.

**धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर ११० दिनांक ०५/०८/२०२१**

धुळे शहर पाणीपुरवठा योजनेचे नियोजन कामी प्रकल्प सल्लागार (PMC) नेमणे बाबतच्या कामास मे. स्थायी समितीपुढे दरास मंजुरीस ठेवणे बाबत धुळे महानगरपालिका जा.क्र./ धुमपा/ पा.पु.वि / ४५७ /२०२०-२१ दि.०४/११/२०२० अन्वये दि.०५/११/२०२० रोजी दैनिक दिव्य मराठी / श्रमराज्य या वृत्तपत्रात जाहीर निविदा प्रसिद्ध करणेत येऊन दि. २७/११/२०२० रोजी निविदा दर मागविण्यात आले आहेत. पात्र कंत्राटदार यांनी निविदेबाबत ऑनलाईन पद्धतीने बयाणा रक्कम भरुन निविदा दर सादर केलेले आहेत.

| अ.क्र. | कंत्राटदाराचे /ठेकेदराचे नाव | दिलेले निविदा दर | शेरा |
|---|---|---|---|
| १ | मे.पाचुरकर अॅन्ड असोसिएट्स | रु.८,८९,०००/- प्रती महिना | सर्वात कमी दर |
| २ | मे.पाराले ईजिनिअर अॅन्ड कन्सलटन्स | रु.११,६०,०००/- प्रती महिना | |
| ३ | प्रभाकर जे. रंगारी कन्सलटिंग ईजि. | रु.१२,५५,०००/- प्रती महिना | |
| ४ | डब्यु. ए.पी. सी.ओ.एस. लिमिटेड | रु.१२,९२,२६०/- प्रती महिना | |

वरील प्रमाणे निविदेत भाग घेतलेले ठेकेदार **श्री/मे.पाचुरकर अॅन्ड असोसिएट्स** यांचे दर **रु.८,८९,०००/- प्रती महिना** सर्वात कमी आलेले आहे.

सदर कामासाठीचा आलेल्या सर्वात कमी दराचा निविदाधारक **मे.पाचुरकर अॅन्ड असोसिएट्स, पुणे** यांना कामाचे सादरीकरण करणेसाठी दि.१८/०३/२०२१ रोजी म.आयुक्त सो., यांच्या दालनात सादरीकरणासाठी बोलविले असता त्यावेळेस म.सभापती सो., म. अभियंता, मनपा धुळे, श्री.शितलकुमार नवले, व सर्व कनिष्ठ अभियंता हजर होते. सदर चर्चेत जलशुद्धीकरण केंद्रापासून ते जलकुंभ पावेतो ते शेवटच्या नळापावेतो किती पाणी येते त्याचे सर्वेक्षण करून Measurementघेण्यात येतील. सदर कामासाठी लागणारा अवधी २४ महिन्याचा आहे.त्यात ठेकेदाराने सुचविलेले दुरुस्ती बाबतचे निविदा तयार करणे,आजमितीस सुरु असलेले पाणीपुरवठाचे सर्व कामांचा तपासणी सदर ठेकेदारा मार्फत करून घेता येतील. शहरातील सर्व जलकुंभानुसार वितरण वाहिनीचे नकाशे संबंधित ठेकेदाराकडुन करून घेता येतील.

याबाबत म.आयुक्त सो., यांच्या दालनात ठेकेदार मे.पाचुरकर अॅन्ड असोसिएट्स , पुणे यांनी दिलेले दर ८.८९ लक्ष प्रती महिना हे कमी करणेबाबत ठेकेदार यांचेशी झालेल्या चर्चेनुसार ठेकेदार यांनी रु.१०,०००/-कमी करून रु.८.७९ लक्ष प्रती महिना करणेबाबत पत्र दिले होते.पुन्हा सदर ठेकेदार यांना दर कमी करणेबाबत ई-मेल संदेशानुसार ठेकेदार यांनी दि.२५/०५/२०२१रोजी दिलेल्या पत्रात वरील रक्कमेत रु.१५०००/-कमी करून रु.८.६४ लक्ष प्रती महिना करणे बाबत पत्र दिलेले आहे.त्यामुळे सदर कामासाठी ठेकेदार मे.पाचुरकर अॅन्ड असोसिएट्स,पुणे यांचे दर रु.८.६४लक्ष प्रती महिना दरास मंजुरीसाठी मे.स्थायी समितीपुढे ठेवणे आवश्यक असल्याने सदर दरास मंजुरीसाठी मे.स्थायी समिती पुढे ठेवणेस मंजुरीस्तव सादर झालेला आहे.

उक्त कार्यालयीन अहवाल व सन्मा. सदस्यांनी केलेल्या चर्चेनुसार याकामी निगोसिएशन अंती श्री./मे.पाचुरकर अॅन्ड असोसिएट्स यांचे दर रु.८,६४,०००/- प्रती महिना या दराप्रमाणे प्राथमिक स्तरावर १ वर्षासाठी तांत्रिक सल्लागार (PMC) नियुक्त करण्यास कार्यालयीन अहवालास अधिन **राहून महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ७३ अन्वये मान्यता देण्यांत येत आहे.1 वर्षाच्या कालावधीत संबंधित संस्थेने केलेल्या कामाचे मुल्यमापन करुन पुनश्च स्थायी समिती पुढे मुल्यमापन प्रस्ताव सादर करावा व त्यानंतर कामाच्या आवश्यकतेनुसार पुढील मुदतवाढ देणेबाबत प्रशासनाने** कार्यवाही करावी. तसेच सदर एजन्सी कडील तांत्रिक मनुष्यबळ व क्षमतेबाबत खात्री करुनच संबंधित एजन्सीला कार्यादेश देण्याबाबत कार्यवाही करावी.सदर प्रस्ताव व कार्यवाहीबाबत लेखा आक्षेप निर्माण होणार नाही याची दक्षता घ्यावी.याबाबतची जबाबदारी संबंधित विभागाची राहील.

**सर्वानुमते मंजुर,**

सही/-X X X

**सभापती,**

**स्थायी समिती,**

**धुळे महानगरपालिका धुळे**

| | |
|---|---|
| विषय क्रमांक:- १०२ | महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियानाअंतर्गत धुळे शहराच्या रस्ते विकास प्रकल्पातील विद्युतीकरण पथदिवे पोल उभारणे कामी निविदा दर मागविण्यांत आलेत, त्याबाबत आलेल्या कार्यालयीन अहवालावर विचार करणे. |
| म. नगरसचिव | नगरसचिव यांनी विषयांचे वाचन केले. |
| म. विद्युत अभियंता | सन २०१९ मध्ये महाराष्ट्र नगरोत्थान योजना अंतर्गत शंभर कोटीच्या कामांना प्रशासकीय मान्यता मिळालेली आहे या प्रशासकीय मंजुरीचे आतच हे काम आहे सद्यस्थितीत १९ रस्त्यांचे काम आता सुरू आहे त्या १९ कामामध्ये विद्युतीकरण आणि रस्ता रुंदीकरण हा एक महत्वाचा पार्ट आहे. यात जे डी पी रोड घेतलेले आहेत त्यांच्या मध्ये येणारी एलईडी लाईट आहेत या एकोणावीस रस्त्यामध्ये आपण आवश्यकतेप्रमाणे डीवाईडर मध्ये पोल उभारणार आहोत ज्याप्रमाणे आपण शंभर फुटी रोड ला लाईट लावलेले आहेत त्याप्रमाणे हे काम आहे. वाडीभोकर रस्त्याचे पूर्णपणे नूतनीकरण याठिकाणी आहे आता डीवाईडर मध्ये-महावितरण कंपनीचे पोल तसेच एलटी व एचटी लाईन आहे किंवा ट्रांसफार्मर आहेत ते आपण पूर्णपणे काढतो आहोत त्यामध्ये एमएसईबी च्या वीजवाहिन्या आहेत त्या शक्यतो अंडरग्राउंड करणार आहोत किंवा बन्च केबल करून त्या ठिकाणी काम करणार आहोत त्या ठिकाणी रुंदी वाढणार आहे त्यामध्ये असाच स्कोप आपण घेतलेला आहे तसेच सावरकर पुतळा पासुन नकाणे रोड आहे देवपूरमधील या कामामध्ये 4 रस्ते आहेत तसेच फाशी पूल कडून जमनागिरी कडे जाणारा धान्य गोडाऊन पासून ते हायवे पर्यंत शंभर कोटी मधील सर्व रस्ते शासनाच्या १९ च्या शासकीय दर सूची नुसार हे काम पेंडिंग होते हे काम मनपा मार्फत करावे असे पत्र प्राप्त झाल्याने निविदा कार्यवाही करून दर मंजूर झाल्यानंतर या कामांना आपण सुरुवात करणार आहोत आपण एमएसईबीशी संपर्क करून त्यांच्याकडून अंदाजपत्रक मागणी करून घेणार आहोत . |
| म.सुनिल बैसाणे | ज्यावेळेस महाराष्ट्रामध्ये भाजपाचे सरकार होते आणि मनपाच्या निवडणुकीच्या काळात या दरम्यान त्या वेळचे महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री आणि विरोधी पक्ष नेते देवेंद्र फडवणीस साहेब यांनी धुळेकर नागरिकांना एक शब्द दिला होता आमच्या हातात सत्ता द्या आम्ही धुळे शहराचा विकास करणार आणि त्यावेळेस त्यांनी शंभर कोटी रुपये देण्याचे आश्वासन केले होते त्या अनुषंगाने पहिला हप्ता २७ ते २८ कोटी रुपयांचा त्या कामासाठी मंजूरही केला त्या शंभर कोटीचा रस्त्यांच्या कामांमध्ये धुळे शहरात सुसज्ज पद्धतीने लाईट व्यवस्था बसवण्यासाठी स्वतंत्र तरतूद त्याठिकाणी केली होती साधारण आठ ते नऊ कोटी रुपयांची सदरची कामे सार्वजनिक बांधकाम विभागाच्या माध्यमातून करणार होतो परंतु या विभागाकडे विद्युत यंत्रणा व पुरेसे मनुष्यबळ व टेक्निकल स्टाफ नसल्याने २०१९ च्या पासून तो विषय प्रलंबित होता येणाऱ्या काळामध्ये सर्वात चांगला आणि सुसज्ज भाग देवपूर होणार आहे. भूमिगत गटारीचे काम महाराष्ट्र जीवन प्राधिकरणामार्फत होत आहे याची कल्पना नव्हती परंतु एलईडी च्या कामामुळे गोंदूर रस्ता असेल वाडीभोकर रस्ता असेल या रस्त्यांवर वायरी लोबंकळताना दिसतात या योजनेमुळे वायरीचे नियोजन चांगल्या पद्धतीने येणाऱ्या काळात होणार आहे आपण या ठिकाणी मंजुरी देत असताना प्रशासनाने काय काम केले आहे याबाबत सविस्तर माहिती दिली आहे म्हणून अनेक रस्ते या ठिकाणी सुसज्ज होणार आहेत शंभर कोटीच्या रस्त्यांना प्रशासकीय मंजुरी दिली गेली आहे परंतु दोष भावनेने भाजपची याठिकाणी सत्ता आहे व चांगले काम या ठिकाणी होत आहे त्यामुळे आघाडी सरकारच्या माध्यमातून १०० कोटीचा निधी आडवून ठेवलेला आहे त्यामुळे ठेकेदाराला त्याच्या कामामध्ये काम करण्यास अडथळा निर्माण होत आहे माझी विनंती आहे संबंधित ठेकेदारांना बोलून त्यांना काय अडचण आहे त्या अडचणी दूर करून नागरिकांना रस्ता वापरासाठी खुला करावा शासनाचा निधी पर्यंत तर त्यांना निधीची गरज भासत असेल तर मनपा मार्फत त्याचे नियोजन करावं हा एक चांगला विषय आहे गावातील नागरिकांना अंधारापासून मुक्तता मिळावी धुळे शहरात सर्वत्र एलईडी लाईट लावले गेले आहेत तरी हा विषय मंजूर करण्यात यावा. |
| म.सभापती | नगरोत्थान योजनेतील रस्त्यांच्या कामाची माहिती द्यावी. |
| म.अभियंता | आपल्याकडे साधारण दीड ते दोन वर्षापूर्वी या योजनेला मंजुरी दिली मंजुरी दिल्यानंतर हे काम सार्वजनिक बांधकाम विभागाने करावे असे शासन आदेशात नमूद होते त्यामुळे सार्वजनिक बांधकाम |

विभागाने आवश्यक ती निविदा प्रक्रिया पूर्ण करून सर्व कामे त्यांच्यामार्फत करण्यात येत आहेत आपल्याला देवपूर भागात खूप अडचणी आल्या ८०% ड्रेनेज लाईनचे काम पूर्ण झालेले आहे फक्त २० टक्के भागाचे काम बाकी राहिले आहे ते दोन महिन्यात पूर्ण होईल मागील आठवड्यात शासनस्तरावर या संदर्भात बैठक झाली मुंबईत त्यात त्यांनी आश्वासित केले जे ठेकेदार आहेत त्यांच्याकडून रस्त्याची कामे करून घ्या त्यांनी सात कामे पूर्ण केली असून उर्वरित कामे लवकर पूर्ण करू असे आश्वासन दिले आहे आपल्याकडे साधारण२३ कोटी रुपये निधी आला होता आणि आपण त्यात आपला हिस्सा नमूद करून आपण ३३ कोटी रुपये वर्ग केले आहेत पुढील कामासाठी निधीची अडचणअसून शासनाकडून निधी येईल त्याप्रमाणे आपण काम करणार आहोत.

म.सभापती — ठेकेदाराने काम सुरू केले तर शासनाला पत्र देऊन निधी मागवता येईल यामध्ये एकाच कंपनीला काम दिले आहे का किंवा या रस्त्यांचे ठेकेदार वेगवेगळे आहेत याबाबत आपण खुलासा करावा.

म.अभियंता — याबाबत सार्वजनिक बांधकाम विभागाकडून माहिती घेऊन आपल्याला देता येईल मी ती माहिती मागून आपल्याकडे लगेच सादर करतो.

म.सभापती — आपण त्यांना आपल्या मार्फत निधी देत आहोत त्यामुळे याबाबतची माहिती आपल्याला असणे आवश्यक आहे. आपण तातडीने सर्व माहिती मागून घ्या कारण अहवालास अधीन राहून सदरचा प्रस्ताव शहरासाठी अत्यंत महत्त्वपूरण असल्याने या विषयाला सर्व सदस्यांच्या सहमतीने मान्यता देण्यात येत आहे.

**धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर १११ दिनांक ०५/०८/२०२१**

ई-निविदा सूचना क्र. 15. 2021-22 राज्य नगरोत्थान निधी अंतर्गत धुळे शहरातील 1 ते 19 रस्त्यांवर ओक्टोगोनल स्ट्रीट लाईट पोल LED पथदिव्यांसह बसविणे तसेच LT/HT/DTC शिफ्टिंग करणे.कामाबाबत महाराष्ट्र शासन यांचेकडील पत्र क्र.नगरो-2019 /प्र.क्र.222/नवि-33.दि.26-2-2021 यांचे मंजुरीने अन्वये उक्त कामाबाबत रक्कम **रु.8,47,37,408/-**मात्र खर्चास आर्थिक व **प्रशासकीय मंजुरी** देणेत आली आहे.

उक्त बाबत म.जी.प्रा. धुळे/ म.जी.प्रा. मंडळ नाशिक/ **शहर अभियंता मनपा धुळे**/कार्यकारी अभियंता महावितरण यांचे **पत्र क्र.04.दि.16-3-2021** अन्वये रक्कम **रु.8,47,37,408/-**मात्र खर्चास **तांत्रिक मंजुरी** मिळालेली आहे.

उक्त कामाबाबत धुळे महानगरपालिका **जा.क्र./विवि/पापु/ 21.दि.26-4-2021** अन्वये व **दि.27-4-2021** च्या **दै.लोकमत/पथदर्शी** किंवा धुळे महानगपालिका /महाराष्ट्र शासनाच्या वेबसाईट www.dhulecorporation.org / www. mahatender.gov.in वर खुल्या ई-निविदा/कोटेशन प्रसिद्ध करणेत येवून **दि.31-5-2021** रोजी निविदा मागविणेत आले आहेत. पात्र कंत्राटदार यांनी निविदेबाबत रोखीने बयाणा रक्कम भरून/लेटर प्याड वर निविदा दर सादर केलेले आहेत.

| अ.क्र. | कंत्राटदाराचे नाव | दिलेले निविदा दर | शेरा |
|---|---|---|---|
| 1 | **मे.बडगुजर & कंपनी,नाशिक** | 1.96% **कमी दराने** | **L१** |
| 2 | मे.राजसन इलेक्ट्रोन | 4.72% Above | |
| 3 | मे.फ्रेंड्स इंजिनीरिंग कॉर्पोरेशन | 3.50% Above | |

ठेकेदार **मे.बडगुजर & कंपनी,नाशिक** यांचे दर तुलनेत सर्वात कमी असून त्यांनी नियमाप्रमाणे रोखीने बयाणा रक्कम भरलेली आहे.सबब कंत्राटदार **मे.बडगुजर & कंपनी,नाशिक** यांनी सर्वात कमी म्हणजेच अंदाजपत्रकीय दराच्या 1.96% **कमी दराने** आलेले निविदा दर मे. स्थायी समिती समोर मंजुरीस्तव सादर करण्यांत आलेला आहे.

उक्त कार्यालयीन अहवाल व सन्मा. सदस्यांनी केलेल्या चर्चेनुसार याकामी **मे.बडगुजर & कंपनी, नाशिक** यांनी सर्वात कमी म्हणजेच अंदाजपत्रकीय दराच्या 1.96% **कमी दराने** आलेले निविदा दरास कार्यालयीन अहवालास अधिन राहून महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ७३

अन्वये मान्यता देण्यांत येत आहे. सदर प्रस्ताव व कार्यवाहीबाबत लेखा आक्षेप निर्माण होणार नाही याची दक्षता घ्यावी. याबाबतची जबाबदारी संबंधित विभागाची राहील.

**सर्वानुमते मंजुर,**
सही/-X X X
**सभापती,**
**स्थायी समिती,**
**धुळे महानगरपालिका धुळे**

विषय क्रमांक:- १०३ सुवर्ण जयंती नगरोत्थान योजना अंतर्गत प्र.क्र.8 मध्ये राजकमल टॉकीज ते मौलीगंज पावेतो रस्ता कॉंक्रीटीकरण करणेचेनिविदा दर मागविण्यांत आलेत, त्याबाबत आलेल्या कार्यालयीन अहवालावर विचार करणे.

म. नगरसचिव नगरसचिव यांनी विषयांचे वाचन केले.

म. नागसेन बोरसे विषय मंजूर करण्यांत यावा.

म. सभापती सर्व सन्मा. सदस्यांच्या सहमतीने व कार्यालयीन अहवालास अधिन राहून सदर प्रस्तावास मान्यता देण्यांत येत आहे.

**धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर ११२ दिनांक ०५/०८/२०२१**

सुवर्ण जयंती नगरोत्थान योजना अंतर्गत प्र.क्र.८ मध्ये राजकमल टॉकीज ते मौलीगंज पावेतो रस्ता कॉंक्रीटीकरण करणे बाबतच्या कामास धुळे मा.जिल्हाधिकारी सो. यांचा दि.२६/०३/२०२१ रोजीचा प्रशासकीय मान्यता आदेश मा.आयुक्त सो. धुळे महानगरपालिका यांनी टिपणी मंजुरीने दि.२२/०७/२०२१अन्वये उक्त कामाच्या खर्चास रक्कम **रु.३९,९१,६९७/-** मात्र रकमेस आर्थिक व प्रशासकीय मान्यता दिलेली आहे.

उक्त कामाबाबत शहर अभियंता मनपा धुळे यांचे पत्र क्र./९५६/२०२१ दि. ११/०१/२०२१ अन्वये रक्कम रु.३९,९१,६९७/- मात्र खर्चास तांत्रिक मंजुरी मिळालेली आहे.उक्त कामाबाबत धुळे महानगरपालिका जा.क्र./ बा.वि./ ५९ / २०२१ दि. ०७/०६/२०२१ अन्वये दि.०७/०६/२०२१ रोजी दै.दिव्य मराठी/वार्ता या वृत्तपत्रात जाहीर निविदा प्रसिद्ध करणेत येऊन दि.२५/०६/२०२१ अखेर निविदा दर मागविण्यात आले आहेत. पात्र कंत्राटदार यांनी निविदे बाबत ऑनलाईन पद्धतीने बयाणा रक्कम भरून निविदा दर सादर केलेले आहेत.

| अ.क्र. | कंत्राटदार किंवा ठेकेदाराचे नाव | दिलेले निविदा दर | शेरा |
|---|---|---|---|
| १ | श्री.ऋषभ सतिष खिवसरा | **अंदाजपत्रक दर** | **सर्वात कमी दर** |
| २ | मे.हिंद कन्सट्रक्शन | श.२.००% जास्तीने | |
| ३ | मे.एकविरा कन्सट्रक्शन | श.३.००% जास्तीने | |

वरील प्रमाणे निविदेत भाग घेतलेले ठेकेदार पात्र असून श्री/मे.ऋषभ सतिष खिवसरा यांनी दिलेले दर अंदाजपत्रकीय दर असून त्यांनी नियमा प्रमाणे ऑनलाईन बयाणा रक्कम भरलेली आहे.सबब कंत्राटदार श्री/मे.ऋषभ सतिष खिवसरा यांची अंदाजपत्रकीय दराने आलेले निविदा दर मंजुरीस्तव सादर तसेच अन्य काम न मिळालेले ठेकेदारांना त्यांची बयाणा रक्कम परत करणे बाबत मंजुरीस्तव सादर झालेला आहे.

सर्व सन्मा.सदस्यांच्या सहमतीने व कार्यालयीन अहवालास अधिन राहून सदर कामी मे.ऋषभ सतिष खिवसरा यांचे अंदाजपत्रकीय दराने आलेल्या दरास मान्यता देण्यांत येत आहे. सदर प्रस्ताव व कार्यवाहीबाबत लेखा आक्षेप निर्माण होणार नाही याची दक्षता घ्यावी. याबाबतची जबाबदारी संबंधित विभागाची राहील.

**सर्वानुमते मंजुर,**
सही/-X X X
**सभापती,**
**स्थायी समिती,**
**धुळे महानगरपालिका धुळे**

| | |
|---|---|
| विषय क्रमांक:- १०४ | वैद्यकीय आधिकारी तथा प्र. म. आरोग्याधिकारी डॉ. श्री. महेश एम. मोरे, मनपा धुळे यांना माहे एप्रिल-२०२१ पासून स्वत:चे खाजगी वाहन वापरणेस व त्यापोटी खाजगी वाहन प्रतिपुर्ती भत्ता / भाडे दरमहा **₹.१३८७५/-**मासिक भाडे लागु करणेस प्रशासकीय व आर्थिक मंजुरी मिळाल्या नुसार येणाऱ्या खर्चास व वाहन प्रतिपुर्ती भत्ता लागु करणेस मंजुरी देणेबाबत आलेल्या कार्यालयीन अहवालावर विचार करणे. |
| म. नगरसचिव | नगरसचिव यांनी विषयांचे वाचन केले. |
| म. नागसेन बोरसे | विषय मंजूर करण्यांत यावा. |
| म. सभापती | सर्व सन्मा. सदस्यांच्या सहमतीने व कार्यालयीन अहवालास अधिन राहून सदर प्रस्तावास मान्यता देण्यांत येत आहे. |

**धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर ११३ दिनांक ०५/०८/२०२१**

मनपा कार्यालयीन कामासाठी म.वैद्यकीय अधिकारी तथा प्र.वैद्यकीय आरोग्याधिकारी डॉ. श्री. महेश एम. मोरे, मनपा धुळे यांना माहे एप्रिल-२०२१ पासुन स्वत:चे खाजगी वाहन क्र. एम.एच.१८ ए.झेड.३७४५ हे धुळे मनपा कार्यालयीन कामकाजासाठी दि.०१/०४/२०२१ पासून वाहन वापरणेस व वाहन वापरणे बाबत खाजगी वाहन प्रतिपुर्ती भत्ता मिळणेस डॉ. श्री. महेश एम. मोरे यांनी पत्र सादर केलेले आहे.

शासन निर्णय क्रमाकं –वाहन १०.०५/प्र.क्र.१३/२००५/विनियम मंत्रालय मुंबई दि.२५ में २००५ नुसार स्थायी समिती ठरांव क्र.१० दि.२१/१२/२००६ चे नुसार पदाधिकारी व आयुक्त व त्या पेक्षा उच्च दर्जा वरील उपायुक्त व इतर प्रति नियुक्तीने वर्ग १ व वर्ग २ च्या अधिका-याना वाहन वापराच्या दर महा खर्चाची प्रतिपुती डिझेल वाहनासाठी ₹.१४८७५/- मधुन रु.१०००/- वजावट करुन ₹.१३८७५/- मात्र मंजुरी देण्यात आली आहे.

त्यानुसार धुळे महानगरपालिककेतील अधिकारी / पदधिकारी यांना धुळे महानगरपालिका ठरांव क्र.२०१ दि.१३/१/२०१६ अन्वये कार्यालयीन अहवालास अधिन राहुन वाहन प्रतिपुर्ती भत्ता अदा करणेस मान्यता देण्यात आली आहे व या संदर्भात शासनाकडील आदेश तपासुन त्यानुसार उचित निर्णय प्रशासनाने घ्यावा असे नमुद आहे. त्याअन्वये तात्कालीन म.आयुक्त सो यांनी मनपातील पदाधिकारी / अधिकारी यांना वाहन प्रतिपुर्ती भत्ता अदा करणेचा निर्णय मनपाचा आर्थिक हिताचे असल्याने मनपातील पदाधिकारी/ अधिकारी यांना वाहन प्रतिपुर्ती भत्ता अदा करणेस मंजुरी दिलेली आहे.

मे. स्थायी समिती ठराव नं ८९ दि.१०/०८/२०१२ अन्वये वाहन भत्ता बंद करुन भाडे तत्वावर वाहन लावणे बाबत निर्णय होऊन दि.०९/०१/२०१३ रोजी वाहन भाडे तत्वावर पुरविणे बाबत फेर निविदा (टेंडर) नोटीस प्रसिध्द करणेत आली होती. तरी प्राप्त निविदा दर मधील दरा नुसार ₹.२९०००/- मात्र प्रति माहे भाडे येणार असुन शासन निर्णय २५.५.२००५ नुसार दर रक्कम मासिक भाडे ₹.१३८७५/- मात्र आहे.तरी यामध्ये धुळे महानगरपालिकेचे रक्कम ₹.१५१२५/- मात्रचा आर्थिक हिताचे आहे.

प्रादेशिक परिवहन कार्यालय धुळे, यांचेकडील पत्र क्र.परिवहन/प्रापका/धुळे/ २०१९/ जा.क्र.५४४६ दिनाक १८/११/२०१९ नुसार इंडीगो/फोर्ड आयकॉन/स्वीप्ट डिझायर/लोगान / इटिऑस/(वातानुकुल) या वाहनांचे मासिक भाडे विना इंधन ₹.३५०००/- मात्र दर देण्यात आले आहे. तसेच २००० कि.मी. पावेतो अंदाजित १५/ लिटर सरासरी इंधन खर्च १३३ लिटर डिझेल अपेक्षित आहे. सध्या बाजार भावानुसार १३३×९५=१२६३५ मात्र खर्च होऊ शकतो. असा एकुण खर्च ₹.४६६३५/- मात्र मासिक खर्च होऊ शकतो.

त्यानुसार निविदेत प्राप्त दर व प्रादेशिक परिवहन कार्यालयाकडकील दरपत्रक जास्त आहेत व शासन निर्णयात नमुद मासिक वाहन प्रतिपुर्ती भत्ता (दर) कमी आहेत. त्यामुळे शासन निर्णय दि.२५.५.२००५नुसारच व शा.नि.दि.३१/१२/२००७मधील नमुद नुसार शासकीय व इतर कार्यालयांमध्ये वाहनांच्या वापरासंबंधी धारेण नुसार शासन निर्णय निर्गमित होण्याच्या दिनांकास या योजनेनुसार

स्वत:चे वाहन शासकीय कामकाजासाठी वापरत आहेत त्यांच्या करिता सदर योजनेचा लाभ ते त्या पदावर कार्यरत असेपर्यंत कायम ठेवण्यात येत आहे. त्यानुषंगाने मनपाचे हित लक्षात घेता तत्कालीन पदाधिकारी/अधिकारी यांना म.आयुक्त सो यांनी वाहन प्रतिपुर्ती भत्ता दि.२८/०१/२०१३ ने मंजुरी दिलेली आहे. तत्कालीन पदाधिकारी / अधिकारी यांना मा.आयुक्त सो. यांनी दि.१०/१०/२०१९ नुसार मासीक ₹.१३८७५/- मात्र वाहन प्रतिपुर्ती भत्ता अदायगीस मंजुरी दिलेली आहे. तसेच सर्वसाधारण सभा ठराव नं २०१ दि.१३/०१/२०१६ अन्वये वरील प्रमाणे प्रस्तावास मंजुरी देणेत आलेली आहे.

परंतु वर्ष २०१५-१६ या वित्तीय या वर्षातील वाहन खाजगी वाहन प्रतीपुर्ती भत्ता अदा करणेस लेखा आक्षेप घेण्यात आला आहे. याबाबत सदर लेखा आक्षेप वगळणेसंदर्भात प्रशासनामार्फत अनुपालन करण्यांत येत आहे.

तरी येणेप्रमाणे अहवालाचा विचार होऊन म.वैद्यकीय आधिकारी तथा प्र. म. आरोग्याधिकारी डॉ. श्री. महेश एम. मोरे, मनपा धुळे सो.यांना खाजगी वाहन प्रातिपुर्ती भता मासिक **₹. १३८७५/-** लागु केल्यास मनपा आर्थिक हिताचे आहे.

**मासिक वाहन प्रतिपुर्ती भत्ता**

**दि. ०१/०४/२०२१ पासुन प्रत्येकी एक (१) महिना ₹. १३८७५/-**

म. वैद्यकीय आधिकारी तथा प्र. म.आरोग्याधिकारी—डॉ.श्री.महेश एम.मोरे, मनपा धुळे सो. यांना प्रतिमाह वाहन प्रतिपुर्ती भत्ता रक्कम ₹.१३,८७५/- मात्र लागु करता येईल व सदर खर्च सन २०२१-२२ या अंदाजपत्रकीय अधिकारी/पदाधिकारी वाहन भाडे बजेट तरतुद रक्कम ₹.४०,०००००/- मात्र मधुन करता येईल.आजपावेतो उपलब्ध शिल्लक रक्कम ₹. ४०,०००००/- आहे.

तरी डॉ.श्री. महेश एम. मोरे- म. वैद्यकीय आधिकारी तथा प्र. म. आरोग्याधिकारी, महानगरपालिका धुळे यांना माहे १ एप्रिल-२०२१ पासून खाजगी वाहन प्रतिपुर्ती भत्ता / भाडे मासिक ₹.१३,८७५/-(अक्षरी-तेरा हजार आठशे पंच्याहत्तर रुपये) मात्र लागू करणेस प्रशासकीय व आर्थिक मान्यता व मे.स्थायी समितीकडेस मान्यतेसाठी ठेवणेस मान्यता दिली आहे त्यानुसार मे.स्थायी समितीकडेस मंजुरीस्तव सादर झाला आहे.

उक्त कार्यालयीन अहवाल व सन्मा. सदस्यांनी केलेल्या चर्चेनुसार डॉ.श्री. महेश एम. मोरे- म. वैद्यकीय आधिकारी तथा प्र. म. आरोग्याधिकारी, महानगरपालिका धुळे यांना माहे १ एप्रिल-२०२१ पासून खाजगी वाहन प्रतिपुर्ती भत्ता / भाडे मासिक ₹.१३,८७५/-(अक्षरी-तेरा हजार आठशे पंच्याहत्तर रुपये) मात्र लागू करणेस मान्यता देण्यांत येत आहे. सदर प्रस्ताव व कार्यवाहीबाबत लेखा आक्षेप निर्माण होणार नाही याची दक्षता घ्यावी.याबाबतची जबाबदारी संबंधित विभागाची राहील.

**सर्वानुमते मंजुर,**

सही/-X X X

**सभापती,**

**स्थायी समिती,**

**धुळे महानगरपालिका धुळे**

विषय क्रमांक:- १०५ — कोविड -१९ कृति आराखडयांतर्गत कोविड केअर सेंटर व रुग्णालयांकरीता आवश्यक मनुष्यबळ विशेष पद भरतीद्वारे उपलब्ध करुन घेणेबाबत आलेल्या कार्यालयीन अहवालावर विचार करणे.

म. नगरसचिव — नगरसचिव यांनी विषयांचे वाचन केले.

म. अमोल मासुळे — विषय मंजूर करण्यांत यावा.

म. सभापती — सर्व सन्मा.सदस्यांच्या सहमतीने व कार्यालयीन अहवालास अधिन राहून सदर प्रस्तावास मान्यता देण्यांत येत आहे.

**धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर ११४ दिनांक ०५/०८/२०२१**

धुळे शहरातील कोविड १९ या साथरोगाचा वाढता प्रादुर्भाव रोखण्यासाठी व रुग्णांवर उपचार करण्यासाठी धुळे महानगरपालिका अंतर्गत स्वतंत्र रुग्णालय नसल्यामुळे शासनाच्या आदेशानुसार कोविड केअर सेंटर (CCC) व डेडिकेटेड कोविड हेल्थ केअर सेंटर (DCHC) ची

सेवा चालु करणे आवश्यक होते त्याकरीता दैनिक पुण्यनगरी वृत्तपत्रातील दि. १४/०६/२०२० रोजी जाहिरात प्रसिध्द करण्यात आली होती.

तरी प्राप्त अर्जानुसार शैक्षणिक अर्हता व त्यामधील गुणांकन तसेच मुलाखती अंती खालील पदनिहाय **वैद्यकीयअधिकारी** या पदांकरीता निवड समिती मार्फत डॉ.श्री. योगेश पाटील यांची निवड करणेत आलेली आहे.

डेडिकेटेड कोविड हेल्थ केअर सेंटर (DCHC)सिव्हील हॉस्पिटल व कोविड केअर सेंटर (CCC)सेंटर येथे काम करण्यासाठी वरील **वैद्यकीय अधिकारी** यांना पुढील २ महिन्यांकरीता मानधनावर फेर नियुक्ती देणेत आलेली आहे.

श्री.योगेश शालीग्राम पाटील यांनी अर्ज सादर करुन आयुर्वेदिक दवाखाना येथील वैद्यकीय पद रिक्त असल्याने तेथील पदाचा अतिरिक्त कार्यभार सांभाळण्या बाबत आदेशित केले असुन सदर दवाखान्यात ४००+ रुग्णांची आयुर्वेदिक शास्त्र पध्दतीने रुग्ण नाडी परीक्षा,तपासणी, उपचार,समुपदेश, मार्गदर्शन करणे रुग्णसेवा करीत आहे. सदर दवाखान्यात सुसज्ज पंचकर्म विभाग कार्यान्वित करुन रुग्णांची चांगली दर्जेदार सेवा, आयुर्वेद औषधी व पंचकर्म उपचार उपब्ध करुन रुग्णसेवा करावयाची असून रुग्णसेवेची संधी देणे बाबत विनंती केली आहे.

श्री.योगेश शालीग्राम पाटील यांना दि.१२/०१/२०२१ ने २ महिन्यासाठी मुदत वाढ देणेत आलेली असुन सदरची मुदत११/०३/२०२१ रोजी संपुष्टात आली आहे.

तदनंतर डॉ.योगेश पाटील यांना एनयुएचएम अंतर्गत डेडीकेटेड कोविड हेल्थ केअर सेंटर येथे ३० जून २०२१ पर्यत मानधनावर फेर नियुक्ती देण्यांत आलेली होती.

तरी श्री.योगेश शालीग्राम पाटील यांना आयुर्वेद दवाखाना येथे वैद्यकीय अधिकारी म्हणुन एकत्रित मानधन रुपये ३०,०००/-मात्रने ३ दिवसाचा सेवा खंड देऊन ०६महिने कालावधी करीता फेर नियुक्ती देणेबाबत महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ५३ नुसार मे.स्थायी समितीच्या मंजुरीसाठी सादर झालेला आहे.

सर्व सन्मा. सदस्यांच्या सहमतीने व कार्यालयीन अहवालास अधिन राहून सदर प्रस्तावास मान्यता देण्यांत येत आहे. तसेच कामाच्या आवश्यकतेनुसार व विभागाच्या शिफारसीनुसार पुढील मुदतवाढ देणेबाबत प्रशासनाने कार्यवाही करावी. सदर प्रस्ताव व कार्यवाहीबाबत लेखा आक्षेप निर्माण होणार नाही याची दक्षता घ्यावी.याबाबतची जबाबदारी संबंधित विभागाची राहील.

**सर्वानुमते मंजुर,**

सही/-XXX

**सभापती,**
**स्थायी समिती,**
**धुळे महानगरपालिका धुळे**

विषय क्रमांक:- १०६ — कोविड-१९ कोरोना वायरस प्रतिबंधात्मक उपाययोजना साठी महानगरपालिका क्षेत्रात कंटेंमेंट झोन करिता व कोविड सेंटर मध्ये विविध व्यवस्था करणेकामी धनलक्ष्मी मंडप व डेकोरेटर्स यांचे वाटाघाटी अंती निश्चित केलेल्या दरांना व शासन निधीअंतर्गत सदर खर्चास मान्यता देणेबाबत आलेल्या फेर कार्यालयीन अहवालावर विचार करणे.

म. नगरसचिव — नगरसचिव यांनी विषयांचे वाचन केले.

म.सुनिल बैसाणे — सदरचा विषय मागील सभेचा तहकूब विषय आहे. याला मंजुरी देत असतांना सन्मा. सदस्यांना ज्या शंका कुशंका उपस्थित झाल्या होत्या तर या गोष्टीला मंजुरी कुठल्या आधारावर दिली गेली पाहिजे मंजुरी देत असतांना धुळे शहरामध्ये तातडीचा निर्णय घ्यावा लागत होता आणि तांतडीचा निर्णय प्रशासनाने त्यावेळेस घेतला प्रशासनाने महाराष्ट्र शासनाचे आदेशाने निर्ण्य घेतला आणि ते अत्यावश्यक होते कोरोनाचा प्रार्दुभाव वाढू नये म्हणून त्यावेळेस निर्णय घेण्यांत आला आणि त्या अनुषंगाने या ठिकाणी शंका उपस्थित झाल्या त्यानंतर आपण महाराष्ट्रातील अनेकन.पा./मनपा यांचे

दर तपासले ते तपासल्यानंतर आपल्याकडे माहिती आलेली आहे. त्यानंतर आपण सार्वजनिक बांधकाम विभागाकडून दराबाबत माहिती मागविलेली आहे.या विषयाला मंजुरी देण्याच्या आधी प्रशासनाने हा विषय सादर केलेला आहे.दरमंजुरी आपण कुठल्या आधारावर करणार आहोत. सदर विषय आपण तहकूब केलेला होता.त्यानंतर आपण काय कार्यवाही केली यांची माहिती मिळून चर्चा होणे आवश्यक आहे.

म. सभापती — आपण सदर प्रस्ताव मागील स्थायी समिती सभेत तहकूब केल्यानंतर दर तपासणीसाठी अन्य शक्षम विभागाकडे पाठविण्यांस आदेशित केले होते. त्याबाबत काय अभिप्राय व माहिती सादर झालेली आहे. याचा खुलासा करावा. सदर प्रस्ताव विषय पटलावर आणण्यासाठी भाजपा मार्फत किंवा पदाधिका-यामार्फत आपल्याला काही आदेश होते का?

म. विद्युत अभियंता — सदर विषय यापूर्वी स्थायी समितीपुढे आल्यानंतर विषय तहकूब करण्यांत आला होता. स्थायी समितीने दर तपासणीबाबत सुचना व निर्देश दिले होते. त्यानुसार आम्ही दर तपासणीसाठी सार्वजनिक बांधकाम विभागास लेखी पत्र सादर केले.व समक्ष त्याठिकाणी गेलेलो होतो. सार्वजनिक बांधकाम विभागाने विधान परिषद निवडणूकीसाठी जे दर निश्चित केले होते त्याची माहिती दिलेली आहे. निवडणूकीची संपूर्ण कार्यवाही शासन स्तरावर झालेली आहे. सदर विभागाच्या दरानुसार जाळीचा दर 39 रु.व बांबू बॅरेकेटींगचा दर17 रु.निश्चित केलेला होता.सार्वजनिक बांधकाम विभागाने शासनाच्या दरसूचीमध्येअसे कुठलेही दर निश्चित नाही असे कळविलेले आहे.त्याअनुषंगाने जिल्हाधिकारी कार्यालयामार्फत लोकसभा व विधान सभेच्या निवडणूका झाल्यात. व सन 2019मध्ये एसआरपी ग्राऊडवर एअरफोर्सची भरती प्रक्रिया करण्यांत आलेली होती. त्याठिकाणचे दर तपासण्यांत आले.सदर दर 55रु प्रतिदिवस निश्चित झालेले होते.त्यामुळे आता तपासणीअंती आलेले दर व आपण निश्चित केलेले दर यानुसार आपण स्थायी समितीसमोर पुनश्च प्रस्ताव सादर केलेला आहे. यामध्ये ठेकेदाराने जे दर दिलेले आहे.रिडयुर्सींग रेट प्रमाणे कंटेनमेंट झोनचे रेट कमी केलेले आहे. सुरुवातीचे कंटेनमेंट झोन 11 ते 55 यामध्ये 28780 प्रति कंटेनमेंट झोन दर निश्चित केलेला आहे. एक कंटेनमेंट झोन 14 दिवसासाठी निश्चित केलेलाहोता.काही कंटेनमेंट झोन14 दिवसापेक्षाही जास्त दिवस ठेवलेले होते. काही ठिकाणी लोक प्रतिनिधी व नागरीकांच्या मागणीनुसार सुमारे एक महिना कंटेनमेंट झोन ठेवलेले होते. मार्च 2020 मध्ये कोविड सुरु झाला त्यावेळेस शासनाने जे जे आदेश केले त्या त्या प्रमाणे कंटेनमेंट झोन बाबत कार्यवाही केलेली आहे. जिल्हा प्रशासनाचे प्रमुख मा.जिल्हाधिकारी तसेच महानगर स्तरावर आयुक्त हे सक्षम प्राधिकारी होते. तसेच जिल्हाधिकारी व पोलीस अधिक्षक यांच्याकडेस झालेल्या बैठकांमधील निर्णयाप्रमाणे वेळोवेळी कार्यवाही झालेली आहे.तसेच या कंटेनमेंट झोन व्यतिरिक्त महापौर सो. तसेच सभापती व पोलीस विभागाच्या सुचनेनुसार अन्य ठिकाणीही कंटेनमेंट झोन तयार करण्यांत आलेले आहे.आपण पुल,चौक व अन्य रस्ते संपूर्णत:दिर्घ कालावधी साठी बंद केलेले होते. कंटेनमेंट झोन व्यतिरिक्त अन्य कामे झालेली आहेत.ही वस्तुस्थिती आहे व सर्वांनी ती पाहिलेली आहे.395 कंटेनमेंट झोनचे जे दर आहे ते आपण कमी केले. ते खालील प्रमाणे आहेत.

| अ.क्र. | कंटेनमेंट झोन क्रमांक | एकूण कंटेनमेंट झोन | १४दिवसकरीता रक्कम | सरासरी भाडे प्रती दिवस प्रती फुट |
|---|---|---|---|---|
| | ११ ते ५५ | ४५ | २८६८०/- | रू.१३.६५ |
| | ५६ ते १५६ | १०० | २५६८०/- | रू.१२.२२ |
| | १५७ ते ३९७ | २४० | २३६८०/- | रू.१६.९१ |
| | | ३९५ | ९५४१८००/- | रू.१४.२३ |

यांची जर सरासरी पाहिली तर 150 रनिंगफूट प्रमाणे 14 दिवसाचा रेट 12 रुपये अधिक जीएसटी प्रमाणे दिला जात आहे. याठिकाणी एकंदरीत जे रेटआहेत इतर ठिकाणच्या निवडणूकीचा किंवा इतर शहराच्या ठिकाण्याची माहिती घेतली असता तुलनेत कमी आहे. नाशिकजळगांव इत्यादी

मनपानी अशा प्रकारे भाडयाने कंटेनमेंट झोनची कामे केलेली आहेत. धुळे शहरात मोठया प्रमाणात कामे झालेली आहे.व वेळोवेळी दिलेल्या शासन निर्देशाप्रमाणे आपण कामे केलेली आहेत.

म. सुनिल बैसाणे — आपण इतर मनपानी काय दराने दिलेले आहे व आपण काय दराने देत आहोत याबाबत खुलासा करावा.

म. विद्युत अभियंता — याठिकाणी राज्य शासनाने जे आदेश दिलेले होते तसेच कोविड प्रतिबंधात्मक उपाय योजनेबाबत मा. मुख्यमंत्री, मा.आरोग्यमंत्री यांच्या नियमित होणा-या व्ही.सी.व्दारे दिलेल्या आदेशाप्रमाणे व सुचनेप्रमाणे कार्यवाही केलेली आहे.नाशिक मनपात कंटेनमेंट झोन वेगळया प्रकारे केलेली होती त्यांनी 1.40 लाख रुपये प्रतिदिवसाप्रमाणे कंटेनमेंट झोनचा दर निश्चित केलेला होता त्यात मंडप व्यवस्था विद्युत व्यवस्था संगणक व अनय सुविधांचा समावेश होता.आपल्याकडे 25687 रु. 14दिवसासाठी देण्यांत आलेला आहे.

म. कमलेश देवरे — 2005 च्या रोगप्रतिबंधक कायदयानुसार या गोष्टी तांतडीने करण्यांचे आपले अधिकार आहे. मागच्या वेळेस मी व सदस्यांनी या गोष्टींला विरोध केलेला होता.याबाबत विभागाकडून बागुल सो. यांनी माहिती दिलेली आहे. सार्वजनिक बांधकाम विभागाकडून दर मागविले होते त्या व आपल्या दरात काय तफावत आहे त्याच प्रमाणे अन्य ठिकाणीही बॅरेकेटींगची कामे केली जातात त्याठिकाणचे काय दर होते तसेच शासकीय दर सूचीत जर या दरांचा समावेश नसेल तर इतर मनपाचा दर व आपल्या दरात काय तफावत आहे त्याचा खुलासा करावा.

म. विद्युत अभियंता — आपण परिस्थिती जन्य काम केले आहे. इतर मनपाने जी काही कामे केली ती अतिरिक्त सुरुपाची होती मंडप विद्युत व्यवस्था इत्यादीचा समावेश होता. मनुष्यबळ देखील बाहय यंत्रणेव्दारे घेतलेले होते. आपण मनुष्यबळाच्या खर्चासह ठेकेदाराकडून कामे करुन घेतलेली आहे. रात्री अपरात्री देखील कंनटेमेंट झोन निर्माण केलेले आहे. याबाबत त्यांना कोणताही अतिरिक्त भत्ता किंवा भोजन भत्ता दिलेला नाही. आपण सर्वांनी ते काम पाहिलेले आहे.

म.सुनिल बैसाणे — एखादया मनपाने किंवा नगरपालिकेने बांबू विकत आणून कंटेनमेंट झोन तयार केलेले आहेत का ?

म. विद्युत अभियंता — असे कुठेही नाही. आपण जे तांतडीने कंटेनमेंट झोन तयार करुन शासनाच्या निर्देशानुसार कार्यवाही केलेली आहे त्यामुळे संसर्गाचा वेग आटोक्यांत आणण्यास फार मोठयाप्रमाणावर मदत झालेली आहे.व त्यामुळेच रिकव्हरी रेटमध्ये धुळे शहर अग्रेसर राहिलेले आहे.

म. शितल नवले — पूर्वीची टिपणी व आताची टिपण्णी सविस्तर जर वाचल्या तर मागचेच भागाकार गुणाकार बदलून रकमा सारख्याच ठेवलेल्या आहेत. यांतच कोविड सेंटरची लिस्ट दिलेली होती व 397 कंटेनमेंट झोनची यादी होती यांत काही कंटेनमेंट झोन मध्ये काही रस्ते 3मिटरचे काही 6मिटरचे होते. मोठा पुल 12 मिटरचा होता. आपण सरसकट 28हजार रुपये रेट का लावला. रस्त्याच्या रुंदी नुसार बॅरेकेटींगचा दर वेगवेगळा येईल. याचे बिल रेकॉंड केले असल्यास आपल्याकडे यादी उपलब्ध आहे. सन्मा. सदस्य मासुळे यांच अपार्टमेंट मध्ये आहे. त्याठिकाणी आपण कुठलाच रस्ता अडवलेला नव्हता गल्ली बंद केलेली होती तसेच फॉरेस्ट कॉलनीमध्ये राजेंद्र सोनार हे पेशंट होते तेथे देखील पूर्ण वेळ गल्ली चालू होती. त्यांचे सुध्दा यात पैसे लावले आहे. रासकरनगर मध्ये गल्लीची रुंदी 10 फूटाच्या वर नाही त्याचा ही रेट 28 हजार रुपये लावले आहे. आमचे हे म्हणणे होते तुम्ही तत्वनिष्ठ घ्या मी देवेंद्र फडनवीस सो. यांचेविधान परिषदेतील भाषण शोधत होतो एक मुद्दा मांडला होता.तिथल्या जम्बो कोव्हीडचा भ्रष्टाचार तिथ एक एक फॅनचे भाडे 9/9 हजार रुपये दिले त्यावर आमचे नेते म्हणता 9 हजारात किती पंखे आले असते हे आमच्या सर्वच्च नेत्याचे म्हणणे आहे माझ्या नेत्यांनी मा. फडवणीस,मा. मुनगंटीवारांनी सभेत जें जे प्रश्न उपस्थित केले की माझ्या कॉम्पुटरला सेव करुन ठेवले आहे. माझ हेच म्हणणे होते 400 कन्टेंनमेंट झोनसाठी 20000 बांबू त्यांची कॉस्ट किती पन्नास रुपये 10 लाख बाबुची कॉस्ट आणि20 लाख लेबर चार्जेस कुठे 25 लाख कुठे एक कोटी तुम्हाला शासनाने असे सांगितले होते का? हा विपरीत काळ आहे तुम्ही काहीही उत्माद करा म्हणून भाऊ बोलले 8 कोटी जेवणावर खर्च केला मी म्हणणे आहे तोही भ्रष्टाचार आहे थर्मामिटर 150 ते 200 रुपयांत मिळत होतें तेच महाराष्ट्र सरकारने 1200 रुपयाला घेतले ते जबाबदार आहे त्यांनी असे आदेश काढले आणि आपण आपले

कुठलाही स्वत:चा सेन्स न वापरता करत असेल तर असे सर्वाना वाटत असेल तर माझ काही म्हणणे नाही जनतेचा पैसा आहे त्यांचे विश्वस्थ म्हणून आपल्याला बसविले आहे विश्वस्त असल्याने माझ्या त्या गोष्टीला विरोध आहे तरी माझा विरोध नोंदविण्यांत यावा. नाशिक मनपाने 1 लाख रुपये दिले ठिक आहे कागद दाखवा आम्हाला त्यात काय काय आहे शेवटी 94 लाख रुपये कसे आणावयाचे ते गणित एकदम फिक्स आणाल उदाहरण 11ते 55 कन्टेमेंट झोनचे दर-28680 56 ते 156 कन्टेमेंट झोनचे दर 25680 व 157 ते 397 कन्टेमेंट झोनचे दर 23680 हा दर कसा झाला तुम्ही डिटेल कॅल्कुलेश दया आपल्याकडे जसे इंग्रज गेले तसे मेट्रीक सिस्टीम लागू केली आहे. आपण कुठलेही दर फूटात देत नाही तुमचे युनिट पण चुकत आहेत एका मिटरमध्ये अंतर टाकतात एकात फूटास अंतर टाकतात मिटरला फूटाने गुणायचे का फूटाने मिटरला गुणायचवे ज्या वेळेस घ्या कागदावरचे कॅल्कुलेशन जुळत नाही सभापती महोदय आपलयाला जो निर्णय घ्यावयाचा तो आपण घेऊ शकता माझ्या बोलण्यावरती कुठल्याही सदस्यांनी खुलासा देण्याची आवश्यकता नाही माझा या गोष्टीला विरोध नोंदवा.

म. नागसेन बोरसे — ज्या काळामध्ये कोव्हीडची साथ सुरु झाली त्या काळामध्ये रिस्क खूप होती. शेजारचा माणूस जर पॉझेटीव्ह आला असेल त्यांनी महिनाभर दारे लावून ठेवली होती अशा काळामध्ये संबंधित ठेकेदाराने हे काम केले आहे पहिल्या मजल्यावर जर बांधकाम करायचे असेल ना तर तेथे रेट कमी दुस-या मजल्याचे त्यापेक्षा जास्त तिस-याचे करायचे तर त्याच्यापेक्षा जास्त दर असतात. संबंधित ठेकेदाराने त्या काळात काम केले आहे. त्या काळामध्ये निविदा काढायची वेळ नव्हती जो 2005 चा आपत कालीन कायदा म्हणतो तो कायदा मध्ये निविदा काढावयाची वेळ लागतो त्यावेळी ते काम आपल्या स्तरावरुन करण्यासाठी तो कायदा लागतो. जिल्हाधिकारी,पोलीस अधिक्षक आणि आमचे आयुक्त सो. असतील यांनी वेळोवेळी मिटींग घेतल्या मा. मुख्यमंत्रयाची दर दिवसाला मिटीग राहावयाची त्या व्ही.सी. वरुन वेळोवेळी सुचना दिल्या गेल्या होत्या ज्या वेळेस आमच्या नेत्यांने आरोप केले त्या वेळेचा कोव्हीडचा शेवटचा काळ होता ज्या वेळेस आपल्या पालिकेने काम केले त्यावेळेस वेळ नव्हता म्हणून निर्णय घ्यावा लागला आणि संबंधित ठेकेदाराने साहित्य पुरविले माझ्याकडे बांधकाम चालू होते मी ड्रम लावला त्यांचे भाडे मी 700 रुपये भरुन दिले त्यावेळची माझी गरज होती दोन दिवसाचे काम आहे 20 रुपये देऊन देईल माझे काम होवून जाईल पण मला 700 रुपये भरावे लागले आणि ज्यावेळेस हे काम सुरु होते त्यावेळी कोणीही काम करण्यास तयार नव्हते कारण रिस्क जास्त होती स्लम वस्तीमध्ये कन्टेंन्मेंट झोन म्हटल की 25- 30 गल्लया बंद कराव्या लागत होत्या. मोठापुल बंद म्हणजे पूर्ण एरिया होत नाही माझी अशी विनंती आहे हे जे काम झाले आहे त्या ठेकेदाराला पैसे देणे गरजेचे आहे. प्रशासनाची टिपणी आहे जर तो कोर्टात गेला तर कारण प्रशासनाने त्याच्याकडून काम करुन घेतले आहे. माझी विनंती आहे हा विषय मंजूर करण्यांत यावा.

म. शितल नवले — सभापती महोदय देवेंद्रजी एक श्वेत प्रत्रिका प्रसिध्द केली आहे जसा कोव्हीड भारतात शिरला त्यावेळेपासून हया तिघाडी सरकारने कोरोना काळात 2005 चा जो कायदा आहे त्याच्या अनुषंगाने काय काय भ्रष्टाचार केला त्यांची श्वेतपत्रिका हिवाळी अधिवेशनात दाखविली याच काळात मुंबई पुणे जिथे जिथे भ्रष्ट्राचार झाले जिथे जी वस्तु घेवून परवडणार होती तिच 10 पटीने भाडे भरल माझी कळकळीच हेच म्हणणे होत त्याच वेळेस यांनी हे कॅल्यकुलेशन केले असते त्या श्वेत पत्रिकेत कसा कसा भ्रष्टाचार झाला सर्व श्वेत पत्रिकेत म्हटले आहे एकाटयाने चूक केली म्हणून मी पण करावी हे न्यायाला धरुन नाही त्या काळामध्ये दर निश्चितसाठी 4/5 लोक बसले असते दर निश्चित केले असते ऑगस्टमध्ये सर्व काम संपूर्ण गेले आहे. बाकीचे पैसे दयायला काही हरकत नाही मंडप उभारले असतील ही चूक आपण सत्तेत असतांना करणे गैर आहे.

म. नागसेन बोरसे — शितल भाऊनी सांगितले तिघाडी सरकारच आम्ही त्याच अभिनंदन करतो आघाडी सरकारवर आरोप केला आहे. जर तिघाडी सरकारच पाप होते तर काळ वर्तमानपत्रात बातम्या आल्या त्यात आरोप सरळ सरळ भाजपाच्या सत्ताधा-यावर झालेला आहे. वेळोवेळी आदेश तुमच्याच नेत्यांनी दिले त्या पध्दतीने प्रशासनाने हे काम केले आहे आणि त्याच पध्दतीने हा विषय आला नसता भाजपाचे या विषयाशी कुठेही देणे घेणे नाही कारण वेळोवेळी आदेश करणारे तुमच्याच सरकारचे तुमचा पालकमंत्री तर गायब

होते आमच्यावर आरोप केले आहे त्यांना माझे आव्हान आहे त्यांनी आघाडी सरकारच्या नेत्यावर आरोप करावे तुम्ही केलेल्या आदेशामुळे हे पाप आलेले आहे पण हे ठेकेदाराने केलेले काम आहे त्याला पैसे देणे बंधनकारक आहे त्यामुळे विषय मंजूर करण्यांत यावा.

म. शितल नवले — जे काल उत्तर मागायला आले होते माझा पण एक प्रश्न आहे त्यांना ज्या मुंबई मनपाबाबत आमच्या नेत्यांनी जी श्वेतपत्रिका प्रसिध्द केली आहे आधि त्याचे उत्तर तिथून घेवून या आमचा तर काय 1 कोटीचे बील आहे पण तुम्ही तेथे हजारो कोटीचा भ्रष्ट्राचार करुन ठेवला आहे आरोप करुन नये हा विषय भाजपाकडून आलेला नाही हा विषय प्रशासनाकडून आला आहे. अजेंडावर विषय घेण्यांचे अधिकार सचिवाना असतो तो मंजूर करायचा किंवा नाही हा अधिकार सभागृहाला आहे. माझ त्यांना आव्हान आहे त्यांचे पालकमंत्री धुळयामध्ये बिर्याणी खायला येतात धुळयाला त्या काळात सोडून गेले होते ते कोणत्या नैतिकतेच्या आधारावर आरोप करता मी प्रशासन यंत्रणेत नाही त्यामुळे मला प्रशासनाच्या काही गोष्टी कळत नाही मला टेक्नीकल कळत फोटो छाप पुढा-यांना माझ आव्हान आहे एक तरी विषय तडीस नेऊन दाखवा साहेब हया विषयाला माझा विरोध नोंदवा.

म. सुनिल बैसाणे — सभापती महोदय, या विषयामध्ये प्रशासनाची बाजु व सन्मा.सदस्यांच्या शंखेचे निरसन करुन सर्व विषयांना आपण या ठिकाणी मंजूरी देणार आहोत. मंजुरी देत असतांना कन्टेन्मेंट झोनचा हा जो विषय आला आहे यात आपण मनपाचे हित जपणार आहोत हे करत असतांना आपले नगरसेवक कशा पध्दतीने विषय मांडत असतो त्यांच्याकडे बघण्याचा दृष्टीकोन काय आहे. आपण त्याठिकाणी दर निश्‍चिती करत असतांना आपण प्रशासनाच्या माध्यमातून आलेले विषय बाजार भावाचे विषय बाजार भाव व्यतिरिक्त आलेले विषय आणि सर्वाचा लेखाजोखा घेवून घेत असतो. असे कुठलेही विषय जे सदस्यांच्या अंगाशी येतील त्यांना आताही नाही पुढील काळात देखील मंजूरी देणार नाही. जर त्यांना यांच्यात काही काळेगोरे करायचे असत तर त्यांनी 20-20 लाखाचे तुकडे केले असते हा विषय चर्चेला ही आला नसता हे पैसे देत असतांनास कन्टेमेंट झोनमुळे एका माणसाच जीव वाचवू श्कतो त्यामुळे माणसाच्या जिवा पेक्षा पैसे देत असतांना कन्टेन्मेंट झोन मुळे एका माणसाचा जरी जिव वाचवू शकलो तरी माणसाच्या जिवापेक्षा हे पैसे जास्त नाही. त्यावेळचा काळ असा होता शेजारच्या घरात कोरोना पेशंट निघाला तर त्याला वाळीत टाकल्यासारखे होत होते आणि आपण अशा वेळेस कंन्टेमेंट झोन केले. शासनामार्फत केलेल्या सुचना व निर्देशानुसार काम झालेले आहे. त्यात मोजमाप कमी जास्त होवू शकते. ज्या ठेकेदाराने 100 टक्के काम केलेले आहे आपणास शंका असली त्यानुसार आपण तपासू शकतात. ज्या ज्या कंन्टेमेंट झोनच्या बाबतीत आपली तक्रार आहे ती तक्रार तुम्ही स्पष्टपणे नोंदवा. त्यांची समिती स्थापन करा. कोरोना काळ अजून संपलेला नाही. जर तांतडीचा विषय घेत असतांना प्रशासनाने काही चूक केली व त्यामुळे ठेकेदाराला काही त्रास होत असेल तर त्याला फासावर दयाल का या मताचा मी नाही. होणा-या कारणाचे मुळ शोधले गेले पाहिजे त्या ठेकेदाराने काम करुन काही चूक केली आहे का? त्या वेळेस आपल्याकडे मनुष्यबळ उपलब्ध होते का? मी सभापती होतो.मी 6 महिने त्या काळात घराबाहेर नव्हतो. त्यावेळी तो व्यक्ती रस्त्यावर काम करीत होता.आपण सार्वजनिक विभागाचे आणि इतर मनपाचे दर तपासले आहेत. विरोधला विरोध करण्यांची आमची प्रवृत्ती नाही. तो धुळे शहरासाठी चांगले काम करत असेल तर त्याला सर्वानी सहकार्य केले पाहिजे. याठिकाणी शितलभाऊचे काही आक्षेप असतील माझे काही आक्षेपअसतील ते तपासून बील अदा करण्यांत यावे.आज महाराष्ट्रामध्ये धुळे शहरात मृत्यूदर कमी होता तसेच रिकव्हरी रेटमध्ये आपण अग्रसेर होतो याही बाजू आपण लक्षांत घेतल्या पाहिजे.महाराष्ट्रामध्ये त्यावेळेस मृत्यूचा हाहाकार माजलेला होता. धुळे शहरात सर्व अधिकारी लोकप्रतिनिधी व पदाधिकारीच्या साथीने आपण कोरोनावर मात करु शकलो. आणि अशा परिस्थितीत आपण कंन्टेमेंट झोनव्दारे शहराचा संसर्ग कमी करु शकलो. येणा-या काळामध्ये आपल्याला जर कोणी बदनाम करत असेल तर त्याचा विचार करावा लागेल. याठिकाणी विरोधी पक्षनेता देखील आहे. त्यांनी या विषयात चूकीचे सांगितले तर याबाबत निर्णय घ्यावा.

म. सभापती — हे सर्व काम झालेले आहे. ते पूर्ण शहराने पाहिलेले आहे. जर एखादयाचे बील अदा करु नये असे करणे योग्य होणार नाही ठेकेदाराने काम केलेले आहे. त्यांचे बील तपासून अदा करणे हे तेवढेच महत्वाचे आहे.

म. शितल नवले — ठेकेदाराला पैसे देऊच नये असे सभागृहाचे मत नाही. जास्तीत जास्त 25 ते 30 लाखाचे बील व्हायला पाहिजे. प्रशासनाने केलेले आकडेवारी पटवून दयावी किंवा टिपणीत जो गुणाकार भागाकार केलेला आहे त्यांची सविस्तर टिपणी सादर करा. शब्दावर काम करुन घेणे हा मोठेपणा आहे. पण शब्दाचा दुरुपयोग करुन अतिरिक्त बिल अदा करणे हे चूकीचे आहे. योग्य दाम आणि योग्य मोबदला दया आमचे काहीच म्हणणे नाही.

म. अमिन पटेल — हा जो प्रस्ताव आलेला आहे धुळे शहरात ज्यावेळी कोविड आला त्यावेळी आम्ही सुध्दा मनपात येत नव्हतो.आयुक्त सो यांनी स्वत: ठेकेदाराला बोलावून हे काम दिले. मी स्वत: माझ्या भागात कंन्टेमेंट झोनसाठी आग्रही होतो आणि काम करुन घेतले त्यात त्यांचे बांबू व काही साहित्य चोरीस गेले. जिल्हाधिकारी कार्यालयाने 17 रुपये दराने काम केलेले आहे आपण 12 रु. दराने काम करुन घेत आहोत यांत मनपाने कमी दराने काम केलेले आहे. मनपा बांबू विकत घेवून लावू शकली असती पण त्यावेळेस ती परिस्थिती नव्हती. त्यावेळेस घराबाहेर पडत नव्हते व तशी परिस्थिती नव्हती.त्या काळात ठेकेदाराने काम केलेले आहे.ज्याठिकाणी कंन्टेमेंट झोनबाबत शंका आहे. तेथील दर कमी करा.

म. सभापती — सर्व सन्मा.सदस्यांच्या भावना याठिकाणी नोंदविलेल्या आहेत मागील वर्षी कोरोनाने संपूर्ण जगात थैमान घातलेले होते त्यावेळी धुळे शहरात शासनाच्या आदेशाने कंन्टेमेंट झोन करण्यांत येत होते. त्यावेळेस नेमका उपाय व कार्यवाही काय करावी यामध्ये संभ्रम होता शासनाने दिलेल्या निर्देशाचे पालन वेळोवेळी करण्यांत आले. व त्यामुळे महानगरपालिकेला कंन्टेमेंट झोनची उभारणी करावी लागली. यामध्ये सदर ठेकेदाराचे बरेच साहित्य चोरीला गेलेले आहे. आपण शहराचा संसर्ग कमी करु शकलो व त्यामुळे निश्चितच मृत्यू दर कमी झाला ही बाबही लक्षांत घेणे आवश्यक आहे.आपण कुठल्याही चुकीच्या विषयाला मंजुरी देत नाही. प्रशासनाने जी काही आपतकालीन परिस्थिती कार्यवाही केली व प्रशासनाच्या मार्फत हा प्रस्ताव स्थायी समिती समोर सादर झालेला आहे.कार्यालयीन अहवालास अधिन राहून बहुमताने या प्रस्तावास मान्यता देण्यांत येत आहे. याठिकाणी शितलभाऊ नवले यांचा विरोध नोंदवून घेण्यांत यावा.

**धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर ११५दिनांक ०५/०८/२०२१**

आपत्ती व्यवस्थापन कायदा २००५ तसेच साथ रोग प्रतिबंधात्मक कायदा १८९७ अन्वय केंद्र शासन व महाराष्ट्र शासना कडील निर्देशानुसार धुळे महानगरपालिका क्षेत्रात कोरोना विषाणूचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी म.जिल्हाधिकारी, धुळे तथा जिल्हा आपत्ती व्यवस्थापन समिती प्रमुख यांचे आदेशानुसार प्रतिबंधात्मक उपाय योजना २२/०३/२०२० पासून करण्यात आला.

म.जिल्हा आपत्ती व्यवस्थापन समिती अध्यक्ष तथा जिल्हाधिकारी, धुळे यांच्या आदेशानुसार तसेच म. पोलीस अधीक्षक, धुळे यांच्या कडील निर्देशानुसार व उपविभागीय पोलिस अधीक्षक, धुळे यांचे सूचनांनुसार धुळे शहरातील मुख्य रस्ते, चौक, पूल, पांझरा नदी किनारचे धार्मिक ठिकाणे तातडीने बॅरेगेटिंग द्वारे बंदिस्त करणेत आली.

१. संतोषी माता मंदिर चौक २. पंडित नेहरू पुतळा चौक ३ सिंचन भवन ते विद्यावर्धिनी महाविद्यालय परिसर ४. मच्छीबाजार चौक ५. मौलवीगंज चौक ६. पारोळा रोड, छत्रपती शिवाजी महाराज चौक ७. गुरुद्वारा चौक ८. सुभाष पुतळा चौक ९. एकविरा मंदिरासमोर जुने धुळे फुल १०.८० फुटी रस्ता, तिरंगा चौक ११. लोकमान्य हॉस्पिटल चौक,४० गाव रोड १२. अग्रसेन चौक मालेगाव रोड १३. भंगार बाजार चौक १४. देवपूर चौफुली १५. दत्त मंदिर चौक १६. आयटीआय चौक १७.नेहरू चौक १८.स्टेडियम चौक वाडीभोकर रोड व गोंदूर १९. वीर सावरकर पुतळा चौक २०. पाच कंदील अग्रा रोड २१. मामलेदार कचेरी चौक २२. साक्री रोड जेल रोड

असे विविध ठिकाणी व पांझरा नदीवरील पूल, इ. पोलिस यंत्रणेच्या सूचनांनुसार सुमारे १६ ते २५ आठवडे पर्यंत बंद करण्यात आलीत. त्याबाबत पोलिस विभागाकडील तसेच म.महापौर, धुळे यांनी वेळोवेळी दिलेल्या सूचनांनुसार पालन करण्यात आले.

धुळे शहरात प्रथम रुग्ण माहे मार्च २०२० अखेरीस आढळून आला. याबाबत पूर्ण विषाणूची तीव्रता व शहरातील वातावरण लक्षात घेता जिल्हा प्रशासनाने दिलेल्या सूचनांनुसार सुमारे ३ किमी पावेतो कंटेनमेंट झोन करण्यात आला शासनाच्या कोविड-१९ च्या निर्देशानुसार ठरवून दिलेल्या क्षेत्र व्याप्तीनुसार कंटेनमेंट झोन घोषीत केल्या प्रमाणे त्यांचे काम करण्यात आले आहेत. प्रत्येक कंटेनमेंट झोन घोषित केल्यानुसार चे आदेश सोबत जोडलेले आहेत. सुरुवातीचे कंटेनमेंट झोन चे क्षेत्र नुसार १.५ की मी ते किमान ०.७५ की. मी वर्तुळाकार होते. त्यानुसार बॅरेगेटिंग झालेले आहे. कालांतराने शासनाने सदर कंटेनमेंट झोन क्षेत्राची व्याप्ती कमी करून ५०० मीटर व नंतर पुनश्च कमी करून मायक्रो झोन करून ५० मीटरपर्यंत केली आहे. यानुसार कंटेनमेंट झोन साठी सुमारे सरासरी किमान ५० ते १०० मीटर पर्यंतचे बॅरेगेटिंग काम करणेत आले आहे.

वरील प्रमाणे शासनाकडे निर्देश वेळोवेळी जिल्हा आपत्ती व्यवस्थापन कक्ष व पोलीस यंत्रणा यांचेकडील लेखी तथा तोंडी आदेशानुसार धुळे महापालिकेने मनपा क्षेत्रात आवश्यक व दक्षतापूर्वक कामे केली आहेत उक्त नमूद केल्यानुसार धुळे महानगरपालिका क्षेत्रात कंटेनमेंट झोन बाबत प्रशासनाच्या सुचनाप्रमाणे,मागणीनुसार वेळोवेळी जास्तीचे कामे करून ही मक्तेदाराचे घोषीत कंटेनमेंट झोन बाबतचे देयक सादर केलेआहे.

माहे मार्च २०२० ते जुलै.ऑगस्ट २०२० पर्यंत घोषित कंटेनमेंट व त्या व्यतिरिक्त जेव्हा प्रशासनाच्या निर्देशानुसार व पोलिस विभागाच्या मागणीनुसार धुळे महानगरपालिका क्षेत्रात बॅरेगेटिंगचे कामे पूर्ण केली आहेत. यावेळी प्रत्यक्ष कामाची पाहणी म. जिल्हाधिकारी, धुळे, पोलीस अधीक्षक व नियंत्रण अधिकारी यास बरोबर म.महापौर सो.धु.म.न.पा.धुळे, भाजपा जिल्हाप्रमुख म.आयुक्त, म.उपायुक्त, अभियंता यांनी ही स्वतः त्यांचे निगराणीत कामे करून घेतली आहेत. या दरम्यान म. महापौर सो. यांच्या संकल्पनेनुसार प्रभाग कंटेनमेंट सूचनेनुसार शहरी भागात प्रभाग कंटेनमेंट केले आहे.

उक्त कामाबाबत मागील बैठकीत सन्मा. सदस्यांनी मुख्यत: दोन गोष्टीबाबत आक्षेप नोंदविला असून त्यात देयक बिलात नमूद केलेल्या लांबी पेक्षा कमी लांबी व क्षेत्रफळाचे बॅरेगेटिंग करणे व याबाबत नोंदविलेल्या परिणामापेक्षा सरासरी सुमारे २०० रनिंग फुटाचे जास्तीचे बॅरेगेटिंग मक्तेदाराने केलेले असून त्यात सरासरी मापे आधारीत मापे घेऊन मनपाचे आर्थिक हित जोपासले आहे. याबाबत म. नगररचना विभागाने सर्वेक्षण केलेल्या व त्याबाबतचे कार्यालयीन आदेश (घोषीत कंटेनमेंट बाबत) पोलीस विभागाकडील पत्र व प्रत्यक्षात कामाचे फोटो इ. सोबत जोडले आहेत त्यामुळे जास्तीचे मापे नोंदविणे बाबतच्या आक्षेपाशी कार्यालय सहमत नाही.

या कामांबाबत दुसरा अक्षेप दरांबाबत नोंदविला असुन सन २०२० मधील प्राप्त परिस्थिती, सदर रोगाचा जागतिक प्रादुर्भाव, देशपातळीवरील राज्य पातळीवरील कडक निर्बंध, सदर कोरोना रोगाचा प्रादुर्भाव किती दिवस राहील, याबाबत संभ्रम व त्याची भीती या कारणाने करावयाच्या उपाययोजना बाबतची निश्चितता कोणत्या विभागास नव्हती. त्यामुळे कोरोना उपाययोजनांची तातडी व त्याबाबतचे शासनाचे शिघ्र आदेश यानुसार भाडे तत्वावर काम करण्यात आले. सदर चे कंटेनमेंट झोन बॅरेगेटिंगचे काम मनपा प्रशासनाकडुन मोठ्या प्रमाणात कालमर्यादेत करणेत आले. त्यावेळी प्रशासकीय यंत्रणेसह म.महापौर सो.,उपमहापौर सो ,विरोधी पक्षनेता,मनपा धुळे तसेच मनपाचे सन्मा. नगरसेवक व लेखा प्रतिनिधी यांनी प्रत्यक्ष सामाजिक भावनेतून या कामाची पाहणी केली आहे. सदर कामांबाबत म.न.पा. स्तरावर साहित्य खरेदी करून कंटेनमेंट झोन करणे बाबत मागील स्थायी समिती सभेत सन्मा. सदस्यांनी आक्षेप नोंदविला ते सन्मा. सदस्य ही सदर काम करतेवेळी मनपा कामकाजात पर्यवेक्षणात सहभागी होते. त्या वेळच्या परिस्थितीत प्रत्यक्ष कामासाठी लागणारे साहित्य, वाहतुकीसाठी लागणारे वाहने,कोरोनाच्या भितीग्रस्त वातावरणात मनुष्यबळाची उपलब्धता व कामासाठी प्रशासनाने

निर्धारित केलेली कालमर्यादा या बाबींचा विचार करणे अवश्यक आहे. सन्मा. लोकप्रतिनिधींनी दरांबाबत घेतलेला आक्षेप व त्याबाबत केलेला विश्लेषण यामध्ये वरील बाबींचा सदृष्यपणे पाहिल्यावरी मोठया प्रमाणात तफावत असून उक्त कामे लागणारे साधन सामुग्री, वाहतुक व्यवस्था, मनुष्यबळाची उपलब्धता लोखंडी सळई, तसेच नागरिकांनी वेळोवेळी रहदारीसाठी बॅरेगेटिंग खोलून घेणे व त्याची पुनश्च बांधणी करणे, त्यावरील खर्च त्यात ठराविक भागात त्याची झालेली चोरी इ. कुठल्याही बाबींचा आक्षेप घेते वेळी विचार केलेला नाही. तथा सदरचे बॅरेगेटिंग १४ दिवस सुरक्षित ठेवणेसाठी लागणारे लागणारे मनुष्यबळ याबाबतचा ही सदर दरात विचार करणे आवश्यक वाटते कोरोना उपाययोजना कंटेनमेंट झोन करीता राज्यातील इतर महानगरपालिका, नगरपालिकांनी सुध्दा भाडे तत्वावर अशा स्वरूपाची कामे केली आहेत.

वरील प्रमाणे मक्तेदार मे.धनलक्ष्मी मंडप डेकोरेटर्स यांचे देयक उक्त प्रमाणे उपलब्ध निधी / तरतुद मधुन खर्च करण्यास मान्यतेसाठी प्रस्ताव ठराव क्र.२५ दि.०१/०४/२०२१ नुसार तहकुब ठेवण्यासाठी मान्यता देण्यात आलेली आहे. सदरील ठरावानुसार सदरची प्रस्तावीत खर्चा बाबत त्रयस्त यंत्रणेकडुन दर व इतर बाबी तपासणी करून आवश्यक त्या दुरूस्तीसह मा.स्थायी समितीकडे पुनश्च सादर करण्याबाबत निर्देश देण्यात आले.

धुळे महानगरपालिका पत्र क्र.४ दि.०७/०४/२०२१ नुसार उप विभागीय अभियंता, सा.बा. उपविभाग, धुळे यांना कोविड-१९ करीताच्या उपाययोजना अंतर्गत कंन्टेन्मेन्ट झोन करीता तात्पुरता स्वरूपात बांबु,पत्रा वापरून क्षेत्र बंदिस्त करणे कामाच्या दरांबाबत विचारणा करण्यात आली. सार्वजनिक बांधकाम विभाग यांच्याकडील पत्र क्र.प्र.शा-१/५१९ दि.१६/०४/२०२१ नुसार सा.बा विभागाकडुन खालील प्रमाणे कळविणेत आले आहे.

सदर बाबीचे शासकिय दर या कार्यालयास तसेच राज्य दरसूचीमध्ये उपलब्ध नाहीत. तरी या कार्यालयामार्फत धुळे नंदुरबार स्थानिक प्राधिकार मतदार संघाची पोट निवडणूक २०२० साठी जाधव मंडप डेकोरेटर्स, औरंगाबाद, यांचे देयक व दरपत्रक या कार्यालयास उपलब्ध आहे. सदर देयक यापत्रासोबत सादर करण्यात येत आहे.

सदर प्रपत्रातील दर या कार्यालामार्फत प्रस्तावित दरांपेक्षा जास्तीचे आहे.राज्य दरसूची बाहेरील बाबीच्या दरासाठी शासकीय कामाकरीता किमान ३ ठेकेदारांकडून पुरवठादारांकडून दर मागविण्यात यावेत व सार्वत कमी दाराचे व प्रस्ताव आपल्या योग्य स्तरावरून मंजूर करून सदर दर उपरोक्त विषयांकीत कामासाठी वापरण्यात यावेत असे या कार्यालयाचे मत आहे.या कार्यालयामार्फत प्रस्तावित करणेत आलेले बिल हे सा.बा.विभागाकडील दरांपेक्षा व बाजारभावातील दरांपेक्षा कमीचे आहे.

उक्त बाबत धुळे महानगरपालिकेने जा.क्र./धुमपा/विवि/०७ दि. २०/०७/२०२० च्या महाराष्ट्र शासनाच्य वेब पोर्टल वर जाहिरात प्रसिध्द करून निविदा दर मागविले आले आहे.स्पर्धात्मक दर मगवुन कमी आलेले दर L१ रू. १७ प्रति फुट प्रति दिवस असे आहेत. अंतिम: मक्तेदारचे सादर देयकासाठी सदरचे दर सरासरी रू.१४.२३ प्रति रनिंग फुट असे आहे.

सा.बा.विभागाच्या पत्रासोबत विधान परिषद निवडणूकीत मक्तेदार जाधव मंडप डेकोरेटर्स यांचे प्रमाणीत दर प्राप्त आहे. सदरच्या दरामध्ये जाळी बॅरेगेटींग दर रू. ३९ मात्र प्रती रनिंग फुट आहे. धुळे जिल्हा लोकसभा व विधानसभा निवडणूक २०१९ करीता मंजूर दराचे कार्यादेश मा .जिल्हाधिकारी धुळे निवडणूक कार्यालय / कक्ष ११ / निवडणूक/कावि/२१४ दि.१४/०३/२०१९ चे कार्यादेशाचे बाब क्र. ७ बल्या व बांबू बॅरेगेटीगचे दर प्रती रनिंग फुट प्रती दिवस रू.११ /- मात्र आहे. तसेच एअर फोर्स भरती करीता एस.आर.पी.एफ ग्राउड क्र. ६ मंहिदळे येथे मंडप बॅरेगेटींगस्टेज बाबतचे सा.बा.विभागाकडील अंदाजपत्रक सोबत जोडले आहे. त्यातील बाब क्र.१ चे स्पेशिफिकेशन व दर प्रति रनिंग फुट प्रती दिवस प्रमाणे खालील प्रमाणे आहे.

| N.o | Qty | Item of work | Rate | Unit | Amount |
|---|---|---|---|---|---|
| ०१ | २१००.०० | Providing and fixing steel/wooden barricading with १.२ meter height having vertical post २ m. center | ५५.० | Rft. | ११५५००.०० |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | to wrapping by clothsaround the pipes for th period dated०४/०२/२०१९ to ०५/०२/२०१९ et completed, as directed by engineer in charge. | | | |

वरील प्रमाणे लोकसभा व विधानसभा निवडणूक २०१९ चे जिल्हा निवडणूक शाखा जिल्हाधिकारी कार्यालय,धुळे चे कार्यादेशाचे दर, विधान परिषद निवडणूक २०२० चे सा.बा उपविभाग,धुळे. कडील दर व एअर फोर्स भरती करीता एस.आर.पी.एफ ग्राउड क्र. ६ मंहिदळे येथे मंडप बॅरेगेटींग स्टेज बाबतचे सा.बा.विभागाकडील अंदाजपत्रकचे दर नमुद केले आहे.

धुळे महानगरपालिका क्षेत्रामध्ये कंटेनमेन्ट झोन बॅरेगेटींग करणेबाबत कंत्राटदार मे.धनलक्ष्मी मंडप डेकोरेटर्स यांचे खालील प्रमाणे प्रती कंटेनमेंट झोन प्रमाणे देयक देणेबाबत सादर आहे.

| अ.क्र. | कंटेनमेंट झोन क्रमांक | एकूण कंटेनमेंट झोन | १४दिवसकरीता रक्कम | सरासरी भाडे प्रती दिवस प्रती फुट |
|---|---|---|---|---|
| १ | ११ ते ५५ | ४५ | २८६८०/- | रू.१३.६५ |
| २ | ५६ ते १५६ | १०० | २५६८०/- | रू.१२.२२ |
| ३ | १५७ ते ३९७ | २४० | २३६८०/- | रू.१६.९१ |
| | | ३९५ | ९५४१८००/- | रू.१४.२३ |

वरील प्रमाणे १४५ कंटेनमेंट झोन चे १५० रनिंग फुट प्रती दिवस प्रमाणे व २५० कंटेनमेंट झोन चे १०० रनिंग फुट प्रमाणे सरासरी गणना करून दर व क्षेत्र निश्चित केले आहे. सदरचे दर जी.एस.टी.करासह असुन उक्त प्रमाणे सरासरी दर रू.१२+ १८% जी.एस.टी या प्रमाणे आहे.

उपरोक्त विषयान्कींत कामी दर व खर्चास मंजुरीसाठी मा.स्थायी समितीकडे खालील प्रमाणे मंजुरीस्तव सादर करण्यात आले होते.सदर प्रकरणी म.आयुक्त सो यांचे दालनात दि.२५/०१/२०२१ रोजी चर्चा झाली. कोविड-१९ कोरोना व्हायरस प्रतिबंधत्मक उपाययोजना करणे कामी करण्यात आलेल्या विविध व्यवस्था कामे,कंटेनमेंट झोन करीता बॅरेगेटींग करणे, कोविड केअर सेंटर येथे जनरेटर व्यवस्था करणे,मंडप व्यवस्था करणे, विदयुत व्यवस्था करणे कामाचे एकत्रित बिल रू. १,०४,७१,३७४/- सादर करणेत आले आहे. सदर देयकांबाबत म.आयुक्त सो., यांचे दालनात, म.आयुक्त सो, म. अति.आयुक्त सो, म.उपायुक्त तथा उपमुख्यलेखा परिक्षक सो, व म. अभियंता यांची चर्चा झाली असता सदरचे देयक पुर्णपणे १४ व्या वित्तआयोग योजनेच्या व्याजातुन(शासन परिपत्रक- टी एफसी-८०१५/ प्र.क्र. १०६ / नवि ०४ मंत्रालय,मुंबई दि.१४/०९/२०२० नुसार) देणे खालील प्रमाणे शिफारस करणे बाबत निर्देशीत केले.

| | | | |
|---|---|---|---|
| १. | कार्यालयीन आदेश करणेत आलेल्या११ ते ३९७ कंटेनमेंट झोन करीता बॅरेगेटींग व्यवस्था करणे व चौक बंदिस्त करणे | ९५,४१,८००/- | शासन परिपत्रक- टी एफसी-८०१५/ प्र.क्र. १०६/ नवि०४ मंत्रालय, मुंबई दि. १४/०९/२०२० नुसार १४व्या वित्त आयोगाच्या व्याज रकमेतुन |
| २. | कोविड केअर सेंटर येथेमंडप व्यवस्था जनरेटर व्यवस्था,विदयुत व्यवस्था, व अनुषंगिक कामे | ९,२९,५७४/- | शासन अनुदान — कोविड -१९ व्यवस्थापन कामे |
| | | १,०४,७१,३७४/- | |

उक्त प्रमाणे कोविड-१९ उपाययोजना करणेसाठी कोरोना प्रादुर्भाव रोखणे करीता प्रतिबंधात्मक कंटेनमेंट झोन करणेची कामे राज्य शासन व केंद्र शासनाच्या निर्देशानुसार राष्ट्रीय आपत्ती व्यवस्थापन कायदा २००५ च्या नियम ५० व नियम ४८ च्या तरतुदीनुसार व साथरोग प्रतिबंधात्मक कायदा १८९७ नुसार जिल्हा आपती व्यवस्थापन समिती अध्यक्ष यांचे आदेशानुसार करणेत आली आहेत.त्यावेळच्या प्राप्त परिस्थितीत म.जिल्हाधिकारी ,म.जिल्हा पोलीस प्रमुख,आरोग्ययंत्रणेतील सर्व कर्मचारी तसेच मनपातील अधिकारी व लोकप्रतिनिधी यांच्या सर्वांच्या समक्ष सदरची कामे सुरळीतपणे कालमर्यादेत उचित दराने पूर्ण केलेली आहे.

सदरच्या कामी सदर दर व खर्चासाठी मान्यतेसाठीच्या प्रस्तावावरील आक्षेपांबाबत कार्यालयीन विश्लेषण तथा प्रशासनाची धारणा याबाबत सादर असुन उक्त प्रमाणे खर्चास मान्यता होणेस स.सादर.

याबाबत म.मुख्य लेखापरीक्षक यांनी खालील प्रमाणे अभिप्राय नोंदविलेला आहे.

विभागाने रक्कम रूपये १,०४,७१,३७४/- मात्रच्या खर्चास मंजूरीकामी सादर केले असून त्यापैकी खर्च रूपये ९५,४१,८००/- हा "अ" मध्ये मजूर शासन निर्णयानुसार १४ वा वित्त आयोग व्याजाच्या रकमेतून व "ब" २ मध्ये नमूद नुसार रक्कम रूपये ९,२९,५७४ हा शासन अनुरान कोविड - १९ व्यवस्थापन कामे अंतर्गत प्रस्तावित केला आहे. तसेच यापुर्वी मे.स्थायी समिती ठरावानुसार सदर विषय दर तपासणी व बाकी तपासणी कामी त्रयस्थ यंत्रणेकडे सादर करणे व त्यानंतर प्रस्ताव आवश्यक त्या दुरूस्तीसह सादर करणेबाबत निर्देश दिले आहेत. त्यानुसार विभागाने टिपणीत बाबी नमूद केलेल्या आहेत.

विभागाने सदर कामी दि.२०/०७/२०२० अन्वये ई निविदाप्रसिध्द करून निविदा मागविल्या असता त्यात ३ निविदा प्राप्त झाल्यात त्यात सर्वात कमी दर धनलक्ष्मी मंडप डेकोरेटर्स यांचे होते.सदर मक्तेदार यांनी निविदेमध्ये १,२७,०६,२८२/- (जी.एस.टी) करासह सादर केले त्यात 386 कंटेमेंट झोनचे ब्यारेकेंटींग आहे.

त्यानंतर सदर मक्तेदारासोबत वाटाघाटी करून सुधारणा व कपात करून जी.एस.टी करासह रू 105,20,734/- मात्र इतके मक्तेदाराने कमी केले आहे.

विभागाने सदरचा खर्च शासन निर्णयानुसार शासनाच्या 14 व्या वित्त अयोगाच्या मुलभुत व कार्यात्मक अनुदानाच्या रक्कमेवर जमा होणाऱ्या व्याजाच्य रक्कमेतुन करणे बाबत नमुद केले आहे. त्यामुळे सदरच्या खर्चाचा मनपा निधीवर बोजा पडणार नाही.

सदरचे खर्चास म.स्थायी समिती पुढे सादर केला असता म.स्थायी समिती ने सदर प्रस्ताव त्रयस्थ यंत्रणेकडे दर व नमुद बाबीबाबत तपासणीसाठी सादर करून तो आवश्यक दुरूस्ती सह सभागृहा समोर सार करावा असे नमुद करून सदर प्रस्ताव तहकुब ठेवला.

उक्त नुसार विभागाने जा.क्र.४ दि.०७/०४/२०२१अन्वये उपविभागीय अभियंता, सा.बां.वि.धुळे यांना पत्र देवुन प्रस्तुत कामाबाबत शासकिय दर मागविले असता, सदर विभागाने सदर बाबींचे दर उपलब्ध नसलेल्या बाबत कळविले.

सार्व.बांध. उप विभाग यांनी राज्य दरसुची बाहेरील बाबीच्यां दरासाठी ३ ठेकेदारांकडून दर मागवुन त्यानुसार दर निश्चीत करून सदर कामासाठी वापरावेत असे कळविले आहे.

तरी उक्त बाबीनुसार विभागाने नमुद केले टिपणीत नमुद केलेल्या बाबत अ मधील रक्कम रू.९५,४१,८००/- मात्रचा खर्च शासन परिपत्रक टी एफसी ८०१५ दि.१४/०९/२०२० नुसार १४ व्या वित्त आयोगाच्या व्याज रक्कमेतुन व बाब ब मधील रक्कम रू. ९,२९,५७४/- मात्रचा खर्च हा शासन अनुसार कोविड-१९ व्यवस्थापन कामे अंतर्गत करणेसाठी विभागाने प्रस्तावित केला आहे. त्यास म.स्था.स ठरावानुसार त्रयस्थ यंत्रणेकडून सदर बाबीची तपासणी करून दुरूस्तीसह प्रस्ताव तयार करून म.स्थायी समिती सभेपुढे सादर करणे, व शासन निर्णय नुसार प्राधिकृतअधिकारी यांचकडून प्रशासकिय मान्यता घेणे आवश्यक वाटते असे मत आहे.

याबाबत मा.आयुक्त सो. यांनी सदर काम Pandemic तातडीचे कारणामधील अतिशय तातडीने व सर्वोच्च प्राधान्याने करणे गरजेचे होते. शासनाकडुन सुध्दा सतत या उपाययोजना करणेचे सुचना निर्गमीत केले जात होते. व आढावा घेतला जात होता त्यानुसार किमान आवश्यक प्रक्रिया पार पाडून (दरपत्रक) काम करणेत आले आहे. संपुर्ण सदहेतूने व नागरी जिवीत हानी टाळणेचे दुष्टीने करण्यात आली आहे. स.मान्यतेस सादर झालेला आहे.

सर्व सन्मा.सदस्यांच्या भावना याठिकाणी नोंदविलेल्या आहेत मागील वर्षी कोरोनाने संपूर्ण जगात थैमान घातलेले होते त्यावेळी धुळे शहरात शासनाच्या आदेशाने कंन्टेमेंट झोन करण्यांत येत होते.त्यावेळेस नेमका उपाय व कार्यवाही काय करावी यामध्ये संभ्रम होता शासनाने दिलेल्या निर्देशाचे

पालन वेळोवेळी करण्यांत आले.त्यामुळे महानगरपालिकेला कंन्टेमेंट झोनची उभारणी करावी लागली.यामध्ये सदर ठेकेदाराचे बरेच साहित्य चोरीला गेलेले आहे.आपण शहराचा संसर्ग कमी करु शकलो व त्यामुळे निश्चितच मृत्यू दर कमी झाला ही बाबही लक्षांत घेणे आवश्यक आहे.आपण कुठल्याही चुकीच्या विषयाला मंजुरी देत नाही.प्रशासनाने जी काही आपतकालीन परिस्थिती कार्यवाही केली व प्रशासनाच्या मार्फत हा प्रस्ताव स्थायी समिती समोर सादर झालेला आहे. कार्यालयीन अहवालास अधिन राहून बहुमताने या प्रस्तावाप्रमाणे दर व खर्चास मान्यता देण्यांत येत आहे. प्रशासनाने अंतिमत: खात्री करुन तपासणी करावी.सदर प्रस्तावास श्री.शितलभाऊ नवले यांचा विरोध नोंदवून घेण्यांत येत आहे.सदर प्रस्ताव व कार्यवाहीबाबत लेखा आक्षेप निर्माण होणार नाही याची दक्षता घ्यावी. याबाबतची जबाबदारी संबंधित विभागाची राहील.

**बहुमताने मंजुर,**
**सही/-X X X**
**सभापती,**
**स्थायी समिती,**
**धुळे महानगरपालिका धुळे**

विषय क्रमांक:-१०७ — महिला व बालकल्याण निधीतून प्रभाग क्र. ११ मध्ये रामनगर येथे महिलांसाठी सामजिक सभागृह बांधणे कामास आर्थिक व प्रशासकीय मंजुरी मिळणे बाबत आलेल्या कार्यालयीन अहवालावर विचार करणे.

म. नगरसचिव — नगरसचिव यांनी विषयांचे वाचन केले.

म. कमलेश देवरे — विषय मंजूर करण्यांत यावा.

म. सभापती — सर्व सन्मा.सदस्यांच्या सहमतीने व कार्यालयीन अहवालास अधिन राहून सदर प्रस्तावास मान्यता देण्यांत येत आहे.

**धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर ११६दिनांक ०५/०८/२०२१**

महिला व बालकल्याण निधीतून प्रभाग क्र.११ मध्ये रामनगर येथे महिलांसाठी सामजिक सभागृह बांधणे कामाबाबत संदर्भीय पत्रान्वये सादर करण्यात आलेली असून प्रत्यक्ष जागेवर जाऊन पाहणी केलेली असता सदर ठिकाणी महिलांसाठी सामाजिक उपक्रम व विविध कार्यक्रमासाठी सभागृह बांधणे गरजेचे आहे.

सदर कामाचे अंदाजपत्रक तयार करण्यात आले असून सदर कामास शासकीय दरसूची सन २०२०-२१ नुसार रु.३०,००,७०२/- मात्र खर्च अपेक्षित असून सदरचा खर्च महिला व बालकल्याण निधीतून करण्यात येणार आहे.

त्यानुसार लेखा विभागाने सदर कामासाठी नगररचना विभागाचा अहवाल घेणे आवश्यक आहे असे नमूद केले असून म. नगररचनाकार यांनी एकत्रित प्रोत्साहन बांधकाम निमंत्रण नियमावली क्र.३.४.७ नुसार खुल्या जागेत सामजिक सभागृह अनुज्ञेय होत नाही. तथापि सदर जागी ध्यान धारणा केंद्र, व्यायाम केंद्र या प्रमाणे वापर अनुज्ञेय होतील. त्यानुसार वि. नि. नि. प्रमाणे विकसन देण्यास हरकत नाही असे नमूद केले आहे.

म.आयुक्त यांनी उपरोक्त rules चे अधीन व प्रयोजनाकरिता बांधकाम करणेत हरकत नाही असे नमूद आहे. त्यानुसार सदरच्या कामास आर्थिक व प्रशासकीव मंजुरीसाठी मे.स्थायी समितीपुढे सादर झालेला आहे.

सर्व सन्मा.सदस्यांच्या सहमतीने व कार्यालयीन अहवालास अधिन राहून महिला व बालकल्याण निधीतून प्रभाग क्र.११ मध्ये रामनगर येथे महिलांसाठी ध्यान धारणा केंद्र बांधणे कामास आर्थिक व प्रशासकीय मान्यता देण्यांत देत आहे.

**सर्वानुमते मंजुर,**
**सही/-X X X**
**सभापती,**
**स्थायी समिती,**
**धुळे महानगरपालिका धुळे**

# धुळे महानगरपालिका,धुळे

## नगरसचिव कार्यालय

## स्थायी समिती सभा क्रमांक १७ चे इतिवृत्त

---

**धुळे मनपा भारतरत्न अटलबिहारी वाजपेयी सभागृह**
**गुरुवार दिनांक २६/०८/२०२१**
**वेळ :-सकाळी ११-०० वाजता.**

धुळे महानगरपालिका स्थायी समितीची ऑन लाईन साप्ताहिक सभा आज गुरुवार दिनांक २६/०८/२०२१ रोजी सकाळी ११-०० वाजता **मा.श्री संजय सुधाकर जाधव,सभापती**,स्थायी समिती, मनपा,धुळे यांच्या अध्यक्षतेखाली **धुळे मनपा भारतरत्न अटलबिहारी वाजपेयी सभागृह** भरली. ऑनलाईन सभेस खालील सन्मा.सदस्य सभागृहात हजर होते.

| अ.क्रं. | सदस्यांचे नांव | हुद्दा |
|---|---|---|
| १ | श्री. जाधव संजय सुधाकर | सभापती |
| २ | श्री. वैसाणे सुनिल तुळशिराम | सदस्य |
| ३ | श्रीमती माळी भारती अशोक | सदस्या |
| ४ | श्रीमती पाटील मंगला सुरेश | सदस्या |
| ५ | श्रीमती बोरसे पुष्पा प्रकाश | सदस्या |
| ६ | श्री. मासुळे अमोल पावबा | सदस्य |
| ७ | श्री. देवरे कमलेश नारायण | सदस्य |
| ८ | श्रीमती पठाण हिना अस्लम | सदस्या |
| ९ | श्री. सईद बेग हाशम बेग | सदस्य |
| १० | श्री. नवले शितल मोहन | सदस्य |
| ११ | श्री. बोरसे नागसेन दामोदर | सदस्य |
| १२ | श्रीमती कुलेवार किरण राकेश | सदस्या |
| १३ | श्रीमती वराडे वैशाली भिकन | सदस्या |
| १४ | श्री. जाधव बन्सीलाल माणिक | सदस्य |
| १५ | श्रीमती चौधरी मंगला अर्जुन | सदस्या |
| १६ | श्री. पटेल अमीन अब्दुल करीम | सदस्य |

**उपस्थित अधिकारी गण**

| अ.क्र. | अधिकाऱ्यांचे नाव | हुद्दा |
|---|---|---|
| १ | श्री. नितीन कापडणीस | अति. आयुक्त |
| २ | श्री. गणेश गिरी | उपायुक्त |
| ३ | श्रीमती शिल्पा नाईक | उपायुक्त |
| ४ | श्रीमती पल्लवी शिसाळ | सहा. आयुक्त |
| ५ | श्री. तुषार नेरकर | सहा. आयुक्त |
| ६ | श्री. विनायक कोते | सहा. आयुक्त |
| ७ | श्री. मनोज अरविंद वाघ | प्र. नगरसचिव |
| ८ | श्री. महेंद्र परदेशी | नगररचनाकार |
| ९ | डॉ. महेश मोरे | आरोग्याधिकारी |

| | | |
|---|---|---|
| १० | श्री. चंद्रकांत जाधव | सहा.आरोग्याधिकारी |
| ११ | श्री. लक्ष्मण पाटील | सहा.आरोग्याधिकारी |
| १२ | श्री.बी.एस. रनाळकर | प्र. लेखाधिकारी |
| १३ | श्री.रमजानअन्सारी | कार्यालय अधिक्षक |
| १४ | श्री. एन.के. बागुल | विद्युत अभियंता |
| १५ | श्री. सी.सी. बागुल | पा. पु. ओव्हरसिअर |
| १६ | श्री. सी.एम. उगले | पा. पु. ओव्हरसिअर |
| १७ | श्री. हेमंत पावटे | बां.वि. ओव्हरसिअर |
| १८ | श्री. किशोर सुडके | बाजार विभाग |
| १९ | श्री. राजू माईनकर | भांडारपाल |
| २० | श्री. प्रसाद जाधव | अति.विभाग |
| २१ | श्री. राजकुमार सुर्यवंशी | प्र. एल.बी.टी. अधिक्षक |

म.सभापती सर्व उपस्थित सन्मा.सदस्य अति.आयुक्त सो. अधिकारी वर्ग छायाचित्रकार बांधव सभेचे कामकाज चालविणेसाठी आवश्यक तो कोरम पूर्ण झाल्याने नगरसचिव यांनी सभेचे कामकाज सुरुवात करावी.

म. नगरसचिव वंदे मातरम् या राष्ट्रवंदनेसाठी सर्वांनी उभे रहावे.

विषय क्रमांक :- १०८ मागील स्थायी समिती सभेचे इतिवृत्त वाचून कायम करणे. (दि. ८/७/२०२१)

म.नगरसचिव नगरसचिव यांनी विषयांचे वाचन केले.

म. सुनिल बैसाणे मागील सभेचे इतिवृत्त वाचून कायम करणेचा जो विषय आलेला आहे. विषय क्रं. ८८ या मध्ये मी प्रश्न उपस्थित केला होता ठराव क्रं.४९ मनपाच्या घनकचरा संकलनाच्या विषयाचा त्या सभेच्या वेळेस मा. नगरसचिव मनोजभाऊ हे रजेवर असल्याकारणाने त्यावेळी सभेचे काम सचिव म्हणून गोसावी साहेब पहात होते.त्यामध्ये मी पत्र दिले होत आणि त्या पत्राच्या अनुषंगाने घनकचरा व्यवस्थापनात मंजुरी विषयी जे झाले होते त्यात मी प्रश्न उपस्थित केले होते त्यामध्ये मी नमूद केले होते घनकचरा व्यवस्थापन समिती ही गठीत झाली होती त्या समितीने इतिवृत्त तयार केले होते त्यात समितीचे अधिकारी/सदस्य होते घनकचरा व्यवस्थापनाला मंजुरी देत असतांना टेंडर कुठल्या आधारावर दिली होती त्याचे इतिवृत्त व माहिती मिळणेबाबत मी पत्र दिल होत आता डेग्यु मलेरिया पेस्ट कंट्रोलच्या बाबतीमध्ये सुध्दा त्या वेळी मी पत्र दिल होत त्या वेळेस सुध्दा समिती गठीत झाली होती आणि त्या समितीमध्ये आपण स्थायी समितीचे एक सभापती म्हणून सदस्य म्हणून त्या ठिकाणी आहे आणि त्यावेळेस त्या समितीचे इतिवृत्त त्या समितीने टेंडर मध्ये कुठल्या कुठल्या बाबींयचा निविदा मध्ये सहभाग घेतल्यानंतर त्या निविदा धारकाला पात्र कशा पध्दतीने केले आहे. त्या नंतरच त्या निविदावाल्यास मंजूरी त्या ठिकाणी दिली आहे. मी ते पत्र दिलेले होत तर मला आज पर्यत त्या पेस्ट कंट्रोलच्या बाबतीत त्या समितीचे उत्तर मिळाले नाही घनकचरा व्यवस्थापनामध्ये त्या वेळेस निविदा धारकाला पात्र कुठल्या आधारावर केले होते त्या बाबतीत तुमच इतिवृत्त पाहिजे होत ते मला अजून पर्यत मिळाले नाही. सभापती महोदय आपल्याला विनंती आहे.आता सुध्दा बंटीभाऊ मासुळेनी तुम्हाला पत्र दिलेले आहे. परंतु इतिवृत्तामध्ये त्या पत्राचा कुठेही उल्लेख होत नाही एखादया निविदेच्या दर मंजुरीच्या बाबतीतमध्ये लेखी स्वरुपाचे तक्रारीचे पत्र असतात बोलण्याच्या ओघामध्ये एखादा विषय आम्ही विसरुन जातो म्हणून आम्ही अगोदरच एक लेखी पत्र दिलेले असते त्याचा उल्लेख त्यात येयाला पाहिजे इतिवृत्त मिळणे हा आमचा अधिकार आहे तुम्ही पेस्ट कंट्रोल आणि घनकचरा बाबतीत जी समिती होती गठीत कुठल्या कुठल्या अधिका-यांने काय काय मार्क देऊन टेंडर पास केले आहे.त्या सर्व लेखी मला मिळाल्या पाहिजे.मला पुढील स्थायी समितीच्या बैठकी आगोदर या दोन्ही विषया संदर्भात निविदा पात्र करतांना गठीत समितीने तयार केलेले इतिवृत्त मला मिळावे अशी विनंती.या विषयाला कायम करुन मंजूर करण्यांत यावे.

| | |
|---|---|
| म.सभापती | सर्व सन्मा.सदस्यांच्या सहमतीने मागील स्थायी समिती सभेचे इतिवृत्त क्रमश: वाचून कायम करण्यांत येत आहे. तसेच सन्मा.सदस्य श्री.सुनिल बैसाणे यांनी चर्चेत नमूद करुन मागितलेली माहिती आरोग्य विभागाने त्यांना पुढील बैठकी पर्यत देण्यांची कार्यवाही करावी. |

**धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर ११७ दिनांक २६/०८/२०२१**

मागील स्थायी समिती सभा दिनांक ८/७/२०२१ रोजीचे स्थायी समिती ठराव नंबर ९६ ते १०४ तसेचसन्मा.सदस्यांनी उपस्थित केलेली चर्चा व त्यावरील निर्णय क्रमश: वाचून कायम करण्यांत येत आहे.

तसेच सन्मा.सदस्य श्री.सुनिल बैसाणे यांनी चर्चेत नमूद करुन मागितलेली माहिती आरोग्य विभागाने त्यांना पुढील बैठकी पर्यत देण्यांची कार्यवाही करावी. सही/-x x x

**सभापती,**
**स्थायी समिती,**
**धुळे महानगरपालिका,धुळे**

| | |
|---|---|
| विषय क्रमांक :-१०९ | धुळे शहरात शिव छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंती उत्सवानिमित्त विविध कामासाठी झालेल्या खर्च रु.१,३५०००/- व जीएसटी खर्चास कार्वोत्तर मंजुरी देणेबाबत आलेल्या कार्यालयीन अहवालावर विचार करणे. |
| म. नगरसचिव | नगरसचिव यांनी विषयांचे वाचन केले. |
| म. शितल नवले | विषय मंजूर करण्यांत यावा. |
| म. अमोल मासुळे | विषय मंजूर करण्यांत यावा. |
| म.सभापती | सर्व सन्मा.सदस्यांच्या सहमतीने व कार्यालयीन अहवालास अधिन राहून सदर प्रस्तावास कार्यांत्तर मान्यता देण्यांत येत आहे. |

**धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर ११८ दिनांक २६/०८/२०२१**

धुळे शहरात शिव छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंती उत्सवा निमित्त दि. १८/०२/२०२१ व १९/०२/२०२१ रोजी विविध व्यावस्था करण्यात आलेला होता.

मा.आयुक्त सो.व तसेच म.महापौर यांच्या तोंडी आदेशानुसार शिवजयंती उत्सवा निमित्त विविध कार्यक्रम व्यवस्था करणे व इतर अनुषंगीक कामे करण्याकरीता आदेशीत करण्यात आले होते.

या नियोजित कार्यक्रमासाठी करावयाच्या व्यवस्थेबाबत व नियोजना बाबत मा.महापौर सो., यांच्या दालनात झालेल्या बैठकित दिलेल्या सुचनानुसार शिवजयंती उत्सवा निमित्त विविध कार्यक्रमाची व्यवस्था करण्यात आली आहे.सदरचे काम मे.धनलक्ष्मी मंडप डेकोरेटर्स यांनी पुर्ण केले आहे. सदरच्या कामी मक्तेदार यांनी नियोजना नुसार व कार्यालयीन सुचना प्रमाणे खालील प्रमाणे कामे केलेली आहे.

१)धुळे शहरातील संपूर्ण१४स्मारकांना फोकस व लाईटींग करणे २)मनोहर चित्रमंदीरातील छत्रपती शिवाजी महाराज यांच्या स्मारकाला व फोकसची सजावट करणे ३)मनोहर चित्र मंदीरापासून गांधी पुतळयापर्यत फल्ड लाईट लावणे.४) मनोहर चित्रमंदीरातील छत्रपती शिवाजी महाराज यांच्या स्मारकाजवळ साऊंड सिस्टम व्यवस्था करणे ५) मनोहर चित्रमंदिरातील छत्रपती शिवाजी महाराज यांच्या स्मारकांला ओरिजन फुलांची सजावट करणे ६) सजावटसह भव्य गेट उभारणी

वरील प्रमाणे सर्व व्यवस्था कामे करण्याकरीता मे.धनलक्ष्मी मंडप डेकोरेटर्स यांनी एकत्रित कामाचे तपशिला नुसार रककम रू.१,३५,०००/-+१८% जी.एस.टी.चे बिल सादर केलेले आहे. वरील प्रमाणे शिवजयंती उत्सवाची कामे योग्य रित्यापुर्ण करण्यात आलेली आहे. उक्त प्रमाणे कामाबाबतचे फोटोग्राफस जोडलेले आहेत.

शिवजयंती उत्सवा निमित्त दिलेल्या कार्यालयीन आदेशाप्रमाणे तातडीची बाब लक्षात घेता सदरचे काम विना निविदा करण्यात आलेले आहे. करीता वरील प्रमाणे कामा करीता व खर्चाकरीता महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम ५(२)(२) नुसार कार्योत्तर मंजुरीस्तव सादर करण्यांत आलेला आहे.

सर्व सन्मा.सदस्यांच्या सहमतीने व कार्यालयीन अहवालास अधिन राहून शिवजयंती उत्सवा निमित्त विविध कामासाठी झालेल्या खर्च रु.१,३५०००/- व जीएसटी खर्चास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम ५(२)(२) नुसार कार्योत्तर मान्यता देण्यांत येत आहे. सदर प्रस्ताव व कार्यवाहीबाबत लेखा आक्षेप निर्माण होणार नाही याची दक्षता घ्यावी. याबाबतची जबाबदारी संबंधित विभागाची राहील.

सुचक :- श्री.शितल मोहन नवले, सदस्य मनपा धुळे

अनुमोदक:- श्री.अमोल पावबा मासुळे, सदस्य, मनपा धुळे

**सर्वानुमते मंजुर,**
**सही/-x x x**
**सभापती,**
**स्थायी समिती,**
**धुळे महानगरपालिका धुळे**

विषय क्रमांक :- ११० — धुळे मनपा हद्दीतील शिवाजी व्यायाम शाळा येथील २० सीट सार्व.शौचालयाचे तुटलेला स्लॅब टाकणेसाठी झालेला खर्च रु.४,५०,८०७/- मात्र खर्चास कार्योत्तर मंजुरी देणेबाबत विचार करणे.

म. नगरसचिव — नगरसचिव यांनी विषयांचे वाचन केले.

म. सुनिल बैसाणे — विषय मंजूर करण्यांत यावा.

म.अमीन पटेल — विषय मंजूर करण्यांत यावा.

म.सभापती — सर्व सन्मा.सदस्यांच्या सहमतीने व कार्यालयीन अहवालास अधिन राहून सदर प्रस्तावास कार्यात्तर मान्यता देण्यांत येत आहे.

**धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर ११९ दिनांक २६/०८/२०२१**

धुळे मनपा हद्दीतील शिवाजी व्यायाम शाळा येथील २० सीट सार्व. शौचालयाचे सेप्टिक टॅकचा स्लॅब तुटलेला असून त्यामुळे दुर्गधींचा वास भागात पसरत आहे.

सदर शौचालय जुने जीर्ण झालेले असल्याने तेथील नागरिकांच्या आरोग्यच्या दुष्टीने सदरचे काम करणे आवश्यक आहे. सदर भागात समक्ष पाहणी करून सेप्टिक टॅक दुरुस्ती करणेकामी अंदाजपत्रक तयार केले असता उक्त कामी अंदाजपत्रक तयार केले असता उक्त कामी अंदाजपत्रकीय खर्च रु.४,५०,८०७/- मात्र येणार आहे.

तरी उक्त बाबत काम हे नागरिकांच्या आरोग्याच्या दुष्टीने आवश्यक असल्याने सदरचे काम विना निविदा श्री.पवन अंपळकर ,ठेकेदार,धुळे यांचेकडून करून घेण्यात आलेले असुन सदरचे काम मुंबई प्रांतिक अधिनियम ६७(३)अन्वये विना निविदा करण्यास मंजुरीसाठी व अंदाजपत्रकीय खर्च रु. ४,५०,८०७/- मात्र खर्चास कार्योत्तर मंजुरीसाठी मे.स्थायी समितीची मंजुरी आवश्यक असल्याने सदर कामास येणारा खर्च रु.४,५०,८०७/- मात्रला मंजुरीस्तव सादर झालेला आहे.

सर्व सन्मा.सदस्यांच्या सहमतीने व कार्यालयीन अहवालास अधिन राहून धुळे मनपा हद्दीतील शिवाजी व्यायाम शाळा येथील २० सीट सार्व.शौचालयाचे तुटलेला स्लॅब टाकणेसाठी झालेला खर्च रु.४,५०,८०७/- मात्र खर्चास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम ६७(३)अन्वये कार्योत्तर मान्यता देण्यांत येत आहे. सदर प्रस्ताव व कार्यवाहीबाबत लेखा आक्षेप निर्माण होणार नाही याची दक्षता घ्यावी. याबाबतची जबाबदारी संबंधित विभागाची राहील.

सुचक :- श्री. सुनिल तुळशीराम बैसाणे, सदस्य मनपा धुळे

अनुमोदक:- श्री. पटेल अमीन अब्दुल करीम, सदस्य, मनपा धुळे

**सर्वानुमते मंजुर,**
**सही/-x x x**
**सभापती,**
**स्थायी समिती,**
**धुळे महानगरपालिका धुळे**

विषय क्रमांक :- १११ मा.राज्यपाल महोदय,महाराष्ट्र राज्य यांचा दि. ४/२/२०२१ रोजी धुळे महानगरपालिका येथील कार्यक्रमानिमित्त विविध कामे व्यवस्था करणेकामी झालेल्या खर्च रू.५,२३,५००/-+ १८% जी.एस.टी. खर्चास कार्योत्तर मंजुरी देणेबाबत आलेल्या कार्यालयीन अहवालावर विचार करणे.

म. नगरसचिव नगरसचिव यांनी विषयांचे वाचन केले.

म. शितल नवले विषय मंजूर करण्यांत यावा.

म.कमलेश देवरे विषय मंजूर करण्यांत यावा.

म.सभापती सर्व सन्मा.सदस्यांच्या सहमतीने व कार्यालयीन अहवालास अधिन राहून सदर प्रस्तावास कार्योत्तर मान्यता देण्यांत येत आहे.

**धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर १२०दिनांक २६/०८/२०२१**

मा.राज्यपाल महाराष्ट्र राज्य यांच्या हस्ते दि. ४/०२/२०२१ रोजी धुळे महानगपालिका येथे कोरोना योध्दा याचा सत्कार कार्यक्रम आयोजित करण्यात आलेला होता.

कार्यालयीन आदेश धुमपा/आस्था/३५३५दि.०२/०२/२०२१ रोजीच्या आदेशा नुसार या कार्यक्रमा निमित्त मंडप,स्टेज, लाईट,ध्वनी,जनरेटर व्यवस्था करणे व इतर अनुषंगीक कामे करण्याकरीता आदेशीत करण्यात आले होते. मा. राज्यपाल महोदय, याचे या नियोजित कार्यक्रमासाठी करावयाच्या व्यवस्थेबाबत व नियोजना बाबत मा.महापौर सो., यांच्या दालनात झालेल्या बैठकित दिलेल्या सुचनानुसार व पोलिस विभाग यांनी जागा पाहणी करुन दिलेल्या सुचना प्रमाणे तसेच मा.राज्यपाल यांचे कार्यक्रमाच्या शिष्टाचारानुसार आवश्यक कामे व व्यवस्था करण्यात आली आहे.सदरचे काम मे.धनलक्ष्मी मंडप डेकोरेटर्स यांनी पुर्ण केले आहे. सदरच्या कामी मक्तेदार यांनी नियोजना नुसार व कार्यालयीन सुचना प्रमाणे खालील प्रमाणे कामे केलेली आहे.

१)वॉटरप्रुफ मंडप २) साधा मंडप पंधरा फुट उंच व्हाईट ३) वाल परदे रनिंग फुट ४) मॅट जुट५)स्टेज अपरोल ४ फुट हाईट ६) स्टेज रॅम ३५ फुट रेलिंगसह ७) ग्रील हाऊस पॅडेल ८) प्लेट फॉर्म ९)मॅटींग गलीचा १०) ग्रीन रूममध्ये डंल्लप सोफे ११) टीपॉय १२) कुलर १३)केमिकल टॉयलेट १४) मंडप १५)सेफ हाऊस मॅटींग गालीचा १६) सोफे डंल्लप १७) सेफ हाऊस कुलर १८) सेफ हॉऊस टीपॉय १९) सेफ हाऊस केमिकल टॉयलेट २०)डीझान होम जाळी बॅरिगेटींग रनिंग फुट २१) खुर्ची कवर सह २२) सोफे डंल्लप २३) सोफे साधे २४) डल्लप चेअर कवर सह २५) कुलर २६) स्टेज टॉवर एसी अडीच टन २७) स्टेज टीपॉय २८) जनरेटर (८२ केव्ही, ६२ केव्ही) २९) फोकस ३०) साऊंड सिस्टीम ३१)फुल सजावट स्टेज ३२) गेट ३३) वाल परदे बिल्डींग

वरील प्रमाणे सर्व व्यवस्था कामे करण्याकरीता मे.धनलक्ष्मी मंडप डेकोरेटर्स यांनी एकत्रित कामाचे तपशिला नुसार रक्कम रू.५,२३,५००/-+ १८% जी.एस.टी.चे बिल सादर केलेले आहे.वरील प्रमाणे मा.राज्यपाल यांचे दौऱ्यानिमित्त व त्यांच्या शिष्टाचाराच्या नियमाप्रमाणे सेफ हॉऊस, ग्रिन हॉऊस, व्यासपिठ इ. कामे योग्य रित्यापुर्ण करण्यात आलेली आहे. उक्त प्रमाणे कामाबाबतचे फोटोग्राफस जोडलेले आहेत.

मा.राज्यपाल महोदय,महाराष्ट्र राज्य यांचा दि.०४/०२/२०२१ रोजी नियोजित दौरानिश्चित झाल्याने व त्याबाबत दि.०२/०२/२०२१ रोजी दिलेल्या कार्यालयीन अदेशा प्रमाणे तातडीची बाब लक्षात घेता सदरचे काम विना निविदा करण्यात आलेले आहे. करीता वरील प्रमाणे कामा करीता व खर्चाकरीता महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम ५(२)(२)नुसार कार्योत्तर मंजुरीस्तव सादर झालेला आहे.

सर्व सन्मा.सदस्यांच्या सहमतीने व कार्यालयीन अहवालास अधिन राहून मा.राज्यपाल महोदय, महाराष्ट्र राज्य यांचा दि.०४/०२/२०२१रोजी धुळे महानगरपालिका येथील कार्यक्रमा निमित्त विविध कामे व्यवस्था करणेकामी झालेल्या खर्च रू.५,२३,५००/- +१८% जी.एस.टी. खर्चास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम ५ (२) (२) नुसार कार्योत्तर मान्यता देण्यांत येत आहे. सदर प्रस्ताव व

कार्यवाहीबाबत लेखा आक्षेप निर्माण होणार नाही याची दक्षता घ्यावी. याबाबतची जबाबदारी संबंधित विभागाची राहील.

सुचक :- श्री.शितल मोहन नवले, सदस्य मनपा धुळे

अनुमोदक:- श्री कमलेश नारायणराव देवरे , सदस्य, मनपा धुळे

**सर्वानुमते मंजुर,**
**सही/-x x x**
**सभापती,**
**स्थायी समिती,**
**धुळे महानगरपालिका धुळे**

विषय क्रमांक:- ११२ विकास शुल्कातंर्गत अरिहंत मंगल कार्यालय ते वडजाई रोड पावेतो रस्ता डांबरीकरण करणे व अरिहंत मंगल कार्यालय ते नाला पावेतो रस्त्याच्या दोन्ही बाजूस गटार करणे कामाचे निविदा दर मागविण्यांत आलेत, त्याबाबत आलेल्या कार्यालयीन अहवालावर विचार करणे.

म. नगरसचिव नगरसचिव यांनी विषयांचे वाचन केले.

म. सईद बेग हाशम बेग विषय मंजूर करण्यांत यावा.

म. हिना पठाण विषय मंजूर करण्यांत यावा.

म.सभापती सर्व सन्मा.सदस्यांच्या सहमतीने व कार्यालयीन अहवालास अधिन राहून सदर प्रस्तावास मान्यता देण्यांत येत आहे.

**धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर १२१ दिनांक २६/०८/२०२१**

विकास शुल्कातंर्गतअरिहंत मंगल कार्यालय ते वडजाई रोड पावेतो रस्ता डांबरीकरण करणे व अरिहंत मंगल कार्यालय ते नाला पावेतो रस्त्याच्या दोन्ही बाजूस गटार करणे कामाबाबत धुळे महानगरपालिका मे.महासभा ठराव नं.१४० क दि. ३०/१२/२०२० मा.आयुक्त सो. धुळे महानगरपालिका यांनी टिपणी मंजुरीने दि.०९/०७/२०२१अन्वये उक्त कामाबाबत रक्कम रु.६९,५८,९६३/- मात्र खर्चाचा आर्थिक व प्रशासकीय मंजुरी देणेत आली आहे.सुधारित अंदाज पत्रकीय दराने रु.६९,५८,९६३/- मात्र प्रशासकीय मंजुरीस्तव सादर.

उक्त कामाबाबत शहर अभियंता मनपा धुळे यांचे पत्र क्र./११२८/२०२१ दि. २२/०२/२०२१ अन्वये रक्कम रु.६३,५९,७९३/- मात्र खर्चास तांत्रिक मंजुरी मिळालेली आहे.

उक्त कामाबाबत धुळे महानगरपालिका जा.क्र./बा.वि./२१३/२०२१ दि.०४/०३/२०२१ अन्वये दि.०४/०३/२०२१ रोजी दै.दिव्यमराठी/आ.म./मर्डर या वृत्तपत्रात जाहीर निविदा प्रसिद्ध करणेत येऊन दि.२४/०३/२०२१ अखेर निविदा दर मागविण्यात आले आहेत. पात्र कंत्राटदार यांनी निविदेबाबत ऑनलाईन पद्धतीने बयाणा रक्कम भरून निविदा दर सादर केलेले आहेत.

| अ.क्र. | कंत्राटदार किंवा ठेकेदाराचे नाव | दिलेले निविदा दर | शेरा |
|---|---|---|---|
| १ | शाहीद अन्जुंम शकील अहमद | शे.४.००% जास्तीने | |
| २ | इसाक शब्बीर शेख | शे.३.००% जास्तीने | |
| ३ | मे.प्रियदर्शनी कन्सट्रक्शन | **अंदाजपत्रक दर** | **सर्वात कमी दर** |

वरील प्रमाणे निविदेत भाग घेतलेले ठेकेदार पात्र असून श्री/ **मे.प्रियदर्शनी कन्सट्रक्शन** यांनी दिलेले दर अंदाजपत्रकीय दर असून त्यांनी नियमा प्रमाणे ऑनलाईन बयाणा रक्कम भरलेली आहे. **मे.प्रियदर्शनी कन्सट्रक्शन** यांना मा.आयुक्त सो. यांचे आदेशानुसार**मे.प्रियदर्शनी कन्सट्रक्शन** यांना दि.०६/०७/२०२१ रोजी मा.अभियंता सो. यांचे दालनात दरवाटाघाटी करीता बोलावले असता त्यांनी दि.०६/०७/२०२१ रोजी दिलेल्या पत्रात शे.१% कमी दराने काम करण्यास तयार असलेबाबत पत्र सादर केलेले आहे. त्यानुसार मा.आयुक्त सो. यांनी मान्यता दिलेली आहे. तरी**मे.प्रियदर्शनी कन्सट्रक्शन** यांचे शे.१%कमीचे दरास मे.स्थायी समितीपुढे ठेवणेस मंजुरीस्तव सादर झालेला आहे.

सर्व सन्मा.सदस्यांच्या सहमतीने व कार्यालयीन अहवालास अधिन राहून सदर कामी मे. प्रियदर्शनी कन्सट्रक्शन धुळे यांचे निगोसिएशन अंती आलेले शे.१% कमीचे आलेल्या निविदा दरास

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ७३ नुसार मान्यता देण्यांत येत आहे. सदर प्रस्ताव व कार्यवाहीबाबत लेखा आक्षेप निर्माण होणार नाही याची दक्षता घ्यावी. याबाबतची जबाबदारी संबंधित विभागाची राहील.

सुचक :- श्री.सईद बेग हाशम बेग,सदस्य मनपा धुळे

अनुमोदक:- श्रीमती पठाण हिना असलम, सदस्या,मनपा धुळे

**सर्वानुमते मंजुर,**
**सही/-x x x**
**सभापती,**
**स्थायी समिती,**
**धुळे महानगरपालिका धुळे**

विषय क्रमांक :-११३ — सर्व साधारण जिल्हा वार्षिक योजना अंतर्गत धुळे मनपा हद्दीतील सर्व्हे नं.४३६ मधील शासकीय जागेचे अतिक्रमण रोखण्यासाठी संरक्षण भिंत बांधणे कामाचे निविदा दर मागविण्यांत आलेत, त्याबाबत आलेल्या कार्यालयीन अहवालावर विचार करणे.

म. नगरसचिव — नगरसचिव यांनी विषयांचे वाचन केले.

म. सईद बेग हाशम बेग — विषय मंजूर करण्यांत यावा.

म. हिना पठाण — विषय मंजूर करण्यांत यावा.

म.सभापती — सर्व सन्मा.सदस्यांच्या सहमतीने व कार्यालयीन अहवालास अधिन राहून सदर प्रस्तावास मान्यता देण्यांत येत आहे.

**धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर १२२दिनांक २६/०८/२०२१**

सर्व साधारण जिल्हा वार्षिक योजना अंतर्गत धुळे मनपा हद्दीतील सर्व्हे नं.४३६ मधील शासकीय जागेचे अतिक्रमण रोखण्यासाठी संरक्षण भिंत बांधणे कामाबाबत धुळे महानगरपालिका मे.महासभा ठराव नं.-- दि.-----मा.आयुक्त सो. धुळे महानगरपालिका यांनी टिपणी मंजुरीने दि. २८/०४/२०२१ अन्वये उक्त कामाबाबत रक्कम रु.९९,५२,०००/- मात्र खर्चाचा आर्थिक व प्रशासकीय मंजुरी देणेत आली आहे.सुधारित अंदाजपत्रकीय दराने रु.६९,५८,९६३/-मात्र प्रशासकीय मंजुरीस्तव सादर.

उक्त कामाबाबत शहर अभियंता मनपा धुळे यांचे पत्र क्र./१२६४/२०२१दि. २९/०३/२१ अन्वये रक्कम रु.९९,५२,७४७/-मात्र खर्चास तांत्रिक मंजुरी मिळालेली आहे.

उक्त कामाबाबत धुळे महानगरपालिका जा.क्र./बा.वि./३४/२०२१ दि.०७/०५/२१ रोजी दै.लोकमत/पथदर्शी या वृत्तपत्रात जाहीर निविदा प्रसिद्ध करणेत येऊन दि.०२/०६/२१ अखेर निविदा दर मागविण्यात आले आहेत. पात्र कंत्राटदार यांनी निविदेबाबत ऑनलाईन पद्धतीने बयाणा रक्कम भरून निविदा दर सादर केलेले आहेत.

| अ.क्र. | कंत्राटदार किंवा ठेकेदाराचे नाव | दिलेले निविदा दर | शेरा |
|---|---|---|---|
| १ | अहमद वफा अ.अन्सारी | शे.४.००% जास्तीने | |
| २ | इसाक शब्बीर शेख | शे.३.००% जास्तीने | |
| ३ | मे.प्रियदर्शनी कन्स्ट्रक्शन | **अंदाजपत्रक दर** | **सर्वात कमी दर** |

वरील प्रमाणे निविदेत भाग घेतलेले ठेकेदार पात्र असून श्री./**मे.प्रियदर्शनी कन्स्ट्रक्शन** यांनी दिलेले दर अंदाजपत्रकीय दर असुन त्यांनी नियमा प्रमाणे ऑनलाईन बयाणा रक्कम भरलेली आहे. सबब कंत्राटदार श्री./**मे.प्रियदर्शनी कन्स्ट्रक्शन** यांची अंदाजपत्रकीय दराने आलेले निविदा दर मंजुरीस्तव सादर तसेच अन्य काम न मिळालेले ठेकेदारांना त्यांची बयाणा रक्कम परत करणे बाबत मंजुरीस्तव सादर झालेला आहे.

सर्व सन्मा.सदस्यांच्या सहमतीने व कार्यालयीन अहवालास अधिन राहून सदर कामी मे. प्रियदर्शनी कन्स्ट्रक्शन धुळे यांचे अंदाजपत्रकीय दराने आलेल्या निविदा दरास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम ७३ नुसार मान्यता देण्यांत येत आहे. सदर प्रस्ताव व कार्यवाहीबाबत

लेखा आक्षेप निर्माण होणार नाही याची दक्षता घ्यावी. याबाबतची जबाबदारी संबंधित विभागाची राहील.

सुचक :- श्री.सईद बेग हाशम बेग , सदस्य मनपा धुळे
अनुमोदक:- श्रीमती पठाण हिना असलम,सदस्या, मनपा धुळे

**सर्वानुमते मंजुर,**
**सही/-x x x**
**सभापती,**
**स्थायी समिती,**
**धुळे महानगरपालिका धुळे**

विषय क्रमांक :- ११४ नगरोत्थान (जिल्हास्तरीय) योजना अंतर्गत चितोड रोड अमरधाम विकसित करणे कामाबाबत निविदा दर मागविण्यांत आलेत,त्याबाबत आलेल्या कार्यालयीन अहवालावर विचार करणे.

म. नगरसचिव — नगरसचिव यांनी विषयांचे वाचन केले.

म. शितल नवले — विषय मंजूर करण्यांत यावा.

म. अमोल मासुळे — विषय मंजूर करण्यांत यावा.

म.सभापती — सर्व सन्मा.सदस्यांच्या सहमतीने व कार्यालयीन अहवालास अधिन राहून सदर प्रस्तावास मान्यता देण्यांत येत आहे.

**धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर १२३दिनांक २६/०८/२०२१**

नगरोत्थान (जिल्हास्तरीय) योजना अंतर्गत चितोड रोड अमरधाम विकसित करणे कामाबाबत धुळे महानगरपालिका मे.महासभा ठराव नं.- दि.---- मा.जिल्हाधिकारी सो. धुळे महानगरपालिका यांनी टिपणी मंजुरीने दि.२६/०३/२०२१ अन्वये उक्त कामाबाबत रक्कम रु.७४,९७,०९६/- मात्र खर्चाचा आर्थिक व प्रशासकीय मंजुरी देणेत आली आहे.

उक्त कामाबाबत शहर अभियंता मनपा धुळे यांचे पत्र क्र./९०९ दि.०४/०१/२०२१ अन्वये रक्कम रु. ७४,९७,०९६/- मात्र खर्चास तांत्रिक मंजुरी मिळालेली आहे.

उक्त कामाबाबत धुळे महानगरपालिका जा.क्र./पा.पु.वि./११३/२१ दि.१२/०५/२१ अन्वये दि.१३/०५/२०२१ रोजी दै.नवभारत /आपले नवराज्य या वृत्तपत्रात जाहीर निविदा प्रसिद्ध करणेत येऊन दि.०७/०६/२०२१ अखेर निविदा दर मागविण्यात आले आहेत. पात्र कंत्राटदार यांनी निविदेबाबत ऑनलाईन पद्धतीने बयाणा रक्कम भरून निविदा दर सादर केलेले आहेत.

| अ.क्र. | कंत्राटदार किंवा ठेकेदाराचे नाव | दिलेले निविदा दर | शेरा |
|---|---|---|---|
| १ | मे.श्रीस्वामी समर्थ कन्सट्रक्शन | **शे.०.९९% कमीने** | **सर्वात कमी दर** |
| २ | श्री.आशिष एम.पटवारी | अंदाजपत्रकीय दराने | |
| ३ | मे.राधेय कन्सट्रक्शन | शे.६ % जास्तीने | |

वरील प्रमाणे निविदेत भाग घेतलेले ठेकेदार पात्र असून श्री/**मे.श्रीस्वामी समर्थ कन्सट्रक्शन** यांनी दिलेले दर शे.०.९९ % कमीने असून त्यांनी नियमा प्रमाणे ऑनलाईन बयाणा रक्कम भरलेली आहे. सबब कंत्राटदार श्री/ **मे.श्रीस्वामी समर्थ कन्सट्रक्शन** यांची शे.०.९९ % कमीने दराने आलेले निविदा दर मे.स्थायी समिती पुढे ठेवणेस मंजुरीस्तव सादर.तसेच अन्य काम न मिळालेले ठेकेदारांना त्यांची बयाणा रक्कम परत करणे बाबत मंजुरीस्तव सादर झालेला आहे.

सर्व सन्मा.सदस्यांच्या सहमतीने व कार्यालयीन अहवालास अधिन राहून सदर कामी **मे.श्रीस्वामी समर्थ कन्सट्रक्शन** यांची शे.०.९९ % कमीने दराने आलेले निविदा दरास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम ७३ नुसार मान्यता देण्यांत येत आहे.सदर प्रस्ताव व कार्यवाहीबाबत

लेखा आक्षेप निर्माण होणार नाही याची दक्षता घ्यावी. याबाबतची जबाबदारी संबंधित विभागाची राहील.

सुचक :- श्री.शितल मोहन नवले, सदस्य मनपा धुळे
अनुमोदक:- श्री.अमोल पावबा मासुळे, सदस्य, मनपा धुळे

**सर्वानुमते मंजुर,**
**सही/-x x x**
**सभापती,**
**स्थायी समिती,**
**धुळे महानगरपालिका धुळे**

विषय क्रमांक:- ११५ — विकास कामे योजना अंतर्गत प्र.क्र. ७ मध्ये रमापतीनगर ते गवळी वाडा पावेतो रस्ता कॉक्रीटीकरण करणे व गटार करणे कामाचे निविदा दर मागविण्यांत आलेत, त्याबाबत आलेल्या कार्यालयीन अहवालावर विचार करणे.

म. नगरसचिव — नगरसचिव यांनी विषयांचे वाचन केले.

म. सुनिल बैसाणे — विषय मंजूर करण्यांत यावा.

म. बन्सीलाल जाधव — विषय मंजूर करण्यांत यावा.

म.सभापती — सर्व सन्मा.सदस्यांच्या सहमतीने व कार्यालयीन अहवालास अधिन राहून सदर प्रस्तावास मान्यता देण्यांत येत आहे.

**धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर १२४दिनांक २६/०८/२०२१**

विकास कामे योजना अंतर्गत प्र.क्र.७ मध्ये रमापती नगर ते गवळी वाडा पावेतो रस्ता कॉक्रीटीकरण करणे व गटार करणे कामाबाबत धुळे महानगरपालिका मे.स्थायी समिती ठराव नं.१५२ दि.०१/०२/२०२१ मा.आयुक्त सो. धुळे महानगरपालिका यांनी टिपणी मंजुरीने दि.---------अन्वये उक्त कामाबाबत रक्कम रु.९५,२२,७९२/- मात्र खर्चाचा आर्थिक व प्रशासकीय मंजुरी देणेत आली आहे.

उक्त कामाबाबत शहर अभियंता मनपा धुळे यांचे पत्र क्र./११३९/२०२१ दि.२४/०२/२०२१ अन्वये रक्कम रु. ९५,२३,०५९/- मात्र खर्चास तांत्रिक मंजुरी मिळालेली आहे.

उक्त कामाबाबत धुळे महानगरपालिका जा.क्र./बा.वि./२६८/२०२१ दि. ३१/०३/२०२० अन्वये दि.३१/०३/२०२० रोजी दै.देशदूत/समाज सारथी या वृत्तपत्रात जाहीर निविदा प्रसिद्ध करणेत येऊन दि.२२/०४/२०२१ रोजी निविदा दर मागविण्यात आले आहेत. पात्र कंत्राटदार यांनी निविदेबाबत ऑनलाईन पद्धतीने बयाणा रक्कम भरून निविदा दर सादर केलेले आहेत.

| अ.क्र. | कंत्राटदार किंवा ठेकेदाराचे नाव | दिलेले निविदा दर | शेरा |
|---|---|---|---|
| १ | मे.स्वामी समर्थ कन्सट्रक्शन | शे.३.००% जास्तीने | |
| २ | श्री.आशिष एम.पटवारी | शे.२.००% जास्तीने | |
| ३ | मे.हिंद कन्सट्रक्शन | **अंदाजपत्रक दर** | **सर्वात कमी दर** |

वरील प्रमाणे निविदेत भाग घेतलेले ठेकेदार पात्र असून श्री/**मे.हिंद कन्सट्रक्शन** यांनी दिलेले दर अंदाजपत्रकीय दर असून त्यांनी नियमा प्रमाणे ऑनलाईन बयाणा रक्कम भरलेली आहे. **मे.हिंद कन्सट्रक्शन** यांना मा.आयुक्त सो.यांचे आदेशानुसार **मे.हिंद कन्सट्रक्शन** यांना दि.३१/०५/२०२१ रोजी माअभियंता सो. यांचे दालनात दरवाटाघाटी करीता बोलावले असता त्यांनी दि.१९/०७/२०२१ रोजी दिलेल्या पत्रात शे.२% कमी दराने काम करण्यास तयार असलेबाबत पत्र सादर केलेले आहे.त्यानुसार मा.आयुक्त सो.यांनी मान्यता दिलेली आहे. तरी **मे.हिंद कन्सट्रक्शन** यांचे शे.२% कमीचे दरास मे.स्थायी समिती पुढे ठेवणेस मंजुरीस्तव सादर झालेला आहे.

सर्व सन्मा.सदस्यांच्या सहमतीने व कार्यालयीन अहवालास अधिन राहून सदर कामी **मे.हिंद कन्सट्रक्शन** यांचे यांचे निगोसिएशन अंती आलेले शे.२%कमीचे दरास महाराष्ट्र महानगरपालिका

अधिनियम ७३ नुसार मान्यता देण्यांत येत आहे. सदर प्रस्ताव व कार्यवाहीबाबत लेखा आक्षेप निर्माण होणार नाही याची दक्षता घ्यावी.याबाबतची जबाबदारी संबंधित विभागाची राहील.

सुचक :- श्री.सुनिल तुळशीराम बैसाणे, सदस्य मनपा धुळे
अनुमोदक:- श्री.बन्सीलाल माणिक जाधव , सदस्य, मनपा धुळे

**सर्वानुमते मंजुर,**
**सही/-x x x**
**सभापती,**
**स्थायी समिती,**
**धुळे महानगरपालिका धुळे**

विषय क्रमांक :- ११६ — नागरी दलित्तेतर वस्ती सुधार योजना अंतर्गत प्र.क्र.९ मध्ये सर्व्हे नं.३६ व सर्व्हे नं.३४/१ येथे सभागृह बांधणेचे निविदा दर मागविण्यांत आलेत, त्याबाबत आलेल्या कार्यालयीन अहवालावर विचार करणे.

म. नगरसचिव — नगरसचिव यांनी विषयांचे वाचन केले.

म. भारती माळी — विषय मंजूर करण्यांत यावा.

म. वैशाली वराडे — विषय मंजूर करण्यांत यावा.

म.सभापती — सर्व सन्मा.सदस्यांच्या सहमतीने व कार्यालयीन अहवालास अधिन राहून सदर प्रस्तावास मान्यता देण्यांत येत आहे.

**धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर १२५दिनांक २६/०८/२०२१**

नागरी दलित्तेतर वस्ती सुधार योजना अंतर्गत प्र.क्र.९ मध्ये सर्व्हे नं.३६ व सर्व्हे नं.३४/१ येथे सभागृह बांधणे बाबतच्या कामास धुळे मा.जिल्हाधिकारी सो.यांचा दि.३०/०३/२०२१ रोजीचा प्रशासकीय मान्यता आदेश मा.आयुक्त सो. धुळे महानगरपालिका यांनी टिपणी मंजुरीने दि.३०/०३/२०२१ अन्वये उक्त कामाच्या खर्चास रक्कम **रु.९३,००,०८८/-** मात्र रकमेस आर्थिक व प्रशासकीय मान्यता दिलेली आहे.

उक्त कामाबाबत शहर अभियंता मनपा धुळे यांचे पत्र क्र./१२६९/२०२१ दि. १२/०३/२०२१अन्वये रक्कम रु.९५,४५,८६२/-मात्र खर्चास तांत्रिक मंजुरी मिळालेली आहे.

उक्त कामाबाबत धुळे महानगरपालिका जा.क्र./बा.वि./३९/२०२१ दि. १७/०५/२०२१ अन्वये दि.१७/०५/२०२१ रोजी दै.दिव्य मराठी/मर्डर या वृत्तपत्रात जाहीर निविदा प्रसिद्ध करणेत येऊन दि.०८/०६/२०२१ पावेतो निविदा दर मागविण्यात आले आहेत. पात्र कंत्राटदार यांनी निविदेबाबत ऑनलाईन पद्धतीने बयाणा रक्कम भरून निविदा दर सादर केलेले आहेत.

| अ.क्र. | कंत्राटदार किंवा ठेकेदाराचे नाव | दिलेले निविदा दर | शेरा |
|---|---|---|---|
| १ | मे.श्रीस्वामी समर्थ कन्सट्रक्शन | शे.५.००% जास्तीने | |
| २ | मे.श्रीराम कन्सट्रक्शन | **अंदाजपत्रक दर** | **सर्वात कमी दर** |
| ३ | अे.के.सैफी | शे.१.००% जास्तीने | |
| ४ | सुकन्या सुरेश चौधरी | शे.२.००% जास्तीने | |
| ५ | श्री.अक्षय धनराज माखिजा | अंदाजपत्रक दर | सर्वात कमी दर |
| ६ | मे.हिंद कन्सट्रक्शन | शे.३.००% जास्तीने | |

वरील प्रमाणे निविदेत भाग घेतलेले ठेकेदार पात्र असून श्री/**मे.श्रीराम कन्सट्रक्शन व श्री.अक्षय धनराज माखिजा** यांनी दिलेले दर अंदाजपत्रकीय दर असून त्यांनी नियमा प्रमाणे ऑनलाईन बयाणा रक्कम भरलेली आहे.सबब कंत्राटदार श्री / **मे.श्रीराम कन्सट्रक्शन व श्री.अक्षय धनराज माखिजा** यांची अंदाजपत्रकीय दराने आलेले निविदा सादर आहे.तसेच अन्य काम न मिळालेले ठेकेदारांना त्यांची बयाणा रक्कम परत करणे बाबत सादर तथापि श्री/ **मे. श्रीराम कन्सट्रक्शन व श्री.अक्षय धनराज माखिजा** या दोन्ही ठेकेदारांना दि.२८/०७/२०२१ रोजी दर वाटाघाटी करीता बोलावले असता **श्री.अक्षय धनराज माखिजा** यांनी दि.२९/०७/२०२१ रोजी दिलेल्या पत्रात अंदाजपत्रकीय दराने (निविदेत भरलेल्या दराने) काम करणे बाबत नमूद केलेले आहे.

**मे.श्रीराम कन्सट्रक्शन** यांनी दि.२९/०७/२०२१ रोजी दिलेल्या पत्रात श.१% कमी दराने काम करणेस तयारी दर्शविलेली आहे.त्यानुसार मा.आयुक्त सो.यांनी मान्यता दिलेली आहे. तरी **मे.श्रीराम कन्सट्रक्शन** यांचे श.१% कमीचे दरास मे.स्थायी समिती पुढे ठेवणेस मंजुरीस्तव सादर झालेला आहे.

सर्व सन्मा.सदस्यांच्या सहमतीने व कार्यालयीन अहवालास अधिन राहून सदर कामी **मे.श्रीराम कन्सट्रक्शन** यांचे निगोसिएशन अंती आलेले श.१% कमीचे दरास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ७३ नुसार मान्यता देण्यांत येत आहे. सदर सामाजिक भुवनाचा सार्वजनिक वापर होणार आहे.सदर ठिकाणी जुने सार्वजनिक स्वच्छतागृह असल्याने परिसरात अस्वच्छता आहे. त्यामुळे सदरचे जुने शौचालय काढून अनयत्र जागेवर बांधण्यांत यावे. सदर प्रस्ताव व कार्यवाही बाबत लेखा आक्षेप निर्माण होणार नाही याची दक्षता घ्यावी.याबाबतची जबाबदारी संबंधित विभागाची राहील.

सुचक :- श्रीमती भारती अशोक माळी, सदस्या, मनपा धुळे
अनुमोदक:- श्रीमती वैशाली भिकन वराडे , सदस्या, मनपा धुळे

**सर्वानुमते मंजुर,**
**सही/-x x x**
**सभापती,**
**स्थायी समिती,**
**धुळे महानगरपालिका धुळे**

# धुळे महानगरपालिका,धुळे
## नगरसचिव कार्यालय
## स्थायी समिती सभा क्रमांक १८ चे इतिवृत्त

---

**धुळे मनपा भारतरत्न अटलबिहारी वाजपेयी सभागृह**
**मंगळवार दिनांक ०७/०९/२०२१**
**वेळ सकाळी ११-०० वाजता.**

धुळे महानगरपालिका स्थायी समितीची आज मंगळवार दिनांक ०७/०९/२०२१ रोजी सकाळी ११-०० वाजता **धुळे मनपा भारतरत्न अटलबिहारी वाजपेयी सभागृह आयोजित करण्यांत आली.** सदर सभेस स्वाक्षरी बुकावर सही करुन खालील सन्मा.सदस्य सभागृहात हजर होते.

| अ.क्रं. | सदस्यांचे नांव | हुद्दा |
|---|---|---|
| १ | श्री. वैसाणे सुनिल तुळशिराम | हंगामी सभापती |
| २ | श्रीमती माळी भारती अशोक | सदस्या |
| ३ | श्रीमती पाटील मंगला सुरेश | सदस्या |
| ४ | श्रीमती बोरसे पुष्पा प्रकाश | सदस्या |
| ५ | श्री. मासुळे अमोल पावबा | सदस्य |
| ६ | श्री. देवरे कमलेश नारायण | सदस्य |
| ७ | श्रीमती पठाण हिना अस्लम | सदस्या |
| ८ | श्री. सईद बेग आशम बेग | सदस्य |
| ९ | श्री. नवले शितल मोहन | सदस्य |
| १० | श्री. बोरसे नागसेन दामोदर | सदस्य |
| ११ | श्रीमती कुलेवार किरण राकेश | सदस्या |
| १२ | श्री.जाधव बन्सीलाल माणिक | सदस्या |
| १३ | श्रीमती चौधरी मंगला अर्जुन | सदस्य |
| १४ | श्री. पटेल अमीन अब्दुल करीम | सदस्य |

उपस्थित अधिकारी गण

| अ.क्र. | अधिकाऱ्यांचे नाव | हुद्दा |
|---|---|---|
| १ | श्री. नितीन कापडणीस | अति.आयुक्त |
| २ | श्री. गणेश गिरी | उपायुक्त |
| ३ | श्री. विनायक कोते | सहा.आयुक्त |
| ४ | श्री. तुषार नेरकर | सहा.आयुक्त |
| ५ | श्री. एन.पी. सोनार | इस्टेट मॅनेजर |
| ६ | श्री. महेंद्र परदेशी | नगररचनाकार |
| ७ | श्री मनोज अरविंद वाघ | प्र.नगरसचिव |
| ८ | श्री. पी.डी. चव्हाण | प्र.अभियंता |
| ९ | डॉ. श्री महेश मोरे | आरोग्याधिकारी |
| १० | श्री. चंद्रकांत जाधव | सहा.आरोग्याधिकारी |

| | | |
|---|---|---|
| ११ | श्री. लक्ष्मण पाटील | सहा.आरोग्याधिकारी |
| १२ | श्री. बी.एस. रनाळकर | प्र.मुख्य लेखाधिकारी तथा सहा. कर मूल्य निधारण अधिकारी |
| १३ | श्री. एन.के. बागुल | विद्युत अभियंता |
| १४ | श्री. सी.एम. उगले | ओव्हरसिअर पा.पु. विभाग |
| १५ | श्री. हेमत पावटे | ओव्हरसिअर बांधकाम विभाग |
| १६ | श्री. चंद्रकांत मोरे | लेखापाल |
| १७ | श्री. किशोर सुडके | बाजार विभाग |
| १८ | श्री. प्रसाद जाधव | अति. विभाग |
| १९ | श्री. सुक्राम आत्या राऊत | वाहन विभाग |
| २० | श्री. विशाल निंबाळकर | लिपीक ले. परीक्षण विभाग |

म. नगरसचिव — आजच्या बैठकीस विद्यमान सभापती श्री.संजय सुधाकर जाधव हे प्रकृती अस्वास्थामुळे बैठकीस अनुपस्थित आहेत.याबाबत त्यांनी रजेचा अर्ज सादर केलेला आहे.विद्यमान सभापतीच्या अनुपस्थितीमुळे त्यांच्या जागी उपस्थित सदस्यांमधून एका सदस्यांची हंगामी सभापती म्हणून नियुक्ती करता येईल यासाठी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम प्रकरण 2 नियम 3 ई नुसारउपस्थित सदस्यांमार्फत आजच्या बैठकीसाठी सभापती म्हणून निवड करण्यांत यावी.

म. नगरसचिव — वरील विषयान्वये आज रोजीच्या स्थायी समितीच्या सभेस मा.विद्यमान सभापती हे अनुपस्थित असल्याने महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम प्रकरण 2 नियम 3 ई नुसार आजच्या स्थायी समिती बैठकीसाठी स्थायी समिती सदस्य श्री. नागसेन दामोदर बोरसे यांची हंगामी सभापती म्हणून नियुक्ती करण्यांत यावी असे पत्र श्रीमती.वैशाली भिकन वराडे, श्री. सुनिल तुळशीराम बैसाणे, श्रीमती मंगला सुरेश पाटील, श्री.शितलकुमार नवले, सौ.भारतीताई माळी, श्री.अमोल मासुळे, श्री.नागसेन बोरसे यांनी सादर केलेले आहे. त्यानुसार आजच्या बैठकीचे कामकाज करण्यासाठी श्री. नागसेन दामोदर बोरसे यांनी सभापती पदी विराजमान व्हावे.

म. हंगामी सभापती — सर्वांनी माझ्यावर विश्वास ठेवून आजच्या बैठकीसाठी सभापती म्हणून माझी निवड केली याबद्दल मी प्रथमत:सर्वांचे आभार व्यक्त करतो.सभेचे कामकाज चालविणेसाठी आवश्यक तो कोरम पूर्ण झालेला असल्याने नगरसचिव यांनी सभेच्या कामकाजास सुरुवात करावी.

म. नगरसचिव — वंदे मातरम् या राष्ट्रवंदनेसाठी सर्वांनी उभे रहावे.

**सन्मा. सदस्यांकडून आलेले रजेचे अर्ज**

सन्मा.सभापती श्री. संजय सुधाकर जाधव यांनी आजच्या सभेस अर्जात नमूद केलेल्या कारणामुळे उपस्थित राहू शकत नसल्याने रजा मंजूर करणेबाबत विनंती केली आहे.

म. हंगामी सभापती — सन्मा.सदस्यांच्या आलेल्या विनंती अर्जावरुन रजा मंजूर करण्यांत येत आहे.

**धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर १२६ दिनाक ७/९/२०२१**

सन्मा. श्री. संजय सुधाकर जाधव सभापती यांनी आजच्या सभेस अर्जात नमूद केलेल्या कारणामुळे उपस्थित राहू शकत नसल्याने रजा मंजूर करणेबाबत विनंती केली आहे.

सन्मा.सदस्यांच्या आलेल्या विनंती अर्जावरुन आजच्या सभेस रजा मंजूर करण्यांत येत आहे.

**सर्वानुमते मंजुर,**
**सही/-x x x**
**हंगामी सभापती,**
**स्थायी समिती,**
**धुळे महानगरपालिका,धुळे**

विषय क्रमांक:-११७ — मागील स्थायी समिती सभेचे इतिवृत्त वाचून कायम करणे.( ५/८/२०२१)

म. नगरसचिव — नगरसचिव यांनी विषयांचे वाचन केले.

म. सुनिल बैसाणे — मागील बैठकीत विषय क्र. १०१ शहराच्या पाणीपुरवठयाची नियोजन करण्यासाठी पी.एम.सी नेमणे बाबत विषय आलेला होता. सदर पी.एम.सी. नेमणेचे प्रयोजन काय त्यामुळे शहरास व

महानगरपालिकेस काय फायदा होणार आहे याबाबत मी प्रशासनाला प्रश्न केलेले होते त्यानुसार शहर अभियंता श्री. शिंदे यांनी शहर पाणीपुरवठयातील सद्यस्थितीत असणारे दोष निवारण करुन त्यावर कायमस्वरुपी कार्यवाही करण्याच्या दृष्टीने पी.एम.सी नेमण्यात येत असल्याचा खुलासा करण्यात आलेला होता सदर पी.एम.सी साठी आपण संबंधितांना महिन्याला ९ लाख रुपये व वर्षाकाठी १ कोटी रुपये साधारण देणार आहोत. त्यांच्या माध्यमातुन धुळेकर नागरीकांना काय फायदा होणार आहे. सदर एजन्सीने आजतागायत कोणत्या ठिकाणी व महानगरपालिकेत काम केलेले आहे त्यांना कामाचा अनुभव आहे काय तसेच त्यांच्याकडे मनुष्यबळ किती आहे व सदर एजन्सीने आपल्या कामाचे प्रेजेनटेशन देणे बाबत मागच्या स्थायी समितीमध्ये चर्चा झाली होती हे सर्व इतीवृत्त झालेले आहे परंतु त्याबाबतचे प्रात्याक्षिक झालेले नाही त्यांनी कोणत्या महानगरपालिकेत काम केलेले आहे व धुळे शहरात कशा पध्दतीने करणार आहेत याची माहिती होणे गरजेचे आहे. मला असे कळले आहे की सदर एजन्सी शहरात काम करण्यास इच्छुक नाही. याबाबत अंदाजपत्रकात तरतुद करणे प्रथम गरजेचे आहे. तो जर काम करीत नसेल तर यावर पुर्नविचार होणे गरजेचे आहे.

म. शितल नवले — सदर विषयाबाबत मी पुर्वीपासुन आग्रही होतो देशमुख साहेब आयुक्त असतांना मी पाणी पुरवठयाच्या नियोजनाबाबत त्यांच्याशी चर्चा करुन लेखी अहवाल सादर केलेला होता. सद्यस्थितीत ५ ते ६ दिवसाआड पाणी येते परंतु पाण्याची उपलब्धता पाहता २-३ दिवसाआड पाणीपुरवठा झाला पाहिजे हा माझा उद्देश होता त्यासाठी पी.एम.सी नियुक्त करणे गरजेचे होते त्याप्रमाणे निविदा प्रक्रिया तयार करणे व निविदा मागविणे या कार्यवाहीसाठी सुमारे दिड ते दोन वर्षाचा कालावधी लागलेला आहे मी याबाबत कालच माहिती घेतली सदर एजन्सीने आपल्याला मेलव्दारे कळविलेले आहे की आम्हांला विहित मुदतीत कार्यादेश दिलेला नाही. कोणत्याही निविदेची मुदत १२० दिवस असते १२० दिवसानंतर त्याने काम करावे किंवा नाही हे ठरवयाचे अधिकार संबंधित ठेकेदाराकडे जातात आपल्याला रोज पाणी मिळेल अशी आपली अजुनही मानसिकता नाही आपली धुळेकर जनता सहनशील आहे २ वर्ष हीच परिस्थिती राहीली तरी काही फरक पडणार नाही.

मा. सभापती — याबाबत संबंधित पा.पु. अभियंता श्री. उगले यांनी खुलासा करावा.

म.सी.एम. उगले — मागील स्थायी समितीच्या बैठकीत पी.एम.सी. नेमण्याबाबत ठराव झालेला होता. त्या ठरावानुसार आम्ही संबंधित ठेकेदार पाचुरकर यांना दि.३/८/२०२१रोजी करारनामा करण्याबाबत पत्र दिलेले होते. परंतु शितलभाऊंनी सांगितल्याप्रमाणे अद्यापपावेतो तसा मेल आमच्या कार्यालयापावेतो आलेला नाही.

मा. हंगामी सभापती — यामध्ये जर संबंधित ठेकेदार काम करण्यास इच्छुक नसेल तर सेकंड लोऐस्ट ठेकेदार यांना नियमाप्रमाणे विचारणा करण्यात यावी व त्यानुसार पुढील कायदेशीर कार्यवाही करावी. इतिवृत्त वाचुन कायम येत आहे.

**धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर १२७ दिनांक ०७/०९/२०२१**

मागील स्थायी समिती सभा दिनांक ५/८/२०२१ च्या सभेतील ठराव नंबर १०५ ते ११६ तसेच सन्मा.सदस्यांनी उपस्थित केलेली चर्चा व त्यावरील निर्णय क्रमश: वाचून कायम करण्यांत येत आहे.

**सही/-X X X**

**सभापती,**

**स्थायी समिती,**

**धुळे महानगरपालिका,धुळे**

विषय क्रमांक:- ११८ — मा.आयुक्त सो. यांना असलेल्या अधिकारानुसार रु.५ लाख ते२५ लाखापर्यंत कार्यादेश दिलेले कार्यादेश (बांधकाम विभागाकडील) कामांची यादी अवलोकनार्थ सादर
(दि.२५/६/२०२१ ते दि.३/८/२०२१)

म. नगरसचिव — नगरसचिव यांनी विषयांचे वाचन केले.

म.अमोल मासुळे कामाच्या यादीचे अवलोकन करण्यांत आले आहे.

म.हंगामी सभापती — मा. आयुक्त सो. यांना असलेल्या अधिकारानुसार रु. ५ ते २५ लाखपर्यतचे दिलेले कार्यादेशाचे अवलोकन करण्यांत आले. दि. २५/६/२०२१ ते ३/८/२०२१ अखेर .

**धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर १२८ दिनांक ०७/०९/२०२१**

मा.आयुक्त सो. यांना असलेल्या अधिकारानुसार रु.५ लाख ते २५ लाखापर्यंत कार्यादेश दिलेले कार्यादेश (बांधकाम विभागाकडील) कामांची यादी अवलोकनार्थ सादर
(दि. २५/६/२०२१ ते दि./ ३/८/२०२१)

| अ.क्र | कार्यादेश क्रमांक | दिनांक | कामाचे नाव | रक्कम | निधी |
|---|---|---|---|---|---|
| १ | २०४ | २५/०६/२०२१ | वलवाडी सर्व्हे नं.३०/१-३ बोरसे नगर येथील मोकळ्या जागेवर संरक्षण भिंत बांधणे. | १९,९७,४३४/- | जिल्हा वार्षिक योजना अंतर्गत |
| २ | २०५ | २५/०६/२०२१ | वलवाडी सर्व्हे नं.३०/१-१ नेताजी सुभाषचंद्र बोस कॉलनी येथील मोकळ्या जागेवर संरक्षण भिंत बांधणे. | १४,९९,३७३/- | जिल्हा वार्षिक योजना अंतर्गत |
| ३ | २०९ | ०२/०७/२०२१ | प्र.क्र.१० मध्ये वरखेडी मरिमाता मंदिर ते सबस्टेशन पर्यंत HDPE पाईपलाईन टाकणे. | १३,१७,८६९/- | मनपा निधी अंतर्गत (हद्दवाढ पा. पु. वरखेडी ) |
| ४ | २१० | ०२/०७/२०२१ | प्र.क्र.१० मध्ये वरखेडी आदिवासी बस्तीत श्री.भरत अहिरे ते श्री.दादाभाऊ अहिरे यांचे घरापर्यंत पेव्हिंग ब्लॉक बसविणे. | ६,९६,४०३/- | मनपा निधी अंतर्गत (नगरसेवक निधी) |
| ५ | २११ | ०२/०७/२०२१ | प्र.क्र. ५ मध्ये प्रमोद नगर सेक्टर नं.३ भागात श्री.सोनवणे ते श्री.गोविंद मगर यांच्या घरापर्यंत रस्ता काँक्रीट करणे. | ९,९४,१८७/- | मनपा निधी अंतर्गत (नगरसेवक निधी) |
| ६ | २१२ | ०२/०७/२०२१ | प्र.क्र. ५ मध्ये शिवप्रताप कॉलनी भागात कंपाऊंड वॉल बांधणे. | ७,७७,२७१/- | मनपा निधी अंतर्गत (नगरसेवक निधी) |
| ७ | २१८ | ०७/०७/२०२१ | प्र.क्र.४ मध्ये गीता नगर भागातील स.नं.२०१२ मधील खुल्या जागेत पेव्हिंग ब्लॉक बसविणे. | १९,९९,५७१/- | मनपा निधी अंतर्गत (सन २०२०२१ ची विकास कामे) |
| ८ | २१९ | ०७/०७/२०२१ | प्र.क्र.१७ मध्ये विखेनगर येथे भरत महाजन घर ते ललित देशमुख घर ते तुळसाबाई मळा राजेंद्र सरगर घर ते महेश पवार यांचे घरापावेतो रस्ता काँक्रीट करणे. | १९,९८,४६५/- | मनपा निधी अंतर्गत (नगरसेवक निधी) |
| ९ | २२२ | १५/०७/२०२१ | जिल्हा वार्षिक योजने अंतर्गत सर्व्हे नं.४८९ मिरच्या मारोती मराठा पंच मंडळाच्या मोकळ्या जागेवर संरक्षण भिंत बांधणे. | २४,९८,३३७/- | जिल्हा वार्षिक योजने २०२०-२१ अंतर्गत |
| १० | २२५ | १५/०७/२०२१ | जिल्हा वार्षिक योजने अंतर्गत सर्व्हे नं.५२६/५२७ मध्ये जिरेकर नगर मधील मोकळ्या जागेस संरक्षण भिंत बांधणे.. | २४,९९,१०७/- | जिल्हा वार्षिक योजना २०२०-२१ अंतर्गत |
| ११ | २२७ | १५/०७/२०२१ | अक्कलपाडा धरणातून धुळे शहरासाठी हनुमान टेकडी जलशुद्धीकरण केंद्रा पावेतो थेट पाईपलाईन टाकणे साठीच्या कामामध्ये कॅनाल्वर स्लॅब कल्व्हर्ट बांधणे बाबत. | १९,३८,७५७/- | अक्कलपाडा धरण योजने अंतर्गत |
| १२ | २२८ | १५/०७/२०२१ | प्र.क्र.१९ मध्ये रईस मंडप पासून ते हाकम्मी हॉल पर्यंत रस्ता काँक्रीट करणे. | ६,१५,५३२/- | सन २०२०-२१ नगरसेवक निधी अंतर्गत |
| १३ | २२९ | १५/०७/२०२१ | प्र.क्र.१९ मध्ये अविष्कार कॉलनी भागात रस्ते डांबरीकरण करणे | ९,९६,७६९/- | मनपा निधी अंतर्गत (नगरसेवक निधी) |
| १४ | २३१ | १५/०७/२०२१ | धुळे शहर मंजूर विकास योजनेतील आरक्षित भूखंड फायनल प्लॉट नं.१५३ या आरक्षित जागेवर खाजगी करणातून बी.ओ.एल.टी.या तत्वावर व्यापरी संकुल विकसित करणे करीता वास्तू विशारद तज्ञ प्रकल्प सल्लागार नेमणूक करणे. | अंदाजपत्रकीय रकमेच्या शे.१.२५% कमी | |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| १५ | २३५ | १५/०७/२०२१ | प्र.क्र.१७ मध्ये धुळे मनपा हद्दीतील सेवादास नगर भागात ओपनस्पेस सुशोभिकरण करणे बाबत. | ९,९५,१२७/- | मनपा निधी अंतर्गत |
| १६ | २३६ | १५/०७/२०२१ | प्र.क्र.६ मध्ये महिंदळे येथे हॉटेल कृष्णाई जवळ साक्री रोड ते हनुमान टेकडी पर्यंत रस्ता कॉंक्रीट करणे. | २४,५२,८४४/- | मनपा निधी अंतर्गत ( हनुमान टेकडी परिसर विकसित करणे) |
| १७ | २३७ | १५/०७/२०२१ | प्र.क्र.१ मध्ये गौतम नगर भागात बंदिस्त गटार करणे. | १२,९२,१४९/- | मनपा निधी अंतर्गत (नगरसेवक निधी) |
| १८ | २३८ | १५/०७/२०२१ | प्र.क्र.१ मध्ये वलवाडी भागातील परभणी वाडा येथे रस्ता कॉंक्रीट करणे. | ६,९९,९००/- | मनपा निधी अंतर्गत (नगरसेवक निधी) |
| १९ | २३९ | १५/०७/२०२१ | प्र.क्र.५ मध्ये भरत नगर भागातील खुल्या जागेत पेव्हिंग ब्लॉक बसविणे. | ९,४८,८५३/- | मनपा निधी अंतर्गत (नगरसेवक निधी) |
| २० | २४६ | १६/०७/२०२१ | प्र.क्र.११ मध्ये दाता सरकार भुवन ते नाल्यापर्यंत ड्रेनेज पाईपलाईन टाकणे. | ९,८५,७७१/- | मनपा निधी अंतर्गत (नगरसेवक निधी अंतर्गत ) |
| २१ | २४७ | २२/०७/२०२१ | प्र.क्र.६ मध्ये एकता नगर ,आधार नगर ,रामदास नगर,श्रीहरी कॉलनी,व अजिक्यतारा सोसा.भागात पाईपलाईन टाकणे. | २२,७८,५७१/- | हद्दवाढ गाव पाणी पुरवठा (वलवाडी) अंतर्गत |
| २२ | २४८ | २२/०७/२०२१ | प्र.क्र.६ मध्ये महिंदळे येथे डी.पी. रोडपासुन ते सुरज हौ.सो.अजिक्यतारा सोसा.पर्यंत रस्ता कॉंक्रीटीकरण करणे. | २४,७९,०८९/- | (मनपा निधी) सन २०२०-२१ ची विकास कामे |
| २३ | २४९ | २२/०७/२०२१ | प्र.क्र.६ मध्ये महिंदळे येथे इच्छापुर्ती कॉलनी, अनिरुध्द नगर,सुयोग सोसा.विविध ठिकाणी ४ इंच व ६ इंच पाईपलाईन टाकणे. | ९,३८,२१८/- | हद्दवाढ गाव पाणी पुरवठा |
| २४ | २५० | २२/०७/२०२१ | प्र.क्र.५ मध्ये स्वामी नगर भागातील खुल्या जागेत पेव्हिंग ब्लॉक बसविणे. | ६,१७,२७९/- | मनपा निधी अंतर्गत (नगरसेवक निधी अंतर्गत) |
| २५ | २५३ | २७/०७/२०२१ | प्र.क्र.३ मध्ये राजेश्वरी नगर भागात आग्रा रोड ते श्री.नितीन खिवसरा यांच्या घरापर्यंत रस्ता डांबरीकरण करणे. | २४,९४,००३/- | सन २०२०-२१ ची विकास कामे अंतर्गत |
| २६ | २५५ | २८/०७/२०२१ | प्र.क्र.६ मध्ये मोराणे येथे काळमदेव मंदिर ते हरी ओम नगर बोर्ड पर्यंत कॉंक्रीट गटार करणे. | ६,४१,०६७/- | मनपा निधी अंतर्गत (नगरसेवक निधी) |
| २७ | २५६ | २८/०७/२०२१ | प्र.क्र.६ मध्ये मौजे मोराणे प्र.ल.त.जि.धुळे येथे अमरधाम बैठक व्यवस्था करणेआदिवासीसाठी | ९,९५,६१८/- | आमदार स्थानिक विकास कार्यक्रम अंतर्गत |
| २८ | २५७ | २८/०७/२०२१ | प्र.क्र.६ मध्ये मोराणे येथे १)शिवाजी जाधव ते कैलास दौलत २)सुनील ठाकरे ते बंन्टी बोरसे ३)शिवाजी महाराज यांच्या स्मारका पासून ते पारधी वाडा पर्यंत विविध ठिकाणी पाईपलाईन टाकणे. | १५,८४,९५५/- | हद्दवाढ गाव पाणी पुरवठा अंतर्गत |
| २९ | २५८ | २८/०७/२०२१ | प्र.क्र.२ मध्ये वलवाडी शिवारातील मंगलमुर्ती सोसायटी भागात वागुलसर यांच्या घरापासुन ते हजारे कॉलनी पावेतो रस्ता कॉंक्रीट करणे. | २४,८२,५०३/- | नवीन हद्दवाढ क्षेत्रातील विकास निधी अंतर्गत |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ३० | २५९ | २८/०७/२०२१ | प्र.क्र.५ मध्ये तुळशीराम नगर भागात चैतन्य मोबाईल ॲण्ड गिफ्ट ते श्री.महाजन यांच्या घरापर्यंत रस्ता काँक्रीट करणे. | १७,४९,६८३/- | मनपा निधी अंतर्गत (नगरसेवक निधी अंतर्गत) |
| ३१ | २६० | २८/०७/२०२१ | प्र.क्र.३ मध्ये आग्रारोड लगत ग.नं.६ मध्ये कुरेशाबानो मोह.अफ्फान यांच्या घरापासून ते मुख्तार अन्सारी यांच्या घरापर्यंत रस्ता काँक्रीटीकरण करणे. | ७,९९,२५७/- | आमदार स्थानिक विकास कार्यक्रम सन २०२०-२१ |
| ३२ | २६३ | २९/०७/२०२१ | प्र.क्र.१७ मध्ये धुळे मनपा हद्दीतील तुळसाबाई चा मळा भागात ड्रेनेज लाईन टाकणे. | २४,९०,७२७/- | प्री.बजेट अंतर्गत |

उक्त यादीचे वाचन करुन सभागृहास माहिती देण्यांत आली.

**सही/-X X X**
**हंगामी सभापती,**
**स्थायी समिती,**
**धुळे महानगरपालिका धुळे**

विषय क्रमांक:- ११९ धुळे महानगरपालिका सामान्य प्रशासन विभागा कडील वाहन क्र. एम.एच.१८ एफ.१०३ वाहनांची दुरुस्ती खर्च ₹.२९,२०५/-मात्रच्या खर्चास कार्योत्तर मंजुरी देणेबाबत आलेल्या कार्यालयीन अहवालावर विचार करणे.

म. नगरसचिव नगरसचिव यांनी विषयांचे वाचन केले.

म.अमोल मासुळे सदर विषय मंजूर करण्यांत यावा.

म. हंगामी सभापती सर्व सन्मा.सदस्यांच्या सहमतीने व कार्यालयीन अहवालास अधिन राहून सदर प्रस्तावास कार्योत्तर मान्यता देण्यांत येत आहे.

**धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर १२९ दिनांक ०७/०९/२०२१**

धुळे महानगरपालिका सामान्य प्रशासन विभागाकडील सध्या कोविड-१९ अत्यावश्यक सेवेतील वाहन क्र. एम.एच.१८ एफ. १०३ टाटा सुमो वाहन हे रिपेरिंगसाठी अधिकृत वितरक उज्वल ॲटोमोटिव्ह प्रा.लि.धुळे यांचे कडेस दुरुस्तीसाठी लावण्यात आलेली आहे.परंतु सदर वाहनांत पुर्व मंजुर झालेल्या ४५७३२/- व्यतिरिक्त इतर दुरुस्ती कामे निघालेले आहे.असा अहवाल वाहन चालक मेकॅनिक व प्र.अतिक्रमण विभाग प्रमुख यांनी सादर अहवालानुसार जा.क्र.९९ दि.१७/०६/२०२१ मो. वाहन विभागाकडुन उज्वल ॲटोमोटिव्ह प्रा.लि धुळे अधिकृत वितरक यांना पत्र देऊन अभियंता मार्फत वाहनांची तपासणी करून त्यांचे अहवालानुसार वाहनात खालीलप्रमाणे दुरूस्ती कामे करावे लागतील वाहन हे कोविड-१९ अतिक्रमण विभागाकडेस कार्यरत असल्याने वाहनांची तातडीने दुरूस्ती करणे आवश्यक आहे. त्यानुसार दुरूस्ती कामाचे इस्टीमेट घेण्यात आले आहे.

सदर दुरूस्ती खर्चातील खर्च रुपये २९,२०५/-. नविन साहित्याची नोंद प्रमाणित केल्यानंतरच देयक अदा करण्यात येईल. सदर दुरुस्ती कामे ही पुर्व मान्यतेसाठीच ठेवण्यात आले आहे. म.न.पा. मेकॅनिक यांनी तांत्रिक अहवाल दिलेला आहे. दुरूस्ती कामाचे दर बाजार भावाप्रमाणे योग्य आहेत असे मेकॅनिक यांनी तपासले आहे.

त्यानुसार सदर दुरूस्ती ही शासकीय खरेदी कार्यपध्दती शासन निर्णय १ डिंसेबर २०१६ नियम ३.२.२ मधील परिच्छेद २ व नियम ४.३ मधील तरतुदी नुसार ₹.५०,०००/- पर्यंतची थेट खरेदी अधिकृत वितरक यांच्याकडुन करता येईल.अशी तरतुद आहे.

**सन २०२१-२२ या चालु आर्थीक वर्षात खर्च ५२,१३२/- झालेला आहे.**व या दुरुस्ती खर्च ₹.२९,२०५ असे एकुण चालु आर्थिक वर्षात ₹.८१३३७/- मात्र खर्च होत आहे.त्यामुळे सदरील वाहनांवर आर्थिक वर्ष मर्यादा ओलांडत असल्याने व वाहनांस १५ वर्ष आयुष्यामान झालेला असल्याने वाहनांची नोंदणी नुतनीकरण प्रादेशिक परिवहन कार्यालयाकडुन करावयाचे असल्याने सदरील दुरुस्ती कामे करणे आवश्यकआहे ,त्यामुळे सदरील दुरुस्ती ही विना निविदा करावयाचे असल्याने मनपा

अधिनियम ७३ (क) नुसार म.आयुक्त सो. यांची मंजुरीसाठी आहे. त्यानंतर मे.स्थायी समिती कडेस मान्यतेसाठी ठेवणेस नस्ती प्रस्तावित आहे.

चालु आर्थीक वर्ष २०२१-२२ या वर्षात सामान्य प्रशासन विभागाकडील वाहन दूरूस्ती अंदाजपत्रकीय तरतुद येणेप्रमाणे १) ₹.१०,०००००/- २) पुर्वीचा खर्च-₹.२५,४४५/- ३) हया बिलातील खर्च-₹.२९,२०५/- ४) २ व ३ ची बेरीज ₹.५४,६५०/- उपलब्ध शिल्लक-₹.९,४५,३५०/- येणेप्रमाणे आहे.

तरी सदर खर्च ₹.२९,२०५/- मात्रच्या खर्चास, प्रशासकीय व आर्थिक तसेच सदर खर्च आर्थिक मर्यादेपेक्षा जास्त असल्याने व टाटा अधिकृत वितरक यांचे कडून विना दरपत्रक दूरूस्ती करावयाची असल्याने मे.स्थायी समितीकडेस मान्यतेसाठी ठेवणेस मंजुरी दिली आहे त्यानुसार मे.स्थायीकडेस मंजुरीस्तव सादर झालेला आहे.

सर्व सन्मा. सदस्यांच्या सहमतीने व कार्यालयीन अहवालास अधिन राहून सदर वाहन दुरुस्तीचे कामी झालेला खर्च रुपये ₹.२९,२०५/- मात्रला मनपा अधिनियम ७३ (क) नुसार कार्योत्तर मान्यता देण्यांत येत आहे. सदर प्रस्ताव व कार्यवाही बाबत लेखा आक्षेप निर्माण होणार नाही याची दक्षता घ्यावी.याबाबतची जबाबदारी संबंधित विभागाची राहील.

सुचक :- श्रीमती भारती अशोक माळी
अनुमोदक:- श्री. अमोल पावबा मासुळे

**सर्वानुमते मंजुर,**
**सही/-X X X**
**हंगामी सभापती,**
**स्थायी समिती,**
**धुळे महानगरपालिका धुळे**

| | |
|---|---|
| विषय क्रमांक:- १२० | धुळे मनपा हद्दीतील वडजाई रोड१००फुटीरोड क्रॉसिंग,चाळीसगाव रोड काटेवाले जवळ, मास्टर कॉलनी रातराणी हॉटेल जवळ व स्लाटर हाउस जवळील मुख्य जलवाहिनी दुरुस्तीचे काम तांतडीने करुन घेण्यांत आले त्यासाठी झालेला खर्च रु. १,०५,६१९/- मात्र खर्चास कार्योत्तर मंजुरी देणेबाबत आलेल्या कार्यालयीन अहवालावर विचार करणे. |
| म. नगरसचिव | नगरसचिव यांनी विषयांचे वाचन केले. |
| म.अमीन पटेल | सदर विषय मंजूर करण्यांत यावा. |
| म.कमलेश देवरे | सदर विषय मंजूर करण्यांत यावा. |
| म. हंगामी सभापती | सर्व सन्मा.सदस्यांच्या सहमतीने व कार्यालयीन अहवालास अधिन राहून सदर प्रस्तावास कार्योत्तर मान्यता देण्यांत येत आहे. |

**धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर १३० दिनांक ०७/०९/२०२१**

धुळे मनपा हद्दीतील धुळे मनपा हद्दीतील 100 फुटी रोड वडजाईरोड, क्रॉसिंग, चाळीसगाव रस्त्यावरील काटेवाले जवळ 1500 मी.मी.व्यासाची पाईपलाईन गळती होत असल्याने तसेच मास्टर कॉलनी रातराणी हॉटेल जवळ व स्लाटर हाउस जवळील मुख्य जलवाहिनी दुरुस्ती स्लाटर हाउस जवळील व भोईवाडा वडजाई रोड वरील 8" पाईपलाईन गळती होत असल्याने पाणी वितरणात अडचणी येत असल्याने सदरचे काम तातडीने करणे आवश्यक काम करण्यात आलेले आहे. सदर कामास अंदाजपत्रकीय खर्च रु.1,05,619/- मात्र झालेला असून काम श्री.गौरव विजय बुरकुले यांच्याकडून करून घेण्यात आलेले आहे.

तरी उक्त काम हे विना निविदा श्री.गौरव विजय बुरकुले, ठेकेदार, धुळे यांचे कडून करून घेण्यात आलेले असून सदरचे काम मुंबई प्रांतिक अधिनियम नियम 67 (क) अन्वये विना निविदा करण्यास मंजुरीसाठी व अंदाजपत्रकीय खर्च रु. 1,05,619/- मात्र खर्चास कार्योत्तर मंजुरीस्तव मे. स्थायी समितीपुढे ठेवणेस मंजुरीस्तव सादर झालेला आहे.

सर्व सन्मा. सदस्यांच्या सहमतीने व कार्यालयीन अहवालास अधिन राहून सदर पाईप लाईन लिकेजेचे काम तांतडीने श्री.गौरव विजय बुरकुले, ठेकेदार, धुळे यांचे कडून करून घेण्यात आलेले

असून सदरचे काम मुंबई प्रांतिक अधिनियम नियम 67 (क) अन्वये विना निविदा अंदाजपत्रकसनुसार करुन घेण्यांत आले त्यासाठी झालेला खर्च रु. 1,05,619/- मात्रला कार्योत्तर मान्यता देण्यांत येत आहे. सदर प्रस्ताव व कार्यवाही बाबत लेखा आक्षेप निर्माण होणार नाही याची दक्षता घ्यावी.याबाबतची जबाबदारी संबंधित विभागाची राहील.

सुचक :- श्री. पटेल अमीन अब्दुल करीम

अनुमोदक:- श्री. देवरे कमलेश नारायण

**सर्वानुमते मंजुर,**
**सही/-X X X**
**हंगामी सभापती,**
**स्थायी समिती,**
**धुळे महानगरपालिका धुळे**

विषय क्रमांक:- १२१ मा. राज्यपाल महोदय, महाराष्ट्र राज्य यांचा दि.०४/०२/२०२१ रोजीचा धुळे महानगरपालिका येथे दौऱ्यांनिमित्त करण्यात आलेल्या व्हीडियो शुटिंगचे व फोटोग्रीफीची व्यवस्था करणेकामी झालेला खर्च रू.६८,०००/-जी.एस.टी.सह बिलास कार्योत्तर मंजुरी देणेबाबत आलेल्या कार्यालयीन अहवालावर विचार करणे.

म. नगरसचिव नगरसचिव यांनी विषयांचे वाचन केले.

म.पुष्पाताई बोरसे सदर विषय मंजूर करण्यांत यावा.

म. किरण कुलेवारसदर विषय मंजूर करण्यांत यावा.

म.हंगामी सभापती सर्व सन्मा.सदस्यांच्या सहमतीने व कार्यालयीन अहवालास अधिन राहून सदर प्रस्तावास कार्योत्तर मान्यता देण्यांत येत आहे.

**धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर १३१ दिनांक ०७/०९/२०२१**

मा.राज्यपाल महाराष्ट्र राज्य यांच्या हस्ते दि.४/०२/२०२१ रोजी धुळे महानगपालिका येथे कोरोना योध्दा याचा सत्कार कार्यक्रम आयोजित करण्यात आलेला होता.

कार्यालयीन आदेश धुमपा/आस्था/३५३५ दि.०२/०२/२०२१ रोजीच्या आदेशानुसार या कार्यक्रमा निमित्त व्हीडियो शुटिंग व फोटोग्राफ व्यवस्था करणे व इतर अनुषंगीक कामे करण्याकरीता आदेशीत करण्यात आले होते. मा.राज्यपाल महोदय, याचे या नियोजित कार्यक्रमासाठी करावयाच्या व्यवस्थेबाबत व नियोजना बाबत मा.महापौर सो., यांच्या दालनात झालेल्या बैठकित दिलेल्या सुचनानुसार व पोलिस विभाग यांनी जागा पाहणी करुन दिलेल्या सुचना प्रमाणे तसेच मा.राज्यपाल यांचे कार्यक्रमाच्या शिष्टाचारानुसार आवश्यक कामे व व्यवस्था करण्यात आली आहे.सदरचे काम शाम फोटोज स्टुडिओ यांनी पुर्ण केले आहे. सदरच्या कामी मक्तेदार यांनी नियोजना नुसार व कार्यालयीन सुचना प्रमाणे प्रमाणे कामे केलेली आहे.

वरील प्रमाणे व्यवस्था कामे करण्याकरीता शाम फोटोज स्टुडिओ यांनी एकत्रित कामाचे तपशिला नुसार रककम रू.६८,०००/- जी.एस.टी.सह बिल सादर केलेले आहे. वरील प्रमाणे मा.राज्यपाल यांचे दौऱ्यानिमित्त व त्यांच्या शिष्टाचाराच्या नियमाप्रमाणे काम योग्य रित्यापुर्ण करण्यात आलेली आहे.

मा.राज्यपाल महोदय,महाराष्ट्र राज्य यांचा दि.०४/०२/२०२१ रोजी नियोजित दौरा निश्चित झाल्याने व त्याबाबत दि.०२/०२/२०२१ रोजी दिलेल्या कार्यालयीन अदेशाप्रमाणे तातडीची बाब लक्षात घेता सदरचे काम विना निविदा करण्यात आलेले आहे. करीता वरील प्रमाणे कामा करीता व खर्चाकरीता महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम ५(२)(२) नुसार कार्योत्तर मंजुरीस्तव म.स्थायी समिती कडे मान्यतेस सादर झालेला आहे.

सर्व सन्मा.सदस्यांच्या सहमतीने व कार्यालयीनअहवालास अधिन राहून मा. राज्यपाल महोदय यांचे सत्कार समारंभ निमित्त व्हीडियो शुटिंग व फोटोग्राफ व्यवस्था करणेकामी झालेला खर्च रककम रू.६८,०००/-जी.एस.टी.सह खर्चास खर्चाकरीता महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम ५(२) (२)

नुसार कार्योत्तर मान्यता देण्यांत येत आहे. सदर प्रस्ताव व कार्यवाही बाबत लेखा आक्षेप निर्माण होणार नाही याची दक्षता घ्यावी.याबाबतची जबाबदारी संबंधित विभागाची राहील.

सुचक :- श्रीमती पुष्पाताई प्रकाश बोरसे

अनुमोदक:- श्रीमती किरण राकेश कुलेवार

**सर्वानुमते मंजुर,**
**सही/-X X X**
**हंगामी सभापती,**
**स्थायी समिती,**
**धुळे महानगरपालिका धुळे**

| | |
|---|---|
| विषय क्रमांक:- १२२ | धुळे मनपा आरोग्य विभाग अंतर्गत शहरात विविध प्रभागांमध्ये दैनंदीन रस्ते सफाई, गटार सफाई व इ.अनुषंगीक कामांकरीता मनुष्यबळ सेवा पुरविणे बाबत निविदा दर मागविण्यांत आलेत, त्याबाबत आलेल्या कार्यालयीन अहवालावर विचार करणे. |
| म. नगरसचिव | नगरसचिव यांनी विषयांचे वाचन केले. |
| म. सुनिल बैसाणे | याप्रस्तावात नेमके काय काय नमुद आहे याबाबत सभागृहास माहिती द्यावी. |
| श्री. लक्ष्मण पाटील | सदर निविदा १ वर्षासाठी असून कामाच्या व प्रत्येक प्रभागाच्या आवश्यकतेनुसार कर्मचारी नियुक्त करावयाचे आहे त्यासाठी निविदा काढण्यात आलेली होती यात साधारणत: २२३ कर्मचारी गृहित धरलेले आहे. तथापि दरवर्षी निविदा प्रसिध्द करण्यांस येणा-या प्रशासकीय व तांत्रिक अडचणी येत असतात.त्यामुळे निविदा कालावधी वाढविणे गरजेचे आहे. |
| मा. सभापती | सदर कर्मचा-यांच्या कामाचे स्वरुप काय राहिल. |
| श्री. लक्ष्मण पाटील | कायम कर्मचा-यांच्या रजेच्या कालावधीत संबंधित कर्मचारी काम करतील व प्रभागाच्या गरजेनुसार मनुष्यबळाची कमतरता असल्याने सदर कर्मचा-यांना त्या ठिकाणी काम देण्यात येईल. |
| म. सुनिल बैसाणे | सदर निविदा प्रक्रिया करण्याचा उद्देश काय आहे. शहराच्या सार्वजनिक स्वच्छतेसाठी किती कर्मचारी आवश्यक आहे. |
| मा. सभापती | सफाई कर्मचा-यांची १९८६ पासुन भरती झालेली नाही आता शहराचा विस्तार देखील वाढलेला आहे. आता किती कर्मचा-यांची आवश्यकता आहे. |
| श्री. लक्ष्मण पाटील | सद्यस्थितीत आपल्याकडे २२३ लोकांची आवश्यकता आहे आपल्याकडे कोविड-१९ तसेच विविध उद्याने जलकुंभ देखरेख व स्वच्छतेसाठी कर्मचारी आवश्यक असतात तसेच कायम सफाई कर्मचारी रजेवर असतात त्या जागेवर देखील सदर कर्मचारी काम करणार आहेत. |
| म. सभापती | सन्मा. सदस्यांनी मागणी केली तर आपण कर्मचारी देणार आहेत का. |
| श्री. लक्ष्मण पाटील | सद्यस्थितीत प्रभाग निहाय २२३ कर्मचारी दिलेले आहेत. |
| म. शितल नवले | यामध्ये पुरुष कर्मचारी आहेत का स्त्री कर्मचारी आहेत. |
| श्री. लक्ष्मण पाटील | यामध्ये महिला कर्मचारीपण आहेत ज्या भागात कर्मचारी कमी आहेत त्या भागात प्रभागाच्या आवश्यकतेनुसार कर्मचारी देण्यात येतील पेठ भागात जास्त कर्मचा-यांची आवश्यकता नाही. उर्वरीत प्रभागाचे क्षेत्रफळ मोठे आहे त्यानुसार कर्मचारी नियुक्त करावे लागतील. |
| मा. शितल नवले | माझ्या भागात सद्यस्थितीत किती कर्मचारी आहेत व त्यांच्याकडे कोणते काम सोपविलेले आहे याची माहिती मोबाईल क्रमांकासह मला उपलब्ध करुन देण्यात यावी. |
| मा. सभापती | संबंधित माहिती सन्मा.नगरसेवकांना देण्यात यावी. सर्व सन्मा. सदस्यांच्या सहमतीने व कार्यालयीन अहवालास अधिन राहून सदर प्रस्तावास मान्यता देण्यात येत आहे. |

**धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर १३२ दिनांक ०७/०९/२०२१**

धुळे मनपा आरोग्य विभागा अंतर्गत शहरात विविध प्रभागांमध्ये दैनंदीन रस्ते सफाई, गटार सफाई व इ. अनुषंगीक कामांकरीता मनुष्यबळ सेवा पुरविणे बाबत उक्त संदर्भिय ई-निविदा प्रसिध्द करण्यात आली होती.सदर निविदेत खालील संस्थांनी भाग घेवुन त्यांचा तांत्रीक लिफाफा उघडण्यातआला होता.

| अ.क्र. | संस्थेचेनांव |
|---|---|

| | |
|---|---|
| १ | आदर्श सर्व्हिसेस,नाशिक |
| २ | आस्थास्वयंरोजगार सेवा सह.संस्था धुळे |
| ३ | साई गणेश एंटरप्राईजेस |
| ४ | दिग्विजय एंटरप्राईजेस,नाशिक |
| ५ | श्री.अनंत एंटरप्राईजेस,विरार |

तरी उक्त ५ संस्थेपैकी अनंत एंटरप्राईजेस,विरार यांचे संस्था नोंदणी प्रमाणपत्र अपलोड करण्याचा अंतीम तारखेनंतर असल्याने व तसेच दिग्विजय एंटरप्राईजेस, नाशिक यांचेकडे निविदा कालावधीतील कार्यरत बँक सॉल्वंसी सादर केली नसल्याने सदरची बँक सॉल्वंसी मुदतबाह्य असल्यामुळे दोन्ही संस्था अपात्र करुन खालील ३ संस्थांचे दि.१४/७/२०२१ रोजी फायनान्सीयल बीड (दरपत्रक) ऑनलाईन उघडण्यात आले असता खालील प्रमाणेदर प्राप्त झाले आहेत.

| अ.क्र. | संस्थेचे नांव | प्रती कामगार प्रती दिवस दर |
|---|---|---|
| **L-१** | आस्था स्वयंरोजगार सेवा सह.संस्था धुळे | ५०७.१२ |
| **L-२** | साई गणेश एंटरप्राईजेस | ५५५ |
| **L-३** | आदर्श सर्व्हिसेस,नाशिक | ६१७ |

उक्त तीन संस्थेपैकी L-१ आस्था स्वयंरोजगार सेवासह.संस्था,धुळे यांचे सर्वात कमी दर प्रती कामगार प्रती दिवस रु.५०७.१२/- दर प्राप्त झाले आहे.

त्यानुसार आरोग्य विभागातील आवश्यक कामगारांची संख्या विचारात घेता एकुण कामगार २२३ x ५०७.१२ = १,१३,०८८ x २६= २९,४०,२८२/- रु. प्रतीमाह मासिक नुसार एका वर्षाकरीता ३,५२,८३,३८४/- ऐवढा खर्च अपेक्षीत आहे.

आस्था स्वयंरोजगार सेवा सह.संस्था यांचे सर्वात कमी प्राप्त झालेले दर प्रती कामगार प्रती दिवस प्रमाणे रु.५०७.१२/- या दरात मे.स्थायीसमितीच्या मंजुरीकरीता सादर करण्यास मा. आयुक्त सो. यांनी मान्यता दिलेली आहे. त्यानुसार सदरचा विषय मे.स्थायी समितीसमोर सादर झालेला आहे.

धुळे शहरातील सार्व आरोग्याख प्रश्न व सद्यस्थितीत शहराचा वाढता विस्तार लक्षांत घेताया कामी तांतडीने कार्यवाही करणे आवश्यक आहे. आरोग्य विभाग व धुळे मनपाचे दवाखाने व इतर ठिकाणी मनुष्यबळाची आवश्यकता असल्याने कार्यालयीन अहवालानुसार कामागार पुरविणेसाठी ठेका देणे क्रमप्राप्त आहे.

सर्व सनमा.सदस्यांच्या सहमतीने व कार्यालयीन अहवाल अधिन राहून सदर कामी आस्था स्वयंरोजगार सेवा सह.संस्था यांचे सर्वात कमी प्राप्त झालेले दर प्रती कामगार प्रती दिवस प्रमाणे रु.५०७.१२/-मात्र या दरास व होणा-या खर्चास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ७३नुसार मान्यता देण्यांत येत आहे. तसेच दरवर्षी निविदा प्रसिध्द करण्यांस येणा-या प्रशासकीय व तांत्रिक अडचणी येत असतात. त्यामुळे सदर ठेका 2 वर्ष मुदतीकरिता देण्यांस मान्यता देण्यांत येत आहे. सदर कामाच्या कालावधीत काम समाधानकारक असल्यास पुढे मुदतवाढ देण्याबाबत प्रस्ताव स्थायी समिती समोर सादर करावा. तसेच पहिल्या वर्षानंतर नियमाप्रमाणे व कामगार अधिकारी यांच्याकडील अभिप्रायानुसार नैसर्गिक दरवाढ देण्याबाबत प्रशासनाने उचित कार्यवाही करावी. तसेच प्रशासनाने सन्मा. नगरसेवक व शहरातील कामाच्या आवश्यकतेनुसार कामगार उपलब्धतेबाबत उचित कार्यवाही करावी. सदर प्रस्ताव व कार्यवाही बाबत लेखा आक्षेप निर्माण होणार नाही याची दक्षता घ्यावी. याबाबतची जबाबदारी संबंधित विभागाची राहील.

सुचक :- श्री.सुनिल तुळशिराम बैसाणे
अनुमोदक :- सौ.वैशाली भिकन वराडे

**सर्वानुमते मंजुर,**
**सही/-X X X**
**हंगामी सभापती,**
**स्थायी समिती,**
**धुळे महानगरपालिका धुळे**

विषय क्रमांक:- १२३ नगरोत्थान (जिल्हास्तरीय) योजना अंतर्गत नविन मनपा पासुन ते डॉ.बाबासाहेब आंबेडकर लायब्ररी भतवाल टॉकीज पर्यंत रस्ता डांबरीकरण करणेचे निविदा दर मागविण्यांत आलेत, त्याबाबत आलेल्या कार्यालयीन अहवालावर विचार करणे.

म. नगरसचिव नगरसचिव यांनी विषयांचे वाचन केले.

म. सुनिल बैसाणे सदर विषय मंजूर करण्यांत यावा.

म. शितल नवले सदर विषय मंजूर करण्यांत यावा.

म.हंगामी सभापती या प्रस्तावात थोडी दुरुस्ती आहे या प्रस्तावात सदर रस्ता नविन मनपा पासून ते डॉ.बाबासाहेब आंबेडकर लायब्ररी भतवाल टॉकीज पर्यंत दर्शविण्यात आलेला आहे तथापि नागरी दलित बस्ती योजनेअंतर्गत सावरकर पुतळा ते डॉ. बाबासाहेब आंबेडकर लायब्ररी पर्यंत रस्ता कॉंक्रीटकरणाचे काम घेण्यात आलेले आहे. तसेच सदर रस्त्याच्या असलेल्या अंदाजपत्रकीय खर्चात ऐवढया लांबीचा रस्ता होणार नाही त्यामुळे नवीन मनपा ते सावरकर पुतळया पावेतो रस्ता डांबरीकरणाचा प्रस्ताव घेण्यात यावा सर्व सन्मा.सदस्यांच्या सहमतीने व कार्यालयीन अहवालास अधिन राहून सदर प्रस्तावास मान्यता देण्यांत येत आहे.

**धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर १३३ दिनांक ०७/०९/२०२१**

नगरोत्थान (जिल्हास्तरीय) योजना अंतर्गत नविन मनपा पासून ते डॉ.बाबासाहेब आंबेडकर लायब्ररी भतवाल टॉकीज पर्यंत रस्ता डांबरीकरण करणे कामाबाबत धुळे महानगरपालिका मे.महासभा ठराव नं.९६ दि.३१/१२/२०१९ मा.जिल्हाधिकारी सो. धुळे महानगरपालिका यांनी टिपणी मंजुरीने दि.२६/०३/२०२१ अन्वये उक्त कामाबाबत रक्कम रु.६६,९४,१०२/- मात्र खर्चाचा आर्थिक व प्रशासकीय मंजुरी देणेत आली आहे.

उक्त कामाबाबत शहर अभियंता मनपा धुळे यांचे पत्र क्र./८९२ दि.०१/०१/२०२१ अन्वये रक्कम रु. ६६,९४,१०२/- मात्र खर्चास तांत्रिक मंजुरी मिळालेली आहे.

उक्त कामाबाबत धुळे महानगरपालिका जा.क्र./पा.पु.वि./ ११३/२०२१ दि. १२/०५/२०२१ अन्वये दि.१३/०५/२०२१ रोजी दै.नवभारत /आपले नवराज्य या वृत्तपत्रात जाहिर निविदा प्रसिद्ध करणेत येऊन दि.०७/०६/२०२१ अखेर निविदा दर मागविण्यात आले आहेत. पात्र कंत्राटदार यांनी निविदेबाबत ऑनलाईन पद्धतीने बयाणा रक्कम भरून निविदा दर सादर केलेले आहेत.

| अ.क्र. | कंत्राटदार किंवा ठेकेदाराचे नाव | दिलेले निविदा दर | शेरा |
|---|---|---|---|
| १ | मे.रामा कन्सट्रक्शन | शे.२% जास्तीने | |
| २ | श्री.आशुतोष अशोक पाटील | **शे.३.५४% कमीने** | **सर्वात कमी दर** |
| ३ | मे.श्रीस्वामी समर्थ कन्सट्रक्शन | शे.१० % जास्तीने | |

वरील प्रमाणे निविदेत भाग घेतलेले ठेकेदार पात्र असून मे/**श्री.आशुतोष अशोक पाटील** यांनी दिलेले दर शे.३.५४% कमीने असून त्यांनी नियमा प्रमाणे ऑन लाईन बयाणा रक्कम भरलेली आहे.सबब कंत्राटदार मे/**श्री.आशुतोष अशोक पाटील** यांची शे.३.५४% कमीने दराने आलेले निविदा दर मे.स्थायी समिती पुढे ठेवणेसाठी तसेच अन्य काम न मिळालेले ठेकेदारांना त्यांची बयाणा रक्कम परत करणे बाबत मंजुरीस्तव सादर झालेला आहे.

सर्व सन्मा.सदस्यांच्या सहमतीने व कार्यालयीन अहवालास अधिन राहून सदर कामी कंत्राटदार मे/**श्री.आशुतोष अशोक पाटील** यांचे शे.३.५४% कमीने दर सर्वात कमीने आले असल्याने महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ७३ नुसार मान्यता देण्यांत देण्यांत येत आहे. सदर प्रस्तावात दुरुस्ती करुन नवीन मनपा ते सावरकर पुतळया पावेतो रस्ता डांबरीकरणाचा प्रस्ताव

घेण्यात यावा सदर प्रस्ताव व कार्यवाही बाबत लेखा आक्षेप निर्माण होणार नाही याची दक्षता घ्यावी.याबाबतची जबाबदारी संबंधित विभागाची राहील.

सुचक :- श्री. सुनिल तुळशीराम बैसाणे
अनुमोदक:- श्री. शितल मोहन नवले

**सर्वानुमते मंजुर,**
**सही/-X X X**
**हंगामी सभापती,**
**स्थायी समिती,**
**धुळे महानगरपालिका धुळे**

विषय क्रमांक:- १२४ नगरोत्थान (जिल्हास्तरीय) योजना अंतर्गत वरखेडी उपनगर येथे अमरधाम विकसित करणे कामाबाबत करणेचे निविदा दर मागविण्यांत आलेत, त्याबाबत आलेल्या कार्यालयीन अहवालावर विचार करणे.

म. नगरसचिव नगरसचिव यांनी विषयाचे वाचन केले.

म.वैशाली वराडे विषय मंजूर करावा.

म. पुष्पाताई बोरसे विषय मंजूर करावा.

म. हं.सभापती सर्व सन्मा. सदस्यांच्या सहमतीने व कार्यालयीन अहवालास अधिन राहून सदर प्रस्तावास मान्यता देण्यांत येत आहे.

**धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर १३४ दिनांक ०७/०९/२०२१**

नगरोत्थान (जिल्हास्तरीय) योजना अंतर्गत वरखेडी उपनगर येथे अमरधाम विकसित करणे कामाबाबत धुळे महानगरपालिका मे.महासभा ठराव नं.९६ दि.३१/१२/२०१९ मा. जिल्हाधिकारी सो.धुळे महानगरपालिका यांनी टिपणी मंजुरीने दि.२६/०३/२०२१ अन्वये उक्त कामाबाबत रक्कम रु.६३,८३,५१४/- मात्र खर्चाचा आर्थिक व प्रशासकीय मंजुरी देणेत आली आहे.

उक्त कामाबाबत शहर अभियंता मनपा धुळे यांचे पत्र क्र./९६६ दि.११/०१/२०२१ अन्वये रक्कम रु. ६३,८३,५१४/- मात्र खर्चास तांत्रिक मंजुरी मिळालेली आहे.

उक्त कामाबाबत धुळे महानगरपालिका जा.क्र./बां.वि./६०/२० दि.०७/०६/२०२१ अन्वये रोजी पुण्यनगरी /सा.जनसंग्राम या वृत्तपत्रात जाहीर निविदा प्रसिद्ध करणेत येऊन दि.०९/०७/२०२१अखेर निविदा दर मागविण्यात आले आहेत. पात्र कंत्राटदार यांनी निविदे बाबत ऑनलाईन पद्धतीने बयाणा रक्कम भरून निविदा दर सादर केलेले आहेत.

| अ.क्र. | कंत्राटदार किंवा ठेकेदाराचे नाव | दिलेले निविदा दर | शेरा |
|---|---|---|---|
| १ | मे.समर्थ कन्सट्रक्शन | **शे.०.९९% कमीने** | **सर्वात कमी दर** |
| २ | मे.हिंद कन्सट्रक्शन | शे.२ % जास्तीने | |
| ३ | मे.राधेय कन्सट्रक्शन | शे.१ % जास्तीने | |

वरील प्रमाणे निविदेत भाग घेतलेले ठेकेदार पात्र असून **मे.समर्थ कन्सट्रक्शन** यांचे दर शे.०.९९% कमी आहे व त्यांनी नियमा प्रमाणे ऑनलाईन बयाणा रक्कम भरलेली आहे. सबब कंत्राटदार **मे.समर्थ कन्सट्रक्शन** यांची शे. शे.०.९९% कमीने दराने आलेले निविदा दर मंजुरीस्तव सादर तसेच अन्य काम न मिळालेले ठेकेदारांना त्यांची बयाणा रक्कम परत करणे बाबत मंजुरीस्तव सादर झालेला आहे.

सर्व सन्मा. सदस्यांच्या सहमतीने व कार्यालयीन अहवालास अधिन राहून सदर कामी **मे.समर्थ कन्सट्रक्शन** यांचे शे.०.९९%कमीने दराने आलेल्या निविदा दरास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ७३ अन्वये मान्यता देण्यांत येत आहे. सदर प्रस्ताव व कार्यवाही बाबत लेखा आक्षेप निर्माण होणार नाही याची दक्षता घ्यावी.याबाबतची जबाबदारी संबंधित विभागाची राहील.

सुचक :- श्रीमती वराडे वैशाली भिकन, सदस्या, मनपा धुळे

अनुमोदक:- श्रीमती बोरसे पुष्पाताई प्रकाश, सदस्या, मनपा धुळे **सर्वानुमते मंजुर,**

**सही/-X X X**

**हंगामी सभापती,**

**स्थायी समिती,**

**धुळे महानगरपालिका धुळे**

विषय क्रमांक:- १२५ नगरोत्थान (जिल्हास्तरीय) योजना अंतर्गत नकाणे अमरधाम विकसित करणेचे निविदा दर मागविण्यांत आलेत, त्याबाबत आलेल्या कार्यालयीन अहवालावर विचार करणे.

म. नगरसचिव नगरसचिव यांनी विषयांचे वाचन केले.

म. कमलेश देवरे सदर विषय मंजूर करण्यांत यावा.

म.भारतीताई माळी सदर विषय मंजूर करण्यांत यावा.

म.हंगामी सभापती सर्व सन्मा.सदस्यांच्या सहमतीने व कार्यालयीन अहवालास अधिन राहून सदर प्रस्तावास मान्यता देण्यांत येत आहे.

**धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर १३५ दिनांक ०७/०९/२०२१**

नगरोत्थान (जिल्हास्तरीय) योजना अंतर्गत नकाणे अमरधाम विकसित करणे कामाबाबत धुळे महानगरपालिका मे.महासभा ठराव नं.96दि.31/12/2019 मा.जिल्हाधिकारी सो.धुळे महानगरपालिका यांनी टिपणी मंजुरीने दि.26/03/2021 अन्वये उक्त कामाबाबत रक्कम रु.29,83,054/-मात्र खर्चाचा आर्थिक व प्रशासकीय मंजुरी देणेत आली आहे.

उक्त कामाबाबत शहर अभियंता मनपा धुळे यांचे पत्र क्र./889 दि. 01/01/2021अन्वये रक्कम रु.29,83,054/- मात्र खर्चास तांत्रिक मंजुरी मिळालेली आहे.

उक्त कामाबाबत धुळे महानगरपालिका जा.क्र./पा.पु.वि./113/2021दि. 12/05/2021 अन्वये दि.13/05/2021 रोजी दै.नवभारत /आपले नवराज्य या वृत्तपत्रात जाहीर निविदा प्रसिद्ध करणेत येऊन दि.07/06/2021 अखेर निविदा दर मागविण्यात आले आहेत. पात्र कंत्राटदार यांनी निविदेबाबत ऑनलाईन पद्धतीने बयाणा रक्कम भरून निविदा दर सादर केलेले आहेत.

| अ.क्र. | कंत्राटदार किंवा ठेकेदाराचे नाव | दिलेले निविदा दर | शेरा |
|---|---|---|---|
| 1 | श्री.पवन नंदलाल अजळकर | **शे.0.99% कमीने** | **सर्वात कमी दर** |
| 2 | श्री.योगेश एम. येवले | शे.1 % जास्तीने | |
| 3 | श्री.विकास जी. विभूते | अंदाजपत्रकीय दराने | |
| 4 | मे.सिद्धेश कन्सट्रक्शन | अंदाजपत्रकीय दराने | |
| 5 | मे.राधेय कन्सट्रक्शन | शे.3 % जास्तीने | |
| 6 | मे.श्रीस्वामी समर्थ कन्सट्रक्शन | शे.2 % जास्तीने | |

वरील प्रमाणे निविदेत भाग घेतलेले ठेकेदार पात्र असून मे/**श्री.पवन नंदलाल अजळकर** यांनी दिलेले दर शे.0.99% कमीने असून त्यांनी नियमा प्रमाणे ऑनलाईन बयाणा रक्कम भरलेली आहे. सबब कंत्राटदार मे/**श्री.पवन नंदलाल अजळकर** यांची शे. शे.0.99% कमीने दराने आलेले निविदा दर मे.स्थायी समिती पुढे ठेवणेसाठी तसेच अन्य काम न मिळालेले ठेकेदारांना त्यांची बयाणा रक्कम परत करणे बाबत मंजुरीस्तव सादर झालेला आहे.

सर्व सन्मा.सदस्यांच्या सहमतीने व कार्यालयीन अहवालास अधिन राहून सदर कामी कंत्राटदार मे/ **श्री.पवन नंदलाल अजळकर** यांची शे. शे.0.99% कमीने दर सर्वात कमीने आले असल्याने महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ७२ नुसार मान्यता देण्यांत देण्यांत येत आहे.

सदर प्रस्ताव व कार्यवाही बाबत लेखा आक्षेप निर्माण होणार नाही याची दक्षता घ्यावी.याबाबतची जबाबदारी संबंधित विभागाची राहील.

सुचक :- श्री. कमलेश नारायणराव देवरे
अनुमोदक:- श्रीमती भारती अशोक माळी

**सर्वानुमते मंजुर,**
**सही/-X X X**
**हंगामी सभापती,**
**स्थायी समिती,**
**धुळे महानगरपालिका धुळे**

विषय क्रमांक:- १२६ धुळे मनपा हद्दीत अण्णाभाऊ साठे नागरी दलित वस्ती योजना सन२०२०-२१ सानेगुरुजी चौकापासून ते लॉ कॉलेज पावेतो रस्ता कॉंक्रीटकरण करणेचे निविदा दर मागविण्यांत आलेत, त्याबाबत आलेल्या कार्यालयीन अहवालावर विचार करणे.

म. नगरसचिव नगरसचिव यांनी विषयांचे वाचन केले.

म. सुनिल बैसाणे सदर विषय मंजूर करण्यांत यावा.

म. अमोल मासुळे सदर विषय मंजूर करण्यांत यावा.

म.हंगामी सभापती सर्व सन्मा.सदस्यांच्या सहमतीने व कार्यालयीन अहवालास अधिन राहून सदर प्रस्तावास मान्यता देण्यांत येत आहे.

**धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंब१३६ दिनांक ०७/०९/२०२१**

धुळे मनपा हद्दीत अण्णाभाऊ साठे नागरी दलित वस्ती योजना सन2020-21 सानेगुरुजी चौकापासून ते लॉ कॉलेज पावेतो रस्ता कॉंक्रीटकरण करणे कामाबाबत धुळे मनपा मे.महासभा ठराव क्र. 140 (अ) दि.30/12/2019 मा. आयुक्त सो., धुळे मनपा यांनी टिपणी मंजुरीने दि.26/03/2021 अन्वये उक्त कामाच्या खर्चास रु.49,93,247/- मात्र रक्कमेस आर्थिक व प्रशासकीय मंजुरी देणेत आली आहे.

उक्त बाबत शहर अभियंता मनपा , धुळे यांचे पत्र क्र. 1209 दिनांक 08/03/2021 अन्वये रक्कम रु.49,93,247/- मात्र खर्चास तांत्रिक मंजुरी मिळालेली आहे.

उक्त कामाबाबत धुळे महानगरपालिका जा.क्र./ बां. वि./80 अन्वये दि.11/06/2021 रोजीचा दै.दिव्य मराठी/ मर्डर या अंकात प्रसिद्ध केली असता मुदतीत दि.06/07/2021 अखेर खालील प्रमाणे निविदा धारकांचे निविदा दर आलेले आहे.

| अ.क्र. | कंत्राटदारा/ठेकेदराचे नाव | दिलेले निविदा दर | शेरा |
|---|---|---|---|
| 1 | श्री.श्रृषभ सतिष खिवसरा | शे 2.00% जास्तीने | |
| 2 | श्री.हिंद कन्सट्रक्शन | शे 3.00% जास्तीने | |
| 3 | **मे. एकविरा कन्सट्रक्शन** | **अंदाजपत्रकीय दराने** | **सर्वात कमी दर** |

वरील प्रमाणे प्राप्त दरास सर्वात कमी दर **मे. एकविरा कन्सट्रक्शन, धुळे** यांचे **अंदाजपत्रकीय दराने** सर्वात कमी असून त्यांनी नियमाप्रमाणे रोखीने बयाना रक्कम भरलेली आहे. सबब कंत्राटदार **मे .एकविरा कन्सट्रक्शन, धुळे** यांची अंदाजपत्रकीय दराने आलेले निविदा दर मंजुरीसाठी मे.स्थायी समितीची आवश्यकता असल्याने सदर दरास मंजुरीसाठी मे.स्थायी समिती पुढे ठेवणेस मंजुरीस्तव सादर झालेले आहे.

सर्व सन्मा.सदस्यांच्या सहमतीने व कार्यालयीन अहवालास अधिन राहून सदर कामी कंत्राटदार **मे .एकविरा कन्सट्रक्शन, धुळे** यांची अंदाजपत्रकीय दराने आलेले निविदा दरास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ७३ नुसार मान्यता देण्यांत देण्यांत येत आहे. सदर प्रस्ताव व

कार्यवाही बाबत लेखा आक्षेप निर्माण होणार नाही याची दक्षता घ्यावी.याबाबतची जबाबदारी संबंधित विभागाची राहील.

सुचक :- श्री. सुनिल तुळशीराम बैसाणे
अनुमोदक:- श्री. अमोल पावबा मासुळे

**सर्वानुमते मंजुर,**
**सही/-X X X**
**हंगामी सभापती,**
**स्थायी समिती,**
**धुळे महानगरपालिका धुळे**

विषय क्रमांक :-१२७ धुळे मनपा हद्दीत महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान सन२०२०-२१ अंतर्गत अग्रवाल नगर येथील ओम क्रिटीकल हॉस्पिटल ते श्री.नरेश अग्रवाल यांचे घरापावेतो व खोपडे अपार्टमेंट ते गणेश अपार्टमेंट पावेतो रस्ता डांबरीकरण करणेचे निविदा दर मागविण्यांत आलेत, त्याबाबत आलेल्या कार्यालयीन अहवालावर विचार करणे.

म. नगरसचिव नगरसचिव यांनी विषयांचे वाचन केले.

म. वैशाली वराडे सदर विषय मंजूर करण्यांत यावा.

म. मंगलाताई पाटील सदर विषय मंजूर करण्यांत यावा.

म.हंगामी सभापती सर्व सन्मा.सदस्यांच्या सहमतीने व कार्यालयीन अहवालास अधिन राहून सदर प्रस्तावास मान्यता देण्यांत येत आहे.

**धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर १३७ दिनांक ०७/०९/२०२१**

धुळे मनपा हद्दीत महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान सन2020-21 अंतर्गत अग्रवाल नगर येथील ओम क्रिटीकल हॉस्पिटल ते श्री.नरेश अग्रवाल यांचे घरापावेतो व खोपडे अपार्टमेंट ते गणेश अपार्टमेंट पावेतो रस्ता डांबरीकरण करणे कामाबाबत धुळे मनपा महासभा ठराव क्र. 96 दि.31/12/2019 मा. आयुक्त सो., धुळे मनपा यांनी टिपणी मंजुरीने दि.26/03/2021 अन्वये उक्त कामाच्या खर्चास रु.74,95,626/- मात्र रक्कमेस आर्थिक व प्रशासकीय मंजुरी देणेत आली आहे.

उक्त बाबत शहर अभियंता मनपा , धुळे यांचे पत्र क्र. 1009 दिनांक 27/01/2021 अन्वये रक्कम रु.74,95,626/- मात्र खर्चास तांत्रिक मंजुरी मिळालेली आहे.

उक्त कामाबाबत धुळे महानगरपालिका जा.क्र./ बां. वि./ 60 अन्वये दि.07/06/ रोजीचा दै.पुण्य नगरी या अंकात प्रसिद्ध केली असता मुदतीत दि.09/07/2021 अखेर खालील प्रमाणे निविदा धारकांचे निविदा दर आलेले आहे.

| अ.क्र. | कंत्राटदारा/ठेकेदराचे नाव | दिलेले निविदा दर | शेरा |
|---|---|---|---|
| 1 | श्री.श्रृषभ सतिष खिवसरा | शे 2.00% जास्तीने | |
| 2 | श्री.हिंद कन्सट्रक्शन | शे 3.00% जास्तीने | |
| 3 | **मे. एकविरा कन्सट्रक्शन** | **अंदाजपत्रकीय दराने** | **सर्वात कमी दर** |

वरील प्रमाणे प्राप्त दरास सर्वात कमी दर **मे.एकविरा कन्सट्रक्शन,धुळे** यांचे **अंदाजपत्रकीय दराने** सर्वात कमी असून त्यांनी नियमाप्रमाणे रोखीने बयाना रक्कम भरलेली आहे. सबब कंत्राटदार **मे.एकविरा कन्सट्रक्शन, धुळे** यांची अंदाजपत्रकीय दराने आलेले निविदा दर मंजुरीसाठी मे.स्थायी समितीची आवश्यकता असल्याने सदर दरास मंजुरीसाठी मे.स्थायी समिती पुढे ठेवणेस मंजुरीस्तव सादर झालेला आहे.

सर्व सन्मा.सदस्यांच्या सहमतीने व कार्यालयीन अहवालास अधिन राहून सदर कामी कंत्राटदार **मे .एकविरा कन्सट्रक्शन, धुळे** यांची अंदाजपत्रकीय दराने आलेले निविदा दरास महाराष्ट्र

महानगरपालिका अधिनियम कलम ७३ नुसार मान्यता देण्यांत देण्यांत येत आहे. सदर प्रस्ताव व कार्यवाही बाबत लेखा आक्षेप निर्माण होणार नाही याची दक्षता घ्यावी. याबाबतची जबाबदारी संबंधित विभागाची राहील.

सुचक :- श्रीमती वैशाली भिकन वराडे

अनुमोदक:- श्रीमती मंगला सुरेश पाटील

**सर्वानुमते मंजुर,**
**सही/-X X X**
**हंगामी सभापती,**
**स्थायी समिती,**
**धुळे महानगरपालिका धुळे**

विषय क्रमांक:-१२८ — १४ व्या वित्त आयोग अंतर्गत ओम क्रिटीकल ते कब्रस्थान पावेतोचा नाल्यास रिटेनिंग वॉल बांधणेचे कामास मे.स्थायी समितीने मान्यता दिलेली आहे.तथापि सदर अंदाजपत्रकातील बदलास मान्यता देणेबाबत आलेल्या कार्यालयीन अहवालावर विचार करणे.

म. नगरसचिव — नगरसचिव यांनी विषयांचे वाचन केले.

म. वैशाली वराडे — सदर विषय मंजूर करण्यांत यावा.

म. मंगलाताई पाटील — सदर विषय मंजूर करण्यांत यावा.

म.हंगामी सभापती — सर्व सन्मा.सदस्यांच्या सहमतीने व कार्यालयीन अहवालास अधिन राहून सदर प्रस्तावास मान्यता देण्यांत येत आहे.

**धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर १३८ दिनांक ०७/०९/२०२१**

१४ व्या वित्त आयोग अंतर्गत ओम क्रिटीकल ते कब्रस्थान पावेतो नाल्यास संरक्षण भिंत बांधणे कामास धुळे महानगरपालिका स्थायी सामिती ठराव नं.139 दि.30/12/2020 अन्वये रक्कम रु.72,92,400/- मात्र रकमेस आर्थिक व प्रशासकीय मान्यता दिलेली आहे.

उक्त कामाबाबत सार्वजनिक बांधकाम विभाग, धुळे यांचे पत्र क्र./1100 दि. 11/02/2021 अन्वये रक्कम रु.72,92,400/- मात्र खर्चास तांत्रिक मंजुरी मिळालेली आहे.

उक्त कामाबाबत या धुळे महानगरपालिका जा.क्र./धुमपा/बांवि/27 दि. 12/04/2021अन्वये दैनिक देशदूत / देशोन्नती या बृत्तपत्रात जाहीर निविदा प्रसिद्ध करणेत येऊन दि.05/05/2021 रोजी निविदा दर मागविण्यात आलेले होते. सदर खर्चास मे.स्थायी समिती ठराव क्र. 80 दि. 10/06/2021 अन्वये दर मान्यता मिळालेली आहे. सदर कामास सर्वात कमी दराची निविदा मे.एकविरा कन्सट्रक्शन, धुळे; ठेकेदार यांची मंजूर झाली असून यांना कार्यादेश देण्यात आला आहे.

सदरच्या नाल्यात मोठ्या प्रमाणात कचरा पडत असतो त्यामुळे सदरचा नाला चोकअप होवून नाल्याचे पाणी हे नाल्याकिनारी असलेले अल्प उत्पन्न गटातील नागरिकांचे असलेल्या वसाहतीत जात असते. त्यामुळे भविष्यात या भागातील नागरिकांची गैरसोय होवून जीवित हानी व वित्त हानी होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

सदरच्या नाल्यास पाण्याचा प्रवाह 24 तास असल्याने या ठिकाणी आर. सी.सी.नाला करणे आवश्यक आहे.त्याकरीता सदरच्या अंदाजपत्रकात बदल करून सुधारित अंदाजपत्रक तयार केलेले आहे.सदरच्या सुधारित अंदाज पत्रकास तांत्रिक मंजुरीसाठी मे.स्थायी समितीची आवश्यकता असल्याने मे.स्थायी समितीपुढे ठेवणेस मंजुरीस्तव सादर झालेला आहे.

सर्व सन्मा.सदस्यांच्या सहमतीने व कार्यालयीन अहवालास अधिन राहून सदर कामी अंदारजपत्रकात झालेल्या बदलास मान्यता देण्यांत येत आहे. याबाबत उचित कायदेशीर कार्यवाही

नियमानुसार प्रशासनाने करावी. सदर प्रस्ताव व कार्यवाही बाबत लेखा आक्षेप निर्माण होणार नाही याची दक्षता घ्यावी. याबाबतची जबाबदारी संबंधित विभागाची राहील.

सुचक :- श्रीमती वैशाली भिकन वराडे

अनुमोदक:- श्रीमती मंगला सुरेश पाटील

**सर्वानुमते मंजुर,**

**सही/-X X X**

**हंगामी सभापती,**
**स्थायी समिती,**
**धुळे महानगरपालिका धुळे**

# धुळे महानगरपालिका,धुळे
## नगरसचिव कार्यालय
## स्थायी समिती सभा क्रमांक १९ चे इतिवृत्त

---

**धुळे मनपा भारतरत्न अटलबिहारी वाजपेयी सभागृह**
**गुरुवार दिनांक ३०/०९/२०२१**
**वेळ :-सकाळी ११-०० वाजता.**

धुळे महानगरपालिका स्थायी समितीची ऑन लाईन साप्ताहिक सभा आज गुरुवार दिनांक ३०/०९/२०२१ रोजी सकाळी ११-०० वाजता **मा.श्री संजय सुधाकर जाधव,सभापती,**स्थायी समिती, मनपा,धुळे यांच्या अध्यक्षतेखाली **धुळे मनपा भारतरत्न अटलबिहारी वाजपेयी सभागृह** भरली. ऑनलाईन सभेस खालील सन्मा.सदस्य सभागृहात हजर होते.

| अ.क्रं. | सदस्यांचे नांव | हुद्दा |
|---|---|---|
| १ | श्री. जाधव संजय सुधाकर | सभापती |
| २ | श्री. वैसाणे सुनिल तुळशिराम | सदस्य |
| ३ | श्रीमती माळी भारती अशोक | सदस्या |
| ४ | श्रीमती पाटील मंगला सुरेश | सदस्या |
| ५ | श्रीमती बोरसे पुष्पा प्रकाश | सदस्या |
| ६ | श्री. मासुळे अमोल पावबा | सदस्य |
| ७ | श्री. देवरे कमलेश नारायण | सदस्य |
| ८ | श्रीमती पठाण हिना अस्लम | सदस्या |
| ९ | श्री. सईद बेग हाशम बेग | सदस्य |
| १० | श्री. नवले शितल मोहन | सदस्य |
| ११ | श्री. बोरसे नागसेन दामोदर | सदस्य |
| १२ | श्रीमती कुलेवार किरण राकेश | सदस्या |
| १३ | श्रीमती वराडे वैशाली भिकन | सदस्या |
| १४ | श्री. जाधव बन्सीलाल माणिक | सदस्य |
| १५ | श्रीमती चौधरी मंगला अर्जुन | सदस्या |
| १६ | श्री. पटेल अमीन अब्दुल करीम | सदस्य |

**उपस्थित अधिकारी गण**

| अ.क्र. | अधिकाऱ्यांचे नाव | हुद्दा |
|---|---|---|
| १ | श्री. नितीन कापडणीस | अति. आयुक्त |
| २ | श्रीमती शिल्पा नाईक | उपायुक्त |
| ३ | श्रीमती पल्लवी शिरसाठ | सहा. आयुक्त |
| ४ | श्री. एन. पी. सोनार | सहा. आयुक्त |
| ५ | श्री. मनोज अरविंद वाघ | प्र. नगरसचिव |
| ६ | श्री. के. एन. शिंदे | अभियंता |
| ७ | डॉ. महेश मोरे | आरोग्याधिकारी |
| ८ | श्री. चंद्रकांत जाधव | सहा.आरोग्याधिकारी |
| ९ | श्री. लक्ष्मण पाटील | सहा.आरोग्याधिकारी |
| १० | श्री.बी.एस. रनाळकर | प्र. लेखाधिकारी |
| ११ | श्री.रमजानअन्सारी | कार्यालय अधिक्षक |

| | | |
|---|---|---|
| १२ | श्री. एन.के. बागुल | विद्युत अभियंता |
| १३ | श्री. सी.एम. उगले | पा. पु. ओव्हरसिअर |
| १४ | श्री. सी.सी. बागुल | पा. पु. ओव्हरसिअर |
| १५ | श्री. कमलेश सोनवणे | ओव्हरसिअर न.र. वि. |
| १६ | श्री. हेमत पावटे | ओव्हरसिअर बां.वि. |
| १७ | श्री.प्रसाद जाधव | अति. विभाग |
| १८ | श्री. राजु माईनकर | भांडारपाल |
| १९ | श्री. किशोर सुडके | बाजार विभाग |
| २० | श्री. राजकुमार सुर्यवंशी | प्र. अधिक्षक परवाना विभाग |

म.सभापती — सर्व उपस्थित सन्मा.सदस्य अति.आयुक्त सो.अधिकारी वर्ग छायाचित्रकार बांधव सभेचे कामकाज चालविणेसाठी आवश्यक तो कोरम पूर्ण झाल्याने नगरसचिव यांनी सभेचे कामकाज सुरुवात करावी.

म. नगरसचिव — वंदे मातरम् या राष्ट्रवंदनेसाठी सर्वांनी उभे रहावे.

विषय क्रमांक:-१२९ — मागील स्थायी समिती सभेचे इतिवृत्त वाचून कायम करणे. (दि.२६/८/२०२१)

म. नगरसचिव — नगरसचिव यांनी विषयांचे वाचन केले.

म.सुनिल बैसाणे — इतिवृत्त वाचून कायम करावे

म.सभापती — सर्व सन्मा. सदस्यांच्या सहमतीने मागील स्थायी समिती सभेचे (दि.२६/८/२०२१) इतिवृत्त क्रमश: वाचून कायम करण्यांत येत आहे.

**धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर १३९दिनांक ३०/०९/२०२१**

मागील स्थायी समिती सभा दिनांक २६/८/२०२१ रोजीचे स्थायी समिती ठराव नंबर ११७ ते १२५ तसेच सन्मा.सदस्यांनी उपस्थित केलेली चर्चा व त्यावरील निर्णय क्रमश: वाचून कायम करण्यांत येत आहे.

सही/-X X X

**सभापती,**

**स्थायी समिती,**

**धुळे महानगरपालिका,धुळे**

विषय क्रमांक:-१३० — मा.सभापती सो.स्थायी समिती, मनपा, धुळे यांचे पत्रानुसार वॉटरग्रेस कंपनीचा ठेका बंद करुन घनकचरा संकलन व वाहतूक करणेचे काम मनपामार्फत करणेबाबत आलेल्या पत्रावर चर्चा करुन निर्णय घेणे.

म.नगरसचिव — नगरसचिव यांनी विषयांचे वाचन केले. तसेच या विषयासंदर्भात प्रथम मा. सभापती महोदय याबाबत निवेदन देतील.

म.सभापती — घनकच-याचा विषय दोन दिवसापूर्वी स्थायी समिती सदस्यां समोर मा. उपायुक्त श्री. गिरी सो. प्रमुख म्हणून काम पहात आहेत त्यांना त्या ठिकाणी बोलावून बैठक घेतली होती. धुळे शहरात घंटागाडया हया 20 ते25 % सुरु आहेत. मात्र बील पूर्ण प्रमाणात काढले जात आहे. बरेचशे टॅक्ट्रही बंद केले गेले. आजची परिस्थिती अशी आहे की ठेकेदाराच्याड्रायव्हर लोकांनी काम बंद केले कारण त्यांना वेतन अदा होत नाही. शितलभाऊनी जरी वार्डाचा वैयक्तीक विषय मांडला असेल परंतु संपूर्ण धुळे शहरांची परिस्थिती तीच आहे जर आपण निर्णय घेतला नाही तर प्रशासनापेक्षा जास्त जबाबदार आपण आहे आपण निर्णय घेण्यांचा आणि या आठवडयात अंमलबजावणी करणे भाग पाडणे होत नसेल तर नागरीकांसाठी आपल्याला रस्त्यावर उतरावे लागेल.प्रशासनात ठेका रद्द करुन स्वत:ची वाहने सुरु करत नसेलतर आपण दोन तीन महिन्यापूर्वी स्वयंभू कंपनीला ठेका देण्यांबाबत या सभागृहात निर्णय घेतला परंतु धुळे शहराच्या आमदारांनी त्या ठेकेदाराला वर्कऑर्डर देऊ नये म्हणून वर मंत्रालयापर्यंत गेले परंतु आमदारांनी एक शब्द सुध्दा काढला नाही की वॉटरग्रेसची एक सुध्दा गाडी फिरत नाही त्यांनी आयुक्ताना विचारले का कधी या ठिकाणी आमदारांच्या संशयास्पद हालचाली दिसून येतात तसे अजीज शेख साहेबांनी कार्यादेश देण्यासाठी प्रयत्न सुरु केलेत आमदारानी पुन्हा मंत्रालयांत जाऊन नगरविकास मंत्रयांकडे त्या विषयावर स्टे आणला म्हणजे धुळे शहरातील कचरा उचलला जाऊ नये ही जी निष्कीय यंत्रणा आहे ही कार्यरत रहावी असे या लोकांचे प्रयत्न सुरु आहेत. ही वस्तुस्थिती मी या

ठिकाणी मांडलेली आहे त्यासाठी कुठल्याही परिणामास सामोरे जावे लागले तरी आपण तयार आहोत. आज या ठिकाणी ठेका बंद करण्यासाठी निर्णय घ्यावयाचा आहे महिना महिना गाडया फिरत नाही अजून 15 दिवस गाडया नाही आल्या तरी काही बिघडणार नाही पालिका स्तरावर आपल्याला टॅक्ट्रर व घंटागाडया कार्यान्वीत करुन याठिकाणी व्यवस्थित काम सुरु करुन घ्यावयाचे आहे.पालिकेच्या कर्मचा-यांकडून आपल्याला पाठपुरावा करता येईल याठिकाणी मी आदेशित करतों.डॉ.महेश मोरे आणि चंद्रकांत जाधव आम्हाला पुढच्या सभेपर्यंत मागील दोन महिन्यांचे बील बाकी आहे ते याठिकाणी स्थायी समिती समोर अवलोकनार्थ द्यावे मागील दोन महिन्यांचा संपूर्ण अहवाल याठिकाणी देण्यात यावा त्यानंतरच सदर ठेकेदाराच बील अदा करावे तोपर्यंत अदा करु नये असे मी आदेश देत आहे. यांच्यात जर कार्यवाही झाली तुम्ही परिणास समोरे जाण्यास तयार रहा तुमची यंत्रणा कुठपर्यंत आहे यांची माहिती दया.

म. चंद्रकांत जाधव — सभापती साहेबाच्या दालनात बैठ क झाली त्यात जी चर्चा झाली त्या अनुषंगाने लेखा विभागालानिर्देश दिले होते. पर्यायी योजना उभारणीसाठी आपण काय करु शकतो या विषयावर चर्चा झाली त्यानुसार मी विभागामार्फत खर्चाचा ढोबळ आराखडा तयार केलेला होता त्यांची कॉस्ट साधारणत: 55लाख पर्यंत जात होती.यामध्ये काही तांत्रिक बाबी तपासून घेणे गरजेचे होते.त्या अनुषंगाने शितलभाऊंनी एक सुचना केली होती मला तुम्ही टॅक्टरचे जे दर मागविणार त्यांची SSR ने पडताळणी करा त्यांनी मला चांगली सुचना केली त्याअनुषंगाने मीSSR चा रेट बघितला त्यानुसार मी टेंडर प्रोसस करीत आहे. आयुक्तांची सही बाकी आहे.

म. सुनिल बैसाणे — हया वॉटरग्रेसने धुळे शहरांची वाट लावली परंतुआपण मागील वर्षापासून प्रशासनाला पर्यायी व्यवस्थेबाबत विचारणा केली होती मी सभापती असतांना वॉटरग्रेसला ब्लॅकलिस्ट करावा यासाठी आयुक्त सो.यांनी स्थायी समिती पुढे विषय मांडला होता सदरचा अधिकार हा आयुक्त सो. यांचा आहे. जर आदेश तुम्हीच करणार त्यांची अंमलबजावणी तुम्ही करणार त्याला ब्लॅकंकरण्याचा अधिकार स्थायी समितीला नाही जर त्यावेळी जनतेच्या भावना विचारात घेवून जर तो विषय बलॅकलिस्ट केला असता तर त्यावेळी सर्व स्थायी समितीच्या सदस्यांवर सदरचा ठेकेदार जर न्यायालयात गेला असता तर रिकव्हरी निघाली असती यांना ब्लॅकलिस्ट करण्यांचे अधिकार आयुक्त सो. यांना आहेत. यांचा संपूर्ण अभ्यास करा वकीलांचे मार्गदर्शन घ्या त्यानंतर त्याला ब्लॅकलिस्ट करायची जबाबदारी आयुक्तांची आहे.महाराष्ट्र शासनाचा घनकचरा व्यवस्थापनाबाबतीत एक G.R.आहे त्या G.R. मध्ये पेसिफिक दिलेले आहे घनकचरा व्यवस्थापना मध्ये लोकप्रतिनिधीच्या तक्रारी असतील त्या तक्रारी केल्यानंतरही धनादेश देण्यांत आला असेल त्यांची सर्वस्वी जबाबदारी आयुक्त यांची असते. जर आयुक्तांनी लोकप्रतिनिधीच्या तक्रारीकडे दुर्लक्ष केल्याचे लक्षात येत असेल तर आयुक्त यांच्यावर शिस्तभंग शास्तीचा गुन्हा नोंदविण्यांचा अधिकार नागरी व लोकप्रतिनिधी यांना आहे. हे मी त्यावेळीही निदर्शनास आणून दिले होते.जो आपण पैसा देतो तो महाराष्ट्र शासनाचा पैसा असतो. आणि महाराष्ट्र शासनाला पूर्णत अधिकार आहे की, त्या पैशाचा तुम्ही कशा पध्दतीने विनियोग करत आहे. त्याचा हिशोब घेण्यांचा अधिकार आहे त्या अनुषंगाने महाराष्ट्र शासनाने आदेश काढला होता.आतापर्यंत ऐवढया तक्रारी केल्या होत्या. त्यावेळी आयुक्त सो. यांना मी स्वत: विचारणा केली आपल्याला पर्यायी व्यवस्था करावी लागणार आहे. चंद्रकांत जाधव यांनी आता पर्यायी काय व्यवस्था केली आहे.जे कर्मचारी काम करीत आहे त्यांना दोन महिन्यांपासून पगार झालेला नाही. ते सर्व माझ्या घरी आलेले होते. आता हे काम आपण राबविणार आहे तर कर्मचा-यांना किती रोज देणार आहे.

म.चंद्रकांत जाधव — ठेकेदारामार्फत साधारणत:250रुपये रोज दिला जातो.आपण कर्मचारी संस्था नेमली आहे. त्यांचा दर आहे 407 रु.

म. सुनिल बैसाणे — आता आपण टॅक्ट्रर लावणार आहे त्यांचा किती खर्च येईल.

म. चंद्रकांत जाधव — आपण ढोबळ अंदाज काढला होता. एका टॅक्ट्ररचा प्रति दिवस खर्च 2800 रुपये येईल. एसएसआर च्या शेडयुलमध्ये 350 रुपये तास आहे जर आपण 8 तास काम केले तर 2800 एका दिवसाचा दर येईल.

म. सुनिल बैसाणे — जर आपण काम न करता महिन्याला 50 ते 60 लाख रुपये देतो आहे. जर आपण काम केले तर कमीत कमी 60ते 70टक्के काम होईल पण त्याचा खर्च 60 लाखावर जाईल. परंतु धुळेकर नागरीकांची समस्या सुटली पाहिजे. त्यांना नैर्सगिक वाढ दिलेली आहे का.?

म.चंद्रकांत जाधव — अजून त्यांना नैसर्गिक वाढ लागू केलेली नाही.

म. सभापती — आपण बोलतांना विचार करुन बोलावे. 250 रुपये रोज कामगार कायदयाने नियम बाहय आहे.

म. सुनिल बैसाणे — तुम्ही जर त्यांना 250 रुपये रोज देतात तर ते कसे चांगले काम करतील. साहेब तुम्ही ज्यावेळी आमदार सो. यांच्याकडेस बैठकीला जातात त्यावेळी त्यांना विचारा धुळेकर नागरीकांना का वेठीस धरत आहात. स्वच्छता निरीक्षक हे काम करीत नाही.त्यांच्या दाखल्यावरुन संबंधित ठेकेदारांचे बिले दिली जातात. त्यांना जबाबदार धरले पाहिजे. आपण जी यंत्रणा राबविणार आहे ती कशा पध्दतीने राबविणार आहे.

म.सभापती — मनपाची यंत्रणा आपण तात्पुरती स्वरुपात राबविणार आहोत जो पर्यत नवीन ठेका जात नाही तो पर्यत ही यंत्रणा कार्यरत ठेवावी लागेल.

म. सुनिल बैसाणे — त्यांच्या डिपॉझीट मधून घंटागाडयांचे दुरुस्तीचे पैसे वसुल करा. या गोष्टींचा सखोल अभ्यास करुन विचार करावा. अधिका-यांनी धुळेकर नागरीकांच्या भावना नगरविकास मंत्रालयाकडे कळविल्या का?

म. अमोल मासुळे — गेल्या दीडतासा पासून सन्मा.सदस्यांनी वॉटरग्रेस बाबत अनेक गंभीर तकारी केल्यात. धुळे शहरात कचरा संकलनासाठी वॉटरग्रेस नामक कंपनीला जो ठेका दिला आहे हा मुजोर ठेकेदार वर्षभरापासून धुळे शहरात काम करीत आहे धुळे शहरात गल्लोगल्ली कच-या संदर्भात काय परिस्थिती आहे ती वर्तमानपत्रातून आपण बघत आहोत मिल परिसरातील दोन ते तीन प्रमुख रस्ते आहेत तुम्ही कुठल्याही रस्त्याने जा जागोजागी कचऱ्याचे ढीग आहेत आमच्या प्रभागात चार घंटागाड्या पैकी कधी दोन सुरू असते तर कधी तीन सुरू असते ट्रॅक्टर पण एकच आहे परंतु ठेकेदाराचे बिल पूर्ण गाड्यांचं व पूर्ण ट्रॅक्टर्स निघत आहे हा ठेकेदार एवढा गुन्हेगार नाही जेवढे आरोग्य विभागातील जी अधिकारी असतील आणि कर्मचारी असतील यांना सर्वांना हाताशी धरून हा त्याच्या पद्धतीने सादर करतो व त्याच पद्धतीने बिल काढत आहे गेल्या दोन ते तीन महिन्यापूर्वी जे आपले उपमहापौर आहेत त्यावेळी सभा घेऊन सांगितले संपूर्ण तक्रारींचा पाढा वाचून दाखविला त्यांनी तत्कालीन आयुक्त श्री. अजीज शेख यांना सांगितले की पाच दिवसांमध्ये मी तुम्हाला वर्कऑर्डर देईन मागील वर्ष रिलायबल वाल्याला काम न करण्यासाठी धमकावण्यात आले त्यामध्ये पालिका अधिकारी कर्मचारी यांचे देखील सहभाग होते बाबत जो काही निर्णय घ्यायचा तो आजच्या आजच घ्या त्या ठेकेदाराचे देयके बाकी असेल ते पूर्ण थांबवावे मालेगाव मध्ये देखील श संस्थेचे काम सुरू होते या ठिकाणी धायगुडे मॅडम यांनी त्यांना जवळजवळ दीड ते पावणेदोन कोटी रुपये दंड केला होता ते दंड वसूल करून शकतात तर मग आपण आपले अधिकारी दंड का वसूल करू शकत नाही.

म. सभापती — जाधव बापू दोन महिन्याचे बिल पुढील स्थायी समितीमध्ये तुम्हाला सादर करावयाची आहे तोपर्यंत देयक देऊ नये असा माझा आदेश आहे .

म.अमोल मासुळे — दुसरा महत्वाचा विषय म्हणजे सार्वजनिक शौचालय याबाबत हेअर टेंडर काढण्याकरिता मागील सभेत मी विषय केला होता आपण त्यांना आदेशित केले होते आणि त्यांनी त्यावर काय उपाय योजना केल्या राजुबाबा कदमबांडे यांनी मागील पंचवार्षिक मध्ये अतिशय मेहनत घेऊन १३६ कोटीची पाणी योजना आणली त्याचं काय बट्ट्याबोळ झाला त्यानंतर भूमिगत गटार योजना डॉक्टर भामरे असतील अनुपपैयया असेल जयकुमार रावल असतील यांनी ही योजना अतिशय मेहनतीने आणली. त्याचेही काम एमजीपी करत आहे पण धुळेकर नागरिक भाजपाला जबाबदार धरत आहे तसेच पेस्ट कंट्रोल आपण त्याला चार कोटी चा ठेका दिला होता धुळे शहरात डेंगूने हाहाकार घातला त्यावर आरोग्य विभागाने आणि अतिरिक्त आयुक्त हे फायलींवर सह्या करून देतात अधिकाऱ्यांना देखील याबाबत दखल घेतली पाहिजे माझ्या प्रभागात दिनेश कुलकर्णी नावाच्या व्यक्ती आहे त्याचा सहा वर्षाचा मुलगा डॉक्टर अभय कुलकर्णी कडे ऍडमिट आहे मी फॉगींग करण्यासाठी पाच दिवसापूर्वी त्यांना सांगितले आहे मग मनपा पथक व ग्रुप करून काय उपयोग तुम्ही हा विषय घेतला त्याबद्दल तुमचे धन्यवाद हे

काम बंद केले पाहिजे पण मनपा याबाबत इच्छुक नाही त्यांना घरी पाठवण्यासाठी त्यांचे जी बिल आहे ते न देता मालेगाव मध्ये त्या पद्धतीने त्यांच्या बिलातून वसूल करण्यात यावा

म.चंद्रकांत जाधव शहरामध्ये सार्वजनिक शौचालय व ते त्यांची पार्श्वभूमी थोडक्यात सांगतो आपण सार्वजनिक शौचालय साठी पे ॲण्ड युज तत्त्वावर बनवले होते आणि कमी खर्चाची योजना अंतर्गत त्याचे चार्जेस वसूल करून शौचालय देखभाल दुरुस्तीसाठी देण्यात आली होती परंतु नागरिकांची पे करण्याची इच्छाशक्ती होती ती संबंधित ठेकेदाराला मिळत नव्हती म्हणून त्यावेळी स्थायी समितीमध्ये असा ठराव झाला की याचं टेंडर करावं त्याबाबत प्रोसेस केली आणि टेंडर प्रक्रिया राबवली त्यामध्ये चार संस्थानी भाग घेतला त्यांना अटी शर्तीनुसार पात्र ठरविले आणि त्या संस्था पात्र झाल्या नंतर त्यांना काम केलं त्याच पार्श्वभूमीवर स्थायी समितीच्या ठरावाच्या अनुषंगाने जे सेवा फाउंडेशन ला देण्यात आले ते त्याच्यामध्ये कन्वर्ट करण्यात आलेले आहे तसेच टप्याटप्याने सार्वजनिक शौचालय तयार झाले त्या पद्धतीने स्थायी समितीच्या ठरावानुसार संबंधित संस्थेत दिले आज जी परिस्थिती आहे यामध्ये वेळोवेळी दुर्लक्ष व सुधारणा झाल्या नाही म्हणून मोठ्या दृष्टीसाठी खर्चिक बाब आहे याचा आपण स्ट्रक्चरल ऑडिट करून घेणार आहोत आठ दिवसात त्याचं ऑडिट करून घेण्यांत येईल आणि त्या स्ट्रक्चरल ऑडिट नुसार निविदा प्रक्रिया राबवावे असे माझे मत आहे.

म.अमोल मासुळे सदर फाईल आता कोणाकडे आहे.

म.चंद्रकांत जाधव टेंडर प्रोसेस ची फाईल पाटील सो यांनी ज्या वेळेस गेलो होतो त्यावेळी स्ट्रक्चरल ऑडिट साठी ती फाईल उगले यांच्याकडे दिली होती त्यांनी ऑल इंडिया इन्स्टिटयूट यांच्याकडे कामासाठी दिलेली आहे.

म. शितल नवले लक्ष्मण पाटील पण ऑल इंडिया वर अडकले होते तुम्ही पण तिथे अडकले मग महिनाभर काय केले.

म.सभापती - जाधव बापू तुम्ही क्लिअर करा पुढची प्रोसेस काय आहे.

म.चंद्रकांत जाधव ऑल इंडिया इन्स्टिटयूट ड्रॉप दिला नाही लवकर टेंडर प्रक्रिया करतो.

म.शितल नवले याचे दोन टेंडर वेगळे होतील एक देखभाल-दुरुस्ती चे आणि एक शौचालय दुरुस्तीसाठी अमीन पटेल- मी वेळोवेळी एकच प्रश्न करत आहे मला लाज वाटते पुण्याहून जी कंपनी आली आहे तिला आपण कचरा साफ करण्याचे काम देणार आहोत त्याचे टेंडर काढले वर्कऑर्डरची प्रोसेस सुरू झाली त्याच्यात काही भ्रष्टाचार आहे का आपण सर्व लोक प्रतिनिधी आहोत जनतेने आपल्याला अधिकार दिलेला आहे सभेमध्ये प्रश्न विचारण्याचा जर यामध्ये राजकारण होत असेल तर सर्वात जास्त नुकसान शहरातील जनतेची होत आहे आज डेंगू मलेरिया आणि जे लोक मरत आहेत जे आजारी पडत आहेत माझ्या स्वतःचा मुलगा चिकनगुनिया झाला आहे तो दवाखान्यात ऍडमिट आहे त्याचा पाप आपण सर्वांना लागणार आहे या विषयावर आपण सर्व एकत्र येऊन मग त्यांना प्रश्न का विचारत नाही आपण नागरिकांनी नगर विकास मंत्री व सचिवांकडे बसून त्यांना विचारू यात काय चूक आहे बीजेपी ची सत्ता आहे म्हणून त्रास देत आहेत का माझ्या शहरातील नागरिकांना त्रास होत आहे तर मला या सत्ता ची गरज नाही मी शहरातील जनतेचा लोकप्रतिनिधी आहे काम करण्यासाठी आपण जे ट्रॅक्टर घेणार आहे तो ट्रॅक्टर वाला पूर्ण असेच काम करेल ३० ट्रॅक्टर मध्ये काम होणार आहे का धुळे शहराच्या जनतेसाठी माझ्या पक्षाने मला हाकलून दिले तरी चालेल आपल्याला शहरातील जनतेसाठी राजकारण करायचे नाही आपण ७४नगरसेवक मंत्रालयात धरणे धरण्यात बसायला तयार आहे स्थानिक स्वराज्य संस्था आहे आपला अधिकार आहे या अधिकारीच अधिकाराचा आपण वापर करीत नाही त्याला वर्क ऑर्डर द्यावी. अशी माझी मागणी आहे.

म. सुनील बैसाणे तुमच्या बाजुला बसलेले तुमच्या सोबत आहेत का ते कोणत्या पक्षाचे आहेत

म.सईद बेग हाशम बेग मी शहराच्या जनतेसोबत आहे मी एम आय एम पक्षाचा नगरसेवक आहे त्यासंबंधी आपण आमदार साहेबांशी चर्चा केली का आमदार शहराचे प्रतिनिधी आहे.

म. शितल नवले या सभागृहात या विषयाला आपण मंजुरी दिलेली होती त्यावेळी देखील आमचे नगरसेवक होते त्यांनी अभ्यास करून त्याचं मूल्यांकन केलं तर बरोबर आहे म्हणून स्थायीने एकमताने मंजुरी दिली तेथे त्यांनी विरोध केला नाही आपण ७४ नगरसेवकांनी महासभा घेतली तिथे देखील त्यांनी विरोध केला नाही मग का म्हणून आपण आमदाराकडे जायला पाहिजे.

म.अमीन पटेल — साहेब आपण सांगितले वर्कऑर्डर देण्याचा अधिकार आपला आहे त्यामध्ये भ्रष्टाचार झाला आहे का व जे ३० ट्रॅक्टर घेणार आहे त्याने शहरातील कचरा साफ होणार आहे का ये मी मिटींगला येणार नाही मी कॉर्नर मिटिंग घेऊन धुळे शहरातील नागरिकांना सांगणार आहे की, आपण एका थैली मध्ये कचरा भरून मनपाच्या गेटवर टाकावे.

म.अतिरिक्त आयुक्त — पहिले तर आपण ओपन टेंडर केले आहे त्यामध्ये काही चुकीचे नाही रीतसर आहे

म.अमीन पटेल — जर रीतसर आहे तर आपण सचिवांना पत्र का दिले नाही पुण्यात हा दर आहे मालेगावला हा दर आहे जर अधिकारी जाणून-बुजून असे करीत असतील तर आपण ७४ नगरसेवक मिळून अविश्वास ठराव आणून त्यांची खुर्ची बदलवू शकतो. मी निषेध व्यक्त करुन सभागृह सोडीत आहे.

म. कमलेश देवरे — अमीन पटेल यांनी जो रोष व्यक्त केला आणि सभागृह सोडून चालले गेले आमच्या दृष्टीने खेदाची गोष्ट आहे या सभागृहात तीन वेळा निवडून आलेले आहेत आज धुळे शहरात इतकी भयंकर परिस्थिती झाली आहे याला जबाबदार प्रशासन आहे का आपण हवं लोकप्रतिनिधी म्हणून नगरसेवक बदनाम होतो आता बंटी भाऊ यांनी जे काही खुलासे केले वॉटर ग्रेसला मुदतवाढ देण्यात मध्ये कोणाचा जास्त इंटरेस्ट होता वॉटरग्रेस संस्था तीस टक्के काम करत नाही आणि शंभर टक्के बिल काढले असेल या गोष्टीकडे प्रशासनाला वेळ द्यायला नसेल आपण लोकप्रतिनिधी म्हणून लाज वाटते अधिकाऱ्यांना त्यांच्या पदाची इतकी गुर्मी चालली असेल वीस-बावीस दिवस गाड्या बंद असतात पूर्ण बिल देते या रोषाला सगळेच नगरसेवक कंटाळले आहेत धुळे शहरात कुठल्याही भागात जा कचऱ्याचे ढीग तुम्हाला दिसतील मागे पूर्ण धुळे शहरात कुठल्याही प्रकारची यंत्रणा उपलब्ध नसताना फक्त मनपाची यंत्रणा होती त्यावेळी एकच व्यक्ती आहे म्हणून पूर्ण धुळे शहर सांभाळायचे त्यावेळी देखील एवढी जनता होती अधिकारी होते त्यावेळी कुठलीही तक्रार आली नाही आता ठेका देऊन ४० टक्के रक्कम जास्त देऊन धुळे शहराचा कचरा उचलला जात नसेल ही शोकांतिका आहे माझा आरोप आहे प्रशासनाचा चुकीच्या कामामुळे जनतेचा रोष आम्हाला भोगावा लागत आहे हा विषय लवकर मार्गी लावा आणि जुना ठेका रद्द करण्यात यावा आणि जो काही घंटागाड्या दुरुस्तीचा खर्च आहे तो दंडा सहीत त्याच्याकडून वसूल करण्यात यावा आणि सर्व सदस्य मिळून माननीय मंत्री यांची भेट घेऊन त्यांना सांगू आम्ही नागरिकांच्या रोषाला बदनाम होत आहे असे सांगून धुळे शहरातील वर्तमान पेपर भूमिगत गटार व धुळे शहरातील खड्ड्यांचे रोज फोटो येतात याची एनजीपी वाल्यांना लाज वाटत नाही इतक्या दिवसापासून काम चालू आहे त्या ठिकाणी एकही माणूस उपलब्ध नाहीत भागामध्ये २२ फूट खड्डा पडला व त्यात पाणी जर नजरचुकीने कोणी पडला असता तर फार मोठी जीवितहानी झाली असतील हे दोन अधिकारी आपल्याला मिटींगला येतात उडवाउडवीची उत्तरे देतात भागात फक्त मुरूम टाकला आहे आपण आता तरी त्याला किती बिले दिली आहेत याची सविस्तर माहिती पुढच्या मिटींगला उपलब्ध करून द्या माझी एक विनंती आहे त्याच्या दुरुस्तीचे काम पेंडिंग आहे किती किमीचे काम बाकी आहे ते काम आपल्या स्तरावरून करावं.

म. शितल नवले — कापडणीस साहेब हीच वॉटर ग्रेस कंपनी मालेगावला काम करीत होती आपण त्यांना बऱ्यापैकी दंड केला आहे साहेब आपण येथे आल्यावर आपला पेन थांबला सभापती महोदय यांचे पहिले व दुसरे बिल कला त्या बिलामध्ये लेखा विभागाने काढलेले आक्षेप याची पूर्तता केली होती का याची माहिती द्या पहिल्या व दुसऱ्या बिलामध्ये लेखा विभागाच्या रिमार्क होता त्यांनी पीएफ चे चलन जमा करावे माझ्या माहितीप्रमाणे आतापर्यंत एकही पीएफ चे चलन त्यांनी मनपात जमा नाही केले यांनी जे कर्मचारी आपल्याकडे लावले होते त्या कर्मचाऱ्यांचे आपल्या लेखा विभागाने पिएफ नंबर घेतला का ७९ ड्रायव्हर प्लस ट्रॅक्टर ड्रायव्हर प्लस हेल्पर असे एकूण ३५० लोक यांची ईपीएफ नंबर आहे का आणि ३५० लोकांची रक्कम कुठे जाते किती मोठा भ्रष्टाचार आहे मी काय करतो आहे भ्रष्टाचार की जो कोणी या ठेक्या मध्ये इंटरेस्ट घेत आहे सभापती महोदय आपण जर दर मंजुरी केली आहे ना तर मग माझं खुले आव्हान आहे त्याला वर्क ऑर्डर देऊन टाका जर रिकव्हरी झाली तर आपण सर्व मिळून भरून टाकू या माणसाकडे आणि ते तीन कोटीची निघेल ईपीएफ रिकवरी निघेल या मनपाचे तीन ते चार वर्षांपूर्वी ईपीएफ मुळे खाते गोठवण्यात आली होती जर पहिल्या बिलाला आक्षेप घेतला होता तर

शेवटच्या क्षणापर्यंत बिले कसे काढली विषय पटलावर विषय असतांना फाईल सभागृहात का आली नाही पहिले व दुसरे बिल मी पाहिले आहे त्याच्यात दहा गोष्टी अशा होत्या तो आयुष्यात पूर्ण करू शकत नव्हता मला दोन गोष्टी चे उत्तर द्या यांनी पिएफ नंबर घेतले आहे का आणि लेखा शाखेने बँक यादी घेतली आहे का जो कार्यात कसूर करतो आहे त्याच्यावर आत्ताच कार्यवाही करा आणि या ठेकेदाराला दहा टक्के नैसर्गिक वाढ न देता ६० लाख रुपये बिल निघते कसे.

म. चंद्रकांत जाधव — पंचावन्न लाखाचे चाहे जो नालेसफाईचा उचलला होता त्या दोन तीन महिन्याचे बिल वाढले आहे.

म.शितल नवले — या सभागृहाला तुमच्याकडे ओला कचरा आणि सुका कचरा याची वर्गवारी आहे का पाच मे २०१९ पासून ठेका चालू झाला मी त्यांना चॅलेंज करतो २४ महिन्याचे भागिले एकोणीस करा हे काम मी करून दाखवितो अकाउंट वाले अटी शर्ती न वाजता कसे बिल देता पीएफ चे खाते नंबर आहे का धुळ्याचे तीनशे कर्मचारी आहे आणि त्यावर नाशिकचे लोक मजा मारता आणि कोराना काळात एम्पलोयी चा हिस्सा सेंट्रल गव्हर्मेंट भरणार होती त्यांना गाड्या दररोज प्रेशर मशीन नि स्वच्छ करायचे असतात.

म.बी.एस. रनाळकर — जी यादी दिली आहे कर्मचाऱ्यांची त्याची पडताळणी संबंधित विभागाने करायचे असते.

म.शितल नवले — त्यांच्या बिलातून पीएफची रक्कम कपात केली आणि नंतर लगेच देऊन टाकली त्याने अशी कोणत्या कागदपत्रांची पूर्तता केली

म.सभापती — याचं कामकाज बंद कधी करायचं सात दिवसांची मुदत मागितली होती

म.शितल नवले — पुढच्या सोमवारी काम बंद झाले पाहिजे मागे तो एक व्यक्ती सांभाळू शकत होता तर आता एवढ्या गलथान कारभार का होत आहे

म.सभापती — सदर ठेक्या मध्ये सुरुवातीपासून ते आज पर्यंत बऱ्याच मोठ्या प्रमाणावर भ्रष्टाचार झालेला आहे मी या ठिकाणी आपल्या स्थायी समितीला असलेल्या अधिकारान्वये आदेशित करतो कि वॉटरग्रेस कंपनीला जो ठेका देण्यात आला २०१९ ला त्याच्यात निवेदा प्रक्रियेपासून तर आज पर्यंत या संपूर्ण कामाचा लेखापरीक्षण करण्यात यावे सध्या मनपात औरंगाबादचे लेखापरीक्षण सुरु झालेले आहेत त्याच बरोबर दुसरे जे २ बिले आहेत आहेत पुढील दोन महिन्याचे बिल स्थायी समितीच्या निदर्शनात आणून द्यायचे की गाड्या कोणत्या कोणत्या वार्डात किती फिरले आहेत पूर्णपणे याची प्रक्रिया झाल्याशिवाय आणि करारनाम्याची पूर्तता झाल्याशिवाय याच बिल अदा करू नये बिल अदा केल्यास प्रशासनातील सर्व अधिकारी आपण वसुलीस पात्र रहाल याची नोंद घ्यावी त्याच बरोबर आम्ही सन्माननीय सदस्य मिळून बैठक घेतली होती प्रशासनाने सात दिवसांची मुदत सांगितली होती त्याप्रमाणे सोमवारी त्यांची मुदत संपत आहे बुधवारी कुठल्याही परिस्थितीत हे काम बंद करायचे आहे असा आपण याठिकाणी ठराव करू यांनी बंद न केल्यास पुढील कारवाईसाठी कचरा या विषयावर विशेष सभा घेण्यात येईल याची प्रशासनाने नोंद घ्यावी.

## धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर १४०दिनांक ३०/०९/२०२१

मा.सभापती श्री. संजय सुधाकर जाधव सो. स्थायी समिती, मनपा धुळे यांच्या जा.क्रं. धुमपा/ स्था. स./ ६१ दि.२७/०९/२०२१ च्या पत्रानुसार धुळे शहरात सद्यस्थितीत पावसाळी वातावरण लक्षात घेता गटारीमध्ये सांडपाणी तुंबुन डासांची निर्मीती मोठया प्रमाणावर होत आहे.त्यामुळे त्यापासुन होणाऱ्या आजारांचा प्रादुर्भावही मोठया प्रमाणावर सुरु आहे.अशा परिस्थितीवर वेळीच उपाय योजना करुन कार्यवाही होणे हे प्रभागातील नागरीकांच्या आरोग्याच्या दृष्टीने अत्यंत महत्वपुर्ण व आवश्यक आहे.. सद्यस्थितीत महानगरपालिकेने कचरा संकलनासाठी वॉटरग्रेस, नाशिक यांना कंत्राट दिलेले आहे.परंतु कचरा संकलनाचे काम सदर ठेकेदार केवळ १० टक्के काम करीत असुन शहरातील एकुणच परिस्थीतीवरुन दिसत आहे.शहरात विविध भागात कचरा पडलेला दिसतो.विविध भागात घाणीचे साम्राज्य निर्माण झालेले आहे.तसेच घंटागाडयाही शहरात येत नसल्याचे निदर्शनास आले आहे.

यापुर्वीच्या स्थायी समिती सभेमध्ये सदर कंत्राटदाराकडुन साफसफाईचे काम तातडीने काढुन घेवुन मनपा स्तरावरुन याबाबत कार्यवाही करणेबाबत आदेशीत केलेले आहे. तरी सदर स्थायी समिती सभेमध्ये झालेल्या चर्चेनुसार सदर कंत्राटदाराकडुन काम बंद करण्यात येवुन मनपा स्तरावरुन

सदरचे काम करणेबाबत चर्चा करुन निर्णय घेणेस्तव विषय स्थायी समितीपुढे विषय सुचीवर घेणेत आलेला आहे.

सन्मा.सदस्यांनी केलेल्या चर्चेनुसार वॉटरग्रेस कंपनी नाशिक यांच्या विषयी मनपा प्रशासनाला वेळोवेळी प्राप्त झालेल्या धुळेकर नागरीक/सन्मा.लोकप्रतिनिधी/ नगरसेवक तसेच स्थानिक वृत्तपत्रातून नियमित निदर्शनास येणा-या वृत्तांकन इ.नुसार सदर वॉटरग्रेस कंपनी हे धुळे शहरातील कचरा संकलन करणे व विल्हेवाट लावणे हे काम निविदा अटी शर्ती प्रमाणे कार्यवाही करीत नसल्याने शहरात कचरा साचून नागरीकांच्या आरोग्याबाबत अत्यंत धोकादायक परिस्थिती निर्माण झालेली आहे. याविषयी मनपाच्या प्रत्येक सभांमध्ये सन्मा. सदस्यांच्या तक्रारीच्या अनुषंगाने सभापती या नात्याने मनपा प्रशासनास व संबंधित आरोग्य विभागाच्या अधिकारी यांना अत्यंत कडक निर्देश देवूनही वॉटरग्रेस कंपनी व प्रशासनाने त्याच्या कामात कोणतीही सुधारणा केलेली नाही मात्र संबंधित वॉटरग्रेस कपनींचे नियमितपणे देयके अदा करण्यांत येतात.वॉटरग्रेस कंपनीचे आर्थिकहित मनपा प्रशासनाकडून जोपासले जात आहे व नागरीकांचे आरोग्य धोक्यात येवून सुंदर शहर या संकल्पनेला मनपा प्रशासनाकडून बगल दिल्याची भावना पाहता सदरचा ठेका तात्काळ बंद करण्यांचे प्रशासनाला आदेश देण्यात येत असून प्रशासनाने विशेषत:मा.आयुक्त सो.यांनी तात्काळ आदेश आरोग्य विभागासह संबंधित ठेकेदारास देण्यांची कार्यवाही करावी.

सन्मा.सदस्यांचे गंभीर आरोप विचारात घेता मा.आयुक्त सो. यांनी तात्काळ सदर वॉटरग्रेस कंपनीस नियुक्त करण्यापासून निविदा प्रक्रियेपासुन ते आजपावेतो अदा करण्यात आलेल्या देयकांचे सखोल/ सर्वकष लेखापरीक्षण करुन घेणे आवश्यक आहे. त्यासाठी शासनाच्या वित्त विभागाकडील अनुभवी अधिकारी/ कर्मचारी यांचेकडून सदरचे लेखा परीक्षण करुन घ्यावे व या कामातील झालेली आर्थिक अनियमिततेबाबत अहवाल प्राप्त करुन तो स्थायी समितीपुढे सादर करावा.तोपर्यंत सदर वॉटरग्रेस कंपनीचे कोणतेही देयक अदा करण्यांत येवू नये तसेच असे देयक सभेच्या आदेशाशिवाय अदा झाल्यास ती गंभीर अनियमितता व अपहार समजाण्यांत येईल तसेच वॉटरग्रेस कंपनीकडील काम बुधवार दिनांक 6 ऑक्टोबर 2021 पासून बंद करण्यात यावे व पुढील ठेकेदार नियुक्त करे पर्यत मनपा प्रशासनाने शहरातील कचरा संकलन करणे व विल्हेवाट लावणे इ.कार्यवाही मनपा आरोग्य विभागाकडील कर्मचारी यांचेकडून करुन घेण्यांचे उचित कार्यवाही करण्यांची जबाबदारी मा.आयुक्त सो.,यांचेकडेस देण्यांत येत आहे.

**सर्वानुमते मंजुर,**
सही/-X X X
**सभापती,**
**स्थायी समिती,**
**धुळे महानगरपालिका धुळे**

| | |
|---|---|
| विषय क्रमांक:-१३१ | पाणीपुरवठा विभागाकडील मानधनावरील १ फिटर कर्मचारी यांना६महिन्याकरिता मुदतवाढ देणेबाबत आलेल्या कार्यालयीन अहवालावर विचार करणे. |
| म. नगरसचिव | नगरसचिव यांनी विषयांचे वाचन केले. |
| म. शितल नवले | विषय मंजूर करण्यांत यावा. |
| म. अमोल मासुळे | विषय मंजूर करण्यांत यावा. |
| म. सभापती | सर्व सन्मा. सदस्यांच्या सहमतीने सदर प्रस्तावास कार्यालयीन अहवालास अधिन राहून मान्यता देण्यांत येत आहे. |

**धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर १४१ दिनांक ३०/०९/२०२१**

इम्रान शेख इब्राहीम यांची फीटर पदावर.मे.स्थायी समिती ठराव क्र १३७ दि १४/१/२०२१ अन्वये सदर कर्मचा-यास फेर नियुक्ती करणेत आली होती.

पाणीपुरवठा विभागाकडील अहवालानुसार इम्रान शेख इब्राहीम यांची नियुक्तीची मुदत दि १४/७/२०२१ रोजी संपुष्ठात आलेली आहे.

| अ.क्र. | कर्मचाऱ्यांचे नांव | पदाचे नाव |
|---|---|---|
| १ | इम्रान शेख इब्राहीम | फीटर |

पाणीपुरवठा विभागाकडील अहवालानुसार उक्त कर्मचारी यांच्या कामाची निकड पाहता व पाणीपुरवठा व्यवस्था सुरळीत ठेवणेकरीता वरील कर्मचा-यास ०६ महिनेकरीता मुदतवाढ देणेबाबत पत्र सादर करण्यात आलेले आहे.तरी उक्त कर्मचा-यास बाहय स्त्रोत प्रणालीने मनुष्यबळ मिळेपर्यंत मुदत संपल्याच्या दिनांकापासून ५ दिवसाचा खंड करुन एकत्रित करार पध्दतीने मानधन रु ८०००/- मात्र नुसार पुढील ६ महिने करीता मुदतवाढ देणेबाबत महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ५३ (३) नुसार मान्यता मिळणेबाबत प्रस्ताव सादर झालेला आहे.

सर्व सन्मा.सदस्यांच्या सहमतीने व कार्यालयीन अहवालास अधिन राहून श्री. इम्रान शेख इब्राहीम फिटर यांना महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ५३ (३) नुसार बाहय स्त्रोत प्रणालीने मनुष्यबळ मिळेपर्यंत मुदत संपल्याच्या दिनांकापासून ५ दिवसाचा खंड करुन एकत्रित करार पध्दतीने मानधन रु ८०००/- मात्र नुसार पुढील ६ महिने करीता मुदतवाढ देणेबाबत मान्यता देण्यांत येत आहे. सदर प्रस्ताव व कार्यवाही बाबत लेखा आक्षेप निर्माण होणार नाही याची दक्षता घ्यावी. याबाबतची जबाबदारी संबंधित विभागाची राहील.

सुचक :- श्री. शितल मोहन नवले

अनुमोदक:- श्री. अमोल पावबा मासुळे

**सर्वानुमते मंजुर,**

सही/-X X X

**सभापती,**

**स्थायी समिती,**

**धुळे महानगरपालिका धुळे**

विषय क्रमांक:-१३२ — एनयुएचएम व कोविड १९ अंतर्गत नियुक्त ५डाटा एंट्री ऑपरेटर (मानधनावरील)कर्मचा-यांना ६ महिन्याकरिता पुर्ननियुक्ती देणेबाबत आलेल्या कार्यालयीन अहवालावर विचार करणे.

म. नगरसचिव — नगरसचिव यांनी विषयांचे वाचन केले.

म. सुनिल बैसाणे — विषय मंजूर करण्यांत यावा.

म. कमलेश देवरे — विषय मंजूर करण्यांत यावा.

म. सभापती — सर्व सन्मा. सदस्यांच्या सहमतीने सदर प्रस्तावास कार्यालयीन अहवालास अधिन राहून मान्यता देण्यांत येत आहे.

**धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर १४२ दिनांक ३०/०९/२०२१**

कोविड-१९ NUHM अंतर्गत डाटा एंट्री ऑपरेटरसाठी श्री विकास संतोष खलाणे, श्री निलेश भिला सोनवण, व श्री कैलास सतु गलांडे (मानधनावरील) कर्मचा-यांची नियुक्ती करण्यात आली होती. सदर मानधनावरील कर्मचा-यांचे दि. १६/७/२०२१ रोजी मुदत संपुष्ठात आलेली आहे.

कोविड-१९ NUHM अंतर्गत डाटा एंट्री ऑपरेटर साठी श्री उमाकांत दगडू बारी , व कु. ज्योती मोहन पुकळे (मानधनावरील) कर्मचा-यांची नियुक्ती करण्यात आली होती सदर मानधनावरील कर्मचा-यांचे दि ३१/७/२०२१ रोजी मुदत संपुष्ठात आलेली आहे.

आरोग्य विभागाकडील अहवालानुसार उपरोक्त कर्मचा-यांच्या कामाची आवश्यकता व निकड विचारात घेता सदर कर्मचा-यांना कोविड-१९ NUHM अंतर्गत मुदतवाढ देणे शक्य नसल्याने सदर कर्मचा-यांना मनपा फंडातून फेर नियुक्ती बाबत अहवाल सादर केलेला आहे. सदर कर्मचा-यांना कोविड-१९ NUHM अंतर्गत रु. १७,०००/- मात्र मानधनावर नियुक्ती देण्यात आलेली होती . परंतु सदर कर्मचा-यांनी मनपा फंडातून इतर कर्मचा-यांप्रमाणे देय असलेले रु १०,०००/- मात्र माधनावर काम करण्यास खालील कर्मचा-यांनी विनंती अर्ज सादर केलेला आहे

| अ क्र | उमेदवाराचे नाव | पदाचे नाव |
|---|---|---|
| १ | श्री. विकास संतोष खलाणे | |
| २ | श्री. निलेश भिला सोनवणे | |

| | | |
|---|---|---|
| ३ | श्री. कैलास संतु गलांडे | डाटा ऐंन्ट्री ऑपरेटर |
| ४ | श्री. उमाकांत दगडू बारी | |
| ५ | कु. ज्योती मोहन पुकळे | |

तरी वरील तक्त्यात दर्शविलेल्या मानधनावरील कर्मचा-यांस मनपा फंडातून एकत्रित मानधन रु १००००/- प्रमाणे किमान ०६ महिने कालावधीकरीता तात्पुरती फेर नियुक्ती देणेबाबत महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ५३ (३) नुसार मान्यता मिळणेसाठी सदरचा विषय मे. स्थायी समिती पुढे ठेवणेस सादर झालेला आहे.

सर्व सन्मा. सदस्यांच्या सहमतीने व कार्यालयीन अहवालास अधिन राहून उक्त १ ते ५ डाटा एंट्री ऑपरेटर यांना मनपा फंडातून महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ५३ (३) नुसार बाहय स्त्रोत प्रणालीने मनुष्यबळ मिळेपर्यंत मुदत संपल्याच्या दिनांकापासून ५ दिवसाचा खंड करुन एकत्रित करार पध्दतीने मानधन रु.१००००/- मात्र नुसार पुढील ६ महिने करीता मुदतवाढ देणेबाबत मान्यता देण्यांत येत आहे. सदर प्रस्ताव व कार्यवाही बाबत लेखा आक्षेप निर्माण होणार नाही याची दक्षता घ्यावी. याबाबतची जबाबदारी संबंधित विभागाची राहील.

सुचक :- श्री. सुनिल तुळशीराम बैसाणे

अनुमोदक:- श्री.कमलेश नारायणराव देवरे

**सर्वानुमते मंजुर,**

सही/-X X X

**सभापती,**

**स्थायी समिती,**

**धुळे महानगरपालिका धुळे**

विषय क्रमांक:- १३३ — मनपा कार्यालयाकडील ३ डाटा एंट्री ऑपरेटर (मानधनावरील) कर्मचा-यांना ६ महिन्याकरिता पुर्न नियुक्तीने मुदत वाढ देणबाबत आलेल्या कार्यालयीन अहवालावर विचार करणे.

म. नगरसचिव — नगरसचिव यांनी विषयांचे वाचन केले.

म. अमोल मासुळे — विषय मंजूर करण्यांत यावा.

म. भारती माळी — विषय मंजूर करण्यांत यावा.

म. सभापती — सर्व सन्मा.सदस्यांच्या सहमतीने सदर प्रस्तावास कार्यालयीन अहवालास अधिन राहून मान्यता देण्यांत येत आहे.

**धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर १४३ दिनांक ३०/०९/२०२१**

धुळे महानगरपालिकेत जा. क्र. धुमपा/आस्था/३५३९ दि ०२/०२/२०२१ डाटा एंट्री ऑपरेटर (मानधनावरील) कर्मचा-यांची नियुक्ती करण्यात आली होती. सदर मानधनावरील खालील तक्तानुसार कर्मचा-यांचे दि. ०१/०८/२०२१ रोजी मुदत संपुष्ठात आलेली आहे

| अ क्र | उमेदवाराचे नाव | पदाचे नाव |
|---|---|---|
| १ | श्री. पवन किशोर कानडे | डाटा ऐंन्ट्री ऑपरेटर |
| २ | श्री. मिलींद रविन्द्र नगराळे | |
| ३ | श्री. भाग्यश्री प्रकाश मोरे | |

संदर्भीय क्र २,३ व ४ नुसार आरोग्य विभागाकडील, एल. बी .टी विभाग व सा.आयुक्त यांच्या अहवालानुसार उपरोक्त कर्मचा-यांच्या कामाची आवश्यकता व निकड विचारात घेता सदर डाटा एंट्री ऑपरेटर (मानधनावरील) कर्मचा-यांना मुदत संपल्याच्या दिनांकापासून पुढिल ०६ महिने कालावधी करीता पुर्ननियुक्तीने मुदत वाढ देणबाबत पत्र सादर कलेले आहे ऊपरोक्त आह्वाल नुसार तक्तानुसार कर्मचा-यांना बाहय यंत्रणेमार्फत मनुष्यबळ उपलब्ध होईपावेतो ५ दिवसाचा सेवा खंड देवून पुढिल०६ महिने कालावधीकरीता पुर्ननियुक्तीने मुदत वाढ देणेकरीता महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमचे कलम ५३ (३) नुसार मान्यता मिळणे साठी सदरचा विषय मे. स्थायी समितीपुढे प्रस्ताव सादर झालेला आहे.

सर्व सन्मा.सदस्यांच्या सहमतीने व कार्यालयीन अहवालास अधिन राहून उक्त प्रस्तावातील अ.नं. १ ते ३ डाटा एंट्री ऑपरेटर यांना मनपा फंडातून महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ५३ (३) नुसार बाहय स्त्रोत प्रणालीने मनुष्यबळ मिळेपर्यंत मुदत संपल्याच्या दिनांकापासून ५ दिवसाचा खंड करुन एकत्रित करार पध्दतीने मानधन रु.१००००/- मात्र नुसार पुढील ६ महिने करीता मुदतवाढ देणेबाबत मान्यता देण्यांत येत आहे. सदर प्रस्ताव व कार्यवाही बाबत लेखा आक्षेप निर्माण होणार नाही याची दक्षता घ्यावी. याबाबतची जबाबदारी संबंधित विभागाची राहील.

सुचक :- श्री. अमोल पावबा मासुळे

अनुमोदक:- श्रीमती भारती अशोक माळी **सर्वानुमते मंजुर,**

सही/-X X X

**सभापती,**

**स्थायी समिती,**

**धुळे महानगरपालिका धुळे**

| | |
|---|---|
| विषय क्रमांक:-१३४ | धुळे मनपा हद्दीत हॉटेल देश विदेश जवळील सिव्हील हॉस्पिटला जोडणारी मेन पाईप लाईन पिण्याच्या पाण्याच्या सोई करिता शिफ्टिंग करणेचे काम तांतडीने मनपा अधिनियम ६७ (क) अन्वये विना निविदा करुन घेणेत आले तदर्थ झालेला खर्च रु.३,१५,२४८/-मात्र खर्चास कार्योत्तर मंजुरी देणेबाबत आलेल्या कार्यालयीन अहवलावर विचार करणे. |
| म. नगरसचिव | नगरसचिव यांनी विषयांचे वाचन केले. |
| म. सुनिल बैसाणे | सदर विषय मंजूर करण्यांस हरकत नाही. तथापि सदर प्रस्ताव कार्योत्तर मंजुरीसाठी आलेला आहे. सद्यस्थितीत बजेट मंजूर नसल्याने कामांसाठी तरतूद होऊ शकत नाही. प्रशासनामार्फत त्यामुळे कामांना मान्यता देत नाही.मग ही कार्योत्तर मंजुरी कोणत्या निधीतून व हेडखाली देण्यांत आलेली आहे. याबाबत प्रशासनाने खुलासा करावा. मागे आपल्या सनमा. सदस्या श्रीमती हिनाताई पठाण यांच्या प्रभागातील व्हॉल दुरुस्तीचे 60000/- रुपयांचे किरकोळ काम बजेट मंजूर नसल्याने प्रलंबीत ठेवण्यांत आलेले होते. त्यांचाही विषय अत्यावश्यक स्वरुपाचा होता. याबाबत प्रशासनाने खुलासा करावा. |
| म.अति. आयुक्त | महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम 67(3)अन्वये मान्यता दिली जाते अत्यावश्यक व तांतडीच्या कामांसाठी अर्थसंकल्पातील तरतूदीनुसारच मान्यता आवश्यक आहे.आपण कामांना कार्योत्तर मान्यता घेत आहोत. जर अत्यावश्यक विषय असेल तर आपण कामे घेवू शकतो. |
| म. सुनिल बैसाणे | प्रभागातही काही कामे अत्यावश्यक स्वरुपाची असतात.कामांना मान्यता देतांना आपण त्याचा देखील विचार करावा. बजेट तरतूदीबाबत आपण व्यावहारीक भूमिका घेवून प्रशासनाने कार्यवाही करावी ही आमची आपेक्षा आहे. |
| म. शितल नवले | विषय मंजुर करण्यांत यावा. |
| म. सभापती | सर्व सन्मा.सदस्यांच्या सहमतीने व कार्यालयीन अहवालास अधिन राहून सदर कामाचे प्रस्तावास कार्योत्तर मान्यता देण्यांत येत आहे. |

**धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर १४४ दिनांक ३०/०९/२०२१**

धुळे मनपा हद्दीत हॉटेल देश विदेश जागेतील सिव्हील हॉस्पिटला जोडणारी मेन पाईप लाईन पिण्याच्या पाण्याच्या सोई करिता शिफ्टिंग करणे आवश्यक आहे. तरी सदरचा भागात समक्ष पहाणी करून डी.आय. पाईप लाईन स्थलांतरण करणे कामी अंदाजपत्रक तयार केले असता उक्त कामी अंदाजपत्रकीय खर्च रु.३,१५,२४८/- मात्र येणार आहे.

तरी उक्त काम हे नागरिकांचा पिण्याचा पाणीचा प्रश्नाशी निगडीत असल्याने सदरचे काम विना निविदा श्री. गौरव विजय बुरकुले, ठेकेदार, धुळे यांचे कडून करून घेण्यात आलेले असून सदरचे काम महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम नियम ६७ (क) अन्वये विना निविदा करण्यास मंजुरीसाठी व अंदाजपत्रकीय खर्च रु.३,१५,२४८/- मात्र खर्चास कार्योत्तर मंजुरीस्तव मे. स्थायी समितीपुढे सादर झालेला आहे.

सर्व सन्मा.सदस्यांच्या सहमतीने व कार्यालयीन अहवालास अधिन राहून सदर काम झालेल्या खर्च रु. ३,१५,२४८/-मात्रला महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम नियम ६७(क)अन्वये कार्योत्तर मान्यता देण्यांत येत आहे. सदर प्रस्ताव व कार्यवाही बाबत लेखा आक्षेप निर्माण होणार नाही याची दक्षता घ्यावी. याबाबतची जबाबदारी संबंधित विभागाची राहील.

सुचक :- श्री. सुनिल तुळशीराम बैसाणे

अनुमोदक:- श्री.शितल मोहन नवले

**सर्वानुमते मंजुर,**

सही/-X X X

**सभापती,**

**स्थायी समिती,**

**धुळे महानगरपालिका धुळे**

विषय क्रमांक:-१३५ — धुळे मनपा हद्दीतील देवपूर भागातील आयुक्त निवास येथे नवीन गेट बसविणे कलरिंग करणे व इतर अनुषंगिक मी तांतडीने करण्यांत आले.त्यासाठी झालेला खर्च रु.१,०५,१२५/- मात्र खर्चास मनपा अधिनियम ६७(क) अन्वये कार्योत्तर मान्यता देणेबाबत विचार करणे.

म. नगरसचिव — नगरसचिव यांनी विषयांचे वाचन केले.

म.भारती माळी — विषय मंजूर करण्यांत यावा.

म.कमलेश देवरे — विषय मंजूर करण्यांत यावा.

म. सभापती — सर्वसन्मा.सदस्यांच्या सहमतीने सदर प्रस्तावास कार्यालयीन अहवालास अधिन राहून कार्योत्तर मान्यता देण्यांत येत आहे.

**धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर १४५ दिनांक ३०/०९/२०२१**

देवपूर भागांतील मयूर उद्यान येथे आयुक्त निवासस्थानचे गेट नादुरस्त झाल्याने त्याठिकाणी नवीन गेट बसविणे, कलरिंग करणे, ग्रील वर्क करणे,सुशोभिकरण करणे इ.कामे तातडीने करणे गरजेचे असल्याने ठेकेदार मोईनुद्दीन शेख,धुळे यांच्याकडून काम पूर्ण करून घेण्यात आले आहे.

सदर कामास शासकीय दरसूची सन२०२०-२१नुसार रु.१,०५,१२५/-मात्र खर्च अपेक्षित असून सदरचे काम करणे अत्यंत गरजेचे असल्याने उक्त काम ठेकेदार मोईनुद्दीन शेख,धुळे यांच्या मार्फत विना निविदा करण्यात आले आहे. सदरचे काम मुंबई प्रांतिक अधिनियम नियम ६७(क)अन्वये विना निविदा मंजुरीसाठी व अंदाजपत्रकीय खर्च रु. १,०५,१२५/- मात्र खर्चास कार्योत्तर मंजुरीसाठी मे.स्थायी समिती पुढे सादर झालेला आहे.

सर्व सन्मा.सदस्यांच्या सहमतीने व कार्यालयीन अहवालास अधिन राहून सदर काम झालेल्या खर्च रु. १,०५,१२५/- मात्रला महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम नियम ६७(क) अन्वये कार्योत्तर मान्यता देण्यांत येत आहे. सदर प्रस्ताव व कार्यवाही बाबत लेखा आक्षेप निर्माण होणार नाही याची दक्षता घ्यावी. याबाबतची जबाबदारी संबंधित विभागाची राहील.

सुचक :- श्रीमती भारती अशोक माळी

अनुमोदक:- श्री. कमलेश नारायणराव देवरे

**सर्वानुमते मंजुर,**

सही/-X X X

**सभापती,**

**स्थायी समिती,**

**धुळे महानगरपालिका धुळे**

विषय क्रमांक:- १३६ — धुळे मनपा हद्दीतील देवपूर भागांतील प्रभाग क्र.३ मधील शिवपार्वती कॉलनी भागांत देवरे हॉस्पिटल ते आग्रा रोड पावेतो आरसीसी पाईप गटार करणेचे काम तांतडीने तांतडीने मनपा अधिनियम ६७ (क) अन्वये विना निविदा करुन घेणेत येत आहे तदर्थ खर्च रु.७,९४,४५३/- मात्रला कार्योत्तर मंजुरी देणेबाबत आलेल्या कार्यालयीन अहवलावर विचार करणे.

म. नगरसचिव — नगरसचिव यांनी विषयांचे वाचन केले.

म.कमलेश देवरे — विषय मंजूर करण्यांत यावा.

म. सईद बेग	विषय मंजूर करण्यांत यावा.

म. सभापती	सर्व सन्मा.सदस्यांच्या सहमतीने सदर प्रस्तावास कार्यालयीन अहवालास अधिन राहून कार्योत्तर मान्यता देण्यांत येत आहे.

**धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर १४६ दिनांक ३०/०९/२०२१**

धुळे मनपा हद्दीतील देवपूर भागांतील प्रभाग क्र.३ मधील शिवपार्वती कॉलनी भागांत देवरे हॉस्पिटल ते आग्रा रोड पावेतो आरसीसी पाईप गटार करणे बाबत संदर्भीय पत्रानुसार मागणी करण्यात आली आहे.यापूर्वी सदर भागांतील सांडपाण्याचा निचरा करणे साठी आयटीआय कॉलेज च्या आवारातून आरसीसी पाईप टाकण्यात आले होते.परंतु आयटीआय कॉलेज मार्फत सदर ठिकाणी भराव करून सांडपाण्याचा प्रवाह थांबविण्यात आल्याने उक्त भागांतील सांडपाणी रस्त्यावर येत असून सदर सांडपाण्याचा निचरा करणेबाबत उक्त भागांतील नागरिक श्री.चौधरी यांनी प्रधानमंत्री कार्यालय नवी दिल्ली येथे तक्रार केली होती.त्यानुसार प्रधानमंत्री कार्यालय नवी दिल्ली येथून मा.आयुक्त यांना सदरचे काम तातडीने करून सदर तक्रारीचे निवारण करणे बाबत आदेशित केले आहे.तसेच सभापती आपल्या दारी मोहिमे अंतर्गत दि.०७/०१/२०२१ मा.सभापती,मा.अभियंता यांनी पाहणी करून सदर ठिकाणी तातडीने गटार करणे बाबत आदेशित केले आहे.

त्यानुसार सदर कामाचे अंदाजपत्रक तयार केले असून सदर कामास शासकीय दरसूची सन २०२०-२१ नुसार रु.७,९४,४५३/-मात्र खर्च अपेक्षित असून सदरचे काम करणे आरोग्याच्या दृष्टीने अत्यंत आवश्यक असल्याने उक्त काम ठेकेदार ओम शिव कन्स्ट्रक्शन, धुळे यांच्या मार्फत विना निविदा करून घेण्यासाठी सदरचे काम महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम नियम ६७ (क) अन्वये विना निविदा करण्यास मंजुरीसाठी व अंदाजपत्रकीय खर्च रु.७,९४,४५३/-मात्र खर्चास कार्योत्तर मंजुरीसाठी मे. स्थायी समिती सादर झालेला आहे.

सर्व सन्मा.सदस्यांच्या सहमतीने व कार्यालयीन अहवालास अधिन राहून सदर काम झालेल्या खर्च रु.७,९४,४५३/- मात्रला महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम नियम ६७(क)अन्वये कार्योत्तर मान्यता देण्यांत येत आहे. सदर प्रस्ताव व कार्यवाही बाबत लेखा आक्षेप निर्माण होणार नाही याची दक्षता घ्यावी. याबाबतची जबाबदारी संबंधित विभागाची राहील.

सुचक :- श्री. कमलेश नारायणराव देवरे

अनुमोदक:- श्री. सईद बेग हाशम बेग

**सर्वानुमते मंजुर,**

सही/-X X X

**सभापती,**

**स्थायी समिती,**

**धुळे महानगरपालिका धुळे**

# धुळे महानगरपालिका,धुळे
## नगरसचिव कार्यालय
## स्थायी समिती सभा क्रमांक २० चे इतिवृत्त

---

**धुळे मनपा भारतरत्न अटलबिहारी वाजपेयी सभागृह**
**गुरुवार दिनांक ३०/०९/२०२१**
**वेळ दुपारी १२-३० वाजता.**

धुळे महानगरपालिका स्थायी समितीची ऑन लाईन विशेष सभा आज गुरुवार दिनांक ३०/०९/२०२१ रोजी दुपारी १२-३० वाजता **मा.श्री संजय सुधाकर जाधव,सभापती**,स्थायी समिती, मनपा,धुळे यांच्या अध्यक्षतेखाली **धुळे मनपा भारतरत्न अटलबिहारी वाजपेयी सभागृह** भरली. ऑनलाईन सभेस खालील सन्मा.सदस्य सभागृहात हजर होते.

| अ.क्रं. | सदस्यांचे नांव | हुद्दा |
|---|---|---|
| १ | श्री. जाधव संजय सुधाकर | सभापती |
| २ | श्री. वैसाणे सुनिल तुळशिराम | सदस्य |
| ३ | श्रीमती माळी भारती अशोक | सदस्या |
| ४ | श्रीमती पाटील मंगला सुरेश | सदस्या |
| ५ | श्रीमती बोरसे पुष्पा प्रकाश | सदस्या |
| ६ | श्री. मासुळे अमोल पावबा | सदस्य |
| ७ | श्री. देवरे कमलेश नारायण | सदस्य |
| ८ | श्रीमती पठाण हिना अस्लम | सदस्या |
| ९ | श्री. सईद बेग हाशम बेग | सदस्य |
| १० | श्री. नवले शितल मोहन | सदस्य |
| ११ | श्री. बोरसे नागसेन दामोदर | सदस्य |
| १२ | श्रीमती कुलेवार किरण राकेश | सदस्या |
| १३ | श्रीमती वराडे वैशाली भिकन | सदस्या |
| १४ | श्री. जाधव बन्सीलाल माणिक | सदस्य |
| १५ | श्रीमती चौधरी मंगला अर्जुन | सदस्या |

**उपस्थित अधिकारी गण**

| अ.क्र. | अधिकाऱ्यांचे नाव | हुद्दा |
|---|---|---|
| १ | श्री. नितीन कापडणीस | अति. आयुक्त |
| २ | श्रीमती शिल्पा नाईक | उपायुक्त |
| ३ | श्रीमती पल्लवी शिरसाठ | सहा. आयुक्त |
| ४ | श्री. एन. पी. सोनार | सहा. आयुक्त |
| ५ | श्री. मनोज अरविंद वाघ | प्र. नगरसचिव |
| ६ | श्री. के. एन. शिंदे | अभियंता |
| ७ | डॉ. महेश मोरे | आरोग्याधिकारी |
| ८ | श्री. चंद्रकांत जाधव | सहा.आरोग्याधिकारी |
| ९ | श्री. लक्ष्मण पाटील | सहा.आरोग्याधिकारी |
| १० | श्री.बी.एस. रनाळकर | प्र. लेखाधिकारी |
| ११ | श्री.रमजानअन्सारी | कार्यालय अधिक्षक |
| १२ | श्री. एन.के. बागुल | विद्युत अभियंता |

| | | |
|---|---|---|
| १३ | श्री. सी.एम. उगले | पा. पु. ओव्हरसिअर |
| १४ | श्री. सी.सी. बागुल | पा. पु. ओव्हरसिअर |
| १५ | श्री. कमलेश सोनवणे | ओव्हरसिअर न.र. वि. |
| १६ | श्री. हेमंत पावटे | ओव्हरसिअर बां.वि. |
| १७ | श्री.प्रसाद जाधव | अति. विभाग |
| १८ | श्री. राजू माईनकर | भांडारपाल |
| १९ | श्री. किशोर सुडके | बाजार विभाग |
| २० | श्री. राजकुमार सुर्यवंशी | प्र. अधिक्षक परवाना विभाग |

विषय क्रमांक:-१३७ — धुळे म.न.पा. क्षेत्रातील पथदिव्यांची दैनंदिन निगा व दुरुस्ती, संपूर्ण साहित्य व मजुरी खर्चासह तसेच पथदिवे चालू बंद करणे,व्यवस्था हाताळणी करणेचे काम वार्षिक करार पद्धतीने करणे कामाला ३ महिने मुदत वाढ देणे बाबत आलेल्या कार्यालयीन अहवालावर विचार करणे.

म. नगरसचिव — नगरसचिव यांनी विषयांचे वाचन केले.

म.सुनिल बैसाणे — सभापती महोदय, नाशिकच्या या कंपनीला या अगोदर मी सभापती असतांना 6 महिन्यासाठी मुदतवाढ दिलेली होती.आणि आपण आज धुळे शहरामध्ये Led बसविणेचे चांगले काम सुरु केले आणि नवीन एजन्सीच्या माध्यमातून काम करतो आहे. माझी आपल्याला विनंती आहे श्री. बागुल सो. मी तुम्हाला मागील 6 महिन्यांपासून सांगतो आहे.मनपा प्रशासनातील किती कर्मचारीआपल्या विभागात आहे. सुपरवायझर,इंजिनिअर त्यांच्याकडे मनुष्यबळ नसल्या कारणाने ते सांगतात आम्ही करु शकत नाही अशी अडचण आहे. माझी प्रशासनाला विनती आहे आपल्याकडे मनुष्यबळ नाही तर ज्या अत्यावश्यक पदे मानधनावर का म्हणून भरती करत नाही. मागे देखील ईजिनिअराची भरती प्रक्रिया केली होती ती काही तांत्रिक कारणामुळे रद्द झाली परंतुLedचे चांगल काम होत असतांना त्याठिकाणी तुम्हाला सुपरवायझर नाही हेल्पर नाही अभियंता नाही बागुल सो. तुम्ही माणसाची मागणी केली आहे का?

म. एन.के. बागुल — आपण आस्थापना विभागाकडे मागणी केलेली आहे.4माणसाची ईजिनिअर म्हणून मागणी केली आहे.

म. सुनिल बैसाणे — बागुल सो. तुम्हाला अडचण काय आहे.

म. एन.के. बागुल — इंटरव्हयु रद्द झाल्याने माणसे मिळत नाही.

म.रमजान अन्सारी — आयुक्त सो. यांच्याकडेस चर्चा झाली पुढील तारीख मिळणेबाबत अति.आयुक्त सो. यांचेशी चर्चा करुन तारीख ठरविण्यांत येईल.

म.सुनिल बैसाणे — यामुळे आपल्याला अनेक अडचणींना सामोरे जावे लागत आहे. चांगल काम सुरु असतांना आपल्याला रोषाला सामोरे जावे लागते तरी यासाठी साहेब तुम्ही तात्काळ कार्यवाही करा.

म. भारती माळी — धुळे मनपा मध्ये कर्मचारी संख्या अतिशय कमी आहे. सर्व विभागात आपण दि. 20/5/2021 ला इंटरव्हयूसाठी बोलविले होते ती काही कारणामुळे रद्द करण्यांत आली. ज्या ज्या विभागात कर्मचा-यांची गरज आहे.ते ते कर्मचारी मानधनावर भरावयास पाहिजे होते आज आपल्या मनपात अशी परिस्थिती आहे एक एक कर्मचारी चार कामे करतो आहे जे काम आठ दिवसांनी व्हावयास पाहिजे ते दोन महिन्यात होते म्हणजे सर्वच कामांना विलंब होतो. गतीमान प्रशासन आपल्याला हवे असेल तर हे पद मानधन तत्वावर भरणे खूप गरजेचे आहे. जेणे करुन धुळे शहरातील जे बेरोजगार आहेत त्यांना काम मिळेल.

म. सभापती — मानधनावरील कर्मचारी भरणेची प्रक्रिया कुठ पर्यत आलेली आहे. प्रक्रिया का थांबविली आहे.

म. रमजान अन्सारी — पुढील इंटरव्हयु घेण्यासाठी तारीख मागितली होती.

म. सुनिल बैसाणे — यांनी स्थगित करायचे कारण असे होते मानधन तत्वावर ऑलरेडी मनपात कर्मचारी काम करीत आहे. त्यांनी ठरावयाला पाहिजे होते. त्यांच्या व्यतिरिक्त इंअरव्हयु घ्यावयास पाहिजे होती. यांनी काय केले जे जुने कर्मचारी होते त्यांना तेथे घेवून गोंधळ घातला मग जाहिरात कशाला काढतात असा गोंधळ झाला म्हणून ती स्थगित झाली.

म.सभापती — यापुढे त्यांना वेठीस धरु नका.

म. सुनिल बैसाणे — हा सावळा गोंधळ केव्हा झाला यांनी काही मुलांचे इंटरव्हयु चालू असतांना शिष्टमंडळ गेले आयुक्तांसाहेबाकडे तेथून इंटरव्हयुला स्थगिती मिळाली.

म. अमोल मासुळे — याठिकाणी जो लाईट संबंधि विषय घेतलाआहे तो महत्वाचा आहे ज्या प्रमाणे आपण कच-यांच्या समस्येला सामोरे जात आहोत. त्याच प्रमाणे लाईटाबाबतही धुळेकर त्रस्त झाले आहेत. भारतीय जनता पार्टीच्या माध्यमातून अतिशय चांगली योजना आणून धुळे शहर लख्ख प्रकाशमय होईल अशी योजना आणली आहे. याठिकाणी अतिशय चांगली योजना आणल्यानंतर नियोजन कशा पध्दतीने झाले पाहिजे होते. याठिकाणी जे लाईट लावले आहेत. ते पण बंद पडत आहे. आता या ठिकाणी देखभाल दुरुस्तीसाठी मुदतवाढ देतो आहे. माझ्या प्रभागामध्ये एका व्यक्तीने 26/8/21 रोजी तक्रार केली आहे. जगदंबा हौ. सो. मध्ये एक महिन्यापासून त्याठिकाणचे 13 लाईटापैकी 9 लाईट बंद असून 4 लाईट सुरु आहे. त्याठिकाणी अक्षरशाअंधारातून नागरीकांना जावे लागते. इतकीर चांगली योजना आली आहे याठिकाणी चांगले नियोजन केले पाहिजे होते त्या नियोजनात आपण अपयशी ठरलो आहोत. बागुल सो. ही योजना किती कोटीची होती आणि आता पर्यत किती बील देण्यांत आले आहे. यांची माहिती आम्हाला मिळावी आता देखभाल दुरुस्तीसाठी जी मुदत वाढ देत आहोत याबाबत सर्वांना आपल्या दालनात मिटींग घेवून काम कशा पध्दतीने करावे याबाबत नियोजन करुन करावे कारण आता पुढे नवरात्र, दसरा, दिवाळीचे दिवस येत आहे.

म. एन.के. बागुल — पाहिले आर.ए.बील आपण 1.40 लाखाचे दिले आहे. जी मंजुरी मिळाली आहे ती 13.65 लाखाची आहे. आतापर्यत जे लाईट लावले गेले आपल्या दोन वर्कऑर्डर आहेत. पांझरा नदीच्या उत्तरेकडे व दक्षिणेकडेस शहर भागात 8 सप्टेंबर पर्यत 4187 लाईट लागले आहे. आणि देवपूर भागात 2317 लाईट लागले आहेत.आता जो मेटेन्ससाठी विषय आलेला आहे.यांची मुदत वाढविण्यासाठी जुलै 2021 या महिन्यातच टिपणी ठेवली होती. की मेटेन्नस काम चालू ठेवावे लागेल परंतु मा.आयुक्त सो. यांनी नवीन ठेकेदाराला सांगून त्यांकडून काम तांतडीने करुन घेण्यांचे आदेश दिले. त्यासाठी त्याला माणसे वाढविण्यांचे सांगितले होते. परंतु ठेकेदाराने माणसे वाढविले नाही. जे लाईट बंद आहे ते बंद राहिले जे नवीन लाईट बंद पडले आहेत ते लावण्यासाठी त्यांना पत्र दिले आहे.आपण यापूर्वी महापौर यांच्या दालनात नियोजना केले होत. प्रभाग निहाय काम करु. प्रभाग क्र.1 आणि प्रभाग क्. 19 परंतु विविध पदाधिकारी नगरसेवकांकडून सुचना झाल्यानंतर त्यांचे लाईट लावले आहेत. त्याच्याकडे सर्व व्हॅटचे लाईट उपलब्ध असणे आवश्यक होते. 26,40,60 व्हॅट ते वेळोवेळी उपलब्ध नव्हते परवान आयुक्त सो. यांच्याकडे आढावा बैठक झाली त्या ठिकाणी त्यांना सांगितले तुम्ही सर्व लाईट उपलब्ध ठेवा 5 दिवसामध्ये चार्ट तयार करतो आणि दिवाळी पूर्वी 80 टक्के भाग कव्हर करावयाचा आणि एका प्रभागात 2 दिवस काम करायचे त्यांचा चार्ट तयार करुन संबंधित नगरसेवकांना द्यावयाच्या आहेत त्याबाबत सुचना दिलेल्या आहेत. प्रभाग निहाय टाईमटेब्ल करायला सांगितले आहे.

म. सईद बेग — Led चा जो ठेका दिला आहे त्याच नियोजन व्यवस्थित न झाल्याने जे लाईट बंद आहेत ते आजपर्यत बंद आहेत.आणि जे चालू होते ते काढून Led लाईट लावण्यात आले ठेकेदाराचा मॅनेजरला फोन केला तर तो फोन उचलत नाही. बागुल सो.यांना फोन केला तर ते म्हणतात पराग ठाकरे कडे बोला.परंतु आजपर्यत लाईट बंद आहेत.

म. सभापती — ज्या प्रभागात काम चालू आहे त्या प्रभागातील चारही नगरसेवकांच्या संपर्कात रहावयास सांगा.

म. नागसेन बोरसे — जो Led चा ठेकेदार आहे त्यांचे फक्त 10 लोक कामाला लावले आहेत 10 लोकांमध्ये 14700 लाईट लावायला 6 महिनें लागतील माझ्या भागात काही लाईट बंद आहेत. माझी अशी विनंती आहे आपण देखभाल दुरुस्तीचे ठेकेदाराला 2-3 महिन्यांची मुदतवाढ देतो आहे तर त्याला 6 महिन्यांची मुदतवाढ दिली पाहिजे. जो पर्यत धुळे शहराचे पूर्ण लाईट लावले जात नाही तोपर्यत हया ठेकेदाराला ठेवण्यांत यावे तसेच जी नैसर्गिक वाढ असेल ती देण्यांस हरकत नाही हा विषय मंजुर करण्यांत यावा ही विनंती.

म. भारती माळी — माझ्या प्रभाग क्रं. २ मध्ये इतकी वाईट परिस्थिती आहे माझ्या प्रभागात लाईट बंद आहे चालायला रस्ता नाही इतका अंधार असतो की लोक मोबाईलचा टॉर्च लावून फिरता तेच फोटो काढून मला सेंन्ट करतात सभापती महोदय देवपूर भागात लाईट लावणे अतिशय गरजेचे आहे प्रथम देवपूर भागात

लाईट लावावे जेणे करुन खड्डे तरी दिसतील चालतजांना 25 दिवसापासून उत्तर ऐकत आहे लाईट उपलब्ध नाही आल्यावर लावण्यांत येईल.

म. सुनिल बैसाणे — सभापती महोदय, त्यांचे आतापर्यंत 5 ते 6 कोटीचे काम करुन टाकली आहे आणि त्याला फक्त 1.40 लाख दिलेले आहेत. आणि जे काम करीत नाही त्यांना आपण बील अदा करतो यांनी काम केलेले आहे काम चांगले होणार आहे त्याचे बील कशासाठी अडवले . शहरात इतक चांगले काम झाले आहे आपण त्यांचे 25% बील कपात करतो.

म. भारती माळी — माझ्याकडे एकच कर्मचारी आहे मेंन्टेनन्ससाठी आणि माझ्या प्रभागात लाईटाचे काम सुरु करा. बागुल सो. म्हणतात देवपूर भागात 2 हजार लाईट लावले कोणत्या कोणत्या ठिकाणी लावले मला याच उत्तर पाहिजे.

म. एन.के. बागुल — प्रभाग क्रं. 1 मध्ये लावले प्रभाग क्रं. 2 मध्ये प्रभातनगर मध्ये लावले प्रभाग क्रं. १ मध्ये 70 टक्के करुन झाले आहे.स्टेडियम समोरच्या 80 टक्के कॉलन्या प्रभातनगर मध्ये साधारण 70 लाईट लावले नकाणे रोड पासून ते प्र.क्रं. 6 चा भाग आहे ते नगावबारी पर्यत प.क्रं. 1 आहे.

म. भारती माळी — पाडवी सोसायटीत एक गरोदर महिला होती लाईट नसल्याने तीला अंधा-यात दिसत नाही ती त्याठिकाणी पडली.

म सभापती — भारती ताईच्या भागातील ज्या ज्या तक्रारी असतील त्या प्रथम पूर्ण करा.

म. अमोल मासुळे — सध्या पावसाचे दिवस आहे संध्याकाळी लवकर अंधार पडतो जे कर्मचारी आहेत लाईट ऑन ऑफ करणारे ते 7. 45 वाजता लाईट लावतात लाईट थोडे लवकर लावण्यास सांगावे.

म. नागसेन बोरसे — जो नवीन ठेकेदार कामाला लावला आहे तो फक्त 25 वॅटचे लाईट लावतो आहे 9 मिटरला जर 25 वॅटचे लाईट लावले तर उजेड पडेल काय?

म. एन.के. बागुल — 9 मिटरला 60 वॅटचे लाईट लावले पाहिजे परंतु त्याच्याकडे लाईट शिल्लक नाही त्यामुळे त्यांचे कमी वॅटचे लाईट लावले ते काढावे लागणार आहे आणि ती दुरुस्ती करुन घ्यावी लागणार आहे. आता त्याला मनुष्यबळ वाढविण्यास सांगितले आहे.

म. शितल नवले — हा जो विषय आहे त्यांची आपण कुठल्या निधीतून तरतूद केली आहे.

म. एन.के. बागुल — हे काम मनपा फंडातून घेतले आहे.

म. शितल नवले — माझी विनंती आहे आपल्याला सर्व नगरसेवकांची एक बैठक लावा आपण एक दिवसात एक प्रभागात काम करण्यांत यावे.आपण प्र. क्रं.1आणि प्र.क्रं. 19 ला काम करतो आहे ना तर दुस-या दिवशी प्र.क्रं .2 आणि18ला काम करायचे किमान थोडे थोडे लाईट लागले ना नाही तर प्रक्रं.18 पुढच्या पंचवार्षिकला लाईट लागतील मागे सेंट्रल गवहर्मेंटच्या पैशातून ते काम होणार होते आज ते आपण फंडातून करतो आहे महिन्याला किती विज बचत होत आहे.

म. एन.के. बागुल — 3,75,000 इतके सेव्हींग आलेले आहे.

म. शितल नवले — प्रत्येक प्रभागात थोडे थोडे का होईना नियोजन करा जर एका प्रभागात 2 हजार लाईट लागले तर दुस-या प्रभागात 70 लाईट लागले तर बॅलन्स कसे होणार सभापती महोदय त्याला पेमेंट करा पैसे दिले तर तो काम करणार आहे.

म. सभापती — दर आठवडयाला आपली बैठक घेत जाऊ व याबाबत आयुक्तांशी चर्चा करुन नियोजन करु.

सर्व सन्मा सदस्यांनी केलेली चर्चा व मा.आयुक्त सो. यांनी सादर केलेला कार्यालयीन अहवाल लक्षात घेता मे. ओमश्री मंगलमुर्ती इलेक्ट्रीकल्स नाशिक यांना शहरातील विद्युत दिवे देखभाल दुरुस्तीसाठी दिनांक 9/7/2021 ते10/8/2021 या मागील कालावधीसाठी कार्योत्तर मान्यता तसेच पुढील 3 महिन्यासाठी मुदतवाढ देण्यांस मान्यता देण्यांत येत आहे. व पुढील कालावधीसाठी कामाची

आवश्यकता असल्यास प्रशासनाने तांतडीने मुदतवाढ देण्यांची कार्यवाहीसही मान्यता देण्यांत येत आहे.याबाबत स्थायी समितीस अवगत करण्यांत यावे.

**धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर १४७दिनांक ३०/०९/२०२१**

धुळे म.न.पा क्षेत्रातील पथदिव्यांची दैनंदिन निगा व दुरुस्ती ,संपूर्ण साहित्य व मजुरी खर्चासह तसेच पथदिवे चालू बंद करणे,व्यवस्था हाताळणी करणेचे काम वार्षिक करार पद्धतीने करणे कामाचे कार्यादेश धूमपा /वि.वि./ 40 दि.11/01/2018 नुसार 3 वर्षाकरिता मे. ओम श्री. मंगल मूर्ती इलेक्ट्रिकल्स & CONTRACTOR, नाशिक यांना देण्यात आले होते. 3वर्ष मुदतीनुसार दि. 10/01/2021 रोजी सदर कामाची मुदत संपुष्ठात येत होती.त्यानुसार स्थायी समिती ठराव क्र.150.दि.1-2-2021 नुसार मे. ओम श्री.मंगल मूर्ती इलेक्ट्रिकल्स & CONTRACTOR,नाशिक यांना 6 महिने मुदतीकरिता मुदतवाढ देण्यात आलेली आहे.यानुसार दि.10-7-2021 रोजी मुदत संपलेली आहे.

तसेच धुळे महानगरपालिका हद्दीतील शहर व देवपूर भागातील जुने पथदिवे काढून नवीन LED पथदिवे बसविणे.तसेच आवश्यकतेनुसार गर्डर पोल,स्ट्रीट लाईट कंडक्तर,केबर वायर,तुमार CONTRACTOR MCCC,RCCCB,स्ट्रीट लाईट कंट्रोल panal व इतर संबधित विद्युत साहित्य बसविणे ई. 5 वर्ष मुदतीकरिता कामासाठी ई निविदा क्र.65 दि. 07/10/2020 नुसार कार्यवाही करणेत आली आहे.त्यानुसार कंत्राटदार मे,वल्लभ इलेक्ट्रिकल्स, व्ही.यु.नगर,जि.आनंद ,गुजरात .यांना सदर कामांचे कार्यादेश क्र.विवि/37,38. दि.25-1-2021नुसार देण्यात आलेले आहेत.परंतु संदर्भीय पत्रानुसार मीटर पॉईट, मेनस्वीचेस ई. बाबी समजण्यासाठी आम्हास सुमारे तीन महिने कालावधी लागेल, तो पर्यंत सद्यस्थितीत असलेले कंत्राटदार यांचेकडून देखभाल दुरुस्ती करणेत यावी.असे पत्रात नमूद केले आहे. सद्यास्थितीत पावसाळ्यामुळे बंद पथदिवे तक्रार मध्ये वाढ झालेली आहे.तथा LED पथदिवे बसविणारे मक्तेदार यांचेकडे अद्याप पुरेसा LED पथदिव्यांचा साठा नसल्याने सदर तक्रारी प्रलंबित राहतील.

नवीन LED पथदिवे बसविण्याचे कार्यादेश झाल्यानंतर पूर्ण पथदिवे बदलविणे व दरम्यानची निगा व दुरुस्ती यासाठी 8 महिने कालावधी लागणार आहे.जसजसे नवीन मक्तेदाराचे काम प्रगतीत राहील त्याप्रमाणे पूर्वीच्या मक्तेदाराच्या कंत्राटात मधून त्या पथदिव्यांची संख्या कमी होवून मर्यादेत कामाचे देयक ओम श्री मंगलमूर्ती इलेक्ट्रिकल कॉन्ट्रॅक्टर ,नाशिक यांना दिले जाईल.

दि.14-6-2021 पासून मे.वल्लभ इलेक्ट्रिक,गुजरात यांनी शहरात LED पथदिवे बसविणेचे काम सुरु केले आहे. तथापि मक्तेदाराची कामाची प्रगती कमी असून योजनेनुसार प्रभाग निहाय काम करणेसाठी पुरेशा प्रमाणात LED पथदिवे उपलब्ध नाही.

दि.१०/०८/२०२१ रोजी पुर्वीचा देखभाल दुरूस्तीचा मक्ता बंद करण्यात येऊन एल. ई. डी. बसविणारे मक्तेदार यांनाच देखाभाल दुरूस्तीचे काम सोपविण्यात आले आहे. या मध्ये बंद पथदिव्यांच्या जागी नविन एल.ई.डी पथदिवे बसविण्यासाठी आदेशीत करण्यात आले तथापि सदर कामी प्रचंड दिरंगाई होत असुन मक्तेदाराकडुन त्यांचे विलंबाबाबत आग्रह होत असुन मटेरिअल अभावी कामे ठप्प आहे.

सदया पावसामुळे बंद पथदिव्याची संख्या वाढली असुन नागरिकांच्या सुविधेसाठी अस्तित्वातील पथदिवे सुरू करणे आवश्ःयक आहे. ओम श्री मंगलमुर्ती यांना मुदत वाढ देण्यासाठी माहे जुलै मध्ये प्रस्तावित करण्यात आले होते. तथापि १०ऑगस्ट पासून म.आयुक्त सो.,यांच्या निर्देशानुसार काम बंद करण्यात आले आहे.सदयास्थितीत एल.ई.डी पथदिवे बसविण्याचे कामेही योग्य गतीने होत

नसल्याने व बंद पथदिव्याच्या वाढत्या तक्रारी पाहता देखभाल दुरूस्तीचे कामी आदेश होणे आवश्यक आहे.याबाबत म.महापौर सो.,यांनी तांतडीने कार्यवाही करणे बाबत आदेशी केले आहे.

सदर कामी दि.१०/०८/२०२१ पासून खंड झाला असल्याने दि.०९/०७/२०२१ ते १०/०८/२०२१ पर्यंत तसेच यापुढील कामी तातडीची बाब म्हणून नागरी मुलभुत सुविधेचे काम असल्याने महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम 5 (2)(2) नुसार सदर कामी किमान 3 महिने मुदतवाढ देणेकरिता सदर प्रस्ताव हा शहराच्या दृष्टीने महत्वाचा असल्याने व नागरिकांच्या तक्रारी लक्षात घेता सदर कामी मुदवाढ देणे गरजेचे असल्याने महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम अनुसुची ड प्रकरण २ नियम ३ क अन्वये सदरचा प्रस्ताव मे. स्थायी समिती पुढे सादर झालेला आहे.

सर्व सन्मा सदस्यांनी केलेली चर्चा व मा.आयुक्त सो. यांनी सादर केलेला कार्यालयीन अहवाल लक्षात घेता मे.ओमश्री मंगलमुर्ती इलेक्ट्रीकल्स नाशिक यांना शहरातील विद्युत दिवे देखभाल दुरुस्तीसाठी दिनांक 9/7/2021 ते10/8/2021 या मागील कालावधीसाठी कार्योत्तर मान्यता तसेच पुढील 3 महिन्यासाठी मुदतवाढ देण्यांस मान्यता देण्यांत येत आहे. व पुढील कालावधीसाठी कामाची आवश्यकता असल्यास प्रशासनाने तांतडीने मुदतवाढ देण्यांची कार्यवाहीसही मान्यता देण्यांत येत आहे.याबाबत स्थायी समितीस अवगत करण्यांत यावे.

सुचक :- श्री. सुनिल तुळशीराम बैसाणे
अनुमोदक:- श्री. नागसेन दामोदर बोरसे

**सर्वानुमते मंजुर,**

**सही/-x x x**

**सभापती,**
**स्थायी समिती,**
**धुळे महानगरपालिका धुळे**

# धुळे महानगरपालिका,धुळे

## नगरसचिव कार्यालय

## स्थायी समिती सभा क्रमांक २१ चे इतिवृत्त

---

**धुळे मनपा भारतरत्न अटलबिहारी वाजपेयी सभागृह**
**गुरुवार दिनांक १४/१०/२०२१**
**वेळ :-सकाळी ११-०० वाजता.**

धुळे महानगरपालिका स्थायी समितीची ऑन लाईन साप्ताहिक सभा आज गुरुवार दिनांक १४/१०/२०२१ रोजी सकाळी ११-०० वाजता **मा.श्री संजय सुधाकर जाधव,सभापती**,स्थायी समिती, मनपा,धुळे यांच्या अध्यक्षतेखाली **धुळे मनपा भारतरत्न अटलबिहारी वाजपेयी सभागृह** भरली. ऑनलाईन सभेस खालील सन्मा.सदस्य सभागृहात हजर होते.

| अ.क्रं. | सदस्यांचे नांव | हुद्दा |
|---|---|---|
| 1 | श्री. जाधव संजय सुधाकर | सभापती |
| 2 | श्री. बैसाणे सुनिल तुळशिराम | सदस्य |
| 3 | श्रीमती माळी भारती अशोक | सदस्या |
| 4 | श्रीमती  पाटील मंगला सुरेश | सदस्या |
| 5 | श्रीमती बोरसे पुष्पा प्रकाश | सदस्या |
| 6 | श्री. मासुळे  अमोल पावबा | सदस्य |
| 7 | श्री. देवरे कमलेश नारायण | सदस्य |
| 8 | श्रीमती  पठाण हिना अस्लम | सदस्या |
| 9 | श्री. सईद बेग हाशम बेग | सदस्य |
| 10 | श्री. नवले शितल मोहन | सदस्य |
| 11 | श्री. बोरसे नागसेन दामोदर | सदस्य |
| 12 | श्रीमती कुलेवार किरण राकेश | सदस्या |
| 13 | श्रीमती वराडे  वैशाली  भिकन | सदस्या |
| 14 | श्री. जाधव बन्सीलाल माणिक | सदस्य |
| 15 | श्रीमती चौधरी मंगला अर्जुन | सदस्या |
| 16 | श्री. पटेल अमीन अब्दुल करीम | सदस्य |

**उपस्थित अधिकारी गण**

| अ.क्र. | अधिकाऱ्यांचे नाव | हुद्दा |
|---|---|---|
| 1 | श्री. देविदास टेकाळे | आयुक्त |
| 2 | श्री. नितीन कापडणीस | अति. आयुक्त |
| 3 | श्री. गणेश गिरी | उपायुक्त |
| 4 | श्रीमती  शिल्पा नाईक | उपायुक्त |
| 5 | श्रीमती पल्लवी शिरसाठ | सहा. आयुक्त |
| 6 | श्री. एन. पी. सोनार | सहा. आयुक्त |

| | | |
|---|---|---|
| 7 | श्री. मनोज अरविंद वाघ | प्र. नगरसचिव |
| 8 | श्री. के. एन. शिंदे | अभियंता |
| 9 | श्री. पी.डी. चव्हाण | प्र. नगररचनाकार |
| 10 | डॉ. महेश मोरे | आरोग्याधिकारी |
| 11 | श्री. चंद्रकांत जाधव | सहा.आरोग्याधिकारी |
| 12 | श्री. लक्ष्मण पाटील | सहा.आरोग्याधिकारी |
| 13 | श्री.बी.एस. रनाळकर | प्र. लेखाधिकारी |
| 14 | श्री.रमजानअन्सारी | कार्यालय अधिक्षक |
| 15 | श्री. एन.के. बागुल | विद्युत अभियंता |
| 16 | श्री. सी.एम. उगले | पा. पु. ओव्हरसिअर |
| 17 | श्री. सी.सी. बागुल | पा. पु. ओव्हरसिअर |
| 18 | श्री. कमलेश सोनवणे | ओव्हरसिअर न.र. वि. |
| 19 | श्री. हेमत पावटे | ओव्हरसिअर बां.वि. |
| 20 | श्री. महेंद्र सोनवणे | प्रशासन अधिकारी मनपा शिक्षण मंडळ |
| 21 | श्री.प्रसाद जाधव | अति. विभाग |
| 22 | श्री. किशोर सुडके | बाजार विभाग |
| 23 | श्री. राजकुमार सुर्यवंशी | प्र. अधिक्षक परवाना विभाग |
| 24 | श्री. तुषार ढाके | अग्नीशमन अधिकारी |
| 25 | श्री. सुक्राम राऊत | वाहन विभाग |

म.सभापती सर्व उपस्थित सन्मा.सदस्य अति.आयुक्त सो.अधिकारी वर्ग छायाचित्रकार बांधव सभेचे कामकाज चालविणेसाठी आवश्यक तो कोरम पूर्ण झाल्याने नगरसचिव यांनी सभेचे कामकाज सुरुवात करावी.

म. नगरसचिव वंदे् मातरम् या राष्ट्रवंदनेसाठी सर्वांनी उभे रहावे.

**सभेच्या सुरुवातीस सन्मा. सभापती व सदस्यांकडून आलेली अभिनंदनाची यादी**

धुळे मनपा स्थायी समिती सदस्य श्री.नागसेन दामोदर बोरसे यांची अनुसूचित जाती मोर्चा उत्तर मध्य मुंबई जिल्हा प्रभारी म्हणून नियुक्ती झाल्याने त्यांचे आजच्या बैठकीत अभिनंदनाचा ठराव पारीत करण्यांत यावा.

**धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर १४८ दिनांक १४/१०/२०२१**

धुळे मनपा स्थायी समिती सदस्य श्री.नागसेन दामोदर बोरसे यांची अनुसूचित जाती मोर्चा उत्तर मध्य मुंबई जिल्हा प्रभारी म्हणून नियुक्ती झाल्याने स्थायी समितीच्या वतीने त्यांचे पुष्पगुच्छ देवून हार्दीक अभिनंदन करण्यांत आले व तसा अभिनंदनाचा ठराव सर्वानुमते पारीत करण्यांत येत आहे.

सुचक :- मा.श्री.संजय सुधाकर जाधव, सभापती, स्थायी समिती मनपा धुळे

अनुमोदक:- श्री.सुनिल तुळशीराम बैसाणे

**सर्वानुमते मंजुर,**
**सही/-X X X**
**सभापती,**
**स्थायी समिती,**
**धुळे महानगरपालिका धुळे**

विषय क्रमांक:- १३८ मागील स्थायी समिती सभेचे इतिवृत्त वाचून कायम करणे.(दि.०७/०९/२०२१,दि.३०/९/२०२१)

म. नगरसचिव नगरसचिव यांनी विषयांचे वाचन केले.

| | |
|---|---|
| म. सुनिल बैसाणे | मागील स्थायी समिती सभेचे दिनांक ७/९/२०२१ रोजीचे सभेत सभापती महोदय रजेवर असल्याने हंगामी सभापती यांची निवड करुन त्यांचे अध्यक्षतेखाली सभेचे कामकाज चालविण्यांत आले आहे. त्यात हंगामी सभापती म्हणून श्री.नागसेन दामोदर बोरसे यांची निवड करण्यांत आली होती मात्र इतिवृत्तात माझ्या नावाचा उल्लेख आलेला आहे.या चूकीची दुरुस्ती करुन इतिवृत्तात कायम करण्यांत यावे व यापुढे अशा प्रकारच्या चुका होणार नाही याची दक्षता घ्यावी. |
| म.नगरसचिव | धन्यवाद सुनिल भाऊ आपण आमची चूक निदर्शनास आणून दिली. आमच्या टंकलेखका कडून कॉपी पेस्ट मध्ये झालेल्या चूकीमुळे तसे झाले आहे. ती चूक मान्य करण्यांत येत असून सदरची दुरुस्ती इतिवृत्तात करण्यांत येत आहे. |
| म. सुनिल बैसाणे | मागील स्थायी समिती सभेत आपण आस्था स्वयंरोजगार संस्थेमार्फत कर्मचारी स्वच्छतेसाठी पुरविणेस मान्यता दिलेली आहे. यापूर्वी सदरचा खर्च आपण १४ व्या वित्त आयोगातून करत होतो. परंतु शासनाच्या १५ व्या वित्त आयोगाच्या सुचना प्राप्त झालेल्या आहे. त्यामुळे आता १५ व्या वित्त आयोगातून खर्च करता येणार नाही. आपण सदरचा खर्च मनपा फंडातून करणार आहोत किंवा कसे याबाबत माहिती द्यावी |
| म. चंद्रकांत जाधव | सदरचा खर्चास यापूर्वीच १४व्या वित्त आयोग योजनेअंतर्गत प्रशासकीय मान्यता प्राप्त झालेली आहे.सदरचा खर्च त्या निधी अंतर्गतच प्रसतावित करण्यांत आलेला आहे. |
| म. सुनिल बैसाणे | त्यानुसारच प्रशासनाने कार्यवाही करावी. |
| म. सभापती | सर्व सन्मा. सदस्यांच्या सहमतीने मागील स्थायी समिती सभांचे इतिवृत्तात क्रमश: वाचून कायम करण्यांत येत आहे. |

**धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर १४९ दिनांक १४/१०/२०२१**

मागील स्थायी समिती सभा दिनांक ७/९/२०२१ रोजीच्या सभेतील हंगामी सभापती निवड करणेसंदर्भात इतिवृत्तांत झालेल्या चुक दुरुस्त करुन स्थायी समिती ठराव नंबर १२६ ते १३८ तसेच सन्मा.सदस्यांनी उपस्थित केलेली चर्चा व त्यावरील निर्णय क्रमश: वाचून कायम करण्यांत येत आहे.

तसेच स्थायी समिती सभा दि.३०/०९/२०२१ चे स्थायी समिती ठराव नंबर १३९ ते १४७अखेर तसेच सन्मा.सदस्यांनी उपस्थित केलेली चर्चा व त्यावरील निर्णय क्रमश: वाचून कायम करण्यांत येत आहे.

सही/-X X X

**सभापती,**
**स्थायी समिती,**
**धुळे महानगरपालिका धुळे**

| | |
|---|---|
| विषय क्रमांक:- १३९ | मा.आयुक्त सो. यांना असलेल्या अधिकारानुसार रु.५लाख ते २५ लाखापर्यत कार्यादेश दिलेले कार्यादेश (बांधकाम विभागाकडील) कामांची यादी अवलोकनार्थ सादर (०३/०८/२०२१ ते दि.२१/०९/२०२१) |
| म. नगरसचिव | नगरसचिव यांनी विषयांचे वाचन केले. |
| म. नागसेन बोरसे | कामाच्या यादीचे अवलोकन करण्यांत आले आहे. |
| म. अमोल मासुळे | कामाच्या यादीचे अवलोकन करण्यांत आले आहे. |
| म.हंगामी सभापती | मा. आयुक्त सो. यांना असलेल्या अधिकारानुसार रु. ५ ते २५ लाखपर्यतचे दिलेले कार्यादेशाचे अवलोकन करण्यांत आले. दि. ३/८/२०२१ ते२१/९/२०२१ अखेर . |

**धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर १५० दिनांक १४/१०/२०२१**

मा.आयुक्त सो. यांना असलेल्या अधिकारानुसार रु.५लाख ते२५लाखापर्यत कार्यादेश दिलेले कार्यादेश (बांधकाम विभागाकडील) कामांची यादी अवलोकनार्थ सादर

## दिनांक :- दि.०३/०८/२०२१ ते दि.२१/०९/२०२१ अखेर निर्गमित केलेल्या विकास कामांच्या कार्यादेशची यादी

| अ.क्र | कार्या. क्रं. | दिनांक | कामाचे नाव | रक्कम | निधी |
|---|---|---|---|---|---|
| १ | २६६ | ०३/०८/२०२१ | प्र.क्र.५ मध्ये प्रमोद नगर सेक्टर नं.३ भागात परदेशी ते श्री.चौधरी ते श्री.जोशी यांच्या घरापावेतो रस्ता कॉंक्रीट करणे. | ९,९८,१५६/- | मनपा निधी अंतर्गत (नगरसेवक निधी अंतर्गत ) |
| २ | २६८ | ०३/०८/२०२१ | प्र.क्र.८ मध्ये अपनी बेकरी ते श्री.गिदोंन्डीया यांच्या घरापर्यंत बंदिस्त कॉंक्रीट गटार करणे. | १४,९५,४७९/- | मनपा निधी अंतर्गत (नगरसेवक निधी अंतर्गत ) |
| ३ | २७० | ०४/०८/२०२१ | प्र.क्र.१३ मध्ये डॉक्टर मोहज्जन ते कुजवली यांच्या घरापर्यंत रस्ता कॉंक्रीट करणे. | ९,९९,५९१/- | मनपा निधी अंतर्गत (नगरसेवक निधी अंतर्गत ) |
| ४ | २७३ | ०४/०८/२०२१ | प्र.क्र.१२ मध्ये चितरंजन सोसा. मध्ये मजीद शहा यांच्या घरापासून ते धोबी सर यांच्या घरापर्यंत रस्ता कॉंक्रीट करणे. | १०,०९,६२७/- | मनपा निधी अंतर्गत (नगरसेवक निधी अंतर्गत) |
| ५ | २७४ | ०४/०८/२०२१ | प्र.क्र.६मध्ये महिंदळे येथे श्री.कुलकर्णी यांच्या घरापासून ते वायुपुत्र हनुमान मंदिर बजरंग सोसायटी पर्यंत रस्ता कॉंक्रीट करणे. | १४,५५,४९५/- | आर्थिक दुर्बल घटक (वर्गणी ५%) |
| ६ | २७६ | १०/०८/२०२१ | प्र.क्र.१३ मध्ये रातराणी हॉटेल जवळ नाल्यावर पूल बांधणे | १२,४३,२४७/- | जिल्हास्तरीय नागरोत्थान योजना अंतर्गत |
| ७ | २७७ | १०/०८/२०२१ | प्र.क्र.१९ मध्ये नॅशनल हायवे नं.३ पासून हाजी शब्बीर नगर पावेतो रस्ता डांबरीकरण करणे. | १२,४७,२०२/- | जिल्हास्तरीय नागरोत्थान योजना अंतर्गत |
| ८ | २७८ | १०/०८/२०२१ | प्र.क्र.११ मध्ये संताजी चौक ते त्रिकोणी बगीचा येथे रस्ता डांबरीकरण करणे. | ९,८४,८१५/- | मनपा निधी अंतर्गत (नगरसेवक निधी अंतर्गत) |
| ९ | २८२ | १०/०८/२०२१ | प्र.क्र.१८ मध्ये श्री.संदीप महाले नगरसेवक यांचे निधीतून प्र.क्र.१८ मोहाडी गट नं.२ भागात ड्रेनेज लाईन टाकणे व रस्ता कॉंक्रीट करणे. | ९,९४,३७६/- | मनपा निधी अंतर्गत (नगरसेवक निधी अंतर्गत) |
| १० | २८३ | १०/०८/२०२१ | प्र.क्र.१० मध्ये सुपडू आप्पा कॉलनी येथे सुर्यमुखी मारोती मंदिर ते श्री.मनीष शर्मा ते कैलास सोनार यांच्या घरापावेतो बंदिस्त गटार करणे. | २४,९८,५६१/- | महाराष्ट्र सुवर्ण जयंती नागरोत्थान (जिल्हास्तरीय) योजना अंतर्गत |
| ११ | २८४ | १०/०८/२०२१ | प्र.क्र.१९ मध्ये आ लेरा स्कूल येथे रस्ता कॉंक्रीटीकरण करणे. | १२,४८,९८८/- | नागरोत्थान (जिल्हास्तरीय) योजना अंतर्गत |
| १२ | २८५ | १०/०८/२०२१ | प्र.क्र.९ मध्ये सुभाष नगर भागात शाळा क्र.१६ च्या मागील भागात मोठोगळी सार्व. शौचालयापासून ते श्री.भोई यांच्या घरापावेतो बंदिस्त गटार करणे. | २३,११,८६८/- | सुवर्ण जयंती जिल्हास्तरीय नागरोत्थान योजना अंतर्गत |
| १३ | २८६ | १०/०८/२०२१ | प्र.क्र.२ मध्ये जिल्हा परिषद कॉलनी येथे रस्ता डांबरीकरण करणे. | १२,४८,६१९/- | सुवर्ण जयंती जिल्हास्तरीय नागरोत्थान योजना अंतर्गत |
| १४ | २८७ | १०/०८/२०२१ | प्र.क्र.१९ मध्ये आलेरा शाळेच्या मागेअंबिका नगर भागात नवीन पाईपलाईन टाकणे | ११,२८,३२९/- | मनपा निधी अंतर्गत (नवीन पाईपलाईन टाकणे ) |
| १५ | २८८ | १०/०८/२०२१ | प्र.क्र.३ मध्ये जुनी बॉडी ते जुन्या गेट पावेतो रस्ते कॉंक्रीटीकरण करणे. | १२,४३,००९/- | जिल्हास्तरीय नागरोत्थान योजना अंतर्गत |
| १६ | २९० | १०/०८/२०२१ | प्र.क्र.३ मध्ये देवपूर कब्रस्थान येथे अंतर्गत रस्ते कॉंक्रीटीकरण करणे. | २४,९५,८४९/- | जिल्हास्तरीय नागरोत्थान योजना अंतर्गत |
| १७ | २९५ | ११/०८/२०२१ | प्र.क्र.१८ मध्ये मेहबूब सुभानी दर्गा जवळ दुर्गा सोसा. येथे नागरिकांच्या सोयीसुविधा साठी४इंची पाईपलाईन टाकणे. | ५,९४,७८०/- | प्री.बजेट |
| १८ | २९६ | १३/०८/२०२१ | प्र.क्र.१३ मध्ये इस्लाम खाटवाला येथे ओपनस्पेस मध्ये लहान मुलांसाठी मनोरंजनात्मक खेळणी बसविणे तसेच सुशोभिकरण करणे व पेव्हिंग ब्लॉक बसविणे. | ५,३८,८०७/- | मनपा निधी (गार्डन सुविधा विकसित करणे.) |
| १९ | २९७ | १७/०८/२०२१ | प्र.क्र.३ मध्ये विटाभट्टी परिसरातील श्री.राजेंद्र पाटील यांच्या घरापासून ते जरराक पेंटर यांच्या घरापर्यंत व कलील हाजी यांच्या घरापासून ते शौचालय पर्यंत कॉंक्रीट गटार करणे. | ५,९९,१६८/- | आमदार स्थानिक विकास योजना अंतर्गत सन२०२०-२१ |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| २० | २९८ | १८/०८/२०२१ | प्र.क्र.६ मध्ये महिंदळे येथे इंदिरा नगर पाण्याच्या टाकी पासून ते पाटकिनारी पर्यंत कॉंक्रीट रस्ता व गटार करणे. | १९,९९,२१२/- | मनपा निधी अंतर्गत (नगरसेवक निधी ) |
| २१ | २९९ | २४/०८/२०२१ | प्र.क्र.१९ मध्ये दुर्बल घातक सोसा.भागात रोशन डब्बेवाले यांच्या घरापासुन ते फिरोजभाई यांच्या घरापर्यंत रस्ता कॉंक्रीटीकरण करणे. | १२,४७,१८९/- | जिल्हास्तरीय नगरोत्थान योजना अंतर्गत सन २०२०-२१ |
| २२ | ३०० | २४/०८/२०२१ | प्र.क्र.१२ मध्ये सार्वजनिक हॉस्पिटल मागे फैयान पाटेवाले गल्ली पावेतो रस्ता कॉंक्रीटीकरण करणे. | १२,४२,२२६/- | जिल्हास्तरीय नगरोत्थान योजना अंतर्गत सन २०२०-२१ |
| २३ | ३०२ | २४/०८/२०२१ | प्र.क्र.१८ मध्ये मोहाडी येथील नविन पाण्याची टाकी ते कैलास मराठे घरापावेतोचा रस्ता डांबरीकरण करणे. | १२,२९,००६/- | जिल्हास्तरीय नगरोत्थान योजना अंतर्गत सन २०२०-२१ |
| २४ | ३०३ | २४/०८/२०२१ | प्र.क्र.१८ मध्ये साईबाबा मंदिर ते गंभीर गावडे घरा पावेतोचा रस्ता डांबरीकरण करणे. | १२,४६,४०१/- | जिल्हास्तरीय नगरोत्थान योजना अंतर्गत सन २०२०-२१ |
| २५ | ३०४ | २४/०८/२०२१ | प्र.क्र.१८ मध्ये गौड वस्ती,गुलाब गौडते गणेश गौड, मारोती मन्दिर ते मेश्राम गौड ते विजय गौड घरा पावेतोचा रस्ता डांबरीकरण करणे. | १२,४१,३७४/- | जिल्हास्तरीय नगरोत्थान योजना अंतर्गत सन २०२०-२१ |
| २६ | ३०५ | २४/०८/२०२१ | प्र.क्र.१८ मध्ये समता नगर मधील देव घरापासुन ते संन्यासी घरा पावेतोचा रस्ता डांबरीकरण करणे. | १२,४४,३९८/- | जिल्हास्तरीय नगरोत्थान योजना अंतर्गत सन २०२०-२१ |
| २७ | ३०६ | २५/०८/२०२१ | प्र.क्र.५ मध्ये भरत नगर भागातील सर्व्हे नं.७०/१, ७०/२, ७०/३ मधील ओपनस्पेसला कंपाऊंड वॉल करणे. | १३,८४,२३३/- | जिल्हा वार्षिक योजने अंतर्गत सन २०२०-२१ |
| २८ | ३०७ | २५/०८/२०२१ | प्र.क्र.५ मध्ये गणेश नगर भागातील सर्व्हे नं.७३ मधील ओपनस्पेसला कंपाऊंड वॉल करणे. | १३,२५,९३१/- | जिल्हा वार्षिक योजने अंतर्गत सन २०२०-२१ |
| २९ | ३०८ | २५/०८/२०२१ | प्र.क्र.५ मध्ये भरत नगर भागातील सर्व्हे नं.७३(पार्ट) मधील ओपनस्पेसला कंपाऊंड वॉल करणे. | १७,८४,३६७/- | जिल्हा वार्षिक योजने अंतर्गत सन २०२०-२१ |
| ३० | ३०९ | २६/०८/२०२१ | प्र.क्र.५ मध्ये केले नगर भागातील सर्व्हे नं.८७/१+२+३ मधील ओपनस्पेसला कंपाऊंड वॉल करणे. | १३,५९,६०१/- | जिल्हा वार्षिक योजने अंतर्गत सन २०२०-२१ |
| ३१ | ३१० | २६/०८/२०२१ | प्र.क्र.१७ मध्ये नगरोत्थान योजने अंतर्गत शिवशक्ती कॉलनी मोगलाईकर ते सवडे ते ओपनस्पेस कॉर्नर ते झापे ते बंडू वाणी ते मिश्रा पावेतो गटार करणे. | १२,४७,७९१/- | महाराष्ट्र सुवर्ण जयंती जिल्हास्तरीय नगरोत्थान योजने अंतर्गत |
| ३२ | ३११ | २६/०८/२०२१ | प्र.क्र.११ मध्ये पवन नगर सोनु सोनवणे ते केले यांचे घर सोनवणे घर ते बराडे यांचे घर पर्यंत रस्ता कॉंक्रीट करणे. | २४,९६,५६२/- | सहाय्यक अनुदान अंतर्गत (मनपा निधी) |
| ३३ | ३१२ | २६/०८/२०२१ | प्र.क्र.११ मध्ये राम नगर मध्ये शिवनेरी बिल्डींग ते राम मंदिर पर्यंतचा रस्ता कॉंक्रीट करणे. | २४,८८,७५३/- | सहाय्यक अनुदान अंतर्गत (मनपा निधी) |
| ३४ | ३१३ | २६/०८/२०२१ | प्र.क्र.११ मध्ये ५० खोली भागात विनोद शेळके पर्यंत रस्ता डांबरीकरण करणे. | २४,९०,३८३/- | सहाय्यक अनुदान अंतर्गत (मनपा निधी) |
| ३५ | ३१४ | २६/०८/२०२१ | प्र.क्र.१९ मध्ये शालिग्राम पाटील घर ते सुनील खैरनार घरा पावेतोचा रस्ता कॉंक्रीट करणे. | २४,९२,७११/- | सहाय्यक अनुदान अंतर्गत (मनपा निधी) |
| ३६ | ३१५ | ३०/०८/२०२१ | प्र.क्र.१ मध्ये वलवाडी भागातील ओमनगर भागात भाग्यश्री बॅगल्स पासून ते श्री.दाजभाऊ वानखेडे यांच्या घरापर्यंत रस्ता कॉंक्रीटी करणे. | १५,७६,५४८/- | हद्दवाढ महसूल अंतर्गत (वलवाडी) |
| ३७ | ३१६ | ३०/०८/२०२१ | प्र.क्र.१ मध्ये वलवाडी भागातील गवळे नगर भागात श्री.भूपेंद्र गवळे यांच्या घरापसुन ते श्री.सौरभ चौधरी यांच्या घरापर्यंत रस्ता कॉंक्रीटी करणे. | १९,९३,६४५/- | हद्दवाढ महसूल अंतर्गत (वलवाडी) |
| ३८ | ३१७ | ३०/०८/२०२१ | प्र.क्र.१ मध्ये वलवाडी भागातील झेंडा चौक येथे राधिका चक्की पासून ते भूमिका लॉन्ड्री पर्यंत रस्ता कॉंक्रीटी करणे. | १८,९१,३३८/- | हद्दवाढ महसूल अंतर्गत (वलवाडी) |
| ३९ | ३१८ | ३०/०८/२०२१ | प्र.क्र.१७ मध्ये नगरोत्थान योजने अंतर्गत विखेनगर साई सेवादास वर्क शॉप ते बापू खरात घरापावेतो रस्ता कॉंक्रीट करणे. | १२,४९,६८०/- | महाराष्ट्र सुवर्ण जयंती जिल्हास्तरीय नगरोत्थान योजने अंतर्गत |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ४० | ३१९ | ३०/०८/२०२१ | प्र.क्र.१७ मध्ये नगरोत्थान योजने अंतर्गत शिवशंकर कॉलनी व शिवप्रभू कॉलनी मुकेश खरात ते पांडुरंग पवार ते वसंत झिंबल ते मुकेश थोरात तेसुषमा बोरसे घरापावेतो रस्ता डांबरीकरण करणे. | २४,९६,९५६/- | महाराष्ट्र सुवर्ण जयंती जिल्हास्तरीय नगरोत्थान योजने अंतर्गत |
| ४१ | ३२० | ३०/०८/२०२१ | प्र.क्र.१६ मध्ये रमेश नगर येथे जिभाऊ पाटील घर ते अंबर गवळी घरा पावेतो रस्ता कॉक्रीटीकरण करणे. | १८,९२,०३३/- | महाराष्ट्र सुवर्ण जयंती जिल्हास्तरीय नगरोत्थान योजने अंतर्गत |
| ४२ | ३२१ | ३०/०८/२०२१ | प्र.क्र.१५ मध्ये अरुण कुमार वैद्य नगर ,झुलेलाल अपार्टमेंट ते पंजाबी घरापावेतो रस्ता कॉक्रीट करणे. | १२,३२,२४६/- | महाराष्ट्र सुवर्ण जयंती जिल्हास्तरीय नगरोत्थान योजने अंतर्गत |
| ४३ | ३२२ | ३०/०८/२०२१ | प्र.क्र.१५ मध्ये सुशील नगर येथील शर्मा नगर ओपनस्पेस ते गोळीबार टेकडी पावेतो रस्ता डांबरीकरण करणे. | १२,४८,३१३/- | महाराष्ट्र सुवर्ण जयंती जिल्हास्तरीय नगरोत्थान योजने अंतर्गत |
| ४४ | ३२७ | ३०/०८/२०२१ | धुळे मनपा हद्दीतील सेवादास नगर भागात कुंपण भिंतीचा कॉर्नर पासून ते चेतन पाटील ते डी.पी. रोड पावेतो रस्ता डांबरीकरण करणे. | ११,९५,००२/- | मनपा निधी (नगरसेवक निधी) |
| ४५ | ३२९ | ३०/०८/२०२१ | प्र.क्र.१५ मध्ये राजहंस कॉलनी बराडे यांचे घरापासुन ते बाविस्कर यांचे घरापर्यंत आर.सी.सी. गटार करणे. | १२,४८,५२१/- | जिल्हास्तरीय नगरोत्थान योजना अंतर्गत सन २०२०-२१ |
| ४६ | ३३० | ३०/०८/२०२१ | तुळसाबाईचा मळा विनोद जगताप घर ते सीताराम काळे ते खंडाळे ते अंबादास मोरे ते मराठे ते हर्षल मोरे पावेतो रस्ता कॉक्रीटीकरण करणे. | २४,९७,१२७/- | मनपा निधी (नगरसेवक निधी) |
| ४७ | ३३१ | ३०/०८/२०२१ | प्र.क्र.१७ मध्ये मनपा निधी अंतर्गत श्रीकृष्ण कॉलनी येथील ओपनस्पेस लहान मुलांसाठी मनोरंजनात्मक खेळणी बसविणे तसेच सुशोभिकरण करणे. | ९,९२,६३०/- | मनपा निधी (गार्डन सुविधा विकसित करणे ) |
| ४८ | ३३२ | ३०/०८/२०२१ | प्र.क्र.१५ मध्ये सुरभी कॉलनी येथे सबनीस यांचे घरा जवळ रस्ता डांबरीकरण करणे. | १२,४५,६६५/- | जिल्हास्तरीय नगरोत्थान योजना अंतर्गत सन २०२०-२१ |
| ४९ | ३३४ | ०१/०९/२०२१ | प्र.क्र.६ मध्ये महिंदळे येथे पाट किनार भागात रस्ते कॉक्रीटीकरण करणे | २४,९९,७७५/- | मागासवर्गीय आर्थिक दुर्बल घटक ५ % वर्गणी |
| ५० | ३३९ | १५/०९/२०२१ | सुभाषनगर नविन भिलाटी येथे१०सीट सार्व.शौचालय बांधणे. | १९,७४,८३२/- | १४ व्या वित्त आयोगा अंतर्गत |
| ५१ | ३४० | १५/०९/२०२१ | भोला बाजार ८० फुटी रोड येथे १० सीट सार्व.शौचालय बांधणे. | १९,७४,८३२/- | १४ व्या वित्त आयोगा अंतर्गत |
| ५२ | ३४१ | १५/०९/२०२१ | ४०गावरोड १००फुटी रोड भागात १०सीट सार्व.शौचालय बांधणे. | १९,७४,८३२/- | १४ व्या वित्त आयोगा अंतर्गत |
| ५३ | ३४२ | १५/०९/२०२१ | जुनेधुळे पाटील वाडा भागात १०सीट सार्व.शौचालय बांधणे. | १९,७४,८३२/- | १४ व्या वित्त आयोगा अंतर्गत |
| ५४ | ३४३ | १५/०९/२०२१ | देवपूर विटाभट्टी येथे १० सीट सार्व.शौचालय बांधणे. | १९,७४,८३२/- | १४ व्या वित्त आयोगा अंतर्गत |
| ५५ | ३४४ | १५/०९/२०२१ | श्रीराम नगर मिल परिसर येथे १० सीट सार्व. शौचालय बांधणे. | १९,७४,८३२/- | १४ व्या वित्त आयोगा अंतर्गत |
| ५६ | ३४५ | १५/०९/२०२१ | प्र.क्र.१६मध्ये नगरसेवक निधीतून चितोड रोड येथील महादेव मंदिरतेगणराज कृष्णा सोनवणे घरापावेतो रस्ता कॉक्रीट करणे. | १९,९३,७९९/- | मनपा निधी (नगरसेवक निधी) |
| ५७ | ३४६ | १५/०९/२०२१ | प्र.क्र.१६ मध्ये रमेश नगर मधील संजय बर्गे ते मोतीलाल भामरे ते आखाडे ते प्रदीप कुलकर्णी ते बरात जगताप घरा पावेतो नविन पाईपलाईन टाकणे. | ११,६४,७४०/- | मनपा निधी (हद्दवाढ नविन पाईपलाईन टाकणे) |
| ५८ | ३४७ | १५/०९/२०२१ | प्र.क्र.१ मध्ये आदिवासी वस्ती भोकर नाल्यावर मोरी व रस्ता डांबरीकरण करणे. | १२,४५,७२१/- | महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान (जिल्हास्तर) अंतर्गत |
| ५९ | ३४८ | १५/०९/२०२१ | प्र.क्र.१६ राम नगर येथील खंडू बाणी ते लताबाई जगताप यांच्या घरापावेतो रस्ता कॉक्रीटीकरण करणे. | २४,०१,११८/- | आण्णासाहेब साठे नागरी दलित वस्ती योजना अंतर्गत |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ६० | ३४९ | १५/०९/२०२१ | प्र.क्र.१ जुनी भिलाटी (इंदिरा नगर) भागात भूमिगत गटार करणे व कॉंक्रीट रोड करणे संजू सोनवणे ते पंडित सोनवणे ते रोहिदास ठाकरे | १२,४८,६०७/- | सुवर्ण जयंती नगरोत्थान जिल्हास्तरीय योजना |
| ६१ | ३५० | १५/०९/२०२१ | प्र.क्र.१६ मध्ये नगरसेवक निधीतून रमेश नगर वसंत बर्गे घर ते कुलकर्णी पावेतो बंदिस्त गटार करणे. | १३,१४,२२४/- | मनपा निधी (नगरसेवक निधी) |
| ६२ | ३५१ | १५/०९/२०२१ | प्र.क्र.१५ मध्ये महावीर कॉलोनी येथे संदीप जैन ते मोहन पाटील ते राधेशाम पोपतानी ते गजानन क्लिनिक गिरिज अपार्टमेंट ओम शर्मा घरापर्यंतHDPE पाईप लाईन टाकणे | १७,३१,१५६/- | हद्दवाढ नवीन पाईप लाईन टाकणे |
| ६३ | ३५२ | १५/०९/२०२१ | प्र.क्र.१६ अजबे नगर ,रामनगर भागातील पंचशील स्तंभापासून ते राम मंदिरा पावेतो रस्ता डांबरीकरण करणे. | २४,९९,७०३/- | आण्णासाहेब साठे नागरी दलित वस्ती योजना अंतर्गत |
| ६४ | ३५३ | १५/०९/२०२१ | प्र.क्र.१५ मध्ये वैभव नगर येथील ओपनस्पेस मध्ये लहान मुलासाठी मनोरंजनात्मक खेळणी बसविणे. | ९,८९,२९५/- | गार्डन सुविधा विकसित करणे |
| ६५ | ३५४ | १५/०९/२०२१ | प्र.क्र. १ मध्ये जयतोबा नगर मधील भरत बाघ ते मेवाबाई थोरात ते मोतीलाल सैंदाणे ते भरत मोहीते यांच्या घरापावेतो रस्ता कॉंक्रीट करणे. | १९,९८,८४३/- | मनपा निधी अंतर्गत (नगसेवक निधी) |
| ६६ | ३५५ | १५/०९/२०२१ | प्र.क्र. १ मध्ये जीभाऊ नगर येथील यशोधन श्री. मधुकर लोहार ते लक्ष्मण पाटील घरापावेतो रस्ता कॉंक्रीट करणे. | ९,९५,३८८/- | मनपा निधी अंतर्गत (नगसेवक निधी) |
| ६७ | ३५६ | १५/०९/२०२१ | प्र.क्र. १ मध्ये जयतोबा नगर मधील राजेंद्र पाटील ते पदमाबाई यांच्या घरापावेतो रस्ता कॉंक्रीट करणे. | १९,९९,३१७/- | हद्दवाढ गाव महसूल निधी |
| ६८ | ३५७ | १५/०९/२०२१ | प्र.क्र.१६ मध्ये मनपा निधीतून भीमराव काळू घर ते महादेव मंदिर पावेतो आर.सी.सी. गटार करणे. | ६,७४,२६१/- | मनपा निधी अंतर्गत (नगसेवक निधी) |
| ६९ | ३५८ | १५/०९/२०२१ | प्र.क्र.१६ मध्ये नगरोत्थान योजने अंतर्गत सिंहस्थ नगर शेलार अॅक्वा ते संदीप सूर्यवंशी ते छोटू वेंदे घरापावेतो आर.सी.सी. गटार करणे. | १३,९६,६४७/- | जिल्हास्तरीय नगरोत्थान योजना २०२०-२१ अंतर्गत |
| ७० | ३५९ | १५/०९/२०२१ | प्र.क्र.१५ मध्ये नूतन कृषी नगर येथे कोळी घर ते बाधवा घरापावेतो आर.आर. सी. गटार करणे. | २४,९०,३८९/- | मागासवर्गीय आर्थिक दुर्बल घटक |
| ७१ | ३६० | १५/०९/२०२१ | प्र.क्र.१६ मध्ये स.नं.५६७/१ब येथिल राजहंस कॉलोनी व श्रीनगर यथील ओपनस्पेसला वालकंपाऊड करणे. | १९,९९,०२३/- | मनपा निधी अंतर्गत (नगसेवक निधी) |
| ७२ | ३६१ | १५/०९/२०२१ | प्र.क्र. १ मध्ये जयतोबा नगर मधील राजेंद्र पाटील यांच्या घरापासून ते नथ्यु पाटील ते काशीनाथ पाटील ते पांडुरंग पाटील घरापावेतो रस्ता कॉंक्रीट करणे. | १९,८८,७५०/- | वलवाडी हद्दवाढ गाव महसूल निधी |
| ७३ | ३६२ | १५/०९/२०२१ | प्र.क्र.५ मध्ये शाहू नगर देवपूर येथील ओपनस्पेस मध्ये खेळणी बसविणे तसेच सुशोभिकरण करणे बाबत. | ९,९४,७४६/- | गार्डन सुविधा विकसित करणे अंतर्गत |
| ७४ | ३६३ | १५/०९/२०२१ | प्र.क्र.१६ मध्ये जय मल्हार नगर श्री.रवी अहिरे घर ते श्री.योगेश वाघ घरापावेतो रस्ता डांबरीकरण करणे. | २३,८८,७५४/- | मनपा निधी अंतर्गत (मागासवर्गीय आर्थिक दुर्बल घटक अंतर्गत) |
| ७५ | ३६४ | १५/०९/२०२१ | प्र.क्र.१ मध्ये वलवाडी येथील अशोक बैसाणे सर यांच्या घरापासून ते संकल्प कॉलनी बोर्डा पर्यंत रस्ता कॉंक्रीटीकरण करणे. | १९,९९,८३२/- | लोकशाहीर अण्णाभाऊ साठे नागरी दलीत वस्ती योजना अंतर्गत |
| ७६ | ३६५ | १५/०९/२०२१ | प्र.क्र. १ मध्ये पोलीस कॉलनी ते वडेल रोड पावेतो रस्ता कॉंक्रीट करणे | १९,८८,११०/- | हद्दवाढ गाव महसूल निधी |
| ७७ | ३६६ | १५/०९/२०२१ | प्र.क्र.१ मध्ये इंदिरा नगर भागात लक्ष्मी मंदिरा पासून ते साईबाबा मंदिरा पावेतो रस्ता कॉंक्रीट करणे. | १९,९४,४४२/- | लोकशाहीर अण्णाभाऊ साठे नागरी दलीत वस्ती योजना अंतर्गत |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ७८ | ३६७ | १५/०९/२०२१ | प्र.क्र.१मध्ये वलवाडी डॉ.बाबासाहेब आंबेडकर पुतळ्याजवळ भटूलाल वाघ ते बापू गांगुर्डे यांच्या घरापावेतो व दैठणकर नगर येथील दिपालीबेकरी पासून ते मनोज बैसाणे व विटभट्टी येथे देवा वाघ ते आशाबाई वाघ यांच्या घरापावेतो भूमिगत गटार करणे. | १४,०३,३९७/- | लोकशाहीर अण्णाभाऊ साठे नागरी दलीत वस्ती योजना अंतर्गत |
| ७९ | ३६८ | १५/०९/२०२१ | प्र.क्र.१ मध्ये थोरात ताई यांच्या घरापासून ते बिऱ्हाडे ताई यांच्या घरा पावेतो रस्ता कॉंक्रीटीकरण करणे. | २४,९४,०७७/- | नागरी दलीत वस्ती योजना अंतर्गत |
| ८० | ३६९ | २१/०९/२०२१ | प्र.क्र.१८ मध्ये नगरसेविका यांचे निधीतून मोहाडी खालचे गाव होळी चौक येथे रस्ता कॉंक्रीट करणे. | १९,७७,५३८/- | मनपा निधी अंतर्गत (नगरसेवक निधी) |
| ८१ | ३७० | २१/०९/२०२१ | प्र.क्र.१८ मध्ये सुरेखा भागवत देवरे यांचे निधीतुन मोहाडी गट नं.५ सिद्धी विनायक मंदिर येथे वॉल कंपाऊंड करणे. | ९,९८,८४०/- | मनपा निधी अंतर्गत (नगरसेवक निधी) |
| ८२ | ३७१ | २१/०९/२०२१ | प्र.क्र.१८ मध्ये सौ.सुरेखा भगवान देवरे नगरसेविका यांचे निधीतून वर्षावाडी गट नं.१७ येथे मोकळ्या जागेला वॉल कंपाऊंड करणे. | ९,९८,३६३/- | मनपा निधी अंतर्गत (नगरसेवक निधी) |
| ८३ | ३७२ | २१/०९/२०२१ | प्र.क्र.१ मध्ये सरस्वती मंगल कार्यालया पासून ते भदाणे सर तेराठोड सर यांचे घरापावेतो (शिवनेरी कॉलनी)रस्ता कॉंक्रीटी करण करणे. | १२,४८,८९९/- | महाराष्ट्र सुवर्ण जयंती जिल्हास्तरीय नगरोत्थान योजना अंतर्गत |
| ८४ | ३७३ | २१/०९/२०२१ | प्र.क्र.१७ मध्ये धुळे मनपा हद्दीतील सेवादास नगर भागात ओपनस्पेस सुशोभिकरण करणे बाबत. | १४,७०,६७६/- | गार्डन सुविधा विकसित करणे. |
| ८५ | ३७४ | २१/०९/२०२१ | प्र.क्र.१९ मध्ये फैजान बरकत मशीद ते उमर मेडिकल पावेतो रस्ता डांबरीकरण करणे. | १२,४८,३१३/- | जिल्हास्तरीय नगरोत्थान योजना अंतर्गत सन २०२०-२१ |
| ८६ | ३७५ | २१/०९/२०२१ | प्र.क्र.१२ मध्ये शरीफ हॉटेल पासून ते विलास मिस्तरी यांच्या घरापावेतो रस्ता कॉंक्रीटीकरण करणे. | १२,४४,१७६/- | जिल्हास्तरीय नगरोत्थान योजना अंतर्गत सन २०२०-२१ |
| ८७ | ३७६ | २१/०९/२०२१ | प्र.क्र.१२ मध्ये जनता सोसा. मुस्लीम नगर ,हाजी नगर अबुजर यांचे घरापासून ते शकील यांच्या घरापावेतो रस्ता कॉंक्रीट करणे. | १२,४२,८७६/- | जिल्हास्तरीय नगरोत्थान योजना अंतर्गत सन २०२०-२१ |
| ८८ | ३७७ | २१/०९/२०२१ | प्र.क्र.८ मध्ये काझी प्लॉट येथे रेशन दुकान ते नेहाल मोटार गॅरेज पावेतो रस्ता कॉंक्रीट करणे. | १२,४५,३०७/- | जिल्हास्तरीय नगरोत्थान योजना अंतर्गत सन २०२०-२१ |

उक्त यादीचे वाचन करुन सभागृहास माहिती देण्यांत आली.

**सूचक :- श्री.नागसेन दामोदर बोरसे**

**अनुमोदक :- श्री. अमोल पावबा मासुळे**

सही/-X X X
**सभापती,**
**स्थायी समिती,**
**धुळे महानगरपालिका धुळे**

| | |
|---|---|
| विषय क्रमांक:- १४० | धुळे मनपा हद्दीत जमानागिरी रोड दत्तमंदिर परिसरात असलेल्या भूमिगत ड्रेनेज लाईनचे चेंबर नवीन करणेकामी झालेला खर्च रु.52,455/-मात्र खर्चास कार्योत्तर मंजुरी देणेबाबत विचार करणे |
| म. नगरसचिव | नगरसचिव यांनी विषयांचे वाचन केले. |
| म. शितल नवले | विषय मंजूर करण्यात यावा. |
| म सुनिल बैसाणे | विषय मंजूर करण्यात यावा. |
| म. सभापती | सर्व सन्मा.सदस्यांच्या सहमतीने व कार्यालयीन अहवालास अधिन राहून सदर प्रस्तावास कार्योत्तर मान्यता देण्यांत येत आहे. |

**धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर १५१ दिनांक १४/१०/२०२१**

धुळे मनपा हद्दीत जमानागिरी रोड दत्तमंदिर परिसरात असलेल्या भूमिगत ड्रेनेज लाईनचे चेंबर हे तुटलेले असल्याने सदरचे चेंबर चोकअप होऊन नागरिकांचे सांडपाणी हे रस्त्यावर येवून सदरचा परिसरात दुर्गंधी पसरत असून रस्त्यावर पाणी साचत असल्याने सदरील ड्रेनेज लाईन वरील चेंबर हे नवीन करणे आवश्यक आहे.

तरी उक्त काम हे नागरिकांचा सांडपाण्याचा व आरोग्याचा प्रश्नाशी निगडीत असल्याने सदरचे काम विना निविदा श्री.पवन अजळकर, ठेकेदार, धुळे यांचे कडून करून घेण्यात आलेले असून सदरचे काम मुंबई प्रांतिक अधिनियम नियम 67 (क) अन्वये विना निविदा करण्यास मंजुरीसाठी व अंदाजपत्रकीय खर्च रु.52,455/- मात्र खर्चास कार्योत्तर मंजुरीसाठी मे. स्थायी समितीपुढे सादर झालेला आहे.

सर्व सन्मा. सदस्यांच्या सहमतीने व कार्यालयीन अहवालास अधिन राहून सदर कामी श्री.पवन अजळकर,ठेकेदार, धुळेयांचे कडून सदरचे काम तांतडीने करुन घेण्यांत आलेले असल्याने खर्च रु.52,455/- मात्रला महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम नियम 67 (क) कार्योत्तर मान्यता देण्यांत येत आहे. सदर प्रस्ताव व कार्यवाही बाबत लेखा आक्षेप निर्माण होणार नाही याची दक्षता घ्यावी.याबाबतची जबाबदारी संबंधित विभागाची राहील.

सुचक :- श्री. शितल मोहन नवले

अनुमोदक :- श्री. सुनिल तुळशीराम बैसाणे

**सर्वानुमते मंजुर,**

सही/- x x x

**सभापती,**

**स्थायी समिती,**

**धुळे महानगरपालिका धुळे**

विषय क्रमांक:-१४१ — धुळे महानगरपालिका अग्नीशमन विभागा करीता फोम टेंडर बांधणी करुन पुरवठा करणे व ५०० लिटर ए.एफ.एफ.एफ. फोमचा पुरवठा करणेकामी निविदा दर मागविण्यांत आलेत, त्याबाबत आलेल्या कार्यालयीन अहवालावर विचार करणे.

म. नगरसचिव — नगरसचिव यांनी विषयांचे वाचन केले.

म. शितल नवले — विषय मंजूर करण्यात यावा.

मअमोल मासुळे — विषय मंजूर करण्यात यावा.

**म. सभापती** — सर्व सन्मा. सदस्यांच्या सहमतीने व कार्यालयीन अहवालास अधिन राहून सदर प्रस्तावास मान्यता देण्यांत येत आहे.

**धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर १५२ दिनांक १४/१०/२०२१**

धुळे महानगरपालिका अग्निशमन विभाग ई निविदा सुचना क्र. ८४ सन २०२०-२१ अनिशमन विभागा करीता फोम टेंडर बांधणी करुन पुरवठा करणे व ५०० लिटर ए.एफ.एफ.एफ. फोमचा पुरवठा करणे बाबत ई निविदा प्रसिध्द करणेत आलेली होती. सदर ई निविदा मध्ये ०५ निविदाधारकांनी भाग घेतलेला आहे. उक्त ई निविदेचा तांत्रीक लिफाफा उघडणेत आलेला असुन उक्त ई निविदेत भाग घेतलेल्या निविदाधारक यांचे कागदपत्रातील त्रुटीची पुर्तता करणे कामी निविदाधारक यांना पत्र देणेत आलेले होते. सदर निविदाधारकांन पैकी ०३ निविदाधारक **First Responder Pvt.Ltd, Nidhi Enterprises,Shree Deepak Exports** यांनी कागदपत्रांची पुर्तता केलेली आहे. उर्वरीत निविदाधारक **Hi Tech Services, Vijay Fire Vehicles and Pump Ltd** यांनी कागदपत्रांची पुर्तता केलेली नाही. त्यामुळे ०२ निविदाधारक अपात्र झालेअसुन उर्वरीत ०३निविदाधारक पात्र झालेले आहेत. ई निविदेत पात्र ०३ निविदा धारकांचे आर्थीक लिफाफा उघडणेत आलेला आहे. ई निविदेत निविदधरकांनी सादर केलेले दर खालील प्रमाणे आहेत.

| अ.क्र. | निविदाधारकाचे नाव | निविदे मध्ये सादर केलेले दर | |
|---|---|---|---|

| | | | |
|---|---|---|---|
| ०१ | Nidhi Enterprises | ८५,०६,२५५/- | L १ |
| ०२ | First Responder Pvt. Ltd. | ८९,७६,४५०/- | L २ |
| ०३ | Shree Deepak Exports | ९०,६१,९४०/- | L ३ |

उक्त प्रमाणे निविदाधारकांनी दर सादर केलेले आहे. त्यामध्ये Nidhi Enterprises यांचे दर सर्वात कमी आहे.

तरी सदर निविदा धारक Nidhi Enterprises (L१) यांचे दरास मान्यता मिळणेस्तव व कार्यादेश देणे करीता मंजुरी मिळणेस्तव मे. स्थायी समिती पुढे सादर झालेला आहे.

सर्व सन्मा. सदस्यांच्या सहमतीने व कार्यालयीन अहवालास अधिन राहून सदर कामी Nidhi Enterprises (L१) यांचे दर सवार्त कमी आल्याने त्यांचे आलेल्या दरास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ७३ नुसार मान्यता देण्यांत येत आहे. सदर प्रस्ताव व कार्यवाही बाबत लेखा आक्षेप निर्माण होणार नाही याची दक्षता घ्यावी.याबाबतची जबाबदारी संबंधित विभागाची राहील.

सुचक :- श्री. शितल मोहन नवले

अनुमोदक :- श्री अमोल पावबा मासुळे

**सर्वानुमते मंजुर,**

सही/-X X X

**सभापती,**

**स्थायी समिती,**

**धुळे महानगरपालिका धुळे**

विषय क्रमांक:- १४२ ई-निविदा सूचना क्र. 34.2021-22 शासन निधी अंतर्गत धुळे शहरातील फाशी पूल ते दसेरा मैदान, स्टेशन रोड येथे ओक्टोगोनल स्ट्रीट लाईट पोल LED पथदिव्यांसह बसविणेकामी निविदा दर मागविण्यांत आलेत, त्याबाबत आलेल्या कार्यालयीन अहवालावर विचार करणे.

म. नगरसचिव — नगरसचिव यांनी विषयांचे वाचन केले.

म. भारती माळी — विषय मंजूर करण्यात यावा.

म. मंगला पाटील — विषय मंजूर करण्यात यावा.

म. सभापती — सर्व सन्मा. सदस्यांच्या सहमतीने व कार्यालयीन अहवालास अधिन राहून सदर प्रस्तावास मान्यता देण्यांत येत आहे.

**धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर १५३ दिनांक १४/१०/२०२१**

ई-निविदा सूचना क्र.34.2021-22 शासन निधी अंतर्गत धुळे शहरातील फाशी पूल ते दसरा मैदान,स्टेशन रोड येथे ओक्टोगोनल स्ट्रीट लाईट पोल LED पथदिव्यांसह बसविणे कामाबाबत धुळे महानगरपालिका स्थायी समिती ठराव क्र. -- दि. -- / -- /201 मा.आयुक्त/उपायुक्त धुळे महानगरपालिका यांचे टिप्पणी / प्रशासकीय मान्यता/सा.बा.विभाग धुळे यांचे मंजुरीने दि.19-3-2021 अन्वये उक्त कामाबाबत रक्कम रु.30,55,839/- मात्र खर्चास आर्थिक व प्रशासकीय मंजुरी देणेत आली आहे.

उक्त बाबत म.जी.प्रा. धुळे/ म.जी.प्रा. मंडळ नाशिक/ शहर अभियंता मनपा धुळे/कार्यकारी अभियंता महावितरण यांचे पत्र क्र.1341 .दि.22-3-2021 अन्वये रक्कम रु.30,55,839/-मात्र खर्चास तांत्रिक मंजुरी मिळालेली आहे.

उक्त कामाबाबत धुळे महानगरपालिका जा.क्र./विवि/पापु/143. दि.6-5-2021 अन्वये व दि.7-5-2021 च्या दै.पुण्यनगरी/नाव्रज्या किंवा धुळे महानगपालिका / महाराष्ट्र शासनाच्या वेबसाईट www.dhulecorporation.org / www.mahatender.gov.in वर खुल्या ई-निविदा/कोटेशन प्रसिद्ध करणेत येवून दि.31-5-2021 रोजी निविदा मागविणेत आले आहेत. पात्र कंत्राटदार यांनी निविदेबाबत रोखीने बयाणा रक्कम भरून/लेटर प्याड वर निविदा दर सादर केलेले आहेत.

| अ.क्र. | कंत्राटदाराचे नाव | दिलेले निविदा दर | शेरा |
|---|---|---|---|
| 1 | मे.बिजासनी Enterprizes,धुळे | 1.40% कमी दराने | L१ |
| 2 | मे.अंबिका इलेक्ट्रिकल्स,धुळे | 5% Above | |
| 3 | मे.पंडित इलेक्ट्रिकल्स,धुळे | 2% Above | |

करिता ठेकेदार मे.बिजासनी **Enterprizes,**धुळे यांचे दर तुलनेत सर्वात कमी असून त्यांनी नियमाप्रमाणे रोखीने बयाणा रक्कम भरलेली आहे.सबब कंत्राटदार मे. बिजासनी Enterprizes, धुळे यांनी सर्वात कमी म्हणजेच अंदाजपत्रकीय दराच्या 1.40% कमी दराने आलेले निविदा दर मंजुरीस्तव मे. स्थायी समिती समोर सादर झालेले आहे.

सर्व सन्मा. सदस्यांच्या सहमतीने व कार्यालयीन अहवालास अधिन राहून सदर कामी मे. बिजासनी Enterprizes, धुळे यांनी सर्वात कमी म्हणजेच अंदाजपत्रकीय दराच्या 1.40% कमी दराने आलेले निविदा दरास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ७३ नुसार मान्यता देण्यांत येत आहे. सदर प्रस्ताव व कार्यवाही बाबत लेखा आक्षेप निर्माण होणार नाही याची दक्षता घ्यावी.याबाबतची जबाबदारी संबंधित विभागाची राहील.

सुचक :- श्रीमती भारती अशोक माळी

अनुमोदक :- श्रीमती मंगला सुरेश पाटील

**सर्वानुमते मंजुर,**

सही/-X X X

**सभापती,**

**स्थायी समिती,**

**धुळे महानगरपालिका धुळे**

# धुळे महानगरपालिका,धुळे
## नगरसचिव कार्यालय
## स्थायी समिती सभा क्रमांक २२ चे इतिवृत्त

---

**धुळे मनपा भारतरत्न अटलबिहारी वाजपेयी सभागृह**
**मंगळवार दिनांक २६/१०/२०२१**
**वेळ :-सकाळी ११-०० वाजता.**

धुळे महानगरपालिका स्थायी समितीची सभा आज मंगळवार दिनांक२६/१०/२०२१रोजी सकाळी ११-०० वाजता **मा.श्री.संजय सुधाकर जाधव, सभापती, स्थायी समिती,** मनपा, धुळे यांच्या अध्यक्षतेखाली **धुळे मनपा भारतरत्न अटलबिहारी वाजपेयी सभागृह** भरली. सदर सभेस खालील सन्मा.सदस्य सभागृहात हजर होते.

| अ.क्र. | सदस्यांचे नांव | हुद्दा |
|---|---|---|
| १ | श्री. जाधव संजय सुधाकर | सभापती |
| २ | श्री. बैसाणे सुनिल तुळशिराम | सदस्य |
| ३ | श्रीमती माळी भारती अशोक | सदस्या |
| ४ | श्रीमती पाटील मंगला सुरेश | सदस्या |
| ५ | श्री. मासुळे अमोल पावबा | सदस्य |
| ६ | श्री. देवरे कमलेश नारायण | सदस्य |
| ७ | श्री. सईद बेग हाशम बेग | सदस्य |
| ८ | श्री. नवले शितल मोहन | सदस्य |
| ९ | श्री. बोरसे नागसेन दामोदर | सदस्य |
| १० | श्रीमती कुलेवार किरण राकेश | सदस्या |
| ११ | श्रीमती वराडे वैशाली भिकन | सदस्या |
| १२ | श्री. जाधव बन्सीलाल माणिक | सदस्य |
| १३ | श्री. पटेल अमीन अब्दुल करीम | सदस्य |

**उपस्थित अधिकारी गण**

| अ.क्र. | अधिकाऱ्यांचे नाव | हुद्दा |
|---|---|---|
| १ | श्री. नितीन कापडणीस | अति. आयुक्त |
| २ | श्रीमती शिल्पा नाईक | उपायुक्त |
| ३ | श्रीमती पल्लवी शिरसाठ | सहा. आयुक्त |
| ४ | श्री. एन. पी. सोनार | सहा. आयुक्त |
| ५ | श्री. मनोज अरविंद वाघ | प्र. नगरसचिव |
| ६ | श्री. के. एन. शिंदे | अभियंता |
| ७ | डॉ. महेश मोरे | आरोग्याधिकारी |
| ८ | श्री. चंद्रकांत जाधव | सहा.आरोग्याधिकारी |
| ९ | श्री. लक्ष्मण पाटील | सहा.आरोग्याधिकारी |
| १० | श्री. पी.डी. चव्हाण | प्र. नगररचनाकार |
| ११ | श्री.बी.एस. रनाळकर | प्र.लेखाधिकारी तथा सहा.मु.नि. अधिकारी |
| १२ | श्री.रमजान अन्सारी | कार्यालय अधिक्षक |
| १३ | श्री. एन.के. बागुल | विद्युत अभियंता |
| १४ | श्री. सी.सी. बागुल | पा. पु. ओव्हरसिअर |
| १५ | श्री. हेमंत पावटे | ओव्हरसिअर बां.वि. |
| १६ | श्री. राजू माईनकर | भांडारपाल |
| १७ | श्री. किशोर सुडके | बाजार विभाग |

| | | |
|---|---|---|
| १८ | श्री. राजकुमार सुर्यवंशी | प्र.अधिक्षक परवाना विभाग |
| १९ | श्री. महेंद्र सोनवणे | प्रशासन अधिकारी मनपा शिक्षण मंडळ |
| २० | श्री. तुषार ढाके | अग्नीशमन अधिकारी |
| २१ | श्री. आत्या राऊत | वाहन विभाग प्रमुख |

म.सभापती — सर्व उपस्थित सन्मा. सदस्य अति. आयुक्त सो. अधिकारी वर्ग छायाचित्रकार बांधव सभेचे कामकाज चालविणेसाठी आवश्यक तो कोरम पूर्ण झाल्याने नगरसचिव यांनी सभेचे कामकाज सुरुवात करावी.

म. नगरसचिव — वंदे मातरम् या राष्ट्रवंदनेसाठी सर्वांनी उभे रहावे

**दिनांक २६/१०/२०२१ रोजीच्या मे. स्थायी समिती सभेत सन्मा. सदस्यांनी उपस्थित केलेली चर्चा व त्यावरील निर्णय**

म. नागसेन बोरसे:- — सभापती महोदय मी वेगळया विषयावर चर्चा करणार आहे आस्थापना विभागामध्ये महिला कर्मचा-यांना त्रास दिला जातो त्या संदर्भात मला बोलायचे आहे. कालच वर्तमान पेपरात बातमी होती आस्थापना विभागात महिलांची नियुक्ती यांचे गौडबंगाल काय व महिला कर्मचारयांना दिला जाणारा त्रास माझी संबधीत विभागाच्या अधिक्षकांना विनंती आहे की त्यांनी यांचा खुलासा करावा कॉस्टाइब संघटने वाल्यांनी तक्रार केली आहे ज विभागाचे अधिक्षक आहेत ते त्रास देतात. मानसिक त्रास हा त्यांच्या कडुन सुरु आहे. या पूर्वीही मी आरोप केला होता आस्थापना विभागात नेहमी कर्मचारी पिळवणूक होते. काही महिलांना शारीरीक त्रास दिला जातो. रमजान अन्सारी हा वेळोवेळी महिला कर्मचारयांना त्रास देतो आहे. त्यांना सांगतात लेखी दया मी कुठलाही त्रास देत नाही. हे प्रकरण ईथेच थांबवले नाही तर पुढील परिणाम गंभीर भोगावे लागतील आपल्या कडे महिला समिती आहे का.

म. अति. आयुक्त — विशाखा समीती नेमलेली आहे.

म. नागसेन बोरसे — कधी नेमलेली आहे.

म.अति आयुक्त — त्या समीतीकडे हा विषय दिला जाईल.

म.नागसेन बोरसे — ज्या माणसाची महिला बददल मानसिकता चांगली असेल अशांना तिथे बसवा.

म.अति आयुक्त — आवश्यक वस्तुस्थिती लक्षात घेत समिती पुढे चौकशीसाठी प्रकरण देण्यांत येणार आहे.

म.नागसेन बोरसे — किती दिवसात निर्णय घ्याल व महिला अधिकारयांची चौकशी अधिकारी म्हणून नेमणूक करा

म.अमोल मासूळे — गेल्या स्थयीच्या मिटींगमध्ये आयुक्त सो. उपस्थित होते त्यावेळी मी तुम्हाला वॉटर ग्रेस संदर्भात कर्मचारयांची यादी दिली होती जवळ १७३ कर्मचारयांची यादी दिली होती कि वॉटरग्रेस कडे जवळ जवळ २५० त ३०० कर्मचारी असतांना १७३ कर्मचारी रेकॉर्डवर ठेवतो ज्या कर्मचारयांचे पी.एफ. चे चलन तो भरत नाही तर आपण त्यांच्यावर कोणती व कुठल्या प्रकारे कार्यवाही करु शकतो या बाबत मागील मिटींग मध्ये मला पुढील सभेत सर्व रेकॉर्ड आणेल असे सांगीतले होते. त्याच उत्तर मला अपेक्षित आहे तसेच मागील मिटींग मध्ये मी दोन प्रश्न उपस्थित केले होते. त्यावर देखील पुढील सविस्तर उत्तर देऊ. 1) धुळे शहरात जो मोकाट जनावर हैदोस निर्माण झालेला आहे. त्यावर मनपा नियंत्रण ठेवेल का. संबंधित विभागाचे अधिकारी काय काम करतात. 2) संपूर्ण धुळे शहरात जे बांधकाम मटेरियल रस्त्यावर पडते त्यामुळे वाहतुकीला अडथळा निर्माण होतो नागरीकांना मोठया समस्येला सामोरे जावे लागते या संबंधी संबंधित विभागाकडून माहिती आणि उत्तर अपेक्षित आहे आजचा जो विषय आहे धुळे शहरात लावण्यांत येणारे Led लाईट संदर्भात भाजप मनपा मार्फत धुळे शहरात चांगली योजना आणली पण गेल्या महिन्या भरात नियोजन चुकल्यामुळे काही भागात काम सुरु होते काही भागात बंद होते. त्यामुळे काही सदस्य नाराज होते त्यावर आयुक्त, महापौर आपण सर्व मिळून मिटींग घेतली. त्यात योग्य असा निर्णय घेतला प्रत्येक प्रभागात 5 ते 6 दिवस लाईटचे काम करु परंतु सभापती महोदय ज्यावेळी शेडयुल तयार करण्यांत आले आज मी लाईट विभागाशी संपर्क केला असता ते म्हणतात आमच्याकडे कुठल्याही पध्दतीचे लाईट शिल्लक नाही कुठल्याही व्हॅटचा लाईट शिल्लक नाही मग आपण ऐवढी चांगली योजना भाजपाच्या माध्यमातून आणली. त्यामुळे आपले नाव खराब होत आहे. मागील वर्षी सुनिलभाऊ बैसाणे सभापती होते त्यावेळी ज्या काही अटी शर्ती असतील त्या विभाग प्रमुखाने यांचे सविस्तर आम्हाला उत्तर दयावे माझ्या माहितीनुसार ज्यावेळी असं सांगण्यात आले होते की जो मक्तेदार आहे त्याला बील अदा करतांना त्यांच एक स्वतंत्र खाते उघडणे आवश्यक होते आणि दररोज त्या खात्यामध्ये ठरावीक रक्कम त्यात टाकून त्या ठेकेदाराला बील अदा करावयास पाहिजे होते. याचे कारण ते काम थांबावयास नको म्हणून असे ठरले होते. मी ती माहिती घेतली असता मनपाने तसे कुठल्याही प्रकारचे खाते उघडले नाही व कुठलीही रक्कम वेगळी काढून ठेवलेली नाही जो ठेकेदार आहे त्यांचे आज पर्यंत 5 ते 6 कोटीचे काम झालेले आहे. आणि त्या ठेकेदाराला आपण एक ते दीडकोटीचे बील अदा करतो आहे तर संबंधित ठेकेदार कशा पध्दतीने याठिकाणी काम करणार या ठिकाणी जे आपले लेखाधिकारी रनाळकर साहेब आहेत त्यांच्या विभागातून ठेकेदारांचे बील अदा करण्यांत येतात या ठिकाणी आपण तक्रारी करतो पण काम होत नाही जे कामात कुचराई करतात त्यांच्यावर कार्यवाही होईली का

? त्यांच्यावर कार्यवाही करा.गेल्या 15 दिवसांमध्ये ज्या ठेकेदारांचे बीले अदा करण्यांत आले आहे. यांची माहिती मला पाहिजे.

म.सभापती — श्री. रनाळकर Led ठेकेदाराचे किती बील पेंडींग आहे हे सांगा आणि वेगळे अकौंट उघडले का यांचीही माहिती दयावी.

म. बी.एस. रनाळकर — सदर कामाचे कुठलेही वेगळे खाते उघडलेले नाही आणि या ठेकेदाराचे रेडी फॉर पेमेंटसाठी कुठलेही देयक आमच्या विभागाकडे नाही.

म.सभापती — बागुल सो. ठरावाप्रमाणे त्यांना डिटेल्स दिले होते का?

म. एन.के. बागुल — मी तत्कालीन प्र. लेखाधिकारी यांच्या निदर्शनास आणून दिले होते त्यावेळी श्री.नाईक सो. होते.त्यांनी सांगितले की सदरचा खर्च हा फंडातूनच असल्याने असे वेगळे खाते उघडता येत नाही.

म. सभापती — आता बिले किती पेंडींग आहेत.

म.एन.के. बागुल — आता त्यांचे 2 कोटी 80 लाखाचे बील आहे आयुक्त सो. यांची मान्यता झाली आहे.

म. सभापती — कामाची स्थिती काय आहे.

म.एन.के. बागुल — शनिवार पासुन काम बंद होते. आपल्याकडे 60 वॅट 45 वॅट 90 वॅट चे लाईट उपलब्ध नव्हते. काल संध्याकाळी 45 वॅटचे 260 लाईट आले साधारणत: 8 प्रभागात 200 लाईट आज लावले जातील.

म. सभापती — मागील सभेत सांगितले होते त्यांचा अहवाल तयार करत जा तो केला आहे का?

म. एन.के. बागुल — हो तसा अहवाल केला आहे.

म. सभापती — आणि बिलांच्या कंडीशन्स काय आहेत किती परसेंन्ट बील त्याला दयावयाचे आहे.

म.एन.के. बागुल — त्यांच्या कंडीशन अशी आहे त्यांची30%डिपॉझीट गॅरंटी म्हणून ठेवली आहे त्यामध्ये 5%आपण बिलातून कपात करतो आणि 25%आपण बॅक गॅरंटी म्हणून ठेवतो आहे.

म. सभापती — सुरुवातीला झालेल्या कामाच्या अगेन्स किती रक्कम दयावयाची आहे.

म. एन.के. बागुल — आता पर्यत साडे पाच कोटीचे काम झालेले आहे आता तिसरे बील बनविले आहे 2 कोटी 80 लाखाचे बील आहे.

म.अमोल मासुळे — त्यांनी नियोजनानुसार 20 तारीख दिली होती आज मिल परिसरातील अनेक कॉलन्या अंधारात आहे तुम्ही पेपरात बातमी दयाला नव्हती पाहिजे.नागरीक पेपर वाचतात ते आज आम्हाला फोन करीत आहे.

म. एन.के. बागुल — दि.१४/६/२०२१ रोजी आपण Led लावण्याचे काम चालू केले आहे. त्यात आता पर्यत 11700 लाईट लावले आहेत. सर्व 19 प्रभागात काही प्रभागात 70 % काहीत 50%काहीत 30% काहीत 20% असे अनबॅलन्सींग काम झालेले आहे. सुरवातीला आपण प्रभाग क्रं.1व 19चे काम घेतले होते त्यानंतर साहेबानी जो तक्ता बनविला त्या प्रमाणे प्रत्येक प्रभागात काम करण्याचे ठरविले हाते हया ऑक्टोबर 60 वॅटचे लाईट शिल्लक नाहीत 90 वॅटचे लाईट संपलेले आहेत आता 3 दिवसापासून काम बंद होत काल 280 लाईट मिळाले आपल्याला त्याप्रमाणे 8 प्रभागात काम लावलेले आहेत.

म. सभापती — आज किती नंबरच्या प्रभागात काम चालू आहे.

म. एन.के. बागुल — प्र.क्रं. 17 मध्ये शांतीनगर प्र.क्रं. 5 मध्ये क्षिरे कॉलनी, गितानगर,शाहूनगर, प्र.क्रं.15 मध्ये जवाहर नगर, उत्कर्ष कॉलनी प्र.क्रं.16 मध्ये परिसर दिलेला आहे. प्र.क्रं. 4 मध्ये चंदनगर परिसर आहे.

म.अमीन पटेल — DPR 14000 चा मंजूर आहे आणि 11700 लाईट लावून गेले हे कसे शक्य आहे.

म.अमोल मासुळे — 14000 मधून 11000 लाईट लावले गेले तर अजून अर्ध धुळे शहर बाकी आहे.

म. एन.के. बागुल — काही ठिकाणी रिकामे पोल आहेत तर काही ठिकाणी Led लाईट लावण्यांत आले आहे.

म. नागसेन बोरसे — ज्यावेळी लाईटाचा विषय आला होता त्यावेळी मी सांगितले होत ज्या नवीन वसाहत आहे त्याठिकाणी 200 ते 150 फूटावर पोल आहेत आणि 6 मिटरचे रस्ते आहेत त्याठिकाणी 30 वॅटचे लाई ट लावले त्यांचा उजेड पडणार आहे का? त्यामुळे 3 ते 4 हजार पोल आपल्याला मंजूर करावे लागतील म्हणजे तीन हजार पोल आहे तर 3000 लाईटपण येईल तो DPR मध्ये टाकावयास पाहिजे होता ते झाले नाही आणि ज्या नगरसेवकांनी नवीन पोल मंजूर केले होते 5 ते 6 वर्षाच्या काळात ते 2 ते अडीच हजार पोल आहेत त्यावरील लाईट खराब झाले ते पण लावले पाहिजे ते देखील झाले नाही जवळ जवळ 5 ते 6 हजार लाईटाचे वाढीव एस्टीमेट तयार करायला पाहिजे होते 4 हजार पोल मंजूर केले पाहिजे होते ते पण झाले नाही. ज्यावेळी सर्व्हे झाला त्यावेळी धुळे शहराचे सर्व पोल मोजले गेले का ? मेंटेनन्स वाल्याला आपण जेवढे दिले होते तेवढयाच पोलचा DPR तयार केला आपण नवीन पोल किती लावले नवीन वसाहतीत किती पोल आहे याचा काही उल्लेख नाही राहिला विषय ठेकेदाराचा ज्यावेळी ठेकेदाराला आपण काम देतो त्यावेळी असा कुठेच उल्लेख होत नाही तुम्ही 1 कोटीचे काम केले तुला 1 कोटी देतो त्यांची पत बघून त्याला ठेका दिला जातो. त्यांची बॅकगॅरंटी बघून ठेका दिला जातो. त्यांची 10 कोटी रुपयांचे काम करायची ऐपत नसेल तर आपण ठेका देतो जर त्यांचे काम थांबविले तर आपण म्हणतात त्यांचे बील द्या जर रस्त्याच्या ठेकेदाराने काम थांबविले तर आपण म्हणतो का बील द्या हा प्रकार काय चालू आहे.

म. भारती माळी — आताच बागुल सो. यांनी सांगितले की काही ठिकाणी दोन दोन लाईट लावले नागसेनभाऊंनी सांगितले 6 मिटरचा रस्त्याला कमी व्हॅटचे लाईट लावले काही ठिकाणी 60 वॅट, 90 वॅटचे लाईट लावले आहे तर काही ठिकाणी 30 वॅटचे लाईट लावले आहे 30 वॅटचा लाईट जर असेल तर तो किती उजेड देऊ शकतो. आणि माझ्या प्रभागात सर्व रस्ते 9 मिटरचे आहेत त्या ठिकाणी कमीत कमी 60 वॅटचा लाईट लागला गेला पाहिजे. माझ्या कॉलनी परिसराचा भाग आहे खूप विखुरलेला भाग आहे त्याठिकाणी 2 लाईट लावणे गरजेचे होते जो चौक असेल त्याठिकाणी आम्ही सांगतो दोन लाईट लावा आम्ही बागुल सो. यांना फोन करतो लाईटाची काय परिस्थिती आहे.लाईट शिल्लक नाही असे उत्तर मिळते नागरीकांचे आम्हाला मॅसेज येतात 8 दिवसावर दिवाळी आहे दिवाळीत आम्हाला उजेड मिळेल का दिवाळी अंधारात करायची का?

म. सभापती — बागुल सो प्र.क्रं.2 मध्ये किती काम बाकी आहे.

म. भारती माळी — बागुल साहेबांनी मला सांगावे माझ्या प्रभागात किती लाईट लावले यांची यादी दयावी. तापी माई सोसायटी, व्दारकामाई सोसायटी हे हायवे लगतचा भाग आहे तो तरी आधी करा.

म. एन.के. बागुल — प्र.क्रं.2 मध्ये दत्तमंदिर चौकापासून नगावबारी पर्यतचा परिसर दि. 16 पर्यत 970 लाईट लागलेले आहेत.त्यामध्ये प्रभात नगर, विद्यानगर,सुयोगनगर, कदमबांडेनगर आग्रारोडला जो रस्ता आहे दत्तमंदिर डिव्हाईडर हे सर्व मिळून 970 लाईट लावले आहेत. आज सुध्दा प्र.क्रं.2 मध्ये भगवतीनगर मध्ये लाईट लावायला माणसे पाठविले आहेत आज 280 लाईट आले होते त्यापैकी 220 लाईट लागून जातील 40 शिल्लक राहतील 45 वॅटचे या बाबत त्या ठेकेदाराला नोटीस दिली आहे. टप्याटप्याने लाईट येत आहेत.

म. सुनिल बैसाणे — धुळे शहरात अनेक समस्या आहेत त्या समस्या सोडवण्यासाठी नगरसेवक नागरिकांच्या वतीने बाजू मांडत असतो वॉटर,गटर,मिटर हे मनपाची समस्यांची प्रमुख बाब आहे या ठिकाणी अनेक समस्या ,मुददे उपस्थित केलेले आहे. आम्ही स्थायी मध्ये प्रश्न मांडत असतो अधिकारी वेळ मारुन घेतात आयुक्त सो महापौर सभापती प्रशासनातील सर्व अधिकारी यांनी जो धुळे शहरांचा मुख्य प्रशन होता तो मार्गी लावण्यासाठी प्रयत्न केला त्या सर्व सभा व्यक्तीचे मी अभिनंदन करतो. या ठिकाणी माझा हा जो विषय मांडत आहे, हा नागरिकांच्या विषयाशी निगडीत आहेच तसेच मनपाच्या कार्यपध्दतीच्या बाबतीच्या ही निगडीत आहे मी सकाळी आयुक्त सो. यांना निवेदन दिले आहे की राष्ट्रीय नागरी उपजिवीका अभियानांतर्गत दिपक खोंडे यांच्यावर आजवर कार्यवाही काय केली तसेच अमोल प्रभाकर तारगे यांच्या नस्तीच्या बाबती मध्ये तक्रार झालेली आहे त्यावर कार्यवाही झालेली नाही दुसरा विषय धुळे मनपात जे गरीब घरातील मुले इंग्रजी माध्यमामध्ये शिक्षण घेतात त्यांना शिक्षणापासुन वंचीत ठेवण्याचे काम मनपा मार्फत होत आहे. या सर्व बाबतीत आयुक्तांना निवेदन दिलेले आहे जर यांच्यावर आपण७ दिवसांच्या आत कार्यवाही केली नाही तर मी लोकशाही मार्गाने धुळे मनपाच्या गेटवर प्रशासनाच्या विरोधात उपोषणास बसणार आहे. आणि त्या बाबती मध्ये गांभिर्याने विचार केला नाही तर मी न्यायालयात जाणार आहे. या आधी सुध्दा या विषयावर आपण प्रकाशझोत टाकला आहे. प्रथमत: मी आपल्या निवेदनाची एक प्रत देतो. आपण प्रशासनाला तात्काळ आदेशित करण्यासाठी देत आहे आणि आयुक्त सो. तुमच्या बाबतीत माझ्या मनामध्ये एक गैरसमज झाला होता परंतु एखादयाअधिकारयांच्या संपर्कात गेल्यानंतर अधिकारयांशी विचार विनिमय केल्या नंतर त्या अधिका-याच्या बाबतीत आपण मत प्रगट करावे. त्यामध्ये मी चुकलो. होतो ज्या पध्दतीने माझे तुमच्याशी चर्चा संभाषण झाले अनेक मनपाच्या हिताच्या तुमच्याशी चर्चा झाल्याने माझा जा गैरसमज होता तो दुर झाला खरच आपण या ठिकाणी एक चांगले काम करण्याचा प्रयत्न करीत आहे मनपात प्रशासनाचे कसे काम चालू आहे. धुळे मनपात गेल्या २५ वर्षापासुन दोन कर्मचारी असे आहेत त्यांना नियुक्ती पत्र नाही तरी देखील त्यांना आजपर्यंत लाखो रुपये पगार मानधन मनपाच्या तिजोरीतून दिला गेला आहे. त्या दोन महाभागांना २५ वर्षाचे आता पर्यंत किती पैसे होतात तर आपल्याला विनंती आहे आस्थापना विभागाचे किंवा त्यावेळी ज्यांनी-ज्यांनी स्वाक्षरी केली आहे या सर्वांकडून ती रिकव्हरी झाली पाहिजे दुसरी गोष्टी असा भोंगळ कारभार जर आस्थापना विभागाकडून होणार ती लक्षात आली आसेल किंवा नसेल तर डोळे साफ करण्याचे कारण असे की मी शिक्षण मंडळाचा १० वर्ष सदस्य होतो त्योवेळी इंग्रजी माध्यमाच्या संस्थेमध्ये प्रवेश देण्याकरीता गरीब नागरीकांच्या पाल्याकडे पैसे नसताना आपण प्रत्येक नागरीकांकडून शिक्षण कर नावाचा कर वसुल करतो. म्हणून आम्ही विचार या विद्यार्थ्यांना इंग्रजी माध्यमातुन शिक्षण दिले गेले पाहिजे. यामुळे 4 इंग्रजी माध्यमाच्या शाळा सुरु केल्या. त्यांत काय गौंडबंगाल आहे. त्यांचे नियुक्ती पत्र घेणे हे नगरसेवकांचे काम आहे का? हे प्रशासनाचे काम नाही का? जर महासभेमध्ये सभासदांनी त्या मुलांना इंग्रजी माध्यमातून शिक्षण द्यायला पाहिजे. म्हणून शिक्षकांचा ठराव करुन दिला की त्यांना मानधन मिळायला पाहिजे. आपण शासनाकडून इंग्रजी माध्यमाच्या शाळांना मान्यता घेतलेली आहे. शासनाचा नियम आहे कुठल्याही इंग्रजी माध्यमाच्या शाळांना अनुदान देत नाही. महाराष्ट्र स्तरावर अनेक मनपामध्ये इंग्रजी माध्यमाच्या शाळा सुरु केल्या आहेत. त्यांचा पगार , मानधन मनपाने करावयाचा असतो.एवढे झाले असतांना इंग्रजी माध्यमाच्या शाळा बंद करण्यांची वेळ येत आहे.

त्या इंग्रजी माध्यमाच्या शाळेत दलित, गरीबांचे कार्यकर्तेचे तसेच ओबीसी समाजाचे जे खाजगी शाळांमध्ये फी भरु शकत नाही 400 ते 500 विद्यार्थी असलेल्या ज्या मराठी शाळेत एक शिक्षक तीन विद्यार्थी घेवून बसतो त्याला आपण 60 ते 70 हजार पगार देतो. याठिकाणी तुमच्याकडे विद्यार्थी संख्या असतांना तुम्ही फक्त कायदयाच्या चौकटीवर बोट धरुन त्यांना वेठीस धरण्यांचे काम प्रशासनाच्या माध्यमातून होत आहे. जर हे चूकीचे आहे मी तुम्हाला सांगितले त्या दोन कर्मचा-यांचा पगार 25 वर्षापासून नियुक्ती पत्र नसतांना का दिला जात होता हा माझा आरोप आहे. तुम्ही सर्व जर संघटित भ्रष्ट्राचार करीत होता का? जर हे चूकीचे आहे तर ते बरोबर असू शकत नाही. यामुळे जर त्या 400 ते 500 विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होत असेल तर जनता तुम्हाला कदापि माफ करणार नाही. याबाबतीत जो निर्णय आहे तो तुम्हाला घ्यावा लागणार आहे. त्या पाल्यांच्या नातेवाईकांना घेवून मी मनपाच्या गेटवर आंदोलन करणार आहे. गेल्या अनेक दिवसापासून दिपक खोंडे यांचा विषय मी लावून धरला आहे. पहिली गोष्ट त्याला मनपामधून कार्यमुक्त करावयास नको होते. यात भाजपाला बदनाम करण्यांचे काम होत आहे आम्ही सभेमध्ये प्रश्न मांडतो आहे. पत्रकार आमच्यावर हसतात. प्रशासन तुमच्या प्रश्नाकडे लक्ष देत नाही. यामध्ये कोणालाही माफी देणार नाही. त्या दिपक खोंडेच्या बाबतीमध्ये काय निर्णय घेणार आहे? त्यावर प्रशासनाने काय कार्यवाही केली त्याला मनपातून कार्यमुक्त का केले यावर माझा आक्षेप आहे.

म. रमजान अन्सारी — दिपक खोंडे प्रकरणी दोन वेळा चौकशी करण्यांत आली आहे. आणि सहा.आयुक्त सोनार सो. यांनी चौकशी केली होती. त्यानंतर आयुक्त सो. यांच्याकडे चौकशी अहवाल प्राप्त झाल्यानंतर त्याची छाननी करण्यांत आली. छाननी केल्यानंतर मा. आयुक्त सो.यांच्या आदेशानुसार तत्कालीन अ ति. आयुक्त सो. यांना फेर चौकशी करण्यांचे आदेश देण्यांत आले होते.ती चौकशी झाल्यानंतर दोन्ही चौकशी अहवालाचा एका पाकिटात बंद करुन नगरपरिषद, संचनालय मुंबई यांच्याकडे अहवाल पाठविण्यांत आला होता. या अहवालावर त्यांनी कार्यवाही करावयाची आहे.

म. सभापती — कोणाच्या सहीने श्री. खोंडे यांना कार्यमुक्त केले?

म. रमजान अन्सारी — ते नस्तीवरुन पहावे लागेल.

म. सुनिल बैसाणे — रमजान अन्सारी तुम्ही याठिकाणी चूकीचे उत्तर देऊ नका. मी याठिकाणी इतके नागरीक आणेल तुम्हाला पोलीस बंदोबस्तात घरी जावे लागेल. तुम्ही दोन वर्ष अहवाल आयुक्तांकडे दिला नाही. या आधी आस्थापना विभागात कोण कार्यरत होते.

म. रमजान अन्सारी — या आधी सोनार सो. हे आस्थापना विभाग पहात होते.

म. सुनिल बैसाणे — सोनार सो. तुम्ही मला हे सांगा त्यामध्ये माझा आक्षेप खोटा किंवा चुकीचा आहे का ?

म. सोनार — पहिल्या टप्प्यात खोंडे यांना दोषी ठरविण्यांत आले होते.

म. सुनिल बैसाणे — तुम्ही जी कार्यवाही केली ती योग्य आहे का?

म. रमजान अन्सारी — ही कार्यवाही मी केली नसून प्रशासनामार्फत मा. आयुक्त सो. यांनी केली आहे. तत्कालीन सहा.आयुक्त श्री. सोनार सो. यांनी 20 मुद्दे उपस्थित केले होते. त्याचा अहवाल सादर केला होता. त्यानंतर अति. आयुक्त श्री. गिरी सो. यांना फेर चौकशी करण्याचा आदेश देण्यांत आला होता.

म.सभापती — आता आपण असे करु दोन्ही अहवालावर तिसरी चौकशी लावू.

म.अति. आयुक्त — श्री. रमजान अन्सारी यांनी जो चौकशी अहवाल दिला होता. 7-8 मुद्दे होते त्यावर एका मुद्दयावर क्लिनचिट केलेले होते.

म.रमजान अन्सारी — तत्कालीन सहा. आयुक्त श्री. सोनार सो. यांनी चौकशी केली होती. त्यात 20 मुद्दे होते. त्यांचा चौकशी अहवाल सादर केला होता. त्यामध्ये श्री. खोंडे दोषी दिसत आहे तो अहवाल प्राप्त झाल्यानंतर आयुक्त सो. यांच्याकडे पाठविण्यांत आला. त्यावर आयुक्त सो.यांनी पुन्हा फेर चौकशीचा आदेश दिला. खोंडेकडून पुन्हा स्पष्टीकरण मागविण्यांत आले होते. त्यानुसार पुन्हा फेर चौकशीचे आदेश दिले.

म. नागसेन बोरसे — ज्यावेळी तुम्ही सोनार यांचेकडून चार्ज घेतला त्यावेळी ही यादीत आले असेल की, कोणकोणते प्रकरणे प्रलंबीत आहे. दोन वर्ष रमजान अन्सारी यांनी हे प्रकरण दाबून ठेवल. आयुक्त सो. यांच्या निदर्शनास त्यांनी आणून दयावयास पाहिजे होते. अशी चौकशी झालेली आहे. कर्मचा-यांवर कार्यवाही करावी असे स्पष्टपणे नमूद केलेले आहे. यांनी तसे कुठल्याही प्रकारे केले नाही. 2 वर्ष प्रकरण दाबून ठेवले.

म.रमजान अन्सारी — चौकशी अहवाल हा गोपनीय असतो.

म. नागसेन बोरसे — ज्या वेळी मी आरोप केले त्यावेळी तुम्ही तो विषय बाहेर काढला.त्यानंतर फेर चौकशी लावली. माझी अशी विनंती आहे.2 वर्ष यांनी अहवाल दाबून ठेवला मग यांच्यावर काय कार्यवाही केली पाहिजे.

म. सुनिल बैसाणे — सभापती महोदय, चौकशी लावण्यांची गरज नाही. तुम्ही यांच्यावर गुन्हा दाखल करा.जे मुद्दे जे कागदपत्र त्यांच्या वरुन त्याला दोषी ठरविले होते. या योजनेचा कोणाकोणाला लाभ होणार होता त्या नस्तीवर ज्याच्या ज्याच्या सहया आहेत ज्यांनी ज्यांनी त्याला पाठीशी घालण्याचा प्रयत्न केलेला आहे. त्या सर्वांना मी आरोपीच्या पिंजरयात

ठेवले एखादया कोर्टाने जर तुम्हाला दोषी ठरवले तिथे न्यायाधिश असतो यामध्ये तुम्हीच चौकशीचा आदेश देतात आणि तुम्हीच फेरचौकशी करता.सभापती महोदय यांच्यावर तुम्ही गुन्हा आज नोंदविणार का यावर मला स्पष्टीकरण पाहिजे.

अति. आयुक्त — खोंडेनी एफ.आय.आर. नोदविल्या संदर्भात आवश्यक ती कार्यवाही करुन ठेवली आहे.त्यांनी कोर्टात अपील केले आहे.

म. सुनिल बैसाणे — तो कोर्टात कसे जाईल तो त्यांच्यावर गुन्हा दाखल नाही तर तो कशाच्या आधारावर गेला

सभापती — दर मिनटाला आपण खोंडेचा विषय करतो फक्त चर्चा होते प्रत्येक सभेला हेच उत्तर मिळत आहे. आपण एक समिती नेमायची का माझ्या अध्येक्षतेखाली जे तक्रारदार असतील त्यांना कापडणीस सो.,म.शितलभाऊ नवले, म. बंटीभाऊ मासुळे, म. नागसेनभाऊ बोरसे यांनी विषय मांडले आहेत आस्थापनाला सोबत घेऊ त्यांची बैठका घेऊन त्यांची संपूर्णपणे माहिती घेऊ.

म.सुनिल बैसाणे: — आपण तीन चार लोकांची समिती नेमली आमचे राहिले ३ ते ४ महिने

म. सभापती: — हा विषय संपेपर्यंत समिती राहील.

म. सुनिल बैसाणे — मला ७दिवसांमध्ये या समितीचा निर्णय देत असाल तर माझी त्याला काहीच हरकत नाही. त्यामध्ये म.नागसेनभाऊ बोरसे, म. शितलभाऊ मी अशी समीती नेमुन जे-जे दोषी असतील त्यांच्यावर कार्यवाही करावी. दुसरा मुद्दा असा आहे अमोल प्रभाकर तारगे हा तक्रारदार धुळे मनपाचा करोडो रुपयाचा विषय आहे धुळे मनपा आज ज्या पध्दतीने जाते आहे त्याच्यामुळे मनपाच्या तिजोरीत भर पडणार आहे. ती नस्ती गहाळ झाली तरीपण तक्रारदाराकडे आजही ते कागदपत्र आहेत सभापती महोदय तुम्ही त्याला बोलवून त्यांच्या कडुन ॲफेडेव्हिट करुन ते तयार करा त्यांचा ही निपटारा ६/७ दिवसामध्ये करा अशी तुम्हाला विनंती आहे. मानधन तत्वावर आपण कर्मचा-यांना नियुक्ती करतो मनपा प्रशासनाला त्यांचा हातभार लागावा म्हणुन पण ते एवढे मुजोर झालेले आहेत माजी महापौर कल्याणी ताई अंपळकर त्या विशिष्ट विभागाच्या खात्यामध्ये गेले असताना त्यांचा मान-सन्मान ठेवला जात नाही तसेच अनेक विभागामध्ये नगरसेवकांचा मान-सन्मान ठेवला जात नाही आणि जे मानधनावर आहे ते अशापध्दतीने वागणारे आहेत असे मनपात कधीही खपवून घेतले जाणार नाही आपण प्रशासनाचे प्रमुख आहेत सर्व खाते प्रमुखांची एक बैठक घेऊन माझा नगरसेवक तुमच्या विभागात आल्या नंतर त्यांचा मान सन्मान जर राखला गेला नसेल त्यांचा जाब तुम्हाला महा सभेमध्ये दयावा लागेल असे मी तुम्हाला या ठिकाणी आवाहन करतो. महिला उपमहापौरांना जर अशी वागणुक देत असाल तर,सर्व नगरसेवकांना अशी वागणुक देत असाल हया मनपात काय काय झाले आहे आणि काय काय घडते हे महासभेत मी स्क्रीनवर दाखवणार सभापती महोदय मी मांडलेल्या विषयांचा ७ दिवसांत जर निपटारा झाला नाही तर मी मनपा गेटवर लोकशाही मार्गाने आंदोलन करेल आणि आपण ती आंदोलन करण्याची वेळ येऊ देणार नाही यांची मला खात्री आहे.

सभापती: — राष्ट्रीय उपजिविका अभियाना अंतर्गत दिपक खोंडे यांच्यावर बरयाच वेळा चर्चा करुन सभागृहात काहीच निष्पन्न होणार नसल्याने या ठिकाणी मी ठराव करतो की, या ठिकाणी आपण एक समीती नेमतो त्यामध्ये मी असेल म. नागसेन बोरसे, म.शितलभाऊ नवले, म.सुनिलभाऊ बैसाणे, म. बंटी भाऊ मासुळे, आणि अजून कोणी सदस्य येऊ इच्छूक असतील तही समीतीत येऊ शकतात.प्रशासनाच्या वतीने कापडणीस साहेब आस्थापनामधुन म. सोनार साहेब त्यांनी १ ली चौकशी केली दुसरे रमजान अन्सारी तेही असतील संदर्भात आठवडयातून दोनदा बसु त्या विषयावर संपूर्ण चौकशी करुन कार्यवाही करु .

म. अमीन पटेल — सर्वप्रथम दिवाळीच्या शुभेच्छा देतो आज शहराच्या जो मुख्य प्रश्न आहे पाणी,कचरा, लाईट या तीन प्रश्नावर सर्वात जास्त लक्ष दिले पाहिजे माझ्या प्रभागात १५ दिवसांपसुन पाणी नाही त्या भागात ३वेळा पाईपलाईन पुरवली आहे त्यावर माझे म्हणणे असे आहे की अक्कपाडयाची १५०कोटीची पाईपलाईन मंजूर केली आहे. त्याच्यात ६/७ कोटी तापी योजनेसाठी टाकले आहे. अक्कलपाडयाचे काम कुठुन कुठपर्यंत झाले आहे.अक्कलपाडा योजनेवर जर लक्ष नाही दिले तर हा ठेकेदार आपली दिशाभुल करत राहिल आणि जे ६/७ कोटी तापी योजनेसाठी होते त्या पाईप लाईनचे रिपेरिंग का होत नाही .

म. कैलास शिंदे — अक्कलपाडा योजना महाराष्ट्र शासनाने एम.जी.पी कडे दिली आहे. त्यावर आपल मनपाचे देखील नियंत्रण आहे साधारण: आपल्याला ४२की.मी. पाईपलाईन टाकायची होती त्यापैकी ३६ कि.मी. पाईपलाईन झाली आहे. जॅक्वेलसाठी आपण इरीगेशन कडे पाठपुरावा करतो आहे. त्यांच काम चालु २३ मिटरची खोदाई पूर्ण झाली आणि १३ मिटरचे रिंग ओतून बांधकाम देखील पूर्ण झाले सध्या पावसाळया मुळे ते काम थांबविले आहे तसेच फेडरेशन चे जे काम आहे त्याचे काम ७० टकके पुर्ण झालेले आहे. ही कामे साधारणत: मार्च पर्यंत संपतील

| | |
|---|---|
| अमीन पटेल | पुढील मिटींग मध्ये स्क्रीन लावा अक्कलपाडयाचे पाईपलाईनचे किती काम झाले किती बाकी आहे हे सर्व सदस्यांना दाखवा दुसरया वेळेस ठेकेदार येतो त्यावर आपल्या अधिकारयाचे नियंत्रण राहत नाही तो मनमानीने काम करतो. |
| म. कैलास शिंदे | सभापती महोदयांनी सांगीतले या आठवडयात आपण पहाणी करु त्या ठिकाणी तुम्ही या |
| म. अमिन पटेल : | जर आपण अक्कलपाडयाचे पाणी आणले तर आपले लाईट बील वाचणार आहे तापी पाईप लाईन लीकेजचे काम का होत नाही. पुन्हा पुन्हा लिकेज होते त्यामुळे 15-15 दिवस पाणी येत नाही पुढच्या मिटींगमध्ये अक्कलपाडा आणि तापीचे काय काय कामे झाली यांची माहिती मिळावी दुसरी गोष्ट डॉग व्हॅन घेण्यांचा त्यानंतर माझ्या प्रभाग मोठा असल्याने स्वच्छता कर्मचा-यांची संख्या कमी आहे. माझा 19 भागात टॉवर बाबत तक्रारी केली होती. त्यावर सर्व्हे नंबर बदलून त्याला NOC देण्यांत आली आहे. यांची चौकशी व्हावी. |
| म. पी.डी. चव्हाण | सदर विषयाची माहिती घेवून पुढील बैठकीत सांगतो. |
| म. कमलेश देवरे | माझी तुम्हाला विनंती आहे. आमच्या देवपूर भागात सर्वांनी यावे जेवणाचा खर्च मी करेल. नागरीकांचे मणके गेलेत दिवाळी तोंडावर आली लोकांना चालता येत नाहीऐवढे बोलुन सुध्दा ठेकेदारांने डांबरांचा एक लेअर सुध्दा टाकलेला नाही मागे त्यांनी सांगितले 52 K.M. डांबराचे रस्ते केले. |
| म.सभापती | श्री. शिंदे सो. वाडीभोकररोड,नकाणे रोडचे काम सुरु होणार होत त्यांची काय परिस्थिती आहे. |
| म.कैलास शिंदे | वाडीभोकररोडच कॉक्रीटकरणाचे काम सुरु करण्यापूर्वी त्या ठिकाणीआपल्याला पाईपलाईन टाकायची होती. त्यांची निविदा केली आहे पण त्यांचे रेट DSRपेक्षा बाजार भाव जास्त आहेत ते40% पेक्षा जास्त जाणार होते त्यामुळे ते काम करता येणे शक्य होणार नाही म्हणून त्यांची फेर निविदा केली त्याला आपल्याला HDP चे पाईप मिळता आहेत. साधारणत: 8 ते 10 दिवसात हे काम आपण सुरु करतो आहे B&C कडून कॉक्रीट रस्त्याच काम सुरु होईल आणि नकाणेरोडचे रस्त्यांचे आपले ड्रेनेज लाईनच काम चालू आहे. |
| म. सभापती | वाडीभोकर रोडच्या कामाचा कार्यादेश दिला गेला का? |
| म. कैलास शिंदे | टेंडर प्रक्रियेची मुदत 3 तारखेपर्यत आहे.कॉक्रीट रोड 100 कोटीमध्ये आहे. |
| म. कमलेश देवरे | मुख्य रस्त्यानंतर अंतर्गत रस्त्याची इतकी वाईट परिस्थिती आहे मला माहिती पाहिजे त्याला आता पर्यत किती बील अदा करण्यांत आले आहे याची सविस्तर माहिती मिळावी. |
| म. कैलास शिंदे | शासनाकडून आपल्याला 23.33 % अनुदान आलेआणि 5 कोटी मनपाचे असे 28 कोटी एम.जी.पी.कडे वर्ग केले होते. ते सर्व पैसे पूर्णत: खर्च झालेला आहे. सार्वजनिक बांधकाम विभागाने आणि मनपाने शासनाकडेस संयुक्तीक दुस-या हप्त्यासाठी मागणी केली आहे. मार्च पासून आपण प्रयत्न करतो आहे. |
| म. सभापती | ते अनुदान कधी मिळेल. |
| म. कैलास शिंदे | आतापर्यंत १०२ कोटी रु खर्च झाला आहे. मनपाच्या ठिकाणी डायरेक्ट वर्ग होत असतो त्यामुळे एम जी पी च बील अदा करते. |
| म. कमलेश देवरे | सभापती महोदय १३६ कोटीचा कामामध्ये त्याला १०२ कोटीचे बीले दिली आहेत त्याने प्र क्र २,३,४,५ मध्ये कुठल्याही प्रकारचे काम केले नाही तो अपूर्ण काम करुन चालला गेला आहे सदरचा ठेकेदार मशिनरीसह १५ दिवसांपासून गायब झाला आहे आज एकही व्यक्ती त्यांच्या साईटवर नाही या बाबत सर्व आरोप आपल्यावर होतात एम जी पी च्या दारांशी कोणीही गेलेले नाही त्यावर काही कार्यवाही करा |
| म. सभापती | त्यांची स्वतंत्र एक बैठक लावू त्यांच्या कडून अहवाल घेऊ जर ते करतच नसतील तर आपण तयारी ठेवा गुन्हा दाखल करण्याची |
| म. शितल नवले | आपण कच-याच्या मागे लागलो मनपा अधिका-यांनी चांगले काम केले त्यामुळे सकाळ वृत्तपत्राने त्यांची दखल घेतली विचार करा रोज २००टन कचरा गोळा होणारा आज १२५ टनावर आला त्यामुळे याने दोन वर्षात किती भ्रष्टाचार केला असेल तुम्ही एक हफता लक्ष ठेवले म्हणुन ३५ टक्के ने भ्रष्टाचार मी होऊन गेला साहेब नविन ठेकेदाराला लवकरात लवकर ऑर्डर दया दुसरी गोष्ट मी तक्रार केली होती मलेरिया संदर्भात १०टक्के नैसर्गिक वाढ बाबत त्याचे काय झाले |
| म. लक्ष्मण पाटील | नैसर्गिक वाढचा जो मुद्दाआला होता त्याला आयुक्त सो. यांची मान्यता घेवून 10 % वाढ रद्द केली असून ती अट रद्द करण्यांत आली आहे. |
| म.शितल नवले | ही अट टाकलीच का ठरावाच्या अधिन राहून तुम्ही अॅग्रीमेंट का केली नाही हे टाकायचे कारण का? |
| म. लक्ष्मण पाटील | अनावधाने झाले आहे. |
| म.शितल नवले | करारनाम्यात डायरेक्ट 2 नंबरची लाईन आहे ती तुमच्या लक्षात कसे आले नाही. |
| म. सभापती | तुमच्या टेंडर नोटीस मध्ये होती का ही अट मग करारनाम्यात कशी आली. |
| म. शितल नवले | साहेब चूक ही चूक असते यांच्या सर्व्हीस बुकमध्ये नोंद घ्या यावर काय कार्यवाही करणार? |
| म. अति. आयुक्त | त्याच्या कडून चूक झाली त्यांनी मान्य केले आहे. |

| | |
|---|---|
| म. शितल नवले | या मध्ये किती लोकांना भाग घेण्यांस बोलविले. |
| म. लक्ष्मण पाटील | 3 लोकांना |
| म. शितल नवले | मग एकाचे का दर मागविले |
| म. लक्ष्मण पाटील | तिसरा निविदा धारक अनुभवामध्ये कमी होता. |
| म. शितल नवले | पूर्ण टेंडर प्रोसेस मॅनेज होते. फॉगींग कुठे चालू आहे. ते माहित नाही. अॅबेटींग कुठे चाले आहे हे माहित नाही. सर्व मॅनेज आहे. त्यांचे सॉप-वेअर नाही त्यांच्याकडे 77 कर्मचारी काम करतात त्यांचे पीएफ. पीएफ चलन नसणार याच्या विभागामार्फत मला वैयक्तिक पत्र पाहिजे की आमच्या कडून हे अनवधानाने झाले आहे |
| म. सभापती | ज्यांनी ज्यांनी सह्या केल्या तपासणे त्यांनी लक्ष दिले पाहिजे होते |
| म.शितल नवले | सभापती महोदय तुमच्या सभागृहाच्या ठरावात फेर बदल करून अपराध् केला तर तुम्ही काय कार्यवाही कराल |
| म.सभापती | महोदय ठरावात बदल केला असेल तर त्यांच्या अधिकाऱ्यांच्या इन्क्रिमेंट बंद करून सेवा पुस्तकात नोंद घ्यावी. |
| म.शितल नवले | साहेब आपण शिपायाला फौजदार केले आहे प्रत्येक भागात डेंग्यूचे पेशंट आहेत परवा एक व्यापारी मरण पावला सहा वर्षाचा मुलगा मयत झाला आज असा कोणता प्रभाग नाही तिथे डेंगू चा पेशंट नाही. |
| म. सभापती | तुम्हाला पेस्ट कंट्रोल च्या कामांमध्ये बरीच सुधारणा करायची आहे कारण फरक कुठे दिसत नाही |
| म.शितल नवले | सभापती महोदय डिस्ट्रिक मलेरिया ऑफिस वाल्यांना घेऊन बसा आणि ते टेंडर चे गौड बंगाल काय आहे ते सांगतील त्यांचा विरोध होता हे काम द्यायला साहेब आज संध्याकाळपर्यंत मला लेखी स्वरूपात मिळेल याची अपेक्षा करतो |
| म. सभापती | डॉक्टर मोरे संध्याकाळपर्यंत त्यांना लेखी द्या सदरची इतिवृत्तात देखील नोंद घ्यावी की त्यांनी असे अनवधानाने केले आहे |
| म. अमोल मासुळे | साहेब आमच्या प्रश्नांची उत्तरे पाहिजे |
| म. सभापती | बंटी भाऊ आणि अमीन पटेल यांनी मोकाट जनावरा बाबत विचारले आहे. डॉक्टर मोरे दोन आठवड्यांपासून हा विषय मिटिंग मध्ये चर्चिला जात आहे डॉग व्हॅन घ्यायची की कुत्रे पकडणारे बोलवायचे त्याचं काय झालं माहिती द्या |
| म.चंद्रकांत जाधव | मोकाट जनावरे संदर्भात आपण जे काही करतो दर वर्षी पांजरापोळ मध्ये जमा करतो आपण पांजरापोळ ला पत्र दिले आहे त्या अनुषंगाने त्यांचं पत्र आलं आहे त्यात त्यांनी ऍडव्हान्स मध्ये पैशाची मागणी केली आहे मागील वर्षी जनावरे पकडून पांजरापोळ मध्ये जमा केली होती त्यातून मालकांनी सोडून नेले होते त्यांना पेमेंट मिळाले नव्हते त्यामुळे त्यांना यावेळी त्यांनी एडवांस पेमेंट मध्ये मागणी केलेली आहे त्यानुसार कार्यवाही कार्यालयीन टिपणी सादर एक झाली त्या अनुषंगाने पांजरा पोळ ची जी कमिटी आहे त्या कमीटी ला साहेबांच्या दालनात मिटींगला बोलवले होते त्या दिवशी त्यांचे चेअरमन श्री महाले आणि श्री चौधरी हे बाहेरगावी गेले होते आता मी त्यांच्याशी संपर्क साधून माहिती घेतो |
| म.सभापती | हा विषय गांभीर्याने घ्या हे दोन्ही विषय परत पुढच्या सभेत येणार आहे |
| म.चंद्रकांत जाधव | आपल्या दालनात बैठक झाली या विषयावर आपल्याला डॉग व्हॅन घ्यायची होती आपल्याला जीएम पोर्टलवरून खरेदी करायची आहे वाहन विभागाला बोलावून त्यांना सर्व माहिती घ्यायला लावली आहे |
| म.सभापती | आपण २५ लाखाची तरतूद केली आहे की डॉग व्हॅन विकत घेण्यासाठी चांगली अद्ययावत व्हॅन घ्या चंद्रकांत जाधव- या संदर्भात कार्यवाही सुरू आहे कालच साहेबांनी आदेशित केले मालेगावला संपर्क करा ते ज्या पद्धतीने कार्यवाही करत असतील त्या पद्धतीने आपण प्रोसेस राबवूया असे आम्हाला निर्देश दिलेले आहेत |
| म.अमोल मासुळे | आता येथे मोकाट जनावरे बाबत जाधव साहेबांनी सांगितलं मी त्यांना पंधरा दिवस देतो पंधरा दिवसात मोकाट जनावरांचा वर कारवाई होईल का मनपाच्या जागा मोकळ्या आहेत धुळे मनपात बऱ्याच सह्या करून घरी जाणारे आहेत त्यांना तेथे कामाला बसवा |
| म.प्रदीप चव्हाण | रस्त्यावर जे काही बांधकाम पडले होते त्याबाबत आपण नागरिकांना आवाहन केलं होतं याबाबत निविदा करावी लागेल यात एजन्सीची अपॉईनमेंट करावी लागेल |
| म.सभापती | एक महिना देतो काम मुदतीत झाले पाहिजे |
| म.शितल नवले | मलेरिया संदर्भात दोन गोष्टी एक सॉफ्टवेअर आपल्याला दाखवणार होते त्याची तारीख पाहिजे दोन आता हे सांगतात आपल्याकडे कार्यालयीन टिप्पणी येते टेंडर प्रोसेस मध्ये त्यांनी दोन उघडले नवीन टेंडर नियमानुसार तीन निवेदन सादर केले पाहिजे होते मग त्यांनी दोन निवीदा धारकांवर कसे ओपन केले पहिल्याच कॉलममध्ये ओपन केले |
| म. डॉ. महेश मोरे | त्यांची आपण टेंडर प्रोसेस केली नव्हती त्यांच्याकडून प्रस्ताव मागितला होता त्यांच्यात आपण बैठक घेऊन ज्या इंटरेस्टेड एजन्सी होत्या त्यांच्यासमोर मांडले त्यानंतर त्यांचे प्रस्ताव आपल्याकडे आले या प्रस्तावानुसार आपण |

त्यांचे प्रेझेंट टेन्शन घेतलं त्या प्रेझेंटेशन नुसार मार्क दिले त्यामध्ये ज्याला जास्त मार्क पडले त्याला आपण क्वालिफाय केले

म.शितल नवले — तुम्ही कुठलेही टेंडर करा त्याचे तीन प्रकार आहेत कुठल्याही गोष्टीमध्ये तीन दर अपेक्षित आहेत तुम्ही शासनाचे नियम मोडले आहेत जर तुमच्याकडे दोनच क्वालिफाय होते तुम्ही परत टेंडर केले पाहिजे होते का नाही केले

म. डॉ. महेश मोरे — त्यावेळी आपले कॅपो जाधव साहेब होते त्यांनी अभिप्राय दिले त्यानुसारआपण कार्यवाही केली.

म.शितल नवले — शासनाने सर्व स्थानिक स्वराज्य संस्था आणि ग्रामपंचायतीसाठी एकच नियमावली केली आहे तुमच्या टिपण्या महत्त्व नाही आपण महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमानुसार काम करतो क्वालीफाय साठी तीन निविदा पाहिजे होते.

म.सभापती — पुढच्या सभेत सविस्तर माहिती द्या.

म. बी. एस. रनाळकर — वॉटरग्रेस कंपनीचे सहा महिन्याचे बिल आरोग्य विभागाकडून आलेले आहे.

म.चंद्रकांत जाधव — ५७ कर्मचाऱ्यांचे नावे टॅली केलीआहेत मी प्रत्यक्ष फिल्डवर जाऊन कर्मचाऱ्यांची पडताळणी केली कंपनीने १७३ कर्मचाऱ्यांचे चे इपीएफचे चलन सादर केले आहे चार भागात हजेरी मध्ये ५७ कर्मचारी आढळून आले आहेत अजून दोन भाग तपासाचे बाकी आहेत

म.शितल नवले — तुमच्याकडे स्वच्छता निरीक्षक किती आहेत

म.चंद्रकांत जाधव — आठ आहेत

म.शितल नवले — तुम्ही फिरायची काय गरज आहे ते आठ लोकांना सांगायचे

म.सभापती — आता जे सहा महिन्यांची बिले दिले आहेत त्यामधील पीएफच्या याद्या मला द्या.तसेच चर्चेतील मुद्दयाप्रमाणे प्रकल्प विभागातील श्री.दिपक खोंडे यांनी केलेल्या गैरव्यवहाराबाबत केलेल्या दोन्ही चौकशी अहवालाबाबत व त्यांच्यावरील दोषारोपाबाबत पुनश्च पडताळणी व तपासणी करण्यासाठी विशेष समिती गठीत करण्यांत येत असून यामध्ये सभापती स्थायी समिती,सदस्य श्री.सुनिल बैसाणे, श्री. नागसेन बोरसे,श्री.शितल नवले,श्री.अमोल मासुळे,अतिरिक्त आयुक्त श्री.नितीन कापडणीस तसेच उपायुक्त श्रीमती शिल्पा नाईक सहा. आयुक्त तथा चौकशी अधिकारी श्री. नारायण पंडीत सोनार, कार्यालयीन अधिक्षक श्री. रमजान अन्सारी यांची समिती गठीत करण्यांत येत आहे.या समितीने तांतडीने चौकशी करावी. या समितीचे सचिव म्हणून उपायुक्त श्रीमती शिल्पा नाईक यांनी कामकाज पहावे.

तसेच वसुली विभागातील गैरव्यवहाराबाबत श्री.अमोल तारगे यांच्या तक्रारीनुसार आवश्यक ती चौकशी व कार्यवाही तातडीने करुन त्याचा अहवाल स्थायी समिती समोर सादर करावा.

एकात्मिक डास निर्मूलनसाठी नियुक्त केलेल्या एजन्सीला स्वत: च्या अधिकारात दरवर्षी 10% नैसर्गिक दरवाढ देणेबाबतची अट करारनाम्यात विभागामार्फत नमूद करण्यांत आलेली आहे. व सदर अट अनावधानाने समाविष्ट झाल्याचे स्थायी समितीमध्ये संबंधित अधिका-यांनी स्पष्ट केले आहे.या अक्षम्य व मनपा हिताच्या विरुध्द वर्तन करणा-या या प्रकरणी जबाबदारअसणा-या अधिकारी व कर्मचा-यांची चौकशी करुन एक वर्षाची वेतनवाढ बंद करण्याबाबत कार्यवाही प्रशासनाने करावी व याबाबतची नोंद त्यांच्या सेवा पुस्तकात घेण्यात यावी.

शहरातील मोकाट जनावरे व कुत्रयाबाबत आरोग्य विभागाने तांतडीने बैठकीत ठरल्यानुसार कार्यवाही करावी.रस्त्यावरील पडलेल्या बांधकाम साहित्यामुळे होणा-या अडचणीबाबत तांतडीने एजन्सी नियुक्ती तथा प्रशासनामार्फत कार्यवाही करावी.

तसेच वॉटरग्रेस कंपनी मार्फत नियुक्त केलेल्या कर्मचा-यांच्या भविष्य निर्वाह निधीबाबत पडताळणी करुन त्यांची नांवे व यादी स्थायी समिती समोर सादर करावी.

## धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर १५४दिनांक २६/१०/२०२१

धुळे महानगरपालिकेच्या मे.स्थायी समिती सभेत सन्मा.सदस्यांनी उपस्थित केलेल्या विविध मुद्दयाबाबत प्रकल्प विभागातील श्री.दिपक खोंडे यांनी केलेल्या गैरव्यवहाराबाबत केलेल्या दोन्ही चौकशी अहवालाबाबत व त्यांच्यावरील दोषारोपाबाबत पुनश्च पडताळणी व तपासणी करण्यासाठी विशेष समिती गठीत करण्यांस मान्यता देण्यांत येत आहे. यामध्ये सभापती स्थायी समिती, सदस्य श्री.सुनिल बैसाणे,श्री.नागसेन बोरसे, श्री.शितल नवले,श्री.अमोल मासुळे, अतिरिक्त आयुक्त श्री.नितीन कापडणीस तसेच उपायुक्त श्रीमती शिल्पा नाईक सहा. आयुक्त तथा चौकशी अधिकारी श्री. नारायण पंडीत सोनार, कार्यालयीन अधिक्षक श्री. रमजान अन्सारी यांची समिती गठीत करण्यांत येत आहे.या समितीने तांतडीने चौकशी करावी. या समितीचे सचिव म्हणून उपायुक्त श्रीमती शिल्पा नाईक यांनी कामकाज पहावे.

तसेच वसुली विभागातील गैरव्यवहाराबाबत श्री.अमोल तारगे यांच्या तक्रारीनुसार आवश्यक ती चौकशी व कार्यवाही तांतडीने करुन त्याचा अहवाल स्थायी समिती समोर सादर करावा.

एकात्मिक डांस निर्मूलनसाठी नियुक्त केलेल्या एजन्सीला स्वत:च्या अधिकारात दरवर्षी 10% नैसर्गिक दरवाढ देणेबाबतची अट करारनाम्यात विभागामार्फत नमूद करण्यांत आलेली आहे. व सदर अट अनावधानाने समाविष्ट झाल्याचे स्थायी समितीमध्ये संबंधित अधिका-यांनी स्पष्ट केले आहे.या अक्षम्य व मनपा हिताच्या विरुध्द वर्तन करणा-या या प्रकरणी जबाबदार असणा-या अधिकारी व कर्मचा-यांची चौकशी करुन एक वर्षाची वेतनवाढबंद करण्याबाबत कार्यवाही प्रशासनाने करावी व याबाबतची नोंद त्यांच्या सेवा पुस्तकात घेण्यात यावी.

शहरातील मोकाट जनावरे व कुत्र्यांबाबत आरोग्य विभागाने तांतडीने बैठकीत ठरल्यानुसार कार्यवाही करावी.रस्त्यावरील पडलेल्या बांधकाम साहित्यामुळे होणा-या अडचणीबाबत तांतडीने एजन्सी नियुक्ती तथा प्रशासनामार्फत कार्यवाही करावी.

तसेच वॉटरग्रेस कंपनी मार्फत नियुक्त केलेल्या कर्मचा-यांच्या भविष्य निर्वाह निधीबाबत पडताळणी करुन त्यांची नांवे व यादी स्थायी समिती समोर सादर करावी.

सही/- x x x
**सभापती,**
**स्थायी समिती,**
**धुळे महानगरपालिका,धुळे**

विषय क्रमांक:-१४३ — महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान योजना (जिल्हास्तरीय)अंतर्गत प्र.क्र.१०मध्ये वरखेडी गावात आदिवासी समाज वस्ती जवळील जागेत सभागृह बांधणेचे निविदा दर मागविण्यांत आलेत त्याबाबत आलेल्या कार्यालयीन अहवालावर विचार करणे.

म. नगरसचिव — नगरसचिव यांनी विषयाचे वाचन केले.

म.नागसेन बोरसे — सदर निविदेमध्ये मे.हिंद कन्स्ट्रक्शन यांनी शेंकडा 2% कमीने निविदा भरली होती. परंतु त्यांनी दि.१५/७/२०२१ रोजी दिलेल्या पत्रानुसार काम करण्यांस असमर्थता दर्शविली आहे निविदा भरुन अशा प्रकारे काम नाकारणे हे महानगरपालिकेच्या आर्थिक हितास नुकसान पोहचविणारे आहे. तरी यापुढे त्यांनी मनपा निविदेत भाग घेतला तर त्यांची निविदा रद्द करण्यांत यावी.

म. अमोल मासुळे — विषय मंजुर करण्यांत यावा.

म. सभापती — सर्व सन्मा.सदस्यांच्या सहमतीने व कार्यालयीन अहवालासअधिन राहून सदर प्रस्तावास मान्यता देण्यांत येतआहे.

**धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर १५५ दिनांक २६/१०/२०२१**

महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान योजना (जिल्हास्तरीय) अंतर्गत प्र.क्र.१० मध्ये वरखेडी गावात आदिवासी समाज वस्ती जवळील जागेत सभागृह बांधणे बाबतच्या कामास धुळे महानगरपालिका मे.महासभा ठराव नं.१४०(अ) दि.३०/१२/२०२० मा. जिल्हाधिकारी सो. धुळे महानगरपालिका यांनी टिपणी मंजुरीने दि. ३१/०३/२०२१ अन्वये उक्त कामाबाबत रक्कम रु.४९,७९,४४८/-मात्र खर्चाचा आर्थिक व प्रशासकीय मंजुरी देणेत आली आहे.

उक्त कामाबाबत शहर अभियंता मनपा धुळे यांचे पत्र क्र./१२७१/२०२१ दि. २७/०१/२०२१अन्वये रक्कम रु.४९,७९,४४८/-मात्र खर्चास तांत्रिक मंजुरी मिळालेली आहे.

उक्त कामाबाबत धुळे महानगरपालिका जा.क्र./बा.वि./३८/२०२१ दि. १७/०५/२०२१ अन्वये दै.दिव्य पुण्यनगरी /खान्देश खबर या वृत्तपत्रात जाहीर निविदा प्रसिद्ध करणेत येऊन दि.०७/०६/२०२१ पावेतो निविदा दर मागविण्यात आले आहेत. पात्र कंत्राटदार यांनी निविदेबाबत ऑनलाईन पद्धतीने बयाणा रक्कम भरून निविदा दर सादर केलेले आहेत.

| अ.क्र. | कंत्राटदार किंवा ठेकेदाराचे नाव | दिलेले निविदा दर | शेरा |
|---|---|---|---|
| १ | श्री.नकुल सुरेश अहिरराव | शे.२.००% जास्तीने | |
| २ | श्री.अे.के.सैफी | शे.१.००% जास्तीने | |
| ३ | श्री.सुकन्या सुरेश चौधरी | शे.२.००% जास्तीने | |
| ४ | श्री.अक्षय धनराज माखिजा | अंदाजपत्रकीय दर | |
| ५ | मे.हिंद कन्स्ट्रक्शन | शे.-२.००% कमी | सर्वात कमी दर |
| ६ | मे.एकविरा कन्स्ट्रक्शन | शे.३.००% जास्तीने | |

वरील प्रमाणे निविदेत भाग घेतलेले ठेकेदार पात्र असून श्री/**मे.हिंद कन्सट्रक्शन** यांचे दर **शे.-२.००% कमी** दराने आहे व त्यांनी नियमा प्रमाणे ऑनलाईन बयाणा रक्कम भरलेली आहे. तसेच अन्य काम न मिळालेले ठेकेदारांना त्यांची बयाणा रक्कम परत करणे बाबत सादर तथापि **L-१ मे.हिंद कन्स्ट्रक्शन** यांनी दि.१५/०७/२०२१ रोजी दिलेल्या पत्रानुसार काम करण्यास असमर्थता दर्शविलेली आहे.**L-२ श्री.अक्षय धनराज**

**माखिजा** यांनी दर वाटाघाटी अंती त्यांनी दि.१५/०७/२०२१ रोजी दिलेल्या पत्रात शे.२.५०% कमी दराने काम करण्यास तयारी दर्शविलेली आहे.

तरी **मे.हिंद कन्सट्रक्शन** यांनी अतिरिक्त सुरक्षा अनामत डी.डी.मुदतीत जमा न केल्याने सदरचे काम**L-२श्री.अक्षय धनराज माखिजा** यांना**L-१**चे दरा पेक्षा कमी दरात(शे.२.५०% कमी दराने) काम देणेस मे. स्थायी समिती पुढे मंजुरीसाठी सादर झालेला आहे.

सर्व सन्मा.सदस्यांच्या सहमतीने व कार्यालयीन अहवालास अधिन राहून सदर कामी **L-१ मे.हिंद कन्सट्रक्शन** यांनी दि.१५/०७/२०२१ रोजी दिलेल्या पत्रानुसार काम करण्यास असमर्थता दर्शविलेली आहे तसेच **L-२ श्री.अक्षय धनराज माखिजा** यांनी लेखी पत्रान्वये **L-१** चे दरापेक्षा कमी दरात शे.२.५०% कमी दराने काम करणेस तयारी दर्शविली असल्याने वाटाघाटी अंती श्री. अक्षय धनराज माखिजा यांचे शे. २.५०% कमीने आलेल्या दरांस मान्यता देण्यांत येत आहे. सदर प्रस्ताव व कार्यवाही बाबत लेखा आक्षेप निर्माण होणार नाही याची दक्षता घ्यावी. याबाबतची जबाबदारी संबंधित विभागाची राहील.

सुचक :- श्री. नागसेन दामोदर बोरसे
अनुमोदक:- श्री. अमोल पावबा मासुळे

**सर्वानुमते मंजुर,**
**सही/- x x x**
**सभापती,**
**स्थायी समिती,**
**धुळे महानगरपालिका धुळे**

विषय क्रमांक:- १४४ — महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान योजना (जिल्हास्तरीय) अंतर्गत प्र.क्र.१० मध्ये वरखेडी गावात ग्रंथालय बांधणे बांधणेचे निविदा दर मागविण्यांत आलेत त्याबाबत आलेल्या कार्यालयीन अहवालावर विचार करणे.

म. नगरसचिव — नगरसचिव यांनी विषयाचे वाचन केले.
म सुनिल बैसाणे — विषय मंजूर करण्यांत यावा.
म. शितल नवले — विषय मंजूर करण्यांत यावा.
म.सभापती — सर्व सन्मासदस्यांच्या सहमतीने व कार्यालयीन अहवालास अधिन राहून सदर प्रस्तावास मान्यता देण्यांतयेत आहे.

**धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर १५६दिनांक २६/१०/२०२१**

महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान योजना (जिल्हास्तरीय) अंतर्गत प्र.क्र.१० मध्ये वरखेडी गावात ग्रंथालय बांधणे बाबतच्या कामास धुळे महानगरपालिका मे.महासभा ठराव नं.१४०(ड) दि.३०/१२/२०२० मा.जिल्हाधिकारी सो. धुळे महानगरपालिका यांनी टिपणी मंजुरीने दि.३१/०३/२०२१ अन्वये उक्त कामाबाबत रक्कम रु.४८,१०,१०४/- मात्र खर्चाचा आर्थिक व प्रशासकीय मंजुरी देणेत आली आहे.

उक्त कामाबाबत शहर अभियंता मनपा धुळे यांचे पत्र क्र./१२७०/२०२१ दि.१२/०३/२०२१अन्वये रक्कम रु.४८,१०,१०४/-मात्र खर्चास तांत्रिक मंजुरी मिळालेली आहे.उक्त कामाबाबत धुळे महानगरपालिका जा.क्र./बा.वि./३८/२०२१ दि. १७/०५/२०२१ अन्वये दै.दिव्य पुण्यनगरी /खान्देश खबर या वृत्तपत्रात जाहीर निविदा प्रसिद्ध करणेत येऊन दि.०७/०६/२०२१ पावेतो निविदा दर मागविण्यात आले आहेत. पात्र कंत्राटदार यांनी निविदेबाबत ऑनलाईन पद्धतीने बयाणा रक्कम भरुन निविदा दर सादर केलेले आहेत.

| अ.क्र. | कंत्राटदार किंवा ठेकेदाराचे नाव | दिलेले निविदा दर | शेरा |
|---|---|---|---|
| १ | श्री.अे.के.सैफी | शे.१.००% जास्तीने | |
| २ | श्री.सुकन्या सुरेश चौधरी | शे.२.००% जास्तीने | |
| ३ | श्री.अक्षय धनराज माखिजा | अंदाजपत्रकीय दर | |
| ४ | श्री.नकुल सुरेश अहिरराव | शे.२.००% जास्तीने | |
| ५ | मे.हिंद कन्सट्रक्शन | शे.-२.००% कमी | सर्वात कमी दर |
| ६ | मे.एकविरा कन्सट्रक्शन | शे.३.००% जास्तीने | |

वरील प्रमाणे निविदेत भाग घेतलेले ठेकेदार पात्र असून श्री/**मे.हिंद कन्सट्रक्शन** यांचे दर **शे.-२.००%कमी** दराने आहे व त्यांनी नियमा प्रमाणे ऑनलाईन बयाणा रक्कम भरलेली आहे. तसेच अन्य काम न मिळालेले ठेकेदारांना त्यांची बयाणा रक्कम परत करणे बाबत सादर तथापि **L-१ मे.हिंद कन्सट्रक्शन** यांनी दि.१५/०७/२०२१रोजी दिलेल्या पत्रानुसार काम करण्यास असमर्थता दर्शविलेली आहे.**L-२ श्री.अक्षय धनराज माखिजा** यांनी दर वाटाघाटी अंती त्यांनी दि.१५/०७/२०२१ रोजी दिलेल्या पत्रात शे.२.५०% कमी दराने काम करण्यास तयारी दर्शविलेली आहे.

तरी **मे.हिंद कन्सट्रक्शन** यांनी अतिरिक्त सुरक्षा अनामत डी.डी.मुदतीत जमा न केल्याने सदरचे काम**L-२श्री.अक्षय धनराज माखिजा** यांना **L-१** चे दरापेक्षा कमी दरात (शे.२.५०% कमी दराने) काम देणेस मे.स्थायी समिती पुढे मंजुरीसाठी सादर झालेला आहे.

सर्व सन्मा.सदस्यांच्या सहमतीने व कार्यालयीन अहवालास अधिन राहून सदर कामी **L-१ मे.हिंद कन्सट्रक्शन** यांनी दि.१५/०७/२०२१रोजी दिलेल्या पत्रानुसार काम करण्यास असमर्थता दर्शविलेली आहे तसेच **L-२ श्री.अक्षय धनराज माखिजा** यांनी लेखी पत्रान्वये **L-१** चे दरापेक्षा कमी दरात शे.२.५०% कमी दराने काम करणेस तयारी दर्शविली असल्याने वाटाघाटी अंती श्री.अक्षय धनराज माखिजा यांचे शे.२.५०% कमीने आलेल्या दरांस मान्यता देण्यांत येत आहे. सदर प्रस्ताव व कार्यवाही बाबत लेखा आक्षेप निर्माण होणार नाही याची दक्षता घ्यावी. याबाबतची जबाबदारी संबंधित विभागाची राहील.

सुचक :- श्री.सुनिल तुळशीराम बैसाणे

अनुमोदक:- श्री. शितल मोहन नवले

**सर्वानुमते मंजुर,**

सही/- x x x

**सभापती,**

**स्थायी समिती,**

**धुळे महानगरपालिका धुळे**

विषय क्रमांक:-२४५ — महानगरपालिका नंदीरोड दवाखाना येथे कार्यरत १ ते १६ कर्मचा-यांना मुदतवाढ देणेबाबत आलेल्या कार्यालयीन अहवालावर विचार करणे.

म. नगरसचिव — नगरसचिव यांनी विषयांचे वाचन केले.

म.शितल नवले — विषय मंजुर करण्यांत यावा.

म.अमोल मासुळे — विषय मंजुर करण्यांत यावा.

म. सभापती — सर्व सन्मा. सदस्यांच्या सहमतीने व कार्यालयीन अहवालास अधिन राहून प्रशासनाने महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ५३(३)नुसार कार्यवाही करणेस मान्यता देण्यांत येत आहे.

**धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर १५७ दिनांक २६/१०/२०२१**

धुळे महानगरपालिका धुळे नंदीरोड दवाखाना सुरु करणेकामी वैदयकीय अधिकारी १ , औषध निर्माता २, नर्स ४,एएनएम ८,दाई २ अशी नवीन पदे एकत्रित पदे करार पध्दतीने भरण्यात आले होते तरी खालील तक्त्यात दर्शविलेल्या दिनांकानुसार मानधनावरील कर्मचा-यांची मुदत संपुष्ठात येत आहे.

| अ क्र | कर्मचा-याचे नाव | हुददा | मुदत संपुष्ठात आल्याचा दिनांक | मानधन रुपये |
|---|---|---|---|---|
| १ | श्री अन्सरी अन्वरुल फारकान हुसैन | औषध निर्माता | ११/१०/२०२१ | १२२०० |
| २ | प्रियंका वैभवकुमार जगताप | औषध निर्माता | ११/१०/२०२१ | १२२०० |
| ३ | रिवीका गोविंद वळवी | स्टाफ नर्स | ११/१०/२०२१ | १५७५० |
| ४ | कृनिका संजय वाघमारे | स्टाफ नर्स | ११/१०/२०२१ | १५७५० |
| ५ | दिपाली हिलाल गर्दे | स्टाफ नर्स | ११/१०/२०२१ | १५७५० |
| ६ | अमोल सुनिल पानथरे | स्टाफ नर्स | ११/१०/२०२१ | १५७५० |
| ७ | मिरा माकल्या राहसे | ए एन एन | ११/१०/२०२१ | १२००० |
| ८ | वंदना पुरुषोत्त्म निकम | ए एन एन | ११/१०/२०२१ | १२००० |
| ९ | प्रतिभा किशोर सोनवणे | ए एन एन | ११/१०/२०२१ | १२००० |
| १० | शारदा दिपक वाघ | ए एन एन | ११/१०/२०२१ | १२००० |
| ११ | कविता युवराज भोई | ए एन एन | ११/१०/२०२१ | १२००० |
| १२ | सोनिया अशोक तपासे | ए एन एन | ११/१०/२०२१ | १२००० |
| १३ | मनिषा दिलीप गायकवाढ | ए एन एन | ११/१०/२०२१ | १२००० |
| १४ | विजया लाखा राऊत | ए एन एन | १/१२/२०२१ | १२००० |
| १५ | लता किसन गवळी | दाई | ११/१०/२०२१ | ८००० |
| १६ | सुरेखा रविंद्र वाडेकर | दाई | ११/१०/२०२१ | ८००० |

संदर्भीय क्र.2 नुसार उपरोक्त दवाखान्यातील कर्मचा-यांची कामाची निकड पाहता पदनिहाय कर्मचा-यांना मुदत संपल्याच्या दिनांकापासून पुढील 06 महिने कालावधीकरीता मुदतवाढ देणेबाबत पत्र सादर केले आहे.म.आरोग्याधिकारी यांच्या अहवालानुसार उपरोक्त कर्मचा-यांना बाहय यंत्रणेमार्फत मनुष्यबळ उपलब्ध होईपावेतो मुदत संपल्याच्या दिनांकापासून 05 दिवसाची सेवा खंडीत करून करार पध्दतीने एकत्रित मासिक

मानधनानुसार पुढील 06 महिने कालावधीकरीता मुदतवाढ देणेबाबतचा विषय महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम 53 (3) नुसार मे स्थायी समितीपुढे मान्यतेसाठी सादर झालेला आहे.

सर्व सन्मा. सदस्यांच्या सहमतीने व कार्यालयीन अहवालास अधिन राहून उक्त १ ते १६ कर्मचारी यांना महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ५३ (३) नुसार कार्यवाही करणेस मान्यता देण्यांत येत आहे. सदर प्रस्ताव व कार्यवाही बाबत लेखा आक्षेप निर्माण होणार नाही याची दक्षता घ्यावी. याबाबतची जबाबदारी संबंधित विभागाची राहील.

सुचक :- श्री. शितल मोहन नवले

अनुमोदक:- श्री. अमोल पावबा मासुळे

**सर्वानुमते मंजुर,**

**सही/- x x x**

**सभापती,**

**स्थायी समिती,**

**धुळे महानगरपालिका धुळे**

विषय क्रमांक:-१४६ धुळे मनपातील कार्यरत अ.नं. १ ते १५ लिपीक / टंकलेखक (संगणक ऑपरेटर) यांना मुदतवाढ देणेबाबत आलेल्या कार्यालयीन अहवालावर विचार करणे.

म. नगरसचिव नगरसचिव यांनी विषयांचे वाचन केले.

म.शितल नवले विषय मंजुर करण्यांत यावा.

म. कमलेश देवरे विषय मंजुर करण्यांत यावा.

म. सभापती सर्व सन्मा. सदस्यांच्या सहमतीने व कार्यालयीन अहवालास अधिन राहून प्रशासनाने महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ५३(३)नुसार कार्यवाही करणेस मान्यता देण्यांत येत आहे.

**धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर १५८ दिनांक २६/१०/२०२१**

मानधनावरील संगणक लिपीक कर्मचा-यांची रु १०००० /- मानधनावर नियुक्ती करण्यात आली होती. सदर मानधनावरील कर्मचा-यांची दि ६/१०/२०२१ रोजी मुदत संपुष्ठात आलेली आहे.सदर मानधनावरील कर्मचारी यांनी फेर नियुक्ती मिळणेबाबत विनंती अर्ज सादर केलेले आहे.

तरी संबंधीत विभागांकडील प्राप्त अहवालानुसार खालील तक्त्यात दर्शविलेल्या मानधना वरील कर्मचा-यांच्या कामाची आवश्यकता व निकड विचारात घेता सदर कर्मचा-यांना मुदतवाढ देणे आवश्यक आहे.

| अ.क्र. | कर्मचा-याचे नाव | विभाग | अ.क्र. | कर्मचा-याचे नाव | विभाग |
|---|---|---|---|---|---|
| १ | श्री राहुल सुभाष भावसार | आस्थापना वि. | ९ | श्री नितीन ज्ञानेश्वर महाले | महापौर कार्यालय |
| २ | श्री कुणाल संजय दरगुडे | उपायुक्त कार्या. | १० | श्री शोऐब रजा आदिल शेख | आरोग्य विभाग |
| ३ | श्रीमती सरिता गंभीरराव चव्हाण | मालमत्ता कर | ११ | श्री अंजना प्रल्हाद गायकवाड | बांधकाम विभाग |
| ४ | कु. सुनिता दत्तात्रय आव्हाड | मालमत्ता कर | १२ | श्रीमती पल्लवी जयराम सावरकर | लाईट विभाग |
| ५ | श्री शरद दामू मोहिते | मालमत्ता कर | १३ | श्री सचिन विनायक शिंदे | कंपोस्ट डेपो |
| ६ | श्री निखील रविंद्र देशमुख | मालमत्ता कर | १४ | श्री दिलिप खुशाल शिवदे | विरोधी पक्ष नेता कार्या. |
| ७ | श्री जितेंद्र सुभाष शिंदे | बाजार विभाग | १५ | कु.पुजा विठ्ठलसिंग परदेशी | उपमहापौर कार्यालय |
| ८ | श्री लतेश सुरेश चौधरी | कंपोस्ट डेपो | | | |

तरी वरील मानधनावरील कर्मचा-यांना संदर्भीय क्र २ च्या मंजूर कार्यालयीन अहवालानुसार मा.आयुक्त सो. यांनी नवीन भरती प्रक्रीया पुर्ण करण्याच्या अधीन सदरची मुदतवाढ देणेसाठी शिफारस केली आहे त्यानुसार वरील १ ते १५ कर्मचारी यांना मुदत संपुष्टात आल्याच्या दिनांकास ५ दिवसाचा खंड देवून ०६ महिने कालावधीकरीता रु.१००००/- मात्र मानधनावर तात्पुरती नियुक्ती देणेबाबत महाराष्ट्र महानगरपालिकाअधिनियमचे कलम ५३(३ ) नुसार सदरचा विषय मे. स्थायी समितीपुढे सादर झालेला आहे.

सर्व सन्मा. सदस्यांच्या सहमतीने व कार्यालयीन अहवालास अधिन राहून उक्त १ ते १५ कर्मचारी यांना महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ५३(३) नुसार कार्यवाही करणेस मान्यता देण्यांत येत आहे.सदर प्रस्ताव व कार्यवाही बाबत लेखाआक्षेप निर्माण होणार नाही याची दक्षता घ्यावी.याबाबतची जबाबदारी संबंधित विभागाची राहील. सुचक :- श्री. शितल मोहन नवले

अनुमोदक:- श्री. कमलेश देवरे

**सर्वानुमते मंजुर,**

सही/- x x x

**सभापती,**

**स्थायी समिती,**

**धुळे महानगरपालिका धुळे**

| | |
|---|---|
| विषय क्रमांक:- १४७ | बांधकाम/ पाणीपुरवठा विभागातील मानधन तत्वावरील कार्यरत १ ते १० कनिष्ठ अभियंता या संवर्गातील कर्मचा-यांना मुदतवाढ देणेबाबत आलेल्या कार्यालयीन अहवालावर विचार करणे. |
| म. नगरसचिव | नगरसचिव यांनी विषयांचे वाचन केले. |
| म.सुनिल बैसाणे | विषय मंजुर करण्यांस हरकत नाही. परंतु लाईट विभागात दोन अभियंते आहेत. त्या ठिकाणी बागुल सो. यांचेकडेस कामाचा अतिरिक्त लोडआहे.कर्मचारी कमी आहेत. त्या विभागाकडे मानधनावरील इंजिनिअर का भरत नाही. मागे त्या संदर्भात जाहिरात काढण्यांत आलेली होती. श्री. बागुल सो. यांनी कर्मचारी मिळणेबाबत मागणी केलेली आहे. त्यांनी माहिती द्यावी. |
| म. विद्युत अभियंता | याबाबत आस्थापना विभागाकडेस सुपर वायझर 10 वायरमन 5 अशी मागणी केलेली आहे. हद्दवाढ झाल्यामुळे माणसे कमी आहेत. |
| म. अति. आयुक्त | रमजान अन्सारी कर्मचारी मिळणेबाबतची नस्ती माझाकडे घेवून यावी.त्यावर तांतडीने निर्णय घेवू. |
| म. शितल नवले | जसे आपण आरोग्य विभागातील वैद्यकीय कर्मचारी भरतीचा प्रस्ताव शासनाकडेस पाठविलेला आहे. व त्यांना मान्यता देखील मिळालेली आहे. त्या पध्दतीने या १ ते १०कनिष्ठ अभियंत्यांचा प्रस्ताव शासनाकडेस पाठविण्यांस काय हरकत आहे. सदर कर्मचारी अनेक वर्षापासून महानगरपालिकेत प्रामणिकपणे काम करीत आहेत. त्यांनाही कायम आस्थापनेवर सामावून घेण्यांचा प्रस्ताव शासनाकडेस सादर करावा. |
| म. सभापती | सर्व सन्मा. सदस्यांच्या सहमतीने व कार्यालयीन अहवालास अधिन राहून प्रशासनाने महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ५३ (३) नुसार कार्यवाही करणेस मान्यता देण्यांत येत आहे. |

**धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर १५९दिनांक २६/१०/२०२१**

मानधनावरील कनिष्ठ अभियंता कर्मचा-यांची रु२००००/- मानधनावर नियुक्ती करण्यात आली होती. सदर मानधनावरील कर्मचा-यांची दि १५/९/२०२१ रोजी मुदत संपुष्ठात आलेली आहे. सदर मानधनावरील कम्रचारी यांनी फेर नियुक्ती मिळणेबाबत विनंती अर्ज सादर केलेले आहे.

तरी संबंधीत विभागांकडील प्राप्त अहवालानुसार खालील तक्त्यात दर्शविलेल्या मानधनावरील कर्मचा-यांच्या कामाची आवश्यकता व निकड विचारात घेता सदर कर्मचा-यांना मुदतवाढ देणे बाबत अहवाल सादर केलेला आहे.

| अ.क्र | नाव | पदनाम |
|---|---|---|
| १. | पाटील वर्षा गंगाधर | कनिष्ठ अभियंता |
| २. | कु. चंदाबी शेख जाफर शेख | कनिष्ठ अभियंता |
| ३. | शिंदे प्रणव किशोर | कनिष्ठ अभियंता |
| ४. | मुयर राजेंद्र निकम | कनिष्ठ अभियंता |
| ५. | भुषण मनोज ढवळे | कनिष्ठ अभियंता |
| ६. | मोहनीश दिलीप पाटील | कनिष्ठ अभियंता |
| ७. | स्वप्नील सुनील थोरात | कनिष्ठ अभियंता |
| ८. | पाटील अक्षय रा जेंद्र | कनिष्ठ अभियंता |
| ९. | ठाकरे पराग प्रदीप | कनिष्ठ अभियंता |
| १०. | गितेश दिलीप सोनार | कनिष्ठ अभियंता |

तरी वरील मानधनावरील कर्मचा-यांना संदर्भीय क्रं.२च्या मंजूर कार्यालयीन अहवालानुसार ०६ महिने कालावधीकरीता रु.२००००/- मात्र मानधनावर तात्पुरती नियुक्ती देणेबाबत महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम चे कलम ५३ (३) नुसार सदरचा विषय मे. स्थायी समितीपुढे मंजुरीसाठी सादर झालेला आहे.

सर्व सन्मा. सदस्यांच्या सहमतीने व कार्यालयीन अहवालास अधिन राहून उक्त १ ते १० कनिष्ठ अभियंता यांना महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ५३ (३) नुसार कार्यवाही करणेस मान्यता देण्यांत येत आहे. सदर प्रस्ताव व कार्यवाही बाबत लेखा आक्षेप निर्माण होणार नाही याची दक्षता घ्यावी. याबाबतची जबाबदारी संबंधित विभागाची राहील.

सुचक :- श्री.सुनिल तुळशीराम बैसाणे

अनुमोदक:- श्री. शितल मोहन नवले

**सर्वानुमते मंजुर**

सही/- x x x

**सभापती,**
**स्थायी समिती,**
**धुळे महानगरपालिका धुळे**

# धुळे महानगरपालिका,धुळे

## नगरसचिव कार्यालय

## स्थायी समिती सभा क्रमांक २४ चे इतिवृत्त

---

**धुळे मनपा भारतरत्न अटलबिहारी वाजपेयी सभागृह**
**गुरुवार दिनांक ०९/१२/२०२१**
**वेळ :-सकाळी ११-०० वाजता.**

धुळे महानगरपालिका स्थायी समितीची साप्ताहिक सभा आज गुरुवार दिनांक ०९/१२/२०२१ रोजी सकाळी ११-०० वाजता **मा.श्री संजय सुधाकर जाधव,सभापती,स्थायी समिती,** मनपा,धुळे यांच्या अध्यक्षतेखाली **धुळे मनपा भारतरत्न अटलबिहारी वाजपेयी सभागृह** भरली. ऑनलाईन सभेस खालील सन्मा.सदस्य सभागृहात हजर होते.

| अ.क्रं. | सदस्यांचे नांव | हुद्दा |
|---|---|---|
| 1 | श्री. जाधव संजय सुधाकर | सभापती |
| 2 | श्री. बैसाणे सुनिल तुळशिराम | सदस्य |
| 3 | श्रीमती माळी भारती अशोक | सदस्या |
| 4 | श्रीमती पाटील मंगला सुरेश | सदस्या |
| 5 | श्रीमती बोरसे पुष्पा प्रकाश | सदस्या |
| 6 | श्री. मासुळे अमोल पावबा | सदस्य |
| 7 | श्री. देवरे कमलेश नारायण | सदस्य |
| 8 | श्रीमती पठाण हिना अस्लम | सदस्या |
| 9 | श्री. सईद बेग हाशम बेग | सदस्य |
| 10 | श्री. बोरसे नागसेन दामोदर | सदस्य |
| 11 | श्रीमती कुलेवार किरण राकेश | सदस्या |
| 12 | श्रीमती वराडे वैशाली भिकन | सदस्या |
| 13 | श्री. जाधव बन्सीलाल माणिक | सदस्य |
| 14 | श्रीमती चौधरी मंगला अर्जुन | सदस्या |
| 15 | श्री. पटेल अमीन अब्दुल करीम | सदस्य |

**उपस्थित अधिकारी गण**

| अ.क्र. | अधिकाऱ्यांचे नाव | हुद्दा |
|---|---|---|
| 1 | श्री. नितीन कापडणीस | अति. आयुक्त |
| 2 | श्रीमती शिल्पा नाईक | उपायुक्त |
| 3 | श्रीमती पल्लवी शिरसाठ | सहा. आयुक्त |
| 4 | श्री. दिनकर जाधव | मुख्य लेखाधिकारी |
| 5 | श्री. मनोज अरविंद वाघ | प्र. नगरसचिव |
| 6 | श्री. के. एन. शिंदे | अभियंता |
| 7 | श्री. पी.डी. चव्हाण | प्र. नगररचनाकार |
| 8 | डॉ. महेश मोरे | आरोग्याधिकारी |
| 9 | श्री. चंद्रकांत जाधव | सहा.आरोग्याधिकारी |

| | | |
|---|---|---|
| 10 | श्री. लक्ष्मण पाटील | सहा.आरोग्याधिकारी |
| 11 | श्री.बी.एस. रनाळकर | सहा. कर मूल्य निर्धारण अधिकारी |
| 12 | श्री. चंद्कांत मोरे | लेखापाल |
| 13 | श्री. रमजान अन्सारी | कार्यालय अधिक्षक |
| 14 | श्री. एन.के. बागुल | विद्युत अभियंता |
| 15 | श्री. सी.सी. बागुल | पा. पु. ओव्हरसिअर |
| 16 | श्री. प्रकाश सोनवणे | ओव्हरसिअर न.र. वि. |
| 17 | श्री. हेमत पावटे | ओव्हरसिअर बां.वि. |
| 18 | श्री. राजेश गायकवाड | प्रशासन अधिकारी मनपा शिक्षण मंडळ |
| 19 | श्री. राजू माईनकर | भांडारपाल |
| 20 | श्री. किशोर सुडके | बाजार विभाग |
| 21 | श्री. राजकुमार सुर्यवंशी | प्र.अधिक्षक परवाना विभाग |
| 22 | श्री. सुक्राम राऊत | वाहन विभाग |

म.सभापती — सर्व उपस्थित सन्मा.सदस्य अति.आयुक्त सो.अधिकारी वर्ग छायाचित्रकार बांधव सभेचे कामकाज चालविणेसाठी आवश्यक तो कोरम पूर्ण झाल्याने नगरसचिव यांनी सभेचे कामकाज सुरुवात करावी.

म. नगरसचिव — वंद् मातरम् या राष्ट्रवंदनेसाठी सर्वांनी उभे रहावे.

सभेच्या सुरुवातीस सन्मा. सदस्यांकडून आलेल्या श्रध्दांजलीची यादी

१) देशाच्या तिनही सैन्य दलाचे प्रमुख तसेच प्रथम चीफ ऑफ डिफेन्स स्टाफ( संरक्षण दल प्रमुख) जनरल बिपीन रावत यांचे तामिळनाडूमध्ये झालेल्या हेलिकॉप्टर दुर्घ टनेमध्ये निधन झाले. या दुर्घटनेत एकुण तेरा जणांचा मृत्यू झाला ज्यात बिपीन रावत यांच्या पत्नीचाही समावेश आहे. तामिळनाडूच्या कुन्नुर भागात अपघाती हेलिकॉप्टर कोसळून दु:खद निधन झाले. जनरल रावत यांनी अतुलनिय धर्य आणि परिश्रमाने देशाची सेवा केली. सच्चे देशभक्त या नात्याने त्यांचे सशस्त्र सेनादलाच्या आणि सुरक्षा यंत्रणेच्या आधुनिककीकरणातील योगदान मोठे आहे. देशाच्या संरक्षण दलाचे मजबुतीकरणासाठी त्यांनी केलेले काम व घेतलेले निर्णय देश कधीही विसरु शकणार नाही. चीन, पाकिस्तान विरोधात कायम आक्रमक भूमिका घेवून जशास तसे उत्तर दिल्याचे संपूर्ण विश्वाने पाहिले आहे. अशा देशाच्या शूर सेनानी बिपीन रावत यांना तसेच त्यांच्या पत्नी मधुलिका रावत व इतर वरिष्ठ लष्करी अधिका-यांसह एकुण १३ जण मृत्यूमुखी पडले त्यांना आज रोजीच्या स्थायी समिती सभेमध्ये श्रध्दांजली वाहून तसा ठराव पारीत करण्यांत यावा ही विनंती.

सूचक:- श्री. सुनिल तुळशीराम बैसाणे, मा. सभापती स्थायी समिती मनपा धुळे

२) दि. ८/१२/२०२१ रोजी दुपारी तामिळनाडूच्या कुन्नुर भागात भारताचे पहिले चीफ ऑफ डिफेन्स स्टाफ जनरल बिपीन रावत तसेच त्यांच्या पत्नी व इतर लष्करातील ११ अधिकारी यांना घेवून जाणारे भारतीय वायुदलाचे अत्याधुनिक आणि उच्च दर्जाचे हेलिकॉप्टर कोसळले व या भीषण दुर्घटनेत जनरल बिपीन रावत यांच्यासह सर्वाचे दु:खद निधन झाले. मातृभूमीसाठी डोळयात तेल घालुन कार्य करणा-या प्रत्येक सैनिकाबद्दल त्यांना कमालीची आत्मीयता होती.अशा या धैर्यवान जनरल बिपीन रावत यांना तसेच त्यांच्या पत्नी मधुलिका रावत व लष्करी अधिकारी यांना आज रोजीच्या स्थायी समिती सभेमध्ये श्रध्दांजली वाहून तसा ठराव पारीत करण्यांत यावा ही विनंती.

सूचक:- श्री. अमोल पावबा मासुळे, नगरसेवक, मनपा, धुळे

म.सभापती — सन्मा.सदस्यांच्या यादीनुसार वरील मान्यवरांना आजच्या सभेत भावपूर्ण श्रध्दांजली समर्पित करणेसाठी दोन मिनिटे मौन उभे रहावे.

**धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर १६० दिनांक ०९/१२/२०२१**

देशाच्या तिनही सैन्य दलाचे प्रमुख तसेच प्रथम चीफ ऑफ डिफेन्स स्टाफ( संरक्षण दल प्रमुख) जनरल बिपीन रावत यांचे तामिळनाडूमध्ये झालेल्या हेलिकॉप्टर दुर्घटनेमध्ये निधन झाले. या दुर्घटनेत एकुण तेरा जणांचा मृत्यू झाला ज्यात बिपीन रावत यांच्या पत्नीचाही समावेश आहे.तामिळनाडूच्या कुन्नुर भागात अपघाती हेलिकॉप्टर कोसळून दु:खद निधन झाले.जनरल रावत यांनी अतुलनिय धर्य आणि परिश्रमाने देशाची सेवा केली. सच्चे देशभक्त

या नात्याने त्यांचे सशस्त्र सेनादलाच्या आणि सुरक्षा यंत्रणेच्या आधुनिकीकरणातील योगदान मोठे आहे. देशाच्या संरक्षण दलाचे मजबुती करणासाठी त्यांनी केलेले काम व घेतलेले निर्णय देश कधीही विसरु शकणार नाही. चीन, पाकिस्तान विरोधात कायम आक्रमक भूमिका घेवून जशास तसे उत्तर दिल्याचे संपूर्ण विश्वाने पाहिले आहे.अशा देशाच्या शूर सेनानी बिपीन रावत यांना तसेच त्यांच्या पत्नी मधुलिका रावत व इतर वरिष्ठ लष्करी अधिका-यांसह एकुण १३ जण मृत्यूमुखी पडले. वरील सर्व मान्यवरांचे दु:खद निधनामुळे या सभेस आतीव दु:ख होत आहे ही सभा त्यांचे कुटुंबियांचे दु:खात सहभागी असून मृतआत्म्यास चिरशांती प्रदानार्थ दोन मिनिटे मौन धारण करुन त्यांना भावपूर्ण श्रध्दांजली समर्पित करण्यांत येत असून तसा शोक ठराव पारीत करण्यांत येत आहे.

**सर्वानुमते मंजुर,**

**सही/-x x x**
**सभापती,**
**स्थायी समिती,**
**धुळे महानगरपालिका,धुळे**

**सन्मा. सदस्यांचे रजेचे अर्ज**

सन्मा. सदस्य श्री. शितलकुमार मोहन नवले यांनी त्यांची तब्येत बरी नसल्याने आजच्या स्थायी समिती सभेस उपस्थित राहू शकत नसल्याने रजा मंजूर करणेबाबत विनंती केली आहे.

म. सभापती — सन्मा. सदस्यांच्या विनंती अर्जानुसार त्यांची आजच्या सभेस रजा मंजूर करण्यांत येत आहे.

**धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर १६१ दिनांक ०९/१२/२०२१**

सन्मा. सदस्य श्री. शितलकुमार मोहन नवले यांनी त्यांची तब्येत बरी नसल्याने आजच्या स्थायी समिती सभेस उपस्थित राहू शकत नसल्याने रजा मंजूर करणेबाबत विनंती केली आहे.

सन्मा. सदस्यांच्या विनंती अर्जानुसार त्यांची आजच्या सभेस रजा मंजूर करण्यांत येत आहे.

**सर्वानुमते मंजुर,**

**सही/-x x x**
**सभापती,**
**स्थायी समिती,**
**धुळे महानगरपालिका,धुळे**

## दि. ९/१२/२०२१ रोजीच्या मे.स्थायी समिती सभेत सन्मा.सदस्यांनी उपस्थित केलेली चर्चा व त्यावरील निर्णय

म.अमिन पटेल — सभापती सो.,आयुक्त सो. ,सन्माननीय सदस्य, पत्रकार बांधव , कच-याचा विषय गंभीर आहे. जनता त्रस्त झालेली आहे माझी विनंती आहे प्रशासन दूर्लक्ष करत आहे.सर्व नगरसेवक ओरडत आहे का ते काम होत नाही घंटागाडी येत नाही.वार्डातून कचरा उचलला जात नाही.

म.अति. आयुक्त — सन्मानिय सभागृह, सन्माननीय सदस्य आचारसंहितेमुळे वर्कऑर्डर दिली नाही. ॲग्रीमेंटचे काम चालू आहे. ॲग्रीमेंट फायनल झाल्यावर वर्कऑर्डर देऊ .

म. अमीन पटेल — जनतेच्या विषयात लक्ष दिले पाहिजे. वर्क ऑर्डर कधी देणार ही प्रशासनाची चूक आहे शहरात घाणीचे साम्राजय आहे.यात प्रशासन दोषी आहे. पथदिवे बंद आहे पाणी वेळेवर येत नाही.रस्त्यात खडडे आहेत बील दिलेले आहे तर कामे झाली पाहिजे आक्कलपाडयाचे काम स्लो चालू आहे प्रशासन काय करत आहे.याचे उत्तर दया शहराच्या जनतेला न्याय दया.

म.चंद्रकांत जाधव — पुढच्या आठवडयात वर्क ऑर्डर देणार.

म. मंगला पाटील — धुळे शहरात 12 हजार लाईट बसविले आहे. पण माझ्या वार्डात 1 ही लाईट नाही घंटागाडी येत नाही.

म. एन.के. बागुल — १नोव्हेंबर पासून एल.ई.डी. लावण्याचे काम बंद आहे. ताईंचा प्रभाग 1 तारखे नंतर होता आणि साक्री रोडचा विषय आहे मोती नाल्यापासून ते जे.के. ठाकरे हॉस्पिटल पर्यंत त्यावेळेस त्यात 26 लक्ष 50 हजार आपल्याला निधी प्राप्त झालेला आहे. त्याचे आपण निविदा पब्लीश केली आहे. या महिना अखेर पर्यंत ते टेंडर स्थायी समीतीस मंजूरीस येणार आहे.

सभापती — त्यांच्या विषय प्रभागातल्या लाईटांचा आहे. कमीत कमी मेन्टेनंन्स चे काम करुन घ्या. जे जुने आहे चालू करुन घ्या. बिलांचे नियोजन असेल तर टेंडर काढा.

| | |
|---|---|
| म. बन्सीलाल जाधव | जुने लाईट दुरुस्त केले जात नाही. ८० टक्के लाईट बंद आहे. तसेच लाईट दिवसा सुरु राहतात. त्यामुळे नाहक मनपाचे विद्युत बिलात वाढ होते. |
| म. मंगला पाटील | दुसरा विषय असा आहे. घंटागाडी वेळेवर येत नाही. माझ्या प्रभागाला टारगेट केले जात आहे का |
| म. चंद्रकांत जाधव | आपल्याला घंटागाडयाचे नविन एजन्सीच्या ताब्यात दयायचे आहे. |
| म. सभापती | लवकरात लवकर कामे सुरु करा. |
| म. कमलेश देवरे | जनतेचा रोष आहे. कचऱ्याचा विषय आहे. रस्ते गटारीचा विषय आहे. या मूलभूत सोई दिल्या जात नाही.मग आपल्याला सत्तेत बसण्याचा काय अधिकार आहे. एकही अधिकारी आज रस्तयावर फिरुन पाहणी करत नाही. लोकांच्या रिकाम्या प्लॉट मधे कचऱ्याचे ढिग साचलेले आहे. घंटागाडया वेळेवर येत नाही. आज पर्यंत कोणीच पाहायला जात नाही की कुठल्या प्रभागात किती घंटागाडया चालू आहे. मुलभुत सुविधा मागतोय आम्ही.याच्यावर प्रशासन दोषी की पदाधिकारी दोषी हे तरी जनतेसमोर येऊ दया. मी तुम्हाला विनंती करतो. आठ दिवसांच्या आत कुठलीही कार्यवाही झाली नाही तर मी स्वत: व विरोधी पक्षाचे नगरसेवक आयुक्तांच्या दालनात कचरा फेकल्याशिवाय राहणार नाही. त्यावेळी तुम्हाला जे करायचे ते करा. तुम्ही एफ. डी मोडतात कोणालाही न विचारता स्टॅडींग ची मंजूरी घेतली नाही की महासभेची मंजूरी घेतली नाही. |
| म. सभापती | जाधव साहेब कुठली एफ. डी मोडली आहे. आम्हालाही माहिती दया. |
| म.दिनकर जाधव | 22 तारखेच्या नंतर एफ.डी. मोडलेली नाही. ज्या वेळेस आयुक्त साहेबांना गरज वाटली असेल तेव्हा तशी कार्यवाही झाली असेल मी चेक करुन सांगतो. |
| सभापती | रनाळकर तुम्ही सांगा. |
| म. बी. एस. रनाळकर | सन्माननिय सभापतीच्या वतीने खुलासा करतो की जे भंगार बाजाराचे बिल होते. त्याची एफ. डी. करण्यात आली होती. ते बिल अदा करतांना त्यासाठी एफ. डी. मोडली. |
| म.कमलेश देवरे | असे कुठल्याही कामासाठी एफ. डी. मोडता येत नाही. कोणाची परवानगी घेतली. |
| म. सभापती | आयुक्तांनी प्रशासकीय अधिकाराचा वापर करुन ती एफ. डी. मोडली आहे. |
| म. कमलेश देवरे | एखादया ठेकेदारासाठी एफ. डी. मोडणे योग्य आहे का सार्वजनीक कामांसाठी एफ.डी. मोडणे ठिक आहे. |
| म.अति.आयुक्त | आता एफ.डी. मोडल्या आणि कोण- कोणत्या मोडल्या मला हया बाबतीत माहिती नाही. आवश्यक माहिती घेऊन पुढच्या सभेत वस्तुस्थिती मांडतो. |
| म. कमलेश देवरे | महापालिकेचे मुख्य अधिकारी आहात तुम्ही तरी तुम्हाला माहिती नाही. 15 दिवसांची मुदत देतो कचऱ्याचा प्रशन मार्गी लावा . |
| म. पुष्पा बोरसे | सभापती महोदय माझ्या 4 नंबर प्रभागामध्ये स्मशानभुमीचे लाईट बंद आहे,पोलीस स्टेशन भागाचे लाईट बंद आहे. वारंवार तक्रार करुन सुध्दा लाईट चालू होत नाही. कचऱ्याचा मोठा प्रशन आहे. तुम्ही पाहणी करा दुर्गंधी झाली आहे. रस्तयाने चालणे मुश्किल झाले आहे. |
| म. सभापती | आता आपण नविन ठेकेदार नेमणार आहोत.त्याच्याकडून चांगले काम अपेक्षित आहे. पुढच्या आठवडयापर्यंत त्याला वर्क ऑर्डर मिळेल. |
| म. पुष्पा बोरसे | दुसरा प्रश्न माझ्या प्रभागातील शौचालयांची दुरावस्ता झाली आहे. तेथे अपघात होऊ शकतो. तेथे लाईट सुध्दा नाही. जाधव साहेब फोन उचलत नाही. |
| म. चंद्रकात जाधव | सेवा फाउंडेशनला आपण् ते काम दिले आहे. |
| म. अमोल मासुळे | सभापती महोदय, 1 ते सव्वा महिन्यापासून मिटींग न झाल्यामुळे शहरातील अनेक गंभीर समस्या / तक्रारी झाल्या आहे.गेल्या मिटींगमधे जे प्रश्न उपस्थित झाले होते त्यावर अदयाप कुठलीही कारवाही झाली नाही. संबंधीत अधिकारी यांच्यावर काहीतरी कारवाही झाली पाहिजे. अनेक मुख्य रस्तयांवर मोकाट जनावरे फिरत आहे. वारंवार तक्रारी देऊन कारवाही झाली नाही. सार्वजनीक शौचालयाच्या समस्या, हद्दवाढीतील करआकारणी अशा अनेक समस्या आहे.अधिकारी टाळाटाळ करतात. 11महिने झाले सार्वजनिक शौचालयाचे टेंडर काढून. टेंडर काढायला इतका उशिर का होत आहे. |
| म. चंद्रकांत जाधव | ऑगस्ट महिन्यापासून प्रोसेस सुरु केली. |

| | |
|---|---|
| म. अमोल मासुळे | तुम्ही माझ्या प्रभागात येऊन बघा शौचालयाची पाहणी करा. |
| म. चंद्रकांत जाधव | या प्रोसेस मधे आपल्याकडे 14 व्या वित्त आयोगाचा निधी आला नाही. आता हे बजेट मधे तरतूद करणे गरजेचे आहे. त्याच्या नंतर महासभेची मंजूरी लागेल. कुठलीही टेंडर प्रोसेस करताना निधी विचारात घ्यावा लागेल. |
| म. अमोल मासुळे | जे बील अदा करत आहोत ते कशातून देत आहोत |
| म. चंद्रकांत जाधव | 14 व्या वित्त आयोगातून देत आहोत. |
| म. अमोल मासुळे | एल.ई.डी संदर्भात अनेक बिले दिले आहे.पण कामे झाली नाही. मोकाट जनावरे, मागच्या मिटींगमधे पण विषय झाला होता त्याच्यावर काय कारवाही झाली |
| म. सभापती | डॉ. मोरे आपण आपल्या दालनात मिटींग घेतली होती डॉग वाहन खरेदी करायला काय अडचण आहे. |
| म. डॉ महेश मोरे. | वाहन विभागाला प्रस्ताव पाठवला आहे. त्या नंतर आपण पशुवैद्यकिय अधिकाऱ्याची जाहिरात काढणार आहोत. टेंडर जरी काढायचे म्हटले तरी त्यासाठी एक्सपर्ट असणे गरजेचे आहे. |
| म. अमोल मासुळे | आपण जी.एस.आय मॅपींगचे काम स्थापत्य एजन्सीला दिले आहे त्याचा व्यवस्थीत आढावा घेऊन मिटींग लावून पुढच्या मिटींगमधे माहिती दयावी. |
| म. हिना पठान | सभापती महोदय, मागच्या मिटींगमधे विषय झाला होता मोकाट कुत्र्याच्या बाबतीत आपण तेच सांगीतले होते गाडीचा बंदोबस्त करु. पण त्यावर काहीच ॲक्शन झाली नाही. |
| म. सभापती | त्यावेळेस आपला बजेट महासभेत गेला होता.आता बजेट मंजूर झाला आहे. त्यानंतर बाकीचे नियोजन करु |
| म. सुनिल बैसाणे | अनेक सदस्यांनी आपल्या भावना व्यक्त केल्या आहे. मला प्रामुख्याने विरोधीपक्ष नेते कमलेशभाऊ देवरे यांनी या ठिकाणी स्पष्ट केले आहे. भाजपाची सत्ता आहे त्या सत्तेला बदनाम करण्याचे काम अधिकारी वर्ग करतो का असा प्रश्न त्यांनी उपस्थित केला सभापती महोदय आजच्या या समीतीमध्ये एक ठराव असा पारीत करावा. जो कुणी प्रशासनातील अधिकारी विचारलेल्या प्रश्नांच्या बाबतीत चुकीचे उत्तर देऊन दिशाभूल करत असेल.आपल्या पदाचा दुरुपयोग करत असेल त्या अधिकाऱ्यावर तात्काळ कारवाही करुन आयुक्त साहेबांनी त्यांच्या सर्व्हीसबुक मध्ये तशी नोंद करावी. जेणे करुन त्यांच्यावर वचक बसेल. मी ओमाक्रॉन बददल आरोग्य आधिकाऱ्यांना विचारु इच्छीतो.धुळे शहरामधे 26/27 पर्यटक येऊन गेले आहे.काही लोकांना लागण झाल्याची शक्यता नाकारता येत नाही. अशे जे रुग्ण् आहे त्यांचे ॲड्रेस, त्यांच्या चाचण्या किंवा क्वारंटाईन केले की नाही. त्या बद्दल काय उपाययोजना केल्या याची माहिती दयावी. |
| म. डॉ महेश मोरे. | परवा आपल्याकडे 23 लोकांची यादी आली होती.त्या 23 लोकांचे आपण सॅम्पलींग केले होते. त्यांचे सॅम्पल आपण मेडीकल कॉलेजला पाठविले होते. त्यांची विमानतळावर आर.टी.पी.सी.आर. करण्यात आली होती.त्यांची रिपीट आर.टी.पी.सी.आर होईल दोन्ही टेस्ट निगेटिव्ह आल्या नंतर त्यांना क्वारंटाईन बाहेर काढता येईल. ते 23 सॅम्पल निगेटिव्ह आलेले आहे. काल आपल्याकडे दुसरी 29 लोकांची यादी आली आहे. ते होम क्वारंटाईन मध्ये आहे. त्यांचे सॅम्पल घेऊन 7 दिवसांनी सेकंड सॅम्पल घेतले जाईल. मेडीकल ऑफीसर कडून होम विझीट करुन त्यांची तपासणी होते. |
| म. सुनिल बैसाणे | कुठल्या प्रभागात लसीकरणाचे प्रमाण कमी आहे. |
| म. डॉ महेश मोरे. | 76 टक्के लसीकरण झाले आहे. हजार खोली प्रभागामधे पहिला डोस 45 टक्के झालेला आहे.नंदीरोड प्रभागामधे 50 ते 55 टक्के पर्यंत झाले आहे. राऊळवाडी, कृष्णनगर,प्रभात नगर या प्रभागात 80 ते 90 टक्के लसीकरण झाले आहे. |
| म. सुनिल बैसाणे | कालच आपण दिपक खोंडे कर्मचाऱ्यावर कारवाही करण्याबाबतचा विषय घेतला होता. या ठिकाणी आपल्याला अध्यक्ष ,सचिव नियुक्ती करणे क्रमप्राप्त आहे. |
| म. सभापती | सदस्य नियुक्ती आधिच झालेली आहे. फक्त सचिव आणि अध्यक्ष निवडायचे आहे. |
| म. सुनिल बैसाणे | त्याबाबत ठराव करुन तात्काळ कार्यवाही करावी. |
| म. सभापती | तुम्हीच सदस्यांनी सूचवायचे आहे |

| | |
|---|---|
| म. सुनिल बैसाणे | हा सर्व अधिकार आम्ही तुम्हाला दिलेला आहे. तुम्ही स्थायी समीतीचे सभापती आहे त्या कारणामुळे सर्व सदस्यांच्या अनुमतीने व सहमतीने या समीतीच्या अध्यक्षपदी आपण राहावे. स्वच्छ भारत अभियाना अंतर्गत स्वच्छ सर्वेक्षण 2020 मधे ओला कचरा ,सुका कचरा करणे कामी कुंडया खरेदी करण्यात आल्या होत्या त्या डी.पी. आर. मधे 2.5 कोटीचा डी.पी. आर. दाखवला आहे. तो डी.पी. आर. कितीचा होता, काय –काय खरेदी केले, काय शिल्लक आहे. |
| म. राजू माईनकर | जो डी.पी.आर. त्या मधे 79 घंटागाडया खरेदीचा प्रस्ताव होता. त्यात 79 घंटागाडया आपण खरेदी केल्या आहे. त्यानंतर हॅण्डकार्ट होते 16 ते पंधरा लाखाचे होते. व डस्बीन होते 400 नग पंचवीस लाखाचे होते. एवढे साहित्य आपण खरेदी केले आहे. |
| म. सुनिल बैसाणे | आपण ज्या डस्बीन खरेदी केल्या त्या पोर्टल वर केल्या का |
| म. राजू माईनकर | केंद्र शासनाच्या जी.एम.पोर्टलवर आपण खरेदी केल्या त्या पंचवीस लाखाचे असतांना कॉम्पीटीशन झाले त्यात 23 ठेकेदार आले होते. ते 22 लाखांत खरेदी केले. |
| म. सुनिल बैसाणे | बाकीचे डी.पी.आर.चे पैशाचे काय झाले. |
| म. राजू माईनकर | ते सेव्हींग आहे. |
| म. सुनिल बैसाणे | आपण ज्या डस्बीन लावल्या होत्या ते कुठे असतील. |
| म. राजू माईनकर | त्यांनी जे लावले त्याची यादी दिलेली आहे.आरोग्य मार्फत यादी दिली आहे त्याचे फोटोग्राफ पण लावले होते. |
| म. सुनिल बैसाणे | तुमचे काम काय आहे |
| म. राजू माईनकर | आमचे काम खरेदी करुन संबंधीत विभागाच्या ताब्यात देणे. |
| म. सुनिल बैसाणे | साहेब 25 लक्ष रुपयांचे डस्बीन घेतले आहे आजच्या दिवसांपर्यंत एकही डस्बीन दाखवून दयावे जाधव साहेब कुठे आहे त्या डस्बीन व किती शिल्लक आहे मला सांगा. |
| म. चंद्रकांत जाधव | बऱ्याचश्या डस्बीन नागरीकांनी काढायला लावल्या होत्या, काही ठिकाणी नादुरुस्त आहे. |
| म. सुनिल बैसाणे | साहेब यांनी25डस्बीन आणून दाखवावे त्या डस्बीनचा वापरकुठे कुठे झाला. संबंधीत अधिकाऱ्यांच्या मानधनातून वसूल करण्यात यावे.चोरीस गेल्या तर गुन्हा दाखल झाला पाहिजे जर नादुरुस्त असेल तर भांडार विभागाकडे जमा करावी. परिस्थीती नुसार रिपोर्ट सादर करावा. |
| म. सभापती | पुढच्या मिटींग पर्यंत त्या भागातील सॅनिटरी इन्सपेक्टर यांना शोध घ्यायला सांगा तुटलेल्या असतील तर तसा रिपोर्ट करा. |
| म. सुनिल बैसाणे | सभापती महोदय आपल्या अनेक ओपन प्लेस मालकीच्या आहे. नगररचना विभागाने त्या ठिकाणी नावे का लावत नाही हे लोक,बी.ओ.टी. तत्वावर शॉपींग आपल्याला ऊभारायच्या आहे. नवरंग पाण्याच्या टाकी जवळ अतिक्रमण होत आहे. आपल्याला उत्पनाचा स्त्रोत पाहिजे. नाईक मॅडमांकडे नगररचनेचा कारभार आहे. महसूल बुडत आहे. त्यावर का निर्णय घेऊन तुम्ही फाईलीवर सहया करत नाही. |
| म. उपायुक्त | मा. सभापती यांच्या वतीने खुलासा करते की, नगररचना विभागाचा कारभार मा. गिरी साहेबांकडे होता. ते रजेवर असल्यामुळे त्याचा चार्ज माझ्याकडे आला होता. माझ्याकडे बऱ्याच विभागाचा कार्यभार असल्यामुळे निर्णय घेता आला नाही. मी त्या फाईल्स मा. गिरी साहेबांकडे परत पाठवल्या आहेत. |
| म. सुनिल बैसाणे | गिरी सो. ८/१० दिवस रजेवर होते त्या ८/१० दिवसांत कुठल्याही निर्णय घेतला नाही. यात नागरीकांना वेठीस धरले जाते. नगररचनावाले फाईली पेंडींग ठेवता |
| म. सभापती | चव्हाण सो.तुम्ही सांगा तुमच्याकडे त्रुटी कळवण्यासाठी सुध्दा विषय पेंडींग असतात. |
| म. प्रदीप चव्हाण | बऱ्याचशा फाईलीमधे क्युरी असतात. |
| म.सुनिल बैसाणे | सर्वांना विनंती लोकांना वेठीस धरु नका. तांतडीने काम करा. |
| म.सभापती | सर्व सन्मा.सदस्यांनी केलेल्या सुचना व तक्रारीबाबत प्रशासनाने गांर्भियाने दखल घ्यावी व कार्यपध्दतीत सुधारणा करावी. |

सर्व स्थायी समिती सदस्यांनी बैठकीत उपस्थित केलेले मुद्दे तथा सुचना विचारात घेता खालील प्रमाणे कार्यवाही करण्यांस मान्यता देण्यांत येत आहे.

१. घनकचरा वाहतूक व संकलन बाबत काढण्यांत आलेल्या निविदा धारकांस तांतडीने कार्यादेश देण्याबाबत कार्यवाही करावी.
२. घनकचरा व्यवस्थापन प्रकल्पाअंतर्गत खरेदी करण्यांत आलेल्या डस्टबीनचा संपूर्ण तपशील पुढील बैठकीत सादर करावा.
३. स्थायी समितीच्या बैठकीत खाते प्रमुख तथा संबंधित अधिकारी विचारलेल्या प्रश्नांची चूकीची उत्तरे देऊन सभागृहाची दिशाभूल करतात. अशा अधिकारी तथा संबंधित खाते प्रमुख यांच्यावर तात्काळ दंडात्मक कार्यवाही करावी व त्यांच्या सेवा पुस्तकात त्याबाबतची नोंद घेण्यांत यावी.
४. धुळे मनपा मार्फत केलेल्या फिक्स डिपॉझीट बाबतचा तपशील पुढील बैठकीत सादर करावा.
५. सार्वजनिक शौचालय देखभाल दुरुस्तीच्या निविदा प्रक्रियेबाबत तांतडीने कार्यवाही करावी.
६. मोकाट कुत्र्यांच्या बंदोबस्तासाठी डॉग व्हॅन खरेदी तसेच पशु वैद्यकीय अधिकारी नियुक्ती याबाबत तांतडीने कार्यवाही करावी.
७. नगररचना विभागातील कार्यप्रणाली व बांधकाम मंजुरीबाबत येणा-या अडचणी व होणारा विलंब याबाबत सन्मा.सदस्यांनी नाराजी व्यक्त केलेली असून यासाठी तांतडीने कार्यप्रणालीत सुधारणा करण्यांची दक्षता घ्यावी.
८. यापूर्वी श्री.दिपक खोंडे यांच्या गैरव्यवहाराबाबत नियुक्त समितीचे अध्यक्ष म्हणून श्री.संजय सुधाकर जाधव, सभापती स्थायी समिती यांना तसेच सचिव म्हणून J श्री.रमजान अन्सारी , कार्यालय अधिक्षक यांना नियुक्त करण्यांस मान्यता देण्यांत येत आहे. **सर्वानुमते मंजुर,**

**सही/-x x x**
**सभापती,**
**स्थायी समिती,**
**धुळे महानगरपालिका,धुळे**

| | |
|---|---|
| विषय क्रमांक:-१४८ | मागील स्थायी समिती सभेचे इतिवृत्त वाचून कायम करणे. (दि.१४/१०/२०२१) |
| म. नगरसचिव | नगरसचिव यांनी विषयांचे वाचन केले. |
| म. अमोल मासुळे | इतिवृत्त वाचून कायम करण्यांत यावे. |
| म. सभापती | सर्व सन्मा.सदस्यांच्या सहमतीने मागील स्थायी समिती सभा दि.१४/१०/२०२१ चे इतिवृत्त क्रमश: वाचून कायम करण्यांत येत आहे. |

**धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर १६३ दिनांक ०९/१२/२०२१**

मागील स्थायी समिती सभा दिनांक १४/१०/२०२१च्या सभेतील स्थायी समिती ठराव नंबर १४९ ते १५३ अखेर तसेच सन्मा.सदस्यांनी उपस्थित केलेली चर्चा व त्यावरील निर्णय क्रमश: वाचून कायम करण्यांत येत आहे.

**सही/-x x x**
**सभापती,**
**स्थायी समिती,**
**धुळे महानगरपालिका धुळे**

| | |
|---|---|
| विषय क्रमांक:- १४९ | प्रभाग क्रं.15 मधील सार्वजनिक शौचालये विविध संस्थाना देखभाल दुरुस्तीसाठी देण्यांत आले होते. मात्र संबंधित संस्थाबाबत वारंवार तक्रारी येत असल्याने सदर नियुक्त संस्थांकडून सदर शौचालये देखभाल दुरुस्तीचे कामे काढून मे.जमुना बहुद्देशीय संस्था याना देणेबाबत आलेल्या कार्यालयीन अहवालावर विचार करणे. |
| म. नगरसचिव | नगरसचिव यांनी विषयांचे वाचन केले. |
| म.नागसेन बोरसे | सभापती महोदय, अति. आयुक्त साहेब, सन्माननिय सदस्य संस्थेचे चेअरमन कोण आहेत |
| म.चंद्रकांत जाधव | या संस्थेचे चेअरमन पवन रत्नाकर बावीस्कर आहे. |

म. नागसेन बोरसे — सभापती महोदय, जो पर्यंत मला माहिती मिळत नाही तो पर्यंत हा विषय मंजूर करु नका.आदित्य महिला बचतगट या बचतगटाच्या माध्यमातून प्रशासन काम करत होते.रत्नाकर माळी आपल्याकडे आरोग्यधिकारी होते आता रिटायर्ड झाले. श्री.पवन बावीस्कर हे त्यांचे चिरंजीव आहेत. आदित्य महिला बचत गटाचे देयकांचे पैसे श्री.पवन बावीस्कर यांच्या बॅक खात्यावर वर्ग होत होते. यांच्या खात्याची टोटल डिटेल मागवा. तेव्हाच हा विषय मंजूर करा.

म.अति. आयुक्त — या विषयाबाबत सविस्तर माहिती आरोग्य विभागाने सादर करावी.

म.नागसेन बोरसे — मी बँक डिटेल्स बॅकेमार्फत मागविले होते परंतु बँकवाल्याचे असे म्हणने आहे की डिटेल्स तुम्हाला देऊ शकत नाही. आपण ती सर्व बीले व बँक डिटेलस मागवावे. या विषयाला माझी काही हरकत नाही.

म. सभापती — सर्व सन्मा. सदस्यांच्या सहमतीने व कार्यालयीन अहवालास अधिन राहून सदर प्रस्तावास मान्यता देण्यांत येत आहे.

**धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर १६४ दिनांक ०९/१२/२०२१**

धुळे शहरातील BOT तत्वावर सार्वजनीक सुलभ शौचालय सन २००३ पासुन बांधण्यात आले होते. त्यानुसार सेवा फाऊंडेशन,पुणे यांनी नागरीकांकडुन युजर चार्जेस वसुल करुन (प्रती कुटुंब रु.३०/- मात्र प्रती महिना) परंतु नागरीक युजर चार्जेस देण्यास तयार होत नव्हते.

बांधकाम विभागामार्फत शहरात नव्याने विकसीत केलेल्या शौचालय देखभाल दुरुस्ती साठी सन २००७ साली जा.क्र./धुमपा/बावि./२६० दि.३०/८/२००७ अन्वये ७ वर्षांसाठी फेर निविदा प्रसिध्द करण्यात आली होती.

सदरच्या निविदा प्रक्रियेत पुढील ४ संस्थांनी सहभाग घेतलेला होता. १) अल्पसंख्यांक सफाई कामगार सेवाभावी संस्था २) आस्था स्वयंरोजगार महिला बचत गट ३) आस्था स्वयं.सेवा सह.संस्था ४) मुस्लिम मेहतर एकता स्वयं.सेवा संस्था या पात्र संस्थांना धुळे मनपा मे.स्थायी समिती ठराव क्र.४ दि.२०/१२/२००७ अन्वये खालील प्रमाणे दरांना मंजुरी देण्यात आली होती.

१० सिट साठी ३५०० प्रती माह

२० सिट साठी ५५०० प्रती माह

३० सिट साठी ७५०० प्रती माह

उपरोक्त मे.स्थायी समितीने मंजुरी दिलेल्या दरानुसार जा.क्र./धुमपा/बावि/ ६०२/०७/०८ दि.९/१/२००८ अन्वये पात्र संस्थांना कार्यादेश देण्यात आला आहे.

तसेच मे.स्थायी समिती ठराव क्र.२२१ दि.१०/४/२००८ नुसार रु.१२००/- लाईट बिलकरीता प्रती १० सिट साठी मंजुरी देण्यात आली होती. तसा करारनामा करुन घेण्यात आला होता.

धुळे मनपा कार्यक्षेत्रात कमी खर्चाच्या योजना अंतर्गत १) सेवा फाऊंडेशन, पुणे २) जनकल्याण फाऊंडेशन, पुणे यांचे बांधलेले१०+५असे १५युनिट सदरच्या निविदा प्रक्रियेच्या मंजुर दरानुसार समाविष्ट करुन कार्यादेश देण्यात आला आहे. व २५ वर्षे मुदतीचा करारनामा करण्यात आलेला आहे. त्यानंतर जसजसे मनपा मार्फत नव्याने शौचालय बांधण्यात आले आहेत किंवा तक्रारीच्या अनुषंगाने करारनाम्यातील अटी शर्ती नुसार व संबंधीत प्रभागाच्या नगरसेवकांच्या शिफारशी नुसार मे.स्थायी समितीच्या मान्यतेने इतर संस्थांना शौचालय देखभाल दुरुस्तीची कामे देण्यात आली आहेत. सद्यस्थितीत खालील प्रमाणे संस्था काम करीत आहे.

| अ.क्र. | संस्थेचे नांव | युनिट संख्या |
|---|---|---|
| १ | सेवा फाऊंडेशन, पुणे | ४४ |
| २ | जनकल्याण फाऊंडेशन, पुणे | ५ |
| ३ | आस्था स्वयंरोजगार सेवा सह.संस्था | ३८ |
| ४ | आस्था स्वयंरोजगार महिला बचत गट | ६ |
| ५ | अल्पसंख्यांक सफाई कामगार सेवाभावी संस्था | ९ |
| ६ | मुस्लीम मेहतर एकता स्वयं.सेवा संस्था | ७ |
| ७ | उज्वल एज्युकेशन वेल्फेअर संस्था | ६ |

| | | |
|---|---|---|
| ८ | स्वर्गीय गोपालजी गोयर बेरोजगार संस्था | ५ |
| ९ | श्रमीक स्वयंरोजगार सेवा सह.संस्था | ९ |
| १० | अल्पसंख्यांक मेहतर दुर्बल घटक | ५ |
| ११ | लकी सुशिक्षीत बेरोजगार संस्था | १ |
| १२ | राधेय सुशिक्षीत बेरोजगार संस्था | ११ |

वरील सर्व संस्थांना मे.स्थायी समितीक ठराव क्र.९६ दि.२१/१२/२०१७ अन्वये शौचालय साफसफाई व विद्युत बिला २५% वाढ करण्यात आली असुन किरकोळ दुरुस्ती करीता १० सिट साठी रु.१००० व २० सिट साठी रु.२००० असे दर लागु करण्यात आले आहे. त्यानुसार सद्याचे दर खालील प्रमाणे आहेत.

| सिट संख्या | साफसफाई | लाईट बिल | दुरुस्ती | एकुण |
|---|---|---|---|---|
| १० | ७९८७ | २४३० | १००० | ११४१७ |
| २० | ८१६० | ४८६१ | २००० | १५०२१ |
| ३० | १५७१३ | ७२९३ | २००० | २५००६ |

सदरचे शौचाल देखभाल दुरुस्तीसाठी १४ व्या वित्त आयोगाच्या प्राप्त निधीतनु महानगरपालिका अधिनियम ६३ (४) अन्वये मार्च २०२२ पर्यंत प्रशासकीय मान्यता घेण्यात आली आहे व उक्त संस्थांकडुन कामे करुन घेण्यात येत आहे.

मा.स्थायी समिती सभापती तथा प्रभाग क्र.१५ चे नगरसेवक यांनी प्रभाग क्र.१५ मध्ये कार्यरत शौचालय ठेकेदार योग्य प्रकारे साफसफाई करीत नाहीत.वारंवार तक्रारी येत आहेत तसेच करारनाम्या प्रमाणे काम करीत नसल्यामुळे त्यांच्याकडील काम काढुन घेण्याबाबत पत्र सादर केलेले आहे.

प्रभाग क्र.१५ मध्ये सर्व सार्वजनीक सुलभ शौचालय असुन ते नियमीत साफसफाई होत नाही. तसेच किरकोळ दुरुस्ती देखील होत नाही. नागरीक वारंवार तक्रार करीत असुन त्यांची दखल घेतली जात नाही.नागरीकांची तक्रार आल्यास तक्रार निवारण करता येत नाही व साफसफाई व्यवस्थीत करीत नसल्याने वेळोवेळी तक्रार येत असतात. उक्त सुलभ शौचालय साफसफाई देखभाल करणारी संस्था यांच्या सोबत केलेल्या करारनाम्यातील अट क्र.१३ मध्ये नमुद नुसार आम्ही चालवित असलेल्या युनिट बाबत नियमीत तक्रार आल्यास योग्य साफसफाई नसल्यास स्थानीक नागरीक नेमलेले कर्मचारी न आढळल्यास, तक्रार रजिस्टर न ठेवल्यास व आलेली तक्रार वेळीच निवारण न केल्याचे निदर्शनास आल्यास आम्हाला दिलेले काम त्वरीत काढुन ठेका रद्द करुन अन्य संस्थेकडे सदर काम वर्ग करण्यास आमच्या सस्थेस मान्य असुन या बाबतचा अधिकार मा.आयुक्त सो. यांना राहिल असे नमुद आहे. तरी सदर अटी नुसार ज्या संस्थेस साफसफाई व देखभालीचे काम दिले असेल त्यांच्याकडुन काढुन जमुना बहुद्देशीय सेवाभावी संस्था यांना मनपाने ठरविलेल्या दराप्रमाणे देण्याबाबत पत्र सादर केले आहे. व सोबत जमुना बहुद्देशीय संस्थेचे नोंदणी प्रमाणपत्र सादर केले आहे. तरी प्रभाग क्र.१५ मध्ये खालील संस्थांच्या कामाबाबत मोठ्या प्रमाणावर तक्रारी येत असुन त्यांच्याकडुन सदरचे शौचालय काढुन सन्मा.सभापती सो. यांनी केलेल्या शिफारशीनुसार जमुना बहुद्देशीय संस्था यांना साफसफाईसाठी देणे योग्य होईल असे मत आहे.

याबाबत तसेच अ ति.आयुक्त सो. यांनी पुढील प्रमाणे अभिप्राय नोंदविला आहे. **सदरचे** प्रकरण महानगरपालिकेची मालमत्ता (शौचालय) एका संस्थेकडुन काढुन दुसऱ्या संस्थेला देण्या बाबतचे आहे. यापुर्वी ज्या संस्थांना सदर शौचालय दिलेले आहेत ते निविदा न करताच दिलेले होते (स्थायीच्या मान्यतेने). महानगरपालिका कायदा १९४९ च्या कलम ७९ नुसार मनपा मालमत्तेची विल्हेवाट लावण्याची प्रक्रिया निश्चीत करुन दिलेली आहे. व सदर कलमाच्या अनुषंगाने मे २०१८ मध्ये Public Account Committee Act निर्देशानुसार मनपा मालमत्तांची विल्हेवाट लावण्यासाठी शासनाने प्रक्रिया निश्चीतीचे परिपत्रक निर्गमीत केलेले आहे. त्यांचे अवलोकन होऊन सदर प्रस्ताव मे. स्थायी समितीपुढे मान्यतेस्तव सादर करण्यांत आलेला होता.

सर्व सनमा.सदस्यांच्या सहमतीने व कार्यालयीन अहवालास अधिन राहून सद्यस्थितीत नियुक्त संस्थाबाबत देखभाल दुरुस्तीच्या तक्रारी येत असल्याने त्यांच्याकडून सदर काम काढून प्रभाग क्रं. 15 मधील उपरोक्त अहवालात नमूद १ ते ११ सार्वजनिक शौचालये मे. जमुना बहुद्देशीय संस्था यांना देखभाल दुरुस्तीसाठी मागील मंजूर दरानुसार देण्यांस मान्यता देण्यांत येत आहे. सदर प्रस्ताव व कार्यवाही बाबत लेखा आक्षेप निर्माण होणार नाही याची दक्षता घ्यावी. याबाबतची जबाबदारी संबंधित विभागाची राहील. सुचक :- श्री. अमोल पावबा मासुळे

अनुमोदक :- श्री. सुनिल तुळशीराम बैसाणे **सर्वानुमते मंजुर,**

**सही/-x x x**

**सभापती,**
**स्थायी समिती,**
**धुळे महानगरपालिका धुळे**

विषय क्रमांक:- १५० महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान योजना (जिल्हास्तरीय)अंतर्गत प्र.क्र.७ मध्ये मोगलाई भागात श्री. पवार यांच्या घरापासून ते श्री.गायकवाड यांचे घरापावेतो ते मयूर कोळी यांच्या घरापर्यंत रस्ता कॉक्रीट करणेबाबत निविदा दर मागविण्यांत आलेत,त्याबाबत आलेल्या कार्यालयीन अहवालावर विचार करणे.

म. नगरसचिव नगरसचिव यांनी विषयांचे वाचन केले.

म.अमोल मासुळे विषय मंजूर करण्यांत यावा.

म.सुनिल बैसाणे विषय मंजूर करण्यांत यावा.

म. सभापती सर्व सन्मा.सदस्यांच्या सहमतीने सदर प्रस्तावास कार्यालयीन अहवालास अधिन राहून मान्यता देण्यांत येत आहे.

**धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर १६५ दिनांक ०९/१२/२०२१**

महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान योजना (जिल्हास्तरीय) अंतर्गत प्र.क्र.7 मध्ये मोगलाई भागात श्री.पवार यांच्या घरापासून ते श्री.गायकवाड यांचे घरापावेतो ते मयूर कोळी यांच्या घरापर्यंत रस्ता कॉक्रीट करणे बाबतच्या कामास धुळे महानगरपालिका मे.महासभा ठराव नं.96 दि.31/12/2019 मा.जिल्हाधिकारी सो. धुळे महानगरपालिका यांनी टिपणी मंजुरीने दि.31/03/2021 अन्वये उक्त कामाबाबत रक्कम रु.29,99,691/- मात्र खर्चाचा आर्थिक व प्रशासकीय मंजुरी देणेत आली आहे.

उक्त कामाबाबत शहर अभियंता मनपा धुळे यांचे पत्र क्र./1007/2021 दि.27/1/2021 अन्वये रक्कम रु.29,99,691/- मात्र खर्चास तांत्रिक मंजुरी मिळालेली आहे.

उक्त कामाबाबत धुळे महानगरपालिका जा.क्र./बा.वि./59/2021 दि.7/6/2021 अन्वये दै. दिव्य मराठी /वार्ता या वृत्तपत्रात जाहीर निविदा प्रसिद्ध करणेत येऊन दि.25/06/2021 पावेतो निविदा दर मागविण्यात आले आहेत. पात्र कंत्राटदार यांनी निविदेबाबत ऑनलाईन पद्धतीने बयाणा रक्कम भरून निविदा दर सादर केलेले आहेत.

| अ.क्र. | कंत्राटदार किंवा ठेकेदाराचे नाव | दिलेले निविदा दर | शेरा |
|---|---|---|---|
| 1 | अंकित किशोर भंडारी | **अंदाजपत्रकीय दर** | **सर्वात कमी दर** |
| 2 | भूषण लक्ष्मण चौधरी | **शे.1.00% जास्तीने** | |
| 3 | गौरवसिंग आर कौर | **शे.3.00% जास्तीने** | |

वरील प्रमाणे निविदेत भाग घेतलेले ठेकेदार पात्र असून श्री/मे. **अंकित किशोर भंडारी** यांचे दर **अंदाजपत्रकीय दराने** आहे व त्यांनी नियमा प्रमाणे ऑनलाईन बयाणा रक्कम भरलेली आहे.सबब कंत्राटदार श्री/मे. **अंकित किशोर भंडारी** यांची अंदाजपत्रकीय दराने अंदाजपत्रकीय दराने आलेले असल्याने यांच्या दरास मंजुरीस्तव मे. स्थायी समिती समोर सादर झालेला आहे.

सर्व सनमा. सदस्यांच्या सहमतीने व कार्यालयीन अहवालास अधिन राहून सदर कामी मे. **अंकित किशोर भंडारी** यांचे अंदाजपत्रकीय दराने आलेल्या दरांस महाराष्ट्र महानगरपालिका

अधिनियम कलम ७३ नुसार मान्यता देण्यांत येत आहे. सदर प्रस्ताव व कार्यवाही बाबत लेखा आक्षेप निर्माण होणार नाही याची दक्षता घ्यावी. याबाबतची जबाबदारी संबंधित विभागाची राहील.

सुचक :- श्री. अमोल पावबा मासुळे

अनुमोदक :- श्री. सुनिल तुळशीराम बैसाणे **सर्वानुमते मंजुर,**

**सही/-x x x**

**सभापती,**

**स्थायी समिती,**

**धुळे महानगरपालिका धुळे**

विषय क्रमांक:-१५१ नागरी दलित वस्ती सुधार योजना अंतर्गत प्र.क्र. १४ मध्ये आण्णाभाऊ साठेनगर भागात कोर्टासमोरील चहाच्या दुकानापासून ते आण्णाभाऊ साठे नगर बोर्डापर्यंत रस्ता डांबरीकरण करणेबाबत निविदा दर मागविण्यांत आलेत, त्याबाबत आलेल्या कार्यालयीन अहवालावर विचार करणे.

म. नगरसचिव नगरसचिव यांनी विषयांचे वाचन केले.

म. सुनिल बैसाणे विषय मंजूर करण्यांत यावा.

म.कमलेश देवरे विषय मंजूर करण्यांत यावा.

म. सभापती सर्व सन्मा.सदस्यांच्या सहमतीने सदर प्रस्तावास कार्यालयीन अहवालास अधिन राहून मान्यता देण्यांत येत आहे.

**धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर १६६ दिनांक ०९/१२/२०२१**

नागरी दलित वस्ती सुधार योजना अंतर्गत प्र.क्र.१४ मध्ये आण्णाभाऊ साठे नगर भागात कोर्टासमोरील चहाच्या दुकानापासून ते आण्णाभाऊ साठे नगर बोर्डापर्यंत रस्ता डांबरीकरण करणे बाबतच्या कामास धुळे महानगरपालिका मे. महासभा ठराव नं.१४०/अ दि.३०/१२/२०२०, मा.जिल्हाधिकारी सो. धुळे महानगरपालिका यांनी टिपणी मंजुरीने दि.२६/३/२०२१ अन्वये उक्त कामाबाबत रक्कम रु.२९,९७,९३७/- मात्र खर्चाचा आर्थिक व प्रशासकीय मंजुरी देणेत आली आहे.

उक्त कामाबाबत शहर अभियंता मनपा धुळे यांचे पत्र क्र./१२४३/२०२१ दि.८/३/२०२१अन्वये रक्कम रु.२९,९७,९३७/- मात्र खर्चास तांत्रिक मंजुरी मिळालेली आहे.

उक्त कामाबाबत धुळे महानगरपालिका जा.क्र./बा.वि./९१/२०२१ दि. १८/६/२०२१ अन्वये दै.देशोन्नती / पथदर्शी या वृत्तपत्रात जाहीर निविदा प्रसिद्ध करणेत येऊन दि.१३/७/२०२१ पावेतो निविदा दर मागविण्यात आले आहेत. पात्र कंत्राटदार यांनी निविदेबाबत ऑनलाईन पद्धतीने बयाणा रक्कम भरून निविदा दर सादर केलेले आहेत.

| अ.क्र. | कंत्राटदार किंवा ठेकेदाराचे नाव | दिलेले निविदा दर | शेरा |
|---|---|---|---|
| १ | अ.के.सैफी | **शे.१.००% जास्तीने** | |
| २ | सुकन्या सुरेश चौधरी | **शे.२.००% जास्तीने** | |
| ३ | गायत्री कन्स्ट्रक्शन | **अंदाजपत्रकीय दर** | **सर्वात कमी दर** |

वरील प्रमाणे निविदेत भाग घेतलेले ठेकेदार पात्र असून श्री/मे. **गायत्री कन्सट्रक्शन** यांचे दर **अंदाजपत्रकीय दराने** आहे व त्यांनी नियमा प्रमाणे ऑनलाईन बयाणा रक्कम भरलेली आहे.सबब कंत्राटदार श्री/मे. **गायत्री कन्सट्रक्शन** यांची अंदाजपत्रकीय दराने अंदाजपत्रकीय दराने आलेले असल्याने यांच्या दरास मंजुरीस्तव मे.स्थायी समिती पुढे सादर केला आहे.

सर्व सनमा. सदस्यांच्या सहमतीने व कार्यालयीन अहवालास अधिन राहून सदर कामी मे. **गायत्री कन्सट्रक्शन** यांचे अंदाजपत्रकीय दराने आलेल्या दरांस महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम

कलम ७३ नुसार मान्यता देण्यांत येत आहे.सदर प्रस्ताव व कार्यवाही बाबत लेखा आक्षेप निर्माण होणार नाही याची दक्षता घ्यावी. याबाबतची जबाबदारी संबंधित विभागाची राहील.

सुचक :- श्री. सुनिल तुळशीराम बैसाणे
अनुमोदक :- श्री. कमलेश नारायण देवरे **सर्वानुमते मंजुर,**

**सही/-x x x**
**सभापती,**
**स्थायी समिती,**
**धुळे महानगरपालिका धुळे**

विषय क्रमांक:- १५२ नागरी दलित वस्ती सुधार योजना अंतर्गत दादासाहेब गायकवाड चौक ते उत्तरेस भिल वस्ती ग.नं. १४ जुने धुळे पर्यंत आर.सी.सी.गटार करणेबाबत निविदा दर मागविण्यांत आलेत, त्याबाबत आलेल्या कार्यालयीन अहवालावर विचार करणे.

म. नगरसचिव नगरसचिव यांनी विषयांचे वाचन केले.

म. नागसेन बोरसे विषय मंजूर करण्यांत यावा.

म. बन्सीलाल जाधव विषय मंजूर करण्यांत यावा.

म. सभापती सर्व सन्मा.सदस्यांच्या सहमतीने सदर प्रस्तावास कार्यालयीन अहवालास अधिन राहून मान्यता देण्यांत येत आहे. **धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर १६७ दिनांक ०९/१२/२०२१**

नागरी दलित वस्ती सुधार योजना अंतर्गत दादासाहेब गायकवाड चौक ते उत्तरेस भिल वस्ती ग.नं.१४ जुने धुळे पर्यंत आर.सी.सी.गटार करणे. कामाबाबत धुळे महानगरपालिका मे. महासभा ठराव नं.१४० (अ) दि.३०/१२/२०२० मा. जिल्हाधिकारी सो. धुळे महानगरपालिका यांनी टिपणी मंजुरीने दि. २६/०३/२०२१ अन्वये उक्त कामाबाबत रक्कम रु.८८,६९,६९३/- मात्र खर्चाचा आर्थिक व प्रशासकीय मंजुरी देणेत आली आहे.

उक्त कामाबाबत शहर अभियंता मनपा धुळे यांचे पत्र क्र. १२५० दि. ०८/०३/२०२१ अन्वये रक्कम रु. ८८,६९,६९३/- मात्र खर्चास तांत्रिक मंजुरी मिळालेली आहे.

उक्त कामाबाबत धुळे महानगरपालिका जा.क्र./बां.वि./९२/२० दि.१८/०६/२०२१ अन्वये रोजी देशदूत / पोलीस शोध या वृत्तपत्रात जाहीर निविदा प्रसिद्ध करणेत येऊन दि. २६/०७/२०२१ अखेर निविदा दर मागविण्यात आले आहेत. पात्र कंत्राटदार यांनी निविदेबाबत ऑनलाईन पद्धतीने बयाणा रक्कम भरून निविदा दर सादर केलेले आहेत.

| अ.क्र. | कंत्राटदार किंवा ठेकेदाराचे नाव | दिलेले निविदा दर | शेरा |
|---|---|---|---|
| १ | श्री.वृषभ सतीष खिवसरा | शे.३.०० % जास्तीने | |
| २ | मे. एकविरा कन्स्ट्रक्शन | शे.२.०० % जास्तीने | |
| ३ | मे. हिंद कन्सट्रक्शन | **शे.-.९९% कमीने** | **सर्वात कमी दर** |

वरील प्रमाणे निविदेत भाग घेतलेले ठेकेदार पात्र असून **मे.हिंद कन्सट्रक्शन** यांचे दर **शे.-.९९%** कमी आहे व त्यांनी नियमा प्रमाणे ऑनलाईन बयाणा रक्कम भरलेली आहे. सबब कंत्राटदार **मे. हिंद कन्सट्रक्शन** यांची **शे.-.९९ %** कमीने दराने आलेले निविदा दर मंजुरीस्तव मे.स्थायी समिती पुढे सादर केला आहे.

सर्व सनमा.सदस्यांच्या सहमतीने व कार्यालयीन अहवालास अधिन राहून सदर कामी **मे. हिंद कन्सट्रक्शन** यांची **शे.-.९९ %** कमीने दराने आलेले निविदा दरास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ७३ नुसार मान्यता देण्यांत येत आहे.सदर प्रस्ताव व कार्यवाही बाबत लेखा आक्षेप निर्माण होणार नाही याची दक्षता घ्यावी. याबाबतची जबाबदारी संबंधित विभागाची राहील.

सुचक :- श्री. नागसेन दामोदर बोरसे
अनुमोदक :- श्री. बन्सीलाल माणिक जाधव **सर्वानुमते मंजुर,**

**सही/-x x x**
**सभापती,**
**स्थायी समिती,**
**धुळे महानगरपालिका धुळे**

विषय क्रमांक:- १५३ नागरी दलित वस्ती सुधार योजना अंतर्गत प्र.क्र.9 मध्ये गायकवाड उत्तरेकडील बाजूपासून ते सफाई कामगार मेहतर समाज वसाहत पावेतो रस्ता कॉंक्रीट करणे कामाबाबत निविदा दर मागविण्यांत आलेत, त्याबाबत आलेल्या कार्यालयीन अहवालावर विचार करणे.

म. नगरसचिव नगरसचिव यांनी विषयांचे वाचन केले.

म. नागसेन बोरसे विषय मंजूर करण्यांत यावा.

म. बन्सीलाल जाधव विषय मंजूर करण्यांत यावा.

म. सभापती सर्व सन्मा.सदस्यांच्या सहमतीने सदर प्रस्तावास कार्यालयीन अहवालास अधिन राहून मान्यता देण्यांत येत आहे.

**धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर १६८ दिनांक ०९/१२/२०२१**

नागरी दलित वस्ती सुधार योजना अंतर्गत प्र.क्र.९ मध्ये गायकवाड उत्तरेकडील बाजूपासून ते सफाई कामगार मेहतर समाज वसाहत पावेतो रस्ता कॉंक्रीट करणे कामाबाबत धुळे महानगरपालिका मे.महासभा ठराव नं.१४० (अ) दि.३०/१२/२०२० मा.जिल्हाधिकारी सो. धुळे महानगरपालिका यांनी टिपणी मंजुरीने दि.२६/०३/२०२१ अन्वये उक्त कामाबाबत रक्कम रु.५५,०१,८१८/- मात्र खर्चाचा आर्थिक व प्रशासकीय मंजुरी देणेत आली आहे.

उक्त कामाबाबत शहर अभियंता मनपा धुळे यांचे पत्र क्र./१२३१ दि.०८/०३/२०२१ अन्वये रक्कम रु. ५५,०१,८१८/- मात्र खर्चास तांत्रिक मंजुरी मिळालेली आहे.

उक्त कामाबाबत धुळे महानगरपालिका जा.क्र./बां.वि./९२/२० दि. १८/०६/२०२१ अन्वये रोजी देशदूत/पोलीस शोध या वृत्तपत्रात जाहीर निविदा प्रसिद्ध करणेत येऊन दि.२६/०७/२०२१ अखेर निविदा दर मागविण्यात आले आहेत. पात्र कंत्राटदार यांनी निविदेबाबत ऑनलाईन पद्धतीने बयाणा रक्कम भरून निविदा दर सादर केलेले आहेत.

| अ.क्र. | कंत्राटदार किंवा ठेकेदाराचे नाव | दिलेले निविदा दर | शेरा |
|---|---|---|---|
| १ | श्री.वृषभ सतीष खिवसरा | श.३.०० % जास्तीने | |
| व २ | मे.एकविरा कन्स्ट्रक्शन | श.२.०० % जास्तीने | |
| ३ व री | मे.हिंद कन्सट्रक्शन | **शे.-.९९% कमीने** | **सर्वात कमी दर** |

ल प्रमाणे निविदेत भाग घेतलेले ठेकेदार पात्र असून **मे.हिंद कन्सट्रक्शन** यांचे दर **शे.-.९९%** कमी आहे व त्यांनी नियमा प्रमाणे ऑनलाईन बयाणा रक्कम भरलेली आहे. सबब कंत्राटदार **मे.हिंद कन्सट्रक्शन** यांची **शे.-.९९%** कमीने दराने आलेले निविदा दर मंजुरीस्तव मे.स्थायी समिती पुढे सादर केला आहे. सर्व सनमा. सदस्यांच्या सहमतीने व कार्यालयीन अहवालास अधिन राहून सदर कामी**मे.हिंदकन्सट्रक्शन** यांची **शे.-.९९ %** कमीने दरानेआलेले निविदा दरास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ७३ नुसार मान्यता देण्यांत येत आहे.सदर प्रस्ताव व कार्यवाही बाबत लेखा आक्षेप निर्माण होणार नाही याची दक्षता घ्यावी. याबाबतची जबाबदारी संबंधित विभागाची राहील.

सुचक :- श्री. नागसेन दामोदर बोरसे

अनुमोदक :- श्री. बन्सीलाल माणिक जाधव **सर्वानुमते मंजुर,**

**सही/-x x x**

**सभापती,**
**स्थायी समिती,**
**धुळे महानगरपालिका धुळे**

विषय क्रमांक:- १५४ धुळे महानगरपालिका कडील आयुक्त सो यांचे दालनात VC (व्हिडीओ कॉन्फरन्स) रुमची व्यवस्था करण्यात आलेल्या बाबत झालेल्या खर्च रु.64842/-मात्रला कार्योत्तर मंजुरी देणेबाबत विचार करणे.

म. नगरसचिव नगरसचिव यांनी विषयांचे वाचन केले.

म.सुनिल बैसाणे विषय मंजूर करण्यांत यावा. परंतु सदर कोणी केले आहे. पैसे कोणाला दिले जाणार आहे याचा उल्लेख टिपणी असणे आवश्यक आहे.

म.नगरसचिव टिपणी मध्ये ईंजि. मोईनुदिन आजिमउदिन शेख यांनी काम केल्याचे नमूद आहे. त्यानुसार त्याना बील दिले जाईल.

म. अमोल मासुळे विषय मंजूर करण्यांत यावा.

म. सभापती सर्व सन्मा.सदस्यांच्या सहमतीने सदर प्रस्तावास कार्यालयीन अहवालास अधिन राहून कार्योत्तर मान्यता देण्यांत येत आहे.

**धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर १६९ दिनांक ०९/१२/२०२१**

धुळे महानगरपालिका कडील आयुक्त सो यांचे दालनात VC (व्हिडीओ कॉन्फरन्स) रुमची व्यवस्था करण्यात आलेल्या व्यवस्थेचे बिल प्राप्त झालेले असुन खालील प्रमाणे तपशिल सादर करणेत येत आहे.

| अ.क्र | साहित्य तपशिल | नग | प्रतिनग रुपये | इजि.मोईनुदिन आजिमउदिन शेख, धुळे | एकुण खर्च रुपये |
|---|---|---|---|---|---|
| १ | काच बसविणे | १२mm | ७०००.०० | ७०००.०० | **७०००.००** |
| २ | ॲल्युमिनियम सेक्शन | ०१ नग | १८०००.०० | १८०००.०० | **१८०००.००** |
| ३ | कॅमेरा HP | ०१ नग | ४८५०.०० | ४८५०.०० | **४८५०.००** |
| ४ | माईक | ०१ नग | ५२०१.०० | ५२०१.०० | **५२०१.००** |
| ५ | केबल | ०१ नग | ९००.०० | ९००.०० | **९००.००** |
| ६ | फिटींग २ बोर्ड | ०२ नग | ४०००.०० | ४०००.०० | **४०००.००** |
| ७ | धुळे मनपा ॲक्रेलिक सिट | २×२ साईज | १५०००.०० | १५०००.०० | **१५०००.००** |
| | | | | **एकुण खर्च** | **५४९५१.००** |
| | | | | GST 18 % | **९८९१.००** |
| | | | | **एकुण खर्च सर्व करासोबत सादर केले** | **६४८४२.००** |

तरी सदर तक्त्याप्रमाणे खर्च रुपये एकुण 64842/- मात्र अदा करणे करीता म. आयुक्त सो यांचे मंजुरीने सदरचा खर्च अदा करणेस मे.स्थायी समिती पुढे सादर करणेस मंजुरी दिलेली असुन सदरच्या खर्चास कार्यात्तर मंजुरी मिळणे करीता म.स्थायी समिती पुढे सादर झालेला आहे.

सर्व सन्मा. सदस्यांच्या सहमतीने व कार्यालयीन अहवालास अधिन राहून सदर कामी खर्च रु.64842/- मात्रला महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम 5(2)(2) नुसार कार्योत्तर मान्यता

देण्यांत येत आहे. सदर प्रस्ताव व कार्यवाही बाबत लेखा आक्षेप निर्माण होणार नाही याची दक्षता घ्यावी. याबाबतची जबाबदारी संबंधित विभागाची राहील.

सुचक :- श्री.सुनिल तुळशीराम बैसाणे
अनुमोदक :- श्री. अमोल पावबा मासुळे **सर्वानुमते मंजुर,**

**सही/-x x x**

**सभापती,**
**स्थायी समिती,**
**धुळे महानगरपालिका धुळे**

विषय क्रमांक:- १५५ धुळे महानगरपालिकेची लोक अदालत भरविणे व माहिती अधिनियम २००५ अंतर्गत मास्टर ट्रेनर यशदा पुणे यांचे कार्यक्रम करीता मंडप, खुर्ची, चहा, पाणी, भोजन व्यवस्था करणेकामी झालेल्या खर्च रु. ११०३५२/-मात्रला कार्योत्तर मंजुरी देणेबाबत विचार करणे.

म. नगरसचिव नगरसचिव यांनी विषयांचे वाचन केले.

म. सुनिल बैसाणे विषय क्रं. १५५ प्रशासनाचा विषय आहे. ते जे पैसे अदा करणार आहे ते कोणत्या एजन्सीला देणार आहे. असा टिपणीमध्ये उल्लेख नाही.

म.सभापती लोक अदालत कोणा मार्फत आयोजन होते.

म. राजू माईनकर लोक अदालतीचे आयोजन वसूली विभागामार्फत करण्यांत येते.त्यांनी विभागामार्फत माझ्या कडे मागणी पत्र सादर केले

म.सभापती लोक अदालत हा विषय धुळे मनपाचा नाही. हा न्यायालयाचा आहे. त्याच्या स्तरावर ते खर्च करु शकतात. स्वत: हून आपण लोक अदालतीला पैसे देत आहोत. आपल्या संस्थेवर हा खर्च होत नाही. पुन्हा जर असे झाले तर तुमची सर्वांची रिकव्हरी करण्यात येईल.

म.सुनिल बैसाणे प्रस्ताव मान्य करण्याबाबत दुमत नाही. पैसे कोणाला दयायचे ते माहित पाहिजे.

म.नगरसचिव तुमची कार्यालयीन टिपनी समीतीपुढे आलेली आहे त्याचा कुठेच उल्लेख नाही.

म. राजू माईनकर कार्यालयीन अहवालात त्याचा उल्लेख आहे. धनलक्ष्मी मंडप डेकोरेटर्स या संस्थेने काम केलेले आहे.

म. अमोल मासुळे विषय मंजुर करण्यांत यावा.

म.सभापती सर्व सन्मा.सदस्यांच्या सहमतीने व कार्यालयीन अहवालात अधिन राहून सदर कामी झालेला खर्चास कार्योत्तर मान्यता देण्यांत येत आहे.

**धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर १७० दिनांक ०९/१२/२०२१**

धुळे महानगरपालिका कडील धळे महानगरपालिकेची लोक अदालत भरविणे व माहिती अधिनियम २००५ अंतर्गत मास्टर ट्रेवर यशदा पुणे यांचे कार्यक्रम करीता मंडप.खुर्ची.चहा.पाणी.भोजन व्यवस्था करणे बाबत असुन खालील प्रमाणे तपशिल सादर करणेत येत आहे.

1) **मंडप,खुर्ची,टेबल इ.**

| अ.न. | साहित्याचा तपशिल | साईज | अंदाजे दर | खर्च |
|---|---|---|---|---|
| 1 | कापडी मंडप ताडपत्री मजुरीसह | ५०x६० ३००० स्के.फु. | ७/- रू स्के.फुट आहे. | २१०००/- |
| 2 | मंडपात ग्रिन मॅट | ५०x६० ३००० स्के.फु. | २/- रू स्के.फुट आहे. | ६०००/- |
| 3 | खुर्ची | १०० नग | ५/- रू स्के.फुट आहे. | ५००/- |
| 4 | वेलवाला सफेद पडदा | १६ नग | ४००/- रू स्के.फुट आहे. | ६४००/- |
| 5 | टेबल लोखंडी भोजन करीता कव्हर सह | ६० नग | ५०/- रू स्के.फुट आहे. | ३०००/- |
| 6 | लोखंडी बॅरेगेटींग | २०x२० ४०० स्के.फु. | ३०/- रू स्के.फुट आहे. | १२०००/- |
| | | | **एकुण खर्च** | ४८९००/- |
| | | | **GST १८%** | ८८०२/- |
| | | | **एकुण खर्च सर्व करासोबत सादर** | ५७७०२/- |

2) **भोजन**

| अ.क्र. | साहित्याचा तपशिल | नग | दर | एकुण खर्च |
|---|---|---|---|---|
| 1 | लोकअदालत महानगरपालिका आधिकारी कर्मचारी जिल्हा न्यायालय कर्मचारी यांना भोजन<br>1 भाजी ओली, 1 भाजी सुकी, भात, डिस्को पापड, मोहन थाळ, पोळी, भाकर | ३०० | १५० | ४५००० |

3) **भोजन, चहा, पाणी ट्रेनिंगसाठी**

| तपशिल | अधिकारी/ कर्मचारी संख्या | दर | एकुण रक्कम |
|---|---|---|---|
| भोजन | ७० | रु.१००/-(स्विट वगळून) | ७०००/- |
| चहा | ७० | रु.७.५०/- प्रमाणे | ५२५/- |
| पाणी | ७० | रु.२५/- प्रमाणे (५ जार) | १२५/- |
| | | **एकुण खर्च** | **७,६५०** |

तरी सदर तक्त्याप्रमाणे खर्च रुपये एकुण ११०३५२/- मात्र अदा करणे करीता म.आयुक्त सो यांचे मंजुरीने सदरचा खर्च अदा करणेस मे.स्थायी समिती पुढे सादर करणेस मंजुरी दिलेली असुन सदरच्या खर्चास कार्यात्तर मंजुरी मिळणे करीता म.स्थायी समिती पुढे सादर झालेला आहे.

सर्व सन्मा. सदस्यांच्या सहमतीने व कार्यालयीन अहवालास अधिन राहून सदर कामी मे. धनलक्ष्मी मंडप डेकोरेटर्स यांनी केलेल्या खर्च रु.११०३५२/- मात्रला महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम 5(2)(2) नुसार कार्योत्तर मान्यता देण्यांत येत आहे. सदर प्रस्ताव व कार्यवाही बाबत लेखा आक्षेप निर्माण होणार नाही याची दक्षता घ्यावी.याबाबतची जबाबदारी संबंधित विभागाची राहील.

सुचक :- श्री.सुनिल तुळशीराम बैसाणे

अनुमोदक :- श्री. अमोल पावबा मासुळे

**सर्वानुमते मंजुर,**

**सही/-x x x**

**सभापती,**

**स्थायी समिती,**

**धुळे महानगरपालिका धुळे**

| | |
|---|---|
| विषय क्रमांक:- १५६ | जेसीबी वाहन चालक यांना फेर नियुक्ती देणेबाबतआलेल्या कार्यालयीन अहवालावर विचार करणे. |
| म. नगरसचिव | नगरसचिव यांनी विषयांचे वाचन केले. |
| म.पुष्पाताई प्रकाश बोरसे | विषय मंजूर करण्यांत यावा. |
| म. भारती माळी | विषय मंजूर करण्यांत यावा. |
| म. सभापती | सर्व स्न्मा.सदस्यांच्या सहमतीने व कार्यालयीन अहवालास अधिन राहून जेसीबी वाहन चालक यांना फेर नियुक्ती देणेस मान्यता देण्यांत येत आहे. |

**धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर १७१ दिनांक ०९/१२/२०२१**

धुळे मनपामार्फत २ जेसीबी वाहन चालक १२०००/- मात्र एकत्रित मानधनावर ६ महिने कालावधीकरीता नेमणुक करणेत आली होती. सदर नियुक्तीचा कालावधी दि १०/६/२०२० पासून ६ महिने असल्याने ९ डिसेंबर २०२० रोजी त्यांचा सेवा कालावधी पूर्ण झाला होता. उपरोक्त २ कर्मचा-यांपैकी एक कर्मचारी श्री राहुल नाना देसले यांना मुदतवाढ देणेत आली होती. तथापी उपरोक्त आदेशानुसार सदर कर्मचा-यांची दि.१३/६/२०२१ रोजी मुदत संपुष्ठात आलेली आहे.

उपरोक्त कर्मचा-याची कामाची निकड पाहता पुढील ६ महिने करीता मुदतवाढ देणेबाबत आरोग्य विभागाने अहवाल सादर केलेला आहे.

उपरोक्त अहवालानुसार आरोग्य विभागाच्या अहवालानुसार कर्मचा-याची कामाची निकड पाहता मुदत संपुष्ठात आल्याच्या दिनांकापासून ५ दिवसाचा खंड देवून पुढील ६ महिने कालावधी करीता श्री राहुल नाना देसले यांना मुदतवाढ देणेबाबत एकत्रित मानधनावर रु.१२०००/- मात्र नुसार

पुनश्च: फेर नियुक्ती देणेबाबतचा विषय महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ५३ (३)अन्वये मे. स्थायी समितीपुढे सादर झालेला आहे.

सर्व सन्मा.सदस्यांच्या सहमतीने व कार्यालयीन अहवालास अधिन राहून धुळे मनपामार्फत २ जेसीबी वाहन चालक यांना महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम ५३(३) अन्वये बाहय स्त्रोत प्रणालीने मनुष्यबळ मिळेपर्यंत मुदत संपल्याच्या दिनांकापासून ५ दिवसाचा खंड करुन एकत्रित करार पध्दतीने मानधन रु.१२०००/- मात्र नुसार पुढील ६ महिने करीता मुदतवाढ देणेबाबत मान्यता देण्यांत येत आहे.सदर प्रस्ताव व कार्यवाही बाबत लेखा आक्षेप निर्माण होणार नाही याची दक्षता घ्यावी. याबाबतची जबाबदारी संबंधित विभागाची राहील.

सुचक :- सौ. पुष्पाताई प्रकाश बोरसे
अनुमोदक:-सौ. भारती अशोक माळी

**सर्वानुमते मंजुर,**
**सही/-x x x**
**सभापती,**
**स्थायी समिती,**
**धुळे महानगरपालिका धुळे**

| | |
|---|---|
| विषय क्रमांक:-१५७ | धुळे महानगरपालिकेतील मानधनावरील वाहन चालक यांना पुढील ०६ महिने मुदतवाढ देणेबाबत आलेल्या कार्यालयीन अहवालावर विचार करणे. |
| म. नगरसचिव | नगरसचिव यांनी विषयांचे वाचन केले. |
| म. पुष्पाताई प्रकाश बोरसे | विषय मंजूर करण्यांत यावा. |
| म. भारती माळी | विषय मंजूर करण्यांत यावा. |
| म. सभापती | सर्व स्न्मा.सदस्यांच्या सहमतीने व कार्यालयीन अहवालास अधिन राहून मानधनावरील वाहन चालक यांना फेर नियुक्ती देणेस मान्यता देण्यांत येत आहे. |

## धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर १७२ दिनांक ०९/१२/२०२१

धुळे महानगरपालिकेमार्फत यापूर्वी एकुण १५ वाहन चालक यांना एकत्रित करार पध्दतीने नियुक्ती करणेत आलली होती सदर वाहन चालकांपैकी ०१वाहन चालक हजर झालेले नसुन एका वाहन चालकाने राजीनामा दिलेला असून राहिलेले खालील प्रमाणे १३ वाहन चालकाना पहिल्या ६महिन्याची संपल्यानंतर मुदतवाढ देण्यात आली होती. सदर मानधनावरील कर्मचा-यांची मुदतवाढ दिलयानंतर दि ६/११/२०२१ व दि १६/११/२०२१ रोजी संपुष्ठात येत असल्याने त्यांनी मुदतवाढ देणेबाबत अर्ज सादर केलेला आहे. वाहन विभाग प्रमुख यांचे सादर केलेल्या अभिप्रायानुसार वाहन चालकांची आवश्यकता व निकड पाहता वरील प्रमाणे १ ते १३ वाहन चालकांना पुढील ६ महिने कालावधी करीता मुदतवाढ देणेबाबत पत्र सादर केले आहे.

| अ | कर्मचारीचे नाव | पद | नियुक्तीचे आदेश क्र व दिनांक |
|---|---|---|---|
| १ | प्रशांत नामदेव मुर्तडक | वाहन चालक | जा क्र धुमपा/आस्था/३१०९ दि १२/११/२<br>जा क्र धुमपा/आस्था/४००दि २९/०६/२<br>आदेश |
| २ | प्रशांत राजेंद्र बाबर | वाहन चालक | |
| ३ | शाम भट्टू खंदरकर | वाहन चालक | |
| ४ | गोपाल सिताराम माळी | वाहन चालक | |
| ५ | सिध्द र्थ महेशराव खैरनार | वाहन चालक | |
| ६ | आबासाहेब रमेश नेरकर | वाहन चालक | |
| ७ | प्रदिप श्री किसन कांबळे | वाहन चालक | |
| ८ | निलेश रामभाऊ सानवणे | वाहन चालक | जा क्र धुमपा/आस्था/३०१४ दि २/११/२०<br>जा क्र धुमपा/आस्था/४०१ दि २९/०६/<br>आदेश |
| ९ | विजय दिलीप माळी | वाहन चालक | |
| १० | राहुल जिजाबराव पाटील | वाहन चालक | |
| ११ | विनोद प्रल्हाद थोरात | वाहन चालक | |
| १२ | चित्ते ईश्वर राजेश | वाहन चालक | |
| १३ | अविनाश दाजी कुवर | वाहन चालक | |

वाहन विभाग प्रमुख यांचे सादर केलेल्या अभिप्रायानुसार वाहन चालकांची आवश्यकता व निकड पाहता वरील प्रमाणे १ ते १३ वाहन चालकांना पुढील ६ महिने कालावधीकरीता मुदतवाढ देणेबाबत उपरोक्त् कर्मचा-यांना बाहय यंत्रणेमार्फत मनुष्यबळ उपलब्ध होईपावेतो ५ दिवसाचा सेवा खंड देवून एकत्रित करार पध्दतीने रु.१२०००/-मानधनावर पुनश्च:फेर नियुक्ती देणेबाबतचा विषय महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमा तील कलम ५३ (३) अन्वये मे. स्थायी समितीपुढे सादर झालेला आहे.

सर्व सन्मा.सदस्यांच्या सहमतीने व कार्यालयीन अहवालास अधिन राहून अ.नं. १ ते १३ वाहन चालक एकत्रित करार पध्दतीने रु.१२०००/- एकत्रित मानधनावर महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम ५३ (३) अन्वये बाहय स्त्रोत प्रणालीने मनुष्यबळ मिळेपर्यंत मुदत संपल्याच्या दिनांकापासून ५ दिवसाचा खंड करुन पुढील ६ महिने करीता मुदतवाढ देणेबाबत मान्यता देण्यांत येत आहे.सदर प्रस्ताव व कार्यवाही बाबत लेखा आक्षेप निर्माण होणार नाही याची दक्षता घ्यावी. याबाबतची जबाबदारी संबंधित विभागाची राहील.

सुचक :- सौ. पुष्पाताई प्रकाश बोरसे
अनुमोदक:-सौ. भारती अशोक माळी

**सर्वानुमते मंजुर,**
**सही/-x x x**
**सभापती,**
**स्थायी समिती,**
**धुळे महानगरपालिका धुळे**

| | |
|---|---|
| विषय क्रमांक:-१५८ | धुळे महानगरपालिकेतील मानधनावरील स्वच्छता निरीक्षक यांना फेर नियुक्तीने पुढील ०६ महिने मुदतवाढ देणेबाबत आलेल्या कार्यालयीन अहवालावर विचार करणे. |
| म. नगरसचिव | नगरसचिव यांनी विषयांचे वाचन केले. |
| म. किरण राकेश कुलेवार | विषय मंजूर करण्यांत यावा. |
| म. मंगला पाटील | विषय मंजूर करण्यांत यावा. |
| म. सभापती | सर्व स्न्मा.सदस्यांच्या सहमतीने व कार्यालयीन अहवालास अधिन राहून मानधनावरील स्वच्छता निरीक्षक यांना फेर नियुक्ती देणेस मान्यता देण्यांत येत आहे. |

**धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर १७३ दिनांक ०९/१२/२०२१**

धुळे महानगरपालिकेतील आरोग्य विभागातील मानधनावर स्वच्छता निरीक्षक -०२ पदे भरण्याबाबत अहवाल सादर करण्यात आला होता त्यानुसार जाहिरात प्रसिध्द करण्यात आली होती. जा क्र धुमपा आस्था/४५दि.१६/४/२०२१ रोजीच्या आदेशानुसार पात्र उमेदवारांची निवड करण्यात आली होती. त्याअनुसार त्यांना ६ महिने कालावधीकरीता नियुक्ती देण्यात आली होती सदर उमेदवारांची दि १६/१०/२०२१ रोजी मुदत संपुष्ठात आलेली आहे.

आरोग्य विभागाचे कार्यालयीन अहवालानुसार उपरोक्त कर्मचा-यांची कामाची निकड पाहता मुदतवाढ देणेबाबत आरोग्य विभागाने शिफारस पत्र सादर केलेले आहे.

| अ.क्र . | उमेदवाराचे नाव | पदाचे नाव |
|---|---|---|
| १ | श्री गौरव अशोक माळी | स्वच्छता निरीक्षक |
| २ | श्री मनिष अशोक आघाव | स्वच्छता निरीक्षक |

उपरोक्त अहवालानुसार आरोग्य विभागाच्या अहवालानुसार कर्मचा-याची कामाची निकड पाहता मुदत संपुष्ठात आल्याच्या दिनांकापासून ५ दिवसाचा खंड देवून पुढील ०६ महिने कालावधी करीता वरील तक्त्यात दर्शविलेल्या कर्मचा-यांना एकत्रित मानधनावर रु. १२०००/- मात्र नुसार पुनश्च: फेर नियुक्ती देणेबाबतचा विषय महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ५३ (३) अन्वये मे. स्थायी समितीपुढे सादर झालेला आहे.

सर्व सन्मा.सदस्यांच्या सहमतीने व कार्यालयीन अहवालास अधिन राहून धुळे मनपामार्फत उपरोक्त २ स्वच्छता निरीक्षक यांना महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम ५३(३) अन्वये

बाहय स्त्रोत प्रणालीने मनुष्यबळ मिळेपर्यंत मुदत संपल्याच्या दिनांकापासून ५दिवसाचा खंड करुन एकत्रित करार पध्दतीने मानधन रु.१२०००/-मात्र नुसार पुढील ६ महिने करीता मुदतवाढ देणेबाबत मान्यता देण्यांत येत आहे.सदर प्रस्ताव व कार्यवाही बाबत लेखा आक्षेप निर्माण होणार नाही याची दक्षता घ्यावी. याबाबतची जबाबदारी संबंधित विभागाची राहील.

सुचक:- सौ. किरण राकेश कुलेवार

अनुमोदक:- सौ. मंगला सुरेश पाटील

**सर्वानुमते मंजुर,**

**सही/-x x x**

**सभापती,**

**स्थायी समिती,**

**धुळे महानगरपालिका धुळे**

विषय क्रमांक:- १५९ धुळे मनपा विकास शुल्क् अंतर्गत प्रभाग क्रं.7 मध्ये रमापती चौक ते फुले नगरपावेतो रु. ८०,०२,५९९/- मात्र खर्चाच्या रस्ता डांबरीकरण करणेचे कामास आर्थिक व प्रशासकीय मान्यता देणेबाबत विचार करणे.

म. नगरसचिव — नगरसचिव यांनी विषयांचे वाचन केले.

म. सुनिल बैसाणे — विषय मंजूर करण्यांत यावा.

म. कमलेश देवरे — विषय मंजूर करण्यांत यावा.

म.सभापती — सर्व सन्मा. सदस्यांच्या सहमतीने व कार्यालयीन अहवालास अधिन राहून सदर प्रस्तावास आर्थिक व प्रशासकीय मान्यता देण्यांत येत आहे.

**धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर १७४ दिनांक ०९/१२/२०२१**

धुळे मनपा हद्दीतील प्रभाग क्रं. 7 मधील रमापती चौक ते फुलेनगर पावेतो रस्त्यांची स्थिती खूपच खराब असल्याने रस्त्यावर मोठे मोठे खड्डे पडलेले असल्याने दररोज लहान मोठे अपघात होत असतात, त्यामुळे नागरीकांना रहदारीस मोठया प्रमाणावर गैरसौयीस समोरे जावे लागते. त्यामुळे सदरचा रस्ता डांबरीकरण करणे आवश्यक आहे.

सदर ठिकाणी समक्ष पाहणी करुन अंदाजपत्रक तयार केले असता उक्त कामी अंदाजपत्रकीय खर्च रु80,02,599/- मात्र येणार आहे.सदरचा खर्च नगररचना विभागातील विकास शुल्क मध्ये करण्यांत यावा.तरी सदरचा कामीचा अंदाजपत्रकीय खर्च रु. 80,02,599/- मात्रला आर्थिक व प्रशासकीय मंजुरीसाठी मे.स्थायी समिती समोर सादर झाला आहे.

सर्व सन्मा.सदस्यांच्या सहमतीने व कार्यालयीन अहवालास अधिन राहून सदर प्रस्तावास आर्थिक व प्रशासकीय मान्यता देण्यांत येत आहे.

सुचक :- श्री. सुनिल तुळशीराम बैसाणे

अनुमोदक:- श्री. कमलेश नारायण देवरे

**सर्वानुमते मंजुर,**

**सही/-x x x**

**सभापती,**

**स्थायी समिती,**

**धुळे महानगरपालिका धुळे**

विषय क्रमांक :- १६० महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान योजना (जिल्हास्तरीय) अंतर्गत साक्री रोड कुमारनगर येथे अमरधाम विकसीत करणेबाबत निविदा दर मागविण्यांत आलेत,त्याबाबत आलेल्या कार्यालयीन अहवालावर विचार करणे.

म. नगरसचिव — नगरसचिव यांनी विषयांचे वाचन केले.

म. सुनिल बैसाणे — विषय मंजूर करण्यांत यावा.

म. कमलेश देवरे — विषय मंजूर करण्यांत यावा.

म.सभापती — सर्व सन्मा. सदस्यांच्या सहमतीने व कार्यालयीन अहवालास अधिन राहून सदर प्रस्तावास मान्यता देण्यांत येत आहे.

**धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर १७५ दिनांक ०९/१२/२०२१**

नगरोत्थान योजने अंतर्गत साक्री रोड कुमारनगर येथील अमरधाम विकसित करणे या कामाबाबत धुळे महानगरपालिका मे.महासभा ठराव नं.९६ दि.३१/१२/२०१९ मा.जिल्हाधिकारी सो. धुळे महानगरपालिका यांनी टिपणी मंजूरीने दि.२६/०३/२०२१ अन्वये उक्त कामाबाबत रक्कम रु.२८,९९,५०४/- मात्र खर्चाचा आर्थिक व प्रशासकीय मंजुरी देणेत आली आहे.

उक्त कामाबाबत शहर अभियंता मनपा धुळे यांचे पत्र क्र./८८५ दि.१/१/२०२१ अन्वये रक्कम रु. २८,९९,५०४/- मात्र खर्चास तांत्रिक मंजुरी मिळालेली आहे.

उक्त कामाबाबत धुळे महानगरपालिका जा.क्र./पा.पु.वि./११३/२०२१ दि.१२/५/२०२१ अन्वये रोजी नवभारत/आपले नवराज्य या वृत्तपत्रात जाहीर निविदा प्रसिद्ध करणेत येऊन दि.७/६/२०२१ अखेर निविदा दर मागविण्यात आले आहेत. पात्र कंत्राटदार यांनी निविदेबाबत ऑनलाईन पद्धतीने बयाणा रक्कम भरून निविदा दर सादर केलेले आहेत.

| अ.क्र. | कंत्राटदार किंवा ठेकेदाराचे नाव | दिलेले निविदा दर | शेरा |
|---|---|---|---|
| १ | मे.हिंद कन्सट्रक्शन | **शे.२.०० % कमीने** | **सर्वात कमी दर** |
| २ | मे.एकविरा कन्सट्रक्शन | शे.३.०० % जास्तीने | |
| ३ | नकुल सुरेश अहिरराव | शे.२.०० % जास्तीने | |

वरील प्रमाणे निविदेत भाग घेतलेले ठेकेदार पात्र असून **मे.हिंद कन्सट्रक्शन** यांचे दर **शे.२.००%कमीने** आहे व त्यांनी नियमा प्रमाणे ऑनलाईन बयाणा रक्कम भरलेली आहे. सबब कंत्राटदार **मे.हिंद कन्सट्रक्शन** यांची **शे.२.००% कमीने** दराने आलेले निविदा दर मंजुरीस्तव मे. स्थायी समिती समोर सादर झालेला आहे.

सर्व सनमा. सदस्यांच्या सहमतीने व कार्यालयीन अहवालास अधिन राहून सदर कामी **मे. हिंद कन्सट्रक्शन** यांची **शे. २.००% कमीने** दराने आलेले निविदा दरास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ७३ नुसार मान्यता देण्यांत येत आहे.सदर प्रस्ताव व कार्यवाही बाबत लेखा आक्षेप निर्माण होणार नाही याची दक्षता घ्यावी. याबाबतची जबाबदारी संबंधित विभागाची राहील.

सुचक :- श्री. सुनिल तुळशीराम बैसाणे

अनुमोदक:- श्री. कमलेश नारायण देवरे

**सर्वानुमते मंजुर,**

**सही/-x x x**

**सभापती,**

**स्थायी समिती,**

**धुळे महानगरपालिका धुळे**

# धुळे महानगरपालिका,धुळे
## नगरसचिव कार्यालय
## स्थायी समिती सभा क्रमांक २५ चे इतिवृत्त

---

**धुळे मनपा भारतरत्न अटलबिहारी वाजपेयी सभागृह**
**सोमवार दिनांक २०/१२/२०२१**
**वेळ :- दुपारी ४-०० वाजता.**

धुळे महानगरपालिका स्थायी समितीची साप्ताहिक सभा आज सोमवार दिनांक २०/१२/२०२१ रोजी **दुपारी ४-०० वाजता मा. श्री. संजय सुधाकर जाधव,सभापती**,स्थायी समिती, मनपा,धुळे यांच्या अध्यक्षतेखाली **धुळे मनपा भारतरत्न अटलबिहारी वाजपेयी सभागृह** भरली. ऑनलाईन सभेस खालील सन्मा.सदस्य सभागृहात हजर होते.

| अ.क्रं. | सदस्यांचे नांव | हुद्दा |
|---|---|---|
| 1 | श्री. जाधव संजय सुधाकर | सभापती |
| 2 | श्री. बैसाणे सुनिल तुळशिराम | सदस्य |
| 3 | श्रीमती माळी भारती अशोक | सदस्या |
| 4 | श्रीमती पाटील मंगला सुरेश | सदस्या |
| 5 | श्री. मासुळे अमोल पावबा | सदस्य |
| 6 | श्री. देवरे कमलेश नारायण | सदस्य |
| 7 | श्रीमती पठाण हिना अस्लम | सदस्या |
| 8 | श्री. सईद बेग हाशम बेग | सदस्य |
| 9 | श्री. नवले शितल मोहन | सदस्य |
| 10 | श्री. जाधव बन्सीलाल माणिक | सदस्य |
| 11 | श्रीमती चौधरी मंगला अर्जुन | सदस्या |
| 12 | श्री. पटेल अमीन अब्दुल करीम | सदस्य |

**उपस्थित अधिकारी गण**

| अ.क्र. | अधिकाऱ्यांचे नाव | हुद्दा |
|---|---|---|
| 1 | श्री. नितीन कापडणीस | अति. आयुक्त |
| 2 | श्रीमती शिल्पा नाईक | उपायुक्त |
| 3 | श्रीमती पल्लवी शिरसाठ | सहा. आयुक्त |
| 4 | श्री. दिनकर जाधव | मुख्य लेखाधिकारी |
| 5 | श्री. मनोज अरविंद वाघ | प्र. नगरसचिव |
| 6 | श्री. के. एन. शिंदे | अभियंता |
| 7 | श्री. पी.डी. चव्हाण | प्र. नगररचनाकार |
| 8 | डॉ. महेश मोरे | आरोग्याधिकारी |
| 9 | श्री. चंद्रकांत जाधव | सहा.आरोग्याधिकारी |
| 10 | श्री. लक्ष्मण पाटील | सहा.आरोग्याधिकारी |
| 11 | श्री.बी.एस. रनाळकर | सहा. कर मूल्य निर्धारण अधिकारी |
| 12 | श्री. चंद्रकांत मोरे | लेखापाल |
| 13 | श्री. रमजान अन्सारी | कार्यालय अधिक्षक |
| 14 | श्री. एन.के. बागुल | विद्युत अभियंता |
| 15 | श्री. सी.सी. बागुल | पा. पु. ओव्हरसिअर |
| 16 | श्री. प्रकाश सोनवणे | ओव्हरसिअर न.र. वि. |
| 17 | श्री. हेमंत पावटे | ओव्हरसिअर बां.वि. |
| 18 | श्री. राजेश गायकवाड | प्रशासन अधिकारी मनपा शिक्षण मंडळ |
| 19 | श्री. राजू माईनकर | भांडारपाल |

| | | |
|---|---|---|
| 20 | श्री. किशोर सुडके | बाजार विभाग |
| 21 | श्री. राजकुमार सुर्यवंशी | प्र.अधिक्षक परवाना विभाग |
| 22 | श्री. सुक्राम राऊत | वाहन विभाग |

म.सभापती — सर्व उपस्थित सन्मा.सदस्य अति.आयुक्त सो.अधिकारी वर्ग छायाचित्रकार बांधव सभेचे कामकाज चालविणेसाठी आवश्यक तो कोरम पूर्ण झाल्याने नगरसचिव यांनी सभेचे कामकाज सुरुवात करावी.

म. नगरसचिव — वंदे मातरम् या राष्ट्रवंदनेसाठी सर्वांनी उभे रहावे.

विषय क्रमांक:-१६१ — मागील स्थायी समिती सभेचे इतिवृत्त वाचून कायम करणे. (दि.२६/१०/२०२१)

म. नगरसचिव — नगरसचिव यांनी विषयांचे वाचन केले.

म. शितल नवले — इतिवृत्त वाचून कायम करण्यांत यावे.

म. सभापती — सर्व सन्मा.सदस्यांच्या सहमतीने मागील स्थायी समिती सभेचे इतिवृत्त क्रमश: वाचून कायम करण्यांस तसेच सभेत सन्मा. सदस्यांनी उपस्थित केली चर्चा व त्यावरील निर्णय क्रमश: वाचून कायम करण्यांत येत आहे.

**धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर १७६ दिनांक २०/१२/२०२१**

मागील स्थायी समिती सभा दिनांक २६/१०/२०२१ रोजीच्या सभेतील ठराव नंबर १५४ ते १५९ अखेर क्रमश: वाचून कायम करण्यांस तसेच सभेत सन्मा.सदस्यांनी उपस्थित केली चर्चा व त्यावरील निर्णय क्रमश: वाचून कायम करण्यांत येत आहे.

**सही/-x x x**
**सभापती,**
**स्थायी समिती,**
**धुळे महानगरपालिका धुळे**

विषय क्रमांक:- १६२ — मा. सभापती, स्थायी समिती मनपा, धुळे यांचे पत्र क्रं.धुमपा/ स्था.स.८२ दि ७/१२/२०२१ च्या पत्रानुसार धुळे मनपाच्या मालमत्ता कर व लेखा विभागाचे विशेष लेखा परीक्षण करणेसाठी चर्चा विनिमय करुन निर्णय घेणे.

म. नगरसचिव — नगरसचिव यांनी विषयांचे वाचन केले.

म. सभापती — धुळे मनपाच्या मालमत्ता व कर विभाग व लेखा विभाग या दोन्ही विभांगांमध्ये जवळपास मागील दहा वर्षा मधे कुठलेही लेखा परिक्षण झाले नाही. मालमत्ता कर विभागाचे आपण ज्या वास्तू बसलेले आहोत याच ठिकाणी आख्खा मालमत्ता कर विभाग या ठिकाणी जाळण्यात आला होता. मालमत्ता कर विभागात गेल्या १० वर्षांत अनागोंदी कारभार झाल्याचा संशय आहे बऱ्याचशा मनपाच्या रक्कम मनपात न भरता परस्पर त्याची विल्हेवाट लावण्यात आली आहे. रजिस्टर मधे काही बदल करण्यात आलेले आहेत. असे बरेचशे वेगवेगळे संशय या ठिकाणी आहे. त्यामुळे मी मालमत्ता कराचे मागील १० वर्षांचे परिपूर्ण लेखा परिक्षण व विशेष लेखा परिक्षण व्हावे त्यासाठी हा विषय या ठिकाणी आणला आहे. तसेच दुसरा लेखा विभागाचा विषय धुळे मनपाचा अकौंट विभागा मधे सुध्दा १० वर्षा मधे जे काही प्रकार दिसले. त्यामधे व्यवस्थित नोंदी न ठेवणे बऱ्याच गोष्टी मागे एफ. डी. वगरे मोडण्याच्या चर्चा झाल्या असे विषय लेखा परिक्षणाच्या माध्यमातून उघड करण्यात येणार आहे. त्याच बरोबर व्दिनोंद लेखा पदधत ती देखील लेखा विभागातून मागणी असून सुध्दा कार्यान्वीत न करणे ही सुध्दा एक संशयास्पद वातावरण निर्माण करते. यासाठीच मी हा विषय आणला गेल्या १० वर्षातील या विभागाचे लेखा परिक्षण व्हावे माझे एक मत आहे. आपल्याला काही सूचना मांडायच्या असतील तर मांडू शकता.

म. सुनिल बैसाणे — मा.सभापती महोदय, या ठिकाणी जो विषय क्रं. १६२ धुळे मनपाचा मालमत्ता कर विभागाचे लेखा परिक्षण आणलेला विषय हा खऱ्या अर्थाने मनपाच्या ज्या उत्पन्नाच्या बाजू असतील खर्चाच्या बाजू असतील या दोन्ही बाजू या ठिकाणी येत असतात मागे हा विषय लेखा परिक्षणाच्या बाबतीत केला होता. या ठिकाणी कुठल्याही पध्दतीने खात्या अंतर्गत असतील किंवा प्रशासनाच्या माध्यमातून असतील मागणीकडे दूर्लक्ष करण्यात आले या विषयावर चर्चा करणे गरजेचे आहे. त्याचे कारण असे लेखा विभागाचे लेखा परिक्षण दरवर्षी झालेच पाहिजे. अनेक लेखा परिक्षणामधे त्रुटया काढल्या जातात. त्या त्रुटयांची अंमलबजावणी किंवा पूर्तता न होता पुढील दुसऱ्या वर्षाचे पुन्हा लेखा परिक्षण करण्यासाठी येतात मागे ज्या आपल्या लेखा परिक्षणाने आपल्या त्रुटया काढल्या होत्या ज्या बाजू आपल्या निर्दशनास आणून दिल्या होत्या. हया गोष्टी करणे क्रमप्राप्त आहे. दुसरी म्हणजे आपण सांगीतले की अकौंट सेक्शन या विभागामधे मागे नियुक्तीत सदस्यांनी देखील प्रश्न उपस्थित केले की दरवर्षीचे जे स्थायी व महासभेचे बजेट असेल त्या बजेट मधे काही बाजू नमूद केलेल्या असतात त्या बाजू नमूद केल्या नंतरच आकौंट डिपार्टमेंट ने अंमलबजावणी क्रमप्राप्त आहे. परंतु त्या बाजू न बघता स्थयीचे किंवा महासभेचे बजेटच्या बाजूच्या तरतुदी न बघता आकौंट विभाग त्यांच्या पध्दतीने त्यांच्या खात्याची अंमलबजावणी करतात. हा गंभीर स्वरुपाचा गुन्हा आहे. आपण जो विषय घेऊन आलो आहे. त्या विषयाला बगल देण्यासाठी प्रशासनाच्या माध्यमातून केले जातात. महोदय लेखा व मालमत्ता कराच्या बाबतीमधे त्याच खात्यातील एका

लिपीकाने धुळे मनपा व मुख्य लेखा समीती यांच्याकडे त्या तारगे नावाच्या व्यक्तीची मी तक्रार केली आणि त्याची चौकशी चालू आहे. त्याच्या तक्रारीची गंभीर दखल घेतली असती आपण सांगीतल्या प्रमाणे ही वास्तू १ नंबर शाळा होती त्या ठिकाणी लेखा विभाग या ठिकाणी जाळले गेले. हया वास्तूची पुजा झाली नाही. लेखा परिक्षण झालेच पाहिजे तुमच्या मताशी मी सहमत आहे. तारगेची जी तक्रार आहे त्याचा निपटारा होऊन जे जे दोषी आढळत असतील त्यांच्यावर गुन्हा नोंदवणे क्रमप्राप्त असेल असे जर झाले तर येणाऱ्या काळात आपल्याला प्रशासनातील अधिकाऱ्यांची कार्यपध्दती सधुारण्यासाठी मदत होईल. या ठिकाणी वाढीव घरपट्टी वसूली बाबत आपण शास्ती माफी च्या माध्यमातून असेल,लोकअदालतीच्या माध्यमातून या ठिकाणी मनपाचे उत्पन्नाच्या बाजू म्हणून या ठिकाणी करत असतो.या सर्व बाजू करत असतांना आपल्याला किती उत्पन्न मिळाले ? किती शास्ती माफी झाली ? त्या बाबतच्या स्थायी समीती समोर कुठलाही लेखा जोखा ठेवला जात नाही. स्थायीच्या निर्दशनास आणून एखादयावेळेस दर मंजूरी साठी आपण विषय आणतो.ज्यांना आपण वाढीव घरपट्टी लावतो त्या देखील मंजूरीसाठी घेतल्या पाहिजे अनेक बाजू आहे. या बाजू आपण बघीतल्या तर आपल्याला या ठिकाणी मनपाच्या कार्यपध्दतीचा विचार करावा लागेल आणि आपण मागणी केल्या नुसार या विभागाचे लेखा परिक्षण झालेच पाहिजे. लवकरात लवकर झाले पाहिजे. अशी विनंती करतो. व तारगेच्या फाईल मध्ये का दिरंगाई का होत आहे ? यात लक्ष घालावे अशी विनंती करतो.

म. सभापती — सर्व सदस्यांच्या सहमतीने धुळे मनपाच्या मालमत्ता कर व लेखा विभागाचे विशेष लेखा परीक्षण करणे अत्यंत आवश्यक असल्याने याकामी सक्षम प्राधिकरणाकडेस लेखा परीक्षण करणेसाठी प्रस्ताव पाठविण्यांस मान्यता देण्यांत येत आहे.

**धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर १७७ दिनांक २०/१२/२०२१**

मा. सभापती ,स्थायी समिती मनपा, धुळे यांचे पत्र क्रं.धुमपा/ स्था.स.82 दि 7/12/2021 च्या पत्रानुसार धुळे महानगरपालिकेतील मालमत्ता कर विभागामार्फत शहरातील नागरीकांकडून कर वसुली करण्यात येते. परंतु या विभागाचे सुरुवाती पासुन लेखा परिक्षण झालेले नाही. महानगरपालिकेच्या स्थायी समिती सभा, महासभा तसेच विविध बैठकांमध्ये मालमत्ता कर विभागातील कामांबावत चर्चा होऊन सदस्य कर्मचाऱ्यांकडुन होणाऱ्या चुकिच्या कामांबाबत नाराजी व्यक्त करीत असतात. त्यात प्रामुख्याने बरीच वर्षे कर्मचा-यांकडून वसूल केलेल्या रकमा भरणा न करता स्वत: वापरुन घेणे, तसेच चूकीच्या नोंदी करणे डिमांड रजिस्टर व बिल पुस्तके बाळगणे यास्तव मागील १० वर्षांचे विशेष लेखा परिक्षण होणे आवश्यक असल्याने याबाबत यापुवीच पत्र दिलेले आहे.तसेच लेखा विभागात देखील प्रचंड चुकीच्या पध्दतीने कामे होत असुन अद्यापपावेतो लेखा परिक्षण करण्यात आलेले नाही. या विभागा बाबत देखील मोठया प्रमाणावर वित्तीय अनियमीतता असल्याचे निदर्शनास आलेले आहे.

याबाबत सर्व सदस्यांच्या सहमतीने धुळे मनपाच्या मालमत्ता कर व लेखा विभागाचे विशेष लेखा परीक्षण करणे अत्यंत आवश्यक असल्याने याकामी सक्षम प्राधिकरणाकडेस लेखा परीक्षण करणेसाठी प्रस्ताव पाठविण्यांस मान्यता देण्यांत येत आहे. प्रशासनाने याबाबत तांतडीने ठरावानुसार कार्यवाही करावी.

सुचक :- श्री.संजय सुधाकर जाधव, सभापती स्थायी समिती
अनुमोदक :- श्री. सुनिल तुळशीराम बैसाणे,

**सर्वानुमते मंजुर,**
**सही/-x x x**
**सभापती,**
**स्थायी समिती,**
**धुळे महानगरपालिका धुळे**

विषय क्रमांक:- १६३ — मा.सभापती, स्थायी समिती मनपा, धुळे यांचे पत्र क्रं.धुमपा/ स्था.स.८९ दि १५/१२/२०२१ च्या पत्रानुसार मनपा हद्दीत नव्याने समाविष्ट झालेल्या गांवातील ग्रामपंचायत/ मनपा मालकीच्या गावठाण व इतर जागांबाबत चर्चा विनिमय करुन निर्णय घेणे.

म. नगरसचिव — नगरसचिव यांनी विषयांचे वाचन केले.

म. सभापती — या विषयावर सुध्दा मी थोडक्यात प्रकाश टाकतो. वर्ष २०१८ मध्ये धुळे मनपामधे निवडनुका होण्याआधी हददवाढ मधे बऱ्याचशा गावांचा समावेश करण्यात आला होता. ज्या वेळेला ही हद्दवाढ घोषीत केली गेली त्यावेळी हया हद्दवाढीतील गावांतील बऱ्याचशा भूमाफियांनी त्यात कदाचित धुळयातले ही असू शकतात. मला कोणाचे नाव माहिती नाही. परंतु साधारण हजार ते दोन हजार कोटीची प्रॉपर्टी होती त्या वेळच्या ग्रामपंचायतीच्या मालकीची होती जी आज धुळे मनपाच्या मालकीची असायला पाहिजे होती यातले बरेचशे प्लॉट गावठाण म्हणून त्यावेळेला विल्हेवाट लावली गेली. आणि या मधे कदाचित माजी सरपंच असतील,ग्रामपंचायत सदस्य असतील

ग्रामसेवक यांचा रोल सर्वात मोठा होता. ग्रामसेवकांबरोबरच त्या ठिकाणी कार्यरत असलेले क्लर्क. सर्वात मोठे उदाहरण सांगायचे झाले तर वलवाडी ग्रामपंचायत ही धुळे मनपा हददीत आलेल्या सर्वात मोठी ग्रामपंचायत आहे. या ग्रामपंचायतीचे एक रजिस्टर असे आहे हे संपूर्ण रजिस्टर व्हाईटनर लावून खाडाखोड करण्यात आली आहे. संपूर्ण रजिस्टरवर मालमत्तेच्या रजिस्टर दुसरे नावे उतरवले गेले . मला वाटते चौकशी होताना या सारखे दुसरे प्रकरण नसावे. त्याच बरोबर ग्रामपंचायतीचे जुने रजिस्टर होते ते पालीकेला उपलब्ध करुन देण्यात आले नाही. म्हणजे ज्या मालमत्ता आहे. त्या काही लोकांच्या नावावर दिसून येत आहे. या ठिकाणी आपल्या सभागृहात बरेचशे सदस्य अभ्यासू आहे. हया विषयाला शेवटपर्यंत चालना मिळावी या ठिकाणी एक समीती निर्माण करुन आपण वर्षभरात या संपूर्ण प्रकरणाची शहा निशा करुन पालिकेच्या जागा मिळविण्यासाठी या ठिकाणी प्रयत्न करावे. या संदर्भात कोणाला बोलायचे असेल तर मांडावे.

म. शितल नवले — सन्मानिय सभापती ,आयुक्त महोदय हा विषय, विषय पटलावर आणला आहे यापूर्वीच यायला हवा होता. २०१८ मध्ये ही सर्व गावे आपल्या मध्ये समाविष्ट झाली. आणि धक्केदायक बऱ्याचशा गोष्टी नकाणे सारख्या छोटया गावात १३०० ते १३५० अतिक्रमीत आहे. हे ७० टक्के गाव अतिक्रमीत आहे. ८/१२ च्या उताऱ्यावर त्यांची नावे नाही. सभापती महोदय ही समीती आपण गठीत करा. पूर्ण निकाल लागेपर्यंत हे सदस्य राहू दया त्यामधे. जवळ जवळ पाच वर्ष होत आहे.आजूनपर्यंत नवीन डी.पी. तयार नाही केला. शहराच्या मर्यादा संपल्याआहेत. हया समाविष्ट क्षेत्रामधे डेव्हलपमेंट चालू झाल्या आज जर आपण त्या डी.पी जर नाही केला तर शहर कसेही वाकडे तिकडे वाढून जाणार आहे. परत मग आपण हया सिस्टीम करतोय नवीन पाणीपुरवठा,नवीन सगळया गोष्टी करतोय जर शहर एका साईडला वाढून गेले तर आपण ते कॅलक्युलेट नाही करु शकत. मग एक ठराविक एरिया ला पाणी पुरवठा योजना कराव्या लागतात. ज्या मुलभुत सुविधा कमी पडायला लागतात. पाचवी गल्ली, सहाव्वी गल्ली हया प्लॅन नुसार दिसतात. बाकी धुळे कसेही वाढत गेले. याचे कारण डी.पी.च नव्हता २०११ मधे डी.पी. तयार झाला नविन आणि जुना एकत्रीत डी.पी.आपण तयार करु चांगल्या प्रकारे डी.पी. तयार होईल. जसे आपले चितोड गाव आहे. त्याचे जे रस्ते जातात ते शहरातूनच जातात. आज अशी पोजिशन आहे की रस्ते थांबतात अगदी रस्तयासमोरच प्लॉट येऊन जातात. तर आपण आपल्या टॉऊन प्लॅनिंग विभागाला आज आपण नमुद करा की लवकरात लवकर हा डी.पी. ६ महिन्यांत तयार झाला पाहिजे.

म. सुनिल बैसाणे — सभापती आपण जे विषय चर्चेसाठी घेतले आहे जे खऱ्या अर्थाने मनपाच्या हिताचे आहे. शितलभाऊनी या ठिकाणी आपले मत व्यक्त करतांना सांगितले डी.पी. तयार झाला पाहिजे. होता तो झाला नाही. आपण या ठिकाणी या गावठाण जागांबाबतीत आणि धुळे मनपाच्या मालकीच्या बाबतीमधे जे आपल्याला ताब्यात घेऊन त्या उताऱ्यावर आपले नाव लावले गेले पाहिजे. त्या बाबतीत गेल्या वर्ष भरापासून नगररचना विभाग किंवा संबंधित विभागाचा एक अधिकारी नेमणुक केल्या नंतर का होत नाही. या गोष्टीचे उत्तर मला मिळत नाही. खऱ्या अर्थाने धुळे मनपाच्या मालमत्ता याच्या बाजू आपल्याला माहिती नसतील. उदया ऊठुन आपल्याला एखादा प्रकल्प उभारायचा असेल किंवा त्यासाठी राष्ट्रीयकृत बँकाचया माध्यमातून कर्ज उपलब्ध करुन घ्यायचे असेल तरआपल्याला त्या बँकांना त्या कर्जाच्या फेडी कशा करायच्या स्थावर मालमत्ता काय आहे आपलया कडे आपलया उत्पन्नाच्या बाजू किंवा आपली मालमत्ता जे दर ठरलेले असतात. ते आपण निर्धारित करु शकत नाही. न होण्याचे कारण म्हणजे अधिकाऱ्यांचे दूर्लक्ष सभापती महोदय २०१८ पासून ११ खेडे आपल्या धुळे मनपात समाविष्ट झाली आहे. हे नगररचना विभागातील अधिकाऱ्यांना विचारा की, हे सर्व खेडे आपल्याकडे आले आहे.त्या सर्व खेडयांमधे गावठाण जागा आहेत त्या कीती आतापर्यंत तुम्ही जमा केल्या किंवा तुमच्याकडे त्याबाबतची किती माहिती आहे. याची माहिती सुध्दा आपल्याकडे उपलब्ध नाही. जर आपल्याकडे आपल्या किती जागा आहे याची माहिती नसेल त्याठिकाणी काय अतिक्रमण विभाग असेल, बांधकाम विभाग असेल या ठिकाणी काय कारवाही करणार. जे ११ खेडे आहेत त्यावेळचे ग्रामसेवक,तलाठी, सरपंच यांची एक संयुक्त बैठक लावणे गरजेचे आहे. आजपर्यंत त्या खेडयांची दफतरे उपलब्ध नाही. त्या ग्रामपंचायती वर फक्त नावाला ताबा आहे. आज देखील दफतरी खोटया नोंदी चालू आहे. सभापती महोदय वलवाडीचा या ठिकाणी विषय केला. वलवाडी हे गांव महाराष्ट्रामधे ,ग्रामपंचायती मधे सर्वात उत्पन्नाची बाजू असणारी ग्रामपंचायत. त्यामधे त्यांची स्वत:ची स्वतंत्र यंत्रणा,पाण्याची , रस्त्याची,लाईटची होती.ते शासनाच्या कुठल्याही निधीवर अवलंबून नव्हते. अशी ग्रामपंचायत धुळे मनपात समाविष्ट झाली. ३०० ते ३५० कॉलनी ऐरीया चा समावेश धुळे मनपात झाला आहे. परंतु आजपर्यंत दफतरी नोंदी आपल्याला पहायला मिळत नाही. तिथले लोकं निवेदनाच्या मध्यमातून महापौर किंवा आयुक्त साहेबांना ८/१२ उतारे त्या उताऱ्यावर बांधकाम झाले. ८/१२ चे उतारे त्यावेळच्या ग्रामपंचायतच्या होत्या की नव्हतया हे माहित नाही. आज जर ८/१२ च्या उताऱ्यावर त्या लोकांच्या बांधकामांना मंजूरी दिली. फक्त उत्पन्न विकास शुल्काच्या माध्यमातून भेटणार आहे. म्हणून जर आपण घेत असणार तर आपण देखील भ्रष्टाचाराला पाठबळ देत आहोत असा माझा आरोप आहे. कारण हया सर्व जागा त्यावेळच्या

ग्रामपंचायतच्या मालकीच्या होत्या आता धुळे मनपाच्या आहेत. हया खेडयांचे जगांच्या बाबतीत लेखा परिक्षण केले अनेक तर अनेक बाजू या ठिकाणी येतील अनेक जागेवर भूखंड माफीयांनी आज रोजी. या आधी देखील चर्चा झाली.अनेक जागेवरती अवधान सारखे गाव ग्रामपंचायतीचे ५/६ एकर गावठाण आहे. आपल्याला एक दोनच जागा माहीती आहे. परंतु अशा अनेक जागा बेकायदेशिर कामांना आपण मंजुरी देतोय. म्हणून समीतीचा निपटारा होईपर्यंत सदस्य त्या ठिकाणी राहिले पाहिजे. या समीतीत आयुक्त सो. असणे गरजेचे आहे. आयुक्त, अति.आयुक्त,नगररचनाकार हयातून सदस्य घ्यायचे आहे.मनपाच्या जागा आपल्याला पुन्हा प्राप्त करायच्या आहे. हा मुख्य हेतू आहे. मनपाकडे आज रोजी पर्यंत दफ्तर जमा झाले नसतील तर लेखा विभागाने ते जप्त करुन त्या मधे असलेला त्रुटया तपासुन सर्व अतिक्रमीतांना नोटीसा देऊन, कारवाही करण्यासाठी आदेशित करावे. सर्व जागेचा डी.पी.आर. तयार करणे गरजेचे आहे.त्या तयार केल्यावर त्याच्यावर अंमलबजावणी केली पाहिजे. रजिस्टर मेंटेन करणारा व्यक्ती आहे.त्या ग्रामपंचायती मध्ये काम करणारे सर्वात जास्त चांगली माहिती देऊ शकतात. वलवाडी मधे आज देखील घरपटटी मनमानी पध्दतीने आकारणी चालू आहे.ही फार गंभीर गोष्ट आहे. मी पुरावे पण देईल म्हणून एक समीती गठीत करुन आणि आयुक्त साहेबांनी बैठक बोलवावी अशी विनंती करतो. हे विषय मनपाच्या हिताचे आहे. हित ज्यात असतात लोकप्रतिनिधीचे कर्तव्य आहे. ते कर्तव्य चांगल्यारितीने बजवावे अशी विनंती करतो.

म. सभापती — सर्व सन्मा. सदस्यांच्या सहमतीने मनपा हद्दीत नव्याने समाविष्ट झालेल्या गांवातील ग्राम पंचायत/ मनपा मालकीच्या गावठाण व इतर जागांबाबत तपासणी करुन चौकशी करणेकामी सर्व समावेशक समिती गठीत करण्यांस मान्यता देण्यांत येत आहे.सदर चौकशी पूर्ण होई पावेतो सदर समिती अस्तीत्वात राहील. तसेच सदर समितीच्या पहिल्या बैठकीत साप्ताहिक बैठकीचा वार व वेळ निश्चित करण्यांत यावा.

**धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर १७८दिनांक २०/१२/२०२१**

मा.सभापती , स्थायी समिती मनपा , धुळे यांचे पत्र क्रं.धुमपा/ स्था.स.89 दि 15/12/2021 च्या पत्रानुसार सन २०१८ मध्ये धुळे तालुका हद्दीतील सुमारे ११ गावांचा समावेश महानगरपालिका हद्दीत हरण्यात आलेला आहे. सदरची गावे ही शहरालगत असल्याने या ठिकाणी असलेल्या गावठाण व इतर त्यावेळच्या ग्रामपंचायत मालकीच्या व हल्ली धुळे मनपा मालकीच्या शेकडो /हजारो कोटी मुल्य असलेल्या जागा काही भुमाफीयांनी तत्कालीन ग्रामपंचायत कर्मचाऱ्यांना बेकायदेशीर जागा विकुन टाकलेल्या असुन नंतर अनेक प्लॉट दाखवून नागरिकांना खरेदी करुन दिलेले आहेत. सदरची बाब अतिशय गंभीर आहे.

तरी याबाबत तातडीने चौकशी होवून कार्यवाही होणेसाठी तसेच याकामी चौकशी समितीची स्थापना करणेबाबत प्रस्ताव स्थायी समिती समोर सादर झालेला आहे.

सर्व सन्मा.सदस्यांच्या सहमतीने मनपा हद्दीत नव्याने समाविष्ट झालेल्या गांवातील ग्रामपंचायत/मनपा मालकीच्या गावठाण व इतर जागांबाबत तपासणी करुन चौकशी करणे कामी सर्व समावेशक समिती गठीत करण्यांस मान्यता देण्यांत येत आहे.

या समिती चे अध्यक्ष म्हणून श्री. संजय सुधाकर जाधव, सभापती स्थायी समिती यांना तसेच सचिव म्हणून आयुक्त यांची नियुक्ती करण्यांत येत असून समिती सदस्य म्हणून श्री. सुनिल तुळशीराम बैसाणे, श्री. अमोल पावबा मासुळे, श्री.शितल मोहन नवले, श्री. कमलेश नारायणराव देवरे, श्री. खान मोहम्मद साबीर मुहिबुल्लाह तसेच सभागृह नेते श्री.राजेश पवार व सौ. निशा प्रमोद पाटील यांची नियुक्ती करण्यांस मान्यता देण्यांत येत आहे. सदर चौकशी पूर्ण होई पावेतो सदर समिती अस्तीत्वात राहील.

तसेच सदर समितीच्या पहिल्या बैठकीत साप्ताहिक बैठकीचा वार व वेळ निश्चित करण्यांत यावा.

सुचक :- श्री. संजय सुधाकर जाधव, सभापती स्थायी समिती

अनुमोदक :- श्री. अमोल पावबा मासुळे

**सर्वानुमते मंजुर,**

**सही/-x x x**

**सभापती,**

**स्थायी समिती,**

**धुळे महानगरपालिका धुळे**

विषय क्रमांक:- १६४ — धुळे महानगरपालिका सामान्य प्रशासन विभागा कडील एक्सेंट हन क्र.एम.एच.१८ बी. सी. ३३६४ म.उपायुक्त सो.यांचे सेवेतील वाहनांची दुरुस्ती रक्कम ₹.१,२८,१६७/- मात्रच्या खर्चास प्रशासकीय व आर्थिक तसेच मे.स्थायी समिती कडेस मान्यता मिळणेबाबत आलेल्या

म.नगरसचिव — नगरसचिव यांनी विषयांचे वाचन केले.

मा. सभापती — हा विषय कोणी ठेवला आहे ? कुठल्या विभागाचा आहे ?

म.नगरसचिव — वाहन विभागाकडील विषय असून सदर प्रस्ताव वाहन विभागाचे प्रमुख श्री. राऊत यांनी आणलेला आहे.

| | |
|---|---|
| मा. सभापती | राऊत फक्त एकच प्रश्न विचारतो. कोणत्या वर्षाची गाडी आहे ही. |
| म.राऊत | २०१९ ची |
| मा..सभापती | काय काय काम केले तुम्ही त्याच्यात ? २०१९ च्या गाडीला इतका मोठा मेंटेनन्स नेमके काम काय केले सांगा? |
| म.राऊत | इंजीनचे काम होते सर त्याचे. |
| मा. सभापती | कोणाकडची गाडी ही. |
| म.राऊत | गिरी साहेबांकडची |
| मा. सभापती | गिरी साहेब फिरत पण नाही. दालनातच असतात. १२८१६७/- खर्च , माझी स्वत:ची गाडी जिच्यावर पाच वर्षात सुध्दा एवढा खर्च झाला नाही. याच्या निम्मा सुध्दा खर्च झाला नाही. मेनटेंनन्सला. नविन गाडी घेतो आपण एवढा खर्च शक्य नाही. बंटीभाउंचे बोलणे होऊन जाऊदया मग सांगतो. |
| म. अमोल मासुळे | या ठिकाणी दोन वर्षानंतर १२८१६७/- एवढा खर्च तुमच्या आमच्या कडे ,सर्वांकडे गाडया आहेत. त्यांनी टिपणी मधे दिले इंजिन ऑईलचे प्रमाण कमी झाल्यामुळे आणि इंधन गुणवत्ता खराब असल्यामुळे सभापती साहेब या गोर्ष्टीना आळा बसला पाहिजे. आपल्या धुळे कर नागरीकांचा पैसा आपण महापालिकेचे उत्पन्न कसे वाढेल याचे निर्णय घेतो असे विषय येतील आणि असे लाखो रुपये एका बिलात अदा करावे लागत असतील हे खरच खूपच खेदपूर्वक आहे. पुढचा विषय पण त्याच पदधतीचा. ती गाडी २००४-२००५ ची ती गाडी विकायला काढली तर ४००००/-ला पण कोणी घेणार नाही. आणि ते सांगतायेत ७९४८८/- रु खर्च करायचा ४००००/- रुपयाच्या गाडीला ७९४८८/- रु खर्च करायचा राऊत हे कर्तव्यदक्ष अधिकारी आहे. त्याचे काम चांगले आहे. पण हया ठिकाणी चुकले आहे. |
| मा. सभापती | राऊत काम झाले आहे की? काम व्हायचे बाकी? |
| म.राऊत | बाकी आहे. |
| मा. सभापती | बाकीच राहुदया |
| म.राऊत | १० वर्ष झाल्या नंतर रिव्हॅल्यूशन करायचे असते. रिव्हॅल्युशन करायचे असेल तर कॅम्प क्लिअर करायचे असेल तर इतका खर्च येणार |
| म. अमोल मासुळे | सभापती महोदय, कापडणीस साहेब या गाडया आहेत महापालिकेच्या त्या अनेक वर्षापासून धुळ खात पडलेल्या आहे. त्या तेव्हा विकल्या असत्या तर १० ते १५ हजार रु भेटले असते पण आजच्या परिस्थितीला २ ते ४ हजार पण भेटणार नाही. त्या वस्तू धुळ खात पडतील तर नुकसान महापालिकेचे होत आहे. |
| मा. सभापती | या ठिकाणी जो गिरी साहेबांचा वाहनाचा विषय आहे. राऊत त्यांना चांगली गाडी उपलब्ध करुन दया. हा विषय तहकूब ठेवून चौकशी करु. |
| म. राऊत | गाडी कामाला आहे आणि त्याचे ईंजिनचे काम आहे. |
| मा. सभापती | तुम्ही नव्या गाडीचा हा खर्च काढला हा परवडणारा नाही . |
| म. शितल नवले | सभापती महोदय आपल्या १८ गाडया टाटा मोटर्सला पडल्या आहेत. ज्या घंटागाडया त्यांना फक्त ६ गाडयांची वर्कऑर्डर बाकीच्या गाडयांसाठी १४ लाख रुपये क्वोटेशन पाठविले आहे परिस्थिती खराब आहे वार्डामधे १ते २ गाडया चालतायेत फक्त तर जितक्या तळमळीने हे विषय आणतात तितकीच तळमळीने जे रोजचे लागतात घंटागाडया त्यासाठी तळमळ दाखवा.किती दिवस झाले १४ गाडयांचे क्वोटेशन तुमच्याकडे आले आहे. कोणी काही काम करायला तयार नाही. एखादया अधिकाऱ्याची गाडी म्हणून तुम्ही मागे पळणार त्या गाडीच्या आणि जी घंटागाडी रोज लागणार आहे या शहरासाठी त्यांच्यासाठी काही नाही करणार का? ६ गाडया त्यांच्याकडे ७/८ महिन्यांपासून पडून आहे. रोज आम्ही लोकं नागरिकांच्या शिव्या खातो आहे. मी अपेक्षा व्यक्त करतो.उदया त्या माणसाला वर्क ऑर्डर दयावी. आणि किमान आठवडा भरात त्या सगळया गाडयांचे काम पूर्ण होऊन आमच्याकडे वार्डात येतील. |
| म. चंद्रकांत जाधव | आपण याच्यामध्ये कार्यादेश दिला आहे चेकअपसाठी इस्टीमेट प्रमाणे ६ गाडयांचे इस्टीमेट दिले होते.इस्टीमेट प्रमाणे गाडयांचे स्पेअर्सपार्ट मागवण्याचे गेले आहे. आता १५ गाडया लावल्या ६ गाडयां व्यतीरिक्त |
| म. शितल नवले | तुमचे इस्टीमेट जे आहे मेंन्टेनन्सचे ते मला सुध्दा फॉरवर्ड केले होते. |
| म. चंद्रकांत जाधव | तुमचे म्हणने बरोबर आहे. आगोदर फॉरमॅटींग चालू होती ना आगोदर काम करायचे आपण महापालीके मार्फत इस्टीमेट मागवायचो सुरवातीला काय झाले डायरेक्ट गाडया लावायचे त्याच्या बिलाची रक्कम डायरेक्ट वर्ग करायची. |
| म. शितल नवले | आम्हाला गाडया कधी मिळतील. |
| म. चंद्रकांत जाधव | काम चालू आहे. |
| म. शितल नवले | चालू करा लवकर बघा नाहीतर गंभीर परिणाम भोगावे लागतील. |
| मा. सभापती | १६४ नंबरचा जो विषय तो तहकूब ठेवूया. व १६५ रद्द करण्यात येत आहे. |

| | |
|---|---|
| म. नगरसचिव | ती गाडी तापीवर रोज जाते. लोकांना घेऊन आणि सामान वैगरे यासाठी ती आहे. गाडी बंद केली तर त्यांना अडचण येईल असे त्यांचे म्हणने आहे. |
| म. शितल नवले | गिरी साहेबांना वाहनभत्ता देऊन टाका |
| म.अमोल मासुळे | खाली एक गाडी उभी आहे. ती गाडी आपण पाणी पुरवठा साठी देऊ शकतो. |
| मा. सभापती | आहो४०००० महीन्याने गिरी साहेबांनी गाडी ऑलरेडी लावली आहे ते भाडे आरोग्य विभागाकडून पेड होत आहे. कोण माहिती देईल आरोग्य विभागातर्फे या विषयी. |
| म.डॉ.महेश मोरे | कोविड अंतर्गत आपण ४ गाडया लावल्या आहे. त्यातली एक गाडी ही उपायुक्त साहेबांकडे आहे. आणि एक गाडी कंपोस्ट, स्वॅब कलेक्शन मेडीकल कॉलेजला पाठविणे फिल्डवर्क साठी वापरली जाते. एक गाडी डॉक्टर, ऑफीसर यांच्यासाठी वापरली जाते. |
| मा. सभापती | सर्वांना ४०००० रु प्रमाणे भाडे चालू आहे का? |
| म.आरोग्याधिकारी | ३५००० रु प्रमाणे |
| मा. सभापती | भाडयाने लावण्यापेक्षा तुम्ही विकत घेऊन टाका. |
| म. अमोल मासुळे | साहेब याची पण चौकशी करा. |
| म. आरोग्याधिकारी | आपण लसीकरणासाठी जी फिल्ड विजीट करावी लागते त्यासाठी त्या गाडया वापरतो. |
| म. शितल नवले | दोन - दोन लाख रु भाडे कुठे जाते आहे. |
| म.आरोग्याधिकारी | माझ्यासाठीची गाडी मी सरेंडर केली. |
| मा. सभापती | त्यांना वाहन भत्ता दया बारा तेरा हजार रुपये खाजगी गाडी वापरायला सांगा. |
| म. शितल नवले | साहेब इलेक्ट्रीक व्हेईकल दया यापुढे |
| मा. सभापती | या गाडया सर्व सरेंडर करा. खाजगी गाडया आणायला सांगा आणि वाहन भत्ता दया त्यांना. |
| म. शितल नवले | एक गाडी तुम्हाला स्वॅब करता राहू दया बाकी सरेंडर करा. |
| मा. सभापती | दोन्ही विषय तहकूब ठेवूया आता. |
| म.अभियंता | २ मिनटे डिर्स्टब करतो. विषय क्रं.१६५पाणी पुरवठया करीता खाजगी गाडयाचा विषय आहे . |
| म.नगरसचिव | आपण तो विषय तहकूब ठेवला आहे. |
| म.अभियंता | ती खालील पार्कीग मधील छोटा हत्ती गाडी ती पाणी पुरवठयाला दिली तर त्यांचा प्रश्न निमाण होईल |
| म.नगरसचिव | छोटा हत्ती कोणाच्या ताब्यात आहे. |
| म. चंद्रकांत जाधव | त्या गाडीची चावी वाहन विभागाकडे राहते |
| मा..सभापती | वाहन विभागाने बांधकाम विभागाकडे चावी दयावी. |
| म.राऊत | छोटा हत्ती मध्ये श्क्य नाही होणार. रस्त्यात काही झाले तर अडचणीचे होईल. |
| नगरसचिव | सदयस्थितीत दोघे विषय तहकूब ठेवून मग बसून त्यावर चर्चा करु. |
| मा. सभापती | सर्व सन्मा.सदस्यांनी केलेल्या चर्चेनुसार सदर प्रसताव तूर्त तहकूब करण्यांस मान्यता देण्यांत येत आहे. |

**धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर १७९ दिनांक २०/१२/२०२१**

धुळे महानगरपालिका सामान्य प्रशासन विभागा कडील एक्सेंट हन क्र.एम.एच.१८ बी. सी. ३३६४ म.उपायुक्त सो.यांचे सेवेतील वाहनांची दुरुस्ती रक्कम ₹.१,२८,१६७/- मात्रच्या खर्चास प्रशासकीय व आर्थिक मंजुरीसाठी मे.स्थायी समितीपुढे सादर झालेला आहे.

उक्त प्रस्तावावर सन्मा. सदस्यांनी केलेल्या चर्चेनुसार सद्यस्थितीत सदर प्रस्ताव तहकूब ठेवण्यांस मान्यता देण्यांत येत आहे.

सुचक :- श्री. अमोल पावबा मासुळे
अनुमोदक :- श्री. शितल मोहन नवले

**सर्वानुमते मंजुर,**
**सही/-x x x**
**सभापती,**
**स्थायी समिती,**
**धुळे महानगरपालिका, धुळे**

| | |
|---|---|
| विषय क्रमांक:- १६५ | धुळे महानगरपालिका पाणी पुरवठा विभागाकडील अत्यावश्यक सेवेतील टाटा सुमो वाहन क्र. एम.एच.१८ एफ.१०२ वाहनांची दुरुस्ती खर्च ₹.७९४८८/-खर्चास प्रशासकीय व आर्थिक तसेच मे.स्थायी समितीकडेस मान्यता मिळणेबाबत आलेल्या कार्यालयीन अहवालावर विचार करणे. |
| म. नगरसचिव | नगरसचिव यांनी विषयांचे वाचन केले. |
| म. सभापती | मागील विषयामध्ये सन्मा.सदस्यांनी केलेल्या चर्चेनुसार सद्यस्थितीत सदर प्रस्ताव तहकूब ठेवण्यांस मान्यता देण्यांत येत आहे. |

**धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर १८० दिनांक २०/१२/२०२१**

धुळे महानगरपालिका पाणी पुरवठा विभागाकडील अत्यावश्यक सेवेतील टाटा सुमो वाहन क्र.एम.एच.१८ एफ.१०२ वाहनांची दुरुस्ती खर्च ₹.७९४८८/-खर्चास प्रशासकीय व आर्थिक तसेच मे.स्थायी समितीकडेस मान्यतेसाठी सादर झालेला आहे.

उक्त प्रस्तावावर सन्मा.सदस्यांनी केलेल्या चर्चेनुसार सद्यस्थितीत सदर प्रस्ताव तहकूब ठेवण्यांस मान्यता देण्यांत येत आहे.

सुचक :- श्री. अमोल पावबा मासुळे
अनुमोदक :- श्री. शितल मोहन नवले

**सर्वानुमते मंजुर,**
**सही/-x x x**
**सभापती,**
**स्थायी समिती,**
**धुळे महानगरपालिका, धुळे**

विषय क्रमांक:- १६६ — नागरी दलित वस्ती सुधार योजना अंतर्गत प्र.क्र.१५ मध्ये कृष्णकमल कॉलनी भागात राणा प्रो. ते दगडु अमृतकर यांच्या घरापावेतो रस्ता डांबरीकरण करणेचे निविदा मागविण्यांत आलेत. त्याबाबत आलेल्या कार्यालयीन अहवालावर विचार करणे.

म. नगरसचिव — नगरसचिव यांनी विषयांचे वाचन केले.

म.अमोल मासुळे — विषय मंजूर करण्यांत यावा.

म. बन्सीलाल जाधव — विषय मंजूर करण्यांत यावा.

म. सभापती — सर्व सन्मा.सदस्यांच्या सहमतीने व कार्यालयीन अहवालास अधिन राहून सदर प्रस्तावास मान्यता देण्यांत येत आहे.

**धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर १८१दिनांक २०/१२/२०२१**

नागरी दलित वस्ती सुधार योजना अंतर्गत प्र.क्र.१५ मध्ये कृष्णकमल कॉलनी भागात राणा प्रो.ते दगडु अमृतकर यांच्या घरापावेतो रस्ता डांबरीकरण करणे कामाबाबत धुळे महानगरपालिका मे.महासभा ठराव नं.१४०(अ) दि.३०/१२/२०२०अन्वये मंजुरी दिलेली आहे. तसेच मा.जिल्हाधिकारी सो. धुळे महानगरपालिका यांनी टिपणी मंजुरीने दि.२६/०३/२०२१ अन्वये उक्त कामाबाबत रक्कम रु.२८,९५,८८४/-मात्र खर्चाचा आर्थिक व प्रशासकीय मंजुरी देणेत आली आहे.

उक्त कामाबाबत शहर अभियंता मनपा धुळे यांचे पत्र क्र./१२३७ दि.०८/०३/२०२१ अन्वये रक्कम रु.२८,९५,८८४/- मात्र खर्चास तांत्रिक मंजुरी मिळालेली आहे.

उक्त कामाबाबत धुळे महानगरपालिका जा.क्र./बां.वि./९१/२० दि.१८/०६/२०२१ अन्वये रोजी देशोन्नती / पथदर्शी या वृत्तपत्रात जाहीर निविदा प्रसिद्ध करणेत येऊन दि. १३/०७/२०२१ अखेर निविदा दर मागविण्यात आले आहेत. पात्र कंत्राटदार यांनी निविदेबाबत ऑनलाईन पद्धतीने बयाणा रक्कम भरून निविदा दर सादर केलेले आहेत.

| अ..क्र. | कंत्राटदार किंवा ठेकेदाराचे नाव | दिलेले निविदा दर | शेरा |
|---|---|---|---|
| | मे.हिंद कन्सट्रक्शन | शे.२.०० % जास्तीने | |
| | चे.नागसेन लेबर को.ऑ.सो.लि. | **अंदाजपत्रकीय दराने** | **सर्वात कमी दर** |
| | मे.एकविरा कन्सट्रक्शन | शे.३.०० % जास्तीने | |

वरील प्रमाणे निविदेत भाग घेतलेले ठेकेदार पात्र असून **चे.नागसेन लेबर को. ऑ. सो. लि.**यांचे दर **अंदाजपत्रकीय** आहे व त्यांनी नियमा प्रमाणे ऑनलाईन बयाणा रक्कम भरलेली आहे. सबब कंत्राटदार **चे.नागसेन लेबर को.ऑ.सो.लि.** यांची **अंदाजपत्रकीय** दराने आलेले निविदा दर मंजुरीस्तव सादर तसेच अन्य काम न मिळालेले ठेकेदारांना त्यांची बयाणा रक्कम परत करणे बाबत मे. स्थायी समिती समोर मंजुरीस्तव सादर झालेला आहे.

सर्व सन्मा.सदस्यांच्या सहमतीने व कार्यालयीन अहवालास अधिन राहून सदर कामी **चे.नागसेन लेबर को. ऑ.सो.लि.** यांची **अंदाजपत्रकीय**दराने आलेले निविदा दरास मान्यता देण्यांत येत आहे.सदर प्रस्ताव व कार्यवाही बाबत लेखा आक्षेप निर्माण होणार नाही याची दक्षता घ्यावी. याबाबतची जबाबदारी संबंधित विभागाची राहील.

सुचक :- श्री. अमोल पावबा मासुळे
अनुमोदक :- श्री. बन्सीलाल माणिक जाधव

**सर्वानुमते मंजुर,**

**सही/-x x x**

**सभापती,**

**स्थायी समिती,**

**धुळे महानगरपालिका धुळे**

| | |
|---|---|
| विषय क्रमांक:-१६७ | धुळे मनपाचा आर्कीटेक्ट पॅनलवर श्री.हेमंत भावसार,आर्कीटेक्ट,नाशिक यांची नेमणूक करणे संदर्भात आलेल्या कार्यालयीन अहवालावर विचार करणे. |
| म. नगरसचिव | नगरसचिव यांनी विषयाचे वाचन केले. |
| म. शितल नवले | विषय मंजूर करण्यांत यावा. |
| म. सुनिल बैसाणे | आपण आर्किटेक्ट पॅनलवर श्री. हेमंत भावसार यांची नियुक्ती करतो आहे.यांत आर्कीटेक्ट फी देणेबाबत प्रश्न निर्माण होतो.अनेकदा आर्किटेक्ट विनामूल्य काम करण्यांस तयार असतात परंतु नंतर फीची मागणी करतात.त्यामुळे याबाबत कायदेशीर अटी शर्तीची पूर्तता व कागदपत्राची तपासणी करुन प्रशसनाने उचित कार्यवाही करावी. |
| म. सभापती | सर्व सन्मा. सदस्यांच्या सहमतीने व कार्यालयीन अहवालास अधिन सदर प्रस्तावास मान्यता देण्यांत येत आहे. |

**धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर १८२दिनांक २०/१२/२०२१**

श्री. हेमंत भावसार, आर्कीटेक्ट,नाशिक ही फर्म आर्कीटेक्ट व्यवसायात कार्यरत आहे. ही फर्म शासकीय निमशासकीय / स्थानिक स्वराज्य संस्थासाठी कामे करीत असल्याने धुळे मनपाच्या नवीन प्रशासकीय इमारतीच्या बाजूस शाळा क्र.१ येथे व्यापारी संकुल जागेत आर्कीटेक्ट म्हणून काम करणेसाठी तयार असल्याने त्यांनी धुळे मनपा आर्कीटेक्ट पॅनलवर आर्कीटेक्ट म्हणून नियुक्त करणे बाबत कळविले आहे.

सदर कामाबाबत मे.महासभेचा ठराव झालेलाआहे.सदरचे काम यानुसार मनपा मार्फत करणेत येणार होते.परंतु आजमितीस मनपाची आर्थिक स्थिती बरोबर नसल्याने मनपा मार्फत न करता BOT/BOLT नुसार करणे योग्य राहील.यात धुळे मनपाने मनपा कार्यालया समोरील करणेत आलेल्या दुकानदारांना सामावून घेण्यात येईल.

सदरचे काम BOT/BOLT मार्फत करणेत येणार असल्याने काम करणारे ठेकेदारा मार्फत आर्कीटेक्ट यांची फी भरणेत येईल. त्यामुळे आर्कीटेक्ट यांची फी मनपा मार्फत अदा करावी लागणार नाही.

याबाबत म. अति. आयुक्त यांनी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे प्रकरण ५ (२) (२)अन्वये विना निविदा श्री. हेमंत भावसार यांना आर्किटेक्ट पॅनलवर नियुक्ती करणेसाठी स्थायी समितीपुढे प्रकरण सादर केलेले आहे.

यावर म.आयुक्त यांनी मान्यता दिलेली असून धुळे मनपाचा आर्कीटेक्ट पॅनलवर श्री. हेमंत भावसार, आर्कीटेक्ट, नाशिक यांची नेमणूक करणे कामी सदरचा विषय मे.स्थायी समिती समोर मान्यतेस्तव सादर झालेला आहे.

सर्व सन्मा. सदस्यांच्या सहमतीने व कार्यालयीन अहवालास अधिन राहून मनपा नुतन प्रशासकीय इमारतीच्या बाजूस असलेल्या प्रस्तावित व्यापारी संकुलासाठी आर्किटेक्ट श्री.हेमंत भावसार,नाशिक यांची नियुक्ती करण्यांस मान्यता देण्यांत येत आहे.याबाबत संबंधितां कडुन योग्य तो अटी शर्तीचा करारनामा प्रशासनाने करावा.

सुचक :- श्री. शितल मोहन नवले

अनुमोदक :- श्री. सुनिल तुळशीराम बैसाणे

**सर्वानुमते मंजुर,**

**सही/-x x x**

**सभापती,**

**स्थायी समिती,**

**धुळे महानगरपालिका, धुळे**

| | |
|---|---|
| विषय क्रमांक:- १६८ | धुळे शहर मंजूर विकास योजनेतील आरक्षित भूखंड क्रं.१५३ या आरक्षित जागेवर खाजगी करणातून बी.ओ.टी./ बी.ओ.एल.टी. तत्वावर व्यापारी संकुलाचे बांधकाम करावयाचे असल्याने त्यासाठी प्रकल्पाची अधिमूल्य रक्कम (प्रिमियम) निश्चित करणे व निविदा प्रक्रिया राबविणेसाठी आलेल्या कार्यालयीन अहवालावर विचार करणे. |
| म. नगरसचिव | नगरसचिव यांनी विषयाचे वाचन केले. |
| म. शितल नवले | सभापती महोदय मी सर्वप्रथम आपले अभिनंदन करतो. उत्पन्न वाढीच्या दृष्टीने आपण प्रोजेक्ट तयार करतो. आपण ३ बजेट पाहिले आहे. प्रत्येक बजेट मधे बी.ओ.टी. तत्वावर प्रोजेक्ट राबवण्यात येईल परंतु ३ वर्षात एकही बी.ओ.टी प्रोजेक्ट झाला नाही. कार्यालयीन टिपणी वाचल्यानंतर या प्रस्तावातून आपणांस ११० कोटी रुपये उत्पन्न अपेक्षित आहे. यातून अनेक विकासकामे धुळे शहरासाठी करता येईल.असे किमान ५ ते ६ प्रोजेक्ट आपण राबवू |

शकतो. जसे बाजूच्या गुजराती शाळा आहे,नवरंग पाण्याची टाकी आहे.,पाचकंदील , शाळा क्रं.५असे अनेक जागा आहे, रहदारीची समस्या आहे की रस्तयावर दुचाकी पण आपण घेऊन फिरु शकत नाही. पाच कंदील येथे आपण चार टॉवर उभारु शकतो. अतिशय छान प्रोजेक्ट तो करता येईल.

म सुनिल बैसाणे — सभापती महोदय आरक्षित भूखंड क्रं.१५३ चे जागेवर खाजगी करणातून व्यापारी संकूल तयार करुन धुळे मनपाच्या उत्पन्नाचे मोठे योगदान त्याच्या माध्यमातून मिळणार आहे आजच्या परिस्थितीला शासनाकडून कुठलेही अनुदान प्राप्त होत नाही. धुळे शहरातील अनेक जागा आहे. त्या जागा भूखंडमाफीया गिळंकृत करत आहे. डी-मार्ट सारख्या मोठया कंपनीला फसवण्याचे प्रकरण धुळे शहरात झाले. विषय मंजूर करत असतांना ११० कोटी रुपये उत्पन्न आपल्याला अपेक्षित आहे. ११० कोटी पेक्षा कमी येत असतील तर त्या बाबतीत चर्चा आपण केली पाहीजे.यात आपण आर्कीटेक्ट शी करारनामा केलला आहे यात २१ मुद्दे आहेत. त्यातील सर्व गोष्टी तपासून कामे करणे गरजेचे आहे काही कारणास्तव तो प्रकल्प थांबवला गेला. तर त्या प्रकल्प करणारायाची जबाबदारी असेल त्याला ११० कोटी रुपये देणे बंधनकारक असेलच. यातील अटी २१अटी काय आहे हे वाचुन सांगावे

म. नगरसचिव — सदर आकिटेक्ट नियुक्तीची नस्ती बांधकाम विभागाकडे आहे.या नस्तीतील व करारनाम्यातील असलेल्या प्रमुख अटी या कार्यालयीन अहवालात नमूद केलेल्या आहेत त्या मी सभागृहाच्या माहितीसाठी वाचून दाखवितो.

प्रस्तुत प्रकरणात बांधकाम विभागाकडील कार्यादेश क्र. २३१ दि.१५/०७/२०२१ अन्वये धामणे देवरे , वास्तू विशारद यांना अंदाजपत्रक रक्कमेचे १.२५% दराने कार्यादेश देण्यात आलेला आहे. कार्यादेश देणेपूर्वी वास्तू विशारद यांना खालील अटी / शर्तीनुसार कामे करावयाचे आहेत.

१) जागेचे मोजणी सर्वेक्षण करून त्यासाठी आवश्यक ते दस्ताऐवज तालुका / जिल्हा स्तरावरून स्वतः प्राप्त करणे. प्रकल्पास शासनाने विहित केलेल्या नियमानुसार सुसाध्यता अहवाल करणे व सक्षम प्राधिकरणाची मंजुरी करून घेणे.

२) मंजूर कामाचे सविस्तर अंदाजपत्रक आराखडे आर.सी.सी. डीझाईन तयार करून त्यास सक्षम प्राधिकरणाची मंजुरी करून घेणे.

३) कामाची प्रारूप निविदा तयार करून त्यास सक्षम प्राधिकरणाची मंजुरी करून घेणे.

४) प्रकल्पाचे प्रत्यक्ष बांधकाम सुरु झाल्यानंतर ते पूर्ण अंतिम व हस्तांतरित होईपर्यंत चांगले दर्जात निविदा अटी शर्ती प्रमाणे पूर्ण करून घेणे.

५) महानगरपालिकेच्या नगररचना खात्याकडुन अथवा सक्षम प्राधिकरणाकडून प्रकल्पाचे आराखडे काम सुरु करणेपूर्वी मंजूर करून घेणेची जबाबदारी वास्तू विशारद / प्रकल्प सल्लागार यांची राहील.

६) प्रकल्पाचा मागील ५० वर्षापूर्वीचा शोध अहवाल ( सर्च रिपोर्ट ) प्राप्त करून घेणेची जबाबदारी वास्तू विशारद यांची राहील.

म. सुनिल बैसाणे — सभापती महोदय हे २१ मुददे आहेत अॅग्रीमेंट करीत असतांना हे आपण ज्यांना देणार आहे त्यांनी या सर्व गोष्टी त्यामध्ये नमुद करावयाच्या आहेत काही कारणास्तव तो प्रकल्प थांबविला गेला त्यात जो प्रकल्प धारक आहे त्याची जबाबदारी असेल त्या मध्ये मनपाकडे कुठल्याही पध्दतीचा मोबदला मागणार नाही आपण त्याला मोक्याची जागा देत आहोत आपल्याला ११० कोटी रुपये उत्पन्न अपेक्षित आहे हे सर्व होत असतांना काही विघ्न संतोषी लोक या मध्ये आडयळा आणुन ते काम थांबविण्याचा देखील प्रयत्न करतील या मध्ये मी ज्या गोष्टी सांगतो आहे त्या त्याच्यात नमुद करणे गरजेचे आहे. हा प्रकल्प जरी थांबला तरी जो निविदा धारक आहे त्याला ११० कोटी देणे बंधनकारक असेलच ते बंधनकारक याच्यासाठी असेल अॅग्रीमेंट करणाऱ्यांनी या २१ गोष्टी तपासुनच निविदा करायला पाहिजे आणि मध्येच जर एखादा मुद्दा उपस्थित झाला जर धुळे शहरामध्ये चांगल्या गोष्टी घडत असतांना उगाचच वाद निर्माण करुन न्यायालयामध्ये वाद होऊन थांबविण्याचा देखील प्रयत्न होऊ शकतो. त्यामुळे नगररचना विभागाने मनपाला अडचणीचे होणार नाही अशा पध्दतीने केले पाहिजे आपण त्याला बी.ओ.टी वर जागा देतो आहे ती किती वर्षासाठी देणार आहे. यांचा करारनामा करणे क्रमप्राप्त आहे. आपण जर जुन्या बी.ओ.टी चा इतिहास बघीतला आपल्याला उत्पन्न शुन्य आहे. चुकीचे करारनामे करुन अनावधाने झाले असे प्रकार जास्त आहे. किती २० ते ३० वर्ष तो करारनामा शासनाच्या नियमाच्या आधिन राहुन केला पाहिजे भाडेपट्टा जो फॉरमॅट आहे तो मनपाच्या अधिकाऱ्यांच्या माध्यमातूनच केला गेला पाहिजे त्यांच्यात उत्पन्नाची बाजू असल्याने मनपाच्या चांगल्या अधिकाऱ्याकडून झाले पाहिजे भाडयाने जर आपण ३० वर्षा करीता निविदा धारकाला देणार आहे ३० वर्ष झाल्या नंतर ती वास्तु/ इमारत मनपाच्या स्वाधीन करुन किंवा मुदत वाढवून देणे हया गोष्टी सुध्दा करारनाम्यात स्पष्टपणे नमुद करणे गरजेचे आहे जे भाडे तत्वावर दुकानदार असतील त्या दुकानदारांच्या करारनाम्याच्या सर्व बाजू हया न्यायालयीन वाद होणार नाही अशा पध्दतीने झाले पाहिजे. सर्वात महत्वाचा मुद्दा म्हणजे ११० कोटी रु कश्या पध्दतीने देणार आहे टप्पया टप्प्याने देणार आहे का तो आपल्याला

सिक्युरिटी देणार आहे या सर्व गोष्टी तपासणे गरजेचे आहे. जर आपल्याला ११० कोटी रु उत्पन्न अपेक्षित आहे जर तो आपल्याजा एक ठोक रक्कम देत असेल तर आपल्याला विनंती आहे त्या ११० कोटी रु. चा विनीयोग हा धुळे मनपातील विकासकामांचे जे देयके असतील त्यासाठी जर आपण करत असाल तर आपला उद्देश साध्य होणार नाही त्याचे कारण असे आहे. या बाबत राष्ट्रीयकृत बँकेला विचारणा केली पाहिजे आम्ही जर तुमच्याकडे ११० कोटी रु तारण म्हणून ठेवू किंवा डिपॉझिट म्हणून ठेवू परंतू ही डिपॉझिट कधीही न काढता येणारी असावी त्याचे कारण असे कि ११० कोटी रु च वर्षाला कमीत कमी ५ ते ६ कोटी रु मिळतील आपण उत्पन्नाचा झरा निर्माण केला पाहिजे. कारण त्याने हळू हळू उत्पन्न येत राहणार त्या पध्दतीने विचार करावा असे मला वाटते. जर आपण ११० कोटी एखादया बँकेला दिले तर ती बँक कदाचित व्याजा मधे आणि काही उत्पन्नाच्या बाबतीत सूचित करतील हया गोष्टी आपल्या महत्वच्या आहे पैसे कधी कसे देणार याचे नियोजन करावे आणि सर्वात महत्वाचे न्यायालयीन वाद निर्माण झाला तर हि सर्वांची जबाबदारी त्यांची असेल कुठल्याही पध्दतीचा मनपा कडे मोबदल्यासाठी त्यांनी वाद निर्माण करु नये अशा पध्दतीने काळजी घेतली पाहिजे. दुसरी गोष्ट जो बिल्डप ऐरिया आहे तो २२२३५.७५s.m. या मध्ये गॅलरी जीना या सर्व गोष्टी केल्या जातात. जर आपण या ठिकाणी २२२३५.७५ s.m. ची जागा त्याला देणार आहे या सर्व गोष्टी बघीतल्या तर त्या बिल्डर्सला ७८.७३ s.m. येवढा ऐरिया मिळणार आहे. त्याच्यातून त्याला ७० ते ८० कोटी रु मिळणार आहे म्हणजे आपल्या ११० कोटी रु उत्पन्नामधे वाढ होउ शकते. या गोष्टी पण या ठिकाणी बघीतल्या गेल्या पाहिजे या सर्व गोष्टी या मध्ये झाल्या पाहिजे सभापती महोदय आपला माझा कार्यकाळ संपणार आहे. या सर्व गोष्टी नमुद करयाचा कारण असे की हा विषय मनपाच्या हिताचा घेतो आहे स्थायी समीती मध्ये हा विषय सखोल मान्यते साठी मी नसेल त्या वेळी हया गोष्टी सांगण्यासाठी आम्ही उपस्थित नाही राहणार हया गोष्टी आम्ही नमुद केल्या नंतर काही निवीदा मध्ये चुका राहुन गेल्या त्याची बाजु मांडण्याकरीता आम्ही नसलो त्या ठिकाणी न्यायालयीन बाजु मांडण्यासाठी गरजेचे आहे हा धुळे शहराच्या हिताचा विषय हा विषय घेत असतांना मनपाने लवकरात लवकर याची निविदा प्रक्रिया तयार करणे गरजेचे आहे निवदा प्रकिया तयार करीत असतांना टिपणी मध्ये ज्याच्या नमुद अटी, शर्ती आहेत त्या अटी, शर्तीची पूर्तता त्यांनी करुन निविदा प्रकिया लवकरात लवकर होऊन धुळे मनपाला येणाऱ्या वर्षा मध्ये काहीतरी नविन वास्तु धुळे शहराला आपण देतो आहे काही अधिकारी या ठिकाणी रिटायर्ड होतील शिंदे सो. यांच्या प्रमुख उपस्थिती मध्ये चांगले काम उभे राहिल. धुळयाचे लोक मुंबई, पुणे, नासीक येथे सिटी मॉलला जातात परंतु धुळे शहरामध्ये एवढा मोठा मॉल उभा राहणार आहे त्यांची जबाबदारी आपल्या सर्वाची आहे.आपल्याला विनंती आहे. लवकरात लवकर निविदा प्रकिया तयार करुन टिपणीतील अटी व शर्तीचा समावेश करुन हा विषय मंजूर करावा.

म. सभापती — सन्मा.सदस्यांनी उक्त प्रस्तावावर केलेली चर्चा लक्षांत घेता सदर प्रस्ताव धुळे मनपाच्या आर्थिक हिताच्या दृष्टीकोनातून फार महत्वपूर्ण असून मनपाचे शाश्वत उत्पन्न याव्दारे निर्माण होणार आहे. त्यामुळे सदर प्रस्ताव बी.ओ.टी.तत्वावर विकसीत करण्यांस मान्यता देण्यांत येत आहे.तसेच यासाठी आर्किटेक्ट यांनी निश्चित केलेली प्रकल्पाची अधिमूल्य रक्कम (Premium) रु.११०.८५ कोटी निश्चित करण्यांस कार्यालयीन अहवालास अधिन राहून मान्यता देण्यांत येत आहे.तसेच याबाबत ई निविदा प्रक्रिया तांतडीने करण्यांत यावी. व याच बरोबर कार्यालयीन अहवालात नमूद बाबीची पूर्तता व कार्यवाही समांतर पातळीवर करण्यांत यावी.तसेच प्रस्तावास मे.महासभेची कार्योत्तर मान्यता घेण्याबाबत प्रशासनाने कार्यवाही करावी.

**धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर १८३ दिनांक २०/१२/२०२१**

धुळे शहर मंजूर विकास योजनेतील आरक्षित भूखंड फा.प्लॉट नं. १५३ या आरक्षित जागेवर खाजगीकरणातून (बी.ओ.टी./बी.ओ.एल.टी.)या तत्वावर व्यापारी संकुल विकसित करणे बाबत.

धुळे शहर मंजूर विकास योजनेतील आरक्षित भूखंड फा.प्लॉट नं. १५३ या आरक्षणावर Residential म्हणून डी.पी. मध्ये समाविष्ठ आहे.

सदर आरक्षणाची जागा हि धुळे शहरातील मालेगाव रोड , दसेरा मैदान जलकुंभाजवळील मुख्य जागा आहे. सदर जागा विकसित केल्यास याद्वारे धुळे मनपास उत्पन्नाचे स्त्रोत सुरु होणेस मदत होवू शकते. त्याकरिता सदर जागेसाठी खाजगीकरणाच्या माध्यमातून (बी.ओ.टी./ बी.ओ.एल.टी.)या तत्वावर व्यापारी संकुल विकसित करणे आवश्यक आहे.

उक्त बाबत नगररचना विभागाकडील अभिप्राय नुसार , धुळे शहर मंजूर विकास योजना नुसार पुर्णप्रसिद्ध विकास योजना धुळे महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ (१) अन्वये दि. ०३ जुलै २०१५ चे शासन निर्णयानुसार EP- 60 या क्रमांकाने The Govvenrment partly sanction EP- 60 ( The Part land bearing final plot no. 153 is deleted from new site no. 117 Garden and land there under is included in residential zone , more specifically shown as A-B-C-D on the

plan ) म्हणून घोषित असुन मे. उच्च न्यायालय याचिका क्र.४०६०/ २०१५ मधील अंतिम निकालाला अधीन राहून तसेच जागा मालकीचा सिटी सर्वे उतारा नुसार A-B-C-D नुसार रहिवाशी विभागात अंतर्भूत आहेत असा अभिप्राय देण्यात आलेला आहे.

याबाबत म.महासभा ठराव क्र. ११२ दि.१२/११/२०२० अन्वये तत्वतः मान्यता देण्यात आलेली असुन अंदाजपत्रकात याबाबत तरतूद करण्यात आलेली आहे.

उक्त प्रकरणी दि.१७/१२/२०२१ रोजी मा. १७/१२/२०२१ रोजी म. आयुक्त सो., यांच्या दालनात झालेल्या चर्चेनुसार प्रकल्पासाठी वास्तू विशारद नेमणूकीसाठी बांधकाम विभागामार्फत ई- निविदा सूचना क्र. ६३ दि.०१/१०/२०२० रोजी मागविली असता मे. स्थायी समिती ठराव क्र. ११५ दि.२२/१२/२०२० अन्वये प्रस्तुत प्रकरणात बांधकाम विभागाकडील कार्यादेश क्र. २३१ दि.१५/०७/२०२१ अन्वये धामणे देवरे , वास्तू विशारद यांना अंदाजपत्रक रक्कमेचे १.२५% दराने कार्यादेश देण्यात आलेला आहे. कार्यादेश देणेपूर्वी वास्तू विशारद यांना खालील अटी / शर्तीनुसार कामे करावयाचे आहेत.

१) जागेचे मोजणी सर्वेक्षण करून त्यासाठी आवश्यक ते दस्ताऐवज तालुका / जिल्हा स्तरावरुन स्वतः प्राप्त करणे. प्रकल्पास शासनाने विहित केलेल्या नियमानुसार सुसाध्यता अहवाल करणे व सक्षम प्राधिकरणाची मंजुरी करून घेणे.

२) मंजूर कामाचे सविस्तर अंदाजपत्रक आराखडे आर.सी.सी. डीझाईन तयार करून त्यास सक्षम प्राधिकरणाची मंजुरी करून घेणे.

३) कामाची प्रारूप निविदा तयार करून त्यास सक्षम प्राधिकरणाची मंजुरी करून घेणे.

४) प्रकल्पाचे प्रत्यक्ष बांधकाम सुरु झाल्यानंतर ते पूर्ण अंतिम व हस्तांतरित होईपर्यंत चांगले दर्जात निविदा अटी शर्ती प्रमाणे पूर्ण करून घेणे.

५) महानगरपालिकेच्या नगररचना खात्याकडून अथवा सक्षम प्राधिकरणाकडून प्रकल्पाचे आराखडे काम सुरु करणेपूर्वी मंजूर करून घेणेची जबाबदारी वास्तु विशारद / प्रकल्प सल्लागार यांची राहील.

६) प्रकल्पाचा मागील ५० वर्षापूर्वीचा शोध अहवाल ( सर्च रिपोर्ट ) प्राप्त करून घेणेची जबाबदारी वास्तू विशारद यांची राहील.

या अटी/शर्तीसह एकूण १ ते २१अटी/ शर्तीसह वास्तुविशारद यांचे कडून बांधकाम विभागाने करारनामा करून घेतलेला आहे.

उक्त बाबत लेखा विभागाकडील अभिप्रायानुसार शासन निर्णय / अधिनियम इ. विचार करून सदर विकसित जागा भाडेतत्वावर जास्तीत जास्त किती वर्षापर्यंत देणे योग्य राहील. या बाबत निविदा सुचणेमध्ये नमूद करणे आवश्यक राहील. त्या मुदतीनंतर महानगरपालिकेकडून कोणताही मोबदला विकास वा भाडेधारकास देय राहणार नाही. अशा अटी शर्ती भाड्याने देण्यापूर्वी भाडेधारकासोबत करारनाम्यावर नमूद करणे आवश्यक राहील. मुदत संपल्यानंतर बिनाअट सदर मत्ता महानगरपालिकेस हस्तांतरित करणे विकासकास व भाडेधारकास बंधनकारक राहील याची नोंद निविदा सुचणेमध्ये समाविष्ट करणे आवश्यक आहे. महानगरपालिकेला विकासकाकडून देय हिस्सा कधी देय राहील ? याबाबत निविदा सुचणेमध्ये नमूद करणे आवश्यक राहील. प्राप्त रक्कम ही गुंतवणूक म्हणून कायमस्वरूपी ठेवणे योग्य राहील. कोणतेही आपदा वा संकट निर्माण झाल्यास सदर गुंतवणूक वटविण्यात येणार नाही याबाबत निर्णय होणे आवश्यक राहील. सदर विकासासाठी आवश्यक अंदाजपत्रक, प्र.मा. दराची निश्चिती जागेचे मुल्यांकन इत्यादी बाबी निविदापूर्वी पूर्ण करणे आवश्यक राहील. विकास कामा मध्येच प्रकल्प थांबविला / बंद केला तर त्यानंतर योजवायाच्या उपाययोजना व त्यावर करण्यात येणारी कार्यवाही ही निविदा अटी शर्तीमध्ये नमूद करणे आवश्यक राहील. निविदापूर्वी मनपा पॅनलवरील वकील यांचेकडून महसुली अधिनियम व महानगरपालिका अधिनियम याबाबतचा तरतुदींचा स्पष्ट अभिप्राय घेणे आवश्यक राहील. सदरचा प्रस्ताव महानगरपालिकेसाठी आर्थिक फायदेशीर असलेबाबत वित्तीय सल्लागारांचे मत घेणे आवश्यक राहील असा अभिप्राय देण्यात आलेला आहे.

म.उपायुक्त यांनी खालील प्रमाणे अभिप्राय दिलेला आहे.

१) मे.देवरे धामणे,आर्कीटेक्ट यांनी प्रस्तावित जागेवरील व्यापारी संकुलासाठी सादर केलेल्या २ पर्याया पैकी मनपा आर्थिक हिताचे पर्यायास मान्यता देणे आवश्यक आहे.

२)व्यापारी संकुलातील गाळ्यांचे Premium व भाडे निश्चिती करतांना रेडीरेकनर दरानुसार आकारणी होईल या बाबत दक्षता घेणे आवश्यक राहील.

३)सबंधित आर्कीटेक्ट यांनी मागील ३० वर्षाचे सर्च रिपोर्ट व मालकी हक्काबाबत दस्ताएवेज प्रकल्प सुरु करण्यापूर्वी सादर करणे आवश्यक राहील. सक्षम प्राधिकारी यांनी तांत्रिक मंजुरी व प्रशासकीय मंजुरी

सबंधित आर्कीटेक्ट यांनी सादर करणे आवश्यक राहील. "अ" मध्ये नमुद बाबींचा वित्तीय सल्लागारांचे मत प्राप्त करून घेवून निविदा प्रक्रिया राबविता येईल.

त्यानुसार उक्त बाबींची पूर्तता करून बांधकाम आराखड्यास DDTP / ADTP यांचे कडुन नकाशा शिफारस घ्यावी. तूर्त प्रस्ताव स्थायी समितीकडे पाठविणेस मान्यतेस्तव सादर असा अभिप्राय मा. आयुक्त यांनी नोंदविलेला आहे.

उक्त बाबत सदरचा आरक्षणावर बी.ओ.टी./ बी.ओ.एल.टी. मनपा मार्फत राबविणे बाबत निर्णय होणे आवश्यक आहे. तसेच विकसीत करणेसाठी प्रकल्पाची अधिमुल्य (Premium) रक्कम रु.११०.८५ कोटी निश्चीत केली असून सदराची किंमत त्याभागातील इतर मिळकतीच्या दराच्या तुलनेने जास्तीची वाटते निश्चिती करिता म.स्थायी मंजुरीची आवश्यकता असल्याने तसेच सदरचा विषय मे.स्थायी समिती पुढे मंजुरीसाठी सादर झालेला आहे. सन्मा.सदस्यांनी उक्त प्रस्तावावर केलेली चर्चा लक्षांत घेता सदर प्रस्ताव धुळे मनपाच्या आर्थिक हिताच्या दृष्टीकोनातून फार महत्वपूर्ण असून मनपाचे शाश्वत उत्पन्न याव्दारे निर्माण होणार आहे.त्यामुळे सदर प्रस्ताव बी.ओ.टी.तत्वावर विकसीत करण्यांस मान्यता देण्यांत येत आहे.तसेच यासाठी आर्किटेक्ट यांनी निश्चित केलेली प्रकल्पाची अधिमूल्य रक्कम (Premium)रु. ११०.८५कोटी निश्चित करण्यांस कार्यालयीन अहवालास अधिन राहून मान्यता देण्यांत येत आहे.तसेच याबाबत ई निविदा प्रक्रिया तांतडीने करण्यांत यावी. व याच बरोबर कार्यालयीन अहवालात नमूद बाबीची पूर्तता व कार्यवाही समांतर पातळीवर करण्यांत यावी.तसेच प्रस्तावास मे.महासभेची कार्योत्तर मान्यता घेण्याबाबत प्रशासनाने कार्यवाही करावी.

सुचक :- श्री. शितल मोहन नवले

अनुमोदक :- श्री. सुनिल तुळशीराम बैसाणे

**सर्वानुमते मंजुर,**

**सही/-x x x**

**सभापती,**

**स्थायी समिती,**

**धुळे महानगरपालिका, धुळे**

# धुळे महानगरपालिका,धुळे

## नगरसचिव कार्यालय

## स्थायी समिती सभा क्रमांक २६ चे इतिवृत्त

---

**धुळे मनपा भारतरत्न अटलबिहारी वाजपेयी सभागृह**
**गुरुवार दिनांक ३०/१२/२०२१**
**वेळ :-सकाळी ११-०० वाजता.**

धुळे महानगरपालिका स्थायी समितीची साप्ताहिक सभा आज गुरुवार दिनांक३०/१२/२०२१ रोजी सकाळी ११-०० वाजता मा.श्री संजय सुधाकर जाधव,सभापती,स्थायी समिती, मनपा,धुळे यांच्या अध्यक्षतेखाली **धुळे मनपा भारतरत्न अटलबिहारी वाजपेयी सभागृह** भरली. सभेस खालील सन्मा.सदस्य सभागृहात हजर होते.

| अ.क्रं. | सदस्यांचे नांव | हुद्दा |
|---|---|---|
| १ | श्री. जाधव संजय सुधाकर | सभापती |
| २ | श्री. बैसाणे सुनिल तुळशिराम | सदस्य |
| ३ | श्रीमती माळी भारती अशोक | सदस्या |
| ४ | श्रीमती बोरसे पुष्पा प्रकाश | सदस्या |
| ५ | श्री. देवरे कमलेश नारायण | सदस्य |
| ६ | श्रीमती पठाण हिना अस्लम | सदस्या |
| ७ | श्री. सईद बेग हाशम बेग | सदस्य |
| ८ | श्री. नवले शितल मोहन | सदस्य |
| ९ | श्री. बोरसे नागसेन दामोदर | सदस्य |
| १० | श्रीमती कुलेवार किरण राकेश | सदस्या |
| ११ | श्री. जाधव बन्सीलाल माणिक | सदस्य |
| १२ | श्रीमती चौधरी मंगला अर्जुन | सदस्या |
| १३ | श्री. पटेल अमीन अब्दुल करीम | सदस्य |

**उपस्थित अधिकारी गण**

| अ.क्रं. | अधिकाऱ्यांचे नाव | हुद्दा |
|---|---|---|
| १ | श्री. नितीन कापडणीस | अति. आयुक्त |
| २ | श्री. गणेश गिरी | उपायुक्त |
| ३ | श्रीमती शिल्पा नाईक | उपायुक्त |
| ४ | श्री. एन. पी. सोनार | सहा. आयुक्त |
| ५ | श्री. दिनकर जाधव | मुख्य लेखाधिकारी |
| ६ | श्री. मनोज अरविंद वाघ | प्र. नगरसचिव |
| ७ | श्री. पी.डी. चव्हाण | प्र. नगररचनाकार |
| ८ | डॉ. महेश मोरे | आरोग्याधिकारी |
| ९ | श्री. चंद्रकांत जाधव | सहा.आरोग्याधिकारी |
| १० | श्री. विकास साळवे | स्वच्छता निरीक्षक ( मलेरिया प्रमुख) |
| ११ | श्री.बी.एस. रनाळकर | सहा. कर मूल्य निर्धारण अधिकारी |
| १२ | श्री. एन.के. बागुल | विद्युत अभियंता |

| | | |
|---|---|---|
| १३ | श्री. हेमंत पावटे | बांधकाम ओव्हरसिअर |
| १४ | श्री. राजेश गायकवाड | व.स. मनपा शिक्षण मंडळ |
| १५ | श्री. राजू माईनकर | भांडारपाल |
| १६ | श्री. किशोर सुडके | बाजार विभाग |
| १७ | श्री. राजकुमार सुर्यवंशी | प्र.अधिक्षक परवाना विभाग |
| १८ | श्री. सुक्राम राऊत | वाहन विभाग |
| १९ | श्री. तुषार ढाके | अग्नीशमन अधिकारी |

म.सभापती सर्व उपस्थित सन्मा.सदस्य अति.आयुक्त सो.अधिकारी वर्ग छायाचित्रकार बांधव सभेचे कामकाज चालविणेसाठी आवश्यक तो कोरम पूर्ण झाल्याने नगरसचिव यांनी सभेचे कामकाज सुरुवात करावी.

म. नगरसचिव वंदे् मातरम् या राष्ट्रवंदनेसाठी सर्वांनी उभे रहावे.

**दि.३०/१२/२०२१ रोजी आयोजित मे.स्थायी समिती सभेत सन्मा.सदस्यांनी केली चर्चा व त्यावरील निर्णय**

म. सभापती सर्वप्रथम चर्चा सुरु करण्यापूर्वी मी या ठिकाणी एक निवेदन करतो. आपण मागच्या एका सभेमध्ये वॉटरग्रेस या कचरा संकलन ठेकेदाराचे लेखा परिक्षण करायचे असा याठिकाणी एक ठराव केला होता. त्या ठरावाच्या अनुषंगाने लेखापरिक्षण करण्यात देखील आले परंतु लेखापरिक्षक त्यांनी लेखी स्वरुपात दिले की, लेखापरीक्षण करत असतांना त्यांना नस्तया पुरवण्यात आल्या नाही. त्यामुळे लेखापरीक्षण अपूर्ण राहिले. या संदर्भात मी मागच्या पंधरादिवसापूर्वी एक पत्राद्वारे आयुक्तांना सूचित केले की नस्त्या घेऊन पुनश्च लेखा परिक्षण करण्यात यावे. त्या नंतर काल मी पुन्हा एक पत्र देऊन त्यांना आजच्या या सभे मधे त्यांनी काय कार्यवाही केली याबाबत अहवाल ठेवण्याबाबत सूचना केले आहे. त्यांनी काय कार्यवाही केली याबाबत अति. कापडणीस सो. माहीती देतील.

म. अति.आयुक्त सन्मा. सभागृह,सन्मा सभापती,सन्मा सदस्य वॉटरग्रेस च्या संदर्भात म.सभापतींनी एक पत्र आयुक्त सो. यांना लेखापरिक्षणा संदर्भात दिले आहे. एक बैठक घेतली सर्व सदस्यांनी वॉटरग्रेसच्या अनुषंगाने. सर्व माहीती काढली. ८/१०/२०२० रोजी आपण त्याला ब्लॅकलिस्टची नोटीस दिली. आपला जो क्लॉज आहे ॲग्रीमेंटचा ७.३ त्याप्रमाणे कामामधे सुधारणा केली नाही तर त्याला टर्मीनेशनची नोटीस देण्यात येईल.

म. शितल नवले ब्लॅकलिस्ट का टर्मीनेशन?

म. अति.आयुक्त त्याच्यामध्ये ब्लॅकलिस्ट शब्द वापरलेला आहे. ब्लॅकलिस्ट मोठी कारवाही होते. त्यानंतर टर्मीनेशन ही छोटी कारवाही आहे. तर आपण ब्लॅकलिस्ट नोटीस दिली होती. त्याच्यापुढे आपण गेलो नाही. डेडलाईन दिली आहे. कलम ८ जे आहे आणि रेझोल्युशन जे दोघांमधे संवाद घडवून पुढची कारवाही करण्यात येईल. परंतु ते प्रशासनाने नाकारले. दहा ते बारा दिवसांत चर्चा करण्यासाठी स्टँडीग मध्ये पाठवले. ब्लॅकलिस्ट करण्यासाठी पाठविले एक प्रकारे आपण कलम ८ नाकारला आणि टर्मीनेशनचा क्लॉज स्वीकारला असा त्याचा अर्थ स्टँण्डींग ने त्याला ब्लॅकलिस्ट न करता त्याचा ठराव रद्द म्हणजे टर्मीनेशन एक्झीक्युट आणि त्या ऐवजी पर्यायी व्यवस्था निर्माण करावी असे ठरले. आपण विनंती केली १२/१/२१ ला रिलाएबल ने कळवले आम्ही हे काम करु शकत नाही. कारण वॉटरग्रेसच्या कामात त्रुटया आहे. त्यामुळे आम्ही हॅण्डओव्हर करुन घेऊ शकत नाही. त्यानुसार २७/१२/२०२१ ला वॉटरगेस ने पत्र दिले जोपर्यंत पर्यायी व्यवस्था होत नाही तो पर्यंत हे काम आम्ही चालू ठेवतो. टर्मीनेशन क्लॉज पाहिला तर त्यामधे एक स्टेटमेंट आहे. ऑटोमॅटीक टर्मीनेशन ऑटोमॅटीक सिक्युरिटी डिपोझिट आणि परफॉरमन्स सेक्युरिटी डिपोझिट हे फोरबिड होते असे त्यामधे दिले आहे. याच्यामधे एक प्रॉब्लेम असा झाला की दिवाळीच्या वेळेस काम बंद केल्यामुळे आपण त्या कर्मचाऱ्यांकडून काम करुन घेतले होते. असे आपले स्वच्छता निरिक्षक साहेब यांनी सांगीतले तर त्यांचे काही पेमेंट देणे बाकी आहे. परंतु त्यांच्या सांगण्याप्रमाणे आपल्याला गाडया दुरुस्त करुन घ्यायच्या आहे. तर त्या दुरुस्तीला ५० लाखां पार्यत खर्च येऊ शकतो. असे त्यांनी मत मांडले आहे. आणि जे आपल्याला जे बिल दयायचे आहे, ते वॉटग्रेसची लायबीलिटी आहे आपल्याकडे.

| | |
|---|---|
| म.सभापती | साहेब विषय भरकटतोय या विषयावर यायचे आहे की लेखा परिक्षणाच्या नस्तया का पुरवल्या गेल्या नाही? |
| म.सुनिल बैसाणे | साहेब लेखापरीक्षण तुम्ही जे कागदपत्र सादर करता त्यावर होते. संबंधीत लेखापरीक्षण अधिकारी सांगतायेत आम्हाला नस्त्या पुरवल्या नसल्या कारणामुळे आम्ही लेखापरीक्षण पूर्ण करु शकलो नाही. आणि प्रशासनातले अधिकारी सांगतायेत आम्ही नस्त्या पुरवल्या आहे. यातून शाब्दीक विरोधाभास लक्षात येतोय. एक तर अधिकारी लेखापरीक्षणाची दिशाभूल करतायेत किंवा अधिकारी प्रशासनातील प्रमुख अधिकाऱ्यांना चुकीची माहिती देवून हा विषय भरकटण्याचे काम करतायेत. म्हणून यात जर नस्त्या दिल्या नसतील यांच्यावर कारवाई करण्यात यावी. |
| म.शितल नवले | कुठेपण डॉक्युमेंट ऑफिशिअली हॅण्डओव्हर करतांना कोणत्याही विभागातून तर तुमच्याकडे पोहोच घ्यावी लागते. मग तुम्ही लेखापरीक्षणाची पोहोच का घेतली नाही. जर तुम्ही म्हणता आम्ही नस्त्या पुरवल्या तर पोहोच चा कागद कुठे आहे? |
| म.सुनिल बैसाणे | शितलभाऊ त्याही पलीकडे मी सांगेल हे म्हणतात ना नस्त्या पुरवल्या लेखी स्वरुपात दया तुम्ही आयुक्तांना लेखापरीक्षक खोटे बोलता येत हे त्यांनी लेखी दयावे. |
| म.शितल नवले | तुम्ही हॅण्डओव्हर करतांना त्यांनी गहाळ केले तर त्यास कोण जबाबदार राहणार? |
| म.सुनिल बैसाणे | दुसरी गोष्ट तुम्ही या गोष्टी नमुद केल्या प्रशासनाच्या वतीने स्पष्टीकरण देतांना की स्थायी समीतीने ब्लॅकलिस्ट न करता रद्द करण्यात यावे अशा पध्दतीचे मी तुमचया माहीतीसाठी सांगतो. मी सभापती होतो त्यावेळेस आम्हाला प्रशासनाच्या वतीने ब्लॅकलिस्ट करण्यात का येऊ नये? अशा बाबतची विचारणा स्थायी समीतीला केली होती. जर अधिकारी म्हणून आयुक्त त्याचे प्रमुख आहे. आयुक्तांना त्याचे अधिकार आहे. तो अटी शर्ती चे जर उल्लंघन करतोय त्यावेळेस याचा कालावधी एक ते सव्वा वर्ष झाला होता. आणि जर तो न्यायालयात गेला असता स्थायी समीतीच्या सदस्यांविरुध्द त्याने हेतुपुरस्सर राजकीय द्वेषापोटी आम्हाला ब्लॅकलिस्ट केले. आमच्याकडून रिकव्हरी झाली असती. स्थायी समीतीने पुन्हा आयुक्त साहेबांना पुर्नविचार करुन त्याचयावर ब्लॅकलिस्ट होण्यासाठी कायदेशिर कार्यवाही करावी असे अपेक्षीत केलेले होते. त्याला कुठेही पुढे जाऊन आपल्याविरुध्द दावा न दाखल करता यावा यासाठी असा निर्देष केला होता. त्यांना फक्त रद्द करण्यासाठी केला नव्हता. खरेतर ब्लॅकलिस्ट त्याच वेळी का करण्यात आला नव्हता ? प्रशासनाने त्याला आपल्याकडे दुसरा पर्याय उपलब्ध नसल्यामुळे म्हणुन त्याला पुन्हा संधी दिली. आणि त्यानंतर आज त्याचा ३ वर्षाचा कालावधी संपुष्टात येतोय. आज रोजी पर्यंत पर्यायी व्यवस्था केली नाही. आपल्या आरोग्य विभागाचे इतके धाडसाचे कौतुक करावे वाटते. सभापती महोदय, माझ्या प्रभागामध्ये जागोजागी तो कचरा साठलेला आहे. आणि त्या ठिकाणी हा कायदयाने गुन्हा आहे. माझ्याकडे रेकॉर्डीग पण आहे. की अक्षरक्ष: तो कचरा जाळला आहे आरोग्य विभाग हे धुळे शहरातील नागरीकांच्या आरोग्याशी खेळत आहे. म्हणून ज्यांनी माझ्या प्रभागातील असो की धुळे शहरातील असो,ज्यांनी जो साठलेला कचरा त्याला जाळून प्रदुषण करण्याचा प्रयत्न केला त्यांच्यावर कारवाही करण्यात यावी. |
| म.नागसेन बोरसे | वॉटरग्रेसला आपण शेख साहेब आयुक्त असतांना ब्लॅकलिस्ट मध्ये टाकण्यासाठी नोटीस काढली होती .ते हजरच नव्हते. आपण ३ वेळा पुकारा केला होता.मला जाधव सो. यांना एवढेच विचारायचे की पुकारा करुन तो आला होता की नाही हे विचारायचे आहे? |
| म.चंद्रकांत जाधव | आपण पुकारा केला होता. त्याचया नंतर जो ४ वाजता हजर झाला. आपण त्याला ब्लॅकलिस्ट मध्ये का टाकण्यात येऊ नये अशी नोटीस बजावली होती. या नंतर एक बैठक बोलविली होती. बैठकीसाठी पत्र दिले होते. त्या बैठकीत ११ वाजता हजर नव्हता आपण पुकारा केला होता. |
| म.नागसेन बोरसे | सभापती साहेब ११ वाजेची मिटींग होती तो आला ४ वाजेला ते म्हणतात २ वाजेला आला होता. माझ्याजवळ पुरावे आहेत त्याचे. |
| म.सभापती | नागसेन भाऊ आपण जेवढी चर्चा करु या सर्वांचे एकच उत्तर आहे परीपूर्ण लेखापरिक्षण.लेखा परीक्षण झाले तर चांगले चांगले उघडे पडतील. मी तुम्हाला ती ग्वाही देतो. लेखापरीक्षण होईलच. |
| म. नागसेन बोरसे | सभापती साहेब फाईली पण जाळून टाकतील हे. |

| | |
|---|---|
| म.सभापती | जाळू दया. पुरावे नष्ट करु दया जेवढी रिकव्हरी आहे तेवढी काढू त्यांच्यावर.प्रशासन आपल्याला किती कन्व्हींन्स करत होते. काम बंद झाले त्यावेळेस. |
| म.नागसेन बोरसे | वर्ष होऊन गेले साहेब. |
| म.सभापती | ब्लॅकलिस्ट तर आता केले. मागच्या वेळेस केले होते ते वेगळे प्रशासनाकडून कार्यवाही होत नाही. माझ्या प्रश्नाचे उत्तर अजूनही अनुउत्तरीत आहे कापडणीस साहेब तुम्ही लेखापरीक्षणाकरीता फाईली पुरवल्या नाही. शेवटी तुम्हाला उत्तर दयायचे आहे. आधि मी सदस्यांचे ऐकून घेतो सर्व. |
| म.शितल नवले | सभापती महोदय आता अति. आयुक्तांनी २ का ३ नंबरचा पॉईंट वाचला की स्टॅण्डींग कमीटी समोर ब्लॅकलिस्ट करावे की नाही करावे. आपण त्यावेळेस होता का साहेब? तुम्ही शासनाकडून ७ ते ८ लोकं आले आहात. तुम्ही आमच्यापेक्षा विद्वान आहात. कायदया मध्ये सर्वच गोष्टीत तुम्हां लोकांना असे का वाटले की आम्हांला तुमच्यापेक्षा कायदा जास्त कळतो.आम्ही ते ठरवायचे की त्याला ब्लॅकलिस्ट करावे की नाही करावे. तुम्ही प्रस्ताव नव्हता सादर करायचा क्लॉज नं १ कॉन्ट्राक्टर फॉलो करत नाही डिस्कॉलिफाय झाला पाहिजे. क्लॉज नं २ या नियमाप्रमाणे काम करत नाही डिस्कॉलिफाय झाला पाहिजे. तर प्रशासनाचे असे मत आहे की याने इतके क्लॉज ब्रेक केले आहे. इतके- इतके नियमाप्रमाणे काम नाही केले.तर प्रशासनाचे असे म्हणने आहे की त्याला ब्लॅकलिस्ट केले पाहिजे. असा प्रस्ताव आपल्या कडून आला पाहिजे होता.मूळात तुम्ही स्थायी समोर विषय आणतांनाच चुकीचा आणता. आणि तुम्ही सांगता तुम्ही डायरेक्ट निर्णय घेऊन टाका. इथे कोण टेक्नीकल आहे. म्हणजे सर्व दिशाच चुकती आहे तुमची. तुम्ही नस्त्या हॅण्डओव्हर करतात त्याचे तुमच्याकडे कागदपत्रे नसतात. आपल्याकडे शंभर तक्रारी आहे ना त्याच्या बाबतीत.आज तुमच्या गाडया तरी तुमच्या ताब्यात आहे का ? किंवा कॉन्ट्रॅक्टरच्या ताब्यात आहे का? तो गॅरेजवाला तुमच्या गाडया जप्त करुन बसला आहे. त्या दिवशी अमिन भैयांनी सांगीतले त्या इम्रान ऑटो गॅरेजकडे आहेत म्हणून प्रॉपर्टी महापालिकेची ? |
| म.अमिन पटेल | चार लाख रुपये बाकी आहेत त्याचे. |
| म.शितलभाऊ नवले | पत्र दिले काय कार्यवाही केली त्याच्यावर साहेब? |
| म.चंद्रकांत जाधव | हो गॅरेजला गाडया आहे त्या. |
| म.शितल नवले | गॅरेजला गाडी रहायचे कारण काय? ते काय ऑथोराईज सर्व्हीस स्टेशन आहे का? तिथे कस काय गेल्या गाडया? आणि गेल्या असतील तर १ वर्षापासून त्याच्या ताब्यात आहे. तुमचे काम नाही का आमच्या ६ गाडया १ वर्षापासून मिसिंग म्हणून? काय करतात तुम्ही लोकं? ६ गाडया इम्रान मोटर गॅरेजकडे आहेत. |
| म.चंद्रकांत जाधव | आतापर्यंत १३ गाडया दुरुस्त केल्या. पहिला जो लॉट होता त्याने पाठवला आणि त्याचे बिल मिळाले नाही . |
| म.शितल नवले | प्रॉपर्टी महानगरपालिकेची. समजा उदया काही अपघात झाला त्या गाडीला काही झाले?काय करणार तुम्ही. तुमच्या कडे लेखी आहे? किंवा तुमच्याकडे कागदपत्रावर आहे या गाडया आपल्या सेवेत नाही कुठे आहे का डॉक्युमेंटेशन? |
| म.चंद्रकांत जाधव | आपण सर्व गाडया हॅण्डओव्हर केल्या आहे याची जबाबदारी त्याची आहे. |
| म.शितल नवले | एक लक्षात घ्या टेंडरमध्ये क्लॉज आहे . तुम्ही कायदयापासून लांब पळू शकत नाही रोज रिपोर्टींग लागते. किती गाडया चालू किती गाडया बंद आहे. याला पण दंड आहे तुम्ही कागदावर दाखवणार ६ महिन्यापासून तीथे जमा आहे तो कागद दाखवा तुमच्याकडे आहे का? तुमच्यामुळे शहराची वाट लागली आहे. नागरीकांच्या शिव्या आम्हाला खाव्या लागतायेत. तुम्हाला २ कागदे लिहायला जमत नाही दिवसभरात. का लेखी ठेवले नाही तुमच्याकडे. काय लेखा परिक्षणाला देणार आहे. |
| म.सभापती | नाही यांच्याकडे रेकॉर्डच नाही. |
| म.शितल नवले | यांना घरी पाठवा पहिले यांचे टर्मीनेशन करा. |
| म.सभापती | कापडणीस सो. गिरी सो. तुम्हाला सर्वांना सांगणे माझे या खालच्यांच्या चुकांमुळे तुम्हाला तुरुगांत जावे लागेल तुम्ही सहया करतात डोळे झाकून. |

| | |
|---|---|
| म.शितल नवले | पुढच्या आठवडयात महासभा होईल त्या वेळेस कचऱ्याप्रश्नी जो-जो अधिकारी तो आपला राहो की शासनाचा राहो त्याच्यावर अविश्वासाचा ठराव मी मांडेन भले तो सभागृहाने मंजूर करो व ना करो.यांच्यामुळे का म्हणून शिव्या खायच्या आपण?आपल्याकडे पैसे पडलेले आहे. त्या माणसाचे डिपॉझिट पडलेले आहे. पैसे देऊन एक साधी टिपणी लिहू शकतो, की आपल्या गाडया वॉटरग्रेसकडे पडल्या आहे त्या रिपेअर झाल्या बिलाची एवढी-एवढी मागणी आहे. आणि आपण ते बिल अदा करुन टाका. त्याचे डिपॉझिट भरुन १४ ते १५ गाडयांचे आपल्याकडे वर्कशिट पाठवले होते. इस्टीमेट पाठवले होते. त्याचे काय झाले? |
| म.चंद्रकांत जाधव | २० गाडया टाटा मोटर्सला जमा केल्या आहेत. १० गाडयांचे काम झाले परत आता १४ गाडयांचे इस्टीमेट आले आहे. जे १४ लाखाच्या आसपास आहे. |
| म. सभापती | त्याच्या ताब्यातून गाडया घ्या. तुम्ही स्वत: दाखल करा त्या. त्याच्याकडून नका दुरुस्ती करुन घेऊ. |
| म.शितल नवले | सभापती महोदय,आजच्या तारखेत ४० गाडया दुरुस्त होतील. |
| म.सभापती | शहरातील कचरा कसा उचलला जाईल. |
| म. शितल नवले | कोणा कोणावर अविश्वास आणायचा १-२ घरी पाठवावे लागतील |
| म. सभापती | सहया करणारे सगळेच दोषी असतील. एक-एक सहीवर बरेच क्युरी लिहत चालतो. |
| म. शितल नवले | सभापती महोदय, आपल्याला विनंती करतो. आपण ४ सदस्य मी तयार आहे बाकीचे सदस्य तयार आहे. मी सांगतो आजच आपण विषयपत्रीकेवर विषय घेण्यासाठी संबंधीत जो कोणी अधिकारी दोषी असेल त्याचयावर अविश्वास आणण्याचा विषय घ्यायला लावा. हा विषय महासभेचा आहे. आपण आर्थिक धोरणाशी निगडीत लोकं आहोत. परंतु काही कारणास्तव महासभा झाली नसेल मागे.. |
| म.सभापती | पत्राद्वारे घेऊ शकतो ना, ४ सदस्यांच्या सहया दया पत्राद्वारे मागणी करा महासभेची. |
| म.शितल नवले | तत्काळ याच्या जो-जो दोषी असेल तत्काळ त्याला सस्पेंड करा. विषय आणता काय विषय पटलावर इथे कोण टेक्नीकल होते, तुमचे ब्लॅकलिस्ट अॅक्सेप्ट करायला. सभापती महोदय, यांनी नस्त्या लेखा परिक्षणाकडे दिल्या असतील तो कागद त्वरीत आताच्या आता सभागृहात आला पाहिजे. जो पर्यंत कागद येत नाही तो पर्यंत सभागृह सोडायचे नाही. |
| म.सभापती | कापडणीस सो. मी सभागृहाच्या वतीने आपल्याला आदेशित करतो,लेखा परीक्षणाला नस्तया पुरवल्या गेल्या नाही. ते कागदं ताब्यात घ्या. त्यांची लिस्ट बनवा जे कागदं नसतील तुम्हालाही लक्षात येतील. कारण तुम्ही सहया केलेले बरेचशे.यादी दया |
| म. शितल नवले | मागेही असेच कागदं आणतो-आणतो म्हणून सभा संपून गेली |
| म.सुनिल बैसाणे | सभापती महोदय आपल्या लेखापरीक्षणाचा जो विषय आहे तो केल्याशिवाय सभा संपवायची नाही. धुळे शहरात कुत्रयांनी धुमाकुळ घातलेला आहे. परवा च्या दिवशी १८५ रुग्ण धुळे सिव्हीलला आलेले होते. आणि हिवाळा असल्या कारणामुळे धुके असतात, काही ठिकाणी लाईट बंद असतात. आता काही शाळा चालू झाल्या आहेत. आपण मागच्या वर्षीसुध्दा हा विषय दोन/तीन सभेमधे केला होता. त्यांचे म्हणने पशुवैद्यकीय अधिकारी नसल्या कारणामुळे आपल्याला हया अडचणी येतात. त्या गोष्टीला ३ महीने झाले. ज्या निविदा असतील किंवा जाहिरात असतील आपल्याकडे मानधन तत्वावर कुणी वैद्यकीय अधिकारी येण्यास तयार असेल किंवा नसेल. बजेट मधे व्हॅनची पण व्यवस्था केलेली आहे.सभापती महोदय आपण काही आरोग्याच्या गरजापूर्ण करत नसलो पण लोकांच्या जिवाशी कुत्रयांच्या माध्यमातून असा त्रास होत असेल, |
| म.सभापती | डॉगव्हॅनचा चार-पाच मिटींगापासून विषय चालू आहे. काय केले सांगा. |
| म. आरोग्याधिकारी | डॉग व्हॅन घेण्यासाठी वाहन विभागाला प्रस्ताव दिलेला आहे. |
| म.सुनिल बैसाणे | याच्यावर प्रश्न विचारुन ३ महिने होऊन गेले. आपल्याकडे इंजेक्शन उपलब्ध नसल्यामुळे सिव्हील हॉस्पीटला जावे लागते. सभापती महोदय, मी मागच्या सभेमध्ये सुध्दा लसीकरणाच्या बाबतीत विषय मांडला होता. मागच्या सभेला निवडणूक असल्या कारणामुळे विषय मांडला नव्हता. त्यानंतर सर्वात आधी विषय मांडल्यानंतर काही. प्रसीध्दीचे भुकेले लोकं आपल्या गेटजवळ येऊन माळा वैगरे आणि ज्या गोष्टी मध्ये पदाधिकारी म्हणून संबंध नसतांना त्यांनी आरोप केले .गंभीर स्वरुपाचे आरोप केले |

जेणे करुन महापालिका पैश्यासाठी काम करते असा त्यांच्या आरोपांच्या उद्देश होता. सभापती महोदय या बाबतीत स्वत:आयुक्त साहेबांनी तक्रार केली त्याची चौकशी करावी, जे कोणी दोषी असतील त्यांच्यावर कार्यवाही करण्याबाबत परंतु अजुन कुठल्याही प्रकारची कार्यवाही केली नाही. मालेगांव महापालिकेचे आपल्याला पत्र आले आहे. दिले असलेले प्रमाणपत्र खोटे आहे त्यांचा महानगपालिकेचे त्यांचे कर्मचारी घरोघरी जाऊन डोस देतात.ते लसीकरण करतायेत. त्या वेळेस धुळे मनपाचे खोटे प्रमाणपत्र त्यांनी लसीकरण न केलेले असे भरपुर प्रमाणपत्र त्यांना आढळून आले.त्यांनी एका प्रमाणपत्राची झेरॉक्स घेतली आणि धुळे मनपाच्या अधिकाऱ्यांना कळवले.आणि आपले आरोग्यधिकारी सदर डोसचे प्रमाणपत्र पहिल्या व दुसऱ्या डोसचे आपण उपलब्ध करुन देणे त्या महानगरपालिकेने आपल्याला निर्दशनास आणून दिले.की खोटे प्रमाणपत्र जे खोटे प्रमाणपत्र आहे त्याबाबतची चौकशी करुन कार्यवाही करा असे पत्र दिले आहे. आणि आपले आरोग्याधिकारी त्यांना लिहतात १ ला व २ रा डोसचे चे कागदपत्र उपलब्ध असतील त्याचा अहवाल आम्हाला सादर करा म्हणून.

म.आरोग्यधिकारी — हेजे पत्र मालेगांव महापालिकेने दिले होते त्या पत्रामधे धुळे महापालिका कार्य क्षेत्रांतील एस.व्ही.के.एम. हायस्कुल मध्ये अशा-अशा पध्दतीची बॅच होती प्रमाणपत्र क्रं. नाही आहे बॅच नंबर आहे तो. त्या बॅच नंबरचे दोन्ही तारखेला त्याच बॅच नंबरचे असलेले इश्यु झाले आहे. या पध्दतीचे त्यांनी आपल्याला पत्र दिले होते. फक्त एवढेच त्यामध्ये नमुद होते. त्याच्यानुसार आम्ही त्यांना पत्र दिले आहे की,अशा प्रकारचे जे कोणी लसीकरण प्रमाणपत्र सादर केले असेल, प्रमाणपत्राची प्रत मिळावी. त्याच्यावरुन आपल्याला व्हेरीफाय करता येईल.कारण जे पत्र आले आहे.त्यामध्ये बॅच नंबरच नमुद आहे.८४ दिवस एक बॅच चालतो. असे त्यांचे म्हणने आहे.८४ दिवसानंतर तो बॅच नंबर चालत नाही. असे त्यांचे म्हणने आहे. परंतु बऱ्याचदा आपल्याकडे ऑफलाईन लसीकरण केलेले असते.त्या डोसच्या वेळेस टेक्नीकल कारणामुळे नोंदणी होत नाही. ९० दिवसांनंतर २ रा डोस घेतला जातो. त्यावेळेस आपण जो बॅच नंबर टाकला तर पहील्या डोसला त्याच बॅच नंबरचे क्रमांक येत असतो. मग जर त्यांनी आपल्याला कुठल्या व्यक्तीने प्रमाणपत्र घेतले आहे. ते सव्वीस्तर प्रमाणपत्र सादर केले नाही.

म. सुनिल बैसाणे — सभापती महोदय, यांचे उत्तर ऐका तुम्ही. खोटे प्रमाणपत्र धुळे शहराच्या हद्दीत दिले गेले आहे की नाही सांगा तुम्ही?

म. आरोग्यधिकारी — या बाबतीमध्ये म.जिल्हाधिकारी व म.आयुक्त सो. यांच्या आदेशाने चौकशी नेमण्यात आली आहे. आणि चौकशीत याबाबतीत सव्वीस्तर समोर येईल.

म.सभापती — कुठले चौकशी अधिकारी नेमले काही सांगता येईल तुम्हाला?पोस्टींग?नाव?

म. सुनिल बैसाणे — अधिकाऱ्याची नावे दया?

म.आरोग्यधिकारी — चौकशी सुरु आहे.उपायुक्त गिरी सो.यांना चौकशी अधिकारी म्हणून नेमले आहे.त्यांनी चौकशी केलेली आहे.

म.सुनिल बैसाणे — सभापती महोदय हा विषय गंभीर आहे.आपण आता तिसऱ्या लाटेला सामोरे जातोय. हे खोटे प्रमाणपत्र घेणारे धुळे शहरात कोरोनाला निमंत्रण देताय.हे खोटे नोंदणी करुन एका दिवसांमध्ये २००० हजार शहरामध्ये झाले आणि हजार ते पाचशे एका लसीचे घेतात. हा लाखोंत आकडा जातो. त्या मधे चौकशी अधिकाऱ्यांच्या चौकशी मधे तथ्य निघत नाही. हा देशद्रोहाचा गुन्हा आहे. हा देशाशी द्रोह करतोय आपण. त्या प्रमाणपत्रावर राजमुद्रा छापलेली असते.ही संघटीत गुन्हेगारी आहे साहेब.औरंगाबादमध्ये असाच प्रकार झाला.धुळे शहरात एस.व्ही.के.एम.या केंद्रावर एका दिवसांत अडीच हजार नोदणी प्रमाणपत्र झाले आहे.आता चार दिवसांपूर्वी धुळे शहरात २७/२८ लसीकरण केंद्र चालू झाले आहे. यांचा हजाराच्यापुढे आकडा गेला नाही. आणि हे म्हणतात त्याचे नाव नाही गाव नाही?

म.सभापती — चौकशी अहवाल ऐकून घ्यायचा का आपण?

म.सुनिल बैसाणे — मला बोलू दया पहिले.

म. सभापती — तुम्हाला काय मांडायचे समजेल.

| | |
|---|---|
| म. उपायुक्त | बोगस लसीकरणाबाबत ज्या तक्रारी प्राप्त झाल्या त्यानुसार आयुक्त सो. यांनी माझ्याकडे चौकशी दिली.त्यामध्ये दोन गोष्टी होत्या एस.व्ही.के.एम. ला एक सत्र ओपन झाले त्यामधे शहर आणि ग्रामीण तर त्या दिवशी चर्चा केली हे सत्र ग्रामीण भागाने ओपन केले. त्यात आपले रुरल ऑफिसर यांनी त्यांना पत्र दिले.तुमच्याकडे सत्र ओपन झाले किती व्हॅक्सीनेशन झाले त्या दिवशी ? त्यांनी सांगीतले २३ तारखेला ७७ व्हॅक्सीनेशन झाले परंतु, २८ तारखेला २१५४ व्हॅक्सीनेशन झाले. आणि त्याबाबत आयुक्त साहेबांनी आदेश केला डॉक्टर आणि जो स्टाफ आहे यांचे प्रत्येकाचे मायक्रो ऑडीट करा हा जर गुन्हा असेल तर सायबरकडे गुन्हा दाखल करा त्यामध्ये २ ते ३ दिवस लागतील डॉ.मोरे आणि रवंदळे मॅडम यांना आदेशित केले यावर जे सत्य येईल ते मांडा. |
| म.सुनिल बैसाणे | गिरी साहेब धुळे शहरामध्ये हे खोटे प्रमाणपत्र घेणारे एक विशिष्ट समाजाचे लोकं आहेत. मी त्या समाजाचा उल्लेख करत नाही. परंतु सगळयांना माहीती आहे. |
| म. सभापती | सुनिल भाऊ त्यांना दोषी धरण्यापेक्षा जे करुन देणारे आहेत ना त्यांच्यावर गुन्हे दाखल पुर्णपणे अपेक्षित आहे. |
| म. सुनिल बैसाणे | यात नोडल ऑफिसर जे आहे. तुम्ही गुन्हा का नोदला नाही कापडणीस साहेब?चौकशी अधिकारी नेमण्याचे कारण काय?मी तुमच्या माहितीसाठी सांगतो.कापडणीस साहेबांकडे एवढा मोठा बंच पडलेला आहे. खोटया प्रमाणपत्राचा. मी पहिला डोस घेतल्यानंतर दुसऱ्या डोसला उशिर झाला. १ महिन्या नंतर सुध्दा बॅच नंबर दुसरा आला.औरंगाबाद महापालिकेत सुध्दा असाच प्रकार झाला. त्यांनी तात्काळ गुन्हा नोंदवला जे बोगस प्रमाणपत्र ५ लोकांवर गुन्हा नोंदवला. आणि ज्यांनी करुन दिले त्यांच्यावर गुन्हा दाखल करुन निलंबीत केले. आणि हया गोष्टीला एक ते दीड महीन्यापासून चौकशी चालू आहे. त्याच्यामध्ये जो कोणी असेल ज्याचा सहभाग असेल त्याच्यावर कारवाही करा. हा सायबरचा गुन्हा आहे. तुम्ही गुन्हा नोंद करा चौकशी मध्ये येईल सर्व. आपण त्यांना गुन्हा करु देण्यात मदत करतोय. आगोदरच कोरोनामुळे व्यतीत झालोय.हा गुन्हा नाही का? हा तर देशद्रोहाचा गुन्हा आहे. ही संघटीत गुन्हेगारी आहे. पाचशेने जरी धरले तरी पंधरा लाख रुपये होतात आणि हजारने धरले तर तीस लाख रुपये होतात. फक्त एका दिवसाचे विशिष्ट भागामधे दलाल फिरतायेत. जितका गुन्हेगार दोषी त्याच्यापेक्षा दहापट तुम्ही दोषी आहात. देशद्रोह करतायेत तुम्ही. नागरीकांच्या आरोग्याशी खेळतायेत. बदनामी काय महापालिकेची होणार नाहीये. आपण खोटे काम करणाऱ्यांना पकडून देतोय.धुळे महानगरपालिकेचे चांगले काम असल्यामुळे १ नंबरवर आलोय. ग्रामीणचा अधिकारी दोषी असेल तर त्याच्यावर गुन्हे दाखल करा. सभापती महोदय या प्रकरणावर तत्काळ गुन्हा नोंदवणे गरजेचे आहे. जर तुम्ही नोंदवत नसाल तर आपण एक विषय घ्या आपण स्वत: कुणीतर एक प्रमाणपत्र दया माझ्याकडे पूर्ण लिस्ट आहे. आपण नागरिक म्हणून सुध्दा गुन्हा नोंदवू शकतो. यांनी त्या गुन्हेगाराला मदत करण्याचे काम केले आहे. धुळे महापालिकेच्या चांगल्या असलेल्या कामाला गालबोट लावता आहेत. एस.व्ही.के.एम केंद्रावर एका विशिष्ट समाजाचे हजार-हजार लोकं जात आहे. यदाकदाचित कोरोना कोणाला झाला तर हे अधिकारी दोषी म्हणून मी गुन्हा दाखल करेल. |
| म. सभापती | कालच्या मिटींग नंतर काम गिरी साहेब, कापडनीस साहेब,मोरे साहेब आपण कोणावर गुन्हे दाखल करण्याबाबत निर्णय काही घेतला? आपण बोलत असतांना यांच्या भूमिका ही समजू दया. |
| म.शितल नवले | सभापती महोदय आपल्या दालनात बैठक झाली होती. भले ती अनऑफिशिअल असेल. सि.सि.टी.व्ही. फुटेज मध्ये आली असेल ती त्या दिवसाचे सि.सि.टी.व्ही फुटेज काढा सभापती महोदय मी ठामपणे बोलतो. नाव घेऊन बोलतो. माझ्याकडे कागदं आहेत की त्या परीचारीकांनी आणि डॉक्टरांनी स्पष्टपणे प्रेशराईज केले हे कृत्य करायला असा लेखी कागद आहे आपल्याकडे तुम्हालाही दाखवला दुसरी गोष्ट आयुक्त साहेबांनी जी चौकशी समीती बसवली ती बसवायलाच नव्हती पाहिजे. उपायुक्तांना अधिकार दिले. कशासाठी दिले?आणि उपायुक्त इन कॅमेरा असे त्यांच्याकडून लिहून घेतायेत आम्हाला ऐकायला मिळाले की असा काही प्रकार घडलेला नाही. माझे म्हणणे जर गुन्हेगारी घडली होती ,स्पष्ट पणे डॉ. मोरेंचे नाव त्यात आले होते. तत्काळ डॉ. मोरेंना कार्यमुक्त का नाही केले? सभापतींच्या दालनात स्पष्टपणे त्या परीचारकांनी नाव घेतले. आणि लेखी कागदपण दाखवला आहे. |

आयुक्त पण होते त्यांनी स्पष्ट केले खरोखर असा भ्रष्टाचार झालेला आहे. आणि अशा प्रकारचे प्रमाणपत्र वाटण्यात आले आहे. आयुक्त साहेबांच्या तोंडातले शब्द आहे यात मनपाची बदनामी होते म्हणून.आणि झी २४ तास ने ती बातमी दाखवली पण. क्रेडीट घेता ना तुम्ही कोरोना मुक्त झालो. भ्रष्टाचार केला त्याचे पण क्रेडीट घ्या.आयुक्तांना माहिती होते त्यांनी गुन्हा दाखल का नाही केला.

| | |
|---|---|
| म.आरोग्यधिकारी | या बाबतीमधे डॉ. मोरें चे जे नाव झाले आहे. तर संबंधीत वैद्यकीय अधिकाऱ्यांनी माझ्याकडे त्या अधिकाऱ्यांनी पाटवलेला व्हॉटसअप पुरावा नाही,परंतु लसी करणाची जबाबदारी असलेल्या डॉ. रवंदळे यांनी संबंधीत केंद्रावरील कर्मचाऱ्यांना ३ तास बसवले. त्यांनां दम दिला की तुमच्यावर एफ.आय.आर. दाखल करु,दंड करु,तुम्हांला तुरुंगात टाकू. आरोग्यधिकाऱ्यांच्या नावाने आम्हाला लेखी दया. |
| म.शितल नवले | एका महिले बाबत तुम्ही चुकीचे बोलता आहात. |
| म.सभापती | महिला डॉक्टर कशी दादागिरी करेल? |
| म.शितल नवले | ज्या माणसाने गुन्हेगारी केली ज्यांच्यावर आरोप आहेत त्यांच्याकडून काय उत्तर अपेक्षित करता तुम्ही. |
| म.आरोग्यधिकारी | त्या दिवशी मी गिरी साहेबांना फोन करुन सुध्दा विचारले. |
| म. शितल नवले | मी आयुक्तांना उत्तर मागतोय, की तुमचयाकडे लेखी स्वरुपात तक्रार दाखल झाली होती. तुम्ही गुन्हाच दाखल का नाही केला? |
| म. सभापती | कापडणीस साहेब तुम्ही अयुक्तांच्या वतीने खुलासा करा. |
| म.शितल नवले. | आयुक्तांना बोलवा. आम्हाला ज्यांच्याकडे तक्रार नोंदवली आयुक्तांकडे त्या आयुक्तांकडून उत्तर पाहिजे. जो पर्यंत गुन्हेगारांचे नाव येते त्याला त्या कार्यापासून लांब का ठेवत नाही. डॉ. मोरेंकडून उत्तराची अपेक्षा आहे ना डॉ. रवंदळे कडून. डॉ. मोरे तुम्ही सभापतींच्या परवानगीशिवाय बोलू शकत नाही. ज्यांच्या नावाने पत्र देण्यात आले होते ते उत्तरदायी आहे. सगळयात भ्रष्ट विभाग आहे तो आरोग्यविभाग आहे. प्रत्येक बाबतीत चौकशी समीती. बांबूचे प्रकरण पण यांचेच ,लसीकरण प्रकरण पण यांचेच. हे चौकशा बंद करा. पहिले तर गुन्हा दाखल करा. आमची मागणीच ती आहे. प्रकरणे आपण बाहेर काढतो अधिकाऱ्यांचे आणि आपलेच लोकं आपल्या जिवावरती त्यांचे भांडवल करुन आपल्याला बदनाम करतायेत. जर राज्यस्तरीय न्यूज चॅनेज ही बातमी इतक्या वेगाने घेते आणि आपण परत चौकशी समीती. काय करता त्या चौकशीची? |
| म.सभापती | गिरी साहेब तुम्ही आता जे बनावट देत होते सर्टीफिकेट ज्यांनी ॲप वैगरे तयार केले. काय-काय केले तुम्ही? लोकं समोर असून सुध्दा त्यांना शोधू शकत नाही. |
| म.उपायुक्त | सभापती साहेब आता काल आयुक्त साहेबांच्या दालनात मिटींग घेतली तयामधे दोघं अधिकाऱ्यांकडून कुठे-कुठे आणि कसे –कसे व्हॅक्सीनेशन झालेय याची माहिती घेतली. त्याला कमीत कमी २ ते ३ दिवस लागतील. |
| म. सभापती | कोणत्या ॲपद्वारे दिले हे सिध्द झाले. ज्यांच्या मोबाईल मधुन दिले गेले ते नंबर आपल्याकडे आहे. |
| म.उपायुक्त | त्याच्यामधे जे दोषी असतील त्यांच्यावर गुन्हा दाखल होणारच आहे. |
| म.शितल नवले. | त्यांनी कबुल केले कॅबीनमध्ये कागद आहे आपल्याकडे. गुन्हा दाखल करा ना एक कडी सापडली आख्खी चैन सापडेल ना. |
| म.सुनिल बैसाणे | एक साधी गोष्ट आहे. ऑफिसची नस्ती हरवली तर आपण आज्ञातांवर गुन्हा नोंदवतो का नाही? ते सायबरला जर हा गुन्हा नोंदवायला दिला असता. अधिकाऱ्याला सांगीतले असते. पोलीसांनी आपले काम केले असते. आपले कर्तव्य काय? मालेगांव महापालिकेने धुळे मनपाला पत्र दिले आहे. जिल्हा प्रशासनाला पत्र आले आहे. |
| म. सभापती | चौकशी म्हणजे सोपा विषयआहे. ज्या सायबर वाल्यांनी दिले ते सायबर वाले जे ऑफलाईन मधुन दिलेले ते ऑफलाईन मधुन रेकॉर्ड शोधायचे आहे. चौकशी करता काय आहे आपण? ४-४ तास आयुक्तांकडे बसून काही उपयोग नाही. |
| म. शितल नवले | बोलवा आयुक्तांना आम्ही मागणी करतो. |
| म. सभापती | चौकशीच्या नावाखाली दोषी शोधायचे. आपण दोषी शोधलेलेच नाही. |

| | |
|---|---|
| म.उपायुक्त | दोषी शोधायलाच आपल्याला सर्वांचे रिपोर्ट आल्यानंतरच आपण त्याचयावर कार्यवाही करु शकतो. |
| म.शितल नवले | सभापती महोदय ही सभा आयुक्त आल्याशिवाय चालणार नाही. तुम्हाला टाईम बदलायचा असेल तर टाईम बदलून घ्या. |
| म.सुनिल बैसाणे | सन्माननिय सदसयांना विनंती आहे. जर तुम्हाला धुळे शहराच्या नागररिकांनी या ठिकाणी निवडून दिल्या नंतर तुमचे कर्तव्य पार पाडावे जर आयुक्त येत नसतील तर सभात्याग करुन ही सभा तहकूब करण्यात यावी. आज गुन्हा दाखल झालाच पाहिजे. |
| म. शितल नवले | एक गुन्हा दाखल होऊ दया चौकशी समीत्या बंद होऊन जातील. |
| म. सभापती | चौकशी समीतीला काहीच अर्थ नाही. |
| म. सुनिल बैसाणे | सिध्द झालेला गुन्हा आहे. खोटे प्रमाणपत्र लिस्ट दिली आहे. आणि ते कोणी महिला असो वा पुरुष असो त्याच्याशी घेणं- देणं नाही. |
| म.नागसेन बोरसे | तुमच्या कॅबीनमध्ये चर्चा झाली. कुठ-कुठे केंद्र नियुक्त झाले. कोण-कोणत्या केंद्रावर हा भ्रष्टाचार झाला आहे. ज्या केंद्रावर हा भ्रष्टाचार झाला असेल ते केंद्र वगळण्यात यावे ज्या केंद्रावर भ्रष्टाचार नसेल त्याची चौकशी व्हावी. |
| म.सभापती | आपण प्रशासनाकडून अपेक्षा करतो. ते करत नाही. म्हणून चौकशी समीत्या नेमतो. किती प्रकरणांवर समीत्या नेमणार आपण आयुक्तांकडून ऐकू. त्यांच्याकडे दिले लेखी. |
| म.अति आयुक्त | दालनामध्ये अनौपचारीक चर्चा झाली त्या मधे रश होता. सगळयांनी मुद्दे मांडले. त्या व्यतीरिक्त विषय त्यावर माहीती नाही देऊ शकत. |
| म. शितल नवले | साहेब आता हे म्हणतायेत माझ्याकडे टिपणी तयार आहे. साबर गुन्हा दाखल करण्याची का टिपणी थांबवली? हे तुम्ही सांगाल का? हा आपल्या इथे घडलेला गुन्हा आहे. |
| म. सुनिल बैसाणे | आज गुन्हा दाखल करण्यासाठी सांगीतले पाहिजे. अशी-अशी चौकशी झाली. असे-असे लेखी प्राप्त झाले. म्हणून आज आम्हाला गुन्हा दाखल करायचा आहे. |
| म.नागसेन बोरसे | यांनी टिपनी कधी दाखल केली त्याची तारीख दया आम्हाला. |
| म. सभापती | त्यांची टिपनी होऊन डॉ. मोरेंची सही २४/१२/२०२१ ला झाली. |
| म.नागसने बोरसे | त्यानंतर परीचारीकांनी किती तारखेला दिले त्यांच्या दबावाखाली करतो असे त्यांनी कधी अर्ज दिला. आम्हाला समजू दया. नेमके काय हे आम्हाला समजेल. |
| म. सुनिल बैसाणे | नोडलअधिकाऱ्याचीजबाबदारी आहे.नोडल अधिकारी त्यांची जबाबदारी नाकारु शकतनाही. आम्हाला आयुक्तांचे उत्तर पाहिजे.आज गुन्हा नोंदवणार की नाही नोंदणार? त्याचा पाठपुरावा आम्ही करु. |
| म.आरोग्याधिकारी | काही कर्मचाऱ्यांनी डॉ. मोरेंनी दबाब आणला असे लिहून दिले असेल, ते कर्मचारी येथे येऊन सांगायला तयार आहे. की कबीरगंज या ठिकाणी या पध्दतीने अगोदर नमुद केलेआहे. कर्मचाऱ्यांवर दबाव आणून आरोग्यधिकाऱ्यांच्या दबावामधे लिहून घेतल्या संदर्भात सगळयांना व्हॉटसअप मॅसेज केला होता त्या अर्जाचा व्हॉटसअप सुध्दा ते कर्मचारी दाखवतील. |
| म. सभापती | विषय असा आहे, आपल्याला हे साक्षीदारांचे जबाब घ्यायचे नाही. |
| म. नागसेन | ज्यावेळी सभा सदस्य आरोप करतायेत, हे कोर्ट नाही.ज्यावेळी यांनी त्यांवर कार्यवाहीसाठी टिपणी फिरवली. |
| म.आरोगयाधिकारी | ऑनलाईन एस.व्ही.के.एम. केंद्रावर इश्यु क्रियेट झाला आहे लसीकरणाचा, याच्या संदर्भातला आयडी आणि पासवर्ड हा नोडल अधिकाऱ्यांकडे असतो. त्याबद्दल मलासुध्दा माहिती नाही. त्यांच्या आयडी पासवर्ड ने सेशन तयार करायचे असतात. त्यांनी काम झाल्यावर क्लोज करायचे असते. त्यांच्या कामकाजाची माहिती ही त्यांची जबाबदारी असते. |
| म.सभापती | या ठिकाणी सभा मी तहकूब करत आहे.आजची तहकूब झालेली सभा आयुक्तांकडे वेळ घेऊन निश्चित करण्यांत येईल व त्यानुसार आपणास कळविण्यांत येईल. **सही/-x x x** |

**सभापती,**
**स्थायी समिती,**
**धुळे महानगरपालिका,धुळे**

**धुळे मनपा भारतरत्न अटलबिहारी वाजपेयी सभागृह**
**गुरुवार दिनांक ०६/०१/२०२२**
**वेळ :- दुपारी ३-०० वाजता.**

धुळे महानगरपालिका स्थायी समितीची सभा क्रं. २६ दि.३०/१२/२०२१ रोजी तहकूब करण्यांत आलेली सभा शासनाच्या दि. ३ जानेवारी २०२२ रोजीच्या नवीन सुचनानुसार ऑन लाईन पध्दतीने गुरुवार दिनांक ०६/०१/२०२२ रोजी **दुपारी ३-०० वाजता** मा. श्री. संजय सुधाकर जाधव, सभापती, स्थायी समिती, मनपा, धुळे यांच्या अध्यक्षतेखाली **धुळे मनपा भारतरत्न अटलबिहारी वाजपेयी सभागृह** भरली. ऑनलाईन सभेस खालील सन्मा.सदस्य सभागृहात हजर होते.

| अ.क्रं. | सदस्यांचे नांव | हुद्दा |
|---|---|---|
| १ | श्री. जाधव संजय सुधाकर | सभापती |
| २ | श्री. बैसाणे सुनिल तुळशिराम | सदस्य |
| ३ | श्रीमती माळी भारती अशोक | सदस्या |
| ४ | श्रीमती पाटील मंगला सुरेश | सदस्या |
| ५ | श्रीमती बोरसे पुष्पा प्रकाश | सदस्या |
| ६ | श्री. मासुळे अमोल पावबा | सदस्य |
| ७ | श्री. देवरे कमलेश नारायण | सदस्य |
| ८ | श्रीमती पठाण हिना अस्लम | सदस्या |
| ९ | श्री. सईद बेग हाशम बेग | सदस्य |
| १० | श्री. नवले शितल मोहन | सदस्य |
| ११ | श्री. बोरसे नागसेन दामोदर | सदस्य |
| १२ | श्रीमती कुलेवार किरण राकेश | सदस्या |
| १३ | श्रीमती वराडे वैशाली भिकन | सदस्या |
| १४ | श्री. जाधव बन्सीलाल माणिक | सदस्य |
| १५ | श्रीमती चौधरी मंगला अर्जुन | सदस्या |
| १६ | श्री. पटेल अमीन अब्दुल करीम | सदस्य |

**उपस्थित अधिकारी गण**

| अ.क्र. | अधिकाऱ्यांचे नाव | हुद्दा |
|---|---|---|
| १ | श्री. देविदास टेकाळे | आयुक्त |
| २ | श्री. नितीन कापडणीस | अति. आयुक्त |
| ३ | श्रीमती पल्लवी शिरसाठ | सहा. आयुक्त |
| ४ | श्री. एन.पी. सोनार | सहा. आयुक्त |
| ५ | श्री.,दिनकर जाधव | मुख्य लेखाधिकारी |
| ६ | श्री. मनोज अरविंद वाघ | प्र. नगरसचिव |
| ७ | श्री. पी.डी. चव्हाण | प्र. नगररचनाकार |
| ८ | डॉ. महेश मोरे | आरोग्याधिकारी |
| ९ | श्री. चंद्रकांत जाधव | सहा.आरोग्याधिकारी |
| १० | श्री. रमजान अन्साररी | कार्यालय अधिक्षक |
| ११ | श्री. एन.के. बागुल | विद्युत अभियंता |
| १२ | श्री. सी.सी. बागुल | पा. पु. ओव्हरसिअर |
| १३ | श्री. सी.एम. उगले | अभियंता पा.पु. वि. |
| १४ | श्री. हेमत पावटे | ओव्हरसिअर बां.वि. |
| १५ | श्री. महेंद्र सोनवणे | प्रशासन अधिकारी मनपा शिक्षण मंडळ |

| | | |
|---|---|---|
| १६ | श्री. किशोर सुडके | बाजार विभाग |
| १७ | श्री. राजकुमार सुर्यवंशी | प्र.अधिक्षक परवाना विभाग |
| १८ | श्री. प्रसाद जाधव | अतिक्रमण विभाग |
| १९ | श्री. सुक्राम राऊत | वाहन विभाग |

म.सभापती सर्व उपस्थित सन्मा.सदस्य आयुक्त सो.अधिकारी वर्ग छायाचित्रकार बांधव सभेचे कामकाज चालविणेसाठी आवश्यक तो कोरम पूर्ण झाल्याने नगरसचिव यांनी सभेचे कामकाज सुरुवात करावी.

म. नगरसचिव वंदे् मातरम् या राष्ट्रवंदनेसाठी सर्वांनी उभे रहावे.

**सन्मा.सदस्यांकडून आलेली श्रध्दांजली यादीचे वाचन नगरसचिव यांनी केले.**

यादी देण्यांत येते की, शेकडो अनाथ,निराधार जीवांना आपल्या मायेच्या पदराखाली घेत आधार देणा-या व अनाथाची माय म्हणून अवघ्या देशात ओळखल्या जाणा-या ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्त्या पदश्री पुरस्कार प्राप्त सिंध्दुताई सपकाळ यांचे दि. ४/१/२०२२ मंगळवार रोजी हृदविकाराच्या झटक्याने दु:खद निधन झाले. सामाजकार्याचा उत्तम गुण्वत्तेचा खणखणीत पुरावा म्हणजे सिंधुताई सपकाळ, अनेकांना नवजीवन देणा-या, संसा उभा करणा-या अनेक अनाथ मुलामुलीच्या माता म्हणून जगभरात परिचीत होत्या. अत्यंत कष्टप्रद, वेदनादायी जीवन त्यांच्या वाटयाला आलेले पण त्यातूनही त्यांनी मार्ग काढत आयुष्याच सोन केले होते. अनेक पुरस्कार सन्मान त्यांच्या वाटयाला आले हीच सिंधुताईच्या कर्तत्वाची ज्योत अखंड तेवत होती ती ज्योत मालवली.

अशा या थोर अनाथांच्या आईला सिंधुताई सपकाळ यांना आज रोजीच्या स्थायी समितीमध्ये श्रध्दांजली वाहून तसा ठराव पारीत करण्यांत यावा.

सूचक :- श्री. सुनिल तुळशीराम बैसाणे, मा. सभापती स्थायी समिती मनपा धुळे

याच आशयाची यादी सन्मा. सदस्य श्री.अमोल पावबा मासुळे यांनी देखील सादर केलेली आहे.

म.सभापती सर्व सन्मा. सदस्यांच्या यादीनुसार सिंधुताई सपकाळ यांना दोन मिनिटे मौन उभे राहून भावपूर्ण श्रध्दांजली समर्पित करण्यांत येत आहे.

**धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर १८४ दिनांक ०६/०१/२०२२**

सन्मा.सदस्यांच्या यादीनुसार शेकडो अनाथ,निराधार जीवांना आपल्या मायेच्या पदराखाली घेत आधार देणा-या व अनाथाची माय म्हणून अवघ्या देशात ओळखल्या जाणा-या ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्त्या पदश्री पुरस्कार प्राप्त सिंध्दुताई सपकाळ यांचे दि.४/१/२०२२ मंगळवार रोजी हृदविकाराच्या झटक्याने दु:खद निधन झाले. सामाजकार्याचा उत्तम गुण्वत्तेचा खणखणीत पुरावा म्हणजे सिंधुताई सपकाळ, अनेकांना नवजीवन देणा-या, संसा उभा करणा-या अनेक अनाथ मुलामुलीच्या माता म्हणून जगभरात परिचीत होत्या.अत्यंत कष्टप्रद, वेदनादायी जीवन त्यांच्या वाटयाला आलेले पण त्यातूनही त्यांनी मार्ग काढत आयुष्याच सोन केले होते. अनेक पुरस्कार सन्मान त्यांच्या वाटयाला आले हीच सिंधुताईच्या कर्तत्वाची ज्योत अखंड तेवत होती ती ज्योत मालवली.अशा या थोर अनाथांच्या आईला सिंधुताई सपकाळ यांना भावपूर्ण श्रध्दांजली समर्पित करण्यासाठी उपस्थित सर्वानी दोन मिनिटे मौन उभे राहून त्यांना आदराजली समर्पित करुन तसा ठराव पारीत करण्यांत येत आहे.

सुचक:- श्री. सुनिल तुळशीराम बैसाणे
अनुमोदक:- श्री.अमोल पावबा मासुळे

**सर्वानुमते मंजुर,**
**सही/-x x x**
**सभापती,**
**स्थायी समिती,**
**धुळे महानगरपालिका धुळे**

आज दर्पनकार आचार्य बाळ शास्त्री जांभेकर यांनी महाराष्ट्रात प्रथम नियतकालिक सुरु केले त्याचा आज वर्धापन दिन. आज संपूर्ण महाराष्ट्रात त्यानिमित्ताने पत्रकार दिन म्हणून साजरा केला जातो. या पत्रकार दिनाच्या निमित्ताने आपल्या सभागृहात पत्रकार बांधव उपस्थित असून त्यांना या पत्रकारदिनाच्या निमित्ताने शुभेच्छा देण्यांत येत असून यासाठी सर्वानी व्यासपिठाकडे येवून शुभेच्छा स्विकाराव्यात असे सभापती स्थायी समिती यांनी बैठकीच्या प्रारंभी विदीत केले.

विषय क्रमांक:-१६९ मागील स्थायी समिती सभेचे इतिवृत्त वाचून कायम करणे. (९/१२/२०२१)

म. नगरसचिव नगरसचिव यांनी विषयांचे वाचन केले.

म. शितल नवले मागील सभेचे इतिवृत्त वाचून कायम करण्यांत यावे.

म. सभापती सर्व सनमा. सदस्यांच्या सहमतीने मागील स्थायी समिती सभा दि. ९/१२/२०२१ चे इतिवृत्त वाचून कायम करण्यांत येत आहे.

**धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर १८५दिनांक ०६/०१/२०२२**

मागील स्थायी समिती सभा दिनांक ९/१२/२०२१ चे सभेतील ठराव नंबर १६० ते १७५ अखेर तसेच सभेस सन्मा. सदस्यांनी केलेली चर्चा व त्यावरील निर्णय क्रमशः वाचून कायम करण्यांत येत आहे.

सही/-xxx

**सभापती,**
**स्थायी समिती,**
**धुळे महानगरपालिका, धुळे**

विषय क्रमांक:- १७० धुळे मनपा कडील पाणीपुरवठा विभागातील रसायन तज्ञ (मानधनावरील) कर्मचा-यांना पुढील ०६ महिने कालावधीसाठी फेर मुदतवाढ देणेबाबत आलेल्या कार्यालयीन अहवालावर विचार करणे.

म. नगरसचिव नगरसचिव यांनी विषयांचे वाचन केले.

म.सुनिल बैसाणे मागच्या वेळेसही या विषयात हर्षदा गवळे म्हणून केमिस्ट आहेत त्या वेळी देखील मी रसायन तज्ञ म्हणून त्यांना समाविष्ट करण्यांची मागणी केली होती. त्यांत श्रध्दा पाटील आणि गोसावी यांची शैक्षणिक पत्रात कमी असतांना सुध्दा हर्षदा गवळे यांना मानधन तत्वावर न घेता त्यांना आस्था संस्थेकडुन मानधनावर घेतले गेले आहे. त्यांची शैक्षणिक पात्रता असतांना सुध्दा त्या हया पदापासून वंचित आहे. त्यांचा कामाचा अनुभव आणि शैक्षणिक पात्रतानुसार त्यांना समाविष्ट करण्यात यावे. मागेच्या सभेला ज्यावेळेस त्यांना मंजूरी दिली. त्यावेळी मी प्रश्न उपस्थित केला होता. त्याबाबत हि काही विचारच केला नाही. आणि पुन्हा त्यांना ६ महिन्याची मुदतवाढ देत आहे. ख-या अर्थाने शैक्षणिक पात्रता आणि त्या क्षेत्रात पात्रताधारक असलेली व्यक्ती वलवाडी पाणी पुरवठावर येथे काम करीत आहेत. यामध्ये त्यांच्या बाबतीत न्याय दिलेला नाही याबाबत प्रशासनाने खुलासा करावा.

म.रमजान अन्सारी ग्रामपंचायतीचे जे कर्मचारी वर्ग झालेले होते. त्यामध्ये १ हर्षदा गवळे ही महिला कर्मचारी होती. ते २०१५ नंतर आकृतीबंधानुसार त्यांची नेमणुक झालेली होती .म्हणून त्यांना आपण मानधनावर घेतलेले नव्हते. शासनाचा जीआर होता हस्तांतरण करण्यापुर्वी १ अधिसुचना निघाली होती त्यांच्या नंतर जे लागले आहेत त्यांना मनपामध्ये घ्यावयाचे नाही. त्यामुळे त्यांना आपण कमी न करता त्यांना ठेकेदारामार्फत काम घेतलले आहे.

म.सुनिल बैसाणे मी प्रश्न उपस्थिती केला होता. त्यांची शैक्षणिक पात्रता निवडीसाठी जे जे मेरीट लागते ते त्यांकच्याकडे होते. आपली ११ खेड्डी कधी समाविष्ट झाली.

म.रमजान अन्सारी २०१५ पुर्वीचे जे कर्मचारी होते. त्यांना आपण ठेवलेले आहे.नंतरचे जे ४५कर्मचारी आहेत त्यांना ठेकेदारामार्फत ठेवलेले आहे. पहिली अधिसुचना निर्गमित केलेली होती त्यांनुसार जे अधि कामावर होते त्यांना आधी कामावर घेतले आहे.

म.सुनिल बैसाणे आत हे जे २आहेत.पाटील आणि गोसावी यांची रसायनतज्ञ म्हणून निवड केलेली पात्रता योग्य आहे का.

म.रमजान अन्सारीनिवड समितीमार्फत यांची निवड झालेली आहे.

म.सुनिल बैसाणे याबाबतची काही तक्रार झालेली आहे का काय तक्रार झालेली आहे.

म.रमजान अन्सारीहो मागे तक्रार झालेली आहे की, त्यांनी या विषयात पदवी प्राप्त केलेली नाही.

म.सुनिल बैसाणे अति.आयुक्त साहेब जर रसायनतज्ञ हे धुळेकर नागरीकांच्या आरोग्याच्या दृष्टीने महत्वाचे आहे. त्या दोन्हीच्या बाबतीत जर रसायन तज्ञ म्हणूनच पात्र नाही आहे. अशा व्यक्तीची तक्रार सन्मा.सदस्यांनी केलेली आहे. त्यामध्ये चौकशी नियुक्ती झाली त्यामध्ये काय झाले ते आम्हाला माहिती नाही जो खऱ्या अर्थाने रसायनतज्ञ म्हणून पात्राताधारक व्यक्ती आहे ते कोणी आमचे नातेवाईक नाही. पण धुळेकर

नागरीकांच्या आरोग्याच्या दृष्टीने महत्वाचे नाही. जर तुम्ही पात्रताधारक व्यक्तीला मानधन तत्वावर न घेता ठेकेदाराच्या संस्थेत पगारावर आहे.पण रसायनतज्ञ म्हणूनच त्यांची नियुक्त झाली पाहिजे होती तुमचा उद्देश काय आहे तो रसायन तज्ञ पाहिजे मग तो २०१५ नंतर झालेला असो की २०१८ नंतर झालेला असो.

म.रमजान अन्सारी त्यांनी पदवी प्राप्त केलेली आहे. गोसावी यांनी ऑर्गेनिक या विषयामध्ये पदवी प्राप्त केलेली आहे याबाबतीत आपण महाविद्यालयाकडे पत्र दिलेले होते त्यांनी आपल्याला असे उत्तर दिले आहे की ही पदवी समतुल्य आहे.

म.सुनिल बैसाणे हया हर्षदा गवळे यामध्ये पात्र असतील जर तुम्हाला धुळेकर नागरीकांच्या जीवाशी खेळायचे असेल तर आस्थापना विभागचे प्रमुख म्हणून हे देखील जबाबदार राहतील.

म.शितल नवले सभापती महोदय आपण यांना फेरनियुक्त देत आहोत. या शहराच्या ६ लाख लोकसंख्येला जी पाणीपुरवठा योजना चालते जे पाणी पुरविले जाते त्यांच्यात जे केमिकल वापरले जाते शुध्दीकरणासाठी असेल याला ईजिनियरींगमध्ये अभ्यासक्रम आहे. या गोष्टीला या ठिकाणी ईजिनियर लेव्हलाचा व्यक्ती नियुक्त केला पाहिजे होता. म्हणजे रोजच्या रोज टेस्ट करतो की नाही आपण चुकीच्या व्यक्तीला बसवून ६ लाख लोकाच्या जीवाशी खेळतो आहोत.

म.नागसेन बोरसे हा जो प्रश्नउपस्थिती झाला आहे. आज आपल्याला किती लोकांची गरज आहे. रसायनतज्ञाची किती आवश्यकता आहे.आपले फिल्टर प्लॅन्ट किती आहेत एक फिल्टर प्लॅनवर किती माणसे पाहिजे एकच माणुस पुर्ण २४ तास काम करतो का तो कशाला तपासयाला येईल यांची डयुटी ८ तासांची आहे. पाणी फिल्टर करतो २४ तास तर माझे असे म्हणे आहे की, आपल्याला आवश्यकता आहे किती लोकांची त्यांना मुदतवाढ द्याची नाही आता किती आवश्कता आहे. त्यांची इंटरव्हयु घ्या त्यांची पात्रता तपासा ८ दिवसाच्या आत आणि ही जी महिला आहे गवळे हिला हि बोलवा आपल्या आस्थापनावर किती कर्मचारी आहेत. फिल्टर प्लॅट किती आहेत.

म.रमजान अन्सारी४ फिल्टर प्लॅन आहे.

म.नागसेन बोरसे माणसे २ आणि फिल्टर प्लॅट ४?

म.सी.सी.बागुल ४ फिल्टर प्लॅन आहे ३ केमिस्ट आहेत. त्यापैकी वलवाडीला हर्षदा गवळे आणि श्रध्दा पाटील यांना हनुमान टेकडी आणि डेडरगांव फिल्टर प्लॅनवर तर गोसावी हे बाभळे जलशुध्दीकरण केंद्रावर आहेत.

म.नागसेन बोरसे बाभळे फिल्टर प्लॅनवरून धुळे शहराच्या ७० टक्के भागाला पाणी पुरवठा होतो आणि अपात्र व्यक्ती त्या फिल्टर प्लॅन्टवर दिला आहे.

म.सभापती कापडणीस साहेब याकडे आपण लक्ष द्या काही बदल करा.

म.शितल नवले साहेब जी जाहिरात काढली होती त्याला काही बेस होता का याला ईजिनियरच पाहिजे आपल्याकडे फिल्टरेशन साठी वेगळा विषय आहे.

म.नागसेन बोरसे या दोन लोकांचे विषय मुदतवाढीसाठी आलेले आहे या दोन लोकांचा मुदतवाढीचा विषय नामंजूर करावा.

म.सभापती सर्व सन्मा. सदस्यांच्या सहमतीने सदर प्रस्ताव नामंजूर करण्यांत येत आहे. प्रशासनाने तांतडीने नवीन जाहिरात काढून पात्र उमेदवांराना नियुक्ती देणेबाबत कार्यवाही करावी.

**धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर १८६ दिनांक ०६/०१/२०२२**

धुळे मनपा कडील पाणीपुरवठा विभागातील रसायन तज्ञ (मानधनावरील) कर्मचा-यांना पुढील ०६ महिने कालावधीसाठी फेर मुदतवाढ देणेबाबतचा प्रस्ताव सभागृहासमोर मंजुरीसाठी सादर झाला

असता उपस्थित सदस्यांनी केलेल्या चर्चेनुसार सदर फेर मुदतवाढीचा प्रस्ताव नामंजूर करण्यांत येत आहे.प्रशासनाने तांतडीने नवीन जाहिरात काढून पात्र उमेदवारांना नियुक्ती देणेबाबत कार्यवाही करावी.

सुचक:- श्री. सुनिल तुळशीराम बैसाणे

अनुमोदक:- श्री. नागसेन दामोदर बोरसे

**सर्वानुमते मंजुर,**

सही/-xxx

**सभापती,**

**स्थायी समिती,**

**धुळे महानगरपालिका धुळे**

| | |
|---|---|
| विषय क्रमांक:- १७१ | धुळे मनपा कडील लिपीक टंकलेखक (संगणक ऑपरेटर) मानधनावरील यांना पुढील ०६ महिने कालावधीसाठी फेर मुदतवाढ देणेबाबत आलेल्या कार्यालयीन अहवालावर विचार करणे. |
| म. नगरसचिव | नगरसचिव यांनी विषयांचे वाचन केले. |
| म. सुनिल बैसाणे | विषय मंजूर करण्यांत यावा. |
| म. सभापती | सर्व सन्मा. सदस्यांच्या सहमतीने व कार्यालयीन अहवालास अधिन राहून सदर प्रस्तावास मान्यता देण्यांत येत आहे. |

**धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर १८७ दिनांक ०६/०१/२०२२**

धुळे महानगरपालिकेतील विविध विभागासाठी " **लिपीक टंकलेखक (संगणक ऑपरेटर) मानधनावरील**" पद भरण्याबाबत **दैनिक दिव्य मराठी** या वृत्तपत्रात सविस्तर जाहिरात प्रसिध्द करण्यात करण्यात आली होती. त्यानुसार श्रीमती वर्षा छबिलाल माळी मानधनावरील संगणक ऑपरेटर यांना नियुक्ती आदेश देण्यात आले होते .

मंजूर कार्यालयीन अहवालानुसार उक्त कर्मचा-यांस मुदतवाढ देण्यात आली होती. सदर कर्मचारी यांची दि. ६/१२/२०२१ रोजी नियुक्तीची मुदत संपुष्ठात येत आहे.

लेखापाल यांनी श्रीमती वर्षा छबिलाल माळी, मानधनावरील संगणक ऑपरेटर यांची कामाची आवश्यकता व निकड पाहता मुतदवाढ देण्याबाबत पत्र सादर केले आहे.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ५३ (३) मध्ये नमुद केले आहे की, या अधिनियमात अन्यथा तरतूद केली असेल त्या व्यतिरिक्त, नगरपालिका अधिकारी व कर्मचारी मग ते कायम असोत किंवा तात्पुरते असोत त्यांची नेमणुक करण्याचा अधिकार आयुक्तांकडे निहित असेल. परंतु कायम नेमणुकांच्या बाबतीत असा अधिकारी कलम ५१ अन्वये तयार केलेल्या व मंजुर केलेल्या त्यावेळी अंमलात असलेल्या विवरणपत्राच्या अधीन असेल. आणखी असे की, आयुक्तास स्थायी समितीच्या पुर्व मंजुरी वाचून कोणतीही तात्पुरती नेमणुक सहा महिन्यांहून अधिक असेल अशा कोणत्याही कालावधीसाठी करता येणार नाही आणि (लिपीक या पदाशी समतुल्य, असलेल्या किंवा त्यापेक्षा उच्च दर्जाच्या पदाच्या वेतनाएवढे अथवा त्याहून अधिक वेतन असलेल्या) कोणत्याही नेमणुकीचे उक्त सहा महिन्यांचा कालावधी संपल्यांनतर नवीकरण करता येणार नाही. असे अधिनियमात नमुद आहे .

उपरोक्त अहवालानुसार लेखा विभागाच्या अहवालानुसार कर्मचा-याची कामाची निकड पाहता मुदत संपुष्ठात आल्याच्या दिनांकापासून ५ दिवसाचा खंड देवून पुढील ०६ महिने कालावधीकरीता श्रीमती वर्षा छबिलाल माळी, यांना एकत्रित मानधनावर रु. १०,०००/- मात्र नुसार पुनश्च:फेर नियुक्ती देणेबाबतचा विषय महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ५३ (३) अन्वये मे. स्थायी समितीपुढे निर्णयार्थ सादर झालेला आहे.

सर्व सन्मा.सदस्यांच्या सहमतीने व कार्यालयीन अहवालास अधिन राहून लेखा विभागाच्या अहवालानुसार कर्मचा-याची कामाची निकड पाहता मुदत संपुष्ठात आल्याच्या दिनांकापासून ५ दिवसाचा खंड देवून पुढील०६ महिने कालावधीकरीता श्रीमती वर्षा छबिलाल माळी, यांना एकत्रित मानधनावर रु.१०,०००/- मात्र नुसार महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ५३ (३) अन्वये

मुदतवाढ देण्यांस कार्योत्तर मान्यता देण्यांत येत आहे. सदर प्रस्ताव व कार्यवाही बाबत लेखा आक्षेप निर्माण होणार नाही याची दक्षता घ्यावी. याबाबतची जबाबदारी संबंधित विभागाची राहील.

सुचक:- श्री. सुनिल तुळशीराम बैसाणे

अनुमोदक:- श्री. नागसेन दामोदर बोरसे

**सर्वानुमते मंजुर,**

सही/-xxx

**सभापती,**

**स्थायी समिती,**

**धुळे महानगरपालिका धुळे**

विषय क्रमांक:- १७२ विकास शुल्क निधी अंतर्गत १०० फुटी रस्ता वैभव नगर ते चितोड नाका पावेतो रस्ता डांबरीकरण करणे व दुभाजक करणे या कामाचे निविदा दर मागविण्यांत आलेत त्याबाबत आलेल्या कार्यालयीन अहवालावर विचार करणे.

म. नगरसचिव नगरसचिव यांनी विषयांचे वाचन केले.

म. अमोल मासुळे विषय मंजूर करण्यांत यावा.

म. सभापती सर्व सन्मा.सदस्यांच्या सहमतीने व कार्यालयीन अहवालास अधिन राहून सदर प्रस्तावास मान्यता देण्यांत येत आहे.

**धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर १८८ दिनांक ०६/०१/२०२२**

विकास शुल्क निधी अंतर्गत १०० फुटी रस्ता वैभव नगर ते चितोड नाका पावेतो रस्ता डांबरीकरण करणे व दुभाजक करणे या कामाबाबत धुळे महानगरपालिका मे.स्थायी समिती ठराव नं.१६ दि.२५/३/२०२१ अन्वये उक्त कामाबाबत रक्कम रु.३,५४,९९,७२०/- मात्र खर्चाचा आर्थिक व प्रशासकीय मंजुरी देणेत आली आहे.

उक्त कामाबाबत म.कार्यकारी अभियंता ,सार्वजनिक बांधकाम विभाग, धुळे यांचे पत्र क्र./३५९७ दि.२३/७/२०२१ अन्वये रक्कम रु.३,१७,०४,३८७/- मात्र खर्चास तांत्रिक मंजुरी मिळालेली आहे.

उक्त कामाबाबत धुळे महानगरपालिका जा.क्र./पा.पु.वि./४१४/२०२१दि.१४/९/२०२१ अन्वये रोजी नवभारत (राज्यस्तरीय) / देशदुत या वृत्तपत्रात जाहीर निविदा प्रसिद्ध करणेत येऊन दि.८/१०/२०२१ अखेर निविदा दर मागविण्यात आले आहेत. पात्र कंत्राटदार यांनी निविदेबाबत ऑनलाईन पद्धतीने बयाणा रक्कम भरून निविदा दर सादर केलेले आहेत.

| **अ.क्र.** | **कंत्राटदार किंवा ठेकेदाराचे नाव** | **दिलेले निविदा दर** | **शेरा** |
|---|---|---|---|
| १ | मे.जयप्रकाश महाले | शे.४.०० % जास्तीने | |
| २ | **मे.अभिनव गिते** | **अंदाजपत्रकीय दराने** | **सर्वात कमी दर** |
| ३ | प्रकाश पाडंव | शे.२.०० % जास्तीने | |

वरील प्रमाणे निविदेत भाग घेतलेले ठेकेदार पात्र असून **मे. अभिनव गिते** यांचे दर **अंदाजपत्रकीय दराने** आहे व त्यांनी नियमा प्रमाणे ऑनलाईन बयाणा रक्कम भरलेली आहे. सबब कंत्राटदार **मे.अभिनव गिते** यांची **अंदाजपत्रकीय दराने** आलेले निविदा दर मंजुरीस्तव मे. स्थायी समिती पुढे सादर झालेला आहे.

सर्व सन्मा. सदस्यांच्या सहमतीने कार्यालयीन अहवालास अधिन राहून कंत्राटदार **मे.अभिनव गिते** यांची **अंदाजपत्रकीय दराने** आलेले निविदा दरास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम

७३ नुसार मान्यता देण्यांत येत आहे. सदर प्रस्ताव व कार्यवाही बाबत लेखा आक्षेप निर्माण होणार नाही याची दक्षता घ्यावी. याबाबतची जबाबदारी संबंधित विभागाची राहील.

सुचक:- श्री. अमोल पावबा मासुळे
अनुमोदक:- श्री. नागसेन दामोदर बोरसे

**सर्वानुमते मंजुर,**
सही/-xxx
**सभापती,**
**स्थायी समिती,**
**धुळे महानगरपालिका धुळे**

विषय क्रमांक:- १७३ आण्णाभाऊ साठे नागरी दलित वस्ती सुधार योजना अंतर्गत दादासाहेब गायकवाड चौक ते उत्तरेस भिल वस्ती ग.नं.१४ जुने धुळे पर्यंत आर.सी.सी.गटार करणे या कामाचे निविदा दर मागविण्यांत आलेत त्याबाबत आलेल्या कार्यालयीन अहवालावर विचार करणे.

म. नगरसचिव सदरचे विषय बांधकाम विभागाच्या नजरचूकीने स्थायी समितीपुढे मंजुरी आलेले आहे. सदर विषय यापूर्वी दि. ९/१२/२०२१ रोजी स्थायी समिती सभेत मंजुर झालेले आहे. तरी बांधकाम विभागाने सदर विषय विषय पटलावरुन मागे घेण्यांबाबत कळविलेले आहे.

म. शितल नवले सभापती महोदय हे नजरचूकीचे प्रकार कधी बंद होतील जर कदाचित हा विषय ३०/१२/२१ च्या सभेत मंजूर झाला असता तर बाहेर काय मेसेज जातो. बाहेर या विषयांचे भांडवल केले जाते. आणि आपली चूक नसतांना पक्षाची बदनामी होते. कोणाच्या नजरचूकीने हे घडले त्यांचा खुलासा घ्या.

म. हेमंत पावटे सदर विषय नजर चूकीने झाला आहे एवढे सांगू शकतो.

म. सभापती नेमकी काय नजर चूक झाली.

म. पावटे यांत नेमकी परिस्थिती काय आहे ते तपासणीकरुन सांगण्यांत येईल

म. सभापती प्रशासनाकडील आलेल्या प्रस्तावानुसार सदर विषय विषय पटलावरुन मागे घेण्यांत येत आहे.

**धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर १८९ दिनांक ०६/०१/२०२२**

आण्णाभाऊ साठे नागरी दलित वस्ती सुधार योजना अंतर्गत दादासाहेब गायकवाड चौक ते उत्तरेस भिल वस्ती ग.नं.१४ जुने धुळे पर्यंत आर.सी.सी.गटार करणे या कामाचे निविदा दर मागविण्यांत आलेत त्याबाबत आलेल्या कार्यालयीन अहवालावर विचार करणेबाबत प्रसताव सादर झालेला आहे.

सदर प्रस्ताव यापूर्वीच्या स्थायी समिती सभा क्रं.२४ ठराव नंबर १६७ दि.९/१२/२०२१ अन्वये मंजुरी देण्यांत आलेली आहे. सदर प्रस्तावाची वर्क ऑर्डर देखील झालेली आहे.

सदर प्रस्ताव पुन्हा स्थायी समितीच्या विषय पटलावर नजरचूकीने पुनश्च मान्यतेसाठी सादर झालेला आहे.तरी सदर विषय विषय पटलावरुन प्रशासनामार्फत मागे घेण्यांत येत आहे.

सही/-xxx
**सभापती,**
**स्थायी समिती,**
**धुळे महानगरपालिका धुळे**

विषय क्रमांक:- १७४ आण्णाभाऊ साठे नागरी दलित वस्ती सुधार योजना अंतर्गत प्रभाग क्र.९ मध्ये गायकवाड उत्तरेकडील बाजूपासून ते सफाई कामगार मेहतर समाज वसाहत पावेतो रस्ता कॉंक्रीट करणे या कामाचे निविदा दर मागविण्यांत आलेत त्याबाबत आलेल्या कार्यालयीन अहवालावर विचार करणे.

म. नगरसचिव सदरचे विषय बांधकाम विभागाच्या नजरचूकीने स्थायी समितीपुढे मंजुरी आलेले आहे. सदर विषय यापूर्वी दि. ९/१२/२०२१ रोजी स्थायी समिती सभेत मंजुर झालेले आहे. तरी बांधकाम विभागाने सदर विषय विषय पटलावरुन मागे घेण्यांबाबत कळविलेले आहे.

म. सभापती प्रशासनाकडील आलेल्या प्रस्तावानुसार सदर विषय विषय पटलावरुन मागे घेण्यांत येत आहे.

**धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर १९० दिनांक ०६/०१/२०२२**

आण्णाभाऊ साठे नागरी दलित वस्ती सुधार योजना अंतर्गत प्रभाग क्र.९ मध्ये गायकवाड उत्तरेकडील बाजूपासून ते सफाई कामगार मेहतर समाज वसाहत पावेतो रस्ता कॉंक्रीट करणे या कामाचे निविदा दर मागविण्यांत आलेत त्याबाबत आलेल्या कार्यालयीन अहवालावर विचार करणेबाबत सादर झालेला आहे.

सदर प्रस्तावयापूर्वीच्या स्थायी समिती सभा क्रं.२४ ठराव नंबर १६८ दि.९/१२/२०२१ अन्वये मंजुरी देण्यांत आलेली आहे. सदर प्रस्तावाची वर्क ऑर्डर देखील झालेली आहे.

सदर प्रस्ताव पुन्हा स्थायी समितीच्या विषय पटलावर नजरचूकीने पुनश्च मान्यतेसाठी सादर झालेला आहे. तरी सदर विषय विषय पटलावरुन प्रशासनामार्फत मागे घेण्यांत येत आहे.

सही/-xxx

**सभापती,**

**स्थायी समिती,**

**धुळे महानगरपालिका धुळे**

# धुळे महानगरपालिका,धुळे

## नगरसचिव कार्यालय

## स्थायी समिती सभा क्रमांक २७ चे इतिवृत्त

---

**धुळे मनपा भारतरत्न अटलबिहारी वाजपेयी सभागृह**
**गुरुवार दिनांक ०६/०१/२०२२**
**वेळ :- दुपारी ४-०० वाजता.**

धुळे महानगरपालिका स्थायी समितीची साप्ताहिक सभा शासनाच्या दि. ३ जानेवारी २०२२ रोजीच्या नवीन सुचनानुसार ऑन लाईन पध्दतीने आज गुरुवार दिनांक ०६/०१/२०२२ रोजी **दुपारी ४-०० वाजता मा.श्री. संजय सुधाकर जाधव, सभापती**, स्थायी समिती,मनपा,धुळे यांच्या अध्यक्षतेखाली **धुळे मनपा भारतरत्न अटलबिहारी वाजपेयी सभागृह** भरली. ऑनलाईन सभेस खालील सन्मा.सदस्य सभागृहात हजर होते.

| अ.क्रं. | सदस्यांचे नांव | हुद्दा |
|---|---|---|
| १ | श्री. जाधव संजय सुधाकर | सभापती |
| २ | श्री. बैसाणे सुनिल तुळशिराम | सदस्य |
| ३ | श्रीमती माळी भारती अशोक | सदस्या |
| ४ | श्रीमती पाटील मंगला सुरेश | सदस्या |
| ५ | श्रीमती बोरसे पुष्पा प्रकाश | सदस्या |
| ६ | श्री. मासुळे अमोल पावबा | सदस्य |
| ७ | श्री. देवरे कमलेश नारायण | सदस्य |
| ८ | श्रीमती पठाण हिना अस्लम | सदस्या |
| ९ | श्री. सईद बेग हाशम बेग | सदस्य |
| १० | श्री. नवले शितल मोहन | सदस्य |
| ११ | श्री. बोरसे नागसेन दामोदर | सदस्य |
| १२ | श्रीमती कुलेवार किरण राकेश | सदस्या |
| १३ | श्रीमती वराडे वैशाली भिकन | सदस्या |
| १४ | श्री. जाधव बन्सीलाल माणिक | सदस्य |
| १५ | श्रीमती चौधरी मंगला अर्जुन | सदस्या |
| १६ | श्री. पटेल अमीन अब्दुल करीम | सदस्य |

**उपस्थित अधिकारी गण**

| अ.क्र. | अधिकाऱ्यांचे नाव | हुद्दा |
|---|---|---|
| १ | श्री. नितीन कापडणीस | अति. आयुक्त |
| २ | श्रीमती पल्लवी शिरसाठ | सहा. आयुक्त |
| ३ | श्री. एन.पी. सोनार | सहा. आयुक्त |
| ४ | श्री. दिनकर जाधव | मुख्य लेखाधिकारी |
| ५ | श्री. मनोज अरविंद वाघ | प्र. नगरसचिव |
| ६ | श्री. पी.डी. चव्हाण | प्र. नगररचनाकार |
| ७ | डॉ. महेश मोरे | आरोग्याधिकारी |

| | | |
|---|---|---|
| ८ | श्री. चंद्रकांत जाधव | सहा.आरोग्याधिकारी |
| ९ | श्री. रमजान अन्सारी | कार्यालय अधिक्षक |
| १० | श्री. एन.के. बागुल | विद्युत अभियंता |
| ११ | श्री. सी.सी. बागुल | पा. पु. ओव्हरसिअर |
| १२ | श्री. सी.एम. उगले | अभियंता पा.पु. वि. |
| १३ | श्री. हेमत पावटे | ओव्हरसिअर बां.वि. |
| १४ | श्री. महेंद्र सोनवणे | प्रशासन अधिकारी मनपा शिक्षण मंडळ |
| १५ | श्री. किशोर सुडके | बाजार विभाग |
| १६ | श्री. राजकुमार सुर्यवंशी | प्र.अधिक्षक परवाना विभाग |
| १७ | श्री. प्रसाद जाधव | अतिक्रमण विभाग |
| १८ | श्री. सुक्राम राऊत | वाहन विभाग |

म.सभापती — सर्व उपस्थित सन्मा.सदस्य अति.आयुक्त सो.अधिकारी वर्ग छायाचित्रकार बांधव सभेचे कामकाज चालविणेसाठी आवश्यक तो कोरम पूर्ण झाल्याने नगरसचिव यांनी सभेचे कामकाज सुरुवात करावी.

म. नगरसचिव — वंदे मातरम् या राष्ट्रवंदनेसाठी सर्वांनी उभे रहावे.

विषय क्रमांक:-१७५ — मागील स्थायी समिती सभेचे इतिवृत्त वाचून कायम करणे. (२०/१२/२०२१)

म. नगरसचिव — नगरसचिव यांनी विषयांचे वाचन केले.

म. शितल नवले — इतिवृत्त वाचून कायम करण्यांत येत यावे.

म. सभापती — सर्व सनमा. सदस्यांच्या सहमतीने मागील स्थायी समिती सभा दि. २०/१२/२०२१ चे इतिवृत्त वाचून कायम करण्यांत येत आहे.

**धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर १९१ दिनांक ०६/०१/२०२२**

मागील स्थायी समिती सभा दिनांक २०/१२/२०२१ चे सभेतील ठराव नंबर १७६ ते १८३ अखेर तसेच सभेस सन्मा. सदस्यांनी केलेली चर्चा व त्यावरील निर्णय क्रमशः वाचून कायम करण्यांत येत आहे.

**सही/-x x x**
**सभापती,**
**स्थायी समिती,**
**धुळे महानगरपालिका, धुळे**

विषय क्रमांक:-१७६ — पाणीपुरवठा विभागाकडील मानधनावरील व्हॉलमन कर्मचा-यांना ६ महिनेपुढे मुदतवाढ देणेबाबत आलेल्या कार्यालयीन अहवालावर विचार करणे.

म. नगरसचिव — नगरसचिव यांनी विषयांचे वाचन केले.

म. सुनिल बैसाणे — विषय मंजूर करण्यांत यावा.

म. सभापती — सर्व सन्मा. सदस्यांच्या सहमतीने व कार्यालयीन अहवालास अधिन राहून सदर प्रस्तावास मान्यता देण्यांत येत आहे.

**धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर १९२ दिनांक ०६/०१/२०२२**

पाणीपुरवठा विभागाकडील मागणीनुसार खालील नमुद कर्मचा-यांच्या एकत्रित मानधनावर करार पध्दतीने आकृती बंधातील मंजुर व रिक्त असलेल्या व्हॉलमनच्या पदावर नियुक्त्या करण्यात आल्या होत्या.

संबंधित कर्मचा-यांची मुदत संपल्याने त्यांना फेर मुदत वाढ देण्यात आली होती. सदर मानधनावरील कर्मचा-यांची मुदत **दिनांक १९/१२/२०२१ रोजी संपुष्ठात येत आहे**

शासनाने धुळे महानगरपालिकेसाठी नविन आकृतीबंध मंजुर केला असून त्यामध्ये पाणीपुरवठा विभागासाठी व्हॉलमनची एकूण ३८ पदे मंजुर केली आहे ३८ पदापैकी सद्यस्थितीत २८ पदे कार्यरत असून असून सद्यस्थितीत १० पदे रिक्त आहेत.

यापूर्वी मानधनावर एकूण १७ व्हॉलमन कर्मचारी नियुक्त केले होते.१७ कर्मचाऱ्यां मध्ये १० कर्मचारी व्हॉलमनची पदे असून त्यापैकी ७ पदे ही बिगारी/मजुर प्रवर्गातील आहे.१० व्हॉलमनच्या रिक्त पदापैकी ४ व्हॉलमन कर्मचाऱ्यांचा मुदतवाढीचा प्रस्ताव मे.स्थायी समितीपुढे मुदत वाढ देण्यासाठी सादर केलेला आहे.

कामाची निकड व पाणीपुरवठा विभागाकडील मागणीनुसार खालील नमुद १३ कर्मचाऱ्यांची आवश्यकता असल्याबाबत अहवालात नमुद आहे.सबब उर्वरीत ६ व्हॉलमनची व ७ बिगारी /मजूरच्या रिक्त पदामधून व्हॉलमन म्हणून मानधनावर पाणी पुरवठा विभागाकडील रिक्त असलेल्या बिगारी / मजूर या पदानुसार मानधनावर नियुक्ती करणे योग्य राहिल.

| अ क्र | उमेदवाराचे नाव | अ क्र | उमेदवाराचे नाव |
|---|---|---|---|
| १ | दिपक छगन बागुल | ८ | गणेश शंकर बिरारी |
| २ | सैयदद इमरान अली जाफर अली | ९ | किरण राजेंद्र फुलपगारे |
| ३ | तुषारगिरीश चौधरी | १० | योगेश भानुदास वाखारकर |
| ४ | शिंदे दिनेश रामसिंग | ११ | ज्ञानेश्वर तुकाराम सैंदाणे |
| ५ | चंद्रकांत मोतीलाल फुलपगारे | १२ | प्रणय राजेंद्र लहामगे |
| ६ | हेमराज भाईदास कोळी | १३ | रणदिवे राहुल अरुणराव |
| ७ | प्रमोद विठ्ठल सोनवणे | | |

प्रमुख यांनी सादर केलेल्या अहवालानुसार उपरोक्त व्हॉलमन (मानधनावरील) यांची कामाची निकड पाहता बाह्य यंत्रणेमार्फत मनुष्यबळ उपलब्ध होई पावेतो मुदतवाढ देणेबाबत आहवाल सादर केलेला आहेउपरोक्त कर्मचारी . यांना यापूर्वी वेळ मुदतवाढ देणेत ३ ते २ आलेली आहे तरी .उपरोक्त व्हॉलमन (मानधनावरील) कर्मचा-यांना ५ दिवसाचा सेवा खंड करुन एकत्रित करार पध्दतीने रु.८०००/- मात्र प्रमाणे पुढील ६ महिने कालावधीकरीता मुदतवाढ देणेबाबत मे.स्थायी समिती पुढे मान्यतेसाठी प्रस्ताव सादर झालेला आहे.

सर्व सन्मा.सदस्यांच्या सहमतीने व कार्यालयीन अहवालास अधिन राहून पाणीपुरवठा विभागाकडील मानधनावरील व्हॉलमन कर्मचा-यांना कामाची निकड पाहता बाह्य यंत्रणे मार्फत मनुष्यबळ उपलब्ध होई पावेतो महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम ५३ (३) अन्वये ५ दिवसाचा सेवा खंड करुन एकत्रित करार पध्दतीने रु.८०००/- मात्र प्रमाणे पुढील ६ महिने कालावधीकरीता मुदतवाढ देणेस मान्यता देण्यांत येत आहे. सदर प्रस्ताव व कार्यवाही बाबत लेखा आक्षेप निर्माण होणार नाही याची दक्षता घ्यावी. याबाबतची जबाबदारी संबंधित विभागाची राहील.

सुचक:- श्री. सुनिल तुळशीराम बैसाणे
अनुमोदक:- श्री. नागसेन दामोदर बोरसे

**सर्वानुमते मंजुर,**
**सही/-x x x**
**सभापती,**
**स्थायी समिती,**
**धुळे महानगरपालिका धुळे**

| | |
|---|---|
| विषय क्रमांक:-१७७ | मानधनावरील पंप ऑपरेटर व व्हॉलमन कर्मचा-यांना ६ महिनेपुढे यांना फेर नियुक्तीने मुदतवाढ देणेबाबत आलेल्या कार्यालयीन अहवालावर विचार करणे. |
| म. नगरसचिव | नगरसचिव यांनी विषयांचे वाचन केले. |
| म. अमोल मासुळे | विषय मंजूर करण्यांत यावा. |
| म. सभापती | सर्व सन्मा. सदस्यांच्या सहमतीने व कार्यालयीन अहवालास अधिन राहून सदर प्रस्तावास मान्यता देण्यांत येत आहे. |

**धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर १९३ दिनांक ०६/०१/२०२२**

एकत्रित मानधनावर **"पंप ऑपरेटर व व्हॉलमन "** पद भरण्याबाबत कार्यालयीन टिपणी सादर करण्यात आली होती. त्यानुसार संदर्भिय क्र. २ अन्वये दिनांक २८/०५/२०१९ रोजी स्थानिक वृत्तपत्रात संक्षिप्त व मनपाच्या संकेतस्थळावर सविस्तर जाहिरात प्रसिध्द करण्यात आलेली होती.

यापूवी घेतलेल्या मुलाखतीत निवड समितीने नियुक्तीस पात्र ठरविलेल्या उमेदवारांचा अहवाल व मंजूर कार्यालयीन टिपणीनुसार **" पंप ऑपरेटर व व्हॉलमन "** पदासाठी खालील अ क्र १ ते ६ उमेदवार यांना नियुक्ती आदेश निर्गमित करणेत आले होते. तथापी त्यांना वेळोवेळी मुदतवाढ देणेत आलेली आहे. तरी सदर कर्मचा-यांनी दि १९/११/२०२१ रोजी नियुक्तीची मुदत संपुष्ठात येणार आहे.

म.अभियंता यांच्याकडील अहवालानुसार खालील अ क्र १ ते ६ कर्मचा-यांची कामाची आवश्यकता व निकड पाहता सदर कर्मचा-यांना पुढील ०६ महिने करीता मुदतवाढ देणेबाबत पत्र सादर केले आहे.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम१९४९चे कलम५३(३)मध्ये नमुद केले आहे की, या अधिनियमात अन्यथा तरतूद केली असेल त्या व्यतिरिक्त, नगरपालिका अधिकारी व कर्मचारी मग ते कायम असोत किंवा तात्पुरते असोत त्यांची नेमणुक करण्याचा अधिकार आयुक्तांकडे निहित असेल. परंतु कायम नेमणुकांच्या बाबतीत असा अधिकारी कलम ५१ अन्वये तयार केलेल्या व मंजुर केलेल्या त्यावेळी अंमलात असलेल्या विवरणपत्राच्या अधीन असेल. आणखी असे की, आयुक्तास स्थायी समितीच्या पुर्व मंजुरी वाचून कोणतीही तात्पुरती नेमणुक सहा महिन्यांहून अधिक असेल अशा कोणत्याही कालावधीसाठी करता येणार नाही आणि (लिपीक या पदाशी समतुल्य, असलेल्या किंवा त्यापेक्षा उच्च दर्जाच्या पदाच्या वेतनाएवढे अथवा त्याहून अधिक वेतन असलेल्या) कोणत्याही नेमणुकीचे उक्त सहा महिन्यांचा कालावधी संपल्यांनतर नवीकरण करता येणार नाही. असे अधिनियमात नमुद आहे .

| अक्र | उमेदवाराचे नाव | पदाचे नाव | अ क्र | उमेदवाराचे नाव | पदाचे नाव |
|---|---|---|---|---|---|
| १ | श्री आकाश कैलास बोरसे | पंप ऑपरेटर | ४ | श्री पवार तुषार वसंत | व्हॉलमन |
| २ | श्री जमील पठाण | पंप ऑपरेटर | ५ | श्री वराडे विक्रांत वसंत | व्हॉलमन |
| ३ | श्री शशीकांत सदाशिव घोरपडे | व्हॉलमन | ६ | श्री शेळके कुणाल चंद्रकांत | व्हॉलमन |

उपरोक्त अहवालानुसार पाणीपुरवठा विभागाच्या अहवालानुसार कर्मचा-याची कामाची निकड पाहता मुदत संपुष्ठात आल्याच्या दिनांकापासून ५ दिवसाचा खंड देवून पुढील ०६ महिने कालावधीकरीता वरील तक्त्यात दर्शविलेल्या कर्मचा-यांना एकत्रित मानधनावर रु. ८०००/- मात्र नुसार पुनश्च: फेर नियुक्ती देणेबाबतचा विषय महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ५३ (३) अन्वये मे. स्थायी समितीपुढे सादर झालेला आहे.

सर्व सन्मा.सदस्यांच्या सहमतीने व कार्यालयीन अहवालास अधिन राहून पाणीपुरवठा विभागाकडील मानधनावरील पंप ऑपरेटर व व्हॉलमन कर्मचा-यांना कामाची निकड पाहता बाह्य यंत्रणे मार्फत मनुष्यबळ उपलब्ध होई पावेतो महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम ५३ (३) अन्वये ५ दिवसाचा सेवा खंड करुन एकत्रित करार पध्दतीने रु.८०००/- मात्र प्रमाणे पुढील ६ महिने कालावधीकरीता मुदतवाढ देणेस मान्यता देण्यांत येत आहे. सदर प्रस्ताव व कार्यवाही बाबत लेखा आक्षेप निर्माण होणार नाही याची दक्षता घ्यावी. याबाबतची जबाबदारी संबंधित विभागाची राहील.

सुचकः- श्री. अमोल पावबा मासुळे
अनुमोदकः- श्री. नागसेन दामोदर बोरसे

**सर्वानुमते मंजुर,**
**सही/-x x x**
**सभापती,**
**स्थायी समिती,**
**धुळे महानगरपालिका धुळे**

| | |
|---|---|
| विषय क्रमांक:- १७८ | आण्णाभाऊ साठे नागरी दलित वस्ती सुधार योजना अंतर्गत प्रभाग क्र.१५मध्ये उत्कर्ष कॉलनी येथील श्री.पवार यांच्या घरापर्यंत पावेतो रस्ता कॉंक्रीट करणेचे निविदा दर मागविण्यांत आलेत, त्याबाबत आलेल्या कार्यालयीन अहवालावर विचार करणे. |
| म. नगरसचिव | नगरसचिव यांनी विषयांचे वाचन केले. |
| म. शितल नवले | सदर विषय मागच्या प्रमाणे नजरचूकीने आले आहेत किंवा नाही याची विभागाने खातरजमा करावी तो पावेतो विषय तहकूब ठेवावा. |
| म. सभापती | सर्व सदस्यांच्या सहमतीने प्रस्ताव तूर्त तहकूब ठेवण्यांत येत आहे. पुढील बैठकीत प्रस्ताव तपासून सादर करावा. |

**धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर १९४दिनांक ०६/०१/२०२२**

आण्णाभाऊ साठे नागरी दलित वस्ती सुधार योजना अंतर्गत प्रभाग क्र.१५मध्ये उत्कर्ष कॉलनी येथील श्री.पवार यांच्या घरापर्यंत पावेतो रस्ता कॉंक्रीट करणेचे निविदा दर मान्यतेचा प्रस्ताव मे. स्थायी समिती समोर सादर झाला असता सर्व सदस्यांच्या सहमतीने प्रस्ताव तूर्त तहकूब ठेवण्यांत येत आहे. पुढील बैठकीत प्रस्ताव तपासून सादर करावा.

सूचक :- श्री. शितल मोहन नवले
अनुमोदक:- श्री. सुनिल तुळशीराम बैसाणे

**सर्वानुमते मंजुर,**
**सही/-x x x**
**सभापती,**
**स्थायी समिती,**
**धुळे महानगरपालिका धुळे**

| | |
|---|---|
| विषय क्रमांक:- १७९ | आण्णाभाऊ साठे नागरी दलित वस्ती सुधार योजना अंतर्गत प्र.क्र.९ मध्ये गायकवाड चौक नंदू सोनवणे यांचे घरापर्यंत रस्ता व बंदिस्त गटार करणेचे निविदा दर मागविण्यांत आलेत, त्याबाबत आलेल्या कार्यालयीन अहवालावर विचार करणे. |
| म. नगरसचिव | नगरसचिव यांनी विषयांचे वाचन केले. |
| म. शितल नवले | सदर विषय मागच्या प्रमाणे नजरचूकीने आले आहेत किंवा नाही याची विभागाने खातरजमा करावी तो पावेतो विषय तहकूब ठेवावा. |
| म. सभापती | सर्व सदस्यांच्या सहमतीने प्रस्ताव तूर्त तहकूब ठेवण्यांत येत आहे. पुढील बैठकीत प्रस्ताव तपासून सादर करावा. |

**धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर १९५ दिनांक ०६/०१/२०२२**

आण्णाभाऊ साठे नागरी दलित वस्ती सुधार योजना अंतर्गत प्र.क्र.९ मध्ये गायकवाड चौक नंदू सोनवणे यांचे घरापर्यंत रस्ता व बंदिस्त गटार करणेचे निविदा दर मान्यतेचा प्रस्ताव मे. स्थायी समिती समोर सादर झाला असता सर्व सदस्यांच्या सहमतीने प्रस्ताव तूर्त तहकूब ठेवण्यांत येत आहे. पुढील बैठकीत प्रस्ताव तपासून सादर करावा.

सूचक :- श्री. शितल मोहन नवले
अनुमोदक:- श्री. सुनिल तुळशीराम बैसाणे

**सर्वानुमते मंजुर,**
**सही/-x x x**
**सभापती,**
**स्थायी समिती,**
**धुळे महानगरपालिका धुळे**

| | |
|---|---|
| विषय क्रमांक:- १८० | आण्णाभाऊ साठे नागरी दलित वस्ती सुधार योजना अंतर्गत प्रभाग क्र.९ मध्ये गायकवाड चौक मुतारी पासून ते नवीन भिलाटी पर्यंत रस्ता व गटार करणेचे निविदा दर मागविण्यांत आलेत, त्याबाबत आलेल्या कार्यालयीन अहवालावर विचार करणे. |

म. नगरसचिव नगरसचिव यांनी विषयांचे वाचन केले.

म. शितल नवले सदर विषय मागच्या प्रमाणे नजरचूकीने आले आहेत किंवा नाही याची विभागाने खातरजमा करावी तो पावेतो विषय तहकूब ठेवावा.

म. सभापती सर्व सदस्यांच्या सहमतीने प्रस्ताव तूर्त तहकूब ठेवण्यांत येत आहे. पुढील बैठकीत प्रस्ताव तपासून सादर करावा.

**धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर १९६ दिनांक ०६/०१/२०२२**

आण्णाभाऊ साठे नागरी दलित वस्ती सुधार योजना अंतर्गत प्रभाग क्र.९ मध्ये गायकवाड चौक मुतारी पासून ते नवीन भिलाटी पर्यंत रस्ता व गटार करणेचे निविदा दर मान्यतेचा प्रस्ताव मे. स्थायी समिती समोर सादर झाला असता सर्व सदस्यांच्या सहमतीने प्रस्ताव तूर्त तहकूब ठेवण्यांत येत आहे. पुढील बैठकीत प्रस्ताव तपासून सादर करावा.

सूचक :- श्री. शितल मोहन नवले

अनुमोदक:- श्री. सुनिल तुळशीराम बैसाणे

**सर्वानुमते मंजुर,**
**सही/-x x x**
**सभापती,**
**स्थायी समिती,**
**धुळे महानगरपालिका. धुळे**

विषय क्रमांक:- १८१ आण्णाभाऊ साठे नागरी दलित वस्ती सुधार योजना अंतर्गत प्र.क्र.१ मध्ये राजेंद्र नगर वलवाडी येथे गोंदूर रोड डी.पी.पासून श्री.रामकृष्ण सैंदाणे यांचे घरापर्यंत रस्ता डांबरीकरण करणेचे निविदा दर मागविण्यांत आलेत, त्याबाबत आलेल्या कार्यालयीन अहवालावर विचार करणे.

म. नगरसचिव नगरसचिव यांनी विषयांचे वाचन केले.

म. शितल नवले सदर विषय मागच्या प्रमाणे नजरचूकीने आले आहेत किंवा नाही याची विभागाने खातरजमा करावी तो पावेतो विषय तहकूब ठेवावा.

म. सभापती सर्व सदस्यांच्या सहमतीने प्रस्ताव तूर्त तहकूब ठेवण्यांत येत आहे.पुढील बैठकीत प्रस्ताव तपासून सादर करावा.

**धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर १९७ दिनांक ०६/०१/२०२२**

आण्णाभाऊ साठे नागरी दलित वस्ती सुधार योजना अंतर्गत प्र.क्र.१ मध्ये राजेंद्र नगर वलवाडी येथे गोंदूर रोड डी.पी.पासून श्री.रामकृष्ण सैंदाणे यांचे घरापर्यंत रस्ता डांबरीकरण करणेचे निविदा दर मान्यतेचा प्रस्ताव मे. स्थायी समिती समोर सादर झाला असता सर्व सदस्यांच्या सहमतीने प्रस्ताव तूर्त तहकूब ठेवण्यांत येत आहे. पुढील बैठकीत प्रस्ताव तपासून सादर करावा.

सूचक :- श्री. शितल मोहन नवले

अनुमोदक:- श्री. सुनिल तुळशीराम बैसाणे

**सर्वानुमते मंजुर,**
**सही/-x x x**
**सभापती,**
**स्थायी समिती,**
**धुळे महानगरपालिका. धुळे**

# धुळे महानगरपालिका,धुळे

## नगरसचिव कार्यालय

## स्थायी समिती सभा क्रमांक २८ चे इतिवृत्त

---

**धुळे मनपा भारतरत्न अटलबिहारी वाजपेयी सभागृह**
**गुरुवार दिनांक १३/०१/२०२२**
**वेळ :- दुपारी ४-०० वाजता.**

धुळे महानगरपालिका स्थायी समितीची साप्ताहिक सभा शासनाच्या दि. ३ जानेवारी २०२२ रोजीच्या नवीन सुचनानुसार ऑन लाईन पध्दतीने आज गुरुवार दिनांक १३/०१/२०२२ रोजी दुपारी ४-०० वाजता **मा.श्री. संजय सुधाकर जाधव, सभापती**, स्थायी समिती,मनपा,धुळे यांच्या अध्यक्षतेखाली धुळे मनपा भारतरत्न अटलबिहारी वाजपेयी सभागृह भरली. ऑनलाईन सभेस खालील सन्मा.सदस्य सभागृहात हजर होते.

| अ.क्रं. | सदस्यांचे नांव | हुद्दा |
|---|---|---|
| १ | श्री. जाधव संजय सुधाकर | सभापती |
| २ | श्री. बैसाणे सुनिल तुळशिराम | सदस्य |
| ३ | श्रीमती माळी भारती अशोक | सदस्या |
| ४ | श्रीमती पाटील मंगला सुरेश | सदस्या |
| ५ | श्रीमती बोरसे पुष्पा प्रकाश | सदस्या |
| ६ | श्री. मासुळे अमोल पावबा | सदस्य |
| ७ | श्री. देवरे कमलेश नारायण | सदस्य |
| ८ | श्रीमती पठाण हिना अस्लम | सदस्या |
| ९ | श्री. सईद बेग हाशम बेग | सदस्य |
| १० | श्री. नवले शितल मोहन | सदस्य |
| ११ | श्री. बोरसे नागसेन दामोदर | सदस्य |
| १२ | श्रीमती कुलेवार किरण राकेश | सदस्या |
| १३ | श्रीमती वराडे वैशाली भिकन | सदस्या |
| १४ | श्री. जाधव बन्सीलाल माणिक | सदस्य |
| १५ | श्रीमती चौधरी मंगला अर्जुन | सदस्या |

**उपस्थित अधिकारी गण**

| अ.क्र. | अधिकाऱ्यांचे नाव | हुद्दा |
|---|---|---|
| १ | श्री. नितीन कापडणीस | अति. आयुक्त |
| २ | श्रीमती पल्लवी शिरसाठ | सहा. आयुक्त |
| ३ | श्री. एन.पी. सोनार | सहा. आयुक्त |
| ४ | श्री..दिनकर जाधव | मुख्य लेखाधिकारी |
| ५ | श्री. मनोज अरविंद वाघ | प्र. नगरसचिव |
| ६ | श्री. के.एन. शिंदे | अभियंता |
| ७ | श्री. चंद्रकांत जाधव | सहा.आरोग्याधिकारी |
| ८ | श्री. साळवे | सह आरोग्याधिकारी ( मलेरिया) |
| ९ | श्री. सी. एम. उगले | ओव्हरसिअर पा.पु. |
| १० | श्री. महेंद्र सोनवणे | प्रशासन अधिकारी मनपा शिक्षण मंडळ |
| ११ | श्री. राजेंद्र माईनकर | भांडारपाल |

| | | |
|---|---|---|
| १२ | श्री. राजकुमार सुर्यवंशी | प्र.अधिक्षक परवाना विभाग |
| १३ | श्री. सुक्राम राऊत | वाहन विभाग |

म.सभापती सर्व उपस्थित सन्मा.सदस्य अति.आयुक्त सो.अधिकारी वर्ग छायाचित्रकार बांधव सभेचे कामकाज चालविणेसाठी आवश्यक तो कोरम पूर्ण झाल्याने नगरसचिव यांनी सभेचे कामकाज सुरुवात करावी.

म. नगरसचिव वंदे मातरम् या राष्ट्रवंदनेसाठी सर्वांनी उभे रहावे.

विषय क्रमांक:- १८२ मा.आयुक्त सो.यांना असलेल्या अधिकारानुसार बांधकाम विभागाकडील २२/०९/२०२१ ते २८/१२/२०२१ अखेर निर्गमित केलेल्या विकास कामांच्या कार्यादेशाची याची माहितीस्तव सादर.

म. नगरसचिव नगरसचिव यांनी विषयांचे वाचन केले.

म. सभापती **सर्व सन्मा.सदस्यांच्या सहमतीने व कार्यालयीन अहवालास अधिन राहून** बांधकाम विभागाकडील २२/०९/२०२१ ते २८/१२/२०२१ अखेर निर्गमित केलेल्या खालील विकास कामांच्या कार्यादेशाची वाचून माहिती देण्यांत आली.

**धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर १९८ दिनांक १३/०१/२०२२**

मा.आयुक्त सो.यांना असलेल्या अधिकारानुसार बांधकाम विभागाकडील २२/०९/२०२१ ते २८/१२/२०२१ अखेर निर्गमित केलेल्या खालील विकास कामांच्या कार्यादेशाची वाचून माहिती देण्यांत आली.

| अ. क्र | कार्यादेश क्रमांक | दिनांक | कामाचे नाव | रक्कम | निधी |
|---|---|---|---|---|---|
| १ | ३७९ | २२/०९/२०२१ | प्र.क्र.१५ मध्ये श्री.फारुक अन्वर शाह आमदार धुळे शहर यांचे निधीतून वैभव नगर येथे कमलेश सुर्यवंशी घर ते नाल्या पावेतो पेव्हर ब्लॉक बसविणे व गटार करणे तसेच भिंत बांधणे. | ९,९९,२७६/- | आमदार स्थानिक विकास कार्यक्रम २०-२१ अंतर्गत |
| २ | ३८० | २२/०९/२०२१ | प्र.क्र.१३ मध्ये फिरदोस नगर भागात सलीम हाजी यांच्या घरापासुन ते मारोती मंदिरा पावेतो सिमेंट कॉक्रीट गटार करणे. | १२,४८,८३६/- | जिल्हा स्तरीय नगरोत्थान योजना अंतर्गत सन २०-२२ |
| ३ | ३८१ | २२/०९/२०२१ | प्र.क्र.१३ मध्ये शिवाजी नगर झोपड पट्टी भागात फयाज शेठ ते अस्लम भैय्या यांच्या घरापावेतो पेव्हर ब्लॉक बसविणे.. | १२,४४,१५९/- | -----------"------------- |
| ४ | ३८२ | २२/०९/२०२१ | प्र.क्र.८मध्ये अकबर चौकात रईस हाजी यांच्या घरा पासूनते डॉ.कावरे हॉस्पीटल पावेतो बंदिस्त गटार करणे. | २४,९८,२५५/- | -----------"------------- |
| ५ | ३८४ | २२/०९/२०२१ | प्र.क्र.८भोलेबाबा नगर भागात RCC पाईप गटार करणे. | २४,९८,२४४/- | सहा.अनुदान निधी अंतर्गत |
| ६ | ३८५ | २२/०९/२०२१ | प्र.क्र.१८कोळवले नगर भागात रस्ता डांबरीकरण करणे. | २४,९८,२४४/- | -----------"------------- |
| ७ | ३८८ | २८/०९/२०२१ | प्र.क्र.३मध्ये लक्ष्मी नगर भागात १)श्री.पी.जी. गुप्ता यांच्या घरापासुन ते एन वाय.पाटील यांचे घरापर्यंत २) श्री.दिगंबर चौधरी यांच्या घरापासून ते विजय माळी यांचे घरापर्यंत रस्ता डांबरीकरण करणे. | २४,९४,००३/- | महा.सुवर्ण जयंती नगरोत्थान (जिल्हास्तरीय)योजना अंतर्गत |
| ८ | ३८९ | २८/०९/२०२१ | प्र.क्र.३ मध्ये आग्रारोड मराठा बोर्डींग ते श्री. संकलेचा यांच्या घरापावेतो रस्ता डांबरीकरण करणे. | १२,४८,९०२/- | -----------"------------- |
| ९ | ३९० | २८/०९/२०२१ | प्र.क्र.१८ मध्ये भटाइ माता रिक्षा स्टॉप ते खालचे गावातील मारोती मंदिरते रेल्वे फाटक पावेतो रस्ता डांबरीकरण करणे. | १४,९६,००२/- | नागरी दलीत वस्ती सुधार योजना अंतर्गत |
| १० | ३९१ | २८/०९/२०२१ | प्र.क्र.१८ मध्ये पिंपळादेवी नगर येथे वसंत भामरे यांच्या घरापासुन ते दादाभाइ राजपूत यांच्या घरापावेतो बंदिस्त गटार व रस्ता कॉक्रीट करणे. | २४,९२,१९३/- | -----------"------------- |
| ११ | ३९२ | २८/०९/२०२१ | प्र.क्र.१८ मध्ये विठ्ठल मंदिर ते हनुमान मंदिरा पावेतो तसेच जयशंकर कॉलनी मध्ये रस्ता डांबरीकरण करणे. | १२,९९,३४०/- | ना.द.वस्ती सुधार योजना अंत. |
| १२ | ३९३ | २८/०९/२०२१ | प्र.क्र.१८ मध्ये दंडेवाले नगर भागात श्री.विनोद पवार ते राजू सिकलकर यांच्या घरापावेतो रस्ता कॉक्रीटीकरण करणे. | १४,९२,२३२/- | -----------"------------- |
| १३ | ३९४ | २९/०९/२०२१ | म.न.पा देवपूर अमरधाम येथे गॅस शवदाहिनी सयंत्र उभारणी करीता बांधकाम व्यवस्था करणे. | २४,९८,७५६/- | मनपा निधी २१-२२ अंतर्गत |
| १४ | ३९७ | २९/०९/२०२१ | प्र.क्र.१५ मध्ये विद्या विहार कॉलनी बोरादकर सर घर ते पवार घरापावेतो रस्ता डांबरीकरण करणे. | १२,४६,७३७/- | जिल्हास्तरीय नगरोत्थान योजना अंतर्गत सन २०-२१ |
| १५ | ४०४ | ०१/१०/२०२१ | प्र.क्र.१९ मध्ये रस्ता अनुदान अंतर्गत मुल्ला नगर येथील युसुफ मुल्ला ते रऊफ शेख यांच्या घरापर्यंत रस्ता कॉक्रीट करणे. | २२,५०,८३७/- | प्री.बजेट अंतर्गत |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| १६ | ४०५ | ०८/१०/२०२१ | प्र.क्र.७ मध्ये लक्ष्मी नगर येथील संत गाडगे बाबा मठ पासुन ते राहुल माने यांच्या घरापावेतो बंदिस्त गटार करणे. | ९,९८,११४/- | लो.शा.अण्णाभाऊ साठे ना. द. वस्ती सुधार योजना अंतर्गत |
| १७ | ४०६ | ०८/१०/२०२१ | प्र.क्र.७ मध्ये मोगलाई भागात रमापती चौक भैय्या येवले यांच्या घरापासून ते निखील सोनवणे यांच्या घरापावेतो सिमेंट कॉक्रीट रस्ता व गटार करणे. | १९,९६,६१०/- | -----------"------------- |
| १८ | ४०७ | ०८/१०/२०२१ | प्र.क्र.१८ मध्ये सहजीवन नगर येथे सुनील सुराणा यांच्या घरापासून ते पुष्पक आण्णा ते पप्पू व्यास यांच्या घरापर्यंत कॉक्रीट रस्ता करणे. | १८,९४,१४५/- | -----------"------------- |
| १९ | ४०८ | ०८/१०/२०२१ | प्र.क्र.७ मध्ये मोगलाई चर्च मागील भागात चर्च पासून ते श्री.जगताप यांच्या घरापावेतो रस्ता कॉक्रीटीकरण करणे. | १९,९९,५०४/- | -----------"------------- |
| २० | ४०९ | ०८/१०/२०२१ | प्र.क्र.७ मध्ये समता नगर येथील मंदिरा पासुन ते सोसायटी लगत रस्ता कॉक्रीटीकरण करणे. | १९,९८,८५४/- | -----------"------------- |
| २१ | ४१० | ०८/१०/२०२१ | प्र.क्र.७ मध्ये सुमन पतसंस्था पासुन ते चर्च पावेतो रस्ता कॉक्रीट करणे. | २४,९६,२६५/- | -----------"------------- |
| २२ | ४११ | ११/१०/२०२१ | प्र.क्र.२ मध्ये दोंदे कॉलनी श्री.सुर्यवंशी सर प्लॉट नं.५० ते ठाकरे सर यांच्या घरापावेतो कॉक्रीटीकरण करणे. | १२,४७,१८९/- | महा.सुवर्ण जयंती नगरोत्थान (जिल्हास्तरीय)योजना अंतर्गत |
| २३ | ४१२ | ११/१०/२०२१ | प्र.क्र.१२ मध्ये रामचंद्र नगर गणपती कारखान्या पाठी मागे कॉक्रीटीकरण करणे.श्री.संतोष गांगुर्डे यांचे घरापावेतो | १२,४२,७४३/- | जिल्हा स्तरीय नगरोत्थान योजना सन२०-२१ अंतर्गत |
| २४ | ४१३ | ११/१०/२०२१ | प्र.क्र.११ मध्ये माणिक नगर मधील रिलायन्स टॉवर ते बापु चौधरी यांच्या घरापर्यंत रस्ता कॉक्रीटीकरण करणे. | ११,९३,५०५/- | -----------"------------- |
| २५ | ४१४ | ११/१०/२०२१ | प्र.क्र.४ मध्ये चुडामणी बंगला ते सिंधुरत्न अपार्टमेंट पावेतो रस्ता डांबरीकरण करणे. | १२,४९,७६४/- | महा.सुवर्ण जयंती नगरोत्थान (जिल्हास्तरीय)योजना अंतर्गत |
| २६ | ४१७ | ११/१०/२०२१ | प्र.क्र.९ मध्ये राजु खैरनार यांच्या घरापासुन ते भडागे यांच्या घरापर्यंत R.C.C पाईप गटार करणे. | ५,९७,४१३/- | नागरी दलित वस्ती सुधार योजना अंतर्गत |
| २७ | ४१८ | ११/१०/२०२१ | प्र.क्र.१० मध्ये बाबूलाल जैन यांच्या घरापासून ते मोहन अग्रवाल यांच्या घरापावेतो रस्ता कॉक्रीट करणे. | १४,७७,४०१/- | महा.सुवर्ण जयंती नगरोत्थान (जिल्हास्तरीय)योजना अंतर्गत |
| २८ | ४१९ | १४/१०/२०२१ | प्र.क्र.६मध्ये महिंदळे येथे इच्छापूर्ती कॉलनी येथे चंद्रकांत देवरेते सचिन मोरे यांचे घरापावेतो रस्ता कॉक्रीट करणे. | १२,४३,७४१/- | सुवर्ण जयंती नगरोत्थान (जिल्हास्तरीय)योजने अंतर्गत |
| २९ | ४२० | १४/१०/२०२१ | प्र.क्र.६ मध्ये महिंदळे येथे संबोधि नगर भागात श्री.बैसाणे यांचे घरापासुन ते श्री.खंडारे यांचे घरापर्यंत रस्ता कॉक्रीट करणे. | १६,९८,५८७/- | लो.शा.अण्णाभाऊ साठे ना. द. वस्ती सुधार योजना अंतर्गत |
| ३० | ४२१ | १४/१०/२०२१ | भिमनगर भागातील नाल्यावर नाना गोसावी यांच्या घरापासुन ते श्री.शिकलकर यांच्या घरापावेतो संरक्षण भिंत बांधणे. | १८,९७,५६८/- | -----------"------------- |
| ३१ | ४२२ | १८/१०/२०२१ | प्र.क्र.१३मध्ये प्रतिक यांच्या घरापासुन ते राजु नारियलवाला यांच्या घरापर्यंत रस्ता कॉक्रीट करणे. | ८,२८,८०१/- | मनपा निधी (नगरसेवक निधी अंतर्गत) |
| ३२ | ४२३ | १८/१०/२०२१ | प्र.क्र.१९मध्ये डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे पुतळ्या पासून ते आखाडे यांचे घरापर्यंत रस्ता कॉक्रीट करणे. | ९,९३,८५०/- | लो.शा.अण्णाभाऊ साठे ना. द. वस्ती सुधार योजना अंतर्गत |
| ३३ | ४३१ | २०/१०/२०२१ | प्र.क्र.१२ मध्ये वलवाडी शिवारातील वृंदावन कॉलनी भागात श्री.भट्ट बाप यांच्या घरापासुन ते एन. डी. पाटील यांच्या घरापर्यंत रस्ता कॉक्रीट करणे. | २३,६४,३८१/- | नविन हद्दवाढ क्षेत्र विकास निधी |
| ३४ | ४३६ | २६/१०/२०२१ | प्र.क्र.२ मध्ये श्री.गवळे रावसाहेब यांच्या घरापासुन ते श्री.वडगुजर यांच्या घरापावेतो रस्ता डांबरीकरण करणे. | १२,४७,५०६/- | महा.सुवर्ण जयंती नगरोत्थान (जिल्हास्तरीय)योजना अंतर्गत |
| ३५ | ४४१ | २६/१०/२०२१ | प्र.क्र.९ मध्ये ग.नं.४ व ५ चा जवळ सुवर्णकार भुवन ,राज बिअर बार पावेतो रस्ता कॉक्रीट करणे. | २४,९२,५८०/- | -----------"------------- |
| ३६ | ४४३ | २६/१०/२०२१ | प्र.क्र.१६ मध्ये अजबे नगर ते राम नगर भागातील पंचशील स्तंभ ते छत्रपती चौक ते राम नगर भागात दोन्ही बाजुस गटार करणे. | २४,९९,१७०/- | लो.शा.अण्णाभाऊ साठे ना. द. वस्ती सुधार योजना अंतर्गत |
| ३७ | ४४८ | २६/१०/२०२१ | प्र.क्र.१३ मध्ये आंबेडकर नगर भागात वाल्मिक बाविस्कर यांच्या घरापासुन ते पिंटू दयाल यांचे घरापावेतो रस्ता कॉक्रीट करणे. | १८,९८,२३५/- | -----------"------------- |
| ३८ | ४४९ | २६/१०/२०२१ | प्र.क्र.६ मध्ये नकाणे गाव भगवान बागुल ते किसन जयराम यांच्या घरापर्यंत कॉक्रीट गटार करणे. | ५,९७,२८७/- | नविन हद्दवाढ गाव महसुल निधी अंतर्गत |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ३९ | ४५१ | २६/१०/२०२१ | प्र.क्र.१५ मध्ये उदय नगर येथे बागुल यांचे घरापासून ते वैसाणे यांचे घरापर्यंत रस्ता डांबरीकरण करणे. | १८,००,६२५/- | लो.शा.अण्णाभाऊ साठे ना. द. वस्ती सुधार योजना अंतर्गत |
| ४० | ४५२ | २६/१०/२०२१ | प्र.क्र.६ मध्ये नकाणे गाव भगवान बागुल ते किसन जयराम यांच्या घरापर्यंत रस्ता डांबरीकरण करणे. | १३,९७,५०८/- | नविन हद्दवाढ क्षेत्र उत्पन्न निधी अंतर्गत |
| ४१ | ४५४ | २६/१०/२०२१ | प्र.क्र.१० मध्ये सुपडू आप्पा कॉलनी येथे राजू चौधरी ते राज प्रोव्हिजन पावेतो रस्ता कॉंक्रीट करणे. | २०,२७,७६७/- | महा.सुवर्ण जयंती नगरोत्थान (जिल्हास्तरीय)योजना अंतर्गत |
| ४२ | ४५५ | २६/१०/२०२१ | प्र.क्र.१४ मध्ये रामवाडी भागात मालेगाव रोड रामवाडी गेट पासून ते शोरूम पावेतो रस्ता कॉंक्रीटीकरण करणे. | १२,४३,२०२/- | -----------"------------- |
| ४३ | ४५६ | २६/१०/२०२१ | प्र.क्र.१५ मध्ये जवाहर नगर येथे अरुण वाघ यांच्या घरापासुन ते बाविस्कर यांचे घरापर्यंत रस्ता डांबरीकरण करणे. | ९,९७,९०६/- | लो.शा.अण्णाभाऊ साठे ना. द. वस्ती सुधार योजना अंतर्गत |
| ४४ | ४५७ | २६/१०/२०२१ | प्र.क्र.४ मध्ये वैभव गावीत यांच्या घरापासुन ते नंदू कुलकर्णी यांच्या घरापावेतो रस्ता कॉंक्रीट करणे. | १९,९७,८१४/- | -----------"------------- |
| ४५ | ४५८ | २७/१०/२०२१ | प्र.क्र.११ लक्ष्मी कॉलनी येथे श्री.वडार मामा ते श्रीमती जयश्री अहिरराव यांचे घरापर्यंत आर.सी.सी.गटार व ड्रेनेज लाईन टाकणे. | १९,९८,३५२/- | मनपा निधी अंतर्गत (नगरसेवक निधी) |
| ४६ | ४५९ | २७/१०/२०२१ | प्र.क्र.४ झेंडे नवकार स्वीट ते गणपती हार्ड वेअर पावेतो रस्ता डांबरीकरण करणे. | १२,४८,३१३/- | महा.सुवर्ण जयंती नगरोत्थान (जिल्हास्तरीय)योजना अंतर्गत |
| ४७ | ४६० | २७/१०/२०२१ | प्र.क्र.५ एस.आर.पी.रिक्षा स्टॉप ते सुर्यवंशी वेल्डिंग वर्कर्स पावेतो रस्ता डांबरीकरण करणे. | १२,४७,९९५/- | -----------"------------- |
| ४८ | ४६१ | २७/१०/२०२१ | प्र.क्र.५ मध्ये देवपूर आनंद नगर येथे जोगेश्वरी फर्निचर पासुनते श्री.शिंदे यांच्या घरापावेतो रस्ता डांबरीकरण करणे. | १२,४८,६१९/- | -----------"------------- |
| ४९ | ४६२ | २९/१०/२०२१ | प्र.क्र.१४ पवन नगर भागात पश्चिम हुडको येथे श्री.गणेश यांच्या घरापासुनते श्री.वाणी यांच्या घरापावेतो रस्ता कॉंक्रीटीकरण करणे. | १२,४६,८५२/- | -----------"------------- |
| ५० | ४६३ | २९/१०/२०२१ | प्र.क्र.१४ गोपाल नगर भागात धोबी यांच्या घरापासून ते श्री.पाटील रस्ता डांबरीकरण करणे. | १२,४६,५६१/- | -----------"------------- |
| ५१ | ४६४ | २९/१०/२०२१ | प्र.क्र.१४ पश्चिम हुडको व मारोती नगर येथील डी.पी.रोडपासून श्री.अंपळकर यांचे घरा पर्यंत रस्ता कॉंक्रीट करणे. | १९,९८,६८७/- | -----------"------------- |
| ५२ | ४६५ | २९/१०/२०२१ | प्र.क्र.१५ बाला अप्पा नगर येथील ओपनस्पेस लहान मुलांसाठी मनोरंजनात्मक खेळणी व साधने व सुशोभिकरण करणे. | ९,९७,३५१/- | -----------"------------- |
| ५३ | ४६६ | २९/१०/२०२१ | प्र.क्र.६ मध्ये नकाणे येथे आर.सी.पाटील यांच्या घरापासुन ते जिल्हापरिषद शाळेपर्यंत रस्ता सिमेंट कॉंक्रीट करणे. | १२,३२,८९६/- | -----------"------------- |
| ५४ | ४६७ | २९/१०/२०२१ | प्र.क्र.६ मध्ये नकाणे गावात दासभाऊ बागुल यांच्या घरापासुन ते श्री.देवराम मोरे यांच्या घरापर्यंत पेव्हर ब्लॉक बसविणे. | १२,४०,३८०/- | -----------"------------- |
| ५५ | ४६८ | २९/१०/२०२१ | प्र.क्र.६ मध्ये नकाणे गावात पिर बाबा चौक येथे पेव्हर ब्लॉक बसविणे. | १४,४५,६४०/- | -----------"------------- |
| ५६ | ४६९ | २९/१०/२०२१ | प्र.क्र.१५ मध्ये अरुण कुमार वैद्य नगर येथे सोनवणे यांच्या घरापासुन ते इंगळे ते वानखेडे ते कुलथे यांचे घरापावेतो रस्ता डांबरीकरण करणे. | १४,९१,००७/- | लो.शा.अण्णाभाऊ साठे ना. द. वस्ती सुधार योजना अंतर्गत |
| ५७ | ४७० | २९/१०/२०२१ | प्र.क्र.११ मध्ये बाळापुर येथे यशवंत नवल पाटील ते विजय मिस्तरी यांच्या घरापर्यंत रस्ता कॉंक्रीटीकरण करणे व गटार करणे. | १२,४५,००२/- | -----------"------------- |
| ५८ | ४७१ | २९/१०/२०२१ | प्र.क्र.४ मध्ये विशाल साळवे यांच्या घरापासून ते अनिल वाघ यांच्या घरापावेतो रस्ता कॉंक्रीटीकरण करणे. | १२,४९,५६३/- | -----------"------------- |
| ५९ | ४७२ | ०२/११/२०२१ | प्र.क्र.४ मध्ये चंदन नगर भागात श्री.रवी दुसाने यांच्या घरापासुन ते वाणी किराणा दुकाना पर्यंत रस्ता कॉंक्रीट करणे. | २४,९८,९५१/- | -----------"------------- |
| ६० | ४७३ | ०२/११/२०२१ | प्र.क्र.१६ मध्ये सत्यसाईबाबा हौसिंग सोसा. संदिप शिरसाठ यांच्या घरापासून ते शुभम प्रोव्हिजन पावेतो रस्ता डांबरीकरण व गटार करणे. | १९,९५,०५५/- | -----------"------------- |
| ६१ | ४७४ | ०२/११/२०२१ | प्र.क्र.१८ मध्ये मोहाडी ललित भाऊ यांच्या घरापासुन ते पश्चिमेस प्रमोद सोनवणे यांच्या घरापावेतो रस्ता डांबरीकरण करणे. | १९,९५,१६७/- | -----------"------------- |
| ६२ | ४७६ | ०२/११/२०२१ | प्र.क्र.१८ मध्ये मोहाडी साहेबराव दौलत ते सार्व.मुतारी पावेतो रस्ता कॉंक्रीटीकरण व गटार करणे. | २४,९८,१८९/- | -----------"------------- |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ६३ | ४७७ | ०९/११/२०२१ | प्र.क्र.१४ मिरजकर नगर येथे ८० गाळे भागात श्री.अनिल पाटील यांच्या घरा पासून ते श्री.चौधरी यांचे घरापर्यंत रस्ता कॉंक्रीटीकरण करणे. | १२,४३,५२६/- | महा.सुवर्ण जयंती नगरोत्थान (जिल्हास्तरीय)योजना अंतर्गत |
| ६४ | ४७८ | १४/१२/२०२१ | प्र.क्र.४ मध्ये अड.मिलिंद बोरसे यांचे घरापासुन ते रवींद्रनाथ टागोर नर्सरी पावेतो रस्ता डांबरीकरण करणे. | १२,४७,६०८/- | -----------"------------- |
| ६५ | ४७९ | १४/१२/२०२१ | प्र.क्र.१० बर्फ कारखाना गुरुदत्त कॉ.ते राकेश रोकडे यांचे घराजवळील बंदिस्त गटार करणे. | २४,९८,८७६/- | -----------"------------- |
| ६६ | ४८० | १४/१२/२०२१ | प्र.क्र.६ मोराणे येथे विशाल पंजाब हॉटेल ते गुप्ता गणेश नगर रस्ता कॉंक्रीट करणे. | १२,६५,६७५/- | -----------"------------- |
| ६७ | ४८१ | १४/१२/२०२१ | प्र.क्र.३ नुर नगरच्या बोर्ड पासून ते राजू शाह यांचे घरापर्यंत आसिफ पेंटर यांच्या घरापासुन ते साजिद शेख यांचे घरापर्यंत अश्फाक हाजी ते हनीफ शेख यांचे घरापर्यंत कॉंक्रीट रोड व कॉंक्रीट गटार करणे. | १४,९९,७३७/- | आमदार स्थानिक विकास निधी अंतर्गत |
| ६८ | ५०२ | २२/१२/२०२१ | प्र.क्र.१३ मध्ये अन्सारी शेठ यांच्या घरापासून ते जैयव्या यांच्या घरापावेतो रस्ता कॉंक्रीटीकरण करणे. | १२,४१,५७६/- | महा.सुवर्ण जयंती नगरोत्थान (जिल्हास्तरीय)योजना अंतर्गत |
| ६९ | ५०४ | २२/१२/२०२१ | धुळे मनपा हद्दीतील देवपूर भागातील राम नगर बोर्ड ते स्वामी समर्थ पेट्रोल पंपा पावेतो रस्त्याच्या एका बाजूस फिडर मेन ८" HDPE पाईपलाईन टाकणे. | २४,६७,०२९/- | मनपा निधी अंतर्गत (नगरसेवक निधी) |
| ७० | ५०५ | २२/१२/२०२१ | धुळे मनपा हद्दीतील देवपूर भागातील श्री.वाय यांच्या घरापासून ते स्वामी समर्थ सुशांत कॉलनी पावेतो रस्त्याच्या एका बाजूस फिडर मेन ८" HDPE पाईपलाईन टाकणे. | १९,२९,९००/- | -----------"------------- |

**सही/**-x x x
सभापती,
स्थायी समिती,
धुळे महानगरपालिका, धुळे

विषय क्रमांक:- १८३ — आण्णाभाऊ साठे नागरी दलित वस्ती सुधार योजना अंतर्गत प्रभाग क्र.१५मध्ये उत्कर्ष कॉलनी येथील श्री.पवार यांच्या घरापर्यंत पावेतो रस्ता कॉंक्रीट करणेचे निविदा दर मागविण्यांत आलेत, त्याबाबत आलेल्या फेर कार्यालयीन अहवालावर विचार करणे.

म. नगरसचिव — नगरसचिव यांनी विषयांचे वाचन केले.

म. अमोल मासुळे — विषय मंजूर करण्यांत यावा.

म. सभापती — सर्व सन्मा.सदस्यांच्या सहमतीने व कार्यालयीनअहवालास अधिनराहून सदर प्रस्तावास मान्यता देण्यांत येत आहे.

**धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर १९९ दिनांक १३/०१/२०२२**

आण्णाभाऊ साठे नागरी दलित वस्ती सुधार योजना अंतर्गत प्रभाग क्र.१५ मध्ये उत्कर्ष कॉलनी येथील श्री.पवार यांच्या घरापर्यंत पावेतो रस्ता कॉंक्रीट करणे या कामाबाबत धुळे महानगरपालिका मे.महासभा ठराव नं.९७ दि.३१/१२/२०१९ अन्वये तसेच मा. जिल्हाधिकारी, धुळे यांचे प्रशासकीय मान्यता दि.२७/९/२०२१ अन्वये उक्त कामाबाबत रक्कम रु.३३,००,३३९/- मात्र खर्चाचा आर्थिक व प्रशासकीय मंजुरी देणेत आली आहे.

उक्त कामाबाबत म.शहर अभियंता, मनपा धुळे यांचे पत्र क्र./५४१ दि.२३/३/२०२० अन्वये रक्कम रु.३३,००,३३९/- मात्र खर्चास तांत्रिक मंजुरी मिळालेली आहे.

उक्त कामाबाबत धुळे महानगरपालिका जा.क्र./बां.वि./१६९/२०२१ दि.२२/१०/२०२१ अन्वये रोजी सकाळ / खानदेश मैदान या वृत्तपत्रात जाहिर निविदा प्रसिद्ध करणेत येऊन दि.१०/११/२०२१ अखेर निविदा दर मागविण्यात आले आहेत. पात्र कंत्राटदार यांनी निविदेबाबत ऑनलाईन पद्धतीने बयाणा रक्कम भरून निविदा दर सादर केलेले आहेत.

| अ.क्र. | कंत्राटदार किंवा ठेकेदाराचे नाव | दिलेले निविदा दर | शेरा |
|---|---|---|---|
| १ | अभिषेक विजय चिंचोले | शे.२.०० % जास्तीने | |
| २ | सौरभ संजय कदमबांडे | शे.१.००% जास्तीने | |

| | | | |
|---|---|---|---|
| ३ | **सचिन नानाभाऊ आखाडे** | **शे.-३.२५% कमीने** | **सर्वात कमी दर** |
| ४ | मे.आदर्श कन्सट्रक्शन | शे.०.९९% कमीने | |

व

वरील प्रमाणे निविदेत भाग घेतलेले ठेकेदार पात्र असून **सचिन नानाभाऊ आखाडे** यांचे दर **शे.-३.२५% कमीने** आहे व त्यांनी नियमा प्रमाणे ऑनलाईन बयाणा रक्कम भरलेली आहे. सबब कंत्राटदार **सचिन नानाभाऊ आखाडे** यांची **शे.-३.२५% कमीने** दराने आलेले निविदा दर मंजुरीस्तव सादर तसेच अन्य काम न मिळालेले ठेकेदारांना त्यांची बयाणा रक्कम परत करणे बाबत मंजुरीस्तव सादर.

तथापि L१ **श्री. सचिन नानाभाऊ आखाडे** यांनी दि.१६/१२/२०२१ रोजीच्या दिलेल्या पत्रात सदर कामाचे अंदाजपत्रक सन २०१९-२० चे असल्याने चालू बाजार भावात खूप तफावत असल्यामुळे परवडणारे नाही. मी भरलेली निविदा रद्द करावी असे नमूद केले आहे. L१ यांचे EMD अनामत रक्कम जप्त करून L२ **मे.आदर्श कन्सट्रक्शन** यांना दर वाटाघाटीकरिता बोलविले असता त्यांनी दि. २०/१२/२०२१ रोजी दिलेल्या पत्रात **शे. ३.५०% कमी दराने** काम करण्यास सहमती दर्शविली आहे. तरी **मे.आदर्श कन्सट्रक्शन** यांच्या **शे.३.५०% कमी दराने** मान्यतेस्तव तथा निर्णयार्थ मे.स्थायी समिती पुढे सादर झालेला आहे.

सर्व सन्मा.सदस्यांच्या सहमतीने व कार्यालयीन अहवालास अधिन राहून सदर कामी L२ **मे. आदर्श कन्सट्रक्शन** यांना दर वाटाघाटीकरिता बोलविले असता त्यांनी दि.२०/१२/२०२१रोजी दिलेल्या पत्रात **शे.३.५०% कमी दराने** काम करण्यास सहमती दर्शविली आहे. तरी मे.आदर्श कन्सट्रक्शन यांच्या शे.३.५०% कमी दरास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ७३ नुसार मान्यता देण्यांत येत आहे.सदर प्रस्ताव व कार्यवाही बाबत लेखा आक्षेप निर्माण होणार नाही याची दक्षता घ्यावी. याबाबतची जबाबदारी संबंधित विभागाची राहील.

सुचक:- श्री. अमोल पावबा मासुळे

अनुमोदक:- श्री. शितल मोहन नवले

सर्वानुमते मंजुर,
सही/-x x x
सभापती,
स्थायी समिती,
धुळे महानगरपालिका धुळे

विषय क्रमांक:- १८४ — आण्णाभाऊ साठे नागरी दलित वस्ती सुधार योजना अंतर्गत प्र.क्र.९ मध्ये गायकवाड चौक नंदू सोनवणे यांचे घरापर्यंत रस्ता व बंदिस्त गटार करणेचे निविदा दर मागविण्यांत आलेत, त्याबाबत आलेल्या फेर कार्यालयीन अहवालावर विचार करणे.

म. नगरसचिव — नगरसचिव यांनी विषयांचे वाचन केले.

म. शितल नवले — विषय मंजूर करण्यांत यावा.

म. सभापती — सर्व सन्मा.सदस्यांच्या सहमतीने व कार्यालयीनअहवालास अधिनराहून सदर प्रस्तावास मान्यता देण्यांत येत आहे.

**धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर २०० दिनांक १३/०१/२०२२**

आण्णाभाऊ साठे नागरी दलित वस्ती सुधार योजना अंतर्गत प्र.क्र.९ मध्ये गायकवाड चौक नंदू सोनवणे यांचे घरापर्यंत रस्ता व बंदिस्त गटार करणे या कामाबाबत धुळे महानगरपालिका मे.महासभ ठराव नं.९७दि.३१/१२/२०१९अन्वये तसेच मा. जिल्हाधिकारी, धुळे यांचे प्रशासकीय मान्यता दि.२७/९/२०२१ अन्वये उक्त कामाबाबत रक्कम रु.३९,९९,८२९/- मात्र खर्चाचा आर्थिक व प्रशासकीय मंजूरी देणेत आली आहे.

उक्त कामाबाबत म.शहर अभियंता,मनपा,धुळे यांचे पत्र क्र./५६१दि.२३/३/२०२०अन्वये रक्कम रु.३९,९९,८२९/- मात्र खर्चास तांत्रिक मंजुरी मिळालेली आहे.

उक्त कामाबाबत धुळे महानगरपालिका जा.क्र./बां.वि./१७३/२०२१ दि. १/११/२०२१ अन्वये रोजी पुण्यनगरी/ खानदेश या वृत्तपत्रात जाहीर निविदा प्रसिद्ध करणेत येऊन दि.२३/११/२०२१ अखेर निविदा दर मागविण्यात आले आहेत. पात्र कंत्राटदार यांनी निविदेबाबत ऑनलाईन पद्धतीने बयाणा रक्कम भरून निविदा दर सादर केलेले आहेत.

| अ.क्र. | कंत्राटदार किंवा ठेकेदाराचे नाव | दिलेले निविदा दर | शेरा |
|---|---|---|---|
| १ | वृषभ सतीष खिवसरा | शे.३.०० % जास्तीने | |
| २ | हिंद कन्सट्रक्शन | श्र.२.००% जास्तीने | |
| ३ | **मे.एकविरा कन्सट्रक्शन** | **अंदाजपत्रकीय दर** | **सर्वात कमी दर** |

वरील प्रमाणे निविदेत भाग घेतलेले ठेकेदार पात्र असून **मे.एकविरा कन्सट्रक्शन** यांचे दर **अंदाजपत्रकीय दराने** आहे व त्यांनी नियमा प्रमाणे ऑनलाईन बयाणा रक्कम भरलेली आहे. सबब कंत्राटदार **मे. एकविरा कन्सट्रक्शन** यांची **अंदाजपत्रकीय दराने** दराने आलेले निविदा दर मंजुरीस्तव सादर तसेच अन्य काम न मिळालेले ठेकेदारांना त्यांची बयाणा रक्कम परत करणे बाबत मंजुरीस्तव प्रस्ताव मे. स्थायी समिती पुढे सादर झालेला आहे.

सर्व सन्मा. सदस्यांच्या सहमतीने कार्यालयीन अहवालास अधिन राहून कंत्राटदार **मे.एकविरा कन्सट्रक्शन** यांची **अंदाजपत्रकीय दराने** आलेले निविदा दरास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ७३ नुसार मान्यता देण्यांत येत आहे. सदर प्रस्ताव व कार्यवाही बाबत लेखा आक्षेप निर्माण होणार नाही याची दक्षता घ्यावी. याबाबतची जबाबदारी संबंधित विभागाची राहील.

सुचक:- श्री. शितल मोहन नवले
अनुमोदक:- श्री. नागसेन दामोदर बोरसे

सर्वानुमते मंजुर,
सही/-x x x
सभापती,
स्थायी समिती,
धुळे महानगरपालिका धुळे

विषय क्रमांक:- १८५ — आण्णाभाऊ साठे नागरी दलित वस्ती सुधार योजना अंतर्गत प्रभाग क्र.९ मध्ये गायकवाड चौक मुतारी पासून ते नवीन भिलाटी पर्यंत रस्ता व गटार करणेचे निविदा दर मागविण्यांत आलेत, त्याबाबत आलेल्या फेर कार्यालयीन अहवालावर विचार करणे.

म. नगरसचिव — नगरसचिव यांनी विषयांचे वाचन केले.

म.नागसेन बोरसे — विषय मंजूर करण्यांत यावा.

म. सभापती — सर्व सन्मा.सदस्यांच्या सहमतीने व कार्यालयीनअहवालास अधिनराहून सदर प्रस्तावास मान्यता देण्यांत येत आहे.

**धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर २०१दिनांक १३/०१/२०२२**

आण्णाभाऊ साठे नागरी दलित वस्ती सुधार योजना अंतर्गत प्रभाग क्र.९ मध्ये गायकवाड चौक मुतारी पासून ते नवीन भिलाटी पर्यंत रस्ता व गटार करणे या कामाबाबत धुळे महानगरपालिका मे.महासभा ठराव नं.९७ दि.३१/१२/२०१९ अन्वये तसेच मा. जिल्हाधिकारी, धुळे यांचे प्रशासकीय मान्यता दि.२७/९/२०२१ अन्वये उक्त कामाबाबत रक्कम रु.३४,९९,८७९/- मात्र खर्चाचा आर्थिक व प्रशासकीय मंजुरी देणेत आली आहे.

उक्त कामाबाबत म.शहर अभियंता ,मनपा धुळे यांचे पत्र क्र./५६२ दि.२३/३/२०२० अन्वये रक्कम रु. ३४,९९,८७९/- मात्र खर्चास तांत्रिक मंजुरी मिळालेली आहे.

उक्त कामाबाबत धुळे महानगरपालिका जा.क्र./बां.वि./१७३/२०२१ दि.१/११/२०२१ अन्वये रोजी पुण्यनगरी/ खानदेश या वृत्तपत्रात जाहीर निविदा प्रसिद्ध करणेत येऊन दि.२३/११/२०२१ अखेर निविदा दर मागविण्यात आले आहेत. पात्र कंत्राटदार यांनी निविदेबाबत ऑनलाईन पद्धतीने बयाणा रक्कम भरून निविदा दर सादर केलेले आहेत.

| अ.क्र. | कंत्राटदार किंवा ठेकेदाराचे नाव | दिलेले निविदा दर | शेरा |
|---|---|---|---|
| १ | वृषभ सतीष खिवसरा | शे.३.०० % जास्तीने | |
| २ | हिंद कन्सट्रक्शन | श्र.२.००% जास्तीने | |
| ३ | **मे.एकविरा कन्सट्रक्शन** | **अंदाजपत्रकीय दर** | **सर्वात कमी दर** |

वरील प्रमाणे निविदेत भाग घेतलेले ठेकेदार पात्र असून **मे.एकविरा कन्सट्रक्शन** यांचे दर **अंदाजपत्रकीय दराने** आहे व त्यांनी नियमा प्रमाणे ऑनलाईन बयाणा रक्कम भरलेली आहे. सबब कंत्राटदार मे.एकविरा कन्सट्रक्शन यांची अंदाजपत्रकीय दराने दराने आलेले निविदा दर मंजुरीस्तव सादर तसेच अन्य काम न मिळालेले ठेकेदारांना त्यांची बयाणा रक्कम परत करणे बाबत मंजुरीस्तवमे. स्थायी समिती पुढे सादर झालेला आहे.

सर्व सन्मा. सदस्यांच्या सहमतीने कार्यालयीन अहवालास अधिन राहून कंत्राटदार मे.एकविरा कन्सट्रक्शन यांची अंदाजपत्रकीय दराने आलेले निविदा दरास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ७३ नुसार मान्यता देण्यांत येत आहे. सदर प्रस्ताव व कार्यवाही बाबत लेखा आक्षेप निर्माण होणार नाही याची दक्षता घ्यावी. याबाबतची जबाबदारी संबंधित विभागाची राहील.

सुचक:- श्री. नागसेन दामोदर बोरसे

अनुमोदक:- श्री.शितल मोहन नवले

सर्वानुमते मंजुर,

सही/-x x x

सभापती,

स्थायी समिती,

धुळे महानगरपालिका धुळे

विषय क्रमांक:- १८६ — आण्णाभाऊ साठे नागरी दलित वस्ती सुधार योजना अंतर्गत प्र.क्र.१ मध्ये राजेंद्र नगर वलवाडी येथे गोंदूर रोड डी.पी.पासून श्री.रामकृष्ण सैंदाणे यांचे घरापर्यंत रस्ता डांबरीकरण करणेचे निविदा दर मागविण्यांत आलेत, त्याबाबत आलेल्या फेर कार्यालयीन अहवालावर विचार करणे.

म. नगरसचिव — नगरसचिव यांनी विषयांचे वाचन केले.

म.अमोल मासुळे — विषय मंजूर करण्यांत यावा.

म. सभापती — सर्व सन्मा.सदस्यांच्या सहमतीने व कार्यालयीनअहवालास अधिनराहून सदर प्रस्तावास मान्यता देण्यांत येत आहे.

**धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर २०२ दिनांक १३/०१/२०२२**

आण्णाभाऊ साठे नागरी दलित वस्ती सुधार योजना अंतर्गत प्र.क्र.१ मध्ये राजेंद्र नगर वलवाडी येथे गोंदूर रोड डी.पी.पासून श्री.रामकृष्ण सैंदाणे यांचे घरापर्यंत रस्ता डांबरीकरण करणे या कामाबाबत धुळे महानगरपालिका मे.महासभा ठराव नं.९७ दि.३१/१२/२०१९ अन्वये तसेच मा.जिल्हाधिकारी, धुळे यांचे प्रशासकीय मान्यता दि.२७/९/२०२१ अन्वये उक्त कामा बाबत रक्कम रु.२७,७७,५२६/-मात्र खर्चाचा आर्थिक व प्रशासकीय मंजुरी देणेत आली आहे.

उक्त कामाबाबत म.शहर अभियंता,मनपा धुळे यांचे पत्र क्र./५२५ दि. २३/३/२०२०अन्वये रक्कम रु. २७,७७,५२६/- मात्र खर्चास तांत्रिक मंजुरी मिळालेली आहे.

उक्त कामाबाबत धुळे महानगरपालिका जा.क्र./बां.वि./१६८/२०२१ दि. २१/१०/२०२१ अन्वये रोजी पुण्यनगरी/ खानदेश या वृत्तपत्रात जाहीर निविदा प्रसिद्ध करणेत येऊन दि.८/११/२०२१ अखेर निविदा दर मागविण्यात आले आहेत. पात्र कंत्राटदार यांनी निविदेबाबत ऑनलाईन पद्धतीने बयाणा रक्कम भरून निविदा दर सादर केलेले आहेत.

| अ.क्र. | कंत्राटदार किंवा ठेकेदाराचे नाव | दिलेले निविदा दर | शेरा |
|---|---|---|---|
| १ | अभिषेक विजय चिंचोले | शे.२.०० % जास्तीने | |
| २ | **सौरभ संजय कदमबांडे** | **शे.०.९९% कमीने** | **सर्वात कमी दर** |
| ३ | मे.आदर्श कन्सट्रक्शन | अंदाजपत्रकीय दर | |

वरील प्रमाणे निविदेत भाग घेतलेले ठेकेदार पात्र असून **सौरभ संजय कदमबांडे** यांचे दर **शे.०.९९% कमीने** आहे व त्यांनी नियमा प्रमाणे ऑनलाईन बयाणा रक्कम भरलेली आहे. सबब कंत्राटदार **सौरभ संजय कदमबांडे** यांची **शे.०.९९% कमीने** दराने आलेले निविदा दर मंजुरीस्तव सादर तसेच अन्य काम न मिळालेले ठेकेदारांना त्यांची बयाणा रक्कम परत करणे बाबत मंजुरीस्तव मे. स्थायी समिती पुढे सादर केलेला आहे.

सर्व सन्मा. सदस्यांच्या सहमतीने कार्यालयीन अहवालास अधिन राहून कंत्राटदार **सौरभ संजय कदमबांडे** यांची **शे.०.९९% कमीने** आलेले निविदा दर दरास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ७३ नुसार मान्यता देण्यांत येत आहे. सदर प्रस्ताव व कार्यवाही बाबत लेखा आक्षेप निर्माण होणार नाही याची दक्षता घ्यावी. याबाबतची जबाबदारी संबंधित विभागाची राहील.

सुचक:- श्री. अमोल पावबा मासुळे

अनुमोदक:- श्री.शितल मोहन नवले

सर्वानुमते मंजुर,
सही/-x x x
सभापती,
स्थायी समिती,
धुळे महानगरपालिका धुळे

विषय क्रमांक:- १८७ — मनपा शिक्षण मंडळ धुळे अंतर्गत सुरु असलेल्या इंग्रजी माध्यमाच्या शाळेतील शिक्षिकांचे मानधन अदा करणेबाबत आलेल्या कार्यालयीन अहवालावर विचार करणे.

म. नगरसचिव — नगरसचिव यांनी विषयांचे वाचन केले.

म. अमोल मासुळे — सभापती महोदय, उशीरा का असेना पण आज हा विषय अजेंडयावर घेण्यात आला. आपली ३५० ते ४०० कोटी बजेटची महापालिका त्यात शिक्षण क्षेत्रात महानगरपालिकेकडून चांगले काम झाले पाहिजे आणि तेच चांगले काम हया इंग्रजी माध्यमांच्या शाळा त्यांच्या माध्यमातून करतांना दिसत आहे. जवळपास २०० ते २५० विदयार्थी सर्व जाती धर्माचे,सामान्य कुटुंबातील विदयार्थी शिक्षण घेत असतात. या ठिकाणी विषय घेतला हा विषय मंजूर करावा. हा विषय मंजूर केल्यानंतर गेल्या अनेक महिन्यांपासून भगींनींना पायपीट करावी लागत होती. त्रास सहन करावा लागत होता. त्यांना त्वरी त कारवाई करुन ते मानधन मिळावे धन्यवाद.

म. शितल नवले — सन्मा. सभापती महोदय, हा झाला भूतकाळ आता नविन बजेट तयार होत आहे. मी प्रशासनाला विनंती करतो की, हया ज्या शाळा चालू आहे त्या अतिशय उत्तम चालू आहे. माझ्या प्रभागात एक शाळा आहे. शाळा क्रं. २८ तुम्ही तिथे गेलात तर तिथे पटसंख्या सुध्दा नाही. पटसंख्या कशी मॅनेज केली जाते हे तुम्हाला चांगले ठाऊक आहे. आपल्या मराठी शाळाची परिस्थिती फार खराब आहे.फक्त काही अल्पसंख्याक भागातील उर्दू शाळा चांगल्या रितीने सुरु आहे. आपण शिक्षण कर प्रत्येक नागरिकांकडून गोळा करतो. परंतु त्याचे बेनीफिट काय पोहचवतो जनतेला?मी तुम्हाला विनंती करतो एक तर ते महिला बालकल्याणच्या बजेट मध्ये टाका. आमच्यातले बहुसंख्य सदस्य पुढच्याही सभागृहात आहे पुढच्या वर्षात वार्षीक साधारणत: पंधरा लाख तरतूद केले या पैशात २०० ते २५० विदयार्थ्यांचे भविष्य निश्चीत सुधारु शकतो.आणि याला विना अनुदानित जसे आपल्याकडे सफाई कर्मचारी असतील बाकीचे मानधनावरील मॅकेनिक किंवा फिटर असतात त्याचे जसे महिन्याचे कॅल्क्युलेट करतो त्या पदधतीने हया शिक्षिकांना नियुक्त करावे. हा कायमस्वरुपी प्रॉब्लेम सॉल्व्ह करायचा असेल पंधरा लाख महानगरपालिकेला अजिबात जड नाही. त्यांचे पगार आपण करणार आहे.ज्या काही फॉर्मालिटीज शिक्षण खात्यात असतील शासन स्तरावरती लवकरात लवकर कराव्या ही विनंती.

म.अमोल मासुळे — विषय मंजूर करण्यांत यावा.

म. सभापती

सर्व सन्मा.सदस्यांच्या सहमतीने व कार्यालयीन अहवालानुसार सदर प्रस्तावास मान्यता देण्यांत येत आहे. तसेच इंग्रजी शाळाच्या शिक्षकांच्या मानधनाबाबतची तरतूद पुढील येणा-या अर्थसंकल्पात करण्यांत यावी.

**धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर २०३ दिनांक १३/०१/२०२२**

धुळे म.न.पा.शिक्षण मंडळ,अंतर्गत शाळा क्रं.9,14,25 मधून इंग्रजी माध्यमाचे इ. 1 ते 4 वर्ग सुरु आहेत. त्यात कार्यरत शिक्षिकेंना ऑक्टोबर 2021 ते डिसेंबर 2021 पर्यंत मानधन अदा करणेबाबत उपरोक्त संदर्भान्वये मान्यता देण्यात आलेली आहे.

म.न.पा.शिक्षण मंडळ,धुळेने विशेष ठराव करुन धुळे शहरात कार्यरत असणाऱ्या मराठी/उर्दू शाळांमध्ये इंग्रजी माध्यमाचे ज्यु.केजी./सिनि.केजी व प्राथमिक विभागात 1 ते 4 वर्ग सुरु करणेबाबत दि. 13/4/2012 ते 8/2/2012 च्या विशेष ठरावान्वये मान्यता प्रदान करणेत आली होती.

सदर ठराव महासभेत मंजुरीसाठी सविनय सादर करणेत आला व या ठरावास ठराव क्रं.25 दि.15/05/2014 रोजी महासभेने मान्यता प्रदान करणेत आलेली आहे.

मान्यता प्रदानानंतर यासर्व शाळा नियमित सुरु असताना महानगरपालिका धुळे यांनी ज्यु.केजी. मध्ये कार्यरत व 1 ते 4 वर्गांना शिकवित असलेल्या 24 शिक्षिकांसहित मान्यता धुळे महानगरपालिका ठराव क्रं.34 दि 20/2/2017 अन्वये ठराव पारित करण्यात आलेला आहे. त्या अनुषंगाने 2012 पासून या शिक्षिका कार्यरत होत्या मात्र मा.शिक्षण संचालक कार्यालयाकडून सदर पदांना मान्यता न मिळाल्याने 10 शिक्षिकेने कामकाज सोडून दिले सद्यस्थितीत प्रवेशित विद्यार्थ्याचे शैक्षणिक नुकसान होऊ नये म्हणून या शाळा सुरु आहेत. त्यात 14 शिक्षिका कार्यरत आहेत या पदांनाही मंजूर मिळालेली नाही तथापि म.न.पा.स्तरावरून कार्यरत शिक्षिकाना मानधन मिळावे म्हणून संदर्भान्वये चर्चा करण्यात येऊन मानधन देणेबाबत चर्चेद्वारे मान्यता देण्यात आलेली आहे.

तद्नंतर सदर पदांना मंजुरीबाबत म.न.पा.शिक्षण मंडळ,धुळे व म.न.पा.स्तरावरून मा.प्रधान सचिव,नगरविकास विभाग, मंत्रालय,मुंबई यांच्याकडे वेळोवेळी प्रस्ताव सादर करण्यात आलेला आहे.

त्या अनुषंगाने कार्यरत शिक्षिकेचे ऑक्टो.2021 ते डिसेंबर 2021 पर्यंतचे मानधन बील तयार करून सादर करीत आहोत.

महोदयास विनंती की,सदर शिक्षिकेचे मानधन रुपये 3,30,836/- मात्र अदा करणेस्तव सविनय सादर. असे प्रशासन अधिकारी मनपा शिक्षण मंडळा धुळे यांचे सादर केले आहे.

यावर मुख्य लेखाधिकारी यांनी खालील प्रमाणे अभिप्राय सादर केला आहे. विभागाने प्रस्तावित केलयानुसार ऑक्टो २०२१ ते डिसेंबर २१ या ३ महिन्यांचे १४ शिक्षकांचे मानधन वितरीत होणेसाठी नस्ती सादर केली आहे.

सदर प्रकरणासाठी मा. महासभा यांची मंजुरी प्राप्त आहे.सदर शाळा या कार्यान्वीत असून तेथे २०० पेक्षा अधिक विद्यार्थी शिक्षण घेत आहे. मा. आयुक्त . मा. महापौर यांचे सोबत झालेल्या चर्चेनुसार सदर विद्यार्थ्यांना इतरत्र विस्थापित करणे शक्य नाही.जर सद्यस्थितीत शाळा बंद केल्या तर मुलांचे शिक्षणाचा प्रश्न निर्माण होऊ शकतो.भारतीय संविधानाचे कलम २१ अंतर्गत प्राथमिक शिक्षण हे मुलभूत हक्कामध्ये समाविष्ट केले आहे.तसेच RTE Act 2009 नुसार प्राथिमक शिक्षण उपलब्ध करुन देणे हे महानगरपालिकेच्या कर्तव्याचा देखील भाग आहे. त्यानुसार मनपा अधिनियम १९४९चे कलम ६७(क) मध्ये नमूद नुसार कोणत्याही आणिबाबीच्या परिस्थितीत जनतेच्या सेवेसाठी किंवा सुरक्षिततेसाठी किंवा मनपाच्या मालमत्तेंच्या संरक्षणासाठी अशा आणीबाणीच्या परिस्थितीमुळे त्यास समर्थनीय किंवा आवश्यक वाटेल अशी तांतडीची कार्यवाही त्यास या अधिनियमान्वये शासनाच्या

मंजुरी, मान्यता किंवा प्राधिकरणाशिवाय करता येत नसली तरीही अशी कार्यवाही केली पाहिजे व सदर बाब स्थायी समिती व मनपा महासभा यांचे समोर पाठविली पाहिजे असे नमूद केले आहे.

सदर प्रकरणी मानधन अदा न केल्यास सदर शिक्षिकांनी सेवा सोडल्यास विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होऊ शकते तसेच पदास मान्यता नसल्याकारणाने नवीन पदभरतीही करणे शक्य नाही .असा अभिप्राय सादर केला आहे.

याबाबत मा.अति.आयुक्त यांनी मुख्य लेखाधिकारी व लेखापरीक्षक यांच्या अभिप्रायाचे अवलोकन होवून सक्षम प्राधिकरण म्हणून अधिकाराच्या वापरासाठी सदर प्रस्ताव निर्णयार्थ सादर करणेबाबत अभिप्राय दिलेला आहे.

कार्यालयीन अहवालानुसार सदर कामी मनपा शिक्षण मंडळ धुळे अंतर्गत सुरु असलेल्या इंग्रजी माध्यमाच्या शाळेतील शिक्षिकांचे माहे ऑक्टो २०२१ ते डिसेंबर २१ या ३ महिन्यांचे १४ शिक्षकांचे मानधन रुपये ३,३०,८३६/- मात्र अदा करणेचा प्रस्ताव सादर केलेला असून या कार्यालयीन अहवालास मान्यता देण्यांत येत आहे.सदर प्रस्ताव व कार्यवाही बाबत लेखा आक्षेप निर्माण होणार नाही याची दक्षता घ्यावी. याबाबतची जबाबदारी संबंधित विभागाची राहील.

याबाबत सन २०२२-२३ या आर्थिक वर्षाच्या अंदाजपत्रकात संबंधित विभागाने आवश्यक ती मानधनाची तरतुद करावी.

सर्वानुमते मंजुर,<br>
सही/-x x x<br>
सभापती,<br>
स्थायी समिती,<br>
धुळे महानगरपालिका धुळे

# धुळे महानगरपालिका,धुळे

## नगरसचिव कार्यालय

## स्थायी समिती सभा क्रमांक २९ चे इतिवृत्त

---

**धुळे मनपा भारतरत्न अटलबिहारी वाजपेयी सभागृह**
**सोमवार दिनांक २४/०१/२०२२**
**वेळ :- दुपारी ४-०० वाजता.**

धुळे महानगरपालिका स्थायी समितीची साप्ताहिक सभा शासनाच्या दि.३ जानेवारी २०२२ रोजीच्या नवीन सुचनानुसार ऑन लाईन पध्दतीने आज सोमवार दिनांक २४/०१/२०२२ रोजी **दुपारी ४-०० वाजता** मा.श्री. संजय सुधाकर जाधव, सभापती, स्थायी समिती, मनपा, धुळे यांच्या अध्यक्षतेखाली **धुळे मनपा भारतरत्न अटलबिहारी वाजपेयी सभागृह** भरली. ऑनलाईन सभेस खालील सन्मा.सदस्य सभागृहात हजर होते.

| अ.क्रं. | सदस्यांचे नांव | हुद्दा |
|---|---|---|
| १ | श्री. जाधव संजय सुधाकर | सभापती |
| २ | श्री. बैसाणे सुनिल तुळशिराम | सदस्य |
| ३ | श्रीमती माळी भारती अशोक | सदस्या |
| ४ | श्रीमती पाटील मंगला सुरेश | सदस्या |
| ५ | श्रीमती बोरसे पुष्पा प्रकाश | सदस्या |
| ६ | श्री. मासुळे अमोल पावबा | सदस्य |
| ७ | श्री. देवरे कमलेश नारायण | सदस्य |
| ८ | श्रीमती पठाण हिना अस्लम | सदस्या |
| ९ | श्री. सईद बेग हाशम बेग | सदस्य |
| १० | श्री. नवले शितल मोहन | सदस्य |
| ११ | श्री. बोरसे नागसेन दामोदर | सदस्य |
| १२ | श्रीमती कुलेवार किरण राकेश | सदस्या |
| १३ | श्रीमती वराडे वैशाली भिकन | सदस्या |
| १४ | श्री. जाधव बन्सीलाल माणिक | सदस्य |
| १५ | श्रीमती चौधरी मंगला अर्जुन | सदस्या |
| १६ | श्रीमती अन्सारी फातमाबी नुरुल अमीन | |

**उपस्थित अधिकारी गण**

| अ.क्र. | अधिकाऱ्यांचे नाव | हुद्दा |
|---|---|---|
| १ | श्री. नितीन कापडणीस | अति. आयुक्त |
| २ | श्रीमती पल्लवी शिरसाठ | सहा. आयुक्त |
| ३ | श्री. दिनकर जाधव | मुख्य लेखाधिकारी |
| ४ | श्री. मनोज अरविंद वाघ | प्र.नगरसचिव |
| ५ | श्री. के.एन. शिंदे | अभियंता |
| ६ | श्री. प्रदीप चव्हाण | नगररचनाकार |
| ७ | डॉ. श्री. जे.सी. पाटील | प्र.आरोग्याधिकारी |
| ८ | श्री. चंद्रकांत जाधव | सहा.आरोग्याधिकारी |
| ९ | श्री. विकास साळवे | प्र. सह आरोग्याधिकारी ( मलेरिया) |

| | | |
|---|---|---|
| १० | श्री.बी.एस. रनाळकर | सहा. करमूल्य निर्धारण अधिकारी |
| ११ | श्री. महेंद्र सोनवणे | प्रशासन अधिकारी मनपा शिक्षण मंडळ |
| १२ | श्री. राजेंद्र माईनकर | भांडारपाल |
| १३ | श्री. किशोर सुडके | बाजार विभाग प्रमुख |

म.सभापती सर्व उपस्थित सन्मा.सदस्य अति.आयुक्त सो.अधिकारी वर्ग छायाचित्रकार बांधव सभेचे कामकाज चालविणेसाठी आवश्यक तो कोरम पूर्ण झाल्याने नगरसचिव यांनी सभेचे कामकाज सुरुवात करावी.

म. नगरसचिव वंदे मातरम् या राष्ट्रवंदनेसाठी सर्वांनी उभे रहावे.

विषय क्रमांक:- १८८ मागील स्थायी समिती सभांचे इतिवृत्त वाचून कायम करणे. (दि.३०/१२/२०२१,६/१/२०२२)

म.नगरसचिव नगरसचिव यांनी विषयाचे वाचन केले.

म. नागसेन बोरसे दिनांक ३०/१२/२०२१ च्या स्थायी समितीच्या बैठकीत चर्चेमध्ये मी जे बोललो त्याची चूकीची नोंद झालेली आहे. त्यात इतिवृत्तातील पान नं. 8 वर ज्या केंद्रावर हा भ्रष्ट्राचार झालेला असेल ते केंद्र वगळण्यांत यावे व ज्या केंद्रावर भ्रष्ट्राचार नसेल त्यांची चौकशी व्हावी असे अशी नोंद आलेली आहे. त्या ऐवजी ज्या केंद्रावर भ्रष्ट्राचार असेल त्याची चौकशी व्हावी असे नमूद करणे आवश्यक होते.

म. नगरसचिव सदर बाब ही टंकलेखन दुरुस्ती असून याबाबत नोंद घेवून दुरुस्ती करण्यांत येईल.

म. सभापती इतिवृत्तात योग्य ती दुरुस्ती करुन मागील सभांचे इतिवृत्त वाचून कायम करण्यांत येत आहे.

**धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर २०४ दिनांक २४/०१/२०२२**

मागील स्थायी समिती सभा दिनांक ३०/१२/२०२१ च्या स्थायी समिती सभेतील इतिवृत्तात सन्मा. सदस्यांनी सूचित केल्यानुसार दुरुस्ती करण्यांत येवून सदर इतिवृत्त क्रमश: वाचून कायम करण्यांत येत आहे.

तसेच दिनांक ०६/०१/२०२२ रोजीच्या स्थायी समिती ठराव नंबर १८४ ते १९७अखेर तसेच सभेतील सन्मा.सदस्यांनी केलेल्या केलेली चर्चा व त्यावरील निर्णय क्रमश: वाचून कायम करण्यांत येत आहे.

सही/- X X X

**सभापती,**
**स्थायी समिती,**
**धुळे महानगरपालिका धुळे**

विषय क्रमांक:- १८९ धुळे मनपा हद्दीतील देवपूर भागांतील प्रभाग क्र.३ मधील सुशीनाल्या जवळ सेप्टिक टॅक तांतडीने बांधणेचे काम विना निविदा करणेसाठी रु.९४,७८३/-मात्र खर्चास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम नियम ६७(क) अन्वये कार्योत्तर मान्यता देणेबाबत आलेल्या कार्यालयीन अहवालावर विचार करणे.

म.नगरसचिव नगरसचिव यांनी विषयांचे वाचन केले.

म. नागसेन बोरसे या विषयाला तरतूद लावली आहे का? व कोणत्या निधीतून लावली आहे. कारण आमच्या कामांना तरतूद नसल्याचे सांगितले जाते.मी सावित्रीबाई फुले यांचे जयंती निमित्त तेथील चौकाचे किरकोळ कामासाठी तरतूद नाही असे सांगितले होते. सदर काम झाले आहे का ? काम जर झालेले नसेल तर कार्योत्तर मंजुरीसाठी ठेवणे चूकीचे होईल.

म.पी.डी. चव्हाण काम झालेले नाही काम करावयाचे आहे. म्हणून प्रस्ताव मान्यतेसाठी सादर केला आहे.

म. सईद बेग हाशम बेग माझ्या प्रभागातील काम आहे सदर प्रस्ताव मंजुर करण्यांत यावा.

म. नागसेन बोरसे या प्रस्तावातील कार्योत्तर शब्द वगळण्यांत यावा.

म.सभापती आपल्या सन्मा. सदस्यांच्या प्रभागातील प्रस्ताव असल्याने सदर प्रस्तावास सर्व सन्मा. सदस्यांच्या सहमतीने व कार्यालयीन अहवालास अधिन राहून मान्यता देण्यांत येत आहे.

**धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर २०५ दिनांक २४/०१/२०२२**

धुळे मनपा हद्दीतील देवपूर भागांतील प्रभाग क्र.३ मधील सुशीनाल्या जवळ सेप्टिक टॅक बांधणे बाबत संदर्भीय पत्रानुसार मागणी करण्यात आली आहे.सदर ठिकाणी लाला सरदारनगर भागांत

ड्रेनेज लाईन टाकण्यात आली असुन सेप्टिक टॅक नसल्याने सांडपाणी नाल्यामध्ये सोडण्यात आले आहे.त्यामुळे सदर भागांत मोठ्या प्रमाणात दुर्गंधी व रोगराई पसरण्याची शक्यता असल्याने सदर ठिकाणी सेप्टिकटॅक बांधणे गरजेचे आहे.याबाबत सन्मा.सदस्य.सईद बेग हाशम बेग यांनी दि.२०/१२/२०२१ रोजीच्या मे.स्थायी समितीच्या बैठकीत सदर ठिकाणी सेप्टिक टॅक बांधणे बाबत मागणी केली होती. सदरचे काम तातडीने करणे बाबत मा.स्थायी समिती सभापती यांनी आदेशित केले आहे.त्यानुसार सदर कामाचे अंदाजपत्रक तयार केले असून सदर कामास शासकीय दरसूची सन २०२०-२१ नुसार रु.९४,७८३/- मात्र खर्च अपेक्षित असून सदरचे काम करणे आरोग्याच्या दृष्टीने अत्यंत आवश्यक असल्याने उक्त काम ठेकेदार मोईनुद्दिन अजिमोद्दिन शेख, धुळे यांच्या मार्फत विना निविदा करून घेण्यासाठी सदरचे काम मुंबई प्रांतिक अधिनियम नियम ६७(क)अन्वये विना निविदा करण्यास मंजुरीसाठी व अंदाजपत्रकीय खर्च रु.९४,७८३/- मात्र खर्चास कार्योत्तर मंजुरीसाठी मे.स्थायी समिती पुढे सादर झालेला आहे.

सर्व सन्मा. सदस्यांच्या सहमतीने व कार्यालयीन अहवालास अधिन राहून सदर काम तांतडीने केलेले असल्याने त्यासाठी झालेला खर्च रुपये९४,७८३/-मात्रला महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम नियम ६७ (क) अन्वये विना निविदा करण्यास मान्यता देण्यांत येत आहे. सदर प्रस्ताव व कार्यवाही बाबत लेखा आक्षेप निर्माण होणार नाही याची दक्षता घ्यावी. याबाबतची जबाबदारी संबंधित विभागाची राहील.

सुचकः- श्री. नागसेन बोरसे

अनुमोदकः- श्री.सूनिल तुळशीराम बैसाणे

**सर्वानुमते मंजुर,**

सही/- X X X

**सभापती,**

**स्थायी समिती,**

**धुळे महानगरपालिका धुळे**

विषय क्रमांकः- १९० — धुळे तापी पाणी पुरवठा योजनेतील 1000 एम.एम.मुख्य जलवाहिनी दुरूस्तीचे कामास तांतडीने करणे आवश्यक असल्याने सदर कामी झालेला खर्च रु.91691/-मात्रला महाराष्ट्र मनपा अधिनियम 1949 चे प्रकरण5(2)(2)अन्वये कार्योत्तर मान्यता देणेबाबत आलेल्या कार्यालयीन अहवालावर विचार करणे.

म. नगरसचिव — नगरसचिव यांनी विषयांचे वाचन केले.

म. अमोल मासुळे — विषय मंजुर करण्यांत यावा.

म. सभापती — सर्व सन्मा.सदस्यांच्या सहमतीने व कार्यालयीन अहवालास अधिन राहून सदर प्रस्तावास कार्योत्तर मान्यता देण्यांत येत आहे.

**धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर २०६ दिनांक २४/०१/२०२२**

धुळे मनपा अंतर्गत तापी पाणी पुरवठा योजनेतील १००० एम.एम मुख्य जलवाहिनी पारोळा रोड,कॉटन मार्केट समोर अमोल प्लायवुड & हार्डवेअर जवळ मोठया प्रमाणात लिकेज झाल्यामुळे लाखो लिटर शुध्द पाणी वाया जात असून सदरची पाईप लाईन तातडीने व त्वरीत दुरूस्ती करणे आवश्यक आहे. तरी सदरचे काम हे नागरीकांच्या पिण्याच्या पाण्याशी निगडीत असून तेथील पाणी पुरवठा सुरळीत करणे करीता ते काम विना निविदा श्री.सम्राट पृथ्वीराज थोरात रा. धुळे, ठेकेदार यांच्या कडून करून घेण्यात आले आहे.सदरील कामाचे अंदाजपत्रक तयार करण्यात येवून त्यांस रू. ९१,६९१/- मात्र खर्च झालेला आहे.

तरी सदरचे काम विना निविदा करणेस मंजुरीसाठी व सदरचे कामाचा खर्च रू.९१,६९१/- मात्रचा खर्चास मनपा अधिनियम प्रकरण ५ (२) (२) नुसार कार्यारत्तर मंजुरीस्तव मे स्थायी समितीपुढे प्रस्ताव सादर झालेला आहे.

सर्व सन्मा. सदस्यांच्या सहमतीने व कार्यालयीन अहवालास अधिन राहून सदर काम तांतडीने केलेले असल्याने त्यासाठी झालेला खर्च रुपये ९१,६९१/- मात्रला मनपा अधिनियम प्रकरण ५ (२) (२)

नुसार कार्योत्तर मान्यता देण्यांत येत आहे. सदर प्रस्ताव व कार्यवाही बाबत लेखा आक्षेप निर्माण होणार नाही याची दक्षता घ्यावी. याबाबतची जबाबदारी संबंधित विभागाची राहील.

सुचक:- श्री. अमोल पावबा मासुळे

अनुमोदक:- श्री.सुनिल तुळशीराम बैसाणे

**सर्वानुमते मंजुर,**

सही/- X X X

**सभापती,**

**स्थायी समिती,**

**धुळे महानगरपालिका धुळे**

विषय क्रमांक:- १९१ — धुळे मनपा अंतर्गत हद्दवाढ प्रभाग क्र.१० मध्ये वरखेडी येथे पूर्वीची जुनी व जीर्ण जलकुंभ पाडणेकामी झालेला खर्च खर्च रु.४९९९५ /-मात्रला महाराष्ट्र मनपा अधिनियम प्रकरण 5(2) (2) अन्वये कार्योत्तर मान्यता देणेबाबत आलेल्या कार्यालयीन अहवालावर विचार करणे.

म. नगरसचिव — नगरसचिव यांनी विषयांचे वाचन केले.

म. सुनिल बैसाणे — विषय मंजुर करण्यांत यावा.

म. सभापती — सर्व सन्मा.सदस्यांच्या सहमतीने व कार्यालयीन अहवालास अधिन राहून सदर प्रस्तावास कार्योत्तर मान्यता देण्यांत येत आहे.

**धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर २०७ दिनांक २४/०१/२०२२**

धुळे मनपा अंतर्गत हद्दवाढ प्रभाग क्र.१० मध्ये वरखेडी येथे पूर्वीची जुनी व जीर्ण पाण्याची टाकी असून तिचा वापर होत नाही व तिला तडे पडलेले असल्याने तिच्या स्लॅबचे व बांधकामाचे तुकडे पडत असल्याने खाली रहदारी असल्याने तेथील नागरिकांना दुखापत आलेली आहे. तसेच जीवित हानी देखील होण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे सदरची टाकी त्वरित व तातडीने पाडणे अत्यावश्यक आहे.

त्यानुसार त्या कामाची समक्ष पाहणी करून अंदाजपत्रक तयार करण्यात येवून त्यास अंदाजित खर्च रु.४९,९९५/- मात्र खर्च येणार आहे.सदरचा खर्च हा बाजार भावाप्रमाणे योग्य व वाजवी असा असून त्या खर्चाची नोंद घेण्यात आली आहे.

तरी हे काम तातडीने व त्वरित करावयाचे असल्याने हे काम विना निविदा श्री. सचिन शंकर कोदगीर रा.धुळे ठेकेदार यांच्याकडून करून घेण्यात आलेले आहे. त्यास रु.४९,९९५/- मात्र खर्च झालेला आहे.

तरी उक्त काम हे विना निविदा करणेस व रु.४९,९९५/-मात्र केलेल्या खर्चास मुंबई मनपा अधिनियम प्रकरण५(२)(२) नुसार कार्योत्तर मंजुरीस मे.स्थायी समिती पुढे सादर झालेले आहे.

सर्व सन्मा. सदस्यांच्या सहमतीने व कार्यालयीन अहवालास अधिन राहून सदर काम तांतडीने केलेले असल्याने त्यासाठी झालेला खर्च रुपये ४९,९९५/- मात्रला मनपा अधिनियम प्रकरण ५ (२) (२) नुसार कार्योत्तर मान्यता देण्यांत येत आहे. सदर प्रस्ताव व कार्यवाही बाबत लेखा आक्षेप निर्माण होणार नाही याची दक्षता घ्यावी.याबाबतची जबाबदारी संबंधित विभागाची राहील.

सुचक:- श्री.सूनिल तुळशीराम बैसाणे

अनुमोदक:- श्री. अमोल पावबा मासुळे

**सर्वानुमते मंजुर,**

सही/- X X X

**सभापती,**

**स्थायी समिती,**

**धुळे महानगरपालिका धुळे**

| | |
|---|---|
| विषय क्रमांक:- १९२ | सर्व्हे नं.28/2(सि.स.नं. 4760 अ व 4760 ब) जुना आग्रारोड देवपूर येथे व्यापारी संकुल (आरक्षण क्रं.42) म्युनिसिपल परपज इमारत (आरक्षण क्रं.43) खाजगीकरणातंर्गत ( ON B.O.L.T.BASIC) तत्वावर विकसित करणेबाबत आलेल्या कार्यालयीन अहवालावर विचार करणे. |
| म. नगरसचिव | नगरसचिव यांनी विषयांचे वाचन केले. |
| म. सुनिल बैसाणे | विषय मंजुर करण्यांत यावा. |
| म. सभापती | सर्व सन्मा.सदस्यांच्या सहमतीने व कार्यालयीन अहवालास अधिन राहून सदर मान्यता देण्यांत येत आहे. |

**धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर २०८ दिनांक २४/०१/२०२२**

जुना आग्रा रोड, देवपुर येथील सर्व्हे नं. २८/२(सि.स.नं. ४७६०/अ व ४७६०/ब)१.०७ हे. आर.हे क्षेत्र बगीचा (आरक्षण क्र.४१),व्यापारी संकुल (आरक्षण क्र. ४२) व म्यु. पर्पज (आरक्षण क्र. ४३)साठी धुळे शहर मंजूर विकास योजनेत आरक्षित आहे.

आता सादर करण्यात आलेल्या प्रकल्प अहवालात वर नमुद आरक्षणांपैकी आरक्षण क्र. ४२ व आरक्षण क्र. ४३ या जागांवर B.O.L.T तत्वावर अनुक्रमे शॉपिंग कॉम्प्लेक्स आणि म्यु. पर्पज यात मोडणा-या बाबींचे बांधकाम करणे प्रस्तावित आहे. सदर जागा मनपा मालकीची असून सद्यस्थितीत मनपाच्या ताब्यात आहे.

उक्त बाबत जागा मालकी धुळे मनपाची असल्याने,धुळे मनपा स्थायी समिती ठराव नं. २० दि. ०६/०५/२०१४ तसेच धुळे महानगरपालिका ठराव क्र. २०९ दि.१३.०१.२०१६अन्वये प्रस्तावित जागेवर वास्तुविशारद तज्ञ यांचे कडून स्पर्धात्मक आराखडे मागविणेबाबत मंजुरी देण्यात आली आहे. याकामी धुळे मनपाने ई-निविदा सुचना क्र.३१७ दि.१७.०९.२०२०अन्वये मागविण्यात आली असता त्यात सर्वात कमी दराची मे.सावकार प्लॅनर्स,नाशिक यांची निवीदा धुळे मनपा स्थायी समिती ठराव नं.११३दि.२२/१२/२०२०अन्वये मंजुर करण्यात आलेली आहे.त्यानुसार त्यांना इकडील कार्यालया मार्फत जा.क्र.०५दि.०६/०४/२०२१ अन्वये कार्यादेश देण्यात आलेला आहे.

त्यानुसार वास्तुविशारद तज्ञ मे.सावकार प्लॅनर्स, नाशिक यांनी सदर जागेची समक्ष पाहणी करून व संबंधित अधिकारी, पदाधिकारी यांच्याशी चर्चा करून मनपाच्या हिताच्या दृष्टीने MRTP Act 1966 व नविन UDCPR प्रमाणे बांधकाम आराखडे व प्रकल्प अहवाल (Project Report) सादर केलेला आहे.त्यांनी सादर केलेल्या प्रकल्प अहवालात नमुद केले नुसार सविस्तर माहिती खालीलप्रमाणे सादर करणेत येत आहे.

उक्त बाबत मे. सावकार प्लॅनर्स, नाशिक यांनी सादर केलेल्या प्रकल्प अहवालानुसार प्रस्तावित जागेवर आरक्षण असल्याने म. नगररचनाकार, म. अभियंता तसेच पदाधिकारी यांचेशी चर्चा केलेनुसार जागेचे वाटप खालीलप्रमाणे आहे.

A) Details of Land & Consumed F.S.I. Statement :

| Sr. No. | Description | | Area of Land in Sqm. |
|---|---|---|---|
| 1 | Area of Land as per 7-12 Abstract | | 20,800.00 |
| | Area of Land as per CTS Abstract | | 10,700.00 |
| | **Area of Land as per Survey/Demarcation** | | **17,287.00** |
| **Less -** | i) Garden Development Area | 8,423.53 | |
| | ii) Planotorium | 1,625.49 | |
| | iii) Area under road widening | 611.64 | 10,660.66 |
| | | **Balance Area for Development** | **6,626.34** |
| **2** | **Area Availabe for Development** | | **6,626.34** |
| 3 | Permissible F.S.I. including Anciallary F.S.I. | | 2.88 |
| 4 | Consumed F.S.I. | | **1.68** |
| **5** | **Total Built Up Area** | | **11,153.30** |

B )Details of Construction Cost :

| Sr. No. | Floor | Built Up Area in Sqm. | Carpet Area in Sqm. |
|---|---|---|---|
| **1)** | **DEVELOPER COMPONENT** | | |
| **A)** | **Reservation No. 42 ( Commercial Complex )** | | |
| i) | Lower Ground Floor | 473.32 | 218.16 |
| ii) | Upper Ground Floor | 990.93 | 537.24 |
| iii) | First Floor | 963.08 | 537.24 |
| iv) | Second Floor | 990.93 | 501.24 |
| v) | Third Floor | 954.16 | 501.24 |
| | **Total of Reservation No.42 (A)** | **4,372.42** | **2,295.12** |
| **B)** | **Reservation No. 43 ( Municipal Use )** | | |
| i) | Lower Ground Floor | 978.37 | 520.23 |
| ii) | Upper Ground Floor | 989.85 | 500.16 |
| iii) | Upper Ground Floor | 1101.39 | 1101.39 |
| iii) | First Floor | 1,237.09 | 585.52 |
| iv) | Second Floor | 1,237.09 | 726.74 |
| v) | Third Floor | 1,237.09 | 726.74 |
| | **Total of Reservation No.43 (B)** | **6,780.88** | **4,160.78** |
| | **Total of Developer Component (A+B)** | **11,153.30** | **6,455.90** |

C) Details of Revenue :

| Sr. No. | Particulars | As per Ready Reckoner | | | As per Consultant | | | As per Market Rates | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | Area | Rate | Amount | Area | Rate | Amount | Area | Rate | Amount |
| 1) | DEVELOPER COMPONENT | | | | | | | | | |
| A) | Reservation No. 42 ( Commercial Complex ) | | | | | | | | | |
| i) | Lower Ground Floor | 218.16 | 30,296.00 | 66,09,375.00 | 218.16 | 1,00,000.00 | 2,18,16,000.00 | 218.16 | 1,08,000.00 | 2,35,61,280.00 |
| ii) | Upper Ground Floor | 537.24 | 34,083.00 | 1,83,10,751.00 | 537.24 | 1,30,000.00 | 6,98,41,200.00 | 537.24 | 1,45,000.00 | 7,78,99,800.00 |
| iii) | First Floor | 537.24 | 34,083.00 | 1,83,10,751.00 | 537.24 | 55,000.00 | 2,95,48,200.00 | 537.24 | 60,000.00 | 3,22,34,400.00 |
| iv) | Second Floor | 501.24 | 22,716.00 | 1,13,86,168.00 | 501.24 | 45,000.00 | 2,25,55,800.00 | 501.24 | 50,000.00 | 2,50,62,000.00 |
| v) | Third Floor | 501.24 | 22,716.00 | 1,13,86,168.00 | 501.24 | 35,000.00 | 1,75,43,400.00 | 501.24 | 40,000.00 | 2,00,49,600.00 |
| | **SUB TOTAL (A)** | **2,295.12** | | **6,60,03,213.00** | **2,295.12** | | **16,13,04,600.00** | **2,295.12** | | **17,88,07,080.00** |
| B) | Reservation No. 43 ( Municipal Use ) | | | | | | | | | |
| i) | Lower Ground Floor | 520.23 | 30,296.00 | 1,57,60,888.00 | 520.23 | 1,00,000.00 | 5,20,23,000.00 | 520.23 | 1,08,000.00 | 5,61,84,840.00 |
| ii) | Upper Ground Floor (shops) | 500.16 | 34,083.00 | 1,70,46,953.00 | 500.16 | 1,30,000.00 | 6,50,20,800.00 | 500.16 | 1,45,000.00 | 7,25,23,200.00 |
| iii) | Upper Ground Floor (Hall) | 1,101.39 | 34,083.00 | 3,75,38,675.00 | 1,101.39 | 50,000.00 | 5,50,69,500.00 | 1,101.39 | 55,000.00 | 6,05,76,450.00 |
| iv) | First Floor | 585.52 | 34,083.00 | 1,99,56,278.00 | 585.52 | 55,000.00 | 3,22,03,600.00 | 585.52 | 60,000.00 | 3,51,31,200.00 |
| v) | Second Floor | 726.74 | 22,716.00 | 1,65,08,626.00 | 726.74 | 45,000.00 | 3,27,03,300.00 | 726.74 | 50,000.00 | 3,63,37,000.00 |
| vi) | Third Floor | 726.74 | 22,716.00 | 1,65,08,626.00 | 726.74 | 35,000.00 | 2,54,35,900.00 | 726.74 | 40,000.00 | 2,90,69,600.00 |
| | **SUB TOTAL B** | **4,160.78** | | **12,33,20,046.00** | **4,160.78** | | **26,24,56,100.00** | **4,160.78** | | **28,98,22,290.00** |
| | | **6,455.90** | | **18,93,23,259.00** | **6,455.90** | | **42,37,60,700.00** | **6,455.90** | | **46,86,29,370.00** |

D) Developer Profit:

| Sr.No. | Particulars | As per Ready Recokner | As Per Consultant Calculation | As per Maket Rates |
|---|---|---|---|---|
| i) | **Total Revenue from Sublease** | 18,93,23,259.00 | 42,37,60,700.00 | 46,86,29,370.00 |
| ii) | **Less - Total Construction Cost** | 51,29,15,470.00 | 51,29,15,470.00 | 51,29,15,470.00 |
| | **Total Rs.** | -32,35,92,211.00 | -8,91,54,770.00 | -4,42,86,100.00 |
| | **Developers Profit Rs.** | **-32,35,92,211.00** | **-8,91,54,770.00** | **-4,42,86,100.00** |

E) Expected Premium:

| Sr.No. | Particulars | As per Ready Recokner | As Per Consultant Calculation | As per Maket Rates |
|---|---|---|---|---|
| i) | Land Area in SQM. | 6,626.34 | 6,626.34 | 6,626.34 |
| ii) | Rate | 3,590.00 | 18,000.00 | 20,500.00 |
| iii) | Amount | 2,37,88,561.00 | 11,92,74,120.00 | 13,58,39,970.00 |
| iv) | 50% of Land Cost | 1,18,94,281.00 | 5,96,37,060.00 | 6,79,19,985.00 |
| v) | 50% of Developers Profit | -16,17,96,106.00 | -4,45,77,385.00 | -2,21,43,050.00 |
| | **TOTAL EXPECTED INCOME Rs.** | **-14,99,01,825.00** | **1,50,59,675.00** | **4,57,76,935.00** |
| **Less :** | **Const. Cost of DMC Component** | - | - | - |
| | **Expected premium other than Const. Cost. Of DMC Component** | **-14,99,01,825.00** | **1,50,59,675.00** | **4,57,76,935.00** |

**Note -** **As per market rate calculationss, DMC will get Rs. 4,57,76,935.00 in the form of cash premium to be received in the form of Cheque/demand draft.**

F) Rent Income

| Sr.No. | Floor | Area in Sqm. | Rent per Sqm. Per Month | Rent Per Year |
|---|---|---|---|---|
| **1)** | **DEVELOPER COMPONENT** | | | |
| **a)** | **Reservation No.42 (Commercial Complex)** | | | |
| a) | Lower Ground Floor | 218.16 | 30.00 | 78,537.60 |
| b) | Upper Ground Floor | 537.24 | 30.00 | 1,93,406.40 |
| c) | First Floor | 537.24 | 25.00 | 1,61,172.00 |
| d) | Second Floor | 501.24 | 25.00 | 1,50,372.00 |
| e) | Third Floor | 501.24 | 25.00 | 1,50,372.00 |
| | | **2,295.12** | | **7,33,860.00** |
| **a)** | **Reservation No.43 (Municipal Use)** | | | |
| a) | Lower Ground Floor | 520.23 | 30.00 | 1,87,282.80 |
| b) | Upper Ground Floor | 500.16 | 30.00 | 1,80,057.60 |
| c) | Upper Ground Floor (Hall) | 1,101.39 | 30.00 | 3,96,500.40 |
| d) | First Floor | 585.52 | 25.00 | 1,75,656.00 |
| e) | Second Floor | 726.74 | 25.00 | 2,18,022.00 |
| f) | Third Floor | 726.74 | 25.00 | 2,18,022.00 |
| | | **4,160.78** | | **13,75,540.80** |
| | | | **Total Rs.** | **21,09,400.80** |

**Note** **1) As the project is on B.O.L.T.Basis, so rate of monthly rent of Developer Component is at lower side. Rent rates are compared with other Municipal Corporation rent rates of B.O.L.T. Complexes and are similar with them.**

G) Property TaxIncome:

| Sr.No. | Floor | Area in Sqm. | Tax per Sqm. | Tax Per Year |
|---|---|---|---|---|
| **1)** | **Developer Component** | | | |
| **A)** | **Reservation No. 42 (Commercial Complex)** | | | |
| a) | Lower Ground Floor | 218.16 | 242.00 | 52,794.72 |
| b) | Upper Ground Floor | 537.24 | 242.00 | 1,30,012.08 |
| c) | First Floor | 537.24 | 242.00 | 1,30,012.08 |
| d) | Second Floor | 501.24 | 242.00 | 1,21,300.08 |
| e) | Third Floor | 501.24 | 242.00 | 1,21,300.08 |
| | | **2,295.12** | | **5,55,419.04** |
| | | | | |
| **B)** | **Reservation No. 43 (Municipal Use)** | | | |
| a) | Lower Ground Floor | 520.23 | 242.00 | 1,25,895.66 |
| b) | Upper Ground Floor | 500.16 | 242.00 | 1,21,038.72 |
| c) | Upper Ground Floor (Hall) | 1,101.39 | 242.00 | 2,66,536.38 |
| d) | First Floor | 585.52 | 242.00 | 1,41,695.84 |
| e) | Second Floor | 726.74 | 242.00 | 1,75,871.08 |
| f) | Third Floor | 726.74 | 242.00 | 1,75,871.08 |
| | | **4,160.78** | | **10,06,908.76** |
| | | | **Total Tax to be Received Per Year** | **15,62,327.80** |

मे. सावकार प्लॅनर्स, नाशिक यांनी सादर केलेल्या प्रकल्प अहवालात नमूद केलेनुसार मनपास खालील बाबी मिळणार आहेत.

| | | | |
|---|---|---|---|
| **१.** | **व्यापारी संकुल तसेच म्युनिसिपल पर्पज इमारतीच्या प्रकल्पाची किंमत रक्कम रु. (साधारणपणे १,६०,०००.०० चौ. फुट)** | **:** | **५१,२९,१५,४७०.००** |
| **२.** | **रोख प्रिमीयम रक्कम रु.** | **:** | **४,५७,७६,९३५.००** |
| **३.** | **मनपास आवर्ती उत्पन्नाच्या (Recurring Income) स्वरुपात प्रतिवर्ष खालीलप्रमाणे उत्पन्न मिळणार आहे.** | | |
| i) | प्रति वर्ष भाडे रक्कम रु. | : | २१,०९,४००.८० |
| ii) | प्रति वर्ष मालमत्ता कर रक्कम रु. | : | १५,६२,३२७.८० |
| **एकुण रक्कम रु.** | | **:** | **३६,७१,७२८.६०** |

उक्त प्रमाणे एकुण बांधकाम क्षेत्र १११५३.३० चौ. मी. प्रस्तावित असुन त्यासाठी मुख्य अभियंता सार्वजनिक बांधकाम प्रादेशिक विभाग, नाशिक यांच्या दि. २८.०५.२०१९ च्या इमारतीच्या कामांचे ढोबळ अंदाजपत्रकांना स्थापत्य कामांसाठी गृहीत धरावयाचे जोता दर (प्रमाणके) निश्चित करणे बाबतच्या परिपत्रकात नमुद केलेल्या दरांनुसार रक्कम रु. ५६,०३,६०.१५१.०० खर्च अपेक्षित आहे.

तसेच वास्तूविशारद तज्ञ यांनी रेडीरेकनर दरानुसार व बाजार भावाप्रमाणे येणारे उत्पन्न यांचा तुलनात्मक तक्ता प्रकल्प अहवालात दिलेला असून त्यानुसार बाजार भावाप्रमाणे रक्कम रु.४६,८६,२९,३७०.०० मात्र उत्पन्न अपेक्षित असल्याचे प्रकल्प अहवालात नमुद केलेले आहे.

सदर कामासाठी बांधकाम नकाशांना नगररचना विभागाची मंजुरी आवश्यक असल्याने त्याप्रमाणे मंजुरी घेण्यात आलेली आहे. तथापी सदर जागेवर आरक्षणे असल्याने सदर नकाशांबाबत म. सहाय्यक संचालक, नगररचना विभाग, धुळे यांचे देखील अभिप्राय घेणे आवश्यक आहे.

सोबत मे.सावकार प्लॅनर्स नाशिक यांनी तयार केलेला प्रकल्प अहवाल जोडण्यात आला असून उक्त अहवालाचे अवलोकन होवून वसुली विभाग, लेखा विभागामार्फत तपासणी होवून सदरचे बांधकाम प्रस्तावित प्रकल्प B.O.L.T. तत्वावर करणे बाबत व त्यासाठी प्रिमीयम रक्कम निश्चित करणेसाठी सदर प्रस्ताव मे. स्थायी समितीपुढे सादर झालेला आहे.

सदर प्रस्ताव मे.स्थायी समितीपुढे सादर झाला असता सन्मा. सदस्यांच्या सहमतीने व कार्यालयीन अहवालास अधिन राहून सर्व्हे नं.२८/२ (सि.स.नं. ४७६० अ व ४७६० ब ) जुना आग्रारोड देवपूर येथे व्यापारी संकुल (आरक्षण क्रं.४२) म्युनिसिपल परपज इमारत (आरक्षण क्रं.४३) खाजगी करणातंर्गत (ON B.O.L.T. / B.O.T ) तत्वावरील प्रकल्प किंमत रु. ५६,०३,६०,१५१.०० या किंमतीस आर्थिक व प्रशासकीय मंजुरी देण्यांत येत असून याकामी कार्यालयीन अहवालात निश्चित केलेल्या अंदाजित अधिमूल्य (प्रिमीयम) रक्कम रु.४,५७,७६,९३५.०० मात्रला मान्यता देण्यांत येत आहे.

या प्रस्तावासंदर्भात सक्षम अधिका-यांनी दिलेले अभिप्राय तपासून व त्यांची पूर्तता करुन विभागाने तात्काळ पुढील कार्यवाही व निविदा प्रक्रिया करावी.

सुचक:- श्री. अमोल पावबा मासुळे

अनुमोदक:- श्री.सुनिल तुळशीराम बैसाणे

**सर्वानुमते मंजुर,**
**सही/-x x x**
**सभापती,**
**स्थायी समिती,**
**धुळे महानगरपालिका धुळे**

विषय क्रमांक:- १९३ देवपूर आरक्षण क्रं.50 सर्व्हे नं.73 /अ (सि.स.नं. 2455/57) क्षेत्र 47 आर या क्षेत्रात B.O.L.T. तत्वावर भाजी मंडई व शॉपींग कॉम्प्लेक्स उभारणेबाबत आलेल्या कार्यालयीन अहवालावर विचार करणे.

म. नगरसचिव नगरसचिव यांनी विषयांचे वाचन केले.

म. सुनिल बैसाणे विषय मंजुर करण्यांत यावा.

म. सभापती सर्व सन्मा.सदस्यांच्या सहमतीने व कार्यालयीन अहवालास अधिन राहून सदर प्रस्तावास मान्यता देण्यांत येत आहे.

**धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर २०९ दिनांक २४/०१/२०२२**

देवपुर आरक्षण क्र. ५० सर्व्हे नं. ७३/अ (सि. स. नं. २४२२/५७) क्षेत्र ४७ आर. या क्षेत्रात B.O.L.T तत्वावर भाजी मंडई व शॉपिंग कॉम्प्लेक्स उभारणे बाबत.

संदर्भ :- प्रस्तावित प्रकल्पासाठी दि.०३.११.२०२१ रोजी मे.सावकार प्लॅनर्स,नाशिक यांनी सादर केलेल्या अहवाला नुसार

विषयांकित कामाबाबत मा.आयुक्त यांच्या दालनात मा.महापौर,मा.स्थायी समिती सभापती, मा.सभापती महिला व बालकल्याण,मा.अति.आयुक्त,मा.उपायुक्त, मा. सहा. आयुक्त व मा.शहर अभियंता तसेच इतर सन्मा.सदस्य यांच्या उपस्थितीत दि.१६/१२/२०२१ रोजीच्या PPT Presentation व चर्चेनुसार उपरोक्त संदर्भानुसार मे.सावकार प्लॅनर्स,नाशिक यांनी खालीलप्रमाणे अहवाल सादर केला आहे.

| Details of Area Used for Different Purposes Regulation no. 4.27 UDCPR-2020 | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| Uses Proposed | Area Proportion | Reserved Area | Permissible FSI | BUA Permissible | Proposed/Consumed BUA | Remarks |
| Vegitable Market | 60% of Reserved Area | 2820 SQ.M | 4.5 | 12690 SQ.M | 1244.90 SQ.M | |
| Shopping Center | 40% of Reserved Area | 1880 SQ.M | 4.5 | 8460 SQ.M | 8418.00 SQ.M | |
| TOTAL | | 4700 SQ.M | 4.5 | 21150 SQ.M | 9663.00 SQ.M | |

A) Details of Land & Consumed F.S.I. Statement :

| Sr. No. | Description | Area of Land in Sqm. |
|---|---|---|
| 1 | Area of Land (Sq.Mt.) | 4,353.30 |
| 2 | Permissible F.S.I. including Anciallary F.S.I. | 4.50 |
| 3 | Consumed F.S.I. | 2.22 |
| 4 | Total Built Up Area (Sq.Mt.) | 9,663.00 |

| Sr. No. | Floor | Built Up Area in Sqm. | Carpet Area in Sqm. |
|---|---|---|---|
| 1) | Developer Component | | |
| i) | Lower Ground Floor | 919.91 | 506.04 |
| ii) | Upper Ground Floor | 843.68 | 772.13 |
| iii) | First Floor | 1,621.55 | 1,233.77 |
| iv) | Second Floor | 1,621.55 | 1,233.77 |
| v) | Third Floor | 1,547.97 | 1,303.81 |
| vi) | Fourth Floor | 465.89 | 343.38 |
| vii) | Fifth Floor | 465.89 | 343.38 |
| viii) | Sixth Floor | 465.89 | 343.38 |
| viii) | Seventh Floor | 465.89 | 343.38 |
| | Sub-Total (A) | 8,418.00 | 6,423.04 |
| 2) | DMC Component | | |
| i) | Upper Ground Floor | 1,244.90 | 534.39 |
| | Sub-Total (B) | 1,244.90 | 534.39 |
| | Total (A+B) | 9,663.00 | 6,957.00 |

B) Details of Construction Cost :

| Sr.No. | Particulars | Area in Sqm. | Rate per Sqm. | Amount in Rs. |
|---|---|---|---|---|
| **A)** | **DEVELOPER COMPONENT** | | | |
| i) | Lower Ground Floor | 2,603.26 | 31,339.00 | 8,15,83,565.00 |
| ii) | Upper Ground Floor | 902.58 | 31,339.00 | 2,82,85,955.00 |
| iii) | First Floor | 1,720.35 | 28,193.00 | 4,85,01,828.00 |
| iv) | Second Floor | 1,720.35 | 25,410.00 | 4,37,14,094.00 |
| v) | Third Floor | 1,567.57 | 25,410.00 | 3,98,31,954.00 |
| vi) | Fourth Floor | 480.29 | 27,510.00 | 1,32,12,778.00 |
| vii) | Fifth Floor | 480.29 | 29,610.00 | 1,42,21,387.00 |
| viii) | Sixth Floor | 480.29 | 31,710.00 | 1,52,29,996.00 |
| ix) | Seventh Floor | 480.29 | 33,810.00 | 1,62,38,605.00 |
| | **Sub-Total (A)** | **10,435.27** | | **30,08,20,162.00** |
| | | | **Add - For Electrification (11%)** | **3,30,90,218.00** |
| | | | **Add - For Rain Water Harvesting (1%)** | **30,08,202.00** |
| | | | **Add - For Fire Fighting (1%)** | **30,08,202.00** |
| | | | **Add - Technical Service Charges (3%)** | **90,24,605.00** |
| | | | **Total Rs.** | **34,89,51,389.00** |
| | | | **ADD - GST @ 18%** | **6,28,11,250.00** |
| | | | **Total Construction Cost of Developer Component Rs. (A)** | **41,17,62,639.00** |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| **B)** | **DMC COMPONENT** | | | |
| i) | Vegetable Market (Double Height) | 1,244.90 | 36,000.00 | 4,48,16,400.00 |
| | **Sub-Total (B)** | **1,244.90** | | **4,48,16,400.00** |
| | | | **Add - For Electrification (11%)** | **49,29,804.00** |
| | | | **Add - For Rain Water Harvesting (1%)** | **4,48,164.00** |
| | | | **Add - For Fire Fighting (1%)** | **4,48,164.00** |
| | | | **Add - Technical Service Charges (3%)** | **13,44,492.00** |
| | | | **Total Rs.** | **5,19,87,024.00** |
| | | | **ADD - GST @ 18%** | **93,57,664.00** |
| | | | **Total Construction Cost of Developer Component Rs. (B)** | **6,13,44,688.00** |
| | | | **Total Cost of Construction of Project (A+B)** | **47,31,07,327.00** |
| | | | **Add** : Interest on Investment by Developer (50%) @12% P.A. | 4,30,27,756.00 |
| | | | **Total Expenditure on Project Rs.** | **51,61,35,083.00** |

## C) Details of Revenue :

| Sr. No. | Particulars | As per Ready Reckoner | | | As per Consultant | | | As per Market Rates | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | Area | Rate | Amount | Area | Rate | Amount | Area | Rate | Amount |
| A) | DMC COMPONENT | | | | | | | | | |
| i) | Vegetable Market (Upper Ground Floor) | 534.39 | 43,479.00 | 2,32,34,743.00 | 534.39 | 1,35,000.00 | 7,21,42,650.00 | 534.39 | 1,45,000.00 | 7,74,86,550.00 |
| | TOTAL | | | 2,32,34,743.00 | | | 7,21,42,650.00 | | | 7,74,86,550.00 |
| B) | DEVELOPER COMPONENT | | | | | | | | | |
| i) | Lower Ground Floor | 506.04 | 38,648.00 | 1,95,57,434.00 | 506.04 | 1,05,000.00 | 5,31,34,200.00 | 506.04 | 1,25,000.00 | 6,32,55,000.00 |
| ii) | Upper Ground Floor | 772.13 | 43,479.00 | 3,35,71,440.00 | 772.13 | 1,35,000.00 | 10,42,37,550.00 | 772.13 | 1,50,000.00 | 11,58,19,500.00 |
| iii) | First Floor | 1,233.77 | 29,799.00 | 3,67,65,112.00 | 1,233.77 | 65,000.00 | 8,01,95,050.00 | 1,233.77 | 76,000.00 | 9,37,66,520.00 |
| iv) | Second Floor | 1,233.77 | 29,799.00 | 3,67,65,112.00 | 1,233.77 | 60,000.00 | 7,40,26,200.00 | 1,233.77 | 67,000.00 | 8,26,62,590.00 |
| v) | Third Floor | 1,303.81 | 29,799.00 | 3,88,52,234.00 | 1,303.81 | 37,000.00 | 4,82,40,970.00 | 1,303.81 | 49,000.00 | 6,38,86,690.00 |
| vi) | Fourth Floor | 343.38 | 29,799.00 | 1,02,32,381.00 | 343.38 | 32,000.00 | 1,09,88,160.00 | 343.38 | 37,000.00 | 1,27,05,060.00 |
| vii) | Fifth Floor | 343.38 | 29,799.00 | 1,02,32,381.00 | 343.38 | 30,000.00 | 1,03,01,400.00 | 343.38 | 33,000.00 | 1,13,31,540.00 |
| viii) | Sixth Floor | 343.38 | 29,799.00 | 1,02,32,381.00 | 343.38 | 30,000.00 | 1,03,01,400.00 | 343.38 | 33,000.00 | 1,13,31,540.00 |
| ix) | Seventh Floor | 343.38 | 29,799.00 | 1,02,32,381.00 | 343.38 | 30,000.00 | 1,03,01,400.00 | 343.38 | 33,000.00 | 1,13,31,540.00 |
| | TOTAL | 6,423.04 | | 20,64,40,856.00 | 6,423.04 | | 40,17,26,330.00 | 6,423.04 | | 46,60,89,980.00 |

## D) Developer Profit:

| Sr.No. | Particulars | As per Ready Recokner | As Per Consultant Calculation | As per Maket Rates |
|---|---|---|---|---|
| i) | Total Revenue from Sublease | 20,64,40,856.00 | 40,17,26,330.00 | 46,60,89,980.00 |
| ii) | Less - Total Construction Cost | 47,31,07,327.00 | 47,31,07,327.00 | 47,31,07,327.00 |
| | Total Rs. | -26,66,66,471.00 | -7,13,80,997.00 | -70,17,347.00 |
| | ADD - Amount of Interest Rs. | 4,30,27,756.00 | 4,30,27,756.00 | 4,30,27,756.00 |
| | Developers Profit Rs. | **-22,36,38,715.00** | **-2,83,53,241.00** | **3,60,10,409.00** |

## E) Expected Premium:

| Sr.No. | Particulars | As per Ready Recokner | As Per Consultant Calculation | As per Maket Rates |
|---|---|---|---|---|
| i) | Land Area in SQM. | 4,353.30 | 4,353.30 | 4,353.30 |
| ii) | Rate | 8,090.00 | 21,700.00 | 22,750.00 |
| iii) | Amount | 3,52,18,197.00 | 9,44,66,610.00 | 9,90,37,575.00 |
| iv) | 50% of Land Cost | 1,76,09,099.00 | 4,72,33,305.00 | 4,95,18,788.00 |
| v) | 50% of Developers Profit | -11,18,19,358.00 | -1,41,76,621.00 | 1,80,05,205.00 |
| | **TOTAL EXPECTED INCOME Rs.** | **-9,42,10,259.00** | **3,30,56,684.00** | **6,75,23,993.00** |
| | | | | |
| <u>Less :</u> | **Const. Cost of DMC Component** | 6,13,44,688.00 | 6,13,44,688.00 | 6,13,44,688.00 |
| | **Expected premium other than Const. Cost. Of DMC Component** | **-15,55,54,947.00** | **-2,82,88,004.00** | **61,79,305.00** |

**Note - As per market rate calculationss, DMC will get premium of Rs.6,75,23,993.00 out of which Rs. 6,13,44,688.00 in the form of Construction DMC Component and balance amount of Rs. 61,79,305.00 will get in the form of cash premium to be received in the form of Cheque/demand draft.**

F) Rent Income :

| Sr.No. | Floor | Area In Sqm. | Rent per Sqm. Per Month | Rent Per Year |
|---|---|---|---|---|
| **1)** | **Developer Component** | | | |
| a) | Lower Ground Floor | 506.04 | 30.00 | 1,82,174.40 |
| b) | Upper Ground Floor | 772.13 | 30.00 | 2,77,966.80 |
| c) | First Floor | 1,233.77 | 25.00 | 3,70,131.00 |
| d) | Second Floor | 1,233.77 | 25.00 | 3,70,131.00 |
| e) | Third Floor | 1,303.81 | 25.00 | 3,91,143.00 |
| f) | Fourth Floor | 343.38 | 20.00 | 82,411.20 |
| g) | Fifth Floor | 343.38 | 20.00 | 82,411.20 |
| h) | Sixth Floor | 343.38 | 20.00 | 82,411.20 |
| i) | Seventh Floor | 343.38 | 20.00 | 82,411.20 |
| | | 6,423.04 | | **19,21,191.00** |
| **2)** | **DMC Component** | | | |
| a) | Upper Ground Floor (As per Ready Reckoner) | 534.39 | 100.00 | **6,41,268.00** |
| | | | **Total Rent to be Received Per Year** | **25,62,459.00** |

**Note** **1) As the project is on B.O.L.T.Basis, so rate of monthly rent of Developer Component is at lower side. Rent rates are compared with other Municipal Corporation rent rates of B.O.L.T. Complexes and are similar with them.**

**2) On DMC component DMC may take Rent as per ready reckoner rates.**

G) Property Tax Income:

| Sr.No. | Floor | Area in Sqm. | Tax per Sqm. | Tax Per Year |
|---|---|---|---|---|
| **1)** | **Developer Component** | | | |
| a) | Lower Ground Floor | 506.04 | 242.00 | 1,22,461.68 |
| b) | Upper Ground Floor | 772.13 | 242.00 | 1,86,855.46 |
| c) | First Floor | 1,233.77 | 242.00 | 2,98,572.34 |
| d) | Second Floor | 1,233.77 | 242.00 | 2,98,572.34 |
| e) | Third Floor | 1,303.81 | 242.00 | 3,15,522.02 |
| f) | Fourth Floor | 343.38 | 242.00 | 83,097.96 |
| g) | Fifth Floor | 343.38 | 242.00 | 83,097.96 |
| h) | Sixth Floor | 343.38 | 242.00 | 83,097.96 |
| i) | Seventh Floor | 343.38 | 242.00 | 83,097.96 |
| | | 6,423.04 | | **15,54,375.68** |
| **2)** | **DMC Component** | | | |
| a) | Upper Ground Floor (As per Ready Reckoner) | 534.39 | 242.00 | **1,29,322.38** |
| | | | **Total Rent to be Received Per Year** | **16,83,698.06** |

| | | | |
|---|---|---|---|
| **१.** | **भाजी मार्केट तसेच व्यापारी संकुलाच्या इमारतीच्या प्रकल्पाची किंमत रक्कम रु.** | **:** | **४७,३१,०७,३२७.००** |
| **२.** | **मनपा घटकातील भाजी मंडईच्या ५१४.६० चौ. मी. क्षेत्राचे लिलाव करुन येणारे उत्पन्न रक्कम रु.** | **:** | **७,७४,८६,५५०.००** |
| **३.** | **मनपा घटकातील क्षेत्राच्या बांधकामाचा खर्च** | **:** | **६,१३,४४,६८८.००** |
| **४.** | **प्रिमीयम रक्कम रु.** | **:** | **६१,७९,३०५.००** |
| **५.** | **मनपास आवर्ती उत्पन्नाच्या (Recurring Income) स्वरुपात प्रतिवर्ष खालीलप्रमाणे उत्पन्न मिळणार आहे.** | | |
| i) | प्रति वर्ष भाडे रक्कम रु. | : | २५,६२,४५९.०० |
| ii) | प्रति वर्ष मालमत्ता कर रक्कम रु. | : | १६,८३,६९८.०६ |
| | **एकुण रक्कम रु.** | **:** | **४२,४६,१५७.०६** |

उक्त प्रमाणे एकुण बांधकाम क्षेत्र ११६८०.१७ चौ. मी. प्रस्तावित असुन त्यासाठी मुख्य अभियंता सार्वजनिक बांधकाम प्रादेशिक विभाग, नाशिक यांच्या दि. २८.०५.२०१९ च्या इमारतीच्या कामांचे ढोबळ अंदाजपत्रकांना स्थापत्य कामांसाठी गृहीत धरावयाचे जोतादर (प्रमाणके) निश्चित करणे बाबतच्या परिपत्रकात नमुद केलेल्या दरांनुसार रक्कम रु.५१,६१,३५,०८३.००/-खर्च प्रकल्प अहवालात नमूद केला आहे.

तसेच वास्तू विशारद तज्ञ यांनी रेडीरेकनर दरा नुसार व बाजार भावाप्रमाणे येणारे उत्पन्न यांचा तुलनात्मक तक्ता प्रकल्प अहवालात दिलेला असून त्यानुसार बाजार भावाप्रमाणे रक्कम रु. ४६,६०,८९,९८०.०० मात्र उत्पन्न अपेक्षित असल्याचे प्रकल्प अहवालात नमुद केलेले आहे.तसेच मनपा घटकातील क्षेत्राच्या बांधकामाचा खर्च ६,१३,४४,६८८.०० दर्शविला आहे व रोख प्रिमिअम रक्कम म्हणून रु. ६१,७९,३०५.०० मात्र मिळणार आहेत. तसेच आवर्ती उत्पन्नाच्या स्वरुपात प्रतिवर्ष भाडे रक्कम रु.२५,६२,४५९.०० व प्रतिवर्ष मालमत्ता करापोटी रक्कम रु.१६,८३,६९८.०६असे एकूण रु.४२,४६,१५७.०६ मात्र उत्पन्न दर्शविले आहे.

तसेच सदर जागेवर भाजी मंडईचे आरक्षण असल्याने उक्त प्रकल्पाची तपासणी मा.सहा.संचालक नगररचना व मूल्य निर्धारण विभाग,धुळे यांच्याकडून होणे आवश्यक वाटते. तसेच सोबत मे. सावकार प्लॅनर्स नाशिक यांनी तयार केलेला प्रकल्प अहवाल सोबत जोडण्यांत आलेला असून उक्त अहवालाचे अवलोकन होवून वसुली विभाग, लेखा विभागामार्फत तपासणी होवून सदरचे बांधकाम प्रस्तावित प्रकल्प B.O.L.T./ B.O.T तत्वावर विकसीत करणेबाबत व त्यासाठी प्रिमियम रक्कम निश्चितीसाठी मे.स्थायी समिती पुढे सादर आहे.

सदर प्रस्ताव मे.स्थायी समितीपुढे सादर झाला असता सन्मा.सदस्यांच्या सहमतीने व कार्यालयीन अहवालास अधिन राहून देवपूर आरक्षण क्रं.५० सर्व्हे नं.७३/अ (सि.स.नं. २४५५/५७ ) क्षेत्र ४७ आर या क्षेत्रात B.O.L.T./ B.O.T तत्वावर भाजी मंडई व शॉपींग कॉम्प्लेक्स च्या प्रकल्प किंमत रु. ५१,६१,३५,०८३.०० यास आर्थिक व प्रशासकीय मंजुरी देण्यांत येत असून याकामी कार्यालयीन अहवालात निश्चित केलेल्या मनपा घटकाच्या बांधकामाची किंमत रु.६,१३,४४,६८८.०० व रोख प्रिमीयम रक्कम रुपये ६१,७९,३०५.००अशी एकुणअंदाजित अधिमूल्य रक्कम रु.६,७५,२३,९९३.००मात्रला मान्यता देण्यांत येत आहे.

या प्रस्तावासंदर्भात सक्षम अधिका-यांनी दिलेले अभिप्राय तपासून व त्यांची पूर्तता करुन विभागाने तात्काळ पुढील कार्यवाही व निविदा प्रक्रिया करावी.

सुचक:- श्री.सुनिल तुळशीराम बैसाणे
अनुमोदक:- श्री.अमोल पावबा मासुळे

**सर्वानुमते मंजुर,**

**सही/-x x x**
**सभापती,**
**स्थायी समिती,**
**धुळे महानगरपालिका धुळे**

# धुळे महानगरपालिका,धुळे

## नगरसचिव कार्यालय

## स्थायी समिती सभा क्रमांक ३० चे इतिवृत्त

---

**धुळे मनपा भारतरत्न अटलबिहारी वाजपेयी सभागृह**
**सोमवार दिनांक ३१/०१/२०२२**
**वेळ :- दुपारी ४-०० वाजता.**

धुळे महानगरपालिका स्थायी समितीची साप्ताहिक सभा शासनाच्या दि.३ जानेवारी २०२२ रोजीच्या नवीन सुचनानुसार ऑन लाईन पध्दतीने आज सोमवार दिनांक ३१/०१/२०२२ रोजी **दुपारी ४-०० वाजता** मा.श्री. संजय सुधाकर जाधव, सभापती, स्थायी समिती, मनपा, धुळे यांच्या अध्यक्षतेखाली **धुळे मनपा भारतरत्न अटलबिहारी वाजपेयी सभागृह** भरली. ऑनलाईन सभेस खालील सन्मा.सदस्य सभागृहात हजर होते.

| अ.क्र. | सदस्यांचे नांव | हुद्दा |
|---|---|---|
| १ | श्री. जाधव संजय सुधाकर | सभापती |
| २ | श्री. बैसाणे सुनिल तुळशिराम | सदस्य |
| ३ | श्रीमती माळी भारती अशोक | सदस्या |
| ४ | श्रीमती पाटील मंगला सुरेश | सदस्या |
| ५ | श्रीमती बोरसे पुष्पा प्रकाश | सदस्या |
| ६ | श्री. मासुळे अमोल पावबा | सदस्य |
| ७ | श्री. देवरे कमलेश नारायण | सदस्य |
| ८ | श्रीमती पठाण हिना अस्लम | सदस्या |
| ९ | श्री. सईद बेग हाशम बेग | सदस्य |
| १० | श्री. नवले शितल मोहन | सदस्य |
| ११ | श्री. बोरसे नागसेन दामोदर | सदस्य |
| १२ | श्रीमती कुलेवार किरण राकेश | सदस्या |
| १३ | श्रीमती वराडे वैशाली भिकन | सदस्या |
| १४ | श्री. जाधव बन्सीलाल माणिक | सदस्य |
| १५ | श्रीमती चौधरी मंगल अर्जुन | सदस्या |
| १६ | श्रीमती अन्सारी फातमाबी नुरुल अमीन | |

**उपस्थित अधिकारी गण**

| अ.क्र. | अधिकाऱ्यांचे नाव | हुद्दा |
|---|---|---|
| १ | श्री. नितीन कापडणीस | अति.आयुक्त |
| २ | श्रीमती शिल्पा नाईक | उपायुक्त |
| ३ | श्री. मनोज अरविंद वाघ | प्र.नगरसचिव |
| ४ | श्री. के. एन. शिंदे | अभियंता |
| ५ | श्री. कमलेश सोनवणे | ओव्हरसिअर न.र. विभाग |
| ६ | डॉ. श्री. जे. सी. पाटील | प्र.आरोग्याधिकारी |
| ७ | श्री. चंद्रकांत जाधव | सहा.आरोग्याधिकारी |
| ८ | श्री. विकास साळवे | प्र.सह आरोग्याधिकारी ( मलेरिया) |
| ९ | श्री.बी.एस. रनाळकर | सहा. करमूल्य निर्धारण अधिकारी |
| १० | श्री. एन.के. बागुल | विद्युत अभियंता |

| | | |
|---|---|---|
| ११ | श्री. महेंद्र सोनवणे | प्रशासन अधिकारी मनपा शिक्षण मंडळ |
| १२ | श्री. राजेंद्र माईनकर | भांडारपाल |
| १३ | श्री. सुनिल वर्ग | आस्थापना विभाग |
| १४ | श्री. किशोर सुडके | बाजार विभाग प्रमुख |
| १५ | श्री. सुक्राम राऊत | वाहन विभाग |

म.सभापती सर्व उपस्थित सन्मा. सदस्य अति.आयुक्त सो. अधिकारी वर्ग छायाचित्रकार बांधव सभेचे कामकाज चालविणेसाठी आवश्यक तो कोरम पूर्ण झाल्याने नगरसचिव यांनी सभेचे कामकाज सुरुवात करावी.

म. नगरसचिव वंदे् मातरम् या राष्ट्रवंदनेसाठी सर्वांनी उभे रहावे.

म. सभापती आज आपल्या स्थायी समितीची शेवटची बैठक असून सर्व सन्मा. सदस्य अधिकारी वर्ग तसेच पत्रकार बांधव यांचे मी या ठिकाणी आभार व्यक्त करतो.ज्यांनी मला वर्षभर सभापती पदाच्या कालावधीत याठिकाणी मार्गदर्शन केले तसेच शहरातील विविध विकास कामांवर चर्चा केली व मनपातील गैरकामाबाबत वाचा फोडून सहभाग नोंदविला याबद्दल मी सर्व सन्मा. सदस्यांचा आभारी आहे व सर्वाचे याठिकाणी स्वागत करतो.

म. नगरसचिव आज आपले विद्यमान सभापती आदरणीय श्री. संजय भाऊ जाधव यांच्या कार्यकाळातील ही शेवटची बैठक आहे. गेल्या वर्षभराच्या काळातआदरणीय सभापती महोदय व सर्व सन्मा.सदस्यांनी स्थायी समितीच्या माध्यमातुन शहरातील विविध विकास कामांना चालना दिलेली आहे. तसेच मनपा प्रशासनातील ज्या काही उणिवा आहेत त्या वेळोवेळी निदर्शनास आणून दिलेल्या आहेत. त्यामुळे प्रशासनास निश्चितपणे दिशा मिळालेली आहे. या वर्षभराच्या काळात खेळीमेळीच्या वातावरणात सर्व सन्मा. सदस्यांनी एकमताने व सहमतीने काम करुन प्रशासनास सहकार्य केलेले आहे याबद्दल प्रशासनाच्या वतीने आदरणीय सभापती श्री. संजयभाऊ जाधव यांचा सत्कार प्रातिनिधीक स्वरुपात मा.अति.आयुक्त यांनी करावा अशी मी विनंती करतो.

सभागृहाच्या वतीने व प्रशासनाच्या वतीने आदरणीय सभापती श्री. संजयभाऊ जाधव यांचा सत्कार करण्यांत आला.

सही/-X X X

**सभापती,**
**स्थायी समिती,**
**धुळे महानगरपालिका धुळे**

**सभेच्या सुरुवातीस सन्मा. सदस्यांकडून आलेली अभिनंदनाची यादी**

आपल्या धुळे महानगरपालिकेत वयाच्या 58 व्या वर्षी वसुली विभागातून तसेच आरोग्य विभागातून माझे पती श्री अशोक सुकलाल माळी (वरीष्ट लिपिक) दि. 31/1/2022 आज रोजी सेवानिवृत्त होत आहेत. त्यांनी आपल्या हया संपूर्ण कारकिर्दीत अतिशय उत्तमरित्या निस्वार्थीपणे कर्तव्य बजावले आहे. परंतू खेद असा वाटतो की, आपल्या कार्यालयामार्फत एवढी प्रामाणिक पणे सेवा देऊन देखील त्यांना पदोन्नती बहाल केली नाही, असो. तथापी दुसरी एक महत्वाची बाब ती अशी की, मी देखील आपल्या मनपा स्थायी समितीत 2 वर्षा पासून आपल्या समवेत समितीचे कामकाज पाहत आहे. माझे देखील आज दि 31/01/2022 रोजी स्थायी समितीचा कार्यकाळ पूर्ण होत आहे. तथापी आपणांस सुचवू इच्छिते की, माझे पती श्री अशोक सुकलाल माळी, यांचा सेवापूर्ती बाबतचा गौरव व यथोचित सत्कार स्थायी समितीद्वारे करण्यात यावा. तसा अभिनंदनाचा ठराव समितीत पारीत करण्यात यावा तसेच हया यथोचित सेवापूर्वी सत्काराची स्थायी समितीचया प्रोसिडींगमध्ये नोंद करण्यात यावी, ही विनंती

म. सभापती सन्मा.सदस्यांनी दिलेल्या यादीनुसार श्री.अशोक सुकलाल माळी यांचा सत्कार व अभिनंदनाचा ठराव पारीत करण्यांत येत आहे.

**धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर २१० दिनांक ३१/०१/२०२२**

धुळे महानगरपालिकेत वयाच्या ५८ व्या वर्षी वसुली विभागातून तसेच आरोग्य विभागातून माझे पती श्री अशोक सुकलाल माळी (वरीष्ट लिपिक) दि. ३१/०१/२०२२ आज रोजी सेवानिवृत्त होत आहेत. त्यांनी आपल्या हया संपूर्ण कारकिर्दीत अतिशय उत्तमरित्या निस्वार्थीपणे कर्तव्य बजावले आहे. परंतू खेद असा वाटतो की, आपल्या कार्यालयामार्फत एवढी प्रामाणिकपणे सेवा देऊन देखील त्यांना

पदोन्नती बहाल केली नाही, असो. तथापी दुसरी एक महत्वाची बाब ती अशी की, मी देखील आपल्या मनपा स्थायी समितीत 2 वर्षा पासून आपल्या समवेत समितीचे कामकाज पाहत आहे. माझे देखील आज दि 31/01/2022 रोजी स्थायी समितीचा कार्यकाळ पूर्ण होत आहे.

तरी श्री.अशोक सुकलाल माळी,यांचा सेवापूर्ती बाबतचा गौरव व यथोचित सत्कार अभिनंदनाचा ठराव स्थायी समितीद्वारे करण्यात येत आहे.

सुचक :-सौ. भारती अशोक माळी
अनुमोदक :- श्री. सुनिल तुळशीराम बैसाणे

**सर्वानुमते मंजुर,**
**सही/-X X X**
**सभापती,**
**स्थायी समिती,**
**धुळे महानगरपालिका धुळे**

**दिनांक ३१/०१/२०२२ रोजीच्या मे. स्थायी समिती सभेतील सन्मा. सदस्यांनी केलेली चर्चा व त्यावरील निर्णय**

म. अमोल मासुळे — मला दोन वर्षापासुन स्थायी सदस्य म्हणून संधी दिली आज आमची शेवटची मिटींग आहे त्यामुळे तुमचे देखील आभार गेल्या ४ ते ५ महिन्यापासून जे ४ ते ५ विषय महत्वाचे होते त्यावर चर्चा करुन त्यावर निर्णय अपेक्षित आहे. जे मनपाचे सर्व विभाग आहे यातील एकाच ठिकाणी असणाऱ्या अधिकारी /कर्मचाऱ्यांच्या बदलयां बाबत मी विषय मांडला होता. दि ३१/१२/२०२० व दुसरे पत्र ६व्या महिन्यात असे दोन पत्र दिले होते की खात्या अंतर्गत बदली करावी म्हणून सभापती महोदय हा खुप महत्वाचा विषय आहे अनेक वर्षापासून मनपात जेवढे विभाग कार्यरत आहेत त्या सर्व विभागांमध्ये गेल्या अनेक वर्षापासून कर्मचारी/अधिकारी बसलेले आहेत. त्यामुळे माझी विनंती आहे पण आद्यापावेतो या विषयात कुठलेही पाऊन उचलतांना दिसून आले नाही. आपण खात्या अंतर्गत बदलीचा करण्याचा विषय आणतो तो प्रशासनाकडेच जातो. त्या अधिकाऱ्यांना सोईचे होईल त्या प्रमाणे बदल्या करतात या ठिकाणी हसण्यासारखा विषय आहे. तत्कालीन आयुक्त शेख सो. असतांना हा विषय सभागृहात आला होता. त्या वेळेस शेख साहेब मिटींगला उपस्थित होते. यावेळी त्यांनी सांगीतले होते की,या विषयाचा योग्य तो निर्णय घेऊन कार्यावाही करु त्या वेळी त्यांनी कार्यवाही काय केली तर शेवटच्या वर्गाचे कर्मचारी आहेत त्यांच्या बदल्या केल्या आमची मागणी काय होती,अधिकाऱ्यांपासून ते खालपर्यंत सर्वांच्या बदल्या झाल्या पाहिजे होत्या. राऊळवाडीच्या शिपायाची बदली नगांवला केली आम्हाला सांगायचे काय होते आणि त्यांनी केले काय, सभापती महोदय हा विषय खूप महत्वाचा आहे आज तुम्ही एक आदेश करावा. प्रशासनाला कि ७ ते ८ दिवसाच्या आत योगय तो निर्णय घ्यावा. जर निर्णय नाही झाला पत्राच्या माध्यमातुन पुन्हा वाचा फोडण्याचे काम करावे लागेल. २. धुळे शहरातील मोकाट कुत्रे आणि मोकाट जनावरे या बाबत अनेक दिवसापासून विषय चालू आहे. त्या शहरातील लहान बालकांचे कुत्रयांनी लचके तोडले शहरात कुत्रयांनी हैदोस घातला आहे. प्रशासनाला जाग का येत नाही त्यांनी याबाबत कुठलीही कार्यवाही केली नाही. त्यांच्यावर जबाबदारी निश्चीत करावी. जे मोठे सिव्हील हॉस्पिटल आहे तेथे. रोज ४० ते ५० पेशंट कुत्रे चावलेले येतात. यावर प्रशासनाला काहीच वाटत नाही या बाबत जबाबदारी निश्चीत करुन कार्यवाही झाली पाहिजे. ३. दिग्विजय एन्टरप्राईजेस आणि वॉटरग्रेसबाबत मिटींगमध्ये सर्व सदस्यांनी या संस्थेवर आरोप केलेले आहेत त्यावर अद्यापावेतो कार्यवाही प्रशासन का करत नाही? प्रशासनाने असे निर्देश दिले आहे. की ४० लाख रुपये आपण पूर्वी काम करायचो तर आपल्याला कमी पैसे लागायचे आता पैसे जास्त आहे खर्च कमी कसा करता येईल कारण आपण ट्रस्टी आहोत मनपाचे.

म. विकास साळवे — ४० लाखा पेक्षा कमी खर्च कसा करता येईल याबाबत मी आभ्यास करतो आहे.

म.अमोल मासुळे — मी मागणी अधी केली होती की त्यांनी अटी शर्तीचा भंग केला आहे. त्याला ब्लॅकलिस्ट का करण्यात येऊ नये?

म.सभापती — तुम्ही अटी शर्तीचा अभ्यास केला का? अटी शर्ती प्रमाणे काम होत आहे का?

| | |
|---|---|
| म. विकास साळवे | या बाबत आपण त्यांना नोटीस दिली आहे. |
| म.अति.आयुक्त | दिग्विजय बाबत रिपोर्ट स्थायी समीती समोर सादर करायचा आहे. हे काम मनपाच्या फायदयाचे नसुन आपल्या मार्फत फायदयाचे कसे करता येईल या पध्दतीने रिपोर्ट सादर करा आयुक्त सो. यांचे निर्देश आहेत त्या नुसार आम्ही रिपोर्ट बनविण्याचे काम सुरु आहे. |
| म. शितल नवले | पूर्वी आपण हेच काम ६६ लोकांकडून करुन घेत होतो. त्यावेळी ७/७ लाखात काम करुन घेत होतो. पुण्याला मलेरिया विभाग हेड ऑफिस तेथुन औषधेही फ्रि ऑफ कॉस्ट मिळत होते याला शासनाकडून अनुदान आहे आपले अनुदान थकित आहे त्यांची नस्ती फिरत आहे. याकडे कोणी लक्ष देत नाही. पूर्वी हेच आस्थाचे कर्मचारी काम करीत होते त्यावेळी पेशंट कमी होते नेमका हा डी.पी.आर. कोणाच्या हिताचा बनविला गेला आता आपल्याकडे फ्रि ऑफ कॉस्टचे औषधे घेऊन हे काम करता येतात शौचालयाच्या पाईपला जे कॅप लावायचे आहे तो ५ वर्षासाठी एकदाच लावायचे आहेत. आता नविन सिस्टीम मध्ये तसा पाईप येतो आता तो पाईप शासनाने कंम्पलसरी केला आहे. |
| म.अति.आयुक्त | ४० लाख रु ची निविदा काढली त्याला स्थायी समीतीने मंजूरी दिली आहे. दरमंजूरी दिली. |
| म.शितल नवले | माझा प्रशासनावर आरोप आहे. की संपूर्ण टिपनी आमच्या समोर आणत नाही. जर दोन कोटेशन धारक असेल तर पुन्हा रिकॉल करायला पाहिजे होते दुसऱ्यांचा काय रेट होता त्यांची टिपनी ओपन करा. |
| म.अमोल मासुळे | साहेब दिग्विजयला ब्लॅकलिस्ट करण्यासाठी प्रस्ताव सादर करा. ४. आरोग्यविभाग, भांडार विभाग,वसुली विभाग,बाजार विभाग यांचे विशेष लेखा परिक्षण करण्यात यावे आम्ही इथे पोटतिडकीने बोलतो अधिकारी सखोल निर्णय घेत नाही. इथे जो खोंडे नामक व्यक्ती आहे त्यांचे आम्ही पुरावे दिले भांडार विभागाचा देखील सुनिल भाउंनी मागील सभेत मोठा भ्रष्टाचार उघडकीस आणला. दररोज भांडार विभागाची बातमी वर्तमान पेपरात छापून येत आहे. ती बदनामी आपली होते याला कारणीभूत प्रशासनाचे अधिकारी आहेत म्हणून यांचे लेखा परिक्षण झाले पाहिजे ही आता काळाची गरज आहे. |
| म.सभापती | मी तुम्हाला एक वाढीव विभाग देतो या मध्ये नगररचना विभागाला समाविष्ट करुन तसा ठराव करण्यात यावा. |
| म. अमोल मासुळे | या विषयावर वर्षभर बोललो मनपाच्या मालकीच्या ओपन प्लेस जागा आहेत. त्याबाबत त्यांनी आता पर्यंत किती काम केले किती जागा शोधल्या ज्या जागा आहेत त्यावर मनपाचे नाव लावून घ्या हे नाव लावयला का जात नाही? काय कारण आहे? मी मागे ही सांगीतले मनपाचे मोठे मोठे भूखंड मोठ मोठया व्यक्तींना,संस्थेला दिले आहेत. नाममात्र दिले आहेत. ज्याची पूर्वी मुदत संपली असेल त्यांना पत्र दया.नोटीस दया. |
| म.सभापती | मी ३ दिवसांपूर्वी आयुक्तांना पत्र दिलेले आहे आणि त्या जागा शोधायच्या. |
| म.अमोल मासुळे | धुळे मनपात खुप मोठे रॅकेट आहे यावर बोलून उपयोग नाही. आता यावर कार्यवाही करावी लागेल. आता जे ११ हद्दवाढ गावे आहेत त्या ठिकाणच्या जागा होत्या त्या पुढाऱ्यांनी बळकावून त्यांच्या नावावर करुन घेतल्या मनपा अधिकाऱ्यांना सर्व माहीत आहे. ते काय म्हणून दुर्लक्ष करता आहे? यांचीपण संपूर्ण माहिती मिळावी. मनपाला लागून सरदार पटेल उद्यान आहे. भाजपाची सत्ता असतांना जयकुमार रावल यांनी पर्यटन मंत्री असतांना पर्यटन विकास योजनेतून ५ कोटी रु निधी दिला बगीच्याचे काम वर्षभरापासून बंद पडले आहे. निधी अभावी या बाबत मनपाकडून शासनाला काही पाठपुरावा झाला किंवा नाही. |
| म. एम.के शिंदे | सरदार पटेल उद्यान हे मनपाच्या मालकीचे होते त्या भूखंडाचा काही भाग मोडकळीस आला होता. ते दुरुस्ती करण्यासाठी तत्कालीन मंत्री जयकुमार रावल यांनी ५ कोटी रु मंजूर केले होते. त्या नुसार ते काम सार्वजनीक विभागाने करावे त्यानुसार सार्वजनिक बांधकाम विभगाने ते काम केले. आपण त्यांना ताबा पण दिला काही ठरावीक काम पूर्ण झाल्यानंतर पुढील काम निधी अभावी थांबवले तशी निधीची मागणी ही जिल्हाधिकाऱ्यां मार्फत शासनाकडे केलेली आहे. निधी प्राप्त झालेला नाही. मागे बी.&सी. ने विनंती केली होती जे कामे अपूर्ण आहेत ते काम वित्त आयोगातून करु शकतो. ते आपण हस्तांतरण करुन घ्यावे असे मागे चालू होते त्या बाबत शासनाचे पत्र नाही अद्याप त्या कामासाठी अनुदान प्राप्त झालेले नाही. |

| | |
|---|---|
| म.सभापती | राऊत डॉग व्हॅनचे काय झाले. |
| म.राऊत | आजच अति.आयुक्त सो यांचे कडे टिपणी ठेवली आहे. |
| म.सुनिल बैसाणे | आज आपली शेवटची सभा आहे सदस्यांची. आम्हाला नागरीकांच्या हिताचा व मनपाच्या फायदयासाठी व चुकीचे काम होत असेल तर त्यांना वाचा फोडण्यासाठी आम्हाला संधी दिली या बद्दल आभार व्यक्त करतो या वर्ष भरात आपण देखील मनपाचा कारभार चांगला चालवावा म्हणून प्रयत्न केले आहे. याला अधिकाऱ्यांनी देखील मोलाचे सहकार्य केले आहे. आपण चांगल काम करण्याचा प्रयत्न केला आहे. त्यांनी त्यांना असलेल्या ज्ञानानुसार प्रश्न मांडलेले आहे खऱ्या अर्थाने प्रश्नांना वाचा फोडण्यासाठी पत्रकार बांधवांनी प्रश्नांचे गांभिर्य लक्षात घेऊन जनतेच्या हितासाठी वेळोवेळी प्रसिध्दी दिली त्यांचे सर्वांचे आम्ही आभार व्यक्त करतो. सभापती महोदय आपल्याला प्रशासनाचा चांगला अनुभव आहे. त्यानुसार आपण चांगले काम करण्याचा प्रयन्त केला आहे. दोन कर्मचाऱ्यांना आज सेवा निवृत्तीचा कार्यक्रम आहे. सेवा बजावत असतांना त्यांनी चांगले काम केले त्या बद्दल अशोक भाऊंचा सत्कार केला, जे चांगले काम करतांना त्यांच्या कार्याचा गुणगौरव झालाच पाहिजे. सभापती महोदय गेल्या वर्षभरापासून आणि मी सभापती असतांना प्रश्नांना वाचा फोडण्याचे काम केले आहे दिपक खोंडे असेल किंवा लसीकरण बाबतीत असेल प्रशासनातील अधिकारा नुसार करत असतांनाचे विषय असेल ते आम्ही वर्षभरापासून मांडण्याचा प्रयत्न करीत आहोत. आता आम्ही जरी स्थायी समितीत नसलो तरी मनपात दोन वर्ष आहे. आपल्याला पक्षा मार्फत स्थायी समितीत काम करण्याची संधी प्राप्त झाली. जनतेच्या अशिर्वादाने ५ वर्ष काम करण्याची संधी आपल्याहा हया मनपात मिळाली आहे. स्थायी समीतीत काम करतांना काही मर्यादा होत्या. सभाशास्त्रानुसार आपल्याला काम करावे लागत होते. आता मर्यादे पलीकडे जाऊन काम करण्याची संधी आहे. जे-जे विषय आम्ही वर्षभरापासुन मांडले आहे. जे निर्णय झाले असतील त्यांचे आम्ही स्वागत करतो. जे निर्णय राहिले असतील त्यावर आम्ही सातत्याने काम करण्याचा प्रयत्न करणार आहोत. स्वच्छ भारत अभियान अंतर्गत १४ व्या वित्त आयोग मध्ये आपण मनपाच्या हितासाठी अनेक योजनांची अंमलबजावणी केली आहे. मी आपल्या माध्यमातुन प्रशासनाला विनंती करतो. की १४ व्या वित्त आयोगातून हा शासनाच्या अनुदानांचा विषय असल्या कारणाने यांचे ऑडीट झाले पाहिजे. कारण ऑडीट मध्ये सर्व गोष्टींचा लेखा जोखा येतो. मी मागच्या सभेत देखील विषय मांडला होता. त्या विषयामध्ये विना निविदा आणि पदाच्या कामात कसुर केला म्हणून आपण काय निर्णय घेतला मला अजुन पर्यंत कळालेले नाही. विना निविदा काढुन मनपाचच्या २८ लाख रु चा भ्रष्टाचार केला आहे ही मी ठामपणे सांगु शकतो. कालच मी ए.बी.पी. माझा न्युजवर बातमी पाहिली त्या बाबतीमध्ये ज्या-ज्या अधिकाऱ्यांनी पदाचा दुरुपयोग केला आहे. त्या अधिकाऱ्यांनवर नगरविकास खात्यांच्या माध्यमातुन कार्यवाही करण्याचे आदेश कालच प्राप्त झालेले आहेत. या मनपात पदाचा दरुपयोग वेळोवेळी झालेला आहे. नगरसेवकाने बाजु मांडत असतांना हया गोष्टी उजेडात आणल्या आहेत. आता कापडणीस सो तुमच्या कडे आरोग्य विभागाचा चार्ज आहे. खास करुन तुमच्या कडून मला माहिती पाहिजे मी स्वच्छ भारत अभियान अंतर्गत ओला कचरा व सुका कचरा गोळा करणे कामी त्या डस्टबिन च्या बाबतीमध्ये विषय मांडला होता तो विषय मांडत असतांना डस्टबीन खरेदी करत असतांना त्या बाबत जे आरोग्य निरिक्षक आहेत त्यांच्याकडून माहिती मागवली होती आता पर्यंत कुठल्या कुठल्या ठिकाणी त्या डस्टबिन लावलेल्या आहेत? आता किती डस्टबिन आपल्याकडे शिल्लक आहेत या गोष्टीला २ ते ३ महिने होऊन गेले याचे अजून पर्यंत उत्तर मिळालेलं नाही. मागील स्थायीत प्रश्न मांडला आहे तर त्याचे पुढील मिटींगमध्ये उत्तर मिळाले पाहिजे ते आजपर्यंत झाले नाही. याबाबत मी खोलवर सखोल अभ्यास करुन अधिकाऱ्यांवर कार्यवाही करायला लागेल यांची आपण दखल घ्यावी. दुसरी गोष्ट म्हणजे आयुक्त सो इतके कर्तव्यदक्ष आहेत की त्यांनी निविदा समीती गठीत केली आहे. हि समीती गठीत करण्याचे कारण म्हणजे त्यांना अपेक्षित आहे की मनपाच्या कारभारात सुसुत्रता आली पाहिजे. निविदा समीतीचे अधिकारी ८-८ अधिकाऱ्यांच्या टेबलावरुन ती फाईल पास होणार आहे. उदा. दलीत निधीचे काही प्रकरणे वर्कऑर्डर होऊन दरमंजूरीला येत आहे. २० फेब्रुवारी पर्यंत कामांच्या बाबतीमध्ये निविदा प्रक्रीया पूर्ण होऊन ते |

झाले नाही तर निधी परत जाण्याची शक्यता आहे जी निविदा समीती गठीत केली ती गठीत करण्याचा हेतु काय अति. आयुक्त म्हणून येऊन तुम्हाला २-३ महिने झाले. त्या वेळी समीती गठीत करण्याचे तुम्हाला सुचले नाही का? आणि जर तुम्ही निविदा समीती गठीत केली आहे. शिंदे सो. तुम्हाला निविदा संबंधीचा भरपुर अनुभव आहे तुम्ही जी निविदा समीती गठीत केली आहे जी निविदा उघडतांना सर्व अधिकारी एका हॉल मध्ये सभागृहात किंवा तुम्ही निश्चीत केलेल्या ठिकाणी एकत्रीत उपस्थित राहिलं पाहिजे. त्या ठिकाणी त्या फाईलवर अत्याचार झाला नाही पाहिजे. कारण त्या फाईलच अंतीम मंजूरी घेत असतांना वस्त्र हरण झालेलं असतं जर तुम्ही समीती गठीत केली आहे तर ज्या दिवशी तुम्ही निविदा उघडणार त्याच दिवशी त्या फाईलवर कार्यवाही झाली पाहिजे. जर आमचा निधी परत गेला आम्ही राखीव प्रभागातुन निवडणुन आलो आहोत आम्ही शासन स्तरावर निधी मिळावा म्हणून प्रयत्न करीत असतो. जर निधी परत गेला तर याची सर्वस्वी जबाबदारी आयुक्तांची राहिल तुम्ही कामात सुसुत्रता आणली पाहिजे. पदाचा दुरुपयोग या ठिकाणी झाला नाही पाहिजे आम्ही या ठिकाणी प्रश्न उपस्थित करीत असतो त्यात आमच जनहित असते. एखादया चांगल्या कामासाठी जातो त्यांच्या आमच्या फाईलीवर राग काढतात मनपाच्या हितासाठी मनपाच्या उत्पन्न वाढीसाठी आम्ही या ठिकाणी अनेक विषय घेऊन आलो आमचा कार्यकाळ २ महिने बाकी असतांना विषय घेऊन आलो परंतु आज पर्यंत त्या विषयांना वाचा फुटली नाही. त्या कामांना अपेक्षा लावून ब्रेक लावा असे उदिष्टे साध्य करण्यासाठी प्रयत्न झाला आहे. सभापती महोदय ज्यांनी ज्यांनी असा प्रयत्न केला आहे. काही फाईल जंपींग करुन कश्या मंजूर होतात त्या फाईलचे काय होणार आहे. त्यांचा येणाऱ्या काळामध्ये विचार करावा लागेल. मागील सभेत देखील नागसेन भाऊंनी महिला बचतगटाच्या बाबतीत प्रश्न उपस्थित केला होता. त्यांनी पाठपुरावा केला का नाही? परंतु २०१४ ते२०१७ पावेतो कचरा उचलण्याकामी अल्पसंख्यांक महिला बचत गट या महिला बचत गटाने २०१४ ते२०१७ अखेर घनकचरा व्यवस्थापन अंतर्गत या संस्थेमध्ये काम केलेले आहे परंतु आमच्या इ.पी.एफ. चा पैसा आम्हाला आज पर्यंत मिळालेला नाही. मी ती सर्व माहिती गोळा केली. त्यानंतर माझ्या असे लक्षात आले, त्या संस्थेने त्यांचा स्वत:चे जे नातेवाईक कर्मचारी आहे त्यांच्या नावे इ.पी.एफ. भरुन बेकायदेशिर भष्ट्राचार करुन ते पैसे त्यांनी परस्पर मिळवून घेतले आहे. याबाबत देखील कार्यवाही करण्यात यावी. त्यात हाशिम शेख आणि निसार शेख नावाचे दोन व्यक्ती आहेत त्यांनी बोगस काम केल्याचे लक्षात येत आहे. हि अल्पसंख्यांक महिला बचत गट यांची चौकशी झाली पाहिजे. बोगस नावे नोंदणी करुन आर्थिक व्यवहार केला आहे. त्यावर कार्यवाही झाली पाहिजे. असे अनेक प्रश्न आहेत त्यावर कार्यवाही होत नाही. गेल्या वर्षभरापासून सर्वअधिकारी मी सहनशीलतेने घेतले मनोज भाऊ तुमचे मी अभिनंदन व कौतुक करतो की, अधिकारी आणि नगरसेवक यांच्यामध्ये समन्वय साधण्यासाठी काम करतात तुमचे देखील या ठिकाणी आभार व्यक्त करतो. ज्यांनी आम्हाला महिती पुरवली त्यांचेही आभार व्यक्त करतो. शेवटचा दिवस समजुन बोलण्याची संधी दिली आणि आजचा शेवटचा दिवस गोड करण्याची विनंती करतो "मै इन्सान से भगवान न हो जाऊ इसीलिये थोडासा पाप करता हुँ"

म.नागसेन बोरसे — संबंधीत कर्मचारी हाशिम शेख यांची पत्नी ही मनपात नोकरीला आहे. ती या संस्थेची चेअरमन असुन ती नोकरीस असल्याने काम घेऊ शकत नाही.

म.भारती माळी — दि ३१/१/२०२२ रोजी माझे मिस्टर आदरणिय अशोक माळी यांचा सेवा निवृत्तीचा शेवटचा दिवस आहे. व माझाही स्थायी समीती सदस्यांचा शेवटचा दिवस आहे. असा योगायोग आज घडुन आला आहे. स्थायी समीती सभेमध्ये जो त्यांचा सत्कार सभापती आणि सदस्यांनी त्यांचा सत्कार केला त्या बद्दल बिरारी परिवाराच्या वतीने मनपा सदस्य या नात्याने मी आभार मानते मी एकच सांगु इच्छिते की गेल्या वर्षभरामध्ये आमच्या प्रभागाच्या ज्या काही समस्या होत्या त्या मांडण्याचा प्रयत्न केला आणि तुम्ही ऐकण्याचा प्रयत्न केला व आमच्या सर्व भगीनींना बोलण्याची संधी दिली त्या बद्दल तुमचे आभार व्यक्त करते माझी एकच विनंती आहे की देवपूर भागासाठी प्र.क्र.१,२,३,४ या भागासाठी नवरंग पाण्याच्या टाकी जवळ जे कार्यालय आहे त्या ठिकाणी प्रभाग कार्यालय म्हणून चालू करावे. जेणे करुन या भागातील नागरीकांना आठवडयातून तीन दिवस सर्व अधिकाऱ्यांनी त्या ठिकाणी बसावे आणि त्या

भागातील नागरीकांच्या समस्या सोडवण्यात यावी अशी माझी कळकळीची विनंती आहे यासाठी त्या ठिकाणी प्रभाग कार्यालय सुरु करावे अशी अपेक्षा व्यक्त करते.

म.सभापती — नक्की या विषयावर प्रशासनाला सुचीत करु १० वर्षापूर्वी प्रभाग कार्यालय सुरु झाले होते काही कारणास्तव ते पुन्हा बंद पडले आपण पुन्हा प्रशासनाशी चर्चा करु.

म.शितल नवले — संजुभाऊ आज आपला सभापती म्हणून शेवटचा दिवस आपण या एक वर्षात अजून बऱ्याच प्रश्नांना वाचा फोडली ज्यावेळी आपला कार्यकाळ सुरु झाला त्यावेळी पाणी प्रश्न सुरळीत करण्याचा प्रयत्न झाला त्यात थोडेफार यश मिळाले. आपल्या कार्य काळात एका घटनेमुळे बदनामी झाली होती. स्वच्छते बाबत त्यांचा ही ठेका आपल्या कार्यकाळात चालू झाला भले तो पूर्ण क्षमतेने नसेल पण काही अंशी चालू झाला आहे. या बाबत आपले अभिनंदन करतो. तसेच पुढच्या स्थायी मध्ये पुढील हे ८ सदस्य नसतील ते विवृत्त झाले आहेत त्यांना पुढील वाटचालीस शुभेच्छा देतो. संजुभाऊ आपण दोन वेळा हे पद घेतले पुन्हा त्या पदावर येऊ नये पुढच्या पदावर जावे अशी अपेक्षा व्यक्त करतो. आम्हालाही आपल्या अनुभवाचा फायदा झाला सभापती महोदय ज्या एक दोन समीत्या गठीत केल्या त्या समीतीचे कामकाज देखील पुढे चालले पाहिजे.

म.सभापती — आपल्या समीती तो पर्यंत अस्तीत्वात आहे जो पर्यंत त्यांची चौकशी होत नाही.

म.शितल नवले — यांची इतिवृत्तात नोंद करुन घ्यावी अशी माझी इच्छा आहे साहेब आज सकाळ पेपरमध्ये वृत्त आले आहे निविदा समीती गठीत केली आहे. हि समीती काय काम करेल इथे वर्कीग कसे असणार आहे. आणि आपण कुठल्या आधारावर समीती गठीत केली आहे. याची माहिती ३ लाखाच्या कॉन्ट्रॅक्टर अति.आयुक्त बसत असेल अति.आयुक्तांना किती पावर आहेत. त्यांच्या खालच्यांना किती पावर आहत हे समीती गठीत करतांना आम्हाला कोणालाही विश्वासात न घेता केली आहे पुढच्या स्थायी समीती सभेमध्ये हा प्रश्न उपस्थित झाल्याशिवाय राहणार नाही जर खरोखर एका दिवसांत त्या निविदेवरती निर्णय घेणार असाल तर आपली कार्यवाही योग्य आहे.

म सभापती — कापडणीस सो. या बाबत प्रशासना तर्फे धोरणत्मक निर्णय घ्या.

म.शितल नवले — जे शासन निर्णय झाले आहेत समीती गठीत करण्याचे ते देखील मंत्री मंडळात झालेले आहे. याला सुध्दा बेस आहे. समिती गठीत करण्याचा विषय महासभे समोर यायला हवा होता. धोरणात्मक निर्णय आहे तो ४ लाखाच्या कामाला पण तोच निर्णय ४० लाखाच्या कामात पण तोच निर्णय लावत असाल ते योग्य नाही. पुढच्या वेळेस यतांना यांची संपूर्ण माहिती सभागृहाला दया पुन्हा आपले सर्वांचे आभार व्यक्त करतो.

म. सभापती — सन्मा.सदस्यांनी चर्चेत अनेक महत्वाचे मुद्दे उपस्थित केलेले आहे त्याबाबत प्रशासनाने तात्काळ कार्यवाही करुन त्याबाबत अहवाल सादर करावा याबाबत सन्मा. सदस्यांच्या सहमतीने ठराव पारीत करण्यांस मान्यता देण्यांत येत आहे.

**धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर २११ दिनांक ३१/०१/२०२२**

सन्मा.सदस्यांनी चर्चेत अनेक महत्वाचे मुद्दे उपस्थित केलेले आहे त्याबाबत प्रशासनाने तात्काळ कार्यवाही करुन त्याबाबत अहवाल सादर करावा याबाबत सन्मा. सदस्यांच्या सहमतीने ठराव पारीत करण्यांस मान्यता देण्यांत येत आहे.

१)एकाच ठिकाणी वर्षानुवर्षे काम करणा-या अधिकारी व कर्मचारी यांच्या खात्यांतर्गत बदली करण्यांत यावी.

२)शहरातील मोकाट कुत्र्यांचा प्रश्न लक्षांत घेवून डॉग व्हॅन खरेदी व पशु वैद्यकीय अधिकारी नियुक्तीबाबत प्रशासनाने तात्काळ कार्यवाही करावी.

३) वॉटरग्रेस कंपनी यांना काळया यादीत टाकण्याबाबत कार्यवाही करावी.

४) भांडार विभागातील विना निविदा झालेल्या कामाबाबत तसेच आर.एफ आय.डी. प्रणाली च्या तक्रारी संदर्भात तात्काळ चौकशी करुन कार्यवाही करावी.

५)मनपा मालकीच्या ओपनस्पेसवर महानगरपालिकेचे नांव लावणे तसेच शहरात मनपाच्या मालकीच्या जागा संस्था व व्यक्तीना देण्यांत आलेल्या आहेत.त्या ताब्यात घेण्याबाबत कार्यवाही

करावी. तसेच ११ हद्दवाढ गावातील तत्कालीन ग्रामपंचायत मालकीच्या जागांची चौकशी करुन तात्काळ निर्णय घ्यावा.

६) आरोग्य विभाग, भांडार विभाग, वसुली विभाग, बाजार विभाग तसेच नगररचना विभाग या विभागाचे गत १० वर्षाचे विशेष लेखापरीक्षण करण्याबाबत प्रशासनाने कार्यवाही करावी.

७) अल्पसंख्याक महिला बचत गटाच्या मार्फत घनकचरा संकलनासाठी सन २०१४- २०१७ या कालावधीत झालेल्या कामाची तात्काळ चौकशी करुन अहवाल स्थायी समितीपुढे सादर करावा.

८) प्रभाग समितीसाठी व कार्यालय तात्काळ स्थापन करण्याबाबत कार्यवाही करावी.

९) स्थायी समिती अंतर्गत नियुक्त झालेल्या विविध विषयासंदर्भात चौकशी समित्या गठीत झालेल्या असून सदर विषयाचा अंतिम निर्णय होई पावेतो सदर नियुक्त केलेल्या चौकशी समित्या अस्तित्वात रहातील.

सुचक :- श्री. सुनिल तुळशीराम बैसाणे
अनुमोदक :- श्री. अमोल पावबा मासुळे

सही/-X X X
**सभापती,**
**स्थायी समिती,**
**धुळे महानगरपालिका धुळे**

| | |
|---|---|
| विषय क्रमांक:- १९४ | मागील स्थायी समिती सभांचे इतिवृत्त वाचून कायम करणे. (दि.१३/०१/२०२२) |
| म.नगरसचिव | नगरसचिव यांनी विषयाचे वाचन केले. |
| म. नगरसचिव | नगरसचिव यांनी विषयांचे वाचन केले. |
| म. सुनिल बैसाणे | हे जे इतिवृत्त आहे. ते पुढच्या स्टॅण्डींगला जाईल आम्ही उदया स्टॅण्डींग बैठक यासाठी घेऊ शकतो. |
| म. नगरसचिव | इतिवत्त लगेच उदया देणे शक्य नाही मागील ठरावांवर अदयाप मा.सभापतीच्या सहया बाकी आहेत. |
| म. अमोल मासुळे | आम्हाला आक्षेप घ्यायचा असेल तर |
| म. नगरसचिव | बाकी तुमचे आठ सदस्य आहेत. त्याचे इतिवृत्त तुमच्या पर्यंत पोहचवले जाईल. |
| म. सभापती | तुमचे विषय कायम करु जे काही असतील ते. |
| म.सुनिल बैसाणे | आम्हाला आक्षेप घ्यायचा असेल तर |
| म. नगरसचिव | तुम्ही आक्षेप घेऊ शकता या सभेचे इतिवृत्त तुमच्या पर्यंत येईल. |
| म.सभापती | सर्व सन्मा. सदस्यांच्या सहमतीने मागील स्थायी समिती सभेचे इतिवृत्त क्रमशः वाचून कायम करण्यांत येत आहे. |

**धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर २१२ दिनांक ३१/०१/२०२२**

मागील स्थायी समिती सभा दिनांक १३/०१/२०२२ रोजीच्या सभेचे धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर १९८ ते २०३ अखेर तसेच सभेत सन्मा.सदस्यांनी केलेली चर्चा व त्यावरील निर्णय क्रमशः वाचून कायम करण्यांत येत आहे.

सही/-X X X
**सभापती,**
**स्थायी समिती,**
**धुळे महानगरपालिका धुळे**

| | |
|---|---|
| विषय क्रमांक:- १९५ | श्री. योगेश शालीग्राम पाटील यांना आयुर्वेद दवाखाना येथे वैद्यकीय अधिकारी म्हणुन एकत्रित मानधन रुपये ३०,०००/-मात्रने ०६ महिने कालावधीकरीता फेर नियुक्ती देणेबाबत आलेल्या कार्यालयीन अहवालावर विचार करणे. |
| म. नगरसचिव | नगरसचिव यांनी विषयांचे वाचन केले. |
| म.अमोल मासुळे | विषय मंजूर करण्वांत यावा. |
| म.सभापती | सर्व सन्मा.सदस्यांच्या सहमतीने व कार्यालयीन अहवालास अधिन राहून सदर प्रस्तावास मान्यता देण्यांत येत आहे. |

**धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर २१३ दिनांक ३१/०१/२०२२**

श्री. योगेश शालीग्राम पाटील यांना आयुर्वेद दवाखाना येथे वैद्यकीय अधिकारी म्हणुन एकत्रित मानधन रुपये ३०,०००/-मात्रने ०६ महिने कालावधीकरीता फेर नियुक्ती देणेबाबत आलेल्या कार्यालयीन अहवालावर विचार करणे.

धुळे शहरातील कोविड १९ या साथरोगाचा वाढता प्रादुर्भाव रोखण्यासाठी व रुग्णांवर उपचार करण्यासाठी धुळे महानगरपालिका अंतर्गत स्वतंत्र रुग्णालय नसल्यामुळे शासनाच्या आदेशानुसार कोविड केअर सेंटर (CCC) व डेडिकेटेड कोविड हेल्थ केअर सेंटर (DCHC) ची सेवा चालु करणे आवश्यक होते त्याकरीता उक्त नमुद दैनिकांमध्ये पदभरती बाबत दैनिक पुण्यनगरी वृत्तपत्रात दि. १४/०६/२०२० व दि. १५/६/२०२० रोजी जाहिरात प्रसिध्द करण्यात आली होती.

तरी प्राप्त अर्जानुसार शैक्षणिक अर्हता व त्यामधील गुणांकन तसेच मुलाखतीअंती **वैद्यकीय अधिकारी** या पदांकरीता निवड समिती मार्फत डॉ. श्री. योगेश पाटील यांची निवड करणेत आलेली आहे.

डेडिकेटेड कोविड हेल्थ केअर सेंटर (DCHC) सिव्हील हॉस्पिटल व कोविड केअर सेंटर (CCC) सेंटर येथे काम करण्यासाठी वरील **वैद्यकीय अधिकारी** यांना पुढील २ महिन्यांकरीता मानधनावर फेर नियुक्ती देणेत आलेली आहे. श्री. योगेश शालीग्राम पाटील यांना आयुर्वेदिक दवाखाना वैद्यकीय पद रिक्त असल्याने तेथील पदाचा अतिरिक्त कार्यभार सांभाळण्याबाबत आदेशित केले असुन सदर दवाखान्यात ४०० + रुग्णांची आयुर्वेदिक शास्त्र पध्दतीने रुग्ण नाडी परीक्षा, तपासणी, उपचार,समुपदेश, मार्गदर्शन करणे रुग्णसेवा करीत आहे. सदर दवाखान्यात सुसज्ज पंचकर्म विभाग कार्यान्वित करुन रुग्णांची चांगली दर्जेदार सेवा, आयुर्वेद औषधी व पंचकर्म उपचार उपलब्ध करुन रुग्णसेवा करीत आहेत.

श्री. योगेश शालीग्राम पाटील यांना दि.२/०१/२०२१ ने २महिन्यासाठी मुदत वाढ देणेत आलेली होती. जा क्र /धुंमपा/एमयुएचएम/२३०/२०२१ दि.२६/२/२०२१ व जा क्र /धुमपा/ एनयुएचएम / २५२ दि. २१/३/२०२१ अन्वये दि.३०/६/२०२१ पर्यंत मुदतवाढ देणेत आलेली आहे.

श्री योगेश शालीग्राम पाटील यांना ६ महिन्यासाठी मुदत वाढ देणेत आलेली असुन सदरची मुदत दि.०३/०१/२०२२ रोजी संपुष्टात येत आहे.

आरोग्याधिकारी यांनी डॉ योगेश पाटील यांना मुदतवाढ देणेबाबत शिफारस अहवाल सादर केलेला आहे. श्री. योगेश शालीग्राम पाटील यांना आयुर्वेद दवाखाना येथे वैद्यकीय अधिकारी म्हणुन एकत्रित मानधन रुपये३०,०००/-मात्र ने३ दिवसाचा तांत्रिक सेवा खंड देऊन ०६ महिने कालावधीकरीता फेर नियुक्ती देणेबाबत महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ५३ नुसार मे. स्थायी समिती पुढे मान्यतेसाठी पाठविण्यास किंवा उपरोक्त पदाकरीता थेट मुलाखतीने भरणेसाठी जाहिरात प्रसिध्द करणेस योग्य त्या निर्णयास्तव अहवाल सादर करण्यात आलेला होता.

सदरअहवालावर मा.आयुक्त सो. यांनी निर्देश दिले की, अत्यावश्यक बाब पाहता स्थायी समितीची मान्यतेसाठी सादर झालेला आहे.

सर्व सन्मा. सदस्यांच्या सहमतीने व कार्यालयीन अहवालास अधिन राहून डॉ. श्री. योगेश शालीग्राम पाटील यांना आयुर्वेद दवाखाना येथे वैद्यकीय अधिकारी म्हणुन एकत्रित मानधन रुपये ३०,०००/-मात्रने ३ दिवसाचा तांत्रिक सेवा खंड देऊन ०६ महिने कालावधीकरीता फेर नियुक्ती देणेस महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ५३ नुसार कार्योत्तर मान्यता देण्यांत येत आहे. सदर

प्रस्ताव व कार्यवाही बाबत लेखा आक्षेप निर्माण होणार नाही याची दक्षता घ्यावी. याबाबतची जबाबदारी संबंधित विभागाची राहील.

सुचक:- श्री. अमोल पावबा मासुळे
अनुमोदक:- श्री.सूनिल तुळशीराम बैसाणे

**सर्वानुमते मंजुर,**
**सही/-X X X**
**सभापती,**
**स्थायी समिती,**
**धुळे महानगरपालिका धुळे**

विषय क्रमांक:- १९६ — देवपूर भागांतील राजे संभाजी उद्यान बिओटी तत्वावर चालवणेकामी निविदा मागविणे बाबत आलेल्या कार्यालयीन अहवालावर विचार करणे.

म. नगरसचिव — नगरसचिव यांनी विषयांचे वाचन केले.

म. सुनिल बैसाणे — सदर प्रस्तावाबाबत माहिती सादर करावी.

म. अभियंता — राजे संभाजी उदयान यापूर्वी निविदा काढून खाजगी संस्थेस चालवण्यास दिले होते. सदरची मुदत पूर्ण झाल्याने पुन्हा निविदा काढण्याबाबत प्रस्तावित करण्यात आलेले व त्या कामी आवश्यक निविदा पत्र तयार करुन मे. स्थायी समीतीपुढे सादर करण्यात येईल. व अंतिम परवानगी घेऊन याबाबतची निविदा प्रसिध्द करुन पुढील देखभाल दुरुस्ती याबाबतची कार्यवाही करण्यात येईल.

म. सभापती — सर्व सन्मा.सदस्यांच्या सहमतीने व कार्यालयीन अहवालानुसार सदर प्रस्तावास मान्यता देण्यांत येतआहे.

**धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर २१४ दिनांक ३१/०१/२०२२**

देवपूर भागांत पांझरा नदी किनारी राजे संभाजी उद्यान अस्तित्वात आहे. सदरील उद्यान हे इकडील कार्यादेश क्र.४१/दि.०७/१०/२०१५ अन्वये चेअरमन श्री आदिशक्ती हिंगलाज माता चॅरीटेबल ट्रस्ट.धुळे यांना प्रतिवर्ष रक्कम रु.२,१२,०००/-मात्र प्रमाणे ५ वर्षासाठी देण्यात आला होता.त्यानुसार सदर कामाची एकूण रक्कम रु.१०,६०,०००/-मात्र आहे. उक्त ठेक्याची मुदत दि.०६/१०/२०२० रोजी संपत आहे.उक्त कामाच्या रॉयल्टी पोटी ठेकेदार चेअरमन श्री.आदिशक्ती हिंगलाज माता चॅरीटेबल ट्रस्ट.धुळे यांनी आजपावेतो रु.१०,३०,०००/-मात्रचा भरणा केलेला आहे. तथापी कोवीड-१९ या संसर्ग रोगामुळे सदरचे उद्यान दि.१४/०३/२०२० पासुन बंद ठेवण्यात आले होते. व पुन्हा सदर गार्डन एजन्सी मार्फत दि.०८/१२/२०२० पासुन सुरु केले होते. त्यामुळे बंद कालावधीतीतील मुदतवाढ ही २०६ दिवस होते म्हणजे ६ महिने २२ दिवस होते. म्हणजे दि. ०३/०७/२०२१ पर्यंत मुदत वाढ लागु होती. उक्त बाबत त्यानुसार कामाची मुदत संपल्याने श्री.आदिशक्ती हिंगलाज माता चॅरीटेबल ट्रस्ट,धुळे यांना उद्यान ताब्यात देणे बाबत नोटीस दिली आहे.तसेच छावा मराठा संघटन,धुळे यांनी दि.०३/०८/२०२१ रोजी पत्र देवून सदरचे उद्यान नवीन एजन्सीची नियुक्ती होई पर्यंत विना मूल्य देखभाल दुरुस्तीसाठी सदरचे उद्यान ताब्यात देणे बाबत विनंती केली आहे.

तसेच ठेक्याची मुदत संपली असल्याने नव्याने राजे संभाजी उद्यान बिओटी तत्वावर चालवणे कामी ई-निविदा ३ ते ५ वर्षासाठी मागविणे बाबत सदरचा विषय मे.स्थायी समिती सादर झालेला आहे.

सर्व सन्मा. सदस्यांच्या सहमतीने व कार्यालयीन अहवालास अधिन राहून राजे संभाजी उद्यान बी.ओ.टी. तत्वावर चालविणेकामी ई निविदा ३ ते ५ वर्षासाठी मागविणेबाबतच्या प्रस्तावास मान्यता देण्यांत येत आहे.

सुचक:- श्री. सूनिल तुळशीराम बैसाणे
अनुमोदक:- श्री. अमोल पावबा मासुळे

**सर्वानुमते मंजुर,**
**सही/-X X X**
**सभापती,**
**स्थायी समिती,**
**धुळे महानगरपालिका धुळे**

विषय क्रमांक:- १९७ धुळे मनपाच्या नवीन प्रशासकीय इमारतीच्या बाजूस जुनी गुजराथी शाळा सि.स.नं. ३४७८ येथे खाजगीकरणातंर्गत ( B.O.L.T./ B.O.T) तत्वावर व्यापारी संकुल विकसित करणे बाबत आलेल्या कार्यालयीन अहवालावर विचार करणे.

म. नगरसचिव नगरसचिव यांनी विषयांचे वाचन केले.

म. सुनिल बैसाणे या कामाचे प्रेझेंटेशन आम्ही पाहिले आहे. प्रझेंटेशन पाहिल्या नंतर आज खऱ्या अर्थाने तुम्हाला सांगु इच्छीतो नविन इमारत धुळे मनपाची झाली परंतु ज्या वेळेस आम्ही दोंडाईचा नगर पालिकेत गेलो किंवा नाशिक महापालिकेला गेलो, महापालिकेत गेल्या नंतर महापालिकेचे सभागृह हे भव्य दिव्य असे असते. त्या सभागृहात गेल्यानंतर लोकप्रतिनिधीला त्यांच्या समस्या मांडत असतांना देखील त्याचा आनंद होतो. हे आपले सभागृह आहे की कार्यालय आहे हेच कळत नाही. याच्या पलीकडे पर्याय नसल्यामुळे सभागृहामध्ये स्थायी ,महासभा घेतो. स्थायीची सभा घेत असतांना अधिकारी,आपले सदस्य, छायाचित्रकार, पत्रकार यांना सुध्दा बसण्यास जागा नसते. महासभेत काही नगरसेवक अनुपस्थित राहतात. किंवा काही हजेरी लावून जातात म्हणून एका बेंच वर दोन-दोन किंवा तीन-तीन जण बसतो. परंतु अत्यंत भव्य-दिव्य वास्तु उभी राहणार आहे. माझ्या माहिती नुसार एक सभागृह देखील आहे. मोठे सभागृह आहे. हा विषय प्रशासकीय मंजुरीचा जरी असेल, नवरंग पाण्याची टाकीचा असेल, १५३ सर्व्हे नंबरचा असेल किंवा गुजराती शाळेचा असेल महापालिकेचे उत्पन्नाचे हित जपले गेले पाहिजे. ते हित जपले तर धुळे शहराचे हित जपले जाणार आहे. हे सर्व चारही प्रोजेक्ट निर्माण करणार आहे हितासाठी यांत कुठलीही हय-गय करता कामा नये. शुध्द हेतु उत्पन्नाचा असला पाहिजे. प्रशासकीय मंजुरी करतांना ज्या-ज्या आकडयांची आकडेमोड केली आहे,ज्या-ज्या बाबी लक्षात घेतल्या आहे. निविदा प्रकीया राबवतांना त्या-त्या बाबींचा विचार केला पाहिजे. निविदा प्रकीयामध्ये त्रुटी ठेवून कोणाला फायदा होईल असे काम नसले पाहिजे. याचा विचार प्रशासनाने करावा. उत्पन्नाचे हिताचे जे काही प्रश्न येतील ते काळजीपूर्वक हाताळले पाहिजे. हा १९७ नं.विषय आहे त्या विषयाला मंजुरी देत असतांना हा पालिकेच्या हिताचा आहे याला मंजुरी दयावी.

म. शितल नवले सदर प्रस्ताव मंजुर करावा.

म.सभापती सर्व सन्मा. सदस्यांच्या सहमतीने व कार्यालयीन अहवालास अधिन राहून प्रस्तावास मान्यता देण्यांत येत आहे.

**धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर २१५ दिनांक ३१/०१/२०२२**

धुळे मनपाच्या नवीन प्रशासकीय इमारतीच्या बाजूस जुनी गुजराथी शाळा नगर भूमापन क्र. / फा.प्लॉट नं.३४७८ येथे व्यापारी संकुल बांधणे बाबत धुळे मनपाचा आर्कीटेक्ट पॅनलवर आर्कीटेक्ट म्हणून नियुक्त करणे कामी संदर्भीय क्र.२ नुसार महानगरपालिका मे.स्थायी समिती ठरावानुसार मंजुरी मिळालेली आहे.

उक्त बाबत सदरचे काम मनपा मार्फत करणेत येणार होते. परंतु आजमितीस मनपाची आर्थिक स्थिती बरोबर नसल्याने मनपा मार्फत न- करता BOI / BOLT नुसार करणे योग्य राहील. यात धुळे मनपाने मनपा कार्यालयासमोरील करणेत आलेल्या दुकानदारांना प्राधान्याने सामावून घेण्याबाबत निविदेत अट टाकणेत येईल. सदरचे काम BOI/ BOLTमार्फत करणेत येणार असल्याने काम करणारे ठेकेदारामार्फत आर्कीटेक्ट यांची फी भरणेत येईल. त्यामुळे आर्कीटेक्ट यांची फी मनपा मार्फत अदा करावी लागणार नाही.

उक्त बाबत श्री.हेमंत भावसार ,आर्कीटेक्ट,नाशिक यांनी या कार्यालयास दि.१६/१२/२०२१ रोजी दिलेल्या पत्रानुसार सदरील फर्म आर्कीटेक्ट व्यवसायात कार्यरत आहे. ही फर्म शासकीय निमशासकीय / स्थानिक स्वराज्य संस्थासाठी कामे करीत असल्याने तसेच सदरचा विषय हा शहराच्या व मनपाच्या आर्थिक हिताच्या दृष्टीने महत्वपूर्ण धुळे मनपाच्या नवीन प्रशासकीय इमारतीच्या बाजूस शाळा क्र. १ भूमापन क्र./ फा. प्लॉट नं. ३४७८ येथे व्यापारी संकुल जागेत आर्कीटेक्ट म्हणून नेमणे कामी संदर्भीय क्र. २ अन्वये स्थायी समितीने मान्यता दिलेली आहे.

उक्त बाबत श्री.हेमंत भावसार,आर्कीटेक्ट,नाशिक यांना या कार्यालया कडील संदर्भीय क्र. ३ नुसार कार्यादेश देण्यात आलेला आहे.

उक्त विषयी सदरील कामाचे दि.११/०१/२०२२ रोजी म.आयुक्त सो.,यांच्या दालनात मा.महापौर,मा.सभापती, मा.आयुक्त,नगरसेवक यांच्या समवेत श्री.हेमंत भावसार,आर्कीटेक्ट , नाशिक यांनी सादरीकरण केले आहे.

उक्त बाबत आर्कीटेक्ट यांनी निश्चित केलेली प्रकल्प उभारणेसाठी रक्कम रु.२३,०४,७८,१४१/-कोटी निश्चित करण्यात आलेली आहे. धुळे मनपास अधिमुल्य रक्कम (premium) रक्कम रु.४,२४,४८,०२३/- मात्र निश्चित केलेली आहे. यात मनपाचे सभागृह बांधणेसाठी रु.२,१९,६२,६१२/- इतका खर्च लागणार आहे. सदर सभागृह खर्च वजा करून रु.२,०४,८५,४२१/- मात्र मनपास अधिमुल्य मिळणार आहे.

उक्त बाबत लेखा विभागाकडील अभिप्राया नुसार ,धुळे मनपाच्या नवीन प्रशासकीय इमारतीच्या बाजूस शाळा क्र. १ येथे व्यापारी संकुल जागेत BOT / BOLT तत्वावर करणे बाबत अधिमुल्य निश्चितीसाठी व ई- निविदा करणेसाठी मे.स्थायी समितीपुढे सादर करणे कामी सादर करणेत आलेले आहे.

उक्त बाबत मे. महासभा ठराव क्र. १०० दि.२१/०३/२०१८ नुसार नगररचना विभाग व शिक्षण मंडळ धुळे यांचे अभिप्राय नुसार व्यापारी संकुल बांधकाम करणेस मंजुरी दिलेले आहे. जा.क्र./ धुमपा / बांवि /३४ दि.२८/०८/२०१९ अन्वये वर्षा कन्सट्रक्शन यांना कामाचा कार्यारंभ आदेश देणेत आलेला होता. मे.स्थायी समिती ठराव क्र. ५९ दि.२१/०५/२०२१ नुसार सदर ठिकाणी मनपाची शाळा तसेच प्रथम मजल्यावर खाजगी संस्थेस दिलेली जागा रिक्त न झाल्यामुळे सदर कामाचा कार्यादेश देवून ६ महिन्याच्या वर कालावधी झाल्याने ठेकेदाराने दिलेल्या पत्रानुसार सदर निविदा रद्द करण्यास मान्यता दिली आहे. मे.महासभा ठराव क्र. १७१ दि.२५/०५/२०२१ नुसार सदर व्यापारी संकुल यापूर्वी जी प्लस १ प्रमाणे अंदाजपत्रक तयार करणेत आलेले होते. परंतु सदरचे काम रद्द करून जी प्लस ३ प्रमाणे करणे बाबत सुधारित बांधकामास मान्यता दिलेली आहे. नस्तीसोबत सदर जागेचे मालमत्ता पत्रक सादर केले आहे. सदर जागेवर व्यापारी संकुल बांधणे बाबत आर्कीटेक्ट पॅनलवर जा.क्र./धुमपा/बांवि/२०११ दि.२३/१२/२०२१ अन्वये कामाच्या अंदाजपत्रकीय रक्कमेच्या ०.७५%नुसार कार्यादेश दिलेला आहे.तसेच करारनामा करून १ ते २१ अटी शर्तीनुसार दि.२३/१२/२०२१ रोजी करणेत आलेला आहे.त्यानुसार सदर प्रकल्प मनपाची परिस्थिती बरोबर नसल्याने BOT/ BOLT नुसार करण्यात येणार असले बाबत नमूद केले आहे.तसेच आर्कीटेक्ट फी सदर काम करणारे ठेकेदारामार्फत देणार असल्याने मनपा मार्फत अदा करावी लागणार नसलेबाबत नमूद केले आहे.

आर्कीटेक्ट श्री.हेमंत भावसार यांनी प्रकल्प उभारणेसाठी रक्कम रु.२३,०४,७८,१४१ मात्र निश्चित केली असून धुळे मनपास अधिमुल्य रक्कम (premium ) रक्कम रु. ४,२४,४८,०२३ मात्र निश्चित केलेली आहे. यात मनपा सभागृह बांधणे साठी रु.२१९६२६१२ इतका खर्च लागणार आहे. सदर सभागृह खर्च वजा करून रु.२,०४,८५,४२१ मात्र अधिमुल्य मिळणार आहे. तरी सदर प्रकल्प रक्कम रु. २३,०४,७८,१४१ मात्रची ई- निविदा करणेसाठी मे.स्थायी समितीपुढे सादर करणेबाबत नमूद केले आहे. असा अभिप्राय लेखा विभागाकडुन प्राप्त आहे.

उक्त बाबत म.उपायुक्त यांच्या कडील अभिप्राया नुसार, BOLT तत्वावर बांधण्यात येणाऱ्या व्यापारी संकुलातून मनपास अधिमुल्य,भाडे, मालमत्ता कर स्वरूपात उत्पन्न प्राप्त होणार आहे. आर्कीटेक्ट यांचेकडुन प्राप्त नकाशावर नगररचना विभाग व सहाय्यक संचालक नगररचना विभाग यांचे अभिप्राय घेणे आवश्यक राहील.संकुल बांधण्यात येणाऱ्या जागेची बाजार मूल्य लक्षात प्रस्तावित भाडेचे दर हे कमी आहे. त्यामध्ये वाढ केल्यास मनपास कायमस्वरूपी उत्पन्नाचे साधन निर्माण होईल. सनदी लेखापाल यांचेकडुन प्रस्तावासह प्राप्त प्राथमिक Feasilibity Reportतपासून घेणे उचित राहील असा अभिप्राय देणेत आलेला आहे.

उक्त बाबत धुळे मनपाच्या प्रशासकीय इमारतीच्या बाजूस असलेल्या सन ३४७८ या जागेत व्यापारी संकुल BOT /BOLT तत्वावर बांधणे बाबत झालेल्या ठरावानुसार आर्कीटेक्ट श्री.हेमंत भावसार यांना कार्यादेश देण्यात आलेले आहे.

आर्कीटेक्ट यांनी सादर केलेल्या प्रस्तावात सदर ठिकाणी असलेल्या ७७२२ स्के.मी. जागेपैकी व्यापारी संकुल बांधणेसाठी २१३४.९३ स्के.मी.जागा उपलब्ध आहे. एफ.एस.आय. धरून ५१९६.४५ स्के.मी. जागेत बांधकाम करता येवू शकणार आहे. या जागेत पार्किंग , ग्राउंड फ्लोअर , तळ मजला , पहिला मजला , दुसरा मजला व टेरेस अशा स्वरूपाचे बांधकाम नकाशे सादर केले आहे या नकाशा मध्ये धुळे मनपासाठी सभागृह बांधणेत येणार आहे.

उक्त बाबत म.उपायुक्त सो., यांनी नमूद केलेल्या मुद्दा प्रस्तावित भाड्याचे दर कमी आहे. आर्कीटेक्ट यांनी प्रस्तावात नमूद केलेले दर हे कमी किंवा जास्त असू शकतात परंतु सदर सादर केलेल्या प्रस्तावास मे.स्थायी समितीने मंजुरी दिल्यानंतर आर्कीटेक्ट यांना ई- निविदा तयार करतांना निविदा संचात मनपाच्या मंजूर दराप्रमाणे भाडे व घरपट्टी नमूद करणे बाबत सूचना करणेत येतील.

उक्त बाबत आर्कीटेक्ट यांनी धुळे मनपासाठी प्रशस्त सभागृह बांधणे बाबतचा नकाशा सादर केलेला आहे. दि.११/०१/२०२२ रोजी म.आयुक्त सो., यांच्या दालनात सदर प्रकल्पाचे विस्तृतपणे सादरीकरण करणेत आलेले आहे. सादरीकरणावेळेस म.महापौर सो., म.सभापती सो.,म.आयुक्त सो.,म.अति.आयुक्त सो.,म.सहा. आयुक्त व स्थायी समितीचे काही नगरसेवक व सबंधित अभियंते हजर होते. आर्कीटेक्ट यांनी Feasilibity Report जोडलेला आहे.

उक्त बाबत नगररचना विभागाकडील अभिप्राय नुसार , प्रस्तुत प्रस्तावात दिलेल्या आदेशानुसार , धुळे सि.स.नं. ३४७८ हि जागा धुळे शहर मंजूर विकास योजनेनुसार आ.क्र. २३८ प्राथ. शाळा आणि प्रशासकीय इमारत या आरक्षणाने बाधित होत असून विकास योजना अहवालानुसार त्यांचे क्षेत्र १.०५ हे आर. इतके नमूद केले असून गावठाण क्षेत्रात समाविष्ठ आहे. तसेच उक्त जागेत साक्री रोड लगत वाणिज्य क्षेत्र दर्शविलेले आहे.

उक्त अहवाल विचारात घेतला असता प्रशासकीय इमारतीच्या विकसन करण्यात आलेले आहे.तथापि प्राथ.शाळेसाठी असलेले आरक्षणात वाणिज्य वापर- करावायचे झाल्यास UDCPR मधील तरतूद क्र.४.२७ मधील (h) तरतुदीत खालीलप्रमाणे नमूद केलेले आहे.

h :- primary school / high school :- respective uses with their lower / ancillary uses along with canteen and ancillary uses including staff quarter , hotels.15% of the built up area may be permitted for commercial use on FSI related to the educational purpose on ground floor with a separate entry and exist.

उक्त प्रमाणे नगररचना विभागाकडील अभिप्रायानुसार UDCRP चा तरतुदीनुसार जागेचा १५% बांधकाम commercial कामाकरीता बांधकाम करणे अनुज्ञेय आहे. त्याप्रमाणे सि.स.नं. ३४७८ मध्ये ७/१२ उतारा नुसार ७७२२.५५ चौ.मी. १५% म्हणजेच ११५८.१८ चौ.मी. बांधकाम करणे अनुज्ञेय आहे.बांधकाम नकाशा प्रमाणे प्रथम माजल्यास १४५४.२६ चौ.मी. पैकी ६४३.३७ चौ.मी. ऑफिस दर्शविलेली आहे. ती वजा जाता ८१०.८८ चौ.मी. commercial आहे. दुसरा व तिसरा मजला मनपाचे सभागृह व ऑफिस दर्शविलेले आहे. त्यामुळे १५% जागेपेक्षा कमी असल्याने सदरचा विषय मे.स्थायी समितीपुढे ठेवणे बाबत बांधकाम विभागा मार्फत प्रस्तावित आहे.

उक्त बाबत म.अति.आयुक्त यांनी PMC मार्फत अहवाल सादर करणेबाबत कळविले होते. त्यानुसार खालीलप्रमाणे PMC मार्फत देण्यात आलेला आहे.

A) Details of Land & Consumed F.S.I. Statement :

| Sr. No. | Description | Area of Land in Sqm. |
|---|---|---|
| 1 | Area of Land | 2,134.93 |
| 3 | Permissible F.S.I. including Anciallary F.S.I. | 4.00 |

| | | |
|---|---|---|
| 4 | Consumed F.S.I. | **2.43** |
| **5** | **Total Built Up Area** | **5,196.45** |

| Sr. No. | Floor | Built Up Area in Sqm. | Carpet Area in Sqm. |
|---|---|---|---|
| i) | Basement Parking | 0 | - |
| ii) | Ground Floor | 1,454.26 | 688.95 |
| iii) | First Floor | 913.88 | 692.26 |
| iv) | Second Floor | 1,434.36 | 1,243.41 |
| v) | Usable Terrace | 1,393.95 | 1,284.64 |
| | **Total** | **5,196.45** | **3,909.26** |

B) Details of Construction Cost :

| Sr.No. | Particulars | Area in Sqm. | Rate per Sqm. | Amount in Rs. |
|---|---|---|---|---|
| **A** | **Developer Component** | | | |
| i) | Basement Floor - Parking | 1,511.58 | 25,000.00 | 3,77,89,500.00 |
| ii) | Ground Floor | 1,511.58 | 31,339.00 | 4,73,71,405.62 |
| iii) | First Floor | 1,138.69 | 28,193.00 | 3,21,03,087.17 |
| iv) | Second Floor | 810.32 | 25,410.00 | 2,05,90,231.20 |
| v) | Usable Terrace | 1,510.82 | 15,000.00 | 2,26,62,300.00 |
| | Total Construction Area | **6,482.99** | | |
| | | | **Sub Total - A Rs.** | **16,05,16,523.99** |
| | | | **Add - For Electrification (5%)** | **80,25,826.20** |
| | | | **Add - For Rain Water Harvesting (1%)** | **16,05,165.24** |
| | | | **Add - For Fire Fighting (1%)** | **16,05,165.24** |
| | | | **Add - Technical Service Charges (1%)** | **16,05,165.24** |
| | | | **Total Construction Cost of Developer Component (A) Rs.** | **17,33,57,845.91** |
| **B** | **DMC Component** | | | |
| i) | First Floor ( Sabhagraha) | 94.91 | 28,193.00 | 26,75,797.63 |
| ii) | Second Floor ( Sabhagraha) | 624.28 | 25,410.00 | 1,58,62,954.80 |
| | Total Construction Area | **719.19** | | |
| | | | **Add - For Post Tensioned (PT BEAMS) As per design** | 17,97,000.00 |
| | | | **Sub Total - B Rs.** | **2,03,35,752.43** |
| | | | **Add - For Electrification (5%)** | **10,16,787.62** |
| | | | **Add - For Rain Water Harvesting (1%)** | **2,03,357.52** |
| | | | **Add - For Fire Fighting (1%)** | **2,03,357.52** |
| | | | **Add - Technical Service Charges (1%)** | **2,03,357.52** |
| | | | **Total Construction Cost of DMC Component (B) Rs.** | **2,19,62,612.62** |
| | | | **Total Construction Cost ( A + B )** | **19,53,20,458.53** |
| | | | **ADD - GST @ 18%** | **3,51,57,682.54** |
| | | | **Total Project Cost Rs.** | **23,04,78,141.07** |

C) Details of Revenue :

| Sr. No. | Particulars | As per Ready Reckoner | | | As per Consultant | | | As per Market Rates | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | Area | Rate | Amount | Area | Rate | Amount | Area | Rate | Amount |
| **A** | **Developer Component** | | | | | | | | | |
| i) | Ground Floor | 688.95 | 55,300.00 | 3,80,98,935.00 | 688.95 | 1,50,000.00 | 10,33,42,500.00 | 688.95 | 1,65,000.00 | 11,36,76,750.00 |
| ii) | First Floor | 597.35 | 30,024.00 | 1,79,34,836.00 | 597.35 | 70,000.00 | 4,18,14,500.00 | 597.35 | 80,000.00 | 4,77,88,000.00 |
| iii) | Second Floor | 818.87 | 26,688.00 | 2,18,54,003.00 | 818.87 | 55,000.00 | 4,50,37,850.00 | 818.87 | 60,000.00 | 4,91,32,200.00 |
| iv) | Terrace Floor | 1,284.64 | 23,352.00 | 2,99,98,913.00 | 1,284.64 | 40,000.00 | 5,13,85,600.00 | 1,284.64 | 45,000.00 | 5,78,08,800.00 |
| | | **3,389.81** | | **10,78,86,687.00** | **3,389.81** | | **24,15,80,450.00** | **3,389.81** | | **26,84,05,750.00** |
| B | **DMC Component** | | | | | | | | | |
| i) | First Floor ( Sabhagraha) | 94.91 | 30,024.00 | 28,49,578.00 | 94.91 | 70,000.00 | 66,43,700.00 | 94.91 | 80,000.00 | 75,92,800.00 |
| ii) | Second Floor ( Sabhagraha) | 424.54 | 26,688.00 | 1,13,30,124.00 | 424.54 | 55,000.00 | 2,33,49,700.00 | 424.54 | 60,000.00 | 2,54,72,400.00 |
| | | **519.45** | | **1,41,79,702.00** | **519.45** | | **2,99,93,400.00** | **519.45** | | **3,30,65,200.00** |

## D) Developer Profit:

| Sr.No. | Particulars | As per Ready Recokner | As Per Consultant Calculation | As per Maket Rates |
|---|---|---|---|---|
| i) | **Total Revenue from Sublease** | 10,78,86,687.00 | 24,15,80,450.00 | 26,84,05,750.00 |
| ii) | **Less - Total Construction Cost** | 23,04,78,141.07 | 23,04,78,141.07 | 23,04,78,141.07 |
| | **Total Rs.** | -12,25,91,454.07 | 1,11,02,308.93 | 3,79,27,608.93 |
| | **Developers Profit Rs.** | **-12,25,91,454.07** | 1,11,02,308.93 | **3,79,27,608.93** |

## E) Expected Premium:

| Sr.No. | Particulars | As per Ready Recokner | As Per Consultant Calculation | As per Maket Rates |
|---|---|---|---|---|
| i) | Land Area in SQM. | 2,134.93 | 2,134.93 | 2,134.93 |
| ii) | Rate | 9,760.00 | 20,000.00 | 22,000.00 |
| iii) | Amount | 2,08,36,917.00 | 4,26,98,600.00 | 4,69,68,460.00 |
| iv) | 50% of Land Cost | 1,04,18,459.00 | 2,13,49,300.00 | 2,34,84,230.00 |
| v) | 50% of Developers Profit | -6,12,95,727.00 | 55,51,154.00 | 1,89,63,804.00 |
| | **TOTAL EXPECTED INCOME Rs.** | **-5,08,77,268.00** | 2,69,00,454.00 | **4,24,48,034.00** |
| | | | | |
| Less : | **Const. Cost of DMC Component** | 2,19,62,612.62 | 2,19,62,612.62 | **2,19,62,612.62** |
| | **Expected premium other than Const. Cost. Of DMC Component** | **-7,28,39,881.00** | 49,37,841.00 | **2,04,85,421.00** |

**Note -** **As per market rate calculationss, DMC will get Rs. 4,24,48,034.00 as premium from Developer out of which Rs. 2,19,62,612.62 to be received in form of Construction of DMC Component and Rs. 2,04,85,421.00 to be received in the form of Cheque/demand draft.**

F) Rent Income

| Sr.No. | Floor | Area in Sqm. | Rent per Sqm. Per Month | Rent Per Year |
|---|---|---|---|---|
| a) | Ground Floor | 688.95 | 35.00 | 2,89,359.00 |
| b) | First Floor | 597.35 | 35.00 | 2,50,887.00 |
| c) | Second Floor | 818.87 | 35.00 | 3,43,925.40 |
| d) | Terrace Floor | 1,284.64 | 25.00 | 3,85,392.00 |
| | | | **Total Rs.** | **12,69,563.40** |
| | | | | |
| **Note** | **1) As the project is on B.O.L.T.Basis, so rate of monthly rent of Developer Component is at lower side. Rent rates are compared with other Municipal Corporation rent rates of B.O.L.T. Complexes and are similar with them.** | | | |

G) Property Tax Income:

| Sr.No. | Floor | Area in Sqm. | Tax per Sqm. | Tax Per Year |
|---|---|---|---|---|
| a) | Ground Floor | 688.95 | 242.00 | 1,66,725.90 |
| b) | First Floor | 597.35 | 242.00 | 1,44,558.70 |
| c) | Second Floor | 818.87 | 242.00 | 1,98,166.54 |
| d) | Terrace Floor | 1,284.64 | 242.00 | 3,10,882.88 |
| | | | **Total Tax to be Received Per Year** | **8,20,334.02** |

**आर्कीटेक्ट हेमंत भावसार** नाशिक यांनी सादर केलेल्या प्रकल्प अहवालात नमूद केलेनुसार मनपास खालील बाबी मिळणार आहेत.

| | | | |
|---|---|---|---|
| **१.** | **व्यापारी संकुलाच्या इमारतीच्या प्रकल्पाची किंमत रक्कम रु.** | : | **२३,०४,७८,१४१.०७** |
| **२.** | **मनपा घटकातील सभागृह बांधकामाचा खर्च रू.** | : | **२,१९,६२,६१२.६२** |
| **३.** | **प्रिमीयम रक्कम रु.** | : | **२,०४,८५,४२१.००** |
| **.४** | **मनपास आवर्ती उत्पन्नाच्या )Recurring Income ( .स्वरुपात प्रतिवर्ष खालीलप्रमाणे उत्पन्न मिळणार आहे** | | |
| i) | प्रति वर्ष भाडे रक्कम रु. | : | १२,६९,५६३.४० |
| ii) | प्रति वर्ष मालमत्ता कर रक्कम रु. | : | ८,२०,३३४.०२ |
| | | : | **२०,८९,८९७.४२** |

उक्त बाबत PMC अहवाल, नगररचना विभागाच्या अहवाला नुसार व सहाय्यक संचालक, नगररचना विभाग यांचा अहवाल, स्थानिक CAयांचा अहवाल, मनपा पनलवरील औरंगाबाद हायकोर्ट वकील यांचे कडील अहवाल या कामाची ई- निविदा प्रसिद्ध करणेचा अगोदर प्राप्त करून घेण्याची जबाबदारी बांधकाम विभागाची राहील. या अगोदर PMC व नगररचना विभागाचा अहवालानुसार सदरचा विषय अधिमुल्य रक्कम निश्चित करणेसाठी सदरचा विषय मे.स्थायी समितीकडे पाठविणे आवश्यक आहे.

उक्त बाबत म.अति. आयुक्त यांच्या कडील अभिप्राय नुसार शाळा पाडण्याचा ठराव व व्यापारी संकुल उभारण्याचा ठराव क्र.१०० दि.२१/०३/२०१८रोजी झालेला आहे. तूर्तास स्थायी समितीपुढे प्रारुप अधिमुल्य निश्चितीसाठी प्रकरण सादर करणे अभिप्राय देण्यात आलेला आहे.

उक्त विषय म.आयुक्त सो., यांच्या कडील अभिप्रावानुसार वरील सर्व मुद्दे व निविदा समिती व याबाबत सर्व बाबींची पूर्तता करणेच्या अधीन कायदेशीर बाबींची पूर्तता करणेचे अधीन मा.स्थायी समितीकडे पाठविणे कामी स्थायी मंजुरीची आवश्यकता असल्याने तसेच सदरचा विषय मे.स्थायी समिती पुढे मंजुरीसाठी सादर झालेला आहे.

सदर प्रस्ताव मे. स्थायी समितीपुढे सादर झाला असता सन्मा.सदस्यांच्या सहमतीने व कार्यालयीन अहवालास अधिन राहून धुळे मनपाच्या नवीन प्रशासकीय इमारतीच्या बाजूस जुनी गुजराथी शाळा सि.स.नं. ३४७८ येथे B.O.L.T./ B.O.T तत्वावर शॉपींग कॉम्प्लेक्स च्या प्रकल्प किंमत रु.२३,०४,७८,१४१.०७ यास आर्थिक व प्रशासकीय मंजुरी देण्यांत येत असून याकामी कार्यालयीन अहवालात निश्चित केलेल्या मनपाच्या घटकाच्या बांधकामाची किंमत २,१९,६२,६१२.६२ व रोख प्रिमीयम रक्कम रुपये. २,०४,८५,४२१.०० अशा एकुण अंदाजित अधिमूल्य रक्कम रु. ४,२४,४८,०३४.०० यास मान्यता देण्यांत येत आहे.

या प्रस्तावासंदर्भात सक्षम अधिका-यांनी दिलेले अभिप्राय तपासून व त्यांची पूर्तता करुन विभागाने तात्काळ पुढील कार्यवाही व निविदा प्रक्रिया करावी.

**सुचक:- श्री.सुनिल तुळशीराम बैसाणे**

**अनुमोदक:- श्री. शितल मोहन नवले** **सर्वानुमते मंजुर,**

**सही/-X X X**
**सभापती,**
**स्थायी समिती,**
**धुळे महानगरपालिका धुळे**

| | |
|---|---|
| विषय क्रमांक:- १९८ | मा. सभापती सो. स्थायी समिती यांचे पत्रानुसार ऑल इंडिया इन्स्टीटयुट ऑफ लोकल सेल्फ गव्हमेंट या संस्थेकडील मनपा संदर्भातील कामकाज काढुन घेणेबाबत सूचित केले आहे. त्यावर विचार करणे. |
| म. नगरसचिव | नगरसचिव यांनी विषयांचे वाचन केले. |
| म. शितल नवले | ऑल इंडीया इन्स्टीटयुट ऑफ लोकल सेल्फ गव्हमेंट संदर्भात माहिती कोण देऊ शकते. |
| म.अति.आयुक्त | ऑल इंडीया इंन्स्टीटयुट ही धुळे मनपात दोन प्रकारचे काम करते. पहिले काम जे आहे स्वच्छ भारत मिशन अनुषंगाने त्यांना आऊटसोर्स करण्याचे आहे. ते अडीच लाख प्रतिमाह आहे दुसरे जे बायोगॅससाठी क्लस्टर, मेन्टेनंस याचे आहे. |
| म.शितल नवले | आपण त्यांनाअडीच लाख रुपये प्रति महिना फी देतो |
| म.अति आयुक्त | सदर अडीच लाख रुपये स्वच्छ सर्वेक्षणच्या कामासाठी देण्यात येतात |
| म.शितल नवले | स्वच्छ सर्वेक्षणसाठी ते काय काम करतात. |
| म.अति.आयुक्त | स्वच्छ सर्वेक्षण बाबत शासनाकडुन प्राप्त झालेल्या निर्देशानुसार कोणती कार्यवाही करावयाची आहे त्यानुसार कोणते उपक्रम घेणे गरजेचे आहे याबाबत त्यांच्याकडून मार्गदर्शन घेतले जाते. व त्यानुसार त्यांच्याकडुन कार्यक्रम व उपक्रमांची अंमलबजावणी केली जाते तसेच त्याबाबतचे सर्व अहवाल व डॉक्युमेंटेशन त्यांच्यामार्फत करण्यात येते |
| म.शितल नवले | अडीच लाख प्रति महिना त्यांना फी देतो साधारणत: 30 लाख वर्षाला. त्यांचे किती कर्मचारी पूर्ण वेळ असतात. |
| म.अति.आयुक्त | त्यांचे दोन कर्मचारी असतात. परंतु विभागीय आयुक्त कार्यालयाला सध्या एक कर्मचारी त्यांच्या आदेशानुसार देण्यात आलेला आहे त्यामुळे एकच कर्मचारी आहे विभागीय आयुक्त कार्यालयात तिथे प्रत्येक मनपाचा एक-एक कर्मचारी घेऊन सेटअप तयार केला आहे. |
| म.शितल नवले | त्यांनी आपल्याला एक कर्मचारी दयायला पाहिजे. काय हरकत आहे. अडीच लाख रुपये महिना देतोय. त्यांचा विषय आहे. हि एक इंन्स्टीटयुट स्वच्छ भारतसाठी अधिकृत रजिस्ट्रेशन केलेली. अशा किती इंन्स्टीटयुट असतील भारतामध्ये? |

| | |
|---|---|
| म.अति आयुक्त | ऑल इंडीया लेव्हलला ही एकच आहे. बाकीच्या पण असतील. ही पूर्वापार चालत आलेली इंन्सटीटयुट आहे. |
| म.शितल नवले | स्वच्छ भारत 2015 ला चालू झाले 2015 ते 2022 सात वर्षे झाले. सात वर्षात आपल्याला पर्याय नाही सापडला का? का आपण प्रयत्न नाही केला? |
| म.अति आयुक्त | बापूर्वी आपण स्वत: करायचो मागच्या वर्षी हा निर्णय घेतला महापालिका स्तरावरती ऑल इंडीया इन्सटीटयुटला दयायचे आहे. |
| म.शितल नवले | साहेब एक तर हे काय काम करतात हे सभागृहाला माहिती नाही. हे तुमच्या हिताचे कसं असू शकते हे सांगतो. यांचे काम असेसमेंट चे आहे. वॉटरग्रेस न आपल्याला इतका त्रास दिला. आपण एक वर्षा पासून यांची मदत घेऊ शकलो असतो त्या ब्लॅकलिस्ट करायला. वॉटरग्रेस वाला काम करतो किंवा नाही करत हे किमान पत्र देऊन अभिप्राय दयायला पाहिजे होता. |
| म.अति.आयुक्त | मी सभापतीच्या वतीने सांगतो मी आल्यानंतर एक पत्र देऊन रेकॉर्ड तयार केले. वॉटरग्रेसच्या कामाला निर्बंध केले. |
| म.शितल नवले | अभिनंदन साहेब काम केले. जेवढे पैसे मोजतोय तेवढा मोबदला मिळत नाही. सभापतींचा रोष पण बरोबर आहे. काही जे प्रोजेक्ट त्यांना लाईसर्नींग म्हणून लावले आहे. आपल्याला काय फायदा करुन दिला आहे? माझी वसुंधरा मध्ये मी माहिती काढली माझी वसुंधरामधुन आपण 75 कोटी रुपये आणु शकलो असतो. पण नाही आणु शकलो. फक्त भिंतीच पेंट केल्या फक्त पिंजरे जे घोटाळे झाले ते. चार्जींग स्टेशन एकही लावले नाही. आज इलेक्ट्रीक वाहनांची संख्या किती वाढलीय. माझ्या ऑफिस स्टाफकडे एकही पेट्रोल गाडी नाही. माझा खर्च 3000 वरुन 200 ते 300 वर आला महिन्याला सगळया इलेक्ट्रीक वाहने आहे. समजा त्यांना फ्री ऑफ कॉस्ट इलेक्ट्रीक चार्जींग स्टेशन उघडले असते, हे या इंन्सटीटयुटचे काम होते. हे काय काम करतात, टीम आली दिल्लीहून कागदं जमवून देतात. झाले काम. 14 व्या वित्त आयोगामध्ये गोसावी साहेब होते डी.पी.आर. वाचला त्यात 1 कोटी जनजागृती साठी होते. त्यात काम काय केले यांनी? मी त्यांना एक प्रस्ताव टाकला होता. ज्या आशा वर्कर आहे त्यांचे ट्रेनिंग करुन ओला कचरा,सुका कचरा वेगळा कसा करायचा आशा वर्कर शहरात बरोजगार आहे त्या घरोघरी जातील कचरा वर्गीकरण शिकवतील कुठे तरी सुरुवात करायला पाहिजे होती. पण काहीच केले नाही. 1 कोटी रुपयाचे फक्त बॅनर लावले हे काम ऑल इंडीया इन्सटीटयुटचे होते. यांनी काही फायदा करुन दिला नाही मनपाला. फक्त पैसे लुबाडले यांनी माझे तर म्हणने आहे महासभेत विषय घ्या. की 30 लाख वर्षाला घेता आमच्यासाठी काय केले म्हणून? मी विनंती करतो यांनी केलेल्या कामाचे ऑडीट व्हावे. यांनी मनपाला कुठल्या स्कीम आणून दिल्या? त्याचे देखील ऑडीट व्हावे. कर्तव्यात कसुर असेल तर यांना डिस्क्लीफाय करुन दुसरी एजन्सी लावावी. मी अशी विनंती करतो. |
| म.सुनिल बैसाणे | या ठिकाणी शितल भाऊंनी अत्यंत चांगले आणि सोप्या भाषेत या विषयाला आपल्या समोर ठेवले आहे विषय पत्रीकेवरचा विषय हा धुळे मनपाच्या हिताचा आहे. धुळे मनपाचे हित जपले जात नाही. म्हणून सदरच्या संस्थेला काम न करता कुठल्याही पध्दतीचा पैसा देण्यात येऊ नये. अडीच लाख फक्त एका कर्मचाऱ्याला महिन्याची फी देतोय आपण, माझ्या माहिती नुसार धुळयाचे जिल्हाधिकाऱ्यांना पण एवढा पगार नसेल. धुळे मनपाच्या आयुक्तांना पण नसेल. त्या एजन्सीच्या एका कर्मचाऱ्याला अडीच लाख रुपये मोजतो. ही खाजगी संस्था आहे. अशा खाजगी संस्था धर्मादाय आयुक्तांकडे अनेक रजिस्ट्रेशन होत राहतात. त्यांच्या सोईनुसार उद्देश टाकले जातात. त्यांची अंमलबजावणी होती की नाही हे तुम्हाला ही माहिती आहे. वर्षाला 30 लाख फी त्यानंतर वेगवेगळे निविदा करतात त्याचे पैसे वेगळे असतात. धुळे मनपाला फायदा होण्यासाठी किती निविदा प्रकिया केल्या? |
| म.अति.आयुक्त | स्वच्छ भारत मिशन मध्ये निविदा प्रक्रीया केल्या जात नाही. |
| म.सुनिल बैसाणे | गेल्या वर्षभरात एक रुपयाचे शासन स्तरावरुन कुठल्या योजनेचा फायदा होण्यासाठी कुठलेही काम केले नाही. या संस्थेला चार-चार ,पाच-पाच वेळा अधिकारी कर्मचारी फोन करतात तरी ते कर्मचारी फोन उचलत नाही. या संस्थेला बायोगॅस चा विषयी यांना विनंती करुन प्रेझेंटेशन साठी बोलवण्यात आले, परंतु आम्हाला येता येणार नाही. असे सांगीतले. या संस्थेचे काम त्वरीत बंद करण्यात यावे. |

यांना कुठल्याही प्रकारची फी देण्यात येऊ नये. अडीच लाख दरमाह देतात.अडीच लाख अयुक्तांच्या माध्यमातून देण्यात येत असेल तर त्यांचया पगारातून दयावे. आमच्या धुळे कर नागरीकांच्या खिशातून दिले जाणार नाही.

म.सभापती — इथे जे लोक काम करुन गेले त्यांचे हे पाप आहे एवढे फक्त लक्षात घ्या.

म.सुनिल बैसाणे — त्यांचे पाप आहे आपण वाटेकरी नाही बनायचे.

म.सभापती — शेवटच्या सभेत का असेना आपल्याला हा निर्णय घेता येऊ शकतोय.

म.सुनिल बैसाणे — पाप त्यांनी जरी केले असेल त्या पापाचे वाटेकरी होण्याचे काम करु नका त्यांचे पाप त्यांना लख-लाभ या संस्थेने ज्या-ज्या निविदा प्रकीया केल्या असतील जी-जी निविदा प्रकीया पूर्ण झाली नसेल त्या निविदा प्रकीया रद्द करण्यात याव्या कारण यावर आक्षेप आहे. या संस्थेने विशिष्ट संस्थेला लाभ मिळावा याची गोपनियता भंग करण्याचा प्रयत्न केला म्हणून ती निविदा प्रकीया रद्द करावी. दिले जाणारे मानधन देण्यात येऊ नये. देण्यात येत असेल तर जे-जे अधिकाऱ्यांच्या सहया असतील त्यांच्या पगारातून दयावे. हा विषय रद्द करावा.

म.सभापती — या संस्थेचा अनुभव घेतला यांनी चार-चार, आठ-आठ महिने निविदा प्रक्रीयेला लावले. त्याच बरोबर अडीच लाख दरमाह देतोय परंतु प्रत्येक निविदेवर वर्क ऑर्डर देऊन जास्तीची रक्कम देतो. या ठिकाणी ठरावात नमुद करतो की, सदर ऑल इंडीया इंन्सटीटयुटचे काम काढून घेण्यात यावे. धुळे मनपात सुध्दा चांगल्या स्तरावर ईंजिनिअर आहेत. समजा त्यांच्याही क्षमतेबाहेर जात असेल तर पी.डब्ल्यु.डी. कडुन सदरच्या निविदा बनवु शकतो किंवा इतरही दुसरी एजन्सी स्वस्तात उपलब्ध होउु शकते. आता त्यांनी जे काही कर्यादेश दिले असतील ते रद्द करण्याचे आदेश देतो.ते स्थानिक पातळीवर निविदा प्रकीया करण्याचे किंवा प्रसिध्द करण्याचे काम करण्यात यावे. यांना जे काही बिले अदा केले जाणार आहे, ते अदा करु नये

**धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर २१६ दिनांक ३१/०१/२०२२**

मा. सभापती सो. स्थायी समिती मनपा धुळे यांचे दि. २८/१/२०२२ च्या पत्रानुसार ऑल ईंडिया इन्स्टीटयुट ऑफ लोकल गव्हर्मेंट ही शासनाची स्वायत्त संस्था आहे. सदर संस्था तांत्रिक व प्रशासकीय कामे तसेच नगरपालिका व महानगरपालिकांना मार्गदर्शन करणेचे काम करीत असते. सदर संस्थेमार्फत निविदा तयार करुन घेणे तसेच त्या कामांबाबत कन्स्ट्रक्शन तसेच इतर बाबींवर १ वर्षापर्यंत मॉनिटरींग करण्यांचे देखील काम करतात.धुळे महानगरपालिकेमार्फत देखील सदर संस्थेमार्फत काही विशिष्ट निविदा तयार करणेचे देण्यांत आले होते. परंतु सदर संस्थेमार्फत जाणीव पूर्वक खूपच जास्त विलंब केला गेला. त्यामुळे मनपाचे आर्थिक नुकसान होते. त्याकारणास्तव ऑल ईंडिया इन्स्टीटयुब् ऑफ लोकल सेल्फ गव्हर्मेंट या संस्थेकडील कामकाज काढून घेणेत आवश्यक आहे. तसेच या कामाचे देयक चौकशी केल्याशिवाय अदा करण्यांत येवू नये.

तरी ऑल ईंडिया इन्स्टीटयुट ऑफ लोकल सेल्फ गव्हर्मेंट या संस्थेकडुन धुळे महानगरपालिकेचे कामकाज काढून घेण्याबाबत व देयक थांबविणेबाबत सदर विषय स्थायी समिती समोर सादर झाला असता सन्मा.सदस्यांनी केलेल्या चर्चेनुसार व सर्व सन्मा. सदस्यांच्या सहमतीने ऑल ईंडिया इन्स्टीटयुट ऑफ लोकल सेल्फ गव्हर्मेंट या संस्थेच्या कार्यपध्दतीबाबत साशंकता असल्याने सदर संस्थेस महानगरपालिके मार्फत देण्यांत आलेले कार्यादेश रद्द करावे व तसेच संस्थेकडुन काम काढून घेण्यांत यावे.सदर संस्थेला कोणतेही देयके अदा करु नये.

सुचक:- श्री. संजय सुधाकर जाधव सभापती
अनुमोदक:- श्री. सुनिल तुळशीराम बैसाणे

**सर्वानुमते मंजुर,**
**सही/-X X X**
**सभापती,**
**स्थायी समिती,**
**धुळे महानगरपालिका धुळे**